# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१९/१/२००४

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९/१/२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३८. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३९. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ४०. | श्रीमती जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४१. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४२. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४३ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १७. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ५२ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५४. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेद | ५५. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५६. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५७. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २३. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्रीमती किरण लखी माखिजा, |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २७. | श्रीमती.मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २९. | श्रीमती. मोना वनवारी | ६४. | श्री. संजय भठीजा |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६६. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३३. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६८. | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६९. | श्री. इदनानी राजू चंद्रभान, |
| ३५. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३६. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७१. | श्री. माखिजा हरदास |
| ३७. | श्री. रमेश महादेव चव्हाण | ७२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर

मा. सदस्य १. श्री. वाघे शामु बाबु, २. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ३. श्री. नाना आनंदा पवार , ४. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ५. श्री. मोहन साधवानी, ६. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, ७. श्रीमती निना प्रकाश नाथानी, ८. श्री. बदरीया राजेश नानिकराम हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :- आमच्या जाजक समाजाचे श्री. दादा मोटुमल शर्मा यांचे निधन झाले असून त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौरजी, आम्ही येथे २-४ जणांना श्रध्दांजली अर्पित करु इच्छितो. आमचे पूर्व नगरसेवक श्री. पेहलुमल वासवानी तसेच श्री. दादा मोटुमल शर्मा यांना पण दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मा. महापौरजी, अजून २-४ जणांना येथे श्रध्दांजली अर्पित करावी, पुण्यनगरी, वार्ताहर, मुंबई चौफेर या वृत्तपत्र समुहाचे संस्थापिका श्रीमती गयाबाई शिंगोटे यांचे या महिन्यात निधन झाले आहे. पखवाज वादक श्री. शंकर बापू आकेगावकर यांचे सुध्दा या महिन्यात निधन झाले आहे. जय संगित समिक्षक श्री. श्रीकृष्ण दळवी , कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे यांचे सुध्दा या महिन्यात निधन झाले आहे व नामांतर आंदोलनात जे आंदोलक शहिद झाले त्यांना येथे श्रध्दांजली अर्पित करावी. अशी मी आपणा सर्वांना विनंती करतो.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- आर.एस.एस. चे व भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष , माजी अध्यक्ष श्री. कुशाभाऊ ठाकरे यांचे सुध्दा निधन झाले त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित करावी.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):- कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन उभे राहून श्रध्दांजली अर्पित करावी.

## शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :-१) श्री. किशोर वनवारी
२) श्रीमती कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :-१) श्री. शांताराम निकम
२) श्री. लाल पंजाबी

पूर्व नगरसेवक श्री. पेहलुमल वासवानी व श्री. दादा मोटुमल शर्मा, तसेच पुण्यनगरी, वार्ताहर, मुंबई चौफेर या वृत्तपत्र समुहाचे संस्थापिका श्रीमती गयाबाई शिंगोटे , पखवाज वादक श्री. शंकर बापू आकेगावकर , जय संगित समिक्षक श्री. श्रीकृष्ण दळवी यांचे या महिन्यात निधन झाले आहे. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे व नामांतर आंदोलनात जे आंदोलक शहिद झाले. तसेच आर.एस.एस. चे व भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष , माजी अध्यक्ष श्री. कुशाभाऊ ठाकरे यांचे सुध्दा निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या सर्व मृतांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास

चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ११२ (अ)</u>                    <u>दिनांक:-१९/१२/२००३.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. पेहलुमल वासवानी, श्री. दादा मोटुमल शर्मा, श्रीमती गयाबाई शिंगोटे, श्री. शंकर बापू आकेगावकर, श्री. श्रीकृष्ण दळवी, श्री. रामकृष्ण हेगडे, श्री. कुशाभाऊ ठाकरे या सर्वांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी दोन मिनिटे मौन धारण करुन मृतात्म्यांना श्रध्दांजली अर्पित केली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी महासभा सुरु होण्यापूर्वी मी पूर्ण सदनास विनंती करतो की, जसे मागच्या सभेत मा. महापौरांनी मला परवानगी दिली होती. त्यास अनुसरुन आमचे जे गुरु आहेत झुलेलालजी यांची मुर्ती मंचावर आणून ठेवली आहे. तरी १० मिनिटांसाठी आमचे महापौर, उप-महापौर, स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब , सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व जे पण स्वागत करु इच्छितात व इतर कुणाला जर स्वागत करायचे असेल तर त्यासाठी १० मिनिटे महासभेचे कामकाज सुरु होण्यापूर्वी हा कार्यक्रम करावा. तर झुलेलालजी यांच्या पुतळयाच्या स्थापनेबाबत व नविन वर्षामुळे सर्वांचे तोंड गोड करु इच्छितो. त्यास पण परवानगी दयावी. हा कार्यक्रम संपल्यावर महासभा १० मिनिटांनी सुरु करण्याची अनुमती दयावी तर खुपच चांगले होईल.

<u>मा. महापौर :-</u> जसे सभागृह नेत्यांनी सांगितले आहे, त्यानुसार झुलेलालजी यांच्या पुतळयाची स्थापना करुन हार पुष्प घालण्याची परवानगी देत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> तुम्हां सर्वांची जर सहमती असेल तर, यु.टी. आय. बॅंकेतर्फे एक प्रतिनिधी आले आहेत ते तुम्हां सर्वांच्या नावाने बॅंकेत खाते उघडु इच्छितात. तुम्हांला ए.टी.एम. कार्ड देणार, तुम्हांला दर महिन्याला जे मानधन मिळते, तर महापालिकेच्या बाजूला जे यु.टी.आय. ची शाखा आहे तेथून तुम्हांला कधीही पैसे मिळू शकतात. ऑल ओव्हर इंडियामध्ये तुम्ही कुठेपण एटीएम कार्डद्वारे पैसे काढु शकता. तुमची जर हरकत नसेल तर सभा सुरु असतांना एकेकाचे फॉर्म भरुन घेतील.

<u>काही सदस्य :-</u> ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>सन्माननिय महापौरजी, समुद्राचे देव, दर्यादेव असे मानले जाणारे झुलेलाल यांचे या ठिकाणी मुर्ती ठेवून त्याची पुजा अर्चा करुन सदभावनाने सर्व पक्षीय, सदस्य व पदाधिका-यांनी पुजा केलेली आहे. आनंदाचा दिवस आहे याठिकाणी सभागृह नेता यांचे मी अभिनंदन करतो आणि आभारही मानतो, आज बरोबर या सभागृहामध्ये देव पुजा झाल्यानंतर पावित्र्य असे लाभलेले आहे या सभागृहाला, सभागृहनेत्याला, सभागृहामध्ये यापूर्वी सांगु इच्छितो हे पावित्र्य

*कायम राखण्यासाठी आपल्या हिंदुत्त्वाच्या अजूनही देव-देवता याठिकाणी आहेत, उदा. बजरंगबली, श्रीराम, त्याचप्रमाणे भगवान बौध्द यांच्याही मुर्त्या याठिकाणी बसविण्यांत याव्यात. अशी मी याठिकाणी सभागृह नेत्त्याच्या वतीने आणि सर्व पक्षाच्या वतीने महापौर यांना विंनती करु इच्छितो, धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, आमच्या मा. सभागृह नेत्त्यांनी भगवान झुलेलालजी यांच्या मुर्तीची स्थापना केली आहे, आनंदाची गोष्ट आहे आम्ही अभिनंदन करतो व मा. महापौरजी आपणांस विनंती करतो की, पुढच्या महासभेत श्री. भुल्लर महाराज, श्री. होशीयारसिंग व माझ्या तर्फे व आमच्या उल्हासनगरच्या समुदायातर्फे गुरुनानकजी यांच्या मुर्तीची स्थापना करु धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, सभा सुरु होण्याच्या अगोदर मी एका प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो का? नाही, नंतर? ठिक आहे.*

*<u>मा. सदस्य श्रीमती कमला शर्मा :-</u> मा. महापौरजी, मी पुढच्या सभेत गौतम बुध्द यांचा पुतळा आणेन.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> पुढच्या सभेत मी माझा पुतळा आणून बसवितो.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आम्हांला लवकर ती संधी दया.*

*<u>मा. उप-महापौर :-</u> नाही, नाही तुम्हांला तर भरपूर आयुष्य असू दे.*

*<u>मा. महापौर :-</u>मला खुप आनंद होत आहे की, श्रीमती कमला शर्मा यांनी म्हटले की, गौतम बुध्दाचा पुतळा आणेन, विरोधी पक्ष नेत्त्यांनी सुध्दा सांगितले आहे , पुढच्या महासभेत जरुर गौतम बुध्दाचा पुतळा आणावा. धन्यवाद.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रलंबित प्रश्न क्र. २२१ चा उप-प्रश्न हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> प्रश्नोत्त्तराचा तास सुरु होण्यापूर्वी, मागच्या महासभेत श्री. अण्णा पाटील, श्री. विश्वनाथ पाटील यांनी २१० तबेला विषयी विचारले होते, प्रश्न क्र. २१९ होता. त्याप्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा झाली. असे सदस्य अनेकवेळा प्रश्न विचारतात, त्या प्रश्नाला उत्त्तर बरोबर मिळाली नाही की, सभागृहामध्ये चर्चा होते आणि प्रशासनातर्फे उत्त्तरे दिली जातात, पण त्या उत्त्तराची अंमलबजावणी प्रशासनाकडुन कुठे होत नाही. त्याची एक-दोन उदाहरणे मी देवू शकतो. तबेलाचा प्रश्न मागच्या महासभेमध्ये आला , या सभेमध्ये आला होता त्यावेळी मी शांतीनगरच्या तबेल्याबाबत या सभागृहामध्ये चर्चा केली होती आणि त्यावेळेस उत्त्तर देण्यात आले होते. त्यावेळेस या शहराचे राहणारे नागरीक महापालिकेला का घाबरत नाही असे पण उदाहरण दिले होते. अजूनपर्यंत त्याच्यावर कारवाई झालेली नाही, मग या सभागृहामध्ये १९६ नंबरचा प्रश्न मी विचारला होता, गॅस गोडाउन बाबत त्यावेळेस मला उत्त्तर देण्यात आले होते की, याची चौकशी करुन त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. त्याही प्रश्नाचे आतापर्यंत काय झाले? त्या सभेमध्ये ओरडले तेवढेच , त्या सभेमध्ये चर्चा झाली तेवढीच , तेवढया पुर्तीच मर्यादित होती. त्याच्यानंतर आतापर्यंत काही झालेले नाही. जर असे असेल तर मग प्रश्नोत्त्तराचा तास पूर्वी अर्धा तास होता महापालिकेच्या अधिनियमाप्रमाणे. श्री. गणेश चौधरी महापौर असतांना तर अर्ध्या तासाचा एक तास करुन घेतला होता आणि एक तास या सभागृहामध्ये चर्चा होते, या प्रश्नाचे उत्त्तरावर जर अंमलबजावणी होणार नसेल तर प्रश्नोत्त्तराचे तास एक तास वाया घालवू नये आणि ती प्रश्नोत्त्तरे आहेत ती पण बंद करावी अशी मी महापौरांना*

विंनती करतो, २१० तबेलाचा प्रश्न होते त्याचे काय झाले? शांतीनगरच्या रस्त्त्यावर आजपण म्हशी बांधल्या जातात, आताही. त्याच्यावर काय कारवाई केली? गॅस गोडाउन १९६ नंबरचा प्रश्न होता त्याच्यावर कारवाई काय झाली. मध्यंतरी या सभागृहामध्ये आयुक्त साहेबांकडुन एक पत्र सर्व नगरसेवकांना दिले होते ज्या ज्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाली त्याची अशी आम्ही अंमलबजावणी केली आहे, पण श्री. नथु सोनवणे यांनी विचारलेला २०० नंबरचा प्रश्न होता त्याची अंमलबजावणी व त्याच्यावर काय कारवाई झालेली दिसत नाही. उलट त्या बिल्डरने एका माळयावर लॉजिंग बोर्डींगचे काम चालू केले होते ते आता दुस-या माळयावरपण काम सुरु केले. बिल्डरकडुन अंमलबजावणी होते, परंतु महापालिकेकडुन अंमलबजावणी होत नाही. हा माझा आरोप आहे. तर याचाही खुलासा आता प्रश्नोत्त्तराच्या तासापूर्वी केले तर बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, प्रश्नोत्त्तर तासाच जी उत्त्तरे येथे दिली जातात, त्यावर अंमलबजावणी केली जात नाही या आरोपाशी मी सहमत नाही. कारवाई जरुर होते. पण कायदेशीर कारवाई करण्यासाठी जो काही वेळ लागतो. तो वेळ सभागृहाने आम्हांला दिला पाहिजे. तबेल्याविषयी पण मी तुम्हांला माहिती देवू इच्छितो कार्यवाही पूर्ण झाल्यावर माहिती दिली जाते ते योग्य असते. या अगोदर पण आम्ही जेवढे आश्वासन सभागृहात दिले कारवाई पुर्ण झाल्यावर माहिती सभागृहासमोर ठेवली आहे. आज सुध्दा मागील महासभेत काही आश्वासन दिले होते , सदनाच्या पटलावर छोटासा अहवाल ठेवला आहे. जे आज अजूनपर्यंत पूर्ण झालेले नाही, मी ते कारवाई पूर्ण झाल्यानंतरच सदनासमोर ठेवू इच्छितो, तबेल्या विषयीचा जो प्रश्न आहे, २१० तबेलांचा सर्व्हे आम्ही पूर्ण केला आहे, तबेलाचा मालक कोण आहे? त्यांच्याकडे किती जनावरे आहेत? हा सर्व सर्व्हे महासभेनंतर पूर्ण केला आहे. आता त्यांना नोटिस देणे आणि बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये जी तरतूद आहे त्यानुसार कार्यवाही करणे बाकी आहे, परंतु तुम्ही जे सांगता महासभेत प्रश्न निर्माण झाला आणि त्याची कार्यवाही पुढील महासभेपर्यंत एक महिन्याच्या आत झाली पाहिजे, असे होवू नाही शकत , मला आपणांस एक विनंती करायची आहे, त्याला कायदेशीर जो वेळ लागतो तो वेळ प्रशासनाला दयावा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आयुक्त साहेब, त्यात अजून एक गोष्ट आहे, तूम्ही वेळ बघता परंतु महासभेत उत्त्तर दिलेले दिनांक परंतु खुपश्या प्रकरणात दोन-दोन महिन्यापर्यंत प्रश्न येत नाही. जेव्हा एखादा सदस्य प्रश्न देतो त्यावेळपासून कार्यवाही सुरु झाली पाहिजे, महासभेत आल्यानंतर कार्यवाही सुरु झाली नाही पाहिजे, हेतू हाच असतो प्रश्न देण्याचा. आधिच कार्यवाही झाली पाहिजे. प्रश्न ६ महिन्याने आल्यानंतर तुम्ही कार्यवाही करणार का? याबाबतीत तुमचे काय म्हणणे आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी सहमत आहे जेव्हा प्रश्न विचारला जातो तेव्हा, कार्यवाहीसाठी जो कायदेशीर वेळ लागतो. ते ठरविले पाहिजे. यापूर्वी वर्षानुवर्षे यावर चर्चा होत नव्हती. आता परिस्थिती बदलली आहे, सदनासमोर जो प्रश्न आहे तो नोव्हेंबर, २००३ ते डिसेंबर, २००३ पर्यंतचे तुमच्या प्रश्नाचे उत्त्तर येत आहे. त्याच्यावर कार्यवाही तितक्याच तत्परतेने केली जाईल हे आश्वासन मी सदनाला देवू इच्छितो.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> यावेळी ५.०० वाजले आहेत.

प्रलंबित प्रश्न क्र. २२१ चा उप-प्रश्न हा श्री. राज असरोंडकर यांचा असून ते सभेत उपस्थित नसून मा. आयुक्त साहेब जे उत्त्तर देतील त्यांची कार्यवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, प्रश्न क्र. २२१ हा मागच्या वेळेस सभागृहामध्ये आला होता, त्यावेळेस त्याचा उपप्रश्न १ चे उत्तर मी सदनासमोर मांडु इच्छितो, प्रश्न हा होता ३१ मार्च, २००३, मराठीत वाचतो. ३१ मार्च , २००३ रोजी देय असलेल्या रक्कम वगळण्यास सी-४ (१), सी-४ (२), सी-४ (४), सी-४ (१२), सी-४ (१३), सी-४ (१४), सी-४ (१५), सी-४ (१६), या लेखा शिर्षात प्रत्त्येक उरलेली रक्कम किती होती? ३१ मार्च, २००३ ला त्याचा तपशिल असा आहे, सी-४ (१) मध्ये २५ लाख, सी-४ (२) ५ कोटी, जो नगरसेवक निधी आहे, त्यामध्ये २ कोटी ९५ लाख, पाणी पुरवठयाचा सी-४ (१२) जो आहे त्याच्यामध्ये ६० लाख, झोपडपटटी साठी जो आहे त्याच्यामध्ये ५० लाख, महापौर निधी जो आहे, त्यासाठी ५० लाख. उप-महापौर निधी २५ लाख व सी-४ (१६), स्थायी समिती सभापती निधी २५ लाख इतकी रक्कम शिल्लक होती, ३१ मार्च, २००३ पर्यंत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रलंबित प्रश्न क्र. २२६ श्री. नथु सोनवणे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी सभागृहातून बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब मी शिवम मार्केट बद्दल जो प्रश्न विचारला होता तर आपण उत्तर दिले होते की, प्लान पास करतांना ३ व्यक्तींच्या नावाने प्लान पास केला आहे, ३ व्यक्तींच्या नावे प्लान पास केला तर त्याचे ३ भाग झाले पाहिजे. १ अखंड स्लॅब टाकून पहिला मजला चढविला त्याच्यानंतर त्यांना खाली किती गाळयाची परमिशन दिली होती. आणि आता सद्यस्थितीत किती आहे? ते आपण आता सभागृहापूढे मांडावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, शिवम कॉम्पलेक्स विषयी जी अनियमितता झाली होती ती मी सदनासमोर ठेवली होती. व त्यावेळी मी म्हटले पण होते की, त्याबाबतीत पुन्हा एकदा तांत्रिक छाननी केली जाईल त्यानुसार आम्ही पुर्ण प्रस्ताव जो चुकीच्या मार्गाने पास झाला आहे, एका भुखंडावर तीन जणांना परवानगी दिली गेली, हे चुकीचे झाले. तो पुर्ण प्रस्ताव आम्ही उप-संचालक नगररचना विभागाकडे पाठविला आहे. अनेक अनियमितता नगररचनाकारांच्या कारकिर्दित झाली आहे. त्यातून ही एक आहे. स्वतंत्र रुपाने (१) हे प्रकरण उप-संचालक नगररचना विभाग यांच्याकडे पाठविले आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-</u> त्याच्यानंतर कार्यवाही किती दिवसानंतर होईल कारण की, यामुळे विचारतो, मी २०० नंबरचा प्रश्न टाकला होता, ३ -या माळयावर बांधकाम होते तिथे मला उडवाउडवीचे उत्तर दिले, तिथे अंतर्गत सजावटीचे काम चालू आहे. नंतर आता ४ थ्या माळयावर तीच परिस्थिती आहे, आता आमच्या विरोधी नेत्त्यांनी पूर्ण प्रश्न बोलून दाखविला, याचेही मला अश्वासन दया की, यावर कार्यवाही होईल किंवा नाही? कधी होईल?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, दुसरे असे ऐकतो की, सद्यास्थिती काय? काम चालू असेल तर ती बंद करण्याची जबाबदारी देखील महापालिकेची आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी श्रीमती मोना वनवारी हया सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, आज काय स्थिती आहे याची मला माहिती नाही. कारण की, ते काम आधीच पूर्ण झाले आहे, जो रिपोर्ट माझ्या समोर होता त्यानुसार काम आधीच पूर्ण झाले आहे. त्यानुसार जी अनियमितता लक्षात आणून दिली होती, पाहिले गेले तर तत्त्कालीन नगररचनाकार

यांनी रिवाईज प्लान सुध्दा मंजुर करण्याचे ठरविले होते, ते पण तयार होते. पुर्णत्त्वाचा दाखला देखील जवळ जवळ तयार करुन ठेवला होता. परंतु जेव्हा एका दक्ष नागरीकांने आमच्या समोर तक्रार केली त्यानंतर हे सर्व थांबविले गेले, व आता उपसंचालकांकडुन मत आल्यानंतर १५ दिवसात त्याच्यावर अंतीम निर्णय घेतला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, त्या इमारतीत जर कोणी खरेदी करायला जात असेल तर महानगरपालिकेकडुन एक जाहिरात काढुन टाका, ती इमारत महापालिकेच्या परवान्यानुसार बनली नाही, आपण त्यामध्ये खरेदी करु नका. नाहीतर सतनाम साखी सारखी परिस्थिती शहरात निर्माण होईल.

<u>मा. उप-आयुक्त (श्री. पी.डी. कोळेकर):-</u> मा. महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव साहेब, मा. सदन प्रश्न क्र. २२६ मा. नथु सोनवणे यांचा आहे., गेल्या वेळेस हा प्रश्न रेखुन ठेवला होता, मी इमारतीची पाहणी केली आहे, श्रीमती उषा टी. बिजलानी आणि टी.पी. बिजलानी, श्रीमती कृष्णाबाई लेखराज यांनी इमारत बांधली आहे आणि जी + ३ ची परवानगी दिली होती, प्रत्यक्षात पाहणी केली असता तळमजल्यावर १४८.३४ चौ. मि. पहिला मजला १४०.१४ चौ.मी. , दुस-या मजल्यावर १४०.१४, तिस-या मजल्यावर २२९.६८, आणि चौथ्या मजल्यावर २२९.६८ असे एकूण ८८८.९८ चौ.मी. परवानगी पेक्षा जादा बांधकाम केल्याचे दिसून आलेले आहे. त्यांना एम. आर. टी.पी ॲक्टच्या ५२-५३ अन्वये पुढची कार्यवाही करतो.

<u>मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २२८ श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २२८:-</u> उल्हासनगर महानगरपालिकेकडे, रुग्णवाहिका व शववाहिका किती आहेत? त्यांची सदयाची परिस्थिती काय आहे? नागरीकांना त्यांचे आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध होते का?

कृपया वरील प्रश्नांची उत्तरे येत्या महासभेत देण्यात यावी ही विनंती.

<u>उत्तर:-</u>१) महानगरपालिकेकडे ३ रुग्णवाहिका व १ शववाहिका आहे.
२) १ रुग्णवाहिका व १ शववाहिका सुस्थितीत सुरु आहेत व २ रुग्णवाहिका नादुरुस्त असून लिलावासाठी बाद आहेत.
३) नागरीकांच्या मागणीनुसार रुग्णवाहिला व शववाहिका उपलब्ध करुन दिल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असून त्याचे उत्तर वरील प्रमाणे दिले आहे. साहेब हा प्रश्न मी १८/९/२००३ ला विचारला त्या शववाहिका लिलावात काढल्या गेल्या का? आजपर्यंत, चार महिन्यानंतर तरी त्या लिलावात गेल्या का? आणि लिलावात गेल्या असतील तर त्या जागी आपण रुग्णवाहिका, शववाहिका नव्याने घेण्याचे प्रस्तावित केल्या आहेत का?

<u>मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. लोणारे:-</u> मा. महापौर, मा. सदस्य महानगरपालिकेकडे ३ रुग्णवाहिका आणि एक शववाहिका आहे आणि १ रुग्णवाहिका व १ शववाहिका सुस्थितीत सुरु आहेत व २ रुग्णवाहिका नादुरुस्त असून लिलावासाठी काढायच्या आहेत याची कार्यवाही अजून पुर्ण झालेली नाही आणि ज्या जुन्या शववाहिका , रुग्णवाहिका आहेत त्यास दुरुस्त करुन सूरु ठेवलेल्या आहेत. पुढील वर्षात खरेदी करण्यासाठी म्हणून सन २००४ व ०५ च्या अर्थसंकल्पात तरतूद करीत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>त्या चालु आहे का?

<u>मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. लोणारेः-</u> २ बंद आहे , १ शववाहिका व १ रुग्णवाहिका आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>दुसरी खरेदी करण्याचे प्रयोजन.?

<u>मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. लोणारेः-</u>२००४ व ०५ च्या अर्थसंकल्पात तरतूद करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>ड्रायव्हर व ज्यांच्याकडे गाडया आहेत त्यांची मनमानी चालते. जेव्हा मनात येतील तेव्हा गाडया देतात नाहीतर सांगतात डिझेल नाही असे सांगतात कुणाला त्या गाडया दिल्या जात नाही. कृपया त्याबाबतीत लक्ष दयावे.

<u>मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. लोणारेः</u>-याबाबत आपण दिलेल्या सूचनांची नोंद घेऊन संबधितांना सूचना देण्यात येतील.

<u>मा. सचिव (प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २२९ श्री राजेंद चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २२९</u>:-महानगरपालिकेतर्फे प्रभाग समित्त्यांची स्थापना करणेत आली असून अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे विकास कामे करणेसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे, कृपया सन २००१-२००२ चे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार प्रभाग समितीद्वारे किती रुपयांची कामे झाली व सर्व निधी खर्च करणेत आला का? किती निधी शिल्लक आहे याची माहिती येत्त्या महासभेत मिळणेस विनंती आहे.

<u>उत्तरः</u>-सन २००१-२००२ मध्ये प्रभाग समित्त्यांची स्थापना करणेत आली होती. परंतु प्रभाग समितीकरीता वेगळी तरतुद करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे सदर वर्षातील किती निधी खर्च करण्यात आला किंवा किती निधी शिल्लक आहे याबाबत माहिती देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>माझा प्रश्न वरील प्रमाणे असून, यावर मी एक उपप्रश्न विचारतो, मी प्रश्न विचारला होता २००१-२००२ विषयी, आता उप-प्रश्न विचारतो २००२-२००३ मध्ये असा निधी आपण उपलब्ध करुन दिला आहे का? त्या निधीमधून आता पर्यंत प्रभाग समिती मार्फत कामे झाली आहेत का? याचा जर खुलासा झाला तर बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, मागच्या वर्षी देखील २००२-२००३ मध्ये देखील प्रभाग समितीसाठी स्वतंत्ररित्त्या निधी उपलब्ध नव्हता केला. २९ (१) नुसार प्रभाग समितीसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करणे जरुरी आहे. या वर्षात प्रभाग समिती मधूनच त्यांना काय काय काम करायचे आहे, देखभाल दुरुस्ती विषयी आम्ही माहिती मागविली आहे. मागच्या वर्षी तरतूद स्वतंत्रपणे आमच्याच बजेटमधून केली होती, प्रभाग समिती निधी नावाच्या लेखा शिर्षांतर्गत निधी उपलब्ध करुन दिला होता. व प्रत्येक प्रभागात जवळ जवळ दिड लाख रुपयाची कामे तेथे केले गेले, किती काम झाले? किती खर्च झाला? याचा तपशिल आता माझ्याकडे नाही आहे, परंतु अर्थसंकल्पात प्रभाग समितीसाठी प्रावधान केले होते. स्वतंत्रपणे प्रत्येक प्रभाग समितीसाठी अर्थसंकल्पात तरतूद नव्हती.

**मा. सदस्य श्री. ठाकूर बेहरानी सभागृहातून बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता आपल्याकडे किती कामे झालीत आणि किती कामे प्रलंबित आहे याचा तपशिल नसल्यामुळे हा प्रश्न पुढच्या वेळेस तपशिलवार घेतल्यास बरे होईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २३० श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. २३०:-ए) हाउ मेनी म्युनिसिपल गार्डनस आर देअर इन उल्हासनगर? प्लीज गिव डिटेल्स विथ लोकेशन.
बी) हाउ मेनी स्टॉफ वेअर रिक्युटेड फोर मेटेनन्स ऑफ गार्डनस? प्लीज गिव द डिटेल्स ऑफ लेनअवर, मेल्स ज्यु. इंजिनिअर्स.
सी) हाउ मेनी सुपरीटेंडंट ऑफ गार्डन हेव बिन अपोइंटेड?
डी) हाउ मच एक्पेंडीचर ऑक्युअर्ड ऑन मेंटेनन्स ॲण्ड डेव्हलोपमेंट ऑफ गार्डन फोर द इअर २००२-२००३? प्लीज गिव नेम ऑफ गार्डन.
ई) हाउ मेनी गार्डन्स आर मेंटेनेड बाय सोसीअल ऑर्गनायझेशन? प्लीज गिव द नेम, एरिया ॲण्ड लोकेशन.

उत्तर :- ए) इन उल्हासनगर देअर आर अस गार्डनन्स. नेम ॲण्ड लोकेशनन्स ऑफ दिस गार्डन इज गिवन इन ॲनेक्स ''ए''.
बी) टोअल ५९ एम्प्लोइज आर रिक्युरेटेड फोर मेंटेनन्स ऑफ गार्डन, आउट ऑफ विच ४ इम्प्लोइज आर ज्यु. इंजिनिअर, ३८ मेल्स, १७ लेबर्स.
सी) वन गार्डन सुपरिटेंडंट इज अपोइंटेड.
डी) द एक्सपेंडीचर ऑक्युअर्ड ऑन मेंटेनन्स ॲण्ड डेव्हलोपमेंट ऑफ गार्डन फोर इअर २००२-२००३ वर्क रेस. ४१९०००/-.
ई) साधु वासवानी गार्डन ॲट गोल मैदान ॲण्ड गार्डन निअर गोकुल धाम आर मेंटेनेड बाय ब्रम्हकुमारीज ट्रस्ट ऑन लिज बेसीस.

**ANNEXURE 'A'**

**Ward Committee No. 1**

| Sr. No. | Name of Gardan | Location |
|---|---|---|
| 1. | Sadhu Vaswani garden | Goal Maidan UNR.1 |
| 2. | Garden-444 | Opp Nana Nani Park UNR 1. |
| 3. | Shiv Ganga Aptt. Garden | C. Blk. Road UNR. 1 |
| 4. | HAZARE BUNGLOW GARDEN | C Blk Road UNR 1. |
| 5. | Shiv-naina Apt. garden | C Blk Road UNR 1. |
| 6. | Garden Opp Priya Apt. | Opp. UMC UNR.3 |
| 7. | Garden 15. | ay Bhim nagar Chowk |
| 8. | Roma palace garden | beh Aaradhana Apt. |
| 9. | Ramayan garden | opp. Dhanaraj Nichlani house |
| 10. | MIDC GARDEN | Water supply compound UNR 1. |
| 11. | Khemani garden | Vashdev palace UNR 1. |
| 12. | Bal Shivaji Udyan | Kamal Nehru Nagar Dhobighat UNR 1. |
| 13. | More nagar, Garden | More Nagar , UNR 1. |

**Ward Committee No. 2**

| Sr. No. | Name of Gardan | Location |
|---|---|---|
| 14 | Lion Garden | Near Sapna talkies |
| 15. | Nana Nani Park | Near Garden 444 |
| 16. | Indira Gandhi Garden | Near Nagar news office |
| 17. | Pappu Garden | Near Nagar News Office |

| | | |
|---|---|---|
| 18. | Yatri Niwas | Near Khemani |
| 19. | Garden | Near Kewal Kunj Apt. |

**Ward Committee No. 3**

| Sr. No. | Name of Gardan | Location |
|---|---|---|
| 20. | Jijamata garden | Maratha section |
| 21. | Near Notandas house | Bk. 1458 |
| 22. | Gagan Balani garden | Bk. 1503 |
| 23. | Old Zone office garden near Bk. 1638 | Bk. 1638 |
| 24. | Garden near Bk. 1492 | Bk- 1492 |
| 25. | VTC Sports complex | VTC Complex |
| 26. | Garden Nr. Bk. 1272.73 | Nr. Bk. 1872.73 |
| 27. | Boar Club garden | Hiraghat |
| 28. | Rotary Garden | Hiraghat |
| 29. | Garden Nr. Bk. 837.38 | Bk. 837.38 |
| 30. | Garden Nr. Bk. 901.02 | Bk. 901.902 |
| 31. | Municipal Garden | Main Compound |
| 32. | Shivaji Maidan | Near Bk. 1425 |

**Ward Committee No. 4**

| Sr. No. | Name of Gardan | Location |
|---|---|---|
| 33. | Dr. Baba saheb Ambedkar Udyan | Kansai road |
| 34. | Lal-loi garden 3 protions | beh Lalsai bldg |
| 35- | shed office garden BK. 1917 | Nr.Bk. 1917, UNR 5 |
| 36 | Garden Nr. 1952 | Nr. Bk. 1952, UNR.5 |
| 37 | Garden Near BK. C 14 | Bhatia Hospital road |
| 38 | Garden Near MSEB Office | Bhatia Hospital road |
| 39 | gardenNr. manu dispensary | Bhatia Hospital road |
| 40 | Garden Nr. Bk. C.5 | Nr. Netaji garden |
| 41. | garden Nr. Swami Shantiprakash (netaji garden) | Netaji Garden |
| 42. | garden nr, bk 1822 | NNR 5 |
| 43. | sobhraj garden | near fish market UNR 5 |
| 44. | garden Nr. Gurudas singh house | Gandhi road UNR. 5 |
| 45. | dasera maidan playground | UNR 5. |
| 46. | Swami Trilokdas gardeen | Opp. Rupchandani Mension |
| 47. | Swami Bldhraj garden | backsode of Chandiramani bunglow |
| 48 | Opp. Gokuldas Aptt. | Opp. Gokuldas Apt. |

*मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-* मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव माझा हा प्रश्न २७/९/२००३ चा आहे. मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असून तुम्ही ४८ उदयानांची नावे दिली आहेत. दुसरे मी विचारले की, कर्मचारी वर्ग यासाठी किती आहे, मला वरीलप्रमाणे उत्तर दिले असून, मला एक गोष्ट समजत नाही. ४८ उदयाने आहेत, ७९ कर्मचारी आहेत. तर हे कसे सांभाळत असतात. ४ जे. ई., १७ माळी आहेत. मला समजत नाही, ४८ उदयान कशी सांभाळली

*जाते? या संदर्भात मी १७/१२/२००३ ला पत्र दिले होते. पत्र मा. आयुक्त साहेबांना दिले होते, त्यात खुलासा मागितला होता. परंतु हे खेदाने म्हणावे लागते, आज सभा आहे तरीपण मला माहिती मिळाली नाही. उदयान अधिक्षकाचे नाव काय आहे? त्याची नियुक्ती कशी झाली? एक महिना , दोन दिवस होवून गेले, त्यावर अजून मला माहिती मिळत नाही. तुम्ही सभेत जे अर्धवट उत्तरे देतात, त्यावर आम्हांला चर्चा करावी लागते. मी आयुक्तांना विचारु इच्छितो, ४८ उदयाने तुम्ही कशी सांभाळता? ५९ कर्मचारी आहेत. त्यात ४ इंजिनिअरचा पण समावेश आहे, ही सर्व उदयाने त्यांच्याकडुन सांभाळली जातात का? का तुम्ही ठरविले आहे, याला दयायचे त्याला दयायचे नाही. दुसरे असे की, तुम्ही जे उदयान अधिक्षक ठेवलेले आहे, तुम्ही जाहिरातीद्वारे नियुक्ती केली आहे का असेच ठेवले आहे, उदयान अधिक्षक पदावर ज्यांना तुम्ही ठेवले ते सक्षम आहेत की नाही? ते पण आम्हांला माहित नाही, ही जी उदयाने आहेत, ती डी.पी. प्लान मध्ये आहे का? नाही तर येणा-या डी.पी. प्लान मध्ये तुम्ही त्याचा समावेश केला आहे का? याचे मला उत्तर मिळत नाही. ४८ उदयानांची देखभाल हे कसे करतात? कोणकोणत्त्या उदयानात माळी जातात? कोणकोणत्त्या उदयानात अभियंता जातात? ४ अभियंता ४८ उदयाने कसे सांभाळतात?*

***मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. हरदास माखिजा हे सभागृहातून बाहेर गेले.***

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, या शहरात ४८ उदयानांची जी संख्या सांगितली आहे, ती ४८ उदयाने प्रारुप विकास आराखडयानुसार नाही आहे. डी.पी. प्रमाणे ज्या रिझर्व साईटस् आहेत. प्रत्त्येक आरक्षीत भुखंडावर उदयाने बनविली गेली नाही. नगरपालिका असतांना जिथे जागा दिसेल जी शासनाची होती त्यावर काही रोपे लावली व त्यास गार्डन म्हणून नाव दिले, अशी खुपशी उदयाने आहेत. या शहरात ३ किंवा ४ मोठी उदयाने आहेत. १ गौल मैदान, ते सेवाभावी संस्थेस सांभाळण्यासाठी दिले आहे. इतर जी उदयाने आहेत ती उपलब्ध कर्मचा-यांकडुन सांभाळणे शक्य आहे. उदयान अधिक्षक पद हे नियमित अजून भरले नाही, त्याचा अतिरिक्त कार्यभार या ऑफिसच्या कर्मचा-यास दिला आहे. ते पद अजून भरले गेले नाही. माळी व जे लेबर आहेत, ते उदयानांची देखभाल करतात, प्रत्त्येक उदयानासाठी १ माळी , १ लेबर देणे शक्य नाही. जी मोठ मोठी उदयाने आहेत तिथेच कर्मचारी पुरविला जातो, इतर ठिकाणी कर्मचारी दिले जात नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मला हे सांगा तुमच्या दृष्टीकोनातून ४८ उदयानांमधले कोणती उदयाने महत्त्वपुर्ण आहेत? इतर उदयानांचे काय केले जावे? ४८ उदयाने तुम्ही लिहिली आहेत, तुम्ही सांगता की ते रिझर्वरेशन नुसार नाही आहे. तुम्हांला ती उदयाने महत्त्वाची वाटत नाही. तुमच्या नजरेतून कोणती उदयाने महत्त्वाची आहे? इतर उदयानाचे काय करायचे? ती उदयाने बंद करायची का? त्यासाठी तुम्ही काय म्हणणार?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> डी.पी. प्रमाणे जी उदयाने विकसित केली जातात, तेवढयाच उदयानांना सांभाळण्याची जबाबदारी महापालिकेची असेल. इतर ठिकाणाची जी उदयाने आहेत, त्यांच्या देखभालीसाठी आम्ही सेवाभावी संस्थेची मदत मागितली आहे. खुप सा-या सेवाभावी संस्था पुढे येत आहे. अशी जितकी पण उदयाने आहेत, रजिस्टर सोसायटी किंवा सेवाभावी संस्था जर पुढे येत असतील तर त्यांच्या मदतीने ही उदयाने सांभाळली जावू शकतात.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मी तुम्हांला पुन्हा विचारतो की, ऍज पर डि. पी. किती गार्डन आहे?*

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मला आता निश्चीत आकडा माहित नाही पुढच्या महासभेत देवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u>ती उदयाने जशी आहेत तशीच राहतील? त्यांच्यासाठी कर्मचारी वर्ग नाही, का तुम्ही देवू पण इच्छित नाही? जे महापालिकेने बनविले आहे, त्याची देखभाल कोण करणार? जोपर्यंत कोणती संस्था मिळत नाही तोपर्यंत कोण करणार? त्या उदयानाची काय स्थिती होईल? आम्ही काय करायचे त्याच्यासाठी?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मला हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे, जी शासनाची जागा होती तिथे काही उदयाने बनविली आहे. उदयानासाठी जे आरक्षण होते ते महापालिकेला हस्तांतरीत केल्यानंतरही ते उदयान विकसित नाही केले गेले. त्याशिवाय जी पण महापालिकेची उदयाने आहेत, तेथे आम्ही खर्च करत आहोत. ते मेंटेन देखील करत आहोत. उपलब्ध कर्मचा-यांकडुन तो मेंटेन केला जावू शकतो चांगल्या त-हेने. तुम्हां सर्वांना माहित आहे की, प्रभाग समिती अंतर्गत जो निधी उपलब्ध केला गेला, प्रत्येक नगरसेवक आपल्या निधीतून ५० हजार रुपये, प्रभाग समिती निधीमधून ५० हजार रुपये उदयानाच्या देखभालीसाठी खर्च करु शकतो. त्यातून चांगल्या त-हेने उदयाने सांभाळले जावू शकते. १ लाख रुपये दिले गेले आहे, त्यातून उदयानाचे देखभाल चांगल्या त-हेने होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आयुक्त साहेब, मी पुन्हा विचारु इच्छितो की, एकिकडे तुम्ही म्हणत आहात की, ती उदयाने डी.पी. मध्ये नाहीत. तसे तर तुम्ही म्हणता की, प्रभाग समितीला एक लाख रुपये दिले आहेत गार्डन मेंटेनन्स करण्यासाठी. मेंटेनन्स कोण करणार? माळी तर आम्ही ठेवू शकत नाही ना? पाणी आम्ही देणार नाही, कामगार आम्ही ठेवणार नाही. मेंटेनन्स म्हणजे उदयानामध्ये काही खराब झाल्यास, मी विचारु इच्छितो की, या गार्डनला माळी मिळणार, लेबर मिळणार का? का जे. ई. मिळणार? का ते सर्व आम्हांलाच करायचे आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> जो उपलब्ध कर्मचारी आहे त्यातूनच मेंटेन करावे लागेल. फक्त उदयानाच्या मेंटेनन्स साठी जसे तुम्ही सांगत आहात. प्रत्येक गार्डनसाठी एक जे.ई. व दहा-पंधरा लेबर हे जर दयायचे असतील तर आमच्या बजेटमधून २० टक्के खर्च त्यांच्यावरच करावा लागेल. म्हणून मी आधीच सांगितले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मी तुम्हांला हे नाही विचारले एक जे.ई. आणि पंधरा लेबर विषयी नाही विचारले, मी विचारले की, ५९ कर्मचारी जे तुम्ही ठेवले आहेत, ते कसे? आणि दुसरे असे की, तुम्ही ४८ उदयानांची जी यादी दिली आहे, त्याच वेळी तुम्ही लिहायला पाहिजे होते, डी.पी. त आहेत की नाही? लिगल आहे की नाही? आम्ही मग तुम्हांला विचारलेच नसते. आता पण आम्ही तुम्हांला हेच विचारु इच्छितो की, १ लाख रुपये जे दिले आहेत त्यात काय आम्ही लेबर ठेवू शकतो? पाणी देवू शकतो? का फक्त मेंटेन करु शकतो. प्रभाग समितीत त्यासाठी तरतूद आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> समजल, हा जो एक लाख रुपयाचा निधी आहे, तो मेंटेनन्ससाठीच दिला आहे, त्यात जर तुम्हांला वा प्रभाग अधिकारीला वाटले की, तिथे लेबरांची तात्त्कालीक स्वरुपात गरज आहे. ते लेबरर तुम्ही त्यातूनच देवू शकता. तुम्ही जर सेक्शन २९ पाहाल, हे जे काम करायचे आहे ते देखभाल दुरुस्तीसाठी करायचे आहे. एक लाख रुपयाचा निधी देखील

देखभाल दुरुस्तीसाठी दिला आहे. गार्डन बनविण्यासाठी तुम्ही एक लाख रुपये वापरत नाही आहात. तुमच्या प्रभागात जे गार्डन आहे, त्याच्या मेंटेनन्स साठी पैसे दिले जात आहे.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी सभागृहातून बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- उदयान अधिक्षकाचे जे पद आहे, ते तुम्ही कधी पर्यंत भराल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- उदयान अधिक्षकाचे जे पद आहे, ......

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- मा. महापौरजी, कोण कोणत्त्या प्रभागात उदयानच नाही आहेत. त्याचा निधी काय करायचा?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, उदयान अधिक्षकाचे पद लवकरात लवकर भरले जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- लवकर म्हणजे कालावधी तर सांगा. तुम्ही त्वरीत म्हणतात परंतु १६ दिवसात पत्र पोहचत नाही. म्हणून विचारतो, एका पत्रात तुम्ही त्वरीत लिहिले होते , सार्वजनिक बांधकाम विभागात १६ दिवस झाले त्यावर काही कार्यवाही करण्यात आली नाही. लवकर जे तुम्ही बोलता, लवकर म्हणजे किती कालावधी लागेल? आयुक्तांनी लिहिले तरी १६ दिवस झाले. सार्वजनिक बांधकाम विभाग त्यावर काही कार्यवाही करत नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आ
र.के. सोनवणे):- येणा-या ३ महिन्यात हे पद भरले जाईल.

**मा. सदस्य श्री. मनोज साधवानी सभागृहातून बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :- आयुक्त साहेब, मेहरबानी करुन पॅनेल नं. १२ मध्ये सोवराज गार्डनची हालत पहा. जिथे ३० हजार रुपये आम्ही महिना खर्च करतो, तिथे २ माळी ठेवले आहे. माळी काय काम करतो हे कोणी पाहणारे नाही. तिथे लेबर आहेत, अर्धा दिवस काम करतात, उदयानास फाटक नाही. पाणी नाही ते उदयान डी.पी त दाखविले आहे. २० वर्षे झाले त्यात काही सुधारणा नाही. एकीकडे तुम्ही सांगता जे डी.पी.त गार्डन आहे, त्याला सुधारणा करता येवू शकते. कृपया याची पडताळणी करा की या गार्डनमध्ये कधी सुधारणा केली आहे, जर सुधारणा केली नाही तर का नाही केली? जर ३० हजार रुपये आपण खर्च करतो तर नागरीकांसाठी काय सोयी केल्या? तिथे पूर्ण वेळ जुगार खेळणारे भिकारी बसलेले असतात, कित्त्येकदा आपल्याकडे लिखित स्वरुपात दिले आहे. जे. ई. ना सांगितले आहे, मिस्त्रींना सांगितले आहे, कोणी वॉचमन तिथे नाही, कृपया करुन आधी तेथे सुधारणा करा. जसे तुम्ही सांगितले आधी डी.पीतल्या उदयानांना प्राधान्य देणार. कृपया तिथे दुरुस्ती करण्यात यावी. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकूरः- मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आमच्या प्रभागात हिराघाट जवळ एक बोटक्लब उदयान आहे, तुम्ही पण ऐकले असेल, पाहिले पण असेल, कधी काळी त्या उदयानाला शहराचे हृदय समजले जायचे. आज महापालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे सर्व अनैतिक कामे त्या उदयानात होतात. कधी काळी तिथे बाग-बगीचे होते, बोट क्लब होता. त्याकडे जर लक्ष दिले, तर बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u> मा. महापौरजी, माझ्या प्रभागात वाल्मीक नगर आणि टिळक नगर या दोन्ही एरियाच्या मधोमध ते गार्डन आहे, गार्डन चांगल्या पध्दतीचे आहे, त्या ठिकाणाहून वाल्मीक नगर याठिकाणी जाणारा जो रस्ता आहे, तो रस्ता डोंगरासारखा चढणीचा आहे, तो रस्ता फिलींग करुन, रस्ता व्यवस्थित करुन घेणे, तो रस्ता ओळखीचा नसल्याने येणा-या जाणा-या ज्या महिला, पुरुष आहेत, अंधार झाल्याने त्या ठिकाणी बरेचसे लोक पडुन पाय फॅक्चर झालेला आहे, तर त्याठिकाणचा टिळक नगर आणि वाल्मीकी नगर त्यातील जे उदयान आहे, ते उदयान चांगल्या पध्दतीने लवकरात लवकर करुन देण्यात यावे हीच विनंती.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> प्रभाग समिती नं. १ यामध्ये उदयान नं. २ त्यात लिहिले आहे उदयान ४४४, त्याची जागा दाखविली आहे नाना-नानी पार्क समोर, पुन्हा प्रभाग समिती नं. २ त्यामध्ये लिहिले आहे नाना-नानी पार्क उदयान नं. ४४४ समोर.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> तेच बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> हे असे झाले की, दर्शनसिंग कुठे आहेत, सांगितले महापालिकेसमोर. विचारले महापालिका कुठे आहे दर्शनसिंग यांच्या समोर.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रुपाणी :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या ४४४ उदयानाच्या समोर जे उदयान आहे, तो रस्ता इतका निर्जन आहे, तिथे सर्व जुगार, चोरी, होत आहे, त्याला उदयान तरी बनवा. किंवा दुसरा कोणता तरी महापालिकेतर्फे प्रकल्प उभा करावा. तिथे सर्व चूकीचे कामे होत आहे, तिथल्या जनतेच्या खुप तक्रारी आहेत, की त्या उदयानास दुरुस्त केले जावे, दुसरी गोष्ट उल्हासनगरला हरीत उल्हासनगर बनवू इच्छितो, मला वाटते आपण त्याकडे कमी लक्ष देतो. फक्त घोषणा देतो. २ वर्षात एक देखील झाड रस्त्यावर लावले नाही आहे. महापौराच्या निधीमधून जेवढी झाले लावली, त्याशिवाय इतर कोणत्याही मार्गावर झाडे लावलेली नाहीत. प्रभाग समिती निधीमध्ये ५० -५० हजाराचा निधी आहे. त्यात लिहिले आहे, झाड लावणे आणि संरक्षण करणे परंतु त्या प्रस्तावावर अजूनही काही कार्यवाही झालेली नाही आहे. रस्त्यावर झाडे लावली तर शहर सुंदर दिसेल. तर माझी आयुक्तांना विंनती आहे, की त्यावर काही ना काही कार्यवाही करावी. दोन पावसाळे गेले आता हा तिसरा पावसाळा येत आहे, धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u>मा. महापौरजी, आता-आता या विषयावर आमचे जेष्ठ सदस्य खेमाणी साहेब, यांनी जो प्रश्न विचारला होता की, ज्यांच्या प्रभागात उदयान नाही, त्याचा निधीचे काय करायचे? आयुक्तांनी ते उत्तर दिले पाहिजे, त्यांनी ते दिले नाही. ज्यांच्या प्रभागात उदयाने नाहीत, प्रभाग समितीचा जो निधी आहे, एक लाख निधीसाठी त्या वार्डाच्या सदस्यांनी काय करायचे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सदस्य आज जो प्रभाग समितीचा मुददा चालत आहे, आयुक्तांनी जे म्हटले ही गोष्ट बरोबर आहे, की उल्हासनगरमध्ये काही उदयाने आरक्षित भुखंडावर नाही आहेत. परंतु तरीही देखभाल दुरुस्तीचे जे काम आहे, जसे श्री. बच्चाराम रुपचंदानी आमचे सदस्य त्यांच्या प्रभागात जे गार्डन आहे, ते आरक्षणानुसार नाही आहे. परंतु तरीही काही दिवसापूर्वी प्रभाग समितीकडुन त्यांचे काम मंजुर झाले आहे. व ५ नंबर ओ.टी मध्ये आमच्या प्रभागात एक गार्डन आहे, जे आरक्षणानुसार नाही तरीपण तेथे एक माळी किंवा एक लेबर बाई ठेवली आहे जी बरोबर गार्डन मेंटन करते. पंरतु आमचे श्री. चिमन रुपानी प्रभाग समिती सभापती यांनी सांगितले, जितका निधी प्रत्येक सदस्यासाठी एक-एक लाख गार्डनसाठी ५० हजाराचे

कोणतेही ५० हजार रुपयाचे वृक्ष संरक्षण व १ लाख रुपयाची पाण्याची लाईन ३-३ लाख रुपये एक-एक सदस्यासाठी निधी ठेवला गेला आहे, तो कमीत कमी ३१ मार्च पूर्वी पास झाला पाहिजे. ते काम भले दोन-चार महिने उशिरा होवो. ती वेगळी गोष्ट आहे. आज जर ट्री गार्ड फेब्रुवारी किंवा मार्च मध्ये पास होतात. तरी ते जून मध्ये लावले जावे. परंतु जो निधी उपलब्ध आहे, जोपर्यंत हा अर्थसंकल्प संपत नाही, नविन चालू होत नाही, त्याआधी प्रभाग समितीमध्ये प्रत्येक सदस्यांचे काम मंजुर झाले पाहिजे. व आमचे बंधू श्री. शांताराम निकम म्हणाले त्यांच्याशी मी सहमत आहे. काही दिवसांपूर्वी स्थायी समितीमध्ये हा विषय निघाला होता, ज्यांच्या प्रभागात उदयाने नाहीत ते इतर कोणतेही काम करुन घेवू शकतात. व तुम्ही आश्वासन दिले होते की, सदस्यांच्या प्रभागात जर गार्डन नसेल तर दुसरे एक लाख रुपयांचे कोणतेही काम करु शकतात. पाहिजे तर आपण रिवाईज बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करावी लागेल. जसे कोणत्त्याही सदस्यांच्या प्रभागात गार्डन नाही, दुसरे कोणते काम करु इच्छितो, असे पण आश्वासन तुम्ही स्थायी समिती मध्ये दिले, महासभेत दयाल. व ज्यांची पण कामे प्रभाग समितीमध्ये प्रलंबित आहे, ते आमचे लेखा विभाग किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा पाणी पुरवठा विभागातील जी पण कामे प्रलंबित आहे, ते त्वरीत पास केले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-</u> मा. महापौरजी, सभागृह नेता आता म्हणाले की, ज्यांच्या प्रभागात गार्डन नाही, ते आपला निधी दुस-या कामासाठी वापरु शकतात. माझ्या प्रभागात गार्डन मंजुर होवून दोन वर्ष झाले अजून ते काम झाले नाही, तर गार्डन असून नसून काय फायदा? काम तर झाले पाहिजे. काम झाले नाही. ईश्वरी अपार्टमेंट जवळ प्रभाग समितीकडे पत्रव्यवहार पण केला, आमच्या नावाने ४-४ लाख रुपये निधी आहे, ४ रुपये सुध्दा देत नाही. ती प्रभाग समिती स्थापन करुन फायदा काय? ४ लाख रुपये खर्च नाही करु शकत त्यांच्यावर आपण किती खर्च केला? ते कोण भरणार? जनता भरणार? एक वर्षापूर्वी मंजुर केले, आता एक पावसाळा गेला, आता दुसरा पावसाळा येईल, उदयानाचे काम होत नाही, व ज्यांच्याकडे नाही ते ओरडत आहे की, आमच्या प्रभागात गार्डन नाही, ते निधी दुसरीकडे वापरु शकता, जिथे उदयान आहे तिथे उदयान नाही बनवू शकत. म्हणतात फक्त स्वच्छ उल्हासनगर, हरीत उल्हासनगर अशाने होणार आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, प्रभाग समिती उदयान दुरुस्तीसाठी जो निधी आहे, जर कोणत्त्या प्रभागात उदयानच नसेल तर तो निधी शौचालय दुरुस्ती करणे किंवा नविन बनविणे, किंवा पाण्याची लाईन टाकणे यासाठी जर नगरसेवक वापरु इच्छितात, तसा जर त्यांनी प्रस्ताव दिला तर त्यावर निर्णय घेतला जाईल मान्य केला जाईल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २३१ श्री. पमोद टाले यांचा असून त्यांनी तो प्रश्न मागे घेतला आहे. त्यामुळे त्याची नोंद घेता येत नाही.

२३२ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २३२:-</u>मा. महापौर, व मा. आयुक्त यांनी महासभेत जकातीचे मुख्यालय आठ दिवसाच्या आत अग्नीशमन दल, कॅम्प नं. ३ शेजारी हलविण्याची आश्वासनाची पूर्ती झाली नसल्याची कारणे काय?

<u>उत्तर :-</u>मा. महापौर व मा. आयुक्त यांनी महासभेत जकातीचे मुख्यालय आठ दिवसात अग्नीशमन दल कॅम्प नं. ३ शेजारी हलविण्याची आश्वासन पुर्तीची प्रक्रिया सुरु आहे तथापि नियोजित ठिकाणी काही सुविधांची मागणी संबंधित जकात

अभिकर्ता यांनी केलेली असल्याने, त्यांची पुर्तता करुन घेण्यात येत आहे व नाका स्थलांतरीत करण्यात येत आहे.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातून बाहेर पडले.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> उत्तर ठिक आहे, तरी सांगायचे एवढेच आहे, हा जो प्रश्न दिला तेव्हा उप-आयुक्त श्री. भडकवाड साहेब होते. त्यावेळेस त्यांनी उत्तर दिले होते, मा. महापौर आणि मा. आयुक्त यांनी जकातीचे मुख्यालय आठ दिवसात अग्नीशमन दल कॅम्प नं. ३ शेजारी हलविण्याची आश्वासन पुर्तीची प्रक्रिया सुरु आहे, म्हणजे हा प्रश्न विचारला होता ६/१०/२००३ ला तथापी नियोजित ठिकाणी काही सुविधांची मागणी संबंधित जकात अभिकर्ता यांनी केलेली असल्याने, त्यांची पुर्तता करुन घेण्यात येत आहे व नाका स्थलांतरीत करण्यात येत आहे. यानंतर नाका स्थलांतरीत झाला परंतु माझे म्हणणे असे आहे की, हे जे उत्तर देत आहे, हे माझ्या माहितीप्रमाणे चूकीचे उत्तर देत आहे. कारण की मला चांगले माहित आहे की, जेव्हा मा. आयुक्त पोखरकर साहेब होते, त्यावेळेस त्यांच्या सुविधेची पुर्तता झाली होती. आणि त्यानंतर पुर्तता झाली असतांनाही त्यांनी नाका स्थलांतरीत केला नव्हता. त्यानंतर कोनार्क कंपनी पण कोर्टामध्ये गेली होती. त्यावेळेस ती हारली होती. तरीही नाका स्थलांतरीत झाला नव्हता. त्यानंतर जेव्हा श्री. सोनवणे साहेब आयुक्त म्हणून आले त्यानंतर तो नाका स्थलांतरीत झाला. म्हणजे या प्रक्रीयेला जी प्रक्रिया झाली त्यामध्ये जो ७-८ महिन्याचा कालावधी गेला, या ७-८ महिन्याच्या कालावधी मध्ये जर नाका स्थलांतरीत झाला नाही तर त्याचे नेमके कारण काय असावे, का त्यावेळेस स्थलांतरीत झाला नव्हता? म्हणजे सर्व पुर्तता झाली असतांनाही त्यावेळेस कोनार्क कंपनीने स्थलांतरीत केला नव्हता. म्हणजेच उत्तरे चुकीचे मिळतात. याच्या पुढे असे काही उत्तरे देवू नये.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २३३ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.
<u>प्रश्न क्र. २३३:-</u>बौध्दनगर, विठ्ठलवाडी कॅम्प नं. ३ (जुना वार्ड नं. ३०) येथिल रहिवाशीर श्री. आनंदा पवार यांचे नाव किती निवासी व व्यापारी गाळे आहेत? प्रत्येक निवासी व व्यापारी गाळयांचे क्षेत्रफळाची दप्तरी नोंद आहे काय? असल्यास किती? सदरचे निवासी व व्यापारी गाळे भाडे तत्त्वावर दिले असल्यास भाडेकरु कडुन किती भाडे आकारले जात असल्याची नोंद आहे? याबाबत स्थानिक नागरीकांकडुन लेखी तक्रार आली आहे काय?

<u>उत्तर :-</u> १)श्री. आनंदा नामदेव पवार, वार्ड क्र. ३०, जग्गी कंपनीच्या समोर, विठ्ठलवाडी रोड, यांचे नावे महापालिका दप्तरी दोन मिळकतीची नोंद आहे.
अ) वार्ड नं. ३०, बील क्र. ३०/१९९३, क्षेत्रफळ १०० चौ. फुट निवासी भाडोत्री रुपये १००/- दरमहा.
ब) वार्ड नं. ३० बील क्र. ३०/२००४ क्षेत्रफळ ४३० चौ. फुट निवासी क्षेत्रफळ ५०० चौ. फुट निवासी / एकूण ६ भाडेकरु सर्व मिळून भाडे रुपये ३००/-.
२)सौ. आशा पवार यांचे नावावर महापालिका दप्तरी एका मिळकतीची नोंद आहे.
अ) वार्ड नं. ३० बील क्र. ३०/५३९१, क्षेत्रफळ २०० चौ. फुट रहिवासी वापर आहे. खन्ना कंपाउंड, चाळ नं. १ रुम नं. ११ व सदर मिळकतीमध्ये भाडेकरुची नोंद नाही.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> मी जो हा प्रश्न विचारला आहे २३३ नंबरचा, त्यामध्ये उत्तरे दिली आहेत, ती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर दिली आहेत. फक्त त्यामध्ये एक कमी असे वाटत आहे, की जे फायनल असेसमंट केले आहे, जे झोपडे दाखवून केले आहे, खरे तर त्या परिस्थितीत त्या झोपडया नसून ए.सी. शेडस् आहेत. त्यामुळे तेथे आपला महसूल कमी पडत आहे. जे भाडेकरु दाखवायला पाहिजे होते, भाडेकरुंचे जे भाडे आहे, ते तेथे कमी दाखविलेले आहे. त्यांची एक चौकशी व्हायला पाहिजे. आणि त्याच्यावर जेवढे भाडेकरु दाखविलेले

आहे, त्यांची संख्या पण कमी दाखविलेली आहे, खरे तर जास्त भाडेकरु आहेत, तिसरे वाणिज्य तत्त्वावर जे दाखवायला पाहिजे होते, ते वाणिज्य तत्त्वावर न दाखवता, निवासी तत्त्वावर दाखविलेले आहे, ते पण एकदा पुन्हा त्याची चौकशी होणे भाग आहे.

<u>मा. उप-आयुक्त (श्री. पी.डी. कोळेकर):-</u> महापौर महोदया, आणि सचिव साहेब, सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टालेजी यांनी आता ज्या काही त्रुटया दाखविल्या आहेत, ए.सी. शिट ऐवजी झोपडी, त्याचे पुन्हा एकदा आम्ही सर्व्हेक्षण करु. त्याची खात्री करु आणि त्यामध्ये जर तफावत आढळली. तर त्याप्रमाणे दुरुस्त करु.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २३४ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

**मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी, श्री. गोविंदराम लुंड सभागृहातून बाहेर गेले.**

<u>प्रश्न क्र. २३४:-</u> शहरात १/१०/१९९५ पर्यंत नसलेल्या मलामत्ताधारकांकडुन थकबाकी भरल्याशिवाय फोटोपास देण्यात येणार नाही, हे खरे आहे काय? याशिवाय रुपये ४००/- आकारण्यात येतात, हेहि खरे आहे काय? दुर्बल घटक वसाहतींमधील अवाजवी घरपट्टी आकारणीबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले काय? फोटोपास देण्याचे कार्य कोणत्त्या वसाहतींसाठी लागु आहे?

<u>उत्तर :-</u> ''पात्र झोपडपट्टीवासियांकरीता ओळखपत्र योजना-१ ''व'' महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास) (सूधारण व पूढे चालु ठेवणे) अध्यादेश २००१'' मधील तरतूदीनुसारच पात्र झोपडपट्टी धारकांना ओळखपत्र देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> हा जो प्रश्न मी विचारला आहे, हा संपुर्ण शहरातल्या झोपडपट्टी धारकांच्या संदर्भात विचारला आहे, आणि जे जे मी प्रश्न विचारले आहे तुम्ही फक्त मालमत्ता धारकांकडुन थकबाकी वसूल केल्या शिवाय फोटोपास देणार आहे. मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असून त्याचे एकमेव उत्तर दिले आहे, नियमाप्रमाणे उत्तर दिले असेल पण त्याची माहिती नगरसेवकांना नाही, जनतेला पण नाही, मात्र झोपडपट्टीवाशियांकरीता ओळखपत्र योजना १ व महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुर्नविकास) (सूधारण व पूढे चालु ठेवणे) अध्यादेश २००१'' मधील तरतूदीनुसारच पात्र झोपडपट्टी धारकांना ओळखपत्र देणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. ठिक आहे. परंतु मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे नेमके उत्तर मला मिळालेले नाही, त्याची नेमके उत्तर जर मिळाली तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, झोपडपट्टीमध्ये फोटोपास देतांना पात्र झोपडपट्टी धारकांना फोटोपास देण्यात येतील असे उत्तर दिले आहे. फोटोपास देतांना आपण कुठले नियम धरुन दिले आहे , कुठल्या झोपडपट्टीला मिळाले कुठल्या नाही, काही झोपडपट्टीला ते मिळाले नाही, जर ते फोटोपास देण्यात आले आहे तर ते कुठल्या आधारे देण्यात आलेले आहे, त्याचा पण खुलासा व्हावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> महापौर महोदया, राज्य शासनाने जो गृहनिर्माण विभागाचे निर्णय क्र. १२२० प्रकरण क्र. २०४ , ११ जुलै, २००१ ला जे एक धोरण निर्धारीत केले त्यात जे निकष नमुद केले त्याप्रमाणे फोटोपास दिला जातो. त्यातून आपला जो प्रश्न आहे त्याचे उत्तर येथे दिले आहे परंतु स्पष्ट आणि योग्य उत्तर दयायचे असेल तर फोटोपास व थकबाकीची रक्कम भरल्याशिवाय फोटोपास दयायचे नाही असे काही आदेश नाही आहे. परंतु कमीत कमी हा जो

सुधारीत शासन निर्णय आहे, ३ मे, २००३ चा त्यात जो शुल्क दिले आहे, तो शुल्क भरल्याशिवाय फोटोपास देवू शकत नाही, व ते जे शुल्क आहे, २२५ चौ.मी. चे झोपडी कुणाकडे असेल तर प्रत्येक महिना २५ रुपये या हिशोबाने हे शुल्क येते. जेव्हा आम्ही फोटोपास वितरण सुरु केले, तेव्हा ८ महिने पुर्ण झाले होते, ४०० रुपये शुल्क होते. व फोटोपासची जी फी आहे ती २०० रुपये होती. २२५ चौ. पेक्षा जर जास्त जमिन असेल तर ५०० फुटापर्यंत फोटोपास दिला जावू शकत होता. जर ४०० चौ. फुट जमिन आहे त्या हिशोबाने जास्त आकारणी व्हायची. आपल्याकडे लगबग ११हजार झोपडपट्टीची यादी आहे, ती आम्ही बनविली आहे, व जो पात्र झोपडपट्टी धारक जे आहेत, फोटोपास तयार करुन ठेवले आहे, जे पात्र झोपडपट्टीधारकांना त्यांना वारंवार सांगितले आहे, विनंती केली आहे की, तुम्ही तुमचे फोटोपास घेवून जा. परंतु कमीत कमी जे शुल्क आहे, शासनाने ते आधी पेक्षा कमी केले आहे. आधी जास्त होते, ३ मे, २००३ ला अजून कमी केले. ३ मे, २००३ला अजून कमी केले गेले. व आता फक्त २५ रुपये प्रतिमहा त्यांना शुल्क दयायचा आहे, ते कमीत कमी चार्ज भरल्याशिवाय आम्ही फोटोपास देवू शकत नाही, ते कमीत कमी चार्ज त्यांना भरायचेच आहे. पात्र व अपात्र बाबतीत निकष जे आहे, जर आरक्षित भुखंडावर झोपडपट्टी आहे किंवा रोड फुटपाथावर आहे, तर ते पात्र नाही, त्याची गणना केली जाते, परंतु त्यांना फोटोपास मिळत नाही, जे १ जानेवारी, १९९५ पूर्वी शासकिय जमिनीवर जर त्यांचा कब्जा होता, तेथे जर ते झोपडे बनवून राहिले असतील तर त्यांना फोटोपास दिला जातो, ते जे निकष आहेत, ते शासन निर्णयात दिले आहे. त्यानुसारच आम्ही सर्व्हे करुन ११ हजार लोकांना फोटोपास तयार करुन ठेवले आहे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंदसिंह चौधरी :-</u>साहेब, सर्व्हे कुणी केला आहे? आपण केला आहे की शासनाने?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> सर्व्हे महापालिका कर्मचा-याने केला आहे व तो सर्व्हे दोनदा केला गेला. आधी जो सर्व्हे केला त्यात काही त्रुटया होत्या. त्यामुळे दुस-यांदा सर्व्हे करुन जे निकष पुर्ण करतात, जे पात्र असतात अशयांनाच फोटोपास देण्यासाठी तयार केले आहे. व यासाठी जो प्रतिसाद मिळत आहे तो खुपच निराशा जनक आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी सांगितले की, पात्र अपात्र ज्यांचे १९९५ पासून वास्तव्य असेल लोकांना व रिझर्व साईट नसेल अशा लोकांना तर मी आयुक्त साहेबांच्या माहितीसाठी सांगतो, माझ्या प्रभागात विठ्ठलवाडी झोपडपट्टी आहे, गेल्या अनेक वर्षापासून हे सर्वांना माहिती आहे पण तिथेही काही लोकांकडे सनद आहे, तरी त्या लोकांना फोटोपास वाटण्याचे काम अजून सुरु झाले नाही हा त्यांच्यावर अन्याय का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जर कुणाकडे सनद असेल तर त्याचा अर्थ आहे की ती व्यक्ती त्या जमिनिची मालक आहे, जर तो स्वतः मालक आहे तर फोटोपास घेण्याची गरज नाही. फोटोपास अंतर्गत फक्त ती शासकिय जमिन त्यास भोगावटाचा अधिकार त्यांना दिला जातो व ज्यांच्याकडे सनद आहे, त्यांना गरजच नाही फोटोपासची.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> आयुक्त साहेब ज्यांच्याकडे सनद नसेल , त्याच्या बाजूला तो राहत असेल, तर त्याला फोटोपास मिळायला पाहिजे ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> ज्यांच्याकडे सनद नाही त्यांना तर फोटोपास मिळालाच पाहिजे, जर ते आमचे निकष पुर्ण करत असतील तर.

_मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-_ मा. आयुक्त साहेब, आपण जे बोललात, २५ रुपये प्रतिमहा हे नेमके तुम्ही कधी पासून लागू करतात, तो नेमका कुठला कालावधी आहे.

_मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-_ मा. महापौर महोदया, ते जे २५ रुपये प्रतिमहा हे जे शुल्क आकारले असते ३१/१२/२००२ पर्यंत माफ केले आहे. १ जानेवारी, २००३ ने कॅलक्युलेट केले होते. आज जर ती व्यक्ती फोटोपास घ्यायला येते तर २००३ चे पूर्ण वर्ष झाले. तर त्याचे शुल्क ३०० रुपये तर २०० रुपये फोटोपासचा चार्ज आहे. असे ५०० रुपये भरावे लागतील आधी २०० रुपये भरावे लागले असते. आता ५०० रुपये भरावे लागतील.

_मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-_ मा. आयुक्त साहेब तुम्ही जे उत्तर दिले आहे, माझ्या पहिल्या प्रश्नाचे मालमत्ताधारकाकडुन थकबाकी भरल्याशिवाय फोटोपास देण्यात येणार नाही. हे खरे आहे का? यावर तुम्ही उत्तर दिले की, कायदेशीर नाही. परंतु पूर्ण शहरामध्ये तुमची कर पावती क्लीअर असल्याशिवाय तुम्ही फोटोपास इश्यू करत नाही. असे म्हटले जाते , आणि हे सत्य आहे. या बेसखाली सर्व झोपडपट्टी वाल्यांना तुमचे अधिकारी जे फोटोपास देतात, ते अडवणूक करतात, त्यांना ती समज तुम्ही दयावी. आणि टॅक्सपावतीचा जो मुददा आहे, तो संपवावा असे मला वाटते.

_मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-_ मा. महापौर महोदया, हे दोन मुददे वेगवेगळे आहेत, टॅक्स वसूलीसाठी प्रयत्न करणे तो त्या विभागाचे, वार्ड ऑफिसरचे कर्तव्य आहे. ते आपले कर्तव्य बजावत आहे. जेव्हा एखादा टॅक्स धारक येतो, जर त्याला काही सोयी दयायची असेल, काही कागद दयायची, तर टॅक्स भरण्यासाठी त्यांना सांगणे, हे त्याचे काम आहे, टॅक्स भरल्याशिवाय फोटोपास दिला नाही असे नाही आहे. आम्ही स्पष्टपणे आमच्या अधिका-यांना सूचना दिल्या आहेत. टॅक्स क्लीअर आहे की नाही. ते नका पाहू, फोटोपास घ्यायला जर कुणी आला आहे तर ३ मार्च २००३ निर्णयानुसार जेवढे शुल्क वसूल करायचे आहे तेवढेच वसूल करुन फोटोपास देवून टाका.

_मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-_ नेताजी गार्डनला असे प्रकार झाले आहे, आणि यापूढे तुम्ही त्या सूचना दया. यापूढे ४०० रुपये शुल्क जे आकारण्यात येत आहे, तर मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये माझ्या माहितीप्रमाणे हे शुल्क माफ झाले आहे. ४०० रुपये तुम्ही जे आकारता ते माफ झाले आहे, ते त्या क्षेत्रामध्ये माफ झाले आहे, आणि येथेही तो माफ करावा. अशी माझी विनंती आहे.

_मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-_ मा. महापौर महोदया, इकडे जे आता सांगितले गेले, ते चुकीचे आहे त्यामुळेच लोकांच्या मनात शंका निर्माण होतात, जे माफ केले आहे, ते आहे डिसेंबर २००२ पर्यंत , १ जानेवारी २००३ पासून ते शुल्क भरायचेच आहे. आधी होते ते माफ केले, मुंबई असो वा कल्याण असो तो माफ करण्याचा निर्णय महापालिका इकडे घेवू शकत नाही. राज्य सरकारचा निर्णय आहे. जर तुम्हांला वाटते, या निर्णयाची प्रत मी तुम्हांला देतो. जर तुम्ही इथे सांगाल मुंबईमध्ये माफ झाले, तर कोणी येथे येणार नाही फोटोपास घेण्यासाठी, ४ महिन्यापासून, ५ महिन्यापासून माझ्याकडे फोटोपास येवून पडले आहे. कृपया करुन तुम्ही लोकांना समजवा की, हे माफ होवू शकत नाही, इतके कमीत कमी भरायचेच आहे.

_मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-_ फोटोपास घेण्यासाठी येथे लोक येत नाही याचे कारण म्हणजे , तुमचे अधिकारी त्यांची अडवणूक करतात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>हे सरासर चूकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> त्यामुळे लोक घाबरुन येत नाही आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> हे चूकीचे आहे , आम्ही लोकांना वारंवार सांगितले आहे की, शासन निर्णयानुसार जेवढे शुल्क भरायचे आहे, तेवढे भरा आणि फोटोपास घेवू जा. आपणाकडे कुणी असेल तर आमच्याकडे घेवून या. आम्ही त्याच दिवशी त्याच वेळेस सर्व लोकांचे फोटोपास देवू. हे जे शुल्क आहेत शासन निर्णया अंतर्गत ते कमीत कमी त्यांनी भरले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> त्याचे पुढे मी विचारले आहे, दुर्बल घटक वसाहतींमधील अवाजवी घरपट्टी आकारणीबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले काय? फोटोपास देण्याचे कार्य कोणत्त्या वसाहतींसाठी लागु आहे? ही अवाजवी घरपट्टी आकारली आहे हा शब्द मी मुददाम मी येथे वापरला आहे. तक्रारीचे निवारण यासाठी विचारले एकतर तुमचे अधिकारी टॅक्स क्लीअर असल्याशिवाय फोटोपास देत नाही आणि दुसरे फोटोपास देतांना जे तुम्ही टॅक्स पावत्त्या मागता, स्लम एरियात एवढया लोकांच्या टॅक्सपावती बाबत डिस्प्युट आहेत. कुणा-कुणाच्या दोन पावत्त्या आहेत. टॅक्स पावती क्लीअर व्हायला पाहिजे. त्याविषयी तुम्ही काय केले?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, वारंवार येथे चुकीचे सांगितले जात आहे. थकबाकी भरल्याशिवाय फोटोपास दिला जाणार नाही. आम्ही वारंवार स्पष्ट केले आहे की, या थकबाकीचा फोटोपासशी काही संबंध नाही. फक्त शुल्क भरा. तुम्हांला लिखित स्वरुपात पाहिजे का आमच्याकडुन की थकबाकी आणी यांचा काही संबंधी नाही. ते आम्ही तुम्हांला लिखीत स्वरुपात देवू का?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> तुम्ही अधिका-यांना तशी समज दया ना.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> सदन मध्ये असे वक्तव्य केल्याने लोकांमध्ये गैरसमज होतात, लोकांकडे चुकीचा संदेश पोहाचला जातो. यासाठी मी आपणाकडे विनंती करतो, लोकांच्या मनात गैरसमज होतील असे कोणतेही वक्तव्य येथे करु नये. आम्ही या पूर्वी पण स्पष्टपणे आदेश दिले आहेत, अजून आदेश देवू. घरपट्टी वसूल केल्याशिवाय कुणी व्यक्ती जर फोटोपास मागायला आली तर तो दयायचा शुल्क भरल्यानंतर. दुसरे असे की, स्लम मध्ये जी आकारणी झाली आहे, तुमचे म्हणणे चूकीचे आहे, आपल्या माहितीसाठी म्हणून सांगतो, जेव्हा असेसमेंट लिस्ट प्रत्येक वर्षी तयार केली जाते, तर आम्ही एक पब्लीक नोटिस वर्तमानपत्रात देतो. व जर कुणा व्यक्तीला असे वाटत असेल की ही मोजमापणी चुकीची झाली आहे, तर ती व्यक्ती आपल्या सूचना व हरकती यांची नोंद करु शकतो. आमच्याकडे देवू शकतो. व जितके पण सूचना व हरकती येतात त्यावर त्याच वर्षी निर्णय घेतला जातो, तर हे दोन मुददे कृपया वेगळे आपण एकत्र करु नका. हे दोन मुदद एकत्र झाल्याने चुकीचा संदेश लोकांपर्यंत पोहाचेल. व ना आमची वसूली होईल, व ना फोटोपास लोक घेवू जाणार.

<u>मा. सदस्य श्री. पमोद टाले :-</u> आम्ही चुकीचा संदेश काही देत नाही, आम्हांला लोकांचे ज्या ज्या तक्रारी आल्या आहेत, त्याच्यावरुन आम्ही तुम्हांला सांगितले आहे, तुम्ही तुमच्या अधिका-यांना सुचना दया. तुमचे अधिकारी सांगतात, आम्ही तुम्हांला सांगितले तुम्ही त्यांना तशी सूचना दया. तुमचे अधिकारी असे सांगतात टॅक्स पावती क्लीअर असल्याशिवाय फोटोपास देणार नाही. तो मुददा तेथे क्लीअर झाला

पाहिजे. तुमचे अधिका-यांना तसे आदेश दया. फोटोपास देण्याचे कार्य कोणत्त्या वसाहतीत लागू आहे हा एक प्रश्न राहिला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, मला वाटत या प्रश्नाबाबत मी जास्तच उत्तर दिले आहे. जर त्यांना अजून काही उत्तर हवे असेल तर मी सन्मानानिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांना विनंती करेन की, त्यांनी शासन निर्णय कृपया वाचावा.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, आता आयुक्त साहेबांनी सांगितले टॅक्स पावती व फोटोपास याचा काही संबंध नाही तर हे ऐकून शहर वाशियांना दिलासा मिळाला असेल, कारण अनेक लोकांच्या टॅक्स पावत्त्या थकित आहेत, हे सर्व फोटोपासचे पैसे गोळा करण्याचे काम हे नगरपालिकेकडुन केले जाते. तर पुढच्या वर्षी सुध्दा हे पैसे भरावे लागतील. ते नगरपालिकेतच भरायचे का? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हे जे पैसे आपण जमा करणार फोटोपासचे हे शासनाकडे जाणार की, नगरपालिकेला हिस्सा मिळणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>हा जो शुल्क वसूल केला जाणार, त्यामधून जो निधी संकलन होईल, महानगरपालिकेकडेच ठेवण्यासाठी व त्यातूनच झोपडपट्टीला काही सुविधा देण्याचे हे शासन निर्णयात नमूद केले आहे. व त्यातूनपण जी काही टक्केवारी दिली आहे, एकत्रित शुल्क जे आहे, त्यातून सेवा शुल्क ४० टक्के आहे, प्रशासकिय आकार २० टक्के आहे, व जमिनीचे जे भुईभाडे आहे ते आहे ४० टक्के.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २३५ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २३५:-</u>कॅम्प नं. ५ मधील वसंत बहार मार्गाच्या रुंदीकरणात किती मालमत्ताधारक बाधित झालेत व त्यांची नावे काय? सदरहू मालमत्ताधारकां व्यतिरिक्त किती मालमत्ता धारकांची परवागनी शिवाय बांधकाम केले आहे? असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली काय? नसल्यास त्यांची कारणे काय?

<u>उत्तर :-</u> कॅम्प नं. ५ मधील वसंत बहार मार्गाच्या रुंदीकरणात बाधित झालेल्या २५ मालमत्ता धारकांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन प्राप्त झालेली यादी सोबत जोडली आहे.

बाधित झालेल्या मालमत्ता धारकांव्यतिरिक्त कोणत्त्याही मालमत्ता धारकांची परवानगी शिवाय बांधकामे चालू नसल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

**Following Structures Affected in road widening from Basant Bahar to Booster, Near Bk. 1969, UNR. 5**

| | | |
|---|---|---|
| 1- | Gopi Pursemal Ranglani | 14' x 8' |
| 2. | Sanjay | 9' x 6' x 7' |
| 3. | Chander Kataria | 8'3 x 1' |
| 4. | Ravi Reddy Mistry | 10' X 5' |
| 5. | Ramesh Kahar (Press) | 10' x 3' |
| 6. | Ramesh Khar house | 10' x 5' |
| 7. | Vishnu Shanker Patil (2 shops) | 14' x 7' |
| 8. | Harjas Rai | 24' x 7' |
| 9. | Bhagwan Singh (Room No. 1) | 15'7' x 7' |

| | | |
|---|---|---|
| | (Room No. 2) | 7' x 5' |
| | (Room No. 3) | 8'6' x 8' |
| 10. | Satyia Chawan | 8' x 5' |
| 11. | Munilal Chawan | 9'6' x 5' |
| 12. | Raju Bachao Chawan | 16'6' x 4' |
| 13. | Ashok Chawan | 17'6' x 5' |
| 14. | Ramesh Chaner Ketharwani | 10' x 2' |
| 15. | Raju Kachru (owner) | |
| | Munna Rai (Tenant) | 23' x 2' |
| 16. | Raju Patel | 18' x 5' |
| 17. | Premchand Chawan | 16' X 5' |
| 18. | Dinekr Patil / Bijlee Seth | |
| | (Locked Property) | 10' x 5' |
| 19. | Mahinder Inderdev | 13' x 12' |
| 20. | Kishore furniture (Jaliwala) | 11' x 12' |
| 21. | Varandmal Chawla (1) | 10' x 13' |
| | (2) | 10' x 10' |
| | (3) | 4' x 10' |
| 22. | Bhawana R. Lund | 11' x 6' x 9' |
| 23. | Ratan J. Lund | 11' x 6' |
| 24. | Mahesh J. Lund | 11' x 6' |
| 25. | Arti S. Metwani | 12' x 5' |

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> हा जो मी प्रश्न विचारला आहे तो १० व्या महिन्यात विचारला आहे. आणि त्याचे अर्धे उत्तर बरोबर दिले आहे. अर्धे कदाचित त्यावेळी बरोबर असेल. परंतु आजच्या या तारखेला हे अर्धे उत्तर बरोबर आहे का? किंवा कसे याचा जरा खुलासा झाला तर बरे होईल.*

*<u>मा. उप-आयुक्त (श्री. पी.डी. कोळेकर):-</u> मा. महापौर, प्रश्न असा आहे कॅम्प नं. ५ मधील वसंत बहार मार्गाच्या रुंदीकरणात किती मालमत्ताधारक बाधित झालेत व त्यांची नावे काय? आता ही यादी २५ लोकांची आहे, सार्वजनिक बांधकाम विभागातून ही यादी आली आहे. ती आम्ही दिली आहे, महापालिका याच्या निर्णयाप्रमाणे मालमत्ता ॲफेक्टेड असणार तर त्यांना तेथे बांधायला परवानगी दिली जाते. आणि याच्यापेक्षा आणखी काय पाहिजे आपल्याला?*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> नाही, नाही, हा जो प्रश्न विचारला आहे, हा १० तारखेल विचारला आहे, ते ६/१०/२००३ ला विचारला आहे, त्यावेळचे उत्तर आजची नेमकी परिस्थिती काही फरक आहे का? या प्रश्नाला दोन तीन महिने झाले आहे.*

*<u>मा. उप-आयुक्त (श्री. पी.डी. कोळेकर):-</u>काय पाहिजे काय आपल्याला?*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> किती मालमत्ता धारक बाधित झाले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> तेच तर म्हणणे आहे , काय पाहिजे तुम्हांला?*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> तेच तर सांगत आहे ना. वसंत बहार मार्गाच्या रुंदीकरणामध्ये किती मालमत्ता धारक बाधीत झाले आहे त्यांची नावे काय? तुम्ही २५ जणांची यादी दिली आहे, ही आजच्या तारखेला बदली होणार नाही. हे उत्तर बरोबर आहे. सदरहू मालमत्ताधारकां व्यतिरिक्त किती मालमत्ता धारकांची परवागनी शिवाय बांधकाम केले आहे? असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात*

आली काय? नसल्यास त्यांची कारणे काय? तुम्ही वरील प्रमाणे उत्तर दिले आहे. हे त्यावेळेस दिलेले उत्तर आहे, त्याच्यानंतर आजपर्यंत काय परिस्थिती आहे. असे आहे का रोड कटींगच्या नावाने बांधकाम केले आहे. रोड कटींग शिवाय काही कामे केली काय? आजच्या परिस्थितीत नेमकी परिस्थिती काय?

**मा. सदस्य श्री. मनोज साधवानी हे सभागृहातून बाहेर गेले.**

मा. उप-आयुक्त (श्री. पी.डी. कोळेकर):- पहाणी करतो.
मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २३६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- एक मिनिट मला बोलायचे आहे, साहेब या रस्त्याचे जे रुंदीकरण झाले आहे ते करतांना काही ठिकाणी मालकाचे दुकान तुटले आहे, परंतु नाव भाडेकरुचे आले आहे असे झाले आहे. तर त्यांना महापालिकेतर्फे सांगण्यात येते की, यादीमध्ये आपले नाव नाही. याबददल यादीत तशी चुकीची दुरुस्ती करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- माझे म्हणणे आहे की, आपण २५ जणांची जी यादी दिलेली आहे, रोड कटिंग मध्ये बाधित झालेल्या व्यक्तींची. तर प्रत्यक्षात त्यांचे रोड कटिंगमध्ये कामे झालेली आहेत अथवा नाही. ही एक बाब, दुसरी बाब अशी की, तुम्ही उत्तर दिले ते बरोबर आहे की त्यावेळेस एकही काम नव्हते. परंतु आजच्या परिस्थितीत काय झाले आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मा. महापौर महोदया, मला असे वाटते की, त्यांना स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे. आपण आता जे विचारत आहात की, २५ बाधित व्यक्तींशिवाय अजून कोणी बांधकाम केले आहे का? त्याचे उत्तर देण्यापूर्वी आम्हांला त्याठिकाणी सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. त्यानंतरच आम्ही तुम्हांला उत्तर देवू शकू. तोपर्यंत आपला प्रश्न राखून ठेवला जाईल व पूढील बैठकीत त्यावर उत्तर देण्यात येईल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २३६ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २३६:- महानगरपालिकेच्या मागील बाजूस महात्मा फुले नगर व कोसलनगर वसाहती लगत असलेल्या महानगरपालिकेच्या मोकळया भुखंडावर श्री. पांडे बंधू व श्री. मिलिंद सिरीनगर यांनी अतिक्रमण करुन बेकायदेशीर कब्जा केला आहे काय? सदर प्रकरणी लेखी तक्रार आल्या आहेत काय? असल्यास सदर तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय?

उत्तर :- महानगरपालिकेच्या मागील बाजुस महात्मा फुले नगर व कोशलनगर वसाहतीलगत असलेल्या मोकळया भुखंडावर पांडे बंधू व मिलिंद सिरीनकर यांनी कब्जा केलेला असून त्यांचे भोगवटादरी नाव आहे. सदर प्रकरणी या विभागाकडे लेखी तक्रार प्राप्त झाल्या नसल्यामुळे तक्रार निवारण्याचा प्रश्न उदभवत नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- मी हा जो प्रश्न विचारला आहे, त्यावर जे उत्तर दिले आहे, ते आयुक्तांनी वाचल्यास त्यांना स्पष्टपणे दिसेल की, सदर प्रकरणी या विभागाकडे लेखी तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याने, तक्रार निवारणाचा प्रश्न उदभवत नाही. हे जे स्पष्टीकरण दिले आहे, याचा अर्थ असा होतो की जोपर्यंत कुणी तक्रार करणार नाही, किंवा जोपर्यंत कुणी तुम्हांला कळविणार नाही, तोपर्यंत तुमची मालमत्ता कुणीही घ्यावी, आणि हे तुम्हांला कळणार नाही. त्याच्यावर तुम्ही कुठलीही कार्यवाही करु नये असा होतो का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, श्री. प्रमोद टाले यांनी विचारलेला प्रश्न क्र. २३६ आणि त्याला दिलेले उत्तर महापालिकेच्या मागील बाजूस असलेले महात्मा फुले नगर व कौशल नगर येथे पांडे बंधू व मिलिंद सिरीनकर यांनी कब्जा केलेला असून त्यांचे भोगवटादरी नाव आहे, सदर प्रकरणी या विभागाकडे लेखी तक्रार प्राप्त झाल्या नसल्यामुळे तक्रार निवारण्याचा प्रश्न उदभवत नाही. यावर मी आयुक्तांना माहितीसाठी सांगू इच्छितो की, त्या जागेवर महापालिकेने जे.सी.बी. नेऊन कार्यवाही केलेली आहे. दोन वेळा कार्यवाही केलेली आहे. दोन वेळा महापालिकेचा राखीव भुखंड असल्याबाबत फलक लावलेला आहे. आपण हे जे उत्तर देत आहात ते चूकीचे आहे. तक्रारदाराने यापूर्वी छायाचित्रे व अर्जही दिलेले आहे. आपल्याकडे याबददल माहिती नसल्यास मी पूढील महासभेत याबददल आपल्याला छायाचित्रासह सविस्तर माहिती देईन.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

३ आयत्त्यावेळीचे विषय याठिकाणी प्राप्त झालेले आहेत. त्याची प्रत आपल्याला सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषय पूढीलप्रमाणे आहेत.

**विषय** :-श्री. सु .के . घोलप, उपमुख्य लेखा परिक्षक यांना उल्हासनगर महापालिका सेवेत लोकसेवा हितार्थ कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत.

**विषय** :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळावर शिक्षण अधिकारी या वर्ग-१ मधील अधिका-यांची प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्तीस मान्यता देणे.

**विषयः**-हवा प्रदुषण सनियंत्रण केंद्र स्थापन करणे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे बाबत.

आपल्या सर्वांची संमती असल्यास सदरचे विषय आजच्या महासभेच्या कामकाजात विषयपत्रिकेवर घेण्यांत येतील.

<u>मा. महापौर :-</u> सदरचे विषय सर्वानुमते आजच्या महासभेच्या कामकाजात आयत्त्यावेळचे विषय म्हणून समाविष्ट करण्यात यावेत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. २ वाचून दाखवितात.

मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९.१२.२००३ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :-</u> मा. सचिव साहेब, पृष्ठ क्र. ५३ वर श्रीमती रेखा कारीरा यांच्या नावाने जे वाक्य टाकण्यात आले आहे, ते प्रत्यक्षात मी बोलले होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तशी दुरुस्ती करुन घेण्यांत येईल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, विषयांना सुरुवात करण्यापूर्वी मला या ठिकाणी एक मुददा उपस्थित करावयाचा आहे, दोन-तीन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रांमध्ये एक बातमी आली होती, मा. आमदार यांनी शासनाकडे एक तक्रार केली आहे की, शासनाकडून जवळ-जवळ १४ कोटी रुपये हे आपल्या नगरपालिकेला येणे होते, अनुदानाच्या मार्फत. १९८६ ते आतापर्यंत असे विविध

*योजनांखाली जवळ जवळ १४ कोटी रुपये नगरपालिकेला येणे होते. परंतु ते येथिल प्रशासनाने हलगर्जीपणा केल्यामुळे ते येवू शकलेले नाहीत. तर ते आपल्याला आता आणता येतील का? किंवा ते न मागण्यामागे काय कारण आहे? नगरपालिकेला ते अनुदानाच्या स्वरुपात मिळणार होते. ते पैसे शासनाला परत करायचे नव्हते. पण नगरपालिका प्रशासनाने ते का मागितले नाही. याचे उत्तर सभागृहाला मिळू शकेल का? मा. आमदार साहेबांनी तसे वक्तव्य केलेले आहे. जे १४ कोटी रुपये येणार होते, ते कुठे खर्च होणार होते? कुठल्या भागावर खर्च केले जाणार होते?*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पूढील महासभेत आपण याविषयावर प्रश्न विचारवा आपल्याला त्याचे उत्तर देण्यांत येईल.*

*मा. महापौर :-मागील महासभेचे इतिवृत्त श्रीमती भावना खिलनानी यांनी सुचविलेल्या सूधारणेसह सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.*

*मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- मा. महापौरजी, मी येथे हरकतीच्या मुददयाद्वारे एक मुददा उपस्थित करु इच्छितो, हा एक महत्त्वाचा विषय असल्याने सर्वांनी, सभागृहनेत्त्यांनी लक्ष दयावे अशी मी विनंती करतो. या महापालिकेने एक ठराव पारीत केला होता की, जो नविन विकास आराखडा होता, तो रदद केला जावा. व त्याबददल आम्हांला एक पत्र प्राप्त झाले आहे. व मी समजतो की, या शहरामध्ये अशी परिस्थिती निर्माण केली आहे की, नविन विकास आराखडा जो बनवून पाठविला होता, सरकारने असे मानले होते की, तो रदद झालेला आहे. परंतु आम्हांला काही अशी कागदपत्रे प्राप्त झालेली आहे. ज्यांची प्रत आपणांस व आमदारांना देखील प्राप्त झालेली आहे, त्यामध्ये असे लिहिलेले आहे की, जो नविन विकास आराखडा आहे, यावर यापूर्वी जो स्थगन आदेश आला होता तो सरकारने दिनांक २९ नोव्हेंबर, २००२ पूर्वी दिला होता. व नंतर स्थगन आदेश ७ नोव्हेंबर, २००२ नंतर उठविण्यात आला होता. सरकारने असाही आदेश दिला आहे की, आयुक्त, एम.एम.आर.डी.ए., बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स यांनी उल्हासनगर येथून विकास आराखडयावर ज्या काही हरकती गेल्या आहेत, या महापालिकेने ठरावाच्या माध्यमातून एकमताने काही हरकती पाठविलेल्या आहेत, ३१ ऑगस्ट, २००२ ला ठराव पारीत करण्यांत आला होता की, नविन विकास आराखडा रदद केला जावा. परंतु सरकार कडुन आदेशाची प्रत आली आहे की, तो जो स्थगन आदेश होता तो उठविण्यांत आलेला आहे. आता ३ महिन्यांच्या आत उल्हासनगरसाठी कोणतीही सुनावणी न घेता ७ फेब्रुवारी पर्यंत सरकारला त्यावर निर्णय घ्यावयाचा आहे. आम्हांला प्रशासनाकडुन आशा होती की, आम्ही जेव्हा येथून ठराव करुन पाठवितो व सरकारकडुन जर तो ठराव स्थगित होत असेल, स्थगन आदेश उठत असेल तर आयुक्तांचे व प्रशासनाचे कर्तव्य बनते की, आम्ही येथे जे बसलेलो आहोत तर आम्हांला कमीत-कमी याची माहिती तरी दिली जावी. शहराची अवस्था काय आहे, तर आम्हांला असे वाटते की याबददल आपण सर्वांनी मिळून यावर विचार करायला हवा. सरकारकडुन जो आदेश आलेला आहे की, कोणतीही सुनावणी न घेता, निर्णय घ्यावयाचा आहे. यासाठी ७ नोव्हेंबरची तारीख दिलेली आहे व ७ फेब्रुवारीला ती पूर्ण होणार आहे. याबददल आपण आम्हांला अधिक माहिती दयावी. हा जो आदेश आहे त्याच्या प्रती या महासभेत वितरीत करायला हव्या होत्त्या. अन्यथा आम्हांला याची माहिती कशी मिळेल? शासनाकडुन जो महत्त्वाचा पत्र व्यवहार होतो तो माहितीसाठी सभागृहाच्या पटलावर ठेवणे आवश्यक असल्याबाबत तरतूद आहे. तर असे या महापालिकेत का होत नाही? हा शहराचा एक गंभीर विषय आहे. यासाठी हरकतीच्या मुददयाद्वारे मी हा विषय उपस्थित करीत आहे.*

*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, जो सुधारीत विकास आराखडा होता त्याला जी स्थगिती दिली होती, ती स्थगिती हटविली आहे,*

व याबाबत शासनाकडून पत्र आम्हांला प्राप्त झालेले आहे. आपल्या हातात आता कोणते पत्र आहे ते मला माहित नाही. परंतु आम्हांला देखील पत्र प्राप्त झाले आहे, त्यामध्ये असे कुठेही लिहिले नाही की, शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्यांत येईल. जो सुधारीत विकास आराखडा सादर करण्यांत आला आहे, त्यावर काय निर्णय घ्यावयाचा आहे, तो निर्णय नंतर घेण्यांत येईल. कुळगाव-बदलापूर व अंबरनाथ त्यांच्या विकास आराखडयावर सुनावणी सुरु करावयाची आहे, व आपल्या विकास आराखडयावर काय निर्णय घ्यावयाचा? तो निर्णय शासन स्तरावर प्रलंबित आहे. तो निर्णय स्वतंत्रपणे केला जाईल असे या पत्रात नमूद केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> यात असे लिहिले आहे की, उल्हासनगर महापालिका क्षेत्राकरीता तयार करण्यांत आलेल्या विकास योजनेवर कोणतीही सुनावणी न घेता विकास योजना आहे, त्या स्थितीत शासनाकडे अभिप्रायासाठी सादर करण्यांत यावी. त्या विकास योजनेबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यांत येईल. परंतु आमचे असे म्हणणे आहे की, कमीत कमी सभागृहाला याची माहिती तरी दयायला हवी. ही जी प्रगती झाली आहे कारण यामध्ये तरतूद देखील आहे की,............

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>आपले म्हणणे बरोबर आहे. यापूढे शासनाकडुन जो महत्त्वाचा पत्र व्यवहार प्राप्त होईल तो माहितीसाठी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत येईल. पुढील बैठकीत हे पत्र व इतर पत्र आपल्याला देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> जर सरकार असा निर्णय घेत असेल तर आम्ही सर्व मिळून, कारण हा सर्व शहराचा प्रश्न आहे, सरकारला सांगू की, आपण सुनावणी शिवाय कोणताही निर्णय घेवू नये. मला असे वाटते की, आपण सभागृहात सरकारकडे अशी मागणी करायला हवी की, कोणत्त्याही सुनावणी शिवाय निर्णय घेण्यांत येवू नये.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मा. महापौरजी, आज आमचे मा. सदस्य श्री. पंजाबी साहेब यांनी जो मुददा उपस्थित केला आहे, तो बरोबर आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे जे जनप्रतिनिधी आहे, अंमलबजावणी करणारे प्राधिकारी तर आपण आहोत. आज कोणताही विकास आराखडा जर अंमलबजावणी करण्यासाठी आला तर त्याची अंमलबजावणी तर आपणच करणार आहोत. तर असे असतांना सुनावणी घेतल्याशिवाय त्यांनी कोणताही निर्णय घ्यायला नको. काही वेळा पूर्वी आम्ही असा देखील ठराव केला आहे की, हा जो विकास आराखडा आहे तो रदद केला जावा. विकास आराखडा महापालिका स्वत: तयार करेल. त्याआधी ३०० चुका महापालिकेने विकास आराखडयात दाखविल्या होत्या. आम्ही एम.एम.आर.डी.ए.ला त्या सुधारणासाठी सूचीत केले होते, तो ठराव देखील पाठविला आहे. तर पूढील महिन्यात तुम्ही आमच्या समोर जेव्हा हे पत्र ठेवाल, तेव्हा त्यापूर्वी आम्ही सर्व एकत्र बसून आपसात निर्णय घेवू. शासनाने महापालिकेची बाजू ऐकल्याशिवाय कोणताही निर्णय घेवू नये.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> सभागृहनेताजी माझ्या म्हणण्याचा अर्थ असा होता की, ७ फेब्रुवारी ही अंतिम तारीख आहे. तर आपल्याला त्यापूर्वी महापालिकेतर्फे सभागृहाचे जे मत आहे, ते आयुक्तांनी, महापौरांनी असे कळवायला हवे की, आपण आदेश काढलेला आहे, परंतु आमची बाजू ऐकल्याशिवाय आपण यावर निर्णय घेवू नये. यावर आपले एकमत व्हायला हवे.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> श्री. लाल पंजाबी जे बोलत आहे, त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. आपण शासनाला आमच्या भावना लेखी पत्र देवून कळवाव्यात.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> मा. आयुक्त साहेब, १०/५/२००१ ला विकास आराखडा प्रसिध्द झाला होता. त्यानंतर महासभेमध्ये जो आराखडा प्रसिध्द झाला होता त्यावर चर्चा झाली होती. त्यानंतर सूचना व हरकतींद्वारे तो आराखडा एम.एम. आर.डी.ए. कडे पाठविला होता. त्यानंतर सुनावणी घेवून हरकती ऐकल्या जातील असे सर्वसामान्य लोकांचे मत होते. लोकप्रतिनिंधीची भावना होती, परंतु या महासभेमध्ये ठराव क्र. २१ नुसार दिनांक ३१/८/२००२ रोजी, अगोदर एम.एम.आर. डी.ए.कडे पाठविलेला ठराव प्रारुप विकास आराखडा रदद करण्यासाठी ठराव केला. आता शासनाने तो ठराव ज्यावर स्थगन आदेश होता तो उठविलेला आहे, आणि जो तीन महिन्याचा कालावधी होता, तो असाच संपणार आहे. म्हणजेच आम्ही ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्याची सुनावणी करणार नाही किंवा कसे? याची माहिती कृपया दयावी, सुनावणी झाली तर ठिक आहे अन्यथा ती न झाल्यास त्याला कारणीभूत प्रशासन आणि जी छाननी समिती आहे ते असतील. त्यांना माहिती होते आणि ते लोकांसमोर आले नाही त्यामुळे ते जबाबदार असतील. त्यामुळे आमच्या ज्या तक्रारी होत्या त्यावर सुनावणी झाली नाही, आता श्री. लाल पंजाबी व श्री. भुल्लर महाराज यांचे म्हणणे आहे की, सुनावणी शिवाय विकास आराखडा लागू करण्यात येईल. कुळगाव-बदलापूर, अंबरनाथ यांची सुनावणी झालेली आहे, आणि फक्त उल्हासनगरची कुठलीही सुनावणी न घेता ३ महिन्यांची जी मुदत दिली होती. ती मुदत संपलेली आहे. आता फक्त १५ दिवस शिल्लक आहेत असे आहे का? आम्ही ज्या हरकती व सूचना पाठविल्या होत्या त्या विचारात घेण्यात येतील का?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> हे जे पत्र सभागृहाच्या समोर ठेवलेले आहे. त्याचा अर्थ असा होत नाही की, महापालिकेने जे आक्षेप घेतलेले आहेत किंवा शहरातील व्यक्तींनी जे आक्षेप घेतलेले आहे, त्यावर सुनावणी घेतल्याशिवाय अंतीम निर्णय घेण्यात येईल. असा या पत्राचा अर्थ होत नाही. फक्त यावर सुनावणी कोणी करायची आहे? अथवा सुधारीत विकास आराखडा यामध्ये जास्त हरकती असतील त्याबद्दल काय करायचे. याबद्दल महापालिकेचा ठराव असा होता की, सुधारीत विकास आराखडा रदद करण्यांत यावा. तर त्यावर निर्णय घेणे बाकी आहे. सुनावणी घ्यायची असेल तर ती एम.एम.आर.डी.ए.तर्फे घेण्यांत यावी. अथवा अन्य कोणी घ्यावी. इतर महापालिकेमध्ये पाहिल्यास आपल्याला दिसून येईल की, कल्याण-डोंबिवली अथवा ठाणे महापालिका यांचा सुधारीत विकास आराखडा जेव्हा गेला तेव्हा त्यावर एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम २८ अन्वये त्यांच्याच सदस्यांची एक समिती नियुक्त करण्यांत आली होती सुनावणी घेण्यासाठी. नंतर ते पण रदद करण्यांत आले. तर यात सुनावणी शिवाय निर्णय घेण्यांत येईल असे लिहिलेले नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> मी आपल्याला वाचून दाखवितो.......... तसेच उल्हासनगर महानगरपालिका, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना वगळता, अंबरनाथ , कुळगाव-बदलापूर व परिसर क्षेत्रामध्ये आलेल्या सूचना हरकती यांना सुनावणी देवून सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन विकास योजना महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३० अन्वये हे पत्र मिळाल्यापासून ३ महिन्याच्या आत शासनास मंजुरीसाठी सादर करावी. तसेच उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राकरीता तयार करण्यात आलेल्या विकास योजनेवर कोणतीही सुनवाई न करता, विकास योजना आहे त्या स्थितीत अभिप्रायासह शासनाकडे सादर करण्यात यावी. त्या विकास योजनेबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल याचा अर्थ ते मंजुर करण्यात येईल असे होत नाही. सुनावणी एम.एम.आर.डी.ए. ने घ्यायची की कुणी घ्यायची याच्यावर निर्णय होईल. सुनावणीसाठी स्वतंत्र एखादी समिती नियुक्त करायची कलम २८ प्रमाणे की काय याच्यावर निर्णय होईल. परंतु ज्या प्रारुप विकास आराखडयावर सूचना आहेत, तर त्या हरकती व सूचनांवर किंवा प्रारुप विकास आराखडयावर शासन स्तरावर निर्णय होईल मंजुर होणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> हा जो विषय आहे तो आपल्यातील चर्चेचा मुददा नाही. आमचा मुददा असा आहे की, या शहरातील लोकांनी मागील विकास आराखडयाच्या वेळी जे सहन केले आहे त्यामुळे आमचे असे मत आहे की, यापूर्वीचा विकास आराखडा घरात, कार्यालयात बसून तयार करण्यात आला होता. यावेळी आम्हांला असे वाटत नाही, त्यामुळे या सभागृहाचे मत आहे की, शासनाने सुनावणी न घेता कोणताही निर्णय घ्यायला नको. हा आपला आपसातला चर्चेचा मुददा नसून ते संपूर्ण सभागृहाचे मत आहे. ज्याप्रमाणे दुधाने तोंड पोळलेला माणूस ताकही फुंकुन पितो, त्याचप्रमाणे आम्हीदेखील त्रस्त आहोत. आम्हांला असे वाटते की यावेळी आमच्यावर अन्याय व्हायला नको.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण मानता की, सुनावणी शिवाय त्याची अंमलबजावणी होणार नाही, त्यासाठी आपण निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या भावना शासनाला कळवाव्यात. आपण लिहावे की, सुनावणी घेतल्याशिवाय विकास आराखडा मंजुर करण्यात येवू नये.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>सभागृहाचे असे मत असल्यास आपण ठराव पारीत करावा. आम्ही शासनाला तसे कळवू.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> हरकतीच्या मुददयानंतर त्यावर महापौरांचे जे आदेश येतील. त्या आधारावर आपण पाठवू शकता.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, ठराव असा व्हायला हवा की, आम्ही आधी जो विकास आराखडा रदद केलेला आहे. तो तसाच ठेवण्यात यावा.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> सुनावणीच्या वेळी आम्ही तसे सांगू.*
*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> आम्ही जो ठराव पाठविला होता, त्या आधारावर त्यांनी स्थगिती आदेश दिला होता. तो उठविण्यात आला म्हणजे त्यांनी आपला ठराव नामंजुर केलेला आहे. तर परत आपण तसेच केल्यास त्याला काही अर्थ राहणार नाही. सुनावणी शिवाय त्यावर कार्यवाही व्हायला नको, एवढेच आमचे म्हणणे आहे.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> मा. महापौरांच्या आदेशान्वये मी आपल्याला सूचना देत आहे की, हरकतीच्या मुददयाद्वारे आपण ठराव करु शकत नाही. आपली अनुमती असल्यास यावर विशेष सभा बोलविण्यांत येवू शकते, दुसरा पर्याय असा की, महापौरजी आयुक्तांना निर्देश देतील की, या महासभेचे जे मत आहे, ते या विरुध्द आहे. त्यामुळे शासनाला तसे कळवावे. या दोघांमधून एका पर्यायाचा आपण अवलंब करु शकता.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> आम्ही हा मुददा यासाठी उठविला होता की, उल्हासनगरच्या लोकांचे नुकसान व्हायला नको, यासाठी हा मुददा प्रशासन व शासनासमोर आणणे आमचे काम होते, त्यावर काय कार्यवाही करायला हवी ते आपल्या हातात आहे. आपल्या किंवा प्रशासनाच्या बेजबाबदारपणाने, लपविण्याच्या हेतूने जनतेचे नुकसान व्हायला नको.*

<u>मा. महापौर :-</u> मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छिते की, या विषयावर जी चर्चा झाली तर यावर लक्ष द्यावे व तसे शासनाला अवगत करावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> मा. महापौरांचे असे म्हणणे आहे की, सभेचे जे मत आहे ते आयुक्तांच्यावतीने शासनाला कळवावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय क्र. ३:-सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकातील एका लेखाशिर्षातून दुस-या लेखा शिर्षात रक्कम बदल करणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ११२ , दिनांक २४/१२/२००३ विचारात घेणे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा. महापौरजी, ही जी अदलाबदल करायची आहे, तर पैसे शिल्लक आहेत की, यापूर्वीच संपलेले आहेत. हा जो ३५ लाखांचा निधी आहे तो शिल्लक आहे की, यापूर्वीच संपलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री शांताराम निकम :-</u> शिल्लक आहे म्हणुन तर रक्कम बदल करीत आहेत ना.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा. महापौरजी, हा जो निधी आपण वर्ग करीत आहोत तर शौचालय दुरुस्तीसाठी तेवढा निधी शिल्लक आहे ना? का यापूर्वीच संपलेला आहे?

<u>मा. महापौर :-</u> याचे उत्तर आपणांस आयुक्त साहेब देतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, जे लेखा शिर्ष बदलले जाते त्याचा अर्थ आपल्याकडे पैसे शिल्लक आहे असा होत नाही. तेवढे उत्पन्न आपल्याला प्राप्त होईल व नंतर आपण ते खर्च करु. शौचालय दुरुस्तीचे जे काम आहे, यावर यावर्षी आम्ही तरतूद कमी केली होती. ती वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी एका छोटया लेखा शिर्षातून निधी दुस-या छोटया लेखाशिर्षात वर्ग करण्यात येत आहे. या शिर्षामध्ये प्रस्ताव जास्त न आल्याने निधी शिल्लक होता त्यामुळे तो शिल्लक निधी दुस-या लेखा शिर्षात वर्ग करण्यात येत आहे, परंतु तरतुद कमी असल्याने निधी वर्ग करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> मा. महापौर महोदया, हा जो प्रस्ताव आणलेला आहे, यासाठी आम्ही आपले अभिनंदन करतो. कारण की बरेच दिवसापासून आमची मागणी होती की या शहरात सुलभ शौचालय बनविण्यात यावे. नविन शौचालय बनविण्यांत यावे. जुने शौचालय दुरुस्त करण्यात यावीत. नविन मुता-या बनविण्यात याव्यात. प्रशासनाने या मुलभूत सोयीकडे लक्ष दिले आहे व हा प्रस्ताव आणलेला आहे, यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे आम्ही आपले अभिनंदन करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. आयुक्त साहेब, आता आपण जे शौचालय बनविणार आहोत त्याची आवश्यकता आहे का? आता सध्या आवश्यकता आहे का त्याची नाहीतर दुरुस्त कराल व आठ दिवसांनी तोडण्याचे आदेश काढाल. स्थायी समितीमध्ये विषय येईल की, एवढे एवढे शौचालये तोडायचे आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जे शौचालय दुरुस्त करुन वापरात आणता येतील, त्यांच्या दुरुस्तीकरीता आम्ही हा प्रस्ताव

केलेला आहे. जे शौचालय दुरुस्त केल्यांनतरही आज वापरात येणार नाहीत अशा अवस्थेत असल्यास तेथे नविन शौचालय बनविणे आवश्यक आहे. जर त्या परिसरातील लोक तेथे शौचालय ठेवू इच्छित असतील, ते त्याचा वापर करत असतील तर तेथे नविन शौचालय बनविण्यात येईल. परंतु असेही काही आहेत की, दुरुस्त करुन ते वापरात आणू शकतो, त्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्यांनी जो मुददा उपस्थित केला तो वेगळया प्रकारचा आहे, तुम्ही जो खुलासा केला तो वेगळा केला, त्यांचा मुददा असा आहे की आज आपण ही सर्व शौचालय दुरुस्त करणार आहोत. पुन्हा सहा महिन्यांनी तुमचा विभाग स्थायी समिती समोर प्रस्ताव आणेल की, तेथे आता उपयोग नाही, लोकांची मागणी आहे, आणि मग आपला स्वच्छता निरिक्षक अभिप्राय देईल की, ही शौचालय काढायची आहेत. तर मग हा वायफळ खर्च होईल. तर आपल्याला पूढील कालावधी साठी ती शौचालय आवश्यक आहेत असे आपण प्रतिपादन करा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- शौचालय दुरुस्तीचे कामे इतिवृत्त कायम झाल्यानंतर करणार की लगेच करणार आहात?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- हे दुरुस्तीचे जे काम आहे ते ठराव पास झाल्यानंतर त्यास सभागृहात वाचून लगेच मंजुरी दिली जात असेल तर हे इतिवृत्त कायम होण्याच्या पूर्वी देखील होवू शकते. परंतु नियम असा आहे की, ठराव पारीत झाल्यानंतर तो पुनश्च सभागृहात वाचून दाखवायला हवा. व सभागृहाने तो त्वरीत संमत करायला हवा. या प्रकरणात असे झाल्यास आम्ही त्यावर त्वरीत कार्यवाही करु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आज येथे जे ३७ लाख रुपये शौचालय दुरुस्तीसाठी वर्ग करण्याचा तो प्रस्ताव आला आहे, तर मला असे वाटते की, हे काम सर्व सदस्यांच्या प्रभागात करायला हवे. दुसरे असे की, ज्या सदस्याच्या प्रभागात शौचालय वापरात नसेल, जो सदस्य लिहून देत असेल की, हे शौचालय वापरात नाही, हे तोडायला हवे, तर असे शौचालय तोडायला हवेत. आमचे मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले त्याप्रमाणे मी सांगू इच्छितो की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हा ठराव अंमलात आणावा. कारण जे शौचालय अत्यंत वाईट अवस्थेत आहे, ज्यांचे दरवाजे , कडया तुटलेल्या आहेत ते लवकरात लवकर दुरुस्त करता येतील. ज्यामुळे शहरातील लोकांना सुविधा होईल. धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता सभागृहातून बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-आम्ही एक विशेष सूचना करु इच्छितो की, काही दिवसांपूर्वी श्रीमती भारती छाब्रिया यांच्या प्रभागात आम्ही एका सार्वजनिक शौचालयाची मागणी केली होती. जेथे आजही लोक उघडयावर प्रात:विधी करीत आहेत. तेव्हा आपण सांगितले की, सदरचे काम नगरसेवक निधीतून करण्यासाठी पत्र दयावे. नगरसेवक निधीतून २ लाखाचे काम करण्यासाठी श्रीमती भारती छाब्रिया यांचे पत्रही आम्ही सादर केले. त्यानंतर ते मंजुर झाले परंतु कुणीही ठेकेदार सदरचे काम करण्यास तयार नाही. यासाठी कारण सांगितले जाते की, शौचालयामध्ये कमाई नाही. दुसरे असे सांगितले जाते की, पेमेंट मिळत नाही. तर कमीत कमी हे जे मुलभूत आवश्यकतेचे काम आहे, यासाठी ठेकेदारांची व्यवस्था केली जावी की, त्यांनी शौचालयाचे काम केल्यास त्यांना पेमेंट लवकरात लवकर मिळेल. जेणेकरुन आम्ही लोकांना मुलभूत सुविधा देवू शकु. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, मी मागील एक-दोन बैठकीत सांगितले होते की, शहरातील जे मुख्य बाजार आहेत, तेथे मुता-या अजिबात नाहीत, तेथील जे दुकानदार आहेत, त्यांनाही त्रास आहे. बाहेरील लोक खरेदी करण्यासाठी येतात, त्यांना देखील त्रास आहे. जसे कॅम्प नं. १ व २ येथे मुख्य बाजारात ज्या मुता-या आहेत. त्यांची साफ सफाई बरोबर होत नाही. कॅम्प नं. ४ येथिल बाजारात तर खुप जास्त त्रास आहे. मी २-४ वेळा याची यादी तयार करुन देखील दिली आहे जेथे छोटया-मोठया दुरुस्त्या करुनही काम होवू शकते. परंतु त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. तर जनहित लक्षात घेता, मुख्य बाजारातील मुता-या व शौचालय लवकरात लवकर दुरुस्त केल्या जाव्यात.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी, श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>काही सदस्य :-</u>पास, पास.................

<u>मा. महापौर :-</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे. व यावर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करण्यांत यावी.

<u>विषय क्र. ३:-</u> सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकातील एका लेखाशिर्षातून दुस-या लेखा शिर्षात रक्कम बदल करणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ११२, दिनांक २४/१२/२००३ विचारात घेणे.

<u>प्रस्तावना :-</u>

महासभा ठराव क्र. १०१, दिनांक २०/१/२००३ अन्वये सन २००३-२००४ च्या अंदाजपत्रकात विविध विभागातील लेखा शिर्षांतर्गत वित्तीय तरतूद करण्यात आली होती, त्या अनुषंगाने बांधकाम विभागाने विविध योजना हाती घेतल्या आहे. सध्या शहरातील अस्तित्त्वात असलेल्या शौचालयाची दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी ३५ लाख रुपयांचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहे. सदर लेखा शिर्षात पुरेसी तरतूद उपलब्ध नसल्यामुळे इतर लेखा शिर्षातून दुस-या लेखा शिर्षात खालीलप्रमाणे रक्कम हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

| अ. | ज्या लेखा शिर्षातून रक्कम हस्तांतर करावयाची आहे त्याचे नाव | ज्या लेखा शिर्षात रक्कम हस्तांतरण करावयाची आहे त्याचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | प्रवेशद्वारे, यात्रीनिवास, समाज मंदिर स्पोर्टस, स्टेज व इतर महानगरपालिका इमारती दुरुस्ती व निगा<br>अ-अंदाजपत्रक<br>(क-५-IV) भाग-२ | सार्वजनिक शौचालय व मुता-या दुरुस्ती<br>क-अंदाजपत्रक<br>(ड-II) भाग-१ | २० लाख |
| २. | महापालिका इमारती बनविणे | सार्वजनिक शौचालय व मुता-या दुरुस्ती | १५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| | अ-अंदाजपत्रक (क-४-I) भाग-२ | क-अंदाजपत्रक (ड-II) भाग-१ | |
| एकूण--- | | | ३५ लाख |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ चे नियम २ (२) मधील तरतूदीनुसार वरील लेखा शिर्षातून दुस-या लेखा शिर्षात रक्कम हस्तांतरण करणेबाबत महासभेस शिफारस करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र. ११२ दिनांकः-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री उमाप रामदास

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सुचविलेल्या एका लेखाशिर्षातून दुस-या लेखाशिर्षात रक्कम बदली करणेस महासभेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय क्र. ४:- मुख्य लेखा परिक्षकांच्या माहे जुलै, २००३ पर्यंतच्या जमा खर्चाचा अहवाल व नियमबाहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. ११०, दिनांक २४/१२/२००३ द्वारे केलेले आदेश कायम करणे.

काही सदस्य :- पास, पास......

मा. महापौर :- सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना :-

विषय क्र. ४:- मुख्य लेखा परिक्षकांच्या माहे जुलै, २००३ पर्यंतच्या जमा खर्चाचा अहवाल व नियमबाहय प्रकरणी स्थायी समिती ठराव क्र. ११०, दिनांक २४/१२/२००३ द्वारे केलेले आदेश

कायम करणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०५व कलम १०६ (१) (अ) नुसार माहे जुलै २००३ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर केलेला आहे. कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा ही विनंती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे जुलै २००३ पर्यंतच्या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तिय वर्ष २००३ -२००४ च्या 'अ' व 'क' अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व जुलै २००३ पर्यत पहिल्या चार महिन्यामध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलेले आहे .

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| 'अ' | १२० ,९९ ,१५ ,००० |
| 'क' | ४७ ,२२ ,८३ ,००० |
| एकुण | १६८ ,२१ ,९८ ,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत .

| | | |
|---|---|---|
| १ | **महसूल जमा** | १४३ ,६१ ,९१ ,००० |
| २ | शासकीय अनुदान | ७ ,६९ ,०० ,००० |
| ३ | कर्ज ( भांडवली) | २ ,३५ ,०० ,००० |
| ४ | अनामत रक्कमा/दायित्वे इ . | १४ ,३२ ,२९ ,००० |
| | एकूण | १६७ ,९८ ,२० ,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | २३ ,७८ ,००० |
| | एकुण :- | १६८ ,२१ ,९८ ,००० |

वित्तीय वर्ष २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु. १४३ ,६१ ,९१ ,०००/- अपेक्षित धरलेली होती माहे जुलै २००३पर्यंत समप्रमाणात रु ४७ ,८७ ,३० ,०००/- महसूल उत्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात रु २२ ,८८ ,८१ ,०००/- (१६%) महसूल उत्पन्न प्राप्त झाले .

माहे जुलै २००३ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे .

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प 'अ' | | अंदाजित | माहे जुलै २००३पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष (रु . १०००पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात कर | ५७ ,४६ ,०० ,००० | १९ ,१५ ,३३ ,००० | १७ ,४८ ,८६ ,००० | ९२ % |
| २ | मालमत्ता कर | ३४ ,०० ,०० ,००० | ११ ,३३ ,३३ ,००० | २ ,०४ ,५५ ,००० | १८ % |
| ३ | एम आर टी पी वसुली | ३९ ,३८ ,००० | १३ ,१३ ,००० | २३ ,४१ ,००० | १७८ % |
| ४ | महानगर-पालिकेस मालमत्तेपासून प्राप्त झालेले उत्पन्न | ३ ,२७ ,३३ ,००० | १ ,०९ ,११ ,००० | ९००० | ०१ % |
| ५ | मार्केट | - | - | ३००० | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | रुग्णालय फी | २ ,३५ ,००० | ७८ ,००० | २३ ,००० | २९ % |
| ७ | परवाना व इतर फी | ७५ ,०५ ,००० | २५ ,०२ ,००० | ४ ,३८ ,००० | १८ % |
| ८ | संकिर्ण | ५९ ,४७ ,००० | १९ ,८२ ,००० | ५१ ,५९ ,००० | २६० % |
| | एकूण-अ | ९६ ,४९ ,५८ ,००० | ३२ ,१६ ,५२ ,००० | २० ,३३ ,१४ ,००० | ६३ . २० % |
| अर्थ संकल्प 'क' | | | | | |
| ९ | पाणी पुरवठा देयके | ४० ,०० ,०० ,००० | १३ ,३३ ,३३ ,००० | २१ ,०८ ,५००० | १६ % |
| १० | मालमत्ता कर | ७ ,०१ ,०० ,००० | २ ,३३ ,६७ ,००० | ४० ,४२ ,००० | १७ % |
| ११ | परवाना/ इतर फी | १० ,७० ,००० | ३ ,५७ ,००० | ३ ,६५ ,००० | १०२ % |
| १२ | संकिर्ण | ६३ ,००० | २१ ,००० | ७५ ,००० | ३५७ % |
| | एकूण - 'क' | ४७ ,१२ ,३३ ,००० | १५ ,७० ,७८ ,००० | २५ ,५६ ,७००० | १६ % |
| | एकूण- 'अ' व 'क' | १४३ ,६१ ,९१ ,००० | ४७ ,८७ ,३० ,००० | २२ ,८८ ,८१ ,००० | ४७. ८१ % |

'अ' व 'क' अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु . १६८ ,२१ ,९८ ,०००/- ( प्रांरभिक शिलकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात जुलै २००३ पर्यंत रु ३४ ,६० ,९५ ,०००/- उत्त्पन्न प्राप्त झाले आहे. उत्त्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्त्पन्नाचे लेखा परिक्षण अघावत ठेवता येत नाही.

<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००३ ते जुलै २००३ या कालावधीमध्ये रु . २९ ,०० ,०४ ,००० खर्च लेखांकित झालेला आहे .

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी अधिन आहे .

निवृत्ती वेतन प्रकरणे - माहे जुलै २००३ पर्यंत महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा-यांची ४५ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत .

<u>लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी ;मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे</u>

<u>मालमत्ता कर विभाग</u>

<u>आक्षेप क १):-</u> <u>श्री.अनिल ए.खतुराणी वसुली लिपीक, मालमत्ता कर विभाग यांनी</u>

अपहारीत केलेल्या रक्कम रु. १६१४/- बाबत..

मालमत्ता कर विभागातील वसुली लिपीक श्री. अनिल ए,खतुराणी. यांनी पावती पुस्तक कमांक ७८२ मधिल पावती कमांक ०७८२०० दिनांक २२/२/२००२ अन्वये रु. १६१४/-(रुपये एक हजार सहाशे चौदा मात्र) मालमत्ता करापोटी वसूल करुन सदरच्या रकमेचा भरणा महापालिका कोषागारात न केल्याने सदर रकमेचा त्यांनी कायम स्वरुपी अपहार केल्याचे दिसून आले. सदरची अपहारीत रक्कम संबंधीताकडून तात्काळ वसुल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा करण्याबाबत व संबंधीतावर योग्य ती कारवाई करण्याबाबत या विभागाचे अर्धसमास ज्ञापन प.क्र. उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/ दिनांक : १६/७/२००३ अन्वये उपआयुक्त (शहर) यांना कळविले. सदरची रक्कम संबंधीतांकडून वसूल करुन दिनांक : २२/७/०३ रोजी महापालिकेच्या कोषागारात भरणा केल्याचे मालमत्ता करविभागाने त्याचें प.क्र. उमपा/कर/३७३ दिनांक -: ७/८/०३ अन्वये कळविले आहे. श्री. अनिल खतुराणी यांना प्रशासनाने निलंबित केले आहे.

आक्षेप क्र२):- श्री एम.. बी. कनोजे लिपिक ,मालमत्ता कर विभाग यांनी अपहारीत केलेल्या रक्कम रु. ५१७२०/- ( रुपये एक्कावन्न हजार सातशे वीस फक्त) बाबत.

श्री . एम बी कनोजे, लिपीक हे दिनांक १६/१२/०२ ते २४/३/०३ या कालावधीत मालतत्ता कर विभागात प्रभाग ३८ मध्ये कार्यरत होते त्यांचे कडील मालमत्ता कर वसुली पावती पुस्तक कमाक ६७७ ची तपासणी केली असता त्यांनी पा क. ६७६६१ ते पा क. ६७६८४ अन्वये एकूण रक्कम रु . ५१७२०/- (रुपये एक्कावन्न हजार सातशे वीस फक्त ) वसूल केले ,. परंतु सदरची रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नाही .सदरची रक्कम संबंधीतांकडून तात्काळ वसूत करुन महापालिकेच्या कोषगारात भरणा करण्याबाबत व श्री. कनोज लिपीक यांच्यावर योंग्य ती कारवाई करण्याबाबत या विभागाचे अ.स.ज्ञा. प. क उमपा/लेपवि/करविभाग/असज्ञा/ ८७ दिनांक : १०/७/०३ अन्वये उप-आयुक्त (शहर) यांना कळविले आहे. सदरची रक्कम संबंधीताकडून वसूल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा केल्याचे मालमत्ता कर विभाग यांनी त्याचे प. क. उमपा/कर विभाग/४०३ दिनांक : १८/८/०३ अन्वये कळविले आहे. श्री. एम. बी कनोजे यांना प्रशासनाने निलंबित केले आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११० दिनांक:-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री मोहन वेहरानी
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही स्थायी समिती वरीलप्रमाणे महापालिका मुख्य लेखा परिक्षकाचे माहे जुलै २००३ पर्यंत जमा खर्चाच्या लेख्याच्या अहवालास छाननी अंती स्विकृती देत आहे. व प्रशासनास सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाला अनुसरुन उत्पन्नात वाढ करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनास महासभेच्या कायमतेच्या अधिन राहून आदेश करीत आहे.

परंतू--

१ वसूलीच्या बाबतीत श्री. अनिल खतुरानी, लिपिक व श्री. एम.बी. कनोजे, लिपिक यांनी केलेल्या नियमबाहय प्रकाराबाबतीत प्रशासनाने संबंधिताविरुध्द खातेनिहाय चौकशी बसविलेली आहे. आणि त्या चौकशीच्या निकालाअंती रितसर पुढील कार्यवाही करता येईल.

२ श्री. अनिल खतुरानी व श्री. एम.बी. कनोजे यांनी अपहारीत केलेल्या

रक्कमेची महापालिका कोषागरात भरणा केली असून आवश्यक वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. ११४ दिनांकः-१९ ७ २००४.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती सिमा मोकल

ही महासभा वरील स्थायी समिती ठराव क्र. ११० , दिनांक २४/१२/२००३ द्वारे मुख्य लेखा परिक्षकाचे माहे जुलै, २००३ पर्यंत जमा खर्चाचा व नियम बाहय प्रकरणी अहवालावर केलेला आदेश कायम करीत आहे.

सूचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५:- प्रभाग समिती क्षेत्र क्र. ३ चे सभापती श्री. प्रशांत जाधव यांना दिनांक ३०/५/२००३ ते २२/८/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ११५ , दिनांक २४/१२/२००३ कायम करणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- आम्हाला असे वाटते की, तांत्रिक दृष्टया याच्यावर लेखा परिक्षणाचे आक्षेप आहे. ज्याच्याकडे वाहन नाही त्याला आपण असा भत्ता देवू शकत नाही. लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून हे चूकीचे आहे. लेखा परिक्षकांचा त्यावर आक्षेप देखील आहे. यासाठी आम्ही त्याचा विरोध करतो.

मा. सचिव (श्री. पकाश कुकरेजा):- त्यांच्याकडे वाहन होते, परंतु ते त्यांच्या नावावर नव्हते. त्याबददलची कागदपत्रे त्यांनी नंतर दिलेली आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो यापूर्वी असेच विषय आले होते, स्थायी समितीने त्यास मान्यता दिली होती. महासभेने देखील मान्यता दिली होती. व हे जे धोरण आहे, ते आपल्या पहिलेच्या धोरणाप्रमाणे जेवढे सभापती आहेत, पदाधिकारी आहेत त्यांना काही दराने वाहन

भत्त्याची प्रतीपूर्ती करणे यानुसारच आलेले आहे. फक्त त्यावेळी त्यांच्या नावावर वाहन नव्हते. नंतर त्यांच्या नावावर झाले. जर महापालिकेने असा ठराव पारीत केला की, कुणालाही वाहनभत्त्ता दयायचा नाही तर सर्वात जास्त आनंद मला होईल.
<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>आयुक्त साहेब, माझा सांगण्याचा मुददा असा आहे की, हे जे प्रकार होतात, मध्ये जे आडकाठी येते त्याला कारण आहे की, तुमचा जो ठराव आहे त्यामध्ये वाहनाची कागदपत्रे नावावर असल्याशिवाय वाहन भत्त्ता देण्यात येवू नये. हा जो मुददा आहे हा मुददा काढुन टाकायला हवा. ज्या दिवसापासून सभापती रुजू होतो त्या दिवसापासून त्यांना भत्त्ता मानधनाच्या स्वरुपात दिला गेला पाहिजे. कोणत्त्याही प्रकारची कागदपत्रे मागविण्यात येवू नये.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास...............

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुंमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. ५:-</u> प्रभाग समिती क्षेत्र क्र. ३ चे सभापती श्री. प्रशांत जाधव यांना दिनांक ३०/५/२००३ ते २२/८/२००३ या कालावधीचा वाहन भत्त्ता अदा करणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ११५, दिनांक २४/१२/२००३ कायम करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिकेच्या अधिनियम १९४९ मधील कलम २९ (अ) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेच्या महासभेने ठराव क्र. ३ , दिनांक २१/४/२००३ अन्वये महानगरपालिकेकरीता एकूण ४ प्रभाग समित्त्यांची स्थापना करण्यास मान्यता दिलेली आहे.

महासभा ठराव क्र. २१, दिनांक १२/१२/२००१ अन्वये प्रभाग समिती सभापती यांना प्रति महिना रुपये १५०००/- वाहन भत्त्ता स्थायी समिती ठराव क्र. ६ , दिनांक ३०/४/१९९७ मधील मंजूर अटी व शर्ती नुसार अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६ , दिनांक ३०/४/१९९७ मधील अटी व शर्तीनुसार संबंधीतांकडे स्वतःचे वाहन भत्त्ता देय आहे. तसेच आज मितीस संबंधीतांकडे वाहन नसेल तर असे वाहन ज्या दिवशी खरेदी करता त्या दिवसापासून वाहन भत्त्ता मिळण्यास संबंधीत पात्र राहतील आणि याच ठरावा अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांच्या कार्यकालावधीत चार चाकी वाहन देणे ऐवजी प्रती महिना रुपये १५०००/- वाहन भत्त्ता देणे बाबत मान्यता दिलेली आहे.

प्रभाग समिती क्र. ३ ची दिनांक ३०/५/२००३ रोजी सभा होऊन त्यामध्ये ठराव क्र. ३ क्रमांक ८, दिनांक ३०/५/२००३ अन्वये श्री. प्रशांत जगन्नाथ जाधव यांची सभापती म्हणून निवड झालेली होती. उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. प्रशांत जाधव यांचे वापरात असलेले वाहन क्र. एम.एच. ०५ जी ३६५ हे वाहन दिनांक २२/८/२००३ रोजी त्यांच्या नावांवर झाल्याची नोंद आहे.

तत्त्कालीन प्रभाग समिती सभापती श्री. प्रमोद टाले यांना त्यांचे वाहन उशिरा नावावर झाल्यानंतरही त्यांना सभापतीपदी नियुक्ती झालेल्या दिवसापासून स्थायी समिती ठराव क्र. १२९, दिनांक ३१/३/२००३ अन्वये वाहन भत्त्ता विशेष बाब म्हणून अदा करण्यात आलेला आहे.

श्री. प्रशांत जाधव सध्या कार्यरत प्रभाग समिती सभापती यांनी श्री. प्रमोद टाले यांच्या प्रमाणे वाहन भत्ता त्यांना देण्यांत यावा अशी विनंती अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्यात त्यांनी दिनांक ३०/५/२००३ ते २२/८/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता मिळण्याची मागणी केली आहे.

सबब सदर बाब मान्यतेसाठी मा. स्थायी समिती व महासभेकडे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ११५ दिनांकः-२४/१२/२००३.

सुचकाचे नाव :- श्री पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती नंदिनी बामणकर

ही स्थायी समिती वरील कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४.१९९७ च्या धर्तीवर अटी व शर्ती मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. प्रशांत जाधव यांना विशेष बाब म्हणुन दिनांक ३०/५/२००३ ते २२/८/२००३ या कालावधीत प्रभाग समिती सभापती पद धारण केल्याने वाहन भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. ११५ दिनांकः-१९.१.२००४.

सुचकाचे नाव :- श्री. होशीयारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

ही महासभा प्रभाग समिती क्र. ३ चे सभापती श्री. प्रशांत जाधव यांना दिनांक ३०/५/२००३ ते २२/८/२००३ या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणे कामी वरील स्थायी समितीचा दिनांक २४/१२/२००३ चा ठराव क्र. ११५ कायम करीत आहे

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

विषय क्र. ६:- पाणी पुरवठा योजना टप्पा-१ व भुयारी गटार
योजना या कर्जावरील दंडनिय व्याज माफ
करणेसाठी महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या
निर्भय योजनेचा फायदा घेणे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आम्हांला समजावून सांगा विषय काय आहे ते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> गोषवारा आपल्याला दिलेला आहे, त्यामध्ये स्पष्टपणे दिलेले आहे, तो वाचल्यास सभागृहात त्यावर जास्त चर्चा करण्याची वेळ येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आपण काय इच्छितात ते सांगा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये पर्याय स्पष्टपणे नमूद केलेले आहे. जेथे आम्हांला सर्वात जास्त फायदा होत आहे, जवळपास ५ करोडचे विलंब शुल्क माफ होत आहे. त्याबाबत पर्याय क्र. १ स्विकारायचा आहे. म्हणजे ३ महिन्यांमध्ये ते पैसे भरावयाचे व ज्यामध्ये फक्त ८४ लाखाचे विलंब शुल्क माफ होणार आहे, त्यामध्ये एक वर्षाचा कालावधी घ्यायचा असा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. पहिले तर पाणी पट्टीचे जे विलंब शुल्क होते, ते १.२२ कोटी एवढे आम्हांला भरायचे होते, ते आम्ही भरलेले आहेत. त्यामुळे पाणी बिलावर जे विलंब शुल्क होते ते माफ होईल. आम्ही जे कर्ज घेतले आहे, दोन कामांसाठी. तर एक कर्ज भरल्यानंतर त्याचे व्याज व मुददल भरल्यानंतर आपणांस रुपये ५ कोटी माफ होणार आहे. त्यात आम्ही जो पर्याय १ आहे, जर पहिल्या तिमाहीत म्हणजेच ३१ मे पासून सुरु होणा-या तिमाहीत जर आपण पूर्ण पैसे भरले तर किती पैसे माफ होतील अथवा किती विलंब शुल्क माफ होईल, त्याची टक्केवारी देखील येथे दिली आहे. शेवटचे आपण वाचल्यास उपरोक्त तक्त्यातील पर्याय क्र. १ व ४ चा लाभ घेण्याच्या दृष्टीने सदर निर्भय योजनेत भाग घेवून एकूण रुपये १९.१६ कोटी व्याजासह कर्ज परत फेड करुन विलंब शुल्क २२.०३ कोटी माफ करण्याचा प्रयत्न महापालिकेच्या दृष्टीने हिताचे होईल. हे स्पष्टपणे आम्ही लिहिलेले आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी सभागृहातून बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> महापालिकेकडे एवढे पैसे आहेत का भरण्यासाठी? आता स्थिती अशी आहे की, एवढे करोडोंचे देयके अदा करायचे आहे. तर एवढे पैसे कुठून येतील. याची योजना आपण कशी केली आहे ते सांगा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> आम्ही नागरीकांकडुन जो कर वसूल करीत आहेत त्यातून अथवा शासनाकडे आमचे जवळपास जे रुपये १४ कोटी अनुदानापोटी येणे आहेत. त्यातून हे पैसे भरले जातील.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> अवस्था अशी आहे की, रुपये २५ लाख जे तीन वर्षापासून देय आहेत ते घेवू शकत नाही. तर आपण १४ कोटींची गोष्ट कशी करता? शासनाची जी काही योजना असते. तर त्यासाठी पैसे येत नाहीत. आपण बघा की, पंतप्रधान निधीचे जे पैसे आहेत त्यातून ३ वर्षापासून एकही काम झाले नाही. १४ कामे पास होतात परंतु आपण एकही काम करु शकत नाही. तर यासाठी पैसे कुठून येतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>महापालिकेची जी आर्थिक स्थिती आहे ती पाहता त्यातून बाहेर यायचे असल्यास आर्थिक शिस्त लावणे आवश्यक आहे. आधी आपण जे कर्ज घेतले त्याची परतफेडच केलेली नाही. त्यामुळे २ बाजूने आपले नुकसान होत आहे. एक म्हणजे त्यावर दंडनीय व्याजाची आकारणी होत आहे. व दुसरे म्हणजे नविन विकासाची कामे घ्यावयाची असल्यास आपल्याला त्यासाठी कुणीही कर्ज दयायला तयार नाही. दोन्ही बाजूने आपले नुकसान होत असल्याने ..............

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> शासनाचे जे पैसे आहेत त्याचा उपयोग होत नसेल तर आपण दुसरे काय करणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>आपण यामध्ये दोन विषय एकत्र करीत आहात. शासनाचे अनुदान येणे व ते त्याच कामावर खर्च करणे ही एक बाब आहे. व दुसरे म्हणजे या आधी आपण जे काही कामे केलीत म्हणजेच रस्ते निधी यातील रक्कम चार करोड पेक्षा जास्त थकबाकी आहे. व मागील ३ वर्षांपासून आपल्याला ही रक्कम मिळालेली नाही. तो पैसा जर आपण ठरावाद्वारे शासनाला दिले तर बूक ॲडजेस्टमेंट द्वारे आपले कर्ज फिटेल. व विलंब शुल्क माफ होईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आपण जे सांगत आहात की, रुपये १४ कोटी येणार आहेत तर ते कसे येणार आहेत ते जरा सांगा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मला असे वाटते की, आपण अर्थसंकल्प व्यवस्थितरित्त्या वाचत नाही. प्रत्येक अर्थसंकल्पात मत्ता व दायित्त्व याचे विवरण दिलेले असते. ते पाहिल्यास दिसून येईल की, आपले दायित्त्व जास्त आहे. आपण आधी जे कर्ज घेतले किंवा एम.जे.पी. तर्फे जो पाणी पुरवठा होत होता, त्याचे विलंब शुल्क किंवा एम.आय.डी.सी. ला पाण्याचे जे देयक दयायचे होते, ते न भरल्याने मी आपल्या माहितीसाठी सांगतो. एम.आय.डी.सी. चे पाणी देयक वेळेवर न भरल्याने ४२ कोटींची थकबाकी होती. एम.जे.पी. चे पाणी बील वेळेवर न भरल्यामुळे १६ कोटी पेक्षा जास्त थकबाकी होती. आधीच ४२ कोटीची एम.आय.डी.सी.ची, १६ करोडपेक्षा जास्त एम.जे.पी.ची व जे कर्ज घेतले आहे, त्याचे विलंब शुल्क ६ करोडपेक्षा जास्त होते. अशी निर्भय योजना वारंवार येत नाही. या योजनेनुसार जर आपण १९ करोड भरले तर २२ करोड पेक्षा विलंब शुल्क माफ होईल. म्हणजेच तेवढेच आपले दायित्त्व कमी होईल. आपले अर्थसंकल्प दरवर्षी फुगवुन बनविले जातात म्हणूनच दायित्त्व दिवसेंदिवस वाढत जाते. आपल्याला मी सांगू इच्छितो की, आपला रस्ता निधी ६ करोड ६५ लाख येणे बाकी आहे. दलित वस्तीचे २ करोड ७५ लाख येणे बाकी आहे. मनोरंजन करातर्फे ४ करोड ५० लाख येणे बाकी आहे. नगरपालिका असतांना आम्हांला डायरेक्टर म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशनतर्फे जे काही अनुदान मिळत होते, कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यावर तर त्यापोटी रु ६०. ६७ लाख येणे बाकी आहे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना व श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आपल्याला असे वाटते का, की मार्च महिन्यापर्यंत एवढी रक्कम आपणांस मिळेल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>जर शासनाने हे पैसे आपणास दिले नाहीत तर आपल्याला एमजेपी ला जी रक्कम देय आहे ती रक्कम शासनातर्फे

एमजेपी ला दिली जावी असा प्रस्तावही शासनाकडे आम्ही पाठवु. त्याची बुक ॲडजस्टमेंट होवु शकते. त्यामध्ये आपला फायदा होईल.

**काही सदस्य :-** पास, पास . . . . .

**मा. महापौर :-** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना :-**

विषय क्र. ६:- पाणी पुरवठा योजना टप्पा-१ व भुयारी गटार योजना या कर्जावरील दंडनिय व्याज माफ करणेसाठी महाराष्ट्र शासनाने जाहिर केलेल्या निर्भय योजनेचा फायदा घेणे.

१) पाणी पुरवठा योजना टप्पा -१ कर्ज परतफेड :-

उल्हासनगर शहराच्या उंच संखल भागात समान तत्त्वावर पाण्याचे वितरण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत खुल्या बाजारातून व जीवन आयुर्विमा महामंडळाकडून खालील प्रमाणे कर्जाची उभारणी करण्यात आलेली आहे ..

| अ. क्र | तपशिल | रक्कम | कर्ज ।दिनांक | व्याज दर | कर्जाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | ओ एम बी | ७-०० कोटी | ३१/३/९८ | १४.५५ | १० वर्षे |
| २ | ओ एम बी | १५० कोटी | १८/३/९७ | १५.३५ | १० वर्षे |
| ३ | एल आय सी | १.१० कोटी | २६/३/९९ | १३.०० | २५ वर्षे |
| ४ | एल आय सी | ४.०९ कोटी | १६/९/२००२ | ११.५० | २५ वर्षे |

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हालाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे वरील कर्जापैकी काही हप्ते वेळेवर परतफेड न झाल्याने सदरच्या कर्जावर दंड आकारण्यात आला आहे .

उपरोक्त कर्जापोटी डिसेंबर २००३ पर्यत देय असलेली थकीत रक्कम, व्याज व आकारण्यात आलेल्या दंडनीय व्याजाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | तपशिल | रक्कम | थकित रक्कम | व्याज | एकूण | दंडनीय व्याज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओ एम बी | ७.०० | ३ .५० | ३ .६९ | ७ .१९ | ३ .८८ |
| २ | ओ एम बी | १ .५० | ० .९० | ० .९३ | १ .८३ | १ .१६ |
| ३ | एल आय सी | १.१० | नियमित भरणा करण्यात येते | | | |
| ४ | एल आय सी | ४.०९ | नियमित भरणा करण्यात येते | | | |
| एकूण-- | | | ४.४० | ४.६२ | ९.०२ | ५ .०४ |

२) भुयारी गटार योजना कर्ज परतफेड :- उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर शहरात भुयारी गटार योजना राबविणेसाठी वर्ष १९७९-१९८६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत जागतिक बॅकाकडून रुपये
११ . ८४ कोटी कर्जाची उभारणी केली होती . सदर कर्जाचा व्याजदर ६. ७५ टक्के प्रति वर्ष असून कर्जाचा कालावधी २५ वर्षापर्यंत आहे.

सन २००२-०३ या वित्तीय वर्षाअखेर प्रकल्प कर्जापोटी खालील रक्कम प्राधिकारणाकडे भरणा करावयाची आहे .

| | | |
|---|---|---|
| मूळ रक्कम रुपये | ५ . ७२ | कोटी |
| व्याज | ४ . ४२ | कोटी |
| एकूण | १० . १४ | |
| दंडनीय व्याज | ० . ८४ | कोटी |

३) पाणी खरेदी :- दिनांक १९/१२/९४ रोजी उल्हासनगर शहर वासीयाना पाणी पुरवठा करण्याचे कार्य उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यांत आले . यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिका इतर ग्राहकांप्रमाणे महापालिकेच्या मालमत्ता व दुर्बलघटक वसाहंतीमध्ये सार्वजनिक नळांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी खरेदी करीत होते . सदर पाणी खरेदी पोटी रुपये १० २२ कोटी व विलंब शुल्क आकार रुपये १६० ४० कोटी एवढी थकबाकी होती .
महाराष्ट्र शासनाने पाणीपट्टीवरील विलंब आकारणी तसेच कर्जावरील दंडनीय व्याज माफ करण्यासाठी शासन निर्णय कमांक : निर्णय १००३/प्र क ६८१ / पा / पापु २२/ मंत्रालय, मुंबई दिनांक २७/११/२००३ अन्वये निर्भय योजना जाहीर केलेली आहे

सदरच्या शासनाच्या निर्णयाचा सारांश थोडक्यात खालील प्रमाणे :-
ही योजना फक्त एका वर्षासाठीच मर्यादीत आहे .

सदर योजना १ मार्च २००४ पासून लागू होईल १ एप्रिल २००३ ते २९ फेब्रुवारी २००४ या कलावधीत पाणी पट्टीची मूळ रककम वा कर्जाची मूळ रककम भरेल त्यांना या योजनेचा फायदा होईल .

सदर योजना लागू झाल्यापासून ४ पर्यायी कालावधी मध्ये थकबाकीची रक्कम भरेणची मुभा असेल ज्या स्थानिक संस्था मूळ रक्कम पूर्णत भरतील त्यांना विलंब आकारात / दंडनीय व्याजात खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल .

| अ. क्र. | तपशिल | विलंब आकार /दंडनीय व्याज माफीची टक्केवारी | विलंब आकार / दंडनीय व्याज भरावयाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पहिल्या तिमाही (३१ मे २००४ अखेर) मूळ थकबाकी पूर्ण भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय असलेली विलंब आकाराची दंडनीय व्याजाची संपूर्ण रककम | निरंक |
| २ | दुसरी तिमाही (३१ ऑगष्ट २००४ अखेर) मूळ थकबाकीची रक्कम भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार दंडनीय व्याज रक्कमेच्या ९० टक्के | १० टक्के |
| ३ | तिस-या तिमाही (३० नोव्हेंबर २००४ अखेर) | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार / | २० टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| | मूळ थकबाकीची रक्कम भरल्यास | दंडनीय व्याज रक्कमेच्या ८० टक्के | |
| ४ | चौथ्या तिमाही २८ फेब्रुवारी २००५ अखेर मूळ थकबाकीची रक्कम पूर्ण भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार /दंडनीय रककमेच्या ७० टक्के | ३० टक्के |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्भय योजनेचा विचार करता, उल्हासनगर महानगरपालिकेस पाणी पुरवठा योजनेत टप्पा -१ या कर्जापोटी माहे डिसेंबर २००३ पर्यंत देय असलेली मूळ रक्कम ४. ४० कोटी, व्याज रक्कम रुपये ४. ६२ कोटी अशी एकूण रक्कम रुपये ९. ०२ व त्यावरील दंडनीय व्याज रक्कम रुपये ५. ०४ एवढी देणे बाकी आहे.

तसेच भुयारी गटार योजने अंतर्गत माहे डिसेंबर २००३ पर्यंत देय असलेली मुळ रक्कम रुपये ५. ७२ कोटी, व्याजाची रक्कम रुपये ४. ४२ कोटी अशी एकूण रक्कम रुपये १. १४ व त्यावरील दंडनीय व्याज रक्कम रुपये ०. ८४ कोटी एवढी आहे.

निर्भय योजने अंतर्गत उपरोक्त तक्त्यातील ४ पर्यायापैकी कोणताही एक पर्याय स्विकारणे आवश्यक आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी पहिली तिमाही म्हणजे १ मार्च २००४ ते ३१ मे २००४ हा पर्याय स्विकारण्याचे प्रस्तावीत आहे. म्हणून मुळ रक्कम व व्याजापोटी थकबाकीची रक्कम रुपये ९. ०२ कोटी भरल्यास त्यावरील दंडनीय व्याज रक्कम रुपये ५. ०४ कोटी माफ होवून महापालिकेस त्याचा लाभ होईल .

पाणी पुरवठा कर्ज परत फेडीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जर ९. ०२ कोटी रक्कम पहिल्या तिमाहीत भरली तर त्याच कालावधीत भुयारी गटार योजने अंतर्गत १०. १४ कोटी रक्कम भरणे महापालिकेस शक्य होणार नाही .

सबब भुयारी गटार योजना परतफेडी करीता उपरोक्त तत्त्क्त्यातील ४ था पर्याय म्हणजे २८ फेब्रुवारी २००५ अखेर स्विकारण्याचे प्रस्तावीत आहे. सदर पर्याय स्विकारल्यास एकूण विलंब शुल्क रक्कम रुपये ८४ लाखमधून रुपये ५८. ८० रक्कम महापालिकेस माफ होतील .

पाणी खरेदी पोटी रक्कम रुपये १,२२,३५,६५७/- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा केलेले असल्याने विलंब शुल्क आकार रुपये १६,४०,३५,३६५/- एवढी रक्कम माफ होईल.

उपरोक्त तक्त्यातील पर्याय कमांक १ व ४ च्या लाभ घेण्याच्या दृष्टीने सदर निर्भय योजनेत भाग घेवून एकूण रुपये १९.१६ कोटी व्याजासह कर्ज परतफेड करुन विलंब शुल्क २२.०३ कोटी माफ करण्याचा प्रयत्न करणे महापालिकेच्या दृष्टीने हिताचे होईल .

निर्भय योजनेस सहभागी होण्यासाठी नांव नोंदणी करणे आवश्यक असून त्याची कालमर्यादा दिनांक ३१/१/२००४ पर्यंत आहे .यासाठी उल्हासनगर महानगरपालिके तर्फे ठराव पारीत करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविणे आवश्यक आहे.

तरी महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या ''निर्भय योजनेत'' सहभागी होवून उपरोक्त कर्जावरील दंडनीय व्याज माफ करुन घेणेसाठी मा .महासभा यांच्या मंजुरीसाठी प्रस्तावीत करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ११६</u> <u>दिनांकः-१९.७.२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ व भुयारी गटारी योजना या कर्जावरील वा थकित रक्कमेवर दंडनीय व्याज माफ होणेकामी महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या निर्भय योजने अंतर्गत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करणे व वरील तक्त्यातील ४ पर्यायापैकी सुचविलेला उक्त पर्याय स्विकारुन फायदा घेणे मान्य करीत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ७:-</u> उल्हासनगर येथे उड्डानपुल बांधत असतांना ८ व्यक्तींची खाजगी जमीन संपादन केल्याने त्यांस नुकसान भरपाई पोटी महापालिकेची मालमत्ता विनियोग करणे.

<u>मा. सदस्य श्री राजेंद चौधरी :-</u> त्यांना जागा कोठे देणार आहात ?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सपना गार्डनच्या शेजारी जी इमारत तयार होत आहे तेथे ४०२६ चौ फुट क्षेत्र आपल्यास मिळणार आहे. त्यातुन बाधित व्यक्तिंना जागा देणार आहोत. प्रत्येकाला किती क्षेत्र देणार ते गोषवा-यात त्या व्यक्तिच्या नावासमोर स्पष्ट लिहिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री राज असरोंडकर :-</u> मा. आयुक्त महोदय ही नुकसान भरपाई देत असताना त्या बाधित व्यक्तिंनी या आधीच कोठे पर्यायी बांधकाम केलेले नाही याची खात्री करुन घ्या. माझ्याकडे एक उदाहरण आहे, आपल्याला नंतर मी ते देईन.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम सभागृहातून बाहेर गेले.**

<u>काही सदस्य :-</u> पास, पास . . . . .

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना :-</u>

<u>विषय क्र. ७:-</u> उल्हासनगर येथे उड्डाणपुल बांधत असतांना ८

व्यक्तींची खाजगी जमीन संपादन केल्याने त्यांस नुकसान भरपाई पोटी महापालिकेची मालमत्ता विनियोग करणे.

उल्हासनगर येथे उल्हासनगर रेल्वेस्टेशनच्या पूर्व आणि पश्चिम भागाला जोडण्यासाठी रेल्वे विभागाकडून रेल्वे उडडानपुल बांधणेचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्या अर्थी उल्हासनगर महानगरपालिकेला रेल्वे उडडाण पुल बांधणेकामी रेल्वेला आर्थिक सहाय्य व जमीन उपलब्ध करुन दयायचे हे ठरले होते, त्यामुळे सदरहू उडडाणपुल बांधण्यापूर्वी उल्हासनगर-३ येथे प्लॉट क्र. ४४४, बॅ.नं. १०७० समोर काही कारखानदारांचे बांधलेले शेड त्या उडडाणपुलामध्ये बाधीत व्हायचे. सदर बांधकामाचे मालकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. ६५३/२००१ आणि याचिका क्र. ६४६/२००१ दाखल करुन महापालिकेच्या उडडाणपुल बांधणेच्या कृतीला आव्हान दिले कारण त्यांच्या कब्जात त्यांच्या मालकीच्या हक्काची असलेली जमीन महापालिकेने कायदेशीर किंवा रीतसर पध्दतीने संपादन केल्याशिवाय घेता कामा नये आणि त्या जमिनीवर केलेले बांधकाम तोडू नये म्हणून ती याचिका दाखल केली होती. मा. मुंबई उच्च न्यायालयाने त्या दोन्ही याचिका निकालात काढतेवेळी महापालिका वकीलांकडून निवेदन घेतले की सदर याचिकाकर्त्यांचे मालकी हक्काची जमीन कायदेशीर रीतीने संपादन केल्याशिवाय उडडाणपुल बांधणेकामी वापरता कामा नये तसेच प्रशासनास त्यांचे जमिनीवरील बांधकाम अनधिकृत असल्यास त्यास हटविण्यासाठी महापालिकेला सूटपण दिली. महापालिकेने तेथील ९ विकासकर्त्यांचे अनाधिकृत बांधकाम काढून टाकले आणि त्या अनाधिकृत बांधकाम काढल्यानंतर राहिलेली मोकळी जागा /जमीन त्या विकासकर्त्यांचे मौखिक संमतीने महापालिकेने जमीन हाताळली. त्या जमिनीवर सध्या रेल्वे उडडाणपूल तयार होऊन जनतेच्या वापरासाठी उपलब्ध आहे.

उपरोक्त जागी रेल्वे उडडाणपूल बांधणेचा अधिकारांचा वापर करण्यामुळे ज्या विकासकर्त्यांचे नुकसान झालेले आहे आणि त्यांच्याकडून हाताळलेल्या जमिनीचे क्षेत्रफळाबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नांव | बाधित झालेल्या जमिनीचे क्षेत्रफळ | बाधित झालेल्या जमिनीचे प्रतिफुट बाजारमुल्य | एकुण नुकसान |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. नामोमल छांगोमल रोहडा | २७० चौ.फुट | रु. ११०/- | रु. २९,७००/- |
| २. | श्री. गंगु गोपीचंद आर | ९६० ३० चौ. फुट | रु. ११०/- | रु.१,०५,६३३/- |
| ३. | श्री. मुरली नानिकराम कुकरेजा | २५५१.९५ चौ. फुट | रु. ११०/- | रु.२,८०,७१४/- |
| ४. | श्री. शंकरलाल दुसेजा | ५१८४ चौ. फुट | रु. ११०/- | रु५,७०,२४०/- |
| ५. | श्री. ताराचंद साजनदास आहुजा | १३७७ चौ. फुट | रु. ११०/- | रु.१,५१,४७०/- |
| ६. | श्री. मोतीराम टेकचंद वरदानी | २४५ चौ. फुट | रु. ११०/- | रु. २६,९५०/- |
| ७. | श्रीम. रामकुमारी एल. कुकरेजा | २३५१ चौ. फुट | रु. ११०/- | रु.२,५८,६१०/- |
| ८. | श्रीम. विजया शंकरलाल | ६६६.९० चौ. | रु. ११०/- | रु. ७३,३५९/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नागदा | फुट | | |
| ९. | श्रीम. किरण सुदामोमल चावला | १६९४२५ चौ. फुट | रु. ११०/- | रु.१,८६,३६७५० |

महापालिकेने कोणतेही काम पार पाडण्यास फारसे नुकसान न पोहोचविता काम केले पाहिजे आणि अशा अधिकाराचा वापर केल्यामुळे ज्या व्यक्तिचे नुकसान होईल अशा कोणत्त्याही व्यक्तीस विहित किलेल्या रितीने निर्धारीत केलेली भरपाई दिली पाहिजे. सध्या महापालिकेकडे कुठल्याही प्रकारचे नुकसान भरपाई बाबत विहीत रीत किंवा पध्दती निश्चित केलेली नाही. त्यामुळे उल्हासनगर-५ येथील तहसिलदार कार्यालयातील दुय्यम सहाय्यक निबंधकांच्या २००२-२००३ च्या प्रसिध्द निर्धारीत बाजारभावाप्रमाणे त्या क्षेत्रातील जमीनीचे वरीलप्रमाणे प्रत्त्येक विकासकर्त्याची नुकसानभरपाई निश्चित करण्यात आलेली आहे. वरील विकासकर्त्यांपैकी श्रीम. किरण सुदामोमल चावला यांनी महापालिकेकडून उल्हासनगर-३ येथील युनियन बॅकेसमोरील जमीन ७८२० ग ३० ७ अशा क्षेत्रफळाची जमिन शासनाकडून पर्यायी जागा म्हणून मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे आणि त्यासाठी या महापालिकेकडून "ना हरकत" प्रमाणपत्र घेतले आहे. श्रीम. किरण सुदामोमल चावला वरीलप्रमाणे त्यांच्यानावासमोरील निर्धारित केलेली नुकसान भरपाई घेण्यास उत्त्सुक नाही. त्यांना तीच जमिन हवी व त्यासाठी शासनाने ती जमिन देण्याचे नाकारल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात एक याचिका क ८७५०/२००३ दाखल केलेली आहे. त्या याचिकेतील निकालाअंती श्रीम. किरण सुदामोमल चावला यांना कुठल्या रितीने त्त्यांचे नुकसान भरपाई करण्यात येईल हे निश्चित केले जाईल. राहिलेल्या विकासकर्ता / व्यक्तिंसाठी नुकसान भरपाई निर्धारित करण्यापूर्वी प्रत्त्येकाकडून लेखी संमती घेण्यात आलेली आहे. त्या संमतीनुसार प्रत्त्येकाने महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या मालकीहक्काचे मालमत्ता असेल तर त्यापैकी ते घेण्यास तयार आहेत. सपना गार्डनचे बाजुला प्लॉट क. १४/२५ (भाग), १४/२६ (भाग),१४/२७ (भाग),१४/२८, (भाग), शिट क. ४९ उल्हासनगर-३ बांधण्यात येणा-या इमारतीमधील ४०२६ चौ. फुटाचे क्षेत्रफळ, मालमत्ता महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येईल. सदर इमारत विकास आराखडयातील आरक्षित भुखंडावर साईट क. १४८ वर होत आहे व शासनाच्या विहीत केलेल्या नीतीप्रमाणे एकुण बांधकामापैकी २५: (प्रतिशत) बांधकाम महापालिकेला हस्तांतरीत करण्यात येईल म्हणून त्या इमारतीमध्ये पहिल्या माळयावर ४०२६ चौ.फुट जागा महापालिकेला मिळेल. विकास आराखडयाप्रमाणे सदर जागेवरील बांधकाम व्यापारी संकुलन प्रयोजनासाठी आरक्षणाप्रमाणे बांधले जात आहे. म्हणून वरील व्यक्ती नुकसान भरपाईपोटी अनुज्ञेय असलेला भाग त्या इमारतीत महापालिकेकडून प्राप्त करु इच्छितात आणि प्रति फुट रु. ७३५/- या बाजारभावाने घेण्यास तयार आहे.

श्रीम. किरण सुदामोमल चावला वगळता राहिलेल्या व्यक्तिने त्या एकाच जागी अनुज्ञेय भागाचे क्षेत्रफळ वरील सुचविलेल्या बाजारभावाने घेणेस संमंति दर्शविलेली असल्याने त्याप्रमाणे सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क. | नांव | निर्धारित केलेली नुकसान भरपाई | अनुज्ञेय असलेले उक्त इमारतीत मिळणारे क्षेत्र | बाजारभाव |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. नामोमल छांगोमल रोहडा | रु. २९,७००/- | ४०.४० चौ. फुट | रु. २९,६८४/- |
| २. | श्री. गंगु गोपीचंद आर | रु.१,०५,६३३/- | १४३.७१ चौ. फुट | रु.१,०५,६२८.८५ |
| ३. | श्री. मुरली नानिकराम कुकरेजा | रु.२,८०,७१४/- | ३८१.९२ चौ. फुट | रु.२,८०,७११.२० |
| ४. | श्री. शंकरलाल दुसेजा | रु.५,७०,२४०/- | ७७५.८३ चौ. फुट | रु.५,७०,२३५.०५ |
| ५. | श्री. ताराचंद साजनदास आहुजा | रु.१,५१,४७०/- | २०६.०८ चौ. फुट | रु.१,५१,४६८.८० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | श्री. मोतीराम टेकचंद वरदानी | रु. २६,९५०/- | ३६६६ चौ. फुट | रु. २६,९४५.१० |
| ७. | श्रीम. रामकुमारी एम. कुकरेजा | रु. २,५८,६१०/- | ३५१८.५ चौ. फुट | रु.२,५८,६०९.७५ |
| ८. | श्रीम. विजया शंकरलाल नागदा | रु. ७३,३५९/- | ९९८० चौ. फुट | रु. ७३,३५३/- |

वरील रितीने उपरोक्त व्यक्तिस निधारित केलेल्या नुकसानभरपाई ऐवजी उक्त इमारतीत सुचविलेले क्षेत्र महापालिकेकडून हस्तांतरण / विनियोग करण्यास योग्य राहिल व विकास आराखड्यातील विहीत केलेल्या आरक्षित प्रयोजनासाठी सदर बांधकाम वापरण्यात येईल म्हणून महासभेपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ७९ प्रमाणे महापालिकेचे उक्त मालमत्तास विनियोग करणेकामी मंजुरी मिळावी हे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ११७</u> <u>दिनांकः-१९.१.२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी
अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर स्टेशन येथिल रेल्वे ओव्हर ब्रिज प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या ८ उपरोक्त व्यक्तींना नुकसान भरपाई पोटी उल्हासनगर-३ येथिल प्लॉट क्र. १४/२५ (भाग), १४/२६ (भाग), १४/२७ (भाग), १४/२८ (भाग) शिट क्र. ४९ येथे बांधण्यात येणा-या रिजन्सी गार्डन इमारती मधील महापालिका निहित मालमत्तेतील सुचविलेले उक्त क्षेत्र प्रत्येकास विनियोग करणे मान्य करीत आहे.

सूचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ८:-</u> उल्हासनगर शहरातील टाऊन हॉल वापर उपाययोजने कामी नियुक्त केलेला अभिकर्ता श्री. कुमार पी. चैनानी या पक्षकारा ऐवजी कमार इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. हे नाव करारात अंतर्भुत करणे.

<u>मा. सदस्य श्री लाल पंजाबी :-</u> या विषयाला आमचा पुर्ण विरोध आहे. त्याचे कारण असे आहे की, आयुक्त साहेब आपण जो गोषवारा दिलेला आहे त्याच्यामध्ये दिनांक चुकीचा दर्शविलेला आहे. मी आपल्याला सांगु इच्छितो की, तुम्ही यात लिहीले आहे स्थायी समितीने जो ठराव पारित केला होता तो ठराव कमांक १४४, दिनांक २५/१०/२००२ हा जो ठराव झाला होता तो २००० मध्ये झाला होता २००२ मध्ये नाही. या विषयासाठी त्यावेळी जो स्थायी समिती ठराव झाला होता तेव्हा देखील सन २००० मध्ये आम्ही याचा विरोध केला होता. व आज हा जो विषय आला आहे याबाबत मागील महासभेत देखील आपण आयत्त्या वेळचा विषय आणला होता, तो वाचला व आज दिलेला गोषवारा वाचला तर त्यामध्ये खुप फरक आहे. ३-४ महिन्यांपूर्वी स्थायी समितीमध्ये जेव्हा याबददलचा विषय आला होता त्यावेळी त्याचे स्वरुप भिन्न होते. म्हणजे चार महिन्यात आपण आयुक्त म्हणुन ३ विभीन्न गोषवारे स्थायी समितीत व महासभेत दिलेले आहेत. आम्हाला आपल्याकडुन अपेक्षा होती की,

*सन २००० मध्ये हा जो ठराव पारित झालेला होता व त्याअन्वये जे कार्यादेश दिला होता ते २०/८/२००२ रोजी दिला होता. एवढा उशिर होण्यास कारण होते की, हे प्रकरण मध्यंतरी शासनाकडे होते. शासनाने याला नंतर मंजुरी दिली होती. त्यानंतर २०/८/०२ रोजी ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला. मी आयुक्त व संबधित उपायुक्तांना विचारु इच्छितो की, हे काम कधी पुर्ण करायला हवे होते? जर आपण करारनामा पाहिला तर दिसून येईल की, हे काम कार्यादेश मिळाल्यापासून १२ महिन्याच्या आत पूर्ण व्हायला हवे होते. २० ऑगस्टला जर कार्यादेश देण्यात आले असतील तर आमची अपेक्षा होती की, ते काम २० ऑगस्ट, २००२ पासून १२ महिन्याच्या आत पूर्ण व्हायला हवे होते. आता परिस्थिती पाहिली तर असे वाटत नाही की, हे काम अजून १ वर्षाच्या आत तरी पूर्ण होईल. आमची माहिती अशी आहे की, वेगवेगळया प्रकारचे ठराव, गोषवारे जे आयुक्तांनी सादर केलेले आहेत, त्यावरुन असे वाटते की, आधी जो ठेकेदार होता, कुमार चैनानी नावाचा. कदाचित त्याची तेवढी क्षमता नसेल. आम्ही त्यावेळी देखील आरोप केला होता की, महापालिका जे भाडे वसूल करते, रुपये २५ हजार ते फार कमी आहेत. आम्ही बघतो की जेव्हा तरणतलाव भाडयाने दिला त्याचे भाडे ४५, ७५०/- एवढे येते. एवढा मोठा टाउन हॉल ज्याचे क्षेत्र फार मोठे आहे, तो फक्त रुपये २५ हजार एवढया अल्प भाडयाने देण्यात आला. त्यावर बाजारभावाप्रमाणे भाडे घ्यायला हवे होते परंतु तसे झाले नाही. स्वस्त भावाने टाउन हॉल देण्यात आला होता. २५ हजार रुपये महिना, जेव्हा की तरणतलाव रुपये ४५ हजार एवढया भाडयाने देण्यात आला. आम्ही त्यावेळी देखील सांगितले होते की, पडदयामागे एक ठेकेदार आहे. व पडदयासमोर दुसरा ठेकेदार आहे. व आज आमच्या समोर तो पडदा उठलेला आहे. व पडदयाच्या मागे जे खरे लोक होते ते आता आपल्या समोर आलेले आहे. येणा-या दिवसात हे प्रकरण न्यायालयात गेल्यास यामागे लपलेल्या मोठया व्यक्ती समोर येण्याची शक्यता आहे. यावरुन स्पष्ट दिसते की, तत्कालीन आयुक्तांनी याबाबीकडे त्यावेळी लक्ष दिले नाही. परंतु आता प्रस्ताव समोर आल्यानंतर ते दिसून येते. काहीही करुन काही लोकांना फायदा देण्यासाठी २५ हजार रुपये भाडे त्यावेळी ठरविण्यांत आले होते. हे फक्त ठेकेदार व काही विशिष्ट व्यक्तींना फायदा होण्यासाठी करण्यात आले होते. मागील महासभेत जेव्हा आयुक्तांनी गोषवारा सादर केला होता तेव्हा आपण पाहिले की, त्यामध्ये सबलिज करण्याचा प्रस्ताव होता. मी परत एकदा सांगू इच्छितो की, बाजारभावाप्रमाणे जी लिज व्हॅल्यु ठरविण्यात आली होती ती फार कमी होती. मागील बैठकीत आपण ठेकेदारातर्फे जो गोषवारा आणला होता म्हणजेच त्यांनी जे दिले व आपण बैठकीत आणले की, त्याला २ माळयांचे भाडे फक्त रुपये १० हजार एवढे मिळू शकते. तर यामागे मोठे षडयंत्र आहे. व ते आता समोर आले आहे. यासाठी आम्ही याचा विरोध करीत आहोत. आयुक्त साहेब, कृपया आपण यावर खुलासा करावा. कारण आमची अपेक्षा होती की आपण या ठरावाच्या ऐवजी असा ठराव आणाल की, जर १२ महिन्यात काम पूर्ण न झाल्यास ठराव रदद करण्याचा प्रस्ताव आणाल व दुस-या ठेकेदाराला जास्त भाडयाने दयाल असा प्रस्ताव आम्हांला आपल्याकडून अपेक्षित होता. आपण असे का नाही केले? याचे स्पष्टीकरणही आपण करावे.*

***मा. सदस्या श्रीमती बेबी वसिटा, श्रीमती माया मसंद, श्रीमती किरण मारिवजा हया सभागृहातून बाहेर गेल्या.***

*<u>मा. सदस्य श्री राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री लाल पंजाबी यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या संपुर्ण युतीच्या भावना आहेत याच्यामध्ये हा विषय आणण्याचा कारण काय? याचा सविस्तर खुलासा चर्चेमध्ये आयुक्त करतीलच. अशा प्रकारचा विषय पुन्हा पुन्हा या सभागृहामध्ये यापूर्वी २ वेळा आला होता. तेव्हा तो पूढे ढकलण्यांत आला होता. त्यानंतर पुन्हा पुन्हा वेगवेगळया मार्गांनी वेगवेगळी भाषा वापरुन वेगवेगळे शब्द फिरवून तो सभागृहामध्ये मांडण्याचा प्रशासनाचा काय हेतू आहे? याच्यामध्ये*

महापालिकेचे व शहराचे कुठले हित लपलेले आहे? याचा खुलासा आयुक्तांच्या निवेदनामध्ये होणे फार आवश्यक आहे. हा जो मुददा आहे या मुददयाला टाउन हॉलचा जो प्रश्न आहे त्याला शिवसेना - भाजपाचा विरोध आहे. हा या सभागृहात या विषयाच्या निमित्ताने पहिल्यांदा होत नाही. याच्यापूर्वी अनेकदा हा विरोध झालेला आहे. महापालिका स्तरावर त्यानंतर शहरामध्ये आंदोलनाच्या माध्यमातून आणि अगदी शासन स्तरावर सुध्दा पाठपूरावा करुन या विषयाचा वारंवार विरोध झालेला आहे. तसेच सन्मानानिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहामध्ये स्पष्टपणे सांगितले की, त्यावेळेला अनेक आरोपांपैकी हा सुध्दा एक आरोप होता की हया टाउन हॉलचा ठेका ज्याने घेतलेला आहे, तो ठेकेदार हा एक डमी ठेकेदार आहे. आणि पडदयामागच्या हस्ती वेगवेगळया आहेत. त्या हस्ती त्यावेळेला या सभागृहामध्ये बसलेल्या होत्त्या. आणि त्यांनी एकमेकांशी मिळून हे सर्व पास केलेले आहे. आणि ते करत असतांना, टाउन हॉलचा विषय पास करत असतांना त्यामध्ये शहराचा किंवा महापालिकेचा कोणत्त्याही प्रकारचा फायदा लक्षात घेतलेला नाही. केवळ स्वार्थी भावनेने निविदा प्रक्रिया करुन, पार पाडून हा विषय त्यावेळेस पास केलेला होता. सरकारसुध्दा त्यांचेच असल्याने सरकारने सुध्दा त्यांना पाठींबा दिला. आणि दुर्देवाने हा विषय रदद करण्यामध्ये त्यावेळेला आपण असफल ठरलो. आमची जी आंदोलने झाली त्या माध्यमातून. परंतु पुन्हा या विषयामधून, या विषयात एकच गोष्ट आमच्या बाजूने आहे. हा विषय आणण्यामागे जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की त्यावेळेला या प्रकरणात राजकिय व्यक्ती असल्याचा, भ्रष्टाचार असल्याचा, आणि स्वार्थ असल्याचा जो-जो आरोप त्यावेळेला केला होता, त्याचा एक चांगला कागदोपत्री पुरावा यानिमित्ताने आमच्या हाती आलेला आहे. त्यातल्या त्यात हीच एक गोष्ट चांगली आहे. बाकी हया विषयाला समर्थन करावे किंवा त्याला पाठींबा दयावा असा एकही मुददा आमच्या डोळयासमोर नाही. तुम्हांला त्याबददल जर आम्हांला काही पटवून देता आले, की ही सगळी माणसे या कंपनीत येणे का आवश्यक आहे? आणि हे सगळे गरजेचे का आहे? तर तूम्ही जर आम्हांला याबददल पटवून दिले तर आमच्या भूमिकेत फरक पडेल. पण शहराच्या व महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने आपण आम्हांला पटवून दयावे ही आमची विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> मा. आयुक्त साहेब, सन २००० मध्ये जो विषय गाजला होता, जो विषय विधानसभेमध्ये व विधान परिषदेमध्ये देखील ज्याची चर्चा झाली होती, तो विषय आज पुन्हा आपण महासभेमध्ये आणलेला आहे. त्याच्यामागची कारणे काय ते तुम्ही आम्हांला सांगालच. परंतु एक सक्षम अधिकारी असल्यानंतर मागे झालेल्या चूका किंवा त्रुटी या आपण काढता असे आपण वारंवार सांगता. आपली त्याबाबतीत लोकप्रियता आहे, खासीयत आहे. प्रत्येकवेळी तुम्ही सांगता की, ही चूक पूर्वी झालेली आहे पण आता होणार नाही. परंतु याबाबत नेमके उलटे झाले आहे. लोकांचा चर्चेचा विषय होता, शंका-कुशंका होत्त्या, सत्त्य होते हे आजच्या ठरावामध्ये उघड झालेले आहे. जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, पडदयामागे होते कारण त्यांना सदस्यत्त्व रदद होण्याची भिती होती. परंतु आज पडदा उठल्यानंतर ते उघड झाले आहे की, त्यावेळी या सभागृहामध्ये असलेले नगरसेवक श्री. कुमार आयलानी व श्री. गिरधारी सचदेव या दोघांचे नातेवाईक , पुत्र आणि बायको हे त्याच्यामध्ये भागीदार आहेत. पहिली गोष्ट अशी की, गोषवारा लिहितांनाच आपण म्हणता की, निविदेमध्ये व संविदेमध्ये कसलाही बदल न करता, केवळ कुमार चैनानी यांनी मागितल्यामुळे आपण प्रायव्हेट लिमिटेड कंपनीस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव महासभेसमोर आणला. मुळात कुमार चैनानी यांना हा प्रस्ताव आणण्याची गरजच काय पडली? जर समर्थ नव्हते तर त्यांनी निविदा का घेतली? २ कोटी खर्च करणे एवढे साधे आणि सरळ, त्यासाठी लागणा-या इतर अटी महापालिकेने टाकल्या होत्त्या. अगदी कमीत-कमी निशुल्क अशा भाडे-तत्त्वावर तो टाउन हॉल त्याला दिला ज्याचा मालमत्ता कर सुध्दा भाडयाच्या दुप्पट होत आहे. अशावेळी ती निविदा कुणाला तरी फायदा होण्यासाठी देण्यात आली. आणि सर्व

कोर्ट-कचे-या झाल्या. शासनाकडे सुनावणी झाली, त्यानंतर शासनाने त्यांना दिले आणि महापालिकेने तो कार्यादेश २०/८/२००२ रोजी दिला. त्यामध्ये नमूद केलेली मर्यादा १ वर्षाची होती. महापालिका प्रकल्प अहवाल तयार करेल की, ठेकेदार तयार करेल. त्यानुसार त्याचे काम चालेल व त्याचे पर्यवेक्षण महापालिका करेल. महापालिकेने शिक्कामोर्तब केलेला प्रकल्प अहवाल महापालिकेकडे आहे का? प्रथम त्याचे उत्तर दया. त्यानंतर २० ऑगस्ट, २००२ रोजी कार्यादेश दिल्यानंतर त्याची मुदत १२ महिन्यांनी म्हणजेच २० ऑगस्ट, २००३ रोजी संपते. त्यानंतर करारातील अटी व शर्तीनुसार प्रत्येक दिवशी जर अभिकर्त्यांनी त्यास उशिर केल्यास प्रतीदिन एक हजार रुपये त्याला दंड आकारण्यात येईल. हा आकारलेला आहे का? हे आकारणे प्रशासनाचे एक प्रमुख म्हणून आपले कर्तव्य असतांना ते केलेले आहे का? हे ही सांगा. प्रथम प्रकल्प अहवालानुसार काम चालू आहे का? कुमार चैनानी यांना आणि विहित मुदतीमध्ये तो ठेका किंवा ती लोकोपयोगी असलेली वास्तु पूर्ण न झाल्याने आपल्या करारातील अटी व शर्तीनुसार जर विहित मुदतीत पूर्ण न केल्यास ठेका रदद करण्यात येईल अशी तरतूद आहे. तर त्या अटीचा आधार घेवून हा ठेकाच रदद करा, अशी आमची आपणांस विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मा. महापौरजी, आज सर्व सदस्यांनी जी काही चर्चा केली, ती जवळपास सारखीच होती. आज आमचे बंधू श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, यामागे कोण आहे? त्यामागे कोण-कोण होते ते आपल्यालाही माहित आहे. काही नावे घेण्यात आली, काही वगळण्यांत आली. टाउन हॉलमध्ये कोण होते, तरणतलावामध्ये कोण होते. आज येथे जो मुददा आलेला आहे. त्या मुददयाविरुध्द २ वर्ष शासनाकडे याचा विरोध चालू होता. महाराष्ट्र शासनाने याला मंजुरी दिली, त्यानंतरच ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला. आज येथे जो मुददा उपस्थित झालेला आहे, मला वाटते हा निर्णय म्हणजे महिन्याला किती भाडे दयायला हवे तर हा मुददा सन २००४ चा नसून २००० चा मुददा आहे. आज हा मुददा २-३ वर्षांपर्यंत रेंगाळला नसता तर काम केव्हाच पूर्ण झाले असते. व टाउन हॉल सुरु होवून महापालिकेचा फायदा झाला असता. परंतु कोणत्या लोकांनी २ वर्षापर्यंत हा प्रश्न रेंगाळत ठेवला? त्या विषयामध्ये आम्ही जावू इच्छित नाही. आम्हांला असे वाटते की, महापालिकेची जी परिस्थिती आहे, जसे थेंबे-थेंबे तळे साचे, जिथून जागू तेथूनच सकाळ. कमीत कमी महापालिकेची परिस्थिती अशी असावी की, सर्व ठिकाणाहून उत्पन्न मिळायला हवे. तर महापालिकेची परिस्थिती सुधारायला हवी. मला असे वाटते की, श्री. सोनवणे साहेब आल्यापासून ते २४ तास महापालिकेचे उत्पन्न वाढण्यासाठी व महापालिकेचा फायदा होण्यासाठी, शासकिय अनुदाने मिळण्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न केलेले आहे व यापूढेही जसे आज निर्भय योजनेचा मुददा त्यांनी आणला. त्याचप्रमाणे आपण निवडुन आलेल्या सदस्यांचे सुध्दा कर्तव्य आहे की, जो प्रस्ताव आपल्या समोर आणला जातो, त्याला मान्यता दिली जावी. व तो एकमताने पारीत करावा. ज्यामुळे महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढून महसूलात वाढ होईल. तर मला असे वाटते की, सभागृहाने या विषयाला उशिर का झाला? या बाबींकडे लक्ष न देता, लवकरात लवकर टाउन हॉलचे काम पूर्ण होवून शहरातील लोकांना एक चांगली जागा मिळावी. तेथे प्रत्येक आठवडयाला ते लोक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी महापालिकेला मोफत देणार आहेत. तर त्यासाठी आमच्या महापालिकेला जेव्हा समारंभ असेल जसे आजपर्यंत ३-४ समारंभ जसे श्री. जयकुमार केणी यांनी शिक्षकांना तेथे पारीतोषिके दिले होते, तर अशा प्रकारे क्रिडा संकुल व टाउन हॉल आपल्या शहराची शान आहे. त्यामुळे हा मुद्‌दा एकमताने पारीत केला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, याबाबत मी एक गोष्ट लक्षात आणू इच्छितो की, जो ठेकेदार आहे, त्याला काही दिवसांपूर्वी तत्त्कालीन आयुक्त श्री. पोखरकर साहेब, यांनी पत्र देवून त्याला काम बंद करण्यासाठी आदेश दिले होते. जर कामास विलंब झाला असेल तर त्यास ठेकेदाराची काही चूक आहे असे

मला वाटत नाही. पोखरकर साहेबांनी पत्र दिल्यामुळे कामास विलंब झाला आहे. व त्याचा आराखडा देखील अदयाप पास केलेला नाही तर मी आपणांस निवेदन करेन की त्याचा आराखडा लवकरात लवकर पास केला जावा. ज्यामुळे ठेकेदार त्याचे काम सुरु करु शकेल. व शहरातील लोकांना त्याचा फायदा घेता येईल.

यावेळी काही सदस्य जोर-जोराने बोलत असल्याने कोण काय बोलत होते, ते कळून येत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u> मी विनंती करेन की, यावर जास्त चर्चा न करता हा प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u> आपल्याला महापालिकेच्या नियमांची माहिती नसल्यास आपण सचिव साहेबांना नियम विचारावा.

<u>मा. महापौर :-</u> पास करत असाल तर करून टाका.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. महापौर महोदया, आपणांस पास करायचे असेल तर करा, पण त्यापूर्वी आयुक्तांना उत्तर देवू दया.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> टाउन हॉलमध्ये आपणांस रस असेल तर पास करा, परंतु आयुक्तांना उत्तर दयायचे आहे, तर त्यांना तुम्ही उत्तर का देवू देत नाहीत?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी मी सांगू इच्छितो, की मी आता थोडे बोललो, तर आमचे एक मित्र बोलले की, तुम्ही त्यात भागीदार होणार आहात की भागीदार आहात? याचा अर्थ असा होतो की, जो महासभेसमोर वस्तुस्थिती ठेवतो, तर तो भागीदार आहे किंवा बनणार आहे. याचा अर्थ जे विरोध करीत आहेत ते भागीदार नाहीत म्हणून विरोध करीत आहेत का?

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे हे सभागृहातून बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मा. महापौर महोदया, आपणांस पास करायचे असेल तर करा, पण त्यापूर्वी आयुक्तांना उत्तर देवू दया.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> टाउन हॉलमध्ये आपणांस रस असेल तर पास करा, परंतु आयुक्तांना उत्तर दयायचे आहे, तर त्यांना तुम्ही उत्तर का देवू देत नाहीत? तुमचा काय रस आहे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> त्यांचा काही रस नाही. आपल्याला जे बोलायचे आहे ते मुददयाला धरून बोला. कोणावर आरोप करु नका.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> यावर मी खूलासा करतो. पहिली बाब म्हणजे प्रशासनाकडुन एवढे प्रस्ताव का आले? तर जोपर्यंत सक्षम प्राधिकरणाचा निर्णय होत नाही, तोपर्यंत प्रशासन प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे म्हणजेच महासभेपूढे व स्थायी समितीपूढे ठेवू शकते. तोपर्यंत त्यामध्ये सुधारणा करता येतात. ज्यांच्या समवेत करारनामा केला, त्या पक्षकाराने आमच्याकडे वेगवेगळे प्रस्ताव दिले त्या सर्व प्रस्तांवाची कायदेशीरदृष्टया छाननी करून जर योग्य असतील तर आम्ही ते सक्षम प्राधिकरणासमोर ठेवलेले आहेत. वारंवार प्रस्ताव ठेवण्याचा तोच हेतू आहे. त्यामध्ये कुणाचा काहीच हेतू नव्हता. त्यांनी प्रस्तावात बदल केला. समजा, स्थायी समितीसमोर एखादे प्रकरण ठेवले व त्यांनी पुन्हा वेगळा प्रस्ताव दिला. तर पहिला प्रस्ताव मागे घेवून दुसरा प्रस्ताव आम्ही आपल्या समोर सादर

केला आहे, हा प्रस्ताव आपल्यासमोर का ठेवलेला आहे, याचे उत्तर आहे की, जो करारनामा त्यांच्यासोबत केला आहे त्यामध्ये एक तरतूद आहे की, जर बदल करावयाचा असेल तर महासभेसमोर प्रस्ताव ठेवावा लागेल. करारनाम्यात तसा उल्लेख केलेला असल्याने आपल्यासमोर हा प्रस्ताव आणलेला आहे. तिसरे असे की, कालावधी पूर्ण न झाल्यामुळे करार संपुष्टात आणण्याची कार्यवाही का करण्यात आली नाही. आपणा सर्वांना माहित आहे की,हि वेळ मर्यादा कुठपर्यंत होती. हा कालावधी जेव्हा सुरु झाला त्यानंतर याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे अधिनियमाचे कलम ४५१ नुसार प्रस्ताव पाठविण्यात आला होता. नंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले होते. पहिल्या प्रस्तावाबाबत तेथे सर्व निर्णय झाला आहे. त्यानंतरच हे काम देण्यात आले. काम दिल्यानंतर राज्य शासनाकडे व उच्च न्यायालयामध्ये जेवढी काही सादरीकरण करण्यात आली, त्यानंतर हा निर्णय झालेला आहे. व ती कालामर्यादा संपुष्टात आल्यानंतर तत्कालीन आयुक्त महोदयांनी का नाही केले? याचा बोध ती फाईल वाचल्याशिवाय होणार नाही. परंतु जर वेळ वाढवून देणे हे चूकीचे आहे. किंवा हा ठेकाच रद्द करावा असे जर या सभागृहाचे मत असेल तर मी तो ठेका त्वरीत रद्द करेन.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> आम्हांला प्रशासनाचे मत पाहिजे आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u>जो ठेका अदयापपर्यंत संपुष्टात आलेला नाही, त्या ठेक्यामध्ये जी काही सुधारणा करायची आहे, त्याबाबत आपल्यासमोर यायचे आहे. म्हणूनच मी आपल्यासमोर आलेलो आहे. जर आपणाला असे वाटत असेल की, यामध्ये दुरुस्ती करणे हेही चूकीचे होईल तर आपण निर्णय घ्या. ठेका रद्द करा. व मी प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करेन. त्यानंतर ...............

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> जो दंड आकारायचा होता, ती जबाबदारी कोणाची होती? ती जबाबदारी सभागृहाची होती की आयुक्तांची? करार करण्याचे काम आपले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> ती जबाबदारी आयुक्तांची आहे. मी हे शोधून काढत आहे की, दंडाची रक्कम का वसूल झाली नाही? आणि जर ती वसूल झाली नसेल तर ती मी वसुल करेन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> ते का झाले नाही याचे आम्हांला उत्तर पाहिजे. हा प्रस्ताव जेव्हा तुम्ही ३ वेळा आणलात त्याच वेळेस यास उशिर होत आहे हे सुध्दा आपण पहावयास पाहिजे होते. प्रती दिवशी १ हजार रुपये याप्रमाणे दंड सुध्दा आकारावयास पाहिजे होता.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u>आज सभागृहास मी एवढेच सांगू इच्छितो, हा जो प्रस्ताव आपल्यासमोर आणला आहे, त्यामागील हेतू एवढाच होता की, ज्या हेतूने ते काम खाजगी ठेकेदारास दिले आहे. तो हेतू सफल होत नव्हता. एका सुविधेपासून जनता वंचित होत होती. व जर हे केले नाही व करार रद्द केला तरी सुध्दा काही दिवसापर्यंत आम्ही जनतेला ही सुविधा देवू शकणार नाही. जनतेला सुविधा व्हावी, ज्या हेतूने महासभेने त्या ठेकेदाराची नेमणूक केली आहे, तो हेतू सफल व्हावा, यासाठीच हा प्रस्ताव आपल्यासमोर आणला आहे. बाकी यामागे प्रशासनाचा कोणताही हेतू नाही. आपणांस याबाबतीत जो निर्णय घ्यायचा आहे, प्रस्ताव मंजुर करायचा आहे, नामंजूर करायचा आहे आपण तो निर्णय घेवू शकता. नामंजूर केला तर त्याच्याकडुन ते काम परत घेवू. नविन ठेकेदाराची नेमणूक करायची आहे की, महापालिकेने ते स्वत: चालवायचे आहे. याबाबतीत निर्णय घेण्यासाठी सुध्दा आम्ही आपल्या समोर येवू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> म्हणजेच महापालिकेचा जुना जो ठराव होता किंवा मत होते ते चुकीचे होते. त्यामुळेच तो ठेकेदार यशस्वी होवू शकला नाही. व टाउन हॉल लोकांच्या उपयोगासाठी आला नाही. म्हणून पुन्हा त्या बाबतचा प्रस्ताव महासभेपूढे आला.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> तसे नाही, जो करार आपण केला आहे, महासभेने मान्यता दिल्यानंतर. त्यामध्ये अशी तरतूद आहे की वेळोवेळी यामध्ये जर काही सुधारणा करायची आहे, किंवा काही अटी व शर्ती बदलायच्या आहेत तर तो अधिकारसुध्दा महापालिकेस राहिल. यासाठीच आपल्यासमोर हा प्रस्ताव आलेला आहे. करारातील खंड (क्लॉज) ८(पी) मध्ये अशी तरतूद आहे. म्हणून हा प्रस्ताव आपल्यासमोर आणला आहे. बरोबर होते किंवा चुकीचे होते असे काही नाही. आम्हांला सुध्दा अशी शंका होती की, भविष्यामध्ये यामध्ये काही सुधारणा कराव्या लागतील.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> जर विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्यास करार रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांना आहे. विहित मुदत पूर्ण झालेली आहे. कार्यादेश देण्याअगोदर, न्यायालय व शासन स्तरावरील कार्यवाहीत २ वर्षे गेलीत, परंतु २० ऑगस्ट, २००२ ला कार्यादेश दिल्यानंतर २० ऑगस्ट, २००३ ला मुदत संपली. त्यानंतर तुम्ही त्यापूढची काही कार्यवाही केलीत का? की २० ऑगस्ट, २००३ नंतर, त्याला स्मरणपत्र दिले आहे का? मुदत संपून जवळ-जवळ ६ महिने झाले, विहित मुदत पूर्ण झाल्यानंतर तुम्ही त्यांना नोटिस बजावयास पाहिजे होती की, तुमचा ठेका का रद्द करण्यात येवू नये, कारणे दाखवा नोटिस वगैरे प्रशासनाने त्यांना दिली आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> हे खरे आहे की, कोणतीही नोटिस दिलेली नाही, त्याचे कारण हे आहे की, काम थांबले होते व त्यांच्याकडुन सुधारीत प्रस्ताव आला होता. सुधारीत प्रस्तावावर जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, पहिले तर असा प्रस्ताव आला होता की, काही भागीदार घेणे, त्यानंतर आला होता पोटभाड्याने देण्याचा (सबलेटिंगचा) प्रस्ताव, व आता आला आहे खाजगी मर्यादीत कंपनी स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव .

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- हे</u> जाणीव पूर्वक केले जात आहे. हा ठेका चालविण्याची ठेकेदाराची आर्थिक कुवत नव्हती. यासाठी हा जो विलंब केला आहे तो जाणीव पूर्वक विलंब केला आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> निविदा मागवितांना टाउन हॉलसाठी जो कोणी जास्तीत जास्त खर्च करेल, त्यालाच ते काम देण्याबाबत निविदा मागविण्यांत आलेल्या होत्त्या. आणि आता १ वर्षानंतर सुध्दा आपण असमर्थ आहेत. हे कळल्यानंतर त्यांना इतरांची मदत घ्यावीशी वाटली. आणि त्याला प्रशासन व लोकनियुक्त सदस्य साथ देतील असे त्याला वाटले. त्यावेळस जर ही अट सर्वांना माहित असती तर कदाचित दुसरे ठेकेदार याठिकाणी येवू शकले असते, यांच्यापेक्षाही जास्त खर्च करण्याची तयारी त्यांनी दशविली असती. त्यामुळे लोकांना यापेक्षाही जास्तीत-जास्त सुविधा उपलब्ध करून देता आल्या असत्त्या, म्हणजे प्रशासनाच्या मुळ संविदेमध्ये ज्या अटी आहेत, त्याचे उल्लंघन होत आहे. फक्त त्या ठेकेदाराने मागितले म्हणून आम्ही देत आहोत. अटी व शर्तीमध्ये बदल करीत नाहीत. परंतु मुळ संविदेमध्ये फरक होत आहे, हे तुम्हांला दाखवून दयावेसे वाटते. जर या अटी व शर्ती इतर लोकांना माहित असत्त्या, ठेकेदारांना माहित असत्त्या तर २ कोटी ऐवजी ३ कोटी रुपये खर्च करण्याची क्षमता त्यांनी दाखविली असती. ज्याची ज्याची जी क्षमता होती, त्यानुसार त्यांनी त्यावेळेस निविदा भरल्या होत्त्या,

*रक्कमा भरल्या होत्त्या. यांनी २ कोटी ५ लाख रुपयाची रक्कम निविदेत लिहिली म्हणून यांची निविदा स्विकृत केली, परंतु एक वर्षानंतर सुध्दा तो काम करण्यास असमर्थ आहे, म्हणून इतरांची मदत घेतो आहे, आणि त्याला आपण साथ देवू नये. तेव्हा कृपया प्रशासनाने प्रशासनाच्या आखत्त्यारीत हा विषय असल्याने हा ठराव रदद करावा. मागच्या ६ महिन्याचे प्रती दिवशी १ हजार रुपये याप्रमाणे त्याच्याकडुन दंड वूसल करावा.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> आयुक्त महोदय, या निर्णयाने या महापालिकेत चूकीचा पायंडा निर्माण होणार आहे. आपण त्याची गंभीर दखल घ्यावी आणि ज्या ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकले पाहिजे, त्या ठेकेदाराला कुठल्याही परिस्थीतीमध्ये पाठींबा देण्याचे काम आपण करु नये. ही आमच्या सर्वांच्या वतीने आपणांस विनंती आहे.*

*<u>मा. महापौर :-</u> सचिव साहेब, या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> जे प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.*

## *<u>प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने, ३५ मते</u>*

१. श्री. टेकचंदानी राजू
२. श्रीमती रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. ऐडके गणपत
५. श्रीमती शर्मा कमला
६. श्री. वलेचा पृथ्वी
७. श्री. रोहडा श्यामसुंदर
८. श्री. गुप्ता प्रभुनाथ
९. श्री. रुपानी चिमन
१०. श्री. ठाकूर विनोद
११. श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१२. श्री. गायकवाड सुरेश
१३. श्रीमती वनवारी मोना
१४. श्री. वनवारी किशोर
१५. श्री. जेसवानी सतराम
१६. श्रीमती खिलनानी भावना
१७. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
१८. श्रीमती कारीरा रेखा
१९. श्री. पमनानी ईश्वर
२०. श्रीमती भठिजा कोमल
२१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२२. श्री. तलरेजा विनोद
२३. श्रीमती रिझवानी सुजाता
२४. श्रीमती भारती छाब्रिया
२५. श्री. संजय बठिजा
२६. श्रीमती दासानी मिनु
२७. श्री. म्हस्के अंकुश
२८. श्री. लालबिहारी यादव
२९. श्री. जाधव सुरेश
३०. श्री. जाधव प्रशांत

३१. श्री. प्रमोद टाले
३२. श्रीमती साधवानी जया
३३. श्री. भालेराव गौतम
३४. श्री. ठाकूर अशोक
३५. श्रीमती करोतिया मालती

जे प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात, १७ मते</u>

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. रुपचंदानी बच्चाराम
५. श्री. असरोंडकर राज
६. श्रीमती कृष्णानी रेखा
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्रीमती बामणकर नंदिनी
९. श्रीमती खांडेकर प्रेमा
१०. श्री. गायकवाड दिलीप
११. श्रीमती माने किरण
१२. श्री. चव्हाण रमेश
१३. श्री. बोडारे धनंजय
१४. श्री. पाटिल विश्वनाथ
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी
१६. श्री. चौधरी राजेंद्र
१७. श्रीमती सुर्वे जयश्री

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव बहूमताने संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ८:-</u> उल्हासनगर शहरातील टाऊन हॉल वापर उपाययोजने कामी नियुक्त केलेला अभिकर्ता श्री. कुमार पी. चैनानी या पक्षकारा ऐवजी श्री. कमार इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. हे नाव करारात अंतर्भुत करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे टाऊन हॉल ही वास्तु विकसित करण्याबाबत जाहिर निविदा मागवून श्री. कुमार पी. चैनानी यांची अभिकर्ता म्हणून नियुक्ती केलेली आहे. यास स्थायी समिती ठराव क्र. १४४, दिनांक २५/१०/२००२ ने मंजुरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे रितसर संविदा करण्यात आली.

मे. कुमार पी. चैनानी यांनी करारनाम्यातील खंड ८ (पी) अन्वये ''कुमार इन्फास्ट्रक्चर प्रा. लि.'' या नावाने खाजगी मर्यादित कंपनीस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. सदर खाजगी मर्यादित कंपनीत खाली नमुद केल्याप्रमाणे संचालक असतील.

| अ.क्र. | नांव | वय | पत्ता |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुमार पी. चैनानी | ३७ वर्ष | कैलास पॅलेस, प्लॅट नं. ५०२, बसंतराम चौक, उल्हासनगर-१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. धिरज के. आयलानी | २१ वर्ष | ६ वा मजला, साई कुटिर अर्पा., गुजराती शाळेजवळ,उल्हासनगर-१. |
| ३. | श्रीम. मिना के. आयलानी | ४२ वर्ष | वरीलप्रमाणे |
| ४. | श्री. अशोक आर. सचदेव | ३२ वर्ष | विपिन पॅलेस, गुजराती शाळेजवळ, उल्हासनगर-१. |

याबाबत पूर्वीचे संविदेत उक्त बदल केला तरी मुळ संविदेतील इतर अटी व शर्ती त्याच राहतील. सबब, उक्त प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी मिळण्यासाठी मा. महासभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ११८</u> <u>दिनांकः-१९.७.२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. श्यामसुंदर रोहडा

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात उल्हासनगर-३ येथिल महापालिका निहित टाऊन हॉल ''बांधा, वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर उपाययोजने कामी नेमलेले अभिकर्ता श्री. कुमार पी. चैनानी या व्यक्ती ऐवजी कुमार इन्फ्रॉस्ट्रक्चर प्रा. लि. या नावाने पक्षकार म्हणून करारात अंतर्भाव करणे मान्य करीत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहूमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ९:-</u>उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळा करीता १९ प्राथमिक शिक्षकांची एकतर्फे बदली व सेवा नियमिती कामी शिक्षण मंडळाचा ठराव कायम करून कार्योतर मंजुरी देणे.

<u>काही सदस्य :-</u>पास,पास........

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ९:-</u>उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळा करीता १९ प्राथमिक शिक्षकांची एकतर्फे बदली व सेवा नियमिती कामी शिक्षण मंडळाचा ठराव कायम करून कार्योतर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळाच्या कार्यक्षेत्रात एकूण २९ प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी ९ मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. सदर शाळांमधील वाढती पटसंख्या पहाता मराठी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांची कमतरता लक्षात घेता शिक्षण मंडळाने जिल्हा परिषद, ठाणे व रायगड येथिल एकूण १९ प्राथमिक

शिक्षकांची एकतर्फी बदलीस शिक्षण मंडळाने प्रथमत: खालील नमुद केलेले ठराव पारीत केले आहेत.

| ठराव क्र. | दिनांक | एकतर्फी बदली झालेल्या शिक्षकांची नावे |
|---|---|---|
| १) ठराव क्र. ८६२ | २७/५/१९९४ | सौ. विद्या दिलीप झोपे |
| २) ठराव क्र. ९३६ | ११/१०/१९९५ | सौ. मोनिका राजेंद्र लवंगडे |
| ३) ठराव क्र. ९७४ | २५/१०/१९९६ | श्री. सतिश रामदास बाविसकर |
| ४) ठराव क्र. १०८५ | ११/३/२००० | सौ. सपना सतिश बाविसकर |
| ५) ठराव क्र. १०९७ | २०/६/२००० | सौ. वैशाली दिगंबर पाटील |
| ६) ठराव क्र. १०९८ | २०/२/२००० | सौ. स्नेहल गुरुनाथ विशे |
| ७) ठराव क्र. १०९९ | २०/६/२००० | सौ. रेणूका हिरामण गोवर्धन |
| ८) ठराव क्र. ११०८ | ५/८/२००० | सौ. संगिता अनिल इंगळे |
| ९) ठराव क्र. १११० | ---//-- | सौ. निलिमा विनोद धाकिते |
| १०) ठराव क्र. ११११ | ---//-- | सौ. कल्पना बाळकृष्ण वाघ |
| ११) ठराव क्र. ११३१ | २/१२/२००० | सौ. सुनिता विलास पाटील |
| १२) ठराव क्र. ११३७ | २०/१/२००० | श्री. रमेश शंकर सुरोशी |
| १३) ठराव क्र. ११३७ | ---//-- | सौ. माधवी माधव जाधव |
| १४) ठराव क्र. ११३७ | ---//-- | सौ. पद्मा दिगंबर हुसे |
| १५) ठराव क्र. ११५९ | १८/८/२००१ | सौ. योजना दशरथ मोरे |
| १६) ठराव क्र. ११७३ | २/३/२००२ | सौ. अनिल प्रभाकर पाटिल |
| १७) ठराव क्र. ११७४ | ---//-- | सौ. नितीन गोपाळराव वावळे |
| १८) ठराव क्र. ११८५ | ३१/८/२००२ | सौ. वैशाली गोपाल झोपे |
| १९) ठराव क्र. ११०९ | ५/८/२००० | श्री. सुरेश किसन भदरगे |

संबंधीत शिक्षकांच्या एकतर्फी बदलींचे उपरोक्त ठराव जिल्हा परिषद ठाणे व रायगड यांचेकडे शिक्षणमंडळाने शिफारस केली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद ठाणे यांनी ततसंबंधी ठराव पारीत न करता टिप्पणीद्वारे शिक्षकांच्या एकतर्फी बदलीस मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषद ठाणे व रायगड यांनी संबंधीत शिक्षकांना वर्ग केलेले आहे. त्यानुसार शिक्षणमंडळाने एकतर्फी बदली झालेल्या शिक्षकांना हजर करुन घेतले आहे. महानगरपालिका पूर्वीचे २ ठराव व महापालिका अस्तित्त्वात आल्यानंतर १७ ठराव करुन १९ शिक्षकांच्या एकतर्फी बदल्या झालेल्या आहेत व त्यांना शिक्षण मंडळाने रुजू करुन घेतले आहे. शिक्षण मंडळाने १९ शिक्षकांच्या एकतर्फी बदलीस मंजुरी दिलेल्या ठरावास महापालिकेची मंजूरी घेणे आवश्यक होते परंतू त्या-त्या वेळी संबंधित प्रशासन अधिकारी यांनी सदर ठरावास महासेची मान्यता न घेता जिल्हा परिषद ठाणे व रायगड कडे प्रस्ताव पाठविले प्रस्तावाच्या आधारे संबंधित जिल्हा परिषदेने १९ शिक्षकांच्या एकतर्फी बदल्या केल्या आहेत. शिक्षण मंडळाने त्या सर्व शिक्षकांना रुजू करुन घेतले. या सर्व प्रक्रियेस त्या-त्या वेळेचे प्रशासन अधिकारी जबाबदार आहेत.

अशाप्रकारे शिक्षण मंडळाने रुजू करुन घेतलेल्या शिक्षकांच्या बदलीस व त्यांच्या सेवा नियमीत करण्यासाठी महासभेच्या मंजुरीची आवश्यकता आहे. त्याशिवाय त्यांना भविष्यात निवृत्तीवेतन विषयक फायदे अनुज्ञेय ठरणार नाहीत. म्हणून हा प्रस्ताव मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधिल नियम ४० अन्वये शिक्षण मंडळाने पारीत केलेल्या ठरावास महासभेच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ११९</u> <u>दिनांकः-१९.७.२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार जिल्हा परिषद ठाणे व रायगड येथिल मराठी माध्यमाच्या एकूण १९ प्राथमिक शिक्षकांची उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाकडे एकतर्फी बदलीस व त्यांच्या सेवा नियमित करणेसाठी शिक्षण मंडळाच्या उपरोक्त ठरावास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सूचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. १०:-</u> उल्हासनगर महापालिका शिक्षण मंडळ सभापती यांचेसाठी शिक्षण मंडळाचे ठरावाप्रमाणे दरमहा रुपये १५,००० वाहन भत्ता मान्य करणे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा, महापौर महोदया, या विषयावर शिक्षण मंडळाचे सन्माननिय सदस्य श्री. नरेश तहिलरामानी यांनी शिक्षण मंडळाच्या प्रत्येक सभेत हरकत घेतली आहे. त्यांनी शिक्षण मंडळाचे जे नाशिक येथे उपसंचालक आहेत, त्यांच्याकडे याबाबत पत्रव्यवहार केला आहे, आयुक्त महोदयांशी पत्रव्यवहार केला आहे. जेव्हा वर्तमानपत्रामध्ये याबाबत बातम्या आल्या होत्या. त्यावर आयुक्त महोदयांचे असे निवेदन होते की, या प्रकरणी पूर्णपणे चौकशी केली जाईल व योग्य तो निर्णय घेतला जाईल. मला समजून येत नाही की, त्या चौकशीचे अशाप्रकारचे मत कसे निघाले की त्या ठरावान्वये १५ हजार रुपये वाहनभत्ता दिला पाहिजे. अशाप्रकारचा विषय आज महासभेपूढे आला आहे. हा विषय असा नाही की, कुण्या सभापतीसाठी जो वाहनभत्ता नव्हता तो वाहनभत्ता मंजुर करायचा आहे, असा नाही. हा विषय असा आहे की, सभापतीनी या अगोदर कायदयाच्या कोणत्त्याही चौकटीत न बसविता आपल्या पदाचा पूर्णपणे दुरुपयोग करुन तो वाहनभत्ता घेतलेला आहे. व घेतलेल्या त्या वाहनभत्त्यास आपण आता नियमित करणार आहोत. हा विषय असा नाही की, आज सभापती म्हणून बसलेल्या व्यक्तीस उदयापासून वाहनभत्ता दयायचा आहे. या गोषवा-यात एवढया

*मोठ्या ज्या गोष्टी दर्शविलेल्या आहेत, बेकायदेशीर बाबीला कायदेशीरता देण्याचा प्रयत्न प्रशासनाने या गोषवा-याच्या माध्यमातून केलेला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे, शिक्षण मंडळाच्या सभापतीस वाहन किंवा वाहनभत्ता देण्याची कुठलीही तरतूद शिक्षण मंडळाच्या अधिनियमामध्ये कुठेही नाही. परंतु त्या व्यतिरिक्त सुध्दा तेथे प्रशासन अधिकारी व सभापती यांनी चेकद्वारे वाहनभत्ता काढुन घेतला आहे. चेकवर सभापती महोदय, स्वाक्षरी करतात. व कायदयात तरतूद नसतांना व कुठलाही ठराव न करता, त्यांनी वाहनभत्त्याची रक्कम काढुन घेतली आहे. ही चुकीची व गंभीर अशी बाब आहे. ज्यामुळे खरे तर त्यांना त्या पदावरुन अनर्ह करावयास पाहिजे होते. परंतु आमच्या येथे एक नविन पध्दती सुरु झाली आहे की, पहिले बेकायदेशीरपणे कुठलेही काम करा. आणि त्यानंतर बहूमताच्या जोरावर त्यास कायदयाच्या चौकटीत बसवून त्यास कायदेशीरता देवून ते कायदेशीर केले जावे. ` नियममित स्वरुपाचे कोणतेही काम करायचे नाही. अगोदर चूकीचे काम करायचे, ही पध्दती प्रशासनाच्या प्रत्येक विभागात वापरली जात आहे. शिक्षण मंडळासारख्या विभागात सुध्दा अशा प्रकारची अनियमितता व बेकायदेशीरता होत आहे. व आम्ही येथे सभागृहात बसलेलो नगसेवक त्या बेकायदेशीरतेस कायदेशीरतेचा मुलामा चढवून तो प्रस्ताव पास करतो, ही अतिशय गंभीर व चूकीची गोष्ट आहे, या प्रस्तावास आमचा विरोध आहे, व आमची अशी मागणी आहे की, त्यांनी बेकायदेशीरपणे जे पैसे काढले आहेत, ते प्रथम त्यांच्याकडुन वसूल केले पाहिजेत. त्यानंतर विषय आणला असता तर आम्ही समजू शकलो असतो, परंतु त्यांच्याकडुन कोणतीही वसूली न करता त्यांनी वाहनभत्ता म्हणून जे पैसे काढुन घेतले आहेत ते नियमित करणे, व त्यांनी जे चुकीचे केले आहे त्यास बरोबर केले आहे असे म्हणणे व त्याबाबतीत येथे निर्णय घेणे हे अतिशय चूकीचे होईल. या प्रस्तावास आमचा पुर्णपणे विरोध आहे.*

*मा. सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, आज येथे हा जो मुददा उपस्थित झाला आहे, आमचे मा. सदस्य , गटनेते श्री. राज असरेंडकर यांनी सांगितले की, प्रशासन बेकायदेशीररित्त्या काम करते. व बहूमताच्या जोरावर त्या प्रस्तावास येथे पारीत केले जाते. यावर मी जरा स्पष्टीकरण करु इच्छितो की, हा वाहनभत्ता चालू कुठून झाला? १९९७ साली जेव्हा शिवसेना-भाजपाचे राज्य आले तेव्हा श्री. नरेंद्र राजानी हे स्थायी समितीचे सभापती होते तेव्हा वाहन भत्त्याचा प्रस्ताव आणण्यात आला होता. वाहन भत्ता तेव्हापासून सुरु झाला, प्रथम महापौर म्हणून श्री. गणेश चौधरी होते, उप-महापौर म्हणून श्री. कुमार आयलानी होते. तेव्हापासून सभापतींना वाहन भत्ता देण्याची प्रथा सुरु झाली. कशी सुरुवात झाली? आमचे तत्कालीन आयुक्त श्री. शूळ साहेबांनी सांगितले होते की, एका गाडीस ४० ते ५० हजार रुपयांपर्यंत खर्च येतो, पेट्रोल, ड्रायव्हर, देखभाल दुरुस्ती, इत्त्यादीसाठी महानगरपालिकेचे एका वाहनावर दर महा ४० ते ५० हजार रुपये खर्च होतात. त्यापेक्षा हे चांगले आहे की, सभापतींना प्रतिमहा १५-१५ हजार, महापौरांना २५ हजार , उप-महापौरांना २५ हजार व स्थायी समिती सभापतींना २० हजार, व इतर सभापतींना १५-१५ हजार रुपये दरमहा वाहन भत्ता दिला जावा. अशा या प्रकारामुळे महापालिकेचे बरेचसे पैसे वाचतील. तर तेव्हा पासून हे सुरु झाले आहे व मला खुपच आनंद होतो की, मी स्थायी समितीमध्ये सदस्य होतो. आम्ही विरोधी पक्षात होतो व आम्ही असे ठराव सर्व संमतीने पारीत करत होतो. अशा ठरावांना आम्ही कधी विरोध केला नव्हता. ज्या कामामध्ये महापालिकेचे हित होते, महापालिकेचे पैसे वाचत होते,तर त्यावेळच्या ठरावात सूचक मी होतो, आम्ही लोक सहकार्य देत होतो. तर आम्ही आज विरोधी पक्षांकडुन सहकार्याची अपेक्षा ठेवतो. व जे श्री. नरेश तहिलरामानी हे जे सदस्य आहेत, ते जे या प्रस्तावास विरोध करत आहेत. विरोधी पक्षांनी विरोध केला तरीही शिक्षण मंडळामध्ये ठराव पारीत झाला आहे. शिक्षण मंडळामध्ये जो ठराव पारीत झाला आहे*

तो कायम करण्यासाठी येथे आणला आहे, भले तो शिक्षकांबाबतचा असो, किंवा वाहन भत्त्याबाबतचा असो , शिक्षण मंडळाचे कुठलेही प्रकरण असो, शिक्षण मंडळामध्ये त्याबाबत जो ठराव होतो तो माहितीसाठी महासभेपुढे येतो. तर मला असे वाटते की, जी परंपरा आपण चालू केली होती, ती परंपरा कायम ठेवाल, आपण लोकांनी ९७-९८ मध्ये जसे वाहन भत्ते घेतले, आमचे मा. सदस्य श्री बोडारे साहेब, हे तीन वर्ष उप-महापौर होते. त्यांनी सूध्दा अशा प्रकारचा वाहनभत्ता ३ वर्ष घेतला तर मला असे वाटते की, १५ हजार रुपये वाहन भत्ता दिल्यानंतर महानगरपालिकेचे ३०-३५ हजार रुपये जे दर महा वाचतात अशी परंपरा चालत राहो की, ज्यामूळे महानगरपालिकेचे पैसे वाचतात, आजपर्यंत ज्या काही सभापतींनी कार घेतली आहे, आपण त्याबाबतीत त्यांच्याकडे चौकशी करा. किती खर्च येत होता. जेव्हा सभापती १५ हजार रुपये वाहनभत्ता घेतात, तेव्हा प्रत्येक वाहनमागे महानगरपालिकेचे ३५ हजार रुपये वाचत होते. तर महानगरपालिकेची व शिक्षण मंडळाची परिस्थिती देखील अशीच आहे, ते पैसे वाचविले पाहिजे. व या ठरावास सर्व संमतीने कायम केले पाहिजे. धन्यवाद.

**मा. महापौर श्रीमती मालती करोतिया हया सभागृहा बाहेर गेल्या. व त्यांचे जागी मा. उप-महापौर श्रीमती जया साधवानी यांनी आसनग्रहण केले.**

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> महापौर महोदया, त्यांनी काही भाष्य केले म्हणून मी पुन्हा एकदा बोलण्यासाठी उभा राहिलो आहे. हे शिक्षण मंडळाचे इतिवृत्त आहे. त्यामध्ये विषय असा होता, शिक्षणमंडळ सभापतींना, महापालिकेच्या इतर सभापतीप्रमाणे पेट्रोल, वाहनचालक, देखभाल दुरुस्ती खर्चासह वाहनभत्ता देणे बाबतच्या विषयावर चर्चा व विचार करणे, शिक्षणमंडळामध्ये सभापतींना वाहनभत्ता देण्याचा विषय होता, त्यावर शिक्षण मंडळाचे जे प्रशासन अधिकारी होते त्यांचे शेरे आले आहेत. (शिक्षणमंडळ प्रशासन अधिका-यांचे शेर वाचून दाखवितात.) त्या शे-यांमध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे. देअर इज नो सच प्रोव्हीजन इन बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन रुल १९४९ ॲण्ड ॲक्ट १९४७ जो विषय होता, एकतर यांनी विषय व्यवस्थित ऐकला नसेल आमची जी हरकत होती, ती अशी की, पहिले एखादे बेकायदेशीर काम केले जावे, त्यानंतर ते नियमित करण्यासाठी येथे आणले जावे. ही पध्दतच चूकीची आहे, या पध्दतीस आमचा विरोध आहे. सभापतीस वाहनभत्ता दिला जावू नये हा मुददा येथे आम्ही आणलेला नाही. आज आम्ही १९ जानेवारी, २००४ या दिवशी येथे जो बसलो आहोत, विषय पास करण्यासाठी. व तेथे सभापतींनी ८-९ महिन्याचा वाहनभत्ता अगोदरच घेतलेला आहे. आमचा मुददा हा आहे की, ही पध्दत कुठपर्यंत योग्य आहे? जेव्हा महानगरपालिकेने त्यांच्या अर्थसंकल्पासाठी तेथे तरतूद केली आहे. व शिक्षण मंडळामध्ये शासनाकडून जे अनुदान येते, ते तेथे जे कर्मचारी आहेत त्यांच्या पगारासाठी येते. त्याच्या व्यातिरिक्त शिक्षणमंडळ जे खर्च करते, त्या खर्चाची रक्कम महापालिकेस दयावी लागते. व महापालिका आपल्या अर्थसंकल्पात शिक्षण मंडळासाठी जी तरतूद करते. त्या शाळेच्या इमारतीची देखभाल दुरुस्ती या सर्व बाबी येतात. परंतु त्या पैशयातून त्यांना दुसरा काही उपयोग करायचा आहे, भत्ते किंवा दुस-या काही कामासाठी करायचा असेल तर त्यासाठी त्याअगोदर महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. ती घेतली नाही. येथे बहूमताच्या जोरावर जे होते तेच शिक्षण मंडळामध्ये सुध्दा होते. बहूमताचा चूकीचा फायदा घेवून जर अशाप्रकारे महापालिकेची पुर्व संमती न घेता जर ८-९ महिन्यापासून वाहनभत्ता घेतला जात असेल, त्यानंतर त्यांना आठवण येत असेल की, कोणी विरोध करत आहे. वरच्या स्तरावर चौकशी होत आहे. कुणी चौकशी करत आहे, त्यानंतर औपचारीकता पूर्ण करण्यासाठी महासभेपूढे प्रस्ताव येत असेल तर आम्ही काय औपचारीकता पूर्ण करण्यासाठी महासभेत बसलो आहोत का? जर अशाप्रकारे महानगरपालिकेला गृहित धरुन, जर प्रस्ताव आणला जात असेल, सभागृहामध्ये आपणाकडे बहूमत आहे. तेथे कोणी विरोध केला तरी काय फरक पडणार आहे? प्रस्ताव तर पारीत होणारच आहे. ही

मानसिकता जर शिक्षण मंडळाच्या सभापतींची असेल तर अशा मानसिकतेस सुध्दा आमचा विरोध आहे. बहूमताच्या जोरावर आपणांस जर हा प्रस्ताव पारीत करायचा असेल तर आपण करा. ही पध्दतच चुकीचा आहे. या पध्दतीला आमचा विरोध आहे. त्याचबरोबर या प्रस्तावास सुध्दा आमचा विरोध आहे.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले, श्री. राजु टेकचंदानी हे सभागृहा बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> महापौर महोदया, श्री. राज असरोंडकर यांनी मुददा उपस्थित केला होता की, यापूर्वी मंजूरी मिळण्याआधीच सभापतींनी जी वाहनभत्त्याची रक्कम काढुन घेतली आहे, ही पध्दत चूकीची आहे. आम्ही कधी या गोष्टीस विरोध केला नाही की, श्री. किशोर वनवारी मागील पाच वर्षापासून सभागृह नेत्त्यांचा वाहनभत्ता घेत आहेत. किंवा श्रीमती ज्योती कालानी या मागील ७ वर्षापासून कधी विरोधी पक्ष नेता तर कधी स्थायी समिती सभापती म्हणून वाहन भत्ता घेत आहेत. त्यासाठी आम्ही कधीही विरोध केला नाही, ४ वर्ष असो, ५ वर्ष असो, ७ वर्ष असो. आपण ऐकता कमी बोलता जास्त, आपण ऐकून सुध्दा घेत जा. जे ऐकता ते चूकीचे ऐकता व काहीपण बोलता. जो मुददा उपस्थित करायला नको तो मुददा उपस्थित करुन आमचे उपमहापौर श्री. बोडारे साहेब असे म्हणता. आपणांस माहिती आहे की, मागील आठ-दहा महिन्यात त्या सभापतीने महासभेच्या अनुमती विना जी रक्कम काढून घेतली आहे, ते चूकीची आहे. ही रक्कम कशी वसूल करता येईल. यासाठी आम्ही कधी विरोध केला आहे किंवा काय ही नंतरची गोष्ट आहे. परंतु त्याचे काय कराल? ते प्रशासनास विचारणा केली आहे. सचिव साहेब, शिक्षण मंडळाच्या अखत्यारीमध्ये हा विषय होता का? त्यांच्या कार्यकक्षेत आहे का? शिक्षण मंडळाच्या सभापतीला वाहनभत्ता देण्याचा किंवा त्यास मंजूरी देण्याचा आहे का? त्या व्यतिरिक्त जर कुणी घेतला आहे, तर काय केले पाहिजे? व राहिली गोष्ट मागील ७ वर्षाची, मागील ७ वर्षात सुध्दा महापालिकेच्या शिक्षण मंडळामध्ये सभापती होते, त्यांनी वाहनभत्ता घेतलेला नव्हता. तर या सभापतीस परवानगी विना वाहनभत्ता कसा दिला गेला? त्यास आपण समर्थन कसे देता? तर मग मागील सभापतींनी काय गुन्हा केला होता? हे बरोबर आहे का? परवानगी न घेता, त्यांनी वाहनभत्त्याची रक्कम काढुन घेतली आहे, म्हणजेच त्यांनी त्या पदाचा दुरुपयोग केला आहे. हे बरोबर आहे का?

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम, श्री. अशोक ठाकूर हे सभागृहा बाहेर गेले.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> शिक्षण मंडळ स्वतःसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करते. जर अर्थसंकल्पात तरतूद असेल, कारण की, शिक्षण मंडळाचा जो अर्थसंकल्प असतो तो महासभा मंजुर करते. त्यानंतरच ते लागू होते. जर त्या कामी तरतूद असेल तर त्याचा ते उपयोग करु शकत होते. जर तरतूद नसतांनाही त्यांनी उपयोग केला आहे, ठराव केला आहे, ज्याप्रकारे शासकिय पत्र त्यांनी सांगितले, त्यात त्यांनी असे लिहिले आहे की, ही रक्कम जर महापालिकेने अदा केली तर ते ही सवलत घेवू शकतात. दुसरी गोष्ट ही आहे की, सभापतींना कार वापरण्याचा अधिकार आहे. त्यांच्याकडे कार उपलब्ध नाही. त्याच्या ऐवजी वाहनभत्ता घेत आहेत. ठराव करुन त्यांनी हे जे पैसे घेतले आहेत, ते अनियमित जरुर आहे. आपण जर त्यास कार्योत्तर मंजुरी दिली तर ते नियमित होईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> कार्योत्तर मंजुरीसाठी कुठे प्रस्ताव आला आहे?

<u>मा. सचिव (श्री. पकाश कुकरेजा):-</u>आहे, कार्योत्तर मंजुरीसाठी आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> असे कुठे आहे? गोषवा-यामध्ये कुठे आहे? कार्योत्तर मंजुरीसाठी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कार्योत्तर मंजुरीसाठीच आहे, जवळ-जवळ.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> जवळ-जवळ म्हणजे काय?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> जवळ-जवळ म्हणजे काय?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u>आपण यामध्ये उल्लेख करा. उल्लेख करा, गोषवा-यामध्ये.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> महापौरजी, माझी एक सूचना आहे, त्यानूसार प्रस्तावामध्ये एक सुधारणा केली जावी की, जसे आम्ही लोक नगरसेवक आहोत, येथे आम्हांला दर महिन्याला ३ हजार रुपये मानधन व बैठक भत्ता म्हणून मिळतात. शिक्षणमंडळाचे जे सदस्य आहेत, त्यांना सुध्दा नगरसेवक म्हंटले जाते. त्यांना सुध्दा दरमहिन्याला ३ हजार रुपये मानधन व बैठक भत्ता म्हणून मिळाले पाहिजेत. अशी सूधारणा त्यामध्ये करुन प्रस्ताव पारीत केला पाहिजे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> वाहनभत्त्याचा वेगळा प्रस्ताव आहे, पारीत, सर्व संमतीने? कुणाचा विरोध आहे का?

<u>मा. महापौर :-</u> सचिव साहेब, या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## <u>प्रस्तावाच्या बाजूने ३० मते</u>

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. एडके गणपत
४. श्रीमती शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहडा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्री. रुपानी चिमन
९. श्री. ठाकूर विनोद
१०. श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
११. श्री. गायकवाड सुरेश
१२. श्रीमती वनवारी मोना
१३. श्री. वनवारी किशोर
१४. श्री. जेसवानी सतराम
१५. श्रीमती खिलनानी भावना
१६. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
१७. श्रीमती कारीरा रेखा
१८. श्री. पमनानी ईश्वर
१९. श्रीमती भठिजा कोमल
२०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

२१. श्री. तलरेजा विनोद
२२. श्रीमती रिझवानी सुजाता
२३. श्रीमती भारती छाब्रिया
२४. श्री. संजय वठिजा
२५. श्रीमती दासानी मिनु
२६. श्री. म्हस्के अंकुश
२७. श्री. लालबिहारी यादव
२८. श्री. जाधव सुरेश
२९. श्री. जाधव प्रशांत
३०. श्रीमती जया साधवानी

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> व जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## <u>प्रस्तावाच्या विरोधात १८ मते</u>

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. रुपचंदानी बच्चाराम
५. श्री. असरोंडकर राज
६. श्रीमती कृष्णानी रेखा
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्रीमती बामणकर नंदिनी
९. श्रीमती खांडेकर प्रेमा
१०. श्री. गायकवाड दिलीप
११. श्रीमती माने किरण
१२. श्री. चव्हाण रमेश
१३. श्री. बोडारे धनंजय
१४. श्री. पाटिल विश्वनाथ
१५. श्रीमती ससाणे लक्ष्मी
१६. श्री. चौधरी राजेंद्र
१७. श्रीमती सुर्वे जयश्री
१८. श्री. नथु सोनवणे

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव बहूमताने संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १०:-</u> उल्हासनगर महापालिका शिक्षण मंडळ सभापती यांचेसाठी शिक्षण मंडळाचे ठरावाप्रमाणे दरमहा रुपये १५,००० वाहन भत्ता मान्य करणे.

<u>प्रस्तावना :-</u>

महानगरपालिका शिक्षणमंडळ कार्यालयासाठी सभापतींना वेळोवेळी शाळांच्या भौतिक सुधारणा करणे, शैक्षणिक दर्जा सुधारणे यासाठी शाळांना भेटी द्याव्या लागतात. मा. संचालक, नाशिक, पुणे यांच्या कार्यालयात जाण्यासाठी तसेच शाळांमध्ये विविध शैक्षणिक कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम याचे आयोजन करताना वाहनाची आवश्यकता असते. महानगरपालिका शिक्षणमंडळाने ठराव क्र. ७, दि. १४/१/२००३ अन्वये मा. सभापतींसाठी दरमहा वाहनभत्ता रु. १५०००/- मंजुर केलेला आहे.

शिक्षणमंडळाची समिती ही महापालिकेच्या समित्त्यांप्रमाणे वैधानिक समिती आहे. सदर समित्त्यांच्या सभापतींना वाहनभत्त्ता देण्यात येतो. तसेच, इतर महानगरपालिकेतील शिक्षणमंडळाच्या सभापतींना वाहनभत्त्ता मिळतो. त्याच धर्तीवर उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळाच्या सभापतींना वाहनभत्त्ता देण्यास हरकत नाही. महानगरपालिका शिक्षणमंडळाच्या वर्ष २००३-२००४ च्या अंदाजपत्रकामध्ये कार/वाहनभत्त्ता या लेखा शिर्षाखाली रु. ७,००,०००/- इतक्या रक्कमेची तरतूद केलेली आहे. सदर वाहनभत्त्यापोटी वर्ष २००३-२००४ च्या अंदाजपत्रकामध्ये जादा तरतूद करावी लागणार नसल्याने तसेच नविन वाहन खरेदी करून वाहन चालकाची नियुक्ती करणे यावर जादा खर्च होणार असल्याने मा. सभापती यांच्यासाठी दरमहा वाहनभत्त्ता रु. १५,०००/- मान्यतेसाठी महासभेपूढे प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १२०</u> <u>दिनांकः-१९.७.२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ सभापती यांना दरमहा रुपये १५,०००/- वाहनभत्त्ता अदा करणेकामी शिक्षण मंडळाचे ठराव क्र. ७, दिनांक १४/७/२००३ कायम करीत आहे.

सूचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहूमताने</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ११:-</u> महापालिका निहित इंदिरा गांधी यादगार उदयान उल्हासनगर-१ या नावाचे उदयान संत श्री. आसारामजी आश्रम, ओ.टी. सेक्शन, खेमाणी रोड, उल्हासनगर-२ या संस्थेस वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> हा विषय पारीत केला जावा, परंतु त्यामध्ये एक-दोन दुरुस्त्त्या करु इच्छितो. आम्ही आजपर्यंत जेवढी काही उदयाने दिली आहेत, त्यामध्ये लाईट व पाणी जसे दुस-यांना निशुल्क दिले आहे, तसेच यांनाही सुध्दा दिले जावे. जसे मागील वेळेस मेहरबानसिंग यांचे बाबत आम्ही प्रस्ताव पारीत केला आहे, व रोटरी गार्डन वाल्यांबाबत प्रस्ताव पारीत केला. तर यांचे सुध्दा लाईट व पाणी निशुल्क केले जावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> नाही, जर प्रत्येक संस्थेस लाईट आणि पाणी निशुल्क दयायचे आहे, तर उदयान त्यांना चालवावयास दयायचेच कशयासाठी? एक गौल मैदान येथे प्रजापिता ब्रम्हकुमारीजला लाईट आणि पाणी बाबतचा प्रस्ताव निशुल्क दिला कारण की, त्यांच्याकडे निधी नाही, त्यामानाने यांच्याकडे निधी भरपूर आहे. लाईट व पाणी निशुल्क देणे यामध्ये पाण्याचा मुददा मी समजू शकतो. परंतु लाईट निशुल्क देणे हे बरोबर नाही. ते खर्च करतील, १० वर्षात ५ लाख रुपये व लाईटचा खर्च येईल २० लाख यामध्ये हे उदयान त्यांना चालविण्यास देण्यास काही अर्थच नाही. मी याच्या विरोधात आहे. लाईट

निशुल्क, पाणी सुध्दा निशुल्क दयायचे असेल तर कुण्याही संस्थेस उदयान देता कामा नये म्हणून हा प्रस्ताव जसा आला आहे तसाच मंजुर केला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- आता आपण इंदिरा गांधी यादगार उदयानाची जी देखभाल करत आहोत, त्यामध्ये पाण्याची जोडणी पहिल्यापासूनच आहे. तेथे स्ट्रीट लाईट पहिल्यापासूनच लागलेली आहे. ती महापालिकेच्या वतीने लावण्यांत आलेली आहे. त्या व्यतिरिक्त आणखी काही स्ट्रीट लाईट लावायच्या असतील तर त्यांचे पैसे ते भरतील. आता इंदिरा गांधी यादगार उदयान महापालिका जे विकसित करीत आहे त्यामध्ये जी स्ट्रीट लाईट लावण्यात आली आहे ती महानगरपालिकेची आहे. पाण्याची जोडणी महापालिकेचीच आहे. तर त्याचे पैसे ते कसे भरतील? त्यासाठी आपण जी रक्कम ठरवून दिली आहे ती १० वर्षासाठी ५ लाख रुपये खर्च करुन त्यांना ती विकसित करायची आहे. ते ठिक आहे. व आपण लिहिले आहे की, तेथे वॉचमन राहतील, ट्रस्टवाले तेथे २४ तास वॉचमन ठेवतील. त्यांचे सेवाधारी उपलब्ध राहतील. ते स्वतः सांभाळतील. तेथे स्ट्रीट लाईट तशीही निशुल्क आहे, तसेच पाण्याची नळजोडणीही घेतलेली आहे. उदयानासाठी हे निशुल्क असले पाहिजे, जसे दुस-यांना निशुल्क दिले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :- मा. महापौर महोदया, ज्या उदयानाची गोष्ट येथे होत आहे, हे मैदान म्हणजेच एक खंडार पडलेले मैदान होते, त्यास हिरवेगार जर ठेवले आहे, तर ते श्री. परसराम पंजवानी यांनीच ठेवले आहे. ते या आश्रमाचे सदस्य आहेत. व हा जो प्रस्ताव आणण्याची आवश्यकता पडली. त्या आवश्यकतेचे कारण हे होते की, ते सुरुवातीपासूनच त्या उदयानाची देखभाल करत आले आहेत. व त्याची देखभाल करण्यासाठी, ते आपला पूर्ण वेळ देवू इच्छित आहेत. परंतु काही असामाजिक तत्त्वाच्या व्यक्ती तेथे घुसतात, व भूईमुगाच्या शेंगा वगैरे खाऊन त्यांची टरफले तेथे फेकतात. काही बेवारसी जनावरे तेथे घुसतात, तर त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुशासन लावण्यासाठी हा प्रस्ताव येथे आणण्यात आला आहे. व कोणताही शहरवासी या उदयानास हिरवेगार ठेवण्यासाठी प्रयत्न करत असेल तर आमच्या महानगरपालिकेचे सुध्दा हे कर्तव्य आहे की, आम्ही त्यांना पूर्णपणे सहकार्य दयावे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे दंड आकारु नये. जे उदयान आहे ते सर्वांसाठी खुले असते व एवढया वर्षापासून इंदिरा गांधी यादगार उदयान ते सांभाळत आले आहेत. ते एक स्वातंत्र्य सैनिक आहेत. व चांगले समाजसेवक आहेत. व त्यांची ही जी सेवा मिळत आहे, हेच बरेच काही आहे. व याचप्रकारे शहरातील जी काही अन्य उदयाने आहेत, ती जी मैदानांसारखी दिसत आहेत. जर कुणी व्यक्ती पूढे येवून उदयानास सांभाळू इच्छित असेल तर त्यास अशा प्रकारची संधी दिली पाहिजे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- मा. आयुक्त साहेब, मा. महापौर, मागच्या सभेमध्ये साहेब तुम्ही आश्वासन दिले होते, माझ्या प्रभागात ब्रम्हकुमारीज उदयान आहे. लहान मुलांना खेळण्यासाठी तेथे मज्जाव होतो. तुम्ही आश्वासन दिले होते की, तेथे काही तास मुलांना खेळण्यासाठी व्यवस्था करु. तर त्याबाबतीत तुम्ही आतापर्यंत काय केले?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- गौल मैदान बाबत बोलत आहात की आणखी दुस-या काही?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- माझ्या प्रभागात ब्रम्हकुमारीजचे उदयान आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- मी माहिती घेतलेली नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- तुम्ही मागच्या वेळी बोलले होतात.

<u>*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-*</u>*बोललो होतो पण आठवत नाही. सर्वच गोष्टी लक्षात राहत नाहीत.*

<u>*मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-*</u> *त्याच्यासाठी मी तुम्हांला आठवण करुन देतो.*

<u>*मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-*</u> *आणखी एक लहानशी सूचना आहे की, ही जी उदयाने आपण खाजगी संस्थांना देतो आहे, तर त्या उदयानांचे सुशोभिकरण झाल्यानंतर तेथे पुढील बाजूस जो फलक लागेल तो उल्हासनगर महानगरपालिकेचा मोठ्या अक्षरात लागला पाहिजे आणि तेथे देखभाल म्हणून त्या संस्थेचे तेथे नाव आले पाहिजे. परंतु प्रत्येक ठिकाणी उलटे होते. लोकांना असे वाटते की, हे एक खाजगी उदयान आहे, त्यामुळे बरेचसे लोक तेथे जातही नाहीत. तर उल्हासनगर महानगरपालिकेचा बोर्ड प्रामुख्याने मोठ्या अक्षरात तेथे लागला पाहिजे. आणि देखभाल म्हणून संस्थेचे नाव लिहिले पाहिजे.*

<u>*मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :-*</u> *खेमाणी येथे यात्री निवास जे आहे, तेथे महानगरपालिकेचे नाव अस्तित्त्वात नाही. असे वाटते की, ते कुण्या खाजगी व्यक्तीने तयार केले आहे. तर त्यामध्ये सुध्दा सुधारणा झाली पाहिजे.*

<u>*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-*</u> *साहेब, लाईट-पाण्याची व्यवस्था तेथे पहिल्यापासूनच करण्यात आलेली आहे. ते त्याची देखभालही करत आहेत. हे फक्त नियंत्रण करतील. त्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने जी काही लाईट व पाण्याची सोय करण्यात आलेली आहे, तिचा वापर करतील.*

<u>*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-*</u> *उदयानामध्ये जी पाण्याची जोडणी घेण्यात आलेली आहे व स्ट्रीट लाईट लावण्यात आलेली आहे, तिचा निशुल्क वापर करु दिला जावा.*
<u>*मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-*</u> *असे करुन आपण आपल्या जेवढया काही मिळकती आहेत, त्या आपण खाजगी संस्थांना देत गेलात तर त्याद्वारे आपण आपली देणी वाढवत जावू. एक प्रजापिता ब्रम्हकुमारीजचे आपण समजू शकतो की, त्यांच्याजवळ निधीची कमतरता असल्यामुळे तेथील लाईटची व्यवस्था महापालिकेने घेतली. नाहीतर पाणी व लाईट हया अतिशय खर्चिक बाबी आहेत. व याबाबतची जबाबदारी जर महानगरपालिकेने घेतली तर ही संस्था १० वर्षासाठी जेवढी काही गुंतवणूक करेल, त्यापेक्षा कितीतरी पटीने लाईट बिल महापालिकेस भरावे लागेल. व असा प्रस्ताव जर मंजुर झाला तर त्यावर अंमलबजावणी केली जाणार नाही. कारण की, महापालिका निधीही आम्हांला लक्षात घ्यायच्या आहे. व पूढे जावून १० वर्षात जर जास्त देणी निर्माण होत असतील तर आजच्या स्थितीला आमचा जो अर्थसंकल्प आहे, त्यामध्ये लाईट बिलाची जबाबदारी जर आम्ही घेतली आणि फायदा मात्र त्या लोकांनी घेतला तर सद्या तरी हे देणे आपल्या अंगावर घेण्याची महापालिकेची आर्थिक स्थिती नाही. ही जबाबदारी आम्ही घेवू शकत नाही.*

<u>*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-*</u> *फायदा घेण्याची येथे काही गोष्टच नाही. आपण जर म्हणत असाल की, तेथे बोर्ड लावला जावू नये तर तो सुध्दा लावला जाणार नाही. आम्हांला असे वाटते की, परसराम पंजवानी जे गार्डन सांभाळत आहेत, फक्त त्यांना हा हक्क दिला जावा की, जर कुणी गुंडगर्दी करत असेल त्यांना आवर घातला जावा. बेवारसी जनावरे आत जावू नयेत, एवढे जरी अधिकार आम्ही त्यांना दिले तरी आमचा कर्मचारी वर्ग वाचेल. तेथिल आमचे वॉचमन वाचतील. उदयानाची देखभाल होईल. लाईट-पाण्याच्या बिलाचे ओझे त्यांच्यावर लादू नये, कारण की, एकतर ते उदयानाची सेवा देत आहेत. म्हणून त्यांच्यावर हे ओझे टाकणे योग्य होणार नाही.*

मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :- सचिव साहेब, या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मतदान घेतले जावे?

मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ११:- महापालिका निहित इंदिरा गांधी यादगार उदयान उल्हासनगर-१ या नावाचे उदयान संत श्री. आसारामजी आश्रम, ओ.टी. सेक्शन, खेमाणी रोड, उल्हासनगर-२ या संस्थेस वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने देणे.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील चेअरमन, संत श्री. आसारामजी आश्रम, उल्हासनगर-२ यांनी महापालिकेचे इंदिरा गांधी यादगार उदयान, उल्हासनगर-१, १० वर्षासाठी कराराने सौदर्य सुशोभिकरणासाठी मागणी केलेले आहे. सदरचे न्यास (ट्रस्ट) नोंदणीकृत आहे.

सदर जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील. महानगरपालिका निधीतून उद्यान विकासासाठी खर्च करणे शक्य नसल्याने केवळ उद्यानाचा विकास करण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेचा सहभाग घेण्यात यावा व त्या मोबदल्यात संस्थेच्या धर्मादाय प्रयोजनासाठी संस्थेस उद्यानाचा वापर करण्याची परवानगी द्यावी असा प्रस्ताव महानगरपालिकेपुढे इतर अटी व शर्तीसह ठेवला आहे.

सदर संस्थेने सदरचे उद्यान सार्वजनिक सेवाभावी कार्य, प्रवचन, भजन यासाठी मागणी केलेले आहे. तसेच सदर उद्यानाचे सदर संस्था सुशोभिकरण व देखभाल दुरूस्ती करणेस तयार आहे. सबब खालील नमुद अटी शर्तीच्या अधिन राहून सदर न्यासास १० वर्षासाठी भाडेतत्त्वावर सदरचे उद्यान ''वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर देण्यासाठी चर्चा करून उचित निर्णयास्तव प्रस्ताव मा. महासभेपूढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये प्रस्तावित आहे.

अटी व शर्ती

१) संस्थेने दरमहा नाममात्र भाडे म्हणून रक्कम रू १००/- महापालिकेकडे जमा करावी लागेल
२) ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्या उद्देशाकरिताच मैदानाचा वापर करण्यात यावा.
३) संस्थेने / परवानधारकाने विद्युत पुरवठा हा स्वतःच्या खर्चाने घ्यावा.
४) उद्याने / मैदानातील रस्ते, लॉन्स इत्त्यादि ठिकाणी खड्डे खोदु नयेत.
५) वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या परवानगीने वीज मंळडाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.
६) ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.
७) अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.
८) परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकाऊ वस्तु / अवशेष ठेवू नयेत.
९) सदर उद्यानामध्ये होणा-या धार्मीक / सामाजिक कामासाठी / कार्यक्रमासाठी पोलीस विभागाची पुर्व परवानगी घेण्यात यावी.

१०) सदर जागेवर कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची पूर्व परवानगी घ्यावी.

११) उद्यानाच्या ठिकाणी शांतता / सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवानगी धारकावर राहील.

१२) इंदिरा गांधी यादगार उदयान, उल्हासनगर-१ उद्यानातील जागेच्या चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पुर्व | : रोड (नगर न्यूज प्रेस) |
| पश्चिम | : रोड (चंदन अपार्टमेंट) |
| दक्षिण | : रोड (कला अपार्टमेंट) |
| उत्तर | : रोड (तेन्सी जगनानी मार्ग) |

१३) संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्त्याही मार्गाने अन्य पक्षाचे हित संबंध निर्माण करता येणार नाहीत.

१४) उद्यानाचा विकास करून त्याची निगा व दुरूस्ती राखणेचा कालावधी परवानगी दिलेल्या तारखेपासून पूढील १० वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

१५) इंदिरा गांधी यादगार उदयान विकासासाठी प्लॅन्स व इस्टीमेंट संस्थेने तयार करून आयुक्तांना सादर करावेत. आयुक्त त्यात जे बदल सुचवतील त्याप्रमाणे उद्यान विकसित करणे संस्थेवर बंधनकारक राहील. उद्यान विकसित करतांना जो खर्च संस्था करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेस सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेला आजूबाजूचे रस्ते, चौक, उद्यान विकसीत व सुशोभिकरण करणेसाठी किमान रूपये ५ लाख खर्च करावा लागेल.

१६) उद्यानातील विकास कामे एक वर्षाच्या आत पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक असून मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास महापालिका उद्यानाचा ताबा स्वत:कडे घेईल व संस्थेने त्या तारखेपर्यत केलेल्या खर्चाची कोणतीही भरपाई मागणेचा अधिकार संस्थेला असणार नाही.

१७) उद्यानामध्ये सर्वांना विनामुल्य व मुक्त प्रवेश देण्यात येईल व नियोजनाचे हक्क महापालिकेने राहतील. जागेचे कोणतेही हक्क संस्थेस राहणार नाहीत.

१८) उद्यानाची निगा व दुरूस्ती यासाठी पाणी पुरवठा व नळ जोडणी संस्थेस स्वखर्चाने घ्यावी लागेल व १० वर्षापर्यतच्या कालावधीत यासाठी येणारा सर्व खर्च संस्थेने करावयाचा आहे. महापालिका यासाठी कोणत्त्याही प्रकारचा खर्च अथवा अनुदान संस्थेस देणार नाही.

१९) मासिक विद्युत व पाणी देयक देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२०) उक्त नमुद १० वर्षाच्या कालावधीत सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२१) उद्यानाच्या सुरक्षेसाठी दिवसभरात तीन पाळयांमध्ये आवश्यक सुरक्षा कर्मचारी नियुक्ती करणे तसेच उद्यानात वृक्ष व फळझाडांची निगा राखणेसाठी माळी व बागकामगारांची नियुक्ती करणे संस्थेवर बंधनकारक राहील. व त्यांच्या वेतनावर होणारा कोणताही प्रकारचा खर्च, अनुदान अथवा अर्थसहाय महापालिकेकडून संस्थेस देण्यात येणार नाही. भविष्यात सदर कर्मचा-यांचा नियुक्ती बाबत अथवा वेतनाबाबत वाद उदभवल्यास त्यांची कायदेशिर जबाबदारी संस्थेची राहील.

२२) उद्यानाच्या विकासा बरोबरच वृक्ष संवर्धन व पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष , फळे व फुले यांची प्रदर्शने आयोजीत करण्यात महापालिकेची कोणतीही हरकत राहणार नाही. अशा प्रकारचे वर्षभरात किमान एक प्रदर्शन संस्थेच्या खर्चाने आयोजित करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२३) उक्त नमूद १० वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या सदस्यामार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही यांची दक्षता घेणे बंधनकारक राहील.

२४) संस्थेला उद्यानातील फुलांची विक्री करता येणार नाही अथवा अन्य मार्गाने विल्हेवाट लावता येणार नाही तथापि उद्यानात फळझाडे लावल्यास व त्यास फळे आल्यास त्याच्या विक्रीतून येणारे उत्पन्न हे उद्यानाच्या विकास कामासाठी वापरण्यात येईल.

२५) संस्थेने सदर ठेका १० वर्षासाठी चालू ठेवणे बंधकारक असल्याने १० वर्षाच्या आत संस्था ठेका सोडल्यास सदर उद्यानाच्या देखभाल दुरूस्तीवर महापालिकेला खर्च करावा लागणार आहे. सबब संस्थेने रक्कम रू ५० हजार ठेका कालावधीत अनामत रक्कम म्हणून महापालिकेकडे ठेवणे बंधनकारक राहील. व संस्थैने मुदतपर्व ठेका सोडून दिल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

वरील अटी व शर्तीस अधिन राहून प्रस्तावित उद्यान ''संत श्री. आसारामजी आश्रम, उल्हासनगर-२'' यांना १० वर्षासाठी ''वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्त्वावर देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून उचित निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

महासभा ठराव क्र. १२१ — दिनांकः-१९ ७ २००४.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी व शर्तीवर १० वर्षाच्या कालावधीसाठी उल्हासनगर-१ येथिल ''इंदिरा गांधी यादगार उदयान'' संत श्री. आसारामजी आश्रम ओ. टी. सेक्शन, खेमाणी रोड, उल्हासनगर-२ या संस्थेस '' वापरा व हस्तांतरीत करा'' या पध्दतीने देणे मान्य करीत आहे.

परंतु--

१) सदर जागी विज पुरवठा महापालिकेच्या खर्चाने करता येईल.
२) सदर जागी पाणी पुरवठा महापालिकेतर्फे निशुल्क करण्यांत येईल.

सूचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

उपमहापौर्र पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १२ वाचून दाखवितात.

विषय क्र. १२:- श्री. नंदलाल समिती अहवाला अनुसार महापालिकेतील ८३ कर्मचा-यांपैकी ३८, कर्मचारी दोषी आढळल्याने त्यांचे विरुध्द शास्ती लादणे.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानीः-</u> मा. महापौरजी व आयुक्त साहेब, नंदलाल समितीच्या अहवालात जे दर्शविले आहे की, ८६ कर्मचा-यांपैकी ३८ कर्मचारी दोषी आहेत, तर ८६ कर्मचा-यांपैकी ८० कर्मचा-यांची माहिती यामध्ये दिलेली आहे. ६ कर्मचा-यांची माहिती यामध्ये दिलेली नाही. तर काय ते निर्दोष आहेत?

<u>श्री. उत्तम लोणारे ( उप-आयुक्त, मुख्यालय ):-</u> मा. महापौर महोदया, नंदलाल समितीच्या अहवालानुसार एकूण ९७ कर्मचारी यामध्ये दोषी आढळून आले आहेत. त्यापैकी १४ अधिकारी आहेत, ते प्रतिनियुक्तीवरील आहेत. महानगरपालिकेचे ८३ कर्मचारी आहेत. त्यातील ४ कर्मचा-यांची चौकशी अदयापपर्यंत पूर्ण झालेली नाही. २ कर्मचा-यांची पूर्नचौकशी करायची आहे. बाकी जे ७७ कर्मचारी आहेत, त्याबाबतीत सविस्तर विवरण आम्ही दिलेले आहे. व त्यांच्यावरील चौकशीचे विवरण आम्ही थोडक्यात आम्ही त्यात दिले आहे. ४ कर्मचा-यांची अदयाप चौकशी पूर्ण झालेली नाही आणि २ कर्मचा-यांची पुन्हा चौकशी करायची आहे. यासाठी ६ कर्मचा-यांबाबत येथे विवरण दिलेले नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :-</u> त्यांच्यावर कारवाई कधी केली जाईल? त्याबाबतीत निर्णय कधी घेतला जाईल?

<u>श्री. उत्तम लोणारे ( उप-आयुक्त, मुख्यालय ):-</u>चौकशी अधिका-यांकडुन अहवाल आल्यानंतर. त्यांचा जो निर्णय असेल तो महासभेपूढे ठेवला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः-</u> किती वेळ लागेल?

<u>श्री. उत्तम लोणारे ( उप-आयुक्त, मुख्यालय ):-</u> निश्चित अशी वेळ सांगता येणार नाही, परंतु चौकशी अधिका-यांकडुन अहवाल प्राप्त होताच, .................

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः-</u> आपण जर चौकशी अधिकारी नेमता त्यास चौकशी कामी काही वेळ निश्चित करून देत असाल ना? एक महिन्याची, दोन महिन्याची अशी काही नंदलाल समितीचा अहवाल कधी आला होता.

<u>श्री. उत्तम लोणारे ( उप-आयुक्त, मुख्यालय ):-</u> या प्रकरणी अशी काही निश्चित वेळ दिलेली नाही. परंतु आता महानगरपालिकेच्या वतीने त्यांना स्मरणपत्र दिले जाईल, याबाबत १९९८ मध्ये नंदलाल समितीचा अहवाल आला होता.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> चौकशीसाठी आणखी किती वेळ लागेल?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, यांच्या बोलण्यावर माझी हरकत आहे. १९९८ मध्ये राज्य शासनाने जी चौकशी समिती बसविली होती, त्यामध्ये जेवढे काही कर्मचारी दोषी आढळून आले, प्रथमदर्शनी जे दोषी होते, त्यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशी करणे जरूरीचे होते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आयुक्त साहेब, एक मुलभूत प्रश्न आहे. हा जो नंदलाल समितीचा अहवाल आहे तो आम्हां कुणालाही मिळाला नाही. म्हणजे हा जो अहवाला होता तो काय होता? आम्हां कुणाही नगरसेवकाला आजपर्यंत अधिकृतपणे या अहवालाची प्रत मिळालेली नाही. त्या अहवालामध्ये काय काय मुददे होते ते आम्हांला अधिकृतपणे माहित नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये वाचत होतो की, अमुक-अमुक असे आहे. आम्हां नगरसेवकांना या अहवालाची प्रत देण्याची व्यवस्था करायला पाहिजे होती. त्या अहवालात या कर्मचा-यांवर काय काय दोष ठेवले होते ते आम्हांला माहित नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> मा. महापौर महोदया, हे तर मी मान्य करतो की, अधिकृतपणे आपणांस अहवालाची प्रत मिळालेली नाही. परंतु अनौपचारिकपणे सर्वांकडे अहवालाची प्रत आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> नाही-नाही, अहवालाची प्रत आमच्याकडे नाही. त्यावेळेस वर्तमानपत्रामध्ये याबाबतच्या बातम्या येत होत्या. त्या आम्ही वाचत होतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> या सभागृहामध्ये तो अहवाल का नाही ठेवला हे मला माहित नाही. परंतु अनौपचारीकपणे आपणा सर्वांकडे त्याची प्रत आहे. व आपणांस त्याची माहिती झालेली आहे. त्या अहवालात काय आहे त्याची आपणांस माहिती आहे. म्हणूनच तर मी बोलत आहे ना. आम्हांला अहवालाची प्रत दिली नाही हा मुददा उपस्थित करणे बरोबर नाही. आपल्या समोर जो प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:-</u> श्री. लाल पंजाबी यांचे म्हणणे आहे की, औपचारीकपणे आम्हांला या अहवालाची प्रत दिलेली नाही. आता आपण ठराव पारीत करणार आहोत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> माहितीच्या अधिकारानुसार आपण वैयक्तीकपणे या अहवालाची प्रत मागितली असती तरी आपणांस ती मिळाली असती. आजचा मुददा एवढाच आहे की, जे कर्मचारी दोषी आढळून आले, त्यांच्याबाबतीत आम्ही जी शिक्षा प्रस्तावित केली आहे, त्याबाबत सभागृहाने निर्णय घेणे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> सर्व लोक प्रतिनिंधीकडे नंदलाल समितीचा अहवाल अनाधिकृतपणे आहे. ही बातमी तुम्हांला अधिकृत सुत्रांनी दिली की अनाधिकृत सुत्रांनी दिली? अधिकृत सूत्रांकडुनची बातमी आहे का ती तुमची? की सगळयांकडे अनाधिकृतपणे तो अहवाल आहे म्हणून?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> माझ्या बातम्या फारशा हश्यास्पद नसतात. श्री. पंजाबी साहेबांनीच एक दिवस मला सांगितले होते की, तो अहवाल माझ्याकडे आहे म्हणून.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:-</u> मा. आयुक्त साहेब, ज्या कर्मचा-यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येत आहे, त्या कर्मचा-यांना पुन्हा जबाबदारीचे पद देवू नये.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>ज्यांच्या बाबतीत चौकशीच्या वेळी असे स्पष्टपणे लिहिले आहे की, त्यांना जबाबदारीच्या पदावर पुन्हा काम देता कामा नये. त्यांनाच पुन्हा कार्यकारी स्वरुपाचे पद दिले जाणार नाही. ज्यांच्या बाबतीत असे काहीही लिहिलेले नाही त्यांना असे पद देण्यास काही हरकत दिसत नाही. जर चौकशी मध्ये दोषी आढळून आला असेल तर त्याला त्याच विभागात किंवा त्याच पदावर काम दिले असेल तर कायदेशीर चौकशी करुन त्यास हटविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u>महापौर महोदया, येथे नंदलाल समितीच्या अहवालाची प्रत कुणाकडे आहे किंवा नाही, यावर सुध्दा हसत-खेळत चर्चा झाली. हा मजेचा विषय नाही. अनाधिकृत , बेकायदेशीर बांधकामांमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग व महानगरपालिकेची जी आर्थिक स्थिती होती, त्यास कोण जबाबदार आहे? या दोन महत्त्वपूर्ण विषयावर चौकशी पूर्ण झाली होती. व याबाबतचा जो अहवाल आहे, तो अहवाल कुण्याही सदस्याकडे नाही. तो कुण्याही सदस्याने वाचल्याशिवाय, व त्या अहवालाच्या आधारावर काही शिफारशी प्रशासनाकडुन येत

असतील, हा अहवाल वाचल्याशिवाय त्यामध्ये काय माहिती आहे, काय नाही, याची माहिती घेतल्याशिवाय, फक्त प्रशासन म्हणते की, नंदलाल समितीमध्ये या-या कर्मचा-यांवर दोष दर्शविण्यात आले आहेत. ९८ कर्मचा-यांच्या विरुध्द चौकशी केली होती. या ९८ कर्मचा-यांची नावे नंदलाल समितीच्या अहवालात आली आहेत का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-८३ , ८३ ..........

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- ८३ ? ८३ कर्मचा-यांची नावे नंदलाल समितीच्या अहवालात आली आहेत? नाही-नाही, एकाचे सुध्दा नाही. बघा ना तुम्ही? शासनाच्या अहवालामध्ये ८३ लोकांची नावे आहेत?

श्री. उत्तम लोणारे (उप-आयुक्त, मुख्यालय):- महापौर महोदया,.............

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-उपायुक्त महोदय, नंदलाल समितीचा जो अहवाल आहे तो तार्किक (लॉजीकल) अहवाल आहे, जो शासनाला सादर करण्यात आला आहे, आणि ज्याची प्रत महापालिकेकडे आहे, त्या अहवालानुसार ज्या ८३ कर्मचा-यांच्या विरुध्द आपण चौकशी सुरु केली. त्या ८३ कर्मचा-यांची नावे त्या अहवालात आहेत का? की नंदलाल समितीच्या अहवालातील भाष्य लक्षात घेवून तुम्ही त्या ८३ लोकांची नावे त्यात घातली? असा माझा प्रश्न आहे.

श्री. उत्तम लोणारे (उप-आयुक्त, मुख्यालय):-नंदलाल समितीच्या अहवालामध्ये ज्या कर्मचा-यांना दोषी ठरविले आहे, त्या अहवालात ८३ लोकांची नावे आहेत, त्यानुसारच चौकशी केलेली आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- नंदलाल समितीच्या अहवालामध्ये नावे आहेत? मी असा प्रश्न तुम्हांला विचारला की नंदलाल समितीने शासनाला जो अहवाल सादर केला आणि ज्या अहवालाची प्रत आपल्या महापालिकेकडे आहे, त्या अहवालात ८३ कर्मचा-यांची नावे स्पष्टपणे त्यामध्ये आहेत का? कारण ......

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- अहवाल बघून सांगतो. माझ्या कार्यालयामध्ये अहवाल आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :- तोपर्यंत पुढील विषय घेतला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- अहवालामध्ये कुणाकुणाची नावे आहेत? आणि त्या काळात , त्या विभागात कार्यरत कर्मचारी कोण-कोणते होते?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मी प्रश्न काय विचारला?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-कोणत्त्या अधिका-यांची नावे आहेत ते मी दोन मिनिटात सांगतो, माझ्या कार्यालयातील तो अहवाल आणण्यासाठी मी माणूस पाठविला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- आयुक्त महोदय, ......

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, तो जो मा. नंदलाल समितीचा अहवाल होता त्याचे पृष्ठ क्र. २० वर १४ अधिका-यांची नावे आहेत. इतर त्यांच्या ज्या शिफारशी आहेत, किंवा त्यांचे जे निष्कर्ष आहेत, त्यामध्ये त्यांनी कोणत्त्या कालावधीत, कोणत्त्या विभागात, कोणता

अधिकारी-कर्मचारी कार्यरत होता. त्याचे पदनाम काय होते. ते दर्शविले आहे. त्यानुसार ८३ लोकांची चौकशी सुरु केली होती. व चौकशी अंती तीचे जे निष्कर्ष होते, ते आपल्या समोर ठेवले आहेत. कोणत्त्या अधिका-यावर किंवा कर्मचा-यावर कोणते आरोप होते, चौकशी अधिका-याचा निष्कर्ष काय आहे, त्यांनी काय शिक्षा प्रस्तावित केली आहे व नंतर प्रशासनाच्यावतीने काय शिक्षा प्रस्तावित केली आहे, एवढा सविस्तर अहवाल आज आपल्या समोर ठेवण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- नंदलाल समितीच्या अहवालानुसार हा विषय सभागृहासमोर आला आहे. नंदलाल समितीच्या अहवालानुसार चौकशी झाली, चौकशीच्या अनुषंगोन कारवाईचा विषय सभागृहाच्या समोर आला आहे. याचा अर्थ असा आहे की, नंदलाल समितीचा अहवाल खुला आहे, सर्वांसाठी. बरं झाल, आम्हांला कधीही बघायला मिळेल ना? जर तुमच्या कार्यालयात येवून तो पाहिला तर, चाळायला किंवा पाहायला मिळेलच. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे, याच्यामध्ये तुमच्या निवेदनातून एक गोष्ट स्पष्ट झाली की ८३ लोकांची नावे नाहीत. परंतु नंदलाल समितीने जे भाष्य केले आहे त्या अहवालामध्ये, त्या भाष्यास अनुसरुन आपण जबाबदा-या निश्चित केल्या. वेगवेगळया विभागांच्या आणि त्यानुसार आपण चौकशी सुरु केली. माझा प्रश्न आपणांस साधा सरळ आणि स्पष्ट आहे की त्याच्यामध्ये आणखी काही अधिका-यांचा पदनामानुसार उल्लेख आहे का? की ज्यांच्या विरुध्द चौकशी सुरु झालेली नाही?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):- नाही, जे अधिकारी आहेत त्यांचे स्पष्टपणे नाव व कार्यकालावधी दिलेला आहे. व ज्यांचे नाव नाही व चौकशी सुरु केली नाही असे कोणीही यामध्ये नाही. नाव व पदनामाचा सुध्दा उल्लेख केलेला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मला काय म्हणायचे आहे की, १४ ते २० लोकांची नावे अहवालामध्ये स्पष्टपणे आलेली आहेत. ८३ लोकांची नावे आलेली नाहीत. परंतु त्या अहवालामध्ये जे भाष्य आहे, त्या भाष्यास अनुसरुन आपण त्या त्या काळामधील चौकशीसाठी त्यांनी जो कालखंड घेतला होता त्या कालखंडामध्ये त्या-त्या विभागामध्ये जे लोक होते, त्यांना आपण त्या-त्या कालाखंडामध्ये........ आपण काय केले आहे की, त्या अहवालातील भाष्यास अनुसरुन आपण वेगवेगळया विभागामध्ये त्यावेळेस जे लोक काम करत होते, त्यांच्या विरुध्द आपण चौकशी सुरु केली आणि तुमच्या चौकशी बद्दल आमच्या मनामध्ये कुठला संशय नाही की चौकशी चूकीची झाली, किंवा काय झाली. ज्याअर्थी काही नावे टाळल्यानंतरच, त्यांच्यावरती दोषारोप सिध्द झाले आहेत, काहींवर सिध्द झालेले नाहीत हे पाहिल्यानंतरच ब-याचश्या प्रमाणात ही चौकशी योग्य त्या प्रकारे झालेली असणारच त्यामुळे या विषयाला विरोध करण्याचा भाग नाही. फक्त माहिती म्हणून मी आपणाला विचारतो की, या अहवालामध्ये पदनामाचा उल्लेख करुन जबाबदारी निश्चीत करण्यात आली. परंतु चौकशी सुरु झाली नाही. असं तर कुणी राहिलेल नाही ना? याची खात्री फक्त सभागृहाला दया.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-या चौकशीच्या बाबतीत पूर्ण अहवालावर राज्य शासनास निर्णय घ्यायचा होता. व त्यानंतर येथे कोण दोषी आहे, कोण दोषी नाही किंवा दोषी आहे, त्यांच्यावर, किंवा प्रथमदर्शनी काही पुरावे होते, त्यांच्याबाबतीत चौकशी करण्याचा निर्णय घेतला होता.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- परंतु आपण यादी कशी निश्चित केलीत? त्याची प्रक्रिया काय केली?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>८३ लोकांची नावे कशी निवडण्यात आली? याबाबत आता तर मी अधिक माहिती देवू शकणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंकडकर :-</u> मला ही तेच म्हणायचे आहे, आपण ८३ लोकांविरुध्द चौकशी केलीत. २ हजार आपले कर्मचारी आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेतील, २ हजार कर्मचा-यांमधील ८३ लोकांवर आपण दोषारोप बजावून त्यांच्याविरुध्द चौकशी केलीत. ही नावे निश्चित करण्याचे निकष कोणी ठरविले? आपण विभाग प्रमुखांकडुन माहिती मागविली? उप-आयुक्तांनी केले? ते निकष लावले कसे? नावे कशी निश्चित केली? ते पाहिजे. आणि मला काय म्हणायचे आहे त्याच्यामध्ये हया मानवी चूका आहेत. अहवालाचे कामतर हस्तलिखित स्वरुपात (मॅन्युअल) झालेले नाही. एका-दुस-या अधिका-याचे नाव राहिले असू शकते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>नाही, असे तर नाही ना? निवडा आणि घ्या (टेक ॲण्ड चूज) असे तर धोरण ठरविले नाही ना?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> असे होवू शकते ना की, त्याच्यामध्ये एका-दुस-या अधिका-याचे नाव राहिले असेल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>१० मिनिटासाठी या विषयाच्या ऐवजी दुसरा विषय घेतला जावा. याबाबतची पूर्ण संचिका वाचून पाहतो, जेथुन चौकशी सुरु झाली तेथून .......

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> १० मिनिटे काय, पूर्ण महिना घ्या. पुढच्या महासभेत हा विषय ठेवता का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>हे पहा यावर तर निर्णय होवू शकतो ना? या अहवालात कोण प्रथमदर्शनी दोषी आहे? हे पहिलेच ठरविले आहे. कुणाची चौकशी करायची हे प्रथम ठरविले होते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> महापौर महोदया, आयुक्त महोदय, यामध्ये माझा स्पष्ट हेतू आहे...................

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>आपले प्रश्न सुध्दा व आपल्या प्रश्नांचा रोख सुध्दा माझ्या लक्षात आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> म्हणजे याचा अर्थ स्पष्ट आहे की असं नाही व्हायला पाहिजे की, सर्व चौकशीमधून जे उंदिर पकडले आणि बोका बाहेरच राहिला फिरत असे होता कामा नये.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> असे नाही, हे जे पहिल्या पासून ठरले आहे, कुणाची चौकशी करायची हे त्यावेळी प्रशासनाने ठरविले आहे. व चौकशी झाल्यानंतर काय करायचे आहे, ते आपल्यासमोर आम्ही ठेवले आहे. कुणाची चौकशी करायची आहे हे आजतर मी ठरवू शकणार नाही. कुणाची चौकशी करायची होती हे सुध्दा आज मी ठरवू शकणार नाही. ज्याची-ज्याची चौकशी सुरु केली आहे, त्याबाबत काय करायचे आहे ते मी सभागृहासमोर ठेवत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> त्या अहवालामधील शिफारसी वाचून दाखविता का? सर्व शिफारशी सभागृहासमोर वाचून दाखविता का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी अहवालाच सभागृहाच्या पटलावर ठेवतो. यानंतर याची प्रत सचिव कार्यालयाकडुन घेवू शकता.

<u>काही सदस्य :-</u> पास, पास.............

<u>मा. उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १२:-</u> श्री. नंदलाल समिती अहवाला अनुसार महापालिकेतील ८३ कर्मचा-यांपैकी ३८, कर्मचारी दोषी आढळल्याने त्यांचे विरुध्द शास्ती लादणे.

<u>प्रस्तावना :-</u>

शासनाने महापालिकेतील कामकाजाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या नंदलाल समितीने दिलेल्या अहवालानुसार महापालिकेतील एकूण ८३ कर्मचारी व प्रतिनियुक्तीवरील १४ अधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली होती. महापालिकेतील ८३ अधिकारीकर्मचारी विभागवार पुढीलआमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| पाणी पुरवठा विभाग | - | २१ |
| कर विभाग | - | ३१ |
| अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण विभाग | - | ३१ |
| | | ८३ |

अद्यापपर्यंत एकूण ७९ कर्मचा-यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे. यापैकी विभागीय चौकशीमध्ये एकूण ३९ इतके कर्मचारी दोषमुक्त असुन ०२ प्रकरणी फेरचौकशी करण्यात येणार आहे. उर्वरित ३८ कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ५ नुसार किरकोळ शिक्षा प्रस्तावित केल्या आहेत.

सर्व कर्मचा-यांवर विभागीय चौकशीत ठेवलेले दोषारोप, विभागीय चौकशी अधिकारी यांचा निष्कर्ष अहवाल व त्यावरील शिस्तभंग विषयक अधिकारी यांचे अभिप्राय व प्रस्तावित केलेल्या शिक्षा यांचे सविस्तर विवरण सोबत दिले आहे.

सक्षम प्राधिकारी महासभा असल्याने सदर प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र. १२२</u> <u>दिनांक:-१९ ७ २००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा सोबत जोडलेल्या तक्त्यातील पान क्रमांक १ ते १२ मध्ये नमूद केलेल्या कर्मचा-यांविरुध्द गैरवर्तन किंवा कर्तव्य कसूर बाबी महानगरपालिकातर्फे बसविण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशीच्या निकालाअंती प्रशासनातर्फे प्रत्त्येक

कर्मचा-यांच्या नावासमोर प्रस्तावित शिक्षेस वा दोषमुक्तीस, किंवा फेर खातेनिहाय चौकशी करणे कामी मान्यता देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

विषयः-अमन टॉकीज रोडवरील चौकात संत श्री. सतरामदास यांचा पुतळा बसवून त्या चौकास संत श्री. सतरामदास चौक असे नाव देणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- याबाबत सभागृहात आम्ही सर्व पक्षीय, सर्व गटनेत्त्यांची समिती गठित केली होती. हा जो प्रस्ताव आहे, आम्ही वारंवार असे म्हणतो की, नामकरणाबाबतचे कोणतेही प्रस्ताव असतील तर ते या समितीच्या मार्फत आले पाहिजेत. व हा प्रस्ताव त्या समितीला टाळून महासभेत आणला आहे. या पध्दतीचा आम्ही विरोध करतो. आम्ही या अगोदर सुध्दा म्हटले होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी आमच्या समोर जो मुददा मांडला त्याबाबतीत मी त्यांच्याशी बराच सहमत आहे. व मला असे वाटते की, येथे जो सदस्य, गटनेता, जे कोणी त्या समितीवर येण्यासाठी नाव देतात, परंतु या समितीची जेव्हा बैठक होते तेव्हा ते बिल्कुल येत नाहीत. आज मला दुःखाने म्हणावे लागत आहे की, या महिन्यामध्ये, हा तर शासकिय प्रस्ताव आहे. जो शासकिय प्रस्ताव येतो तो समितीसमोर येतो. मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी २ मुददे याबाबतीत आम्हांस दिले आहेत, एक महम्मद रफी मार्ग, व दुसराही प्रस्ताव त्यांनी प्रस्तावित केला आहे. परंतु जेव्हा बैठक झाली तेव्हा ते स्वतः आले नाहीत. विरोधी पक्ष नेता श्री. राजेंद्र चौधरी हे सुध्दा आले नाहीत. आमचे श्री. दिलीप गायकवाड हे या महिन्याच्या ७ तारखेच्या सभेत आले नाहीत, फक्त ३ लोक उपस्थित होते, ६ लोकांची गणसंख्या लागते. त्या सभेपूढे माझ्या प्रभागातील नामकरणाचे ३ प्रस्ताव होते. , सभा न झाल्यामुळे ते व्यपगत झाले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मा. महापौर महोदया,................

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- मा. सदस्य श्री. राज असरोंडकरजी, आपण नंतर बोला. मी बोललो आहे तर आपणांस बोलावेच लागेल ना? मला असे वाटते, जोपर्यंत जो सदस्य, आज श्री. किशोर वनवारी सभागृहनेता आहे, उदया कदाचित

नसेल, आज श्री. राज असरोंडकर गटनेता आहेत, उदया कदाचित नसतील, मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी आज विरोधी पक्ष नेता आहेत, उदया कदाचित नसतील. ते १ वर्षभर पदावर आहेत, त्या कालावधीत त्यांनी आपली जबाबदारी पार पाडुन समित्यांच्या ज्या काही बैठका होतात, त्यामध्ये उपस्थित राहून आपले जे मुददे राहतात, रस्ता चौकाचे नामकरण, फलक लावणे वगैरे. याशिवाय पक्षाच्या इतर सदस्यांचे जे काही प्रस्ताव येतात, एकावेळेस श्री. रामदास उमाप यांच्या वतीने ६ प्रस्ताव समितीपूढे आले होते. त्यांनी सुध्दा मला विचारणा केली होती की, हे प्रस्ताव पारीत का झाले नाहीत तर त्यावर मी म्हटले होते की, गणपुर्तीच नव्हती. कुणी बैठकीस येतच नाहीत. तर श्री. लाल पंजाबी साहेबांनी जे म्हटले की, हे मुददे समितीच्या मार्फत आले पाहिजेत. मी सुध्दा म्हणतो की, बिल्कुल समितीमार्फतच आले पाहिजेत. समितीच्या बैठकीत त्यांनी सुध्दा आले पाहिजे. तर सभागृहास माझी अशी विनंती आहे की, जे समितीवर असतात त्यांनी बैठकीस आले पाहिजे. हा जो ठराव आहे तो शासकिय नाही. अशासकिय प्रस्ताव आहे. यामध्ये मा. सदस्या स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी या सूचक आहेत तर अनुमोदक मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा हे आहेत. अशासकीय प्रस्तावावर येथे चर्चा होते, ठराव होतो. असा अशासकिय प्रस्ताव सदस्यांनी या अगोदर दोन-तीन वेळा दिला आहे. कधीही दोन सदस्य अशासकिय प्रस्ताव सभा सूचनेच्या अगोदर देवू शकतात. व मा. महापौरांचे कर्तव्य आहे की, तो प्रस्ताव थेट सभासूचनेवर घेणे त्यानुसार तो प्रस्ताव थेट सभासूचनेवर येतो. तर अशासकिय प्रस्तावावर आता निर्णय घ्यायचा आहे की तो पारीत करायचा किंवा नाही? तर मला असे वाटते की, हा जो संत सतरामदास यांच्या चौक व पुतळयाबाबतचा प्रस्ताव आहे. तो अतिशय चांगला विषय आहे. या प्रस्तावाच्या ठरावामध्ये अशी नोंद घेण्यांत यावी की राज्य शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून, जेव्हा राज्य शासन या प्रस्तावास मंजुरी देईल. त्यानंतरच हा पुतळा तेथे लागेल. तर मेहरबानी करुन आता हा प्रस्ताव पारीत केला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> यांनी आता जी नावे घेतली श्री. राज असरोंडकर व इतरांची त्याबाबत ते लोक खुलासा करतील. त्यांच्याबाबतीत मी खुलासा करु शकत नाही. परंतु जेथ पर्यंत या विषयाचा प्रश्न आहे, हा प्रस्ताव गटनेत्यांच्या सभेमध्ये यावयास पाहिजे होता. नाहीतर कुणीही व्यक्ती आपापला प्रस्ताव घेवून येथे येईल. अशासकिय ठराव घेवून येईल. व ते आपणांस सर्व लोकांना भारी पडणार आहे हे मी आपणांस सांगू इच्छितो. यासाठी मी सांगू इच्छितो. यासाठी कमीत कमी मी असे सांगू इच्छितो की, स्थायी समितीच्या ज्या सभापती आहेत, त्या एक जबाबदार व्यक्ती आहेत. त्यांनी मागच्या दारातून हा प्रस्ताव आणावयास नको होता. कारण की, यासाठी एक समिती गठित केलेली आहे. तर मागील दरवाज्यातून हा प्रस्ताव आणणे हे अतिशय चुकीचे आहे. व यापूढे बरेचसे नगसेवक अशाप्रकारे थेट प्रस्ताव आणतील. व त्यासाठी आम्हां सर्वांना निर्णय घेणे अतिशय कठिण पडु शकते. याशिवाय आणखी एक गोष्ट मी सांगू इच्छितो विशेष करुन सचिव साहेबांना सांगू इच्छितो. हा लक्षवेधीचा प्रस्ताव आहे. व ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे. त्या आज सभागृहात उपस्थित नसल्याने हा प्रस्ताव चर्चेस घेता येणार नाही. व निर्णय घेता येणार नाही. बस याचा खुलासा व्हावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>हे कायदेशीरदृष्टया चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> आम्ही हा प्रस्ताव समितीच्या माध्यमातून आणू इच्छितो. आम्हांला याबाबत हरकत नाही आहे. या महिन्यात पारीत होईल. किंवा पूढील महिन्यात पारीत होईल त्यात. परंतु सदस्यांनी हे कमीत कमी निश्चीत करावे की यापूढे समितीची जी सभा होईल त्या सभेत सर्वांनी उपस्थित राहावे.

*<u>मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-</u> समितीचे जे सदस्य आहेत त्यांना माझे वैयक्तीक असे निवेदन आहे की, त्यांनी समिती सभेच्या दिवशी व वेळी जरूर हजर रहावे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> महापौर महोदया, .......*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> याबाबतीत खुलासा करु इच्छितो, आजपर्यंत समितीकडे ज्या कुण्या सदस्यांनी प्रस्ताव दिले आहेत, समितीने कधीही ते नाकारले नाहीत. प्रत्येक सदस्यांचा मान ठेवला आहे. यापूढील महिन्यात जी समितीची सभा होईल त्या सभेत सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे. त्यावेळी त्यांच्याही प्रभागातील प्रस्ताव पारीत व्हावेत, त्याचबरोबर इतरांचेही प्रस्ताव पारीत व्हावेत*

*<u>मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-</u>हा विषय आता समिती समोर आणला जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> मा. महापौरजी, सचिव साहेबांनी जे कायदेशीर मत दिले की, या प्रस्तावाचे जे सूचक आहेत, ते आज सभेत उपस्थित नाहीत. ठिक आहे, आम्ही त्यास मान्यता देतो. परंतु आम्हांला दुःखानें म्हणावेसे लागत आहे की, आम्ही हा जो प्रस्ताव आणला आहे तो एका महान संताचा पुतळा उभारण्यासाठी आणला आहे. आपण ठराव पारीत केल्यानंतर तो राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे, त्यानंतरच तो पुतळा बसविला जाणार आहे. त्यास सुध्दा आपण लोक विरोध करत आहात. ही दुःखाची गोष्ट आहे. व दुसरे असे की, श्री. लाल पंजाबी हे अतिशय वरीष्ठ असे नगरसेवक आहेत. व आपण असे करता, पुढे जावून हे आपणांस अतिशय भारी पडेल. श्री. लाल पंजाबी हे विरोध करीत आहेत ही दुःखाची गोष्ट आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u>महापौर महोदया, श्री. किशोर वनवारी यांनी निवेदन करतांना माझे नाव घेतले म्हणून बोलण्यासाठी मी उभा आहे. आता हा विषय चर्चेत आहे. या विषयाबाबत ज्याच्याशी मी चर्चा केली ते पिठासीन अधिका-यांच्या खुर्चीत नाहीत हे माझे दुर्दैव आहे. आपण महापौर कार्यालयाकडुन खात्री करुन घेवू शकता की, मी स्वतः महापौर कार्यालयात दुरध्वनी करुन ही चौकशी केली होती की, नामकरण समितीची बैठक आपण कधी बोलवणार आहात. परंतु महापौरांनी मला सांगितले की, ती बैठक झाली त्या बैठकीस कोणी उपस्थित नव्हते. मी विचारले की, ती बैठक कधी बोलावली होती. माझ्याकडे या बैठकीचे कोणतेही निमंत्रण, ना दुरध्वनी वरुन, ना माझ्या कार्यालयात, कार्यालयात सुध्दा जावून मी खात्री करुन घेतली.*

*<u>मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-</u> श्री. राज असरोंडकरजी ही गोष्ट आता सोडा, यापूढे समितीचे जे सदस्य आहेत ते समितीच्या बैठकीस उपस्थित राहतील. वाद-विवाद का करता? हा प्रस्ताव आता आपण बाजूला केला आहे. पुढल्या महिन्यात आपण पाहू या.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> बाजूला करण्याची गोष्ट नाही, आपल्या माध्यमातून माझी प्रशासनास........*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> परंतु निमंत्रण तर मिळाले पाहिजे ना.*

*<u>मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-</u> यापूढे आपणांस बरोबर निमंत्रण दिले जाईल. श्री. सुखरामानी यांना मी निर्देश देते की, या समितीच्या सर्व सदस्यांना सभेच्या पुरेश्या वेळे अगोदर निमंत्रण दिले जावे. लेखी व दुरध्वनी वरुन सुध्दा*

निमंत्रण दिले जाईल. विषय पत्रिकेवरील विषय क्र. १३ चे मुळ प्रस्तावा सबंधीत प्रस्तावक सभेत उपस्थित नसल्याने सदरचा विषय आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

सचिव साहेब सभा सूचनेवरील पूढील विषय पुकारले जावेत.

मा. सचिव (श्री. पकाश कुकरेजा):- विषय क्र. १४ वाचून दाखवितात.

आयत्त्यावेळचा विषय

महासभा विषय क्र. १४

विषय :-श्री. सु .के . घोलप, उपमुख्य लेखा परिक्षक यांना उल्हासनगर महापालिका सेवेत लोकसेवा हितार्थ कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत.

काही सदस्य :-पास,पास........

मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

महासभा विषय क्र. १४

विषय :-श्री. सु .के . घोलप, उपमुख्य लेखा परिक्षक यांना उल्हासनगर महापालिका सेवेत लोकसेवा हितार्थ कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क. जीईएन / १५९६ / ४७ / सी आर २६ / युडी २४ दिनांक २१/१०/१९९६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेचे रुपांतर झाल्यामुळे महानगरपालिकेच्या स्तरावर विविध पदे निमार्ण करण्यासाठी आस्थापना सूची प्रशाकिय ठराव कमांक १४ दिनांक २/११/१९९६ अन्वये या पुर्वीच तयार करण्यात आलेली असुन त्यामध्ये लेखा परिक्षण विभागासाठी खालील पदे प्रस्तावित केलेली आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | मुख्य लेखा परिक्षक | १ |
| २ | उप मुख्य लेखा परिक्षक | १ |
| ३ | सहा. मुख्य लेखा परिक्षक | १ |
| ४ | मुख्य लिपीक | १ |
| ५ | वरिष्ठ लेखा परिक्षक | १ |
| ६ | लघुलेखक ( निम्नश्रेणी ) | १ |
| ७ | कनिष्ठ लेखा परिक्षक | ४ |
| ८ | वरिष्ठ लिपीक | ५ |
| ९ | टंकलेखक | १ |
| १० | लिपीक | २ |
| | एकुण ---- | १८ पदे |

परंतु सध्या लेखा परिक्षण विभागामध्ये फक्त खालील पदे भरलेली आहेत.

| अ. क्र. | पदनाम | भरलेली पदे |
|---|---|---|
| १ | उपमुख्य लेखापरिक्षक (शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर) | ०१ |
| २ | सहा. मुख्य लेखा परिक्षक (शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर) | ०१ |
| ३ | वरिष्ठ लेखा परिक्षक (शासकीय कर्मचारी प्रतिनियुक्तीवर) | ०१ |
| ४ | कनिष्ठ लेखा परिक्षक | ०१ |
| ५ | वरिष्ठ लिपीक | ०१ |
| | एकुण---- | ०५ |

सद्या लेखा परिक्षण विभागात फक्त ५ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच मुख्य लेखा परिक्षक हे पद दिनांक १/१२/२००२ पासून रिक्त आहे. लेखा परिक्षणासाठी सदर कर्मचारी अपूरा पडत असल्याने लेखा परिक्षणासाठी जादा कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. कनिष्ठ लेखापरिक्षकांची ४ पदे प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी शासनास विनंती केली होती. परंतु शासनाकडून ती उपलब्ध होणार सल्याचे उप संचालक लेखा व कोषागारे, कोकण भवन, नवी मुंबई यांनी दिनांक ८/१/२००१ च्या पत्रान्वये कळविले आहे .

संदर्भीय आदेश क. १ अन्वये श्री. सु. के. घोलप स. लेखा अधिकारी (स. मु.लेप) यांची या महापालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्याने ते दिनांक ३/१०/९८ पासून प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत संदर्भ क. ४ च्या आदेशान्वये दिनांक ५/१२/२००२ पासून ते मुख्य लेखा परिक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळीत असून संदर्भीय कमांक सहाच्या आदेशान्वये त्यांना उप मुख्य लेखा परिक्षक या पदावर नेमणूक दिली आहे. त्यांना या महापालिकेतील लेखा परिक्षण विभागाचा ५ वर्षाचा अनुभव असून त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले आहे. या महापालिकेत लेखा परिक्षण विभागात अनुभवी कर्मचारी नसल्याने श्री. सु. के. घोलप उप मुख्य लेखा परिक्षक यांच्या सेवेची या महापालिकेस लोक सेवा हितार्थ आवक्ष्यकता आहे. श्री. घोलप यांना या महापालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी तसे समंतीपत्र दिलेले असून त्यांना लोकसेवा हितार्थ महापालिकेत कायम स्वरुपी सामावून घेण्याचा प्रस्ताव संदर्भिय पत्र कमांक ७ व ८ अन्वये संचालक लेखा व कोषागारे मुंबई यांना सादर केला आहे.

श्री. सु. के. घोलप. हे दिनांक २/११/१९८१ पासून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असून दिनांक ६/५/१९८९ पासून ते महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग - ३ गट-ब सेवेमध्ये कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या सेवेत अत्त्युत्त्कृष्ट कामाबददल तीन आगाऊ वेतनवाढी मिळाल्या असून त्यापैकी एक आगावू वेतन वाढ आपल्या महापालिकेत मिळाली आहे.

आपल्या महापालिकेत लेखापरिक्षणाचा अनूभव असणारे कर्मचारी कमी असून पदोन्नती देण्यासाठी पात्र कर्मचारी नाहीत त्यामुळे श्री. घोलप उप मुख्य लेखा परिक्षक यांच्या सेवेची महानगरपालिकेत आवश्यकता असल्याने त्यांना लोकसेवा हितार्थ आपल्या महापालिकेत सामावून घेणे महापालिकेच्या हिताचे आहे.

त्यामुळे श्री. घोलप यांना महापालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्यास मान्यता देण्यासाठी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र. १२३</u> <u>दिनांक:-१९.१.२००४.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे श्री. सु.के. घोलप यांना महापालिका सेवेतील उप-मुख्य लेखा परीक्षक या पदावर कायम स्वरुपी सामावून घेणेस मान्यता देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- विषय क्र. १५ वाचून दाखवितात.

आयत्यावेळचा विषय

महासभा विषय क्र. १५

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळावर शिक्षण अधिकारी या वर्ग-१ मधील अधिका-यांची प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्तीस मान्यता देणे.

काही सदस्य:-पास ,पास.....

मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्यावेळचा विषय

महासभा विषय क्र. १५

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळावर शिक्षण अधिकारी या वर्ग-१ मधील अधिका-यांची प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्तीस मान्यता देणे.

प्रस्तावना :-

तत्कालीन उल्हासनगर पालिकेकडे शिक्षण मंडळ जिल्हापरिषदेकडून माहे जून, १९७६ पासून हस्तांतरीत झाले आहे. उल्हासनगर महापालिका अस्तित्त्वात आल्यानंतर दिनांक २१ ऑक्टोंबर, १९९६ पासून शिक्षणमंडळ महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाले आहे.

सध्या महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळाकडे २८ शाळा आहेत. सदर शाळांमध्ये १ ते ७ वी पर्यंतचे वर्ग आहेत आणि एकूण विद्यार्थी संख्या ११,४३५ एवढी आहे. शिक्षणमंडळाचे आस्थापनेवर खालील संवर्गातील पदे मंजुर आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | वर्ग | मंजूर पदे |
|---|---|---|---|
| १ | प्रशासन अधिकारी | ''क'' | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | लिपिक | ''क'' | ०४ |
| ३ | शिक्षक | ''क'' | ४८४ |

शिक्षणमंडळामार्फत महानगरपालिका शाळांव्यतिरिक्त केंद्र / राज्य शासनाच्या शैक्षणिक योजना राबविण्यात येतात. तसेच, सध्या केंद्र शासन पुरस्कृत महात्मा फुले शिक्षण हमी योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रात एकूण २०८ केंद्र सुरु आहेत. सदर केंद्रामध्ये प्रत्येकी २० बाहय शाळा ६ ते १४ या वयोगटातील मुलांची नोंदणी करुन स्वंयसेविकेमार्फत शिक्षण दिले जाते व या कामाबददल स्वंयसेविकांना दरमहा रुपये १,०००/- एवढे मानधन देण्यात आले. सदर केंद्रे ही नोंदणीकृत स्वंयसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येतात. स्वंयसेवी संस्थामार्फत सुरु केलेले केंद्र ही ०२वर्ष चालवायचे असते. संस्थांकडून योजनेच्या निकाषानुसार प्राप्त झालेले प्रस्ताव महानगरपालिकेच्या कार्यकारी समिती शिफारसीनंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मंजुरीसाठी पाठविले जातात. यामध्ये, प्रशासन अधिकारी यांची जबाबदारी व भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे, कार्यकारी समितीचे सचिव, सदस्य हे या योजनेचे अंमलबजावणीचे प्रमुख आहेत. त्यामुळे, सदर योजना यशस्वी करण्यासाठी केंद्राच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी प्रशासन अधिकारी यांची आहे. महापालिका शिक्षणमंडळावरील प्रशासन अधिकारी यांची आहे. महापालिका शिक्षणमंडळावरील प्रशासन अधिकारी या पदनामाचे पद हे वर्ग -- ३ चे पद आहे.

महानगरपालिकेचा दर्जा व शिक्षणमंडळाची व्याप्ती विचारात घेऊन या महापालिकेच्या शिक्षणमंडळावर शिक्षण अधिकारी या वर्ग--१ मधील अधिका-याची प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १२४</u>                    <u>दिनांकः-१९.१.२००४.</u>

सुचकाचे नाव :-श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळावर शिक्षण अधिकारी या वर्ग-१ मधील अधिका-यांची प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्तीस मान्यता व त्यास अनुसरुन शासन व नियुक्ती प्राधिकारी यांस शिफारस करीत आहे.

सूचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १६ वाचून दाखवितात.

<u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>महासभा विषय क्र. १६</u>

विषयः-हवा प्रदुषण सनियंत्रण केंद्र स्थापन करणे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे बाबत.

काही सदस्य :-पास ,पास........

मा. सचिव (श्री.-प्रकाश कुकरेजा):-सर्व संमतीने ?

मा. उप-महापौर तथा पिठासीन अधिकारी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

महासभा विषय क्र. १६

विषयः-हवा प्रदुषण सनियंत्रण केंद स्थापन करणे व त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे बाबत.

प्रस्तावना

मुंबई शहरात मोटार वाहनापासून होणा-या वायूप्रदुषणास आळा घालण्यासाठी स्मोक ॲफक्टेड रेसिडेंट फोरम या संस्थेने दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १७६२/१९९९ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने हवा प्रदुषण नियंत्रणाची जबाबदारी महाराष्ट्र नियंत्रण मंडळ व मुंबई महानगरपालिका यांच्यावर सोपविली आहे. या जबाबदारीनुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी हवेतील बेन्झीन कार्बन मोनॉक्साईड, हायड्रोकार्बन्स पीएम-१० च्या प्रमाणांची नोंद घेणे याकरीता आवश्यक असणारी अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करणे व ही यंत्रणा दिनांक १ जानेवारी, २००० पासून कार्यान्वीत व्हावी असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. मुंबई महानगर प्रदेशामध्ये स्वंयचलित हवेची गुणवत्ता सनियंत्रण केंद स्थापन करण्याबाबत मुंबई कृतीआराखडयामध्ये नमुद करण्यात आले आहे व त्यानुसार महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने तज्ञ समिती गठीत केली होती. तज्ञ समितीच्या शिफारशीवर आधारीत मुंबई महानगर प्रदेशामध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन नगरपालिका व महानगरपालिकेच्या सहाय्याने एकूण १४ स्वंयचलित हवा गुणवत्ता सनियंत्रण केंदे स्थापन करणे व त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका हददीत एक केंद स्थापन करणे आवश्यक आहे.

या केंदाची स्थापना करण्यासाठी अंदाजित रुपये ७५.१७ लक्ष खर्च अपेक्षित असून त्याचा वित्तीय आकृतीबध्द खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण महामंडळ / पर्यावरण विभाग | : | ५० : रुपये ३७.५८ लक्ष (अंदाजित) |
| २) नगरविकास विभाग (महानगरपालिकांना पायाभूत सेवा सुविधांसाठी विशेष अनुदान / नगरपरिषदांना विशेष अनुदान) | : | २५ : रुपये १८.७९ लक्ष (अंदाजित) |
| ३) संबंधित नगरपरिषदा / महानगरपालिका | : | २५ : रुपये १८.७९ लक्ष (अंदाजित) |

सबब, उल्हासनगर शहरात स्वंयचलित हवा गुणवत्ता नियंत्रण केंद स्थापन करण्यास व महानगरपालिकेने २५ : (अंदाजित रुपये १८.७९ लक्ष) रुपये रक्कम निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्याची शिफारस आहे.

<u>महासभा ठराव क्र. १२५</u> <u>दिनांकः-१९ १ २००४.</u>

सुचकाचे नाव :-श्री. देवेंद्रसिंह खेमाणी
अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात स्वंयचलित हवा गुणवत्ता निवारण केंद्र स्थापन करण्यास व खर्चापोटी रुपये १८.७९ लक्ष या अंदाजित रक्कमेस अर्थसंकल्पीय अंदाजात आवश्यक समायोजनाच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

सूचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>
उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. आयुक्त साहेबांना एक निवेदन करायचे आहे. कृपया लक्ष दया.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u>घनकचरा व्यवस्थापना बाबत एक प्रशीक्षण आयोजित केले जात आहे. त्याचे निमंत्रण आपणांस दिले आहे.

<u>काही सदस्य :-</u>गोवा येथे ?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u>नाही, गोवा येथे नाही. प्रथम तर उल्हासनगर येथे करु. त्यानंतर आपणांस गोवा येथे पाठवू. तर हे प्रशिक्षण २९ जानेवारी, २००४ रोजी आहे. त्याचे स्थळ आहे, रिजेन्सी हॉल. या प्रशिक्षणासाठी नगरसेवक, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी व पत्रकार यांना निमंत्रित केले आहे. जे घनकचरा व्यवस्थापनाचे कामात भाग घेवू इच्छितात त्यांच्यासाठी आहे. सर्व लोकांसाठी शक्य नाही. माझी आपणांस विनंती आहे की, आपण सर्व नगरसेवक व आपल्या सोबत काम करणारे सेवाभावी संस्थेचे जे प्रतिनिधी आहेत, त्यांना घेवून आपण या प्रशिक्षणास यावे. व हा जो विषय आहे, त्याकामी मदत करावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>सर्वांना नविन वर्षाच्या शुभेच्छा....

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८. ०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१६/२/२००४

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/२/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १६/२/२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती. मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१)मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्रीमती. भावना रवी खिलनानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. सोनावणे नथु काशिराम | ३८. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३९. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४०. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्रीमती जयश्री सुर्वे |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्रीमती. ज्योती कालानी | ४५. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १८. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, | ५१. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२ | श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. अंकुश म्हस्के |
| २१. | श्रीमती गुप्ता आनिता धर्मेद | ५४. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| २२. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६. | श्रीमती दिपा नारायण पंजाबी |
| २४. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५८. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २६. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५९. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६०. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६१. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्रीमती निना प्रकाश नाथानी |
| ३१. | श्रीमती. मोना वनवारी | ६४. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्री. संजय भठीजा |
| ३३. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३४. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. इदनानी राजू चंद्रभान, |
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. माखिजा हरदास |
| | | ६९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |

तर,

मा. सदस्य १. श्री. मुलचंदानी महेंद्र, २. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, ३. श्री. रमेश महादेव चव्हाण, ४. श्रीमती भठिजा कोमल, ५. श्री. जयसिंघानी अनिल, ६. श्रीमती किरण लखी माखिजा, ७. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश, ८. श्री. बहरानी मोहन वर्यलदास, ९. श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास, १०. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ :-स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००३-०४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे.

<u>मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:-</u>मी राष्ट्रपीता महात्त्मा गांधी यांचे छायाचित्र आणलेले असुन ते सभागृहात लावण्यासाठी मा. महापौरांनी कृपया अनुमती दयावी.

<u>मा. महापौरः-</u>अनुमती देण्यात येत आहे.

यावेळी सर्व पदाधिका-यांनी महात्त्मा गांधी यांच्या छायाचित्रास हार व पुष्पगुच्छ अर्पण करून त्यांच्या भावना प्रकट केल्या.

<u>मा. उपमहापौरः-</u>आपणां सर्वांना सुचित करताना मला अत्यानंद होत आहे की, माझी सुपुत्री एकता हीचा शुभविवाह १५.२.२००४ रोजी मयुर लॉन्स येथे कुमार कैलास सुपुत्र श्रीमती नीता प्रकाश आहुजा यांच्या समवेत संपन्न होणार आहे. आपणां सर्वांना निमंत्रण दिलेले आहे. आपणां सर्वांना मी हार्दिक निमंत्रण देते की, आपण सर्वांनी लग्नास येवुन नवदांपत्त्यास शुभ आर्शिवाद दयावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांतर्फे मा. सभापती स्थायी समिती यांना अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यासाठी व्यासपीठावर आमंत्रित करण्यांत येत आहे तरी सभापती स्थायी समिती श्रीमती. ज्योती कलानी यांनी कृपया व्यासपीठावर यावे. श्री. किशोर वनवारी त्यांना सहकार्य करतील.

<u>मा. सभापती स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, अधिकारी, कर्मचारी, उपस्थित नागरिक तसेच पत्रकार आपणां सर्वांचे मी स्वागत करते.

मा. सदस्या श्रीमती. निता आहुजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. महापौरजी, मा. सभापती स्थायी समिती दरवर्षी अर्थसंकल्प सादर करण्यापुर्वी स्थायी समिती सभापतींच्या भाषणाच्या प्रती सर्व सदस्यांना वितरीत केल्या जातात. आपल्याकडे त्याच्या प्रती असल्यास वितरीत करण्यात याव्यात

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी आता आमचे मा. सदस्य श्री. जमनु पुरस्वानी यांनी जसे सांगितले की, भाषणाच्या प्रती वितरित केल्या जातात तर आता पर्यंत कोणत्त्या वर्षी प्रती वितरीत करण्यात आलेल्या आहेत ते जरा सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>फक्त मागच्या वर्षी दिल्या नव्हत्त्या त्यापुर्वी देण्यात आलेल्या होत्त्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मागच्या वर्षी ही दिल्या नव्हत्त्या व त्यापुर्वी ही दिल्या नव्हत्त्या. जेव्हा महासभेचा ठराव कायम होईल त्यानंतर भाषणाची प्रत आपणांस दिली जाईल.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>मी पुन्हा एकदा आपणांस धन्यवाद देते कारण आपण मला लागोपाठ चौथ्या वेळेस शहरवासियांच्या समस्या सोडविण्याची संधी दिलेली आहे. करांपासुन मुक्ती देण्याचा तसेच शहराचा विकास करण्याचा उल्हासनगर शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन करण्याचा प्रयत्त्न आहे. असे म्हणतात की, आपल्या देशात स्थानिक स्वराज्य संस्थांची सुरूवात रामायण, महाभारताच्या काळात झालेली आहे. आपल्यावर मोगल तसेच ब्रिटीशांचे राज्य होते. तेव्हा ते देखिल त्यांचा कारभार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातुन करीत होते. १५ ऑगस्ट, १९४७ला आपल्या देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर भारतरत्त्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानीक दर्जा देण्यात आला. त्यांना राज्य सरकारच्या अंतर्गत समाविष्ट करण्यात आले होते. याच भारतीय संविधानाच्या ७४व्या घटना दुरूस्तीच्या माध्यमातुन स्थनिक स्वराज्य संस्थांना जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्याची, शक्तीशाली बनविण्याचा, स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्त्न करण्यात आलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाची दिशा व दशा दर्शविणारा दस्तावेज हा अर्थसंकल्प आहे. शहरात राहणा-या नागरिकांचा दर्जा स्थानिक स्वराज्य संस्थेचा अंदाजपत्रक दर्शवतो. आपल्या शहराच्या या अंदाजपत्रकावर चर्चेची सुरूवात आपण सन २००३-२००४ पासुन करू. आम्ही मागच्या वर्षी अंदाजपत्रक सादर करताना जे वायदे केले होते ते पुर्ण करण्याचा प्रयत्त्न तथा परिणामांची माहिती याप्रकारे आहे.

क्र. १:-प्रशासकीय खर्चा अंतर्गत देण्यात येणा-या पाचव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची नियमित अदायगी करण्यात येत आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की मागच्या वर्षी अनुशेष भरती अंतर्गत १७१ कर्मचा-यांना कामावर घेण्यात आले आहे. तसेच ६८ कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

क्र. २:-पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ अंतर्गत ७ पैकी ५ जलकुंभ तयार करण्यात आले आहेत. जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. एम.आय.डी.सी. ला पाणी बिलांची रक्कम पुर्वी पेक्षा जास्त देण्यात आलेली आहे. तसेच थकबाकी प्रत्त्येक महिन्याला रू. ८५ लाख याप्रमाणे अदा करणे सुरू आहे. शहरातील ब-याच विभागात असलेली पाणी समस्या दुरू करण्यासाठी मा. आमदार श्री. पप्पु कालानी यांनी आमदार निधीतुन रूपये २ कोटी ऐवढा निधी महापालिकेला दिलेला आहे. व या निधीतुन ब-याच कामांची प्राकलने तयार केलेली असुन कामे येत्त्या काही दिवसात सुरू होणार आहेत.

क्र. ३:-रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत पवई पुल, उल्हासनगर स्टेशन उड्डाण पुल तसेच अन्य रस्त्त्यांचा देखिल विकास केलेला आहे. मागील वर्षी २० नविन रस्ते बनविण्याचा संकल्प आम्ही केला होता त्यापैकी आठ रस्त्त्यांचे काम हाती घेण्यात आलेले आहे उर्वरित रस्त्त्यांसाठी नविन वर्षात योजना बनविलेली आहे.

क्र. ४:-सर्व शहरवासियांसाठी अभिमानाची गोष्ट आहे की, घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीच्या नियमांतर्गत घनकचरा वाहतुक संबंधी जबाबदारी पुर्ण करणारी उल्हासनगर महानगरपालिका राज्यातील पहिली महापालिका आहे. वर्ष २००३-०४ ची ही सर्वात मोठी उपलब्धी आहे. दहा वर्षा पर्यंत कचरा वाहतुकीची कोणतीही समस्या उत्पन्न होवू नये यासाठी आम्ही ही व्यवस्था केलेली आहे.

क्र. ५:-अग्निशमन विभागासाठी नविन गाडी खरेदी केलेली असुन सदर गाडीचे चेसिसवर पुढील काम सुरू आहे. काही दिवसातच ही गाडी अग्निशमन विभागात दाखल होईल.

क्र. ६:-सपना उद्यान तसेच इतर अन्य उद्यानांचा देखिल विकास करण्यात आलेला आहे. सपना उद्यानाचे सौंदर्य व तेथे दररोज सायंकाळी येणारे नागरिक पाहुन मन प्रसन्न होते. सर्वसामान्य लोकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. याशिवाय गोलमैदान येथील उद्यानात प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या सहकार्याने एक वेगळे पीस हार्मोनी सेंटर बनविण्यात आलेले आहे. सपना उद्यानाच्या विकासासाठी आमदार निधीतुन १७लाख ५० हजार तसेच पीस हार्मोनी सेंटर साठी १९ लाख उपलब्ध करून दिल्याबददल आम्ही आमचे आमदार श्री. पप्पु कलानी यांना धन्यवाद देतो.

क्र. ७:-महापालिकेद्वारा संचालित करण्यात येत असलेल्या शाळांची काही अंशी सुधारणा झालेली आहे. शिक्षण मंडळाचे सभापती श्री. मुरली रोहडा यामध्ये यशस्वी झाले आहेत. महानगरपालिकेने आपले कर्तव्य पार पाडताना त्यांना नियमित स्वरूपात निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

क्र.८:-मागील वर्षी आम्ही सौरउर्जा व पवनचक्कीद्वारे विद्युत निर्मीतीचा प्रकल्प मंजुर केला होता. हा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे व महानगरपालिका मुख्यालयाच्या काही भागांमध्ये पवनचक्की द्वारे निर्मित होणा-या विजेची व्यवस्था केलेली आहे. यावर्षी आपणांस एम.एस.ई.बी. च्या बीलांपासुन काही अंशी सुटका मिळणार आहे. परंतु जास्त सुटका मिळेल जेव्हा याचे नियमित उत्पादन होईल.

क्र. ९:- उपमहापौर निधीतुन नेताजी चौक तथा गांधी रोडवर आधुनिक हायमास्ट दिवे लावण्यात आलेले आहेत. प्रभात उद्यानात कारंजे बसविण्यात आलेले आहे. याशिवाय सेक्शन ३९ येथे आनंदपुरी दरबार पर्यंत बी.एम.ए.सी. रोड, फॉलवर लाईन ते बॅरेक नं. १७११ पर्यंत २५० रस्ते बनविण्यात आले आहेत.

क्र.१०:-महापौर निधीतुन प्रभाग क्र. १८ मध्ये समाज मंदीर, सपना उद्यानाचे सौंदर्यीकरण करणे तसेच शहरातील विविध भागात सी.सी. पॅसेज, २५० रस्ते तथा नविन जलवाहिन्या टाकण्यांत आलेल्या आहेत.

क्र. ११:-सभापती स्थायी समिती निधीतुन कॅप क्र. ५ येथील स्मशानभुमीचा विकास करण्यासाठी ५ लाख देण्यात आलेले आहेत. दसरा मैदान उल्हासनगर ५ येथे व १ नंबर बसस्टॉप येथे हायमास्ट दिवे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

आता वित्तिय वर्ष २००४-०५ कडे आपण वळु या. २००४-०५ करिता महानगरपालिका प्रशासनाने जे अंदाज सादर केले आहेत ते येणे प्रमाणे आहेत.

उत्पन्न रू. १५७. ५० कोटी व खर्च रू. १८६. ३२ कोटी उत्पन्न व खर्चाच्या दरम्यान २८. ८२ कोटी रूपयांची तुट आहे. ती भरून काढण्यासाठी प्रशासनाच्या वतीने जे कर प्रस्तावित करण्यात आले आहेत त्याचे विवरण पुढील प्रमाणे आहे. जकात रू. १५. १९ कोटी मालमत्ता कर ६. ६० कोटी, पाणीपटटी ७. ३४ कोटी,

टॅंकर भाडे १.२७ कोटी व अग्निशमन विभागाच्या ना हरकत दाखल्यापोटी १ लाख रू. मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही स्थायी समिती सदस्यांचे मत आहे की, शहरातील जनतेला काही वेळेसाठी करांच्या बोजा पासुन वाचविले जावे. यावेळी एकच पर्याय होता की, पाणी पटटी व मालमत्ता कराची जास्तीत जास्त वसुली करून अंदाजपत्रकातील ही तुट भरून काढली जावी. सन २००४-०५ चा उत्पन्न व खर्चाचा अंदाजः- जमा बाजुस रू. २ लाख शिल्लक आहेत. जकात ५९.२६ कोटी, मालमत्ता कर ५० कोटी, पाणी पुरवठा ४५ कोटी, अनुदान ८.७२ कोटी, कर्ज निरंक आहे व इतर खर्च आहे २१.५० कोटी खर्चाच्या बाजुस आहेः- पगार भत्ते व प्रशासकीय खर्च २५.६८ कोटी एम.आय.डी.सी. २३.३५ कोटी, भुयारी गटार कर्ज परतफेड ११.७५ कोटी, पाणी पुरवठा योजना ११.३८ कोटी, हुडको कर्ज परतफेड ४२ लाख, एम.एम.आर.डी.ए. कर्ज परतफेड २.६५ कोटी, पथदिवे २.४० कोटी, कचरा वाहतुक व जंतुनाशक इतर खर्च ६.३१ कोटी, शिक्षण मंडळ ४.४६ कोटी, शासकीय व इतर देणी १४.४७ कोटी, दिवाबत्ती १.४६ कोटी, उद्याने ३५ लाख, अग्निशमन ६० लाख, दवाखाना व आरोग्य विषयक कार्यक्रम १.१४ कोटी, पाणी पुरवठा ११.८५ कोटी, भुयारी गटार २.१३ कोटी, ड्रेनेज २.१५ कोटी, रस्ते विकास कार्यक्रम १५ कोटी, बांधकाम खाते २३.७७ कोटी, प्रभाग समिती २.७० कोटी व इतर खर्च ३.८ कोटी अखेर शिल्लक ४० लाख. वर्ष २००४-०५ मध्ये अंदाजित खर्चाचे विवरण करण्यापुर्वी आम्ही आमचे आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांचे अभिनंदन करू इच्छितो ज्यांनी त्यांची जनप्रतिनिधी तसेच जनतेच्या प्रती असणा-या जबाबदारीची जाणीव ठेवुन जनतेच्या हितासाठी व शहराच्या हितासाठी कित्त्येक योजना बनविल्या आहेत. आम्हाला हे सांगताना संकोच होत नाही की श्री. सोनवणे हे प्रत्येक क्षेत्रात मग ते साफसफाई असो अथवा कर वसुली असो, सी.एफ.सी. असो, प्रशासन असो वा पाण्याची समस्या असो ते खरे उतरले आहेत. नव्या वर्षाच्या योजना याप्रकारे आहेत.

महानगरपालिका पाणी निर्मिती योजनाः-आपणा सर्वांना माहिती आहेच की, पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ अंतर्गत विकसित केलेले जलकुंभ तथा जलवाहिन्यामुळे शहरातील टंचाईग्रस्त विभागांमध्ये पाणी पोहचलेले आहे. परंतु महानगरपालिकेची स्वतःची पाणी पुरवठा योजना नसल्याने आम्ही पुर्णपणे एम.आय.डी.सी.वर अवलंबुन आहोत. ते सांगतिल तेवढी किंमत त्यांना दयावी लागत आहे. कोणत्त्याही प्रकारचा विरोध दर्शविल्यास पाणी कपात केली जाते. तसेच जनतेचा रोष ओढवुन घ्यावा लागतो. या सर्व बाबी लक्षात घेता महानगरपालिकेने एम.जे.पी.च्या सहकार्याने आपली स्वतःची पाणी पुरवठा योजना तयार करण्याचे ठरविले आहे. ही योजना रूपये १०२ कोटींची आहे. स्वतःचे पाणी पुरवठा शुध्दीकरण केंद्र व टप्पा २ अंतर्गत बनविण्यात येणा-या पाण्याच्या टाक्यांचा यामध्ये समावेश आहे. ही योजना शासकीय अनुदान, कर्ज तथा महापालिका निधीतुन राबविली जाणार आहे. ही योजना सुरू झाल्यानंतर महापालिकेला रूपये ४.६६ प्रति हजार लिटर्स या दराने पाणी पुरवठा होणार आहे. ज्यासाठी आज आपण ७ रू. प्रती हजार लिटर्स अदा करीत आहोत. या कामाची सुरूवात करण्याकरिता आम्ही वर्ष २००४-०५ मध्ये ३.५ कोटींची तरतुद केलेली आहे.

नागरी सुविधा केंन्द्रः- २१वे शतक हे संगणकीकरणाचे युग आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये जनतेशी संबधित सर्व नागरी सुविधांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. या धोरणाचे पालन करताना महानगरपालिकेने जनतेशी संबंधीत सुविधा जसे जन्म व मृत्यु दाखले, व्यापार परवाना, विविध प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र, इमारत परवाने इत्त्यादींचे संगणकीकरण केले आहे तसेच नागरी सुविधा केंद्र बनविले आहे. ही सेवा काही दिवसातच सुरू केली जाईल व जनता घरबसल्या इंटरनेटच्या माध्यमातुन त्यांच्या तक्रारी व सुविधे संबंधी माहिती प्राप्त करू शकतील. संगणकीकरण करण्यासाठी महापालिकेने वर्ष २००४-०५ मध्ये रू. ५५ लाखांची तरतुद केलेली आहे.

कालांतराने रक्कम अदा करण्याची योजनाः- या योजने अंतर्गत रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. २ अंतर्गत २० नविन रस्ते विकसित करण्याची योजना बनविण्यात आली होती. त्यापैकी ४ रस्त्यांचे काम सुरू आहे. ४ रस्त्यांसाठी प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे. या दरम्यान प्रशासनाकडुन सुचविलेल्या या योजने अंतर्गत ४० रस्त्यांची कामे प्रस्तावित करून ती ३ वर्षात पुर्ण करण्याचा आमचा मनोदय आहे. ३० रस्त्यांच्या व्यतिरिक्त ज्या १० रस्त्यांचा समावेश केलेला आहे तो येणे प्रमाणे आहे.

१. बॅरेक नं. १९३६ ते १९६९, उल्हासनगर-५
२. कैलास कॉलनी रस्ता उल्हासनगर-५
३. डॉ. लालवानी डिस्पेंन्सरी ते ब्लॉक नं.५६३ एकविरामाता मंदीर, उल्हासनगर-४
४. साई पॅलेस ते बॅरेक नं. १४२५, उल्हासनगर-४
५. आस्था हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, उल्हासनगर-३
६. भवानी नगर मच्छीमार्केट ते शालीमार प्रेस, उल्हासनगर-३
७. दसेरा मैदान ते मुखी सोभराज गार्डन, उल्हासनगर-५
८. सचदेव कॉम्प्लेक्स ते हिरा मॅरेज हॉल, उल्हासनगर-२
९. केंब्रिज शोरूम ते साई कुटीर अपार्टमेंट, उल्हासनगर-२
१०. ४४४ गार्डन तथा एल.डी. आहुजा गार्डन रस्ता, उल्हासनगर-२

वर्ष २००४-०५ मध्ये रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत आम्ही रूपये १५ कोटी जमा केलेले आहेत.

पर्यावरण स्थितीः-भारतीय संविधानात ७४ व्या घटना दुरूस्तीच्या माध्यमातुन पर्यावरण स्थिती संतुलित ठेवण्यासाठी एक मोठी महत्त्वाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थावर टाकलेली आहे. कचरा वाहतुकीची नवी व्यवस्था राबवुन आम्ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. याच्याशी संबंधित अजुन एक विषय आहे तो म्हणजे कच-यावर प्रक्रिया करणे. महानगरपालिकेला कांबा गावात जमिन मिळताच हे काम सुरू केले जाईल व यासाठी आम्ही वर्ष २००४-०५ मध्ये १ कोटी रूपयांची तरतुद केलेली आहे.

ही जबाबदारी पुढे अजुन वाढवायची असेल तर आपल्या शहरात हवा प्रदुषण सनियंत्रण कक्ष बनविण्यासाठी रूपये १९ लाखाची तरतुद केलेली आहे. तसेच अंबरनाथ औद्योगिक क्षेत्र येथुन येणारा व उल्हासनगर शहरातुन जाणारा प्रदुषित नाला याचा विकास तथा मलनिःस्सारण केंद्र स्थापित करण्यासाठी रूपये १ कोटीची तरतुद ठेवलेली आहे.

शहरातील उद्यानांचा विकास करण्यासाठी रूपये ५८ लाखांची तरतुद केली आहे. तथा गोलमैदान येथील एका भागाचा रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मीड टाऊन यांच्या सहकार्याने विकास करण्यासाठी एक योजना आहे. रोटरी क्लबने रूपये २५ लाख खर्च करून या भागाचे सौदर्यीकरण करण्यास मान्यता दिली आहे.

कर्ज परतफेडीसाठी माफी योजनाः-आम्ही महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करतो. ज्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मर्यादीत उत्पन्न लक्षात घेता, वाढत्या जबाबदा-या लक्षात घेता जुन्या कर्जावर असलेले दंडनिय व्याज माफ करणे व पाणी बिलावरील विलंब शुल्क आकार माफ करणे यासाठी निर्भय योजना जाहिर केली आहे. या योजनेचा फायदा घेवून महानगरपालिकेने एम.जे.पी. चे १. २२ कोटी अदा केलेले आहेत. यामुळे रूपये १६ कोटीची सुट आपणांस मिळालेली आहे. या १६ कोटीपासुन व एम.आय.डी.सी.च्या ४२ कोटीपासुन सुट मिळण्याचे श्रेय आमचे आमदार श्री. पप्पु कलानी यांना जाते. ज्यांनी शासनाला या परिस्थितीशी अवगत करून दिले त्यानंतर

शासनाने निर्भय योजना जाहिर केली. व सर्व नगरपालिका, महानगरपालिका तथा सामान्य ग्राहकांना याचा फायदा मिळाला. मी धन्यवाद देते मा. आमदार व महाराष्ट्र शासनाला आमच्या समोर दुसरे लक्ष आहे पाणी पुरवठा योजना व भुयारी गटार योजना, कर्ज परतफेड या दोन्ही कर्जांची परतफेड तसेच नियमित हप्ता भरण्यासाठी आम्ही आगामी अर्थसंकल्पामध्ये रू. २३ कोटींची तरतुद केलेली आहे. प्रत्येक वर्षीप्रमाणे महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व नगरसेवक या निधीसाठी रूपये ४. १४ कोटींची तरतुद केलेली आहे. याशिवाय प्रभाग समितींच्या माध्यमातुन विकास कार्य करण्यासाठी रूपये १. ९० कोटींची तरतुद केलेली आहे. आम्हाला विश्वास आहे की, आमचे अंदाजपत्रक ''फिल गुड'' नाही तर ''ॲक्च्युअल गुड'' आहे. स्थायी समिती द्वारे बनविण्यांत आलेला व प्रत्यक्षात चांगला असलेला या अंदाजपत्रकास महासभेच्या सर्व सदस्यांनी अधिनियमाच्या कलम १०० अन्वये अंतिम मंजुरी द्यावा अशी आम्ही अपेक्षा करतो. अंदाजपत्रक तयार करताना सहयोग देणारे अधिकारी तसेच कर्मचा-यांचे मी आभार प्रकट करून माझे दोन शब्द समाप्त करते.

जयहिंद, जय महाराष्ट्र, जय झुलेलाल, जय भिम!

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:</u>-मा. महापौरजी, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त, सचिव, उपस्थित सर्व राजकीय पक्षांचे नेतेगण, नगरसेवक, नगरसेविका तसेच प्रेक्षा गृहात उपस्थित असलेले आमचे पत्रकार बंधु व सर्व नागरिक, सर्वप्रथम मी माझी बहिण श्रीमती. ज्योती कालानी ज्या स्थायी समितीच्या सभापती आहेत, त्यांचे अभिनंदन करतो की, त्यांना लागोपाठ चौथ्यांदा महापालिकेचे हे अंदाजपत्रक सादर करण्याची संधी मिळालेली आहे. या संधीचा फायदा उठवुन त्यांनी जनतेला प्रत्येक वर्षी, प्रत्येक प्रकारचा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे यासाठी मी त्यांना अभिनंदनास पात्र समजतो व आशा करतो की, अशी व्यक्ती जीने शहरातील जनतेच्या भावना लक्षात घेवून अशा प्रकारचे अंदाजपत्रक दरवर्षी या सभागृहात सादर केले आहे. ज्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. जर येणा-या काही दिवसात त्या या शहराच्या महापौर पदावर आल्यास आम्हाला आनंद होईल. दुसरे अभिनंदन त्यांचे करू इच्छितो जे आमचे स्थायी समितीचे सदस्य आहेत. ते राष्ट्रवादीचे असो, कॉंग्रेसचे असो अथवा विरोधी पक्षातील असोत मी त्यांचे अभिनंदन करू इच्छितो त्यांनी स्थायी समिती सभापतींना असा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी मदत केली. तिसरे अभिनंदन मी करू इच्छितो या शहराचे आमदार श्री. पप्पु कलानी यांचे ज्यांच्या नेतृत्त्वाखाली श्रीमती. ज्योती कलानी यांनी या अंदाजपत्रकाची रूपरेखा बनविली ज्यांच्या नेतृत्त्वाखाली स्थायी समितीचे आमचे जे सदस्य आहेत. ज्यांनी त्यांच्या आदेशाचे पालन केले व जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यामध्ये शहरातील जनतेला दिलासा मिळेल याची काळजी घेतलेली आहे. तसेच शहरातील नविन विकासांच्या कामाची सुरवात केलेली आहे. कारण असे वाटायला हवे की या शहरात जी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ती काम करीत आहे. जनतेला असे कळायला हवे की, महापालिकेत आमचे प्रतिनिधी बसलेले आहेत जे सर्वसामान्य लोकांचा विचार करून नियोजन करीत आहेत व शहराला प्रगतीच्या दिशेने देखिल नेत आहेत. हे करताना शहरातील जनतेवर काही खास बोजा देखिल टाकत नाहीत. म्हणुन मी तिसरे अभिनंदन आमचे आमदार श्री. पप्पु कलानी यांचे करित आहे. तसेच त्यांच्या पक्षाचे जे सदस्य आहेत, आमच्या कॉंग्रेस पक्षाचे जे सदस्य आहेत त्यांचे देखिल अभिनंदन करतो. इंग्रजीत एक म्हण आहे की, ''रोम एका दिवसात तयार झालेले नाही'' ही फार जुनी म्हण आहे. रोम हे जगातील एक प्राचीन शहर आहे. या शहराचा इतिहास हा फार जुना आहे. परंतु हे शहर देखिल आज ज्या रूपात आहे ते एका दिवसात तयार झालेले नाही. ते बनविण्यासाठी बरीच युगे लागली, बरीच वर्ष लागली. उल्हासनगरचा तर ५०-५५ वर्षांचा इतिहास आहे. मोठा इतिहास नाही. परंतु या ५५ वर्षामध्ये या शहराने जी प्रगती केली आहे मला असे वाटते की,जगातील इतर शहरांपेक्षा हे फार वेगाने झाले आहे. यामध्ये अमेरीका, युरोप व ब्रिटन मधील शहरांनी देखिल या वेगाने प्रगती केली नाही, ज्या वेगाने उल्हासनगर शहराची प्रगती होत आहे. त्याचे श्रेय या ५०-५५ वर्षात आमचे नगरपालिकेमध्ये जे नगराध्यक्ष होवून

गेले. जे आमदार आले व महापालिकेत कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जे प्रतिनिधी आहेत, ५०-५५वर्षातील प्रगतीचे जास्तीत जास्त श्रेय हे यांच्याकडे जाते. या शहरात धर्म निरपेक्ष पक्षांचे राज्य राहिलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातही कॉंग्रेसची सरकारे होती. ज्यांनी यापूर्वी उल्हासनगरच्या नगरपालिकेला व आताच्या महापालिकेला पाठींबा देवून शहराचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अंदाजपत्रकात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, उल्हासनगर महापालिकेचे कामकाज चालविणे व तिला प्रगतीच्या दिशेने नेणे व यासाठी कोणतीही करवाढ न करणे ही एक मोठी उपलब्धी आहे. याचे श्रेय सत्ताधारी पक्ष, महापौर, उप-महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, सत्ताधारी पक्षाचे, राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते, कॉंग्रेसचे गटनेते, सर्व सदस्य व आयुक्त व त्यांचे सहकारी, महापालिकेचे सचिव यांचेही मोठे योगदान आहे, या सर्वांना याचे श्रेय जाते. अशा परिस्थितीत देखील ते शहराचे कामकाज चालवित आहेत. फक्त करवाढ केलेली नाही असे नाही तर, त्याचबरोबर त्यांनी नियोजन देखील केले आहे. मोठे-मोठे रस्ते, शहरात जेथे-जेथे रस्त्यांची आवश्यकता आहे, जेथे रहदारीची समस्या आहे, तेथे रस्त्यांचे रुंदीकरण विकास आराखडयाप्रमाणे करुन व ते देखील सिमेंटचे रोड आहेत. असे नाही की, श्री. चंद्रशेखर यांच्या वेळेला जसे फक्त डांबरीरोड बनविले होते. सिमेंटचे रोड बनविण्यासाठी जास्त खर्च येतो, परंतु त्यामागेही दुरदृष्टी आहे. कारण सिमेंटचे रोड आता बनविले तर येणा-या २०-२५ वर्षात त्याकडे लक्ष देण्याची गरज भासत नाही. त्यामुळे त्यावरील खर्च योग्य आहे. शहरात विविध ठिकाणी जी उदयाने आहेत, त्यांना सुधारण्यासाठी, आजकाल शहराची जनता आरोग्य विषयक बाबीबददल जागरुक झालेली आहे. सकाळ-संध्याकाळ आपण बघितल्यास सकाळी ६ वाजता अथवा संध्याकाळी ७ वाजता शहरातील वरिष्ठ व्यक्ती विविध उद्यानांमध्ये फे-या मारत असल्याचे आपणांस दिसून येईल. कोणी पळण्यासाठी जाते, कोणी फिरायला जाते, कोणी आपल्या मुलांना फिरायला घेवून जातात. तर अशा विभागांना शोधून काढुन महापौर- उप-महापौर यांनी विकास करण्याकडे लक्ष दिले आहे. आज गोल मैदान येथे साधु वासवानी उदयानात महिला व पुरुषांसाठी जॉगिंग पार्क तयार होत आहे. रोटरी क्लबच्या तर्फे एक रोटरी पार्क बनविण्यात येत आहे. पीस हॉर्मनी सेंटर होत आहे, ज्याचे उदघाटन १८ तारखेला शिवरात्रीच्या मुहूर्तावर होत आहे. सपना उद्यानाचा विकास होत आहे. अर्धा विकास झाला आहे, अर्धा चालू आहे. श्रीमती जया साधवानी यांच्या प्रभागामध्ये स्वामी शांती प्रकाश गार्डन याचा देखील विकास करण्यात आलेला आहे. तेथे कारंजा बसविण्यात आला आहे. अशा प्रकारे नागरीकांची काळजी घेतली जात आहे. अशा प्रकारे महापालिकेतील आमचा सत्ताधारी पक्ष काम करीत आहे. एवढेच नाही तर शहरातील जेवढे चौक आहेत, त्यांचे सौंदर्यीकरण करण्यात येत आहे. या शहरात जे हायमास्ट दिवे लावलेले आहे, त्यामुळे शहराचे रुप पालटले आहे. आपले जेवढे श्रीमंत सदस्य आहेत, ते काही वेळा विमानाने प्रवास करतात, तेव्हा त्यांना आश्चर्य वाटते की, आपण उल्हासनगर शहरावरुन जात आहोत की, मुंबई वरुन जात आहोत. एवढे विद्युतीकरण या शहरात झालेले आहे. लोक आश्चर्यचकित होतात की, आपले विमान मुंबई वरुन जात आहे की, पॅरीस वरुन जात आहे. हे सर्व दर्शविते की, उल्हासनगर महानगरपालिकेतील सत्ताधारी पक्षाचे सदस्य किंवा पदाधिकारी ते जनतेची काळजी व्यवस्थितरित्त्या करीत आहेत. आजच्या काळात जेव्हा परिवारातील मुख्य व्यक्ती, परिवार चालविण्यास असमर्थ असतो, त्याच्या परिवाराचे कितीही उत्त्पन्न असले, व्यापारी असो अथवा नोकरी करणारा असो, परिवार चालविण्यात त्याला अडचण येत आहे. अशा परिस्थितीत करवाढ न करता, ना पाणी पटटी वाढविली, ना घरपटटी वाढविली, ना जकात वाढविली, टँकरवरही आयुक्तांनी लावलेले कर फेटाळून लावले, अशा परिस्थितीत हे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. शहराची प्रगती देखील होत आहे. मला असे वाटते की, यापेक्षा चांगले अंदाजपत्रक पुर्ण भारतात कोणत्त्याही महापालिकेचे नसेल. आपण मुंबई महापालिका पहा, किंवा महाराष्ट्रातील इतर महापालिका पहा, ते आयुक्तांच्या प्रस्तावास अमान्य करीत नाहीत. आयुक्त जे कर प्रस्तावित करतात, ते मान्य

*केले जातात. उल्हासनगर महापालिकेचे जे पदाधिकारी आहेत, जे सत्ताधारी पक्षात आहेत, ते विचार करतात की, ठिक आहे, आयुक्तांनी जे प्रस्ताव दिले आहेत ते काही अंशी ठिक आहेत. परंतु यामुळे शहरातील नागरीकांवर जो बोजा पडेल तो शहरवासी सहन करु शकणार नाही. मी जसे उदाहरण दिले की, शहरात असणारे उदयोग-धंदे संपलेले आहेत. त्याचे कारण हे आहे की, या शहरामध्ये जी महापालिका आली, मी माझ्या बंधूना दोष देणार नाही, महापालिका तर यांनीच आणली होती. भाजपा-शिवसेनेच्या लोकांनी महापालिका आणली होती. आज जर महापालिका नसती तर या शहरात जकात कर देखील नसता. शहरात आज जे धंदे बंद पडले आहेत त्याचे पूर्ण श्रेय शिवसेना-भाजपाला जाते. शहरातील धंदे जे खराब झाले आहेत, बंद पडले आहेत, त्याचे पूर्ण श्रेय या माझ्या मित्रांना जाते. कारण की यांच्यामुळे शहरात महापालिका आली. जर नगरपालिका असती तर या शहरावर आज जो जकातीचा बोजा आहे तो राहिला नसता. परंतु ते आमचे बंधू आहेत, त्यांनी जे काही केले ते आम्ही आता विसरलो आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u> जर आम्ही महानगरपालिका केली नसती तर श्री. हरदास माखिजा हे देखील महापौर होवू शकले नसते.*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> महापौर पदासाठी मी माझ्या शहरवासियांचे नुकसान करु इच्छित नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> जर माखिजा साहेब महापौर नसते झाले तर बोडारे साहेब हे देखील उप-महापौर नसते झाले.*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> आज शहरात जी हवा चालू आहे की या शहरातील व्यापार संपत आला आहे. येथिल लोक त्यांचे सामान घेवून शेजारील शहरांमध्ये घरे विकत घेत आहेत. तेथे राहण्याचा विचार करीत आहेत. मला असे वाटते की, श्रीमती ज्योती कालानी या सभापती आहेत, आमचे सत्ताधारी पक्षाचे जे सदस्य आहेत किंवा स्थायी समितीचे जे सदस्य आहेत, किंवा सत्ताधारी पक्षाचे जे गटनेते आहेत, त्यांनी ही गोष्ट लक्षात घेतलेली आहे. या आजाराचे कारण काय आहे? लोक हे शहर सोडुन का जात आहेत? असा विचार का करीत आहेत? त्यांना असे वाटले की, या शहरातील लोक खर्चाच्या बोज्याखाली दबलेले आहेत. ज्यांचा व्यापार कमी झालेला आहे, अंबरनाथ मध्ये आज व्यापार जास्त आहे. कुळगांव व बदलापूर येथे व्यापार जास्त आहे. उल्हासनगरमध्ये व्यापार कमी आहे. या बाबीकडे विशेष लक्ष आमच्या सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी दिले आहे. यासाठी त्यांनी निर्णय घेतला आहे की, आयुक्तांनी कर वाढीचे जे देखील प्रस्ताव दिले आहे, त्याला आम्ही स्विकृती न देता या शहरावर जास्त बोजा टाकणार नाही. कारण या शहरातील लोक हा बोजा सहन करु शकणार नाहीत, त्याखाली ते मरतील. यासाठी आपण या शहरातील नागरीकांना नविन आयुष्य दिले आहे. आज शहरवासी जो श्वास घेत आहेत व यासाठी तुम्ही त्यांना जी संधी दिली आहे, यासाठी मी आपणांस सलाम करतो. मी ही गोष्टही या सभागृहासमोर पुन्हा आणू इच्छितो की, ......................................*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, एक विनंती करीन की, आता अर्थसंकल्पावरती जी चर्चा चालू आहे, तर प्रत्येक सदस्याने ५ ते १० मिनिटे चर्चा करावी व प्रत्येक सदस्याने एकाच वेळी बोलावे.*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> सभागृहनेता हे सभागृहात आमचे वरीष्ठ असल्याने आम्ही त्यांचे म्हणणे मानतो, सभागृहाचे नेते असल्याने त्यांचे म्हणणे ऐकावे लागेल. त्यामुळे मी अर्थसंकल्पावर जास्त बोलणार नाही. मला आदेश झाले आहेत, मी एकवार पुनश्च या सभागृहात ............*

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> आपल्या भाषणातून आम्हांला पूर्ण माहिती मिळाली नसल्याने आपण कृपया बोलत रहावे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u> उर्वरीत माहिती आमचे सदस्य आपणांस देतील. मी माझे अर्थसंकल्पावरील भाषण आवरते घेत असून मी आकडेवारीत जावू इच्छित नाही. अर्थसंकल्पात जी आकडेवारीत दर्शाविली आहे, त्यात मी खोलात जावू इच्छित नाही. आपले केंद्रामध्ये जे लोकशाही आघाडीचे सरकार आहे, या सरकारची नेहमी एक सवय राहिली आहे की, ते लोकसभेत एकदा अर्थसंकल्प सादर करतात, त्यात आकडेवारी सादर करतात व पुन्हा २० दिवसानंतर सांगतात की आम्ही करवाढ मागे घेत आहोत. त्यांनी जे धोरण अवलंबिले आहे, ते धोरण आमची उल्हासनगर महानगरपालिका अवलंबणार नाही. हा एक चूकीचा पायंडा आहे. दुर्देवाने केंद्र सरकार तसे करीत आहे. मला असे म्हणतांना फार खेद होत आहे. यामुळे मी आकडेवारीत जावू इच्छित नाही. रुपये १८४ कोटीचा महापालिकेचा जो अर्थसंकल्प आहे, आज या सभागृहात आला आहे. स्थायी समिती सभापतींनी जे अंदाजपत्रक सादर केले आहे, व ज्या वास्तविकतेने त्यांनी हा अर्थसंकल्प सादर केला आहे. सर्वसामान्य जनतेची नाडी ओळखून त्यांनी ओळखले आहे की, जनतेला काय हवे आहे? आपले शहर कोठे जात आहे? नागरीकांना काय हवे आहे? त्यांना प्रगती देखील हवी आहे. तसेच त्यांना नविन कर देखील नको. त्यांनी या अर्थसंकल्पात समतोल राखलेला आहे. यासाठी मी आमचे सत्ताधारी पक्षाचे जे सदस्य आहेत, ते तर या अर्थसंकल्पाच्या बाजूने आहेतच, परंतु मला असे वाटते की, आमचे विरोधी पक्षातील सदस्य जे माझ्या उजव्या बाजूस बसले आहेत, त्यांनी देखील यास समर्थन दयावे. या अर्थसंकल्पास सर्व संमतीने पारीत केल्यास त्यांची उंचीही वाढेल. सर्वसामान्य जनतेला वाटेल की, आज विरोधी पक्षात जे सदस्य बसलेले आहेत ते शहराचा विचार करीत आहेत. व ज्या प्रकारे सत्ताधारी पक्षाने हा अर्थसंकल्प सादर केला आहे, त्यांना पूर्ण पाठिंबा देवून एक नविन पायंडा पाडावा. श्री. बोडारे, श्री. चौधरी, श्री. बच्चाराम, श्री. लाल पंजाबी, श्री. जमनु पुरस्वानी, श्री. राज असरोंडकर, यांना निवेदन करेन की, हा जो अर्थसंकल्प सादर केला आहे, हा सर्वसंमतीने पारीत करावा व असे करुन नविन सुरुवात करावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> मा. महापौरजी, उप-महापौरजी, आयुक्तजी, सचिवजी, स्थायी समिती सभापती, नगरसेवक बंधु-भगिनी, मी सुरुवात एका छोटया गोष्टीपासून करतो. एकदा लक्ष्मीदेवता व शनीदेवता एकमेकांना भेटले तेव्हा त्यांच्यात आपसामध्ये चर्चा झाली की, आपल्यामध्ये श्रेष्ठ कोण? तेव्हा त्यांचे आपसात भांडण झाले. त्यानंतर दोघे नारदमुनींकडे गेले व त्यांना विचारले की, आमच्यात श्रेष्ठ कोण आहे? तेव्हा नारदमुनींनी सल्ला दिला, ते फार हुशार होते त्यांनी त्यांना सांगितले तुम्ही उल्हासनगरमध्ये जा, तेथे बरेच व्यापारी आहेत ते आपल्याला यावर तोडगा सुचवू शकतात. तेच आपल्याला सांगतील आपल्या दोघांमध्ये श्रेष्ठ कोण आहे. तेव्हा ते दोघे उल्हासनगरमध्ये येवून एका व्यापा-याकडे गेले. त्यांनी व्यापा-याला तोच प्रश्न केला की, आम्हां दोघांमध्ये श्रेष्ठ कोण आहे? उल्हासनगरचा व्यापारीही हुशार होता. त्याने सांगितले की, आपण दोघे देवता आहात, कृपया थोडे दूर जावे. मी आपल्याला चांगल्याप्रकारे पाहून त्यानंतर सांगतो. समोर एक झाड आहे, आपण तेथपर्यंत जावे, व तेथून परत फिरावे त्यानंतर मी आपणांस सांगतो. लक्ष्मीजी व शनीजी दोघे गेले व जेव्हा परत आले, तेव्हा त्यांनी विचारले की, तुम्हांला काय चांगले वाटले? तेव्हा त्या व्यापा-याने सांगितले की, लक्ष्मीदेवता जेव्हा आपण येत होतात तेव्हा चांगले दिसत होत्त्या. तसेच शनीदेवता जेव्हा जात होते, तेव्हा चांगले दिसत होते. येथे तीच परिस्थिती आहे की, जेव्हा नव्या वर्षाचे अंदाजपत्रक येते, तेव्हा ते फार चांगले वाटते व जेव्हा वर्ष पूर्ण होते तेव्हा शनीदेवतेप्रमाणे ते जातांना चांगले वाटते. मी आता सुरुवात करतो, आपले जे येणा-या वर्षाचे अंदाजपत्रक आहे ते किती चांगले आहे व वर्ष संपल्यावर काय होते

त्याची माहिती मी आता आपणांस देतो. मी मागील चार वर्षाची आकडेवारी आपणांस देतो, जास्त लांब जात नाही. सन २०००-०१ यावर्षी आपण अंदाजपत्रक बनविले होते रुपये १३३. २५ कोटीचे त्यानंतर वर्ष संपत आले, सुधारीत अंदाजपत्रक आले. १३३ कोटीचा अर्थसंकल्प ९७ कोटींवर आला. व जेव्हा प्रत्यक्ष अंदाज आले त्यामध्ये रुपये ८२ कोटी आले. प्रस्तावित उत्पन्न होते रुपये १३३ कोटीचे परंतु प्रत्यक्षात फक्त रुपये ८२ कोटी प्राप्त झाले. त्यानंतर आले दुसरे वर्ष, सन २००१-०२ प्रस्तावित अर्थसंकल्प होता १७३. ३३ कोटी. येथे श्री. हरेश ईदनानी बसलेले आहेत ते आकडेवारी तपासून पाहू शकतात. पुन्हा फेब्रुवारी मध्ये सुधारीत अंदाजपत्रक आले, त्यानंतर ते घटून रुपये ९३. ८४ कोटी एवढे झाले. त्यानंतर प्रत्यक्ष अंदाजपत्रक आले. त्यामध्ये ७९. ३६ कोटी एवढे प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले. सुमारे ५४ टक्के एवढी तूट निर्माण झाली. पुन्हा तिसरे वर्ष सन २००२-०३ मध्ये १५७. ८४ कोटी एवढे उत्पन्न दर्शविण्यात आले. सुधारीत अंदाजपत्रक आले आजच्याप्रमाणे. त्यामध्ये रुपये ११८.९२ कोटी एवढे उत्पन्न दर्शविण्यात आले. त्यानंतर प्रत्यक्ष अंदाजपत्रक आले. त्याच्यात प्रत्यक्ष उत्पन्नामध्ये अजून घट झाली. रुपये ९३. ३९ कोटी एवढी आकडेवारी दर्शविण्यात आली. आता चौथे वर्ष जे पूर्ण व्हायचे आहे, त्यामध्ये आपण रुपये १७८ कोटींची अंदाजीत रक्कम दर्शविली होती, सुधारीत अंदाजपत्रक आणले आहे, त्यामध्ये रुपये ११६ कोटी दर्शविले आहेत, परंतु प्रत्यक्षात किती होईल ते चार महिन्यानंतर कळेल. मी आपल्याला सर्व आकडेवारी दाखवितो त्यामध्ये हीच परिस्थिती आहे. करांची वसूली, आपण किती दाखविता, भाषणात किती बोलता. पाणीपटटी वसूली याचेही २०००-०१ यावर्षी आपण दाखविले की, रुपये ३५ कोटी एवढी वसूली करु. सुधारीत अंदाजपत्रकात रुपये ३५ कोटी यावरुन रक्कम कमी होवून रुपये ८ कोटी एवढी झाली. व प्रत्यक्ष वसूली झाली रुपये ६ कोटी. त्यानंतर सन २००१-०२ पाण्याची वसूली दाखविली गेली. प्रस्तावित वसूली ४२. ४५ कोटी एवढी वसूली दाखविली आहे. सुधारीत अर्थसंकल्पात रुपये १०. ५० कोटी एवढी दर्शविण्यात आली. चार महिन्यानंतर प्रत्यक्ष वसूली कमी होवून रुपये १०. २५ कोटी एवढी झाली. त्यानंतर सन २००२-०३ यावर्षी आम्ही पाणीपटटीद्वारे रुपये ४३ कोटी एवढी वसूली करु असे सांगण्यात आले. सुधारीत अर्थसंकल्प कमी झाला. ४३ कोटी वरुन रुपये १६ कोटी एवढी रक्कम कमी झाली. व जेव्हा अंतिम वसूलीची आकडेवारी आली, ती फक्त १३. ४६ कोटी एवढी आली. हीच परिस्थिती प्रत्येक ठिकाणी आहे. मी आपल्याला सर्व आकडे दाखवू शकतो. मी तक्ता बनवून आणलेला आहे. कर वसूलीमध्ये देखील हीच परिस्थिती आहे. सन २००१ मध्ये एकूण वसूली रुपये ३५. २७ कोटी, सुधारीत रक्कम सांगत नाही, त्यामध्ये वेळ जाईल. नंतर प्रत्यक्ष वसूली रुपये ३५ कोटींवरुन रुपये ८. ८० कोटी एवढी झाली. सन २००१-०२ मध्ये अंदाजपत्रक सादर करतांना रुपये ३६ कोटी अशी आकडेवारी सांगण्यात येते. परंतु प्रत्यक्षात वसूली होते रुपये ११ कोटी , तिस-या वर्षी देखील हीच परिस्थिती आकडे सांगितले जातात रुपये ४० कोटी. परंतु प्रत्यक्षात वसूली होते रुपये १९ कोटी, हीच परिस्थिती आहे, अंदाजपत्रकाची. यावर्षी परत सांगतात की, घरपटटी पासून रुपये ५६ कोटी एवढी वसूली होईल. देव करो, काय होईल ते, येणारी वेळच सांगेल. अशीच परिस्थिती सर्वसाधारण करांचीही आहे. आपण जे देखील मुददे उचलाल, मोठे आकडे, मोठे नाव, व लक्षण खोटे. वर्ष गेले, मूददा गेला, काम पूर्ण झाले. ही तर वसूलीची गोष्ट आहे. खर्च, प्रशासनावर काही नियंत्रण नाही. सामान्य प्रशासन विभागावर असलेला खर्च पाहिल्यास दिसून येईल की, तो वाढतच आहे. एका काळात तो रुपये १७ कोटी होता, दुस-यावर्षी रुपये २१ कोटी एवढा झाला. तिस-या वर्षी रुपये २३ कोटी एवढा झाला. येत्यावर्षात तो खर्च वाढून २००३-०४ साठी रुपये ३१. ६७ कोटी एवढा दर्शविलेला आहे. अशाप्रकारे दिवसेंदिवस आपला खर्च वाढत राहणार आहे. आपण बघतो खर्च वाढतच आहे, अपेक्षित उत्पन्न, आकडे सांगतात, परंतु तेवढी वसूली आपल्याकडुन होत नाही. आपण वसूली पाहिल्यास दिसून येईल की, वसूली कमी आहे. काहीवेळा मी जेव्हा वसूलीची टक्केवारी पाहतो, पाणीपटटी दर्शवितात, घरपटटी

दर्शवितात, तर काही वेळा माझ्या मनात प्रश्न निर्माण होतो की, ही जी आकडेवारी सादर केली जाते, ती फुगवून दर्शविलेली आहे, खोटी आहे की, किंवा आमचे जे आयुक्त आहेत, ते अकार्यक्षम आहेत. दोघांमधील एक बाब खरी असेल. एकतर आमची आकडेवारी बरोबर नसेल अथवा आमचे आयुक्त, प्रशासन व्यवस्थित काम करत नसेल. याचे उत्तर आम्हांला आज येथे हवे आहे. खरी गोष्ट काय आहे? जी आकडेवारी आपण सादर करता ती चुकीची सादर करुन आपण अंदाजपत्रक आमच्यासमोर आणता. अथवा आमचे प्रशासन हे अकार्यक्षम आहे. दोघांमधील खरी गोष्ट काय आहे? या ज्या गोष्टी आहेत, आपली वसूली कमी येते, अंदाजपत्रकाच्या वेळी आम्हांला मोठ्या-मोठ्या गोष्टी सांगितल्या जातात, तर जेव्हा वर्ष पूर्ण होत येते, आपण कधी विचार केला आहे का की आपण एवढा मोठा अर्थसंकल्प बनवितो, परंतु शहरातील जी विकासाची कामे आहेत, त्याची टक्केवारी, योगदान काय आहे ? जर आपण सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे पाहिली तर यावरील भांडवली खर्च आपणांस सांगतो, काम किती मोठे दाखविले जाते, ते देखील प्रत्यक्षात छोटे असते. परंतु शेवटी ते काम किती कमी होते? सार्वजनिक बांधकाम विभागासाठी आपण जेवढया कामांचा विचार केला होता, २०००-०१ सालामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे भांडवली खर्च असलेले काम, शहराच्या विकासाची कामे त्यामध्ये आपण रुपये २२. ५० कोटी एवढा खर्च अपेक्षिला होता. परंतु वर्षात काम झाले फक्त रुपये १२. ४१ कोटीचे. २००१-०२ सालामध्ये प्रस्तावित केलेली आकडेवारी देखील कमी आहे. यावर्षात विकास कामांसाठी रूपये ३०. १२ कोटी एवढी तरतुद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात रू. ९. १२ कोटींचे काम झाले. तीच स्थिती २००२-२००३मध्ये पण आहे. आम्ही रू. ३२. ७१ कोटींची कामे करण्याचा विचार केला होता परंतु प्रत्यक्षात रू. ११. ९१ कोटींची कामे वर्षा अखेरीस झाली. २००३-२००४ सालात आम्ही रू. २७. ६० कोटी एवढा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांसाठी ठेवला होता. तो सुधारित अंदाजपत्रकात घटुन रू. १५. ७३ कोटी एवढा झाला. म्हणजे याचा जो परिणाम होतो तो शहरातील विकास कामांवर होतो. विकासाची कामे कमी होतात. आपण या वर्षाचे अंदाजपत्रक पाहिल्यास जरी ते प्रस्तावित असले तरी आपण पाहु शकतो की, आपण अर्थसंकल्पाच्या फक्त ९ टक्के एवढी रक्कम शहरातील विकास कामांवर खर्च करित आहोत. उर्वरीत रक्कम पगार, सामान्य प्रशासन विभाग यावर खर्च होत आहे. यापुर्वी अर्थसंकल्पात १५ टक्के एवढी दाखविली होती परंतु ती देखिल कमी आहे. परंतु आपला विकास कामांवर फक्त ९-१० टक्के एवढा खर्च होत आहे. ही शहरासाठी चांगली गोष्ट नाही. शहरातील विकासासाठी आपण जास्तीत जास्त निधीची तरतुद करायला हवी. परंतु असे होत नाही. हा अर्थसंकल्प शहराच्या विकासासाठी नसुन, पुरोगामी नसुन प्रतिगामी आहे. मी अजुन एका मुददयावर येतो. अंदाजपत्रक प्रस्तुत करताना बरीचशी आश्वासने दिली जातात. येत्त्या वर्षात आम्ही हे काम करू, ते काम करू. मी आपणांस काही उदाहरणे देवू इच्छितो. आपण या सभेमध्ये शहराच्या प्रती काही आश्वासने दिली होती परंतु ती कामे आपण पुर्ण करू शकला नाही. मी आपल्याला एक यादीच देतो. जसे श्री. हरदास माखिजा साहेब बोलत होते. जसे त्यांनी सांगितले की, मागच्या अर्थसंकल्पात त्यांनी करवाढ केलेली नाही. अर्थसंकल्पात जरी आपण करवाढ केली नसली तरी आयुक्तांच्या माध्यमातुन, आपल्याला कदाचित माहिती नसेल, माझ्याकडे आयुक्तांचे एक पत्र आहे. त्याच्या माध्यमातुन आपण मालमत्ता करात वाढ केलेली आहे. ते आपण सांगितले नाही, आपल्याला माहिती नाही. मी आपल्याला सांगतो ते ७ जुलैचे पत्र आहे. अशा प्रकारे कर वाढविण्यात आलेले आहेत. जरी तुम्ही सांगत आहात की नवीन मालमत्तावर करवाढ केलेली नाही. परंतु यामध्ये शहरात कोणी घराची दुरूस्ती केली, त्याचे क्षेत्र वाढल्यास त्यावरही नविन करवाढ लागु होणार आहे. हे कदाचित श्री. हरदास माखिजा यांना माहिती नसेल ही मागच्या दरवाज्याने आपण लोकांनीच करवाढ केलेली आहे. आपल्याला माहिती नाही म्हणुन आपण ते सांगितले नाही. आपण सांगितले होते की, आम्ही करवाढ करणार नाही परंतु आपल्याकडुन ते होवू शकले नाही. काहीवेळा आजतक या वाहिनीवर कार्यक्रम येतो "काम हो न सका" तर

आपली जी आश्वासने आहेत त्यांचे देखिल मी या धर्तीवर उदाहरणे देतो. आपण आश्वासन दिले होते करवाढ न करण्याचे परंतु ते काम होवु शकले नाही. दुसरे असे की आपण दोन वर्षापुर्वी अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळेस सांगितले होते, सहा रस्त्यांचा उल्लेख केला होता. वर्ष पुर्ण झाले परंतु त्या सहा रस्त्यांचे काम पुर्ण होवू शकले नाही. त्यानंतर पुन्हा पुढील वर्षी आपण सहा रस्ते अधिक चौदा रस्ते अशा प्रकारे वीस रस्त्यांची यादी बनविली की यावर्षी आम्ही २० रस्त्यांचे काम पुर्ण करू परंत त्या २० रस्त्यांचे काम पुर्ण होवू शकले नाही. १९९९ मध्ये मी थोडे मागे जातो, आधीच बोलायला हवे होते. १९९९ मध्ये आपण आयआरडीपी. चा प्रकल्प जाहिर केला, ३४ रस्त्यांचा व त्याची किंमत त्यावेळेला रू. २९१८ लक्ष ऐवढी दर्शविण्यात आली होती. ती आता ४३०० लक्ष ऐवढी झालेली आहे. परंतु अद्याप तो टप्पा क्र. १ पुर्ण होवू शकलेला नाही. आपण मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात अजुन एक गोष्ट सांगितली होती की आम्ही धुरळायंत्र खरेदी करू त्यासाठी रू. १५ लाखांची तरतुद करण्यात आली होती. आम्ही शहरात हिवतापाची साथ येवु नये म्हणुन मशिन खरेदी करू असे सांगितले परंतु हे काम देखिल होवु शकले नाही. आपण मागील वर्षी अजुन एक आश्वासन दिले होते की आम्ही भुयारी गटार साफ करण्यासाठी रू. २५ लाख खर्च करून एक जेट मशिन खरेदी करू. परंतु हे काम देखिल होवु शकले नाही. आपण अजुन एक आश्वासन दिले होते की, आम्ही बोटक्लबचे खाजगीकरण करू ते का केले नाही? परंतु ते काम देखिल होवू शकले नाही. आपण अजुन एक आश्वासन दिले होते की शहरात उल्हासनगर व विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकाच्या बाहेर आम्ही पार्कींगची व्यवस्था करू. परंतु हे काम देखिल होवु शकले नाही. आपण आम्हा सर्वांना येथे आश्वासन दिले होते, एक ठराव पारीत केला होता की, उल्हासनगर शहरातील लोकांसाठी चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यात यावा, एक वरून तीन करण्यात यावा. त्यावेळी सांगण्यात आले की, आजच्या आज पास करा. मुख्यमंत्री महोदयांशी बोलणी झालेली आहे, श्री. लाला साहेबांशी बोलणी झालेली आहे. परंतु दोन वर्ष झालीत हे देखिल काम अदयाप झालेले नाही. आपण एक अजुन आश्वासन दिले होते की शहरातील ३१.३.२०००पर्यंतची जी अनाधिकृत बांधकामे आहेत, आपण ठराव पास करा आम्ही श्री. लाला साहेबांशी बोललेलो आहोत, मुख्यमंत्री महोदयांशी बोललेलो आहोत. त्यांचा फोन आला आहे तुम्ही ठराव आजच्या आज पास करा तीन दिवसात काम होईल. पंरतु अद्याप पर्यंत अनाधिकृत बांधकामे नियमित करण्याचे काम झालेले नाही. मी आपल्याला थोडेच उदाहरण देत आहे. ब-याच गोष्टी सांगु शकतो परंतु वेळ कमी आहे. फक्त वीस मिनिटे बोलायचे आहे जास्त बोलु शकत नाही. आयुक्त साहेब, जसे श्री. हरदास माखिजा यांनी सांगितले की, रोम शहर एका दिवसात तयार झाले नाही. रोम शहर कधी बनले याची तर मला माहिती नाही परंतु आपल्या ठाणे जिल्हयात ठाणे शहर हे चार ते पाच वर्षापुर्वीच सुधारले आहे. यापुर्वी ठाणे कसे होते? उल्हासनगर पेक्षाही खराब होते. ठाणे शहर हे चार ते पाच वर्षात सुधारले आहे हे आपण लक्षात ठेवा. आयुक्त साहेब मी आपले देखिल एक वक्तव्य वाचले. अर्थसंकल्प वाचत असताना एक वाक्य पाहिले मला ते चांगले वाटले. आपण लिहिले आहे की, लोकशाही ही तेव्हा चालते जेव्हा लोक बोलतात व त्याप्रमाणे शासन कार्यवाही करते. आपण सल्ला दिला होता तो सत्ताधारी पक्षासाठी होता की सर्वांसाठी होता ते माहित नाही. त्याचा अर्थ असा आहे की, लोकशाही म्हणजे जेथे व्यक्तीने बोलावे व शासन, प्रशासनाच्या वतीने म्हणजेच ज्यामध्ये शासनाने ऐकावे व प्रशासनाने त्याप्रमाणे काम करावे. परंतु मी आज सत्ताधारी पक्ष, आयुक्त व सर्व उपस्थितांना विचारू इच्छितो की, या परिस्थितीत आम्ही काय करावे? जेव्हा सत्ताधारी पक्ष म्हणजेच शासन जेव्हा बहिरे आहे व प्रशासन आंधळे आहे. अशावेळी आम्ही काय करावे? हे आम्हाला आपण सांगावे.

**मा.उपमहापौर श्रीमती. जया साधवानी व मा. सदस्य श्री. मोहन साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>महापौर महोदया, मी काही बाबींवर प्रकाश टाकु इच्छितो. सर्व प्रथम हा जो अर्थसंकल्प प्रस्तुत केला आहे. तो शहराच्या हिताचा व

शहरातील सर्वसामान्य जनतेच्या आवडीचा असा अर्थसंकल्प आहे. मी शासन व प्रशासनाचे येथे सर्व शहरवासियांच्या तर्फे अभिनंदन करतो. आताच आमचे मित्र श्री. लाल पंजाबी साहेबांनी एक लहानशी कथा ऐकवली की लक्ष्मी व शनी महाराज जेव्हा येतात जातात तेव्हा चांगले कोण आहे? हा प्रश्न उल्हासनगर शहराच्या व्यापा-याला विचारला तर असाच एक प्रश्न महापालिकेच्या निवडणुकीत सर्व सामान्य जनतेला राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आर.पी. आय ने विचारला की आम्ही आपणांस चांगले शासन देवू शकतो, आपणांस आम्ही चांगले वाटतो की भारतीय जनता पार्टी, शिवसेना या पक्षाचे लोक चांगले वाटतात? तर त्यांनी देखिल सांगितले की आपण एक फेरा मारून यावा. जेव्हा दोघे फेरा पुर्ण करून आले तेव्हा त्यांनी सांगितले की दोघेही उत्तम आहेत, अति उत्तम आहेत. परंतु त्यांच्यात फरक ऐवढाच आहे की, शासन पक्षात एन.सी.पी., कॉंग्रेस व आर.पी. आय. चांगले आहेत व विरोधी पक्षात भारतीय जनता पार्टी व शिवसेना हे पक्ष चांगले आहेत. आपला हा जो विरोध आहे. तो विरोधी पक्ष म्हणुन खुप चांगल्या प्रकारे आकडेवारी सादर करून विरोध प्रस्तुत केला आहे. मी आपल्या या भावनांची कदर करतो कारण जेव्हा जेव्हा विरोधी पक्ष जागृत असतो तेव्हा तेव्हा सत्ताधारी पक्ष अजुन चांगले उल्लेखनिय काम करतो. व यासाठी आमच्या कडुन जे उल्लेखनिय कामे होत आहेत त्यामध्ये निश्चितच जर आपले सहकार्य नसते, आपण जागृकता दाखविली नसती तर कदाचित आम्ही देखिल झोपलो असतो. महोदय, उल्हासनगर शहरात हा जो अर्थसंकल्प सादर केला आहे तो कोणतीही करवाढ न करता या शहरासाठी लागोपाठ चार वर्षांसाठी एक वरदान ठरत आहे. कारण हा अर्थसंकल्प जसे आमचे श्री. माखिजा साहेब यांनी सांगितले की ,आमचे सरकार हे राष्ट्रीय आघाडी सरकारा प्रमाणे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर प्रत्येक महिन्याला १२ ते १५ वेळा पेट्रोल व केरोसिनचे भाव वाढवत नाही. बारा महीने आम्ही सर्व सामान्य जनतेकडे लक्ष दिले आहे. कोणत्त्याही प्रकारे करवाढ करण्यात आलेली नाही. व उल्हासनगर शहरातील सर्व सामान्य जनता विश्वासाने म्हणते की, आजही जर हे शहर सुरक्षित आहे तर राष्ट्रवादी कॉंगेस पक्ष, कॉंग्रेस व आर.पी. आय. या पक्षांच्या मजबुत हातांमध्ये हे शहर सुरक्षित आहे. या ओजस्वी अर्थसंकल्पाकरिता भाभी श्रीमती. ज्योती कालानी, महापौर मालती करोतीया, उपमहापौर श्रीमती. जया साधवानी, सभागृह नेता श्री. किशोर वनवारी व आमचे सत्ता पक्षाचे सर्व गटनेते व त्या अधिका-यांना मी धन्यवाद देतो ज्यांनी अर्थसंकल्पाकरिता पुर्ण सहकार्य दिले आहे. मला असे कळले की, स्थायी समितीच्या बैठकीत जेव्हा या अंदाजपत्रकावर चर्चा चालु होती. तेव्हा विरोधी पक्षांनी सांगितले की, आम्हाला विरोध करायचा आहे. जेव्हा त्यांना विचारले गेले की, आपला विरोध कशासाठी आहे? कारण काय आहे? तेव्हा त्यांनी सांगितले की, नाही आम्ही तर विरोधीच आहोत आम्हाला विरोधच करायचा आहे. ते कोणतेही कारण देवू शकले नाही. जर एखादे कारण सांगितले असते तर त्यावर चर्चा होवू शकली असती. आम्ही कोणत्त्याही प्रकारे करवाढ केलेली नाही. हे आज या शहरातील जनता जिने ऐकले होते की, ६० कोटीच्या आसपास करवाढ होवू शकते. त्यांचा श्वास थांबला होता. त्या जनतेला आता दिलासा मिळाला आहे. हा दिलासा श्रीमती. ज्योती कलानी यांनी दिला आहे. ज्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा देखिल आहेत. व स्थायी समितीच्या सभापती देखिल आहेत. त्यांनी पुर्ण शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्त्व करताना जे आश्वासन दिले होते की, या शहरात आम्ही कोणत्त्याही प्रकारे करवाढ होवू देणार नाही व शहराचा चौमुखी विकास करू. त्यांचे आश्वासन त्यांनी पुर्ण करून दाखविले आहे. महोदय, या शहराच्या विकासाची गोष्ट काही ५० वर्ष जुनी नाही. १९८६च्या वेळेस जेव्हा या शहराची सुत्रे आमदार श्री. पप्पु कलानी यांनी घेतली. या शहरातील जनता हे चांगल्या प्रकारे ओळखते की, या शहरातील विकासाचे आधुनिक शिल्पकार श्री. पप्पु कलानी हे आहेत. व आजही आमचा सत्ता पक्ष जर कोणाच्या ओजस्वी नेतृत्त्वाखाली चालत असेल तर ते श्री. पप्पु कलानी यांचे नेतृत्त्व आहे व सदोदित विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. महोदय, या अर्थसंकल्पाला शहराच्या हिताचे मानुन विरोधी आहेत म्हणुन फक्त विरोध न करता जर यामध्ये काही सुधारणा असतील तर त्या सांगु शकतात परंतु कोणत्त्याही प्रकारे

करवाढ केलेली नाही. व नक्कीच शहराच्या सर्व बाजुस विकास कार्य वेगाने होत आहेत. जे विकास कार्य पुर्णपणे ठप्प होते. काही वर्षा पुर्वी जेव्हा येथे शिवसेना, भाजपा युतीचे राज्य होते. तेव्हा विकास कार्य ऐवढया वेगाने चालु नव्हते. ज्या एक दोन रस्त्यांचे काम सुरू केले होते. त्या रस्त्यांची अवस्था काय आहे हे पुर्ण शहराने पाहिले. याकरिता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, कॉंग्रेस व आर.पी. आय. च्या युतीचे हे जे शासन आहे ते आपले आश्वासन पुर्ण करीत आहे व यासाठी पुन्हा एकदा मी माझ्या पक्षाच्या तर्फे श्रीमती. ज्योती कलानी यांना या उल्लेखनिय अर्थसंकल्पाबद्दल अतिशय अंतःकरणापासुन धन्यवाद देतो. व म्हणतो भाभी ज्योती कलानी जिंदाबाद.

यावेळी प्रभारी आयुक्त श्री. आर.के. सोनवणे हे सभागृहाच्या बाहेर गेल्याने त्यांच्या जागी शहर अभियंता श्री. मोहन चिजवानी हे आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>आमचे शहर अभियंता श्री. मोहन चिजवानी हे या महिन्यात सेवा निवृत्त होत आहेत. २७ फेब्रुवारीला त्यापुर्वी त्यांना आयुक्तांच्या खुर्चीवर बसण्याचा बहुमान देण्यात आलेला आहे. यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो. तसेच आमचे आयुक्त श्री. सोनवणे साहेब यांनाही धन्यवाद देतो ज्यांनी त्यांना आयुक्तांच्या खुर्चीवर बसवुन त्यांचा बहुमान केला आहे. श्री. चिजवानी साहेब अभिनंदन!

मा. सदस्या श्रीमती. अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः-</u>मा. महापौरजी ,आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ असणारे श्री. चिजवानी साहेब, मा. स्थायी समिती सभापती भाभी श्रीमती. ज्योती कलानी, मा. सचिव व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य. आज श्रीमती. ज्योती कलानी यांना लागोपाठ चौथ्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या अर्थसंकल्पामधील एक बाब माझ्या मनाला स्पर्श करून गेली की ज्यामुळे प्रशंसा व्यक्त केल्याशिवाय राहु शकत नाही. यामध्ये उल्हासनगर स्टेशन जवळील नाल्याच्या कामाचा जो प्रस्ताव दिलेला आहे. ज्याबाबतीत या सभागृहात अनेक वेळा सांगितले गेले आहे मी सुध्दा ब-याच कालावधीपासुन पत्रव्यवहार केला आहे व त्या कार्यास या अर्थसंकल्पाच्या द्वारे अंतिम स्वरूप दिले जात आहे. ज्यासाठी अर्थसंकल्पात एक कोटी रूपयांची तरतुद केलेली आहे. त्यासाठी भाभी श्रीमती. ज्योती कलानी, आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्यांचे विशेष करून अभिनंदन करतो. हे काम झाल्यानंतर उल्हासनगर शहराच्या विकास कार्यातील एक नविन पर्व लोकांना दिसु लागेल. व लोकांना असे दिसुन येईल की उल्हासनगरमध्ये चांगल्या प्रकारची विकास कामे होत आहेत. मी पुन्हा एकदा भाभी ज्योती कलानी यांचे अभिनंदन करतो. माझ्या प्रभागात नविन रस्ते तयार करण्याबाबत या अर्थसंकल्पात जी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आणखी दोन रस्ते मी समाविष्ट करू इच्छित होतो. या अगोदर सुध्दा मी सांगितले होते की तीन नंबर ओटी ते उल्हासनगर स्टेशनचा व पिंटो पार्क, जेथे २४ तास मोठ्या प्रमाणावर रहदारी आहे. ते दोन रस्ते सुध्दा यामध्ये समाविष्ट केले असते तर कदाचित यास एक नविन दिशा मिळाली असती तरी सुध्दा हा जो अर्थसंकल्प आहे, कोणतीही करवाढ न करता जो अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याबद्दल भाभी श्रीमती. ज्योती कलानी यांचे हार्दिक अभिनंदन करतो. धन्यवाद.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे पुन्हा सभागृहात आले व आपल्या आसनावर आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब...

<u>मा. महापौरः-</u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा यांनी श्री. चिजवानी साहेबांबाबत जे सांगितले की, ते येत्या २७ तारखेस सेवा निवृत्त होत आहेत तर सर्व सन्माननिय

सदस्यांनी आपल्या स्वखुशीने त्यांचा सत्कार समारंभ ठेवावा व मोठया धुमधडाक्याने त्यांच्या या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पाडावा.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, स्थायी समितीच्या सभापती महोदया व सभागृहातील सर्व सदस्य आता आताच आमचे सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी स्थायी समिती सभेचा जो उल्लेख केला की आम्हास हा अर्थसंकल्प चांगला वाटतो परंतु आम्हाला पक्षादेश असल्यामुळे त्यास विरोध करावयाचा आहे. ही गोष्ट पुर्णपणे खोटी आहे. हे मी येथे सभागृहास सांगु इच्छितो. त्याच्या कारणाची नोंद इतिवृत्तांतात सुध्दा आलेली आहे. त्या मुददयाबाबत कोणता आक्षेप घेतला होता. परिस्थिती अशी होती की अर्थसंकल्पाची प्रत स्थायी समितीतील विरोधी पक्षाच्या आम्हा सदस्यांना ब-याच उशिरा दिली गेली. बजेटची प्रत वाचण्यासाठी आम्हा सदस्यांना पुरेसा वेळ दिला गेला नाही. विषय हा होता की त्यामध्ये ज्या काही त्रुटी होत्त्या, कमी वेळामध्ये आम्ही त्या शोधुन काढल्या होत्त्या. जसे की अर्थसंकल्पामध्ये कोणत्त्याही प्रकारची करवाढ होवू दयायची नाही. जसे आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की मागच्या दरवाज्याने कशी करवाढ केली त्याची प्रचिती त्यांनी आपल्या भाषणामध्ये सुध्दा दिली. मी आयुक्तांना व महापौरांना निवेदन करू इच्छितो की, मा. श्री. लाल पंजाबी यांनी जी आकडेवारी सांगितली की प्रस्तुत अर्थसंकल्प कसा असतो व प्रत्यक्ष अर्थसंकल्प कसा असतो. त्यामध्ये काय अंतर आहे? हाच फरक आम्हास तेथे सुध्दा आढळुन येत होता त्यासाठी आम्ही तेथे विरोध केला आहे. हे मी सभागृहास सांगु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौरजी ,मा. आयुक्त साहेब, मा. स्थायी समिती सभापती, सचिव साहेब, उपस्थित असलेले सर्व सन्माननिय सदस्य, आज या संपुर्ण शहराचा अर्थसंकल्प जो प्रस्तुत केलेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी असतील किंवा नसतीलही परंतु हा जो १८४ कोटी रूपयांचा अर्थसंकल्प स्थायी समिती सभापतींनी महासभेला सादर केला आहे. मला वाटते ब-याच अंशी त्यास वास्तविकवादी अर्थसंकल्प म्हणता येईल. एक म्हण आहे "माणुस किती चालला याला महत्त्व नाही परंतु तो नेमके कुठल्या दिशेने चालला याला जास्त महत्त्व आहे." परीवर्तनाची दिशा आपल्या या शहराला आयुक्तांच्या रूपाने जी मिळाली होती. त्या दृष्टीकोनातुन जर विचार केला तर गेल्या दोन वर्षामध्ये आपल्या शहराचा कायापालट करण्याचा प्रयत्न आयुक्त साहेबांनी वेगवेगळया पध्दतीने केला. चौमुखी विकास करण्याचा प्रयत्न केला. आणि आताचा जो अर्थसंकल्प आहे तो अर्थसंकल्प आणि त्यांच्या कामाचा असलेला वेग किंवा त्यांची क्षमता यामध्ये जर काही त्रुटी असतील तर त्या कमी करण्याचा प्रयत्न शासन आणि प्रशासन या दोन्ही व्यक्तींनी केला पाहिजे असे मला वाटते. हा अर्थसंकल्प सादर करित असताना आम्ही जे रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधी आहोत, जे आम्ही झोपडपटटीधारकांचे प्रतिनिधी आहोत. तर हे जे प्रतिनिधी अर्थसंकल्प वाचतात किंवा चाळतात. तेव्हा एक विचार करतात एक म्हण आहे " जो पाहु शकत नाही स्वप्न, जो दाखवु शकत नाही स्वप्न, तो कधीच बनु शकत नाही क्रांतिकारक" याचा उल्लेख यासाठी इथे केला आहे. कारण आम्ही जे स्वप्न बघतो, आम्ही स्वप्न झोपडपटटीवासियांसाठी बघतो. गोरगरीब, दलित, पिडीत जनतेसाठी बघतो. त्यांना सोयी सुविधा कशा मिळतील याच्यासाठी बघतो. त्यांना नागरी सुविधा कशा मिळतील याच्यासाठी बघतो. सामाजिक सुरक्षा कशी मिळेल याच्यासाठी बघतो. आणि हा अर्थसंकल्प बघत असताना एक थोडीशी जी त्रुटी जाणवली त्यामध्ये आमच्या या संपुर्ण झोपडपटटीवासियांवर थोडासा अन्याय झाल्यासारखा वाटतो. झोपडपटटीवासियांचा असणारा निधी जो मागच्या वेळेस होता. दिवाबत्तीसाठी असणारा निधी, जो मागच्या वेळेस होता. तो निधी आणि त्यावेळेस झालेली कामे ही जी अर्थसंकल्पात तरतुद केली होती त्यातुन किती कामे झाली, आणि आता नेमकी तुम्ही अर्थसंकल्पात किती तरतुद केली आणि आता नेमकी किती कामे होणार आहेत हे जर तुम्ही नेमके जर तपासले तर झोपडपटटीवासियांवर या अर्थसंकल्पामध्ये अन्याय झाल्यासारखा वाटतो. दुसरी गोष्ट जो महापौर निधी,

उपमहापौर निधी, स्थायी समिती सभापतींचा जो निधी आहे हा जो निधी आहे तो तुम्ही विभागला आहे. येणा-या कालावधीत ही पदे बदलतील. आमचे ते म्हणणे नाही. पदावर कुठला व्यक्ती आहे याला महत्त्व नाही. परंतु ज्या पदासाठी तो निधी आरक्षित केला आहे. तो निधी त्या पदावरील व्यक्तीला मिळाला पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. त्या दृष्टीकोनातुन हा जो निधी आहे तो सुरवातीपासुन पहिल्या सारखा जसा आहे तसा सर्वांना असावा. स्थायी समिती सभापती, उपमहापौर आणि महापौर यांचा जो निधी तुम्ही विभागला आहे. ५० टक्के वापरा आणि ५० टक्के नंतरच्यांना वापरू दया ही एक चुकीची पध्दत आहे असे मला वाटते. नाला सफाई बददलचा जो प्रश्न आहे. नाला सफाई करण्यासाठी जी तरतुद केली आहे. ती तरतुद जर तुम्ही बघितली तर तुम्ही संपुर्ण शहरातील मोठया नाल्यांची जी सफाई करायला पाहिजे त्याच्यासाठी पाहिजे तेवढी तरतुद केलेली नाही. एक स्टेशन जवळचा नाला फक्त तेवढेच एक तुम्ही गृहीत धरून अर्थसंकल्पात तरतुद केली असेल तर ते चुकीचे आहे. त्याच्या जागी एक उदाहरण देतो मी माझ्या प्रभागातील भारत नगर येथील समता नगर १ पासुन रेल्वे लाईन पर्यंत एक फार मोठा नाला आहे त्याची पण सफाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात कुठे आहे तरतुद? तर यासाठी अर्थसंकल्पात तरतुद व्हावी असे मला वाटते. अर्थसंकल्प हा निश्चितच चांगला आहे. प्रशासन त्याची अंमलबजावणी करेल ऐवढी मी अपेक्षा ठेवुन स्थायी समिती सभापती यांचे मी आभार मानतो आणि दोन शब्द संपवितो धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौर महोदया, स्थायी समिती सभापती महोदया व सर्व सन्माननिय सदस्य जेथ पर्यंत आमचे माजी महापौर श्री. हरदास माखिजा म्हणत होते. ते ऐवढे चांगले भाषण करत होते. मला असे वाटते की कदाचित ते शहरात कमी वेळ राहतात. त्यांनी म्हंटले की शहरात ऐवढी विकास कामे झाली आहेत. मी त्यांना सांगु इच्छितो की, आपण कार मधुन उतरून जर स्कुटर वरून फिरलात तर आपणास शहराची सर्व स्थिती माहित पडेल. कॅम्प नं. १ पासुन ५ नंबर पर्यंत, आपण जर मातीत गेला नाहीत तर एक तर मी शहर सोडेन किंवा आपण शहर सोडा, दुसरी गोष्ट अशी की आपण म्हणता जे लोक शहर सोडुन बाहेर जातात ते का जातात?कारण की या शहरामध्ये एवढी काही दुर्गंधी आहे. दुप्पट पैसे देवूनही आम्ही दुर्गंधीत रहात आहोत. या घाणेरडया शहरात राहु नये म्हणुन लोक बाहेर जातात. आपण जे म्हणता की, जकातीमुळे व्यापारी शहर सोडुन जातात हे पुर्णपणे चुकीचे आहे. कारण की आपणच मागच्या वर्षी आपणच व्यापा-यांना सांगितले होते की आम्ही कोणतीही करवाढ करणार नाही. आपल्या कार्यालयात असा निर्णय झाला होता की नविन वर्षामध्ये जकात कर वाढविणार नाही. जकात वसुलीचे खाजगीकरण करणार नाही. आपण लोक दिलेली आश्वासने विसरून जाता. पाण्याची ऐवढी मोठी समस्या आहे. आपण जेथे राहता त्या इमारतीत अजुनही टॅंकरने पाणी पुरविले जाते. काय हे आपले विकास कार्य दर्शवते? आपण म्हणता की, आम्ही या शहरात फार मोठी विकास कामे केली आहेत हे शहर सुंदर बनविले आहे. शहरामध्ये जे हायमास्टचे दिवे लागलेले आहेत. त्याचे आम्ही काय करावे? शहरामध्ये पिण्याचे पाणी नाही, शहरामध्ये दुर्गंधी आहे. सफेद कपडे घालुन आपण जर स्कुटर वरून गेलात तर पुर्णपणे काळे व्हाल. मला असे वाटते की, खरोखरच आपण उल्हासनगर मधील स्थिती पाहु इच्छित असाल तर आपण कार मधुन उतरून आमच्या बरोबर स्कुटर वर चला. आपणांस दाखवुन देवू शकतो की आपण किती विकास कामे केली आहेत? मागच्या महिन्यामध्ये आयुक्त साहेबांचे एक निवेदन ऐकले होते की, ३३ रस्त्यांमधील ३० रस्त्यांची कामे पुर्ण झाली आहेत. ३३ रस्त्यांचे काम आमचे माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांच्या कार्यकालावधीमध्ये सुरू झाले होते. जे एका वर्षात पुर्ण करायचे होते त्यास आता ४ थे वर्ष सुरू झाले आहे. त्यातील फक्त ३० रस्त्यांची कामे आता पर्यंत पुर्ण झाली आहेत. हे जे ३० रस्ते आपण म्हणता मला वाटते ते सुध्दा चुकीचे आहे. तरी मी आयुक्तांचे निवेदन मान्य करतो की त्यांनी ३० रस्त्यांचे काम ४ वर्षामध्ये पुर्ण केले आहे. ३३ रस्ते अद्याप पुर्ण झाले नाहीत. या रस्त्यांमध्ये आणखी २० रस्ते आपण

समाविष्ट केले व यावर्षी आम्ही ४० रस्ते पुर्ण करू. अग्निशमन विभागाची जेथ पर्यंत गोष्ट आहे. याच सभागृहामध्ये आमच्या श्री. बोडारे साहेबांनी एक प्रश्न विचारला होता की नेताजी चौक येथील जी अग्निशमन विभागाची इमारत आहे ती आपण कधी पुर्ण करणार? एक वर्ष झाले तरी अद्याप अग्निशमन विभागाची ती इमारत पुर्ण झाली नाही. अग्निशमन विभागासाठी जी मशिन यावयाची होती ती अदयाप पर्यंत आलेली नाही. ड्रेनेजसाठी जी गाडी येणार होती ती अदयाप पर्यंत आलेली नाही. आपण या कामी फक्त तरतुद दर्शविता व मोठमोठी राजकीय भाषणे करता. आम्ही हे केले आम्ही ते केले. १९८६ पासुन आम्ही हे केले. श्री. हरदास माखिजाजी आपण लोकांना जर विचारले तर आपणांस माहित पडेल की लोक किती दुःखी आहेत. प्रत्त्येक इमारतीमधुन तक्रार येते की पाणी नाही. टॅंकर द्वारे पाणी पुरविले जाते. नळाव्दारे पाणी पुरविले जात नाही. लोकांना सांगता की आपण पैसे भरा परंतु पाण्याची ज्यांना खात्री देत नाहीत. सत्ताधारी पक्षाचे हे काम आहे. ज्या पक्षाची आपण प्रशंसा करत आहात. दुःख या गोष्टीचे आहे की, आपणांसारखा एक वरीष्ठ व्यक्ती नगरसेवक अर्थसंकल्प न वाचता सभागृहात येतो. आपण एक संदर्भ दिलात की, मी अर्थसंकल्प तर वाचुन आलेलो नाही. परंतु टाईम्स ऑफ इंडीयामध्ये मी हे वाचले की आपण म्हणता की हा अर्थसंकल्प चांगला आहे. मागील वेळेस सुध्दा आपण असेच म्हंटला होतात. आपण जर सभागृहात येत असाल तर आपण अर्थसंकल्पावर अभ्यास करून या. याशिवाय सुवर्ण जयंती योजनेतील कामे तीन वर्षापासुन होत नाहीत. त्यांचे अनुदान येते परंतु महानगरपालिकेत त्याबाबतचे काम होत नाही त्यासाठी जबाबदार कोण? आंबेडकर योजना जी चालु झाली आहे. ज्यानुसार झोपडपट्टीमध्ये वेगवेगळया सुविधा दयावयाच्या आहेत त्याबाबत अदयाप पर्यंत कार्यवाही होत नाही त्यास जबाबदार कोण? ऐवढे जे अनुदान येते त्याचा वापर केला जात नाही. त्यास जबाबदार कोण? तर आयुक्तांना माझी अशी विनंती आहे की आपण मागच्या दरवाज्यातुन जी करवाढ केली आहे. कारण की, आमच्या श्री. हरदास माखिजा साहेबांना सुध्दा हे माहित नव्हते की करामध्ये वाढ झाली आहे कींवा नाही नंतर म्हणतात की मला तर माहित होते आम्ही असे भाषण केले तर कुणीही कर भरणार नाही. २००३-२००४मध्ये आपण जर पाहिले तर जे वेगवेगळे कर आहेत. त्याबाबत जुलैमध्ये एक परिपत्रक निघाले आहे. परंतु ते अदयाप कुणालाही माहित नाही. तर माझी आपणांस विनंती आहे की, वाजवी कर आकारला जावा. आपण जी आश्वासने देता कमीत कमी त्यांची पुर्तता करा. फक्त राजकीय भाषणे आपण जर केलीत तर आमचे जेवढे काही सदस्य आहे ते यास विरोध करतील. सभागृहाची वेळ नाहक फुकट जाईल. मी सर्वांना असे निवेदन करतो की, जो कोणी बोलेल त्यांनी वस्तुस्थितीदर्शक बोलावे. जे सत्त्य आहे तेच बोलावे. बाकी वाढवुन बोलले तर ते बरोबर नाही. अशाने सभागृहाची वेळ नाहक फुकट जाईल. जयहिंद.

<u>मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानीः-</u>मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, स्थायी समिती सभापती महोदया व मा. आयुक्त साहेब, जे जलकुंभ तयार होत आहेत. व अदयाप पर्यंत ठेकेदारांनी ते विहित मुदतीत पुर्ण केले नाहीत त्यांच्याकडुन दंडात्मक रक्कम व्याजासहित वसुल केली पाहिजे. व आपल्या येथे मलप्रवाह कर घेतला जातो. परंतु मलप्रवाह जोडणीचे शुल्क घेतले जात नाही. ते मलप्रवाह जोडणीचे शुल्क आपण घेवू शकतो.व आपले उत्त्पन्न वाढवु शकतो. व दुसरे माझे एक निवेदन आहे आयुक्त साहेबांना की अर्थसंकल्पात वेगवेगळया निधींची तरतुद केली जाते. परंतु काही ठिकाणी नगरसेवकांचा ४ लाखांचा निधी मंजुर केला जातो. कुणाचा ४० लाखाचा निधी मंजुर केला जातो. ऐवढी असमानता केली जाऊ नये. समान धोरण अवलंबिले जावे. असे माझे निवेदन आहे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, स्थायी समिती सभापती महोदया व आयुक्त साहेब, आज अर्थसंकल्पाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात आलेली आहे. आताच थोडया वेळेपुर्वी भाजपाचे नगरसेवक मा. श्री. लाल

पंजाबी साहेबांनी अर्थसंकल्पाच्या वास्तविकतेची एवढी पोल खोलल्यानंतर आणि त्याची दरवर्षी अखेरीस होणारी हालत हे सर्व सभागृहामध्ये सर्वांच्या निर्दशनास आणुन सुध्दा सत्ताधारी पक्ष आपली पाठ दोन्ही हातांनी थोपटुन घेतात आणि असेच जर सतत पाच वर्ष अर्थसंकल्प मांडण्यांत आले तर उदया विरोधी पक्ष सत्ताधारी होवू शकतात आणि सत्ताधारी पक्षांना विरोधी पक्षात बसण्याची वेळ येईल. जास्त हुरळुन जायचे काही कारण नाही. मा. पंजाबी साहेबांनी "जो हो न सका" यावर सर्व वास्तविकतेचे दर्शन सर्वांना घडविले आहे. तसेच आज उल्हासनगरच्या जिव्हाळयाचा प्रश्न हा पाणी प्रश्न सर्व नगरसेवकांच्या प्रभागात भेडसावत आहे. जेथे जेथे नळाव्दारे पाण्याची कमतरता वाटते. नळाव्दारे पाणी मिळत नाही. टॅंकर द्वारे पाणी पुरवठा केला जातो. प्रशासनाने प्रत्येक टॅंकरला काही आकारी दर लावावा. असा प्रस्ताव मांडण्यात आलेला होता. या अगोदर अनेक महासभांमध्ये चर्चा झालेली आहे. आणि टॅंकर कुणाला आणि कुठे देण्यात यावा याविषयी सर्व्हे करण्यांत यावा याविषयी महासभेत मी अनेकवेळा सांगितले होते. त्याचा योग्य असा सर्व्हे आज पर्यंत झालेला नाही असे मला वाटते. तरी तो योग्य सर्व्हे झाला आणि ज्यांना टॅंकर व्दारे पाण्याची अतिशय आवश्यकता आहे त्यांनाच ते टॅंकर जर देण्यात आले तर टॅंकरव्दारे पाणी पुरवठयावर होणारा खर्च हा अतिशय कमी होवू शकतो. कारण ज्यांना आवश्यकता नाही असे पण लोक टॅंकरची मागणी करून पाणी घेतात तरी समजा टॅंकरसाठी शुल्क आकारण्याचे ठरविण्यात आले तर सोसायटयांना पाणी पुरवठा केल्या नंतर त्यांना शुल्क आकारले जावु शकते. परंतु ज्या बैठया वस्त्या व झोपडपटटया आहेत त्यांना टॅंकर द्वारे पाणी पुरविल्यानंतर शुल्क कोणाकडुन वसुल करणार? याचा पण विचार करणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट जकात दरामध्ये जी वाढ प्रस्तावित केली होती, दरवर्षी जकात दरामध्ये वाढ ही चालूच आहे. आणि यावर्षी ज्या वस्तुंवर जकात कराची वाढ सुचविण्यांत आलेली होती, तर त्याच्यामध्ये बहूतेक वस्तु हया रोजच्या वापरातील लोकांच्या असून त्यांच्यावर करवाढ करणे योग्य होणार नाही. आणि दुसरी गोष्ट मालमत्ता करामध्ये दरवर्षी येणारी तूट हे श्री. लाल पंजाबी साहेबांनी सांगितलेलेच आहे. किती-किती, कोण-कोणत्त्या वर्षी तूट आलेली आहे, ते तर त्यांनी सांगितलेलेच आहे. पण मागच्यावर्षी ७० कोटीच्या ऐवजी २१ कोटीवर आणण्याची महापालिकेवर पाळी आली. तर त्याचे कारण असे वाटते की, मालमत्ता कराची जेव्हा बिले पाठविली जातात, काही वेळेस ती बिले अयोग्य असतात, बहूतेक मालमत्ताधारकांना डबल-डबल व तीन-तीनपट, तीन-तीन वेळा बिले पाठविली जातात. समजा माझे नाव विश्वनाथ गौतम पाटील आहे, श्री. विश्वनाथ गौतम पाटील यांच्या नावावर एकदा, श्री. व्ही. जी. पाटील यांच्या नावावर एकदा अशी दोन-दोन , तीन-तीन बिले एकेकाला आल्याची खूप उदाहरणे आहेत. दुसरी गोष्ट त्याच्यामध्ये अवास्तव मालमत्ता कराची मागणी त्याच्यामुळे सुध्दा काही मालमत्ताधारक ती बिले भरण्यासाठी पूढे येत नाहीत. हे एक प्रमुख कारण असले पाहिजे. असे मला वाटते. तर अशीच नेहमी तूट येत गेली तर वर्षाच्या शेवटी अर्थसंकल्पात खर्चाचा अंदाज लावण्यासाठी होत असलेली प्रशासनाची धावपळ व खर्चाचा मेळ घालण्यासाठी फुगविण्यात आलेल्या उत्त्पन्नाचे अंदाज याचा मेळ घालण्यासाठी वर्षभर कसरत करुनही अंदाजाचे आकडे बदलण्याची नामुष्की प्रशासक व प्रशासनावर येणार आहे. तरी मोठ-मोठया गोष्टी व स्वतःची पाठ थोपटून घेवून उत्त्पन्न वाढणार नाही, खिशयातील रक्कमेचा योग्य अंदाज लावून खर्चाचे भान ठेवणे प्रशासन व प्रशासक यांना हितकारक ठरेल. एकूण बजेट उल्हासनगरच्या जनतेच्या डोळयात धूळफेक करणारे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकूर :-</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, माझी एक विनंती आहे की, अर्थसंकल्पामध्ये एका अधिकृत झोपडपटटीमधील विकास आराखडयात अंतर्भुत असलेल्या रस्त्त्याकामी तरतूद केलेली नाही. मी आयुक्त साहेबांना विनंती केली होती तसेच वैयक्तीकपणे त्यांनी पहाणी सुध्दा केली होती की जो रस्ता नागेश्वर मंदिरापासून ओटी चौक, उल्हासनगर-४

*कडे जो रस्ता जातो, या रस्त्याची जी स्थिती आहे ती अतिशय खराब आहे. तेथे धारावी सारखी मोठी झोपडपट्टी आहे. शिवशक्ती कॉलनी, भिमकॉलनी, भिमनगर, महात्मा फुले नगर, इंदिरा नगर, तर या हिशोबाने या झोपडपट्ट्यांकडे दुर्लक्ष न करता, हा जो रस्ता आहे तो कसेही करुन अर्थसंकल्पात समाविष्ट केला जावा. त्यामुळे मी आभारी राहील व दुसरे असे की, काही वर्षापासून ओटी सेक्शन पासून २५ सेक्शन पर्यंत रस्त्याचे काम चालू आहे, त्यात ओटी चौक येथिल सूध्दा निविदेमध्ये बाब होती. ते काम अपूर्ण आहे. ओटी चोक येथे एम-२५० रस्ता तयार केला जावा. तसेच याची चौकशी केली जावी की, तो रस्ता अदयाप का तयार झाला नाही? याबाबत मी आपला आभारी राहिल, धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u> मा. महापौर, आयुक्त, स्थायी समिती सभापती, व सचिव, सर्व सन्माननिय सदस्य, अर्थसंकल्पावर याठिकाणी चर्चा चालू आहे. अर्थसंकल्पाची चिरफाड किंवा त्याचे विश्लेषण श्री. लाल पंजाबी यांनी चांगल्याप्रकारे केले आहे. त्यांनी दाखवून दिले आहे की, वास्तविकतेचे भान न ठेवता अवास्तव असा आकडयाची जुळवाजूळव केलेला अर्थसंकल्प याठिकाणी सादर केलेला आहे. त्यावर चर्चा करायची, भाष्य करायचे म्हणजे निरर्थक आहे. म्हणजे पालथ्या घडयावर पाणी? पालथ्याघडयावर पाणी ओतले तर घडा कधीच भरणार नाही. परंतू लोकप्रतिनिधी असल्यामुळे लोकांच्या भावना याठिकाणी व्यक्त करणे गरजेचे असल्यामुळे म्हणून बोलायचे बाकी काही नाही. गेल्या चार-पाच वर्षापासून आम्ही सतत अर्थसंकल्प मांडतो आहे. चार-पाच वर्षापासून सत्ताधारी पक्ष म्हणून आम्हांला अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळाली म्हणून पाठ थोपटून घ्यायची. परंतू त्याचबरोबर अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आम्ही या शहरासाठी काय देतो आहे? हेही महत्त्वाचे आहे. प्रशासनाने केलेल्या सूचना विरोधी पक्षांने आणलेले प्रस्ताव दिलेले पर्याय याचा विचार करुन जर काम केले, जर अर्थसंकल्प आणला तर विचार करायला डोके लागते. मन आणि डोके असेल जर डोके असेल तर विवेक आणि अविवेक यामधील फरक कळेल, याठिकाणी दोन्ही उपलब्ध नसल्याचा भास होतो आहे, अगदी फक्त आकडयांची जुळवाजुळव करायची. उत्पन्नाचे कसलेही साधन नाही आणि खर्चावर नियंत्रण नाही. अशा पध्दतीचा अर्थसंकल्प आहे. मागच्यावर्षी अर्थसंकल्पावर चर्चा करतांना मी स्वतः, श्री. राज असरोंडकरजी, श्री. लाल पंजाबी, श्री. बच्चाराम रुपचंदानी, व श्री. जमनु पुरस्वानी यांनी वेगवेगळे पर्याय याठिकाणी ठेवले होते. त्यातील कोणत्याही पर्यायाचा शासनाने आणि प्रशासनानेही विचार केला नाही. शासनकर्त्यांकडुन अपेक्षाच नाही. पण प्रशासनाने तरी त्यावर विचार करणे आवश्यक होते. मागच्या वर्षी अर्थसंकल्पावर बोलतांना श्री. जमनु पुरस्वानी यांनी सांगितले होते की, आमचा वास्तविक आकडा किती आहे? आमच्यावर कर्ज किती आहे? प्रत्यक्षात देणे किती आहे? प्रत्यक्षात उत्पन्न किती आहे? हे नमूद करणे गरजेचे होते. परंतु कर्ज वगैरे काही दिलेले नाही. ते देणे आवश्यक होते. कर्ज किती आहे ते. त्यानंतर मी जी एक सूचना केली होती ती खाजगी आणि सरकारी मोकळया जागांवर कलम १४८ च्या (क) या पोटकलमानुसार कर लावावा. त्याचा अंदाज आतापर्यंत प्रशासनाने दिलेला नाही. तसेच लावला किंवा नाही याची माहितीही प्रशासनाने दिलेली नाही, तर तो चालू केला आहे का? त्याची माहिती, कारण मागच्या महासभेत सूध्दा दिलेली नव्हती. तर तो चालू केला किंवा नाही, मागील वर्षी स्थायी समिती सभापतीनी भाषण करतांना सांगितले होते की, अर्थसंकल्प म्हणजे अगोदर नियंत्रण असायचे, नियंत्रणाचे साधन मानले जायचे, आता नियोजनाचे साधन मानले जाते. यावेळेस भाषण करतांना त्यांनी सांगितले की, अर्थसंकल्प म्हणजे शहराची दशा आणि दिशा दर्शविते. आता या ठिकाणी दशा आणि दिशा दोन्ही श्री. लाल पंजाबी यांनी दाखवून दिल्या आहेत दशा काय आहे ती? आणि कुठल्या दिशेने तुमचा अर्थसंकल्प जाणार आहे. दोन्ही दाखवून दिलेले आहे. आम्हीही मागच्या वर्षी तेच सांगितले होते की, नियोजन-नियोजन-नियोजन-नियोजन असले पाहिजे. कुठल्याही गोष्टीला नियोजन असेल तर यश निश्चित आहे. आणि नियोजनच जर चुकीचे असेल तर तिथे*

अपयश हे हमखासच आहे. आणि त्या दृष्टीने अपयशाची प्रचिती चूकीच्या नियोजनाने वाटचाल केल्यामूळे अपयश पदरी पडले आहे. हे आयुक्तांनी मान्य केले आहे. आयुक्तांनी त्यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणामध्ये पान क्र. ९ वर अगदी व्यवस्थित लिहिले आहे की, जर करवाढीचा प्रस्ताव मंजुर केला नाही तर मागील काही वर्षाप्रमाणे यावर्षीचा अर्थसंकल्पही अर्थहीन होईल. म्हणजे आता प्रस्तुत केलेला संकल्प स्थायी समितीने कुठलीही करवाढ न करता मंजुरीसाठी येथे आणला आहे. म्हणजे आयुक्तांचे जे मत आहे की अर्थहिन संकल्प आहे तर ते बरोबर आहे. आणि अशा अर्थहिन संकल्पावर चर्चा करण्यासाठी स्थायी समितीने आणला आहे. आणि कुठलाही प्रस्ताव मंजुर केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे हे आयुक्त व प्रशासनाचे काम आहे. आता आयुक्तांच्या मते हा अर्थहीन अर्थसंकल्प आहे. मागच्या वर्षी याच आयुक्तांना अर्थसंकल्पाबाबत त्याची प्रतिक्रिया विचारली. याच आयुक्तांनी त्यावेळेस जे आता अर्थसंकल्प अर्थहिन होवू नये याची काटेकोरपणे काळजी घेतात. त्या आयुक्तांनी सांगितले की हे काही नाही हे अंदाज असतात. स्थायी समितीमध्ये यांचे हेच उत्तर आमच्या श्रीमती. किरणताई माने यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले की, हे अंदाज आहेत. मग अंदाज चुकीचे आहेत याची तुम्ही अगोदरच काळजी कशाला घेता. तुम्हीच उल्लेख करता अर्थहीन होवू नये. अर्थहीन झाला ना? अर्थ राहिला का? तुमच्या प्रस्तावाला त्यांनी मान्यता दिली नाही. मान्यता दिली असती तर अर्थ आला असता. मान्यता दिली नाही म्हणजे तुमच्या मते तो अर्थहिन झाला. हा अर्थसंकल्प अर्थहिन आहे की अर्थपुर्ण आहे हे ही मला सांगा. तुमच्या म्हणण्याप्रमाणे चला अंदाज. पण अंदाज कसे व्यक्त करायचे असतात. मागील काही वर्षाचे आकडे घ्यायचे असतात आणि पुढील वर्षी आपले अपेक्षित उत्पन्न ऐवढे होईल त्यानुसार खर्च करायचा असतो. अंदाज हे अंदाजपंचे नसावेत. हे अंदाजित असावेत. त्याला मागचा भुतकाळाचा मागोवा घेवून भविष्यात कशी वाटचाल करायची याचे अंदाज बांधायचे असतात. इथे कसालाच विचार नाही, मागचाही विचार नाही, पुढचाही विचार नाही. वारंवार सांगायला आम्हाला दुःख होत आहे की सांगायचे किती, आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी समर्पक त्याचे उत्तर दिले की, प्रशासन आंधळे आहे. प्रशासनकर्ते डोळे असुन आंधळे आहेत. आणि शासनकर्ते कान असुन बहिरे आहेत. आम्ही सांगितलेले ऐकत नाहीत. आणि प्रशासनाला कळते आहे की, अर्थहिन होणार तरीपण ते काही करू शकत नाही. म्हणजे आंधळेच, गांधारी सारखी डोळयावर पट्टी बांधलेली आहे. कारण धृतराष्ट्राला डोळे नव्हते. म्हणजे यांनी डोळे बांधले त्याप्रकारचा याठिकाणी उल्लेख करावा लागतो. अंदाजपत्रक तयार करताना भुतकाळाकडे मागचे बघुन पुढे वाटचाल करायची असते. पण इथे कुठेही त्याचा थोडासाही संबंध दिसत नाही. मागच्या अर्थसंकल्पाच्या वेळी आमच्या विद्वान सभागृह नेत्यांनी सांगितले होते की, बजेट म्हणजेच अर्थसंकल्प आम्ही तयार केलेले आकडे त्याचा अर्थसंकल्प त्याची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. मग आम्ही आकडयांची कितीही जुळवाजुळव करू ते त्यांनी केलेच पाहिजे. हा कुठून करणार? ओझे तितकेच दिले पाहिजे की जे पेलता येईल. नाही तर मराठीत म्हण आहे. गाढव मेले ओझ्याने ते मरणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ते तशाच प्रकारचे आहे कारण अर्थसंकल्पात मुख्य दोन भाग येतात. एक म्हणजे जमा बाजु आणि दुसरी म्हणजे खर्चाची बाब. जमा बाजु वाढविण्यासाठी काही संकल्प केले जातात काही नियोजन केले जाते. आणि आलेल्या उत्पन्नातुन योग्य आणि आवश्यक असाच खर्च करावा, काटकसरीने करावा जेणे करून ज्या नागरिकांना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा देता येतील. त्यासाठी लोकांनी आम्हाला निवडुन दिले आहे. सत्ता दिली आहे. पण त्यासाठी शासनकर्ते आणि प्रशासन यांनी पारदर्शक आणि लोकाभिमुख कारभार करावा. ही एक साधी आणि माफक अपेक्षा असते. याठिकाणी तशी कुठलीही अपेक्षा पुर्ण केली नाही. याठिकाणी मला अगदी ठामपणे आणि विनम्रपणे सांगावेसे वाटते की याठिकाणी फक्त शासन आणि प्रशासन यांची मिलिभगत आहे की, मी मागे सांगितल्यासारखे मी मारल्यासारखे करतो तुम्ही रडल्यासारखे करा. हा शहराच्या हीताचा विचार करून तयार केलेला अर्थसंकल्प नाही. हा राजकीय दृष्टीने फक्त राजकीय फायदा घेवुन आमचे आमदार पप्पु कलानी यांचा उल्लेख याठिकाणी होतो

आहे. आमच्या पप्पु कलानी आमदारांनी हे केले ते केले. हा फक्त राजकीय हेतुच आहे. प्रशासनाने आकडे फुगविले आहेत त्यास काही आधार नाही. आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, मागच्या चार वर्षापुर्वीचे जे आकडे दिले. ११९ कोटीचा सुधारित अर्थसंकल्प होता. प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले ९५ कोटी यावर्षी १६८ कोटीचा अर्थसंकल्प होता. प्रत्यक्ष उत्पन्न किती प्राप्त झाले ते अदयाप कळले नाही. ११६ कोटीच्या खाली आले आहे. तरी आमचे प्रशासन कुठलीही करवाढ न करता उत्पन्नाच्या बाजुने १५७ कोटीचा आकडा देत आहे. आणि हे केले, करवाढ केली तर अर्थपुर्ण होईल आणि करवाढ केली नाही तर अर्थहिन होईल. जाता जाता एक गोष्ट आठवते तेनाली रामणची, राजा विचारतो (''व्हाय दी पिपल डिडंट ग्रीट द किंग'') लोक राजाला शुभेच्छा का देत नाहीत? त्याची कारणे ते देतात की शहर चांगले दिसावे सुशोभित दिसावे. राजा आदेश देतो, प्रधान कामाला लागतो की शहर एकदम सुंदर असले पाहिजे, स्वच्छ असले पाहिजे, एकदम शांतता असली पाहिजे त्यासाठी प्रधान कामाला लागतो. प्रधान सर्व जनतेला एक फर्मान काढतो कुणीही काही बोलायचे नाही. सर्व जण गप्प बसतात आणि काही दिवसानंतर राजाला लहर येते की, चला आपण फिरून येवु या. तेनाली रामणला बरोबर घेतात. तेनाली रामण हा एकच माणुस असतो तो सांगतो की, साहेब हे चुकचे आहे. तुम्ही शहराचा चांगला विचार करता परंतु त्यातुन वाईट होत आहे आणि मग हे दोघे फिरायला जातात तेव्हा पाहतात. एक गरीब लोकांची झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीमध्ये लोकांना खायला नाही. लोक राजाला राम राम सुध्दा करत नाहीत. विचारत सुध्दा नाहीत. राजाला एक आश्चर्य वाटते नेहमी मला राम राम करणारे लोक आज मला पाहुन तोंड का फिरवत आहेत. तेव्हा तेनाली रामण सांगतो साहेब तुमच्या आदेशाप्रमाणे प्रधानजींने लोकांना सांगितले की कुणीही काही गोंधळ करायचा नाही. रस्त्यावर काही केरकचरा फेकायचा नाही. कारण मला स्वच्छ शहर पाहिजे. त्यामुळे लोक काही बोलत नाहीत. जर बोलले तर त्यांना दंड लागेल ५० रू. एका वेळेचा. १०० रू. दुस-या बाबतीतचा असा दंड लागेल म्हणुन लोक काही बोलत नाहीत. नमस्कार सुध्दा करत नाहीत. पुढे गेल्यानंतर गरीबांची वस्ती बघितली. तेथे त्यांनी पाहिले येथे काय चालले आहे.? माझ्या राज्यात लोकांना खायला सुध्दा नाही. काय करणार लोक कर भरून थकले आहेत. त्यांना जेवायला सुध्दा अन्न नाही. अशी परीस्थिती तुम्ही उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये करवाढ केल्यास त्याचा विरोध आम्ही करतोच आमच्या स्थायी समिती सदस्यांनी तो सांगण्याचा प्रयत्न केला परंतु तेथे त्यांची हसवणुक केली. आमचे श्री. दिलीप लालवानी सांगतात की, काय सांगायचे होते त्यांना, त्यांचा करवाढीस विरोध आहे. त्यांनी आधीच सांगितले त्यांना की करवाढीस विरोध करणे हे आमचे काम आहे कारण लोकांना तुम्ही पाहिजे तेवढया सुविधा देत नाहीत. सुविधा दिल्या असत्या तर लोकांनी हसत हसत करवाढीला सुध्दा मान्यता दिली असती. परंतु सुविधा काहीच नाहीत. अशा प्रकारचे हे शासन आणि त्याठिकाणचे एक ताजे उदाहरण म्हणजे श्री. विनोद तलरेजा यांनी तेथे म्हंटलेले आहे की आम्ही करवाढ का होवू देत नाहीत त्यांना लोकांचा विचार नाही. स्थायी समितीचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. ते म्हणतात की यावर्षी निवडणुका आहेत आणि आमचे आमदार पप्पु कलानी यांनी सांगितले आहे. आम्ही एक चांगली बातमी सांगु इच्छितो की आमचे आमदार यांनी ठरविले आहे की, शहरातील जनतेवर कोणताही बोजा न टाकता अर्थसंकल्पात एक रूपयाची सुध्दा करवाढ प्रस्तावित करण्यात आलेली नाही. लवकरच निवडणुका येत असल्या तरी आम्ही काहीही घोषणा केलेली नाही. लवकरच निवडणुका येणार आहेत म्हणजे निवडणुकीवर लक्ष आहे. शहराकडे लक्ष नाही. या राजकीय हेतुने प्रेरीत होवून असा हा अर्थसंकल्प या अगोदर ही आम्ही याबाबत बोललेलो आहोत की, इथे जुळवाजुळव कशी आहे. श्री. विनोद तलरेजा अगोदर आयुक्तांचे अभिनंदन करतात की चांगला अर्थसंकल्प आहे. स्थायी समितीच्या इतिवृत्तांताच्या पृष्ठ क्र. १५ वर याची नोंद आलेली आहे. मी या मुददयावर स्पष्टीकरण करतो की आयुक्तांनी मेहनत घेवून अत्यंत चांगला अर्थसंकल्प तयार केलेला असुन यामध्ये त्यांनी शहराच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविले आहे. असे करून त्यांनी शहराच्या विकासात त्यांचे योगदान दिले आहे. असे

होत तर तुम्ही तुमचा प्रस्ताव मागे का टाकला? १५७ कोटीचे जे उत्त्पन्न होते ते चांगले होते तर तुम्ही स्विकारले का नाही? आयुक्तांच्या सूचना होत्त्या की आम्ही जे प्रस्तावित करीत आहोत ते स्विकारा एक तर करवाढ करा किंवा खर्चात कपात करा. तुम्ही काय केले फक्त आकडे फुगविले. मागच्या वर्षी पाण्याचे उत्त्पन्न फक्त दहा कोटी झाले. ते यावर्षी ४५ कोटीचे दर्शविले आहे. मिळकत कराचे जे उत्त्पन्न होते ३१ कोटी त्याचे ५० कोटी दर्शविले कुठून होणार आहे एवढे उत्त्पन्न? कसे होणार आहे? अशा चुकीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची अपेक्षा सत्त्ताधारी पक्ष आयुक्तांकडुन किंवा त्यांच्या प्रशासनाकडुन करत आहे. आणि आयुक्तही शेवटी काय करणार त्यांना अंमलबजावणी करायचीच आहे. ते काय करणार. यांनी घेतलेल्या निर्णयांचे पालन कसोशिने करण्याचा आटोकाट प्रयत्त्न करीत आहेत. परंतु शेवटी ते ही थकतात हतबल होतात. सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही अशी त्यांची अवस्था आहे असे वाटते. पान नं ५ वर तुम्ही उल्लेख केलेला आहे. हे मी नाही बोलत. पान नं. ५ वर तुम्ही उल्लेख केला आहे की. अंदाज पत्रकात प्रस्तावित केलेल्या उत्त्पन्नाच्या कमी उत्त्पन्न येते हे प्रशासनाचे अपयश आहे. म्हणजे श्री. लाल पंजाबी यांनी जो मुददा उपस्थित केला तो बरोबर आहे. एकतर प्रशासन अकार्यक्षम आहे. तुम्ही चालवता ते अकार्यक्षम प्रशासन आहे. पुढचे उदाहरण तुम्ही दिले आहे की, मालमत्त्ता कर आणि पाणी पट्टी ही वसुलीसाठी खाजगी ठेकेदाराला दया. म्हणजे पुन्हा एकदा कोनार्क इन्फास्ट्रक्चर किंवा मोनार्च इन्फास्ट्रक्चरवाला जसा लोकांच्या डोक्यावर बसुन वसुली करत आहे तसे खाजगी ठेकेदार पाणी पट्टीसाठी, पाणी पट्टी भरली नाही तर लोकांची भांडी उचलायला कमी करणार नाही. त्याची व्यवस्था तुम्ही करत आहात. म्हणजे आमच्या प्रशासनावरील खर्च ३४ कोटी पर्यंत गेलेला आहे. तरी तुम्ही ही अपेक्षा करत आहात की, खाजगी ठेकेदार पाणी पट्टी कर आणि मालमत्त्ता कर वसुलीसाठी नेमावा मग तुमचे प्रशासन काय करणार आहे? जकात वसुली खाजगी, पाणीपट्टी ,मालमत्त्ता कर वसुली खाजगी त्याचाही सत्त्ताधारी अभिमान बाळगतात. तुम्ही जकातीचे खाजगीकरण केले तर आम्ही पाणीपट्टी आणि मालमत्त्ता कराचे खाजगीकरण केले तर काय असे स्थायी समितीमध्ये आमच्या श्री. विनोद तलरेजा यांचे म्हणणे आहे. निर्णय तुम्ही घेत आहात. प्रत्त्येकवेळी करवाढ असेल जसे आमचे विदवान सभागृह नेते म्हणतात की, विरोधी पक्षाला मंजुर असेल तर विरोधी पक्षाला मंजुर असेल तर आम्ही करवाढ करतो. प्रत्त्येक निर्णय काय तुम्ही आम्हाला विचारून घेता का? घनकच-याचा ठेका दिला त्यावेळी आमचा विरोध विचारात घेतला होता? टाऊन हॉलचा ठेका दिला त्यावेळी आमचा विरोध विचारात घेतला होता? विषय समित्त्या स्थापन करू नका, प्रभाग समित्त्या स्थापन केल्या नंतर विषय समित्त्या बरखास्त करा.खर्च कमी होईल, लोकांवर टॅक्स लावण्याची वेळ येणार नाही. ही आमची सुचना होती ती तुम्ही ऐकलीत?ते तुम्ही बहुमताने पारीत करून घेता. आमचे श्री. हरदास माखिजाजी आज काय चुकले होते काही समजले नाही. परंतु श्री. हरदासजी आपण जे म्हंटले ते चुकीचे होते. जेथे श्रेय घ्यायचे तेथे सत्त्ताधारी पक्ष बोटक्लब झाले. हे उद्यान आम्ही विकसित करण्यासाठी दिले. ब्रम्हकुमारीने हे केले, रोटरी क्लबने ते केले त्यास आम्ही विरोध केला आहे का? त्यामध्ये फक्त सत्त्ताधारी पक्षाचे अभिनंदन करतात, आयुक्तांचे अभिनंदन करता, महापौरांचे अभिनंदन करता त्यामध्ये आम्ही पण बरोबर होतो. आम्ही सुध्दा तेवढेच सहकार्य केले होते, कोणत्त्याही चांगल्या प्रस्तावास आम्ही विरोध केला नाही. वारंवार तुम्ही जे म्हणता त्यास मराठीत म्हंटले जाते तुनतुना. हे वाजविण्याचे काम किती वर्ष करणार? की, महापालिका आपण आणलीत, महापालिका आपण आणलीत, महापालिका आपण आणलीत हे किती वेळा बोलणार? महापालिका यासाठी आणली की, जकातीचे जे उत्त्पन्न होते. जे काही लोकांच्या घरात जात होते. ते शहराच्या विकास कामी आले. महापालिकेच्या जकातीचे उत्त्पन्न पाच वर्ष फक्त १५ कोटी, १६ कोटी, १७ कोटी, १८ कोटी, ऐवढेच येत होते. महापालिका झाल्यानंतर जकात वसुलीचे खाजगीकरण झाल्यानंतर कोणतीही करवाढ न करता पहिल्याच वर्षी २५ कोटी ऐवढे उत्त्पन्न झाले होते. म्हणजे बाकीचे दहा कोटी कुठे जात होते? त्याचे उत्त्तर आहे? एकीकडे आपण असे म्हणता की,

विमानाने जाताना हायमास्ट पाहिल्यानंतर लोकांना असे वाटते की, मुंबई आहे की उल्हासनगर आहे. व दुसरीकडे हे म्हणतात की, लोक उल्हासनगर शहर सोडुन जात आहेत. याचा अर्थ काय?एकीकडे म्हणता की, आमच्या कार्यकालावधीमध्ये ऐवढी सुधारणा झाली की लोक मुंबई विसरले. लोकांना सिंगापुर वाटु लागले. व दुसरी कडे ऐवढी दुर्गंधी येते आहे. म्हणुन लोक हिरानंदानी पार्क मध्ये जात आहेत. गोदरेज हिल मध्ये जात आहेत. अंबरनाथमध्ये जी बरीचशी कॉम्प्लेक्स झाली आहे लोकग्राम वगैरे तेथे जात आहेत. त्याची कारणे काय आहेत? ठिक आहे महापालिका आम्ही आणली. लोकांना चांगले लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आम्ही लोकांनी महापालिका आणली होती या अगोदर जे चुकीचे प्रशासन येथे चालु होते. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी आयुक्तांसारखा सक्षम प्राधिकारी येथे बसेल त्यांचे राज्य असेल लोकांच्या तक्रारींची सुनवाई होईल. आपणांस असे वाटते का तसे चालत नाही म्हणुन की आपलेच राज्य चालले आहे लोकांचे चालले नाही. आयुक्त दोन्ही बाजु ऐकुन घेतात. बरोबर की नाही आयुक्त साहेब? नाही त्यांना वाटते की हे चुकीचे चालले आहे. त्यांच्यासारखेच असावे म्हणुन ही महापालिका त्यांना नको होती, नगरपालिका असती तर बरे झाले असते. अजुन पर्यंत जकातीचे उत्पन्न १६ कोटीच राहीले असते. नगरपालिका बरखास्त कुणामुळे झाली होती? त्यावेळेस काय राज्यामध्ये शिवसेना भाजपाचे राज्य होते? तर मग नगरपालिका बरखास्तीचे कारण काय होते? हे मागच्या वेळेस श्री. राज असरोंडकर यांनी विचारले आहे. ते पुन्हा विचारणे उचित वाटत नाही. यावर चर्चा करायची झाली तर बराच वेळ लागेल. आपण याचे उत्तर दयाल, आपल्याकडे सर्व उत्तरे आहेत. आपणांबाबत एकच शब्द पुरेसा आहे. आपण विव्दान आहात हे मी म्हंटलेच आहे. सभागृह नेता आहात यामुळेच आपण पाच वर्षापासुन सभागृह नेता आहात. राष्ट्रवादी कॉंग्रेसवाल्यांनी आपणांस बहाल केलेली पदवी आहे. हे पद नेहमी करता आपल्याकडे राहो. आयुक्त साहेब आता चर्चा झालेली आहे. आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यावर चर्चा करणे म्हणजे पालथ्या घडयावर पाण्यासारखे आहे. भिंतीवर डोके आदळले तर मिळणार काही नाही. डोकेच फुटणार आहे. बोलुन बोलुन आम्ही थकुन जावु परंतु सत्ताधारी पक्षाला त्याचे काही वाटणार नाही. सत्ताधारी पक्ष आणि प्रशासन या दोघांनी मिळुन, कारण तुम्ही आकडे वाढविले आहेत. ते ही पटलेले नाहीत. त्याचा विरोध आमच्या श्रीमती. किरणताई माने यांनी केला होता. इथे त्यांनी स्पष्टपणे म्हंटले आहे की, आयुक्त आणि स्थायी समिती अध्यक्षा यांनी केलेला अंदाजित अर्थसंकल्प हा अंदाजित असल्यामुळे त्यास आमचा विरोध आहे. त्याच्या पलिकडे काय पाहिजे? तुमचे अंदाज बरोबर नाहीत. चुकीचे आहेत. त्याला तुमचा विरोध आहे. संपले. माझ्याकडे स्थायी समितीचे इतिवृत्त आहे त्याच्या पृष्ठ क्र...., आयुक्तांनी व स्थायी समितीने अंदाजित केलेल्या रक्कमेस आमचा विरोध आहे. म्हणजे काय? स्थायी समितीचा उल्लेख केला म्हणुन मी बोलत आहे. नाहीतर बोलण्याची काही आवश्यकता नव्हती. श्री. दिलीप लालवानी म्हणत होते की, स्थायी समितीत त्यांनी कशासाठी विरोध केला हे माहित नव्हते. परंतु स्पष्ट होते स्थायी समिती सभापती व आयुक्त यांनी ज्या रक्कमा प्रस्तावित केल्या आहेत. त्या बरोबर नाहीत. यासाठी आमचा विरोध आहे. व ही वस्तुस्थिती आहे. श्री. लाल पंजाबी यांनी येथे सांगितले आहे. त्यांनी ऐवढया सविस्तरपणे माहिती दिली त्यांनी त्यांना बोलण्याची संधी दिली नाही. आणखी काय बोलले पाहिजे. आयुक्त साहेब, तुम्ही मला एक माहिती दया की, १५७ कोटीचे आपले उत्पन्न तुम्ही अपेक्षित केलेले आहे. कुठून केले कसे केले काही माहिती नाही. परंतु मागच्या वर्षीचे २००२-२००३चे प्रत्यक्ष उत्पन्न ९५ कोटी २० लाख यावर्षी त्यावर नैसर्गिक वाढ गृहीत धरली तरी त्यामध्ये साडे नऊ कोटी वाढ होईल. म्हणजे १०४ कोटी होईल. तुमचे अंदाजानुसार ११६ कोटीचे उत्पन्न आहे. आता सुधारीत अर्थसंकल्पानुसार देय खर्च, प्रशासकीय खर्च ३३ कोटी, पाणी बिल जे आपण एम.आय.डी.सी. ला देतो ते ३३ कोटी ३५ लाख घनकचरा वाहतुकीचे ४ कोटी ४३ लाख प्राथमिक शिक्षण, शिक्षण मंडळाला आपणांस दयायचे आहेत ५ कोटी ११ लाख त्यामध्ये कुठलीही कपात आपणांस करता येणार नाही. असे हे आकडे मी सांगतो आहे. नगरसेवकांचे मानधन ७२ लाख, एक महत्त्वाचा

मुददा याठिकाणी राहिला आहे की, सभागृह नेते, सर्व समित्त्यांचे सभापती, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्षा यांना देण्यात आलेला जो वाहन भत्ता आहे. त्याचा कुठेही उल्लेख अर्थसंकल्पात दिसलेला नाही. यासाठी अर्थसंकल्पात किती तरतुद आहे ती मला आढळुन आली नाही. आहे का काही? किती आहे? त्याचा मला आकडा देण्यात यावा. तो आकडा त्त्याच्यानंतर अनामत व देणगी यापोटी १४ कोटी २० लाख दयायचे आहेत. बरोबर? यानंतर रस्त्त्यांवरील दिवाबत्त्ती, याचे बिल जे येणार आहे ते दोन कोटी ४० लाख, वाहनांचा खर्च जी वाहने आम्ही भाडयाने घेतो त्त्यांचा खर्च आहे २० लाख (सामान्य) आणि पाणी पुरवठा विभागासाठी जी वाहने भाडयाने घेतो त्त्यांनतर पाणी टॅकर भाडे, तुमचे प्रशासन चांगले आहे, शासन चांगले आहे आणि टॅकरवर दरवर्षी वाढ होते. मागच्या वर्षी १ कोटी २३ लाख झाली. यावर्षी तुम्ही दोन कोटी ३७ लाख रूपयांची तरतुद ठेवली आहे. पाणी जर चांगले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या टाक्या चालु झालेल्या आहेत. तर मग २ कोटी ३७ लाख कशासाठी तुम्ही तरतुद करत आहात. दरवर्षी आपले टॅकरचे आकडे फुगत आहेत, वाढत आहेत. श्री. मारवीजा साहेब मागच्या वर्षी टॅकर वरील खर्च १ कोटी २३ लाख होता यावर्षी आपण २ कोटी ३७ लाख प्रस्तावित केला आहात. काय ही प्रगती आहे का? काय ही फार मोठी उपलब्धी आहे? नगरसेवक मानधन ७२ लाख आहे. जल प्रदुषण उपकर हा २६ लाख, बुस्टर मशिनरी चालविणे, ही चालविलीच पाहिजे नाहीतर त्याशिवाय पाणी मिळणार नाही त्याचा खर्च ६५ लाख. पाणी पुरवठा, विद्युत आणि टेलिफोन बिल ९० लाख हे पान नं. ४१ वर आहे. त्यानंतर ड्रेनेज पंप प्लान व देखभाल व दुरूस्ती जी केलीच पाहिजे त्याचा खर्च ८५ लाख आणि ड्रेनेज पंप प्लॅन्ट इमारती विद्युत व टेलिफोन बिल याचा खर्च आहे १६ लाख असा एकुण खर्च झाला ९७ कोटी ५६ लाख हा देय खर्च आहे. त्यांनतर आम्ही वर्षानुवर्ष जे कर्ज घेतलेले आहे ज्याची परतफेड होत नाही असे पाणी पुरवठा योजनेवरील कर्ज परतफेड ११ कोटी ३८ लाख मलनिःस्सारण योजना कर्ज परतफेड ११ कोटी ७५ लाख आणि हुडका व एम.एम.आर.डी.ए. ची कर्ज परतफेड आहे तीन कोटी ७ लाख अशी एकुण आमची यावर्षीची कर्ज परतफेडीची रक्कम आहे या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये २६ कोटी २० लाख. एकुण आमचा जो देय खर्च आहे ज्याच्यामध्ये कुठलीही कपात करता येण्यासारखे नाही. असा खर्च आहे १२३ कोटी ७६ लाख बरोबर? त्यानंतर कर्ज देणी वेगवेगळया ठेकेदारांची मागील मार्च २००४ पर्यंतची तुमची देणी बाकी आहेत. १६ कोटी २४ लाख ऐवढी तुम्ही नमुद केली आहेत. १२३ आणि १६ कोटी २४ लाख म्हणजे साधारणतः १४० कोटी आमचा हा देय खर्च आहे. कुठलाही नविन खर्च न करता १४०कोटी आम्हाला दयावे लागणार आहेत. आमचे उत्त्पन्न, कितीही आम्ही ओढुन ताणुन केले तरी १०० कोटीच्या वर जात नाही. आकडयांची जुळवा जुळव केली तरी काही फरक पडत नाही. कितीही कर वाढविले, वाढवु तर शकत नाही. कारण निवडणुका जवळ आलेल्या आहेत हे त्यांना माहित आहे. फक्त निवडणुका आहेत, उददीष्ठ आहे, उददेश आहे. म्हणुन कर वाढविले नाहीत तर कर वाढविण्यास हे मोकळे आहेत. त्यातल्या त्यात तुम्ही थोडे काम केले ते थोडे बरे आहे. आताच श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की मागच्या दरवाज्यातुन तुम्ही कुठली तरी करवाढ केली. किती केली ती माहित नाही. पण यामध्ये भर पडेल. म्हणजे १४० कोटी खर्च आणि उत्त्पन्न फक्त १०० कोटीच्या आसपास जास्तीत जास्त १०४ कोटी होईल. अशावेळी ३९ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्प कसा काय सादर करता तेच समजत नाही. तुम्ही १५७ कोटी कसे केले त्याची जरा माहिती दिली तर बरे होईल. कृपया लोकांना एक चांगली दिशा देणारा आणि लोकांच्या रहाणीमानाची चांगली दशा, दिशा उंचविणारा अर्थसंकल्प असावा अशी माफक इच्छा तुमच्याकडुन होती ती अपेक्षा तुम्ही पुर्ण करू शकला नाहीत. मागच्या चार वर्षात केली नाही. म्हणुन यावर्षी तुम्ही कराल ही अपेक्षा नव्हती. ऐवढेच याठिकाणी नमुद करून मी आपली रजा घेतो. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती.नीना नाथानी व श्रीमती. अनिता गुप्ता हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

*<u>मा. महापौरः-</u>मी सर्व सदस्यांना सांगु इच्छिते की, या विषयावर जास्त वेळ चर्चा न करता सभेचे काम लवकर संपवावे. कारण की, मला काही कारणास्तव बाहेर जायचे आहे. सेच्युरी रेयॉन येथे कार्यक्रमाला जायचे आहे तरी प्रत्येक सदस्यांनी फक्त पाच-पाच मिनिटे बोलावे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौरजी, सन्माननिय आयुक्त, स्थायी समिती अध्यक्षा, सर्व सन्माननिय सदस्य .....*

*<u>मा. सदस्य श्री. राजेद चौधरीः-</u>सन्माननिय महापौरजी, आताच आपण सांगितले की, मला एका कार्यक्रमासाठी बाहेर जायचे आहे तर सभा स्थगित करा. उदया ठेवा त्यासाठी...*

*<u>मा. महापौरः-</u> सर्व सदस्य अशा प्रकारे तेच तेच बोलत राहिले तर सभा ब-याच वेळेपर्यंत चालेल. म्हणुन प्रत्येक सदस्यांनी पाच पाच मिनिटे बोलावे आता सात वाजले आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>महापौर महोदया, जर आपणांस कार्यक्रमास जायचे आहे तर आपण सभेचे कामकाज स्थगित करून उदया ठेवावे.*

*<u>मा. महापौरः-</u>मला सेंच्युरी रेयॉन येथे कार्यक्रमासाठी जायचे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः'-</u>महापौरांनी सांगण्या अगोदरच मी सांगितले होते की, मेहरबानी करून प्रत्येक सदस्यांनी एकदाच बोलावे, दहा मिनिटे बोलावे व तेच तेच पुन्हा बोलु नये. दुस-याच्या भाषणाची पुनरावृती करू नये. श्री. लाल पंजाबी साहेब जे बोलले तेच श्री. राजेंद चौधरी बोलतात. श्री. राज असरोंडकर सुध्दा तेच बोलतील. म्हणुन कृपा करून पुनरावृत्ती करू नये.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मी अदयाप पर्यंत काही बोललो नाही.*

*<u>मा. महापौरः-</u>प्रत्येक सदस्यांनी बोलण्यासाठी पाच पाच मिनिटाची वेळ घ्यावी.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः'-</u>आपण फक्त हरकती दर्शवा तेच तेच प्रत्येक सदस्यांने पुन्हा पुन्हा बोलु नये.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौर, स्थायी समिती अध्यक्षा, आयुक्त, सन्माननिय सर्व सदस्य, अर्थसंकल्पाबाबत मी जास्त न बोलता. कारण आमचे सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी त्याच बरोबर सन्माननिय श्री. धनंजय बोडारे साहेब यांनी अर्थसंकल्पावर बराच प्रकाश टाकला आहे. परंतु याठिकाणी मी अर्थसंकल्पाला बाजुला सारून बोलु इच्छितो. याठिकाणी वर्षभराचा हा अर्थसंकल्प आल्यानंतर त्या विषयावर बोललेच पाहिजे. जो विषय याठिकाणी येतो त्याच विषयावर बोलले पाहिजे. मा. सभागृह नेता यांची नेहमी तक्रार असते परंतु याठिकाणी आमच्यावर काही आरोप केलेले आहेत. सन्माननिय सदस्य माजी महापौर श्री. हरदास माखिजा साहेब...*
*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौर, काही कारणास्तव बाहेर जात आहेत. मा. स्थायी समिती सभापती श्रीमती. ज्योती कलानी यांना त्यांनी त्यांचे स्थान ग्रहण करण्यास सांगितले आहे. तर याबाबत कुणाची काही हरकत तर नाही ना?*
*<u>काही सदस्यः-</u>कुणाचीही काहीही हरकत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>याठिकाणी मी एक संक्षिप्त गोष्ट सांगेन आपण टिव्ही वर रोज बघत व ऐकत असाल एक अशी जाहीरात येते एक मित्र दुस-या*

मित्राला बोलतो. त्याचा बंगला पाहिल्यानंतर "वाह सुनिल बाबु बहुत बढिया बंगला है" त्यानंतर नविन गाडी घेतल्यानंतर "आपकी नई गाडी बहुत बढीया है" तर असे हे बढीया कुठ पर्यंत येथे बोलत रहायचे? गेल्या वर्षीचा अर्थसंकल्प चांगला आहे यावर्षीचा अर्थसंकल्प आला तोही चांगला आहे. या शहरात अतिक्रमणे होत आहेत ते ही चांगले आहेत. घनकच-यावर लाखो, करोडो रूपये खर्च करूनही कचरा उचलला जात नाही ते पण चांगले आहे. वाह सुनिल बाबु या उल्हासनगरमध्ये काय काय चांगले आहे तेच समजुन येत नाही. याठिकाणी मी ऐवढेच सांगु इच्छितो आमच्यावर आरोप करण्याच्या आगोदर सन्माननिय माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी विचार केला पाहिजे. तोटा आणि नफा याचा विचार करून त्यांनी बोलले पाहिजे. याठिकाणी महानगरपालिका आल्यानंतर व्यापा-यांचे नुकसान झाले. काय मागच्या वर्षाचे विसरलात काय? महापौर महोदया नाहीत याठिकाणी नाहीतर मी त्यांनाच साक्षीदार म्हणुन घेतले असते. अहो, तुमच्या विरोधात महापौर आमच्या बरोबर होत्त्या. ज्यावेळेस जकात कर तुम्ही वाढविलात. व्यापा-यांचे तुम्ही नुकसान केले. खाजगीकरण करून जेव्हा तुम्ही कर वाढविलात. तेव्हा तुमच्या विरोधात उल्हासनगर मधील कित्त्येक व्यापारी संघटना शिवसेना भाजपाच्या बरोबर याठिकाणी आंदोलन करीत होत्त्या. त्या आंदोलनामध्ये सन्माननिय महापौर आमच्या बरोबर भाषणे देत होत्त्या. व म्हणत होत्त्या की मी सभागृहात जात होते तेव्हाच त्यांनी पास, पास, म्हणत विषय पारीत केला होता. तर ते सुध्दा चांगले आहे का? तुमच्या महापौरांना सुध्दा तुम्ही डावलता? सत्ताधारी पक्षातील तुम्ही सर्व सदस्य आहात. उपमहापौर याठिकाणी आहेत. सभागृह नेते आहेत. महापौर येतात तेव्हा जन गन मन हे राष्ट्रगीत होते. त्या राष्ट्रगीताचा अपमान करून जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव तुम्ही पारीत केलात याला जबाबदार कोण? आपण जबाबदार आहात आणि तुम्ही उलट आमच्यावर आरोप लावत आहात. याठिकाणी ऐवढेच मी सांगेन बजेटमध्ये जास्त प्रमाणावर तरतुद कुठे केली आहे ते आमच्या सन्माननिय सदस्यांनी सांगितले आहे. सुवर्ण जयंती मध्ये शहरातील गोरगरीब झोपडपट्टीवासियांचा जो मुददा घेतला आहे त्यावर थोडासा मी प्रकाश टाकु इच्छितो. त्यामध्ये झालेली तरतुद अद्याप पर्यंत अंमलात आणलेली नाही तर ती याठिकाणी अंमलात आणावी. त्याचबरोबर याठिकाणी रस्त्त्यांची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. रस्ता रूंदीकरणाची मी आयुक्त साहेबांना एक छोटेसे उदाहरण देवू इच्छितो की, शिवाजी चौका पासुन उल्हासनगर स्टेशन पर्यंतचा जो रस्ता आपण रूंदीकरणात घेतलेला आहे. तो नक्की किती फुटाचा आहे. कारण की मी परवाच त्याठिकाणाहुन आलेलो आहे. दोन फुट फक्त त्याठिकाणी बांधकामे निष्कासित होत आहेत. या शहरामध्ये मोठ मोठे रस्ते होत आहेत. होत आहेत ना आम्ही ते नक्की कबुल करू. गोर गरीबांच्या झोपडया तोडुन त्याठिकाणी रस्ते तयार केले जातात. शहरामध्ये ज्याठिकाणी वर्दळ व गजबजलेली वाहतुक असते त्याठिकाणी रस्ते तयार केले जात नाही हा आमचा याठिकाणी आरोप आहे. ऐवढेच सांगेन. जयहिंद. जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर</u>:-मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, याठिकाणी २००४ आणि २००५ च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी जेव्हा मी या सभागृहामध्ये आलो तर माझ्या हातामध्ये अर्थसंकल्पाची मागच्या वर्षाची प्रत होती. त्यावेळेस काही सदस्यांनी मला विचारले की, ही तर मागच्या वर्षाची प्रत आहे. यावर्षीची अर्थसंकल्पाची प्रत आणली नाही का? तर मी तो अर्थसंकल्प थोडासा चाळला आणि लक्षात आले की मागच्या वर्षाचा अर्थसंकल्प आणि या वर्षाचा अर्थसंकल्प यात फारसा फरक नाही.आणि त्यामुळे कधी कधी मनामध्ये विचार येतो की, गेल्या वर्षी आपण ज्या अर्थसंकल्पावर बोललो होतो तेच मुददे घेवून या वर्षीच्या अर्थसंकल्पावर बोलायचे का? परंतु काही मुददे समोर आहेत त्यांची उत्त्तरे मिळणे अतिशय आवश्यक आहे. एक मुददा गेले दोन वर्ष मी सतत सभागृहामध्ये उपस्थित केला की म्युनिसिपल अकाऊंट कोड मध्ये अर्थसंकल्प कसा तयार करावा आणि अर्थसंकल्पामध्ये शिर्ष टाकताना त्याबाबत नेमके कोणते निकष लावावे. याचे स्पष्ट निकष आहेत. आणि त्या उल्लेखानुसार एक तर तुमच्या मागील वर्षाच्या उत्त्पन्नाचे

*जे आकडे आहेत त्यामध्ये दहा टक्के वाढ करून जो आलेला आकडा किंवा तुमचे मागील तीन वर्षातील जे उत्पन्न आहे. सरासरी उत्पन्न जे येईल. या दोन्ही पेक्षा जे कमी असेल ते पुढील वर्षासाठी अंदाजित उत्पन्न म्हणुन घेण्यात यावे असा स्पष्टपणे त्यामध्ये निकष आहे. नगरपालिका लेखा संहिताचे (म्युनिसिपल अकाऊंट कोड) जे निकष आहेत ते आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये लागु होतात किंवा नाही. जर लागु होत असतील तर आपण ते का पाळत नाहीत. याचे उत्तर आयुक्त महोदयांकडुन अपेक्षित आहे. याबाबतीत भाषण करताना असे सांगितले जाते की हा अर्थसंकल्प गोरगरीबांसाठी कसा चांगला आहे. काही गोष्टींचे मी मुददाम येथे मुददे लिहुन घेतले की कामे कुठली केली चांगली. त्यामध्ये एक सांगितले की या महापालिकेमध्ये नविन भरती झाली इतक्या इतक्या पदोन्नत्या झाल्या. मला चांगले स्पष्टपणे आठवते की ही भरती मागासवर्गीयांच्या अनुशेषाअंतर्गतची आहे. ही मागासवर्गीयांच्या अनुशेषाबाबतची भरती करावी. यासाठी गेल्या तीन चार वर्षापासुन आमचा पाठपुरावा चालू होता, त्यासाठी आम्हांला उपोषणाला बसाव लागल. आणि त्या उपोषणाला बसल्यानंतर की, मागासवर्गीयांच्या भरतीसाठी हे उपोषणाला बसले म्हणून यांना अनर्ह करण्यात यावे. अशाप्रकारे त्यावेळच्या आयुक्तांकडे आणि उच्च न्यायालयामध्ये कोण-कोण खटाटोपी करत होते, तसेच आयुक्तांना घेराव घालून त्यांच्यावर कोण-कोण दबाव आणत होते. हे काही या शहरामध्ये लपलेले नाही. त्यामुळे अशा भरतींचे निकष घेवून त्यांचे श्रेय घेण्याचे प्रकार हा खरा म्हणजे अस्लाघ्य ही एक कबूली प्रामाणीकपणे स्थायी समितीच्या सभापतींनी या सभागृहामध्ये दिली. आम्ही नविन रस्त्यांची घोषणा मागच्यावर्षी केली होती. त्यातील फक्त आठच रस्ते आम्ही सुरु करु शकलो. बाकीचे झालेले नाहीत. म्हणजे पूर्ण झाले असे जरी म्हटले असते तर आम्हांला थोडाफार तरी आनंद झाला असता. परंतू त्यांनी म्हटले की, आठ रस्ते आम्ही सुरु करु , दुसरे श्रेय त्यांनी घेतले आहे, घनकचरा व्यवस्थापनामध्ये, याबाबतीमध्ये मी जास्त काही सविस्तर पणे येथे बोलणार नाही. कारण की, या विषयावरची आमची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. या प्रकल्पावरती झालेला खर्च हा दामदुप्पट आहे. आणि हा दामदुप्पट खर्च करीत असतांना सार्वजनिक आरोग्य विभाग ज्या ठिकाणी आपल्या आस्थापनेवरती जवळ-जवळ ११ कोटींचा खर्च आहे. त्याच्यामध्येही साडेपाच कोटींची भर पडलेली आहे. जर या प्रकल्पाची आपण तयारी करत असतांना या सफाई कर्मचा-यांच्या यंत्रणेवर आपण जे ११ कोटी रुपये खर्च करीत आहोत, त्याच्याही विनियोग या प्रकल्पामध्ये घेवून हा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला असता, तर ते स्वागतार्हय ठरले असते. ज्यावेळेला हया दामदुप्पट खर्चाचे ओढुन ताणून प्रशासनाकडून आणि सत्ताधा-यांकडुन जेव्हा समर्थन केल गेले, तेव्हा त्याच्यामधील जो संशयाचा भाग आहे तो मात्र ठळकपणे वरती आला. त्याठिकाणी आणखी एक सांगितले गेले की, शिक्षण मंडळामध्ये जे नविन सभापती आले ते फार सफलतेने काम करीत आहेत. आता तुम्हांला काही गोष्टी माहित असतील किंवा माहित नसतील म्हणून सांगतो, त्याठिकाणी कार्यादेश विना जेव्हा शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीची कामे झाली त्याकामाच्या ठेकेदाराच्या बिलाची रक्कम सन्माननिय आयुक्त महोदयांनी स्वत: रोखून धरली आहे. ज्याअर्थी सन्माननिय आयुक्त महोदय एखादया कामाच्या बिलाची रक्कम रोखून धरतात, त्यावेळेस त्या कामामध्ये कोठे ना कोठे अनियमितता असली पाहिजे असे आम्हांला वाटते. यानंतर शिक्षण मंडळाचा स्वतंत्र अर्थसंकल्प चर्चेस येणार आहे. शिक्षण मंडळाचा अर्थसंकल्प वेगळा येणार आहे का की या बरोबरच त्याबाबतही बोलू ?*

***मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया या पुन्हा सभागृहात परत आल्या व आपल्या आसनावर आसनस्थ झाल्या.***

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> आकडेवारी निश्चित करायची आहे, ती निश्चित केल्यानंतर तो स्विकृत केला जाईल. दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा करु शकता.*

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> शिक्षण मंडळाचा अर्थसंकल्पही इथे मांडलेला आहे. त्याच्यामध्ये मी पाहिले की, खर्चाचे नेमके आकडे काय आहेत? जवळ-जवळ साडेचार पाच कोटी रुपये आपणांस शिक्षण मंडळाला दयायचे आहेत. त्यात म्हटले आहे की, गोर-गरीब विद्यार्थ्यांसाठी गणवेश दयायचे आहेत. त्यांनी पण ४० लाखाची तरतूद केली आहे. आपल्या अर्थसंकल्पात सुध्दा गणवेश शालेय साहित्त्यासाठी ४० लाखाची तरतूद आहे. याचाही खुलासा झाला पाहिजे की या ज्या तरतूदी आहेत त्या स्वतंत्रपणे वेगवेगळया आहेत की, एकच आहेत? इकडचा पैसा तिकडे जाणार आहे म्हणून यावर खुलासा झाला पाहिजे. जर का स्वतंत्र तरतूदी असतील तर शिक्षण मंडळाची किंवा महापालिकेतील ४० लाखाची तरतूद कमी केली पाहिजे. त्यांनी खर्च सांगितला आहे की, जे या शहरामध्ये उच्च गुणवत्ता धारक विद्यार्थी आहेत त्यांचा गौरव करायचा आहे. त्यासाठी ३ लाख रुपये खर्च. नविन शाळा बांधायच्या आहेत, शाळा बंद पडत चालल्या आहेत, याठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून शिक्षण मंडळ तुमच्या हातामध्ये आहे. पण या शहरामधील १२ सिंधी भाषिक शाळा एक-एक करत सगळया बंद पडल्या. त्यासाठी तुम्ही कधीही कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना या शाळा जगविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी कधीही केल्या नाहीत. एक-एक सर्व शाळा बंद पडत आहेत, नविन शाळा बांधण्यासाठी शिक्षण मंडळास ४० लाख रुपये हवे आहेत. यावर आपण विचार केला पाहिजे की, दयायचे की, नाही दयाचे, शाळांच्या ईमारतींची देखभाल त्यासाठी ४० लाख रुपये पाहिजेत. सावित्रीबाई फुले ही जी शासनाची योजना आहे, त्या योजनेमधून साहित्त्यखरेदीवर काय खर्च केला, मागच्यावर्षी खर्च शून्य, महात्मा फुले योजनेच्या संदर्भामध्ये सन्माननिय आयुक्त महोदयांनी स्वतः भ्रष्टाचाराचा गुन्हा सेंट्रल पोलिस स्टेशनमध्ये दाखल केला आहे. त्यामुळे महात्त्मा फुले योजनेमध्ये जो भ्रष्टाचार आहे बट्टयाबोळ झाला , त्याला शिक्षण मंडळातील सभापती हे कारणीभूत आहेत हे मी मुददामहून येथे नमूद करतो. कार्यालयीन शाळा आणि फर्निचरसाठी ३० लाख रुपये वेगळे पाहिजेत आणि कार्यालयीन साहित्त्यासाठी १ लाख रुपये वेगळे आणि पुन्हा आकस्मीक खर्च १२ लाखाचा. मला असे वाटते की, शिक्षण मंडळाचा अर्थसंकल्प आपण जेव्हा मंजूर करु. तर तो मंजूर करत असतांनाच शिक्षण मंडळाचा नेमका खर्च काय आहे, शिक्षण मंडळ काय खर्च करणार आहे, आणि आपण शाळांसाठी काय खर्च करणार आहोत, याचा विचार गांभीर्याने या ठिकाणी झाला पाहिजे. याठिकाणी बजेटवर बोलतांना आकडे कसे फुगविले आहेत याच्या बाबतीत काही गोष्टी सांगितल्या आहेत काही गोष्टी आमच्या सदस्यांकडुन सुटलेल्या आहेत. त्या मी निर्दशनास आणु इच्छितो. याठिकाणी नगरपालिका लेखा संहितेमध्ये आणखी एक तरतुद आहे. अर्थसंकल्पाच्या संदर्भामध्ये की एखादा उत्त्पन्नाचा किंवा खर्चाचा आकडा जर मागील वर्षापेक्षा दामदुप्पटीने वाढला असेल तर त्याच्या बाजुच्या रकान्यामध्ये त्याच्या वाढीचे किंवा त्याच्या घटीचे कारण देणे फार आवश्यक आहे. अशा प्रकारचे कुठलेही कारण, आयुक्त महोदय आपणांसाठी आहे. अर्थसंकल्पामध्ये कुठल्याही खर्चामध्ये वा उत्त्पन्नामध्ये दाम दुप्पट वाढ झाली असेल तर त्या वाढीचे किंवा घटीचे कारण इथे बाजुच्या रकान्यामध्ये देण्याचे आवश्यक होते. असे कुठेही दिलेले नाही. पण तरीही मालमत्ता करामध्ये मागच्या वेळेस १४ कोटी रूपये उत्त्पन्न तुम्हाला अपेक्षीत होते. तुम्ही यावेळेला २९ कोटीचा अंदाज वर्तविला. स्थायी समितीने तो ३४ कोटीवर नेला. गेल्या वेळेस आपण बघितले की, महापालिकेच्या मालमत्तेच्या विनियोगातुन येणारे उत्त्पन्न त्यामध्ये ३ कोटीची तरतुद केली होती. उत्त्पन्न शुन्य रू. आले. आणि तुम्ही पुन्हा नविन वर्षामध्ये ३ कोटी रू चे उत्त्पन्न येथे दाखविले आहे. महापालिकेच्या इमारतीपासुन मिळणारे उत्त्पन्न गेल्या वेळेला आपण ६० हजाराची तरतुद दर्शविली होती. त्यामधुन आपणांस शुन्य उत्त्पन्न मिळालेले आहे. आणि पुन्हा या वर्षामध्ये २ कोटी ७६ लाखाची तरतुद आपण केली. ती कुठल्या आधारावर महापालिकेच्या कोणत्त्या इमारतीपासुन कसे २ कोटी आणि ७६ लाख रू. उत्त्पन्न मिळणार आहे. याचा खुलासा आयुक्त महोदयांनी या सभागृहामध्ये करणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन व विकास समिती (डी.पी. डी.सी) चे जे अनुदान आहे मला वाटते. जिल्हा नियोजन व विकास समिती (डी.पी.

डी.सी.) म्हणजे आमदार निधीच असावा. याच्यामध्ये गेल्या वेळेस मंजूर होते ७५ लाख यामधील प्रत्यक्ष खर्च ४६ लाखाचा झालेला आहे. मग तुम्ही सुधारीत अर्थसंकल्पात शेवटच्या चार महिन्यामध्ये ३ कोटी ६३ लाख अशी त्याठिकाणी तेथे उत्पन्न दाखविले आहे तर ते ३ कोटी ६३ लाख कुठून येणार आहेत. याचा खुलासा झाला पाहिजे. गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेमध्ये मागील वर्षी आपण ३ कोटींची तरतुद केली होती. प्रत्यक्षात फक्त ६९ लाख ऐवढेच आपल्या पदरात पडले. तरीही येणा-या ४ महिन्यामध्ये तुम्ही ३ कोटी ४४ लाखाची तरतुद केलेली आहे. आणि पुन्हा नविन वर्षामध्ये अडीच कोटींची तरतुद केली आहे. दलित वस्ती सुधारणा योजनेमध्ये आपण २ कोटींची तरतुद करून ठेवली होती. परंतु त्याच्यामध्ये एक दमडी सुध्दा मिळवु शकलो नाही. नवीन वर्षामध्ये आपण एक कोटीची तरतुद करून ठेवली आहे. आणि याठिकाणी आणखी एक नवीन तरतुद या अर्थसंकल्पामध्ये आली आहे. ती मला वाटते कदाचित शासनाच्या आदेशामुळे तुम्हाला बंधनकारक असेल अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना यावर तुम्ही ४० लाखांची तरतुद केलेली आहे, ५० लाखाची तरतुद केली आहे. पण त्या अर्थसंकल्पात कल्याणकारी योजनांसाठी तुम्ही काय खर्च करणार आहात. व हे ४० लाख रू. तुम्ही कसे खर्च करणार आहात. ज्याप्रमाणे ११ लाखाचे रेनकोट खरेदी झाले आणि गोदामात पडुन राहिले आणि ज्याप्रमाणे शिलाई मशिन आणि इतर वस्तुंची खरेदी होत असते अशा या अपंगाच्या कल्याणकारी योजनेच्या ५० लाखांमधुन नुसत्या खुर्च्या विकत घेणे आणि त्या वाटपाचे कार्यक्रम करणे ऐवढया शक्यताही नाकारता येत नाही. त्यासाठी त्या अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजनेचा जो प्रकल्प आहे तो प्रशासनाने समोर ठेवणे फार आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षणावर एका रूपयाची सुध्दा तरतुद या अर्थसंकल्पामध्ये केलेली नाही याबददल आपले अभिनंदन करू की खेद व्यक्त करू हे मला कळत नाही. कदाचित येथे अशा एक प्रकारचा अंदाज केलेला असेल की उल्हासनगर महापालिकेमध्ये महापालिकेची एकही माध्यमिक शाळा नाही त्यामुळे कदाचित माध्यमिक शिक्षणावरील जी तरतुद आहे ती कदाचित काढुन टाकली असेल परंतु ज्याप्रमाणे एखादा अंदाज व्यक्त करत पुढचे काही प्रकल्प तयार करतो त्यापध्दतीने किमान एखादी तरी शाळा यांच्या कारकीर्दीमध्ये बनावी. आणि त्यासाठी एखादी लहानशा रक्कमेची तरतुद असली पाहिजे होती. आणि दुस-या एका गोष्टीसाठी मला फार आश्चर्य वाटते की सत्ताधा-यांची काम करण्याची पध्दत आणि प्रशासनाची काम करण्याची पध्दत या दोन्हींमध्ये कशी साम्य स्थळे आहेत. की याठिकाणी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सगळया विषय समित्त्या तयार झाल्या. सगळया समित्त्या तयार झाल्या असताना फक्त शिक्षण समिती आणि गलिच्छ वस्ती सुधार समिती या दोन समित्त्या फक्त तयार झाल्या नाहीत. म्हणजे यावरून या महापालिकेमध्ये सत्तेत बसलेल्या लोकांना शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आणि झोपडपटटयांमध्ये काम करण्यामध्ये किती सारस्य आहे आणि झोपडपटटीवासियांचा किती पुळका आहे हे या दोन गोष्टींवरून सिध्द होते. स्थायी समितीच्या सभापतीनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, त्यांनी उल्लेख केला घटनात्तमक संविधानातील तरतुदींचा स्थानिक स्वराज्य संस्थांना कसे अधिकार दिले आहेत. परंतु आपण एक बघितले की प्रभाग समित्त्यांची जी रचना झालेली आहे. ती प्रभाग समित्त्यांची रचना सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार झालेली आहे. परंतु अक्षरशः प्रभाग समित्त्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या तरतु दी केलेल्या नाहीत यावरून असे वाटते की, प्रभाग समित्त्या या केवळ सभापतीना दालने व वाहन भत्ता मिळावा. ऐवढयासाठीच त्या गठीत केलेल्या आहेत की काय असे त्यामध्ये दिसुन येते. दुसरे एक चांगले उदाहरण सत्तेमध्ये बसलेल्या लोकांचे या अर्थसंकल्पामध्ये सारस्य काय आहे ते तुम्हाला सांगतो. की शासनाने एक आदेश काढुन माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्यभुत ज्या सेवा आहेत त्या सहाय्यभुत सेवांच्या घटकांवरती मालमत्ताकर त्यांना निवासी दराने लावावा आणि जकातीमध्ये त्यांना सुट दयावी. अशा प्रकारचे शासनाचे आदेश आहेत. मालमत्ता कर निवासी दराने लावण्याचा निर्णय स्थायी समितीने १ एप्रिल २००४ पासुन लगेच घेतला. पण जकातीमध्ये सुट ही मात्र आताचा ठेका हा जेव्हा संपेल त्यानंतर चालु होईल. हा

चालुपणा कशासाठी? म्हणजे तुमचे सारस्य हा शासनाचे आदेश पाळण्यामध्ये नसुन केवळ ठेकेदाराची तळी उचलुन धरण्यामध्ये आणि ठेकेदाराचे जास्तीत जास्त हीत पहाता येईल यासाठी तरतुद केलेली आहे. जर आपण जकातीचे २०००-२००१ पासुनचे उत्त्पन्नाचे आकडे बघितले आणि त्यामध्ये जर आपण १०-१० टक्के वाढ केली तर आपल्याला या २००४-२००५ मध्ये खरे म्हणजे ६६ कोटीची अपेक्षा आपण केली पाहिजे होती परंतु जकातीच्या या ठेक्यामध्ये सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांचे सारस्य गुंतलेले असल्यामुळे आणि या महानगरपालिकेतील काही अधिका-यांचे हीत गुंतले असल्याने दरवेळेला उत्त्पन्नाचा आकडा कमी करायचा शेवटच्या दिवसापर्यंत ते प्रकरण टांगवत ठेवायचे आणि मग एकच दिवस उरला दोनच दिवस उरले. मग तो ५४ कोटी सांगतो आपण ५१ कोटी करा म्हणुन ते सगळे नाटक करून या पध्दतीने त्यामध्ये आपले जे हित आहे ते साध्य करायचे. अशा प्रकारची जकातीची तरतुद ६६ कोटीची अपेक्षित असताना केवळ ५९ कोटी ऐवढी तरतुद यामध्ये केलेली आहे. याठिकाणी आमचे जेष्ठ सहकारी श्री. हरदास माखिजा यांनी त्या अर्थसंकल्पातील एकही पान न वाचता या अर्थसंकल्पावर चांगले भाषण दिले. मी त्यांच्या भाषणानंतर मनापासुन टाळया वाजवल्या आणि त्याचे कारण ऐवढेच आहे की इतक्या फसव्या आणि खोटारडया आकडेवारीच्या अर्थसंकल्पावर ऐवढे चांगले भाषण करणारे या सभागृहातील सत्ताधा-यांमध्ये दुसरा सदस्य कुठलाच असु शकणार नाही त्यामुळे मला त्यांच्या भाषणाला अक्षरशः दाद दयावी लागली. आणि दुसरे अभिनंदन मी त्यांचे करीन आमचे मित्र श्री. प्रमोद टाले यांचे सुध्दा त्यांनी भाषणाच्या सुरवातिलाच सांगितले की हा अर्थसंकल्प वास्तववादी आहे म्हणुन. आणि त्यानंतर झोपडपट्टयांवर कसा अन्याय करणारा आहे. याचे सुध्दा वर्णन त्यांनी भाषणात केले. ही कसरत सत्ताधारी सदस्यांना फार चांगली जमते. आम्हाला ही कसरत जमत नाही. सभापतींनी आणखी एक उल्लेख या ठिकाणी केला हा अर्थसंकल्प अगदी चांगला नाही (फिलगुड नाही).

परंतु आम्ही लोकांसाठी चांगले करतो. असा उल्लेख देखिल याठिकाणी केला आहे. तुमचा आतापर्यंतचा या शहरातील इतिहास, काम करण्याच्या पध्दती, राजकारण करण्याच्या पध्दती याच्यावरून तुमची पध्दती ही फिलगुंडची आहे फिलगुडची कधीच असु शकत नाही. त्यामुळे तुमच्या कडुन आम्हाला फिलगुडची अपेक्षा कधीच करू शकत नाही. तरी सुध्दा तुम्ही खरे तर आम्हाला वाटले होते की फिलगुडसारखे एखादे बजेट असते तर आम्ही त्याला साथ दिली असती कदाचित तुम्हाला सहकार्य केले असते. परंतु तुमची कारभार करण्याची पध्दत ही एकतर्फी मनमानीची आहे. मनमानी पध्दती आहे आणि त्या मनमानीमुळे याठिकाणी सार्वजनिक विकासाचा कुठलाही विचार न करता केवळ आपल्या पक्षामध्ये उभे राहणा-यांची वैयक्तिक खुशामत करणारे दिशाहिन अशा आकडेवारीवर आधारीत असलेले लोकांना केवळ स्वप्न दाखवुन त्यांना फसविणारा असा जो अर्थसंकल्प आहे अशा अर्थसंकल्पाच्या पाठीमागे शिवसेना भाजपा ही कधीच तुम्हाला पाठिंबा देवू शकत नाही. त्यामुळे तुमच्या या अंदाजपत्रकाला ते अंदाजपत्रक नाही केवळ अंदाजपंछी पत्रक आहे. अशा अंदाजपंछी पत्रकाला आमचा ठाम विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर, मा. आयुक्त, मा. स्थायी समिती सभापती, सर्व सदस्य सभागृहामध्ये बजेटवर बरीच चर्चा झाली आहे. जास्त न बोलता मी फक्त दोन गोष्टी मा. स्थायी समिती अध्यक्षाना विचारेन. इथे जे वॉटर सप्लायचे जे कलेक्शन बाबत आयुक्त साहेबांनी २५ करोड उत्त्पन्न दाखविले आहे. व स्थायी समिती तर्फे ४५ करोड यावर्षाचे उत्त्पन्न दाखविले आहे. चार वेळेस स्थायी समिती अध्यक्ष असलेल्या श्रीमती. ज्योती कालानीच्या कारकीर्दीत चार वर्षात देखिल टारगेट पुर्ण नाही झाले आहे. मी कृपया अध्यक्ष महोदयांना विचारेन की हा आकडा आला कुठून ४५ करोडचा? मागच्यावर्षी आम्ही जी वसुली केली ती १० करोड आहे. हा आकडा अचानक कुठून आला. कृपया या गोष्टीचा खुलासा करावा. इथे कर वसुली दाखवली आहे ३४ कोटी रू. आयुक्त साहेबांनी स्वतः २९ कोटी सांगितले

आहेत. स्थायी समिती सभापतींनी ३४ कोटी सांगितले आहे. कर वसुली १०० टक्के जरी झाली. तर एका वर्षाचे १७ कोटी होतात. तर हा ३४ कोटीचा आकडा कुठून आला. या दोन्ही गोष्टींचा खुलासा कृपया कोणी सभागृहाच्या सदस्यांनी बोलु नये स्थायी समिती अध्यक्षांनी सांगावे की ३४ कोटी कराचे व ४५ कोटी पाणी पुरवठा विभागाचे आकडे कुठून आले. तुम्ही काय विचार करून करात व पाणी पटटीत दरवाढ न करता हा आकडा आणला कुठून? हे आकडे तुम्ही आणले कुठून? कृपया या गोष्टीचा खुलासा सभागृहात केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u> मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, सदनामधील उपस्थित सदस्य, स्थायी समिती सभापतींनी स्थायी समितीचे अंदजपत्रक महासभेपुढे सादर केलेले आहे. पण आयुक्त महोदयांनी स्थायी समितीपुढे अंदाजपत्रक सादर करताना जे शालजोडीतुन सदस्यांना शालजोडे मारले आहेत ते इथे सांगावेसे वाटत आहेत. शालजोडे मारताना त्यांनी सभागृहातील सदस्यांना दमबाजी केली आहे. या अंदाजपत्रकामध्ये सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी मोफत टॅंकर दिले जातात. सवंग दुसरे यावर्षी कर वसुली जी विक्रमी केलेली आहे. असे सांगुन आपली पाठ थोपटताना ते थांबलेले नाही. तसेच पान क्र. १५ वर सन्माननिय सदस्य श्री. विनोद तलरेजा यांनी मा. महापौर, मा. उपमहापौर, स्थायी समिती सभापती निधी हा व्यक्तीसाठी असुन खुर्चीसाठी नसुन याचे चांगले उदाहरण दिलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांचे निवेदन मी या सभागृहात वाचुन दाखवितो. त्यांनी श्री. किशोर वनवारी यांचे निवेदन वाचुन दाखविले आहे त्याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यात भेदभाव कसा करता येईल याचाही उल्लेख स्थायी समितीसभेमध्ये केला आहे आणि ते इतिवृत्तात आलेले आहे. त्यांनी महापौर निधी अर्धा यावेळेस वापरावा, अर्धा नंतरच्या वेळेस वापरावा आणि तो निधी वापरताना पुढचा महापौर कोण होईल हे देखिल या सभेमध्ये सांगितले आहे. आणि तो महापौर होईल त्याच्यासाठी निधी राखुन ठेवला पाहिजे. त्याचा उल्लेख त्यांनी याठिकाणी केलेला आहे. आणि त्यांनी रस्त्त्यांची जी नावे दिली श्री. किशोर वनवारी यांच्या सांगण्यावरून ती सर्व सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांची कामे या स्थायी समितीच्या सभेमध्ये घेण्यात आली त्यातील दोन तीन नावे मी वाचुन दाखवितो प्रभाग क्र. १६ मधील डॉ. लालवानी यांच्या दवाखान्यापासुन ब्लॉक नं. ५६३, एकविरा माता पर्यत रस्ता तयार करणे. श्रीमती. रेखा कारीरा अशा सर्व सत्ताधारी नगरसेवकांची नावे सुध्दा याठिकाणी दिलेली आहेत. व एक भेदभाव कसे करतात त्याचे उदाहरण मी याठिकाणी दिले. तसेच अंदाजपत्रक सादर करताना त्या अदांजपत्रकामध्ये श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की झोपडपटटीवर कसा अन्याय केला आहे त्याचे उदाहरण त्यांनी याठिकाणी दिले. विकर सेक्शन मध्ये , जिथे लाईट सेक्शनमध्ये ९० लाख रू. होते. तिथे ६० लाख केले. त्याचबरोबर श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, शिक्षण मंडळाच्या बजेटची जी चिरफाड केली. ती चिरफाड चांगली केलेली आहे. श्री. लाल पंजाबी यांनी अर्थसंकल्पावर भरपुर चिरफाड केली. आणि हा अर्थसंकल्प हा जनतेच्या डोळयात धुळ फेकणारा अर्थसंकल्प आहे. आणि लोकांना फक्त आश्वासन देवून आकडेवारी या कागदावर मोठी फुगवुन हे बोगस बजेट याठिकाणी केलेले आहे म्हणुन मी विरोधी पक्षातर्फे शिवसेना भाजपातर्फे या अंदाजपत्रकाचा विरोध करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.</u> महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, मा. सचिव साहेब सर्व सदस्य २००३-२००४ व वर्ष २००४-२००५ चे अंदाजपत्रक जे सादर करत आहोत त्यात खुपशा सदस्यांनी खुपशा हरकती घेतल्या आमचे श्री. लाल पंजाबी आम्ही ज्यांना काळा कोट न घातलेला वकील बोलतो. कारण त्यांना कायदयाचे बरेच ज्ञान आहे. आता हे फक्त २००० पर्यंत बोलले नंतर थांबले. आता यांना मी ९७-९८, ९८-९९ मध्ये थोडेसे घेवून जातो. कारण हे वर्ष २००३-२००४चे बजेट होते. हे दोन-चार वर्ष मागे गेले आहेतच त्यांना मी अजुन दोन

वर्ष मागे नेतो. यामध्ये त्यांनी खुप चांगले प्रेझेंन्टेशन केले. आमच्या श्री. नरेंद्र राजानी यांना मदत करून अंदाजपत्रक सादर केले होते. त्यावेळी उत्त्पन्न होते १कोटी ५७ लाख व खर्च होता १८६ कोटी. त्यात डिपॉझिट होते २९ कोटी त्यावेळी श्री. लाल पंजाबी व श्री. नरेंद्र राजानी यांनी आकडयांची जुळवाजुळव केली व पाणी पुरवठा विभागाची वसुली वाढविली, व कराची पण वाढवली. नोट करू शकता तुम्ही पंजाबी साहेब.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>तुम्हाला उत्त्तर पाहिजे तर मी तुम्हाला देवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>यांनी प्रशासनाला सांगितले की तुम्ही नोट करा म्हणुन मी पण यांना सांगितले की तुम्ही नोट करा. त्यावेळी जो तुटीचा अर्थसंकल्प होता. तुम्ही ती प्रथा सुरू केली. त्यानंतर आमचे जे श्री. प्रकाश माखिजा होते त्यांच्या राज्यात अर्थसंकल्प २९ कोटी तुटीचा अर्थसंकल्प होता. त्यांनी ६३ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला आता मी यावर उदाहरण देईन. श्री. लाल पंजाबी साहेब म्हणाले लक्ष्मी माता येताना चांगली दिसते. शनिजी जाताना चांगले दिसतात. ते तुमच्यासाठी ठिक आहे. भाभीजी लक्ष्मी माता म्हणुन आल्या आहेत. तुमचे जाणे निश्चित झाले. त्यानंतर आज भाजपा शिवसेनेच्या राज्यानंतर आमचे युतीचे राज्य आले. चांगली गोष्ट आहे. आम्ही तर श्री. लाल पंजाबींच्या त्या प्रथेची पुनरावृत्ती करतो. त्यांनी जो तुटीचा अर्थसंकल्प बनविण्याची पध्दत सुरू केली. आकडयांची जुळवाजुळव करून पाणी पुरवठा विभागाची रिकव्हरी वाढवुन. कराची वसुली वाढवली. ॲडजेस्ट करून दिले होते परंतु आम्ही काही या शहराचे शत्रु नाही. शहराचा विकास करायचा आहे म्हणुन वर्ष ९७-९८, ९८-९९ मध्ये स्थायी समितीमध्ये सर्वसंमतीने अंदाजपत्रक मंजुर केले होते. मी सदस्य होतो. मी शहराच्या विकासाचा वैरी नाही. शहराचा विकास जेथे राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.पी.आय. युती तेथे. आम्ही सहकार्य केले होते. आज इथे म्हणतात की आकडयांची जुळवाजुळव केली जाते परंतु आकडयांची जुळवाजुळव करायची नाही तर तुमची इच्छा आहे की, आम्ही कर वाढवावा तर आम्ही तो वाढवु इच्छित नाही. आज आमच्या वित्त मंत्रींनी पेटारा उघडला आहे सुखसुविधांचा. आज आम्ही केंद्र सरकार जे करते तरीही आम्ही कुणाला सवलत दिली नाही. महापालिकेची स्थिती नाजुक आहे ही गोष्ट लक्षात घेता. ५ व्या व ६ व्या आयोगाचे असे नाही केले. आज जेव्हा जकात खाजगीकरणाचा मुददा आला होता तो श्री. प्रकाश माखिजा यांच्या कारकीर्दीत सुरू झाला. तुम्ही खाजगीकरणाचे बी पेरले. ९८-९९, ९९-२०००, २०००-२००१,२००१-२००२, २००२-२००३ पर्यंत तुम्ही सर्वसंमतीने जकातीचे खाजगीकरण मंजुर केले.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>जे झाले तेच काय बोलता. तेच तेच काय नेहमी बोलता. तुम्ही आजच्या बाबतीत बोला ना. तुम्हीच म्हणता ना तेच ते रिपीट नका करू म्हणुन.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>तुम्हीच म्हणता ना एकदाच बोलायचे. कारण तुम्ही बोलल्यानंतर कोणी बोलेल म्हणुन का? तुमच्यासाठी विदवान हा शब्द योग्यच आहे. आता झाले ते. आताच श्री. हरदास माखिजा यांनी त्याचा उल्लेख केला तुम्ही पुन्हा तेच का बोलत आहात. तुम्ही दुस-यांसाठी नियम बनवु नका स्वतः पण आधी त्याचा वापर करा. एकदाच बोलायचे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>याचाही मी प्रोटोकॉल दाखवितो. यासाठी पण कल्याण डोंबिवली, ठाणे महापालिकेत जे चालते ते इथे कधीच झाले नाही. प्रोटोकॉल मी तुम्हाला सांगतो. तिथे प्रत्त्येक पक्षाचा एकेक सदस्य बोलतो. चार-चार जण एका पक्षातील बोलत नाही त्यानंतर विरोधी पक्षनेता, सभागृह नेता नंतर महापौर रूलिंग

देतात. मला आधी नाही बोलायचे मला शेवटीच बोलायचे आहे. त्यानंतर महापौरांना रूलिंग दयायचे आहे. कायदा हा आहे. प्रोटोकॉल हा आहे. श्री. लाल पंजाबी जातात

महासभा ऐकायला तिथे त्यांना माहित आहे. तर आज दोन, तीन शाय-या इथे सांगितल्या गेल्या आहेत तर मी पण शायरी सांगतो.

"कृष्ण करे तो रास लिला,
हम करे तो कॅरेक्टर ढिला
कृष्ण करे तो स्वामी,
हम करे तो हरामी
कृष्ण करे तो चमत्कार,
हम करें तो -------
आप करे तो लासानी,
हम करे तो बेईमानी"

मेहरबानी करून मुंगेरीलालचे सपने आम्हाला इथे दाखवु नका. प्रॅक्टीकल व्हा. आम्ही हे जे अंदाजपत्रक सादर केले आहे. आमची जेव्हा सत्ता नव्हती आम्ही सत्तापक्षात नव्हतो. आम्ही तुमच्या जागी बसलो होतो तुम्ही आमच्या जागी बसला होतात. आम्ही सर्वसंमतीने पास करायचो. म्हणुन आम्ही सत्तेत आलो. तर आपण पण मेहरबानी करून आम्ही रूलींग मध्ये आहोत. तुम्ही साथ दया. होवू तर शकत नाही पण संधी जर असेल जसे आम्ही बजेट फेवर मध्ये पास करायचो आम्ही रूलिंगमध्ये आलो. कारण की लोकांनी पाहिले आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. शहराचा विकास करू इच्छितो शहराचे आम्ही शत्रु नाही. जिथे जिथे विकास होत असेल तिथे आम्ही उभे राहु. ३३ रस्ते कॉंग्रेस, युपीपी, आर.पी.आय. यांच्या सत्तेत झाले ते तयार होत आहेत. मी लक्ष वेधु इच्छितो की, मागच्या वर्षी आम्ही २० रस्ते सुरू होते. ४ चे काम झाले आहे. दुसरी कामे चालु होती. आम्ही फायरब्रिगेडची चेसी मागविली. इतर पार्ट अजुन येणार आहेत तुम्हाला ते पण आम्ही दाखवु.

इकडे विपक्षातील काही सदस्य बोलत असताना...

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>तुम्ही मध्ये कशाला बोलता आम्ही बोलत आहोत ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>बोलु दया. बोलु दया. आम्ही श्री. आर.के. सोनवणे सारखा सक्षम आयुक्त आणले असे कधी आयुक्त मिळणार नाही. हे मी उदाहरणार्थ म्हणुन सांगत आहे. जेव्हा चंद्रशेखर साहेब होते तेव्हाची वसुली २९ कोटी ९६ लाख पाणी पुरवठा विभागाची व कर विभागाची. आज आयुक्तांनी वर्ष २००३ मध्ये रिकव्हरी केली आहे पाणी पुरवठा व कर विभागाची ३२ कोटी ४६ लाख. श्री. चंद्रशेखर साहेबांचा यांचा देखिल रेकॉर्ड तोडला आहे. कुणा कुणाला काही काही शब्द कमी आवडतात. खरे आम्ही बोलतो. भाभी जे म्हणाल्या की आमदार साहेबांनी महाराष्ट्र शासनाकडुन कर्ज माफ करण्याची एक पध्दत चालु केली. आज ४२ कोटी रूपये आपल्यावर डिले पेमेंट चार्ज होते ते माफ झाले. ते आम्ही त्यांच्या नावाने नाही सांगायचे तर काय कल्याण डोंबिवली, अंबरनाथ इथल्या आमदारांचे नाव घ्यायचे.

इकडे मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी बोलत असताना...

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> तुम्हाला मी बोललेले सहन होत नाही तुम्ही तीन तीन तास बोलता ते आम्ही कसे सहन करतो. आम्ही तीन तास आपले सहन केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>खोटे बोलु नका.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आमदार साहेबांनी शहराच्या हिताचा विचार करून विकास केला आहे. आयुक्त साहेब पण करत आहेत. म्हणुन तर आमदार साहेबांना तीनदा जनतेने निवडुन दिले. आम्ही सत्ताधारी पक्ष आहोत आम्ही आमदारांना श्रेय देणार. आज शहरात गुडगिरी कोण करतो. कोणासाठी गुंडाना बोलविले जाते हे मला बोलायची गरज नाही.आपण जे बोलता ना. आज शहरात गुंडागर्दी कोण करतो, हप्तारवोरी करतो. आमदार साहेबांनी कधी आयुष्यात लेटर पॅडवर तक्रार करून कुणाची इमारत नाही तोडली. त्या कोण तोडतात? कोण पैसे घेतात? हे सर्वांना माहित आहे. आज मला बोलण्याची आवश्यकता नाही. आजचे जे बजेट आहे. ते वास्तववादी बजेट आहे. आयुष्यात कधी असा अर्थसंकल्प ना कधी आला आहे ना कधी येणार. जेव्हा श्री. प्रकाश माखिजा यांनी अर्थसंकल्प सादर केला तर मालमत्ता कर वसुली ८ कोटीची १६ कोटी केली. आठ कोटी वाढवुन टाकले. पाणी पुरवठा उत्पन्न १० कोटी होते, १३ वाढवून टाकले. जकातचे उत्पन्न ३० होते, ३३ केले. व ५३ करोड रुपये एम.आय.डी.सी. चे होते. ते १७ करोड ४० लाख केले. ५५ करोड ६० लाख साईडला केले होते श्री. प्रकाश माखिजा यांनी. तसेच श्री. नरेंद्र राजानी यांनी एका वर्षाचे एम.आय.डी.सी. चे ठेवले व इतराचे पोस्टमार्टम केले. आज आमच्या आमदार साहेबांच्या अथक परिश्रमाने एक निर्भय योजना लागू केली आहे. पूर्ण महाराष्ट्रासाठी. ४३ करोड एम.आय.डी.सी. चे माफ झाले, त्यानंतर आम्ही जितके पण लोन घेतले. व्याज माफ होणार आहे. सर्व आकडे यावर्षी अर्थसंकल्पात आणले आहे. एक रुपयापण बाजूला ठेवला नाही आहे. पूर्ण महाराष्ट्रात आमदार साहेबांमुळे हे लागू झाले. आमदार साहेबांनी उल्हासनगरसाठी प्रयास केला होता. जसे आमचे श्री. पोखरकर साहेबांनी नगरसेवक निधीसाठी विचारले होते शासनाला. तर पूर्ण महाराष्ट्रात ते लागू झाले २ टक्के. तसेच आमदार साहेबांनी डिले पेमेंट चार्जेस रदद करण्यासाठी प्रयत्न केले. पूर्ण महाराष्ट्राचे त्यात भले झाले. इथे जो अर्थसंकल्प दिला गेला आहे, तिथे सर्व हरकती घेतात, काय वाढवायचे हे कोणी सांगत नाही. तुमची जर इच्छा आहे टॅकर दर वाढविले जावे तर तुम्ही आणा प्रस्ताव. तुमची इच्छा आहे जकात कर वाढवा तर आणा तुम्ही प्रस्ताव. आम्ही आता संमती देतो कारण की, आम्ही निवडणूका बघून हया सुविधा नाही दिल्या. सुविधा तेव्हा दिल्या जातात जेव्हा हया वर्षी लागू होते तेव्हा ते कमीजास्त केले. ५ व्या आयोगाचे ६ वा आयोग नाही केला. कुणाला अजून सवलती दिल्या असतील, तर तुम्ही म्हणा निवडणूका जवळ आहे म्हणून केले. ए टू झेड अक्चुअल फिगर्स आहेत. कर्जफेड असो रस्ते विकास असो आता आमचे बंधुंनी एक आरोप लावला की आम्ही फक्त सत्ताधारी पक्षांचे रस्ते घेतो, तुम्ही २० रस्त्यानंतर १० रस्ते पाहिले नाही आहे. त्यात दोन रस्ते श्री. रमेश चव्हाण यांचे आहे, ते आमचे नाही तुमचे आहे जरा तुम्ही पहा. २० रस्त्यानंतर १० रस्ते जे आयुक्तांनी ठेवले आहेत, त्यात तुमचे किती आहेत, याचा जरा अभ्यास करा प्लीज , तुम्ही थोडी स्टडी कमी करता, म्हणून मी सांगू इच्छितो. या १० रस्त्यांपैकी २ रस्ते श्री. रमेश चव्हाण यांचे आहे. पवईचे श्री. अशोक ठाकूर यांच्या पॅनलचे कुणाचेही असो, शहराच्या विकासासाठी आयुक्तांना एक प्रकारचा जुनुन आहे की, शहराचे जितकेपण रस्ते आहेत ते सर्व बनवावे. यापेक्षा जास्त खरे काही नाही. २० पैकी ४ रस्त्यांची कार्यवाही सुरु आहे. त्याची स्थिती त्यांनी लिहिलेली आहे. यावर्षी जितकेपण रस्ते आम्ही करणार आहोत, ते तीन वर्षाच्या आत पूर्ण नाही झाले. सत्ताधारी पक्ष ३ वर्षापर्यंत आहे, जे पण रस्ते आहेत ते आम्ही आमच्या कारकिर्दीत पूर्ण करु. हे आम्ही तुम्हांला वचन देतो, वचन तर दिले नाही पाहिजे, कारण तुम्ही अर्थसंकल्प मंजुर करण्यासाठी कधी सहकार्य दिले नाही. तुम्ही जर आम्हांला सहकार्य दिले, तर तुम्ही आम्हांला काहीही विचारु शकला असता. तुम्ही नेहमी विरोधच करता. शेवटी तुम्ही वोटिंगच करता. शहराच्या विकासासाठी तुम्ही सहकार्य करतच नाही, आम्ही तुम्हांला याबाबतीत काय बोलायचे? शेवटी काही योजना आहेत. नावे वाचतो काही वाढवायचे आहेत, काही कमी करायचे आहेत. क्लोजिंग बॅलेंस ३८

लाख रुपये आहेत.आज जे डिस्पोजल ऑफ म्युनिसिपल असेटस्, महापालिका मालमत्ता विनियोग त्यात ३ करोड रुपये जे प्रशासनाने ठेवले आहेत, तिथे ४ करोड करु इच्छितो, कारण आज या वर्षात या मालमत्तेसाठी आम्ही आयुक्तांना विनंती करु की, याची विल्हेवाट झाली पाहिजे. महापालिकेची परिस्थिती अशी आहे, त्या जर मालमत्ता तुम्ही विकाव्या, आणि जे ३ करोड ठेवले आहेत, आमची त्यावर हरकत आहे. एक दुर हॉटेल ऑपोझिट सेंट डोमेस्टिक एअरपोर्ट एक हॉटेल इंडिया गर्व्हमेंटने लिलाव केला होता. ७० करोड रुपयात त्याचा लिलाव झाला. काही दिवसानंतर ते हॉटेल १३० की १४० करोड रुपयाला विकले गेले. ज्या डिस्पोजल ऑफ प्रॉपर्टीज आहेत, त्यासाठी तुम्ही ३ करोड ठेवले आहेत ते कमी आहेत, आम्ही त्याला ४ करोड करु इच्छितो. यावर्षी त्या मालमत्ता तुम्ही विकून, महापालिकेची स्थिती जर चांगली नाही तर मालमत्ता ठेवून काही फायदा नाही, त्यातून उत्पन्न मिळाले पाहिजे. त्यानंतर आमचे शिक्षण मंडळाच्या शाळेच्या कार्यालय व फर्निचर देखभाल, दुरूस्तीसाठी १० लाख रुपये वाढविले पाहिजे. युनिफॉर्म, पुस्तके, वहया हयासाठी ४० लाख रुपये वाढवावे. नगरपालिका शाळा दुरुस्तीसाठी १०लाख रुपये वाढविले पाहिजे ते शिक्षण मंडळासाठी वेगळे ठेवले पाहिजे. आता तुम्ही महापालिका शिर्षक यात ठेवले आहे, मेंटेनन्स ऑफ गार्डन. प्रभाग समितीसाठी आम्ही एकेकाचे ५०-५० हजार केले आहे. १ लाख जे मागच्या वर्षाचे होते तेवढेच ठेवले जावे. प्रभाग समितीत उदयान देखभाल दुरुस्तीसाठी १० लाख ५० हजार वाढविले जावे. २२ नगरसेवक आहेत. प्रभाग समिती २ मध्ये यासाठी ९ लाख ५० हजार वाढविले जावे. प्रभाग समिती ३ मध्ये यासाठी ९ लाख वाढविले जावे. प्रभाग समिती ४ मध्ये यासाठी ९ लाख वाढविले जावे. आमचे जे स्विकृत सदस्य आहेत, डॅरिंग श्री. लाल पंजाबी या पाच जणांचे नगरसेवक निधी २-२ लाख रुपये आहेत, यावर्षी त्यांना ४-४ लाख दयावेत. आमच्या सारखेच आहेत, फक्त त्यांना मतदानाचा अधिकार नाही. ते चर्चा करु शकतात, शहराचा विकास करु शकतात, ही गोष्ट लक्षात घेवून मला वाटते श्री. लाल पंजाबी यांचा २ लाखावरुन ४ लाख निधी केला जावा, पाचही जणांचा. ते १० लाख रुपये वाढविले जावे व प्राथमिक शिक्षणासाठी १ करोड २७ लाख रुपयाची जी तरतूद आहे, हे झाले १८५ , १५ , ३४ कोटी बॅलेंस झाला ३४ करोड ३६ लाख त्यातून २० लाख रुपये मागच्या वर्षी महापौरांना बंगला व आयुक्तांसाठी बंगला १०-१० लाख रुपये तरतूद केली होती. यावर्षी स्थायी समितीसाठी न ठेवता ते १०-१० लाख ठेवून महापौरजींचा बंगला व आयुक्तांचा बंगला जे आमचे एक स्वप्न आहे व आयुक्त साहेबांसाठी बंगला की त्यांनी आमच्या सोबत असावे शहरात. २० लाखाची ती पण तरतूद करु इच्छितो. बाकी शिल्लक उरली २० गेले तर १४ करोड ३६ लाख उरले. आज आमच्या बंधूनी जे सांगितले,आम्ही जो विकास करु इच्छितो, मेहरबानी करुन यावर्षाचे प्रभाग समितीचे जे पण कुणाचेही प्रस्ताव जे प्रलंबित असतील, आयुक्तांनी ३१मार्चच्या आत सर्वांना देतील. वर्क ऑर्डर असो, काम मंजूर करायचे असो, कृपा करुन त्यास अनूमती दिली जावी. त्यानंतर एका गोष्टीचा खुलासा करू इच्छितो. बहुतेक आमच्या सदस्यांना समजले नाही. चुकीने इतिवृत्तात चुकीचे आले आहे. मी जे पत्र दिले त्यात मी लिहिले आहे की, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती तिघांचा जो निधी आहे तो ऑक्टोबर पर्यंत अर्धा अर्धा वापर करू. साडे बारा लाख उपमहापौर, २५ लाख महापौर मॅडम व स्थायी समिती सभापती साडेबारा लाख. कारण की यावर्षी ऑक्टोबर ५ तारखेला महापौर, उपमहापौर निवडणुक आहे. तर आम्ही देवी मातेला प्रार्थना करतो की, आमच्या भाभीजी महापौर होवो व साडे बारा लाख वापरू शकतील. त्यानंतर साडे बारा लाख दुसरा येणारा महापौर वापरू शकेल. उपमहापौरांच्या ऐवजी येणारे उपमहापौर येवू दे. तिघांचा जो निधी आहे. तो अर्धा-अर्धा ऑक्टोबर पर्यंत निवडणुकीपर्यंत वापरू शकतील. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती आम्ही काही पक्षपात केला नाही आहे. मी त्याच्या फेवरमध्ये नाही. गरज नसेल तर मी विरोध देखिल करत नाही. त्याचे जिवंत उदाहरण आहे ९७-९८ , ९८-९९ मध्ये अर्थसंकल्पाला मंजुरी दिली. त्याचबरोबर मी काही रस्ते जोडु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापौर, बंगल्यासाठी किती ठेवले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>महापौर, ५० लाख मधुन २५ लाख ऑक्टोबर पर्यंत वापरू शकतील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>बंगल्यासाठी विचारतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>दहा लाख. हे काम सुरू होण्यासाठी त्यानंतर २० लाख, ३० लाख पुढच्या वर्षी ठेवू.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>एक सेकंद थांबा. महापौरांच्या बंगल्यासाठी जे दहा लाख रू. ठेवले आहे. तर या महापौरांसाठी ५ लाख रू. व पुढच्या महापौरांसाठी ५ लाख रू. अशी काही व्यवस्था केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी ':-</u>ठिक आहे. हे पण मानतो. पंधरा-पंधरा लाख करतो. बाकी शिल्लक ४ लाख रू. राहिल. काही रस्ते जे आहेत. आयुक्त साहेबांनी ३० रस्ते ठेवले होते. मागच्या वर्षाचे २० यावर्षाचे दहा. स्थायी समितीने वाढवुन दहा केले. मी त्यात २४ रस्ते अजुन जोडु इच्छितो. २४ रस्त्यांची यादी एक उपमहापौर श्रीमती. जया साधवानी यांचा असे मिळुन २५ रस्ते ते मी अजुन वाढविण्यासाठी महापौरांना देवू इच्छितो व एक रस्ता जो आहे नवजीवन बॅंकेपासुन साईबाबा मंदीरापर्यंत आहे त्यास वगळुन टाकावे. कारण की काही काळापुर्वीच तेथे रस्ता तयार केला होता. तो रस्ता जो आहे नवजीवन बॅंकेपासुन साईबाबा मंदीर, बॅरेक नं. १८३८ पर्यंतचे काढुन टाकावे. त्याच्या ऐवजी १८९९ ते जीवन घोट हॉल ते बॅरेक नं. १९०३ घेतला जावा. व ते २६ रस्ते दुसरे आहेत ते सुध्दा मी सचिवांकडे देत आहे यादी ती पण त्यात समाविष्ट केली जावी. शेवटी मला असे वाटते की, माझ्या दोन शब्दांचा प्रभाव खुप चांगला झाला असेल. आमचे जे विरोधी पक्षीय सदस्य आहेत. यावर्षी आम्हाला सहयोग देतील. व हा अर्थसंकल्प व्यवस्थित लागु व्हावा. पुर्ण होवो म्हणुन तुमचे सहकार्याशिवाय होणार नाही. तुम्ही पण सर्व संमतीने मंजुरी करा. आम्ही तुम्हाला एक वचन देतो की आम्ही जो काही अर्थसंकल्प तयार करतो. समजा १८५ कोटीचा अर्थसंकल्प तयार केला आहे. सुधारीत अर्थसंकल्पात आकडा ११६ जर आला तर आम्ही ११६ देखिल मान्य करतो. कधी असे नाही म्हणाले की, ११६ उत्पन्न आहे तर ११६ खर्च ठेवा. सुधारीत अर्थसंकल्पात वर्षाचे जे उत्पन्न येते तेवढेच ठेवले जाते. अजुन असे काही आयटम आहेत. जे यावर्षी सुरू होतात. ते कॅरी फॉरवर्ड करून आणतो. हा वास्तविक अर्थसंकल्प आहे. जसे तुम्हाला वाटते कोणत्त्याही करात दरवाढ न होवो तर तुम्ही अर्थसंकल्प मंजुर करण्यास सहयोग दया. नाही तर आम्ही असे म्हणु की तुम्हाला वाटते की आम्ही दरवाढ करावी. आम्ही त्या फेवरमध्ये नाही. करवाढ केली नाही. मेहरबानी करून आता आठ वाजेले आहेत आता सर्वसंमतीने अर्थसंकल्प मंजुर करा. या दोन शब्दाने मी माझे बोलणे संपवतो.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>माझी विनंती आहे की तुम्ही जे वाढविण्यासाठी सांगितले आहे त्यात तुम्ही विकर सेक्शन बाबतीत काहीच उल्लेख केला नाही. माझी विनंती आहे. मागच्या वर्षापेक्षा यावेळी खुप कमी तरतुद ठेवली आहे याची पण तरतुद वाढवली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी एका गोष्टीचा खुलासा करू इच्छितो. आम्ही प्रभाग समितीत एकेक लाख रू. ठेवले त्यासाठी जर कुणा सदस्यांना उदयानासाठी खर्च करायचा नसेल तर त्यांना त्याऐवजी दुस-या कामासाठी खर्च करायचे असेल तर करू शकतात. हे स्पष्टपणे आले पाहिजे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मंजुर केले जावे?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मा. स्थायी समिती अध्यक्षांना मी प्रश्न विचारला होता. माझा प्रश्न होता आयुक्तांनी पाणी पुरवठ्यासाठी पाणी पट्टी २५ कोटी दर्शविली. आपण ४५ कोटी कसे ठेवले? तुम्ही आता बसा वनवारीजी. अध्यक्ष महोदया तुम्ही सांगा. तुम्ही हा ४५ कोटी आकडा कुठून आणला. पुर्ण वर्षाची वसुली ११ कोटी पेक्षा जास्त नाही. आयुक्त साहेब म्हणतात २५ कोटी वसुली येणार. तुम्ही म्हणतात ४५ कोटी तर कसे होणार? इतकी वसुली कशी होणार सांगा तुम्ही.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>जाहीर आहे आयुक्त साहेब म्हणतात ४५ करोड येणार.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आयुक्त साहेब २५ कोटी म्हणतात. हे २० कोटी कुठून आणले? वास्तविक ११ कोटीच वसुली होते.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>११ कोटी रनिंग मध्ये आहे अजुन थकबाकी बाकी आहे आम्ही त्यास कॅरीफॉरवर्ड केले. पुढची कार्यवाही आयुक्त साहेब करतीलच ते तुम्हाला उत्तर देतील.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मागील चार वर्षात तुम्ही हे उददीष्ठ ठेवले नव्हते. ४ वर्षात तुम्ही ४० कोटींची वसुली नाही करू शकलात तर एका वर्षात तुम्ही ४५ कोटी कुठून आणले?

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>त्याचे उत्तर आयुक्त साहेब देतील.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आयुक्त साहेबांनी २५ कोटी मांडले होते ना? ते २५ कोटीचे उत्तर देतील ना? तुम्ही ४५ कोटी कसे आणले याचे आधी उत्तर दया.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>आम्ही प्रशासनावर दबाव आणु की तुम्ही प्रयत्न करून वसुली करा. आयुक्त साहेबांनी चांगला रिझल्ट दाखवला आहे. त्यांनी चांगली वसुली केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>त्यांनी वसुली चांगली केली याबददल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. तेवढी जरी त्यांनी वसुली केली किंवा त्याच्या दुप्पट जरी वसुली केली तरी ४५ कोटी होत नाही. २० कोटी होते.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>आम्ही प्रयत्न करू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>ते स्वतः दुप्पट सांगत आहेत. दहा कोटीचे २५ कोटी तुम्ही त्यात आणखी वाढविलेत तर हे पुर्ण कसे होणार?

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>आशेवर पुर्ण संसार चालु असतो. आपण सर्व मिळुन आयुक्तांना सहकार्य देवु त्यांची हिम्मत वाढवु की तुम्ही प्रयत्न करा रिकव्हरी करा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>सन्माननिय आयुक्त साहेब, या बजेटमध्ये हा अर्थहीन आहे का अर्थ आहे. याचे जरा उत्तर दिले तर बरे होईल. पुर्ण जो संकल्प आपण समोर आणला होता त्यामध्ये आपण काही करवाढ केली नाही तर या अर्थसंकल्पाला अर्थ आहे की अर्थहीन आहे हे जरा समजवुन सांगा.

<u>मा. सभापती, स्थायी समिती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>निर्भय योजना जे शासनाचे धोरण आहे त्यानुसार आम्ही प्रयत्न करू की आमच्या जनतेकडे जी थकबाकी आहे. व्याज आहे. डिले पेमेंट चार्जेस हे सर्व पुर्ण करून वसुली वाढविण्याचा प्रयत्न करू.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:-</u>मा. स्थायी समिती सभापती मी आपणांस एक विनंती केली होती की माझ्या प्रभागात झोपडपट्टीचा डी.पी. रोड आहे. त्याचा यादीत समावेश केला जावा. आता २६ रस्त्यांची यादी दिली आहे. त्यात याचा समावेश केला जावा तो बनविणे गरजेचे आहे. गलिच्छ वस्तीचा आहे. नागेश्वर मंदीर पासुन ओ.टी. सेक्शन उल्हासनगर ४.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. सभापती महोदया, स्थायी समितीमध्ये एक वर्षापासुन मी प्रयत्न करून दोन रोड घेण्यासाठी मी वेळोवेळी विनंती करत असताना सुध्दा ऐवढी मोठी यादी मी तुम्हाला दाखवली. यादी वाचुन समाधान तर झाले. त्याच्या कितीतरी पटीने मला दुःख झाले की, स्थायी समितीच्या सदस्याला सुध्दा याठिकाणी सावत्र व्यवहार हा सभागृहात उघडपणे दिसला. मला आयुक्त साहेबांनी पण सांगितले होते व आमचे मित्र सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी पण सांगितले होते की उमापजी तुमचे रोड घेण्यात येतील पण तरीपण घेतले गेले नाही याबददल...

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी तुम्हाला सांगितले सर्व संमतीने करा.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>माझ्यासाठी अट आहे इतर रस्त्यांसाठी अट नव्हती घातली. आमच्या रोडसाठी अट घालता.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> सर्व संमतीने मंजुर करा. एक एक रस्ता द्या सर्व संमतीने करा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. आयुक्त महोदय, म्युनिसिपल अकाऊंट मध्ये जी बजेट बनविण्याची तरतुद आहे तो एक मुददा आणि आय.टी.च्या आयटमवर जकातीमध्ये पुढील कालावधीमध्ये सुट दिलेली आहे त्याचे पण स्पष्टीकरण अपेक्षित आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आम्ही एक एक रोड दिला तर हो न सका यात रोडचा समावेश होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मा. सभापती स्थायी समिती व सभेतील उपस्थित सर्व सदस्य प्रशासनातर्फे उत्पन्न व खर्चाचे जे अंदाजित प्राकलन देणे अनिवार्य आहे अधिनियमानुसार. ते आम्ही स्थायी समिती समोर ठेवले. आमचे उत्पन्न केवढे होणार व खर्च किती होणार याबाबत उल्लेख केला आहे. जवळ जवळ १८-१९ कोटीची जी तफावत दोन्हीमध्ये होती त्यासाठी काही करांमध्ये दरवाढ करण्याचा प्रस्ताव आम्ही स्थायी समितीसमोर व सदनासमोर मांडला होता. आमच्या निवेदनातच आम्ही उल्लेख केला होता की, जर ती करवाढ करण्यात आली नाही तर हा अर्थसंकल्पात उत्पन्नाची जी बाजु दाखविली आहे त्यात अडचण येईल व खर्च जो आहे. तुमच्या समोर दोन पर्याय होते एक तर करांमध्ये वाढ करा. किवा खर्चावर नियंत्रण करणे. खर्च जे आम्ही प्रस्तावित केले त्यापेक्षा

जास्त स्थायी समितीने प्रस्तावित केले आहेत. उत्पन्न जे आहे त्या करांमध्ये जी वाढ आम्ही प्रस्तावित केली होती ते नामंजुर करण्यात आली. तरीही आम्ही आमच्या अर्थसंकल्पाच्या निवेदनात शेवटी असेच लिहिले आहे की, जे अदांजपत्रक स्थायी समिती किंवा महासभा तयार करेल त्या अंदाजपत्रकावर अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही व आमचे अधिकारी संकल्प करू. ऐवढेच लिहिले होते. इथे जी चर्चा झाली. प्रत्त्येक प्रश्नाचे उत्तर देणे मला वाटते आवश्यक नाही. काही प्रश्न विचारले गेले त्याची उत्तरे पण चर्चेत सभागृहात मिळाली काहींची नाही मिळाली. परंतु हे जे अंदाजपत्रक आहे त्यात स्थायी समितीने जे अंदाजपत्रक तयार केले आहे त्यावरच चर्चा खुप चांगली झाली काही चांगले सुझाव देखिल आले आहेत मी प्रशासनातर्फे आपणांस ऐवढेच आश्वासन देवू इच्छितो की, हे जे अंदाजपत्रक महासभा स्विकृत करत आहे. जे पण अंदाजपत्रक महासभेला मान्य असेल त्याच्यावर अंमलबजावणी करण्याचा आम्ही प्रत्त्येक त-हेने प्रयत्न करू.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आयुक्तजी माझा एक प्रश्न आहे. इथे ग्रांन्ट फॉर्म कंम्पेनसेशन पुल प्रॉपर्टी, तुम्ही दाखविले आहे एक कोटी ३० लाख तर सरकारतर्फे काही आले का? का ही शिल्लक रक्कम आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,तुम्हा सर्वांना माहित असेल की डीसप्लेसड् पर्सन ॲक्ट १९५४ जो आहे त्याअंतर्गत ज्यापण मालमत्तेचे हक्क डिसप्लेसड् पर्सनला मिळतात. त्याची भरपाई ॲडमिनिस्ट्रेटर ऑफीसमध्ये जमा केली जाते. आणि तो जो पैसा आहे त्याचा वापर या शहरात इन्फास्टक्चर निर्माण साठी केला जातो. याच्या पुर्वी तो पैसा फक्त एकदाच नगरपालिकेला त्या पुल मधुन पैसा मिळाला. तीन-चार महिन्यापुर्वी आम्ही एस.डी.ओ. ऑफीस मधुन माहिती करण्याचा प्रयत्न केला. त्यात आम्हाला माहित पडले जवळ जवळ १ कोटी २३ लाख महापालिकेला दरवर्षी मिळाले पाहिजे होते ते मिळाले नाहीत. त्यासाठी आम्ही महाराष्ट्र शासनाकडे क्लेम देखिल केला. त्या क्लेमनुसार १ कोटी २३ लाख रू. आपल्याला मिळणारच.

<u>सत्ताधारी सदस्य :-</u> पास करा, प्रस्ताव पास करा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सर्व संमतीने पास की काही सदस्यांचा विरोध आहे.

<u>काही विपक्ष सदस्य :-</u> आमचा विरोध आहे.

<u>मा. महापौर :-</u> मी कार्यसूचीवरील दोन्ही विषय मतास टाकते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या दोन्ही प्रस्तावाच्या बाजूने आहेत, त्यांनी हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मते :-४२ मते</u>

३६. श्री. टेकचंदानी राजू
३७. श्रीमती रामचंदानी भावना
३८. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३९. श्रीमती. ज्योती कलानी
४०. श्री. वाघे शामु
४१. श्री. ऐडके गणपत
४२. श्रीमती शर्मा कमला
४३. श्री. वलेचा पृथ्वी
४४. श्री. रोहडा श्यामसुंदर
४५. श्री. गुप्ता प्रभुनाथ
४६. श्री. नाना पवार

४७. श्री. रुपानी चिमन
४८. श्री. शांताराम निकम
४९. श्री. ठाकूर विनोद
५०. श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
५१. श्री. गायकवाड सुरेश
५२. श्रीमती वनवारी मोना
५३. श्री. वनवारी किशोर
५४. श्री. जेसवानी सतराम
५५. श्री. लुंड गोविंदराम
५६. श्रीमती खिलनानी भावना
५७. श्री. खेमाणी दर्शनसिंग
५८. श्रीमती कारीरा रेखा
५९. श्री. पमनानी ईश्वर
६०. श्री. नारायण पंजाबी
६१. श्रीमती. दिपा पंजाबी
६२. श्री. मनोज साधवानी
६३. श्री. लबाना होशियारसिंग
६४. श्री. ठाकुर नरेंदकुमार
६५. श्री. तलरेजा विनोद
६६. श्रीमती. भारती छाबरीया
६७. श्री. संजय भठिजा
६८. श्रीमती. दासानी मिनु
६९. श्री. म्हस्के अंकुश
७०. श्री. लालबिहारी यादव
७१. श्री. जाधव सुरेश
७२. श्री. जाधव प्रशांत
७३. श्री. प्रमोद टाले
७४. श्री. भालेराव गौतम
७५. श्रीमती. बेबी वसिटा
७६. श्री. ठाकूर अशोक
७७. श्रीमती करोतिया मालती

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या दोन्ही प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-१८ मते.</u>

१८. श्रीमती जावळे संगिता
१९. श्रीमती मोकल सिमा
२०. श्री. उमाप रामदास
२१. श्री. पुरस्वानी जमनादास
२२. श्री. रुपचंदानी बच्चाराम
२३. श्री. असरोंडकर राज
२४. श्रीमती कृष्णानी रेखा
२५. श्री. भुल्लर राजेंद्रसिह
२६. श्री. सोनावणे नथु
२७. श्रीमती बामणकर नंदिनी
२८. श्रीमती खांडेकर प्रेमा
२९. श्री. गायकवाड दिलीप
३०. श्रीमती माने किरण

३१. श्री. बोडारे धनंजय
३२. श्री. पाटिल विश्वनाथ
३३. श्रीमती ससाणे लक्ष्मी
३४. श्री. चौधरी राजेंद्र
१८. श्रीमती सुर्वे जयश्री

मा. महापौरः-विषय क्र. १ व २ हा वर सुचविलेल्या सुधारणेसह बहुमताने पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय :-स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००३-०४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे.

प्रस्तावना

महापालिका आयुक्तांनी सन २००४-०५ च्या उत्पन्न व खर्चाचे अंदाज व सन २००३-०४ चे सुधारित उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करुन स्थायी समितीपुढेउ सादर केले होते. सन २००३-०४ या वर्षाकरिता अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रु १६८. २२ कोटी अपेक्षित होते व खर्च रु १६८. १२ कोटी अपेक्षित होता अर्थसंकल्पीय अनुदानाप्रमाणे उत्पन्न होत नसल्यामुळे खर्चात कपात करणे आवश्यक असुन त्या अर्थी आयुक्तांनी सन २००३-०४ या वर्षात उत्पन्नाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी सुधारणा येणेप्रमाणे प्रस्तुत केल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | - | रु ११६. ९२ कोटी |
| खर्च | - | रु ११६. ९० कोटी |

सन २००४-०५ करिता आयुक्तांनी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले असुन ते येणेप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | - | रु १५७. ५० कोटी |
| खर्च | - | रु १८६. ३२ कोटी |

वित्तीय वर्ष २००४-०५ चे अपेक्षित उत्पन्न व खर्चाच्या अंदाजाप्रमाणे राहणारी तुट रु २८. ८२ कोटी भरुन काढण्यासाठी जकात कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी, टॅंकर भाडे व शुल्क / फी च्या दरांमध्ये वाढ करणेचा प्रस्ताव आयुक्तांनी स्थायी समितीपुढे सादर केला.

खर्च बाजुची वैशिष्टये, योजना-

१ प्रशासकीय खर्च व संगणकीकरण

२ एकात्मिक रस्ते सुविधा कार्यक्रम

३ पाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक १

४ स्वतःचे स्त्रोत असलेली उल्हासनगर पाणी पुरवठा योजना टप्पा क्रमांक २

५ कालांतराने रक्कम अदा करण्याच्या योजनेंतर्गत खालील रस्ते व वाहनतळ उभारणेकामी खालील विकास नियोजन.

१ सीरु चौक ते बाशाराम अपार्टमेंट उल्हासनगर २

२ बेवस चौक ते हिलव्ह्यू अपार्टमेंट उल्हासनगर १

३ साधूबेला हायस्कुल ते मोती अपार्टमेंट मार्गे हनुमान मंदिर उल्हासनगर- १

४ कांतीनगर शेरावाली अपार्टमेंट ते बॅरेक नंबर १९०९ उल्हासनगर ५

५ कॅनेरा बॅंक से सेक्शन २६ मार्गे मानेरा रोड गुरु रानी आश्रम उल्हासनगर ४

६ हनुमान मंदिर ते ई.एस.आय.एस. हॉस्पीटल गेट उल्हासनगर २

७ सोनसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक रोड उल्हासनगर २

८ ओ.टी सेक्शन कमला नेहरु नगर ते मुरबाड रोड उल्हासनगर २

९ राधास्वामी सत्संग हॉल जवळ Culvert उल्हासनगर ३

१० राना टेंडीग कंपनी ते खुनी खड्डा मार्गे एस.ई. एस शाळा, उल्हासनगर १

११ संग हाऊस ते पाणी पुरवठा ऑफिस उल्हासनगर ४

१२ टॅगोर सोसायटी ते उड्डान पुल उल्हासनगर ४

१३ अशोक सिनेमा ते खेमीडाईग कंपनी च्या पुढे मनिषानगर मार्गे दसेरा मैदान उल्हासनगर ३

१४ अंबिका मंदिर ते उड्डान पुल उल्हासनगर ४

१५ रामायणनगर ते ओ.टी. सेक्शन उल्हासनगर ३

१६ शिवाजी चौक ते संतू बिल्डींग उल्हासनगर ३

१७ राधास्वामी पासुन ते साईबाबा मंदीर नाका क . ८ पर्यंत

१८ न्यु इंग्लिश स्कुल पासुन ब्लॉक ९२६ कुर्ला कॅम्प उल्हासनगर ५

१९ रेल्वे उड्डाण पुल ते अंबरनाथ कानसई नाल्याच्या साईटच्या पी.डब्ल्यु.डी ब्रीज पर्यंत

२० प्रेम टेकडी ते पाण्याची टाकी उल्हासनगर ५

६ सन २००४-०५ या वर्षात सुध्दा महापालिका जकात वसुलीचे कर्तव्य अभिकर्त्यामार्फत पार पाडेल.

७ <u>अर्थसहाय्य देणे :</u>

महाराष्ट्र शासन माहिती व तंत्रज्ञान, सहाय्यभुत सेवा घटक २००३ धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटकांना १/४/२००४ पासुन मालमत्ता कराची निवासी दराने आकारणी करणे तसेच जकात करात सुट सध्या असलेल्या जकात अभिकर्त्याची मुदत संपल्यावर लागु करणे.

स्थायी समितीने आयुक्तांचे उत्पन्न व खर्चाचे अंदाज धरुन, सर्व आवश्यक गोष्टी लक्षात घेवुन प्रशासनाकडुन आवश्यक ती तपशिलवार माहिती घेवुन कोणतीही करवाढ न करता, टॅकरभाडे न बसवता व इतर फीच्या दरांमध्ये कोणतीही वाढ न

करता आयुक्तांनी उत्पन्न व खर्चाच्या अंदाजित केलेल्या रक्कमेत काही फेरफार करुन सन २००४-०५ करिता रु ३९. ३६ लक्ष शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार केलेला आहे. त्याप्रमाणे

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| उत्पन्न | - | रु १८४४९७० |
| खर्च | - | रु १८४१०३४ |
| शिल्लक | - | रु ३९३६ |

तसेच सन २००३-०४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज आयुक्तांतर्फे प्रस्तावित करण्यात आलेले असुन ते स्विकारण्यात आले आहेत.

**LFkk;h lferhrQsZ dj.;kr vkysys oSf'k"V;s] QsjQkj o lwpuk &&**

आयुक्तांनी सन २००४-०५ मध्ये पाणीपट्टी वसुलीपोटी अंदाजित केलेल्या रु २५ कोटी ऐवजी रु ४५ कोटी व मालमत्ता कर वसुलीपोटी अंदाजित केलेल्या रु ४३ कोटी ऐवजी रु ५० कोटी अशी फेरफार करुन तसेच काही बाबीसंबंधी आयुक्तांनी अंदाजित केलेल्या रक्कमेत फेरफार करुन उत्पन्न व खर्चाचा मेळ बसवुन अर्थसंकल्पीय अंदाज तयार केलेले आहेत. या व्यतिरिक्त आयुक्तांतर्फे प्रस्तावित करण्यात आलेल्या २० रस्त्यांच्या कामा व्यतिरिक्त १० अतिरिक्त कामांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे प्रस्तावित खालील आणखी १० रस्ते सन २००४-०५ वर्षात विकासासाठी घेण्यात येतील.

१. बॅरेक नं. १९३७ ते १९६९, उल्हासनगर-५
२. कैलास कॉलनी रस्ता उल्हासनगर-५
३. डॉ. लालवानी डिस्पेंन्सरी ते ब्लॉक नं५६३ एकविरामाता मंदीर, उल्हासनगर-४
४. साई पॅलेस ते बॅरेक नं. १४२५, उल्हासनगर-४
५. आस्था हॉस्पीटल ते पंजाबी कॉलनी, उल्हासनगर-३
६. भवानी नगर मच्छीमार्केट ते शालीमार प्रेस, उल्हासनगर-३
७. दसेरा मैदान ते मुखी सोभराज गार्डन, उल्हासनगर-५
८. सचदेव कॉम्प्लेक्स ते हिरा मॅरेज हॉल, उल्हासनगर-२
९. कॅंब्रिज शोरूम ते साई कुटीर अपार्टमेंट, उल्हासनगर-२
१०. ४४४ गार्डन तथा एल.डी. आहुजा गार्डन रस्ता, उल्हासनगर-२

तसेच आयुक्तांतर्फे सुचविल्याप्रमाणे या वर्षात जकात वसुलीचे काम जकात अभिकर्त्यामार्फत पार पाडणे व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटकांना शासनाच्या धोरणाप्रमाणे अर्थसहाय्य देणे मान्य केले आहे. या व्यतिरिक्त स्थायी समितीने रु ५० कोटी महापौर निधी, रु २५ कोटी उपमहापौर निधी व रु २५ कोटी सभापती स्थायी समिती निधी आयुक्तांनी प्रस्तावित न केलेली अशी रक्कम सध्या उक्त शिर्षाखाली स्थायी समितीतर्फे प्रस्तावित करण्यात आली. परंतु महापौर निधी, उप

महापौर निधी व सभापती स्थायी समिती निधी उपलब्ध करण्यात आलेल्या तरतुदीतुन ५० टक्के रक्कम सध्या त्या पदावर कार्यरत असणा-या पदाधिका-यांना विनियोग करणेसाठी मुभा राहिल व निवृत्तीनंतर जे पदाधिकारी नव्याने पद ग्रहण करतील त्यांना उर्वरित ५० टक्के निधीचा विनियोग करता येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेता स्थायी समिती ठराव कमांक १३४, दिनांक ७/२/२००४ ला अनुसरून तयार करण्यात आलेल्या सन २००४-०५ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००३-०४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज व त्या प्रयोजनासाठी मुख्य लेखा अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली अर्थसंकल्पीय अंदाजाची प्रत महासभे समोर प्रस्तावित असुन करांचे दर निश्चित करण्यासाठी व अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम स्विकृतीसाठी विचाराधीन आहेत.

स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेता पुढील सरकारी वर्षात कोणतीही करवाढ न करता किंवा टॅंकर भाडे न आकारता किंवा कोणत्त्याही परवान्याच्या फी / शुल्क दरात वाढ न करता स्थायी समितीने सन २००४-०५ करिता तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात पुढील फेरफार करणे योग्य राहील.

(आकडे हजारात)

| अ. क | उत्पन्न | रुपये १८४४९७० | खर्च | रुपये १८४१०३४ |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका मालमत्ता विनियोग | + १०००० | कार्यालयीन फर्निचर दुरुस्ती व निगा (शिक्षण मंडळासह) | -१००० |
| | | | मनपा शाळा विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके वहया देणे | -४००० |
| | | | प्राथमिक शिक्षण | +१२७०० |
| | | | शाळा दुरुस्ती | -१००० |
| | | | उद्याने दुरुस्ती व निगा (प्र. स क - १) | +१०५० |
| | | | उद्याने दुरुस्ती व निगा (प्र. स क - २) | +९५० |
| | | | उद्याने दुरुस्ती व निगा (प्र. स क - ३) | +९०० |
| | | | उद्याने दुरुस्ती व निगा (प्र. स क -४) | +९०० |
| | | | महापालिका शाळा बनविणे | -१००० |
| | | | नगरसेवक निधीतुन विकास कार्य | +१००० |
| | | | महापालिका इमारती बनविणे (आयुक्त/महापौर निवास) | +२००० |
| | एकुण | १८५४९७० | एकुण | १८५३५३४ |
| | | | अखेरची शिल्लक | १४. ३६ |

तसेच स्थायी समितीचे सभापतींनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केलेल्या ३० रस्त्यांच्या व्यतिरिक्त पुढील २७ रस्त्यांची भर घालणे योग्य होईल.

१ दत्त वाडी ते मुरबाड रोड व्हाया हरमन मोहता कंपाऊंड, उल्हासनगर-१

२ दत्तवाडी शहाड डॉ. नाथानी जवळ, उल्हासनगर-१

३ दयाल शॉप शिव रोड ते जनता मित्र मंडळ व्हाया शंकर मंदिर, उल्हासनगर-१

४ बॅ क १८६१ ते काली बारी चौक व्हाया साईट नं १०६ , उल्हासनगर-५

५ जंगल हॉटेल ते बॅ क १६३८ व्हाया सतरामदास हॉस्पीटल व लिंक ते बॅ क १६१८ व्हाया मनुजा यांचे घर, उल्हासनगर-४

६ मेन रोड व्हीटीसी मैदान व्हाया सेक्शन ३०, उल्हासनगर-४ येथील रस्त्याचे उर्वरित काम

७ मेन रोड उल्हासनगर-४ ते व्हीटीसी मैदान व्हाया कृष्णा मंडळ, उल्हासनगर-४ या रस्त्याचे रुंदीकरण करणे.

८ ढोलुराम दरबार ते मच्छी मार्केट, उल्हासनगर-१

९ बॅ क ११४७ ते मिलन दर्शन सोसायटी व्हाया पंजाबी कॉलनी व लिंक ते गेहानी चौक, उल्हासनगर-२

१० डॉल्फीन क्लब ते राधाकृष्णा सोसायटी, उल्हासनगर-१ येथील रस्त्याचे उर्वरित काम.

११ झुलेलाल मंदिर ते बॅ क ५८६ , उल्हासनगर-२

१२ आवत चौक ते अमरधाम चौक, उल्हासनगर-२

१३ अमरधाम चौक ते बॅ क ५८६ , उल्हासनगर-२

१४ विटभट्टी ते गायकवाड पाडा, उमपा हद्द ते गोविंद गायकवाड सायकल मार्ट, उल्हासनगर-५

१५ बॅ क ८८४ ते ९९० ते रविंद्र हॉटेल, उल्हासनगर-५

१६ उल्हास उड्डाण पुल ते सेंट व्हाया पिंटो पार्क अयोध्या नगर व लिंक ते ओटी चौक, सितलदास यांचे घरासमोर व्हाया नेनुमल सोसायटी, उल्हासनगर-३

१७ उड्डाण पुल ते अण्णाभाउ साठे गेट व्हाया बॅ क १०८० ते ८१ , उल्हासनगर-३

१८ घनश्याम अपार्टमेंट ते मिलन मटन शॉप, प्र क ६

१९ बॅ क १०४ते गुरुनानक शाळा बुस्टर, उल्हासनगर-४

२० गुरुद्वारा (सुभाष टेकडी) ते गुरुनानक शाळा, उल्हासनगर-४

२१ निरंकारी हॉल ते भारत चौक, उल्हासनगर-१

२२ सती भवन ते ४४४ गार्डन व सभोवतालचा रस्ता

२३ डॉ तिवडे ते कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-४

२४ नेताजी शाळा ते प्रभाराम मंदिर, उल्हासनगर-५

२५ मटमंदिर ते नेताजी शाळा व्हाया तहसिलदार कार्यालय व लिंक ते निजधाम आश्रम, उल्हासनगर-५

२६ नागेश्वर मंदिर ते ओटी व्हाया भिम कॉलनी, उल्हासनगर-४

२७ बॅ क १८९९ ते १९०३ व्हाया जिवन घोट हॉल, उल्हासनगर-५

या व्यतिरिक्त वर उल्लेखिलेल्या मच्छी मार्केट ते साईबाबा मंदिर व्हाया आनंदपुरी मार्गे, उल्हासनगर-५ हा रस्ता विकासासाठी तातडीने घेणे आवश्यक नसल्याने वर उल्लेखिलेल्या ५७ रस्त्यांमधुन हा रस्ता वगळणे योग्य राहिल.

सबब स्थायी समितीच्या प्रस्तावाप्रमाणे कोणतीही करवाढ न करता वर उल्लेखिलेल्या आणखी २७ रस्त्यांची भर घालुन व अंदाजित केलेल्या रक्कमेत सुचविलेल्या फेरफारांसह स्थायी समिती ठराव जसा आहे तसा अंगिकार करणे व अंतिम स्वीकृतीसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्रमांक १२६</u> <u>दिनांक : १६/०२/२००४</u>

सुचकाचे नांव : श्री किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव : श्री विनोद तलरेजा

ही महासभा उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे व स्थायी समिती ठराव क्रमांक १३४, दिनांक ७/२/२००४ मध्ये अंतर्भुत केल्याप्रमाणे तसेच कोणतीही करवाढ न करता वरील प्रस्तावित केलेल्या फेरफारांसह सन २००४-०५ च्या रु १४.३६ लक्ष शिलकीच्या अर्थसंकल्पीय अंदाजास व सन २००३-०४ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देत आहे तसेच मुख्य लेखा अधिकारी या बाबत जी छापील प्रत प्रसिध्द करतील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही :-

अनुमोदकाची सही :-

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषय :-</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास स्विकृती देणे.

<u>प्रस्तावना:-</u>

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे शिक्षण मंडळ ठराव क्रमांक ५३ दिनाक २०/८/२००३ अन्वये खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

| | | | |
|---|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न | रुपये | : | ९९६४७५००/- |
| अंदाजपत्रकीय खर्च | रुपये | : | <u>९९६४७५००/-</u> |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ३,२५,१०,७००/- शासकीय अनुदान अपेक्षित असून उर्वरित रक्कम ६,५८,४९,८००/- महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अदा करावयाची आहे .शिक्षण मंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात काही लेखाशीर्षातर्गंत पुढील प्रमाणे फेरफार करुन स्विकृत्ती देण्यांत येत आहे.

| उत्पन्न | रुपये ९९६४७५०० | खर्च | रुपये ९९६४७५०० |
|---|---|---|---|
| इसाऱ्याची रक्कम ठेव | (-) १,००,००० | फर्निचर खरेदी | (-)१५,००,००० |
| सुरक्षा ठेवी | (-) २,००,००० | सण अग्रिम | (-)७,२०,००० |
| सण अग्रीम | (-) ७,२०,००० | सुरक्षा ठेवीचा परतावा. | (-)२,००,००० |
| उमपा देणगी | (-) ८५,५५,००० | इसाऱ्याची रक्कम परतावा | (-)१,००,००० |
| | | सध्या कार्यरत शाळांचा देखभाल खर्च | (-)१०,००,००० |
| | | शाळांच्या नविन इमारतींचे बांधकाम. | (-)२०,००,००० |
| | | नविन कार खरेदी, पेट्रोल वरील खर्च. | (-)७,००,००० |
| | | विद्युत खर्च | (-)१,००,००० |
| | | शैक्षणिक आणि प्रयोगशाळेतील साहित्य खरेदीवरील खर्च | (-)५०,००० |
| | | कॅलक्यूलेटर व टायपराटर मशिनवरील खर्च | (-)५,००० |
| | | गरीब विद्यार्थ्यांना गणवेश व वहया वाटप | (-)१०,००,००० |
| | | शिक्षकांना गणवेष वाटप. | (-)२,००,००० |
| | | क्रिडा,शैक्षणिक साहित्य ,संगणक, दूरदर्शन संच इत्यादींवरील खरेदी खर्च | (-)५,००,००० |
| | | चित्रकला, संगणक,क्रिडा शिक्षकांवरील वेतनवर खर्च. | (-)१५,००,००० |
| एकूण | ९,००,७२,५०० | एकूण | ९,००,७२,५०० |

एकुण अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ९००७२५००/-

एकुण अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ९००७२५००/-

**महासभा ठराव कमांक : १२७** **दिनांक : १६.२.२००४**

सुचकाचे नांव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नांव :- श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रमाणे प्रस्तावित केलेल्या फेरफारासह उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पिय अंदाजास मंजूरी देत आहे. आणि प्रशासकीय अधिकारी याबाबतची छापील प्रत प्रसिध्द करील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही /-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्रीम. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, श्री. अशोक ठाकुर यांनी जो रस्ता सांगितला तो २७ नंबर वर घ्यावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>एक मिनिट श्री. चिजवानी शहर अभियंता यांना पुष्पगुच्छ दयायचा आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>होय. या महिन्यात श्री. चिजवानी साहेब सेवा निवृत्त होत आहेत. काही सदस्य त्यांना सत्कार करू इच्छितात. व त्यांना तुम्हा सवांतर्फे शुभेच्छा देवू इच्छितात.

<u>मा. सदस्य श्रील. किशोर वनवारीः-</u>श्री. चिजवानी नंतर पण महापालिकेत येत राहतील. झाले तर त्यांना मुदत वाढ दया.

इकडे काही सदस्यांनी श्री. चिजवानी यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले व पुढील उर्वरीत जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

<u>श्री. मोहन चिजवानी (शहर अभियंता):-</u>एक मिनिट मला बोलायचे आहे. तुम्ही सर्वांनी मला पुष्पगुच्छ देवून शुभकामना दिल्याबददल मी तुमचा आभारी आहे. माझ्याकडुन काही चुक झाली असल्यास क्षमस्व.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८. ०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१६/३/२००४

**इतिवृत्त**

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१६/३/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दि. १६.३.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.
२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४३. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ५०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५३. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५६ | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५७. | श्री. चौधरी राजेंद |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्रीमती. गुप्ता अनिता धमेंद | ६०. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्री. नाना आनंदा पवार | ६१. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६३. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६४. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्री. शांताराम निकम | ६५. | श्रीमती. किरण माखिजा |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३३. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७१. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३५. | श्री. मोहन साधवानी | ७३. | श्री. बहरानी मोहन |
| ३६. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७४. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७५. | श्री. इदनानी राजु चंदभान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | श्रीमती. खिलनानी भावना | ७६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ४०. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७८. | श्री. वदरीया राजेश |

--२--

तर

मा. सदस्य श्री. बेहरानी ठाकुरदास, श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १:- दि. १ एप्रिल, २००४ पासुन निवृत्त होणा-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

स्थायी समिती सदस्याची आठ पदे रिक्त आहेत, आपणांस आठ पदे भरायची आहेत व रिक्त असलेल्या जागा ही आठच आहेत. येथे बारा उमेदवार आठ पदांसाठी उभे आहेत त्या बारा उमेदवारांची नावे मी वाचुन दाखवितो. कृपया लक्ष दया.

१. श्रीमती. वसिटा बेबी तुलसीदास
२. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
३. श्री. सोनवणे नथु काशिराम
४. श्रीमती. जावळे संगिता रमेश
५. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
६. श्री. वनवारी किशोर नारायणदास
७. श्री. ऐडके गणपत गोविंद
८. श्री. बठिजा संजय रामचंद्र
९. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
१०. श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेन्द्र
११. श्रीमती. वनवारी मोना अशोक
१२. श्री. गायकवाड सुरेश नामदेव

आता श्री. विनोद तलरेजा व श्रीमती. बेबी वसीटा यांनी त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घेतलेले आहेत.

आपणांस आठ उमेदवार निवडायचे आहेत. परंतु प्रत्यक्षात दहा उमेदवार रिंगणात आहेत. गुप्त मतदानाची प्रक्रिया सुरू करण्यापुर्वी जर कोणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी पाच मिनिटाची वेळ दिली जात आहे. उमेदवारी मागे घेण्यास कुणी तयार आहे का?

मा. सदस्या श्रीमती. अनिता गुप्ता:-मी अनिता गुप्ता स्थायी समिती सदस्य पदाची उमेदवारी मागे घेत आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मी प्रमोद टाले स्थायी समिती सदस्य पदाची उमेदवारी मागे घेत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-याबाबतचा फॉर्म भरून दया. कृपया लक्ष दया. रिक्त पदे आठ आहेत व उमेदवार सुध्दा आठ आहेत आता निवडणुकीची काही आवश्यकता नाही. उमेदवारी मागे घेतल्या नंतर जे उमेदवार शिल्लक राहीले आहेत त्यांना बिनविरोध निवडुन आल्याचे घोषित करता येईल.

--३--

मा. महापौरः-या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १:- दि. १ एप्रिल, २००४ पासुन निवृत्त होणा-या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ नंतर महापालिकेच्या दिनांक ५/४/२००२ रोजीच्या पहिल्या सभेत महासभेने आपल्या सदस्यांपैकी १६ व्यक्तींची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणून नेमणूक केली होती व स्थायी समितीची रचना केली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये प्रत्येक वर्षी स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य व कशाप्रकारे निवृत्त होतील हे विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे. त्याअर्थी स्थायी समितीचे जे सदस्य जास्तीत जास्त कालावधीपर्यंत आपल्या पदावर असतील ते सदस्य निवृत्त होतील. त्यानुसार दिनांक १/४/२००४ पासून निवृत्त होणा-या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे.
२. श्री. ईश्वर पमनानी.
३. श्री. पृथ्वी वलेचा
४. श्री. विनोद तलरेजा
५. श्रीमती. किरण माने
६. श्रीमती. जयश्री सुर्वे
७. श्रीमती. सिमा मोकल
८. श्रीमती. नीता आहुजा

निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन आठ सदस्यांची नेमणूक केली पाहिजे. त्यामुळे या आठ पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक १६/३/२००४ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असून निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दिनांक ८/३/२००४ रोजी ज्या उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली व ज्यांची नामनिर्देशन पत्रे दिनांक ९/३/२००४ रोजी वैधरित्त्या घोषित करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे.........

१. श्रीमती. वसिटा बेबी तुलसीदास
२. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
३. श्री. सोनवणे नथु काशिराम

४. श्रीमती. जावळे संगिता रमेश
५. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
६. श्री. वनवारी किशोर नारायणदास
७. श्री. ऐडके गणपत गोविंद
८. श्री. बठिजा संजय रामचंद्र
९. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
१०. श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेन्द्र
११. श्रीमती. वनवारी मोना अशोक
१२. श्री. गायकवाड सुरेश नामदेव

--४--

वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

१. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
२. श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास
३. श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र
४. श्री. टाले प्रमोद नामदेवराव

वरील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्या अंती भरावयाच्या जागांच्या संख्ये इतके उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले त्यामुळे नामनिर्देशीत रित्या आठ उमेदवार येथोचित्त रित्या बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करावे असे प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र. १२८</u> <u>दिनांक :- १६/३/२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील ८ (आठ) उमेदवारांची स्थायी समिती सदस्य म्हणून बिनविरोध नेमणूक करीत आहे.

१. श्री. ऐडके गणपत गोविंद
२. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
३. श्रीमती जावळे संगिता रमेश
४. श्री. बठिजा संजय रामचंद्र
५. श्री. वनवारी किशोर नारायणदास
६. श्रीमती वनवारी मोना अशोक
७. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
८. श्री. सोनवणे नथु काशिराम

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. महापौर:-</u> खालील उमेदवार स्थायी समिती सदस्य म्हणून निवडुन आल्याचे मी, घोषित करीत आहे.

१. श्री. ऐडके गणपत गोविंद
२. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
३. श्रीमती जावळे संगिता रमेश
४. श्री. बठिजा संजय रामचंद्र
५. श्री. वनवारी किशोर नारायणदास
६. श्रीमती वनवारी मोना अशोक
७. श्री. साधवानी मोहन रहंदोमल
८. श्री. सोनवणे नथु काशिराम

यावेळी स्थायी समिती सदस्य म्हणुन नियुक्ती झालेल्या सन्माननिय सदस्यांचे मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. सभापती स्थायी समिती यांच्या तर्फे पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करण्यांत आले.

--५--

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५ . ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(श्री. प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांकः-१९ एप्रिल, २००४

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/४/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दि. १९.४.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>

<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १०. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. अंकुश म्हस्के |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १५. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. नाना आनंदा पवार | ५०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५१. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५२. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्री. शांताराम निकम | ५४. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २१. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५५. | श्रीमती. किरण माखिजा |
| २२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५६ | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५७. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २४. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २५. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. मोहन साधवानी | ६१. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २८. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६३. | श्री. बहरानी मोहन |
| ३०. | श्रीमती. खिलनानी भावना | ६४. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३१. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६७. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. रमेश महादेव चव्हाण | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | ६९. | श्री. वदरीया राजेश |
| ३६. | श्री. जाधव सुरेश मधुकर | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, २. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ३. श्रीमती. सीमा चंदाराम मोकल, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र, ५. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ६ श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन, ७. श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेंद्र, ८. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ९. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, १०. श्री. जयसिंघानी अनिल, ११. श्री. बेहरानी ठाकुरदास, हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, मी सदनाला विनंती करतो की आजची महासभा आम्ही सर्वजण निवडणुक प्रक्रियेच्या कार्यक्रमात व्यस्त असल्याने २८ तारखेपर्यंत स्थगित करण्यात यावी. व आमच्या सदस्या श्रीमती. कमला शर्मा यांनी जी भगवान बुध्दांची प्रतिमा आणली आहे. सभा स्थगित केल्यानंतर हार, फुले वाहुन त्यांची स्थापना करावी. तसेच आमचे मा. सदस्य श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे

यांच्या मातोश्रींचे निधन झाले आहे. त्यांना देखिल दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करावी. तसेच मा. महापौरांच्या घरी लग्नकार्य आहे. त्यापण व्यस्त आहेत तरी ही सभा स्थगित करून २८ तारखेला ठेवण्यात यावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-मा. महापौरजी,उपमहापौर, आयुक्त, सचिव, तसेच सभागृहातील सर्व सदस्य वास्तविक ही सभा आयोजितच करायला नको पाहिजे होती. आज सकाळ पासुन मी ठाणे महापालिका, कल्याण महापालिका येथील महापौरांशी बोलुन माहिती काढली की, आचारसंहितेमुळे कुठेही सभा बोलावली नाही. काही दिवसांपुर्वी आम्ही करवाढ विरूध्द एक रिक्वीझीशन मिटिंग बोलावली होती. २६ तारखेला पत्र दिले होते. त्यावेळी जेव्हा आम्ही असे पत्र दिले होते की मागच्या दारातुन तुम्ही जी करवाढ केली आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी मिटींग बोलवा म्हणुन पत्र दिले होते. तुम्ही आचार संहितेचे कारण सांगुन ती सभा ठेवली नाही. खरेतर त्यावेळी आचारसंहिता लागु पण नव्हती झाली. नोटीफिकेशन पण नव्हते निघाले परंतु तुम्ही मुददाम वाट पाहुन तसे केले कारण तुम्हाला माहित होते लोकसभा निवडणुक होणार आहे. आचारसंहिता जाहिर होणार. तुम्ही खुप वेळ वाट पाहिली व तेव्हा आचारसंहिता जाहिर झाली नंतर तुम्ही आम्हाला उत्तर दिले की आचारसंहितेमुळे सभा ठेवली जाणार नाही. हा लोकशाहीचा अपमान आहे. हे आम्ही खुल्या स्वरूपात बोलतो तुम्ही ती सभा आयोजित करायला पाहिजे होती. करवाढ करणे न करणे हा तुमचा प्रश्न आहे. तुम्ही ती सभा नाही ठेवली लोकशाहीचा खुप मोठा अपमान केला. आम्ही त्यासाठी प्रोटेस्ट करतो. आमचा विरोध प्रर्दशित करतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी जी २८ तारीख सुचवली ती ठिक आहे का त्याच्या पुढची तारीख ठेवायची आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आमच्या मते तर सभाच नको ठेवायला पाहिजे होती आणि जर ठेवली आहे तर आम्ही दिलेल्या टॅक्स विषयी पण सभा ठेवायला पाहिजे होती. तुम्ही ती का नाही ठेवली?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-मा.महापौर महोदया, आजच्या तारखेत जी सभा बोलवली आहे. आम्ही हेच आवाहन केले आहे की ही सभा ठेवायला पाहिजे होती की नाही हा मुददा आम्ही सभागृहात उपस्थित केला आहे. आमचे सहकारी सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी जो मुददा प्रस्तुत केला आहे. आम्ही टॅक्स विषयी सभा बोलविण्याची मागणी केली होती. तेव्हा तुमच्याकडे आचारसंहितेचे कारण होते. शहरात लोकांना दहा-दहा पटीने करवाढीचे बिल जात आहे. जे मागच्यासाली ११००-१२००
बिल भरत होते आज त्या लोकांना ११,०००/-ते १५,०००/- पर्यंत बिले जात आहेत म्हणुन लोक हैराण झाले आहेत. महापालिकेत येतात तर त्यांचे कुणी ऐकत नाही. इथे कुठे दार ठोठाविण्याची देखिल सोय नाही आणि अशावेळी आयुक्त साहेबांनी स्वतःच्या अधिकारात ऐवढा मोठा निर्णय घेतला. महासभेला विश्वासात न घेता, स्थायी समितीला विश्वासात न घेता ऐवढा मोठा निर्णय त्यांनी घेतला. जनता ऐवढी असंतुष्ट असताना प्रशासनाने आमच्याकडुन ही अपेक्षा करावी की आम्ही गप्प बसावे? कार्यसूचीवर इतर जे विषय आहेत ते ऐवढे गंभीर नसताना देखिल घेतले आहे. कर विभागामुळे पुर्ण जनता त्रस्त झाली आहे. म्हणुन आम्ही तो विषय आणला व सभेची मागणी केली तर आचारसंहितेचा तुम्ही बहाना केला. आमचा सरळ सरळ आरोप आहे की ही जी करवाढ प्रशासनाने केली आहे. त्याला सत्ताधारी पक्षाचे देखिल समर्थन होते. त्यांना विश्वासात घेवूनच ही करवाढ केली असेल. ज्यात-हेने अंदाजपत्रक मंजुर करताना सत्ताधारी पक्षाने जनतेला ज्या त-हेने भारावण्याचा प्रयत्न केला की आम्ही करामध्ये काही वाढ केली नाही. परंतु अशारितीने कर विभागात मागच्या दाराने दहा पटीने करवाढ करण्यात आली आहे. लोकांची छळवणुक केली

आहे, त्याबाबतीत आम्हाला विरोध करायचा होता, विचार विनिमय करायचा होता. परंतु अशा सभेसाठी तुमच्याकडे वेळ नव्हता आचारसंहितेचा बहाणा होता. मग आज ऐवढे कोणते मोठे गंभीर विषय होते की तुम्ही ही सभा बोलावली आहे. आम्हाला यात पण असा संशय येतो की, तुमच्या पक्षाअंतर्गत जे पण काही राजकीय बाबी होतात. ते तुम्ही सिध्द करण्यासाठी तुमच्या महासभेचे जे अधिकार आहेत त्याचा गैरवापर करत आहात. आणि पुर्ण महासभेला त्यामध्ये गुंतवु इच्छिता असा आमचा सरळ सरळ आरोप आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आता आम्ही जो विषय ठेवला आहे. ''जाना था जापान पहुँच गए चीन'' तर मेहरबानी करून आम्ही सभा स्थगित करणे विषयी बोलत आहोत. त्याविषयावर बोलावे. सत्ताधारींचा पाठींबा आहे. हे विषय सोडुन बोलत आहेत. मग सभा स्थगित करून फायदा काय? सभा स्थगित करण्यासाठी पण एक तास लागतो? तर माझे असे मत आहे की आम्ही २८ तारखेपर्यंत सभा स्थगित करण्याविषयी बोलत आहोत त्यावर निर्णय घेतला जावा. आणि जे गटनेता सभागृह नेता विरोध पक्ष नेता यांचे जे काही पत्र आले आहे ते २८ तारखेला वाचण्यात यावे. आमची हरकत नाही. तसेच सर्व सदस्यांचे अभिनंदन करू इच्छितो की आमच्या भाभी श्रीमती. ज्योती कालानी ह्या पाचव्यांदा स्थायी समितीवर सभापती म्हणुन निवडुन आल्या आहेत. चांगले वातावरण शहरात आहे. सर्वजण निवडणुकीत व्यस्त आहेत. व आमच्या सदस्या श्रीमती. कमला शर्मा यांनी जी भगवान बुध्दांची प्रतिमा आणली आहे त्यास सर्व जण मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त, गटनेता हार व पुष्प घालतील. व तोंड गोड करतील. त्याआधी ही सभा स्थगित करावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. ऐडके गणपत:-</u>त्यापुर्वी सन्माननिय सदस्य श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे यांच्या मातोश्री चंदभागा हरीभाऊ लिंगे यांचे दोन दिवसापुर्वी निधन झाले आहे. तरी त्यांच्या आत्त्म्यास चिरंशांती लाभण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन त्यांना श्रध्दांजली वाहण्याची कृपा करावी.

<u>मा. महापौर:-</u> सर्व सदस्य व सदस्यांना, उपमहापौर, आयुक्त, सचिव साहेब यांना विनंती करते की, माझ्या मुलीचे लग्न २२ एप्रिल २००४ रोजी गोलमैदान येथे असुन आपण सर्वांनी आर्शिवाद दयावे म्हणुन आमंत्रण देत आहे. धन्यवाद.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>मा. सदस्य श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे यांच्या मातोश्रींना श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी कृपया सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन मौन पाळावे.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. गणपत ऐडके.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

मा. सदस्य श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे यांच्या मातोश्री श्रीमती. चंदभागा हरीभाऊ लिंगे यांचे दिनांक १८.४.२००४ रोजी नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.१</u> <u>दिनांकः-१९.४.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती. चंदभागा हरीभाऊ लिंगे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांच्या आदेशान्वये मी तुम्हाला सूचना देवू इच्छितो की, गौतम बुध्द ..........

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>एक मिनिट, आम्ही जी मागणी केली आहे की तुम्ही आम्ही मागणी केली असताना सभा बोलावली नव्हती. आणि आज हेतुने सभा बोलावली या निषेधार्थ आम्ही या सभेतुन वॉक आऊट करतो. आम्हाला या सभेत बसायचेच नाही.

अशात-हेने महासभेत उपस्थित भाजपा, शिवसेनेचे सदस्य सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. महापौरः-</u>कुणीही नगरसेवक जाऊ नये, माझ्या मुलीच्या लग्नाची निमंत्रण पत्रिका घेवून गेले तर बरे होईल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. सदस्य श्रीमती. कमला शर्मा यांना मा. महापौरांनी परवानगी दिली आहे की, त्यांनी जी गौतम बुध्द यांचे जे तैलचित्र आणले आहे त्याची स्थापना करावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आपले आपलेच असतात निमंत्रण पत्रिका घेण्यासाठी आम्ही थांबलो आहोत ते निघुन गेले.

इकडे सर्वांनी मंचावर जावुन गौतम बुध्द यांच्या तैलचित्राची स्थापना करून पुष्पहार घातले.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे. मा. महापौरांनी ही सभा आपल्या सर्वानुमते दि. २८.४.२००४ पर्यंत स्थगित केली आहे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज दि. २८.४.२००४ पर्यंत स्थगित केल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:-२८/४/२००४

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/४/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दि. १९.४.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यांत आली होती सदर सभेचे कामकाज स्थगित करून पुढे ढकलण्यांत आल्याने सदरची सभा स्थगित करून बुधवार दि. २८.४.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ३. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३८. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ६. | श्री. वाघे शामु बाबु | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ७. | श्रीमती. सीमा मोकल | ४०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ४१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १०. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| ११. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. अंकुश म्हस्के |
| १४. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. चौधरी राजेंद |
| १५. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| १७. | श्रीमती.गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| १८. | श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| १९. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्रीमती. किरण माखिजा |
| २०. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २१. | श्री. शांताराम निकम | ५४. | श्री. नरेंदकुमार केवलराम ठाकुर |
| २२. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५५. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५६ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५७. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २६. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्री. बहरानी मोहन |
| २८. | श्री. मोहन साधवानी | ६१. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| २९. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्रीमती. खिलनानी भावना | ६४. | श्री. हरदास माखिजा |
| ३२. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३३. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ६६. | श्री. वदरीया राजेश |
| ३४. | श्री. रमेश महादेव चव्हाण | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, २. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ३. श्री. यादव लालबिहारी बुझारत,४. श्री. नाना आनंदा पवार,५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा,६. श्री. सुरेश नामदेव गायकवाड,७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण,८. श्री. दर्शनसिंह खेमाणी,९. श्री. बोडारे धनंजय बाबूराव,१०. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण,११. श्रीमती. भटीजा कोमल अमृत,१२ श्री. जयसिंघानी अनिल, १३. श्री. बेहरानी ठाकुरदास, १४. श्रीमती जया साधवानी हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u> मा. महापौर महोदया व सभागृहात उपस्थित असलेले सर्व सदस्य, आम्ही मागील बैठकीत दि. १९.४.२००४ ला बैठक चालु होती तेव्हा सांगितले होते की, यापुर्वी आम्ही २६ फेब्रुवारीला मालमत्ता करवाढ मागे घेण्यासाठी

विशेष महासभा बोलाविण्याची मागणी केली होती. आपणांस १९ सदस्यांनी स्वाक्षरी करून त्याबाबतची सूचना दिली होती. आपण जोपर्यंत निवडणुकीची आधिसूचना येत नाही तोपर्यंत वाट पाहिली, कारण आपणांस त्यावेळी माहित होते की लोकसभेची निवडणुक येणार आहे म्हणुन आपण थांबलात व अधिसूचना निघाल्यानंतर आपण आम्हाला उत्तर दिले की, आता आचारसंहिता चालु झाली आहे त्यामुळे बैठक ठेवू शकत नाही. त्यानंतर १९ तारखेला बैठक बोलाविण्यात आली तर ती बैठक आपण कशी काय आयोजित केली? मी मागिल बैठकीत देखिल याबददल बोललो होतो. इतरत्र कोणत्त्याही महापालिकेत बैठक आयोजित करण्यात आली नाही तर आपण ही बैठक बोलावत असाल तर आम्ही मागणी केलेली बैठक देखिल व्हावयास हवी होती. आता जोपर्यंत मालमत्ता करवाढ मागे घेण्याबाबत आमची जी मागणी होती त्याबददल जोपर्यंत तुम्ही बैठक आयोजित करत नाही तर तोपर्यंत आम्ही कोणत्त्याही बैठकीत सहभाग घेणार नाही व आपणांस देखिल बैठकीचे कामकाज चालवु देणार नाही. आमची ही भुमिका यापुर्वीही होती व आजही आहे. मालमत्ता करवाढी बाबत जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत आम्ही आपणांस बैठक चालवु देणार नाही. आपण लोकांवर अन्याय केलेला आहे त्याचा आधी निर्णय व्हायला हवा. आपण आधी आम्ही मागणी केलेली बैठक आयोजित करा व त्यानंतर ही बैठक ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब घरपट्टी कर मोठ्या प्रमाणावर उल्हासनगर शहरातील नागरिकांवर लादण्यात आलेला आहे. घरपट्टी कर हा कमी करण्यात यावा. अथवा जो अगोदर होता तोच ठेवण्यात यावा अशी आमची मागणी असताना सुध्दा या उल्हासनगरमध्ये स्वतःच्या मालकी घरामध्ये रहात असताना देखिल येथील नागरिकांना भाडोत्री म्हणुन रहावे लागणार आहे. अशी उल्हासनगर शहरामध्ये चर्चा असताना अनेक नागरिकांनी आमच्याकडे तक्रारी केल्या आहेत. म्हणुन आम्ही भारतीय जनता पार्टी व शिवसेनेच्या वतीने आपल्याला एक निवेदन दिले होते त्याद्वारे आपल्याला कळविण्यात आले आहे की, उल्हासनगर शहरामध्ये घरपट्टीकर हा कमी करण्यात यावा यासाठी बैठक घेण्यात यावी. आम्ही असे सांगितल्या नंतर सुध्दा आपण आम्हाला ती बैठक बोलावु दिली नाही व दुस-या विषयावर याठिकाणी महासभा घेत आहात. याचा आम्ही याठिकाणी विरोध करीत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>महापालिकेतील एक तृतीयांश सदस्य बैठकीची मागणी करतात व आपण बैठक आयोजित करीत नाही हा लोकशाहीचा अपमान आहे. बैठक बोलाविण्याचा आमचा अधिकार आहे. तुम्ही आम्हाला ऐवढया सहजतेने घेवू शकत नाही. जर असा कारभार चालला तर आम्ही आपणांस सोडणार नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आचार संहितेच्या कालावधीत सभा बोलविण्यात येवू नये असे बंधनकारक नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आम्ही देखिल हेच सांगत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>याचा अर्थ साफ आहे की आपण आपल्या मनमर्जीने येथिल कारभार चालवित आहात. तुम्ही तुमच्या इशा-याने काम करीत आहात.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>प्रथम सचिव साहेबांना पुर्ण बोलु तर दया.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सन १९९८ मध्ये ब-याच महानगरपालिकेच्या सन्माननिय सदस्यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती की, वर्षभरात ब-याच महापालिकांमध्ये बारा सभा देखिल होत नाहीत, महिन्याला एक सभा देखिल होत नाही. तर त्यावेळी मा. श्री. नंदलाल साहेब जे नगरविकास सचिव होते त्यांनी

सर्व महानगरपालिकांकडुन माहिती मागविली होती की, आपल्या महापालिकेत गेल्या पाच वर्षात किती महासभा घेण्यात आलेल्या आहेत. त्यांनी तसे पत्र देवुन आमच्या कडुन माहिती देखिल घेतली होती. सर्व महापालिकांनी आपआपला अहवाल दिला होता व त्यानंतर १९९८ मध्ये जेव्हा लोकसभेची निवडणुक घोषित करण्यात आली. तेव्हा शासनाकडुन परिपत्रक व निर्देश आले होते की, आचारसंहितेच्या कालावधीत महासभा बोलाविण्यात येवू नये असे आयोगाचे कुठेही निर्देश नाहीत. महासभा न बोलविणे बंधनकारक देखिल नाही. आपण महासभा आयोजित करू शकता. फक्त धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. शासनाकडुन जे पत्र आले होते त्याची प्रत आपणांसर्वांना २८/४/२००४ रोजी जी तहकुब सभासूचना होती त्यासमवेत दिलेली आहे. त्यामध्ये देखिल लिहिले आहे की, धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. सभा आयोजित करण्यास काही हरकत नाही. जोपर्यंत आपण करवाढीबददल बोलत आहात. तर हा विषय आचारसंहितेच्या कालावधीत घेतला असता तर तो एक धोरणात्मक निर्णय झाला असता. त्यामुळे मतदारांवर त्याचा प्रभाव पडु शकला असता. यामुळे मा. महापौरांनी आचारसंहितेच्या कालावधीत महासभा आयोजित न करण्याचा निर्णय घेतला व दुसरे एक कारण म्हणजे मालमत्ता करात जी वाढ झालेली आहे त्याचे कारण असे आहे की, यापुर्वीचे कर निर्धारण मुल्य व आताच्या मुल्यात बराच फरक आहे. कर निर्धारण मुल्य वाढविल्याने मालमत्ता करात वाढ झालेली आहे. आम्ही मालमत्ता कराच्या दरात कोणतीही वाढ केलेली नाही. कर योग्य मुल्याचे निर्धारण करण्याची जबाबदारी ही मा. आयुक्तांची आहे ते यासाठी सक्षम आहेत. या दोन कारणामुळे आपण जी बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती तीचा मा. महापौरांनी स्विकार केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>माझ्याकडे याचे उत्तर आहे. एक तर मी आपले म्हणणे स्विकार करतो की, आपणांस येथे धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. परंतु बैठक आयोजित करून महापौर महोदया येथे सांगु शकल्या असत्त्या की, आज येथे धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही त्यामुळे सदरची सभा स्थगित करून नंतर घेण्यात येईल. आपण कमीत कमी बैठक तर आयोजित करू शकला असता? सभा ठेवणे हे आपले कर्तव्य होते परंतु आपण असे न करता सभागृहाचा अपमान केलेला आहे. जेव्हा आम्ही बैठक बोलाविण्यासाठी सूचना दिली
होती त्यावेळी आचारसंहिता नव्हती. महापौरांचे कर्तव्य होते बैठक बोलाविण्याचे, बैठकीत आपण सांगु शकला असता की, आचारसंहिता आल्याने आपणांस धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही आपण बैठक पुनश्चः कधीतरी मे महिन्यात ठेवू. बैठक बोलाविणे हे आपले कर्तव्य होते. तुम्ही तुमची जबाबदारी टाळु शकत नाही. कोणत्त्याही परिस्थितीत आपण बैठक आयोजित करायला हवी होती. व दुसरे असे की आपण कर निर्धारण मुल्याबददल सांगता की, हा आयुक्तांचा अधिकार आहे तर मी हे मानण्यास तयार नाही. अनाधिकृत बांधकाम तोडणे हे आयुक्तांचे कर्तव्य असतानाही याबाबत विशेष महासभा बोलावतो त्यावर चर्चा करतो. आपण निवडुन आलेले प्रतिनिधी आहोत, चर्चा करणे हे आपले कर्तव्य आहे. मी पुन्हा एकदा सांगतो अनाधिकृत बांधकाम तोडणे हे आयुक्तांचे कर्तव्य असताना देखिल आपण त्यावर बैठक आयोजित करून चर्चा करतो. तर या कर निर्धारण मुल्याच्या मुददयावर येथे चर्चा का नाही करू शकत? आपण असे करून सभागृहाचा अपमान केला आहे. आम्ही विरोधी पक्षातील जे सदस्य येथे बसलेलो आहोत त्या सर्वांचा आपण अपमान केला आहे. आम्ही आमचा असा अपमान सहन करणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, तुम्ही म्हणता मालमत्ता कराच्या मुददयावर आचारसंहितेच्या कालावधीत बोलल्यास त्याचा फायदा कुणाला तरी होईल. तर साहेब तुम्ही मागील बैठकीत गौतम बुध्दांचा फोटो लावला तो तुम्ही एका समाजाला खुश करण्यासाठी लावला की नाही? हा आचारसंहितेचा भंग नाही का? हे तुम्हाला चालते, भगवान गौतम बुध्दांचा फोटो लावण्यास माझा विरोध नाही परंतु तुम्ही एका समाजाला खुश करण्यासाठी हे करता अथवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u> या विषयाबाबत मी बोलु इच्छितो की, गौतम बुध्द हे कुण्या एका समाजाचे नाहीत तर ते आपले हिंदुस्थानातील सर्व हिंदु समाजाचे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>हिंदु समाजाचे आहेत ना? म्हणजेच तुम्ही हिंदु समाजाला खुश करण्यासाठी हे करीत आहात.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>हिंदु समाजामध्ये सर्वच आले ना? यामध्ये फक्त आर.पी. आय. व अन्य कोणी असे नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आम्ही नाव घेतले नाही की, आर.पी. आय., शिवसेना अथवा युपीपीचे. यामध्ये पक्षाचा संबंध येतो की समाजाचा संबंध येतो.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>गौतम बुध्दांसारखे जे देव आहेत ते सर्व जातींच्या वर आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आम्ही आपल्याकडुन उत्तर मागितले नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी मी हे बोलु इच्छितो की गौतम बुध्दांसारखे जे देव आहेत ते सर्व जातीं व धर्म यांच्यावर आहेत. त्यांना एखादया विशिष्ट धर्माशी जोडणे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आपणच सांगितले की ते हिंदु धर्माचे आहेत. तर हिंदु समाजाला खुश करण्यासाठी तुम्ही असे केले का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौरजी, याचे उत्तर आपण दयाल की हे देणार आहेत. तुम्ही उत्तर देण्यासाठी त्यांना प्राधिकृत केले आहे का?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आपण उत्तर देण्यासाठी त्यांना परवानगी दिली आहे का? आम्हाला उत्तर देणारे हे कोण?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आधी मालमत्ता करवाढ मागे घ्या इतर सर्व जावु दया.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मी उत्तर देत नसुन मा. महापौरांचे लक्ष वेधु इच्छित आहे की, ...........
<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आम्हाला आमच्या प्रश्नाचे उत्तर मा. महापौर महोदयांकडुनच हवे आहे तुम्ही मध्ये बोलु नका.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोराने बोलत असल्याने नेमके कोण काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>गौतम बुध्दांबाबत आपण जी चर्चा करत आहात तर मी सांगु इच्छिते की त्याबद्दल श्रीमती. कमला शर्मा यांनी मागील बैठकीत तसा प्रस्ताव पास केला होता. यासाठी मतदान घेतले नव्हते गौतम बुध्द हे सर्वांचे आहेत. आम्ही जसे आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो तसे आपण देखिल गौतम बुध्दांना मानायला हवे. आपणपण त्या दिवशी गौतम बुध्दांच्या तसबिरीला हार अर्पण केले होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-ते आमचे देव आहेत त्यामुळे आम्ही त्यांना हार अर्पण केले होते. ते आमचे देव नाहीत का?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आम्हा लोकांना पटविण्यासाठी तुम्ही असे काम केले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-गौतम बुध्दांची तसवीर लावण्यास यांची काही हरकत आहे का?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मा. महापौर महोदया आपण मालमत्ता करवाढ मागे घ्या. आपण आम्हाला आचारसंहितेचे सांगितले त्यासाठी मी तुम्हाला गौतम बुध्दांचे उदाहरण दिले. माझा त्याला विरोध नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मालमत्ता करवाढ मागे घ्या.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-गौतम बुध्द यांनी जगाला शांतीचा मार्ग दाखविला आहे... ............

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोराने बोलत असल्याने नेमके कोण काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आधी आपण मालमत्ता करवाढ का केली याचे कारण देण्यासाठी बैठक ठेवा. त्यांनतर ही बैठक ठेवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मी आपल्याला सांगु इच्छितो की, मीरा भाइंदर महापालिकेने वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द केलेली आहे दि. २२.४.२००४ च्या सामना या वृत्तपत्रात. जलवाहिनी टाकण्याबाबतची निविदा आहे. जर मीरा भाइंदर महापालिका जलवाहिनी टाकु शकते तर उल्हासनगरची महापालिका मालमत्ता करवाढ का झाली याबाबतची महासभा का बोलवु शकत नाही? जर मालमत्ता करवाढ करणे हा धोरणात्मक निर्णय असेल तर जलवाहिनी टाकणे हा धोरणात्मक निर्णय नाही का? तुम्ही सभागृहाची दिशाभुल करीत आहात.

मा. महापौरः-सचिव साहेबांनी याचे उत्तर दिलेले असल्याने यावर पुन्हा चर्चा करण्याची आवश्यकता नाही. आपण आरडाओरड करून सभागृहाचा अपमान करीत आहात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-याचे उत्तर आम्ही आपणांस दिलेले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आम्हाला येथे उत्तर असे हवे आहे की, आम्ही जो मुददा उपस्थित केला होता तो मालमत्ता करवाढीबाबत होता. ही करवाढ का केली, कोणत्त्या कायदयाने केली याची उत्तरे आपणांकडे आहेत. आपण कायदयाच्या दहा गोष्टी येथे सांगाल परंतु एक हजार रूपये कर भरणारा माणुस दहा हजार रूपये कर का भरेल याचे उत्तर लोकप्रतिनिधी म्हणुन या शहरातील नागरिकांना आम्हाला द्यावे लागणार आहे. त्याचे समाधान या महासभेत व्हायला हवे होते. सर्वात प्रथम म्हणजे याबाबत या महासभेत चर्चा व्हायला हवी होती. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमांन्वये आयुक्तांना बरेच अधिकार आहेत. जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, अनाधिकृत बांधकाम तर त्यावर येथे महासभेत चर्चा केली जाते. त्याच प्रमाणे ऐवढया मोठया प्रमाणावर कर वाढ करण्यापुर्वी येथे चर्चा करायला हवी होती. यासाठी आम्ही बैठकीची मागणी केली होती परंतु आपण आचारसंहितेचे कारण सांगुन त्या बैठकीला टाळण्याचा प्रयत्न केला. याचा निषेध यापुर्वीही आम्ही केला आहे

व आजही करीत आहोत. मालमत्ता करवाढी बाबत आधी निर्णय घ्यायला हवा व त्यानंतरच या सभेचे व इतर सभांचे कामकाज पुढे चालविण्यात येईल. तोपर्यंत आम्ही काहीही कामकाज होवु देणार नाही.

<u>शिवसेना-भाजप पक्षाचे सदस्य :-</u>रदद करा, रदद करा मालमत्ता करवाढ रदद करा असे जोरजोराने ओरडत होते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, आपण अशाप्रकारे बैठक चालविण्याचा प्रयत्न करू नका. हा शहरातील छोटया मोठया सर्व लोकांशी संबंधित प्रश्न आहे.

यावेळी शिवसेना-भाजपाचे काही सदस्य जोरजोराने घोषणा देवुन बाके वाजवत होते त्यामुळे महासभेचे कामकाज पुढे चालविण्यास संधी मिळत नव्हती .

<u>मा. महापौर :-</u> मी आपणांस यापूर्वीच याबददल उत्तर दिलेले आहे, कृपया सभागृहाचे कामकाज सुरळितपणे चालु द्या. सचिव साहेब आपण कृपया विषय क्रमांक १ चे कामकाज सुरु करावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. २३८ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

यावेळी विरोधी पक्षातील सदस्य जोरजोराने बाके वाजवीत असल्याने व घोषणा देत होते व अशा गोंधळातच प्रश्न उत्तरे वाचले जात होते.

<u>प्रश्न क्र. २३८:-</u> सन २००१ ते २००१ व २००१ ते २००३ या आर्थिक वर्षामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे जकात ठेकेदारामार्फत दंडात्त्मक जकात कर किती वसुल केला आहे?

जकात करावर दंडात्त्मक कर किती पट वसुल केला जातो?
जकात ठेकेदारासोबत महानगरपालिकेचा कर्मचारी व अधिकारी वर्ग कार्यरत आहे कुठला कर्मचारी व अधिकारी नेमका कुठला कार्यभार पाहत आहे यांची विस्तृत माहिती दयावी.

दंड आकारणी संदर्भात महानगरपालिकेने किती व कोणत्त्या व्यापा-यावर पोलिस कारवाई केली आहे?

<u>उत्तरः-</u>सन २००१ ते २००२ या आर्थिक वर्षात दंडात्त्मक जकात कर निरंक सन २००२ ते २००३ या आर्थिक वर्षात दंडात्त्मक जकात कर निंक जकात चोरी संबंधी दंडात्त्मक आकारणी करणेचे अधिकार मा. न्यायालयाचे अधिकार क्षेत्रात येतात. जकात ठेकेदारा सोबत महानगरपालिकेतर्फे प्रतिनियुक्तीवर एकूण ४० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. सोबत आदेशाची प्रत जोडली आहे. जकात ठेकेदाराकडे प्रतिनियुक्तीने दिलेले कर्मचारी यांना कामाचे वाटप जकात ठेकेदार करतात, त्यामुळे सदर कामाचे वाटप बदलत्त्या स्वरूपाचे असते.
निंरक.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २३९ हा श्री.रमेश चव्हाण यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २३९:-</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील ३३ रस्त्त्याची दुरुस्ती व रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेणेत आले होते त्यापैकी बहूतांश कामे पुर्ण करणेत आली आहेत, परंतु भाटिया चौक ते नेताजी चौक (स्वामी शांतीप्रकाश पुतळया जवळील भाग) व नेताजी चौक ते व्हीनस टॉकीज चौक पर्यंतचा रस्ता अदयापही काही ठिकाणी खराब झालेला व नादुरुस्त असून रोडचे शेजारील फुटपाथचे कामही अपूर्ण आहे तसेच आवश्यक असलेल्या ठिकाणी रस्ता दुभाजक लावणेत आलेले नाही.

तरी सदर रोडची कामे अदयापपर्यंत अर्धवट स्थितीत का आहेत? कृपया याची माहिती येत्त्या महासभेत मिळणेस विनंती आहे.

<u>उत्तरः-</u>उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील ३३ रस्ता रूंदीकरण करून डांबरीकरण करण्याची कामे हाती घेण्यात आले होते. बहुतांश कामे पुर्ण करण्यात आली आहेत. परंतु भाटीया चौक (स्वामी शांतीप्रकाश पुतळा) ते नेताजी चौकापर्यंतच्या रस्त्त्यामध्ये श्री कृष्ण अपार्टमेंट व शहनाई समोर फक्त नाली व फुटपाथचे काम बाकी आहे. उर्वरित काम पुर्ण झालेले आहे. तसेच नेताजी चौक ते विनस चौक पर्यंतच्या रस्ताचा समावेश ३३ रस्त्त्यामध्ये नव्हता, त्यामुळे त्याचा फुटपाथ व दुभाजकाचे काम हाती घेतलेले नव्हते. सदर रस्त्त्यावर पडलेले फक्त खडडे पावसाळयापुर्वी डांबरीकरणाने भरण्यात आलेले होते.

सदर नेताजी ते भाटीया चौकापर्यंतच्या रस्त्त्याचे बहुतांश काम पुर्ण करून घेण्यात आलेले आहे. उर्वरित काम लवकरच करून घेण्यात येत आहे. उपरोक्त नमुद केलेल्या नेताजी चौक विकसित करण्याच्या कामाचे स्वतंत्र निविदा कार्यवाही सार्वजनिक बांधकाम खात्त्यातर्फे करण्यात आली असुन लवकरच कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यानंतर काम सुरू करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २४० हा श्रीमती. प्रेमा खांडेकर यांचा असुन त्यांनी माघार घेतली असल्याने त्यांच्या प्रश्नाची इतिवृत्तात नोंद करता येत नाही.

प्रश्न क्र. २४१ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २४१:-</u> उल्हासनगर शहर हे अनाधिकृत बांधकामाचे माहेरघर म्हणून प्रसिध्द असून दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. अनेक ठिकाणी उघडपणे अनाधिकृत बांधकाम होत आहेत व प्रशासन मात्र डोळे झाकुन रोडयांची कातडी पांघरुन झोपलेले आहे व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग म्हणजे अनाधिकृत बांधकामांना संरक्षण देणारा विभाग अशी ख्याती पसरलेली आहे यातच श्री. शाम टी. लोकवानी, बिट निरिक्षक हे उल्हासनगर १ ते ५ मध्ये फिरून सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकामाचे बिल्डर कडुन दिवसा व रात्री तसेच सुटटीचे दिवशीही पैसे गोळा करतांना दिसत आहेत. तरी सदर बाब गंभीर स्वरुपाची असून याबाबत कारवाई करण्यास प्रशासनही डोळेझाांक व दिरंगाई करत आहे असे चित्र दिसते

स्थानिक वृत्त पत्रातुनही त्यांचेबद्दल बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. तरी त्यांची योग्य ती चौकशी करून त्यांचेवर कारवाई करण्यांत यावी. तसेच अनाधिकृत बांधकामांना मदत करणा-या व संरक्षण देणा-या सदर बिट निरिक्षकाची तातडीने बदली करण्यात यावी व खालील प्रश्नांची उत्तरे येत्त्या महासभेत मिळावी ही विनंती.
१) श्री. शाम टी लोकवानी यांचे मूळ पद कोणते?
२) त्यांना अतिक्रमण नियंत्रण विभागात काम का देण्यात आले?
३) त्यांचे विरुध्द कोणती चौकशी करण्यात आली आहे काय?

४) चौकशी नंतर पून्हा त्याच विभागात नियुक्ती करता येते काय?
कृपया वरील प्रश्नांची माहिती येत्त्या महासभेत मिळावी ही विनंती

उत्तर :-श्री. शाम टी. लोकवानी, बीट निरिक्षक उल्हासनगर १ ते ५ मध्ये फिरून सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाचे बिल्डरकडून दिवसा रात्री तसेच सुटटीच्या दिवसाही पैसे गोळा करतात. अशा प्रकारची तक्रार महापालिकेकडे प्राप्त झालेली नाही.
१ श्री. श्याम टी. लोकवानी यांचे मुळ पद लिपिक आहे.
२. महापालिकेतील आस्थापनेवर कार्यरत कर्मचा-यांच्या बदल्या प्रशासकीयदृष्टया आवश्यकतेप्रमाणे करण्यात येतात. त्यानुसार त्यांची बदली अतिक्रमण विभागात करण्यात आलेली आहे. (कार्यालयाचे दि८एप्रिल २००३ च्या आदेशान्वये)
३. श्री. श्याम टी. लोकवानी यांचेविरूध्द मा. नंदलाल समिती चौकशी अंतर्गत विभागीय चौकशी सुरू आहे.
४. मा. नंदलाल समितीच्या अहवालानुसार संबंधितांवर कार्यवाही सुरू आहे.
श्री. लोकवानी हे सुरूवातीपासुन त्यांच विभागात कार्यरत असल्याने नियुक्तीचा पुन्हा प्रश्नच उदभवत नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २४२ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

प्रश्न क्र.२४२:- उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे एकत्रित रस्ते विकास योजने अंतर्गत ३३ रस्त्यांचे नुतनीकरण रुंदीकरणाचे काम हाती घेणेत आले त्यातील डॉल्फीन हॉटेल ते शांतीनगर या रस्त्याचे ८० फुटापर्यंत रुंदीकरण करण्यात येणार होते, त्यावेळी दिलेल्या मार्किंगप्रमाणे डॉल्फीन हॉटेलला १६ फुटापर्यंत मार्किंग देण्यात आली होती परंतु आता सदर हॉटेलला फक्त २ फुटाची मार्किंग देण्यात आली आहे हे कसे घडले? सदर हॉटेल शेजारील गोरगरीब जनतेच्या झोपडपटट्या प्रथम तोडण्यात येऊन डॉल्फीन हॉटेलवर अदयापर्यंत कारवाई का करण्यात आली नाही. यामूळे गोरगरीब जनतेत संभ्रम, गैरसमज शंकाकुशंकाची चर्चा सुरु आहे तरी कृपया येत्त्या महासभेत चर्चा घडवून आणावी ही विनंती.

तसेच हॉटेलच्या बाजूच्या बंगल्याची काही हिस्सा टी.पी. प्लॉनप्रमाणे रस्त्यात आहे का?

उत्तरः-उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे एकत्रित रस्ते विकास योजने अंतर्गत ३३ रस्त्यांचे नुतनीकरण रूंदीकरणाचे काम हाती घेणेत आले. त्यातील डॉल्फीन हॉटेल ते शांतीनगर या रस्त्याचे ८० फुटापर्यंत रूंदीकरण करण्यात येणार होते. डॉल्फीन हॉटेल हे सर्व्हे नं.१८१ हा असून हा सर्व्हे नं. त्याच्या मालकीचा आहे त्या सर्व्हे नं. १मधुन ८० फुट रस्ता जात आहे त्याने त्यावेळी बांधकाम परवानगी घेतली असता ८० फुट रस्ता सोडुन बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. ज्या वेळी रस्ता रूंदीकरणाचे मार्कींग देण्याचे काम चालु केले त्यावेळी डॉल्फीन हॉटेल मालकाने मंजूर नकाशे व कागदपत्र वास्तुस्थिती दाखवून समाधान केले होते नंतर त्याप्रमाणे ८० फुट रस्ता नुसार मार्कींग देण्यात आली होती.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २४३ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे

प्रश्न क्र.२४३:-सार्वजनिक बांधकाम विभागांत जेवढे उप-अभियंता कनिष्ठ अभियंता आहेत त्यांची प्रथम नेमणूक कोणत्या विभागांत झाली होती?

उत्तरः-सार्वजनिक बांधकाम विभागातील उप-अभियंता, कनिष्ठ अभियंता हे अभियांत्रिकी स्थापत्य पदवी/पदविका धारण करित असल्याने त्यांची प्रथम नेमणुक सार्वजनिक बांधकाम विभागात करणेत आली होती.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २४४ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे

प्रश्न क्र.२४४:- सुवर्ण जयंती योजनेत जो अपहार आला होता त्याचा निकाल काय लागला? त्याची सध्याची स्थिती काय आहे?

त्याची चौकशी कोणाविरुध्द चालु आहे व सध्या स्थिती काय?

उत्तरः-सन २००१ मध्ये सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत झालेल्या अपहारासंबंधी तात्कालीन प्रभारी प्रकल्प अधिकारी श्री. विलास सोनवणे व कनिष्ठ अभियंता श्री. अनिल जयसिंगानी हे निलंबित असून त्यांचे विरूध्द विभागीय चौकशी सुरू आहे.

तसेच सदर प्रकरणात मध्यवर्ती पोलिस स्टेशन उल्हासनगर येथे गुन्हा रजि. नंबर I १०/२००१ अन्वये गुन्हा दाखल असुन, त्यासंबधाने मा. प्रथम वर्ग सह दिवानी न्यायालय उल्हासनगर यांचे न्यायालयात प्रकरण केस नंबर ९०१/२००१ अन्वये न्यायप्रविष्ठ असून प्रलंबित आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २४५ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे

प्रश्न क्र.२४५:- दुस-या टप्प्याचे रुपये ४४ लाख आले आहेत ती कामे कधी चालू होणार?

महाराष्ट्रातील सगळया मनपा.न.पा. मध्ये सुवर्ण जयंती योजना चालू आहे . आपल्याकडे बंद का? याचा खुलासा व्हावा.

तरी आपण या बाबत संबंधित अधिका-यास येत्त्या महासभेत उत्तरे देणेसाठी सुचना करावी.

उत्तरः-सामान्य/का.३/टे-२/न.पा./एस.आर/४७, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे दि. २०.१०.२००३ च्या पत्रानुसार १८ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाले बाबतचे पत्र आपल्या कार्यालयास दि.२९.१०.२००३ ला प्राप्त झालेले असून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत नागरी मजूर रोजगार योजनेची कामे त्वरीत हाती घेण्यात येत आहेत.

नागरी मजूर रोजगार योजना वगळता सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे अन्य घटकांतर्गत योजना उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कार्यान्वित आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- प्रश्न क्र. २४६ हा श्री.रामदास उमाप यांचा आहे

प्रश्न क्र.२४६:- जकात ठेकेदारास आपण घालुन दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे काम करत आहेत का?

मध्यवर्ती जकात नाका हलवणेचे करारानुसार त्यांना मान्य असतांना अद्याप हलवण्यात आलेला नाही. याला जबाबदार कोण? याचा अर्थ सदर ठेकेदार अटी व शर्तीचे पालन करत नाही म्हणून त्यांचा ठेका रदद (कॅन्सल)करण्याची कार्यवाही केली का? नसेल केली तर का करत नाही व करणार असाल तर किती दिवसात करणार?

काही मा. सदस्यांना आपण वरील संदर्भात जे उत्तरे देतात त्यावर प्रशासन खरे उतरले आहे का?

रस्त्यातील रहदारीवर अडचण, सार्वजनिक बागेतील नागरीकांची कोंडी व असुविधा यास प्रशासन जबाबदार नाही का? आपण आजपर्यंत मध्यवर्ती जकात हलवणेचे काय प्रयत्न केले व जकात किती दिवसात हलवणार?

<u>उत्तरः-</u>होय.

मध्यवर्ती जकात नाका स्थलांतर करणे हे करारानुसार त्यांना मान्य असुन त्याबाबत त्यांचेकडुन कार्यवाही सुरू करणेत आली आहे. परंतु जिथे स्थलांतर करावयाचे आहे त्या ठिकाणी काही असुविधेबाबत प्रशासनाकडुन पुर्तता करणेची कार्यवाही सुरू आहे. पुर्ततेनंतर स्थलांतर करणेत येईल. त्यामुळे ठेका रदद करणेची कार्यवाही करणे योग्य होणार नाही. प्रशासनाकडुन सर्व प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत.

रस्त्यातील रहदारीस अडचण, सार्वजनिक बागेतील नागरिकांची कोंडी व असुविधा लक्षात घेता जकात नाका हलविणेसाठी महापालिका प्रशासनाने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

१. जकात निविदेमध्ये नाक्याचे ठिकाण बदललेले आहे.
२. सदर बदललेल्या ठिकाणी नाका स्थलांतरित करणेसाठी दि. २५.८.०३ व २.९.०३ रोजी संबंधीत ठेकेदारास आदेश देण्यात आलेले आहे. तथापि त्यांनी दि. ८.९.०३ रोजी दिलेल्या पत्रानुसार बदललेल्या ठिकाणी सर्व सुविधा पुरवून तात्काळ नाका स्थलांतराची कार्यवाही करून घेण्यात येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २४७ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे

<u>प्रश्न क्र.२४७:</u>- उल्हासनगरातील कोणालाही ब्लॉक / बॅरेक मधील दोन रुमपैकी एकच रुम विकसित करावयाचा असेल तर दोहोंमधील सामाईक भिंत, सामाईक सेप्टीक टॅक वा इतर सामाईक बाबींबाबत बांधकाम आराखडा मंजुर करतांना प्रशासन कोणता निर्णय घेते?
एकाच रुमचा बांधकाम आराखडा मंजुर करण्यापूर्वी लगतच्या दुस-या रुम मालकाची लेखी संमती आवश्यक आहे काय?

<u>उत्तरः-</u>ही शहरातील मोठी समस्या असून अशया प्रकरणांबाबत महानगरपालिकेत ब-याच तक्रारी प्राप्त होतात, व दोन पैकी एकच रूम विकसीत होत असेल तर लगतच्या जुन्या बांधकामास सामाईक भिंतीमुळे पाणी झिरपणे, गिलावा निघणे, बांधकाम साहित्य बाजूच्या जागेत पडणे अशया प्रकारचा त्रास होतो. व अशया प्रकरणी महानगरपालिका, विकासकास व त्यांचे वास्तुविशारद यांना बाजूस राहणा-या व्यक्तीस त्रास होऊ न देण्यासंबंधीची काळजी घेण्याबाबत सांगितले जाते विकास नियंत्रण नियमावजीत बाजुस राहणा-या मालकाची लेखी संमती घ्यावी अशी तरतुद समाविष्ट नाही अशा प्रकरणात महानगरपालिका समोपचाराचे धोरण ठेवून कार्यवाही करीत असेल या बाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जे शहरासाठीचे विकास नियोजन प्राधिकरण म्हणुन काम करते. त्यांना हया बाबी

निर्देशनास आणुन याबाबत नियंत्रण नियमावलीतील तरतुद करता येवू शकेल काय? याबाबत विचारणा केली आहे. याबाबत वरीष्ट नियोजक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे बरोबर बैठकीही आयोजित करून यातून मार्ग काढता येवू शकेल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २४८ हा श्री. पृथ्वी वलेचा यांचा असुन त्यांनी माघार घेतली असल्याने त्यांच्या प्रश्नाची इतिवृत्तात नोंद करता येत नाही.

प्रश्न क्र. २४९ हा श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.२४९:-</u>मि. अजित पी. सदारंगानी ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर गेव ३ मन्थस नोटीस ऑफ वॉलन्टरी रिटारमेंट टू बी इफेक्टीव्ह फॉम १.१२.२००१ ॲन्ड ॲज सच, ही वॉज टू रिटायर वीथ इफेक्ट फॉम २८.२.२००२.
अे)व्हाय द ऑफीस डीड नॉट कम्युनिकेट टू हीम अबाउट द ॲक्सेप्टंस ऑफ नोटीस ऑफ वॉलंटरी रिटारमेंट ऑन ऑर बीफोर २८.२.२००२

बी)व्हाय द लेटर ऑफ ॲक्सेप्टनस ऑफ वॉलंटरी रिटारमेंट वॉज इश्युड ऑन ३.५.२००२.
सी)हाऊ इज वॉलंटरी रिटारमेंट वॉज ॲक्सेप्टेड वीथ इफेक्ट फॉम २२.२.२००२ वेन हीज ३ मन्थस नोटीस वॉज टू बी गीवन वीथ इफेक्ट फॉम २८.२.२००२.

<u>उत्तर:-</u>(अ व ब)श्री. अजित पी. सदारंगानी जकात निरिक्षक यांचेकडील दि.२१.११.२०.०१ रोजीच्या विनंतीपत्र वजा स्वेच्छानिवृत्तीची नोटीस विचारात घेऊन त्यांना दि. ३.५.२००२ च्या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम १९८२ च्या नियम ६५ अन्वये दिर.२२.२.२००२ रोजी (म.पू)पुर्वलक्षीप्रभावाने महापालिका सेवेतुन सेवानिवृत्त करण्यात आले.क
(क)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६५ नुसार नोटीसीच्या दिनांकापासुन ९० दिवसांचा कालावधी स्वेच्दानिवृत्तीसाठी विचारात घ्यावयाचा असल्याने श्री. सदारंगानी यांची स्वेच्छानिवृत्ती दि.२२.२.२००२ पासुन स्विकारण्यात आली आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५० श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.२५०:-</u>इज इट नॉट टु हॅज वर्कड वीथ कॉरपोरेशन ॲज ऑक्ट्रॉय इन्स्पेक्टर टील १२.३.२००२ ॲन्ड ग्रॅन्टेड लीव वीथ इफेक्ट फॉम १३.३.२००२ अप टु २५.२००२. ही वॉज पेड वेगस अप टू ३१.३.२००२ देन हाऊ द ऑर्डर ऑफ ॲक्सेप्टंन्स ऑफ हीज वॉलंटरी रिटारमेंट वॉज डीसाईडेड ॲज ऑन २२.२.२००२.
अे) वेदर द ॲडमिनिस्ट्रेशन पास द ऑर्डर विदआऊट रीफरींग टू ॲप्लीकेशन ॲन्ड रेकॉर्ड?
बी)हु इज टु बी हेल्ड रिस्पॉन्सीबल?

सी)व्हाट शुट बी डेट ऑफ रिटारमेंट?

<u>उत्तर:-(अ)</u>स्वेच्छानिवृत्तीची नोटीस दिल्यानंतर संबंधित कर्मचा-यांचा नोटीसीचा ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर सेवेतुन सेवानिवृत्त होतात. तसे आदेश काढले नसले तरी कर्मचा-यांनी सेवानिवृत्तीची नोटीस पर घेतली नसेल तर सदर नोटीसीचा कालावधी संपल्यानंतर सेवेतुन निवृत्त होतो. तसे आदेश पूर्वलक्षीप्रभावाने काढले जातात.

*ब)या प्रकरणी प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला आहे त्यामुळे श्री. सदारंगानी याचा स्वेच्छानिवृत्तीचा आदेश पुर्वलक्षीप्रभावाने काढला आहे.*
*क)त्यांची सेवानिवृत्तीचा दि. ११.१.२००१ (म.पू)हाच आहे.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५१ श्री. मोहन वेहरानी यांचा आहे.*

*<u>प्रश्न क्र.२५१:-</u>व्हाय ही वॉज नॉट बीइंग टू पेड मंन्थली पेन्शन अमाऊंट डीस्पाईट हीज ॲक्सेप्टंन्स ऑफ वालंटरी रिटारमेंट?*

*ओ) व्हाय ही हॅज बीन डीप्रीव्हाइड ऑफ मंन्थली पेन्शन सिन्स लास्ट वन यिअर?*
*बी)हु इज टू बी हेल्ड रिस्पॉन्सीबल?*
*सी)व्हाय हीज ग्राच्युटी अमाऊंट हॅज नॉट बीन पेड टू हीम?*

*<u>उत्तर:-</u>श्री. सदारंगानी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८१ नियम १३० अन्वये त्यांना निवृत्तीनंतरचे अनुज्ञेय फायदे देण्यात आले आहेत.*

*त्यांचे विभागीय चौकशीचे प्रकरणी अंतिम कार्यवाही करून त्यांचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५२ श्रीमती. जयश्री सुर्वे यांचा असुन त्यांनी माघार घेतली असल्याने त्यांच्या प्रश्नाची इतिवृत्तात नोंद करता येत नाही.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५३ श्रीमती. जयश्री सुर्वे यांचा आहे.*

*<u>प्रश्न क्र.२५३:-</u> कंवारामचौक ते अमन टॉकीज रोडवर संतोषीमाता मंदीरामागे उल्हासनगर-३ तळमजला अधिक तीन माळयाचे बांधकाम मा. पोखरकर साहेब आयुक्त असतांना अनाधिकृत बांधकाम ठरवून दोन वेळा तोडले सदर जागी पुर्वी प्रमाणेच बांधकाम पुर्ण करण्यात आले असून आणखी एक माळा वाढविणेत आला आहे. सदया आतील अंतर्गत काम चालु आहे. तरी कृपया खालील प्रश्नांची माहिती दयावी.*
*१) सदर इमारतीस बांधकामाची, दुरुस्तीची परवानगी दिली आहे काय?*
*२) बेकायदेशीर इमारतीचे अचानक कायदेशीर इमारतीत रुपांतर कसे झाले?*
*३) सदर काम आपल्या मंजुरीने चालले आहे काय? असल्यास अधिकृत असल्याबाबत पुरावे दयावे.*
*अथवा सदर बांधकाम अनाधिकृत असल्याची चौकशी करुन त्वरीत कारवाई व्हावी ही विनंती.*
*<u>उत्तर:-१</u> सदर इमारतीस तळमजला अधिक तीन माळयाची परवानगी दिली आहे.*

*२. जादा बांधलेल्या मजल्यास परवानगी दिली नसल्याने ते कायदेशिर रूपांतर झालेले नाही.*

*३. वर नमुद केलेले जादा बांधकाम आयुक्तांचे मंजुरी नुसार झालेले नसलेने अनाधिकृत आहे. अनाधिकृत बांधकामाच्या सर्व भिंती निष्कासित केलेल्या आहेत. स्लॅब चे निष्कासन सुरू आहे.*

*प्रश्न उत्तरे चालु असताना देखिल विरोधी पक्षातील सदस्यांचा आरडा ओरडा सुरु असल्याने पुढील प्रश्न घेण्यात आले नाहीत व अशा प्रकारे एक तासाचा प्रश्नोत्तराचा कालावधी संपुष्टात आला.*

<u>मा. महापौर :-</u> माझ्याकडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे सुचना आलेली असुन त्यांनी श्री किशोर वनवारी यांची सभागृह नेता म्हणुन नियुक्ती केलेली आहे. सदरची सुचना मी मान्य करीत असुन त्यांची सभागृह नेता म्हणुन नियुक्ती करीत आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे गटनेते म्हणुन श्री दिलीप लालवानी यांची नियुक्ती करणेबाबतची सुचना माझ्याकडे आले असुन त्यांची सुचना मी मान्य करीत आहे. त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे श्री मोहन वेहरानी यांची गटनेता म्हणुन नियुक्ती करणेबाबत माझ्याकडे सुचना आलेली असुन सदरची नियुक्ती मी मान्य करीत आहे. त्याचप्रमाणे रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया तर्फे श्री प्रमोद टाले यांची नियुक्ती करणेबाबतची सुचना माझ्याकडे आली असुन त्यांची नियुक्ती मी मान्य करीत आहे.

यांनतर मा. महापौरांनी श्री किशोर वनवारी, श्री मोहन वेहरानी, श्री दिलीप लालवानी व श्री प्रमोद टाले यांना व्यासपीठावर बोलावुन हार व पुष्पगुच्छ देवुन सर्वांचे अभिनंदन व स्वागत केले.

<u>मा. महापौर :-</u> सचिव साहेब विषय कमांक २ वाचुन दाखवा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषयः- मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०१/२००४, १६/०२/२००४ व १६/०३/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

यावेळी सत्ताधारी पक्षातील बहुसंख्य सदस्य हाताच्या इशा-याने विषय पास करा, विषय पास करा असा इशारा करीत होते.

<u>मा. महापौरः-</u>दिनांक १९.१.२००४, १६/०२/२००४ व १६/०३/२००४ चे इतिवृत्त जसे आहे तसे बहुसंख्य सदस्यांचे मत आजमावुन कायम करण्यात येत आहे.

**यावेळी विरोधी पक्षातील सदस्य जोर जोराने आरडाओरडा करीत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते .**

<u>मा. महापौर :-</u> सचिव साहेब विषय क्रमांक ३ वाचावा.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्रमांक ३ वाचुन दाखवितात.

विषयः- श्री. विजय दा. गोसावी, महापालिका स्थायी कर्मचारी यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये खटला भरण्यास मंजुरी देणे.

यावेळी विरोधी पक्षातील सदस्य जोरजोराने घोषणा देवुन बाके वाजवित होते.

यावेळी सत्ताधारी पक्षातील काही सदस्यांनी लेखी ठरावाचा प्रस्ताव सचिवांकडे सादर केला व सादर केलेला प्रस्तावित ठराव पारित करण्यासाठी सत्ताधारी सदस्य हात वर करून इशारा करीत होते.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा ठराव पुढीलप्रमाणे बहुसंख्य सदस्यांचे मत आजमावुन संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. विजय दामोदर गोसावी कनिष्ठ अभियंता हे उल्हासनगर महानगरपालिकेत १९७८ पासून सन २००२ व २००३ सुवर्ण जयंती रोजगार हमी योजना २) प्रभारी मालमत्ता व्यवस्थापक पदाचा ३) प्रभारी कनिष्ठ अभियंता अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागात कार्यरत असतांना दिनांक ११.९.२००३ रोजी श्री. हरेश जयसिंग साधवानी यांनी ठाणे ॲन्टी करप्शन ब्युरोकडे केलेल्या तक्रारीनुसार सदर विभागाने सेंट्रल पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर <u>१०६/२००३</u> प्र.क्र. सन १९९८ चे कलम ७,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे ११.९.२००३ रोजी २०.०० वाजता गुन्हा दाखल आहे.

सबब मा. विशेष न्यायालयात श्री. विजय दामोदर गोसावी यांचे विरुध्द खटला पाठविणेसाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१) (क) अन्वये न्यायालयात खटला दाखल करणे कामी नियुक्ती प्राधिका-याच्या मंजुरीची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मा. उप-आयुक्त/ पोलिस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सी. आर. /३६२/ठाणे/२००३/१२४० दिनांक ६.२.२००४ अन्वये संबंधित कर्मचारी यांचेवर अभियोग दाखल करणेसाठी मंजुरीची मागणी केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये उल्हासनगर महापालिका नियुक्ती अधिकारी या नात्याने सक्षम असल्याचे गोषवा-यात नमूद केले असून त्याबद्दल शिफारस करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.सी.डी.आर/१०९९/प्र.क्र. /६२/९९/११ अ दिनांक ३.४.२००० च्या भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९९८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्याबाबत असून सदर आदेशात यापूर्वीचे सर्व आदेश / परिपत्रके यांचा आढावा घेऊन निर्णय घेण्यात आला आहे. तो खालील प्रमाणे...........

सदर निर्णयात लाचलुचपत प्रतिबंधक खात्त्याकडून लाचेचा सापळा किंवा अपसंपदेच्या बहुतांशी प्रकरणी करावयाच्या तपासाच्या दरम्यान फार मोठा कालावधी विचारात घेतला जातो. कागदपत्रे व तपशीलही क्लिष्ट व मोठा असतो. या बाबी विचारात घेता सक्षम प्राधिकार्याने प्रकरण तपासतांना लक्षपूर्वक तपासणी (Application of Mind) केली किंवा नाही असा संशय घेण्यास न्यायालयाला वाव मिळू नये या दृष्टीने छाननी टप्प्यावर पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक असल्याने नमूद करुन वेळापत्रकही नमूद केले आहे.

सबब गोषवा-यात मा. आयुक्त यांनी सदर प्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाने नमूद केलेले मुददे की ज्या बाबींवरुन श्री. विजय दा. गोसावी यांचे विरुध्द गुन्हा होऊ सिध्द शकेल याबाबत सविस्तर माहिती अथवा कागदपत्रे सादर केली नसल्याने सक्षम प्राधिका-यास सदर प्रकरणी लक्षपूर्वक तपासणी करता येत नसल्यामुळे तसेच लाचलुचपत विभागास अशयाच प्रकारे या पूर्वी अभियोग दाखल करण्यास परवानगी दिली असून सर्व संबंधित कर्मचारी दिर्घकाळ निलंबित असून त्यांना निलंबन भत्ता नियमानुसार ७५ टक्के (पगाराच्या) रक्कमेइतका दयावा लागत असल्याने महापालिकेस मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागत असून त्या कर्मचा-याबददल इतर कर्मचारी कामासाठी उपलब्ध करावे लागत आहेत. तसेच सदर कर्मचा-यांना मानसिक त्रास सहन करावे लागत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आल्यामुळे सदर प्रकरणी तीन सदस्याची एक समिती स्थापन करुन सदर समितीस उक्त प्रकरणी प्रशासन कागदपत्र उपलब्ध करुन देईल व समितीने शासन निर्णयानुसार सदर प्रकरणी लक्षपूर्वक तपास करुन (Application of Mind) पुढील सर्वसाधारण सभेत निर्णयासाठी अहवाल सादर करतील व समिती मध्ये सदस्य १) श्री. राजेश वदारिया २) श्री. गणपत ऐडके ३) श्री. अंकुश म्हस्के हे तीन पालिका सदस्य असावे म्हणून महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २ दिनांकः-२८/४/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. मुलचंदानी महेंद्र

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. विजय दा. गोसावी महापालिका सेवेतील कनिष्ठ अभियंता यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा अन्वये खटला भरण्यापूर्वी वरील प्रस्तावित समिती सदस्य शासन निर्णयानुसार लक्षपुर्वक तपासणी करुन आपला अहवाल पुढील महासभेत निर्णयासाठी सादर करणेस निर्देशित करीत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहूमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. महापौर :-** सचिव साहेब विषय क्रमांक ४ वाचुन दाखवावा.

**मा. सचिव :-** विषय क्रमांक ४ वाचुन दाखवितात.

विषयः-श्री ठाकुरदास बेहरानी, महापालिका सदस्य यांना माहे फेब्रुवारी २००४ ते जुलै २००४ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी महापालिकेच्या सभांना गैरहजेरीस मान्यता देणे.

यावेळी विरोधी पक्षातील सदस्य जोरजोराने बाके वाजवुन घोषणा देत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते व हीच स्थिती पुढेही चालु होती.

**विरोधी पक्षातील काही सदस्य :-** सचिव साहेब हे काय चालले आहे? आपण असा कसा काय निर्णय घेत आहात?

**मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-**सर्व सदस्यांना येथे माहिती आहे की, महासभेचा वेळ किती मोलाचा आहे. ज्याप्रकारचे वातावरण इथे आहे त्याप्रकारच्या वातावरणात कोणताही निर्णय योग्यपणे घेता येणार नाही. जो निर्णय घ्यायचा आहे तो मा. महापौरांना घ्यावयाचा आहे. मतदान घ्यायचे अथवा नाही, विषय पास करायचा अथवा नाही हे मा. महापौरांना ठरवायचे आहे.

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही आमची भुमिका स्पष्टपणे मांडली आहे की, जोपर्यंत मालमत्ता करवाढीबाबत आपण बैठक घेत नाही तोपर्यंत आम्ही बैठक चालु देणार नाही.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ते आपल्या विरोधाचे कारण आहे. सभेची निती अशी आहे की, ज्या बाजुला बहुमत असेल....*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्हाला माहिती आहे की, बहुमताच्या जोरावर येथे दादागिरी केली जाते.*

**मा. सदस्य श्री. संजय भठिजा हे सभागृहातुन बाहेर गेले.**

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>सभागृहाचे मत विचारात घेतले जावे.*

*<u>मा. महापौर:-</u>याबाबत आम्ही सर्व गटनेते, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेता, स्थायी समिती सभापती या सर्वांची आयुक्तांसमवेत बैठक घेवून तोडगा काढु. येथे आरडाओरड करून फायदा नाही. आम्हाला देखिल माहित आहे की गरीब लोक जास्त कर भरू शकत नाही. ते काय खातील आणि काय कर भरतील.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आधी कर वाढीच्या मुदयावर चर्चा करा.*

*<u>मा. महापौर:-</u>आयुक्त साहेब आता इथे नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>आता जे विषय आहेत ते ऐवढे महत्त्वाचे नाहीत.*

*<u>मा. महापौर:-</u>याबाबत स्वतंत्रपणे बैठक बोलविण्यात येईल व आपल्याला तारीख कळविण्यात येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>शहरातील नागरिक कर वाढीमुळे त्रस्त आहेत.*

*<u>मा. महापौर:-</u>ही जी करवाढ केलेली आहे ती उचित नाही हे मी देखिल समजते.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापौर महोदया, आम्ही आपणांस दोन महिन्यापुर्वी हे पत्र दिले होते. आपल्याला दोन महिन्यात वेळ मिळाला नाही का?*

*<u>मा. महापौर:-</u> माझ्या मुलीचे लग्न असल्याने मी दिल्ली येथे गेले होते. याबददल चर्चा करण्यासाठी आपण स्वतंत्रपणे बैठक घेवू. त्यामध्ये सर्व गटनेते, सभागृह नेते, विरोधी पक्षनेता व सभापती स्थायी समिती, श्री. मोहन बेहरानी साहेब व आयुक्त साहेब हे असतील. आपण येथे गेल्या एक तासापासुन आरडा ओरडा करीत आहात असे केल्याने काम होत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>कर वाढीचा विषय हा फक्त चर्चेचा विषय नसुन तो बैठकीला घेण्याचा विषय आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही बैठक चालु देणार नाही. आधी आमच्या पत्रावर निर्णय घ्यावा.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>मा. महापौर महोदया, आपण धर्मसंकटात सापडल्या आहात. आपली इच्छा नसली तरी आपल्याला बैठक घ्यावी लागत आहे. आपणांस कोणाचा आदेश आहे का?आपल्याला आदेशाचे पालन करावेच लागेल.*

मा. सदस्या श्रीमती. नीता आहुजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>आपल्याला मतदान घ्यायचे नसेल तर दोन दिवसापुर्वी मतदान का घेतले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>ती लोकशाही आहे. इथे लोकशाही चालते का? आपण दोन दोन महिने बैठक बोलवत नाही. आपणांस लोकशाहीची जाणीव नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांचे असे म्हणणे आहे की, हा जो करवाढीचा विषय आहे याबाबत आचारसंहितेनंतर सर्व गटनेते सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सभापती स्थायी समिती व आयुक्त साहेब...

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही आधी पण हेच ऐकले आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आपण कृपया ऐकुन घ्यावे. त्यांचे म्हणणे असे आहे की, आचारसंहिता चालु असताना बैठक ठेवू शकत नाही. जर आपणांस असे वाटत असेल की, आचारसंहिता असताना बैठक ठेवण्यात यावी तर असे केल्यास आपण सर्व दोषी ठरू शकतो. यामुळे हा दोष कोणी घ्यावयाचा हे आधी ठरवुन घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>सचिव साहेब मी सुरवातीलाच सांगितले की, आम्ही २६.२.२००४ला पत्र दिले होते. तर त्यावेळी आपण त्याबाबत बैठक ठेवू शकला असतात. बैठकीत महापौर सांगु शकल्या असत्त्या की, धोरणात्मक निर्णय असल्याने बैठक स्थगित करून नंतर ठेवण्यात यावी. हे देखिल आम्ही मान्य केले असते. परंतु ऐवढे दिवस उलटुनही आपण बैठक ठेवली नाही हे चुकीचे आहे. आपण हा लोकशाहीचा अपमान केला आहे.
<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आजची बैठक आपण कॉग्रेस पक्षाला ब्लॅकमेल करण्यासाठी ठेवली आहे.
<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आपण बैठक ठेवावी. आपण आमचा मान ठेवायला हवा हा लोकशाहीचा मान आहे आमचा घरचा नाही.
<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>महापौर महोदया, आपण बैठक ठेवावी आम्ही कधीही येण्यास तयार आहोत.
<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>सचिव साहेब, आपण मतदान घेतले आहे ते जाहिर करावे. सभागृहनेता जो काही निर्णय होईल तो कृपया सर्वांना कळवावा.
<u>मा. महापौर:-</u>मी सर्वांना सांगु इच्छिते की, मालमत्ता करवाढीबाबतची बैठक दिनांक १५.५.२००४ रोजी आयोजित करण्यात येईल.
<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>तोपर्यंत आजची बैठक स्थगित केली जावी.
<u>मा. महापौर:-</u>आजची सभा सुरूच राहील.
<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही ही बैठक चालु देणार नाही.

यावेळी विरोधी पक्षातील काही सन्माननिय सदस्य एकाचवेळी जोरजोराने बोलत असल्याने नेमके कोण काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.

<u>मा. महापौर:-</u>मी आपणांस सांगितले की, १५ तारखेला बैठक घेण्यात येईल तरी देखिल तुम्ही ऐकत नसाल तर गोंधळ घालणा-या सदस्यांना मी १५ दिवसांसाठी निलंबित करेन.

मा. सदस्या श्रीमती. निना नाथानी, श्रीमती माया मसंद व मा. सदस्य श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आम्हाला कोण निलंबित करू शकतो?*

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या १९ सदस्यांनी श्री ठाकुर बेहरानी यांच्या रजा नामंजुरीबाबत आपली भुमिका स्पष्ट करणारे लेखी पत्र स्वाक्षरी करून मा. महापौरांकडे सादर केले.**

*<u>मा. महापौर :-</u> मी सदरचा विषय क्रमांक ४ पुनश्चः मतदानास टाकण्याचे निर्देश देत आहे.*

*<u>मा. सचिव :-</u> जे सदस्य हा प्रस्ताव नामंजुर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत.*

**<u>३३ मते :-</u>**

१ श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
३ श्रीमती. कालानी ज्योती
४ श्री. वाघे शामु
५ श्री. ऐडके गणपत
६ श्रीमती. शर्मा कमला
७ श्री. वलेचा पृथ्वी
८ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९ श्री. गुप्ता प्रभुनाथ
१० श्रीमती. गुप्ता अनिता
११ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१२ श्री. ठाकुर विनोद
१३ श्रीमती. सोनेजी मीना
१४ श्रीमती. वनवारी मोना
१५ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१६ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१७ श्री. लुंड गोविंदराम
१८ श्रीमती. खिलनानी भावना
१९ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंदसिंग
२० श्रीमती. कारीरा रेखा
२१ श्री. पमनानी ईश्वर
२२ श्री. पंजाबी नारायण
२३ श्री. रामरख्यानी मोहनदास
२४ श्री. लबाना होशियारसिंग
२५ श्री. ठाकुर नरेंदकुमार
२६ श्री. तलरेजा विनोद
२७ श्रीमती. रिझवानी सुजाता
२८ श्रीमती. छाब्रिया भारती
२९ श्रीमती. दासानी मिनु
३० श्री. म्हस्के अंकुश
३१ श्री. जाधव प्रशांत
३२ श्री. जाधव सुरेश

*कॉंग्रेस पक्षाचे सदस्य आरडाओरडयामुळे काही ऐकायला येत नाही असा इशारा करीत होते, यामुळे खालील सदस्यांनी त्यांचे मत नोंदविले नाही.*

१ श्रीमती. साधवानी मोहन
२ श्री. भालेराव गौतम
३ श्रीमती. वसिटा बेबी
४ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
५ श्री. बेहरानी मोहन

मा. महापौरांनी प्रस्तावासाठी त्यांचे अनुकूल अथवा प्रतिकूल मत दर्शविले नाही.

तसेच खालील सदस्य मतदानाच्या वेळी आरडाओरडा करित होत, त्यांनी त्यांचे मत नोंदविले नाही.

१ श्रीमती. जावळे संगिता
२ श्रीमती. मोकल सिमा
३ श्री. उमाप रामदास
४ श्री. पुरस्वानी जमनादास
५ श्री. रूपचंदानी बच्चाराम
६ श्री.राज असरोंडकर
७ श्रीमती. कृष्णानी रेखा
८ श्री. भुल्लर राजेंदसिंग
९ श्री. सोनावणे नथु
१० श्री. गायकवाड दिलीप
११ श्रीमती. वामणकर नंदिनी
१२ श्री. चव्हाण रमेश
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद
१६ श्रीमती. सुर्वे जयश्री
१७ श्री. टाले प्रमोद

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुसंख्य सदस्यांचे मत आजमावुन संमत करण्यात येत आहे.

<u>विषय:-</u> श्री ठाकुरदास बेहरानी, महापालिका सदस्य यांना माहे फेब्रुवारी २००४ ते जुलै २००४ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी महापालिकेच्या सभांना गैरहजेरीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री ठाकुर बेहरानी, महापालिका सदस्य, प्रभाग कमांक २५ यांनी दिनांक ७/४/२००४ रोजी पत्र देवुन असे निदर्शनास आणले आहे की, काही अपरिहार्य कारणांमुळे ते फेब्रुवारी २००४ ते जुलै २००४ या कालावधीत होणा-या महापालिकेच्या महासभांना उपस्थित राहु शकणार नाहीत. फेब्रुवारी २००४ पासुन झालेल्या महासभांना यापूर्वी ते अनुपस्थित राहिलेले आहेत. त्यामुळे फेब्रुवारी २००४ ते जुलै २००४ असे सलग सहा महिने महासभांना अनुपस्थित राहण्यासाठी त्यांनी परवानगी अपेक्षिलेली आहे.

<u>महासभा ठराव क्र. ३</u> <u>दिनांक:-२८/४/२००४.</u>

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ऐडके गणपत

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सदस्य श्री. ठाकुरदास वेहरानी यांना काही अपरिहार्य कारणामुळे फेब्रुवारी २००४ ते जुलै २००४ पर्यंत सलग सहा महिने सभांना गैरहजर राहण्यास मान्यता देत नाही.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

<u>बहूमताने</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा सचिव :-</u> कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष द्यावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्रौ ८. ३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांकः-१९/५/२००४

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/५/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दि. १९.५.२००४ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४३. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४५. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २०. | श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५८. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २५. | श्री. शांताराम निकम | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २६. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६०. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६२. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. मोहन साधवानी | ६५. | श्री. बहरानी मोहन |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्रीमती. खिलनानी भावना | ६८. | श्री. हरदास माखिजा |
| ३५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ७०. | श्री. वदरीया राजेश |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. सीमा चंदाराम मोकल, २ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ३. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ४. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ५. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे,६. श्री. रामरख्यानी मोहनदास,७.श्रीमती. किरण माखिजा, ८. श्री. संजय रामचंद बठीजा ९. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी, १० श्री. बेहरानी ठाकुरदास, हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ६.०० वाजता सभेला सुरूवात करण्यात आली.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांच्या अनुपस्थितीत श्री. उत्तम लोणारे हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. २५४ हा श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u> एक मिनिट. प्रश्नोत्तरास सुरूवात करण्यापुर्वी मी एक मिनिट बोलु इच्छितो, मागील सभेत माझे दोन प्रश्न राखीव ठेवले होते, २३५ आणि २३६ या क्रमांकाचे.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>नगररचना विभागाशी संबंधित आहेत ना?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-एका प्रश्नाचा क्रमांक २३५ आहे.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-होय. तो कोणत्त्या विभागाशी संबंधित आहे?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागाशी संबंधित आहे.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभाग?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-होय. त्यामध्ये आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले होते आपला प्रश्न राखुन ठेवला जाईल. पुढील सभेत त्यावर चर्चा केली जाईल. व दुसरा प्रश्न आहे २३६ क्रमांकाचा त्याबाबतीत सुध्दा आयुक्त साहेबांनी स्पष्टपणे सांगितले आहे की पुढील महासभेत या प्रश्नाचे उत्तर दिले जाईल.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-सध्या तर आयुक्त साहेब उपस्थित नाहीत. आपणांस आजच उत्तर पाहिजे आहे का?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-सचिव साहेब, जेव्हा तो प्रश्न महासभेत चर्चेस आला होता त्यावेळी प्रशासनाकडुन असे सांगण्यात आले होते की, अशा प्रकारची कोणतीही तक्रार आमच्याकडे आलेली नाही. त्यावेळी मी उभे राहुन आयुक्त साहेबांना सांगितले होते माझ्याच प्रभागातील हे प्रकरण आहे. या प्रकरणाबाबतीत ब-याचशा तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. हा प्रश्न कृपा करून पुढील महासभेत चर्चेस घेतला जावा.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-माहिती दयायची आहे ना?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-त्यावेळी सांगण्यात आले होते की, पुढील महासभेत चर्चेस घेतला जाईल. तोच प्रश्न आता येथे आला आहे.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-त्याबाबतची आपणांस माहिती दयायची आहे ना?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-माझे म्हणणे आहे की, २३५ क्रमांकाचा एक प्रश्न होता कॅम्प नं. ५ येथील व २३६ क्रमांकाचा प्रश्न श्री. राजेंद्र चौधरी यांच्या प्रभागाशी संबंधित तर आयुक्तस्थानी बसलेले प्राधिकृत अधिकारी या दोन्ही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देतील काय? शहरातील मालमत्ता या हडप केल्या जात आहेत. शहरासाठी आम्ही जे लढत आहोत त्याबाबतचा प्रश्न आहे. व महानगरपालिकेचे जे नुकसान होत आहे त्याबाबतचा प्रश्न आहे.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कोळेकर साहेब, आपणांस या प्रश्नाचे उत्तर देत आहेत.

श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-मा. सचिव साहेब, २३५ क्रमांकाचा जो प्रश्न मा. श्री. प्रमोदजी टाले यांचा आहे.

प्रश्न क्रमांक २३५ वाचुन दाखवितात.

तर यामध्ये २५ मालमत्ताधारक बाधित आहेत. आणि त्याची यादी आपणांस दिलेली आहे. नाहीतर आताही आमच्याकडे यादी आहे ती आम्ही देवू शकतो. त्याव्यतिरिक्त त्यांनी अधिक बांधकाम केले असेल याबाबतची आमच्याकडे आता काही माहिती नाही.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'</u>-मी जेव्हा प्रश्न विचारला होता तेव्हा तुम्ही २५ बांधकामांची यादी दिली होती. आता या प्रश्नास आणखी दोन महिने झाले आहेत. हा प्रश्न विचारल्या पासुन तीन चार महिन्याचा कालावधी गेला आहे. आजपर्यंत त्या विभागात २५ मालमत्ता आहेत की आणखी वाढलेल्या आहेत? रोड कटींगच्या नावाखाली कुठलीही मालकी नसताना काही बांधकामे झाली आहेत का?याबाबत तुमच्याकडे अहवाल आहेत का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>२५ मालमत्तांचीच आमच्याकडे यादी आहे. व ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'</u>-आताचे काय? या व्यतिरिक्त रोड कटींगमध्ये काही झालेले आहे का? ज्यांना झिरो कटींग मार्कींग दिली असेल त्यांनी बांधले आहे का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>झिरो कटींग मार्कींगचे बघावे लागेल. जेवढया इमारती तोडलेल्या आहेत .......

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'</u>-हा प्रश्न मी त्याच वेळेस विचारला होता. त्यावेळेस तुम्ही म्हणालात की पुढल्या वेळेस माहिती देतो. आता तीन सभा होवुन गेल्या आहेत. माझी माहिती अशी आहे की, या २५ मालमत्तांच्या व्यतिरिक्त कमीत कमी आठ-दहा मालमत्ता अशा झालेल्या आहेत की ज्यांना कुठलेही मार्कींग नसताना त्यांनी बांधकाम केलेले आहे. माझ्याकडे ही माहिती आहे परंतु तुमच्याकडे अधिकृत काय माहिती आहे. आणि अधिकृत जर माहिती असेल त्यांनी जर खरोखर तसे केलेले असेल तर तुम्ही त्यांच्यावर काही कारवाई केलेली आहे का? प्रशासनाने त्यावर काही कारवाई केली आहे का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>अदयाप पर्यंत काही कारवाई केलेली नाही. परंतु जर २५ पेक्षा जास्त असतील तर त्यावर मी कारवाई करेन.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'</u>-उदयापर्यंत होणार, त्याची मला माहिती मिळणार?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>होय.

प्रश्न क्रमांक २३६ वाचुन दाखवितात.

महात्मा फुले नगर त्या संबंधित माणसाला आम्ही (डॉक्युमेंटरी कॉल लेटर) कागदपत्र मागविण्याबाबतचे पत्र पाठविले होते. त्यांनी ते बांधकाम घेतल्याबाबतची माहिती दिली आहे. मुळ जागेची मालकी त्याच्याकडे नाही. त्यामुळे त्याला कलम ५२, ५३ नुसार ती नोटीस दिलेली असुन बांधकाम निष्कासित करण्याची कारवाई करीत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>हा जो २३६ क्रमांकाचा मी प्रश्न विचारला होता. मोकळया भुखंडावर श्री. पांडे बंधु व श्री. मिलिंद सिरीनकर यांनी अतिक्रमण करून बेकायदेशिर कब्जा केला आहे. या प्रकरणी तुम्ही जे उत्तर दिले आहे की याबाबत तुमच्याकडे कुठल्याही तक्रारी आलेल्या नाहीत हा एक भाग दुसरे तुम्ही त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, भोगवटदारीमध्ये त्यांचे नाव आहे. ते टॅक्स भरतात. माझा मुददा असा आहे की तेथे ती जागा १९८० पासुन बालवाडीसाठी राखीव होती. महानगरपालिकेने त्याजागेवर सिमेंटीकरण केले आहे. आणि हे सिमेंटीकरण झाल्यानंतर बालवाडीसाठी राखीव भुखंड असल्यावरही तिथे तुमच्या कर विभागातील काही कर्मचा-यांनी संगनमताने टॅक्स पावती काढुन दिली आहे. पहिली माझी मागणी अशी आहे की, कर विभागातील ज्या ज्या कर्मचा-यांचा यामध्ये हात असेल त्यांच्यावर एकतर ती कारवाई झाली पाहिजे. त्यांनी हे एक खोटे काम केले आहे.

दुसरा मुददा महानगरपालिकेने तिथे सिमेंटीकरण केलेले आहे. त्यावर अतिक्रमण केलेले असताना तेथील रहिवाश्यांनी जेव्हा तक्रारी केल्या तेव्हा महानगरपालिकेने तेथे निष्काशन केलेले आहे. त्याचेही माझ्याकडे फोटो आहेत. ते मी तुम्हाला देतो. महानगरपालिकेचे शहर अभियंता म्हणुन श्री. चिजवानी त्यावेळेस होते. त्यांचे स्पष्टपणे पत्र आहे की तिथे सिमेंटीकरण झालेले आहे. आणि तिसरे तिथे बालवाडीचे उदघाटन झालेले आहे. त्याचे काही फोटो आहेत. ते पण तुम्हाला देतो. आणि ऐवढे असतानाही तुम्ही मला उत्तर देता की, कोणत्त्याही तक्रारी नाहीत. आणि तक्रारी जर नसतील त्यावेळेस जर आता आम्ही पुरावे दिले तर तुम्ही ती जागा मोकळी करणार आहात का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>होय, करणार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>बालवाडीसाठी, समाजमंदीरासाठी जो प्रस्ताव आहे. त्याची तुम्ही कार्यवाही करणार आहात?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>त्या जागेच्या मालकी बाबत त्याच्याकडे काहीही कागदपत्र नाहीत. त्यामुळे त्या बांधकामाच्या निष्काशनाची कार्यवाही करण्याचे आम्ही सुरू केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>आणि त्यांनी जी टॅक्स पावती काढुन घेतली आहे ती रदद होणार आहे का? आणि टॅक्स पावती काढण्यासाठी जे जे अधिकारी त्यामध्ये सामील आहेत. त्यांच्यावर तुम्ही कारवाई करणार आहात काय?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>टॅक्स पावती काढली म्हणजे तो त्या जागेचा मालक असत नाही, त्या जागेचा भोगवटाधारक असतो. अधिकृत, अनाधिकृत बांधकाम असलेल्या जागेचीही टॅक्स पावती काढलेली असते. तरी सुध्दा हे का झाले हे आम्ही तपासतो.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>सिमेंट कॉक्रिटीकरण झालेल्या जागेची, रस्त्त्याची तुम्ही टॅक्स पावती काढता. त्यामध्ये निश्चितच तुमच्या कर्मचा-यांचा हात आहे.

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>करू तीही चौकशी करू.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>त्यांच्यावर तुम्ही कारवाई करणार आहात का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>करू कारवाई करू.

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५४ हा श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २५४:-</u> उल्हासनगर महानगरपालिका हददीतील घनकचरा वाहतूकीचे कंत्राट मे. ऐन्टोनी वेस्ट हॅन्डलींग सेल प्रा. लि. यांना देण्यात आले असून त्यांनी दिनांक १/१०/२००३ पासून कामास सुरुवात केली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नांची माहिती येत्त्या महासभेत देण्यात यावी ही विनंती.

१) सदर ठेकेदाराचे काम अटी व शर्तीनुसार सुरु आहे काय?

२) सदर ठेकेदारास अदयापपर्यंत किती रुपयेचे बिल अदा केले आहे? उर्वरित रक्कम कशी अदा करणार आहे?

३) सदर ठेकेदाराचे मदतीसाठी महापालिका कर्मचारी अधिकारी व यंत्रणा वापरण्यात आली होती त्यांचे वेतन भत्ते ठेकेदाराकडुन कापण्यात आले आहेत काय? किंवा यापूढे कापणार आहात काय?

४) शहरात जागोजागी कच-याचे ढिग असून ठेकेदाराने आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्रीचा वापर केलेला नसल्याने दंडात्मक कारवाई करणार का?

उत्तरः-१) होय, तथापि काही अटींची पुर्तता होणे बाकी आहे.

२) अदयापपर्यंत देयक अदा करण्यात आलेले नाही. मात्र निविदा सुचनेमध्ये नमुद केल्याप्रमाणे देयक अदा करणेत येईल.

३) शहर स्वच्छ ठेवणे ही प्रशासनाची सुध्दा जबाबदारी असल्याने सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी जबाबदारीच्या भावनेतून काम केलेले आहे. त्याचे वेतन व भत्ते ठेकेदाराकडुन वसूल करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

४) निविदा सुचनेतील तरतुदीनुसार उचित कारवाई करणेत येईल.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वेः-मा. महापौर, मा. आयुक्त सदरचा जो प्रश्न आहे. त्याची दिलेली उत्तरे चुकीची आहेत. माझ्या या प्रश्नाचे उत्तर कोण देत आहे?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-महापौर महोदया, हा जो २५४ क्रमांकाचा प्रश्न आहे. त्याचे जे उत्तर दिले आहे ते बरोबर दिले आहे. त्यावेळेस जे नोव्हेंबर मध्ये पेमेंट केले होते, प्रत्यक्षात पेमेंट केलेले नव्हते. परंतु आता अटी व शर्ती नुसार पेमेंट आपण करत आहोत. त्यांना जे पेमेंट केले आहे ते चुकीचे नाही त्यामुळे त्यांची पुन्हा वसुली करण्याचा प्रश्न उदभवत नाही. या प्रकरणामध्ये चुकीचे काय आहे हे जर सन्माननिय सदस्यांनी सांगितले तर त्याचा आम्ही विचार करू.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-श्री. खरात साहेब, प्रश्न असा आहे की, सदर ठेकेदाराचे काम अटी व शर्ती नुसार सुरू आहे का? त्याला उत्तर दिले आहे होय. तथापि काही अटींची पुर्तता होणे बाकी आहे. आता हया ज्या अटी शर्ती बाकी आहेत त्या कोणत्या? १.१०.२००३ पासुन कामाला सुरूवात झालेली आहे. १.१०.२००३ ते आज १९ मे. २००४ म्हणजे सात महिने पुर्ण झाले आहेत. म्हणुन आजची परिस्थिती काय आहे यातील कुठल्या कुठल्या अटींची पुर्तता होणे बाकी आहे. तुम्ही मान्य केले आहे की काही अटींची पुर्तता होणे बाकी आहे. आज कुठल्या अटी बाकी आहेत?

श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-मा. महापौर महोदया, सदर ठेकेदार.........

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आधी एकुण किती अटी होत्त्या? करारानुसार. जसे की हजेरी शेड बांधणे........

श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-मा. महापौर महोदया व मा. सचिव, करारानुसार, करारातील पान नं. ६२ वर, ठेकेदारनी काय काय केले पाहिजे. ज्या बाबींची त्यांनी पुर्तता केली त्यासाठी त्यास किती गुण दयायचे आहेत याचा उल्लेख केला आहे. एकुण १००० गुणांची आकारणी प्रत्त्येक १५ दिवसात केली जाते. ती आमचे स्वच्छता निरीक्षक, मुख्य स्वच्छता निरिक्षक व प्रभाग

अधिकारी हे अधिकारी शहरात फिरून करत असतात. या १००० गुणपैकी किती गुण ठेकेदाराने अटी शर्तीची पुर्तता करून मिळविले आहेत. त्यावर त्यास अदा करावयाच्या पेमेंटची टक्केवारी निश्चित केली जाते. आजच्या परिस्थितीला जवळ जवळ ९८ टक्के ठेकेदारांकडुन अटींची पुर्तता होत आहे. याबाबतचा आढावा प्रत्येक पंधरा दिवसात घेतला जातो. व त्यानुसार त्यांना आजच्या तारखेला पेमेंट दिले जात आहे. माहे नोंव्हेंबर महिन्यामध्ये ठेकेदाराचे काम मंदगतीने चालु होते. पहिल्या पंधरा दिवसात कामामध्ये ब-याचशा कमतरता होत्त्या. त्यांचे एक ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर पर्यंतचे पेमेंट त्यांना दिलेले नाही. आजही त्यांच्याकडुन ज्या बाबीची पुर्तता होत नाही. ते लक्षात घेवून त्यांच्या पेमेंटमध्ये कपात केली जाते.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>श्री. खरात साहेब मी फक्त अटी व शर्ती पैकी कुठली अट बाकी आहे हे विचारलेले आहे. बाकी स्वच्छता निरिक्षकांनी काय अहवाल दिला हे आमच्या श्री. दिलीप लालवानी यांनी या अगोदर सांगितले आहे की, येथे भ्रष्टाचार चालु आहे. म्हणुन स्वच्छता निरीक्षकांचा अहवाल बरोबर असेल हे आम्हाला सांगता येत नाही. म्हणुन सगळयांचाच आरोप तो आहे. त्यांना ९८ टक्के गुण मिळतात. यांच्याच कार्यक्षमतेची चौकशी करावी लागेल. त्यांच्या विश्वासार्हते बाबत आम्हाला शंका आहे. म्हणुन तुमच्या उत्तराप्रमाणे कोणत्त्या अटी व शर्ती बाकी आहेत ते फक्त सांगा ते सांगता येत नसेल तर याबाबतचे प्रमाणपत्र जनता देईल आम्ही देवू. आम्हाला माहित आहे काय चालले आहे ते. म्हणुन या अटी, शर्ती कोणत्त्या बाकी आहेत त्या फक्त सांगा.

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>अटी व शर्तीनुसार या ठेक्याचे तीन प्रमुख भाग आहेत. घनकचरा गोळा करणे त्यानंतर त्याची वाहतुक या दरम्यान कच-याचे जे वर्गीकरण करायचे आहे. ओला कचरा, सुका कचरा याबाबत आम्ही एक कार्यशाळा सुध्दा घेतली होती. कच-याच्या वर्गीकरणाबाबत दोन तीन टक्क्यांपर्यंत काही त्रुटया आजच्या तारखेला आहेत. त्यासुध्दा पुर्ण करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने पुर्ण प्रयत्न केले जात आहेत. मुंबईहुन सल्लागार मागवुन प्रत्येक प्रभागामध्ये याबाबत बैठका घेण्याचे आम्ही चालु केले आहे. आतापर्यंत २५ प्रभागात २५ बैठका पुर्ण झाल्या आहेत. कच-याच्या या वर्गीकरणापासुन पुढचे पाऊल म्हणजे ओल्या कच-यापासुन खत तयार करणे. यासाठी सुध्दा प्रशासन प्रयत्नशिल आहे. यासाठी ठेकेदारांकडुन आम्हाला जी मदत पाहिजे होती, किंवा जे काम त्यांनी करावयास पाहिजे होते. जनतेमध्ये जागृती आणण्याचे काम त्यांनी करावयास पाहिजे होते. त्यामध्ये काही कमतरता आहेत. म्हणुनच या दोन तीन टक्कयांची मी गोष्ट करत आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>म्हणजे जनतेच्या जागृतीसाठी त्यांनी जो कार्यक्रम आखावयास पाहिजे होता. तो त्यांनी केला नाही. जनतेमध्ये याबाबतची जाहिरात अजिबात केलेली नाही हे एक अटीचे उल्लघन आहे? सात महिने झालेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कच-याची विल्हेवाट लागली पाहिजे त्यातील महत्त्वाचा मुददा म्हणजे कच-याचे वर्गीकरण ओला व सुका कचरा वेगळा करणे आज सुध्दा ते होत नाही. म्हणजे अट क्रमांक २ चे उल्लंघन, बरोबर का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मग काम चालु झाले आहे का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>लोक जागृती अंतर्गत रिजेंन्सी हॉलमध्ये आम्ही जी कार्यशाळा घेतली ती कार्यशाळा ठेकेदाराच्या वतीनेच घेण्यात आलेली आहे. लोक जागृतीच्या अंतर्गत व्हॅनच्या माध्यमातुन जाहिरात चालु आहे. दुसरे असे की, २५ सभांचा आता मी जो उल्लेख केला. जनतेला याबाबत माहिती देणे

जसे की, ओला कचरा व सुका कचरा कसा वेगळा केला पाहिजे याबाबत २५ सभा या शहरात घेतल्या गेल्या त्यासुध्दा त्यांच्याच वतीने घेण्यात आल्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>२५ सभा? कुठे कुठे झाल्या त्या?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>प्रत्त्येक प्रभागामध्ये एक सभा झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>प्रत्त्येक प्रभागामध्ये? माझ्या प्रभागामध्ये एक सुध्दा सभा झालेली नाही.

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>नाही. प्रत्त्येक पॅनलमध्ये.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>पॅनल नं. १७ मध्ये कधी झाली सभा सांगा जरा?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>तारीखेबाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही परंतु नंतर मी ती देतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सभा झालेली नाही. सभा झाली असती तर संबंधित नगरसेवकास माहित पडले असते परंतु नगरसेवकांना माहित नाही म्हणजेच सभा झालेली नाही. पॅनल नं. १७ मध्ये सभा झालेली नाही. आणि तरीही आपण म्हणता की प्रत्त्येक पॅनलमध्ये सभा झाली आहे हे चुकीचे आहे. चुकीची माहिती सभागृहाला देवू नका. त्या ठेकेदाराला पाठीशी घालु नका. अट क्र दुसरी कुठली बाकी आहे तुमची? तुम्ही सांगितलेत काही अटी बाकी आहेत. या दोन अटी सोडुन सगळया अटी पुर्ण झाल्या आहेत का? या दोन व्यतिरिक्त ........

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>वाहतुकीसाठी दोन बंद गाडया दयायच्या होत्त्या. कचरा गोळा करण्यासाठी कचरापेटया दयायच्या होत्त्या त्या बाबींची त्यांच्याकडुन पुर्तता करण्यात आली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>कचरा गोळा करण्यासाठीच्या कचरापेटया? त्या किती ठिकाणी ठेवायच्या होत्त्या?त्याला कटटे बांधायचे होते ते बांधलेले आहेत का? त्याला जे ओटे बांधायचे होते ते बांधलेले आहेत का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>कामगार किती ठेवायचे होते? त्या कामगारांची यादी तुमच्याकडे आहे का? कामगार किती होते?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>कामगारांची यादी आम्ही घेतलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>यादी नाही तुमच्याकडे म्हणजे किती कामगार ठेवले त्याच्यावर काही नियंत्रण नाही. त्या कामगारांना किमान वेतन कायदयानुसार वेतन दयायचे होते हे बंधन होते. ते दिले जात आहे का? ही अट आहे.

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>ही अट आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आहे ना. मग या अटीची पुर्तता होते का? ती ही नाही, १२० घंटा गाडया आहेत का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>घंटा गाडी आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>किती आहेत?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>१२० घंटा गाडया आलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>१२० आहेत, तीन वेगवेगळया प्रकारच्या कचरापेटया येणार होत्या. कॉम्पॅक्टर येणार होते. त्यात तीन प्रकारच्या मशिन आलेल्या आहेत का? वेगवेगळया म्हणजे ठराव आणताना दाटीच्या विभागातुन कचरा आणण्यासाठी वेगळे वाहन, मध्यम म्हणजे जेथे कमी गर्दी आहे तेथुन कचरा आणण्यासाठी वेगळे वाहन आणि एकदम मोकळया रस्त्यावर जाण्यासाठी मोठे कॉम्पॅक्टर, ही जी मशिनरी आहे ती सर्व आली का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>पुर्ण आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आलेली आहे?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>होय.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>म्हणजे ही जी पुर्तता झाली नाही हे तुम्हाला सांगायचे आहे. तुम्ही सांगितले की हे नाही, हे नाही अशा किती अटींची पुर्तता झालेली नाही. यातल्या जवळ जवळ सहा तर अटी झाल्या आता. ज्यांची आतापर्यंत पुर्तता झालेली नाही.

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>मुख्य म्हणजे कच-याचे वर्गीकरण झालेले नाही. ओला कचरा, सुका कचरा वेगळा करायचा होता ते झालेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>कच-याचे वर्गीकरण, कामगारांची नेमणुक याबाबतची माहिती तुमच्याकडे नाही. किती कामगारांची नेमणुक केलेली आहे त्यांना पगार कसा दिला जातो. त्यानंतर सुका कचरा, ओला कचरा हा वेगळा केला जात नाही. त्यानंतर हजेरी शेड त्यांनी बांधायच्या होत्या. प्रत्येक कॅम्पामध्ये प्रत्येक प्रभागामध्ये केबीन्स बांधायच्या होत्या. त्या केबीन्स सुध्दा नाहीत. बरोबर? केबीन्स कुठेही नाहीत त्यानंतर जे कामगार लावलेत त्यांची यादी आपल्याकडे नाही. कामगार कमी आहेत हा आमचा दावा आहे, ठाम विश्वास आहे. तुमच्या रेकॉर्डला नाही परंतु आमचा विश्वास आहे. त्यानंतर कामगारांना दिला जाणारा पगार, हा पगार सुध्दा कामगार कायदयानुसार, किमान वेतन कायदयानुसार दिला जात नाही या अटीचेही उल्लंघन आहे. ओटे बांधलेले नाहीत. म्हणजे जवळपास अर्ध्या पेक्षा जास्त अटींचे उल्लंघन आहे त्या अटी पाळल्या जात नाही अशावेळी तुम्ही, प्रशासन काय करत आहे? तरीही तुमचे स्वच्छता निरीक्षक त्यांना ९८ टक्के मार्कस देतात. म्हणजे प्रशासन नेमके काय करते? कुठल्या निकषावर? ज्या अटी आणि शर्ती महासभेने ठरवुन दिलेल्या आहेत त्या न पाळणा-या ठेकेदाराला ९८ टक्के मार्कस देत आहेत. आणि ९८ टक्के मार्कस आहेत म्हणुन तुम्ही पेमेंट देत आहात. म्हणजे ''आंधळे दळते आणि कुत्रे पिठ खाते'' लोकांचे पैसे आहेत, लोकांकडुन लुबाडलेले पैसे आहेत. लोकांना त्रास देवून

वसुल केलेले पैसे आहेत. त्याचा व्यवस्थित विनियोग करणे. लोकांकडुन कामे करून घेणे हे प्रशासनाचे काम असतानाही ते करत नाही. केवळ त्या ठेकेदारांनी दिलेली बिले तुम्ही परस्पर त्यास अदा करत आहात हा माझा आरोप आहे पाहिजे तर तो तुम्ही सिध्द करून दाखवा की नाही तो खोटा आहे. ज्या निकषानुसार ज्या अटी शर्ती नुसार आमचे काम चालु आहे. आणि त्याआधारेच आम्ही पेमेंट करतो हे होत आहे का? तुम्ही सांगितल्यानुसारच आहे की अटी व शर्तीचे पालन होत नाही. आणि कोणत्त्या कोणत्त्या अटी होत्त्या त्या मी तुम्हाला सांगितल्या आहेत. बाकी फक्त कचरा वाहणे, पुर्वीच्या ठेकेदाराप्रमाणे जर करायचे असते तर आम्ही अडीच कोटी जादा खर्च कशासाठी करत आहात? त्याची कारण मिमांसा काय? पहिले दोन कोटी ३३ लाख होते. आज ४ कोटी ३८ लाख रू. आम्ही देणार आहोत. आणि भविष्यात आम्ही त्याला ५ कोटी देणार आहोत म्हणजे ५ कोटी आम्ही असेच त्यांना देणार का? सात महिने झाले आहेत ठेका चालु होऊन बरोबर?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>होय.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>या अटी व शर्ती यांचे सहा महिन्यांच्या आत त्यांना पालन करायचे होते. आज त्यास साडे सात महिने झाले तरीही पालन होत नाही. त्यावर आपण काही कारवाई केलेली नाही. त्यावर आपली कारवाई करण्याची मनिषा आणि इच्छा दिसत नाही. ज्यापध्दतीने ठेकेदाराला इथे आणले आहे ते सारस्य सिध्द होत आहे. वेगळे काही सांगायला नको महासभेला व लोकांना सुध्दा ज्या सारस्याने हा ठेकेदार घाईगर्दीने आणला. आणि ज्या पध्दतीने काम चालले आहे तो एक पुर्व नियोजित कट होता हे तर आता सिध्द होत आहे. हे एक भ्रष्टाचाराचे कुरण आहे. श्री. लालवानी जे बोलले त्या पध्दतीने याठिकाणी चाललेले आहे. ठिक आहे. अटी आणि शर्ती नाहीत. ब-याचशा अटी आणि शर्तीचे पालन होत नाही हे आम्ही मान्य करतो. ठेकेदाराला आता पेमेंट किती केले आहे? कसे चालले आहे? साधारणतः महिन्याला ३६ लाख रू. आपण त्याला देत आहोत. बरोबर ना? अगोदर १९ लाख २० हजार देत होतो आता ३६ लाख दर महिन्याला देत आहोत तर सात महिन्याचे आपण त्यांना किती पेमेंट दिले आहे? एवढया अटी आणि शर्तीचे उल्लंघन झाले असताना पेमेंट काही थांबवले आहे का?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>महापौर महोदया, मी आताच स्पष्ट केले आहे. पहिल्या पंधरा दिवसामध्ये त्यांच्या कामामध्ये ब-याचशा कमतरता / त्रुटी होत्त्या. म्हणुन १८ लाखाचे पेमेंट त्यांना दिलेले नाही. त्यानंतर मार्च अखेरीपर्यंत त्यांना फक्त ८० टक्के पेमेंट दिले आहे. त्यानंतर एप्रिल पासुन जेव्हा त्यांच्या कामाचा आढावा यावयास सुरू झाला. ९७ ते ९८ टक्के पेमेंट दिले जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>म्हणजे जवळ जवळ १०० टक्के पेमेंट तुम्ही त्यांना करत आहात फक्त दोन टक्के रक्कम जी असते ती इसारा रक्कम किंवा अनामत रक्कम म्हणुन तुम्ही ठेवता. ती कोणत्त्याही ठेकेदाराची ठेवता. एवढया अटी आणि शर्तीचे उल्लंघन होत असताना तुम्ही ९८ टक्के पेमेंट कसे अदा करता. खरे म्हणजे त्याच्यावर कारवाई होणे गरजेचे होते. कारवाई न होता ९८ टक्के पेमेंट देण्यास तुम्ही सुरूवात केली आहे. लोकांना दाखविण्यासाठी प्रथम ८० टक्के त्यानंतर ९७ व आता ९८ टक्के म्हणजे जवळ जवळ १००टक्के २ टक्याचा काय फरक पडतो. तर मग हे तो पुर्ण करणार का? केले नाही अदयाप पर्यंत जे करणे आवश्यक होते. जे केले नाही म्हणुन त्याच्यावर कारवाई करणे आवश्यक होते. त्याचे पेमेंट थांबविणे आवश्यक होते. ते आतापर्यंत न करता तु असेच करत रहा आम्हाला काही फरक पडत नाही. तु आपले चालु दे अशा पध्दतीने प्रशासनाने त्यास हात दिलेला आहे. तो अटी आणि शर्ती पुर्ण करणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचा दाखला येथे दिला जात होता तो उददेश याठिकाणी सफल होतो आहे का आज तरी. कचरा हाताळणा-या त्या लोकांना काही रोगराई होवू नये

यासाठी काही काळजी घेतली जाते का? आजसुध्दा त्याच पध्दतीने ते लोक कचरा उचलत आहेत. अगोदर महापालिकेचे लोक उचलत होते ते आता या ठेकेदाराचे लोक उचलतात. महापालिकेचे लोक सुध्दा त्याच जुन्या पध्दतीने, कुठलीही गंभीर दखल घेतली नाही. परंतु दाखला देताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हे काम चालले पाहिजे परंतु अजिबात ते त्याप्रमाणे चालत नाही. मला खेद वाटत आहे आणि सात महिन्यांनंतर सुध्दा आमच्या प्रशासनाला, आमच्या आयुक्तांना ते लक्षात येत नाही, फक्त पेमेंट करणे ९८ टक्के. सॉलीड वेस्टमध्ये सॉलिड भ्रष्टाचार झाला आहे. तुमच्या नगरसेवकांनी, प्रतिनिधींनी दाखवुन दिले आहे. आणि तुम्ही त्याचे हे पुरावे देत आहात. सांगा ना, जर त्यांनी अटी आणि शर्तीचे पालन केले नाही. जे ठरविले आहेत पाच कोटी, सध्या आपण वर्षाला तीन कोटी , वर्षाला तीन टक्क्यांनी वाढ याची १० वर्षाची सरासरी काढली तर वर्षाला ५ कोटी. हे जे ५ कोटी आम्ही देणार होतो ते अटी आणि शर्तीचे पालन केले तर आणि तरच देणार होतो. आणि तर अटी आणि शर्तीचे, ब-याचशा शर्तीचे पालन न करता तुम्ही त्यांना पेमेंट का देता? कारणे काय? त्यामध्ये कुणाचे स्वारस्य आहे?

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, जसे आता सन्माननिय सदस्यांनी विचारणा केली की, अटी आणि शर्तीचे पालन होत आहे किंवा नाही. कच-याचे वर्गीकरण करण्यासाठी या ठेकेदाराने ज्याप्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे होती त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही हे मी प्रथमच सांगितलेले आहे. त्यांच्या कामाचा आढावा आमचे क्षेत्रीय अधिकारी घेत आहेत. त्या कामाच्या आढाव्यानुसार असे दिसुन येते की, जे काम होत आहे, शहरामध्ये सार्वजनिक स्वच्छता पुर्वीपेक्षा खुपच चांगल्या प्रकारे आहे. आताच संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानानुसार नांदेड महानगरपालिकेतील एक टिम येथे भेट देवून गेली त्यांनी सुध्दा या शहरातील स्वच्छतेची प्रशंसा केली आहे व यापुढे मी आपणांस असे आश्वस्थ करतो की ज्या अटी शर्तीचे ठेकेदार पालन करणार नाही त्यावर जरूर कारवाई केली जाईल व त्याच्याकडुन त्या अटी शर्तीचे पालन करून घेतले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>खरात साहेब कोणी दाखले दिले ते मी विचारत नाही. दोन रूपयाची वस्तु तुम्ही १० रू.घेतली तेव्हा ती चांगलीच असणार आहे. नांदेडच्या लोकांनी सांगितले त्याबाबत आमचा वाद नाही. आमच्या तक्रारी आहेत नगरसेवक सांगत आहेत. इकडची लोक बघतात रस्ता साफ आहे. गल्ली बोळामध्ये आम्ही सांगतो तीच अवस्था आहे. आणि ५ कोटीचे जे बिल आहे ते मुख्य रस्त्यापासुन गल्ली बोळातुन रस्त्यांच्या साफ सफाईचे सुध्दा काम त्यात समाविष्ट आहे. रस्ते चांगले दिसतात हे सांगायला ठिक आहे. रस्ते चांगले दिसतात. एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत आम्ही जे रस्ते तयार केले त्याचा परीणाम आहे. फक्त झाडु मारल्यामुळे साफ होणार नाही. गल्ली मध्ये जी दुर्गंधी होती त्याठिकाणी नांदेडच्या लोकांना तुम्ही घेवून गेला नाहीत. कॅम्प नं. २ येथे रेडीमेड गार्मेन्टचे मार्केट आहे तेच जावुन पहा जसे आहे तसेच आहे. फक्त २ टक्याचे पेमेंट तुम्ही थांबवुन ठेवले आहे. ते ही नंतर तुम्ही त्याला देणार त्याबाबत कुठलेही कारण तुम्ही दाखविले नाही. खरात साहेब, एक प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. जनहित याचिका म्हणुन हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. उत्तरे देताना जपुन दया. अटी आणि शर्ती कुठल्या आहेत त्यांचे पालन केले आहे किंवा नाही. हे नीट सभागृहाला सांगा कारण त्यानंतर ते उच्च न्यायालयात जाईल कारण तुम्ही येथे सांगणार पुर्तता झालेली आहे. आणि तेथे नसेल तर अडचणीचे होईल. म्हणजे तुम्ही त्या ठेकेदाराला जाणीव पुर्वक पाठीशी घालत आहात. याचा ठपका तुमच्यावर यायला नको आहे. जे असेल ते स्पष्टपणे सांगा. त्यांनी किती अटी, शर्ती पुर्ण केल्या आहेत ते तुम्ही अजुनही सांगितले नाही. आरोग्य विभागाचे प्रमुख आयुक्तांनंतरचे त्या विभागाचे प्रमुख म्हणुन अजुनही किती अटी पुर्ण केल्यात किती अटी बाकी आहेत ते तुम्हाला माहित नाही.आयुक्तांनंतर दुस-या क्रमांकावर तुम्ही आहात. किती अटींची अदयाप पुर्तता होत नाही मी तुम्हाला सहा सात अटी सांगितल्या आहेत. या व्यतिरिक्त अजुन

किती आहेत. एकुण अटी सांगा की एवढया अटी होत्त्या. त्यापैकी ऐवढया अटींची पुर्तता झालेली नाही.

__श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-__मा. महापौर महोदया, येथे जेवढया काही अटी आणि शर्ती सांगितल्या होत्त्या याची पुर्तता झाली नाही. १०० टक्के पुर्तता झाली नाही अशी काही गोष्ट नाही.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__किती अटींची पुर्तता झाली नाही. १०० टक्के पुर्तता झाली नाही असे आम्ही कुठे बोलतो.

__मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-__खरात साहेब त्यांनी आपणांस विचारले आहे. किती अटींची पुर्तता झाली?

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__४० टक्के, ५० टक्के की ११० टक्के किती अटींची पुर्तता झाली आणि किती अटींची पुर्तता झालेली नाही?

__मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-__सहा महिन्यामध्ये त्या अटींची पुर्तता का झाली नाही? याला जबाबदार कोण? झाले नाही तर आपण काय कारवाई केली? त्याचे उत्तर दया तुम्ही.

__मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-__महापौर महोदया, खरात साहेब अतिशय साधासा प्रश्न आहे. आपण महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने उत्तर देत आहात की, त्या ठेकेदाराच्या वतीने उत्तर देत आहात. आपण त्यांची बाजु का घेत आहात. आपण एकीकडे ९८ टक्के मार्क देत आहात तर दुसरीकडे काही अटी शर्तींचे पालन होत नाही असे सांगता व त्यास पेमेंट दिले जात आहे. तर आपण ही बाब स्पष्ट करा की आपण ठेकेदाराची बाजु घेत आहात की, सभागृहास याबाबतची सविस्तर माहिती देत आहात. यापैकी आपणांस काय वाटते ते प्रथम सांगा.आपण खुपच चांगले अधिकारी आहात, कार्यक्षम अधिकारी आहात म्हणुन कृपा करून सत्त्यस्थिती सभागृहा समोर ठेवा. शहराचा पैसा कुठल्याही परिस्थितीत व्यर्थ जाता कामा नये.

__श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-__मा. महापौर महोदया, मी कोणत्त्याही ठेकेदाराच्या बाजुने नाही. माझ्या उपस्थितीत ठेका दिला गेलेला नाही. मी आता आता दोन तीन महिन्यापुर्वी या विभागात आलेलो आहे. या कामामध्ये अधिकाधिक सुधारणा कशा आणता येतील असे आमचे प्रयत्त्न आहेत. प्रशासनाच्या वतीने त्यांच्याकडुन जेवढया काही अटी शर्तींचे त्यांच्याकडुन पालन करून घ्यायचे आहे त्यासाठी आम्ही प्रयत्त्नशिल आहोत. व १०० टक्के पुर्तता झालेली नाही. याचे उत्तर माझ्या अगोदरचे उपायुक्त यांनी दिलेले आहे. मी सुध्दा आज तेच म्हणत आहे की, १०० टक्के पुर्तता झालेली नाही. यासाठी घेतलेल्या कामाच्या आढाव्यानुसार त्यांना पेमेंट दिले जात आहे.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__हे उत्तर बरोबर नाही. हे गोलमटोल उत्तर आहे. ७. ११.२००३ रोजी विचारलेला प्रश्न आहे.

__मा. महापौरः-__या प्रश्नाचे उत्तर श्री. लोणारे साहेब देतील.

__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__महापौर महोदया, येथे अधिका-यांनी सांगितले की, १०० टक्के पुर्तता झालेली नाही. म्हणजे याचा अर्थ किती टक्के पुर्तता झालेली आहे याची तर माहिती असेल जर याबाबतची माहिती त्यांच्याकडे असेल, महापौर महोदया, प्रशासनाकडे ही माहिती आहे की, १०० टक्के पुर्तता झालेली नाही. याचा अर्थ किती टक्के पुर्तता झाली याची तर माहिती असेल. तर ती सांगा.

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौरजी, घन कचरा व्यवस्थापनाचे काम जेव्हा ठेका पध्दतीने आपण घेतो तेव्हा आपण त्यांना नगदी पैसे मोजतो. जर त्या पैशाचा योग्यप्रकारे मोबदला  आपणांस मिळत नसेल किंवा आपण ठरविलेल्या अटी व शर्ती प्रमाणे या ठेकेदाराकडुन काम होत नसेल तर त्या ठेकेदाराचा ठेका रदद करण्यासाठी तरतुद केली आहे. आणि माझी ही विनंती आहे की हा ठेकेदार अटी पुर्ण करीत नसेल तर ठेका रदद करण्यात यावा.*

*<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>महापौर महोदया प्रश्न क्र. २५४ बददल प्रशासनाने जे उत्तर दिले आणि सन्माननिय सदस्यांनी अटी बाबतचे जे मुददे उपस्थित केले. ठेकेदाराकडुन सर्व अटींची पुर्तता करून घेण्याचे प्रशासनाने प्रयत्न केले. आणि नुकतेच शासनाने नियुक्त केलेल्या संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना अंतर्गतची नांदेड येथील समिती येथे येवून गेली. त्या समितीने या शहरातील स्वच्छतेची प्रशंसा केली आहे. जिल्हाधिकार्यालयातील एक वरीष्ठ अधिकारी मध्यंतरी येथे येवुन गेले त्यांनी सुध्दा या शहरातील साफसफाई बाबत प्रशंसा केली आहे. याच्या पलिकडे जर काही अटींची पुर्तता आमच्याकडुन करून घेतली जात नसेल तर याबाबतचे सविस्तर उत्तर पुढल्या बैठकीत आम्ही देवू.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>मग आतापर्यंत तुम्ही काय केले?*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आयुक्त महोदय, प्रश्न साधा सरळ आहे की, जर अधिका-यांना खात्री आहे की, १०० टक्के पुर्तता झालेली नाही. पण किती टक्के अटींची पुर्तता झाली हे तर माहित असेल ना? आपण १००० मार्क देतो तर किती टक्के...........*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>ज्या ढोबळ अटी आहेत ज्या आमच्या लक्षात आहेत त्या आम्ही सांगितलेल्या आहेत. तुम्ही अभ्यास करून आलेला आहात या प्रश्नावर. कटटे बांधलेले नाहीत. कचरा पेटया त्या त्या ठिकाणी व्यवस्थित बसलेल्या नाहीत. कामगारांना कामगार कायदयानुसार पगार दिला जात नाही. त्यांचा विमा उतरविलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कचरा हात्ताळताना कामगारांना ग्लॉव्ह्स वगैरे घालायला पाहिजेत ते घातले जात नाहीत. ओला कचरा व सुका कचरा याचे वर्गीकरण करायचे होते ते केले जात नाही. या ज्या दोन वेगवेगळया कुंडया बसविणे आवश्यक होते त्या कुंडयाही बसविल्या जात नाहीत. त्यानंतर केबीन्स बांधणे हे त्या ठेकेदाराचे काम होते त्याही अदयाप पर्यंत बांधल्या जात नाही. त्यानंतर गाडया ठेवण्याची व्यवस्था त्यांनी स्वत: करायची होती ती ही केली जात नाही अशा ढोबळ अटी आम्ही सांगु शकतो आणि एवढी तयारी करून आल्यानंतर ७.११. २००३ला हा प्रश्न विचारलेला आहे. १९.५.२००४ ला तुम्ही उत्तर देत आहात म्हणजे सहा महिन्यापुर्वी आलेल्या प्रश्नाचे सात महिन्यापुर्वी नेमलेल्या ठेकेदाराने किती अटींची पुर्तता केली आहे याचा अभ्यास करून तुम्ही उत्तर देवू शकत नाहीत. किती अटी पुर्ण झाल्या आहेत त्या आणि आपले प्रशासन त्या ठेकेदाराचे काम चांगले चालले आहे असे प्रमाणपत्र देते. जेथे तुमचेच परिक्षण नाही तर तुम्ही दुस-यास प्रमाणपत्र कसे देता. नांदेडच्या लोकांनी काय प्रमाणपत्र दिले ते सांगता मी तुम्हाला सांगतो राजीव गांधी नगर येथील मी एक तक्रार तुमच्याकडे केली होती यानंतर फक्कडमंडली येथील एक तक्रार केली होती. त्याबाबत आज पण अवस्था तशीच आहे त्यात कसलाही फरक झालेला नाही आज सुध्दा जावुन पहा. ते नांदेडवाल्यांचे कशाला सांगता. आम्ही येथील स्थानिक रहिवाशी आहोत. नांदेडच्या लोकांना जे रस्ते दाखविले ते तुम्हीच दुसरे कोण आहे? त्या राजीव गांधी नगरची स्थिती मी प्रत्यक्ष तुमच्या कानावर घातली होती. फक्कड मंडळीची परिस्थिती तुमच्या कानावर घातली होती परंतु आजही परिस्थिती जशीच्या तशीच आहे. त्या ठेकेदाराला काही देणे घेणे नाही आणि प्रशासनाला काही देणे घेणे नाही. ८० टक्क्याचे ९८ टक्यावर आले.*

साधा आणि सरळ प्रश्न आहे किती अटींची पुर्तता झाली आणि किती अटी बाकी आहेत. हे उत्तर नाही तुमच्याकडे? मी ज्या अटी सांगितल्या त्यांची पुर्तता करण्याचे तुम्ही मान्य करता का? ओटे नाहीत, ओला सुका कचरा वेगळा केला जात नाही. जाहिरातबाजी कमी झालेली आहे. ज्या पध्दतीने केली पाहिजे होती ती केली नाही, केबिन्स नाहीत, गाडया उभ्या करण्यासाठी व्यवस्था करायची होती ती केली नाही.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, या संपुर्ण अटींची माहिती आता माझ्याकडे नाही. याबाबतची माहिती पुढच्या सभेत मी सभागृहाला देतो. एवढे मी आश्वासन याठिकाणी देतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>हे चुकीचे आहे. आज पहिलाच प्रश्न असताना तुमच्याकडे माहिती नाही हे कसे?

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>ज्या काही अटी आहेत त्यानुसार त्यांना आपण पेमेंट देतो. पुर्ण पेमेंट काही आपण देत नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>९८ टक्के? ९८ टक्के पेमेंट देत आहोत.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>पुढील महासभेत आपल्याला सर्व बाबींची माहिती दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सर्व बाबींची पुर्तता झाली पाहिजे जसे आमच्या श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की त्या करारामध्ये स्पष्टपणे तरतुद आहे की दोन्ही पक्षापैकी कुणीही कराराचे उल्लंघन केले तर त्यावर करार रदद करण्याची व दंड आकारण्यात येईल. त्याबाबतची कार्यवाही आपण करावी. करार होवून सात महिने झाले आहेत. लोकांच्या पैशाचे व्यवस्थित विनियोग करणे हे आपले काम आहे ते आपण करत नाही कराराचे उल्लंघन होत आहे म्हणुन त्यावर केस दाखल करा आणि तो करार रदद करा आणि लोकांचा पैसा सन्मार्गाला लावा, चांगल्या मार्गाला लावा.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>ज्या अटींची पुर्तता झाली नसेल त्याबाबतीत त्याला काही शिक्षा करता येईल. दंड आकारता येईल. तो आकारू आणि सर्व बाबींची पुर्तता करून घेवून या प्रश्नाचे उत्तर पुढल्या महासभेत देवु.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>निविदा सूचनेमध्येच याबाबतचा उल्लेख असतो या निविदेच्या सूचनेमध्ये तुम्हीच उल्लेख केलेला आहे. एखादया अटी किंवा शर्तीची जर तो पुर्तता करू शकत नसेल तर ती निविदा रदद करण्याचे अधिकार तुमचे आहेत. आणि ते अधिकार तुम्ही वापरावेत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, गेल्या पाच सहा महिन्यामध्ये कुठल्या प्रकारचा दंड ठेकेदाराकडुन वसुल केला आहे का? पत्रव्यवहार केला आहे का? किंवा अटींची पुर्तता होत नाही म्हणुन त्यांना काही कारणे दाखवा नोटीस मेमो वगैरे असे काही दिलेले आहेत का? बांधकाम साहित्याचे ढिगारे सुध्दा तो ठेकेदार उचलत नाही. त्यासाठी सुध्दा दहा वेळा हात जोडावे लागतात.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>खरात साहेब तुमच्या माहितीसाठी सांगतो या अगोदरचे ठेकेदार त्याचे सुध्दा काम समाधानकारक होते, चांगले होते असे प्रमाणपत्र तुम्ही दिलेले आहे. महानगरपालिकेने दिले आहे की त्याबाबत कसलीही तक्रार नाही त्यावर कसलीही दंडात्मक कारवाई आपण केलेली नाही. याचा अर्थ याअगोदरच्या

ठेकेदाराचे काम सुध्दा समाधानकारक होते. असे असताना तुम्ही सांगता की पुर्वी पेक्षा चांगले आहे. एका बाजुला तुम्ही सांगता की अगोदरचे सुध्दा चांगले होते. आणि आताचे सुध्दा चांगले आहे, आणि एका बाजुला म्हणता की पुर्वीपेक्षा चांगले आहे. जर पुर्वीचे चांगले होते, असे तुम्ही प्रमाणपत्र दिले आहे ते पहा, म्हणजे तसेच त्याच पध्दतीचे चालु आहे का?

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. महापौरजी, मी हे विचारू इच्छितो की, अटी आणि शर्तीमध्ये त्याचा ठेका रदद करण्यासाठी कोणकोणत्त्या अटी शर्ती आहेत हे जरा सांगितले तर बरे होईल. त्यांनी काय न केल्यानंतर, किती महिने योग्य प्रकारे काम न करता किंवा वर्षभर योग्य त्या प्रकारे काम न केल्यावर त्याचा ठेका रदद करू शकतो काय? याबाबत ज्या काही अटी शर्ती आहेत त्यांची माहिती आपणांस, प्रशासनास असेल ती आहे किंवा नाही? किती महिने योग्य त्याप्रकारे काम न केल्यावर त्यांचा ठेका रदद करू शकतो. किती कालावधी नंतर त्याबाबतच्या अटी शर्ती तर आपणांस माहित असतीलच जरा त्या सभागृहास सांगितल्या जाव्यात.

**मा. सदस्य अनिल जयसिंघानी हे सभागृहातून बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महापौर महोदया, कामाची बाब तर नंतर येते परंतु प्रथम अटी शर्ती पुर्ण झालेल्या नाहीत. सात महिने झालेले आहेत. ठेकेदारास नियमितपणे पेमेंट दिले जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>महापौर महोदया, कृपया मला बोलु दिले जावे. जेव्हा तुम्ही या ठकेदाराला काम दिले त्यावेळी ज्या अटी शर्ती दिल्या त्यांची यादी आपणांकडे असेलच. त्यामध्ये किती महिने काम केल्यानंतर किती वर्ष त्यांनी योग्य त्या प्रकारे काम न केल्यानंतर त्याचा ठेका रदद होवू शकतो अशी काही अट असेल ती आम्हाला वाचुन दाखविली जावी.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, सन्माननियय सदस्यांनी अटी, शर्तीनुसार ठेकेदाराचा ठेका रदद करण्याबाबत जे निवेदन केले त्याबददल आज मी एवढेच सांगु शकतो की एकतर्फी किंवा पटकन ठेका रदद करण्यापेक्षा तो किती अटी शर्तीची पुर्तता करत नाही त्यास आपणांस काय दंड करता येईल. यासर्व उपाययोजना केल्यानंतर शेवटचा उपाय म्हणुन आपण त्याचा वापर करू त्याअगोदर आपण या सर्व बाबी तपासुन सभागृहास उत्तर देवू. नंतरच जेव्हा गरज पडेल तेव्हा आम्ही त्यावर कारवाई करू.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>आयुक्त साहेब, तुम्हाला विनंती वेगळी केलेली आहे. वेगळा प्रश्न विचारला आहे. मला फक्त त्या अटी शर्ती ऐकायच्या आहेत तुम्ही त्याचा ठेका रदद करण्यासाठी माझा आग्रह नाही. परंतु मला त्या अटी शर्ती तर कळल्या पाहिजेत ना. कोण कोणत्त्या अटी शर्ती नुसार त्याचा ठेका रदद करू शकतो. माहिती तर मिळाली पाहिजे ना? महापौरजी, आयुक्त साहेब मला याबाबत अतिशय खेद वाटत आहे की प्रशासनाकडे आठ महिने अगोदर केलेल्या कराराच्या अटी शर्तीची माहिती नाही तर त्याचे काम कसे चालत आहे त्यांना किती टक्के पेमेंट दिले पाहिजे आपला हा निर्णय पुर्णपणे मला बोगस वाटतो. आपण त्यांना जो ठेका दिला आहे त्यातील अटी शर्ती आपण सांगु शकत नाहीत. मग आपल्याकडे काय माहिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>हा प्रश्न राखुन ठेवला जावा. पुढच्या वेळेस यावर चर्चा केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>प्रश्न राखुन ठेवा आणि पुढच्या वेळेस घ्या.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्रमांक २५५ हा श्रीमती. जयश्री सुर्वे यांचा आहे.

प्रश्न क्र. २५५:- उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत बांधकाम विभागाअंतर्गत सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात झालेल्या कामाबाबत माहिती मिळणे बाबत.

१) लेखा शिर्षानुसार आर्थिक वर्ष २००३-२००४ साठी सार्वजनिक बांधकाम विभागासाठी तरतूद किती? सदर तरतूदीतून एप्रिल २००३ ते आजतागायत किती कामे झाली? कश्या प्रकारची कामे केली? त्यांची खर्च केलेली रक्कम किती? याची यादी दयावी ही विनंती.

उत्तर:- सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात झालेल्या कामांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१) लेखा शिर्षानुसार सार्वजनिक बांधकाम विभागासाठी एकूण तरतूद (रुपये १२.९३ कोटी, २२०कामे)

२) सदर तरतूदीमधून एप्रिल २००३ ते आजतागायत झालेली कामे (रस्ते, पायवाटा, शौचालय, मुता-या, समाजमंदिर, नाल्या, नाले, बगीचे यांचे नुतनीकरण, दुरुस्त्या इत्त्यादी )

३) कश्या प्रकारची कामे कव्हा

४) या कामांवर एकंदर होणारा खर्च (रुपये ९.०८ कोटी)

सदर कामांची यादी जास्त मोठी असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागात पाहण्यासाठी उपलब्ध आहे. कामांबाबत आपण विचारलेली माहिती सार्वजनिक बांधकाम विभागात उपलब्ध आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे :-मा.महापौर, आयुक्त साहेब, सदरचा जो प्रश्न दिलेला आहे. त्याची लेखी माहिती का दिलेली नाही? प्रश्नाचे उत्तर कोण देत आहे? सदरच्या प्रश्नामध्ये याची यादी दयावी म्हणुन विनंती केली आहे. लेखी माहिती का दिलेली नाही?

श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-मा. महापौर महोदया, जी माहिती विचारलेली आहे ती सर्व माहिती दिलेली आहे. यादी जी आहे ती फार मोठी आहे. ती कार्यालयात उपलब्ध आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे :-तर आपल्या कार्यालयात जावुन ती घ्यायची का?

श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-यादी फार मोठी असल्यामुळे ती देता आली नाही. त्यामुळे ती संक्षिप्त करून दिलेली आहे.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे :-प्रश्नोत्तराबरोबर यादी का दिली नाही. ती देण्यात यावी.

श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-एकुण ५१४ कामे आहेत. किती कामे आहेत ती सर्व माहिती आपणांस दिली आहे. पाहिजे तर मी यादी देतो.

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>माईक बाजुला करून न बोलता, माईक पुढे घेवून बोला जरा सदस्यांना ऐकु येवू दया.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>नगरसेवकाने प्रश्न विचारला आहे तर आपण ती यादी तर दाखविली पाहिजे.*

*<u>श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>यादी जी आहे ती कार्यालयात उपलब्ध आहे. ती आपण आता सुध्दा येवून पाहु शकता. ५१४ कामे जी आहेत.....*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आपल्या विभागात येवून पाहण्यास नको. त्यांनी प्रश्नोत्त्तराबरोबर यादी मागितली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, महासभेत विचारलेल्या कुठल्याही प्रश्नाच्या माध्यमातुन जर काही माहिती सर्व सदस्यांना मिळत असेल तर त्यात चुकीचे काय? काम जर योग्य प्रकारे झालेले आहे व आपल्याकडे त्याची सविस्तर यादी आहे तर मग कोणत्त्या कामावर खर्च झाला आहे याची सर्व सदस्यांना माहिती मिळाली तर त्यात चुकीचे काय आहे? अडचण काय आहे?*

*<u>श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>यादी बिल्कुल तयार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>या प्रश्नाच्या अनुषंगाने सर्व सदस्यांना माहिती मिळेल ना? २२० कामांची यादी ही काही फार मोठी नाही. चार पाने असतील.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सभा कामकाज नियमावली अनुसार जर कोणत्त्याही प्रश्नाचे उत्त्तर लांबलचक होत असेल तर त्याची यादी केवळ जो सदस्य प्रश्न विचारतो त्यासच उपलब्ध करून दिली जाते तीही त्या विभागामध्ये यासाठी आपण तेथे जावुन पाहु शकता सर्वांना यादी पुरविली जावु शकत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>यादी किती मोठी आहे?*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>२५ पाने आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्न विचारणा-या सदस्यास तर ती यादी पुरविली पाहिजे ना? त्यामध्ये काही अडचणीचे नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रत्त्येक वेळेस हेच उत्त्तर दिले गेले आहे की, यादी उपलब्ध आहे.*

*<u>श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>२५ पानांची यादी आहे. ती कार्यालयात उपलब्ध आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>२५ पानांची यादी देण्यासाठी काय बैलगाडीमध्ये घेवून जावुन दयावी लागेल काय?*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>झेरॉक्सचे २५ रू. आम्ही देतो. त्या यादीची झेरॉक्स करून आणली जावी. २५ रू. आहेत आमच्याकडे.*

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौरजी, ७.११.२००३ रोजी प्रश्न विचारलेला आहे. या दरम्यान अधिका-यानी नगरसेवकाशी संपर्क साधावयास हवा होता. त्यांना २५ पानांची यादी दिली पाहिजे असे आपणांस नाही वाटले. त्यामध्ये काय घोटाळा आहे काय?

<u>मा. उपमहापौरः-</u>भ्रष्टाचारामध्ये त्यांना वेळ नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>गोल मोल उत्त्तर देणे बंद करा. सत्यता समार आणा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>महापौरजी, हा जो प्रश्न विचारला आहे. त्याच्याशी संबंधित जी यादी आहे ती २५ पानांची आहे. भलेही ती किती पानांची असो. थोडया वेळे अगोदरच भ्रष्टाचाराचा एक मुददा उपस्थित झाला होता. मा. उपमहापौर व मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी तो मुददा उपस्थित केला होता. आम्ही लोकांनीही म्हंटले आहे तर हा जो विभाग आहे त्यामध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार आहे. सर्वात जास्त भ्रष्टाचारी लोक या विभागात आहेत. ४२ ते ४५ टक्के कमीशन येथे चालते. कमीत कमी त्याची तरी यादी दया. भ्रष्टाचार उघडकीस आणण्यास हेच माध्यम आहे. म्हणुन आपण कमीत कमी याची तरी यादी दया. त्यावर आम्ही पुढील महासभेत ठरवु काय करायचे आहे ते? म्हणुन मला असे वाटते की ज्या लोकांनी प्रश्न विचारला ते लोक दुहेरी निती अवलंबित आहेत.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महापौरजी,आपण आदेश दया दहा मिनिटात यादी दया.

<u>मा. महापौरः-</u>यादी सर्वांना वाटप केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> मा. महापौरजी, १३ कोटीची तरतुद त्यांनी यामध्ये दर्शविली आहे. ७ महिने अगोदर ९ कोटी रू. खर्च झाले आहे. आजची स्थिती काय आहे?

<u>श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>आजची परिस्थिती अशी आहे की, ११ कोटी रू. खर्च झाले आहेत. जसा प्रश्न विचाला आहे. तसे उत्त्तर दिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा. पुढल्या महासभेत कामांची यादी दिली जावी त्यावर चर्चा करू.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>२५ पानांची जी यादी आहे ती सर्व नगरसेवकांना वाटप केली जावी. मा. महापौरांनी याबाबत निर्देश दिलेले आहेत.

<u>मा. उपमहापौरः-</u>सर्व सदस्यांना यादी दिली जावी असे महापौरांचे निर्देश आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>पुढील महासभेपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>यादी त्वरीत दिली जावी. हा प्रश्न पुढील महासभे पर्यंत प्रलंबित ठेवला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>११ कोटी जो खर्च झाला आहे त्याची यादी दिली जावी. आजपर्यंतची यादी दिली जावी.

<u>मा. महापौरः-</u>आता उपलब्ध नाही पुढील महासभेत सर्व सदस्यांना यादी दिली जाईल.

*श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-आजपर्यंतची यादी आमच्याकडे तयार आहे. ती आपणांस मिळेल.*

*मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौरजी, त्या अगोदर........*

*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-मा. महापौरजी, तो प्रश्न पुढील महासभेत घेतला जावा.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २५६ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-नाही. नाही. यावेळेस श्री. किशोर वनवारी हे सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तात नोंद घेण्यात येत आहे.*

*प्रश्न क्र. २५६:- श्री. एस.टी. शिंदे, नगररचनाकार हे रजेवर गेल्यानंतर त्यांच्या जागी अनुक्रमे श्री. ठाकुर व श्री. सोनावणी यांची नियुक्ती प्रभारी नगररचनाकार म्हणून करण्यात आली, सदरच्या दोन्ही अधिका-यांच्या कार्यकालावधीत नगररचना विभागातर्फे आजपावेतो किती बांधकाम परवानग्या / पुर्णत्त्वाचे दाखले मंजुर करण्यात आलेले आहेत, याची माहिती दयावी.*

*उत्तरः- श्री. एस.टी. शिंदे, नगररचनाकार हे रजेवर गेल्यानंतर त्यांच्या जागी अनुक्रमे श्री. ठाकुर व श्री. सोनावणे यांची नियुक्ती प्रभारी नगररचनाकार म्हणून करण्यात आली. सदरच्या दोन्ही अधिका-यांच्या कार्यकालावधीत नगररचना विभागातर्फे आजपर्यंत एकच बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.*

*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-याअगोदरचा जो प्रश्न होता. ज्याची यादी मिळाली नाही. तो प्रश्न पुढील महासभेत घेणार ना?*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-होय.*

*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-धन्यवाद.*

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २५७ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.*

*प्रश्न क्र. २५७:- उल्हासनगर शहरात मोठ्या प्रमाणावर भटके जनावरे उदा. कुत्री, डुक्करे, गायी फिरत आहेत, त्यांच्यापासुन शहरातील जनतेला उपद्रव होत आहे. यांचा बंदोबस्त करण्यासाठी महापालिका काय उपाययोजना करणार आहे व केव्हापासुन सुरुवात करणार आहे.*

*तरी सदर प्रश्नांची उत्तरे येत्या महासभेत दण्याची विनंती आहे.*

*उत्तरः- उल्हासनगर शहरात फिरणा-या भटक्या जनावरांच्या बाबतीत महापालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना प्रस्तावित करत आहे.*

*१) भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण करणेसाठी जिल्हा परिषद ठाणे यांच्या मदतीने कार्यवाही करण्याचा प्रस्ताव सुरु आहे.*

२) डुक्करे पकडण्यासाठी पथक निर्माण करण्यात आलेले असून पथकामार्फत नियमित डुक्करे उचलण्याचे काम चालु आहे.

३) भटक्या गायी व म्हशी यांना बांधुन ठेवण्यासाठी महापालिकेकडे कोंडवाड्याची सोय नसल्यामुळे उल्हासनगर शहरात असणा-या खाजगी गौशाळांचे सहाय्य घेऊन सदर भटक्या जनावरांच्या बंदोबस्त करण्याचा प्रस्ताव सुरु आहे.

प्रश्न क्रमांक २५८ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. २५८:- पाण्याची निकड लक्षात घेवून उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मध्ये महानगरपालिकेने बोअरवेल खोदल्या आहेत.

सन २००२-२००४ या वर्षात सदर बोअरवेल दुरुस्तीसाठी कंत्राट देण्यात आले आहे. सदर कंत्राटदाराने आर्थिक वर्षात किती बोअरवेल दुरुस्त केल्या? त्यांची सद्याची स्थिती काय आहे? त्यापैकी किती चालू स्थितीत व किती बंद स्थितीत आहेत? शहरातील एकंदरीत बोअरवेलची संख्या किती? कृपया बाबतची माहिती मिळणेस विनंती आहे.

उत्तरः- अ) सन २००२-२००३ या वर्षात कंत्राटदाराने ९४२ बोअरवेल दुरुस्त केल्या.

ब) सदयस्थितीत २८५ बोअरवेल चालू स्थितीत आहेत.

क) १५० बोअरवेल बंद आहेत.

ड) शहरातील वापरात येण्याजोग्या बोअरवेलची संख्या ४३५ आणि एकूण बोअरवेल्स संख्या ६३५ आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. महापौरजी, प्रश्न क्रमांक २५८ हा दिनांक १२. ११.२००३ रोजी विचारलेला आहे. प्रश्न क्र. २५८ वाचुन दाखविला. साहेब हा १२. ११.२००३ रोजीचा बोअरवेल संदर्भातील प्रश्न आहे.

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-हा दिनांक १२.११. २००३ रोजीचा प्रश्न आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-त्याच्या उत्तरात दिले आहे की, ९४२बोअरवेल या शहरामध्ये दुरूस्त केल्या आहेत कंत्राटदाराने. त्यामध्ये सध्या स्थितीत २८५ बोअरवेल चालु आहेत. मग दुरूस्त कोणत्त्या केल्या. आणि काय दुरूस्त केल्या?

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-आपल्याकडे एकुण बोअरवेल आहेत ६३५.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-येथे उत्तरात ९४२ बोअरवेल दिलेल्या आहेत.

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-त्यापैकी वापरात येणा-या आहेत ४३५ त्यात २०० वापरात येण्या जोग्या नाहीत. त्यातील १०० बोअरवेलला पाणी नाही आणि १०० बोअरवेल परत नादुरूस्त झालेल्या आहेत. या ९४२ दुरूस्त केलेला बोअरवेलचा जो आकडा आहे. वर्षभराच्या कालावधीत एकच बोअरवेल पुन्हा पुन्हा दुरूस्त करावी लागते त्यामुळे वापरात जरी ४३५ असतील तरी पुन्हा पुन्हा

दुरूस्त झाल्यामुळे ९४२ आकडा दिसतो तो आकडा याच्याशी जुळणे शक्य नाही. तो ४३५शी जुळणे शक्य नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-किती बोअरवेल चालु आहेत.

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-१२-११-२००३ची जी स्थिती होती तेवढयाच बोअरवेल सध्या चालु आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-तेवढया चालु आहेत आणि नविन बोअरवेल साठी काय प्रस्ताव आहे आपल्याकडे?

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-नवीन बोअरवेलसाठी......
नवीन बोअरवेल पेक्षा ज्या जुन्या बोअरवेल आहेत आणि त्यांना पुरेशे पाणी आहे. त्यांच्यावर जेटपंप बसविण्यासाठी प्रस्ताव आपण शासनाकडे पाठविला आहे. तातडीच्या पाणीपुरवठा योजने अंतर्गत आणि त्या प्रस्तावाची सध्याची स्थिती म्हणजे तो प्रधान सचिवांच्या कार्यालयात आहे. आणि त्यास लवकरच मंजुरी मिळणे अपेक्षित आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-आपल्याकडे एखादा प्रस्ताव आल्यानंतर किती दिवसात तेथे बोअरवेल बसवुन, जेटपंप बसवुन तयार केला जावू शकतो. एखादा प्रस्ताव आला, नगरसेवक निधी असेल किंवा प्रभाग समिती निधी असेल तर बोअरवेल बसविण्याचा प्रस्ताव एका नगरसेवकाने दिला तर किती दिवसात तेथे बोअरवेल बसविली जावु शकते. जास्तीत जास्त किती दिवसात?

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-जास्तीत जास्त दोन महिन्यात म्हणजे प्रस्ताव मंजुर होवून काम पुर्ण होईपर्यंत दोन महिन्याचा कालावधी लागायला पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-जवांदे साहेब, मी आपल्याला एक उदाहरण देतो की, प्रभाग समिती क्रमांक ३ मधुन आपल्या विभागात दोन वर्षापुर्वी एक प्रस्ताव आला होता. एक लाख रूपयाचा प्रभाग समितीचा निधी होता. व त्यातुन एक बोअरवेल बसविण्याचा प्रस्ताव होता. व एक बोअरवेल व तिच्यावर जेटपंप बसविण्याचा प्रस्ताव होता. १ लाख ४ हजार रू. खर्च होता. सर्व मंजुरी वगैरे झाली ठेकेदाराने काम हाती घेतले. परंतु ते काम अजुनही झालेले नाही. याला जबाबदार कोण?

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-ते काम पुर्ण झालेले नाही. ठेकेदारावर कारवाई करण्याचे व सदरचे काम इतर ठेकेदारांकडुन करवुन घेण्याची कार्यवाही चालु आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-किती दिवसात होईल ते काम?

श्री. एम. ए. जवादे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा.पु. वि.):-१५ जुन पर्यंत ते काम पुर्ण करून घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-१५ जुन पर्यंत? सभागृहाला आश्वासन दिले आहे तुम्ही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्त्तराचा कालावधी संपला.

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, आपल्या देशात कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस व इतर पक्षांच्या वतीने सरकार स्थापन होत आहे. यासाठी मी उल्हासनगर कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष या नात्याने सभागृहात मिठाई वाटप करू इच्छितो. सर्व सन्माननिय सदस्यांनी कृपया तिचा स्विकार करावा. धन्यवाद.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>लक्षवेधी सूचना जी आहे. तिचे सूचक आहेत श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत श्रीमती. भावना खिलनानी त्यांची सूचना अशी आहे की, साफ सफाईच्या कामामध्ये........*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सचिव साहेब एक मिनिट. श्री. बेहरानी साहेब कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मिठाई वाटप करत आहेत. ठाणे लोकसभा मतदार संघात शिवसेना, भाजपाचे श्री. प्रकाश परांजपे खासदार म्हणुन निवडुन आले आहेत. त्या आनंदा प्रित्यर्थ आम्ही सुध्दा सभागृहात मिठाई वाटप करू इच्छितो.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>लक्षवेधी या प्रकारची आहे. शहरामध्ये साफसफाईची कमतरता आहे. कारण की २५ टक्के सफाई कामगार अनुपस्थितीत राहतात. व पावसाळयामुळे त्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यापर्यंत जाते. यामुळे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. ही लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकृत केली आहे. व दोन आयत्त्यावेळीचे विषय प्रशासनाकडुन आलेले आहेत. पहिला विषय आहे लोखंडी भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणेसाठी मंजुरी मिळणे व दुसरा विषय आहे. पैसे द्या व वापरा या तत्त्वावर शौचालय विविध संस्थांना देखभाल व दुरूस्तीसाठी देणे. आपणां सर्वांची संमती असेल तर हे दोन्ही विषय या सभेच्या कामकाजात समावुन घेतले जातील.*

*<u>लक्षवेधी सुचना</u>*

*सुचकाचे नाव :- श्री. सतरामदास जेसवानी*
*अनुमोदकाचे नाव :- श्रीमती भावना खिलनानी*

*<u>सूचनाः-</u> खाडा बदलीवर सफाई कामगारांच्या भरती बाबत.*

*शहरातील साफ सफाईसाठी नेमलेल्या सफाई कामगारांपैकी दररोज २५ टक्के सफाई कामगार रजेवर असतात. एप्रिल, मे महिन्यात हे प्रमाण जवळ जवळ ४० ते ४५ टक्यांपर्यंत जात असल्याने शहरातील साफ सफाईचे काम शिल्लक राहते. ज्यामुळे रोगराई उत्त्पन्न होण्याची शक्यता निर्माण होते. व शहरवासिय त्रस्त होतात.*

*कृपया महासभेमध्ये या लक्षवेधीवर चर्चा व्हावी ही विनंती.*

*धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, उल्हासनगर मध्ये जे रस्ते व चौक आहेत त्यांना नावे देण्याचे प्रस्ताव जानेवारी महिन्यात आपल्या दालनात झालेल्या बैठकीत चर्चेस आले होते. व ते प्रस्ताव अजुन असेच पडुन आहेत कारण की मध्यंतरी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागु होती. त्यामुळे महासभेत ते आले नाहीत. या सभेत ते यावयास पाहिजे होते. सर्व प्रस्ताव तयार आहेत. या सभेत ते विषय आयत्त्यावेळचा विषय म्हणुन घेतले जावेत.*

*<u>मा. महापौरः-</u>श्री. सुखरामाणी साहेब यांच्याकडुन चुक झाली आहे. येणा-या महासभेत हे प्रस्ताव सादर केले जातील.*

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तर सर्वांच्या संमतीने आयत्त्यावेळचे हे दोन्ही विषय सभेच्या कामकाजात समाविष्ट केले जावेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आमचे मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले त्यांना जर वाटत असेल की हा विषय आयत्त्यावेळच्या विषयामध्ये घ्यावा तर जर आमचे कार्यकारी अभियंता याबाबतीत तयार असतील तर रस्त्यांचे व चौकांचे नामकरणाबाबतीतचे जे काही प्रस्ताव मंजुर झाले असतील ते महासभेपुढे आयत्त्यावेळच्या विषयामध्ये आणावेत. आयुक्त साहेब आणु शकतात. जे श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे.

<u>मा. महापौर:-</u>नाही, श्री. लोणारे साहेबांनी काय सांगितले आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले आहे की, १५ मार्च पर्यंत प्रलंबित ठेवू. साहेब आले नाहीत म्हणुन हा विषय प्रलंबित ठेवु या असे लोणारे साहेबांनी सांगितले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आयुक्त साहेब याचे जरा उत्तर दया.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>पुढील सभेत ठेवु. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, आचार संहिता संपल्यानंतरच्या सभेत ठेवू. माझ्याकडे जो पदभार सोपविला आहे. त्याबाबत शासनाकडुन आदेश प्राप्त झालेला नाही परंतु साहेबांनी दैनंदिन काम पाहण्याचे सांगितले आहे. धोरणात्मक निर्णय मी घेवू शकत नाही. म्हणुन मी हा प्रस्ताव ठेवलेला नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आयत्त्यावेळच्या दोन्ही विषयांचा आजच्या सभेच्या कामकाजात समावेश केला जात आहे. याशिवाय शिवसेना व भाजपाच्या वतीने श्री. राजेंद्रसिंह भुल्लर साहेब यांना विरोधी पक्षनेता म्हणुन नेमण्याबाबतचा प्रस्ताव मा. महापौरांना प्राप्त झालेला आहे. व मा. महापौरांनी त्यास स्विकृती दिली आहे.

भाजपाच्या वतीने गटनेते म्हणुन श्री. लाल पंजाबी यांचे नाव सुचविण्यांत आलेले आहे. त्यास सुध्दा मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे.

लक्षवेधी सूचनेचे सूचक श्री. सतरामदास जेसवानी यांनी आपली बाजु मांडावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>महापौर महोदया,उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सदस्यांना माझी नम्र विनंती आहे की एका वर्षापासुन आम्ही लागोपाठ हा प्रस्ताव आणत आहोत की प्रत्येक दिवशी सफाई विभागातील २५ ते ३० टक्के सफाई कामगार गैरहजर राहतात. ज्यामुळे उल्हासनगर शहरातील सफाईचे काम बाकी राहते. व प्रशासनाकडुन काम होत नसल्यामुळे नागरिक नगरसेवकांवर नाराज होत असतात. तीन वेळा महासभेत महापौर महोदयांनी आयुक्त साहेबांना याबाबत आदेश दिले आहेत की लवकरात लवकर खाडा बदली सफाई कामगारांची भरती केली जावी. परंतु न जाणे आमचे आयुक्त साहेब याकामी का उशिर लावत आहेत. सफाई विभाग उशिर करत आहे. त्यांनी याकामी विलंब न करता मेहरबानी करून लवकरात लवकर होवू शकत असेल तर उदयाच या कामगारांच्या नेमणुका कराव्यात याबाबत त्यांना धन्यवाद दिले जातील. सफाई विभागामध्ये त्रासाची आणखी एक गोष्ट आहे. सफाई कामगारांची कमतरता तर आहेच. त्याचबरोबर कचरा उचलण्यासाठी ज्या हातगाडया आहेत त्या सुध्दा तुटलेल्या आहेत. त्यांची सुध्दा पुर्तता केली जावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मा. महापौरजी, श्री. सतरामदास जेसवानी यांनी ही जी लक्षवेधी आणली आहे तिचे मी पुर्णपणे समर्थन करतो. गेल्या सहा महिन्यापासुन आयुक्त साहेबांना महापौर महोदयांनी महासभेत आदेश दिले होते की

लवकरात लवकर खाडाबदली सफाई कामगारांची भरती केली जावी. परंतु अत्यंत खेदाने म्हणावे लागत आहे की सभागृहामध्ये जे आदेश दिले जातात त्याचे पालन देखिल प्रशासन करत नाही. एप्रिल, मे महिन्यामध्ये जशा जशा सुटया येतात. त्यामुळे प्रत्येक विभागामध्ये व प्रत्येक प्रभागामध्ये अशी स्थिती आहे की, सफाई कामगार गैरहजर राहतात व त्यामुळे सफाईचे काम बरोबर होत नाही. हे पाहता पुर्ण सभागृहाने असे ठरविले होते की, खाडाबदलीवर सफाई कामगार घेतले जावेत. याकामी विलंब का होतो आहे. त्याचे कारण काय आहे मला माहित नाही. परंतु खाडा बदली सफाई कामगार लवकरात लवकर घेतले पाहिजेत. मी आज एक वर्तमानपत्र वाचले त्याच्यामध्ये असे वृत्त प्रसिध्द झाले आहे की, उल्हासनगरमध्ये कॉलराची साथ येत आहे. कदाचित आपण लोकांनीही वाचले असेल टाऊन दर्शन या वर्तमानपत्रामध्ये पहिल्याच पानावर ही बातमी आहे की सफाई व्यवस्थित होत नसल्यामुळे उल्हासनगर शहरात कॉलराची साथ पसरत आहे. एकीकडे बोलले जाते की, संत गाडगे महाराज स्वच्छता अभियानानुसार शहरात सफाई योग्य प्रकारे आहे. उल्हासनगरमध्ये फारच चांगल्या प्रकारे साफ सफाई होत असल्याबाबतचे नांदेड महानगरपालिकेच्या आयुक्तांनी प्रमाणपत्र दिले आहे. याबाबत मी वर्तमानपत्रात वाचले होते. परंतु दुसरीकडे पाहिले तर प्रत्येक गल्लीमध्ये लहान मोठया नालीमध्ये एवढी काही दुर्गंधी आहे. जर आपण तेथे आलात तर आपण सुध्दा तेथे उभे राहु शकणार नाहीत. त्याशिवाय जी पावडर वापरात आणली पाहिजे ती वापरली जात नाही. दुसरे असे सांगितले जाते की, साहेब एकच माणुस कामावर आलेला आहे आम्ही काय करायचे. कधी एकच माणुस कामावर येतो तर कधी दहा दहा माणसे कामावर येत नाहीत. याबाबीकडे प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. व लवकरात लवकर खाडा बदली वरील सफाई कामगार कामावर घेतले पाहिजेत. याशिवाय गाडया नाहित. कच-याच्या टोपल्या नाहीत. आपण नाले सफाई कामी जे कामगार लावले आहेत. त्यांच्याकडे कचरा उचलण्यासाठी टोपल्या नाहीत. आरोग्य विभागास ज्या ज्या सामानाची आवश्यकता आहे ते सामान त्यांना त्वरीत उपलब्ध करून दिले पाहिजे. येणा-या महासभेत याबाबत पुन्हा आम्हास लक्षवेधी सूचना मांडण्याची आवश्यकता पडु नये. आता श्री. सतरामदास जेसवानी यांनी लक्षवेधी दिली आहे होवू शकते पुढच्या सभेत मला लक्षवेधी देण्याची आवश्यकता पडु नये.

<u>मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानीः-</u>मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, तीन तीन वेळा महासभेत आदेश दिल्यानंतरही खाडा बदली वरील सफाई कामगारांची भरती केली जात नाही. हा महासभेचा तर अपमान आहेच त्याचबरोबर महापौरांचाही अपमान आहे. प्रशासन आपली मनमानी दाखवत आहे. ७६ प्रभाग आहेत व मुकादम ७० आहेत. ६ प्रभागांमध्ये मुकादम नाहीत. दोन प्रभागामध्ये एक मुकादम कोठपर्यंत काम करणार? एखादया ठिकाणी जनावर मेले तर मुकादमास कुठे शोधावयास जाणार? प्रत्येक प्रभागामध्ये एक मुकादम का नाही? जर या सहा मुकादमांची पदे मंजुर नसतील तर ती पदे मंजुर करून घेण्यासाठी प्रशासनाने काय केले?शासन आणि प्रशासन एकमेकांशी जवळ आहे तर प्रशासनाने काहीही केले तर शासन त्यास मंजुरी देईल का?खाडा बदली कामगार नेमण्याचे काम कुठपर्यंत पुर्ण होईल याचे उत्तर दिले जावे .

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः-</u>मा. महापौरजी,मा. आयुक्त साहेब, सफाईच्या बाबतीत जी स्थिती आहे ती अतिशय खालावत चालली आहे. आमच्या प्रभागात सुध्दा सफाई कामगारांकडे हातगाडया नाहीत. डी.डी.टी. पावडर नाही, जंतुनाशके नाहीत. मच्छर मारण्याची मशिन नाही. तर या बाबींकडे लक्ष दिले जावे. स्टेशन समोर जो नाला आहे तो पावसाळयापुर्वी साफ केला जातो. परंतु यावर्षी अदयापही त्याची सफाई केली नाही. सर्व नाले दुर्गंधीने भरलेले आहेत. असे सांगितले जाते की प्रोकलेन मशिनची निविदा मागविली आहे. आता पावसाळा तोंडावर आलेला आहे असे असताना कधी प्रोकलेन मशिन येणार आणि कधी साफ सफाई होणार. याकडे लक्ष दिले जावे. कर्मचा-यांपैकी आठ दहा कर्मचारी कामावर येत नाहीत. कर्मचारी कामावर

*येत नाही काही अपंग आहेत, काही आजारी असतात. प्रत्येक प्रभागामध्ये पाच-सहा सफाई कामगाराच काम करत आहेत. व आता जे दहा दहा रोजंदारी वर नाला सफाई कामी कामगार घेतले आहेत त्यातील दोन-दोन, तीन-तीन कामगार पहिल्या दिवसापासुनच गैरहजर आहेत. तर यावर नियंत्रण कसे ठेवले जाईल. सफाई कशी होईल. माझी आपणांस विनंती आहे की, सफाईचे कामाकडे योग्य ते लक्ष दिले जावे व त्यावर सक्त कारवाई केली जावी. जेणे करून उपस्थिती बरोबर राहील. व साफसफाईचे काम योग्य प्रकारे होईल. धन्यवाद.*

***मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना,श्री. गोविंदराम लुंड, श्री. ठाकुर नरेंद्रकुमार हे सभागृहातुन बाहेर गेले.***

*मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानी:-आयुक्त साहेब, खाडा बदलीवर सफाई कामगार नेमण्याचे काम कधी पर्यंत पुर्ण केले जाईल.*

*मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-मा. महापौरजी, श्रीमती. भावना खिलनानी यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले जावे.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-मा. महापौरजी, मला काही प्रश्न विचारायचे आहेत. आयुक्त साहेब व महापौरजी, आरोग्य विभागाच्या प्रमुखांना व्यासपीठावर बोलवले तर बरे राहिल. मला त्यांना दोन तीन प्रश्न विचारायचे आहेत. आणि त्याची उत्तरे सभागृहाला मिळावित अशी माझी इच्छा आहे. आयुक्त साहेब, आरोग्य विभागाच्या उपायुक्तांना व्यासपीठावर बोलवा मला त्यांना दोन तीन प्रश्न विचारायचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की आरोग्य विभागाला प्रत्येक वर्षाला औषधे की ज्यामध्ये तेल असेल डीडीटी असेल इतर औषधे असतील यावर एक वर्षासाठी महापालिका किती रूपये खर्च करते? सर्व साधारण प्रश्न आहे. फारसा अवघड नाही.*

*श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-जवळ जवळ ५० लाख रूपये.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-किती?*

*श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-५० लाख रूपये.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप :- ५० लाख रू. महापालिका प्रत्येक वर्षाला आरोग्य विभागाच्या औषधांसाठी खर्च करते आणि अवस्था अशी आहे की इथे बसलेले सर्व माझे लोकप्रतिनिधी मित्र स्पष्टपणे सांगु शकतात की यांच्या हजेरी शेडमध्ये त्यांच्या विभागामध्ये, प्रभागामध्ये.........*

*मा. महापौर:-श्री. उमापजी, लक्षवेधीवर चर्चा चालु असताना आपण प्रश्न विचारू शकत नाहीत.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-आरोग्य विभागाशी संबंधितच माझा हा प्रश्न आहे. आरोग्य विभागाशी संबंधित नसलेल्या विषयावर मी बोलत नाही.*

*मा. महापौर:-लक्षवेधीवर चर्चा चालु असताना आपण असे प्रश्न विचारू शकत नाहीत.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप :- महापौरजी, कृपया मला ही सवलत मिळाली पाहिजे. मी आरोग्य विभागाशी संबंधित विषयावर बोलत आहे.*

*मा. महापौर:-आपण लक्षवेधीच्या विषयावर बोला.*

*मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-महापौरजी, शहराच्या सार्वजनिक आरोग्याशी निगडित माझा हा प्रश्न आहे. पावसाळा तोंडावर आला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>लक्षवेधी वरील श्री. सतरामदास जेसवानी व श्रीमती. भावना खिलनानी यांच्या प्रश्नाची उत्तरे दिली जावीत.*

*<u>मा. महापौर:-</u>मी आयुक्त साहेबांना निर्देश देते की, शहरातील लहान मोठया नाल्यांच्या सफाई बाबत ब-याचशा तक्रारी येतील. शहरातील लहान मोठे सर्व नाले जेसीबी मशिन लावुन साफ करण्यात यावेत. जेवढे काही सफाई कामगार आहेत त्यांना सफाई कामी लावुन नाले साफ करून घेतले जावेत. व सन्माननिय सदस्यांनाउत्तर दिले जावे.*

***मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी, श्री. लालबिहारी यादव हे सभागृहातुन बाहेर गेले.***

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>महापौर महोदया,....*

*<u>मा. महापौर:-</u>मी आपणांस एका गोष्टीची आठवण करून देवू इच्छिते. जसे आमचे श्री. सतरामदास जेसवानी यांनी तीन चार वेळा खाडा बदली सफाई कामगारांची भरती करण्याबाबत महासभेत मुददा उपस्थित केला आहे. कोणत्त्या कारणामुळे खाडा बदली सफाई कामगारांची भरती केली जात नाही. याची माहिती मला व सन्माननिय सदस्यांना मिळाली पाहिजे. कारण की, बरेचसे कामगार बेरोजगार व बेघर आहेत. अशा कामगारांना खाडा बदलीवर कामावर घेतले जावे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौर महोदया, लक्षवेधी सूचनेचा हा जो विषय आहे. कामगारांच्या संख्येबाबत त्यास जोडुन हा जो खाडाबदलीचा विषय उपस्थित केला आहे. हा विषय जरूर त्या विषयाशी संबंधित आहे. मला असे वाटते की आरोग्य विभागामध्ये आजच्या तारखेला जेवढी काही कर्मचा-यांची संख्या आहे. ती संख्या लक्षात घेता या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर का देत नाही. दुसरी गोष्ट अशी की दोन वर्षापासुन जेव्हा पासुन निवडणुका झाल्या आहेत. व पॅनल पध्दती त्याठिकाणी आणण्यांत आली आहे. संपुर्ण शहर २५ पॅनलमध्ये विभागले आहे. तर मग ते ६९ , ७५ , ७६ ,८० प्रभागांची जी पध्दत चालु आहे तर तिचा आधार काय? कधी कधी असे सांगितले जाते की अमुक अमुक हा जो मुकादम आहे तो प्रभाग क्रमांक ५१ चा आहे. तर मग तो प्रभाग क्र. ५१ कुठे आहे. आता आपण सांगता की, तो ४७ क्रमांकाच्या प्रभागाचा आहे तर मग तो प्रभाग क्र. ४७ कुठे आहे? जेव्हा या शहरामध्ये २५ च्यावर कोणतेही प्रभागच नाहीत. तर मुकादमांची आजच्या तारखेला ७६ प्रभागानुसारची कार्यप्रणाली कशी चालु आहे. मुकादमांच्या नेमणुका आज सुध्दा ७६ प्रभागानुसार होत आहेत. याबाबत काही पध्दत नाही. जर एखादया प्रभागाची एकच हदद आहे तर कधी सफाई कामगार आजारी असेल. सुटटीवर असेल तर तेथील सफाई कामगारांना एकत्र करून तेथील प्रभागांची साफसफाई करून घेणे हे प्रभावीपणे होवू शकते परंतु असे होत नाही. आम्ही वारंवार अशा सूचना केल्या आहेत, आमचे श्री. रमेश चव्हाण येथे आहेत, श्रीमती. किरण माने आहेत. आम्ही तीघांनी मिळुन नेहमी अशी तक्रार केली आहे की सफाई कामगार कमी आहेत. तर त्यावेळेस आम्ही पुर्ण पॅनलच्या वतीने अशी सूचना केली होती की आमच्या पुर्ण पॅनलचे सफाई कामगार एकत्र करून पुर्ण पॅनलची साफ सफाई केली जावी. परंतु तेथील मुकादम लोक आमच्या तोंडाकडे पाहतात आणि सांगतात की साहेब आज सहा माणसे कामावर आली नाहीत. काय करायचे सांगा. आठ माणसे आली नाहीत काय करायचे सांगा म्हणजे त्या प्रभागातील मुकादमाने किंवा स्वच्छता निरीक्षकाने नगरसेवकाच्या घरी जावुन सांगायचे की सहा माणसे आली नाहीत काय करायचे सांगा, काय करणार? प्रशासनाचे या बाबतीत काम काय? सफाई कामगारांना झाडु मारायचे आणि नाले सफाईचे काम हे कशापध्दतीने वाटप करून करून घ्यावे याबाबतची काही पध्दत नाही. कधी एखादा सफाई कामगार झाडुवर असतो तर कधी नाली सफाई कामी असतो. झाडुवाल्यास नाली सफाई कामी पाठविल्यास त्याला राग येतो. नाली सफाई करणा-या कामगारास झाडु मारण्यास पाठविल्यास त्याला राग येतो. म्हणजे या पध्दतीत कुठल्याही प्रकारची कार्य प्रणाली नसल्यामुळे तुम्हाला त्रास होत राहिल म्हणुन पहिले अगोदर त्या विभागामध्ये*

कार्यप्रणाली आणा. आणि ती आणल्यानंतर ही जी पॅनलची पध्दत आहे ती आणा. दुसरी काही उपयुक्त वाटेल ती पध्दत आणा. त्यानंतर नंतरचा जो पुढचा प्रश्न आहे कर्मचा-यांची संख्या आणि इतर उपाययोजना परंतु जोपर्यंत तुम्ही तेथे कार्यप्रणाली आणत नाही तोपर्यंत गोंधळ दिसणार. गोंधळ आहे तोपर्यंत खाडाबदलीची व अधिक सफाई कामगाराची मागणी होत रहणार. मग दोन्हीपैकी काही तरी एक पर्याय तुम्ही निवडला पाहिजे. परंतु इथे नगरसेवकांनी प्रत्येक वेळेस लक्षवेधी सूचना मांडत राहायच्या, बोलत राहायचे, विषय काढायचे. तुम्ही सुध्दा लक्षवेधी सूचना आल्यानंतर त्यांची थातुरमातुर उत्तरे दयायची. आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या हे चालु आहे. तर या पध्दतीने सफाई खात्यातील हा गोंधळ संपणार नाही. तुमच्या विभागाचे काम काय? ठेकेदाराचे काम काय हे अजुन निश्चित झाले नाही. ठेकेदार कधी विभागाचे काम करतो, कधी तुमचे लोक ठेकेदाराचे काम करतात. तर ज्या प्रकारे तेथे अगोदर कार्यप्रणाली उभी करा. आणि त्यानंतर पुढचे निर्णय घेण्यात यावे अशी आमची विनंती आहे.

<u>मा. महापौरः</u>-एक मिनिट, आयुक्त साहेबांना उत्तर देवू दया.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):</u>-मा. महापौर महोदया, खाडा बदलीच्या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. यापुर्वी सभागृहामध्ये याबाबतीत ठराव पारीत झाल्यानंतर खाडाबदली सफाई कामगारांची भरती करण्याबाबतची प्रक्रिया आम्ही प्रशासनामार्फत सुरू केली होती. त्यादृष्टीने न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सफाई कामगारांची एक यादी तयार करण्यांत आली होती. त्या यादीतीलच कामगार घ्यायचे होते. त्यादृष्टीने आम्ही त्या यादीची छाननी केली. त्या यादीची पहिल्या तीनशे लोकांना आम्ही बोलावले होते. बोलाविल्यानंतर खाडा बदली सफाई कामगार घेण्याची प्रक्रिया सुरू केली. दरम्यान युनियनने अशी मागणी केली की, खाडा बदली सफाई कामगार न घेता एकुण जी सफाई कामगारांची मंजुर पदे आहेत. १५५० ती संपुर्ण पदे तुम्ही भरा. परंतु खाडा बदली म्हणुन १५ टक्के पदे आपणांस आरक्षित ठेवायची असतात. तर त्यांनी ही पदे रिक्त न ठेवता. पुर्ण भरण्याबाबत मागणी केली आहे. परंतु तसे करता येत नाही. यासाठी युनियन बरोबर दोन तीन वेळा आमची बोलणी झाली आहेत. परंतु युनियनचे समाधान झालेले नाही. त्याचबरोबर कल्याण येथे सहाय्यक कामगार आयुक्त आहेत त्यांच्या कार्यालयातही याबाबत आमची बैठक झालेली आहे. तरीही युनियन याबाबतीला मान्य झाली नाही. युनियननी मान्यता दिली नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, संपुर्ण १५५० पदे आधी तुम्ही भरा तसे आपल्याला करता येणार नाही म्हणुन हे खाडाबदली कामगार नेमण्याचे अदयाप पर्यंत राहुन गेले आहे. दुसरी बाब अशी आहे की, आज रोजी आपल्या महापालिकेचे जे क्षेत्रफळ आहे त्या दृष्टीने आताची संख्या आहे ती पुरेशी आहे. आता जे कार्यरत लोक आहेत १५५० पैकी आपल्याकडे १२१४ लोक कार्यरत आहेत. रिक्त ३३६ पदे आहेत. मुकादम ७० आहेत मंजुर पदे त्यातीत ४३ कार्यरत आहेत. आणि औदयोगिक न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे २६ लोक आहेत प्रत्यक्षात मुकादमाचे एक पद रिक्त आहे. आणि पदोन्नतीसाठी आपल्याकडे ११ लोक पात्र आहेत. आणि न्यायालयाने सांगितले आहे की, २६ पदे भरताना एकच पद भरता येईल तर त्यामुळे मुकादमांची पदोन्नती आपणांस देता येणार नाही. जे खाडा बदलीवर सफाई कामगार घ्यायचे आहेत त्यासाठी १५ टक्के आरक्षित ठेवल्यामुळे व त्याबाबतच्या युनियनच्या धोरणामुळे आम्हाला आतापर्यंत कार्यवाही करता आली नाही. आणि स्वच्छतेचे काम जे आहे. सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी जो मुददा मांडला आहे की तेथे कुणी सफाई कामगार आजारी पडतो किंवा कामावर येत नाही. याबाबत मुकादम व स्वच्छता निरिक्षक यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत की त्यांच्याकडील एखादा सफाई कामगार कामावर आला नाही तर आपल्या अखत्यारीमधील जे काही सफाई कामगार कार्यरत असतील त्यातील सफाई कामगार त्याठिकाणी फिरवुन स्वच्छतेचे काम त्याच्याकडुन करवुन घेण्याबाबतचे आदेश प्रशासकीय स्तरावरून दिले जातील. स्वच्छतेबाबतचे काम करवून घेतले

जाईल. खाडाबदली कामगार नेमणे युनियनच्या भुमिकेमुळे राहुन गेले आहे. युनियनशी पुन्हा बोलणी करून आम्ही हा प्रश्न मार्गी लावु.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>सन्माननिय महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, आपण पावसाळयाच्या अगोदर दरवर्षी नाले सफाईसाठी दहा रोजंदारी सफाई कामगार प्रत्त्येक प्रभागासाठी नेमतो. ते कामगार अजुन पर्यंत का दिले नाहीत याचे जरा उत्तर दयाल तर बरे होईल.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, दरवर्षी नाले सफाईचे काम आपण करतो त्याप्रमाणे यावर्षीही आम्ही त्याबाबत निविदा मागवुन ते काम सुरू केले आहे. ठेकेदार आपण नेमलेला आहे. एक दोन दिवसामध्ये नाले सफाईचे काम सुरू होईल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>आयुक्त साहेब आपण बरोबर माहिती घ्या. आपल्या महानगरपालिकेमध्ये नाले सफाई साठी रोजंदारीवर प्रत्त्येक प्रभागात जे दहा-दहा कामगार नेमले आहेत ते काम करण्यास तयार नाहीत हे आपणांस माहित आहे का? आपण वेळेवर कुणाल पगार देत नाहीत. जर पगार दिला नाही तर आपणांकडे कोण काम करणार. आपण हा तर विचार करा. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की मी खाडाबदलीवर सफाई कामगारांच्या नेमणुका करेल. कायम स्वरूपी सफाई कामगारांच्या नेमणुका करू शकणार नाही. आयुक्त साहेबांनी स्वतः सांगितल्या नंतरही त्यांनी त्याची अदयाप पुर्तता केलेली नाही. आम्हाला कुठपर्यंत वाट पहावयास लावणार. आपण आपल्या कानामध्ये घातलेले बोळे काढा अधिका-यांनी कानात घातलेले बोळे काढावेत. आम्ही वारंवार आपणांस फॅक्स पाठवत आहोत. महासभेत आठवण करून देत आहोत. आज कमीत कमी दोन महिन्यापासुन मच्छर मारण्याच्या धुर यंत्राचा वापर होत नाही. आयुक्त साहेबांनी आपल्या दालनाबाहेर पडुन कधी तरी शहरामध्ये फेरी मारली आहे काय? मी
आपल्या दुरध्वनीवर निरोप दिला आहे की, १७ दिवसापासुन घरांमध्ये दुर्गंधी पसरली आहे. तो निरोप आपणांस मिळाला होता. अधिका-यांनी आपल्या कानातुन बोळे काढावेत. बोलण्यास आम्हास लाचार करू नका. आपण लोक फॅक्स वाचु शकत नाहीत. कर्तव्य पालन करू शकत नाही. येथे महासभेमध्ये मा. महापौर आपणांस जे आदेश देतात त्याचे आपण पालन करीत नाहीत. तर मग आपण आहात कशासाठी? मेहरबानी करा, एक निर्णय घेण्यासाठी आपणांस एक वर्ष लागतो. आम्ही हे कधीही सहन करणार नाही. प्रशासनामुळे आम्हा लोकांना आईबहीणीवर शिव्या खाव्या लागतात, आम्हा लोकांना बदनामी सहन करावी लागते. आमचे जे श्री. रामसिंघानी साहेब आहेत त्यांना आपण ओळखता का त्यांना दारू पिण्या शिवाय दुसरे काही सूचतच नाही. तेथे जे तक्रार पुस्तक आहे त्याच्यामध्ये कित्त्येक वेळा ही तक्रार लिहिली आहे. ते तक्रार पुस्तक आपण मागवुन घ्या. त्यामध्ये तक्रारीची किती पाने लिहीली आहेत? रोज सकाळी साडे सात वाजता मी तक्रार लिहितो. आपण उल्हासनगरमध्ये कधी फेरी मारता? तेथे ठेवलेल तक्रार पुस्तक आपण कधी वाचले आहे? आपले जे उपायुक्त आहेत श्री. खरात साहेब त्यांनी ते तक्रार पुस्तक कधी वाचले आहे?आमच्या म्हात्रे साहेबांनी कधी ते तक्रार पुस्तक पाहिले आहे. हे प्रशासनाचे काम आहे. कामगार कमी आहेत की जास्त आहेत. कमी असतील तर त्यांची पुर्तता केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>महापौरजी, वर्षाला ५० लाख रू. आरोग्य विभागाअंतर्गतच्या साहित्त्यावर खर्च केले जातात परंतु तेथे झाडु कूठे आहे? टोपली कुठे आहे?

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>महापौरजी, मेहरबानी करून आमची मागणी लवकरात लवकर पुर्ण करा. व आज आपणांस जो फॅक्स पाठविला आहे तो कृपया आपण काढुन वाचा. आज मी आपणांस काय लिहिले आहे? आपण ते वाचा तर खरे. आपल्याकडे वाचावयास वेळ नाही. आम्ही लोकनियुक्त प्रतिनिधी आपल्या आईबहिणींवर शिव्या खाण्यास तयार नाहीत. पगार आपण खाता, शिव्या आम्ही खायच्या? दिरंगाई आपण करता, शिव्या आम्ही खायच्या?*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. महापौरजी, ५० लाखासाठी अतिशय लहानसा प्रश्न अतिशय मोठा विषय झाला आहे. मला बोलु दिले नाही. ५० लाखाच्या त्या मुददयासाठी उपायुक्तांना व्यासपीठावर बोलवा. आपण हा जो खर्च औषधावर करतो, टोपल्यांसाठी, झाडुसाठी खर्च करतो.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>लक्षवेधीच्या रूपाने ज्यांनी महासभेसमोर जे अतिशय महत्त्वाचे मुददे मांडले आहेत. त्या मुददयांवर आयुक्तांनी उत्तर दयायचे आहे. हे जे गंभीर स्वरूपाचे मुददे श्री. सतरामदास जेसवानी व श्रीमती. भावना खिलनानी यांनी मांडले आहेत त्याबाबत आयुक्तांना खुलासा करू दया.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, किती दुःख व शरमेची गोष्ट आहे. आमचे सतरामदास जेसवानी रोज तक्रार पुस्तकात तक्रार लिहितात व तक्रार पुस्तकात जे काल लिहिले होते ते आज वाचतात पुन्हा उदया लिहितात, परत काल लिहिलेले तेच वाचतात. तक्रार पुस्तक कशासाठी असते? तक्रार पुस्तक अशासाठी असते तक्रार लिहिल्यानंतर अधिका-यांनी ती वाचावी व त्यावर कार्यवाही करावी यासाठी ते तेथेच तक्रार लिहितात तेथेच वाचतात. हे काय प्रशासन आहे की मस्करी आहे?*

*मा. सदस्या श्रीमती. अनिता गुप्ता व श्रीमती कोमल भठिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.*
*<u>मा. महापौरः-</u>आरोग्य विभागाबाबत या ज्या तक्रारी येत आहेत की तेथे बादल्या नाहीत, झाडु नाहीत, टोपल्या नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>महापौरजी अशा नाकर्त्या अधिका-यांना सेवेतुन निलंबित करा. आपण जर त्यांना निलंबित केले नाही तर मी येथे आमरण उपोषण करेन.*

*<u>मा. महापौरः-</u>प्रभागांमध्ये डिडीटी. पावडरची फवारणी केली जात नाही. तर असे हे का होत आहे? याचे कारण काय आहे? आपण जरा याचे उत्तर दया.*
*<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, आमच्या श्री. सतरामदास जेसवानी यांची जी लक्षवेधी आहे तिचे कृपया आयुक्तांनी उत्तर दयावे.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानीः-</u>आयुक्त साहेब, पॅनल सिस्टीमची गोष्ट करतात. प्रत्येक प्रभागामध्ये आठ-आठ कामगार कमी आहेत. तर आपण हे कामगार कसे ॲडजेस्ट करणार? खाडा बदली कामगार भरले नाहीत तर हे कामगार कसे ॲडजेस्ट होतील?आपण पॅनल सिस्टीमची कशी गोष्ट करत आहात.*

*<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौरजी, लक्षवेधीचा मुळ मुददा खाडा बदलीच्या संदर्भात आहे.*
*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>नांदेडच्या लोकांनी आपणांस प्रमाणपत्र कसे दिले?*
*<u>मा. महापौर :-</u>एक मिनिट, आयुक्तांना उत्तर तर देवु दया.*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :-</u>उत्तरच नाही त्याबरोबर त्यांच्याकडुन निर्णयही घ्या.*

*<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>लक्षवेधीचा मुळ मुददा खाडाबदली सफाई कामगार घेण्या विषयीचा आहे. त्याबाबत महासभेच्या ठरावानुसार आम्ही प्रयत्न केले आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आयुक्त साहेब हिंदीत बोला.*

*<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :-</u>खाडा बदलीवर जे सफाई कामगार नेमायचे होते. महासभेच्या ठरावानुसार कामगार नेमण्याचे आम्ही प्रयत्न केले. परंतु उच्च न्यायालयात प्रशासनाकडुन जी कामगारांची यादी सादर करण्यात आली होती. त्यातीलच सफाई कामगार अनुक्रमानुसार आपणांस घ्यायचे ओत. बाहेरचे कामगार घ्यायचे नाहीत. जेव्हा खाडा बदली कामगार घेण्याचा जेव्हा प्रस्ताव गेला होता. तेव्हा युनियनवाल्यांनी सांगितले होते की, जी मंजुर पदे आहेत. ती भरा परंतु १५ टक्के पदे खाडाबदलीसाठी आरक्षित ठेवावी लागतात. याबाबत दोन तीन वेळा युनियन बरोबर आमची चर्चा झाली. कामगार आयुक्त कल्याण येथे सुध्दा आमची चर्चा झाली. ही बाब युनियनवाल्यांनी सुध्दा मान्य केली नाही म्हणुन खाडा बदलीवरील सफाई कामगार आम्ही नेमु शकलो नाही नाहीतर खाडाबदलीचा आमचा प्रस्ताव तयार आहे. ३०० लोकांना आम्ही बोलावले होते त्यांची आम्ही*
*मुलाखत घेतली त्यातील २२० लोकांना आम्ही निवडले आहे. युनियन बरोबर आणखी एक दोन वेळा चर्चा करून हा खाडाबदलीचा मुददा आम्ही निकाली काढु. राहिली दुसरी गोष्ट.....*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>त्यास एक वर्ष लागेल? तोपर्यंत आमच्या शेजारी बॅरेक नं. २०८६ मध्ये एक मुलगा काविळच्या आजाराने मृत्युमुखी पडला. कॉलराच्या आजाराने कॅम्प नं. ५ मध्ये एक दोन मुले मृत्युमुखी पडली. आपणांस माहित आहे? आणखी किती मुलांना आपण मारणार?*

*<u>मा. महापौरः-</u>उभे राहुन बोला.*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>काय बोलणार? किती वर्ष आम्ही वाट पाहायची? आणखी आमच्या किती मुलांना महानगरपालिका मारणार?काय निर्णय घेतला आहे महापालिकेने? किती माणसे मृत्युमुखी पडल्यानंतर महापालिका निर्णय घेईल? आताही साहेब सांगत आहेत की, युनियनने मान्य केले तर आम्ही भरती करू. साहेब असे नाही सांगत की आम्ही लवकरात लवकर खाडा बदली सफाई कामगारांची नेमणुक करू. हे सांगतात युनियननी मान्यता दिली तर आम्ही खाडाबदली सफाई कामगार नेमु. युनियनने मान्य करेपर्यंत आम्ही वाट पहात राहायचे का? आमची मुल बाळ मृत्युमुखी पडत राहावीत?*

*<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, खाडा बदली कामगार नेमण्याचा हा जो मुददा आहे तो आम्ही महिना भरात निर्णयीत काढु.*

*मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ताः-</u>महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब माझ्या पॅनल क्रमांक ७ मध्ये एक पुरूष सफाई कामगार, एक स्त्री सफाई कामगार आहेत. श्री. लोणारे साहेब, मी २५-३० पत्र दिली आहेत. श्री. भडकवाड साहेब असताना माझ्या प्रभागात ७ कामगार दिले होते. माझ्या प्रभागातील ते कामगार काढुन घेतले आहेत. तिथे जर काही घटना घडली तर त्यास जबाबदार*

कोण असेल? लोणारे साहेबांना विनंती आहे की, खाडा बदली सफाई कामगारांची भरती केल्यानंतर त्यातील काही कामगार माझ्या प्रभागात नेमले जावेत. नाहीतर मी सुध्दा आमरण उपोषणास बसेन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मा. महापौर, उल्हासनगर शहराची कच-याची स्थिती भयानक आहे. सर्व नाल्या भरलेल्या आहेत कॉलराची साथ येणार आहे. एक महिन्यास अजुन बराच वेळ आहे. तुम्ही सांगितले की युनियन तुमचे म्हणणे ऐकत नाही. तर आपणांस वाटते का की, एक महिन्यात त्यांना तुम्ही राजी करू शकाल. पुढच्या सभेत मी पण लिहुन देईन की नाही झाले. तुम्हाला विश्वास आहे का की एक महिन्यात होईल. आठ महिन्यात तुम्ही केले नाही.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया, आपण जो ठराव केला त्यानुसार खाडा बदली कामगार भरती करण्याचे आहे त्यात हे पुर्ण करू. परंतु ती कारवाई करताना आपली गरज सुध्दा प्रशासनाने पाहिली पाहिजे. पहिले गरज तपासली पाहिजे नंतर कार्यवाही केली पाहिजे. सदस्यांचे म्हणणे आहे माझ्या प्रभागात हे काम झाले नाही, ते काम झाले नाही. माझे म्हणणे हे आहे की, नगरसेवकाने आधी प्रभागात पाहुन तक्रार केली पाहिजे की सफाई होत नाही. तात्त्काळ बदलीच्या ऐवजी दुसरा बदली कामगार मागवुन घेतला पाहिजे हे बरोबर नाही. प्रशासनास पण मदत करा. दुसरी एक गोष्ट आहे. एस.आय. आहेत, मुकादम आहेत त्यांच्याकडुन काम करून घ्या. नाही झाले तर मग तक्रार करा. यात-हेने तक्रार नाही केली प्रशासनास त्रास होतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आयुक्त साहेब, तुम्ही आरोप लावत आहात. मी हे सांगु इच्छितो ज्या प्रभागात काम होत नाही. तेच येवून तुम्हाला सांगतात की, आमच्या प्रभागात दोन सफाई कामगार आहेत. जसे मी येवून सांगतो. मी १७ पत्र लिहीली तुम्हाला, तुमच्या पर्यंत पोहचले की, माझ्या प्रभागात हा हा त्रास आहे. साफसफाईची समस्या आहे. लोकांना त्रास होतो. मी १७ पत्र लिहीली आहेत यावर तुम्ही काय कार्यवाही केली? अशा तक्रारी तुमच्याकडे येतात का? ज्या प्रभागात दोन सफाई कामगार असतात तेच येवून सांगतात. जेव्हा आम्ही मुकादमांशी बोलतो ते सांगतात की दोन सफाई कामगार आले आहेत. तुमच्याकडे तशी तक्रार येते का? तुम्ही विषय बदलु नका.

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया,सदस्यांची जी तक्रार आहे सफाई कामगारांच्या गैरहजेरीबाबत तर हे खरे आहे की ३० टक्के लोक गैरहजर असतात, त्याविषयी त्यांना सक्त ताकीद दिली जाईल. जे नाही येणार त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. परंतु जर गैरहजेरीचे प्रमाण वाढले तर खुप सफाईची समस्या वाढेल त्यावर प्रशासन कडक कारवाई करेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आयुक्त साहेब, मला अजुन एक गोष्ट सांगायची आहे.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ताः-मा. महापौर, हे म्हणतात प्रशासनास साथ दया. आमच्या घरी आम्ही खाजगी व्यक्ती या कामासाठी ठेवला आहे. आमच्या प्रभागात तीन खाजगी व्यक्ती या कामासाठी ठेवल्या आहेत. किती साथ दयायची तुम्हाला?

मा. महापौरः-एक मिनिट, बसा. आयुक्त साहेब, सदस्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्यांचे तुम्ही निवारण करा. कुणाच्या प्रभागात एक दोन कामगार तर कुणाच्या प्रभागात दहा कामगार प्रत्येकाची तक्रार येत आहे असे नाही झाले पाहिजे. कुठे बारा

माणसे काम करतात तर कुठे एक पण नाही. असे नाही झाले पाहिजे. कामगार संख्या वाढविली जावी.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-मा. महापौर, याकरिता समान वाटणी करा. ३ नंबर प्रभाग समितीमध्ये तीन चारदा असा हा विषय आला.

मा. महापौर:-मी आता आदेश दिले आहेत ना साहेबांना.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-एका प्रभागात दहा माणसे एका प्रभागात २० माणसे आहेत. कामगारांची समान वाटणी करा.

मा. महापौर:-तुम्ही बसा, मी साहेबांना आदेश दिले आहेत ते करतील.

मा. सदस्या श्रीमती. भावना खिलनानी:-आयुक्त साहेब,

मा. महापौर:-तुम्ही बसा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-मा. महापौर महोदया, उपमहापौर, आयुक्त साहेब आता दोन दिवसापासुन माणसे मिळाली आहेत सफाईसाठी. आठ-आठ, दहा-दहा माणसे दिली आहेत. नाली मधुन कचरा काढतात आणि लोकांच्या घरासमोर ठेवतात. कचरा उचलण्यासाठी गाडी नाही. फक्त नाली मधुन कचरा काढुन लोकांच्या घरासमोर ठेवण्यासाठी माणसे ठेवली आहेत का? गाडी कधी देणार?

श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मा. महापौर महोदया,गाड्यांसाठी निविदा मागवली आहे, उदया फायनल करण्यासाठी बोलविले आहे. दोन दिवसात आदेश देवून गाड्या मागविण्यात येतील.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-साहेब, ५० लाखाचे काय झाले? गाड्या नाहीत, टोपल्या नाहीत, झाडु नाहीत, मला ५० लाखाचे हिशोब पाहिजे की हे सर्व साहित्य गेले कुठे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-लक्षवेधीवर सर्वजण बोलणार का?

मा. महापौर:-सर्वजण एकत्र बोलु नका. बसा खाली.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:- साहेब, ५० लाखाचे काय झाले? गाड्या नाहीत, टोपल्या नाहीत, झाडु नाहीत, मला ५० लाखाचे हिशोब पाहिजे की हे सर्व साहित्य गेले कुठे?माझा प्रश्न त्याच्याशी संबंधित आहे कुठे गेले ५० लाख? पाऊस पडला, आजार पसरले ही काय पध्दत आहे का? १५ आजारी व्यक्तींच्या केसेस सापडल्या. हे सर्व माहित असुन देखिल काही सांगत नाही. ५० लाखाचा विषय काढला तर खाली बसा म्हणतात. मी लिखित प्रश्न दिले आहेत. मी पुन्हा प्रश्न विचारेन सोडणार नाही.

मा. सदस्य श्री. अशोक ठकुर:-मा. महापौर, मा. आयुक्त साहेब........

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. २ .

मा. सदस्य श्री. अशोक ठकुर:-एवढे मोठे शहर आहे परंतु ड्रेनेजसाठी एकच तुटलेली गाडी आहे. गाडीसाठी ठराव पास केला असुन गाडी का खरेदी केली जात नाही. याचे उत्तर दिले जावे.

<u>मा. महापौरः-</u>खरेदी करू असे म्हणतात.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २:-</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक <u>१९/०४/२००४</u>
त्यात दिनांक २८/०४/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मा. महापौरजी, २८ तारखेचे जे इतिवृत्त आमच्या हातात आहे त्यामध्ये दाखविले आहे दोन ठराव पास केले आहे. मी त्या दिवशी सदनात हजर होतो. आम्ही सर्व हजर होतो. कोणताही विषय पास करण्याआधी वाचुन दाखविला जातो. विषय वाचुन दाखविल्यावर चर्चा केली जाते त्यानंतर मतदान वगैरे होते. व नंतर ठराव पास होतो. इथे लिहिले आहे की काही ऐकु येत नव्हते. पंरतु यात लिहिले आहे की ठराव नं. २ व ३ मंजुर करण्यात आला. ठराव क्र. २ व ३ जेव्हा वाचला गेला तेव्हा सदनात कोणी ऐकले नाही. जर कुणी ऐकले नाही तर मंजुर कसे झाले? ठराव मंजुर होण्यासाठी आधी तो वाचावा लागतो, नंतर मतदान घेतले जाते. त्यादिवशी शिवसेना भाजपा सदस्यांने टॅक्स विषयावरून सभेत हंगामा केला होता त्यामुळे सदनात काही ऐकु येत नव्हते. जर काही ऐकुच येत नव्हते. तुम्ही इतिवृत्तात तसेच लिहिले आहे. त्यानंतर इतिवृत्तात असे लिहिले आहे की, काही ऐकु येत नव्हते. परंतु विचारले गेले या विषयाच्या विरोधात जे आहेत त्यांनी हात वर करावेतआणि काही लोकांनी हात वर केले. ही तर नवी पध्दत सुरू करण्यात आली. प्रस्तावाचे बाजुने कोण आहे असे आधी विचारले जाते, विरोधात कोण आहे असे नाही विचारले जात हे आम्ही पहिल्यांदाच ऐकले आहे. विषय नं. ४ मध्ये ठराव क्र. ३ आहे त्यात बोलले गेले आहे की जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. ते सुध्दा आम्ही ऐकले नाही. जेव्हा आमच्या कडे हात दाखवुन म्हंटले गेले पुर्ण सभागृह साक्षी आहे कुणी काही ऐकले नव्हते. जर ऐकलेच गेले नाही तर ठराव कसा पास झाला? तुम्ही सर्व साक्षी आहात, त्यादिवशी काही सुध्दा ऐकु येत नव्हते. जर ऐकुच येत नव्हते तर ठराव कसा वाचला गेला आणि तो कुणी ऐकला? आणि कसा पास झाला? मतदान कसे घेतले गेले?

**मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना, श्री. नरेंद्रकुमार ठकुर यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. महापौर आमचे सहयोगी यांनी जो आता सदनासमोर विषय मांडला. ही सत्त्य परिस्थिती आहे की त्यावेळी आम्ही घसा कोरडा होईपर्यंत, हात दुखे पर्यंत आम्ही इथे मेहनत केली. या मेहनतीवर पाणी फिरविण्याचे असे इतिवृत्त आहे. या इतिवृत्ताने आमच्या मेहनतीवर पाणी फिरविले. वास्तविक कोणाला कोणताच विषय ऐकु येत नव्हता. हे माझे प्रांजळ मत आहे. श्री. मोहन बेहरानी यांच्या बरोबर आम्ही भाजपा, शिवसेना सदस्य सहमत आहोत. इतके अथक परिश्रम करून हे इतिवृत्त कसे आले? कसे टेप झाले? घाईगडबडीत टेप झाले, कसे टेप झाले की यासाठी वेगळा टेप लावला होत. कृपा करून यावर खुलासा करावा. या इतिवृत्ताबाबत आम्हाला संशय आहे. अनुमोदक जे आहेत त्यांना देखिल माहित नाही की झाले काय आणि इतिवृत्तात लिहिले काय. कृपया जरा खुलासा करावा की असा कोणता टेप होता. त्याच्यावर ऐकुन हे इतिवृत्त लिहिले गेले आहे. मला वाटते हा आमच्यावर दुसरा अन्याय आहे. आधी तर एकदा केलाच केला आता दुस-यांदा पण अन्याय करत आहात.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी सागितले की प्रस्ताव जेव्हा मतदानास टाकला गेला तेव्हा हे विचारले की, जे प्रस्तावाच्या विरूध्द आहेत त्यांनी हात वर करावेत. तुम्ही जर पान नं २२ पाहिले तर त्यात जे प्रस्तावाच्या बाजुने असे मतदान आधी घेतले गेले आहे. पान नं. २३ वर प्रस्तावाच्या विरोधात असे मतदान घेतले गेले आहे. तुमची येथे नजरचुकी झाली आहे. २२ नंबर पानावर लिहिले आहेत जे सदस्य हा प्रस्ताव नामंजुर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>नामंजुर करण्याच्या बाजुने ना?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>सत्ताधारी पक्षाच्या तर्फे लेखी प्रस्ताव तसा आला होता. नामंजुर करा. म्हणुन मी तसे मतदान घेतले होते. बहुसंख्य सदस्यांनी जसे लिहुन दिले त्याच त-हेने प्रस्ताव मतदानास टाकला जातो.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>तुम्ही जे काही सदनात बोललात ते कोणी ऐकले नव्हते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>इतिवृत्तातपण सत्य परिस्थिती लिहिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>तुम्ही टेप चालवुन बघु शकता.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>टेप ऐकण्याची काही गरजच भासणार नाही कारण की, आम्ही सर्व खरे लिहिले आहे, तुम्ही जे म्हणत आहात ते देखिल खरे आहे. या दोघांत काही फरक नाही. मी तसे लिहिले आहे. तुम्ही इशारा करत होतात की आम्हाला काही ऐकु येत नाही. परंतु ....

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>आम्ही इशारा केला पण इतरांना देखिल ते ऐकु येत नव्हते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>भाजपा, शिवसेनाचे जे सन्माननिय सदस्य होते ते घोषणा देण्यात मग्न होते. त्यांनी आपले काही मत नोंदविलेलच नाही. व कॉंग्रेस पक्षाचे जे सन्माननिय सदस्य होते ते फक्त इशारा करून बसले की आम्हाला ऐकु येत नाही व सत्तापक्षाचे जे सदस्य आहेत. बहुसंख्य सदस्यांनी लिखित दिले व हात वर करून सांगितले आम्ही या प्रस्तावा सोबत आहोत. मा. महापौरांनी बहुसंख्य सदस्यांचे मत लक्षात घेवून ते जाहिर केले आहे. कायदयाने बरोबर आहे. त्यात काही चुक नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>आम्ही तुम्हाला हे नाही विचारत की कायदयात काय आहे? आमचे एकच म्हणणे आहे. तुम्ही जो प्रस्ताव वाचलात तो कोणी ऐकला नाही. आम्ही हेच म्हणत आहोत. कायदयाने तुम्ही काय केले काय नाही ते आम्ही नाही म्हणत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुमची हरकत इतिवृत्तात लिहिली गेली आहे. आम्ही त्याच्या विरोधात जात नाही. तुमच्या मताची यात नोंद आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>परंतु इथे जे इतिवृत्त लिहित आहेत त्यांना मी खास करून सांगितले होते की तुम्ही लिहा इथे कुणाला काही ऐकु येत नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>तुम्ही जे म्हणत होतात त्याची इतिवृत्तात नोंद आली आहे. त्या परिस्थितीची इथे नोंद करण्यात आली आहे. वेगळे असे काही लिहिले नाही.

मंजुर ?

<u>मा.महापौरः-</u>सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. २:-</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०४/२००४ त्यात दिनांक २८/०४/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ३:-</u> श्री राजेंद्र बामा मुंडकर यांची एक वर्षासाठी ठेक पगारावर जे. सी. बी. ऑपरेटर म्हणुन नेमणुक करणे.

<u>काही सदस्यः-</u>पास.

**मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव व श्री. नारायण पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. ३:-</u> श्री राजेंद बामा मुंडकर यांची एक वर्षासाठी ठेक पगारावर जे. सी. बी. ऑपरेटर म्हणुन नेमणुक करणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर वाहनचालकाची ६० पदे मंजुर असुन ३० पदे कार्यरत आहेत. तथापि, त्यात जे.सी.बी. ऑपरेटर या पदनामाचे पद नाही. जे.सी.बी. यंत्र चालविण्यासाठी जड वाहन चालविण्याच्या अनुभवाव्यतिरिक्त इतर कौशल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मंजुर वाहनचालकाच्या रिक्त पदापैकीएक वाहन चालकाचे पद जे.सी.बी. ऑपरेटर म्हणुन भरणे प्रस्तावित आहे. तथापि, सदर पदावर कायमस्वरूपी नियुक्ती न करता करार पध्दतीने नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात झालेली अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी जे.सी.बी. वाहनासाठी जे.सी.बी. ऑपरेटरची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेने दि. २३.७.२००४ रोजी जे.सी.बी. ऑपरेटरची मुलाखत आयोजित केली होती. त्यात एकुण तीन उमेदवार यांची मुलाखत घेण्यात आली पैकी श्री. राजेंद्र बामा मुंडकर हे जे.सी.बी. ऑपरेटर पदासाठी पात्र असल्यामुळे त्यांची ठेक पगार रू. <u>४०००/-</u> दरमहा, एक वर्षासाठी का.जा.क्र. <u>उमपा/सा.प्र.वि/आस्था/मुली/४२५</u>, दि. ३०.७.२००४ अन्वये करारपध्दतीवर नेमणूक करणेत आली आहे.

सबब, सदर प्रकरण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ५३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र. ५** **दिनांकः-१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :- श्री. प्रभुनाथ गुप्ता.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. राजेंद्र बामा मुंडकर या योग्य उमेदवाराची एका वर्षासाठी ठेक पगारावर जे.सी. बी. ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

एकमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र४:- युवक बिरादरी, भारत व समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''एक सुर एक ताल'' या समुहगान कार्यक्रमाच्या आयोजनास निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-मा. महापौरजी, मला या विषयावर असे बोलायचे आहे की,महापालिकेची आर्थिक स्थिती खराब असताना प्रत्येक विषयावर विचार करावा लागतो. इथे खाडा बदली कामगार घेण्यासाठी देखिल आर्थिक स्थितीचा विचार करावा लागतो. आजच्या तारखेत आपली महापालिका ब-याच त्रासातुन जात आहे. एवढी मोठी रक्कम देण्याच्या स्थितीमध्ये महापालिका नाही. बहुमताच्या जोरावर जर ही रक्कम देण्यात येत आहे तर भाजपा व शिवसेनेचा यास विरोध असेल.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत कृपया त्यांनी हात वर करावेत. कॉंग्रेस पक्षाचे काय आहे? या विषयाच्या ते बाजुने आहेत की विरोधात आहेत? ४३ मते.

प्रस्तावाच्या बाजुने मते :-४३ मते

७८. श्री. टेकचंदानी राजु
७९. श्रीमती रामचंदानी भावना
८०. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
८१. श्रीमती. ज्योती कलानी
८२. श्री. वाघे शामु
८३. श्री. ऐडके गणपत
८४. श्रीमती शर्मा कमला
८५. श्री. वलेचा पृथ्वी
८६. श्री. रोहडा श्यामसुंदर
८७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८८. श्री. नाना पवार
८९. श्रीमती. आहुजा नीता
९०. श्री. रुपानी चिमन
९१. श्री. शांताराम निकम
९२. श्रीमती मंसद माया

९३. श्री. गायकवाड सुरेश
९४. श्रीमती वनवारी मोना
९५. श्री. वनवारी किशोर
९६. श्री. जेसवानी सतराम
९७. श्रीमती खिलनानी भावना
९८. श्री. खेमाणी दर्शनसिंग
९९. श्रीमती कारीरा रेखा
१००. श्री. पमनानी ईश्वर
१०१. श्री. नारायण पंजाबी
१०२. श्रीमती. दिपा पंजाबी
१०३. श्री. मनोज साधवानी
१०४. श्री. लबाना होशियारसिंग
१०५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
१०६. श्री. तलरेजा विनोद
१०७. श्रीमती. रिझवानी सुजाता
१०८. श्रीमती. भारती छाबरीया
१०९. श्री. म्हस्के अंकुश
११०. श्री. लालबिहारी यादव
१११. श्री. जाधव सुरेश
११२. श्री. जाधव प्रशांत
११३. श्री. प्रमोद टाले
११४. श्री. साधवानी मोहन
११५. श्रीमती. साधवानी जया
११६. श्री. भालेराव गौतम
११७. श्रीमती. बेबी वसिटा
११८. श्री. ठाकूर अशोक
११९. श्री. मोहन बेहरानी
१२०. श्रीमती करोतिया मालती

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-१७ मते.</u>

३५. श्रीमती जावळे संगिता
३६. श्री. उमाप रामदास
३७. श्री. पुरस्वानी जमनादास
३८. श्री. रुपचंदानी बच्चाराम
३९. श्री. असरोंडकर राज
४०. श्रीमती कृष्णानी रेखा
४१. श्री. भुल्लर राजेंद्रसिह
४२. श्री. सोनावणे नथु
४३. श्री. दिलीप गायकवाड
४४. श्रीमती बामणकर नंदिनी
४५. श्रीमती खांडेकर प्रेमा
४६. श्रीमती माने किरण
४७. श्री. बोडारे धनंजय
४८. श्री. रमेश चव्हाण
४९. श्री. पाटिल विश्वनाथ
५०. श्री. चौधरी राजेंद्र

१७. श्रीमती सुर्वे जयश्री

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:-</u> युवक बिरादरी, भारत व समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''एक सुर एक ताल'' या समुहगान कार्यक्रमाच्या आयोजनास निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

दिनांक २९ जानेवारी २००४ रोजी सकाळी ८. ०० वाजता दादोजी कोंडदेव स्टेडियम, युवक बिरादरी, भारत व समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांच्या संयुक्त विदयमाने ''एक सुर एक ताल''या समुहगाना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ठाणे येथील विविध शाळांमधील २५ हजार विद्यार्थी या अभियानात सहभागी होणार असून या कार्यक्रमास राजकीय, सामाजि, सांस्कृतिक, कला, साहित्य इत्यादी क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच चित्रपट सृष्टीतील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित राहणार आहेत.

उपरोक्त कार्यक्रमासाठी व्यासपीठ, मुलाचे प्रशिक्षण, मुलांना देण्यात येणारा अल्पोपहार व त्या अनुषंगाने अंदाजे ५ लक्ष रूपये पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

सबब विश्वस्त, मा. वसंत डावखरे युवक बिरादरी, भारत व समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिकेकडुन आर्थिक मदत मिळणेस विनंती केली आहे.

सबब सन २००३-२००४ या वर्षातील अंदाजपत्रकातील C-४ मधील (IV) भाग-१ लेखाशिर्षाअंतर्गत १०,००,०००/- लाखाची तरतुद करण्यात आली असून सदर लेखा शिर्षातर्गत रूपये १,००,०००/- देण्यास मंजुरी साठी महासभेपुढे ठेवण्यात प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र. ६ दिनांकः-१९/५/२००४.**

सुचकाचे नाव :-श्रीमती. ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. शर्मा कमला

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार युवक बिरादरी, भारत व समन्वय प्रतिष्ठान, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''एक सुर एक ताल'' या समुहगान कार्यक्रमाचे आयोजनास महापालिका प्रशासनाच्या वतीने केलेल्या रू. १००,०००/- रक्कमेच्या अदायगीस कायम करित आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय :- निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे सुचविलेल्या उमेदवारांना महापालिकेच्या सेवेत लघुलेखक (निम्नश्रेणी-मराठी), कनिष्ठ लिपीक, पंपचालक, जोडारी व फायरमन या पदावर नियुक्ती करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-यात एक हरकत आहे की, निवड समितीने निर्णय दिला आहे. उमेदवराचे जात प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र यात जर काही चुक निघाली तर निवड समिती जबाबदार राहिल महासभा नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-तुम्ही बोला नका बोलु, जबाबदारी त्यांचीच राहिल. तुम्ही त्यांच्या शिफारशीअन्वये पास करत आहात.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५:- निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे सुचविलेल्या उमेदवारांना महापालिकेच्या सेवेत लघुलेखक (निम्नश्रेणी-मराठी), कनिष्ठ लिपीक, पंपचालक, जोडारी व फायरमन या पदावर नियुक्ती करणे.

प्रस्तावनाः-

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बीसीसी- २००२ /१३०६ /१६-ब, दिनांक ७ ऑक्टोंबर,२००३ अन्वये मागासवर्गीयांची सरळसेवा भरती व पदोन्नतीमधून अनुशेषाची पदे दि. ३१ डिसेंबर,२००३ पर्यत भरण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शासनाच्या मोहीमेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील शिल्लक अनुशेषांतर्गत रिक्त पदे भरण्यासाठी सेवाभरती नियमप्रमाणे जिल्हा सेवायोजन कार्यालय, ठाणे व एकात्मिक आदिवासी विकास आकल्प (शहापूर, नाशिक, पेण, घोडेगाव-पुणे) यांचेकडून यादी मागविण्यात आली होती. मागणीनुसार आप्त झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २८ व २९ जानेवारी,२००४ रोजी घेण्यात आल्या.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या निवड समितीमार्फत उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन सेवा भरती नियमानुसार व गुणवत्त्तेनुसार निवड केलेल्या पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबत शिफारस केली आहे. संवर्गनिहाय व प्रर्गनिहाय निवड झालेल्या उमेदवारांचा प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा तपशील पुढीलआमाणे आहे.

| पदाचे नाव :- लघुलेखक (निम्न श्रेणी-मराठी) | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु. जमाती | ०१ | १) शकुंतला शिरिष गावीत | १) संतोष धोंडीबा आसवले |

| पदाचे नांव :- कनिष्ठ लिपीक |
|---|

| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
|---|---|---|---|
| अनु. जमाती | ०४ | १) बाळू वाडू भांगरे.<br>२) किसन जानू द्विद.<br>३) हेमलता सावळाराम साबळे<br>४) मिनाक्षी तुकाराम जोशी. | १) कृष्णा महादु खिरारी<br>२) संतोष यशवंत खोटारे |
| विमुक्त जाती (अ) | ०२ | १) नामदेव रामचंद्र चव्हाण.<br>२) दरबार सी. राठोड. | १) दिनकर पोमाजी राठोड |
| भटक्या जमाती (ब) | ०२ | १) गोपाल जी. नाथजोगी.<br>२) संगीता श्रीराम गोसावी. | १) मनिषा बजरंग बैरागी. |
| भटक्या जमाती (क) | ०२ | १) शरद एम. परदेसी.<br>२) नरेंद्र एस. आदमाने. | १) रविंद्रकुमार एन. परदेसी |
| भटक्या जमाती (ड) | ०१ | १) गौरी सुरेश पिंपळे. | - |

| पदाचे नांव :- पंपचालक | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशे८ानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| भटक्या जमाती (ब) | ०१ | १) संतो८ा डी. प्रभू | १) विजय बी. उमरे |

| पदाचे नांव :- जोडारी | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नाव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| अनु.जाती | ०१ | १) रविंद्र एस. बैसाने | १) लोटन एस. लोंढे |
| अनु. जमाती | ०१ | १) विष्णू पांडूरंग भांगरे | १) सतिश्ा म्हसू वाघ |
| विमुक्त जाती (अ) | ०१ | १) राजेंद्र ए. मानकर | १) राजेश्ा एफ. चव्हाण |

| | | | |
|---|---|---|---|
| भटक्या जमाती (ब) | ०१ | १) योगेश रमेश पंडुरे | १) दिपक यु. बमाने |

| पदाचे नांव :- फायरमन | | | |
|---|---|---|---|
| प्रवर्ग | अनुशेषानुसार पदसंख्या | निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचे नांव |
| विशेष मागास आवर्ग | ०१ | १) अविनाश पांडुरंग नंदनवार | - |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये वरीलप्रमाणे निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्ती देण्यासाठी महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र.:-७ दिनांक:-१९/५/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. शामसुंदर रोहडा
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या निवड समितीच्या शिफारशी अनुसार लघुलेखक, कनिष्ठ लिपिक, पंपचालक, जोडारी, फायरमन या पदी सुचविलेल्या उमेदवारांस महापालिका सेवेत नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-
अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:- श्री दा. आ. पाटील यांची महापालिकेच्या सेवेत मुख्य लेखा अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

एक वर्ष त्यांना झाले आहे, दोन वर्षासाठी मुदतवाढ पाहिजे.

काही सदस्य :-पास. पास

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ६:- श्री दा. आ. पाटील यांची महापालिकेच्या सेवेत मुख्य लेखा अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः-

तत्कालीन मुख्य लेखा अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका या पदावर कार्यरत असलेले श्री. शेंडे जे.पी. यांची सेवा मूळ विभागाकडे १.१०.०२ पासून प्रत्यावर्तीत केल्यामुळे मुख्य लेखा अधिकारी हे पद रिक्त होते. रिक्त झालेल्या पदावर सक्षम अधिका-यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत मा. संचालक लेखा व कोषागारे संचालनालय मुंबई यांचेकडे विनंती केली होती.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई शासन आदेश क्र. संलेको-११.०२/प्र. क्र.२५१/२००२/भाग१/कोषा-प्रशा-१ दिनांक ५.३.२००३ अन्वये श्री. दा.आ. पाटील यांची मुख्य लेखा अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केली आहे.

त्यानुसार श्री. दा. आ. पाटील हे या महापालिकेत मुख्य लेखा अधिकारी या पदावर दि. १२.३.०३ रोजी मध्यान्होपूर्व रूजू झालेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनसुार श्री. दा.आ. पाटील यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस महापालिकेची मान्यता मिळणेकामी शासनाकडील प्राप्त झालेल्या अटी व शर्तीसह प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ८ दिनांकः-१९/७/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंदसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. दा. आ. पाटील, मुख्यलेखा अधिकारी यांच्या महापालिका सेवेत दि. १२.३.२००३ पासून दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ७:-</u> श्री युवराज भदाणे यांना महापालिकेच्या सेवेत जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती देणे.

<u>काही सदस्य:-</u>पास. दोन वर्षासाठी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>दोन वर्ष हा परीक्षाविधीन कालावधी असेल, काम जर समाधानकारक नसेल तर मग काढले जावु शकते. त्यात काही अडचण नाही.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ७:-</u> श्री युवराज भदाणे यांना महापालिकेच्या सेवेत जनसंपर्क अधिकारी या पदावर नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थापना दि. २१ ऑक्टोबर १९९६ रोजी झालेली आहे. महापालिकेच्या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिकेतर्फे सार्वजनिक हिताच्या योजना राबविल्या जातात तसेच पालिकेकडुन व धोरणात्मक बाबी यांना प्रसिध्दी देणे व प्रशासन व सामान्य जनता यातील दुवा साधने यासाठी महापालिकेमध्ये जनसंपर्क अधिकारी असणे गरजेचे आहे. सदर पदास महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. <u>उमपा/२२९८/२०३०/प्र. क्र.२५९/९८/नवि-२३</u> , मंत्रालय, मुंबई-३२दि. १३ जून २००२ रोजी जनसंपर्क अधिकारी या पदास मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार जनसंपर्क अधिकारी हे पद भरण्यासाठी विद्यापीठ सेवा योजन, माहिती व मार्गदर्शन केंद्र, विद्यापीठ सेवा योजन कार्यालय, विद्यापीठ विद्यार्थीभवन दुसरा मजला बी रोड चर्चगेट मुंबई ४०० ०२० या कार्यालयाकडून १: ५ या प्रमाणात सेवाभरती नियमाप्रमाणे पात्र उमेदवरांची यादी दि. २८.१०.२००३ च्या पत्राने मागविण्यात आली होती. त्यानुसार सदर कार्यालयाने दि. १.११.२००३ च्या पत्रान्वये ४ उमेदवारांची नावे कळविली होती. सदर उमेदवारांना दि. ७.१.२००३ च्या पत्रान्वये दि. २८.११.०३ रोजी मुलाखतीस बोलविण्यात आले होते. श्री युवराज धोंडु भदाणे हे सदर पदाचे शैक्षणिक अर्हता धारण करत असल्याचे दिसुन आले. त्यामुळे 'जनसंपर्क अधिकारी' श्री. भदाणे यांची निवड समितीने निवड केली आहे. श्री. भदाणे यांना कार्यालयीन आदेश <u>क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/३६८</u> दि. २२.१२.०३अन्वये ६५००-२००-१०५०० या वेतन श्रेणीत (अधिक नियमानुसार मिळणारे

इतर भत्ते) जनसंपर्क अधिकारी या पदावर सहा महिन्याकरिता नियुक्ती देण्यात आली आहे. या काळात त्यांचे काम समाधानकारण आढळल्यास त्यांची दोन वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीत नियुक्ती करण्यात येईल.

सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ७३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे

**महासभा ठराव क्र. ९ दिनांकः-१९/७/२००४.**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे श्री. युवराज भदाणे यांना महापालिकेच्या सेवेत जनसंपर्क अधिकारी या पदावर दि. ११.१२.२००३ पासुन दोन वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ८:-</u> श्री चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक २०/१२/२००३ पासुन मुळ पदावर नियुक्तीस कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मला असे वाटते की, चंदर धिरमलानी यांनी एस.एस.सी चे प्रमाणपत्र दिले आहे ते बोगस आहे. त्या प्रमाणपत्राची प्रत माझ्याकडे आहे. दुस-या कुणाचे नाव आहे.खाडाखोड करून दिले ते पण प्रमाणपत्र माझ्याकडे आहे. म्हणुन हा विषय येथे थांबवला जावा. आयुक्तांना मी प्रमाणपत्र देतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>सदरचा विषय पुढे ढकलावा किंवा कार्यसूचीवरून वगळुन टाका.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा विषय सर्वानुमते कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

[ <u>विषय क्र. ८:-</u> श्री चंदर धिरमलानी, गॅरेज हेल्पर यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक २०/१२/२००३ पासुन मुळ पदावर

नियुक्तीस कायम करणे. ]

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ९:-</u> श्री पी. डी. डोईफोडे यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठ विभागात शाखा अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

**मा. सदस्य श्री. वाघे शामु हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>त्यांना परत पाठवा. मा. महापौर, मा. उपमहापौर श्री. विनोद ठाकुर, श्री. सुरेश जाधव सर्व सदस्यांनी या विरोधात आवाज उठविला होता. त्यांना म्हणुन परत पाठविले होते. परत त्यांना आणले गेले. आता जर त्यांना कायम केले तर महासभेचा अपमान आहे म्हणुन त्यांना परत पाठविण्यात यावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>जे त्यांना महापालिका सेवेत ठेवण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. श्रीमती. जयश्री सुर्वे तुम्ही विरोधात आहात का? तुमचे मत नोंदु की नाही?

<u>प्रस्तावाच्या बाजुने मते :-१६ मते</u>

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. पुरस्वानी जमनादास
४. श्री. रुपचंदानी बच्चाराम
५. श्री. असरोंडकर राज
६. श्रीमती कृष्णानी रेखा
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिह
८. श्री. सोनावणे नथु
९. श्री. दिलीप गायकवाड
१०. श्रीमती बामणकर नंदिनी
११. श्रीमती खांडेकर प्रेमा
१२. श्रीमती माने किरण
१३. श्री. बोडारे धनंजय
१४. श्री. रमेश चव्हाण
१५. श्री. पाटिल विश्वनाथ
१६. श्री. चौधरी राजेंद्र

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> जे त्यांना महापालिका सेवेत ठेवण्याच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-४० मते.</u>

१. श्री. टेकचंदानी राजु
२. श्रीमती रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्रीमती. ज्योती कलानी
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती शर्मा कमला

७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०. श्री. नाना पवार
११. श्रीमती. आहुजा नीता
१२. श्री. रुपानी चिमन
१३. श्री. शांताराम निकम
१४. श्रीमती मंसद माया
१५. श्री. गायकवाड सुरेश
१६. श्रीमती वनवारी मोना
१७. श्री. वनवारी किशोर
१८. श्री. जेसवानी सतराम
१९. श्रीमती खिलनानी भावना
२०. श्री. खेमाणी दर्शनासिंग
२१. श्रीमती कारीरा रेखा
२२. श्री. पमनानी ईश्वर
२३. श्री. नारायण पंजाबी
२४. श्रीमती. दिपा पंजाबी
२५. श्री. मनोज साधवानी
२६. श्री. लबाना होशियारसिंग
२७. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२८. श्री. तलरेजा विनोद
२९. श्रीमती. रिझवानी सुजाता
३०. श्रीमती. भारती छाबरीया
३१. श्री. म्हस्के अंकुश
३२. श्री. लालबिहारी यादव
३३. श्री. जाधव सुरेश
३४. श्री. जाधव प्रशांत
३५. श्री. प्रमोद टाले
३६. श्री. साधवानी मोहन
३७. श्रीमती. साधवानी जया
३८. श्री. मोहन बेहरानी
३९. श्रीमती करोतिया मालती
४०. श्रीमती जयश्री सुर्वे

<u>तटस्थ मते :- ३ मते</u>

१. श्रीमती बेबी वासिटा
२. श्री. भालेराव गौतम
३. श्री. अशोक ठाकुर

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ९:-</u> श्री पी. डी. डोईफोडे यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

<u>मुख्य</u> अभियंता,(कोकण विभाग)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क ४०१ दि.२०.१०.०३ अन्वये श्री पी.डी.डोईफोडे, यांची

शाखा अभियंता या पदावर  उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री पी.डी.डोईफोडे, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.२२.१०.०३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री पी.डी.डोईफोडे,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी त्यांच्या  प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र.   १०                     दिनांकः-१९/७/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती जयश्री सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. पी. डी. डोईफोडे यांची महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १०</u> :- श्री एन. डी. पाटील यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u>पास पास.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १०:-</u> श्री एन. डी. पाटील यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र ४६६ दि.२०.१२.०३ अन्वये श्री एन.डी.पाटील, यांची शाखा अभियंता या पदावर  उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री एन.डी.पाटील, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.०१.०१.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री एन.डी.पाटील यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दोन वर्षाचा आहे .तरी श्री एन.डी.पाटील, शाखा अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

**महासभा ठराव क :-११** **दिनांकः-१९/७/२००४.**

सुचकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री. एन. डी. पाटील, शाखा अभियंता यांच्या उल्हासनगर महानगरपालिका सेवेत दि. ११.२००४ पासुन एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ११ :-</u> श्री एस. के. सेलवन यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठा विभागात उप अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-एक वर्षासाठी मंजुर करण्यात यावे

**मा. सदस्य श्री. वाघे शामु यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप</u>:-मा. महापौरजी, हा जो पाणी पुरवठा विभाग आहे. याबाबत मी या विषयावर दोन शब्द बोलु इच्छितो, विशेष बाब ही आहे की, श्री. जवांदे साहेबासारखा अधिकारी आल्यानंतर एक रेकॉर्ड उल्हासनगरमध्ये झाला आहे की,इतका उन्हाळा असताना देखिल एकही मोर्चा किंवा कोणीही पाण्याची तक्रार घेवून महापालिकेकडे आले नाही म्हणुन त्यांचा जो कर्मचारी वर्ग आहे त्यांना कंन्टीन्यु करावे कारण ते सहयोगी आहेत त्यांचे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ११:-** श्री एस. के. सेलवन यांची महापालिकेच्या सेवेत पाणी पुरवठा विभागात उप अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

**प्रस्तावना:-**

मुख्य अभियंता,(कोकण विभाग)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/आस्था-२/के.क्र. ३८३/४३५१ दि.२०.०१०.०३ अन्वये श्री एस.के.सेलवन, यांची उप अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री एस.के.सेलवन, हे या महानगरपालिकेत उप अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.०१.११.०३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या उप अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री एस.के.सेलवन,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दोन वर्षाचा आहे .तरी त्यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र :- ११ दिनांक:-१९/५/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. गणपत ऐडके
अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री. एस. के. सेलवन, उप अभियंता यांच्या उल्हासनगर महापालिका सेवेत दि. १.११.२००३ पासून एका वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देत आहे..

सुचकांची सही-
अनुमोदकांची सही-

**एकमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-**विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १२:-** महापालिकेच्या शहरातील भाजी मार्केटमधील गाळे / ओटे / दुकाने उच्चतम निविदाधारकांना पाच वर्षाकरिता भाड्याने देणे.

**काही सदस्य:-**पास.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-**मा. महापौरजी, हा जो भाजी मार्केटचा विषय आहे. त्यात मटन मार्केट ३ नंबर येथील आमच्या समाजातील काही लोकांनी टेंडर भरले होते परंतु त्यांची नावे गहाळ झाली आहेत. उदया किंवा परवा मी त्यांना बोलावतो. जर काही चुक झाली असेल तर मेहरबानी करून त्यात दुरूस्ती करावी. खुपशी नावे गहाळ झाली आहेत. सात आठ नावे गहाळ झाली आहेत. ते जरा वेरीफाय करा.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-**४ नंबरचे भाजी मार्केट कुठे आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-४ नंबर कुठे लिहिले आहे?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-४ नंबरमध्ये भाजी मार्केटच नाही. कुठे आहे?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-१९ सेक्शनमध्ये आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-असतात का तिथे भाजी मार्केटवाले?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):- आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-तिथे भाजीवाले असतात का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-यात नाही आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-४ नंबरमध्ये लोक राहत नाही का?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-भाजी मार्केट क्रमांक ४ येथे ६४ गाळे आहेत ते पुर्णपणे मोडकळीस आले आहेत. सुरवातीपासुन मार्केट बांधलेले नाही. इथे नाही आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-काय नाही आहे?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-रिकामेच आहेत. मोडलेले आहेत.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-महापालिकेला काही उत्त्पन्न त्यातुन काही मिळणार आहे का? प्रस्ताव आहे का? ४ नंबरला लोक राहत नाही का? मार्केट बांधण्यासाठी काही प्रस्ताव आला आहे का?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-दुरुस्तीसाठी आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागास दिले आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- किती दिवस झाले?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):- एक वर्ष झाले.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- एक वर्ष गेले मग सार्व. बांधकाम विभागवाले काय करतात? तेथे नागरीकांना सुविधा नाही. भाजीमार्केटला कुठे जाणार ते? ४ नंबरच्या लोकांना भाजी मार्केट नको आहे का?

**Jh- dksGsdj ¼mivk;qDr vfrØe.k foHkkx½%&** lkoZ- cka/kdke foHkkxkdMqu izkdyu r;kj Ogk;ps vkgs-

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:- प्राकलन आले का?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):- नाही.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :- कृष्णमंडळ शाळेच्या समोर जे भाजी मार्केट बांधलेले आहे, महानगरपालिकेने. तिथे सर्व रोडवर बसतात. आणि येणा-या

जाणा-या लोकांना एवढा त्रास होतो. एवढी घाण होते. तर त्या लोकांना जे भाजी मार्केट बांधलेले आहे, महानगरपालिकेने, ते दुरुस्त करुन तिथे बदली करु शकत नाही का? बाहेर जे भाजीवाले बसतात, त्यांना महानगरपालिकेने मनाई केली , त्यांच्यावर कारवाई केली तर ते आपोआप जावून बसतील भाजीमार्केटमध्ये. तोपर्यंत त्या गाळयांची विक्री पण होणार नाही. कुणी तिथे बसायला तयार नाही आणि त्याचा लिलाव पण होणार नाही. जोपर्यंत तुम्ही बाहेर बसणा-यांवर कारवाई करत नाही, बंदी आणत नाही तोपर्यंत ते आत मध्ये बसायला तयारच होणार नाहीत. त्यांच्यावर प्रथम कारवाई करणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u> आयुक्त साहेब, उत्तर दया याचे. तुम्ही हे म्हणतात की, एक वर्ष आधी सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगितले होते की तेथे मार्केट बनवा. सार्वजनिक बांधकाम विभागाने काय केले? कुठपर्यंत आणले? काही प्रगती पथावर आहे का ते? आणि लोक फुटपाथावर बसले आहेत आणि तुम्ही त्याला दंड लावता. त्यांना मार्केट बनवून देत नाहीत, मग तुम्ही त्यांना दंड का लावता? आणि लोक जाणार कुठे? लोकांना मार्केट नको का, ४ नंबरच्या लोकांना?

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नाची माहिती आता माझ्याकडे नाही आहे, ती पुढच्या वेळेस देतो तुम्हाला.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u> सार्वजनिक विभागाने प्राकलन तयार करुन स्थायी समिती पुढे ठेवले पाहिजे, ते त्यांचे काम आहे.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, याचे प्राकलन मी स्थायी समितीपुढे ठेवण्याची व्यवस्था करतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> आता पर्यंत प्राकलन बनले का? का नाही बनविले का जाणून बूजून दुर्लक्ष केले? याची आम्हांला माहिती पाहिजे. ४ नंबरला तुम्ही जाणून बुजून मागे ठेवता?

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> याबाबत प्राकलन ठेवले नसतील. तयार केले नसतील मी खुलासा विचारतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u> त्यांना विचारा शहर अभियंतांना. त्यांना विचारा बनविले आहेत की नाही प्राकलन का यांनीच अजून दिले नाहीत. यांनी दिलेच नसतील? सगळयांची येतात १ नंबर, २ नंबर............

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>याबाबत माहिती घेवून मी स्थायी समितीपुढे ठेवण्याची व्यवस्था करतो. आणि ज्यांनी ठेवले नसतील, त्याला जबाबदार धरुन कारवाई करतो. स्पष्टीकरण मागतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u> मा. महापौर , मला यावर बोलायचे आहे, जी यादी दिली आहे ती बरोबर नाही आहे. जसे की, २ नंबर मार्केटमध्ये १ ते २६ पर्यंत दिले आहे. त्यात ११ , १५ ,२५ गाळयाचे काय झाले? तिथे ६.७५ मिटर आहे. ३ नंबरमध्ये पण तसेच आहे. त्याचा ३०० रुपये दर आणि इथला ५०० रुपये दर हा फरक का? कुणाला २५ रुपये फरकाने तर कुणाला १२०० , १५०० रुपये फरकाने दिले हा फरक का? ही बरोबर पध्दत नाही. एका मार्केटमध्ये ८४ गाळे आहेत. इतर कुठे गेलेत? आता एवढयांचे टेंडर मागविले तर बाकीच्यांचे कुठे? १ ,२ ,४ आहेत व ३ नंबर कुठे गेले? नंतर ५ , ८ ,९ ,१० सर्व आकडे गायब? हे अपुर्ण आहे. हे बरोबर नाही आहे. मला समजवा तुम्ही.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>जय भवानी मार्केट, भाजी मार्केट, उल्हासनगर-१, ८४ गाळे आहेत, ज्यांनी लिलावात भाग घेतला. ज्यांचे मिनिमम प्राईज पेक्षा जास्त दर आलेत असे ३० लोक आहेत. बाकी ५४ जण आहेत, त्यांची मागणीच नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> मागणी नाहीत तर त्याची पण माहिती तुम्हांला दयायला पाहिजे होती.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>दुस-यांदा रिकव्हर केले, परंतु डिफरन्स कुणाचाच आला नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> मग आता ते गाळे बंद राहतील?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u> पुन्हा तो रिकॉल करावा लागेल.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> बघा निविदा पध्दत कशी असते, एकदा जर भाव जाहिर झाला, तर दुसरे लोक जास्त दराने भरणार नाहीत. ते म्हणतील दुस-यांना इतक्या कमी दराने दिले, आम्ही का जास्त ऑफर करायचे?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>जितके वाजवी आहेत तेवढे तर आले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> ते काय मिनिमम दर दयायला सुध्दा तयार नाहीत काय? कुणाचे ३०० रुपये आहेत, फक्त १० रुपये वाढवून दिलेत. दुस-याचे ५०० वरुन १५०० रुपये दर आला. असे का? एक व्यक्ती १५०० रुपये भरुन देवू शकते गाळयावर. दुसरा १० रुपये फक्त वाढवतो. मार्केट तर तेच आहे ना? एक व्यक्ती १५०० रुपये जास्त देते. त्याच्याशी ब्लॅकमेलींग केले आहे. गरज आहे तर घ्या, नाहीतर दुस-याला देवू.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u> आम्ही कुणाला थांबवू शकत नाही. येवढे भरा, तेवढे भरा, मोहरबंद निविदा येतात. त्यांनी किती दर भरले आम्हांला माहित नसते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> १ ते ८४ पर्यंत गाळे निश्चित होत नाहीत, तोपर्यंत एकास नव्या दराने व दुस-यास जुन्या दराने असे कसे?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u> एकाला ५०० भरले, दुस-याने १५०० भरले, का भरले याचे उत्तर आमच्याकडे नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u> हा भ्रष्टाचाराचा मुददा आहे, मी सरळ सांगतो. हे संगनमताने झाले आहे. १५ गाळयाचे काही भाव नाही? २६ गाळयांचे भाव आले आणि ५४ गाळयांचे का नाही आलेत?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>प्लीज जरा हे सांगा हे कुणाची संगनमताने आहे?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> बाहेरच्या लोकांनी केले आहे. ज्यांनी लाचारीने भरले त्यांनी तर जास्त दर लिहिले ना?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>आम्ही काय करु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> तुम्ही जी निविदा काढली ती पुर्ण मार्केट साठी काढली. जोपर्यंत ८४ गाळयांचे होत नाहीत, इतर लोक जुन्या दराने तिथे बसणार आणि ज्यांनी निविदा न भरल्यास त्यांना नवा दर लागू करणार आणि मार्केट तेच. एक ३०० रुपये भरणार, एक २००० रुपये भरणार? या निविदा केव्हा मागविल्या होत्त्या.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>संगनमताविषयी मी सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> निविदा २ वर्षापुर्वी मागविली होती, २ वर्षानंतर कशी फायनल झाली? निविदा फायनल करण्यासाठी किती दिवसाची मुदत असते. हे २००२ ची निविदा आहे. व २००४ मध्ये निविदा येतात? २ वर्ष तुम्ही कुठे झोपला होतात? मी तुमच्याकडे ५० वेळा चक्करा मारल्या यासाठी. की फायनल करा सर्वांचे. तुम्ही म्हणाला होतात की, माझ्या आधी जे उपायुक्त होते त्यांचे हे काम होते. हे पुर्णपणे चुकीचे आहे. एक व्यक्ती ५०० रुपये भरणार, एक व्यक्ती ३०० ?

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>तुम्ही निर्णय घेवू शकतात. संगनमताने कोण करतात माहित नाही. रिजेक्ट करु शकतात.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u>एक व्यक्ती ३१० रुपये भरतो, एक व्यक्ती १५०० रिजेक्ट करा ते. मार्केट तर तेच आहे. असे तर नाही ३नंबरचा भाव वेगळा, २ नंबरचा वेगळा आणि ४ नंबरचा तर तुम्ही लिहिलेच नाही आहे. का नाही आले त्याचे? करायचे तर पुर्ण करा. १ ते ५ पर्यंत.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u> आता सांगितले ना ४ नंबर चे सर्व.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u>बरे एक काम करा सर्व रदद करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, आता जे भाजी मार्केट भाडयाने देण्याचा जो प्रस्ताव आला आहे, हे गाळे नगरपालिकेपासून आहे. नगरपालिकेपासून तर आजपर्यंत महापालिकेला कधीही आजपर्यंत एक रुपया पण उत्त्पन्न मिळाले नाही. सर्वजण तेथे अनाधिकृत रित्त्या जावून आत बसले आहेत. कोणी काही नगरपालिकेला किंवा महापालिकेला देत नाहीत. ३-३ , ४-४दा निविदा मागविल्यावर आता प्रतिसाद मिळाला आहे. जितके पण गाळे भरले गेले आहेत, त्यातून आपण त्यांना दिले तर महापालिकेचे उत्त्पन्न वाढेल. बाजारभावाप्रमाणे दर निश्चित केले आहे. जिथे पण गाळयांचे लिलाव केला आहे. जो दर मिळाला महानगरपालिकेने त्याचा स्विकार केला. एकदा निविदा मागविले प्रतिसाद नाही मिळाला, दुस-यांदा मागविली, दुस-यांदा प्रतिसाद नाही मिळाला, तिस-यांदा मागविली, तिस-यांदा प्रतिसाद नाही मिळाला. डिफर जरी केले तरी पुढच्या महिन्यात हेच दर पुन्हा येणार. जसे आमचे मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण म्हणाले की, ४ नंबरचे मार्केट का नाही आले. तर यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकामाचे काही काम राहिले आहे. आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले की, सार्वजनिक विभागाचे काम करुन त्याचेपण लिलाव करु. तर मग ४ नंबरचे मार्केट जे टाकले नाही गेले त्याबाबत निविदा मागवा म्हणजे आपल्याला महसूल मिळेल. तर हा जो मुददा आहे महापालिकेचा. जर सर्व महसूल बंद केले तर कसे होणार? कर वाढ नाही, पाणी दर वाढ नाही? भाजीमार्केट देखील देवू नका. सर्व जर महसूलाचे मार्ग जर बंद केले तर महापालिका बुडुन जाईल. तर त्यासाठी आज जसे आमचे कॉंग्रेस

गटनेता श्री. मोहन बेहरानी साहेब, टॅक्स नका वाढवू अशी मागणी आहे पुन्हा वर्तमानपत्रात येईल की, २००करोड थकबाकी आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-२०० करोड मी नाही तुम्ही केले आहे. मी तुम्हांला आठवण करून देतो. ८६ मध्ये जेव्हा नगरपालिकेची सत्ता हातात घेतली तेव्हा शून्य कर्ज होते , आता २०० करोड आहे. माहित नाहि जेव्हा शेवट होईल तेव्हा काय होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- तुम्हांला अजून महापालिकेची परिस्थिती काय याची सविस्तर माहिती नाही. तुम्ही वर्तमानपत्रात काहीही देवू शकतात. वास्तविक महापालिकेची परिस्थिती काय हे मी तुम्हांला सभेनंतर सांगतो. किती कर्ज आहे? काय स्थिती आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :- किशोर भाई, हे मी तुम्हांला सांगणार की तुम्ही मला सांगणार? माझ्याकडे डिटेल्स आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- तुमचे जे २०० करोड आहेत, ते चुकीचे आहेत. आपण सर्व बाजूने जर उत्पन्न घेण्याचे थांबविले. तर हे ठिक नाही. जितके पण महापालिकेवर कर्ज झाले आहे, ते काय कोणी घरी जावून केले नाही. शहरात विकास झाला आहे. आम्ही मानतो आमचा पक्ष ८६ पासून शहराचा विकास करत आहे. आणि करत रहाणार. त्यासाठी आमची काही हरकत नाही. शहराचा विकास करण्यासाठी आम्ही विचार करत आलो आहोत आणि करत रहाणार.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-कामाचा विकास केला आहे की कर्जाचा विकास केला आहे. २०० करोड रूपयाचे. जरा खुलासा करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-त्याचा खुलासा करतो. तुम्ही नव्याने निवडुन आला आहात तुम्हाला माहित नाही. की कित्येक वर्षापासुन महापालिका, नगरपालिका कशी चालत आहे. आपणांस हे माहित नाही. जे लोक कर्जासाठी म्हणुन येथे ओरडतात तेच काम करून हळुहळु कर्ज वाढत जाते. माझी सभागृहाला विनंती आहे. लोकांनी भरलेल्या दरानुसार जितके गाळे आहेत, ते दिल्यावर दुसरे गाळे पण जर त्याच दराने गेले तर महापालिकेला भाजीमार्केटपासुन उत्पन्न मिळण्याची सुरूवात तर होईल. थेंबे थेंबे तळे साचे अशा रितीने जर आपण बचत केली तर पुढे जावुन महापालिकेची आर्थीक स्थिती सुदृढ होईल. हा भाजीमार्केटचा मुददा आहे. हे मंजुर करावे तसेच त्या सोबत श्री. नारायण पंजाबी यांनी ज्या गोष्टी लक्षात आणुन दिल्या आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मला अजुन यावर सांगायचे आहे. मी याबाबतीत तुमच्याकडे आलो तेव्हा तुम्ही सांगितले होते जुनी थकबाकी ज्यांच्यावर आहे त्यांना गाळे देण्यात येणार नाही. या यादीमध्ये मला ५० टक्के असे लोक आढळतात. ज्यांनी आधी पण भाडे भरले नाही. ते आता ७००-८००-१५०० भाडे कसे भरणार? तुम्ही सांगितले होते ना की आम्ही फायनल करत नाही. कारण की त्यांच्याकडे जुनी थकबाकी आहे. तुम्ही त्याची वसुली केली का?

श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-ज्यांच्याकडे थकबाकी आहे त्यांचा यादीत समावेश नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-त्यांची जुनीच थकबाकी बारा हजार, पंधरा हजार आहे ती त्यांनी भरली नाही तर त्यांना नव्याने कसे दिले?

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>ज्यांची थकबाकी आहे जोपर्यंत ते भरत नाही तोपर्यंत गाळा देण्यात येवू नये. हा ठराव सर्व संमतीने पास करावा आणि इतर जे मार्केट आहे त्याच्यासाठी पुर्ननिविदा मागवा. आणि आमच्या मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. नारायण पंजाबी यांनी ४ नंबरच्या मार्केट विषयी सांगितले. ते लवकरात लवकर तयार करून ते पण भाडयाने दया म्हणजे उत्पन्न मिळेल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी,आताच आपण सांगितले की, जे ८४ गाळे आहेत त्यामधील ३० गाळयांसाठी निविदा दर आले, ५४ गाळयांवर निविदा आल्या नाहीत. परंतु आज जी परिस्थिती तिथे आहे. सर्व गाळे भरलेले आहेत. ते त्याचा वापर करत आहेत. त्यासाठी तुम्ही माहिती दया.*

*<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>त्यांना काढावे लागेल.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, दोन तीनदा निविदा मागवुन सुध्दा कोणी भरत नाही. जे ५४ गाळे आहेत. आपला जो मिनिमम रेट आहे. त्यामध्ये जर कुणी पत्र देवून सुध्दा गाळे घेवू इच्छित असाल तर तुम्ही दया. कारण की निविदा जाणुन बुजून लोक भरत नाहीत. ज्यांनी एक गाळा घेतला तो दोन तीन गाळे वापरत आहेत.*

*<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>त्यांना तेथुन काढण्यात येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>एकदा पुन्हा निविदा मागवा त्यानंतर जर गाळे रिकामे राहिले तर .........*

*<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>निविदा मागवु. जे गाळे मागतील त्यांना देवू आणि इतरांना बाहेर काढु.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>हे आधी करा.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, उल्हासनगर स्टेशनच्या बाजुला महापालिकेतर्फे मच्छीमार्केट तयार केले गेले त्या मार्केटची आता काय स्थिती आहे. ते पण भाडयाने देण्याचा विचार महापालिकेने केला आहे का?*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः-</u>मा. महापौरजी, त्या बांधकामाची माहिती अभियंत्त्याने दिली पाहिजे, कार्यकारी अभियंत्त्यांना बोलवा ना, बांधकामची तिथे काय स्थिती आहे. डुकरे बसण्यासाठी तिथे काही शेड बांधल्या आहेत का? त्या बांधकामाची माहिती दया. ४ नंबरची हकीकत काय ते सांगा.*

*<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>मच्छीमार्केट बाबत निविदा जेव्हा भाजी मार्केटसाठी मागवू तेव्हा त्याचवेळी मागवु.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>४ वेळा निविदा काढल्या आहेत भाडयाने देण्याचे. अजुन पर्यंत दिले नाही ही आमची माहिती तुमची माहिती काय?*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>तुम्ही माहिती दया. त्याचा वापर तिथे मुतारी म्हणुन करतात. जिथे पोस्ट ऑफीस साठी आरक्षण आहे आपल्या महापालिकेचे तिथे मच्छी विकतात व जिथे मच्छीमार्केटसाठी आहे तिथे मुतारी म्हणुन वापरले जाते. हे सर्व वेगळेच आहे.*

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>त्याची पहाणी करतो मी, आताच काय मी सांगु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>स्टेशन जवळ तिथे बनवुन ठेवले आहे तिथे डुकरे बसतात, काही त्याचा उपयोग नाही. आणि तिथे पोस्ट ऑफिससाठी आरक्षण आहे तिथे मच्छीवाले बसतात. अशा दहा लेखी तक्रारी केल्या आहेत.

<u>श्री. कोळेकर (उपआयुक्त अतिक्रमण विभाग):-</u>मी प्रत्यक्ष बघतो.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>महापौरजी, उल्हास स्टेशनच्या बाजुला मच्छीमार्केट बनविले आहे ते गाळे कुणाला दिले गेले नाही. त्याबाबत मी सभागृहास काही सांगु इच्छितो. अधिकारी जे आहेत त्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवून काही निर्णय घ्यावे. हे मार्केट बनविण्याचा विचार तेव्हा झाला तेव्हा आमच्या भगिनी श्रीमती ज्योती कालानी नगराध्यक्षा होत्त्या नगरपालिकेच्या मी उपाध्यक्ष होतो. उल्हासनगर स्टेशनच्या दुस-या बाजुस जेथे मराठ सेक्शन आहे. तेथील काही लोक मच्छीचा धंदा करत होते. तिथे त्यांना पोलिस व काही स्थानिक गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना ब्लॅकमेल करत व त्यांच्याकडुन हप्ता वसुल करत होते त्यांनी नगरपालिकेकडे मागणी केली, श्री. दिलीप मालवणकर यांनी पुढाकार घेतला होता, शिवसेनेचे ते त्यावेळचे नगरसेवक होते व विरोधी पक्षनेता होते. त्यांच्या मागणी वरून नगराध्यक्षा यांनी मार्केट बनविण्याची परवानगी दिली. परंतु मार्केटमधील गाळे देण्याचा जेव्हा प्रयत्न केला गेला. त्यात असे काही देकारकार आले आहेत की जे मच्छी व्यवयाय करतच नव्हते. माझी सदनाला विनंती ओह की ज्यां लोकांसाठी मार्केट बनविले आहे. वास्तविक जे उल्हास स्टेशन वर मच्छीचा धंदा करत होते. व ज्यांची मागणी होती ज्यांच्यासाठी हे मार्केट बनविले त्या लोकांना हे गाळे देण्याचा प्रयत्न केला जावा व अशी काही व्यवस्था केली जावी. जेणेकरून जे वास्तविक धंदा तेथे करत आहेत. त्यांना ते गाळे मिळाले पाहिजेत. या गोष्टीकडे खास लक्ष दिले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>मा. महापौरजी, जसे श्री. हरदास माखिजा यांनी सांगितले याची माहिती मला देखिल आहे. आमच्या समाजातील कित्त्येक लोक मच्छीचा व्यवसाय तेथे करत होते. व मला माहित आहे की, त्यांनी त्यासाठी तिथे उपोषण, आंदोलन केले. नंतर माहित पडले की तिथे आरक्षित भुखंड आहे. तो आरक्षित भुखंड आहे. त्यामुळे त्यांना अजुन गाळे दिले गेले नाही. मासळी व्यवसाय करणा-यामध्ये सर्व जातीचे लोक आहेत. परंतु ते अजुनही भटकत आहेत. तर माझी ही विंनती आहे की, याबाबतीत जी पण माहिती पाहिजे. ती श्री. माखिजा साहेब, यांच्याकडुन श्री. जाधव साहेबांकडुन माहिती घेवून योग्य ती कार्यवाही करावी तर मेहरबानी होईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, यासोबत अजुन एक माहिती मी सभागृहासमोर आणु इच्छितो की हे जे मच्छीमार्केट आहे. निवडुन आलेले प्रतिनीधी त्यासाठी मागणी करतच आहे की त्याचा वापर करण्यात यावा परंतु त्याचबरोबर महापालिकेचे जे लेखा परिक्षण विभाग आहे, त्या विभागाने देखिल या मच्छीमार्केटचा वापर होत नाही. त्यामुळे महापालिकेचे नुकसान होत आहे अशात-हेची हरकत त्यांनी घेतली आहे. व प्रशासनाचे हे कर्तव्यच आहे की ऑडीट ऑबजेक्शन पुर्ण करावे. काही ना काही तरी योग्य निर्णय घ्यावा. प्रशासनाचा स्वतःचा निर्णय असायला पाहिजे होता मला वाटते ऑडीट ऑबजेक्शन असुन सुध्दा दोन तीन वर्ष झाले आहेत. तरी अजुन काही कारवाई होत नाही. हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, श्री. हरदस माखिजा साहेब, यांनी जसे सांगितले ज्यांच्यासाठी मार्केट बनविले आहे त्यांनाच दिले गेले पाहिजे दुसरे कुणाला दिले नाही गेले पाहिजे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

**मा. सदस्या श्रीमती. किरण माने, श्रीमती. जयश्री सुर्वे, श्रीमती प्रेमा खांडेकर, श्रीमती रेखा कृष्णानी, श्रीमती नंदीनी बामणकर ह्या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा.महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १२:-</u> महापालिकेच्या शहरातील भाजी मार्केटमधील गाळे / ओटे / दुकाने उच्चतम निविदाधारकांना पाच वर्षांकरिता भाडयाने देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महापालिका हददीतील भाजी मार्केट क्र. १,२,३ व ५ यांच्या निविदा लिलाव पदधतीने देण्याबाबत महासभा ठराव क्र.११ दि. १९.७.०२ नुसार मागविण्यात आल्या होत्त्या. गाळे/ ओटे/ दुकाने भाडे तत्त्वावर देणेबाबत निविदा क्र. उमपा / मालमत्ता/०३ /२००२, दि. १.११.०२ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. सदर निविदा दि. १०.१२. २००२ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित निविदा धारक, उप-आयुक्त (शहर), लेखा परिक्षक, लेखा अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आल्या होत्त्या.

भाजी मार्केट क्र. १,२,३ व ५ मधिल गाळे / ओटे/ दुकाने यांचा लिलाव झाल्यानंतर ज्यांची निविदा रक्कम ही इतर निविदा धारकांपेक्षा जास्त आहे. त्यांनाच ठरावाप्रमाणे गाळे / ओटे / दुकाने देण्यास प्रस्तावित केले आहे. सोबत परिशिष्ट अ,ब,क,ड जोडत आहे.

उपरोक्त भाजी मार्केट क्र. १,२,३ व ५ मधिल निविदा धारकांना गाळे / ओटे / दुकाने ५ वर्षाकरीता भाडयाने देण्यासंबंधी मंजुरीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये प्रस्तावित करीत आहे.

# परिशिष्ट अ

## भाजी मार्केट क्र. १

| गाळा क्र. | गाळा क्षेत्र चौ.मी. | निविदा धारकाचे नांव | किमान देकार | प्राप्त देकार | शेरा किमान देकारा पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|
| १ | २.८६ | श्री. बाळु द. तामखडे | ३००.०० | ३२५.०० | २५.०० |
| २ | २.९६ | श्री. हरेश गो. नागपाल | ३००.०० | ३२५.०० | २५.०० |
| ४ | ३.४२ | श्री. रशिद अ.मदरासा | ३००.०० | १२००.०० | ९००.०० |
| ६ | ३.२३ | श्री. अमृतलाल क. भटीजा | ३००.०० | ३००.०० | -. |
| १० | ३.२३ | श्री. रमेश च. पगारे | ३००.०० | ४००.०० | १००.०० |
| २६ | ३.१० | श्री. चंद्रकांत व. भोइटे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| २७ | ३.१० | श्री. राजा गु. भटीजा | ३००.०० | ३००.०० | -. |
| २८ | ३.१० | श्रीमती मालनबाई गायकवाड | ३००.०० | ४५०.०० | १५०.०० |
| ३१ | ३.१० | श्री. भैजी म. सुरेला | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ३४ | ३.१० | श्री. दिपक नेभनदास वाधवा | ३००.०० | ३२०.०० | २०.०० |
| ३५ | ३.१० | श्री. हसानंद चिमनानी | ३००.०० | ३२०.०० | २०.०० |
| ३७ | ३.४२ | श्री. संदिपाल ज्ञानेश्वर सावळे | ३००.०० | ५००.०० | २००.०० |
| ३९ | ३.४२ | श्री. बुगामदीर फकिरा अल्ली | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ४४ | ३.४२ | श्री. बिहारी लालपाल | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ४७ | ३.१० | श्री. दत्ता उज्जैनकर | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५५ | ३.१० | श्री. बच्चुवन्ना मल्ल्या | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५७ | २.७९ | श्रीमती राधा सुखदेव जाधव | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ५८ | २.९६ | श्रीमती आशा विरु वाघरी मल्या | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ६६ | ३.२३ | श्री. संजय उज्जैनकर | ३००.०० | ४००.०० | १००.०० |
| ६९ | ३.२३ | श्री. रामदास जाधव | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ७० | ३.२३ | श्री. श्रीराम भास्कर | ३००.०० | ३००.०० | - |
| ७१ | ३.२३ | श्री. विठ्ठल पाटिल | ३००.०० | ४००.०० | १००.०० |
| ७२ | ३.१४ | श्रीमती शोभा जाधव | ३००.०० | ४००.०० | १००.०० |
| ७३ | ३.२३ | श्रीमती सरुबाई सोनवणे | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ७४ | ३.२३ | श्री. दिनकर खैर | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ७६ | ३.५१ | श्री. बाळु सुरेला | ३००.०० | ३००.०० | -. |
| ७७ | ३.४२ | श्री. गणेशकुमार राजपुत | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ८० | ३.२३ | श्री. शंकर खरपूडे | ३००.०० | ३००.०० | -. |
| ८१ | ३.२३ | श्रीमती छायाबाई पवार | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| ८४ | २.८७ | श्री. सुरेश दरयानी | ३००.०० | ३८०.०० | ८०.०० |

# परिशिष्ट 'ब'

## भाजी मार्केट क्र. ०२

| गाळा क्रमांक | गाळा क्षेत्र चौ मिटर | निविदा धारकाचे नाव | किमान देकार | प्राप्त देकार | शेरा किमान देकारापेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६.७५ | श्री. किशोर भ. सनोटा | ५००.०० | २००१.०० | १५०१.०० |
| २ | ६.३० | श्री. ताराचंद रामचंद | ५००.०० | १७५०.०० | १२५०.०० |
| ३ | ६.३० | श्री. प्रेमचंद एस. झा. | ५००.०० | १५०१.०० | १००१.०० |
| ४ | ६.७५ | श्री. गोपजेठानंद आईलदासानी | ५००.०० | १८०१.०० | १३०१.०० |
| ५ | ६.७५ | श्री. राजिव शध | ५००.०० | १५०१.०० | १००१.०० |
| ६ | ६.३० | श्री. दिपक क. सहजानी | ५००.०० | ११२५.०० | ६२५.०० |
| ७ | ६.३० | श्री. कन्हैयालाल नारायणदास | ५००.०० | ७२५.०० | २२५.०० |
| ८ | ६.३० | श्रीमती. अंजना सेवकराम | ५००.०० | १०००.०० | ५००.०० |
| ९ | ६.३० | श्री. इंदर हरिराम वाधवा | ५००.०० | ६०१.०० | १०१.०० |
| १० | ६.३० | श्री. मुरलीधर अ. निर्भवणे | ५००.०० | ६००.०० | १००.०० |
| १२ | ६.६७ | श्री. गोपाल ह. वाधवा | ५००.०० | १००१.०० | ५०१.०० |
| १३ | ६.५२ | श्री. जगत अ. वनवारी | ५००.०० | ६५०.०० | १५०.०० |
| १४ | ६.३० | श्री. हेमंत इ. पेसवानी | ५००.०० | ६२५.०० | १२५.०० |
| १६ | ६.७५ | श्री. प्रकाश मा. डोडेजा | ५००.०० | ६५०.०० | १५०.०० |
| १७ | ६.३० | श्री. श्याम सोनेजा | ५००.०० | ७००.०० | २००.०० |
| १८ | ६.३० | श्री. मोहनदास दिपचंद | ५००.०० | ७०१.०० | २०१.०० |
| १९ | ६.३० | श्री. दत्तु गो. चौथे | ५००.०० | ६००.०० | १००.०० |
| २० | ६.३० | श्री. संभाजी ना. गोडबोले | ५००.०० | ८०५.०० | ३०५.०० |
| २१ | ६.३० | श्री. लच्छुमल राजानी | ५००.०० | ६५०.०० | १५०.०० |
| २२ | ६.३० | श्री. धनश्याम टे. भटीजा | ५००.०० | ७५०.०० | २५०.०० |
| २३ | ६.३० | श्री. हरेश डी. जावा | ५००.०० | ६०१.०० | १०१.०० |
| २४ | ६.३० | श्री. राकेश ह. पेसवानी | ५००.०० | ९५१.०० | ४५१.०० |
| २६ | ६.३० | श्री. कुरेशी त. ख्वाजा | ५००.०० | ७२५.०० | २२५.०० |

# परिशिष्ट क

## भाजी मार्केट क्र.०३

| गाळा क्रमांक | गाळा क्षेत्र चौ.मी. | निविदा धारकाचे नांव | किमान देकार | प्राप्त देकार | शेरा किमान देकारापेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २.५० | श्रीमती शरमीला तोलानी | ३००.०० | ४००.०० | १००.०० |
| १९ | २.६५ | सौ.कल्पना एस शर्मा | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| २१ | २.८३ | सौ.इंदुबाई सुर्यवंशी | ३००.०० | ३००.०० | - |
| २३ | २.६७ | श्रीमती पार्वती हाटकर | ३००.०० | ३००.०० | - |
| २८ | २.६७ | श्रीमती इंदुबाई उज्जेनकर | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| ३० | ३.४२ | श्रीमती कल्पना एस शर्मा | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| ५८ | २.८३ | श्रीमती लक्ष्मी वाघ | ३००.०० | ३००.०० | - |
| ६३ | २.७५ | श्री. इंदरलाल दौलतराम | ३००.०० | ३००.०० | - |
| ७० | २.३६ | श्री. धरमु आहुजा | ३००.०० | ३००.०० | - |
| ७२ | २.४५ | श्रीमती. जीजाबाई कि. उज्जैनकर | ३००.०० | ३००.०० | - |
| ७४ | २.५७ | सौ. राजश्री सुभाष चौधरी | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| ७७ | २.४५ | सौ. राधा पाटील | ३००.०० | ३००.०० | - |
| ८९ | २.४० | श्री. सुरेश शर्मा | ३००.०० | ३४१.०० | ४१.०० |
| ९८ | २.४८ | श्रीमती कांती वाघरी | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| १०३ | २.४७ | सौ. राधिका निंबुलाल | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| १०५ | ३.४२ | सौ. हिराबाई सावळे | ३००.०० | ३५१.०० | ५१.०० |
| १०८ | २.४९ | श्री. हरेश भागवाणी | ३००.०० | ३२०.०० | २०.०० |
| ११९ | २.५९ | श्रीमती मनु वाघरी | ३००.०० | ३००.०० | - |
| १२८ | २.६५ | श्री. रमेश चुगवाणी | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| १२९ | २.५८ | श्री. महेद्र कुमार गुप्ता | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| १३१ | २.५४ | श्री. गौतम बनसोडे | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| १३३ | २.५४ | श्री. कनहेयालाल गुप्ता | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| १३४ | २.५८ | सौ. कल्पना सुरेक्ष शर्मा | ३००.०० | ४०१.०० | १०१.०० |
| १३६ | २.५४ | श्री. पितांबर चौहान | ३००.०० | ३२०.०० | २०.०० |
| १४२ | २.६४ | श्री. धर्मेद गुप्ता | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| १४६ | २.५८ | श्री. शंकर सोनवणे | ३००.०० | ३०१.०० | १.०० |
| १५१ | ३.२९ | श्री. राजेंद्र माने | ३००.०० | ३५०.०० | ५०.०० |
| १५४ | ६.५० | श्री. सुरेश शर्मा | ३००.०० | ३२५.०० | २५.०० |
| १५८ | ३.२९ | श्री. मोंहनसिंग लबाना | ३००.०० | ३०७.०० | ७.०० |
| १६० | ३.५८ | श्री. फारुक कुरेशी | ३००.०० | ६००.०० | ३००.०० |
| १६१ | ३.९४ | श्री. बुरासिंग झामनसिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १६२ | ३.७१ | श्री. पुरनसिंग मिर्च्युसिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १६३ | ४.५५ | श्री. अजितसिंग हासासिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १६४ | ४.०८ | श्री. भोजासिंह कृपालसिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १७७ | ४.०९ | श्री. कतारसिंह भुलासिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १७८ | ४.२० | श्री. बाबुसिंह पिनिसिंह | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |
| १७९ | ४.२० | श्री. मोहनसिंग लबाना | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| १८० | ४.२२ | श्री.रणजीतसिंग अर्जुनसिंग | ३००.०० | ३०५.०० | ५.०० |

परिशिष्ट ड
भाजी मार्केट क्र ०५.

| गाळा क्रमांक | गाळा क्षेत्र चौ.मी. | निविदा धारकाचे नाव | किमान देकार | प्राप्त देकार | शेरा किमान देकारा पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|
| ६ | २.७३. | श्री. अलगुप्रसाद गुप्ता | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ७ | २.९० | श्री. चमन गुप्ता | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ८ | २.९५ | श्री. हिरामन निकम | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ९ | २.९५ | श्री. जनार्दन वि. सकपाळ | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| १० | ३.०० | श्री. अशोक सु. गोदानी | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ११ | २.७९ | श्री. कमलेश अ. गोदानी | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| १५ | ३.०९ | श्रीमती. संगिता शि. इंगळे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| १८ | ३.०६ | श्री. किशन क. पंजाबी | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| १९ | ३.०४ | श्री. मुन्नाप्रसाद वै. गुप्ता | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| २२ | ३.०४ | श्री. किशोर स. वासवानी | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| २३ | ३.१३ | श्री. अशोक व. क्षिरसागर | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| २७ | ३.०९ | श्री. गोपाल बा. भांडे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| २८ | २.९७ | श्री. कमलेश तु. सावलदास | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ३० | २.९९ | श्री. मोहन प्रभुमलराजानी | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ३१ | ३.११ | श्री. सुनिल प्र विदया | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ३३ | ३.०० | श्री. अजय वसंत दुधाणे | ३००..०० | ७७७.०० | ४७७.०० |
| ३४ | ३.०४ | श्री. बालु रावजी खारवा | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ३७ | ३.०६ | श्रीमती. विमलाबाई शि इंगळे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ३८ | ३.०७ | श्री. मदन बलुमल कुकरेजा | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ४१ | ३.०० | श्री. राजेद्र नामदेव अडांगळे | ३००.०० | ४०१.२५ | १०१.२५ |
| ४२ | २.८८ | श्री. राजेश धर्मा. पाटील | ३००.०० | ८५१.०० | ५५१.०० |
| ४३ | ३.०१ | श्री. दिलीप नामदेव अडांगळे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ४४ | ३.१८ | श्री. बहाददुर सोनकर | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ४७ | २.९८ | श्री. अर्जुन खारपाटील | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५० | ३.११ | श्री. विठ्ठल धुमाळ | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५१ | २.९४ | श्री. लक्ष्मण गुप्ता | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५२ | ३.०९ | श्री. अमरनाथ बाबुराम | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५३ | २.९७ | श्री. ओमप्रकाश बाबुराम | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५४ | २.८८ | श्री. सुरेश जावळे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५५ | ३.१८ | श्रीमती. रेखा जावळे | ३००.०० | ३२५.०० | २५.०० |
| ५६ | ३.०० | श्री. दिलीप वाघ | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५७ | २.९२ | श्री. गणेश धुमाळ | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ५८ | २.९७ | श्री. दत्तात्रेय धुमाळ | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |
| ६४ | २.९१ | श्री. दिपक दिदोरडे | ३००.०० | ३१०.०० | १०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६५ | २.९३ | श्री. युसुफ खान | ३००.०० | १००१.०० | ७०१.०० |

महासभा ठराव क्र. १३ दिनांक:-१९/७/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंदसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहीत भाजीमार्केट क्र. १,२,३ व ५ मधील गाळे / ओटे / दुकाने परिशिष्ट अ,ब,क, ड मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या योग्य निविदाधारकांना अधिकतम प्राप्त देकार रक्कमेवर ५ वर्षा करिता भाडयाने देणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १३:-</u> दलीत वस्ती सुधारणा योजनेंतर्गत प्रलंबित असलेल्या कामांस मंजुरी देणे व त्याकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांना शिफारस करणे.

**मा. सदस्या श्रीमती. मोना वनवारी, श्रीमती भारती छाबरीया, श्रीमती. रेखा कारीरा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा.महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १३:-</u> दलीत वस्ती सुधारणा योजनेंतर्गत प्रलंबित असलेल्या कामांस मंजुरी देणे व त्याकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांना शिफारस करणे.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महापालिकेने वर्ष २०००-२००१ मध्ये एकंदर १६ कामे रू १०१.४५ लक्ष खर्चाची प्रस्तावित केली होती. या कामांपैकी ६ कामांना मंजुरी मिळुन वर्षे २००१-२००२ मध्ये रूपये २५ लक्ष निधी उपलब्ध झाला होता सदर कामे पुर्ण करून निधी खर्ची घालण्यात आला आहे उर्वरीत १० कामांना मंजुरी मिळाली नव्हती.

उल्हासनगर महानगरपालिकेने वर्ष २००१-२००२ करिता एकंदर १५ कामे रू. १३८.४०७ लक्ष खर्चाची प्रस्तावित केली होती. त्यावेळी फक्त रू. २० लक्ष निधी उपलब्ध झाल्यामुळे फक्त ५ कामांना मंजुरी मिळाल्यानंतर कामांची कार्यवाही करण्यात आली आहे. त्या वर्षामध्ये १० कामांना मंजुरी मिळाली नव्हती.

वर्ष २००२-२००३ मध्ये ३७ कामे रू. १८०.८२६ लक्ष खर्चाची प्रस्तावित केली होती.सदर कामांना मंजुरी मिळालेली नाही सदर कामे मंजुरी अभावी जिल्हाधीकारी कार्यालयात प्रलंबीत आहेत.

अशा प्रकारे एकंदर १०+१०+३७=५७ कामे जिल्हाधिकारी कार्यालयात मंजुरी करीता प्रलंबीत आहेत. सदर कामांची प्राकलने व नकाशे सार्वजनिक बांधकाम खात्याने मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविलेली असुन या कामांच्या नकाशांना शासकीय मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे नगररचनाकार यांची मान्यता व महासभेने मान्यता दिलेली आहे. सदर कामा बाबत सर्व संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडून त्या कामांचे सद्यास्थितीतील अहवाल मागविण्यात आले आहेत.

या अहवालावरून सदर ५७ कामांपैकी ४ कामे यापुर्वी महानगरपालिका निधीमधून करून घेतली असल्याने या योजनेमधुन ती कामे वगळुन उर्वरीत ५३ कामे करणे बाकी आहे असे माहित पडते त्याशिवाय वर्ष १९९७-९८ मध्ये उपलब्ध झालेल्या निधिपैकी शिल्लक असलेल्या रूपये १६.६९ लक्ष निधी उल्हासनगर महानगरपालिकेकडे खर्चाविना शिल्लक आहे.

मा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयामध्ये या विषयाची बैठक झाली होती.त्यावेळी मागील वर्षाप्रमाणे अंदाजे २५ लक्ष इतका निधि चालु वर्षी उपलब्ध होणेची संभावना आह असे समजले होते, तसेच वर्ष १९९७-९८ मधील रू १६.६९ लक्ष निधि महापालिकेकडे खर्चा विना प्रलंबीत आहे.अशा प्रकारे एकंदर ४२ लक्ष पर्यतची कामे चालु वर्षी घेता येउ शकतात असा अंदाज आहे.

परंतु उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मागील तीन वर्षापासुन प्रलंबीत असलेल्या ५३ कामांची किंमत रू २,७३,७६,९९१/- इतकी होत असल्याने या कामांमधुन रू ४२ लक्ष किमतीची कामे निवडणे आवश्यक होते. या कामांपैकी अत्यावश्यक व लोकपयोगी कामांची निवड करून १२ कामांच्या प्रस्तावांना जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून मंजुरी घेणे करीता प्रस्तावित करण्यापुर्वी महासभेकडुन मान्यता मिळणेकरिता सादर करत आहे.

या १२ कामांची यादी परिशिष्ट 'अ' असुन या कामांची एकंदर किमत रू ४२,१४,१३३/- इतकी होत आहे या कामांना दलित वस्ती सुधारणा योजना कार्यक्रमांर्तगत चालु वर्षी २००३-२००४ मध्ये जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडून मान्यता मिळून कामांची कार्यवाही करणेकरीता महासभेकडुन मान्यता मिळणे साठी प्रस्तावित करण्यात येत आहे

महासभा ठराव क्र. १४ दिनांकः-१९/५/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या निधीतून सोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेल्या एकुण १२ प्रलंबित कामी रू. ४२,१४,१३३/- च्या खर्चास मान्यता देत आहे व सदरचा प्रस्ताव अंतीम मंजुरीसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यास प्रशासनास निर्देशित करित आहे.

सुचकांची सही/-
अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने</u>

# महापौर / पीठासीन अधिकारी
# सर्वसाधारण महासभा
# उल्हासनगर महानगरपालिका

परिशिष्ट 'अ'

उल्हासनगर महानगरपालिका

सार्वजनिक बांधकाम विभाग

दलित वस्ती सुधारणा योजना वर्ष २०००-२००१ व वर्ष २००१-२००३ व वर्ष २००२-२००३ मधील प्रस्तावित केलेल्या व मंजुरी न मिळालेली कामे पुन्हा वर्ष २००३-२००४ करिता प्रस्तावित करण्याकरिता प्रस्ताव

| अनु. क्र. | वर्ष मधील प्रस्ताव | अनु. क्र. | कामांचे नांव | प्रभाग क्र | प्राकलनीय किंमत | ,शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०००.२००१ | ५ | प्र क्र ३१ मध्ये रामधन यादव यांच्या घराजवळ ६ बैठकिचे शौचालय बांधणे | १ | २७९४६०.०० | त्या वेळीचा व आताचा अनु.जातीचा प्रभाग |
| २ | २००१.२००२ | १० | उल्हासनगर-३ येथील भैयासाहेब नगर, रमाबाई आंबेडकरनगर, हनुमान नगर, येथे रस्ता बी. एम. व एसी आणि नाली बनविणे.(प्रभाग क्रमांक-७) | ५ | ४७००००.०० | त्या वेळीचा व आताचा अनु. जातीचा प्रभाग |
| ३ | २००१.२००२ | ११ | उल्हासनगर-२ येथील फॅक्टरी भारत मार्बल कारखाना ते संतोषी माता मंदिर येथे रस्ता बनविणे.(प्रभाग क्रमांक-८) | ६ | ४९८००००.०० | त्या वेळीचा व आताचा अनु. जातीचा प्रभाग |
| ४ | २००१.२००२ | १४ | उल्हासनगर-३ येथील रेणूका सोसायटी जवळ सम्राट अशोक नगर येथे १० बैठकिचे शौचालय बांधणे.(प्रभाग क्र१३) | ८ | ३८४३००.०० | त्या वेळीचा व आताचा अनु. जातीचा प्रभाग |
| ५ | २००१.२००२ | १६ | उल्हासनगर-४ येथील ब्लॉक ऐ-१४० आणि ब्लॉक ऐ-१४२ नाली बनविणे आणि डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र१६) | ९ | ४५९९००.०० | त्या वेळीचा व आताचा अनु. जातीचा प्रभाग |
| ६ | २००२.२००३ | ३८ | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १४ मधील मेघ्नदूत अपार्टमेंटच्या बाजूला रस्ता बी एम आणि एसी ने बांधणे व नाली बांधणे | १४ | ६२४८००.०० | सद्याचा अनु.जातीचा प्रभाग |
| ७ | २००२.२००३ | ४० | उल्हासनगर-४ येथील प्र क्र १५ मध्ये शिंदे पेन्टर, बाबूल किराणा स्टोअर, येथे नाला व साकव बांधणे | १५ | ४६५७३८.०० | सद्याचाअनु.जातीचा प्रभाग |
| ८ | २००२.२००३ | ४२ | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र १५ मध्ये वाल्मीकी नगर येथे नाली आणि चेकर्ड टाईल्स बसविणे | १५ | २०००३०.०० | दलित वस्तीआणि सद्याचा अनु.जातीचा प्रभाग |
| ९ | २००२.२००३ | ४४ | उलहसनगर-४ येथील प्र क्र. १७ मध्ये हरिजनपाड येथे नाला आणि साकव बांधणे | १७ | ४३३६०५.०० | दलितवस्ती |
| १० | २००२.२००३ | ५१ | उल्हासनगर-५ येथील महात्मा फुलेनगर मध्ये वाघमारे यांचे घर ते पोलिस वसाहत येथे नाल्या बांधणे | १३ | ९९७००.०० | दलितवस्ती |
| ११ | २००२.२००३ | ५२ | उल्हासनगर-५ येथील पटेलनगर मध्ये शिवसेना ऑफिस ते कदम यांचे घर येथे नाल्या बांधणे | १३ | १९९६००.०० | दलितवस्ती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | २००२-२००३ | ५३ | उल्हासनगर-५ येथील महात्मा ज्योतिबा फुलेनगर आर पी आय ऑफिस ते महानगरपालिका शौचालय येथे नाल्या बांधणे | १३ | ९९०००.०० | दलितवस्ती |
| | | | | एकूण | ४२१४१३३.०० | |

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. वाघे शामु, श्री. मनोज साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

विषय क्र. १४:- उल्हासनगर विकास योजनेंतर्गत आरक्षण कमांक १० मधील रहिवासी जागेच्या आरक्षणाऐवजी मुस्लीम समाजासाठी कब्रस्तान हा वापर बदलणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण बदलाचा व वापर बदलाचा प्रस्ताव शासनास पाठविणे.

काही सदस्य :-पास. पास.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १४:- उल्हासनगर विकास योजनेंतर्गत आरक्षण कमांक १० मधील रहिवासी जागेच्या आरक्षणाऐवजी मुस्लीम समाजासाठी कब्रस्तान हा वापर बदलणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण बदलाचा व वापर बदलाचा प्रस्ताव शासनास पाठविणे.

प्रस्तावना:-

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, अध्यक्ष मुस्लिम जमात कब्रस्थान ट्रस्ट यांनी आ. क्र. १० मध्ये समाविष्ट असलेल्या जागेची मागणी कब्रस्थानासाठी केली आहे. सदर जागा मंजुर विकास योजनेमध्ये रहिवास विभागात आहे. या पुर्वी दि. २०.२. २००१ रोजी महासभेचे ठराव क्र. २८ अन्वये प्रारूप विकास योजनेतील आरक्षण क्र. १० वरील सामाजिक, सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयीसाठीचे या आरक्षणामधील जमिनीपैकी काही भाग शहरातील मुस्लिम जमातीकरीता दफनभुमी प्रयोजनार्थ उपविभागीय अधिकारी (महसुल विभागाचे सक्षम अधिकारी) किंवा मा. जिल्हाधिकारी ठाणे यापैकी आवश्यक वाटेल त्या प्राधिकरणामार्फत शासनाकडुन महापालिकेकडे हस्तांतरीत करून घेणेस महासभेची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शासनाने हयाबाबत प्रारूप विकास आराखड्यात तसा बदल करता येणार नाही, असे पत्रात नमुद केले आहे.

सदर मुस्लिम जमातीने मागणी केलेली जागा मंजूर विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट असल्याने व प्रसिध्द प्रारूप विकास योजनेप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिम व कल्याणकारी सुखसोयीसाठी आरक्षित असल्याने वापर बदलासाठी किरकोळ फेरबदल मंजूर व प्रसिध्द प्रारूप विकास आराखड्यात केल्यानंतरच ही जागा कब्रस्थानासाठी देता येवू शकेल. शासनाने संदर्भित पत्रात असे आदेश निर्गमित केले आहेत की, अर्जदाराने मागणी केलेली जागा ही मंजुर विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ट असुन सदर जागा कब्रस्थान म्हणुन फेरबदल करणेबाबत उल्हासनगर महानगरपालिकेने आवश्यक ती सर्व कार्यवाही करून महाराष्ट्र प्रादशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७

अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करावा सदर प्रस्ताव शासनास सादर झाल्यानंतरच त्यावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

वरील अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षणाबदलाचा व वापर बदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्वी महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, विषयी महासभेपुढे विचार विनिमय करण्यासाठी मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे. मा. आयुक्त यांच्या आदेशास अधिन राहुन सदर विषय महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

**महासभा ठराव क्र. १५ दिनांकः-१९/७/२००४.**

सुचकाचे नाव :- १. श्रीमती ज्याती कलानी

२. श्री किशोर वनवारी

३. श्री हरदास माखीजा

४. श्री मोहन बेहरानी

अनुमोदकाचे नाव :- १. श्री बच्चाराम रुपचंदानी

२. श्री राजेंद्र चौधरी

३. श्री गौतम भालेराव

४. श्री शांताराम निकम

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार सुधारित प्रारूप विकास योजनेतील सामाजिक सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयीसाठीचे आरक्षण क्र. १० वरील शासकीय जमीनीपैकी पुर्वीच्या ठराव क्र. २८ दि. २०.२.२००२ प्रमाणे काही भाग शहरातील मुस्लीम जमाती करिता कब्रस्थान प्रयोजनार्थ आरक्षणात बदलाचा व मंजुर विकास योजनेतील रहिवाशी ऐवजी कब्रस्थान असा वापर बदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये शासनाचे मंजुरीचे अधिन राहून मान्य करित आहे.

सुचकांची सहया/- १.
२.
३.
४.
अनुमोदकांची सहया/-१.
२.
३.
४.

<u>एकमताने</u>

महापौर / पीठसीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी, धंदे व व्यवसाय करणेसाठी परवान्या संबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता देणे.

काही सदस्य :-नामंजुर करण्यात यावे.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

विषय क्र. १५:- उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी, धंदे व व्यवसाय करणेसाठी परवान्या संबंधी प्रारुप उपविधी व प्रारुप नियमावलीस अंतिम मान्यता देणे.

प्रस्तावनाः-

वरील विषयाबाबत उपविधी करण्यासाठी पस्ताव महापालिकेच्या विचाराधीन होता त्या अनुषंगाने महासभा ठराव क्र. १११ दिनांक १९.१२.२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार स्थानिक वर्तमानपत्रामध्ये आवश्यक ती प्रसिध्दी देवून दि. ३१.१.२००४ अखेर सूचना व हरकती मागवल्या आहेत. प्रस्तुत प्रारूप उपविधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी दिली ते राजपत्र बुधवार, डिसेंबर ३१, २००३ रोजी असाधारण प्राधिकृत प्रकाशन शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यामध्ये भाग दोन, पृष्ठ क्र. ५७ वर प्रसिध्द झाले आहे.

वरील प्रारूप उपविधी जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापि वरील मुदतीत कोणाचे सूचना अगर हरकती प्राप्त झालेले नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरी करता राज्यशासनाकडेपाठविण्या अगोदर महासभेपुढे अंतिम मंजुरी करता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १६** **दिनांकः-१९/५/२००४.**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार शासनाच्या मंजुरीस अधीन राहून उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारूप उपविधी व प्रारूप नियमावलीस अंतिम मान्यता देत नाही व त्यातील प्रस्तावित फी निश्चित करित नाही.

सुचकांची सही/-
अनुमोदकांची सही/-

एकमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १६:- उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास मान्यता देणे.

काही सदस्य :-पास. पास.

मा.महापौर:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १६:- उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना:-

विद्युत विभागा मार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी ३ वर्तमान पत्र म्हणजे दै. नवभारत, दै. फ्रि प्रेस व दै. सकाळ यात निविदा सुचना देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात मे. हिन्दुस्तान स्क्रेप, श्री. के. आर. शाहीवाला, श्री. आबु तालीब, मे. एस. के इन्टरप्राईजेस, मे. लोकई यादव स्क्रेप, श्री. राम नारायण पांडे, मे. रेहमतुलाह भंगारवाला, मे. इंडियान वायर स्क्रेप, मे. सबा टेड्रर्स, मे. क्यूबा इन्टरप्राईजेस, मे. सुल्तान डिस्पोसल स्टोर्स, श्री. रफीउल्हा खांन, श्री. अबदुल्ला खांन, श्री. फकिर मोहम्मद खांन, मे. पुरव सेफटी इंजीनियर्स व श्री शाहा मोहम्मद यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले

सदर निविदा इसारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत १२/४/०४ रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत होती, ३ निविदा धारकांनी इसारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक १५/४/०४ रोजी सांयकाळी ४.१५ वाजता उघडण्यात आल्या त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

INITIAL COMPERATIVE STATEMENT

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. K.R. Sahiwala | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 40 वॉ. कॉपर चोक | नग | 250 | 12.86 | 12.87 | 15.92 | | 3,980.00 |
| 2. | 40 वॉ. टयुब लाईट | नग | 1300 | 3.75 | 2.25 | 2.00 | | 2,925.00 |
| 3. | 250 वॉ. सोडियम चोक | नग | 440 | 79.30 | 90.00 | 120.00 | | 52,800.00 |

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. K.R. Sahiwala | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. | 250 वॉ. सोडियम बल्ब | नग | 2800 | 56.10 | 10.00 | 32.52 | Lumsum 1,00,786 | 91,056.00 |
| 5. | 100 ॲ. कटाउट | नग | 1000 | 8.00 | 5.00 | 3.00 | | 5,000.00 |
| 6. | २५० वॉ. होल्डर | नग | 500 | 1.00 | 0.50 | 0.50 | | 250.00 |
| 7. | इगनीटर | नग | 1500 | 1.50 | Nil | 1.50 | | 2,250.00 |
| 8. | २५० वॉ सोडियम फक्त कॅप | नग | 250 | 2.50 | 0.50 | 2.52 | | 630.00 |
| 9. | बंद झालेली खिडकी वातानुकुलिन यंत्र | नग | 2 | 500.00 | 600.00 | 552.00 | | 1,200.00 |
| 10. | अल्युमिनियम सॅकप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | 250 | 76.14 | 72.00 | 68.00 | | 18,000.00 |
| 11. | अल्युमिनियम केबल /वायर | कि. | 250 | 21.68 | 25.00 | 22.00 | | 6250.00 |
| 12. | जी. आय/ लोखंड सॅकप (मिक्स) | कि. | 1000 | 7.70 | 13.20 | 13.00 | | 13,200 |
| | एकूण | | | | | | 1,00,786 | 1,97,541 |

सदर तुलनात्मक तक्त्या नुसार ॲटम क्रं. ९ ,११ आणि १२ श्री. राम नारायण पांडे यांनी दिलेल्या दर आणि ॲटम क्रं. १ ,३ ,७ आणि ८ मे. हिंदुस्तान स्क्रॅप यांनी दिलेल्या दर महापालिकेने ठरवलेल्या दरा पेक्षा जास्त किंवा ठरवलेल्या दरानुसार आहे. तसेच सर्वाधिक दर घेतले तर एकूण रक्कम रुपये १ ,९७ ,५४१/- आहे त्यामुळे श्री. के. आर. शाहीवाला यांनी दिलेले लॉट साठी एकूण रक्कम रु. १ ,०० ,७८६/- कमी असून त्यांना काही सामान विकणेस प्रश्न अदभत नाही.

परंतु ॲटम कं. २ , ५ आणि १० मध्ये श्री. राम नायरण पांडे याचे दर सर्वाधिक असून आणि ॲटम कं. ४ मध्ये मे. हिन्दुसतान स्कॅप याचे दर सर्वाधिक असून ही आपल्या ठरवलेल्या दरा पेक्षा कमी आहे व ॲटम कं. ६ मध्ये दोघांचे दर सारखे व ठरवलेल्या दरा पेक्षा कमी आहे त्या मुळे त्यांना सदर ॲटमच्या वाटाघाटी साठी बोलवण्यात आले.

वाटाघाटी नंतर मे. हिन्दुस्तान स्कॅप, यांनी ॲटम कं. ६ - रु. ०.५० चे रु. १.०० वाढवून दिले आहे. तसेच ॲटम कं. ४ मध्ये कुढलेही दर वाढ देण्याचे नाकारले.

व श्री. राम नारायण पांडे यांनी वाटाघाटी नंतर ॲटम कं. २ चे दर वाढुन रु. ३.७५ केले, ॲटम कं. ५ चे दर वाढुण रु. ८.०० केले आणि अल्युमिनियम स्कॅप ॲटम कं. १० चे दर वाढवून रु. ७६.१४ केले आणि ॲटम कं. ४ मध्ये कुढलेही दर वाढवून देण्याचे नाकारले.

वाटाघाटी नंतर सर्व ॲटम चे पुढील प्रमाणे दर होतात.

Comparative Statement after negociation

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | वाटाघाटी नंतर दिलेले दर Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | वाटाघाटी नंतर दिलेले दर M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. K.R. Sahiwala | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ४० वॉ.कॉपर चोक | नग | 250 | 12.86 | 12.87 | 15.92 | Lumsum 1,00,786 | 3,980.00 |
| 2. | ४० वॉ. टयुब लाईट | नग | 1300 | 3.75 | 3.75 | 2.00 | | 4,875.00 |
| 3. | २५० वॉ. सोडियम चोक | नग | 440 | 79.30 | 90.00 | 120.00 | | 52,800.00 |
| 4. | २५० वॉ. सोडियम बल्ब | नग | 2800 | 56.10 | 10.00 | 32.52 | | 91,056.00 |
| 5. | १०० ॲ. कटाउट | नग | 1000 | 8.00 | 8.00 | 3.00 | | 8,000.00 |
| 6. | २५० वॉ. होल्डर | नग | 500 | 1.00 | 0.50 | 1.00 | | 500.00 |
| 7. | इगनीटर | नग | 1500 | 1.50 | Nil | 1.50 | | 2,250.00 |
| 8. | २५० वॉ सोडियम फक्त कॅप | नग | 250 | 2.50 | 0.50 | 2.52 | | 630.00 |

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | वाटाघाटी नंतर दिलेले दर Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | वाटाघाटी नंतर दिलेले दर M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. K.R. Sahiwala | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9. | बंद झालेली खिडकी वातानुकुलिन यंत्र | नग | 2 | 500.00 | 600.00 | 552.00 | | 1,200.00 |
| 10. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | 250 | 76.14 | 76.14 | 68.00 | | 19,035.00 |
| 11. | अल्युमिनियम केबल /वायर | कि. | 250 | 21.68 | 25.00 | 22.00 | | 6250.00 |
| 12. | जी. आय/ लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि. | 1000 | 7.70 | 13.20 | 13.00 | | 13,200 |
| | एकूण | | | | | | 1,00,786 | 2,03,776.00 |

वरील वाटाघाटी नंतर आलेल्या दराच्या तुलनात्त्मक तक्त्या नुसार श्री. राम नारायण पांडे ॲटम कमांक २ ,५ ,९ ,१० ,११ व १२ या सर्वात जास्त दर दिलेले आहे आणि हे दर ठरलेल्या दरानुसार किंवा ठरलेल्या दरापेक्षा जास्त आहे.

तसेच मे. हिन्दुस्तान स्कॅप यांचे ॲटम कं. १ ,३ ,४ ,६ ,७ व ८ चे दर सर्वात जास्त आहे व ॲटम कं.४ वगळुन बाकीचे दर ठरलेल्या दरा प्रमाणे किंवा ठरलेल्या दरा पेक्षा जास्त आहे.

ॲटम कं.४ हे २५० वॅ. चे सोडियम बल्ब आहे. आमचा ठरलेला दर रु.५६.१० आहे (हे दर २००१ च्या निविदेत मिळाले होते व वर्ष २००३ मध्ये याचे दर रु.१७.०० आला होता व हा ॲटम विकण्यात आला नव्हता) व आलेला दर रु. ३२ ५२ पैसे आहे.

आता आलेला दर रु. ३२ ५२ प्रमाणे हे २५० वॅ. चे सोडियम बल्ब विकणे योग्य राहील कारण या बल्बची तुटफुट होत आहे यामुळे जास्त दिवस ठेवले कि नुकसान होणार व महापालिकेची मुल्यवान जागा पण घेवुन बसले आहे, आणि निविदाधारकाला विक्रीकर वेगळा भरावयाचा आहे. यामुळे हे ही

आलेल्या दर रु. ३२५२ प्रमाणे हे २५० वॉ. चे सोडियम बल्ब विकणे प्रस्तावीत आहे.

तसेच निरुपयोगी सामानाची विक्रीच्या तारखे पर्यंत जे काही सदर सामानाचे परिमाण जमा होतील ते पण त्यासोबत विक्रीची मंजुरी मिळावी.

मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक, यांनी सदर प्रस्तावास सिफारिश केलेली आहे.

वरील सर्व लक्षात घेता ज्या ॲटम मध्ये ज्या एजन्सीने सर्वात अधिक दर दिले आहे त्याला ते साहित्ये विकण्याची परवानगी मिळणे करीता प्रस्ताव महासभे पुढे मंजुरी साठी सादर.

महासभा ठराव क्र. १७ दिनांक:-१९/५/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. भावना रामचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील निरूपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी प्रशासनास बाब निहाय अधिकतम दराच्या सुचविलेल्या निविदाकाराशी संविदेस व त्याप्रकारे विनियोग करणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

**एकमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आयत्त्यावेळचा विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १७:-</u> लोखंडी भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणेसाठी मंजुरी मिळणे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

मा. उपमहापौरः-नाही. नाही. थांबा. कोणता विषय.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-लोखंडा भंगार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे लोखंडी भंगार आहे त्याची विल्हेवाट लावायची आहे.

मा. उपमहापौरः-ठिक आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः-मा. महापौरजी, मला या विषयाबाबत सूचना दयायची आहे. पास तर करायचा आहेच, याचा दर मला कमी वाटत आहे. भंगारचा दर जास्त आहे, लोखंडाचा भाव वाढलेला आहे. दरात बदल झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-मा. महापौरजी, आपण हा जो विषय क्र. १४ सर्व संमतीने पास केला. मुस्लीम जमातीच्या कब्रस्थानासाठी त्यासाठी सर्वांचे अभिनंदन करतो.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-१७ नंबर विषय पास ना?

काही सदस्य :-पास पास.

मा.महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

विषय क्र. १७:- लोखंडी भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणेसाठी मंजुरी मिळणे.

प्रस्तावनाः-

उपरोक्त विषयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागात विविध क्षेत्र कार्यालयांत भंगार साहित्त्य (लोखंडी) बगीच्यामधील जुनी तुटलेले, मोडकळीस आलेली भंगार साहित्त्य, असे जवळ जवळ एक टन भंगार साहित्त्य आहे.

तसेच विद्युत विभागातील विविध प्रकारचे जुने निरूपयोगी विद्युत साहित्त्य विक्रीसाठी निविदा पध्दतीने केलेली आहे. त्यात लोखंडी भंगारचाही समावेश आहे.

निविदाकार श्री. राम नारायण पांडे यांनी लोखंडी भंगार साहित्त्यासाठी प्रत्येक किलो साठी रू. १३.२० पैसे प्रमाणे दर दिलेले आहे. सदर दराच्या मंजुरीबाबत दिनांक २०/४/२००४ रोजी मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे शिफारस केलेली आहे.

तरी विद्युत विभागातील भंगार साहित्त्य विक्रीकेलेल्या निविदाकार श्री राम नारायण पांडे यांना सदर भंगार साहित्त्याची रूपये १३.२० प्रति किलोच्या दरानुसार विक्रीकरण्याच्या मंजुरीकरिता महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच या महिन्याच्या महासभेची विषयसुची निघाली असून हा प्रस्ताव आयत्त्यावेळेत घेण्याची विनंती आहे.

महासभा ठराव क्र. १८ दिनांकः-१९/५/२००४.

सुचकाचे नाव :- श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्याची विल्हेवाट लावणेकामी प्रशासनास श्री. रामनारायण पांडे या अधिकतम दराच्या निविदाकाराशी रू. १३.२० प्रती किलो या दराने संविदेस व विनियोग करणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आयत्त्यावेळचा विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १८-</u> पैसे द्या व वापरा या तत्त्वावर शौचालय विविध संस्थांना देखभाल व दुरूस्तीसाठी देणे.

<u>मा. उपमहापौर:-</u>विषय क्र. १८ बाबत आम्हाला हे सांगायचे आहे की. मला बोलु दया, दोन दोन दा पास करणार का? यात एक दुरूस्ती आहे, गुरूकृपा विकास संस्थेतर्फे नंबर ४ वर एका शौचालयाचे आम्ही उपमहापौर निधी मधुन मंजुर करून घेतले होते ज्याचे उदघाटन आम्ही आचार संहितेमुळे करू शकलो नाही. परवा उदघाटन ठेवले आहे. इथे तुम्ही पैसे दया वापर करा मध्ये लिहिले आहे. तर जेव्हा आम्ही महापालिकेतर्फे लोकांना मोफत सुविधा देवू शकतो ते रहिवासी क्षेत्र आहे. नंबर २ बॅरेक नं. १८२८ चे जे शौचालय आहे. ते तिथुन काढले जावे.

<u>श्री. के. आर. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>ठिक आहे.

<u>मा. उपमहापौर:-</u>अजुन एक जोडायचे आहे. श्री. अशोक ठाकुर सांगा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी एक माहिती देवू इच्छितो की, प्रशासन जे आज हे देत आहे त्यासाठी दुस-यांनी पण अर्ज केले आहे. ते पण टाकले जावे.

<u>मा. सदस्य श्री. अशोर ठाकुर:-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आमचा जो प्रभाग आहे तो मार्केट ऐरीया आहे. मेन रोड आहे. आमच्या दोन जागा इथे जोडल्या जाव्यात. पैसे दया आणि वापर करा यासाठी माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>दोन संस्थांनी अजुन दिले आहे ते पण जोडले जावे.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-माझे दोन लोकेशन ॲड केले जावे. एक आहे बॅरेक नं १२४९ च्या बाजुला व दुसरे आहे ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-४ येथे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-आपण जे शौचालयाबाबत बोलत आहात त्यासाठी कुण्या सेवाभावी संस्थेने पत्र दिले आहे का? जोपर्यंत देणार नाहीत तोपर्यंत समावेश होणार नाही. उदया पर्यंत जर दिले तर त्यात जोडु.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-उपमहापौरांनी जे कॅन्सल केले त्या संस्थेला आम्ही विनंती करू.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-अशोकजी तुम्ही समजत नाही. ज्या संस्था रजिस्टर आहेत. त्या संस्थानी पत्र दिले आहे. तुम्ही कोणत्त्याही संस्थेकडुन उदया परवा पत्र घेवून दया म्हणजे यादीत जोडण्यात येईल. त्यांनाच सांगा.

काही सदस्य :-पास. पास.

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १८- पैसे द्या व वापरा या तत्त्वावर शौचालय विविध संस्थांना देखभाल व दुरूस्तीसाठी देणे.

प्रस्तावनाः-

१. प्रास्ताविकः-

१. अभिनव विकास संस्था, २. आश्रय कृषी सेवा प्रतिष्ठान, ३. एकता सामाजिक प्रतिष्ठान, ४. गुरूकृपा विकास संस्था, ५. जनसेवा लेबर कॉ. ऑप. सोसायटी, ६. जिव्हाळा सामाजिक प्रतिष्ठान,७. मेघ वेल्फेअर सोसायटी, ८. मेहतर समाज बेरोजगार संस्था, ९. लांक संस्कृती, १०. सागर सामाजिक प्रतिष्ठान, ११. हायजीन इंडिया या नोंदणीकृत संस्थांनी '' पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर उल्हासनगर शहरात शौचालय देखभाल व दुरूस्ती करणेसाठी प्रस्ताव सादर केले आहेत.

२. शौचालयाची सद्यस्थिती :-

''पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर उल्हासनगर शहरातील शौचालय देखभाल व दुरूस्ती करणेसाठी वरील संस्थाना देणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरिक्षकांकडून शौचालयांची सद्यस्थितीबाबत माहिती मागविण्यात आली आहे. शौचालयांची सद्यस्थितीबाबत माहिती पुढील प्रमाणे आहे.

३. महाराष्ट्र शासनाचे धोरण :-

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुंसाशी-१०००/स.क्र.२४१/प्र.क्र.१३/पापु २१, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ३० ऑगस्ट, २००१ नुसार शासनाचे धोरण खालील प्रमाणे आहे.

''सुलभ व तत्सम् सेवाभावी संस्था तर्फे ''पैसे द्या व वापरा'' या तत्त्वावर शौचालय बांधकाम कार्यक्रम हाती घ्यावा. सेवाभावी संस्थाची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती / सर्व साधारण सभा ठरवतील, त्या निकश अटी व शर्ती प्रमाणे करावे. यासाठी सर्व सुविधा (वीज, पाणी, मलनिःसारण व्यवस्था इ.)

महानगरपालिकेने उपलब्ध करून घ्याव्यात. या शौचालयाच्या बांधकाम किंवा देखभाल दुरूस्तीसाठी व चालविण्यासाठी दिर्घ मुदती करारावर ते अशा संस्थांना देण्यात यावेत. यासाठी शौचालय वापरणा-या प्रत्येक कुटुंबाकडुन संबंधित सेवाभावी संस्थेने मासीक किमान रू. २० वर्गणी घ्यावी व त्यातून वीज, पाणी पुरवठा व देखभाल दुरूस्ती इत्यादीचा खर्च भागवावा.

<u>४. प्रशासनाचा प्रस्तावः-</u>

वरील नोंदणीकृत संस्थांकडुन ''पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर उल्हासनगर शहरातील शौचालय देखभाल व दुरूस्ती करणेसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीवर अर्ज मागविण्यात आले आहेत. यानुसार इच्छुक नोंदणीकृत संस्थांनी आपले अर्ज महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या निश्चित मुदतीत म्हणजे दिनांक १८.११.२००३ पर्यंत उप-आयुक्त (आरोग्य) यांचेकडे सादर केले आहेत.

''पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर उल्हासनगर शहरातील शौचालय देखभाल व दुरूस्ती करणेसाठी वरील संस्थाना देणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरिक्षकांकडुन शौचालयांची माहिती मागविण्यात आली आहे. सदर माहितीवरून उल्हासनगर शहरातील एकूण ४७ शौचालयांचे वाटप, एका संस्थेस ४ शौचालये व प्रथम तीन संस्थांना ५ शौचालये या प्रमाणे देखभाल व दुरूस्ती करणेसाठी देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर प्रस्तावामुळे महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत परस्पर संबंधित शौचालयाची देखभाल व दुरूस्ती होणार असल्याने नागरिकांना चांगल्या प्रतीच्या सेवेची संधी प्राप्त होणार आहे.

तरी वरील परिस्थितीत सदर ११ संस्थेस उपरोल्लीखीत केल्याप्रमाणे शौचालये सोबतच्या परिशिष्ठात दिल्याप्रमाणे अटी व शर्ती नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) नुसार मा. महासभेच्या मंजुरी नंतर हस्तांतरण करणेस हरकत नाही. तरी मा. महासभेसमोर मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

<u>१) अटी व शर्ती</u>

१. जागेची मालकी :-

जागेची व वास्तूची संपूर्ण मालकी उल्हासनगर महानगरपालिकेची राहिल. जागेचे प्रति शिट रू. ५ (मुतारी वगळून) प्रति महीना भाडे महानगरपालिकेकडे जमा करावे लागेल.

२. जागेचा वापर :-

जागेमध्ये कोणतीही पोट भाडेकरू अथवा हस्तांतरण महापालिकेच्या विनापरवानगी केले जाणार नाही तसेच सदर जागेचा वापर केवळ शौचालय यासाठीच करावा लागेल.

३. वापराचा कालावधी :-

सार्वजनिक स्वच्छता गृह हे महानगरपालिकेच्या मालकीचे राहील व सदरचे स्वच्छता गृह २० वर्षे कालावधीसाठी ''पे ॲण्ड युज'' या तत्त्वावर सस्थेमार्फत

देखभाल व दुरूस्ती करण्यात येईल व नंतर विनामुल्य महानगरपालिकेकडे हस्तांतर केले जाईल.

४. वापराचे दर :-

अ. पाहिल्या तीन वर्षासाठी सेवाशुल्क दर पुढील प्रमाणे राहतील.

| स्वरूप | बाहेर गावावरून येणा-या नागरीकांकरीता | कायम स्वरूपी नागरिकांकरीता |
|---|---|---|
| मूतारी | मोफत | मोफत |
| शौचालय | रू.१/- | दरमहा २५ / प्रति कुटूंब / प्रतिमहा (पाच व्यक्ती पर्यंत) |
| स्नानासाठी | रू. ५/- | दरमहा ७५ / प्रति कुटूंब / प्रति महा (पाच व्यक्ती पूढे) |

ब) तीन वर्षानंतर महानगरपालिका आयुक्त यांचे मंजुरीनुसार वेळोवेळी सेवाशुल्क आकारण्यात येईल.

क) मंजूर सेवाशुल्क दर्शविणारा दरतक्ता दर्शनीभागावर संस्थेमार्फत बसविण्यात येईल.

कर्मचारी वर्ग :-

अ) नियोजित शौचालयाच्या ठिकाणी आवश्यक असणारा कर्मचारी वर्गाची नियुक्ती संबंधिपत संस्था स्वखर्चाने करेल.
ब) संबंधित कर्मचारी कामावर असताना अपघात झाल्यास किंवा संबंधितांनी गैरवर्तन केल्यास होणा-या परिणामास महापालिका जबाबदार राहणार नाही.
क) अस्तित्त्वात असणारे विविध कामगार कायदे तसेच किमान वेतन कायदा यामधील तरतुदी संबंधित कर्मचा-यांनाही लागू करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

<u>इतर सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>

अ) सार्वजनिक स्वच्छता गृहाचे बांधकाम संस्था स्वखर्चाने करण्यास तयार असून त्याबाबत कोणताही मोबदला उल्हासनगर महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही.
ब) स्वच्छता गृहाचे बांधकाम हे महानगरपालिकेने मंजुर केलेल्या संकल्प चित्रानुसार व आर.सी. सी. डिझाईन नुसार करण्यात येईल.
क)पाणी व विद्युत जोडणी संस्था स्वखर्चाने करेल तसेच पाणी व विद्युत मिटर प्रभाग क्षेत्र अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचे नाव राहिल.
ड) पाणी वा विद्युत यांचे मासिक देयक संस्थेमार्फत अदा करण्यात येईल.
इ)जेथे आवश्यकता असेल तेथे जूने बांधकाम स्वखर्चाने व संस्थेच्या जबाबदारीवर मा. आयुक्त यांचे पुर्ण मंजुरीने तोडण्यात येईल.
फ)स्वच्छता गृहाचे बांधकाम करताना संबंधित शासकीय कार्यालय व शहर वाहतूक निरीक्षक यांच्या आवश्यकतेनुसार ना हरकत दाखला घेणेची जबाबदारी संस्थेची राहिल.
ग)पाणी व विद्युत व्यवस्था मान्यता प्राप्त प्लंबर व वायरमन यांचे मार्फत करण्यात येईल.

ह) स्थापत्त्य व विद्युत देखभाल व दुरूस्ती व सार्वजनिक दैनंदिन स्वच्छता संस्थेस स्वखर्चाने करावी लागेल.
ज)भविष्यकालीन तरतुदीसाठी अथवा रस्ता रूंदीकरणासाठी महापालिकेस जागा आवश्यक भासल्यास स्वच्छता गृह त्वरीत स्वखर्चाने तोडून दयावे लागेल.
ल)सुरक्षा अनामत रक्कम रू. २५,०००/- मात्र परतावा स्वच्छता गृहाचे वापर सुरू झाल्यावर तीन महिन्यांनी मागणी करता येईल व सदर सुरक्षा अनामत रक्कम प्रति शौचालयास रू. २५,०००/- राहिल.
म) स्वच्छता गृहाचे बांधकाम तीन महिन्यात करणेस येईल अन्यथा सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेत येईल मात्र बांधकाम होईपर्यंतच्या काळात संस्थेने संबंधित वापर करण्यासाठी चलत शौचालयाची (मोबाईल टॉईलेट) व्यवस्था करावी लागेल.
न )संस्थेस वाटप करण्यात आलेल्या शौचालयाच्या संख्येच्या १:४ या प्रमाणात अन्य आयुक्त ठरवतील अशा शौचालयाची विनामुल्य देखभाल दुरूस्ती करणे बंधनकारक राहील.

७) दंडात्त्मक कारवाई :-

शौचालय देखभाल दुरूस्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने तीन महिन्यांच्या आत काम पूर्ण करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. विहित मुदतीत काम पुर्ण न झाल्यास प्रति दिन रक्कम रू. २५/- दंड आकारला जाईल.

८) अटी व शर्तीचा भंग :-

संस्थेने त्यांना घालुन दिलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास संबंधितासोबत केलेला करारनामा रदद ठरविण्यात येईल व जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व संस्था संबंधित शौचालयाचे विनामुल्य महापालिकेस हस्तातरण करेल.

अटी व शर्तीच्या भंग या सदराखाली खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

अ. जागेच्या वापरात बदल करणे.

ब. विहित केलेल्या दरा व्यतिरिक्त जास्तीच्या दराची आकारणी करणे.

क. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचा भंग करणे.

ड. अन्य अटी व शर्तीचे पालन न करणे

## विधीविषयक कार्यक्षेत्र

सदर स्वच्छता गृहाबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्याबाबत महानगरपालिके मार्फत सुनावणी घेण्यात येईल व त्याबाबत आयुक्त यांचा निर्णय संस्थेला बंधनकारक राहिल.

**महासभा ठराव क्र. १९** **दिनांकः-१९/५/२००४.**

सुचकाचे नाव :- श्री गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :- श्री प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार वर उल्लेखिलेल्या अटी शर्ती व त्या व्यतिरिक्त आयुक्तास इष्ट वाटेल अशा अटी, शर्ती व निर्बंधावर सोबत जोडलेले परिशिष्टात विर्निदिष्ट केलेल्या १३ सेवाभावी संस्थांना नेमुन दिलेल्या ६१ शौचालयांची / मुता-यांची स्वखर्चाने देखभाल, दुरूस्ती व चालविणे कामी २० वर्षाचे कालावधीसाठी हस्तांतर करणेस मान्यता व ''पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर उपयोगास / विनियोगास मंजुरी देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८. ३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:-१८/६/२००४

<u>इतिवृत्त</u>

## <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि१८/६/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.६.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्रीमती. खिलनानी भावना |
| ४. | श्री. राजेंदसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ६. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३८. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्री. चौधरी राजेंद शांताराम |
| १७. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ४९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद | ५२. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास, |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती. किरण माखिजा |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५६ | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २५. | श्री. शांताराम निकम | ५७. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६२. | श्री. बहरानी मोहन |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम | ६६. | श्री. हरदास माखिजा |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास, २. श्री. टाले प्रमोद नामदेवराव, ३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम , ४. श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर, ५. श्री. रमेश महादेव चव्हाण, ६. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, ७ श्री. जाधव सुरेश मधुकर, ८. श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल, ९. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १०. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, ११. श्री.साधवानी मनोज लालचंद, १२. श्री. बेहरानी ठाकुरदास, १३. श्री. लालवानी दिलीप जेठानंद, १४. श्री. वदरीया राजेश हे सभेस अनुपस्थित होते.

सायंकाळी ४. ३० वाजता सभेला सुरूवात करण्यात आली.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-__ आमचे मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले आहे. परमेश्वराने त्यांना आपल्या चरणी स्थान दयावे. मला असे वाटते की, सर्व सदस्यांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली दिली तर फारच चांगले होईल.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. लाल पंजाबी.

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ९ ब चे नगरसेवक व प्रभाग समिती क्र. ४ चे सभापती श्री. शांताराम निकम यांच्या मातोश्री श्रीमती एकादशी ओंकार निकम यांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

__महासभा ठराव क्र. १९ अ__ __दिनांक:-१८ ६ २००४.__

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती एकादशी ओंकार निकम यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

__सर्वानुमते__

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

__मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-__ विषय क्र. १ प्रश्नोत्तरे. प्रश्न क्र. २५९ हा श्री. शांताराम निकम यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> सर्वात प्रथम मी मा. महापौरांना धन्यवाद देवू इच्छितो, त्यांनी आजच्या सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यास परवानगी दिली आहे. आम्ही तर सुरुवातीपासून असे मानतो की, सभेच्या कामकाजामध्ये पारदर्शीपणा असला पाहिजे. व काही वर्षापूर्वी जेव्हा आम्ही सत्तेमध्ये होतो तेव्हा सुध्दा प्रत्येक सभेच्या कामाचे थेट प्रक्षेपण होत होते. म्हणून सर्वात प्रथम मी आपणांस धन्यवाद देतो, मी आपले आभार प्रकट करतो. परंतु त्याचबरोबर आपणाकडुन ही सुध्दा अपेक्षा करतो की, प्रत्येक सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण झाले पाहिजे. जेणेकरुन नागरीकांना माहित पडेल की, काय चालले आहे. संसदीय सभांचेही थेट प्रक्षेपण होते. तर महापालिकेच्या सभेचे का नाही? तर या पूढील प्रत्येक सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण झाले पाहिजे. असे झाले तर फार चांगले होईल.

**मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी, श्री. विनोद ठाकुर, श्रीमती. मोना वनवारी, श्री. हरदास माखिजा, श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> सचिव साहेब, या अगोदरच्या सभेत एका प्रश्नावरील चर्चा अपूर्ण राहिली आहे. जो कच-याच्या विषयाबाबत होता.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> श्रीमती जयश्री सुर्वे यांचा तो प्रश्न आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u>श्रीमती जयश्री सुर्वे यांनी या विषयी बरेच प्रश्न विचारले होते. प्रशासनातर्फे याबाबत पुढील महासभेत म्हणजे आजच्या महासभेत उत्तर मिळणार होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> तर मग आपण विचारा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>विचारण्याची गोष्ट नाही, त्यांचे उत्तर जर पाहिले तर ते असे आहे की, हे उत्तर अपुर्ण आहे. गोष्ट अशी होती की, कितीतरी अटी शर्तीचे पालन झालेले नाही. तर त्या ठेकेदाराने किती अटी शर्तीची पुर्तता केली आहे? त्यावेळेस प्रभारी आयुक्त म्हणून श्री. लोणारे साहेब, येथे आसनस्थ होते. त्यांनी सांगितले होते की, पुढील महासभेत मी याबाबत खुलासा करेल. तर अशी ती गोष्ट होती.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, त्या प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे ते मी पाहिले आहे. करारातील काही शर्तीची अदयाप पुर्तता झालेली नाही. बाकी अधिकतर शर्तीचे पालन झालेले आहे. व ज्या शर्तीचे अदयाप पर्यंत पालन झालेले नाही, त्यांची सुध्दा पुर्तता सद्या सुरु आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> सन्माननिय महापौरजी, करारामध्ये सहा महिन्याची मुदत होती. तर त्या ठेकेदारास ठेका मिळून आज ८ महिने झाले आहेत. या ८ महिन्यामध्ये त्या अटींची पुर्तता होत नाही. तर मग प्रशासन काय करत आहे? प्रशासन सुध्दा आज सांगत आहे की, काही शर्तीचे पालन व्हायचे आहे. मागच्या महासभेत आम्ही विचारणा केली होती की, कोणत्त्या शर्तीची पुर्तता केली आहे व कोणत्त्या शर्तीची अदयाप पुर्तता केली नाही. व जर त्यांची पुर्तता केलेली नाही तर मग ती का केली नाही?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, नागरीकांनी आपल्या घरामध्ये जो कचरा २ वेगवेगळया डब्यामध्ये ठेवला पाहिजे कच-याचे वर्गीकरण केले पाहिजे. कच-याचे वर्गीकरण करणे या एकच शर्तीचे अदयापपर्यंत

पालन झालेले नाही. कच-याचे वर्गीकरण करण्यासाठी जी जनजागृती करावयास पाहिजे ते काम सुरु झाले आहे. सर्व २७ प्रभागांमध्ये सभा घेणे, सोसायटयांमध्ये सभा घेणे इत्त्यादी कामे त्यांनी सुरु केले आहे. प्रत्यक्षात ओल्या आणि सुक्या कच-याचे दोन वेगवेगळे डबे ठेवणे हे काम त्याचे आहे, ज्यांच्याकडे अशयाप्रकारच्या कच-याची निर्मिती होत असते. महापालिकेच्या वतीने या कामी दबाव आणणे हे आमचे काम आहे. ते अदयाप आम्ही करत नाही. कारण की, जेव्हा वर्गीकृत कचरा जेव्हा गोळा होईल. हा कचरा जेव्हा गोळा होईल, तेव्हा तो डंम्पींग ग्राऊंडवर एकाच ठिकाणी जाईल. जोपर्यंत डंम्पींग ग्राऊंड वर आम्ही कच-यावर प्रक्रिया करण्याचे केंद्र आम्ही सुरु करत नाहीत तोपर्यंत कच-याचे वर्गीकरण करणे काही फायदयाचे नाही. फक्त आम्ही याबाबत जनजागृती करण्याचे काम सुरु केले आहे, ते त्या ठेकेदाराचे काम आहे. त्यांनी हे काम सुरु केले आहे. परंतु नागरीक अदयापपर्यंत कच-याचे वर्गीकरण करत नाहीत. बाकी ज्या काही शर्ती आहेत जसे की, वाहने पुरविणे किंवा इतर ज्या काही शर्ती आहेत, त्यांची त्यांनी पुर्तता केली आहे. एवढेच नाही तर अटी, शर्तीमध्ये उल्लेख केलेल्या संख्येपेक्षा त्यांनी अधिक कामगार पुरविले आहेत. वाहने सुध्दा अधिक प्रमाणात पुरविली आहेत. इतकेच नाही तर डेपो मॅनेजर जे आहे, आमचे जे अनाधिकृत डंम्पींग ग्राऊंड आहे. तेथे त्यांनी डेपो मॅनेजमेंटसाठी एक जेसीबी मशीन जादा पुरविली आहे. म्हणून जरी कच-याचे वर्गीकरण होत नसेल तरी त्याऐवजी अधिक प्रमाणावर काम होत आहे. असे नाही आहे की, हा ठेकेदार काहीच काम करत नाही किंवा चुकीचे काम करत आहे व प्रशासन झोपले आहे असे काही नाही. आम्ही आपणांस आश्वस्त करु इच्छितो. जेवढया काही शर्ती आहेत त्यानुसार काम चालु आहे. त्यापेक्षाही काही जास्त काम या संस्थेकडुन होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौर महोदया, आता-आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, आपण करारामध्ये ज्या अटी शर्ती घातल्या होत्त्या त्या ठेकेदार पुर्ण करत आहे, केलेल्या आहेत. फक्त एका शर्तीचे पालन करणे बाकी आहे. असे त्यांनी सांगितले आहे. परंतु असे नाही. मागील महासभेत श्री. धनंजय बोडारे साहेबांनी याबाबत विस्तृतपणे चर्चा केली होती. त्यावेळी सुध्दा असा प्रश्न विचारण्यात आला होता की, कोणत्त्या शर्तीची त्यांनी पुर्तता केली आहे. व कोणत्त्या शर्तीची पुर्तता केलेली नाही. जर शर्तीची पुर्तता केलेली नाही तर मग आठ महिने झाले त्यांनी ठेका घेवून, तरी सुध्दा त्यांनी अदयापपर्यंत त्या शर्तीची पुर्तता का केली नाही? जसे की, करारातील अटी प्रमाणे सहा महिन्याच्या आत त्यांनी सर्व अटी, शर्तीची पुर्तता केली पाहिजे. तर मग कोण-कोणत्त्या अटी, शर्तीची त्यांनी पुर्तता केली आहे व कोण-कोणत्त्या अटी, शर्तीची त्यांनी पुर्तता केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> मा. महापौरजी, मागील महासभेत मी एक लहानसा प्रश्न विचारला होता की, कोणत्त्या अटी, शर्तीची पुर्तता न केल्यानंतर त्याचा ठेका रदद केला जावू शकतो? दुसरी गोष्ट अशी की, येथे आम्ही अटी, शर्तीची यादी मागीतली होती. ही माहिती देण्याची प्रशासनाने तयारी दर्शविली नाही. व आजपर्यंत सभागृहास ही माहिती नाही की त्यामध्ये काय-काय अटी, शर्ती आहेत. त्यामधील किती अटी, शर्तीची त्यांनी पुर्तता केली आहे? व किती अटी, शर्तीची पुर्तता करण्याचे बाकी राहिले आहे? माझा दुसरा प्रश्न असा होता की, कोणत्त्या अटी, शर्तीची पुर्तता न केल्यावर, विहित वेळेच्या आत पुर्तता न केल्यावर त्यांचा ठेका रदद होवू शकतो. हा एक माझा प्रश्न होता. दुसरा प्रश्न असा होता की, त्यांना जे पेमेंट अदा केले जाते, त्याचा आधार काय आहे, त्यांचे काम कसे चालले आहे, किती टक्के त्यांना पेमेंट अदा केले जाते? व किती टक्के पेमेंट थांबून ठेवले जाते. याची माहिती मागील महासभेत मी स्वतः विचारली होती. त्यावेळेस याबाबत समाधानकारक उत्तर मिळाले नाही. ते उत्तर या सभेमध्ये मिळाले पाहिजे.

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, निविदेच्या ज्या अटी, शर्ती आहेत त्या या सभागृहास माहित नाहीत, असे तर काही नाही. या सभागृहासमोर सर्व अटी, शर्ती ठेवून ठराव मंजूर केलेला आहे. तर अटी, शर्ती सभागृहाने ठरवुन दिल्या आहेत. त्यांनतर त्या निविदेच्या कागदपत्रांमध्ये आल्या आहेत. या व्यतिरिक्त जर या सभागृहास वाटत असेल की, अटी, शर्ती कोणत्त्या होत्त्या व त्यातील कितींची पुर्तता झाली, याबाबत जर सभागृहास लेखी उत्तर पाहिजे असेल तर पुढील महासभेत सभागृहासमोर लेखी निवेदन ठेवण्यास मी तयार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित राहिल.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>चालेल.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्न क्र. २५९ हा श्री. शांताराम निकम यांचा आहे.*

*<u>प्रश्न क्र. २५९:-</u> उल्हासनगर महानगरपालिकेत एकाच ठिकाणी (पदावर व विभागात) तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून कार्यरत असणारे किती अधिकारी वर्ग आहेत? (कृपया विभागवार यादी दयावी.)*

*असल्यास संबंधित अधिका-यांना वर्षानुवर्षे त्याच पदावर ठेवण्याचा हेतू काय?*

*अ) एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा जास्त काम केल्यानंतर काही व्यक्तींशी संबंध दृढ होऊन त्यांना झुकते माफ मिळू नये यासाठी तीन वर्षांनी बदलीचा शासनाचा कायदा नगरपालिकेस लागू होत असल्यास त्यांची बदली केव्हा करणार?*

*<u>उत्तर :-</u>उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर मंजुर पदानुसार अधिकारी हे नियुक्त केलेले असतात व त्यांचे काम त्या त्या विभागांशी निगडीत असल्याने त्यांचे त्या पदांवर व त्या विभागात नियुक्ती केलेली असते. या व्यतिरिक्त ३ वर्षापेक्षा अधिक काळ एकाच विभागात अधिकारी कार्यरत नाहीत.*

*प्रश्न भाग १ चे उत्तर पहाता लागू नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>उत्तर ठिक आहे.*

*<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २६० हा श्री. विनोद तलरेजा यांचा आहे.*

*<u>प्रश्न क्र. २६०:-</u>ए) हाउ मेनी बोअरवेलस् इन १ टू ५ उल्हासनगर?*
*बी) हाउ मेनी बोअरवेलस् आर वर्किंग ऑर नॉट वर्किंग इन १ टू ५, उल्हासनगर?*
*सी) हु इज द इनचॉर्ज टू टेक कॉम्पलेन गिव नेम?*
*डी) आउ मेनी स्टॉफ प्रोव्हाइड इनक्लुडींग मिस्त्री, मुकादम, लेबर गिव नेमस्?*

*<u>उत्तर :-</u> ए) टोटल बोअरवेल्सइन कॅम्प नं. १ टू ५ आर ६३५ ॲण्ड प्रेझेन्टली इन युज आर ४३५.*
*बी) २६५ नं. आर इन वर्किंग कंडीशन. १७० नं. आर नॉट इन वर्किंग कंडिशन.*
*सी) श्री. एस. के. सेल्वन, एसडीई. साउथ झोन, उल्हासनगर-५.*
*डी) टोटल स्टॉफ प्रोव्हाईड ४ नं. डिटेल्स :*
*१) श्री. आर. व्ही. मोरे, रोड मुकादम*
*२) श्री. एस. एस. पवार, मिस्त्री*
*३) श्री. आर. डब्ल्यु. मोरे, मुकादम*

४) श्री. टी. व्ही. डगडे, लेबर

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २६१ हा श्री. दिलीप गायकवाड यांचा असून तो प्रश्न मागे घेण्यांत आला आहे.

प्रश्न क्र. २६२ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे, यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तरातील इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २६२ :-</u> सेक्शन- १७ मध्ये निलीमा अर्पाटमेंट जवळील सुरू असलेली बिल्डींगचे बांधकाम हे महानगर पालिकेच्या नियमानुसार आहे का?

यामध्ये प्लान नुसार कीती एफ. एस. आई बांधण्याची परवानगी आहे?

आजच्या तारखेला कीती एस.एफ.आई बांधकाम आहे?

प्लानच्या व्यतिरीक्त किती एफ.एस.आई बांधकाम आहे? असल्यास काय कारवाई केलेली आहे?

<u>उत्तर :-</u>सेक्शन १७ मध्ये निलीमा अपार्टमेंट जवळील सुरु असलेली बिल्डींगचे बांधकाम हे महानगरपालिकेच्या नियमानुसार आहे.

यामध्ये प्लॉन नुसार १३५७. ४० चौ.मी. एफ. एस. आय. बांधण्याची परवानगी आहे.

आजच्या तारखेला १३५७. ४० चौ. मी. एफ. एस. आय. बांधकाम आहे.

प्लॉन व्यतिरिक्त कोणतेही बांधकाम करण्यात आले नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २६३ हा श्री. रामदास उमाप यांचा असून तो प्रश्न मागे घेण्यांत आला आहे. तसेच प्रश्न क्र. २६४ हा श्री. नथु सोनवणे यांचा असून तो प्रश्न सुध्दा मागे घेण्यांत आला आहे.

प्रश्न क्र. २६५ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे, यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २६५ :-</u> डॉल्फीन हॉटेल क्लबमुळे डॉल्फीन हॉटेल ते शांतीनगर हा रस्ता गेली ४ ते ५ वर्षे विकसित करण्याचे काम न्यायालयीन दाव्यामुळे बाकी होते तेच वादग्रस्त डॉल्फीन क्लबचे बांधकाम रस्ता रुंदीकरणामध्ये तोडले होते ते पुर्ववत बांधकाम झालेले असून त्यामूळे समोरील झोपडपट्टीतील रहिवाश्यावर अन्याय होत आहे. असा प्रश्न मागील सभेमध्ये सदस्य श्री. नथु सोनवणे आणि विपक्षनेता श्री. राजेंद्र चौधरी यांनी लक्षवेधी उपस्थित केलेल्यावरुन खालील माहिती देण्यात यावी.

१) डॉल्फीन क्लब हॉटेल कोणत्त्या साली बांधण्यात आले ? प्लान नं. व वर्ष दयावे. नकाशानुसार बांधकामाचे क्षेत्रफळ दयावे.

२) मालमत्ता कर नोंदीनुसार मालमत्ता मोजमाप कोणत्त्या वर्षी घेण्यात आले व ते नोंदीनुसार किती आहे? तळमजला, पहिला व इतर?

३) मालमत्ता कर केव्हापासून व किती आकारण्यात येतो? हॉटेल कर तसेच करमणूक कर लावण्यात येतो का?

सदर बांधकाम अधिकृत आहे का अनाधिकृत? अनाधिकृत असल्यास कश्याप्रकारे केले आहे याची माहिती आगामी महासभेत दयावी.

<u>उत्तर :-</u> डॉल्फीन क्लब हॉटेल १९८९ मध्ये बांधण्यात आले. त्याचा प्लॉन क्र. उमपा/नरवि/बांप/९८ , दिनांक १४/६/१९८९ बांधकामाचे क्षेत्रफळ २७८२.७९ चौ.मी. आहे.

सन २००२-२००३ या आर्थिक वर्षापर्यंत मालमत्ता कर निर्धारण झालेली नाही. त्यामुळे मालमत्ता कराची अदयाप आकारणी करणेत आलेली नाही.
नगररचना विभागाशी संबंधित आहे.

**मा.सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २६६ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे, यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तरातील इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २६६:-</u> हॉटेल ॲम्ब्रोसिया हे महापालिकेच्या आरक्षित असलेल्या भूखंडावर बांधलेले असून त्या मोबदल्यात त्या विकासकाकडून वाहनतळ विकसित करुन घेतलेला आहे.

त्याचे एकूण क्षेत्रफळ किती आहे? कृपया नगररचना विभागाकडून माहिती घ्यावी तसेच मालमत्ता विभागातील नोंदीनुसार त्याचे क्षेत्रफळ व मालमत्ताकर व हॉटेल व्यवसायातील इतर कर केव्हापासून लागू करण्यात आले त्याची वर्षनिहाय माहिती महासभेमध्ये देण्यात यावी.

<u>उत्तर :-</u> वाहन तळाचे क्षेत्रफळ ८३० चौ.मी. आहे.

| क्षेत्रफळ | बांधकामाचा प्रकार | मालमत्ता कर आकारणी | शेरा |
|---|---|---|---|
| ९६१६ चौ. फुट | आर.सी.सी. | ९४५२१ प्रति वर्ष | कर निर्धारण सन २००१-०२ या वर्षापासुन करण्यात आलेले आहे. |
| १०३२१ चौ. फुट | मोकळी जागा | | २००३-०४ या आर्थिक वर्षापर्यंत मालमत्ता कर जमा केलेला आहे. |

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २६७ , २६८ , २६९ , २७० , २७१ हे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत.

<u>प्रश्न क्र. २६७ :-</u>राखीव भुखंड क्र. १४८ , शिट नं. ४९ , प्लॉट नं. १४/१२ व १४/१३ (शॉपिंग फॉर डिसहाउस शॉपस) करीता आरक्षित भुखंडासंबंधित दिनांक

३०/९/२००३ रोजी विचारलेल्या महासभा प्रश्न क्र. १४४ नुसार श्री. अनिल राजवानी व इतरांनी एकुण क्षेत्राच्या २५ टक्के बांधकाम खालील क्षेत्र कारनामानुसार महापालिकेस ताब्यात देण्याबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देण्याबाबत.

१. अ) राखीव भुखंड क्र. १४८, शिट नं. ४९ , प्लॉट नं. १४/१२ व १४/१३ च्या संबंधीत दिनांक ३०/९/२००३ रोजी विचारलेल्या महासभेत प्रश्न क्र. १४४ नुसार सदर भुखंडावर श्री. अनिल राजवानी व इतरांनी एकुण क्षेत्राच्या इमारतीच्या मंजुर आराखडयानुसार किती चौरस क्षेत्र आराखडा मंजुर करण्यात आला व एकूण क्षेत्राच्या मंजुर आराखडयाच्या इमारतीत किती चौरस क्षेत्र दुकाने व सदनिका आहेत व त्याचे प्रत्येकी दुकान व सदनिकेचे चौरस क्षेत्र (फुट) किती आहे?

१. ब) राखीव भुखंड क्र. १४८, शिट नं. ४९ , प्लॉट नं. १४/१२ व १४/१३ च्या संबंधीत दिनांक ३०/९/२००३ रोजी विचारलेल्या महासभेत प्रश्न क्र. १४४ नुसार सदर भुखंडावर श्री. अनिल राजवानी व इतरांनी एकुण क्षेत्राच्या २५ टक्के बांधकाम खालील क्षेत्र करारनामानुसार महापालिकेस किती चौरस क्षेत्रफळाच्या (फुट) दुकाने व सदनिका ताब्यात मिळणार आहेत. तसेच ताब्यात मिळणा-या दुकान व सदनिकांचे किती चौरस फुट (क्षेत्र) आहेत व महापालिका त्या सदनिका व दुकानांचा वापर कसा करणार आहे?

१.क) राखीव भुखंड क्र. १४८, शिट नं. ४९ , प्लॉट नं. १४/१२ व १४/१३ च्या संबंधीत दिनांक ३०/९/२००३ रोजी विचारलेल्या महासभेत प्रश्न क्र. १४४ नुसार सदर भुखंडावर श्री. अनिल राजवानी व इतरांनी एकुण क्षेत्राच्या २५ टक्के बांधकाम खालील क्षेत्र करारनामानुसार ताब्यात मिळणा-या दुकान व सदनिकांचे रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्या गोरगरीब बेघर कुटुंबियांचे ताब्यात मिळणा-या दुकान व सदनिकांत पुर्नवसन करु शकतात का?

उपरोक्त प्रश्नांचा संबंधितांनी योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याची कृपा करावी ही नम्र विनंती.

<u>उत्तर :-</u> १ अ) सदर इमारतीच्या मंजुर आराखडयानुसार एकूण प्लॉटचे क्षेत्र १४९६.६५ चौ.मी. २५ टक्के बांधकाम म.न.पा.स ३७४.१८ चौ.मी. विनामुल्य दिल्याने एकूण चटई क्षेत्र १.२५ = १८६६.१६ चौ. मी. क्षेत्रावर मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. मंजुरी दिलेल्या एकूण क्षेत्रापैकी २५ टक्के क्षेत्र (३७४ .१८ चौ.मी.) एकच हॉल पहिल्या मजल्यावर विकासकाने विकसित करुन उल्हासनगर महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरण करणे बंधनकारक आहे. याबाबत अट क्र. ३९ वर नमुद करुन तदनंतर मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर इमारतीस तळमजल्यावर एकूण ८ गाळे २.५८ X ८.६५ = ७८.८८८ चौ.मी.

२ गाळे ३.०० X ८.६५ = ५१.९० चौ. मी

२ गाळे २.५५ X ८.६५ = ४४.११५ चौ.मी.

-----------------

एकूण-------- १७४ .९०३ चौ.मी.

आणि उर्वरित क्षेत्र १६९१.२५७ चौ.मी. रहिवास वापराखाली मंजुरी दिलेली आहे.

२ ब ) एकूण क्षेत्रफळ १४९६.६५ चौ.मी. क्षेत्राच्या २५ टक्के म्हणजे ३७४.१८ चौ.मी. क्षेत्राच्या एक हॉल पहिल्या मजल्यावर विकासकाने विकसित करुन विनामुल्य उल्हासनगर महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे बंधनकारक आहे व सदर हॉलचा वापर उड्डान पुलामध्ये बाधित झालेल्या लोकांना देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

२ क) आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिस हाउस शॉप्स असे आहे. त्यामुळे रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या दुकानदारांचे पुर्नवसन या ठिकाणी होवू शकते, याबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त, महानगरपालिका घेतील.

प्रश्न क्र. २६८:- उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षित भुखंडापैकी किती आरक्षित भुखंडावर आराखडा मंजुर झाले आहेत?

आरक्षित भुखंडावर मंजुर झालेल्या आराखड्यापैकी सदर भुखंड कोणत्त्या प्रकल्पासाठी आरक्षित आहेत?

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षित भुखंडापैकी ६ आरक्षीत भुखंडावर आराखडा मंजुर झालेले आहेत.

आरक्षित भुखंडावर मंजुर झालेल्या आराखड्यापैकी सदर भुखंड (अ) साईट नं. १९३ वाहन व दुकान केंद्र (ब) साईट नं. ८० मार्केट (क), साईट नं. १४७ होलसेल मार्केट (ड), साईट नं. १४८, शॉपिंग फॉर डिसहाऊस शॉप प्रकल्पासाठी आरक्षित आहेत.

प्रश्न क्र. २६९ :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्त्येकी आरक्षित भुखंडावर किती चौरस फुट प्लान मंजुर झालेला आहे?

त्यापैकी किती दुकाने व सदनिका आहेत?

त्यांची प्रत्त्येकी किती चौरस फुट आहेत?

उत्तर :-आरक्षित भुखंडावर मंजुर केलेले नकाशांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. आरक्षण क्र. १९३ वाहन व दुकान केंद्र ३३१९.३९चौ.मी. क्षेत्रावर नकाशे मंजुर झालेले आहेत.
२. आरक्षण क्र. ८० मार्केट ९९२.०९ चौ.मी. वर नकाशे मंजुर झालेले आहेत.
३. आरक्षण क्र. १४७ होलसेल मार्केट ४७११.५२ चौ.मी. वर नकाशे मंजुर झालेले आहेत.
४. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउस शॉपस १४९६.७३ चौ.मी. वर नकाशे मंजुर झालेले आहेत.
५. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउस शॉपस ८५७.०५ चौ.मी. वर नकाशे मंजुर झालेले आहेत.
६. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउस शॉपस ३५२.१७ चौ.मी. वर नकाशे मंजुर झालेले आहेत.

प्रश्न क्र. २७० :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्त्येकी आरक्षित भुखंडावरील किती टक्के चौरस फुट ताबा महापालिकेस मिळणार आहे?

त्यामध्ये किती दुकाने व सदनिका किती चौरस फुट आहेत?

त्याबाबत सविस्तर तपशिल दयावा.

उत्तर :-

१. आरक्षण क्र. १९३ वाहन व दुकान केंदामध्ये ८३०.०० चौ.मी. क्षेत्र (वाहनतळासाठी ) ताब्यात घ्यावयाचे आहे.
२. आरक्षण क्र. ८० मार्केट २४७. ८० चौ.मी. क्षेत्र ताब्यात ताब्यात घ्यावयाचे आहे (पहिला व दुसरा मजला (भाग).
३. आरक्षण क्र. १४७ होलसेल मार्केटमध्ये ११७८. ०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घ्यावयाचे आहेत. दुसरा व तिसरा माळा (भाग)
४. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउसमध्ये ३७४. १८ चौ.मी. क्षेत्र ताब्यात घ्यावयाचे आहे. (पहिला माळा)
५. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउसमध्ये २१४. २६ चौ.मी. क्षेत्र ताब्यात घ्यावयाचे आहे. (दुसरा माळा)
६. आरक्षण क्र. १४८ शॉपींग फॉर डिसहाउसमध्ये ८९. ०० चौ.मी. क्षेत्र ताब्यात घ्यावयाचे आहे.

<u>प्रश्न क्र. २७१:-</u> यामध्ये किती आरक्षित भुखंडावर प्लान मंजुर झालेल्यापैकी किती काम पुर्ण झालेली आहे?

यापैकी कितीचा ताबा मिळालेला आहे?

त्या टक्केवारीनुसार त्यामध्ये किती चौरस फुट आहेत?

त्या ठिकाणांना कोणत्या नावे ओळखली जातात?

याबाबत सविस्तर खुलासा करावा.

<u>उत्तर :-</u>सदर भुखंडावर ३ आरक्षणामध्ये भाग पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला आहे.

आरक्षण क्र. १) १९३, वाहन व दुकान
२) ८० शॉपींग फॉर हाउस
३) १४७ होलसेल मार्केट

वरील ३ बांधकामांना भाग पुर्णतेचा दाखला देण्यात आला असुन म.न.पा.च्या ताब्यात घ्यावयाचे क्षेत्र मालमत्ता विभागाने ताब्यात घ्यावे याबाबत मालमत्ता विभागास कळविण्यात आले आहे.

१. आरक्षण क्र. १९३ मध्ये ८३०. ०० चौ.मी. क्षेत्र (वाहनतळ) म्हणून म.न.पा.स ताब्यात घ्यावयाचे आहे.
२. आरक्षण क्र. ८० मार्केट २४७. ०० चौ.मी. क्षेत्र पहिल्या व दुस-या मजल्यावर म.न.पा.स विनामुल्यस घ्यावयाचे आहे.
३. आरक्षण क्र.१४७ होलसेल मार्केटमध्ये ११७८. ०० चौ.मी. क्षेत्र दुस-या व तिस-या मजल्यावर म.न.पा.स विनामुल्य घ्यावयाचे आहे.
   १. आरक्षण क्र. १९३ ला ॲमबॅासिया हॅाटेल नावाने ओळखतात.
   २. आरक्षण क्रॆं८० इंदिरा मार्केट हया नावाने ओळखतात.
   ३. आरक्षण क्र. १४७ मार्केट हया नावाने ओळखतात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर :-</u> सन्माननिय महापौर, उप-महापौर, व आयुक्त साहेब, आजच्या तारखेला याची काय स्थिती आहे?

<u>श्री. पी. डी. कोळेकर (मा. उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u> सन्माननिय महापौर, उप-महापौर,आयुक्त साहेब, व सचिव साहेब,..........

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>कोळेकर साहेब, आपण महापौरांना विसरलात? थेट उप-महापौर असे आपण म्हंटलात?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> बोलले, बोलले.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> माईक बंद होता का? ठिक आहे.

श्री. पी. डी. कोळेकर (मा. उप-आयुक्त, अ.बां.वि.):- सहा जागांचा नगररचनाकारांनी उल्लेख केला आहे. त्यांची स्थिती अशी आहे, त्यामधील २ जागांची ट्रान्सफर ऑफ डिड, दिनांक ३/६/२००४ रोजी दुय्यम निबंधक (रजिस्टार ऑफिस मध्ये )नोंदणी झाली आहे. त्यामधील एक आहे, वुड लॅन्ड ११७७.८७ चौ.मी. चे ट्रान्सफर डीड झाले आहे. व दुसरी जागा सपना गार्डनची आहे. ३७४.१८ चौ.मी. याचेही ट्रान्सफर डीड झाले आहे. जी सहा बांधकामे आहेत, त्यामधील ३ बांधकामे अपुर्णावस्थेत आहेत. ती कामेच सुरु झालेली नाहीत. व वाहनतळ नोंदणीचे जे आहे ती जागा ताब्यात घेतली आहे परंतु दुय्यम निबंधक यांचे कार्यालयातून याबाबत नोंदणी व्हायची आहे. व एक जे गिता हेमनानी यांचे आहे, त्याबाबत त्यांनी कागदपत्र दिली आहेत. आता त्याची दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात नोंदणी व्हायची बाकी आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>आता हा जो प्लॉट नंबर आहे १४४ याचे ३७४.१८ मिटरचे जे क्षेत्र आहे, हा प्लॉट कशासाठी आरक्षित आहे?

<u>श्री. पी. डी. कोळेकर (मा. उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u> शॉपिंग फॉर डिस हाउस ....

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> तर मग आपण त्यासाठी काय घेतले पाहिजे? कायदयानुसार...... आपण त्यांच्याकडुन जे २५ टक्के घेतले पाहिजे ते काय घेतले पाहिजे? आपण फक्त हॉल घेतला आहे. पहिल्या माळयावर किंवा दुस-या माळयावर तो हॉल काय कामाचा?

<u>श्री. पी. डी. कोळेकर (मा. उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u> जागा घेतली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> हॉल घेतला आहे ना साहेब?

<u>श्री. पी. डी. कोळेकर (मा. उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u> होय, हॉल घेतला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> हॉल आपल्या काय कामाचा? मला सांगा ना आपण, २५ टक्के बांधकाम घ्यायचे तर दुकाने किंवा गाळे घ्यावयास पाहिजे होते ना? ज्या कुणाची जागा जाते त्यास पर्यायी जागा देण्यासाठी हे घेणे आवश्यक आहे. हॉल आपल्या काय कामाचा?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, याबाबत ना कोळेकर साहेब उत्तर देवू शकतील, ना मी उत्तर देवू शकेन. कारण की, जो नकाशा मंजुर झाला, मंजुर नकाशाप्रमाणे जे क्षेत्र घ्यायचे आहे ते त्यावेळचे नगररचनाकार व आयुक्त यांनी ठरविले आहे. व ते काम पुर्ण झाल्यानंतर आम्ही त्याचा ताबा घेतला व एवढेच नाही हे पहिल्यांदाच झाले आहे. पहिल्यावेळेस आम्ही महापालिकेच्यावतीने आम्ही दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात त्याची नोंद करुन घेतली आहे. महापालिकेचे टायटल लावले आहे. आता यामध्ये हेच होवू शकते की, जो हॉल आम्हांला मिळाला आहे, त्यामध्ये पार्टीशन टाकून ज्या लोकांची बांधकामे तुटली आहेत, जे बेघर झाले आहेत त्यांना आम्ही देवू शकतो. परंतु याचे आम्ही

उत्तर देवू शकत नाही की, हॉल का घेतला म्हणून? याबाबत श्री. कोळेकर साहेब व मी उत्तर देवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> आयुक्त साहेब, परंतु आपण हे मान्य करता की, हे चूकीचे झाले आहे म्हणून?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> जे पण झाले आहे, ते तत्त्कालीन लोकांनी कायदयाची माहिती करुन घेवून जे योग्य आहे तेच केले असेल. चूक की बरोबर हे येथे सांगण्याचा मला अधिकार नाही. जे काही झाले त्यांनी जसे मंजुर केले त्या प्रमाणे आम्ही त्याचा ताबा घेतला.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> परंतु दुसरी गोष्ट अशी की, आयुक्त साहेब, अशया गोष्टी, जेव्हा आपण आयुक्त म्हणून कार्यभार स्विकारलेला नव्हता, या सभागृहात भुखंड घोटाळयावर फार मोठी चर्चा झाली आहे. व आम्हांला असे वाटते की, ही जी कामे चालु आहेत ती फार मोठे घोटाळे आहेत. व असे विषय प्रथम महासभेत आले पाहिजेत. त्यानंतर ते मंजुर केले पाहिजेत असे काही आपणांस वाटत नाही का? कुण्या नगररचनाकारास या शहरास विकण्याचे वैयक्तीक अधिकार आहेत का? याबाबत आपणाकडुन आम्हांला थोडी माहिती पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> सन्माननिय महापौर, उप-महापौर, व आयुक्त साहेब, आम्ही त्याची दुकाने तयार करु, गाळे तयार करु या कामी जो खर्च येईल, ४०-५० हजारात तर तयार होणार नाही. ४-६-१० लाख रुपये आम्हांला खर्च करावा लागेल. एवढा खर्च आपण का करायचा? तो खर्च कोण देईल? ज्यांनी हे चुकीचे काम केले आहे, त्यांच्या पगारातून ही रक्कम कपात करुन घेतली पाहिजे. व पुर्तता केली पाहिजे. आता मागील काही दिवसापूर्वी आपण श्री. सोनवणे , नगररचनाकार यांना दंड लावला आहात, १ लाख रुपयाचा. त्याप्रमाणे यांना सुध्दा ८-१० लाख रुपयाचा दंड लावा. ही रक्कम त्यांच्या पगारातून कपात झाली पाहिजे. दोन्ही ठिकाणी त्यांनी जी चुक केली आहे, महापालिकेकडे जो हॉल हस्तांतरीत झाला आहे त्याच्यामध्ये पार्टीशन टाकण्यासाठी ही रक्कम उपयोगी येवू शकेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> खरेच , आपण अशी प्रकरणे लाच-लुचपत प्रतिबंध विभागाकडे पाठविली पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> असे केले नाहीतर यापूढेही अशी प्रकरणे होत राहतील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> असे घोटाळे चालू राहतील. व महासभेत कुणाला माहित पडणार नाही. याबाबत नंतर आपणांस माहिती पडेल की, या भुखंडाबाबत घोटाळा झाला आहे. अमुक-अमुक हा भुखंड अमुक या कामी दिला गेला आहे. याची पुर्वसूचना तर महानगरपालिकेस असली पाहिजे, लोक नियुक्त प्रतिनिधींना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> सन्माननिय सदस्य आपल्या आसनावर बसल्यानंतरच मी बोलु शकेल ना? दोन-दोन सन्माननिय सदस्य उभे असतांना मी कसे बोलणार?

मा. महापौर महोदया, ही जी आरक्षणे आहेत, त्यांचा विकास करण्यासाठी एक तर पहिला अधिकार किंवा पहिली जबाबदारी महानगरपालिकेची आहे. जर महानगरपालिका विकसित करु इच्छित नसेल तर एम.आर.टी.पी. ॲक्टच्या कलम (सेक्शन) १५४ नुसार तो जो जागेचा मालक आहे तो भुखंड विकसित करु शकतो. प्राथमिक शाळा व उदयान हे महापालिकेस विकसित करायचे असते. कलम १५४

नुसार, याबाबत जो एक शासन निर्णय झालेला आहे. कोणते आरक्षण महापालिकेने विकसीत केले पाहिजे. व कोणते जमिन मालकाने विकसित केले पाहिजे हे ठरविले आहे. त्यानुसार हे जे आरक्षण आहे, हे जे आरक्षण आहे ते जमिन मालक विकसित करु शकतो व त्यास विकसित करण्याची परवानगी देणे हे महापालिका आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात आहे. म्हणून त्यांनी आपल्या अधिकारान्वये ती जी परवानगी दिली आहे ती योग्य आहे. परंतु आजच्या एम.आर.टी.पी. ॲक्ट मध्ये तरतूद असल्यामुळे प्रत्येक प्रकरण महासभेपूढे आणण्याची आवश्यकता नाही. याबाबत संविधानिक तरतूद आहे. धोरणात्मक निर्णय जर काही घ्यायचा असता, तर आपल्या समोर ते प्रकरण यावयास पाहिजे होते. परंतु यामध्ये धोरणात्मक निर्णय असा काहीही नाही. अधिनियमामध्ये तरतूद करुन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>वाहनतळाबाबत असे काही आहे का? वाहनतळ महापालिका विकसित करु शकत नाही असे काही आहे का? जसे आपण म्हंटले की, प्राथमिक शाळा व उदयान हे महापालिकेने स्वतः विकसित करायचे असते. वाहनतळ असेल तर महापालिका स्वतः विकसित करु शकत नसल्याने ते दुस-यास विकसित करण्यासाठी दिले जाते. असे काही आहे का?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>ठराविक आरक्षणाबाबत पहावे लागेल. उदयान, खेळाचे मैदान, किंवा शाळा याबाबत मला खात्रीने माहित आहे की, ही आरक्षणे जमिन मालक विकसित करु शकत नाही. ट्रक टर्मिनन्स किंवा वाहनतळाबाबत मला पहावे लागेल. खाजगी जमिन मालक ही आरक्षणे विकसित करु शकतात किंवा नाही? किंवा महापालिकेने ही आरक्षणे विकसित केले पाहिजे. याबाबत मला पहावे लागेल. दुसरा यांचा जो प्रश्न होता की, विकास करण्यासाठी जो पैसा लागेल, पार्टीशन टाकण्यासाठी जो पैसा लागेल तो खर्च कुणी करायचा? ज्यांची दुकाने किंवा घरे एखादया रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होत असतील. अश्या ज्या लोकांना आम्ही अशा ठिकाणी पुनर्वसित करु, एकतर त्यांच्याकडुन हा खर्च वसूल केला जावू शकतो. किंवा अधिनियमानुसार ज्यांनी हे आरक्षण विकसित केले त्यांनी दुकाने किंवा गाळे तयार करुन दयावयास पाहिजे होते. तर ती दुकाने आता सुध्दा आम्ही त्यांच्याकडुन विकसित करुन घेवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> ज्यांनी बांधकाम केले, त्यांच्याकडुन आपण विकसित करुन घेवू शकता?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> आता घेवू शकतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> तर मग त्यांच्याकडुनच विकसित करुन घ्या ना साहेब? आपण का खर्च करायचा?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>ठिक आहे, प्रयत्न करु.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> आणखी काही चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे का?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.बां.वि):-</u> नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> नाही, बिल्कुल? आपण त्यांच्याकडुन विकसित करुन घेणार आहात ना? आताच आपण सांगितले...............

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>आम्ही हेच सांगितले की, आम्ही प्रयत्न करु. जर होत असेल, महापालिकेचे पैसे वाचत असतील तर ठिक आहे, नाहीतर

ज्यास पुनर्वसित केले जाईल. त्यांच्याकडुन पैसे वसूल करु. किंवा त्यांना सांगू आपण स्वतः विकसित करु. जो खर्च करायचा आहे, तो स्वतः करा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर :-</u> जो तेथे राहण्यास जाईल? परंतु साहेब, हे ज्या लोकांनी नुकसान केले आहे. आपण त्यांच्याकडुन याची भरपाई करुन घेतली पाहिजे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मी, एवढे सांगितले आहे की, ज्यांनी ज्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे त्यांनी कायदयातील सर्व तरतुदींचा उल्लेख करुन यास मंजुरी दिली आहे. एवढेच मी सांगितले आहे. याबाबतीत मला अधिक काही भाष्य करायचे नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u> त्यांनी आपणांस जे २५ टक्के बांधकाम विकसित करुन दयायचे आहे..........

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> आयुक्त साहेब म्हणतात, मला काही भाष्य करायचे नाही. (नो कॉमेंटस) जसे राजकिय नेते बोलतात त्याप्रमाणे ..........

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u> हा आपला राजकिय नेत्यांचाच थोडा हक्क आहे? आमचाही हक्क आहे. मला काही भाष्य करायचे नाही (नो कॉमेंटस) असे बोलण्याचा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> श्री. भुल्लर महाराज आपले चारही प्रश्न झाले ना?

प्रश्न क्र. १७२ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे, यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १७२ :-</u> खालील दर्शविलेली बांधकामे महानगरपालिका कार्यालयाने कधी निष्कासित केली होती काय? व किती भाग निष्कासित केला होता? याची विस्तृत माहिती दयावी.

आजच्या तारखेला सदर निष्कासीत केलेली कामे पुन्हा बांधकाम झालेले आहे काय?

असल्यास काय कारवाई केली आहे?

१) हरदिप फर्निचरच्या वर, सपना टॉकीज शेजारी, उल्हासनगर-३.

२) हॉटेल पिन्टो पार्क समोरील शेड स्टेशन रोड, उल्हासनगर-३.

<u>उत्तर :-</u>१) हरदिप फर्निचरच्या वर सपना टॉकीज शेजारी, उल्हासनगर-३ येथिल इमारतीचा काही भाग तत्त्कालीन मा. आयुक्त श्री. चंद्रशेखर साहेब यांचे कालावधीत तोडण्यात आला होता. तो पुन्हा बांधण्यात आला असून त्याबाबत नियमबध्द कारवाई करण्यात येत आहे.

२) हॉटेल पिन्टो पार्क समोरील शेड, स्टेशन रोड, उल्हासनगर-३ येथिल बांधकामाच्या दोन खोल्या दिनांक २८/१०/०३ रोजी तोडण्यात आल्या आहेत. त्या दिवशी मा. न्यायालयाची तहकुबी आल्यामुळे निष्कासनाची कारवाई थांबविण्यात आली. त्यानंतर निष्कासित केलेल्या भागाची पुर्नबांधणी सुरु झाल्याचे निदर्शनास

आल्यावरुन मा. न्यायालयीन आदेशाचा अवमान केल्यामुळे ही बाब मा. न्यायालयाचे निदर्शनास आणण्याची कार्यवाही केली आहे व सदरचे प्रकरण सद्या न्यायप्रविष्ठ आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २७३ हा श्री. विश्वनाथ पाटील यांचा आहे.

प्रश्न क्र. २७३ :- उल्हासनगर-५ येथिल जागा दुनिचंद कालानी हायस्कुलला ९९ वर्षे कराराने भाडेपट्टयाने दिली असून सदर संस्थेने अदयापपर्यंत किती घरपट्टी भरलेली आहे?

किती घरपट्टी शिल्लक आहे?

कोणत्त्या वर्षापासून शिल्लक आहे? कृपया याची माहिती मिळावी ही विनंती.

उत्तर :-सदर संस्थेने अदयापपर्यंत घरपट्टी भरलेली नाही.

सन ९१-९२ पासून ९५-९६ अखेर रुपये १२८८२५ येणे आहे. त्यापूढील आकारणी रुपये १२५७९८ वसूल करणेची आहे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :- मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. आयुक्त साहेब, प्रश्न असा आहे की, दुनिचंद कालानी कॉलेजसाठी, हॉयस्कुलसाठी ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाच्या करारावर महानगरपालिकेने जागा दिली. तर त्याची घरपट्टी किती बाकी आहे आणि किती भरलेली आहे. त्याबाबत मी हा प्रश्न विचारलेला आहे. तर उत्तर असे आहे की, सदर संस्थेने घरपट्टी भरलेली नाही. सन १९९१-९२ पासून ९५-९६ अखेर १,२८,८२५/- रुपये येणे बाकी आहे आणि त्यापूढील आकारणी १,२५,७९९/- तर ही घरपट्टी वसूल करण्यासाठी महानगरपालिकेने आजपर्यंत काय प्रयत्न केले. दुसरी गोष्ट त्या संस्थेने घरपट्टी भरलेली नाही, भाडे पटटयावर त्यांना ती जागा दिलेली आहे. त्यांनी ती घरपट्टी भरलेली नाही, तर त्यांचा भाडे करार रदद करु शकतो का नियमानुसार? तर त्या करारामध्ये काय-काय अटी आहेत, त्या सभागृहाच्या आपण निदर्शनास आणाव्यात.

श्री. पीडी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-सन्माननिय महापौर, उप-महापौर, आदरणीय आयुक्त साहेब, सचिव साहेब, हा जो २७३ क्रमांकाचा प्रश्न आहे, तो दुनिचंद कालानी कॉलेज बाबतचा आहे. या कॉलेजने २००३-२००४ मध्ये १,४८,०३६/- रुपये १५/२/२००४ रोजी भरलेले आहेत. त्याचा पावती क्रमांक १२९२६९ आता २००४ पर्यंत काहीही थकबाकी नाही. ती सर्व वसूल केली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- परंतु एक गोष्ट विचारु इच्छितो की, प्रश्न विचारल्यानंतरच वसूली होईल का? नाहीतर आम्ही लोकांनी आपणांस यादी दयावी की, याची वसूली केली नाही, त्याची वसूली केली नाही? २५ हजारापेक्षा अधिक ज्याच्याकडे थकबाकी आहे, त्याच्याकडील वस्तुंची आपण जप्ती करतात. तर मग प्रशासन काय असे करणार आहे का सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतरच तेथिल वसूली करायची.

श्री. पीडी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):- ४ डिसेंबर, २००३ चा हा प्रश्न आहे. १५ फेब्रुवारी, २००४ ला वसूली केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> मी तेच सांगत आहे की, कुणाकडुन वसूली करायची असेल तर कुणाकडुनही प्रश्न विचारणे जरुरीचे आहे की, आपण स्वतः वसूली करु शकता.

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-</u>आम्ही वसूली करतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> २५ हजारापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या सर्वांकडुन वसूली झाली पाहिजे. ही तर मोठी रक्कम आहे ती एवढया वर्ष आपण कशी सोडुन दिली होती?

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> आता पैसे भरल्यानंतर त्यांच्याकडे किती थकबाकी आहे?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-</u> २००४ अखेर कुठलीही बाकी नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> त्या करारामधील अटी नुसार किती वर्ष घरपटटी भरली नाही तर त्यांचा करार रदद होवू शकतो. अश्या काही अटी, शर्ती आहेत का त्याच्यामध्ये?

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-</u>याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही ती पहावी लागेल.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :- तर या अगोदर पाहून तुम्ही त्याच्यावर कारवाई का केली नाहीत?

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानी :- मा. महापौरजी, आम्ही या अगोदर सुध्दा तक्रार केली आहे की, जो कोणताही प्रश्न महासभेत चर्चेस येतो, त्याबाबत अधिकारी पूर्ण अभ्यास करुन तयारीनिशी येत नाहीत. आपणांस माहित असले पाहिजे, डिसेंबर महिन्यामध्ये प्रश्न आला आहे. आता तो चर्चेस आला आहे. यामध्ये काय-काय आहे? त्याबाबत सन्माननिय सदस्य उप-प्रश्न विचारु शकतात ना? आता आपण मला एक सांगा की, दुनिचंद कालानी कॉलेज बाबत त्यांनी हा एक प्रश्न विचारला. दुसरे एक कॉलेज २ नंबरमध्ये आहे. त्याचे काय? त्यावर किती लाख रुपये थकबाकी येणे बाकी आहे? आपण सांगू शकाल?

श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-नाही, आता नाही.

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानी :- नाही सांगू शकणार? एका कॉलेजसाठी प्रश्न आला तर दुस-या कॉलेजसाठीही येवू शकतो. म्हणून आपण तयारी करुन यावयास पाहिजे होते. एक सर्वात मोठी गोष्ट ही आहे की, ही जी आमच्या महापालिकेची मिळकत आहे, महापालिकेची मिळकत कुणाला चालविणेसाठी दिली आहे. जमिन आमच्या महानगरपालिकेची आहे. त्यावर जी इमारत तयार झाली आहे ती महानगरपालिकेची आहे. ज्याला ही मिळकत चालविण्यास दिली आहे तो दरवर्षी जवळ-जवळ १५ लाख रुपये प्रवेश फी पोटी गोळा करीत आहे. महानगरपालिकेची मिळकत आहे. महानगरपालिकेने ती तयार केली आहे. १५,१५ लाख रुपये कोणी खाजगी व्यक्ती तेथे डोनेशन घेत आहे. त्यानंतरही तो मालमत्ता कर भरत नाही. व यांना माहित नाही की, त्यांच्याकडे मालमत्ता कर येणे किती बाकी आहे? २५,०००/- पेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांची आपण यादी तयार केली होती. परंतु ज्यांच्याकडे लाखो रुपयांची थकबाकी आहे, ते आपणांस माहित नाही. असे आपण एक जबाबदार अधिकारी असतांना म्हणत आहात. कमीत कमी

प्रलंबित ठेवा. या प्रश्नाशी पुरक असलेल्या सर्व प्रश्नांची पुढील महासभेत आपण उत्त्तरे दया.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- **आयुक्त साहेब,............**

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, जो प्रश्न विचारला आहे, त्याचे पुर्णपणे उत्त्तर दिले गेले आहे. आता आपण काही उप-प्रश्न विचारत आहात. आता आपण आपला प्रश्न पुन्हा वाचून पहा. उल्हासनगर-५ येथिल जागा दुनिचंद कालानी हायस्कुलला ९९ वर्षे कराराने भाडेपटटयाने दिली असून सदर संस्थेने अदयापपर्यंत किती घरपट्टी भरलेली आहे? त्याचे उत्त्तर वर दिले आहे, घरपट्टी भरलेली नाही.

किती घरपट्टी शिल्लक आहे? त्यात सुध्दा स्पष्टपणे लिहिले आहे ९१-९२, ९५-९६ अखेर १,२८,८२५/- व त्यापुढील आकारणी १,२५,७९९/- बाकी आहे. आता त्याच्यामध्ये जे पैसे वसूल झाले, पैसे वसूल झाले म्हणजे आपला जो प्रश्न आहे, त्याचे पुर्णपणे उत्त्तर दिले आहे. आता आपण म्हणाल की, या संस्थेला दुस-या ठिकाणी जागा दिली आहे, तिस-या ठिकाणी जागा दिली आहे, त्याची सुध्दा माहिती सभागृहामध्ये पाहिजे. या प्रश्नासंबंधी जेवढे काही उप-प्रश्न विचारले जातील. त्यांची उत्त्तरे देण्यास आम्ही बाध्य आहोत. आपण आणखी जी काही माहिती विचारु इच्छिता त्याबाबत दुसरा एक प्रश्न विचारा. त्यावेळेस त्या प्रश्नाची सुध्दा माहिती दिली जाईल. परंतु हा जो प्रश्न आहे, तो राखून ठेवण्याचा किंवा त्याबाबत पुढील महासभेत माहिती देण्याची मला काही एक गरज वाटत नाही. कारण की या प्रश्नाचे उत्त्तर पुर्णपणे दिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> माझी महापौरांना एक विनंती आहे, या शहरामध्ये असे चालु आहे की, ज्यांना मालमत्ता कराचे पैसे भरायचे नाहीत ते लोक वर्षानुवर्ष पैसे भरत नाहीत. जे इमानदार लोक आहेत, त्यांच्याकडुन आमचे टॅक्स इन्स्पेक्टर किंवा अधिकारी वर्ग वसूली करतात. दुस-या लोकांकडुन वसूली करत नाही. यासाठी माझी एक विनंती आहे की, २५ हजाराच्या वर ज्यांची पण .............., ३१ मार्च २००४ रोजी २५ हजारापेक्षा जास्त ज्यांच्याकडे मालमत्ता कराची रक्कम बाकी आहे, त्यांची यादी सभागृहास दिली पाहिजे. व वर्तमानपत्रामध्ये सुध्दा माहिती प्रसिध्द केली पाहिजे.

<u>मा. महापौर :-</u>मी, आयुक्त साहेबांना निर्देश देते की, ज्या मालमत्ता धारकांकडे २५ हजारापेक्षा जास्त रक्कमेचे मालमत्ता कर येणे बाकी आहे. त्यांची चौकशी केली जावी. व महासभेपूढे माहिती सादर केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी, या विषयावर मी सुध्दा दोन शब्द बोलू इच्छितो. आज जसे आमच्या आयुक्त साहेबांनी सांगितले, जो काही विषय असेल प्रश्न असेल त्याच्याशी संबंधित जर उप-प्रश्न असेल तर तो विचारला जावू शकतो. श्री. कोळेकर साहेबांना व्यासपिठावर बोलावून जर विचारणा केली की, कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत किती खाजगी व्यक्तींना आपण भाडे पटटयांने महापालिकेच्या जमिनी दिल्या आहेत, त्याची माहिती दया. तर या प्रश्नाचा त्या प्रश्नाची काही संबंध नाही. आम्ही लोक जो प्रश्न विचारतो, त्याच्यावरच उप-प्रश्न विचारला जावू शकतो. नाहीतर मी कोळेकर साहेबांना असेही विचारु शकतो की, पुर्ण उल्हासनगर शहरामधील मिळकतींची आताच येथे माहिती दया तर ते देवू शकत नाही. म्हणून मेहरबानी करुन प्रत्त्येक सदस्य प्रत्त्येक महासभेत ५ प्रश्न विचारु शकतो. जर एखादया विषयाबाबत त्यास प्रश्न विचारायचा असेल तर तो दुस-या महिन्यामध्ये विचारु शकतो. तर मेहरबानी करुन आता जे आयुक्त साहेबांनी सांगितले की, जो प्रश्न विचारला जातो त्याचे उत्त्तर दिले आहे. इतर

*महानगरपालिकांमध्ये सुध्दा असेच होत असते. त्यावरही जर उपप्रश्न विचारायचा असेल तर दुस-या महिन्यामध्ये प्रश्न दयावा लागतो. परंतु इथे असे आहे की, जो प्रश्न विचारला आहे, त्याच्यावर कुणीही उपप्रश्न विचारतो, श्री. विश्वनाथ पाटील यांनी प्रश्न विचारला आहे, त्यावरील उप-प्रश्नावर उत्तर मिळत आहे. ही एक चांगली प्रथा आहे. परंतु मुळ प्रश्नाशी जो प्रश्न संबंधित नाही असा प्रश्न विचारला नाही तर बरे होईल. असा प्रश्न पुढील महासभेत विचारला तर फारच चांगले होईल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> मी आयुक्त साहेबांना सांगू इच्छितो की, यापूर्वी सुध्दा कर विभागाकडुन वर्तमानपत्रामध्ये एक यादी प्रसिध्द करण्यात आली होती. ती यादी ज्या पत्रकारास दिली होती तो पत्रकार एक नंबरचा ब्लेकमेलर आहे. तो ब-याचशया मिळकत धारकांना ब्लेकमेलिंग करत होता. आता आपण जर वर्तमानपत्रामधून यादी प्रसिध्द करण्यास देणार असाल तर विचार पुर्वक २-४ वर्तमानपत्रांना अशी यादी दया. एकाच वर्तमानपत्राला देवू नका.*

*<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> मा. महापौर, .....*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौरजी, आताच एका सदस्यांनी सांगितले की, तो एक पत्रकार आहे, ब्लॅकमेलर आहे. तो आमच्या हिशोबाने संपादक आहे. त्यांनी आमच्याकडुन माहिती मागीतली की, थकबाकी दारांची यादी दया. आम्ही त्यांना माहिती दिली. दुस-या संपादकांनी अशी मागणी केली असती तर त्यांनाही दिली असती. आता तर वर्तमानपत्राच्या माध्यमातून अशी यादी पाहण्याची आवश्यकता नाही. संगणकाच्या माध्यमातून इन्टरनेट वर आपण पुर्ण शहरातील थकित मालमत्ता कर धारकाची यादी आपण पाहू शकता. भलेही तो एक रुपया थकबाकीधारक असो, त्याचेही नाव आपणांस येथे पाहावयास मिळेल.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> ठिक आहे, आपण कुण्या वर्तमानपत्रवाल्यांना ही माहिती देणार नाहीत. आम्ही ही माहिती इन्टरनेटवर पाहू. ठिक आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> मा. महापौर महोदया, आता जो प्रश्न चालु आहे, त्याचा उपप्रश्न मी विचारला होता. सदर संस्थेला कराराने, भाडेपटटयाने सदर जागा दिली, त्याचा करारनाम्यामध्ये काही उल्लेख आहे का की, घरपटटी अमूक एवढया वर्ष भरली नाही तर त्याचा करारनामा रदद होवू शकतो. किंवा त्याच्यावर काही कारवाई होवू शकते. त्याचे उत्तर तुम्ही दिले नाही. किंवा तो करारनामा तुम्ही सर्व नगरसेवकांना सादर करावा.*

*<u>श्री. पीडी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u>महापौर महोदया, कराराबाबत जो उपप्रश्न विचारला आहे, त्याबाबतची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु पुढील महासभेत मी ती देवू शकतो.*

*<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u> करारनाम्याची प्रत दया सर्वांना.....*

*<u>मा. महापौर :-</u>श्री. कोळेकर साहेब, आपण म्हणता की, याबाबतची माहिती माझ्याकडे नाही. तर हे असे कुठपर्यंत चालेल?*

*<u>श्री. पीडी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.बां.वि.):-</u> करारनाम्याचा प्रश्नामध्ये उल्लेख नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u>श्री. कोळेकर साहेब, सदस्यांनी मागणी केली आहे की, त्या कराराची प्रत आम्हांला दया. ती देता येईल का?*

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-</u> देतो ना.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> हा, तर मग ती दया.

<u>श्री. पी.डी. कोळेकर (उप-आयुक्त, अ.ब्रां.वि.):-</u>पुढच्या सभेत देतो म्हणून सांगितले ना मी?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २७४ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २७४ :-</u> १)उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मगासवर्गीय अनुशेष भरणेसाठी मुलाखती घेवून विविध पदावर किती कर्मचारी नेमले?

२) त्यांचेपैकी कागदपत्रांची / दाखल्यांची पूर्तता करु न शकलेले कर्मचारी किती?

३) त्यांचेपैकी स्वतःहून नोकरीचा राजीनामा अथवा नोकरी सोडून गेलेले कर्मचारी किती कृपया याची माहिती येत्या महासभेत मिळावी.

<u>उत्तर :-</u>१) उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मागासवर्गीय अनुशेष भरण्यासाठी मुलाखती घेवून विविध पदांवर एकूण ९४ उमेदवारांना आतापर्यंत नियुक्त्या दिल्या होत्या.

२) निरंक

३) त्यांचेपैकी स्वतःहून नोकरीचा राजीनामा/ नोकरी सोडुन गेलेल्या कर्मचा-यांची संख्या ०२ आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>उत्तर ठिक आहे का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. २७५ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत, म्हणून त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. २७५ :-</u> उल्हासनगर कॅम्प नं. २ में जय गजानंद मार्केट के पीछे, मंगल मुर्ती मार्केट के सामने बनी हुई ३ दुकाने (जिनके नाम वाहगुरु टेड्रर्स, नारायण दीपकार्नर और एक चाय की होटल है।)

१) ये दुकाने सिमेंट रोड पर बनी हुई है या नही?

२)इन दुकानोंको बनाने की उमनपा से मंजूरी ली गई थी या नहीं?

३) क्या ये दुकाने उमनपा की नजर में अवैद्य बांधकाम है या नहीं?

४) उक्त दुकानों के विरुध्द अब तक उमनपा में कितनी शिकायतें आई है?

५) उक्त तीनों दुकानों को यदि वे अवैद्य है, सिमेंट रोंड पर अतिक्रमण करके बनाई गई है, और उनके बारे में शिकायते भी आई हैं तो उन दुकानों को तोडने

के लिए अब तक क्या कारवाई उमनपा ने की ? यदि नहीं तो क्यों? कारवाई नहीं हुई?

उत्तर :-प्रश्नांकित जागेची प्रत्यक्ष पहाणी केली असता खालील प्रमाणे वस्तुस्थिती आढळून आली आहे.

१) श्री. नानकराम चंद सिदवानी यांचे चहा दुकान काजल गारमेंट व नारायण दिप कलेक्शन असे तीन दुकाने १९९१ पासून सिमेंट कॉक्रिट रस्तेकडेस आहेत. रस्तेची रुंदी किती आहे. काय याची माहिती बांधकाम विभागाकडुन मागविली आहे. ती प्राप्त होणेची आहे.

२) दुकाने बांधकामास परवानगी दिलेचे सकृत दर्शनी आढळून आले नाही. तथापी नगररचना विभागाकडे पुन्हा विचारणा करण्यात आली आहे.

३) क्र. २ ची माहिती प्राप्त झालेवर अनाधिकृत बांधकामाबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

४) या दुकानाबाबत तक्रार आढळलेली नाहीत तथापी जुन्या तक्रारींचा शोध घेणे सुरु आहे.

या दुकानाबाबत फौजदारी खटला क्र. ५६३/ ९१ चा उल्हासनगर न्यायालयात दाखल केला होता व त्याचा निकाल २८/५/९६ रोजी झाला आहे.

तथापी रस्तेची जागा, त्यावर अतिक्रमण आहे काय, बांधकाम परवाना आहे काय याची माहिती संकलन करुन याची माहिती कायदयाच्या बाबी तपासून नियमबध्द कारवाई करण्यात येत आहे.

५) सदर दुकाने शासकिय जमिनीवर आहे व अनधिकृतपणे आहे. यासाठी विकासकरीता महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ प्रमाणे नोटिस बजावण्यात आली होती. त्या नोटिसांना आव्हान देवून विकासकर्त्यांनी दावा क्र. ३०६/ ९८ दाखल केला व स्थगिती आदेश घेतले ते स्थगित उल्हासनगर कोर्टाने कायम केल्यानंतर तत्त्कालीन नगरपालिकेने त्या आदेशाने अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश त्यांचेकडील अपील क्र. ४०/९३ अपील दाखल करुन आव्हान दिले. नगरपालिकेचे सदर अपील फेटाळण्यात आले. त्यामुळे खालच्या कोर्टामार्फत जोपर्यंत अंतिम निकाल येत नाहीत तोपर्यंत स्थगिती आदेश सदर प्रकरणी लागे असून न्यायप्रविष्ठ असून त्यावर चर्चा करता कामा नये.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- त्यांच्याबाबत आम्हांला माहिती हवी आहे की, वर्तमानपत्रामध्ये असे वृत्त येते की, त्यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी राजीनामा दिला आहे की नाही?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :- त्याबाबत आपला काही संबंध नाही. मेहरबानी करुन याबाबत येथे विचारणा करु नये. हा आमचा आपसातील मुददा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-हा आपला काही घरगुती मुददा नाही. त्यांचा प्रश्न आहे व सचिव साहेब सांगत आहेत की, यावेळी ते सभागृहात उपस्थित नाहीत. म्हणून आम्ही जाणून घेवू इच्छितो की, ते सभागृहात का नाहीत? त्यांनी राजीनामा दिला आहे का? सर्व वर्तमानपत्रामध्ये वृत्त प्रसिध्द झाले आहे की, त्यांनी राजीनामा दिला आहे. म्हणून मी आपणांस असे विचारु इच्छितो की, खरेच त्यांनी राजीनामा दिला आहे किंवा नाही?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-नाही, त्यांनी कोणत्त्या पदाचा राजीनामा दिला आहे असे आपणास विचारायचे आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :- नगरसेवक पदाचा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-नगरसेवक पदाचा राजीनामा देतांना त्यांना मा. आयुक्त साहेबांकडे लेखी पत्र दयावे लागेल. माझ्या मते त्यांच्याकडे असे काही पत्र आलेले नाही.

मा. सदस्य श्री. विनोद ठकूर :- श्री. पंजाबी साहेब, असा प्रश्न विचारणे आपल्या अधिकारक्षेत्रात येत नाही.

मा. सदस्य श्री मोहन साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २७६ हा श्री. मोहन बेहरानी यांचा आहे.

प्रश्न क्रमांक २७६:-१ बीसाईड नितेश प्रकाश रंगारी हाऊ मेनी परसन रिसेंन्टली अपॉइंटेड अंडर द बॅकलोग ऑफ बॅकवर्डस क्लास इम्प्लॉइज आर फाउंड टु बी अनसुटेबल ऑर अन कॉलिफाईड फॉर द रिकमन्डेड बाय स्टाफ सिलेक्शन कमिटी.
२. इज इट टृ दॅट फाय मोअर इम्प्लॉइज अपॉइंटेड ॲज पर द रिकमन्डेशन ऑफ सिलेक्शन कमिटी आर फाउंड टु बी अनकॉलीफाईड फॉर द पोस्ट? हु आर दे?
३. प्लीज गीव द नेम ऑफ सच इंम्प्लॉइज अन कॉलिफाईड बट सिलेक्टेड.
४. व्हाय सिलेक्शन हॅज फेल टु स्कुटनीज द रेकॉर्ड बीफोर अपॉइंट देम?
५. नेम द ऑफीसर इनव्हालेड इन धिस रेकॅट ॲन्ड व्हॉट ॲक्शन कमिशनर प्रपोझड टु टेक अगेन्स्ट ऑफीसर रिसपॉन्सीबल फॉर लॅप्स ऑर रिलिजन्स ऑन देअर पार्ट.

उत्तर :-१. श्री. दिनेश सोनाजी गावीत. कनिष्ठ अभियंता विद्युत.
२. नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांमध्ये अपात्र कर्मचारी नाहीत.
३. नाही.
४. प्रश्नच उदभवत नाही
५. संबंध नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-उत्तर ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्न क्र. २७७ हा श्री. विश्वनाथ पाटील यांचा आहे.

प्रश्न क्रमांक २७७:-उल्हासनगर शहरात रस्ते एकात्मिक प्रकल्प (आर.आर.डी.पी) अंतर्गत ३३ रस्त्यांचे दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले परंतु रामेश्वर कॉम्प्लेक्स ते मानेरा जंक्शन हा रस्ता आजतागायत अपुर्ण अवस्थेत असुन त्यामुळे अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. तरी सदर रोड का पुर्ण केला जात नाही?
सदर रस्त्याचे काम कोणत्त्या मजूर सहकारी संस्थेस देण्यात आले?
त्यांची कामाची मूदत किती होती? त्यांची मूदत संपली आहे काय?
मुदत संपली असल्यास त्यांच्यावर काय कारवाई केली गेली?
सदर रोडचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येईल?
रस्ता सध्या कोणत्त्या अवस्थेत आहे? कृपया याची सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

*<u>उत्तर :-</u>या कामाच्या सुरवातीस सदर कामाकरिता जागा उपलब्ध होण्यास अडचणी आल्यामुळे तसेच मध्यंतरीच्या काळात महापालिकेची आर्थीक स्थिती खराब असल्याने ठेकेदारास पेमेंट नसल्यामुळे कामास विलंब झाला आहे.*

*सदर काम मजुर संस्थेकडुन करण्यात येत नाही.*

*७ महिने*
*संपली आहे.*
*सदर कामामध्ये सुरवातीपासुन गुतागुंत झाल्यामुळे तसेच मध्यंतरीच्या काळात महानगरपालिकेची आर्थीक स्थिती खराब असल्याने ठेकेदाराचे देयक देण्यात विलंब झालेला असल्याने काम लांबलेले आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उदभवत नाही.*

*३१.३.२००४ अखेरपर्यंत.*

*दुतर्फा नाल्याचे बांधकाम झाले असुन फुटपाथ अपुर्ण अवस्थेत आहे. तसेच शेवटी कामाचे उर्वरीत २ स्तर करणे शिल्लक आहे. आता संबंधीत ठेकेदारास देयक अदा करण्यात येत असल्याने ठेकेदार लवकरच काम पुर्ण करणार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :-</u>मा. महापौर महोदया, उल्हासनगर मध्ये ३३ रस्त्याचे एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पांतर्गत काम करण्यात आलेले होते. त्यापैकी रामेश्वर कॉम्पलेक्स पासून मानेरा जंक्शन पर्यंत काम वेगवेगळया ठेकेदारांना दिले होते. पूर्ण रस्त्याचे काम श्रीराम टॉकीज पासून ते मानेरा जंक्शन दुसरीकडुन व्हिनस चौकापासून ते लालचक्की पर्यंत असा जो रोड होता त्या रस्त्याचे वेगवेगळया ठिकाणचे काम वेगवेगळया ठेकेदारांना दिले होते. त्यापैकी रामेश्वर कॉम्पलेक्स ते मानेरा जंक्शन हा रस्ता आज पर्यंत अपूर्ण अवस्थेत आहे. मध्यंतरी हा प्रश्न विचारल्यानंतर थोडे दिवस त्या रस्त्याचे दुरुस्तीकरणाचे काम चालू झाले. पण अदयापपर्यंत तो पूर्ण रस्ता बनविलेला नाही. त्याच्या फुटपाथाची अवस्था गंभीर आहे. फुटपाथाखाली ज्या नाल्या तयार केल्या आहेत, त्यांचीही अवस्था गंभीर आहे. तो रस्ता पूर्ण अवस्थेत नाही आहे. तर ज्या ठेकेदाराला ते काम देण्यात आलेले होते, त्याची मुदत काय होती? मुदत संपली आहे काय? किंवा मुदतीत त्यांनी काम न केल्याने दुस-या ठेकेदाराला काम देण्यात आले आहे का? किंवा ते काम आजपर्यंत का अर्धवट अवस्थेत आहे? ते काम कधीपर्यंत पुर्ण होणार? २-२ पावसाळे गेलेत, तेथे नेहमी-नेहमी अपघात होतात. त्या रस्त्यावरती, आणि त्या रस्त्याची अवस्था अतिशय गंभीर आहे. ते काम कधी पूर्ण होणार? उत्तरामध्ये हे सुध्दा दिले आहे, ७ महिन्यापूर्वी त्यांची मुदत संपलेली आहे. मुदत संपली आहे तर त्याच्यावर काय कारवाई केली आहे? सदर कामामध्ये सुरुवातीपासून गुंतागुंत झाल्यामुळे, काय गुंता-गुंत झाल्यामुळे? गुंता-गुंतीचा प्रश्न काय आहे?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, हा जो प्रश्न विचारला आहे, त्यामध्ये तथ्य आहे. हे काम आज सुध्दा अपुर्ण आहे. पहिले त्या ठेकेदाराला चालु बिल जे मिळावयास पाहिजे होते, ते वेळेवर न मिळाल्यामुळे काम वेळेवर पूर्ण होवू शकले नाही. त्यानंतरही हे अपेक्षित होते की, चालू बिल दिल्यामुळे मार्च, २००४ पर्यंत ते काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते. परंतु अदयापपर्यंत ते काम पूर्ण झालेले नाही. त्याचा जो फुटपाथ आहे त्या फुटपाथचे काम अर्धवट आहे, आम्ही येणा-या पुढील दोन महिन्याच्या आत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. व जर २ महिन्यामध्ये त्यांनी हे काम पूर्ण केले नाही तर मग करारानुसार त्यांचे नाव काळया यादीमध्ये टाकण्याची कार्यवाही सुरु करण्यात येईल.*

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> मा. महापौरजी, प्रश्न क्रमांक आहे २७७. त्यांनी तर एकाच रस्त्याचा उल्लेख केला, मी तर ३३ रस्त्याचा उल्लेख करतो की, यापैकी एक सुध्दा रस्ता पूर्ण झाला नाही. हा माझा प्रशासनावर आरोप आहे. एखादा जरी रस्ता पुर्ण झाला असेल तर मला सांगा. आयुक्त साहेब, आपण सांगत आहात की, २ महिन्यानंतर कारवाई करु. ३३ रस्त्त्यांचा जो प्रकल्प आला होता त्यास आज ४ वर्ष झाली. ४ वर्षात आपण काय कारवाई केली? ३३ रस्त्त्यांमधील एक रस्ता सुध्दा आपण पूर्ण केला नाहीत. व आता आपण २ महिन्याची मुदत मागत आहात. जो कोणता रोड पुर्ण झाला असेल त्याचे नाव सांगा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, रस्ते विकास प्रकल्पांतर्गत ज्या ३३ रस्त्त्यांचे जे काम सुरु केले होते, त्यामधील बरेचश्या रस्त्त्यांचे काम अपूर्ण होते. हे सत्त्य आहे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, ३३ मधील १२ रस्त्त्यांचे काम जवळ-जवळ पूर्ण झाले आहे. त्यांचे अंतिम बील सुध्दा अदा करण्यात आले आहे. व जे रस्ते अर्धवट आहेत, त्यांचे ठेकेदारांना करारातील अट क्रमांक १७ नुसार नोटिस दिली होती. एका ठेकदाराचे काम रदद सुध्दा केले आहे. मानेरा जंक्शनचा जो रोड आहे, त्याचा बुधरानी नावाचा ठेकदार आहे. त्यांचे काम रदद केले आहे. ते काम दुस-या संस्थेस देवून पूर्ण करुन घेतले जाईल. बाकी ज्या संस्था आहेत, त्यांनी काम पुर्ण करण्यासाठी हमीपत्र दिले आहे. म्हणून त्यांना काम करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. व मला असे वाटते की, येणा-या २महिन्यामध्ये काम पूर्ण होईल, फक्त एक बुधरानी यांचे जे काम आहे व विठ्ठलवाडी स्टेशन ते बोटक्लब पर्यंत रस्ता जो आहे, याची जी संस्था आहे, त्यांचेही काम रदद करण्याची कार्यवाही चालू आहे. या दोन संस्था रदद होतील, बाकी संस्था आपापले काम करण्यास तयार आहेत तर त्यांना मुदवाढ दिली पाहिजे. त्या हिशोबाने आम्ही ती दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> मा. महापौरजी, उप-महापौर, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, मी आयुक्त साहेबांना हे विचारु इच्छितो की, ते जे १२ रस्ते सांगत आहेत, ते कोणते १२ रस्ते आहेत? ३३ मधील बाकी जे रस्ते बाकी आहेत, व येथे आपण सांगत आहात की, ३१/३/२००४ पर्यंत काम पूर्ण होईल. आज जून महिना संपत आला आहे. ३ महिने पुर्ण झाले आणखी २ महिन्याची मुदत आपण मागत आहात. म्हणजे मला असे वाटते की, ऑगस्ट महिन्यामध्ये पूर्ण होईल. एकिकडे हे आहे तर दुसरीकडे ठेकेदारांना वेळेवर पेमेंट मिळत नाही. आपण अशी व्यवस्था केली आहे का की या ठेकेदारांचे पेमेंट करुन हे काम पूर्ण होईल. नाहीतर ऑगस्ट महिन्यामध्ये आम्ही पुन्हा आपणांस विचारु. त्यावेळेस आपण बोलाल की, आम्ही त्यांना पेमेंट दिले नाही. म्हणून ते काम वेळेवर पूर्ण झाले नाही. म्हणून आपणांस असे वाटते का की, ते काम ऑगस्ट महिन्यापर्यंत पूर्ण होईल? कारण मला शंका वाटते. कारण की, नेहमी जेव्हा आम्ही प्रश्न विचारतो तेव्हा आश्वासन मिळते की, हे काम ७ महिन्यात पूर्ण होईल. ७ महिन्याच्या कामासाठी १७ महिन्याची मुदतवाढ दिली आहे. इतर विभागांमध्ये आपण गेला तर ७ महिन्याच्या कामासाठी ८ महिने , १० महिने लागतात. कामाचा जेवढा कालावधी असतो त्यापेक्षा जास्त मुदत वाढ दिली जाते. म्हणून आम्ही वारंवार आपणांस सांगतो की, ३३ रस्त्त्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करा. जसे माझ्या पॅनल मध्ये २४ क्रमांकाचा रस्ता आहे, त्याबाबतीत आम्ही ६ महिने अगोदर सूध्दा या महासभेत मी बोललो होतो. त्यावेळी आयुक्त साहेबांनी आम्हांस आश्वासन दिले होते की, २ महिन्यामध्ये ते काम पूर्ण केले जाईल. त्यास ६ महिने पूर्ण झाले. आणखी किती वेळ त्यांना दयायची? माझी आपणांस विनंती आहे की, जे १२ रस्ते पुर्ण झाले ते कोणते? व बाकीचे जे आहेत ते कधी पर्यंत पुर्ण होणार? आपणांस जर वाटत असेल की, ऑगस्ट महिन्यामध्ये काम पूर्ण होईल तर आपण आम्हांस सप्टेंबरची वेळ दया. पुन्हा आपणांस असे विचारावे लागू नये की, साहेब याचे काय झाले? मग आपण सांगाल, ठेकेदाराचे पेमेंट झाले नाही. ठेकेदार आला

नाही. त्यास आम्ही नोटिस दिली व शेवटी त्यांचे काम रद्द केले. तर माझी आपणांस विनंती आहे की, १२ ऐवजी बाकी जे रस्ते आहेत ते आपण कधी पूर्ण करु इच्छिता?

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u> मा. महापौरजी, उप-महापौर, आयुक्त साहेब, हे जे रोड अर्धवट आहेत. एकतर ठेकदाराला पेमेंट देण्यास आपणाकडे पैसे नसतील किंवा ते काम पूर्ण करण्याची ठेकेदाराची क्षमता नसेल, तर त्यांना त्या रस्त्यांचे काम दयावयास नको होते. अर्धवट स्थितीत ते रोड आहेत. त्यामुळे उल्हासनगर मधील व त्या रस्त्यावरुन येणा-या जाणा-या इतर शहरामधील लोकांना एवढा त्रास सहन करावा लागतो. नेहमी नेहमी त्या रस्त्यांवरती अपघात होत असतात. आणि तुम्ही पोलिस स्टेशनला जावून याबाबतची जर यादी बघितली तर मला वाटते या ५-६ महिन्यामध्ये या ज्या रस्त्याबाबत प्रश्न विचारला आहे. त्या रस्त्यावर अपघाताने १० ते १५ लोकांचा मृत्यू झालेला आहे. आशेळा जंक्शन येथे एकाच वेळेला ३ लोकांचा मृत्यु झाला होता. तर सर्वात महत्त्वाचे हे आहे की, ते लोकांच्या सुविधेसाठी व लोकांच्या सुरक्षिततेसाठी तो रस्ता लवकरात लवकर तयार होणे अत्यंत आवश्यक आहे. कृपया तो रोड लवकरात लवकर बनविण्याची कृपा करावी.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>मा. महापौर, उपमहापौर, व आयुक्त साहेब, रोडच्या संदर्भात मला या ठिकाणी असे सांगावेसे वाटते की, माझ्या पॅनलमध्ये शहाड फाटक नाक्यापासून ते आयडीआय कंपनीच्या गेटपर्यंत जो रस्ता अर्धवट स्थितीत आहे, आपणांस विचारणा केल्यांनतर आपण रितसर मला समाधानकारक उत्तर दिले आहे. परंतु त्या उत्तराचे रस्त्यावर समाधान होत नाही. त्या ठिकाणी सेंच्युरी कंपनीच्या नाल्याची काहीतरी अडचण आपण सांगितलेली आहे. वारंवार सेंच्युरी रेयॉन कंपनीला पत्रव्यवहार करुन सुध्दा रस्त्यावर जो नाला आहे, तो ती कंपनी आत मध्ये घेत नाही. तर त्याच्यावर यापूढे आपण काय कारवाई करणार आहात? आणि केव्हा? तो रोड लवकरात लवकर पुर्ण होईल. याचे या ठिकाणी मला समाधानकारक उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मा. महापौरजी, आता जो ३३ रस्त्यांचा मुददा उपस्थित झाला, त्याबाबतीत मी ही गोष्ट जरुर सांगू इच्छितो की, आशेळा व मानेरा गावचा जो रोड आहे, जेव्हा ३३ रस्त्यांमध्ये घेतला होता, त्या वेळी आमचे आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी सांगितले होते की, ही गावे उल्हासनगरमध्ये नाहीत. आशेळा, मानेरा गावचा रोड उल्हासनगरमध्ये नाही. परंतु येथिल हा रस्ता ग्राम पंचायत कधीही तयार करु शकणार नाही. परंतु जर महानगरपालिकेच्यावतीने आम्ही हा रस्ता तयार केला तर तो रस्ता तयार झाल्यामुळे आपल्या लोकांना सुध्दा तेथुन ये-जा करणे सवलतीचे होईल. त्यावेळस तो रस्ता उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीत नसतांनाही मंजुर केला होता. आज सांगण्यास मला अतिशय आनंद होत आहे की, जेव्हा ३३ रस्त्यांचे काम चालु झाले होते, माझ्या प्रभागातील ११ नंबर जकात नाक्यापासून गायकवाड पाडयापर्यंतचा जो रस्ता होता, तो रस्ता एका वर्षाच्या आतच पुर्ण झाला होता. बरेचश असे रस्ते आहेत जे पुर्ण झाले आहेत, परंतु हे राहिले आहेत. ते सुध्दा लवकरात लवकर पूर्ण होतील. परंतु आम्हांला उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांना व त्यावेळेस जे सत्ताधारी पक्ष होते त्यांनी ते ३३ रस्ते मंजूर केले ते रस्ते या ३ वर्षमध्ये जो पर्यंत आमची इलेक्टेड बॉडी पदावर आहे तोपर्यंत पुर्ण केले जातील. व मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी जे आश्वासन दिले आहे त्या नुसार लवकरात लवकर कारवाई करुन त्या रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल अन्यथा जसे त्यांनी सांगितले की, त्या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकू. ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकतांना कुणीही मध्ये येवू नये. ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकण्याची प्रक्रिया जेव्हा सुरु होते. तेव्हा कुणीना कुणी मध्ये येता कामा नये. या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकू नका. असे सांगितले जाते. परंतु असा कोणताही ठेकेदार असो. ज्या ठेकेदारास

काम मिळते. कामाचा कालावधी ठरवून दिला असतो. त्या कालावधीत काम पूर्ण न केल्याने त्यानंतर मुदतवाढ दिली जाते. व त्यानंतरही ते काम पूर्ण करत नाही. अशया वेळेस ते काम दुस-या ठेकेदारास दिले पाहिजे. अशया पध्दतीने थोडया फार लोकांवर कारवाई झाल्यानंतर पुढे सर्व ठेकेदार चांगल्या प्रकारे काम करतील.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-</u>मा. महापौर, उप-महापौर, व आयुक्त साहेब, सचिव साहेब, ३३ रस्त्यांमध्ये माझ्या प्रभागातील सी-ब्लॉक ते मधुबन हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावरील फुटपाथ तुटलेला आहे. सदर रोड बाबत मी लेखी निवेदन सुध्दा दिले आहे. तरी त्यावर कार्यवाही झालेली नाही. तसेच दुनिचंद कालानी कॉलेज ते राणा आईस फॅक्टरी पर्यंतच्या रस्त्यावर सुध्दा दोन्ही बाजूला फुटपाथवर लादया बसविलेल्या नाहीत. आणि चेंबरवर कव्हर सुध्दा बसविलेले नाही. ३३ रस्त्यांच्या कामामध्ये या रस्त्याचे सुध्दा काम होईल, असे आश्वासन आपण दिले बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:-</u> मा. महापौर, उप-महापौर, व आयुक्त साहेब, सचिव साहेब, ३३ रस्त्यांबाबत मी सांगु इच्छितो की, ५ नंबरपासून विठ्ठलवाडी पर्यंत शहाड फाटक पासून फॉल्वर लाईन पर्यंत चेंबर्सवर झाकणे नाहीत. शाळेमध्ये येणारी जाणारी कित्त्येक लहान मुले या चेंबर्समध्ये पडत असतात. मी याबाबत पत्र दिले आहे, परंतु त्याचे ना मला उत्त्तर दिले ना कामही झाले. साहेब मी हे एक सांगु इच्छितो की, येथे ठेकेदार काम करतात तेथे प्रथमतः ते माती भरतात. वर स्लॅब टाकून झाकण ठेवतात. मी एक उदाहरण देतो. सीरु चौक पासून ईएसआयएस हॉस्पीटल पर्यंत रस्त्याचे काम चालू आहे. नालीवर त्यांनी फ्रेम बसविली आहे. ती अचानकपणे पडून अपघात होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर मी हेही सांगू इच्छितो की, फॉल्वर लाईनपासून रेडक्रॉस पर्यंत पावसाचे पाणी साचत आहे. याबाबत मी जवळजवळ १५ पत्रे दिली आहेत. आज जवाहर हॉटेल येथे जवळ जवळ फुटभर पाणी साचले आहे. शंकर सैनी यांच्या घरापासून फॉल्वर लाईनपर्यंत पाणी साचले आहे. याबाबीकडे विशेष लक्ष दया. व याबाबतीत योग्य ती कारवाई लवकर करण्यात यावी. सार्वजनिक शौचालय तुटली आहेत, त्यांच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा. महापौर, उप-महापौर, व आयुक्त साहेब, सचिव साहेब, रस्ते तयार करण्याबाबत बोलले जात आहे. रस्ते रुंदीकरणाच्यावेळी काही लोकांची घरे निष्कासित होतात. त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत कोणी बोलत नाही. त्यांचे काय कराल? त्यांची घरे तोडता त्यानंतर त्यांना सांगता की, १९९५ चा पुरावा आणा. झटपट त्यांची घरे तोडता, पर्यायी जागा मागतात तेव्हा १९९५ चा पुरवा मागता, काय करायचे त्या लोकांनी याबाबतीत काहीतरी रस्ता काढला पाहिजे ना? रस्ता तयार करण्यास सर्वजण बोलतात. डॉल्फीन क्लब येथे १७ घरे तुटली त्यांना अदयाप पर्यायी जागा दिलेली नाही. ते लोक पावसात बसलेत बिचारे, त्यांची काही सुनवाई केली जात नाही. आणखी काही घरे तुटतील. त्यांच्याबाबतीत काय विचार केला आहे. हॉलमध्ये त्यांना पर्यायी जागा दया. परंतु एका हॉलमध्ये किती लोकांना पर्यायी जागा दयाल? याबाबतीत काय निर्णय घेणार आहात. उल्हासनगर मधून बाहेर जाण्यास सर्व लोकांना सांगणार आहात काय? तुमचे घर रस्त्यामध्ये येत आहे. म्हणून तुम्ही येथून निघून जा असे सांगणार आहात का?

<u>प्रभारी कार्यकारी अभियंता (श्री. एस. बी. सुखरामानी):-</u> जे रस्ते पुर्ण झाले आहेत ते येणे प्रमाणे......

१. हरमन मोहटा ते शहाड स्टेशन.
२. शहाड स्टेशन ते सी ब्लॉक.
३. सी ब्लॉक ते प्रिया अपार्टमेंट.
४. राधास्वामी सत्त्संग हॉल ते ओटी सेक्शन, उल्हासनगर-३

५. बॅरेक क्रमांक १९१७ ते वॉटर सप्लाय कंम्पाऊंड उल्हासनगर-५

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>साहेब, राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी सेक्शन उल्हासनगर-३चा रस्ता पुर्ण झाला असे म्हणता परंतु तो रस्ता पुर्ण कुठे झाला. हे तर चुकीची माहिती देत आहेत. हा रस्ता विकास आराखड्यातील रूंदीप्रमाणे तयार होत आहे का?

श्री. सुखरामानी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-**तो जो रस्ता आहे तो २००१मध्ये पुर्ण झाला आहे.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>काही रस्त्यांना फुटपाथ नाहीत, साईडच्या नाल्या नाहीत. आपण म्हणता की, रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. हा घोटाळा झाला आहे काय? नालीचे पैसे कुणाच्या खिशात गेले काय?

<u>श्री. सुखरामणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>तेथे नाली व फुटपाथ तयार केलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तयार झाला आहे? चला आता गाडीने जावुन पाहुन येवू या.

<u>श्री. सुखरामाणी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>चला. त्या रस्त्याची रूंदी ४० फुट आहे. राधास्वामी सतसंग हॉल ते उल्हासनगर कॅम्प नं. ३ येथील ओ.टी. सेक्शन बाबत बोलत आहे. तो मुख्य रस्ता नाही. आमचे नगरसेवक श्री. चिमन रूपाणी हे तेथे राहतात. फुटपाथ व गटारे तेथे तयार केलेली आहेत.

५. बॅरेक नं. १९१७ ते वॉटर सप्लाय कंम्पाऊंड वॉल उल्हासनगर-५ हा सुध्दा विकास आराखड्याप्रमाणे ४० फुट रूंद रस्ता आहे.
६. गुरूव्दारा सी. ब्लॉक ते डी.टी. कालानी चौक
७. गोलमैदान ते सोनेसर अपार्टमेंट
८. बलराम अपार्टमेंट ते बॅंक ऑफ बडौदा
९. मधुबन हॉटेल ते दुनीचंद कालानी कॉलेज.
१०. गोलमैदान सभोवतालचा सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता
११. शिवाजी चौक ते नेहरू चौक
१२. झुलेलाल मंदीर ते सेंन्ट्रल हॉस्पीटल (रेडक्रॉस मार्ग)

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः-</u>मी आताच म्हंटले आपण ऐकले नाही. आपण सभागृहात नव्हतात. आपण आता सुध्दा येवून पाहु शकता. रामायण नगर पासुन पुढे चेंबरर्स वर एकही झाकण नाही. जो फुटपाथ चालण्यासाठी तयार केला जातो त्या फुटपाथ वरून चालताना लहान मुल चेंबर मध्ये पडले तर मोठा अपघात होवू शकतो. त्यास जबाबदार आपण रहाल का? आपण म्हणता त्या रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे.

<u>श्री. सुखरामानी (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>फुटपाथवरील चेंबर्स वर झाकणे बसविली होती. परंतु त्यांची चोरी झाली.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः-</u>बिल्कुल नाही. मी लेखी तक्रार दिली आहे. फुटपाथ सर्व तुटलेले आहेत. आपण म्हणता रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे. मातीवर सी ग्रेडची लादी बसविली आहे. त्यामुळे पुर्ण फुटपाथ दबला आहे. एवढे मोठे काम आहे. कॉलीटी कंट्रोलच्या हिशोबाने कधी आपण ते काम तपासून पाहिले आहे?

लादी तपासून पाहिली आहे? सर्व लादया निघत आहेत. कारण लादया बसविण्यासाठी सिमेंटचा वापर केला नाही. मातीवरच लादया बसविल्या आहेत. घरातील मातीचे मडके पहा. ते कधी विरघळत नाही. परंतु या लादया पहा त्या कश्या विरघळल्या आहेत. हे समजून येत नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :-</u> आपणांस रस्त्यांचा ताबा कधी दिला?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मला असे वाटते की, सभागृहाला ३३ रस्त्यांबाबत पुर्ण माहिती पाहिजे. जे ३३ रस्ते हाती घेतले होते त्यांची सद्यस्थिती काय आहे? काम जर पुर्ण झाले असेल तर ते कधी पुर्ण झाले आहे? काम जर अपुर्ण असेल तर त्यामध्ये कोणती बाब अदयापपर्यंत अपूरी आहे? ही पुर्ण माहिती जर सभागृहाला पाहिजे असेल तर, लिखित स्वरुपात जर पाहिजे असेल तरए याबाबत सभागृहामध्ये एक निवेदन केले जाईल. परंतु आता सन्माननिय सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी जे सांगितले की, जर त्या रस्त्यावर काही अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेईल? आपणांस कदाचित हे माहित असले पाहिजे. जेव्हा रस्त्याचे काम पूर्ण झाले त्यावेळेस तेथे ठेकेदाराने झाकणे लावली होती. चेंबरमध्ये जे लोखंडी सामान असते ते काही लोक रात्री चोरुन नेतात. या वर्षी सुध्दा पावसाळया अगोदर ब-याच ठिकाणी चेंबर्सवर आम्ही झाकणे बसविली आहेत. परंतु एका रात्री एखादा माणूस काही पैसासाठी ती झाकणे चोरुन नेतो. व त्यानंतर जर एखादा अपघात होत असेल तर त्यास आमचे अधिकारी जबाबदार कसे असतील? आपण सुध्दा या सभागृहाचे सदस्य आहात. आपणांस सुध्दा माहिती असेल की,अश्या घटना होत असतात. येथे आज झाकण बसविल्यानंतर उदया कुणी त्याची चोरी करते. व यानंतर जर काही अपघात होत असेल तसा तो होवू नये, म्हणून आम्ही सर्व ते प्रयत्न केले आहेत. पावसाळयापूर्वी ब-याचश्या ठिकाणची झाकणे बसविण्याबाबत आम्ही आदेश दिले आहेत व काम सुध्दा सुरु झाले आहे. काही ठिकाणी काम पुर्ण सुध्दा झाले आहे. परंतु या अपघाताची जबाबदारी आपण घ्याल का असे म्हणणे ठिक नाही. शहरामध्ये ज्या काही घटना होतात, त्याची जबाबदारी आपली, आमची व सर्वांची असते. कुण्या एकाची नसते ती. आपणांस सुध्दा माहिती पाहिजे की, कुणी व्यक्ती झाकणे चोरुन घेवून जाते. आपणांस माहित असेल त्या विभागामध्ये भंगार सहित्य विकत घेणारे लोक कोण आहेत? तेथे जावून कधी आपण पहा. आपली जी झाकणे चोरीला जातात ती तेथे मिळू शकतात. इतकेच नाही तर जे फुटपाथ तयार केले आहेत ते फुटपाथ का खराब होतात? तेथे मालाची चढउतार होते. कधी कधी कुणी गणपतीच्या मुर्ती विक्रीसाठी तेथे ठेवत असतो. त्यामुळे सुध्दा फुटपाथ खराब होतात.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :-</u> हरकतीचा मुददा आपण थेट गणपतीचा विषय काढलात, आपल्या चुका झाकण्यासाठी, आपण एक चांगला मुददा मांडलात. मी एक सदस्य या नात्याने लेखी स्वरुपी कितीतरी वेळा मी आपणाकडे तक्रारी केल्या आहेत, त्यातील कोणत्त्या तक्रारीची आपण पुर्तता केली आहे ते आपण सांगा. एवढे दिवस झाले आपण माझे एखादे तरी काम केले आहे? तक्रारीचे लेखी उत्तर दिले आहे? रस्त्यावर काय काय होते? ते आपणांस दिसत नाही? पिवळया बत्तीच्या गाडीतुन आपण फिरता, आपण गणपतीसाठी बोलता, चला माझ्या बरोबर मी जेथे गणपती ठेवतो, ती जागा खराब झाली असेल तर वाटेल तो दंड भरण्यास मी तयार आहे. मी माझ्या स्वतःच्या खर्चाने तेथिल दुरुस्ती करेल. इतर ठिकाणी ज्या जागा खराब झाल्या आहेत त्या आपण आपल्या स्वतःच्या खर्चाने दुरुस्त करुन घ्या. आता सभागृहा समोर मी बोलत आहे. ५ राजकीय पक्षाचे ५ लोक पंच म्हणून आपण बरोबर घ्या. गणपती ठेवून जर मी फुटपाथ खराब केला असेल तर तो मी माझ्या स्वतःच्या खर्चाने तो फुटपाथ पुर्ववत तयार करुन दईन आताच्या आता, २४ तासाच्या आत. नाहीतर आपण २४ तासाच्या आत तयार करा. आपण हे लोकांना

हे दर्शवत आहात की, मी फुटपाथ खराब केला. मी खराब केला असेल ना तर मी तो पुर्ववत करण्यास तयार आहे. ३३ रस्त्त्यांच्या कामामध्ये आपल्या अधिका-यांनी काय काय केले ते मान्य करण्यास आपण तयार नाहीत. एवढा पैसा कुठे गेला, माती टाकुन सर्व रस्ते तयार केले. ना कॉलीटी कंट्रोल, ना स्लॅब मध्ये सळया टाकल्या. हे सर्व झाकण्यासाठी आपण थेट गणपतीच्या विषयावर आलात.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :-</u> मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी जे सांगितले की, लोखंडी झाकणांची चोरी झाली. मी त्यांना निवेदन करु इच्छितो की, लोखंडी झाकणे चोरी झाल्यानंतर आपल्या कार्यकारी अभियंत्त्यांनी एफआयआर दाखल करण्याची दखल घेतली आहे काय? ही एक गोष्ट झाली, दुसरी मी सांगतो की, आपणांस एक तांत्रिक अधिका-यांनी हे सांगितले नाही की, चेंबर्स वर लोखंडी झाकणे लावली नाही पाहिजेत. त्या ठिकाणी सिमेंटची झाकणे लावली पाहिजेत. तर श्री. सुखरामानी सारखे अधिकारी येथे ठेवल्यानंतरही जर अशया प्रकारचे मार्गदर्शन आपणांस केले नसेल तर ही दुःखाची गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, कालच आयुक्त साहेबांनी श्री. सुखरामणी यांच्या बरोबर कॅम्प नं. ४ येथिल बहुतांश रस्त्त्यांची पाहणी केली. तेथिल ज्या रस्त्त्यांवरील चेंबर्सवर झाकणे नाहीत तेथे झाकणे बसविण्याबाबत आदेश दिले आहेत. व जी कामे बाकी आहेत ती कामे पूर्ण करण्यासाठी आदेश दिले आहेत. दुसरी गोष्ट अशी की, आमचे मित्र थोडया वेळे पूर्वी आरोप लावत होते की, एक सुध्दा रोड पूर्ण नाही, त्याबाबत श्री. सुखरामाणी यांनी १०-१२ रत्त्यांची नावे वाचून दाखविली. माझ्या मित्रांना माझे निवेदन आहे की, फक्त आरोप लावण्यासाठी आरोप लावले जावू नयेत, काहीतरी वस्तुस्थिती दर्शक प्रकरण समोर ठेवले तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री.राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, ३३ रस्त्त्यांबाबत जेव्हा चर्चा चालु होती तेव्हा मी आरोप केला होता की, एका सुध्दा रस्त्त्याचे काम पुर्ण झाले नाही. ३३ रस्ते पुर्ण कधी झाले होते? ३३ रस्त्त्यांचा प्रकल्प कधी हाती घेतला होता हे आपणांस माहित आहे का?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u>मी आपल्या एका गोष्टीची नोंद घेतली आहे की, आपण म्हणालात की, एका सुध्दा रस्त्त्याचे काम पुर्ण झाले नाही. श्री. सुखरामानी यांनी १२ रस्त्त्यांची नावे सांगितली मी या गोष्टीचा संदर्भ देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>अहो, पाच वर्षामध्ये फक्त १२ रस्त्त्यांचे काम पुर्ण केले.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u>तर मग तशी गोष्ट करा. आपण म्हंटलात की, एक सुध्दा रस्त्त्याचे काम झाले नाही. त्यांनी १२ रस्त्त्यांची नावे सांगितली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>१२ पैकी एकाही रस्त्त्याला फुटपाथ नाही......

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :-</u>आपण खोटे बोलत आहात. थेट प्रक्षेपणामुळे लोक महासभेचे कामकाज टीव्ही वरून पहात आहेत.

यावेळी काही सन्मानिनिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>आसना शेजारी उभे असलेल्या सर्व सदस्यांनी आपापल्या आसनावर आसनस्थ व्हावे. सर्व सदस्य एकाचवेळी बोलु लागले तर सभेचे कामकाज कसे

चालणार? जे लोक या प्रश्नावर चर्चा करत आहेत त्यांना बोलु दया. दुस-यांनी मध्ये बोलु नका. प्रत्येक सदस्य एका विषयावर एकदाच बोलु शकतो. या प्रश्नाचे बाबत उत्तर तर दिले आहे ना? श्री. राजेंद चौधरी यांना बोलु दयावे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>श्री. नथु सोनावणे आपण बसुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आजच्या सभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण टिव्ही वरून दाखविले जात आहे. आपण काहीही बोलाल का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मा. महापौरांची परवानगी घेवून मी बोलत आहे. आपणांस त्यामध्ये काय त्रासाचे होत आहे?

<u>मा. महापौरः-</u>श्री. राजेंद चौधरी यांना बोलु दयावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, मी बोलत असताना हे लोक बोलण्यासाठी उभे राहिले.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मा. महापौरांची परवानगी घेवुन बोला.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मी. मा. महापौरांची परवानगी घेवुन बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मा. सदस्य श्री. खेमाणी, आपण आसनावर बसल्यानंतर मी बोलण्यास उभा राहिलो.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मी बसलो कुठे आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया इकडे लक्ष दया. मा. महापौरांचा आदेश आहे की, आपण आपापल्या आसनावर आसनस्थ व्हावे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u>मा. महापौरजी, प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>रस्ता रूंदीकरणामध्ये ज्या लोकांची घरे गेली आहेत. ते तर बरबाद झाले आहेत. गुलशन नगर उध्वस्त करण्याची साजीश चालु आहे, ते लोक कुठे जातील? सत्ताधारी पक्षवाले म्हणतात की आम्हाला झोपडपटटीवाल्यांची गरज नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मा. महापौरजी, ३३ रस्त्यांचा प्रश्न जो या सभागृहात आला. त्यावेळी मी म्हंटले की, एका सुध्दा रस्त्याचे काम पुर्ण झाले नाही. प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, १२ रस्त्यांचे काम पुर्ण झाले आहे. व काही सदस्य त्याबाबत म्हणत आहेत की आमच्या प्रभागातील रस्त्याचे काम अदयाप पुर्ण झालेले नाही. तर रस्त्यांचे काम पुर्ण झाले आहे किंवा नाही. याबाबत प्रशासन व ज्या ज्या सदस्यांनी याबाबत हरकत घेतली आहे.

मा. महापौरजी, जर कुणाच्या प्रभागातील रस्त्याचे काम पुर्ण झाले नसेल तर ते पुर्ण करण्याचे काम प्रशासनाचे आहे. त्यांनी आश्वासन दिले आहे की आम्ही काम पुर्ण करू. त्याबाबत आता आताच आयुक्त साहेबांनी सांगितले की, चेंबर्स वरील जी

झाकणे चोरीस जातात त्याबाबतची जबाबदारी आमची आहे, सदस्यांची आहे आपणांसर्वांची आहे. मी असे सांगु इच्छितो की, एका सदस्यांनी त्यावेळेस आपणांकडे तक्रार केली होती. तक्रार देवुन सुध्दा अदयाप पर्यंत आपण कार्यवाही केली नाहीत. तर ती जबाबदारी आपली एकटयाची आहे. तर ती जबाबदारी आपण पुर्ण करा. व त्यानंतर सदस्यांवर आरोप लावा. कुणी फुटपाथवर गणपती ठेवले होते, काय केले होते तर त्यावेळेस आपण काही कारवाई केली नव्हती. ती आपण करावयास पाहिजे होती. आम्ही आपणांस ब-याचशा तक्रारी दिल्या होत्या. फुटपाथ व्यापले आहेत. गाडया रस्त्यावर उभ्या असतात. वाहतुक नियंत्रणाबाबत पोलिस उपायुक्तांच्या दालनात जी बैठक झाली होती. त्यावेळी जे निर्देश दिले होते. त्याचे काय झाले? ती कारवाई करण्याची हिंमत आतापर्यंत आपण का दाखविली नाहीत. व कुणा सदस्यावर आरोप लावता की ते फुटपाथवर गणपतीची मुर्ती ठेवतात. म्हणुन त्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे कारवाई करा. ती कारवाई अदयाप पर्यंत का होत नाही? प्रशासनाची ही सुध्दा जबाबदारी आहे ना? आम्ही लेखी तक्रार देतो. सभागृहात लक्षवेधी मांडतो. तरीही कार्यवाही होत नाही. व कुण्या सदस्यांनी आपणांबाबत बोलले तर त्वरीत त्यास उत्तर देता.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>हरकतीचा मुददा. आयुक्त साहेब, पक्षपाती काम करतात. फुटपाथवर जी दुकाने तयार झाली आहेत त्यांची उदयाच मी आपणांस यादी देतो. ती आपण उदया तोडुन दाखवा. तेव्हा कुठे मी मान्य करेन की आपण योग्य ते काम करता. ब-याच वेळा मी आपणांकडे आलो तेव्हा आपण म्हणालात की मी चुकीचे काम करत नाही. किती चुकीची कामे आहेत ती मी आपणांस दाखवतो. चला माझ्या बरोबर, बांधकाम नकाशा मंजूर न करता किती इमारतींचे बांधकाम चालु आहे? कितीतरी चुकीचे कामे मी आपणांस दाखवू शकतो. आता माझ्याबरोबर येत असाल तर मी ती बांधकामे आपणांस दाखवतो. फुटपाथवर बांधण्यात आलेल्या दुकानांची यादी उदयाच मी आपणांस देतो. आपण ती बांधकामे हटवून दाखवा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> सचिव साहेब, एक मिनिट, मा. वसंत डावखरे हे ठाणे जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकरणाच्या निवडणूकीत विजयी झाले आहेत म्हणून सर्व सदस्यांना शुभेच्छा देवून सर्वांचे तोंड गोड करु इच्छितो. तरी मा. महापौरजी, पेढे वाटप करण्यास परवानगी दयावी ही विनंती.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया लक्ष दया. शिवसेना पक्षाच्या गटनेता पदासाठी मा. महापौरांना २ सुचना प्राप्त झाल्या आहेत. एक मा. खासदार श्री. प्रकाश परांजपे यांच्याकडुन मिळाली आहे. त्यांनी श्री. दिलीप गायकवाड यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवलेला आहे. व दुसरा प्रस्ताव श्री. मनोहर अंबावणे, ठाणे जिल्हा प्रमुख यांच्याकडुन प्राप्त झाला आहे. त्यामध्ये श्री. रमेश चव्हाण यांच्या नावाचा प्रस्ताव आहे. आता या दोन्ही सुचनांमधील कोणती अधिकृत आहे, कोणती अनाधिकृत आहे, याची शहानिशा करणे कठिण आहे. पुढील महासभेत या दोन्ही प्रस्तावातील कुठला तरी एक ग्राहय मानून त्याप्रमाणे गटनेता म्हणून नावाची घोषणा केली जाईल.

एक लक्षवेधी सूचना प्राप्त झाली आहे. जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, (विरोधीपक्ष नेता) , अनुमोदक आहेत श्री. लाल पंजाबीजी.

ही सूचना या प्रकारची आहे की, शहरात नाला सफाईचे काम योग्य प्रकारे होत नाही. जेसीबीचा वापर कमी होत आहे. व हजेरीमध्ये भ्रष्टाचार होत आहे.

यामुळे शहरामध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे. म्हणून प्रशासनाने याबाबतीत उत्तर दयावे. ही लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकृत केली आहे.

व आयत्त्यावेळीचा एक विषय आहे. पैसे दया व वापरा या तत्त्वावर शौचालय देखभाल व दुरुस्ती कामी विविध संस्थांना देणे. आपल्या सर्वांची अनुमती असेल तर आजच्या सभेच्या कामकाजात सामावून घेता येईल. याबाबत कुणाची हरकत तर नाही ना? हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जात आहे. व लक्षवेधीचे सुचक श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी आपली बाजु मांडावी.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

## <u>लक्षवेधी सूचना</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :- श्री.लाल पंजाबी

उल्हासनगर शहरात जागोजागी कच-याचे ढिग साचलेले असून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. पावसाळा सुरु झाल्याने त्यात वाढ होऊन दुर्गंधी पसरली आहे. प्रशासन साफसफाईचे कामात अपयशी ठरत असल्याने नागरीकांचे आरोग्यास धोका संभविण्याची भिती नाकारता येत नाही.

आरोग्य खात्त्यातील अनेक सफाई कामगार गैरहजर राहत आहेत. पावसाळयापूर्वी नाले सफाईसाठी नेमलेल्या कामगाराकडुन योग्य प्रकारे सफाई करुन घेण्यात अधिकारी कमी पडत आहेत त्यांचे हजेरीत भ्रष्टाचार होत असल्याचे समजते. तसेच जेसीबी मशीनद्वारेही योग्य प्रकारे मोठया नाल्यांची सफाई झालेली नसल्याचे पावसाचे पाणी साचून नागरीकांचे घरात शिरुन वित्तहानी जिवित हानी होण्याचा धोका संभवत आहे. यामुळे रोगराई व साथीचे रोग यांची साथ येण्याची भिती असल्याने सदर प्रकरणाची योग्य ती चौकशी व्हावी. संबंधितावर योग्य कारवाई व्हावी.

कृपया सदर प्रकरणी महासभेत चर्चा व्हावी ही विनंती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, उपमहापौर व आयुक्त साहेब हे जे नाले सफाईचे काम चालु आहे. जे दहा-दहा कामगार याकामी नेमले आहे. ते दहाच्या दहा कामगार कधी कामावर येत नाहीत. कुठे आठ आहेत, कुठे सात आहेत. यामुळे साफसफाई बरोबर होत नाही. व अधिकारी त्यांच्याकडुन योग्य त्या प्रकारे काम करून घेत नाहीत. शहरात जागोजागी कच-याचे ढिग साचले आहेत. नाल्यातुन कचरा काढुन बाजुला त्याचा ढिग केला जातो. जेसीबी व्दारे जे नाले साफ केले आहेत ते सुध्दा बरोबर साफ केले नाहीत. पाऊस आला तर सफाईचे काम कसे केले ते उघड होईल. म्हणुन आम्हाला असे वाटते की, यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी व आयुक्त साहेब जसे की, महाराज राजेंद्रसिंह भुल्लर यांच्याकडुन जी लक्षवेधी आली आहे, जेव्हा पासुन हे दहा दहा रोजंदारीवरील सफाई कामगार नेमण्याचा प्रस्ताव मागील ४ वर्षापासुन उल्हासनगर महानगरपालिकेत आला. प्रथम आम्हाला नाला सफाई कामी

२० सफाई कामगार मिळत होते. व हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये माझ्याकडुनच आणण्यांत आला होता. नाला सफाईचे काम ठेकेदारांकडुन केले जात होते व यामध्ये भ्रष्टाचार झाला होता. तेव्हापासुन हे कामगार नेमण्याची प्रथा आम्ही स्थायी समितीमध्ये ठेवली होती. तेव्हापासुन ही प्रथा सुरू झालेली आहे. आम्हाला २०-२० सफाई कामगार एक महिन्यासाठी मिळत होते. त्यानंतर दुस-या वर्षी असे झाले की २० कर्मचारी मिळत होते त्यातील काही अनुपस्थित राहत असत. त्यामुळे तत्कालिन जे आयुक्त होते त्यांनी दहा-दहा सफाई कामगार दोन महिन्यापर्यंत याप्रकारे ..........
..

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>महापौरजी, लक्षवेधी कुणाची आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>लक्षवेधीवर आपण सुध्दा बोलु शकता.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>ज्याची लक्षवेधी आहे त्यांनी प्रथम बोलावे नंतर दुस-यांनी बोलावे. आम्ही असे थोडे म्हणत आहोत की कुणाला बोलण्याचा अधिकार नाही, कुणीही बोलु शकते ना? बोलण्यास काहीही हरकत नाही परंतु लक्षवेधीचे सुचक व अनुमोदक आहेत ते प्रथम बोलतील.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>लक्षवेधीच्या सुचकांनी आपली बाजु मांडली आहे. अनुमोदक नंतर बोलणार आहेत. म्हणुन मी बोलत आहे. तर मागील वर्षी व त्याअगोदरच्या दोन वर्षी सुध्दा दहा-दहा जे कर्मचारी आम्हास नाले सफाईकामी दिले होते ते दोन महिन्याच्या कालावधीसाठी दिले होते. व हे काम जे आहे ते मे महिन्यापासुन सुरू होत होते. यावर्षी आम्हाला जे कर्मचारी नाला सफाईकामी पुरविले आहेत ते अतिशय उशिरा पुरविले आहेत. व दहा कर्मचारी प्रत्येक महिन्यास पुरविले आहेत. आता एक महिना संपत आलेला आहे. या महिना भरात काहीच काम झालेले नाही. ज्या दहा लोकांनी नाल्यातील कचरा काढला आहे तो व्यवस्थितपणे उचलला सुध्दा नाही. सर्व नाले कच-याने भरलेले आहेत. जसे की मा. आयुक्त साहेबांना माहित आहे. काल सुध्दा माझ्या प्रभागात भारत चौक येथील सोनारा हॉल जवळ चार फुट उंचीपर्यंत पाणी साचले होते. व त्या विभागातील नागरिकांचे एक शिष्टमंडळ महापालिकेत आले होते. व आमच्या भाजपाचे सर्व नगरसेवक आयुक्त साहेबांना भेटले. ही तर चांगली गोष्ट होती की दहा-दहा कामगार कामावर होते. आम्ही तेथे आणखी २०-२५ लोकांना कामावर लावुन नाला साफ करून घेतला. ज्यामुळे साचलेले पाणी ओसरले. जर हे कर्मचारी नसते तर तेथे अतिशय त्रासाचे झाले असते. लोकांच्या घरात पाणी गेले असते. आज जो कचरा निघाला आहे. ब-याच जागी कच-याचे ढिग आहेत. ब-याचशा ठिकाणचे ते ढिग मी स्वच्छता निरीक्षकांना दाखविले आहेत. जो कचरा निघालेला आहे तो कचरा उचलणारे ठेकेदार उचलत नाहीत. कचरा कुंडयावर सुध्दा कच-याचे ढिग साठले आहेत. ज्यामुळे मच्छर व मलेरीया पसरण्याची शक्यता आहे. नाल्यांमध्ये कचरा भरल्यामुळे त्यांचा प्रवाह बंद झाला आहे. थोडा सुध्दा पाऊस पडला तरी पावसाचे पाणी साठते. म्हणुन सर्वात पहिली गोष्ट ही आहे की जे दहा-दहा कामगार नेमले आहेत त्यांना आणखी एक महिन्याची मुदत वाढ देणे अतिशय आवश्यक आहे. व दुसरे असे की या अगोदरच्या सभेत मा. आयुक्त साहेब उपस्थित नव्हते. त्यावेळी कचरा उचलणा-या गाडयांचा एक विषय येथे चर्चेस आला होता. त्यावेळी जे आयुक्तांच्या आसनावर जे आसनस्थ होते त्यांनी सांगितले होते की, १५ दिवसामध्ये कच-याच्या गाडया येतील परंतु आज एक महिना पुर्ण झाला आहे व गाडया आल्या नाहित. म्हणुन कचरा उचलण्यास अतिशय त्रासाचे होत आहे. म्हणुन मी निवेदन करतो की, सफाई विषयीची जी काही कामे आहेत. त्यांना प्राधान्य देवून ती पुर्ण केली जावीत. व जे दहा-दहा रोजंदारी सफाई कामगार नेमले आहेत त्यांना आणखी एक महिन्याची मुदत वाढ दिली जावी. व लवकरात लवकर गाडया उपलब्ध करून दिल्या जाव्यात. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>या लक्षवेधीच्या माध्यमातुन बोलु इच्छितो की, मला वाटते की, शासन व प्रशासन यांच्यामध्ये तालमेल नाही. कारण की याच्या अगोदर सुध्दा एक लक्षवेधी आली होती. श्री. सतरामदास जेसवानी यांनी ती दिली होती. त्यांची लक्षवेधी अशी होती की, खाडाबदलीवर सफाई कामगार कामावर घेतले पाहिजेत. सफाई कामगारांमध्ये अनुपस्थितीचे प्रमाण बरेचसे असते. त्यावेळेस उपायुक्त श्री. लोणारे, आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते. त्यांनी असे उत्तर दिले होते की, पुढील महासभेपर्यंत आम्ही हे खाडा बदली कामगार नेमु. परंतु दुःखाने म्हणावे लागत आहे की, लक्षवेधी दिल्यानंतरही प्रशासन त्यावर लक्ष देत नाही. वारंवार आम्हाला बोलावे लागते. खाडाबदली कामगार नेमण्यासाठी आम्हाला लक्षवेधी दयावी लागते. रोजंदारीवरील सफाई कामगारांना मुदत वाढ देण्यासाठी आम्हाला लक्षवेधी दयावी लागते. या अगोदर प्रशासन स्वतः हे काम समजत होते. दोन महिन्याची आवश्यकता असेल तर रोजंदारीवरील सफाई कामगारांची नेमणुक केली जात होती. परंतु यावेळेस प्रत्त्येक बाब महासभेपुढे आणावी लागते. आम्ही लक्षवेधी देतो. प्रशासन आम्हाला आश्वासन देते की आम्ही हे काम करू. अत्त्यंत खेदाने असे म्हणावे लागते की पुन्हा दुस-या महासभेत विचारावे लागते की त्या कामाचे काय झाले? याआधी तुम्ही जे दहा कामगार ठेवले त्यांना ना टोपली आहे ना कचरा उचलण्याचे सामान आहे. फक्त गाडी आहे. ते नालीतुन कचरा काढुन बाहेर ठेवतात. पाऊस पडतो आणि पुन्हा कचरा नाल्यात जातो. ठेकेदार कचरा उचलत नाही. त्यांना दहादा सांगुन सुध्दा ते कचरा उचलत नाही. अशा खुपशा तक्रारी आम्ही लिखित स्वरूपात दिले आहे. स्वच्छता निरीक्षकांना दिले आहेत, आयुक्तांना दिले आहेत. परंतु त्यावर काही कारवाई होत नाही. माझी आयुक्तांना विनंती राहिल की जी पण लक्षवेधी येते तुम्ही त्यावर आश्वासन देता. त्याची कमीत कमी पुर्तता तर करावी. मला असे वाटते की, जी पण लक्षवेधी आम्ही दिली त्यावर फक्त आश्वासनच दिले आहे. आम्ही बाहेर जातो तुम्ही विसरून जाता. आज ही लक्षवेधी आमच्या सहयोगींनी दिली आहे. मला आशा आहे की यावर काही तरी अंमलबजावणी होईल. कारण की पावसाळयात उल्हासनगरमध्ये पुर येवु नये. काल तुमच्या समोर सोनारा हॉलचे उदाहरण आले होते. गांधीरोड तसेच सोभराज गार्डन येथे पण भरपुर नाले भरले होते. लोक चालु शकत नव्हते एवढे पाणी भरले होते. तुम्ही दहा कामगार दिले परंतु सामान नसल्यामुळे सफाई बरोबर होऊ शकली नाही. दुसरे सहयोगी म्हणाले की कधी सात माणसे येतात, कधी आठ माणसे येतात. स्वच्छता निरीक्षक त्यावर लक्ष देत नाहीत. डीडीटी पावडर कधीही फवारली जात नाही. चुना नाही, गाडी नाही, टोपली नाही. हे तर असे झाले एक महिना फुकट गेला काही काम झाले नाही. खरोखरच काम जर करायचे असेल तर या दहा सफाई कामगारांना मुदतवाढ देवून त्यांच्याकडे नीट लक्ष दिले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. महापौरजी, ही जी आम्ही लक्षवेधी आणली आहे. श्री. भुल्लर व मी. याचे मुख्य कारण हे आहे की, देअर इज अ लॅक ऑफ सुपरविझन. जितके लक्ष दयायला पाहिजे होते तितके दिले गेले नाही. माणसे लागली पण त्यांच्यावर देखरेख बरोबर करण्यात आली नाही. मी जसे काल सांगितले की सोनारा हॉलच्या इथे लोक मोर्चा घेवून आले होते महापालिकेत. त्याचत-हेने मी दुसरी जागा तुम्हाला सांगु इच्छितो तेथील तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत. साधुबेला शाळेच्या बाजुला जो नाला आहे. तिथे पण खुप त्रास आहे. एक चांगले कार्यकर्ता शहराचे श्री. कला चंचलानी यांनी कमीत कमी तीन चार पत्रे दिली आहेत. या महापालिकेत येवून गेले आहेत. प्रभाग अधिकारी यांचे नाव घेवून सांगतो, श्री. लाल पिंजानी यांनी सांगितले की मी कचरा उचलायला सांगतो परंतु आजतागायत काम झाले नाही. आज मी घरी गेलो. मी पण तशी तक्रार दिली होती. आज मला पत्र आले. ३ जुनला मी पत्र दिले होते. काम बरोबर होत नाही. आज मी घरी दुपारी गेला तर मला पत्र मिळाले कालच्या तारखेचे की आम्ही आदेश दिला आहे काम करा. म्हणजे १३ दिवसापर्यंत काम झाले नाही. त्याशिवाय सपना टॉकीजचे जे गार्डन आहे. दोन तीन दिवसापुर्वी पाऊस आला होता. सपना टॉकीजचे गार्डन आहे सपना एंन्ड

*तिथे पण पाण्याचा प्रवाह साठला होता. सेवासदन कॉलेज येथील चौकात सुध्दा भरपुर पाणी साचले होते. फक्त परवाच पाऊस पडला तेव्हा स्वतः मी पाहिले होते. अशा खुपशा अजुन जागा असु शकतात. आमचे म्हणणे आहे की, यावेळी आम्ही पाहिले आहे की, सुपरविझन बरोबर नाही आहे. जसे श्री. बच्चाराम म्हणाले की त्यांना साधनसामुग्री दिली नाही आहे. देखरेख नसल्यामुळे काम बरोबर होत नाही. त्यावर सर्वात जास्त लक्ष दिले पाहिजे. आणि जी सर्वांची मागणी आहे काही काळासाठी सफाई कामगारांची मुदत वाढवा. मुदत वाढ झाली पाहिजे. सुपरविझन व पुर्ण साहित्त्यासहित. नाहीतर जनतेचा पैसा फुकट जाईल याकडे पुर्ण लक्ष दिले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:-</u>मा. महापौरजी, मा.आयुक्त साहेब सफाईच्या मुददयावर स्थायी समितीमध्ये आमचे सहयोगी श्री. किशोर वनवारी आणि आम्ही सर्वांनी दहा लोकांना एक महिन्याची मुदत वाढवुन दया अशी विनंती आयुक्त साहेबांना त्याठिकाणी केलेली आहे. मुददा असा आहे की सफाई एक महिन्यामध्ये बरीचशी झाली असती परंतु आपले अधिकारी वर्ग जो आहे. त्यांच्यामध्ये जी कमी आहे त्याबददल आयुक्तांनी लक्ष घातले पाहिजे अशी मी त्यांना विनंती करतो. मागच्या महासभेमध्ये मी एक प्रश्न विचारला होता की, शहरामध्ये वार्षिक औषधासाठी आपण किती खर्च करतो? तर ७० लाखाचा आकडा मला श्री. खरात साहेबांनी या सभेमध्ये सांगितलेला आहे. परंतु त्यावर मला बोलु दिले नाही की त्या ७० लाखाचे औषध तुम्ही आणता का? कसे वापरता? कुठे वापरता? याची थोडी प्रात्यक्षिक आम्हाला सांगितलीत, दाखवलीत तर बरे होईल. सकाळी मी त्यांच्या कार्यालयात जावुन त्यांना विचारले माझ्या प्रभागामध्ये जे हजेरी शेड आहेत. ज्याठिकाणाहुन सकाळी आमचे वर्कर ती औषधे घेवुन शौचालये, नाल्या, गल्ल्या यामध्ये ते शिंपडतात. तर तो स्टॉक निदान एक लिटर,दोन लिटर, अर्धा लिटर, पाव लिटर, १०० ग्रॅम कमीत कमी मला दाखवा तरी. आपल्या अधिका-याची ही हिंमत झाली नाही की मला प्रत्यक्षात नेवुन तो किती स्टॉक तुमचा रोजच्या रोज वापरला जातो. कोण वापरतो? कुठे वापरतो? हे दाखवायची सकाळी त्यांची काही तयारी दिसली नाही. तर कृपया मी आपल्या निर्दशनास आणुन देतो की झोपडपटटीचा जो विभाग आहे. तर त्या विभागात साफसफाई करण्याकरिता जे दहा लेबर आहेत तर ते इतके कंटाळतात व त्रासतात की त्यांच्यातुन हजेरी जर बघितली तर सहा ते सात अशी हजेरी रोजच्या रोज दिसते. अगोदर एक मुददा आला होता की याठिकाणी दहा लोकांमध्ये बोगस हजे-या लावणे. व त्यांचा पगार कापणे. दहा लोक हजर आहेत असे दाखवणे असा भ्रष्टाचार आहे ते खरे आहे. दुसरा मुददा असा आहे की छोटया छोटया गल्लीमधुन कचरा बाहेर काढण्याकरिता, हलविण्यासाठी काही साधन नाही. कुठल्याही प्रकारच्या गाडयांची व्यवस्था नाही, घमेल्याची व्यवस्था नाही, किंवा टोपल्यांची व्यवस्था नाही. इतका पैसा आपण महापालिकेमध्ये आपण आरोग्य विभागावर खर्च करतो. वास्तविक पाहिले तर आपल्याकडे काय काय साधने आहेत. कर्मचारी काम कसे करतात? कसे करत नाहीत. प्रत्यक्षात माझ्या प्रभागात प्लास्टीकची झोळी करून कचरा बाहेर काढला जातो ते पाहिल्यावर आम्हाला दुःख वाटते की किती दरिद्री महापालिका आहे, किती दरिद्री अवस्था आहे ती आमचीच असु शकेल. तर कृपया मी अशी विनंती करतो की, कर्मचारी बरोबर काम करत नाही हा एक मुददा. माझ्या प्रभागातुन मुकादमाची बदली केली ९ महिने झाले. त्याठिकाणी मुकादम देण्याची आवश्यकता नाही असे अधिका-यांचे म्हणणे आहे कारण तो झोपडपटटीचा विभाग आहे. तो स्वच्छ राहणार. त्याठिकाणी रोगराईचा जन्म होणार नाही अशी त्यांना खात्री आहे. तिसरा मुददा हा आहे की त्याठिकाणी मुकादम दया म्हंटले तर अधिकारी दयायला तयार नाहीत. आवश्यकता नाही ही भाषा मी त्यांची प्रत्येक वेळा ऐकली आहे. तिसरी गोष्ट ही आहे की त्याठिकाणी जो कर्मचारी वर्ग काम करतो. त्या कर्मचारी वर्गावर सुपरविझन व नियंत्रण आपल्या अधिका-यांचे नसते. दुसरी गोष्ट अशी आहे की, सार्वजनिक शौचायल हे झोपडपटटयांमध्येच वापरल्या जातात आणि त्या सार्वजनिक*

शौचालयात औषध जर चार-चार, सहा-सहा महिने वापरले गेले नाही. त्याठिकाणी रोगराईचा जन्म नक्कीच होतो. मागच्या वेळेला आमच्या आनंदनगर मधुन सुरूवात झाली होती. आता मी आयुक्तांच्या लक्षात आणुन देतो. आमच्याकडुन सुरूवात होईल. रमाबाई टेकडी, आझाद नगर किंवा शास्त्री नगर या भागातुन सुरूवात होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौरजी, उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे काही दिवसापुर्वी मोठे नाले साफ करण्यासाठी मशिनरी घेण्यात आली होती. ती मशिनरी १४ तारखेपासुन पुर्णतः बंद आहे याचा अर्थ असा की महापालिकेतर्फे जी मशिनरी घेण्यात आली होती. नाले साफ करण्यासाठी ते नाले पुर्णतः साफ झालेले आहेत असे समजायचे की ती मशिनरी पुन्हा या महापालिकेत काम करण्यासाठी मागविली जाणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आता जो नाला सफाईचा मुददा चालु आहे. त्यावर मी या गोष्टीचा खुलासा करू इच्छितो की, या मुददयावर काल स्थायी समितीत देखिल चर्चा झाली होती व जेव्हा हा मुददा स्थायी समितीमध्ये मंजुर होण्यासाठी आला होता. प्रशासनातर्फे एक महिन्यासाठी होता. परंतु स्थायी समितीने दोन महिन्यासाठी ठराव केला की सफाई कामगार दोन महिने असले पाहिजे. आता ज्या सदस्यांनी म्हंटले की, कुणाकडे सात तर कुणाकडे आठ सफाई कामगार येतात. ही गोष्ट खरी आहे. कारण माझ्या प्रभागात ३० कामगार असुन कधी २० येतात, कधी २१ येतात व त्यांची हजेरी जेवढे येतात तेवढयांचीच भरली जाते. यासाठी आयुक्तांना मान दिला पाहिजे की जितके सफाई कामगार काम करतात तेवढीच हजेरी भरली जाते. प्रत्येक प्रभागात दहा असले आणि जर सात आहे तर प्रशासन काय करणार? कुणाकडे कोणी आजारी असते, कुणाकडे काही समस्या असते. सफाई कामगार जर कुणाकडे दहा येतात, कुणाकडे आठ येतात. जर कमी येतात तर हजेरी कमी भरली जाते व मला असे वाटते की, आपण आपल्या प्रभागात उभे राहुन काम करून घेतल्यामुळे चांगला परिणाम दिसत आहे. त्याचे जिवंत उदाहरण श्री. विनोद तलरेजा यांचे आहे. सकाळपासुन ते संध्याकाळपर्यंत स्वतः उभे राहुन प्रभागात सफाई करून घेतात. म्हणुन त्यांचा प्रभाग आदर्श प्रभाग म्हणुन घोषित करण्यात आला आहे. स्वच्छता निरीक्षकांकडुन काम करून घेणे ही आपली जबाबदारी आहे ती सर्व सदस्यांनी पार पाडली पाहिजे. व उभे राहुन काम घेतले पाहिजे. त्याचबरोबर स्थायी समितीचा जो ठराव आहे माझ्यामते पुर्ण सभागृहाचे असे मत आहे की, एक महिन्यासाठी सफाई कामगार वाढविले पाहिजेत. महत्त्वाचा मुददा हाच आहे. त्याच्याशी मी पण सहमत आहे. स्थायी समितीमध्ये आधीच दोन महिन्यासाठी ठराव पास झाला आहे. जितके सफाई कामगार कामावर येतात. हजेरी तेवढीच भरली जाते. नाही आले तर त्यांची गैरहजेरी लावली जाते. ते बरोबर आहे. सात कामगार आले तर सातच लिहिले जाते. आयुक्त साहेबांच्या देखरेखीखाली प्रशासनाने अजुन एक कल्पना सुचविली आहे की रविवारी त्यांना सुट्टी दिली जाते. जसे आपण २० तारखेला त्यांना कामावर घेतले. ४ रविवार सुट्टी असल्याने २४ तारखेपर्यंत महिना चालेल तर ४ दिवस हे पण वाढवुन मिळाले आहेत. आठवडयातुन एकदा सुट्टी दिली जाते. स्थायी समितीमध्ये अजुन एक अट आम्ही मान्य केली आहे. प्रभागात ज्या तारखेपासुन सफाई कामगार लागले आहेत त्यादिवसापासुन सात दिवसापर्यंत असेल. ती पण गोष्ट चांगली आहे. आता जो एक महिन्याचा मुददा आहे. मुदतवाढ दिल्यानंतर सर्वजण प्रशासन असो, नगरसेवक असो, स्वच्छता निरीक्षक असो, मुकादम असो सर्व मिळुन या महिन्यात काम चांगल्यात-हेने करतील जेणेकरून शहरात कुठेही पुर येणार नाही. या प्रस्तावास स्थायी समितीने आधीच दोन महिन्यासाठी मंजुरी दिली आहे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>सन्माननिय महापौर, मा. आयुक्त साहेब मा. सभागृह नेते यांनी सागितले की, श्री.विनोद तलरेजा यांचा प्रभाग आदर्श प्रभाग म्हणुन गणला जाईल तर त्यांना आदर्श प्रभाग म्हणुन पारीतोषिक मिळेल. चांगली

गोष्ट आहे. आदर्श प्रभाग होण्याच्या मागचे श्रेय श्री. विनोद तलरेजा यांना श्रेय नाही असे याठिकाणी मी सांगु इच्छितो. त्याचे कारणही मी सांगणार आहे. प्रत्येक प्रभागामध्ये मागील महासभेत मी एकदा तक्रार केली होती की, माझ्या प्रभागामध्ये तीन मुकादम आणि दोन सफाई कामगार असतात. म्हणजे सफाई कामगार दोन त्याच्या पाठीमागे मुकादम ३ परंतु सत्ताधारींच्या प्रभागामध्ये आपण जावुन बघा माझा आरोप सिध्द होईल. आताही तुम्ही चौकशी करा. २५-३० सफाई कामगार यांच्या प्रभागात दिलेले आहेत. माझ्या शहाड गावठाण व तानाजी नगर या परिसरात तीन किंवा चारच्या पुढे कधीही सफाई कामगार दिलेले नाहीत. मात्र मुकादम तीन दिले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>माझी हरकत आहे प्रत्येक प्रभागात प्रशासनातर्फे ... ........

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मला आधी बोलु दया नंतर तुम्ही बोला.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>तुम्ही बोला पण सरळ बोला चुकीचे बोलु नका.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>तुम्ही मध्ये बोलु नका. नाहीतर कच-याचे मागच्यावर्षीचे प्रकरण उकरून काढावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आम्हाला जे सफाई कामगार मिळाले आहेत ते प्रशासनातर्फे मिळाले आहेत. तुम्ही कसे आरोप लावता सत्ताधारी पक्षाकडे जास्त कामगार आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>याचे उत्तर तुम्ही नंतर घेवू शकता. मा. महापौर मी तुमच्याकडुन परवानगी घेतली आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>दिलीप भाई सर्वजण बोलले आहेत अंतिम काय ते बोलुन निर्णय घ्या.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>आमच्याशी सावत्र व्यवहार केला जातो. म्हणुन आमचे जे प्रभाग आहेत ते प्रभाग आदर्श म्हणुन गणले जात नाहीत. तेथे सफाई कामगार जे आहेत. त्यांची संख्या कमी व मुकादमांची जास्त आहे. आता तुम्ही एस. आय. ना बोलवा.................

<u>मा. सदस्य श्री.नारायण पंजाबीः-</u>तुम्ही असे कसे बोलता........

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौर, हे विना परवानगी कसे बोलतात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तुम्ही मध्ये बोलु नका ना?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>हे आमच्यावर आरोप लावत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मी परवानगी घेवुन बोलत आहे. माझ्या प्रभागाची समस्या सांगण्याचा मला अधिकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मी आपल्या महापौरांशी बोलत आहे तुमच्याशी नाही. तुम्ही असे कसे ऐकता?

मा. महापौरः-आधी श्री. दिलीप गायकवाड यांनी परवानगी घेतली आहे त्यांना बोलु दयावे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-काही दिवसापुर्वी माझ्या प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. अधिकारींना धन्यवाद देवू इच्छितो. इथे सन्माननिय श्री. उमाप यांनी जे आरोप केले त्यांच्याशी मी सहमत आहे. मुकादम व स्वच्छता निरिक्षक यांच्यापैकी कुणाचेही सफाई कामगारांवर नियंत्रण नाही. जी दहा लोक लावली त्यापैकी सहा ते सात जण हजर असतात बाकीचे गैरहजर असतात. सकाळी आम्ही प्रभागात जर विचारायला गेलो. तर मुकादम सांगतील की, धोबीघाटला गेला, कुणी सांगेल शिवनेरी नगरला गेला. वेगवेगळया भागाचे नाव सांगुन इकडे नगरसेवकांची दिशाभुल करतात. कायम स्वरूपी जे सफाई कामगार आहे. ते आठ किंवा दहाच्या संख्येने कधीही या दोन वर्षात मला मिळाले नाही अशी मी आधी पण तक्रार दिली आहे. तर असे जर आहे. आमच्या प्रभागात सफाई कामगार कमी व मुकादम जास्त राहिले तर आमचा आदर्श प्रभाग ७ वर्षात कधीही होणार नाही. माझ्या बाजुचा प्रभाग ४ नंबर आहे त्यात किती कामगार संख्या आहे ते सांगा आणि माझ्या प्रभागात किती कामगार संख्या आहे ते इथे सांगा. असे होवुन देखिल माझ्या प्रभागात साफसफाई असणार नाही. घाणीचे साम्राज्य किती आहे ते बघा. सफाईसाठी जे दहा कामगार दिले त्यांनी कचरा काढुन ठेवला आहे. कचरा उचलण्यासाठी काही साहित्य नाही, टोपली नाही, बादली नाही हे पण मी येथे सांगु इच्छितो. जर सर्वांचे प्रभाग आदर्श करायचे असतील. तर सर्वांच्या प्रभागात सफाई कामगारांचे वितरण बरोबर झाले पाहिजे. जसे इथे बहुसंख्येने पाणी मिळते परंतु त्याचे वितरण बरोबर नाही. अशात-हेने सफाई कामगारांचे वितरण बरोबर नाही. सफाई कामगार भरपुर आहेत. वितरण बरोबर नाही. दुजाभाव केला जातो. सफाई कामगारांचे वितरण बरोबर आहे का याचा खुलासा मला इथे दया. धन्यवाद.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य जो आरोप इथे आमच्यावर लावतात. आमचेच प्रभाग फक्त आदर्श होतात. कारण की आम्ही आमच्या प्रभागात लक्ष देतो. आपल्या महापालिकेत खुपसे सदस्य असे आहेत की जे प्रभागात लक्ष न देता. दुस-या प्रभागातील अनाधिकृत बांधकामावर फक्त लक्ष देतात. आम्ही काय करणार? आम्ही तर आमचा प्रभाग बघतो.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-याचा अर्थ तुम्ही अनाधिकृत बांधकाम करत आहात. म्हणुन तुम्हाला असे म्हणायचे आहे. आजचे वर्तमानपत्र वाचा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-पेपर वाचा आजचा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-विषय कुठला चालला आहे. आणि तुम्ही आरोप काय लावत आहात. इथे विषय साफसफाई बाबत आहे तुम्ही आरोप काय लावत आहात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-चला लक्षवेधी संपली.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, मी हे सांगु इच्छितो....

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-आमचा प्रभाग पॅनल मध्ये एक नंबर आहे. आमच्या प्रभागाला यावर्षी पारितोषिक दिले आहे.

मा. महापौरः-आयुक्त साहेब उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी,...................

मा. महापौरः-तुम्ही बसा आयुक्त साहेब उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-कमाल आहे. तुम्ही आम्हाला दोन मिनिटे बोलु देत नाही. पंधरा-पंधरा लोक ते बोलत आहेत. आम्हा चार जणांना तुम्ही बोलु देत नाही.

मा. महापौरः-आता चर्चा झाली आहे. साहेब उत्तर देत आहेत ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मी दोन मिनिटे बोललो तर काय अडचण आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-आम्हाला बोलतात स्वतःच्या बगलेत डोकावायला सांगा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-महापौरजी, दोन मिनिटे मला बोलु दया .

मा. महापौरः-नाही. सर्वजण आपापल्या जागी बसा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, या लक्षवेधीव्दारे या शहरातील घनकच-याबाबत जे काही मुददे उपस्थित केले गेले. मी हे मान्य करतो की आपल्याकडे साधने कमी आहेत. हातगाडी जी मिळायला पाहिजे होती २२५. ती खरेदी करण्याचा मी आदेश दिला होता. परंतु ती वेळेवर न मिळाल्याने थोडी असुविधा झाली. परंतु आज आमच्याकडे माहिती आहे की, ज्याकाही ४५ नविन व्हीलबॅरोज आहेत. आज आम्हाला मिळाली आहेत. २२५ची ऑर्डर आहे बाकी लवकरच मिळतील. जे दहा कर्मचारी काम करत आहेत त्यासाठी एक महिना अगोदर आधी आम्ही आदेश दिले होते परंतु सदनाचे मला मत दिसत आहे. मला असे वाटत आहे की एक महिना अजुन दिले पाहिजे. ते आम्ही मान्य करतो. इतर गोष्टी ज्या इथे सांगितल्या गेल्या. जंतुनाशक फवारणी ज्यासाठी कालच मी स्वच्छता निरिक्षकांची बैठक बोलावली होती. त्यांना स्पष्टपणे आदेश दिले आहेत की, ज्या विभागात फवारणी होते. तेथील नागरिकांची स्वाक्षरी तसेच नगरसेवकांची सही तुम्ही सांगितले की, बरोबर होत नाही. तर दोघांच्या सहया घेण्यासाठी त्यांना डाय-या दिल्या आहेत. तिथे जे शौचालय आहेत त्यात देखिल जंतुनाशक फवारणीसाठी लिखित स्वरूपात आदेश स्वच्छता निरिक्षकांना दिले आहेत. इथे सांगितले की सफाई कामगारांचे असमान वाटप झाले आहे त्याकडे पण आम्ही लक्ष देवू व सर्व प्रभाग समान लोकसंख्येची घनता लक्षात घेवून किंवा रस्त्याची व गटारीची लांबी व रूंदी बघुन सर्व लक्षात घेवून तिथे सफाई कामगारांच्या संख्येचे वितरण करू. एक तर मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, मागील वर्षी नाला सफाई योग्य पध्दतीने झाल्यामुळे कुठेही पुर आला नव्हता. मी सदनाला आश्वस्थ करू इच्छितो की, यावर्षी पण त्याच त-हेने नाले सफाई आम्ही केली आहे. मोठया नाल्यांची सफाई प्रोक्लेन मशीन लावून केली आहे. पुर येईल असे मला वाटत नाही. छोटया नाल्यांची सफाई १०-१० कामगार करत आहे. अजून एक महिना ते सफाई करतील. म्हणून मला वाटते की, पुर येणे शक्य नाही. तसा माझा विश्वास आहे. या व्यतिरिक्त तुम्हांला जर काही विशेष एरिया सुचवायचे असतील जिथे तुम्हांला वाटते की, सफाई बरोबर झाली नाही, तिथे तुम्ही जर सांगितले, आमच्या कर्मचा-यांना सांगितले ते पण विशेष लक्ष देवून तेथे सफाई करुन घेतली जाईल. इतके मी सदनाला आश्वासन देवू इच्छितो. खाडा-बदली बाबत मी माहिती देवू इच्छितो की, युनियन बरोबर आज पण या विषयाबाबत चर्चा झाली. त्यांना रोजंदारीवर घ्यायचे आहे की खाडा-बदलीने

घ्यायचे आहे, त्यासाठी आम्ही वारंवार युनियनशी चर्चा केली आहे. पुढची बैठक आम्ही २२ तारखेला बोलावली आहे, या आधीपण बोलावले होते पण युनियनचे लोक आले नाही. एक युनियन आली, त्यांनी वेगळी मागणी केली. प्रोक्लेनच्या कामासाठी ९०० तासाचे प्राकलन केले होते, आता पर्यंत ५६८ तासांचे काम झाले आहे. कुठे जर प्रोक्लेनची गरज असेल तेथे पाठविले जावू शकते. खाडा बदली बाबत युनियनशी जो पर्यंत सहमत होत नाही तोपर्यंत काही करु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> ३ जागा मी सांगितल्या होत्त्या, जेथे वॉटर लॉगिंग होत आहे, ते तुम्ही नमूद करा. साधुबेला शाळा, सेवासदन कॉलेजचा एरिया, सपना टॉकिज जवळ.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के.सोनवणे):-</u> मी ते नमुद केले आहे. साधुबेला हायस्कूल जवळ मी ते नमुद केले आहे. सपना गार्डनचे सोनारा गल्ली येथे जे सांगितले होते, तेथे मी त्वरीत माणसे पाठविली होती. तुम्ही सांगत आहात की, तेथे काम झाले नाही, मी प्रभाग अधिकारीकडुन स्पष्टीकरण मागेल की, तेथे काम का झाले नाही?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>आयुक्त साहेब, तुम्ही एक महिना वाढवून देतात, सफाई कामगार, अधिका-यांनी सांगा त्यांच्याकडुन काम नीट करुन घ्यायला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०५/२००४ व विशेष महासभा दिनांक १९/०५/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> सचिव साहेब, पान नं. ६ व पान नं. ७.....

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विशेष की सर्वसाधारण?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> विशेष.......

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> पान नंबर?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> ६ व ७. त्यावर तुम्ही स्वतःच कात्री लावली आहे. ते गाळले गेले पाहिजे. खाली पण महापौर बोलले आहेत. ६ व ७ नंबरवर पण बोलले आहे की, जमनु पुरस्वानीजी आपणांस असे बोलण्याचे अधिकार नाही हे.. ..

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कुठे आहे ते?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> ६ व ७ वर.......

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ठिक आहे. पास?

<u>काही सदस्य :-</u> पास-पास............

<u>मा. महापौर :-</u> सदरचे इतिवृत्त वरील सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. २ :-</u>मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०७/२००४ व विशेष महासभा दिनांक १९/०७/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ३ :-</u>सन २००४-०५ या वर्षाकरिता जकात वसुली महापालिका कर्मचा-यां मार्फत करण्याकरिता दिनांक २९/७/२००४ चा स्थायी समिती ठराव क्र. ३८ कायम करणे.

<u>काही सत्ताधारी सदस्य :-</u>पास-पास............

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> पास तर करायचा आहे, चर्चा होऊ दया आधी. आम्ही पण खाजगीकरणाच्या विरोधात आहोत, पण चर्चा तर झाली पाहिजे?

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :-</u> आम्ही पास केले आहे.

<u>काही सत्ताधारी सदस्य :-</u>पास-पास............

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मा. महापौरजी, आम्ही या विषयाच्या विरोधात नाही पण आम्हांला चर्चा करायची आहे. सत्ताधारी आमच्या चर्चेला घाबरत आहे का?

<u>काही सत्ताधारी सदस्य :-</u>पास-पास............

काही सत्ताधारी सदस्य पास-पास, पास म्हणून ओरडत होते.

<u>मा. महापौर :-</u> सर्वांनी शांत बसा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :-</u> चर्चा करायला तुम्ही का घाबरता?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> हेच समजत नाही की, हे चर्चा करायला का घाबरत आहेत?

<u>मा. महापौर :-</u> चर्चा करा ना, चर्चा.

<u>काही सत्ताधारी सदस्य :-</u>पास-पास............

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> अरे, घाबरता का? पास तर करायचा आहे, चर्चा होऊ दया ना?

<u>काही सत्ताधारी सदस्य :-</u>पास-पास............

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> आम्ही घाबरत नाही, भाजपा, शिवसेनेने जी प्रथा चालु केली होती ती बंद करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> मागच्या वेळी मग काय झाले होते? ४ सेकंदात ठराव पास केला होता.

काही सत्ताधारी सदस्य :-पास-पास...........

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय म्हणत होते, ते समजून येत नव्हते.

मा. महापौर :- सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-खुप चांगला प्रस्ताव आहे, शहरात खुशीचे वातावरण निर्माण झाले आहे.

काही सत्ताधारी सदस्य :-बाकडे वाजवत, पास करा, पास करा म्हणून ओरडत होते.

मा. महापौर :- इतका गोंधळ करु नका, आपापल्या जागी बसून बोला.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :-विरोध नका करु, पास करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- विरोध कोण करत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- चर्चा करायला का घाबरत आहात? लोकसभेच्या निवडणूक झाल्यावर जकात खाजगीकरण न करण्याचा प्रस्ताव तुम्ही का आणला?

इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- आम्ही जेव्हा चार सेकंदात प्रस्ताव पास केला होता तेव्हा तुम्ही कुठे गेला होता?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :- पास करा, विरोध नका करु.

इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :- मा. महापौरजी व माझे सहयोगी........

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- शहराच्या हिताची गोष्ट करा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :- व्यापा-याच्या हितासाठी झाले आहे.

मा. महापौर :- सगळेजण बसा मला बोलू दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-विरोध नका करु.

काही विपक्ष सदस्य :- कोण करत आहे विरोध?

इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-लोकसभेचा निकाल लागल्यानंतर निर्णय घेतला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- माईक बंद करु नका.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-शहराच्या हितासाठी, व्यापा-याच्या हितासाठी विरोध करु नका.

काही सत्ताधारी सदस्य :- पास करा, पास करा, पास करा............

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-शहराच्या हितासाठी, व्यापा-याच्या हितासाठी विरोध करु नका. कृपया सहयोग करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- चर्चेला घाबरतात?

काही सत्ताधारी सदस्य :-विरोध नका करु, पास करा............

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- विरोध नका करु, माईक नका बंद करु .

मा. महापौर :- माखिजा साहेब बोलू इच्छितात. त्यांना बोलण्याची संधी दया.

मा. सदस्या श्रीमती किरण माने :- घाबरले, घाबरले, चर्चेला घाबरले, निवडणूका आल्या आहेत म्हणून घाबरले.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-मा. महापौरजी, हे लाईव्ह कॅमेरावाले फक्त तिकडेच कॅमेरा नेत आहे. पूर्ण शहर पाहत आहे.

इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- शहर के ध्यान में सत्तापक्ष नजर में ।

मा. महापौर :- सगळेजण खाली बसा, माखिजा साहेबांना बोलू दया.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-विरोध करु नका. कृपया सहयोग करा.

इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत होते.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :-पूर्ण शहर खूष झाले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- नौटंकी बंद करा. शहरातील लोकांना सर्व माहित आहे.

इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- शहरातील व्यापा-यांना माहित आहे.

इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत असल्याने कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.

<u>*मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-*</u> *आर.पी.आय. कॉंग्रेस, एनसीपी, युतीचा विजय असो.*

<u>*मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*</u> *घाबरले, घाबरले........... विधानसभेचे इलेक्शन आले म्हणून नाटक करतात आहे.*

*इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत असल्याने कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.*

<u>*मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*</u> *घाबरले, घाबरले........... विधानसभेचे इलेक्शन आले म्हणून नाटक करतात आहे.*

<u>*मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-*</u> *मेहरबानी करुन प्रस्तावाला विरोध करु नका*

*इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत असल्याने कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.*

<u>*मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*</u> *घाबरले, घाबरले........... चर्चेला घाबरले.*

*इकडे सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा म्हणून ओरडत असल्याने कोण काय बोलत होते, ते समजत नव्हते.*

<u>*मा. सदस्या श्रीमती किरण माने :-*</u> *घाबरले, घाबरले........... विधानसभेचे इलेक्शन आले म्हणून नाटक करतात आहे.*

<u>*मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-*</u> *मेहरबानी करुन विरोध करु नका. व्यापा-यांच्या हितासाठी प्रस्ताव करा.*

<u>*मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-*</u>*आम्हांला चर्चा करायची आहे.*

<u>*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-*</u> *महापौरजी, वोटिंग घ्या.*

<u>*मा. महापौर :-*</u> *चर्चा तर होवू दया.*

*इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.*

<u>*मा.सदस्य श्री. शांताराम निकमः-*</u>*जनतेचा विचार करा, जकात खाजगीकरण करू नका.*

<u>*मा. महापौरः-*</u>*आयुक्त साहेब या विषयावर बोलत आहेत.*

<u>*मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-*</u>*या प्रस्तावाचे आम्ही समर्थन करतो परंतु चर्चा होवू दे.*

*इकडे काही सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा असे ओरडत होते.*

<u>*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-*</u>*मा. महापौरजी, मुव्ही बाहेर काढायला सांगा.*

<u>*मा. महापौरः-*</u>*आयुक्त साहेब या विषयावर बोलणार आहे.*

इकडे काही सत्ताधारी सदस्य पास करा, पास करा असे ओरडत होते.

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने:-</u> आयुक्त साहेबांना चर्चा करू दया ना.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>पास करा. पास करा. जनतेच्या हिताचा विचार करा. जकात ठेक्यावर देवु नका.

<u>मा. महापौर:-</u>सर्वजण आधी खाली बसा, आयुक्त साहेबांना बोलु दया.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सदनासमोर जो प्रस्ताव आहे........

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मेहरबानी करून विरोध करू नका.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>पास करा. चर्चा नको. आम्ही पास केले, पास करा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>या विषयावर प्रशासनाचे काय मत आहे हे जाणुन घेतले पाहिजे....

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>एक मिनिट आयुक्त साहेब........

<u>काही सत्ताधारी सदस्य:-</u>पास करा, पास करा..........

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>शहरातील व्यापा-यांच्या अडचणी हटविण्यासाठी हा प्रस्ताव पास करणे जरूरीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्हा विरोधी पक्षाचे पण समर्थन आहे. प्रस्तावात एक त्रुटी आहे.

<u>मा. महापौर:-</u>सर्वजण खाली बसा. आयुक्तांना बोलु दया.

<u>काही सत्ताधारी सदस्य:-</u>विरोध नका करू. पास करा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>कोण विरोध करत आहे?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही विरोध नाही करत पण पास तर करू दया.

<u>काही सत्ताधारी सदस्य:-</u>वोटींग घ्या.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>आम्ही शहराच्या भल्यासाठी करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>निवडणुकीसाठी नाटक चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>दादागिरी करू नका, ऑक्ट्रायचा ठेका रदद करा.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>आमचे बहुमत आहे आम्ही पास केले आहे.

इकडे सत्ताधारी व विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>आपसात भांडु नका. शहर हितासाठी ऑक्ट्रायचा ठेका रदद करा.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेबांना बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>शहराचा आम्हाला पुळका आलेला आहे.....

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>माझी सदनाला विनंती आहे प्रशासनाचे म्हणणे शांतपणे ऐकुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>प्रशासन सक्षम आहे ऑक्ट्राय वसुल करण्यास.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>तुमचे मत असु दे............

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>साहेब, आम्ही तुमची काय प्रशंसा करायची? तुम्ही इतके सक्षम आहात. तुम्ही खुप चांगली वसुली कराल उल्हासनगरची.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मला जे बोलायचे ते बोलु दया मग तुम्ही प्रमाणपत्र दया...........

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आम्हाला एक सेकंद बोलु दया साहेब?

इकडे सत्ताधारी सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मेहरबानी करून आयुक्त साहेबांना बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>आम्ही पास केले तुम्ही का बोलायला उठता शांतपणे बसा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आमचे समर्थन आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>कोण विरोध करत आहे?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>शहराच्या हितासाठी आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, तुमच्या माहितीसाठी सहा गोष्टी समोर मांडणे जरूरी आहे. मागील पाच सहा वर्षापासुन जकातीचे खाजगीकरण झाले. पुर्ण राज्यात हा एक यशस्वी प्रयोग ठरला आहे. आणि नेहमी उल्हासनगर महानगरपालिकेचे उदाहरण म्हणुन नाव दिले जाते. जकातीचे खाजगीकरण केल्यानंतर सहा सात वर्ष यशस्वीरित्त्या जकातीचे खाजगीकरण करणारी राज्यातील एकमेव महापालिका आहे. अमरावती येथे या प्रयोगाची सुरूवात झाली. तिथे ते चालले नाही. कल्याण-डोंबिवली महापालिकेत हा प्रयोग केला असता एकच वर्ष यश मिळाले. जेव्हा जकातीचे उत्त्पन्न १९९६-९७साली १६-१७ कोटी होते. खाजगीकरण झाल्यानंतर ते उत्त्पन्न वाढले व आज आपल्याला वर्षाला ५६ कोटी जकातीमार्फत उत्त्पन्न मिळते. ५६ कोटी जे निश्चित स्वरूपात मिळाले, मिळणार

*आहेत. पुढच्यावर्षी कदाचित जास्त उत्पन्न मिळेल. त्या निश्चितते मधुन अनिश्चिततेकडे आपण जात आहोत. होऊ शकते महापालिका कर्मचा-यामार्फत जकातीची वसुली केल्यानंतर यापेक्षा कमी उत्पन्न होईल किंवा जास्त होईल हे आजच्या तारखेत निश्चित स्वरूपात सांगता येत नाही. परंतु ७६ कोटी यावर्षी मिळाले त्यामुळे शहरात विकास कार्य साध्य होवू शकते. मागील काही वर्षापासुन जितके उत्पन्न जकात खाजगीकरणामुळे महापालिकेला मिळाले त्यामुळे काही विकास कार्य महापालिकेने हाती घेतली व ते पुर्ण देखिल केले. जर यावर्षी खाजगीकरणाचा निर्णय नाही झाला. तुम्ही अर्थसंकल्प मंजुर करताना जकात खाजगीकरण मान्य केले होते. येणा-या वर्षात जर आपण खाजगीकरण केले नाही. तर येणा-या उत्पन्नात जकातीकडुन जे उत्पन्न अपेक्षित केले त्यापेक्षा कमी उत्पन्न जर झाले तर त्यास जबाबदार कोण? त्याचे उत्तरदायित्त्व सभागृहाला घ्यावे लागेल. जर उत्पन्न कमी झाले तर. खाजगीकरण न करता महापालिका कर्मचा-यांकडुन वसुली केली तर. कारण की जर उत्पन्न कमी झाले तर सरळ प्रभाव अर्थसंकल्पावर पडतो. जो अर्थसंकल्प आम्ही या वर्षासाठी मंजुर केला आहे. त्यावरही त्याचा प्रभाव पडेल. व उत्पन्न जर कमी झाले तर लेखा हरकत सुध्दा येवू शकते. अकाऊंट जनरलची जी हरकत असते. त्यामध्ये जे ऑडीट होते त्यात पण हरकत घेतली जाईल. जर खाजगीकरणाचा प्रयत्न केला गेला व त्यामध्ये जर आपल्याला अपेक्षित उत्पन्नापेक्षा जर जास्त उत्पन्न मिळाले. एकदा निविदा प्रकाशित करून काय प्रतिसाद मिळतो. त्यानंतरच आपण निर्णय घेतला तर मला वाटते योग्य ठरेल. जकात निविदा प्रकाशित करण्यापुर्वी ते न करणे मागच्या वेळेस पण असेच झाले. प्राकलनिय रक्कमेपेक्षा रक्कम कमी आली तरी पण तुम्ही ते स्विकारले होते. जी काही प्राकलनिय किंमत आहे. त्यापेक्षा जर जास्त आहे तर आपल्याला जकातीचे खाजगीकरण केले पाहिजे. प्राकलनिय रक्कमेपेक्षा जर कमी आहे तर सदनाला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्याआधीच हा निर्णय घेवून. महापालिकेचा फायदा होईल की नुकसान होईल ते आता निश्चित करणे ठिक होणार नाही. माझी सदनाला विनंती आहे की, खाजगीकरणा विषयी तुम्ही विचार करा.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>नाही. नाही आम्हाला खाजगीकरण करायचे नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>आम्हाला तुमच्यावर विश्वास आहे.*

*इकडे काही विपक्ष सदस्य पास करा, पास करा असे ओरडत होते.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी / श्रीमती. किरण माने:-</u>पास. पास....*

*<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>तुम्ही एक प्रामाणिक अधिकारी आहात....*

*<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने / सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>पास. पास. पास.... .*

*इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>मा. आयुक्त साहेबांना बोलु दया.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>भाजपा पक्ष व शिवसेनेचे म्हणणे पुर्ण झाले.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>वोटींग करा.*

मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः-मा. आयुक्त साहेब तुम्ही म्हणता खाजगीकरण करा याचा अर्थ आम्ही असे समजायचे की महापालिकेचा कर्मचारी वर्ग सक्षम नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-भाजपा पक्ष व शिवसेनेची मागणी पुर्ण झाली.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-डोक्यातील कुलूप उशिरा उघडले. धन्यवाद. धन्यवाद.......कमीत कमी कुलुप तर उघडले. भाजपा पक्ष व शिवसेनेची मागणी पुर्ण झाली. विरोध कमी झाला.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-शहर के हित में राष्ट्रवादी मैदान में.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-राष्ट्रवादी नौटंकीके मैदान में.

मा. सदस्य श्री. राजु इदनानीः-पास करा. पास करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-वोटींग करा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-भाजपा पक्ष व शिवसेनेची मागणी पुर्ण झाली.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

इकडे विपक्ष व सत्ताधारी सदस्य वोटींग करा, पास करा असे वारंवार बोलत होते.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-चापलुसी करू नका.

इकडे काही सत्ताधारी सदस्य विरोध करू नका पास करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पास.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-भाजपा, शिवसेना युतीचा विजय असो. उशिरा का होईना सत्ताधारीच्या डोक्याचे कुलूप उघडले.

इकडे सत्ताधारी सदस्य राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, आर.पी.आयच्या युतीचा विजय असो तर विपक्ष सदस्य भाजपा-शिवसेना युतीचा विजय असो अशा घोषणा देत होते.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-राष्ट्रवादीकॉंग्रेस, कॉंग्रेस, आर.पी.आय युतीचा विजय असो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-भारतीय जनता पार्टीचे म्हणणे अखेर पुर्ण झाले. एकाच निवडणुकीत कुलूप उघडले गेले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-जकात वसुलीसाठी प्रशासन जबाबदार राहील.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-नाही. नाही ऐका............

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-विरोध नका करू. आता पास झाले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-आता जर बोलले आहे तर आम्ही पण बोलु. सर्वसंमतीने पास म्हणजे सर्व संमतीने पास.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-धन्यवाद. धन्यवाद. देर आये दुरूस्त आये.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-फक्त श्री. हरदास माखिजा यांचा विरोध आहे. वोट करा श्री. हरदास माखिजा यांचा एकट्यांचाच विरोध आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ३ पास सर्वसंमतीने?

काही सदस्य :- पास-पास.......

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:- सन २००४-०५ या वर्षाकरिता जकात वसुली महापालिका कर्मचा-यां मार्फत करण्याकरिता दिनांक २९/५/२००४ चा स्थायी समिती ठराव क्र. ३८ कायम करणे.

प्रस्तावनाः-

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी

ज्याअर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (अ) अन्वये या महानगरपालिकेने उल्हासनगर शहरात जकात वसुली करणे कामी दि. २५.७.२००३ ते दि. २४.७.२००४ पर्यंत मे. कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. यांना दि. २१.७.२००३चे महासभा ठराव क्र. ६० अन्वये जकात अभिकर्ता म्हणुन नेमण्यास मान्यता दिली होती. त्याअर्थी मे. कोनार्क इन्फास्ट्रक्चर कंपनी, प्रा. लि. हे कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करत असल्याचे तसेच जकात वसुलीचे कर्तव्य पार पाडण्यात कसुर करत असल्याचे निर्दशनास आले आहे.

जकात अभिकर्त्याने नेमलेल्या काही कर्मचा-यांनी दि. २५.५.२००४ रोजी जकात देण्यास पात्र असलेल्या मालाची तपासणी करताना श्री. अमित हिंगोरानी या व्यक्तीशी दुर्व्यवहार व जोरजबरदस्ती केली व त्यांच्या हातात असलेला मोबाईल खेचुन त्या व्यक्तीला हाताशी धरून मध्यवर्ती जकात नाक्यावर घेऊन गेले. तेथे त्यांच्याकडुन दहा पट जकात वसुलीची मागणी केली.

त्यामुळे त्याव्यक्तीने या दुर्व्यवहारासंबंधी आपली तक्रार व्यापारी महामंडळ या संस्थेकडे केल्यानंतर संस्थेने त्या व्यक्तीस समर्थन देण्याकरिता जकात अभिकर्त्यांविरूध्द आयुक्तांकडे न्यायाची मागणी केली. जकात अभिकर्त्यांच्या दुर्व्यवहाराच्या निषेधार्थ दि. २५.५.२००४ रोजी १७ सेक्शन रोडवरील दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवली होती व आयुक्तांकडे न्यायाची मागणी केली. या जकात अभिकर्त्या संबंधी अनेक तक्रारी असुन त्यातील प्रमुख तक्रारी खालील प्रमाणे आहेत.

१) जकात देण्यास पात्र असलेल्या मालाची तपासणी करण्याच्या अधिकाराचा गैरवापर करणे.
२) जकात वसुलीचा रोजच्या रोज हिसाबकिताब न ठेवणे.
३) सोनार व इतर व्यक्तींना जकाती ऐवजी ठोक वसुलीची सवलत देऊन भरलेल्या जकातीची पावती न देणे.
४) जकात कराबाबत बिले सादर केलेली असतानाही ती मान्य न करता आपल्या मर्जीप्रमाणे मुल्य आकारणे.
५) विनाकारण जोरजबरदस्तीने जकात वसुलीस पात्र असलेल्या वस्तु अटकावुन ठेवणे.
६) मागणी करण्यात आल्यावर व जकात न दिल्यास त्याबाबत रितसर जप्त केलेल्या वस्तुची लेखी नोटीसीसह मालमत्तेची यादी न देणे.
७) अधिकार नसताना जकात चुकविल्याबददलच्या अपराध सिध्दीशिवाय देय असलेल्या जकातीच्या रक्कमेच्या दहा पट रक्कमेची मागणी करणे किंवा जकात पात्र माल जप्त करणे.

यास्तव स्थायी समिती ठराव क्र. १०७ दि. ७.२.२००३, महासभा ठराव क्र. १०१, दि. २०.२.२००३ मध्ये अंशत: सुधारणा करून अभिकरणामार्फत पार पाडले जात असलेले जकात वसुलीचे कर्तव्य सन २००४-२००५ पासुन महापालिकेने आपल्या कर्मचा-यांमार्फत पार पाडण्या कामी स्थायी समिती पुढे प्रस्तावित.

**LFkk;h lferh Bjko Ø%& 38** **fn- 29-5-2004**

ही स्थायी समिती वरील प्रस्ताव विचारात घेता पुर्वीच्या स्थायी समिती ठराव क्र. १०७, दि. ७.२.२००३ मध्ये अंशत: बदल करून सन २००४-२००५ करिता जकात वसुलीचे कर्तव्य महापालिका कर्मचा-यां मार्फत पार पाडण्यास मान्यता देत आहे. व महासभेपुढे त्या प्रयोजनार्थ पूर्वीच्या महासभा ठराव क्र. १०१, दि. २०.२. २००३ मध्ये अंशत: बदल करण्यास शिफरस करित आहे.

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र. २० दिनांक:-१८/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

ही महासभा स्थायी समितीचे दिनांक २९/५/२००४ च्या ठराव क्र. ३८ अंतर्गतच्या शिफारशी प्रमाणे पुर्वीच्या महासभा ठराव क्र. १०१, दिनांक २०/२/२००३ मध्ये अंशत: बदल करून उल्हासनगर शहरात जकात वसुली

कामी अभिकर्ता न नेमता महापालिका कर्मचा-यांमार्फत जकात वसुली करण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ही सभा २३ तारखेपर्यंत स्थगित करण्याचा प्रस्ताव सत्ताधारी पक्षातर्फे आला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>कारण काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>कारण विनाकारण.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर:-</u>आनंद साजरा करायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>कारण सांगा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>२३ तारखेपर्यंत सभा स्थगित करावी. कारण मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे व श्री. रमेश चव्हाण नाहीत म्हणुन.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>म्हणजे या दोन्ही सदस्यांची गरज काय तुम्हाला.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>२३ तारखेपर्यंत सभा स्थगित करण्याचा प्रस्ताव आला आहे कुणाची काही हरकत आहे का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>कुणाचा प्रस्ताव आला आहे?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांचा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>कारण काय?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>चौधरी साहेब, सात वाजले आहेत.

इकडे सत्ताधारी सदस्य राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, आर.पी.आयच्या युतीचा विजय असो तर विपक्ष सदस्य भाजपा-शिवसेना युतीचा विजय असो अशा घोषणा देत होते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे. मा. महापौरांनी ही सभा आपल्या सर्वानुमते दि. २३.६.२००४ पर्यंत स्थगित केली आहे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता सभेचे कामकाज दि. २३.६.२००४ पर्यंत स्थगित केल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):-मा

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. ४

आयत्त्यावेळचा विषय

विषय क्र. ५

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:-२३/६/२००४

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२३/६/२००४ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.६.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून ही सभा बुधवार दिनांक २३.६.२००४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.
२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. साधवानी मनोज |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५४. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६ | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास, |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम | ५९. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम | ६८. | श्री. दिलीप लालवानी |
| ३५. | श्रीमती. खिलनानी भावना | | |
| ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु काशीराम, २. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ३.श्री. टाले प्रमोद नामदेवराव,४. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, ५. श्री. रमेश चव्हाण, ६. श्री. प्रशांत जाधव, ७. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,८. श्रीमती. किरण माखिजा,९. श्री. बहरानी मोहन, १०. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी,११, श्री. बेहरानी ठाकुरदास, १२. श्री. वदरीया राजेश हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>एक अभिनंदन प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्याचे सुचक श्री. राज असरोंडकर व अनुमोदक श्री. धनंजय बोडारे हे आहेत. श्री. योगेश

खेमचंद धांडे या विदयार्थ्यांने दहावीच्या परिक्षेत मुंबई विभागात गुणवत्ता यादीमध्ये ९वे स्थान प्राप्त केले आहे. त्यांनी दहावीच्या परिक्षेत ९३. २० टक्के एवढे गुण प्राप्त केले आहेत. ते अभिनंदनास पात्र असल्याने आपण सर्वांनी मिळुन त्यांचे अभिनंदन करावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौर महोदया, काही दिवसापुर्वी या शहरातील सामना या वृत्तपत्राचे प्रतिनिधी श्री. दिनेश गोगी यांच्या वडीलांचे निधन झालेले आहे. तर त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी अशी सूचना आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी:-</u>अजुन एक प्रस्ताव आहे. आपले सन्माननिय सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे यांच्या मातोश्रींचे देखिल काही दिवसापुर्वी निधन झाले आहे त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पित करावी.

सुचकाचे नाव :- श्रीमती. ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

## <u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर शहरातील सामना या वृत्तपत्राचे प्रतिनिधी श्री. दिनेश गोगी यांचे वडील श्री. गोटीराम सुपाजी पवार यांचे व उल्हासनगर महानगरपालिकेचे सन्माननिय सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे यांच्या मातोश्री श्रीमती चंद्राबाई हरीभाऊ लिंग यांचे नुकतेच निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> २० अ <u>दिनांकः-२३.६.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. गोटीराम सुपाजी पवार व श्रीमती चंद्राबाई हरीभाऊ लिंगे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा महापौर महोदया,.....

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>मा. महापौर महोदया, मागील काही बैठकीमध्ये महासभेत एक प्रस्ताव पारीत झाला होता की, या सभागृहात गुरूनानक यांची तसबीर लावली जावी. आपण त्याला परवानगी देखिल दिली होती. तर आज आम्ही गुरूनानक यांची तसबीर आणली असुन ती येथे लावण्यास आम्हाला कृपया परवानगी दयावी. तसेच सर्वांना मिठाई वाटण्याची देखिल परवानगी दयावी. मी श्री. भुल्लर यांना देखिल विनंती करेन की, आपणही आमच्या समवेत सदरची तसबीर लावण्यासाठी यावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सत्तापक्षातील सदस्य अशा प्रकरणांमध्ये देखिल दुजाभाव करीत आहेत. मी यांना आधी बोललो की तसबीर लावु या त्यावेळी यांनी सांगितले की मोठी मिरवणुक काढुन त्यानंतर चांगल्या प्रकारे सन्मानाने तसबीर लावु. आता ही पध्दत चुकीची आहे. तसबीर लावण्यास आमचा विरोध नाही. परंतु हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>एकच गोष्ट आहे. आम्ही लावली काय आणि तुम्ही लावली काय? गुरूनानक सर्वांचे आहेत, तुमचेही आहेत, आमचेही आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मी आपल्याला सांगु इच्छितो की, मला देखिल याची माहिती नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>श्री. वलेचा आपण मध्ये मध्ये बोलु नका. तुम्हाला याबद्दल काही माहिती नाही.

<u>मा. महापौरः-</u>गुरूनानक यांची तसबीर लावण्यास परवानगी देण्यात येत आहे.

यावेळी गुरूनानक यांची तसबीर लावण्यात आली व हार व पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आले.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, या सभागृहामध्ये थोडया वेळापुर्वी एक अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला की, ज्ञानदा विद्यामंदीर या शाळेचा योगेश धांडे नावाचा एक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेला आहे. तर ज्ञानदा मंदीर ही शाळा या शहरातील काही उच्चभ्रु शाळांमध्ये गणली जात नाही. आणि या शाळेभोवती एक प्रतिकुल परिस्थिती आहे. शिक्षकांच्या व पालकांच्या मेहनतीमुळे मध्यम वर्गातील एक विद्यार्थी गुणवत्ता यादीत ९वा येवुन त्याने ९३. २० टक्के एवढे गुण प्राप्त केलेले आहेत. त्याचा जो अभिनंदन ठराव आपण या ठिकाणी मांडला आहे. तर तो ठराव एक औपचारीकता म्हणुन सिमित न राहता हा जो विद्यार्थी आहे त्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने जाहिर सत्कार करून अभिनंदन करायला हवे अशी माझी मागणी आहे. आमच्या युतीच्या वतीने आणि त्या शाळेला सुध्दा बीपीएमसी ॲक्टच्या चौकटीत काही विशेष शैक्षणिक सुविधा जर पुरवता आल्या तर त्या शाळेला सुध्दा प्रोत्साहन मिळु शकेल असे दोन प्रस्ताव मी या ठिकाणी सभागृहात मांडत आहे. तर माझी महापौरांना विनंती आहे की त्यांनी त्या विद्यार्थ्याचा व शाळेचा सत्कार करण्यासाठी आयुक्तांना आदेशित करावे.

**<u>अभिनंदन प्रस्ताव</u>**

सुचक :- श्री. राज असरोंडकर

अनुमोदक :- श्री. धनंजय बोडारे

सन २००३-२००४ च्या शालांत परिक्षेत उल्हासनगर-४ येथिल ज्ञानदा विदयामंदिर या शाळेतील कुमार योगेश खेमचंद धांडे हा विदयार्थी ९३.२० टक्के गुण मिळवून मुंबई विभागात गुणवत्ता यादीत ९ व्या क्रमांकावर झळकलेला आहे.

सदर विद्यार्थ्याने अतुलनिय यश प्राप्त करून उल्हासनगर शहराच्या नावलौकीकात भर घातलेली आहे. याबददल सदरहु विद्यार्थ्यांचा महापालिकेतर्फे जाहिर सत्त्कार व अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २० ब</u>　　　　　　　　　　<u>दिनांक:-२३.६.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कु. योगेश खेमचंद धांडे या उल्हासनगरच्या विद्यार्थ्याने सन २००३-२००४ च्या शालांत परिक्षेत मुंबई विभागात ९ व्या क्रमांकाचे स्थान ग्रहण करून उल्हासनगर शहराच्या नाव लौकीकात भर घातल्याने त्याचे अभिनंदन करित आहे. व महापालिकेतर्फे सदर विद्यार्थ्याचा येत्त्या १५ ऑगस्टला जाहिर सत्त्कार करणे मान्य करित आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>१५ ऑगस्टला महापालिकेच्या वतीने सदर विद्यार्थ्याचा सत्त्कार करण्यात येईल. विषय क्रमांक ४ ............

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, आज या महानगरपालिकेच्या बाहेर शहरातील बरेचसे पत्रकार धरणे धरून बसलेले आहेत. मागील महासभेत जेव्हा कालानी परिवाराव्दारे चालविण्यात येणा-या एका न्यासाचा, कर न भरण्याचा विषय चालु होता. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, रू. २५,०००वर ज्यांची करांची थकबाकी आहे त्यांची यादी प्रसिध्द केली जावी. त्यावेळी पत्रकारांना एका सदस्यांने ब्लॅकमेलर असे संबोधले होते. याबददल सर्व पत्रकारांनी खेद व्यक्त केला आहे. म्हणुन मला असे वाटते की, या शहरातील सर्व पत्रकार आमचे बंधु आहेत. ते आज धरण्यावर बसले आहेत. तर मला असे वाटते, त्यांची देखिल मागणी आहे की सदस्य श्री. नारायण पंजाबी यांनी त्यांना ब्लॅकमेलर असे म्हंटले आहे तर त्यासाठी त्यांनी त्यांची माफी मागावी. याबददल त्यांनी सभागृहात खेद प्रकट करायला हवा. असे केल्यास योग्य होईल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. महापौरजी, आमचे श्री. पंजाबी साहेब यांनी जे विधान केले होते त्याचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. त्यांनी एका विवक्षित

पत्रकाराबद्दल सदरचे उद्गार काढले होते. सर्व पत्रकारांसाठी सदरचे उद्गार नव्हते ही बाब लक्षात घेतली जावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>कुणी एक पत्रकार नव्हता तर मग जो होता त्याचे नाव घेतले जावे.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना: '</u>-सदरचे उद्गार हे फक्त एका पत्रकाराशी संबंधित होते व ते आयुक्तांसमोर त्यावेळी सांगण्यात आले होते ते उद्गार सर्व पत्रकारांसाठी नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:-</u>ते उद्गार एका पत्रकारासाठीच होते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>पत्रकाराच्या नावाचा खुलासा येथे व्हायला हवा. तुम्ही असे बोलुन सर्वांना बदनाम करीत आहात. आणि या सर्व लोकांना बदनाम केल्याबद्दल आपण येथे माफी मागायला हवी. मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब जोपर्यंत हे माफी मागत नाहीत तोपर्यंत आम्ही सभेचे कामकाज चालु देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना::-</u>कशाबद्दल माफी मागावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u> शहरातील पत्रकारांना ब्लॅकमेलर असे बोलल्या बद्दल माफी मागावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> आता येथे जर कुणी बोलले की, नगरसेवक चोर आहेत, तर सर्व नगरसेवक चोर आहेत, असे होते. यासाठी नगरसेवकाचे नाव घ्यायला हवे. याचप्रकारे ज्या पत्रकाराबद्दल सदरचे उद्गार काढले आहे, त्याचे देखील नाव घेण्यात यावे.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>ते एकाच पत्रकाराबद्दल बोलले होते. आपण उगाच हे प्रकरण वाढवित आहात. हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रुपानी :-</u> एकाच पत्रकाराबद्दल बोलण्यात आले होते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> त्या पत्रकाराचे नाव सांगावे व इतर पत्रकारांची माफी मागावी.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> महाराजजी, आमचे विरोधी पक्ष नेते जर आपणांस त्या पत्रकाराचे नाव ऐकण्याची हौस असेल, आपण महासभेचे कामकाज चालु देणार नसाल. एक ब्लॅकमेलर पत्रकार ज्याचे मी नाव घेणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>आपण असे कसे बोलता की हौस आहे? आपणांस अहंकार आहे. हे आपल्या भाषेवरुन दिसून येते.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> आपणांस त्या पत्रकाराचे नाव हवे असेल तर ते मी सांगतो, व त्याने केलेल्या कार्यांचा देखील तपशिल देतो. आपण कृपया शांततेने ऐकून घ्यावे. मा. महापौरजी..........

यावेळी सभागृहाच्या प्रेक्षागृहात काही व्यक्ती जोर-जोराने आरडा-ओरडा करीत होत्त्या.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>त्या पत्रकाराने माझ्या प्रभागात काही कामाच्या मोबदल्यात दहा हजार रूपये मागितले होते ते मी न दिल्याने तो माझ्या नावाने ओरडत होता........

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा. महापौर व आयुक्त साहेब, आपण हा जो नविन माणूस श्री. भदाणे याला बसविले आहे, त्याच्यामुळे प्रेक्षागृहात भांडणे होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> प्रेक्षा गॅलरी रिकामी करा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया प्रेक्षागृहात शांतता ठेवावी.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी :-</u> यासाठी पोलिसांना लवकरात-लवकर पाचारण करावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, या गोंधळ करणा-या व्यक्तींना जाणून-बूजून बोलविण्यात आले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> जाणून-बूजून बोलविले आहे व हे सर्व श्री. युवराज भदाणे यांच्यामुळे होत आहे.
<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> असे असेल तर आम्हीही लोकांना बोलवू. सभागृहात थकले म्हणून प्रेक्षागृहात दंगा करायला लोकांना बोलाविले आहे का?

<u>मा. सदस्य श्री. मनोज साधवानी :-</u> यामध्ये आमचा कुणीही माणूस नाही.
<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> या सर्वांना जाणून-बूजून बोलविले असून या सर्व व्यक्ती समाजकंटक आहेत.
<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> सचिव साहेब, प्रेक्षागृहासाठी पास कोण-कोणत्त्या व्यक्तींना दिले, कोणाच्या शिफारशीने दिले, याची चौकशी केली जावी. ज्या व्यक्तींची नावे पोलिस स्टेशनमध्ये आहेत, गुन्हेगार आहेत, अशा व्यक्तींना पास दिलेले आहेत. त्याचा परिणाम हा आहे.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :-</u> ही सर्व तुमच्या लोकांची चाल आहे. वर आमचा कुणीही माणूस नाही.

<u>मा. महापौर :-</u> पोलिसांनी व सुरक्षा रक्षकांनी तावडतोब प्रेक्षागृहात जावून परिस्थतीवर नियंत्रण आणावे. कारण सभागृहाचे कामकाज बिघडता कामा नये.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> शहरात व महापालिकेत हे लोक दंगा करु इच्छितात.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u>प्रेक्षागृहात बसलेले लोक आपणाकडुन आदेश घेत आहेत. आपण काय बोलता?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> शांतीने खाली बसावे.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, वर प्रेक्षागृहात बसलेली दाढीवाली व्यक्ती यांच्याशी इशा-याने बोलत आहे. तुम्ही गप्प बसा. मर्यादेच्या बाहेर जावू नका.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> कोणाच्या शिफारसीने कोणती व्यक्ती प्रेक्षागृहात गेलेली आहे. याची चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मी यांना सांगतो आहे की, वर बसलेले लोक आमचे नाहीत तर राजेंद्र चौधरी मला सांगतात की, खाली बसा. तर आम्ही खाली का बसावे?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, कोणाच्या शिफारसीने कोणती व्यक्ती प्रेक्षागृहात गेलेली आहे. याची चौकशी केली जावी. तसेच त्या व्यक्ती कश्या प्रकारच्या आहेत, याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> तो जो वर बसलेला दाढीवाला माणूस आहे, तो यांच्याशी इशा-याने बोलीत आहे. तो कोण आहे याची चौकशी केली जावी. हे बोलले की, ती तुमची माणस आहेत, त्यावर मी त्यांना सांगितले की, ती आमची माणसं नाहीत. यावर श्री. राजेंद्र चौधरी हे मला खाली बसण्यासाठी सांगत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> प्रेक्षागृहात बसलेल्या व्यक्तींना कोणी शिफारस केली, याची चौकशी करुन त्याची यादी तयार केली जावी. याची इत्त्यंभूत माहिती आताच्या-आता मागवून चौकशी केली जावी. आयुक्त साहेब, याची माहिती आम्हांला येथे दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> सदरची यादी पोलिस स्टेशनला देवून त्याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, माझी देखील हीच मागणी आहे की, जे लोक आज वर आले आहेत, त्यांची चौकशी केली जावी. ती व्यक्ती कोण आहे, व यांच्या इशा-याने काम का करीत आहे? याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारे :-</u> तुम्ही अशाप्रकारे सभा चालवत असाल तर मग चालवुन दाखवा.

<u>मा. सदस्य श्री दिलीप गायकवाड :-</u> आम्ही पण बघतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> श्री. गायकवाड, तुम्ही का भांडण करीत आहात? नगरसेवक आपसात का भांडण करीत आहेत? तुम्ही महापालिकेत बसलेले आहात, नगरसेवक आहात. तर मग असे का करता? तुम्हांला सर्व शहर बघत आहे. पत्रकार बघत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>कृपया हा राजकिय मुद्दा बनवू नये. महासभेचे जे शांतीचे वातावरण आहे, ते कायम ठेवावे. व श्री. पंजाबी जे बोलू इच्छित आहेत, ते त्यांना बोलू दयावे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> मा. महापौरजी, मागील महासभेत चर्चा सुरु होती, त्यामध्ये ज्यांची कराची थकबाकी रुपये २५,०००/- पेक्षा जास्त आहे, अशा व्यक्तींची यादी दिली जावी, अशी मागणी आमचे नगरसेवक श्री. लाल पंजाबी यांनी आयुक्तांना केली होती. तर त्यावेळी त्यामध्ये मी असे बोललो होतो की, यापूर्वी देखील आपल्या महापालिकेने अशया व्यक्तींची एक यादी जाहिर केली होती, व ती यादी चार-पाच पत्रकारांना न देता फक्त एकाच पत्रकाराला देण्यात आली होती. त्याला पत्रकार असे म्हणणे देखील मला लाजिरवाणे वाटते. कारण तो पत्रकारांवर अन्याय करीत आहे. त्या व्यक्तीचे कृत्य मी आपणांस येथे सांगु इच्छितो. आपल्या मागील महासभेमध्ये सर्वात वरीष्ठ नगरसेवक श्री. गोप बेहरानी हे होते. त्यांचा फोटो हा पत्रकार दररोज वृत्तपत्रात छापत असे. १५ दिवस, एक-एक महिना फोटो छापत असे. तो शहरातील वरीष्ठ नागरिक, वरीष्ठ राजकीय व्यक्ती यांचा विचार करीत नसे. तो पत्रकार होता त्यावेळी त्याला हे कळत नव्हते. या उपर ही मी सांगु इच्छितो आपल्या शहरात सिंधी नागरिकांची नवजीवन बॅंक आहे जीचे नाव फार प्रसिध्द आहे. या बॅंकेला बुडविण्याच्या मागे तो लागला होता. तो सर्वांना सांगत असे की बॅंकेतुन पैसे काढुन घ्या. पैसे न काढल्यास ते बुडतील. आता यावेळी त्या बॅंकेचे दोन संचालक नगरसेवक म्हणुन येथे बसलेले आहेत. त्यांना देखिल माहित आहे की, त्या बॅंकेच्या मागे तो ब्लॅकमेलर कसा लागला होता. तो बॅंकेकडुन देखिल पैसे मागत होता. बॅंकेतुन पैस न मिळाल्याने तो बॅंक बुडवायच्या मागे लागला होता. तो सर्व शहरातील लोकांची दिशाभुल करीत होता. एवढया चांगल्या बॅंकेसाठी तो एवढे वाईट कार्य करत होता यासाठी त्याला लाज वाटायला हवी. आमचे सहयोगी श्री. मोहन बेहरानी जे आमचे वरीष्ठ नगरसेवक आहेत, त्याची दादागिरी एवढी वाढली की लोणावळा येथे त्याने श्री. मोहन बेहरानी यांच्याशी मारामारी केली होती. त्याला पोलिसांचे देखिल भय नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>आपण नाव सांगावे. इतिहास सांगु नका.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>कृपया ऐकण्याची हिंमत ठेवा. चुकीच्या माणसाला साथ देवू नका.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>आपण भांडणाचे वातावरण निर्माण करू नका. शांतता ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>मी आपल्याला सर्व सांगतो, त्याचे नाव देखिल सांगतो. आपण ऐकण्याची हिंमत ठेवावी. तुम्ही आम्हाला सभा न चालविण्याचा दम का देता? आम्ही तयार आहोत. आम्ही प्रत्येक गोष्टीचा पुरेपुर विरोध करू. मी आपल्याला अजुन एक महत्त्वाची गोष्ट सांगु इच्छितो. कदाचित आपण विसरला असाल परंतु मी विसरणार नाही. आपले शिवसेनेचे हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या विरूध्द देखिल त्याने चुकीचे शब्द उच्चारले होते व त्यामुळे आपले शाखा प्रमुख श्री. लहु नाईक यांनी त्याचे तोंड काळे केले होते. आपण अशा पत्रकारासाठी बोलत आहात. आजकाल कोणत्त्या पत्रकारासाठी असे बोलले जाते?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>नाव सांगा. त्यानंतर बोला.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी :-</u>नाव आपणांसही माहित आहे आपणांस सर्व कळते.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आपण खरे शिवसैनिक असाल तर माझे बोलणे ऐकुन घ्याल. श्री. बाळासाहेब ठाकरे हे आपलेच नाहीत तर आमचे देखिल नेता आहेत. आम्ही त्यांचा सन्मान करतो. मी देखिल कधी त्यांच्याबरोबर होतो. त्यांना देखिल याने शिवीगाळ केली होती. यामुळे लड्डु नाईक याने त्याचे तोंड काळे केले होते. हे सर्व पत्रकांरना माहित आहे आणि आपणासही माहित असावयास हवे. अशा माणसाला आपण पाठिंबा देत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आपण कृपया त्याचे नाव घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>त्याच्या करामती तरी ऐकुन घ्याव्यात.

यावेळी मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे सभागृहाच्या बाहेर गेले व त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>गायकवाड साहेब आपण हिंदु आहात. मी सांगतो की, आपण अशा पत्रकाराला शोधुन त्याचे तोंड परत काळे करा मी देखिल आपल्या सोबत येईन. येथे नवजीवन बॅंकेचे दोन संचालक बसलेले आहेत त्यांना देखिल माहित आहे की, तो कशाप्रकारे ब्लॅकमेलिंग करतो. मी पत्रकारांना एका गोष्टीची आठवण करून देवु इच्छितो. आपण सर्व नगरसेवकांनी आयुक्तांना विनंती करून पत्रकारांना तळमजल्यावर पत्रकार कक्षाची व्यवस्था करून दिली होती. ज्यासाठी आम्ही आयुक्तांचे आभारी आहोत. आम्ही जेव्हाही पत्रकार कक्षात जातो त्यावेळी आम्हाला सन्मान मिळतो. परंतु हाच एक बेकार माणुस, नाकर्ता माणुस होता जो आयुक्तांना दहा वेळा पत्र देवुन पत्रकारांना पत्रकार कक्ष का दिला याची विचारणा करीत होता. हा कोण आहे? जो पत्रकारांच्या घरात बसुन त्यांच्या ताटात जेवतो त्यामध्येच मुततो. असा हा घाणेरडा माणुस आहे. त्याचप्रकारे यापुर्वी दोन वेळा तो भाजपाच्या तिकीटावर निवडणुक लढला होता, दोन्ही वेळा तो हारला होता. त्याचे नाव श्री. मनोहर जेसवानी असे आहे. देशभगतचा तो पत्रकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, आता श्री. नारायण पंजाबी यांनी ज्याचे नाव घेतले तो मनोहर जेसवानी लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा प्रचार प्रमुख होता.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आता देखिल आमच्या ठाणे जिल्हयाच्या भाजपाच्या श्रीमती कबरे त्याला भेटायला गेल्या होत्या. भाजपाचे आपले सर्व नेते त्याच्याकडे बसले होते. जे स्वत: जिंकु शकले नाहीत श्री. प्रकाश माखिजा हे देखिल तेथे झटापट करत होते. पुर्ण शहरात अनाधिकृत बांधकामे श्री. राम चार्ली व श्री. प्रकाश माखिजा हे करीत आहेत. ते त्याला मदत करीत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>श्री. जेसवानी हे कोणाच्या मदतीने येथे स्विकृत सदस्य म्हणुन आले होते. ते सर्वांना माहित आहे. हे येथे उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांना माहित आहे. ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे, युपीपीचे संस्थापक सदस्य होते. अशा मनोहर जेसवानीचे नाव घेण्यास आपणास एवढा वेळ लागतो. दुस-यावर आरोप करता, शेम, शेम असे करता.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>याच्यावर कलम ३८४ अन्वये कारवाई झालेली आहे. आमचे वरीष्ठ नगरसेवक श्री. किशोर वनवारी यांच्याकडुन रू. २५,०००/- घेताना त्याला पकडण्यात आले होते. आपण जरा यावर टाळया वाजवाव्यात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सभागृहात त्यांनी किशोर वनवारी बरोबर भांडण देखिल केले होते ते ही सांगावे. त्यावेळी ते दोघे युपीपीचे नगरसेवक होते. आम्ही देखिल त्यावेळी सभागृहात होतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>चौधरी साहेब, आपण त्याची बाजु घेवु नका. त्याने श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे देखिल नाव खराब केले होते. अशा माणसाला आपण लाथ मारायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>महाराजजींनी त्यांना नाव विचारले व श्री. पंजाबी यांनी आता त्याचे नाव सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>तुम्ही जन्म दिलेल्या मुलाला दुस-याचे नाव देत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, येथे कोणता व्यक्ती कोणत्त्या पक्षाचा आहे, तो बाहेर जावुन काय करतो हा प्रश्न नाही. ही जी महासभा आहे तिचा दुरूपयोग करून आपला वैयक्तिक राग काढणे व कुणावरही चिखलफेक करणे व ते सांगण्यासाठी या महासभेचा उपयोग करणे हे चुकीचे आहे. मी सदस्यांच्या कोणत्त्याही वक्तव्याचे खंडण केलेले नाही. माझा मुददा असा आहे की, या महासभेचा दुरूपयोग करून कुठेही आपला वैयक्तिक राग काढणे व वैयक्तिक पातळीवर जावुन कोणावरहीताशेरे ओढणे यासाठी महासभेचा उपयोग करणे सर्वथा अनुचित आहे. ही चुकीची बाब आहे. मला असे वाटते की, सचिव साहेबांनी सदस्यांचे जे असे वर्तन आहे त्यावर खुलासा करायला हवा की हे उचित आहे अथवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौरजी, विरोधी पक्षातील सदस्यांनी सांगितले की, जोपर्यंत नाव सांगत नाही तोपर्यंत सभेचे कामकाज चालु देणार नाही. आपण आपले गटनेता श्री. लाल पंजाबी हे देखिल सांगत आहेत की, नाव घेवु नका तर आपण असा दबाव का आणत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>दुसरा मुददा असा पण आहे की, या मुददयावर शहरातील सर्व पत्रकार महापालिकेबाहेर धरण्यावर बसले आहेत. त्या धरण्याचे काय होईल, ते कोण संपुष्टात आणेल. त्या धरण्याची जबाबदारी कोणावर आहे. हे देखिल येथे स्पष्ट करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>त्या धरण्यामध्ये काही मोजकेच पत्रकार बसलेले आहेत. बाकी राष्ट्रीय वृत्तपत्रांचे कुणीही पत्रकार त्या धरण्यामध्ये नाही. तसेच मी काल सर्वांना लेखी दिले होते त्यामध्ये मी सर्व स्पष्टपणे लिहिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>धरणे मिटविण्याची जबाबदारी कुणाची आहे? आज महापालिकेच्या मुख्यालयासमोर शहरातील पत्रकार धरण्यावर बसले आहेत ते मिटविण्याची जबाबदारी कुणाची आहे? त्यांची अपेक्षा आहे की, या महासभेत सदस्यांनी या विषयावर बोलायला हवे. याचा निकाल दयायला हवा. त्याचा निकाल काय आहे? ज्या सदस्यामुळे हा मुददा उपस्थित झाला आहे. त्यांनी फक्त आपला राग काढायला नको तर त्यांनी सांगायला हवे की याचा निकाल काय आहे?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आपण मागणी केली होती की, सभागृहात त्या व्यक्तीचे नाव सांगितले जावे त्याप्रमाणे मी आता नाव सांगितलेले आहे. आपण स्वतः पत्रकार राहिलेले आहात आपल्याला तर कळायला हवे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-सभागृहात जी व्यक्ती उपस्थित नाही. ज्या व्यक्तीला खुलासा करण्याची संधी मिळणार नाही अशा कोणत्त्याही व्यक्तीवर टिका करणे अनुचित आहे. आपण मागील इतिवृत्त पहा त्यामध्ये आम्ही कधीही कोणत्त्याही नेत्त्यावर नाव घेवून टिका केलेली नाही. कारण ती व्यक्ती सभागृहात उपस्थित नव्हती.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आम्हाला देखिल बोलायची आवश्यकता नव्हती. परंतु आपण नाईलाज केला त्यामुळे आम्हाला नाव घ्यावे लागले.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-ज्या व्यक्तीला येथे बचाव करण्याची संधी मिळणार नाही अशा कोणत्त्याही व्यक्तीविरूध्द येथे बोलणे उचित होणार नाही. इतरही वर्तमानपत्र आहेत. आपले सर्वांशी चांगले संबंध आहेत. आपण आपला खुलासा त्यांच्याकडे करू शकला असता. परंतु या सभागृहाचा आपण दुरूपयोग केलात.....

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-आपण पंजाबी साहेबांना सांगितले की आधी खुलासा करा त्याशिवाय बैठकीचे कामकाज चालु देणार नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-आपण जे बोलले आहात ते आपले वैयक्तिक मत आहे. परंतु मुददा असा आहे की, ज्या कारणामुळे शहरातील पत्रकार महापालिकेबाहेर धरणे धरून बसले आहेत. त्या धरण्याला कोण मिटवेल त्याचा निकाल कोण लावेल ते देखिल सदस्यांनी इथे स्पष्ट करायला हवे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-आता येथे प्रेक्षागृहात देखिल आपण बघु शकता. बरेचसे पत्रकार बसलेले आहेत. त्यांनी जी मागणी केली होती ती मी पुर्ण केलेली आहे. त्यांनी मला सांगितले होते की महासभेत नाव घोषित करा त्याप्रमाणे मी येथे नाव घोषित केले आहे.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी:-अजुन काही करणे बाकी असेल तर ते पण सांगा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-महापौर व उपमहापौर यांचे कर्तव्य बनते की, त्यांनी या प्रश्नावर तोडगा काढावा.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-मा. महापौर महोदया, आपण यावर पुढाकार घेवून तोडगा काढावा व धरणे मिटवावे अशी आमची विनंती आहे. त्यानंतर सभेचे कामकाज होवु शकते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया लक्ष दयावे. मी मा. महापौरांच्या वतीने बोलत आहे. मा. महापौरांना या संदर्भात अदयाप काहीही पत्र प्राप्त झालेले नाही. याशिवाय त्यांचे म्हणणे आहे की आजचे सभेचे कामकाज झाल्यावर पत्रकारांना भेटुन त्यांचे समाधान करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-मा.महापौर, उपमहापौर विषयास सुरवात होण्यापुर्वी मी एका बाबीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो. आता कचरा उचलण्यासाठी ज्या हातगाडया मागविण्यात आल्या आहेत. त्या दुस-याच दिवशी तुटलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>हे बरोबर आहे. दुस-याच दिवशी गाडीची चाके निघालेली आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. भुल्लर यांच्याशी आम्ही सहमत आहोत. त्या ठेकेदाराचे देयक थांबविले जावेत. त्याला पैसे देण्यात येवु नये. मी असे देखिल सांगु इच्छितो की, यापुर्वी गाडया मागविण्यापुर्वी त्याचा नमुना स्थायी समिती सदस्यांना दाखविण्यात येत असे. तेथे मंजुर झाल्यानंतरच त्यांना माल पुरविण्याचे आदेश देण्यात येत होते. यावेळी आलेल्या डाय-या आपण बघितल्या असतील. आपण स्थायी समितीला त्या दाखविल्या नाहीत. यावेळी कच-याच्या गाडया आपण आपल्या मर्जीने मागविल्या आपण स्थायी समितीमध्ये नमुना दाखविला नाही त्यामुळे गाडया अशा आल्या आहेत. यानंतर जे काही खराब सामान येईल त्यासाठी प्रशासन जबाबदार राहिल.

<u>मा. महापौरः-</u>ज्या ठेकेदाराला हे काम दिले आहे त्याचे देयक जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत थांबविण्यात यावे. कचरा भरल्यानंतर गाडीचे चाक तुटत आहे हे मला देखिल माहित आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>या गाडयांचा नमुना कोणी मंजुर केला होता?

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>मला एक गाडी मिळाली ती देखिल तुटकी फुटकी होती.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> या कामासाठी आम्ही निविदा मागविली असता आम्हाला नांदेड येथील ठेकेदाराने लघुत्तम दराची निविदा सादर केली होती. त्यानंतर आम्ही त्याच्याकडुन हातगाडीचे नमुने मागविले आयुक्तांनी सदरचे नमुने संमत केल्यानंतरच आम्ही त्याला कार्यादेश दिले होते. त्याने वेळेवर हातगाडया पुरविल्या नाहीत, उशिरा दिल्या, ४५ व्हील बॅरोज त्याने आता पुरविल्या आहेत. त्या व्यवस्थित नाहीत. त्याचा पत्रा देखिल खराब आहे त्याचप्रमाणे चाके देखिल खराब आहेत. आम्ही त्या ठेकेदाराला सर्व गाडयांची चाके बदलुन देण्याचे आदेश दिले आहेत. याला तो देखिल तयार झाला आहे. जर गाडी निविदे प्रमाणे मिळाली नाही तर आम्ही तिचा स्विकार करणार नाही. त्याचा ठेका रद्द करू व त्याला देयक देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौर महोदया, यांनी ४५ किलोची गाडी मागविली होती. परंतु प्रत्यक्षात ३३ -३४-३५ किलोच्या गाडया प्राप्त झाल्या आहेत. १२ किलोने वजन कमी आहे. यामुळे हा ठेका रद्द करून त्याचे देयक थांबवायला हवे तसेच नवीन निविदा मागवायला हव्यात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> जेव्हा नमुना बघितला तेव्हा गाडी किती किलोची होती? ४५ किलोची होती की, ३५ किलोची होती?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आयुक्त साहेब, आपण सांगतात की, ४४ गाडया खराब होत्त्या. तर त्या गाडया परत करुन नविन मागविल्या जाव्यात. कारण या गाडया पहिल्याच दिवशी तुटलेल्या आहेत. त्यानंतर ज्या गाडया येतील त्या चांगल्या असतील तरच त्यांचा स्विकार करण्यात यावा. गाडयांची सक्त गरज आहे. गेल्या एक वर्षापासून गाडया मिळाल्या नाही. यासाठी दर्जा चांगला ठेवायला हवा.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>या पूढील गाडया घेतांना त्या बघून घेतल्या जातील. तसेच मागील गाडयांचे देयक त्यांना देण्यात येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> वजन देखील बघून घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जर या गाडया निर्धारीत प्रमाणानुसार नव्हत्त्या, तर त्यांचा स्विकार का करण्यात आला? प्रशासनाने त्या कश्या काय घेतल्या? हा मुख्य मुददा आहे. आपणच आधी घेणार व नंतर त्या परत करणार असे कसे काय चालेल?

<u>मा. महापौर :-</u>श्री. लोणारे साहेब यांनी यावर उत्तर दिले आहे. तर मग चर्चा का करीत आहात? ज्या गाडया खराब आहेत, त्याचे देयक थांबविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जर या गाडया निर्धारीत प्रमाणानुसार नव्हत्त्या, तर त्यांचा स्विकार का करण्यात आला? त्या कोणी घेतल्या? त्या कोणाच्या आदेशाने घेतल्या?

<u>मा. महापौर :-</u>यासाठी मी सांगितले की, जोपर्यंत गाडया व्यवस्थित होत नाहीत, तोपर्यंत त्याचे देयक थांबविण्यात यावे.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, या गाडया पाऊस चालु असतांना आल्या होत्त्या, रात्रीच्या वेळी आल्या होत्त्या. मला रात्री ११.३० वाजता दुरध्वनी आला होता. त्यावेळी आमच्या सुरक्षा रक्षकाने सदरच्या गाडया ताब्यात घेतल्या. दुस-या दिवशी त्या घेवून त्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर त्या खराब असल्याचे निदर्शनास आले, तेव्हा त्याचे देयक थांबविण्यात आले. आता आम्ही त्या गाडया बदलून देण्यासाठी आदेश देणार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकूर :-</u> मा. महापौरजी, मला एका वर्षापूर्वी एक गाडी मिळालेली होती, ती देखील तुटकी-फुटकी होती. आता एक वर्षाने परत गाडी मिळणार आहे. ही देखील अशीच मिळणार का?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ४:-</u> निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे १२ वर्षांपर्यंत पदोन्नती न मिळालेल्या पात्र कर्मचा-यांना शासकीय धोरणा प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे व काही कर्मचा-यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव मान्य करणे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> या विषयावर मला बोलायचे आहे, काही कर्मचा-यांनी सेवेत १२ वर्ष पूर्ण केले आहेत व जे पदोन्नतीस पात्र आहेत, त्यांची यादी तयार केली असेल. तर मला असे वाटते की, ती यादी देखील सभागृहासमोर आणण्यात यावी. कारण मला अशी माहिती आहे की, असे काही कर्मचारी आहेत या महापालिकेमध्ये. ज्यांचे महापालिका सेवेत १२ वर्ष पूर्ण झाले आहेत परंतु त्यांची नावे या प्रस्तावात समाविष्ट केलेली नाहीत. तर त्यांना त्यांचा हक्क मिळायला हवा. यावर आयुक्तांनी सभागृहाला आश्वासन दयायला हवे किंवा अशा कर्मचा-यांची यादी सादर करायला हवी.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, १२ वर्षाचा जो लाभ आहे, तर ज्या संवर्गात पदोन्नती मिळत नाही, व काही

*संवर्गात पद असून देखील पदोन्नती मिळत नाही, अशा कर्मचा-यांसाठी शासनाने १९९४ पासून एक योजना अंमलात आणली आहे. त्या योजनेप्रमाणे ज्या कर्मचा-यांनी १२ वर्ष पूर्ण केले आहे, त्या सर्वांना आपण पदोन्नती देणार आहोत व जसे सदस्यांनी सांगितले की, काही लोकांची नावे राहिली आहेत, तर अशा कर्मचा-यांची नावे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.*

*<u>काही सदस्य :-</u>पास. पास*

*<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

<u>विषय क्र. ४:–</u> निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे १२ वर्षापर्यंत पदोन्नती न मिळालेल्या पात्र कर्मचा–यांना शासकीय धोरणा प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे व काही कर्मचा–यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव मान्य करणे

<u>प्रस्तावना:–</u>

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्रमांक एच आर व्ही १०९५ /पत्र क्र. १/९५/बारा दि०८ जून १९९५ व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक – वेतन ११९९/प्रक.२/९९/सेवा–३ दि. २० जुलै, २००१ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील वर्ग – ३ व ४ मधील कार्यरत कर्मचा–यांना १२ वर्षाचा लाभ देणेबाबत तसेच पदोन्नती देणेबाबत महापलिका कर्मचारी निवड समितीची बैठक दिनांक २६/८/२००३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पुढील विविध संवर्गातील कार्यरत वर्ग – ३ व ४ चया कर्मचा–यांना १२ वर्षाचा लाभ तसेच पदोन्ती देणेबाबत निवड समितीने शिफारस केलेली आहे.

खालिल वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा–यांना १२ वर्षे कालबध्द पदोन्नतीचा लाभ देतांना दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णयापुर्वी ज्या कर्मचा–यांना १२ वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांची वेतनश्रेणी दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयामध्ये विर्निदिष्ठ केल्याप्रमाणे अनुज्ञेय आहे. व दि. २० जूलै २००१ नंतर ज्या कर्मचा–यांना १२ वर्षे पुर्ण झाली आहेत त्यांना दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. ज्या कर्मचा–यांना दि. १/१०/९४ पूर्वी १२ वर्ष पूर्ण झाली आहेत त्यांना सदर योजनेचा लाभ दि. १/१०/९४ पासून देय राहिल

खालील वर्ग ३ चं संवर्गातील कर्मचा–यांना दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे त्यांची सेवाजेष्ठता, अर्हता , पात्रता व गोपनिय अहवाल या सर्व बाबींची तपासणी केली असुन त्यानुसार त्यांच्या नावासमोर नमुद केल्याप्रमाणे त्यांना १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून सुधारित वेतन श्रेणी अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | कर्मचा–यांचे नांव | संवर्ग /हुद्दा | १२ वर्षेसेवा पुर्ण झाल्याचा दि. | सध्या मिळत असलेल्या ५ व्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी | १२ पूर्ण झाल्या पासून अनुज्ञेय वेतन श्रेणी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. १८/४/९५ च्या शासन निर्णया नुसार | दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णया नुसार |
| १ | श्री. यु. एस मोरे | लिपीक | ३०/७/०३ | ३०५०–४५९० | – | ४०००–१००–६००० |
| २ | श्री. डी. आर जाधव | लिपीक | ३१/५/०३ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | |
| ३ | श्री. बी.एम.बिर्ला | मिस्त्री | १/१/९६ | ९५०–१४००<br>३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | – |
| ४ | श्री. बी.झेड. भोपी | मिस्त्री | ४/३/९६ | ९५०–१४००<br>३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | – |
| ५ | श्री. एम.जे.मराडे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०–१४००<br>३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | – |
| ६ | श्री. व्ही.जे. मराडे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०–१४००<br>३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | श्री. आर.एस. भुतांबरे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| ८ | श्री. बी.पी.मोकाशी | जोडारी | ४/१०/९३ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| ९ | श्री. डी.एम.भोपी | जोडारी | ४/१०/९३ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १० | श्री. पी.बी.भोसले | जोडारी | १६/९/९४ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| ११ | श्री.एम.ए. सोनावणे | जोडारी | १९/२/९६ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १२ | श्री.एच.बी. भोपी | जोडारी | १२/२/९७ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १३ | श्री.ए.ए.घाटे | जोडारी | ३१/१/९७ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १४ | श्री. सी.के.लाडगे | पंपचालक | ३०/९/९३ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १५ | श्री. सी.एम. वाघ | पंपचालक | १८/६/९६ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १६ | श्री.ए. जी माळी | पंपचालक | ३०/४/९७ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १७ | श्री.एल.आर.पवार | पंपचालक | १/१/९७ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १८ | श्री. टी.एम. बाविस्कर | पंपचालक | १३/६/९७ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| १९ | श्री.एम. ए. रसिद | पंपचालक | १९/११/९७ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| २० | श्री. व्ही. आर. गेगजे | पंपचालक | १८/३/९८ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| २१ | श्री.ए.एच. भांडे | पंपचालक | १९/३/९८ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| २२ | श्री. पी.के. भोईर | मिटर दुरुस्तीकार | १४/९/९६ | ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| २३ | श्री.एच.जी.पगारे | मिटर दुरुस्तीकार | १५/९/९६ | ३०५०–४५९० | — | ४०००–१००–६००० |
| २४ | श्री. बी.आर. डोंगरे | मिटर दुरुस्तीकार | २०/९/९६ | ९५०–१४०० ३०५०–४५९० | ४०००–१००–६००० | — |
| २५ | श्री. महेश सी. सितलानी | कनिष्ठ अभियंता | ८/४/९९ | ४५००–१००–७००० | ६५००–२००–१०५०० | — |
| २६ | श्री. अश्विनीकुमार अहुजा | कनिष्ठ अभियंता | १०/६/९९ | ४५००–१००–७००० | ६५००–२००–१०५०० | — |
| २७ | श्री. तरुणकुमार सेवकाणी | कनिष्ठ अभियंता | ३०/९/०० | ४५००–१००–७००० | ६५००–२००–१०५०० | — |

खालील वर्ग ४ संवर्गातील कर्मचा–यांना शासन निर्णय क्र. एच आर व्ही–१०९५/प्र.क्र.१/९५/बारा दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शना सुचनानुसार अ. १ ते ६ वरील ''पहारेकरी'' या संवग्रतील कर्मचा–याची त्यांचे पदोन्नती साखळीतील ''वरिष्ठ सुरक्षारक्षक'' या पदोन्नतीवरील पदाची अर्हता धारन करित आहेत अ.क्र. ७ ते २० वरिल ''मजूर'' संवर्गातील कर्मचारी यांचेकडे ''मजूर'' संवर्गातील पदोन्नतीचे साखळीतील ''मुकादम'' या पदाची अर्हता धारण करित आहेत.

अनुक्रमांक २१ ते ४८ वरील ''माळी'' संवर्गातील कर्मचारी हे त्यांचे पदोन्नतीचे साखळीतील मुकादम या पदाची सेवा भरती नियमाप्रमाणे अर्हता धारण करित आहेत. त्यामुळे वरील ''पहारेकरी '' ''मजूर '' व ''मुकादम'' या संवर्गातील अ.क्र. १ ते ४८ वरिल वर्ग ४ चे कर्मचारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

खालील अ.क्र. ४९ ते ५२ ''शिपाई,'' अ.क्र.५३ ते ५४ '' कॅटल कॅचर,'' अ.क्र. ५५ ते ५७ ''गॅरेज मदतनीस,'' अ.क्र. ५८ ''सफाई मुकादम'' व अ.क्र. ५९ ते ६१ वरील ''विद्युत मदतनीस'' या पदाचे पदोन्नती चे पद मनपा आस्थापनेवर नाही. त्यामुळे शासन निर्णय क्र. ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा ३ दि. २० जूलै २००१ परिछेद क्र. २ (४) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

| अ.क्र. | कर्मचा–यांचे नांव | संवर्ग /हुद्दा | १२ वर्षेसेवा पुर्ण झाल्याचा | सध्या मिळत असलेल्या ५ व्या वेतन आयोगाची वेतन | १२ वर्षे पूर्ण झाल्या पासून अनुज्ञेय वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दि. | श्रेणी | दि. १८/४/९५ च्या शासन निर्णया नुसार | दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णया नुसार |
| १ | श्री. एच एल गाडे | पहारेकरी | १६/११/९८ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| २ | श्री. सुलतांन राजाराम | पहारेकरी | ३०/७/९३ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ३ | श्री. पी.बी.शिंदे | पहारेकरी | ३१/३/९४ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४ | श्री. दिपसिंग भावसिंग | पहारेकरी | १/७/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५ | श्री. शाम रेलूमल | पहारेकरी | ४/१/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ६ | श्री. पंचू यादव | पहारेकरी | ३/४/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ७ | श्री. पी.एल वायले | मजूर | ३०/९/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ८ | श्री. अे.अे.सोनावणे | मजूर | १४/२/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ९ | श्री. एच.जी. म्हस्कर | मजूर | ३१/१/२००२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १० | श्रीम. एस.एन पालेकर | मजूर | २२/११/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| ११ | श्री. पी.एच.ढोले | मजूर | २७/१२/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १२ | श्रीम. आर.के. गायकर | मजूर | ३/४/०३ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १३ | श्री. आर.एन फुलोरे | मजूर | ३१/५/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १४ | श्री. एम.एस. भोईर | मजूर | ३१/५/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| १५ | श्री. एस.एन. लालवाणी | मजूर | ३०/९/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| १६ | श्री. जी.एच खैरे | मजूर | १०/५/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| १७ | श्री. ए.बी.गवळी | मजूर | १८/११/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १८ | श्री. ए.एम.थत्ते | मजूर | २६/१२/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| १९ | श्री. जे.एस.शिगटे | मजूर | ३/४/०३ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| २० | श्रीम. एस.के.शिर्के | मजूर | ३/४/०३ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—६०—४००० |
| २१ | श्री. पुट्टप्पा कलप्प | माळी | २८/६/९० | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २२ | श्री. अन्नप्पा मडप्पा | माळी | २०/६/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २३ | श्री. मरिन्ना चिक्कन्ना | माळी | २०/२/९३, | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २४ | श्री. बैजनाथ रामधन | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २५ | श्री. निज्जप्पा कलप्पा | माळी | १८/८/९० | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २६ | श्री. रामदुलारे आवतार | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २७ | श्री. रामजी बाळू | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २८ | श्री. असाराम नारायण | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २९ | श्री. लक्ष्मण कल्लप्पा | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३० | श्री. श्रावण मुकुंद | माळी | ३१/५/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३१ | श्री. शांताराम महादेव | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३२ | श्री. वालकु जी मोरे | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३३ | श्री. ठाकुर व्ही. भोजवानी | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३४ | श्री. अमरसिंग वागरी | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | श्री. वसंत जी. कटारे | माळी | ४/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ३६ | श्री. रामचंद्र नामदेव | माळी | ४/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ३७ | श्री. पांडूरंग के. भोईर | माळी | ४/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ३८ | श्री. राजेंश शिंदे | माळी | ४/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ३९ | *श्री. कृष्णा धरमसिंग* | माळी | ५/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४० | श्री. विष्णू पवार | माळी | ५/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४१ | श्री. वेडू डी. शिरसाठ | माळी | ५/५/९५ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४२ | रामू कल्लप्पा | माळी | १६/१/९६ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४३ | श्री. बारकू एस. भोईर | माळी | १७/४/९७ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४४ | श्री. गौतम एन. सुरवाडे | माळी | १४/६/९७ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४५ | श्री. केशव जे. नारवाणी | माळी | ३१/५/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४६ | श्री. रामलाल बी. पवार | माळी | १०/७/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४७ | श्री. दिपक जी. रहेजा | माळी | २८/७/२००१ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ४८ | श्रीम. कमल एस. बाविस्कर | माळी | २९/४/०३ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—४००० |
| ४९ | श्री. ठाकूर डी. मनकानी | शिपाई | ३१/३/०२ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—४००० |
| ५० | श्री. अशोक वामन भोसले | शिपाई | २३/१२/९४ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५१ | श्री. प्रल्हाद डी. दलाल | शिपाई | ११/७/२००० | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५२ | श्री. अशोक मंडलीक | शिपाई | ३०/७/०१ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | श्री. लक्ष्मण एस. अल्हाड | कॅटल कॅचर | २१/५/८८ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५४ | श्री. दिलीप शिंदे | कॅटल कॅचर | ३०/११/९९ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५५ | श्री. जयप्रकाश जाधव | गॅरेज मदतनीस | ३१/८/८८ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५६ | श्री. रघुनाथ चौधरी | गॅरेज मदतनीस | १७/२/९४ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५७ | श्री.एस.एफ. पायल | गॅरेज मदतनीस | ३१/३/९४ १/१०/९४ | २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ५८ | श्री. आर. जे. राऊत | सफाई मुकादम | ८/५/९० | २६१०—६०—४००० | ३०५०—४५९० | — |
| ५९ | श्री. ज्युरी जैसवाल | विद्‌युत मदतनीस | ३१/३/९४ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०—४००० | — |
| ६० | श्री. इंद्रकुमार वरासिया | विद्‌युत मदतनीस | ३०/९/०० | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | २६१०——४००० | — |
| ६१ | श्रीम. आशा चुग | विद्‌युत मदतनीस | ३०/११/०१ | ७५०—१२—८७० द. रो—१४—९४० २५५०—५५—२६१०—६०—३२०० | — | २६१०—४००० |

**वरिष्ठ सुरक्षारक्षक** :— वरिष्ठ सुरक्षारखक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष अनु. जाती — १ पद असा आहे. सदर रिक्त पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा—यांना पदोन्ती द्‌यावयाची असल्याने श्री. रमेश वामन रणदिवे, सुरक्षारक्षक यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र यापूर्वी सादर न केल्यामुळे खुल्या प्रवर्गातील श्री. राजन खरात, सुरखारक्षक यांना दि. १८/७/२००३ रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आह. श्री. रमेश वामन रणदिवे, संरक्षारक्षक यांनी आता अनु. जातीचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्यामुळे सेवा जेष्ठतेनुसार ते वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदाच्या पदोन्तीसाठी पात्र आहेत. त्याूळे श्री. राजन खरात यांच्याऐवजी श्री. रमेश रणदिवे यांना वरिष्ठ सुरक्षारक्षक या अनु. जातीच्या आरक्षित असलेल्या पदवर पदोन्ती देणेसाठी निवड समिती शिफारस केली आहे.

**विजतंत्री** :— निवड समिती पुढे सादर केलेल्या पदोन्नतीचे प्रस्तावातील एकूण ४ कर्मचारी हे खुला प्रवर्गातील आसून विजतंत्री या संवर्गातील खुला प्रवर्गाचे सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या १ पदावर श्री. एम.आर.शेख , तारतंत्री हे सेवाजेष्ठतेनुसार पात्र असून विजतंत्री या पदाची अर्हता धारण करीत असल्याने सदर खुला प्रवर्गाचे १ पदावर श्री. एम. आर. शेख, तारतंत्री यांना विजतंत्री या पदावर पदोन्नती देता येईल.

निवड समितीने १२ वर्षाचा लाभ/पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठी शिफारस केलेल्या उपरोक्त विविध संवर्गातील कर्मचा—यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा / पदोन्नतीचा लाभ मिळणेकामी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

*महासभा ठराव क . २१*
*दिनांकः-२३/६/२००४.*

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे महापालिकेच्या सेवेत १२ वर्षापर्यंत पदोन्नती न मिळालेल्या वर निर्दिष्ट केलेल्या पात्र कर्मचा—यांना शासकिय धोरणाप्रमाणे वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देणेस मान्यता देत आहे व श्री. रमेश वामन रणदिवे, सुरक्षा रक्षक यांना वरीष्ठ सुरक्षा रक्षक व श्री. एम.आर. शेख, तारतंत्री यांना विजतंत्री या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/—

अनुमोदकांची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.*

*विषय क्र. ५:- तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.*

*मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :- मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, अनु.क्र. ७, ११ व १२ वर प्रभाग क्र. १२ असे लिहिले आहे. तर त्या जागी प्रभाग क्रमांक १३ अशी सुधारणा केली जावी.*

*मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :- मा. महापौर, यामध्ये एक रस्ता राहून गेला आहे. गांधी रोड ते निजधाम आश्रम या रस्त्याला निजधाम मार्ग असे नाव दिले तर बरे होईल. धन्यवाद. या प्रस्तावा सोबत तो देखील प्रस्ताव होता.*

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- मा. महापौर महोदया, अनु.क्र. १ वर सिध्देश्वर उदयान असे दर्शविले आहे, तर त्या ठिकाणाला यापूर्वीच सिध्देश्वर चौक असे नामकरण करण्यात आले आहे. या प्रस्तावासाठी कोणत्त्याही नगरसेवकाने पत्र दिलेले नाही, तर अनु. क्र. १ वरील बाब वगळण्यात यावी. तेथिल चौकाला सिध्देश्वर चौक असे नाव यापूर्वी दिलेले आहे.*

***यावेळी मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.***

*मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :- मा. महापौरजी, मला असे वाटते, विरोधी पक्ष नेत्त्यांनी जो प्रस्ताव केला आहे, तर मी सांगु इच्छितो की, मला याबाबत माहिती आहे. हे खरे आहे की, तेथिल चौकाला यापूर्वी सिध्देश्वर चौक असे नामकरण करण्यात आलेले आहे. कोणा व्यक्तीने मंत्रालयात जावून तेथून आयुक्तांच्या नावे शिफारस पत्र आणले आहे. तर मला असे वाटते की, त्यामुळेच यादीमध्ये या रस्त्याचे नाव आले आहे. यासाठी तेथिल संबंधित नगरसेवक श्री. बोडारे यांनी अदयाप समंती दिलेली नाही. तर मला असे वाटते की, जोपर्यंत ते यासाठी शिफारस करीत नाहीत तोपर्यंत या रस्त्याचे नाव स्थगित ठेवण्यात यावे.*

*मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मा. महापौर महोदया, या यादीमध्ये अनु. क्र. १६ वर जो रस्ता दर्शविला आहे, जो स्मशान भूमीपासून कुर्ला कॅम्प येथिल शिवनेरी हॉस्पीटल मार्गाने जातो, तर या रस्त्याला स्वर्गीय महम्मद रफी मार्ग असे दर्शविले आहे. परंतु माझी अशी सूचना आहे, त्या पूर्वी पदमश्री हा शब्द जोडण्यात यावा. '' पदमश्री स्वर्गीय महम्मद रफी मार्ग'' अशी सुधारणा त्यामध्ये करण्यात यावी. व दुसरे असे की, या रस्त्याचे नाव मी सुचविले होते. परंतु हा रस्ता*

आमच्या प्रभागातून इतर जवळच्या प्रभाग क्र. १० मध्ये जातो. तर यासाठी प्रभाग क्र. ९ व १० च्या नगरसेवकांनी जे सहकार्य दिले त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकूर :-</u> रस्त्यांना नावे दिली जात आहेत, तर मी आपणांस एक निवेदन करु इच्छितो की, प्रभात सिनेमा ते शिवमंदिर हा मुख्य रोड आहे, त्या रस्त्यावर मागील सात दिवसात दोन अपघात झालेले आहेत व त्यामध्ये दोघांचा मृत्यू झालेला आहे. त्या रस्त्यावर कुठेही गतीरोधक, झेब्रा क्रॉसिंग नाही. तर कृपया करून तेथे गतिरोधक बसवावा व त्यावर पटट्या मारून दयाव्यात.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी :-</u> मा. महापौरजी, सभागृहाला माझे निवेदन आहे की, कॅम्प नं. २ येथिल, ओटी सेक्शन मध्ये एक निजधाम आश्रम आहे, एक प्रस्ताव आला आहे की, त्या विभागाला अमरधाम चौक असे नाव दिले जावे. तर मी या सदनाला विनंती करते की, त्याची औपचारीकता पूर्ण झाली आहे. परंतु ते या प्रस्तावात आलेले नाही तर ते देखील पास केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा.महापौरजी, नामकरणाचा प्रस्ताव आला आहे, पहिले २५ नावे आहेत. त्याचबरोबर दुसरे ९ देखील नावे आहेत. ते सर्व पास केले जावे. जसे आमच्या विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले, व आमचे माजी महापौर यांनी सांगितले की, ते नगरसेवक मार्फत यायला हवे. तर अनु. क्र. १ वरील रस्ता वगळून इतर सर्व पास केले जावे. जसे सभापती स्थायी समिती यांनी सांगितले तर तो देखील प्रस्ताव मंजुर केला जावा. तर मी समजतो की, त्याला कुणाची काही हरकत नाही. तर सर्वानुमते एक रस्ता वगळून सदस्यांनी सुचविलेले इतर रस्ते पास केले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u>मा. महापौर, सचिव साहेब, या विषयावर मी बोलू इच्छितो, महापालिकेतर्फे पूर्ण शहरात कुठल्याही चौकास जेव्हा नामकरण करण्यात येते, तर त्यावेळेस त्याठिकाणी त्या रस्त्यावर काही अनाधिकृत फलक काही व्यक्ती लावतात. तर अशावेळी महापालिकेचे कर्तव्य आहे की ते फलक काढुन टाकण्यात यावेत. अन्यथा येथे जे पास होते त्याला काही अर्थ उरणार नाही. असे एक उदाहरण आहे कॅम्प नं. १ येथे एक सिंधी पेपर लिडर प्रकाशित होते. तेथे माता मजनीबाई चौक असे नामकरण करण्यात आले होते तेथेच शेजारी कुणीतरी फलक लावला आहे. त्याबददल मी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले देखिल आहे. तो फलक हटविण्यासाठी मी सांगितले आहे. तर मी निवेदन करतो की, तो जो फलक आहे तो तात्काळ हटविण्यात यावा. भविष्यात असे प्रकार घडु नयेत म्हणुन महापालिकेतर्फे पाउले उचलण्यात यावीत.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ५:-</u> तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अ. | रस्त्या/ चौक | प्रस्तावित नांव |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | बॅरेक नं. ५७५ ते बॅरेक नं. ६२५ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-२ | ''स्वामी अमरदास नगर '' |
| २ | उल्हासनगर-१, मधील नगर न्युज प्रेस समोरील उद्यानास | ''इंदिरा गांधी यादगार उद्यान'' |
| ३ | उल्हासनगर-४, मधील प्रभाग कमांक १६, मधील चित्रा पॅलेस ते बॅ.नं.१३९४ ते बॅ.नं. १३९७ पर्यंतच्या मार्गास | ''दासूमल कारारा मार्ग'' |
| ४ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील बॅ.नं. २०८४ ते बॅ.नं. २०८५ पर्यंतच्या रस्त्यास | ''मुखी शिणकुमल रामचंदाणी मार्ग'' |
| ५ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील झुलेलाल टॉवर, ओ.टी.सेक्शन येथील चौकास | ''गुरुनानक देव चौक'' |
| ६ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील, बॅ.नं.२०७१ मधील रुम नं.११ ते २० पर्यंतच्या रस्त्यास | ''श्री.फतीचंद उध्दवदास चिचडेजा मार्ग'' |
| ७ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक १३ मधील, ब्लॉक नंबर ७१४ ते ७४१ पर्यंतच्या वस्तीस | ''सहयादी नगर'' |
| ८ | उल्हासनग-५ प्रभाग कमांक १२ मधील बॅ.नं. १७७९ ते दसरा मैदान पर्यतच्या रस्तास | ''स्वामी सर्वानंदजी महाराज मार्ग'' |
| ९ | उल्हासनगर-५ प्रभाग कमांक १२ मधील तिरथ टॉवरपासून प्रभाराम अपार्टमेंटच्या परिसरास | ''भगत नगर'' |
| १० | उल्हासनगनर-५ प्रभाग कमांक १२ मधील जॅकी प्लॉझा हॉटेल पासून ते ब्लॉक सी-४ सी-६ मार्गे, कुलदेवी माता मंदिर ते डॉ. लाला यांच्या घरापासून पॅनारामा अपार्टमेंटच्या परिसरास | ''सुख निधान नगर'' |
| ११ | उल्हासनगर-५, मधील प्रभाग कमांक १३ सरस्वती अपार्टमेंटपासून ते निजधाम अपार्टमेंटच्या रस्त्यास | ''स्वामी रामदासजी महाराज मार्ग'' |
| १२ | उल्हासनगर-५, प्रभाग कमांक १३ मधील सुगन पॅलेस ते निजधाम मंदिरापर्यंत (ब्लॉक नं.७७९ ते ब्लॉक नं.७९३) पर्यंतच्या मारिषा अपार्टमेंटच्या रस्त्यास | ''जय बाबा धाम मार्ग'' |
| १३ | उल्हासनगर-४, मधील प्रभाग कमांक ९, मधील सिध्दार्थ हौ.सो.ब्लॉक नं. ४४६ समोरील कानसईरोड येथील चौकास | ''युवा नेते चंद्रशेखर भालेराव चौक'' |
| १४ | उल्हासनगर-२ मधील अमन टॉकीजजवळील चौकास | ''संत सतरामदास चौक'' |
| १५ | उल्हासनगर-३, प्रभाग कमांक १ मधील माता सप्तश्रुगी चौक ते राणा कंम्पाउंडजवळील महात्मा फुले चौक पर्यंतच्या रस्त्यास | ''माता रेणूका देवी माहूरगड मार्ग '' |
| १६ | उल्हासनगर-४ ,प्रभाग कमांक १४ मधील व्हिनस लाल चक्की मार्गावरील वखारीपासून, स्मशानभूमी, शिवनेरी हॉस्पीटल, अंबिका बेकरी, बुध्द विहार, | ''पदमश्री स्वर्गीय महम्मद रफी मार्ग'' |

| | | |
|---|---|---|
| | सर्टीफॉईल स्कूल मार्गे, नितनवरे यांचे घरापर्यंतचे रस्त्यास | |
| १७ | उल्हासनगर-४ प्रभाग क्रमांक १४ मधील, विनु अपार्टमेंट पासून भक्ती अपार्टमेंटपर्यंतच्या रस्त्यास | ''स्वातंत्र सैनिक श्री. नारायण बाबुराव शिंदे मार्ग'' |
| १८ | उल्हासनगर-१ प्रभाग कमांक ४ मधील बेवस चौक ते शिवशक्ती अपार्टमेंट टिळकनगर पर्यतच्या रस्त्यास | ''दादा कन्हैयालाल पारवानी रोड'' |
| १९ | उल्हासनगर-१ प्रभाग कमांक ४ मधील बॅ.नं. २०९ ते २११ पर्यतच्या रस्त्यास | ''ताराचंद लाहोरी मार्ग'' |
| २० | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक. ६ मधील,चंद्रशेखर आझाद शाळेसमोरील चौकास | ''श्री चंद्रशेखर आझाद चौक'' |
| २१ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील,आझाद पॉवर लॉड्रीजवळील चौकास | ''स्व. रामभाऊ म्हाळगी चौक'' |
| २२ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, कुंज बिहारी तब्बेला शेजारील चौकास | ''राहूल चौक'' |
| २३ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, वडार कॉलनी चौकास | ''जय संतोषी माता चौक'' |
| २४ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील,रुहाणी संतसंग ते चंद्रशेखर आझाद शाळेपर्यंतचे रस्त्यास | ''साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे मार्ग'' |
| २५ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, चंद्रशेखर शाळे पासून आनंद शिंदे यांचे घरापर्यंतचे रस्त्यास | ''शहिद मंगल पांडे मार्ग'' |
| २६ | उल्हासनगर -३ येथील कल्याण-अंबरनाथ रोडवरील परमानंद ट्रान्सपोर्ट समोरील चौकास, | कै. अण्णासाहेब पांडुरंग पाटिल चौक |
| २७ | उल्हासनगर-१ येथील सतनाम बी. अपार्टमेंट ते गुलशन अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यास. | ''स्वर्गीय होतुसिंग गुणसिंग गुलबान मार्ग'' |
| २८ | उल्हासनगर-२ मधील वाह गुरू चक्की बॅरेक नंबर ७०३ समोर ते रामरात यादव, यांचे घर ते नाल्यापर्यंत या विभागास | ''महा महिंदर नगर'' |
| २९ | उल्हासनगर-१ मधील बॅ. नं. ५७८ अे ते बॅ. नं. ५८८ पर्यंतच्या रस्त्यास | ''स्वर्गीय मोटुमल शर्मा (जाजक)मार्ग'' |
| ३० | उल्हासनगर-४मधील उल्हास रेल्वे स्टेशन समोरील जकात नाका क्रमांक ७ समोरील चौकास | ''कै.प्रतापराव मारूती सावंत चौक'' |
| ३१ | उल्हासनगर-१ प्रभाग क्र. २ मधील, ओ.टी. सेक्शन पोस्ट ऑफिस येथिल चौकास | ''डॉ. हजारीमल चौक'' |
| ३२ | उल्हासनगर-२ प्रभाग क्रमांक २२ येथे इ. एस. आय. दवाखानाजवळ तसेच सतनाम कॉलनी उल्हासनगर -२ येथे व जपानी बाजार मिलद दुप्पटा कापड दुकान याठिकाणी | ''श्री. नारायणदास एल. रामरख्यानी प्रवेशव्दार'' |
| ३३ | उल्हासनगर-२ प्रभाग क्रमांक २२ सोनार हॉल मातामंदिरजवळ | ''श्री. हरिसिंग मिलापसिंग लबाणा प्रवेशव्दार'' |

| | | |
|---|---|---|
| ३४ | गांधी रोड, तहसिलदार कार्यालय ते निजधाम आश्रम गेट, उल्हासनगर-५ | ''निजधाम आश्रम मार्ग'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही नांवाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव क्रमांक ५, दिनांक ११.२.२००४ अन्वये २५ व ठराव क्रमांक ६, दिनांक ७.६.२००४ अन्वये ८ असे एकूण ३३ उपरोक्त दर्शाविलेले नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर/ अध्यक्ष व इतर चार सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण ३३ नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

सभेतील चर्चेअंती, तदर्थ नामकरण समितीचे दिनांक ११.२.२००४ रोजीचे ठराव क्र. ५, मधील अनुक्रमांक १ वर दर्शाविलेले नाव वगळून त्या जागी बॅरेक नं. ५७५ ते बॅरेक नं. ६२५ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-२ या जागेस स्वामी अमरदास नगर व अनुक्रमांक ३४ वर गांधी रोड, तहसिलदार कार्यालय ते निजधाम आश्रम गेट, उल्हासनगर-५ या रस्त्यास निजधाम आश्रम मार्ग असे नाव देण्याचा प्रस्ताव समाविष्ट करुन एकुण ३४ जागांना नावे देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव महासभेपूढे प्रस्तावित

महासभा ठराव क्र. २२ दिनांकः-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)

अनुमोदकाचे नाव :- श्री. पंजाबी नारायण

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरुन वर नमूद केलेल्या उक्त रस्त्यांचे, सार्वजनिक जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ६:-</u> श्री उत्तम लोणारे यांची महापालिकेच्या सेवेत उपआयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ६:- श्री उत्तम लोणारे यांची महापालिकेच्या सेवेत उपआयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः-

महाराष्ट्र शासन, गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ३१ मे, २००३ च्या आदेशान्वये श्री. उत्तम लोणारे यांची या महापालिकेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे. त्यानुसार श्री. उत्तम लोणारे हे या महापालिकेत दि. २.६.२००३ पासुन कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ नुसार महासभा ठराव क्र. ४९ दिनांक १८.७.२००३ नुसार श्री. उत्तम लोणारे यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीची मुदत दिनांक २.६.२००४ रोजी संपुष्ठात येत आहे.

श्री. उत्तम लोणारे यांच्या प्रतिनियुक्तीच्या वाढीव कालावधीस आणखी दोन वर्षाकरिता मान्यता मिळणेकामी महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. २३ दिनांकः-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री उत्तम लोणारे, उप-आयुक्त यांना महापालिका सेवेत दिनांक २/६/२००३ पासून दोन वर्षाचे कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

सर्वानुमते

महापौर / पीठसीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ७:- सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहुन यु. एन. एफ. पी. ए साहयक

एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रु ८ ,३८ ,३२७/- ची रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव आला आहे तर हे पैसे कोणत्त्या वर्षासाठी दयायचे आहेत. यावर्षीसाठी दयायचे आहेत की तीन-चार वर्षा पुर्वीचे दयायचे आहेत हे आमच्या समोर यायला हवे कारण यावर्षी आपल्याला ८ ,३८३२७/-रू. कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाहीत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, आपल्या येथे एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पा अंतर्गत काम चालु आहे त्याच्या कंन्ट्री प्लान क्रमांक ५ मध्ये आपणांस ९० टक्के अनुदान प्राप्त झाले होते व त्यावेळी तत्त्कालिन आयुक्त श्री. शुळ साहेब यांनी राज्यशासनाला अभिवचन दिले होते की, महापालिकेतर्फे १० टक्के रक्कम भरण्यात येईल. ती रक्कम अदयाप दिलेली नाही कारण त्यास महानगरपालिकेची मान्यता नव्हती. १९९६सालची ही गोष्ट आहे. त्यावेळी ही बाब महापालिकेसमोर येवुन रक्कमेचा भरणा करणे योग्य झाले असते कारण त्यावेळी त्यांचे ९० टक्के अनुदान आपणांस प्राप्त झाले होते थोडीफार बाकी आहे. जवळ जवळ रू. ७० लाख अनुदानापोटी आपणांस मिळणार आहे. जर आपण एवढे पैसे भरले तर. त्यावेळी हा प्रस्ताव मंजुर व्हायला हवा होता. त्यावेळी ठेवला नाही म्हणुन आम्ही आता हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौर महोदया, यु.एन.एफ.पी.ए. च्या अंतर्गत शहरामध्ये एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पा अंतर्गतचे जे वेगवेगळे कार्यक्रम चालतात त्यामध्ये आरोग्य विषयक व इतर कार्यक्रम असतात. पंरतु याची माहिती सदस्यांना कमी असते. या योजने अंतर्गत चांगले कार्यक्रम शहरात चालतात. झोपडपट्ट्यांमध्ये देखिल या योजने अंतर्गत चांगले काम केले जाते. परंतु सदस्यांना याची माहिती कमी असते त्यामुळे माझी आयुक्तांना विंनती आहे की, येणा-या महासभेत यु.एन.एफ.पी.ए च्या अंतर्गत जी कामे करण्यात आली आहेत. त्याची माहिती आम्हास देण्यात यावी व माझी अशी देखिल विनंती आहे की, या योजने अंतर्गत सदस्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेतल्यास चांगले होईल.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास

<u>मा. महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ७:-</u> सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहुन यु. एन. एफ. पी. ए साहयक एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रु ८ ,३८ ,३२७/- ची रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:-</u>

यु. एन. एफ. पी. ए. सहाय्यित एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प, उल्हासनगर महानगरपालिकेत सन १९९८ ते २००२ या कालावधीत राबविणेत आला. सदर प्रकल्पांतर्गत झालेल्या एकुण खर्चापैकी १० टक्के रक्कम महानगरपालिकेने खर्च करण्याबाबत आणि प्रकल्प संपुष्ठात आल्यानंतर होणा-या आवर्ती खर्चाचा भार

उचलण्यास तत्कालीन मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सहमती दिलेली होती. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने रू. ८,३८,३२७/- (आठ लाख अडतीस हजार तीनशे सत्ताविस मात्र) इतकी रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करावयाची आहे. सदर रक्कम राज्य आर.सी. एच सोसायटीकडे जमा करण्यासाठीचे अ.शा.पत्र क्र. आयपीडी-१००३ /३१०/प्र.क्र.५४/क क.१ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ए दि. १३ फेब्रुवारी, २००४ या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

सन २००४-२००५ च्या अंदाजपत्रकात सदरचा खर्च भागविण्यासाठी तरतुद करण्यात आलेली नाही. सदर खर्चासाठीची तरतुद सुधारित अंदाजपत्रकात करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात सदर रक्कम अदा करण्याचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

महासभा ठराव क्र. २४ दिनांकः-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहून यु. एन. एफ. पी. ए. सहाय्यित एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रुपये ८,३८,३२७/- ची रक्कम राज्य आर.सी.एच. सोसायटीस अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आयत्त्यावेळचा विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>विषय क्र. ८:-</u> पैसे द्या व वापरा तत्त्वावर शौचालय देखभाल व दुरूस्तीसाठी विविध संस्थाना देणे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौर महोदया, हा प्रस्ताव आणताना प्रशासनाकडुन काही चुका झालेल्या आहेत त्यामुळे हा विषय नियमित विषय सुचीवर आणण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-</u> नियमीत विषय सुचीवर हा विषय आणण्यात यावा.

<u>काही सदस्य :-</u> नियमीत विषय सुचीवर हा विषय आणण्यात यावा.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा विषय नियमित विषय सुचीवर आणण्यांत यावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ७. ३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः-२३/६/२००४

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२३/६/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.६.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून ही सभा बुधवार दिनांक २३.६.२००४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. साधवानी मनोज |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५४. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६ | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास, |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम | ५९. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम | ६८. | श्री. दिलीप लालवानी |
| ३५. | श्रीमती. खिलनानी भावना | | |
| ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु काशीराम, २. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ३.श्री. टाले प्रमोद नामदेवराव,४. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, ५. श्री. रमेश चव्हाण, ६. श्री. प्रशांत जाधव, ७. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,८. श्रीमती. किरण माखिजा,९. श्री. बहरानी मोहन, १०. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी,११, श्री. बेहरानी ठाकुरदास, १२. श्री. वदरीया राजेश हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>एक अभिनंदन प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्याचे सुचक श्री. राज असरोंडकर व अनुमोदक श्री. धनंजय बोडारे हे आहेत. श्री. योगेश

खेमचंद धांडे या विदयार्थ्यांने दहावीच्या परिक्षेत मुंबई विभागात गुणवत्ता यादीमध्ये ९वे स्थान प्राप्त केले आहे. त्यांनी दहावीच्या परिक्षेत ९३. २० टक्के एवढे गुण प्राप्त केले आहेत. ते अभिनंदनास पात्र असल्याने आपण सर्वांनी मिळुन त्यांचे अभिनंदन करावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-मा. महापौर महोदया, काही दिवसापुर्वी या शहरातील सामना या वृत्तपत्राचे प्रतिनिधी श्री. दिनेश गोगी यांच्या वडीलांचे निधन झालेले आहे. तर त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी अशी सूचना आहे.

मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानीः-अजुन एक प्रस्ताव आहे. आपले सन्माननिय सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे यांच्या मातोश्रींचे देखिल काही दिवसापुर्वी निधन झाले आहे त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-कृपया सर्वांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पित करावी.

सुचकाचे नाव :- श्रीमती. ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर शहरातील सामना या वृत्तपत्राचे प्रतिनिधी श्री. दिनेश गोगी यांचे वडील श्री. गोटीराम सुपाजी पवार यांचे व उल्हासनगर महानगरपालिकेचे सन्माननिय सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे यांच्या मातोश्री श्रीमती चंद्राबाई हरीभाऊ लिंग यांचे नुकतेच निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २० अ दिनांकः-२३ ६ २००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. गोटीराम सुपाजी पवार व श्रीमती चंद्राबाई हरीभाऊ लिंगे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा महापौर महोदया,.....

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>मा. महापौर महोदया, मागील काही बैठकीमध्ये महासभेत एक प्रस्ताव पारीत झाला होता की, या सभागृहात गुरूनानक यांची तसबीर लावली जावी. आपण त्याला परवानगी देखिल दिली होती. तर आज आम्ही गुरूनानक यांची तसबीर आणली असुन ती येथे लावण्यास आम्हाला कृपया परवानगी दयावी. तसेच सर्वांना मिठाई वाटण्याची देखिल परवानगी दयावी. मी श्री. भुल्लर यांना देखिल विनंती करेन की, आपणही आमच्या समवेत सदरची तसबीर लावण्यासाठी यावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सत्तापक्षातील सदस्य अशा प्रकरणांमध्ये देखिल दुजाभाव करीत आहेत. मी यांना आधी बोललो की तसबीर लावु या त्यावेळी यांनी सांगितले की मोठी मिरवणुक काढुन त्यानंतर चांगल्या प्रकारे सन्मानाने तसबीर लावु. आता ही पध्दत चुकीची आहे. तसबीर लावण्यास आमचा विरोध नाही. परंतु हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>एकच गोष्ट आहे. आम्ही लावली काय आणि तुम्ही लावली काय? गुरूनानक सर्वांचे आहेत, तुमचेही आहेत, आमचेही आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मी आपल्याला सांगु इच्छितो की, मला देखिल याची माहिती नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>श्री. वलेचा आपण मध्ये मध्ये बोलु नका. तुम्हाला याबद्दल काही माहिती नाही.

<u>मा. महापौरः-</u>गुरूनानक यांची तसबीर लावण्यास परवानगी देण्यात येत आहे.

यावेळी गुरूनानक यांची तसबीर लावण्यात आली व हार व पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आले.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, या सभागृहामध्ये थोडया वेळापुर्वी एक अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला की, ज्ञानदा विद्यामंदीर या शाळेचा योगेश धांडे नावाचा एक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेला आहे. तर ज्ञानदा मंदीर ही शाळा या शहरातील काही उच्चभ्रु शाळांमध्ये गणली जात नाही. आणि या शाळेभोवती एक प्रतिकुल परिस्थिती आहे. शिक्षकांच्या व पालकांच्या मेहनतीमुळे मध्यम वर्गातील एक विद्यार्थी गुणवत्ता यादीत ९वा येवुन त्याने ९३. २० टक्के एवढे गुण प्राप्त केलेले आहेत. त्याचा जो अभिनंदन ठराव आपण या ठिकाणी मांडला आहे. तर तो ठराव एक औपचारीकता म्हणुन सिमित न रहता हा जो विद्यार्थी आहे त्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने जाहिर सत्कार करून अभिनंदन करायला हवे अशी माझी मागणी आहे. आमच्या युतीच्या वतीने आणि त्या शाळेला सुध्दा बीपीएमसी ॲक्टच्या चौकटीत काही विशेष शैक्षणिक सुविधा जर पुरवता आल्या तर त्या शाळेला सुध्दा प्रोत्साहन मिळु शकेल असे दोन प्रस्ताव मी या ठिकाणी सभागृहात मांडत आहे. तर माझी महापौरांना विनंती आहे की त्यांनी त्या विद्यार्थ्याचा व शाळेचा सत्कार करण्यासाठी आयुक्तांना आदेशित करावे.

## अभिनंदन प्रस्ताव

सुचक :- श्री. राज असरोंडकर

अनुमोदक :- श्री. धनंजय बोडारे

सन २००३-२००४ च्या शालांत परिक्षेत उल्हासनगर-४ येथिल ज्ञानदा विदयामंदिर या शाळेतील कुमार योगेश खेमचंद धांडे हा विदयार्थी ९३.२० टक्के गुण मिळवून मुंबई विभागात गुणवत्ता यादीत ९ व्या क्रमांकावर झळकलेला आहे.

सदर विद्यार्थ्याने अतुलनिय यश प्राप्त करून उल्हासनगर शहराच्या नावलौकीकात भर घातलेली आहे. याबददल सदरहु विद्यार्थ्यांचा महापालिकेतर्फे जाहिर सत्त्कार व अभिनंदन करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २० ब                    दिनांक:-२३.६.२००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कु. योगेश खेमचंद धांडे या उल्हासनगरच्या विद्यार्थ्याने सन २००३-२००४ च्या शालांत परिक्षेत मुंबई विभागात ९ व्या क्रमांकाचे स्थान ग्रहण करून उल्हासनगर शहराच्या नाव लौकीकात भर घातल्याने त्याचे अभिनंदन करित आहे. व महापालिकेतर्फे सदर विद्यार्थ्याचा येत्त्या १५ ऑगस्टला जाहिर सत्त्कार करणे मान्य करित आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-१५ ऑगस्टला महापालिकेच्या वतीने सदर विद्यार्थ्याचा सत्त्कार करण्यात येईल. विषय क्रमांक ४ ............

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, आज या महानगरपालिकेच्या बाहेर शहरातील बरेचसे पत्रकार धरणे धरून बसलेले आहेत. मागील महासभेत जेव्हा कालानी परिवाराव्दारे चालविण्यात येणा-या एका न्यासाचा, कर न भरण्याचा विषय चालु होता. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, रू. २५,०००वर ज्यांची करांची थकबाकी आहे त्यांची यादी प्रसिध्द केली जावी. त्यावेळी पत्रकारांना एका सदस्यांने ब्लॅकमेलर असे संबोधले होते. याबददल सर्व पत्रकारांनी खेद व्यक्त केला आहे. म्हणुन मला असे वाटते की, या शहरातील सर्व पत्रकार आमचे बंधु आहेत. ते आज धरण्यावर बसले आहेत. तर मला असे वाटते, त्यांची देखिल मागणी आहे की सदस्य श्री. नारायण पंजाबी यांनी त्यांना ब्लॅकमेलर असे म्हंटले आहे तर त्यासाठी त्यांनी त्यांची माफी मागावी. याबददल त्यांनी सभागृहात खेद प्रकट करायला हवा. असे केल्यास योग्य होईल.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-मा. महापौरजी, आमचे श्री. पंजाबी साहेब यांनी जे विधान केले होते त्याचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. त्यांनी एका विवक्षित

*पत्रकाराबददल सदरचे उदगार काढले होते. सर्व पत्रकारांसाठी सदरचे उदगार नव्हते ही बाब लक्षात घेतली जावी.*

***<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>***कुणी एक पत्रकार नव्हता तर मग जो होता त्याचे नाव घेतले जावे.*

***<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना: '-</u>***सदरचे उदगार हे फक्त एका पत्रकाराशी संबंधित होते व ते आयुक्तांसमोर त्यावेळी सांगण्यात आले होते ते उदगार सर्व पत्रकारांसाठी नव्हते.*

***<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:-</u>***ते उदगार एका पत्रकारासाठीच होते.*

***<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>***पत्रकाराच्या नावाचा खुलासा येथे व्हायला हवा. तुम्ही असे बोलुन सर्वांना बदनाम करीत आहात. आणि या सर्व लोकांना बदनाम केल्याबददल आपण येथे माफी मागायला हवी. मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब जोपर्यंत हे माफी मागत नाहीत तोपर्यंत आम्ही सभेचे कामकाज चालु देणार नाही.*

***<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना::-</u>***कशाबददल माफी मागावी.*

***<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :-</u>*** *शहरातील पत्रकारांना ब्लॅकमेलर असे बोलल्या बददल माफी मागावी.*

***<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>*** *आता येथे जर कुणी बोलले की, नगरसेवक चोर आहेत, तर सर्व नगरसेवक चोर आहेत, असे होते. यासाठी नगरसेवकाचे नाव घ्यायला हवे. याचप्रकारे ज्या पत्रकाराबददल सदरचे उदगार काढले आहे, त्याचे देखील नाव घेण्यात यावे.*

*यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.*

***<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>***ते एकाच पत्रकाराबददल बोलले होते. आपण उगाच हे प्रकरण वाढवित आहात. हे चुकीचे आहे.*

***<u>मा. सदस्य श्री. चिमन रुपानी :-</u>*** *एकाच पत्रकाराबददल बोलण्यात आले होते.*

***<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>*** *त्या पत्रकाराचे नाव सांगावे व इतर पत्रकारांची माफी मागावी.*

***<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u>*** *महाराजजी, आमचे विरोधी पक्ष नेते जर आपणांस त्या पत्रकाराचे नाव ऐकण्याची हौस असेल, आपण महासभेचे कामकाज चालु देणार नसाल. एक ब्लॅकमेलर पत्रकार ज्याचे मी नाव घेणार आहे.*

***<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>***आपण असे कसे बोलता की हौस आहे? आपणांस अहंकार आहे. हे आपल्या भाषेवरुन दिसून येते.*

*यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.*

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> आपणांस त्या पत्रकाराचे नाव हवे असेल तर ते मी सांगतो, व त्याने केलेल्या कार्यांचा देखील तपशिल देतो. आपण कृपया शांततेने ऐकून घ्यावे. मा. महापौरजी..........

यावेळी सभागृहाच्या प्रेक्षागृहात काही व्यक्ती जोर-जोराने आरडा-ओरडा करीत होत्त्या.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>त्या पत्रकाराने माझ्या प्रभागात काही कामाच्या मोबदल्यात दहा हजार रूपये मागितले होते ते मी न दिल्याने तो माझ्या नावाने ओरडत होता........

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> मा. महापौर व आयुक्त साहेब, आपण हा जो नविन माणूस श्री. भदाणे याला बसविले आहे, त्याच्यामुळे प्रेक्षागृहात भांडणे होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> प्रेक्षा गॅलरी रिकामी करा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> कृपया प्रेक्षागृहात शांतता ठेवावी.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी :-</u> यासाठी पोलिसांना लवकरात-लवकर पाचारण करावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, या गोंधळ करणा-या व्यक्तींना जाणून-बूजून बोलविण्यात आले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> जाणून-बूजून बोलविले आहे व हे सर्व श्री. युवराज भदाणे यांच्यामुळे होत आहे.
<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> असे असेल तर आम्हीही लोकांना बोलवू. सभागृहात थकले म्हणून प्रेक्षागृहात दंगा करायला लोकांना बोलाविले आहे का?

<u>मा. सदस्य श्री. मनोज साधवानी :-</u> यामध्ये आमचा कुणीही माणूस नाही.
<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> या सर्वांना जाणून-बूजून बोलविले असून या सर्व व्यक्ती समाजकंटक आहेत.
<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> सचिव साहेब, प्रेक्षागृहासाठी पास कोण-कोणत्त्या व्यक्तींना दिले, कोणाच्या शिफारशीने दिले, याची चौकशी केली जावी. ज्या व्यक्तींची नावे पोलिस स्टेशनमध्ये आहेत, गुन्हेगार आहेत, अशा व्यक्तींना पास दिलेले आहेत. त्याचा परिणाम हा आहे.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :-</u> ही सर्व तुमच्या लोकांची चाल आहे. वर आमचा कुणीही माणूस नाही.

<u>मा. महापौर :-</u> पोलिसांनी व सुरक्षा रक्षकांनी तावडतोब प्रेक्षागृहात जावून परिस्थतीवर नियंत्रण आणावे. कारण सभागृहाचे कामकाज बिघडता कामा नये.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u> शहरात व महापालिकेत हे लोक दंगा करु इच्छितात.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u>प्रेक्षागृहात बसलेले लोक आपणाकडुन आदेश घेत आहेत. आपण काय बोलता?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> शांतीने खाली बसावे.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, वर प्रेक्षागृहात बसलेली दाढीवाली व्यक्ती यांच्याशी इशा-याने बोलत आहे. तुम्ही गप्प बसा. मर्यादेच्या बाहेर जावू नका.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> कोणाच्या शिफारसीने कोणती व्यक्ती प्रेक्षागृहात गेलेली आहे. याची चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मी यांना सांगतो आहे की, वर बसलेले लोक आमचे नाहीत तर राजेंद्र चौधरी मला सांगतात की, खाली बसा. तर आम्ही खाली का बसावे?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, कोणाच्या शिफारसीने कोणती व्यक्ती प्रेक्षागृहात गेलेली आहे. याची चौकशी केली जावी. तसेच त्या व्यक्ती कश्या प्रकारच्या आहेत, याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> तो जो वर बसलेला दाढीवाला माणूस आहे, तो यांच्याशी इशा-याने बोलीत आहे. तो कोण आहे याची चौकशी केली जावी. हे बोलले की, ती तुमची माणस आहेत, त्यावर मी त्यांना सांगितले की, ती आमची माणसं नाहीत. यावर श्री. राजेंद्र चौधरी हे मला खाली बसण्यासाठी सांगत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> प्रेक्षागृहात बसलेल्या व्यक्तींना कोणी शिफारस केली, याची चौकशी करुन त्याची यादी तयार केली जावी. याची इत्त्यंभूत माहिती आताच्या-आता मागवून चौकशी केली जावी. आयुक्त साहेब, याची माहिती आम्हांला येथे दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> सदरची यादी पोलिस स्टेशनला देवून त्याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> मा. महापौरजी, माझी देखील हीच मागणी आहे की, जे लोक आज वर आले आहेत, त्यांची चौकशी केली जावी. ती व्यक्ती कोण आहे, व यांच्या इशा-याने काम का करीत आहे? याची देखील चौकशी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री धनंजय बोडारे :-</u> तुम्ही अशाप्रकारे सभा चालवत असाल तर मग चालवुन दाखवा.

<u>मा. सदस्य श्री दिलीप गायकवाड :-</u> आम्ही पण बघतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> श्री. गायकवाड, तुम्ही का भांडण करीत आहात? नगरसेवक आपसात का भांडण करीत आहेत? तुम्ही महापालिकेत बसलेले आहात, नगरसेवक आहात. तर मग असे का करता? तुम्हांला सर्व शहर बघत आहे. पत्रकार बघत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>कृपया हा राजकिय मुददा बनवू नये. महासभेचे जे शांतीचे वातावरण आहे, ते कायम ठेवावे. व श्री. पंजाबी जे बोलू इच्छित आहेत, ते त्यांना बोलू दयावे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> मा. महापौरजी, मागील महासभेत चर्चा सुरु होती, त्यामध्ये ज्यांची कराची थकबाकी रुपये २५,०००/- पेक्षा जास्त आहे, अशा व्यक्तींची यादी दिली जावी, अशी मागणी आमचे नगरसेवक श्री. लाल पंजाबी यांनी आयुक्तांना केली होती. तर त्यावेळी त्यामध्ये मी असे बोललो होतो की, यापूर्वी देखील आपल्या महापालिकेने अश्या व्यक्तींची एक यादी जाहिर केली होती, व ती यादी चार-पाच पत्रकारांना न देता फक्त एकाच पत्रकाराला देण्यात आली होती. त्याला पत्रकार असे म्हणणे देखील मला लाजिरवाणे वाटते. कारण तो पत्रकारांवर अन्याय करीत आहे. त्या व्यक्तीचे कृत्य मी आपणांस येथे सांगु इच्छितो. आपल्या मागील महासभेमध्ये सर्वात वरीष्ठ नगरसेवक श्री. गोप बेहरानी हे होते. त्यांचा फोटो हा पत्रकार दररोज वृत्तपत्रात छापत असे. १५ दिवस, एक-एक महिना फोटो छापत असे. तो शहरातील वरीष्ठ नागरिक, वरीष्ठ राजकीय व्यक्ती यांचा विचार करीत नसे. तो पत्रकार होता त्यावेळी त्याला हे कळत नव्हते. या उपर ही मी सांगु इच्छितो आपल्या शहरात सिंधी नागरिकांची नवजीवन बँक आहे जीचे नाव फार प्रसिध्द आहे. या बँकेला बुडविण्याच्या मागे तो लागला होता. तो सर्वांना सांगत असे की बँकेतुन पैसे काढुन घ्या. पैसे न काढल्यास ते बुडतील. आता यावेळी त्या बँकेचे दोन संचालक नगरसेवक म्हणुन येथे बसलेले आहेत. त्यांना देखिल माहित आहे की, त्या बँकेच्या मागे तो ब्लॅकमेलर कसा लागला होता. तो बँकेकडुन देखिल पैसे मागत होता. बँकेतुन पैस न मिळाल्याने तो बँक बुडवायच्या मागे लागला होता. तो सर्व शहरातील लोकांची दिशाभुल करीत होता. एवढया चांगल्या बँकेसाठी तो एवढे वाईट कार्य करत होता यासाठी त्याला लाज वाटायला हवी. आमचे सहयोगी श्री. मोहन बेहरानी जे आमचे वरीष्ठ नगरसेवक आहेत, त्याची दादागिरी एवढी वाढली की लोणावळा येथे त्याने श्री. मोहन बेहरानी यांच्याशी मारामारी केली होती. त्याला पोलिसांचे देखिल भय नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>आपण नाव सांगावे. इतिहास सांगु नका.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>कृपया ऐकण्याची हिंमत ठेवा. चुकीच्या माणसाला साथ देवू नका.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>आपण भांडणाचे वातावरण निर्माण करू नका. शांतता ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मी आपल्याला सर्व सांगतो, त्याचे नाव देखिल सांगतो. आपण ऐकण्याची हिंमत ठेवावी. तुम्ही आम्हाला सभा न चालविण्याचा दम का देता? आम्ही तयार आहोत. आम्ही प्रत्येक गोष्टीचा पुरेपुर विरोध करू. मी आपल्याला अजुन एक महत्त्वाची गोष्ट सांगु इच्छितो. कदाचित आपण विसरला असाल परंतु मी विसरणार नाही. आपले शिवसेनेचे हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या विरूध्द देखिल त्याने चुकीचे शब्द उच्चारले होते व त्यामुळे आपले शाखा प्रमुख श्री. लहु नाईक यांनी त्याचे तोंड काळे केले होते. आपण अशा पत्रकारासाठी बोलत आहात. आजकाल कोणत्त्या पत्रकारासाठी असे बोलले जाते?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>नाव सांगा. त्यानंतर बोला.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी :-</u>नाव आपणांसही माहित आहे आपणांस सर्व कळते.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोर-जोराने बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आपण खरे शिवसैनिक असाल तर माझे बोलणे ऐकुन घ्याल. श्री. बाळासाहेब ठाकरे हे आपलेच नाहीत तर आमचे देखिल नेता आहेत. आम्ही त्यांचा सन्मान  करतो. मी देखिल कधी त्यांच्याबरोबर होतो. त्यांना देखिल याने शिवीगाळ केली होती. यामुळे लहु नाईक याने त्याचे तोंड काळे केले होते. हे सर्व पत्रकांरना माहित आहे आणि आपणासही माहित असावयास हवे. अशा माणसाला आपण पाठिंबा देत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आपण कृपया त्याचे नाव घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>त्याच्या करामती तरी ऐकुन घ्याव्यात.

यावेळी मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे सभागृहाच्या बाहेर गेले व त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>गायकवाड साहेब आपण हिंदु आहात. मी सांगतो की, आपण अशा पत्रकाराला शोधुन त्याचे तोंड परत काळे करा मी देखिल आपल्या सोबत येईन. येथे नवजीवन बॅंकेचे दोन संचालक बसलेले आहेत त्यांना देखिल माहित आहे की, तो कशाप्रकारे ब्लॅकमेलिंग करतो. मी पत्रकारांना एका गोष्टीची आठवण करून देवु इच्छितो. आपण सर्व नगरसेवकांनी आयुक्तांना विनंती करून पत्रकारांना तळमजल्यावर पत्रकार कक्षाची व्यवस्था करून दिली होती. ज्यासाठी आम्ही आयुक्तांचे आभारी आहोत. आम्ही जेव्हाही पत्रकार कक्षात जातो त्यावेळी आम्हाला सन्मान मिळतो. परंतु हाच एक बेकार माणुस, नाकर्ता माणुस होता जो आयुक्तांना दहा वेळा पत्र देवुन पत्रकारांना पत्रकार कक्ष का दिला याची विचारणा करीत होता. हा कोण आहे? जो पत्रकारांच्या घरात बसुन त्यांच्या ताटात जेवतो त्यामध्येच मुततो. असा हा घाणेरडा माणुस आहे. त्याचप्रकारे यापुर्वी दोन वेळा तो भाजपाच्या तिकीटावर निवडणुक लढला होता, दोन्ही वेळा तो हारला होता. त्याचे नाव श्री. मनोहर जेसवानी असे आहे. देशभगतचा तो पत्रकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, आता श्री. नारायण पंजाबी यांनी ज्याचे नाव घेतले तो मनोहर जेसवानी लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा प्रचार प्रमुख होता.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आता देखिल आमच्या ठाणे जिल्हयाच्या भाजपाच्या श्रीमती कबरे त्याला भेटायला गेल्या होत्त्या. भाजपाचे आपले सर्व नेते त्याच्याकडे बसले होते. जे स्वतः जिंकु शकले नाहीत श्री. प्रकाश माखिजा हे देखिल तेथे झटापट करत होते. पुर्ण शहरात अनाधिकृत बांधकामे श्री. राम चार्ली व श्री. प्रकाश माखिजा हे करीत आहेत. ते त्याला मदत करीत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>श्री. जेसवानी हे कोणाच्या मदतीने येथे स्विकृत सदस्य म्हणुन आले होते. ते सर्वांना माहित आहे. हे येथे उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांना माहित आहे. ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे, युपीपीचे संस्थापक सदस्य होते. अशा मनोहर जेसवानीचे नाव घेण्यास आपणास एवढा वेळ लागतो. दुस-यावर आरोप करता, शेम, शेम असे करता.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>याच्यावर कलम ३८४ अन्वये कारवाई झालेली आहे. आमचे वरीष्ठ नगरसेवक श्री. किशोर वनवारी यांच्याकडुन रू. २५,०००/- घेताना त्याला पकडण्यात आले होते. आपण जरा यावर टाळया वाजवाव्यात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सभागृहात त्यांनी किशोर वनवारी बरोबर भांडण देखिल केले होते ते ही सांगावे. त्यावेळी ते दोघे युपीपीचे नगरसेवक होते. आम्ही देखिल त्यावेळी सभागृहात होतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>चौधरी साहेब, आपण त्याची बाजु घेवु नका. त्याने श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे देखिल नाव खराब केले होते. अशा माणसाला आपण लाथ मारायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>महाराजजींनी त्यांना नाव विचारले व श्री. पंजाबी यांनी आता त्याचे नाव सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:-</u>तुम्ही जन्म दिलेल्या मुलाला दुस-याचे नाव देत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौर महोदया, येथे कोणता व्यक्ती कोणत्त्या पक्षाचा आहे, तो बाहेर जावुन काय करतो हा प्रश्न नाही. ही जी महासभा आहे तिचा दुरूपयोग करून आपला वैयक्तिक राग काढणे व कुणावरही चिखलफेक करणे व ते सांगण्यासाठी या महासभेचा उपयोग करणे हे चुकीचे आहे. मी सदस्यांच्या कोणत्त्याही वक्तव्याचे खंडण केलेले नाही. माझा मुददा असा आहे की, या महासभेचा दुरूपयोग करून कुठेही आपला वैयक्तिक राग काढणे व वैयक्तिक पातळीवर जावुन कोणावरही ताशेरे ओढणे यासाठी महासभेचा उपयोग करणे सर्वथा अनुचित आहे. ही चुकीची बाब आहे. मला असे वाटते की, सचिव साहेबांनी सदस्यांचे जे असे वर्तन आहे त्यावर खुलासा करायला हवा की हे उचित आहे अथवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>मा. महापौरजी, विरोधी पक्षातील सदस्यांनी सांगितले की, जोपर्यंत नाव सांगत नाही तोपर्यंत सभेचे कामकाज चालु देणार नाही. आपण आपले गटनेता श्री. लाल पंजाबी हे देखिल सांगत आहेत की, नाव घेवु नका तर आपण असा दबाव का आणत आहात.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>दुसरा मुददा असा पण आहे की, या मुददयावर शहरातील सर्व पत्रकार महापालिकेबाहेर धरण्यावर बसले आहेत. त्या धरण्याचे काय होईल, ते कोण संपुष्टात आणेल. त्या धरण्याची जबाबदारी कोणावर आहे. हे देखिल येथे स्पष्ट करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>त्या धरण्यामध्ये काही मोजकेच पत्रकार बसलेले आहेत. बाकी राष्ट्रीय वृत्तपत्रांचे कुणीही पत्रकार त्या धरण्यामध्ये नाही. तसेच मी काल सर्वांना लेखी दिले होते त्यामध्ये मी सर्व स्पष्टपणे लिहिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>धरणे मिटविण्याची जबाबदारी कुणाची आहे? आज महापालिकेच्या मुख्यालयासमोर शहरातील पत्रकार धरण्यावर बसले आहेत ते मिटविण्याची जबाबदारी कुणाची आहे? त्यांची अपेक्षा आहे की, या महासभेत सदस्यांनी या विषयावर बोलायला हवे. याचा निकाल दयायला हवा. त्याचा निकाल काय आहे? ज्या सदस्यामुळे हा मुददा उपस्थित झाला आहे. त्यांनी फक्त आपला राग काढायला नको तर त्यांनी सांगायला हवे की याचा निकाल काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आपण मागणी केली होती की, सभागृहात त्या व्यक्तीचे नाव सांगितले जावे त्याप्रमाणे मी आता नाव सांगितलेले आहे. आपण स्वत: पत्रकार राहिलेले आहात आपल्याला तर कळायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>सभागृहात जी व्यक्ती उपस्थित नाही. ज्या व्यक्तीला खुलासा करण्याची संधी मिळणार नाही अशा कोणत्त्याही व्यक्तीवर टिका करणे अनुचित आहे. आपण मागील इतिवृत्त पहा त्यामध्ये आम्ही कधीही कोणत्त्याही नेत्त्यावर नाव घेवून टिका केलेली नाही. कारण ती व्यक्ती सभागृहात उपस्थित नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आम्हाला देखिल बोलायची आवश्यकता नव्हती. परंतु आपण नाईलाज केला त्यामुळे आम्हाला नाव घ्यावे लागले.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>ज्या व्यक्तीला येथे बचाव करण्याची संधी मिळणार नाही अशा कोणत्त्याही व्यक्तीविरूध्द येथे बोलणे उचित होणार नाही. इतरही वर्तमानपत्र आहेत. आपले सर्वांशी चांगले संबंध आहेत. आपण आपला खुलासा त्यांच्याकडे करू शकला असता. परंतु या सभागृहाचा आपण दुरूपयोग केलात.....

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>आपण पंजाबी साहेबांना सांगितले की आधी खुलासा करा त्याशिवाय बैठकीचे कामकाज चालु देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आपण जे बोलले आहात ते आपले वैयक्तिक मत आहे. परंतु मुददा असा आहे की, ज्या कारणामुळे शहरातील पत्रकार महापालिकेबाहेर धरणे धरून बसले आहेत. त्या धरण्याला कोण मिटवेल त्याचा निकाल कोण लावेल ते देखिल सदस्यांनी इथे स्पष्ट करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आता येथे प्रेक्षागृहात देखिल आपण बघु शकता. बरेचसे पत्रकार बसलेले आहेत. त्यांनी जी मागणी केली होती ती मी पुर्ण केलेली आहे. त्यांनी मला सांगितले होते की महासभेत नाव घोषित करा त्याप्रमाणे मी येथे नाव घोषित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. मनोज साधवानी:-</u>अजुन काही करणे बाकी असेल तर ते पण सांगा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापौर व उपमहापौर यांचे कर्तव्य बनते की, त्यांनी या प्रश्नावर तोडगा काढावा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौर महोदया, आपण यावर पुढाकार घेवून तोडगा काढावा व धरणे मिटवावे अशी आमची विनंती आहे. त्यानंतर सभेचे कामकाज होवु शकते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया लक्ष दयावे. मी मा. महापौरांच्या वतीने बोलत आहे. मा. महापौरांना या संदर्भात अदयाप काहीही पत्र प्राप्त झालेले नाही. याशिवाय त्यांचे म्हणणे आहे की आजचे सभेचे कामकाज झाल्यावर पत्रकारांना भेटुन त्यांचे समाधान करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>मा.महापौर, उपमहापौर विषयास सुरवात होण्यापुर्वी मी एका बाबीकडे आपले लक्ष वेधु इच्छितो. आता कचरा उचलण्यासाठी ज्या हातगाडया मागविण्यात आल्या आहेत. त्या दुस-याच दिवशी तुटलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>हे बरोबर आहे. दुस-याच दिवशी गाडीची चाके निघालेली आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. भुल्लर यांच्याशी आम्ही सहमत आहोत. त्या ठेकेदाराचे देयक थांबविले जावेत. त्याला पैसे देण्यात येवु नये. मी असे देखिल सांगु इच्छितो की, यापुर्वी गाडया मागविण्यापुर्वी त्याचा नमुना स्थायी समिती सदस्यांना दाखविण्यात येत असे. तेथे मंजुर झाल्यानंतरच त्यांना माल पुरविण्याचे आदेश देण्यात येत होते. यावेळी आलेल्या डाय-या आपण बघितल्या असतील. आपण स्थायी समितीला त्या दाखविल्या नाहीत. यावेळी कच-याच्या गाडया आपण आपल्या मर्जीने मागविल्या आपण स्थायी समितीमध्ये नमुना दाखविला नाही त्यामुळे गाडया अशा आल्या आहेत. यानंतर जे काही खराब सामान येईल त्यासाठी प्रशासन जबाबदार राहिल.

<u>मा. महापौरः-</u>ज्या ठेकेदाराला हे काम दिले आहे त्याचे देयक जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत थांबविण्यात यावे. कचरा भरल्यानंतर गाडीचे चाक तुटत आहे हे मला देखिल माहित आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>या गाडयांचा नमुना कोणी मंजुर केला होता?

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः-</u>मला एक गाडी मिळाली ती देखिल तुटकी फुटकी होती.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> या कामासाठी आम्ही निविदा मागविली असता आम्हाला नांदेड येथील ठेकेदाराने लघुत्तम दराची निविदा सादर केली होती. त्यानंतर आम्ही त्याच्याकडुन हातगाडीचे नमुने मागविले आयुक्तांनी सदरचे नमुने संमत केल्यानंतरच आम्ही त्याला कार्यादेश दिले होते. त्याने वेळेवर हातगाडया पुरविल्या नाहीत, उशिरा दिल्या, ४५ व्हील बॅरोज त्याने आता पुरविल्या आहेत. त्या व्यवस्थित नाहीत. त्याचा पत्रा देखिल खराब आहे त्याचप्रमाणे चाके देखिल खराब आहेत. आम्ही त्या ठेकेदाराला सर्व गाडयांची चाके बदलुन देण्याचे आदेश दिले आहेत. याला तो देखिल तयार झाला आहे. जर गाडी निविदे प्रमाणे मिळाली नाही तर आम्ही तिचा स्विकार करणार नाही. त्याचा ठेका रदद करू व त्याला देयक देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मा. महापौर महोदया, यांनी ४५ किलोची गाडी मागविली होती. परंतु प्रत्यक्षात ३३ -३४-३५ किलोच्या गाडया प्राप्त झाल्या आहेत. १२ किलोने वजन कमी आहे. यामुळे हा ठेका रदद करून त्याचे देयक थांबवायला हवे तसेच नवीन निविदा मागवायला हव्यात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> जेव्हा नमुना बघितला तेव्हा गाडी किती किलोची होती? ४५ किलोची होती की, ३५ किलोची होती?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आयुक्त साहेब, आपण सांगतात की, ४४ गाडया खराब होत्त्या. तर त्या गाडया परत करुन नविन मागविल्या जाव्यात. कारण या गाडया पहिल्याच दिवशी तुटलेल्या आहेत. त्यानंतर ज्या गाडया येतील त्या चांगल्या असतील तरच त्यांचा स्विकार करण्यात यावा. गाडयांची सक्त गरज आहे. गेल्या एक वर्षापासून गाडया मिळाल्या नाही. यासाठी दर्जा चांगला ठेवायला हवा.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>या पूढील गाडया घेतांना त्या बघून घेतल्या जातील. तसेच मागील गाडयांचे देयक त्यांना देण्यात येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :-</u> वजन देखील बघून घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जर या गाडया निर्धारीत प्रमाणानुसार नव्हत्त्या, तर त्यांचा स्विकार का करण्यात आला? प्रशासनाने त्या कश्या काय घेतल्या? हा मुख्य मुददा आहे. आपणच आधी घेणार व नंतर त्या परत करणार असे कसे काय चालेल?

<u>मा. महापौर :-</u>श्री. लोणारे साहेब यांनी यावर उत्तर दिले आहे. तर मग चर्चा का करीत आहात? ज्या गाडया खराब आहेत, त्याचे देयक थांबविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u> मा. महापौर महोदया, महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, जर या गाडया निर्धारीत प्रमाणानुसार नव्हत्त्या, तर त्यांचा स्विकार का करण्यात आला? त्या कोणी घेतल्या? त्या कोणाच्या आदेशाने घेतल्या?

<u>मा. महापौर :-</u>यासाठी मी सांगितले की, जोपर्यंत गाडया व्यवस्थित होत नाहीत, तोपर्यंत त्याचे देयक थांबविण्यात यावे.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, या गाडया पाऊस चालु असतांना आल्या होत्त्या, रात्रीच्या वेळी आल्या होत्त्या. मला रात्री ११.३० वाजता दुरध्वनी आला होता. त्यावेळी आमच्या सुरक्षा रक्षकाने सदरच्या गाडया ताब्यात घेतल्या. दुस-या दिवशी त्या घेवून त्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर त्या खराब असल्याचे निदर्शनास आले, तेव्हा त्याचे देयक थांबविण्यात आले. आता आम्ही त्या गाडया बदलून देण्यासाठी आदेश देणार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकूर :-</u> मा. महापौरजी, मला एका वर्षापूर्वी एक गाडी मिळालेली होती, ती देखील तुटकी-फुटकी होती. आता एक वर्षाने परत गाडी मिळणार आहे. ही देखील अशीच मिळणार का?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ४:-</u> निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे १२ वर्षांपर्यंत पदोन्नती न मिळालेल्या पात्र कर्मचा-यांना शासकीय धोरणा प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे व काही कर्मचा-यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव मान्य करणे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u> या विषयावर मला बोलायचे आहे, काही कर्मचा-यांनी सेवेत १२ वर्ष पूर्ण केले आहेत व जे पदोन्नतीस पात्र आहेत, त्यांची यादी तयार केली असेल. तर मला असे वाटते की, ती यादी देखील सभागृहासमोर आणण्यात यावी. कारण मला अशी माहिती आहे की, असे काही कर्मचारी आहेत या महापालिकेमध्ये. ज्यांचे महापालिका सेवेत १२ वर्ष पूर्ण झाले आहेत परंतु त्यांची नावे या प्रस्तावात समाविष्ट केलेली नाहीत. तर त्यांना त्यांचा हक्क मिळायला हवा. यावर आयुक्तांनी सभागृहाला आश्वासन दयायला हवे किंवा अशा कर्मचा-यांची यादी सादर करायला हवी.

<u>श्री. उत्तम लोणारे (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, १२ वर्षाचा जो लाभ आहे, तर ज्या संवर्गात पदोन्नती मिळत नाही, व काही

*संवर्गात पद असून देखील पदोन्नती मिळत नाही, अशा कर्मचा-यांसाठी शासनाने १९९४ पासून एक योजना अंमलात आणली आहे. त्या योजनेप्रमाणे ज्या कर्मचा-यांनी १२ वर्ष पूर्ण केले आहे, त्या सर्वांना आपण पदोन्नती देणार आहोत व जसे सदस्यांनी सांगितले की, काही लोकांची नावे राहिली आहेत, तर अशा कर्मचा-यांची नावे पुढील बैठकीत ठेवण्यात येईल.*

*__काही सदस्य :-__पास. पास*

*__मा. महापौरः-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

<u>विषय क्र. ४:—</u> निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे १२ वर्षांपर्यंत पदोन्नती न मिळालेल्या पात्र कर्मचा—यांना शासकीय धोरणा प्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे व काही कर्मचा—यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव मान्य करणे

<u>प्रस्तावना:—</u>

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्रमांक एच आर व्ही १०९५ /पत्र क्र. १/९५/बारा दि०८ जून १९९५ व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक — वेतन ११९९/प्रक.२/९९/सेवा—३ दि. २० जुलै, २००१ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या मंजुर आस्थापनेवरील वर्ग — ३ व ४ मधील कार्यरत कर्मचा—यांना १२ वर्षाचा लाभ देणेबाबत तसेच पदोन्नती देणेबाबत महापलिका कर्मचारी निवड समितीची बैठक दिनांक २६/८/२००३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पुढील विविध संवर्गातील कार्यरत वर्ग — ३ व ४ चया कर्मचा—यांना १२ वर्षाचा लाभ तसेच पदोन्ती देणेबाबत निवड समितीने शिफारस केलेली आहे.

खालिल वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा—यांना १२ वर्षे कालबध्द पदोन्नतीचा लाभ देतांना दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णयापुर्वी ज्या कर्मचा—यांना १२ वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांची वेतनश्रेणी दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयामध्ये विर्निदिष्ठ केल्याप्रमाणे अनुज्ञेय आहे. व दि. २० जूलै २००१ नंतर ज्या कर्मचा—यांना १२ वर्षे पुर्ण झाली आहेत त्यांना दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे. ज्या कर्मचा—यांना दि. १/१०/९४ पूर्वी १२ वर्ष पूर्ण झाली आहेत त्यांना सदर योजनेचा लाभ दि. १/१०/९४ पासून देय राहिल

खालील वर्ग ३ चं संवर्गातील कर्मचा—यांना दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे त्यांची सेवाजेष्ठता, अर्हता , पात्रता व गोपनिय अहवाल या सर्व बाबींची तपासणी केली असुन त्यानुसार त्यांच्या नावासमोर नमुद केल्याप्रमाणे त्यांना १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून सुधारित वेतन श्रेणी अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | कर्मचा—यांचे नांव | संवर्ग /हुद्दा | १२ वर्षेसेवा पुर्ण झाल्याचा दि. | सध्या मिळत असलेल्या ५ व्या वेतन आयोगाची वेतन श्रेणी | १२ पूर्ण झाल्या पासून अनुज्ञेय वेतन श्रेणी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि. १८/४/९५ च्या शासन निर्णया नुसार | दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णया नुसार |
| १ | श्री. यु. एस मोरे | लिपीक | ३०/७/०३ | ३०५०—४५९० | — | ४०००—१००—६००० |
| २ | श्री. डी. आर जाधव | लिपीक | ३१/५/०३ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | |
| ३ | श्री. बी.एम.बिर्ला | मिस्त्री | १/१/९६ | ९५०—१४००<br>३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ४ | श्री. बी.झेड. भोपी | मिस्त्री | ४/३/९६ | ९५०—१४००<br>३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ५ | श्री. एम.जे.मराडे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०—१४००<br>३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ६ | श्री. व्ही.जे. मराडे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०—१४००<br>३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | श्री. आर.एस. भुतांबरे | जोडारी | ३०/९/९३ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ८ | श्री. बी.पी.मोकाशी | जोडारी | ४/१०/९३ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ९ | श्री. डी.एम.भोपी | जोडारी | ४/१०/९३ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १० | श्री. पी.बी.भोसले | जोडारी | १६/९/९४ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| ११ | श्री.एम.ए. सोनावणे | जोडारी | १९/२/९६ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १२ | श्री.एच.बी. भोपी | जोडारी | १२/२/९७ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १३ | श्री.ए.ए.घाटे | जोडारी | ३१/१/९७ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १४ | श्री. सी.के.लाडगे | पंपचालक | ३०/९/९३ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १५ | श्री. सी.एम. वाघ | पंपचालक | १८/६/९६ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १६ | श्री.ए. जी माळी | पंपचालक | ३०/४/९७ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १७ | श्री.एल.आर.पवार | पंपचालक | १/१/९७ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १८ | श्री. टी.एम. बाविस्कर | पंपचालक | १३/६/९७ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| १९ | श्री.एम. ए. रसिद | पंपचालक | १९/११/९७ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| २० | श्री. व्ही. आर. गेगजे | पंपचालक | १८/३/९८ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| २१ | श्री.ए.एच. भांडे | पंपचालक | १९/३/९८ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| २२ | श्री. पी.के. भोईर | मिटर दुरुस्तीकार | १४/९/९६ | ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| २३ | श्री.एच.जी.पगारे | मिटर दुरुस्तीकार | १५/९/९६ | ३०५०—४५९० | — | ४०००—१००—६००० |
| २४ | श्री. बी.आर. डोंगरे | मिटर दुरुस्तीकार | २०/९/९६ | ९५०—१४०० ३०५०—४५९० | ४०००—१००—६००० | — |
| २५ | श्री. महेश सी. सितलानी | कनिष्ठ अभियंता | ८/४/९९ | ४५००—१००—७००० | ६५००—२००—१०५०० | — |
| २६ | श्री. अश्विनीकुमार अहुजा | कनिष्ठ अभियंता | १०/६/९९ | ४५००—१००—७००० | ६५००—२००—१०५०० | — |
| २७ | श्री. तरुणकुमार सेवकाणी | कनिष्ठ अभियंता | ३०/९/०० | ४५००—१००—७००० | ६५००—२००—१०५०० | — |

खालील वर्ग ४ संवर्गातील कर्मचा—यांना शासन निर्णय क्र. एच आर व्ही—१०९५/प्र.क्र.१/९५/बारा दि. ८ जून १९९५ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शना सुचनानुसार अ. १ ते ६ वरील ''पहारेकरी'' या संवग्रतील कर्मचा—याची त्यांचे पदोन्नती साखळीतील ''वरिष्ठ सुरक्षारक्षक'' या पदोन्नतीवरील पदाची अर्हता धारन करित आहेत अ.क्र. ७ ते २० वरिल ''मजूर'' संवर्गातील कर्मचारी यांचेकडे ''मजूर'' संवर्गातील पदोन्नतीचे साखळीतील ''मुकादम'' या पदाची अर्हता धारण करित आहेत.

अनुक्रमांक २१ ते ४८ वरील ''माळी'' संवर्गातील कर्मचारी हे त्यांचे पदोन्नतीचे साखळीतील मुकादम या पदाची सेवा भरती नियमाप्रमाणे अर्हता धारण करित आहेत. त्यामुळे वरील ''पहारेकरी '' ''मजूर '' व ''मुकादम'' या संवर्गातील अ.क्र. १ ते ४८ वरिल वर्ग ४ चे कर्मचारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

खालील अ.क्र. ४९ ते ५२ ''शिपाई,'' अ.क्र.५३ ते ५४ '' कॅटल कॅचर,'' अ.क्र. ५५ ते ५७ ''गॅरेज मदतनीस,'' अ.क्र. ५८ ''सफाई मुकादम'' व अ.क्र. ५९ ते ६१ वरील ''विद्युत मदतनीस'' या पदाचे पदोन्नती चे पद मनपा आस्थापनेवर नाही. त्यामुळे शासन निर्णय क्र. ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा ३ दि. २० जूलै २००१ परिछेद क्र. २ (४) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी अनुज्ञेय आहे.

| अ.क्र. | कर्मचा—यांचे नांव | संवर्ग /हुद्दा | १२ वर्षेसेवा पुर्ण झाल्याचा | सध्या मिळत असलेल्या ५ व्या वेतन आयोगाची वेतन | १२ वर्षे पूर्ण झाल्या पासून अनुज्ञेय वेतन श्रेणी |
|---|---|---|---|---|---|

| | | | दि. | श्रेणी | दि. १८/४/९५ च्या शासन निर्णयानुसार | दि. २० जूलै २००१ च्या शासन निर्णयानुसार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. एच एल गाडे | पहारेकरी | १६/११/९८ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| २ | श्री. सुलतांन राजाराम | पहारेकरी | ३०/७/९३ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३ | श्री. पी.बी.शिंदे | पहारेकरी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४ | श्री. दिपसिंग भावसिंग | पहारेकरी | १/७/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५ | श्री. शाम रेलुमल | पहारेकरी | ४/१/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ६ | श्री. पंचू यादव | पहारेकरी | ३/४/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ७ | श्री. पी.एल वायले | मजूर | ३०/९/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ८ | श्री. अे.अे.सोनावणे | मजूर | १४/२/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ९ | श्री. एच.जी. म्हस्कर | मजूर | ३१/१/२००२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १० | श्रीम. एस.एन पालेकर | मजूर | २२/११/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| ११ | श्री. पी.एच.ढोले | मजूर | २७/१२/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १२ | श्रीम. आर.के. गायकर | मजूर | ३/४/०३ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १३ | श्री. आर.एन फुलोरे | मजूर | ३१/५/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १४ | श्री. एम.एस. भोईर | मजूर | ३१/५/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| १५ | श्री. एस.एन. लालवाणी | मजूर | ३०/९/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| १६ | श्री. जी.एच खैरे | मजूर | १०/५/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| १७ | श्री. ए.बी.गवळी | मजूर | १८/११/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १८ | श्री. ए.एम.थत्ते | मजूर | २६/१२/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| १९ | श्री. जे.एस.शिगटे | मजूर | ३/४/०३ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| २० | श्रीम. एस.के.शिर्के | मजूर | ३/४/०३ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–६०–४००० |
| २१ | श्री. पुट्टप्पा कलप्प | माळी | २८/६/९० | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २२ | श्री. अन्नप्पा मडप्पा | माळी | २०/६/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २३ | श्री. मरिन्ना चिक्कन्ना | माळी | २०/२/९३, | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २४ | श्री. बैजनाथ रामधन | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २५ | श्री. निज्जप्पा कलप्पा | माळी | १८/८/९० | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २६ | श्री. रामदुलारे आवतार | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २७ | श्री. रामजी बाळू | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २८ | श्री. असाराम नारायण | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| २९ | श्री. लक्ष्मण कल्लप्पा | माळी | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| ३० | श्री. श्रावण मुकुंद | माळी | ३१/५/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| ३१ | श्री. शांताराम महादेव | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| ३२ | श्री. वालकु जी मोरे | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| ३३ | श्री. ठाकुर व्ही. भोजवानी | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |
| ३४ | श्री. अमरसिंग वागरी | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | — |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | श्री. वसंत जी. कटारे | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३६ | श्री. रामचंद्र नामदेव | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३७ | श्री. पांडूरंग के. भोईर | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३८ | श्री. राजेंश शिंदे | माळी | ४/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ३९ | *श्री. कृष्णा धरमसिंग* | माळी | ५/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४० | श्री. विष्णू पवार | माळी | ५/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४१ | श्री. वेडू डी. शिरसाठ | माळी | ५/५/९५ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४२ | रामू कल्लप्पा | माळी | १६/१/९६ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४३ | श्री. बारकू एस. भोईर | माळी | १७/४/९७ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४४ | श्री. गौतम एन. सुरवाडे | माळी | १४/६/९७ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४५ | श्री. केशव जे. नारवाणी | माळी | ३१/५/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४६ | श्री. रामलाल बी. पवार | माळी | १०/७/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४७ | श्री. दिपक जी. रहेजा | माळी | २८/७/२००१ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ४८ | श्रीम. कमल एस. बाविस्कर | माळी | २९/४/०३ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–४००० |
| ४९ | श्री. ठाकूर डी. मनकानी | शिपाई | ३१/३/०२ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–४००० |
| ५० | श्री. अशोक वामन भोसले | शिपाई | २३/१२/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५१ | श्री. प्रल्हाद डी. दलाल | शिपाई | ११/७/२००० | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५२ | श्री. अशोक मंडलीक | शिपाई | ३०/७/०१ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | श्री. लक्ष्मण एस. अल्हाड | कॅटल कॅचर | २१/५/८८ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५४ | श्री. दिलीप शिंदे | कॅटल कॅचर | ३०/११/९९ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५५ | श्री. जयप्रकाश जाधव | गॅरेज मदतनीस | ३१/८/८८ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | श्री. रघुनाथ चौधरी | गॅरेज मदतनीस | १७/२/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५७ | श्री.एस.एफ. पायल | गॅरेज मदतनीस | ३१/३/९४ १/१०/९४ | २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ५८ | श्री. आर. जे. राऊत | सफाई मुकादम | ८/५/९० | २६१०–६०–४००० | ३०५०–४५९० | – |
| ५९ | श्री. ज्युरी जैसवाल | विद्युत मदतनीस | ३१/३/९४ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०–४००० | – |
| ६० | श्री. इंद्रकुमार वरासिया | विद्युत मदतनीस | ३०/९/०० | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | २६१०––४००० | – |
| ६१ | श्रीम. आशा चुग | विद्युत मदतनीस | ३०/११/०१ | ७५०–१२–८७० द. रो–१४–९४० २५५०–५५–२६१०–६०–३२०० | – | २६१०–४००० |

**वरिष्ठ सुरक्षारक्षक** :– वरिष्ठ सुरक्षारखक या पदावर पदोन्नतीने भरावयाचा शिल्लक अनुशेष अनु. जाती – १ पद असा आहे. सदर रिक्त पदावर सुरक्षारक्षक या पदावरील कर्मचा–यांना पदोन्ती द्‌यावयाची असल्याने श्री. रमेश वामन रणदिवे, सुरक्षारक्षक यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र यापूर्वी सादर न केल्यामुळे खुल्या प्रवर्गातील श्री. राजन खरात, सुरखारक्षक यांना दि. १८/७/२००३ रोजीच्या महासभेने मान्यता दिलेली आह. श्री. रमेश वामन रणदिवे, संरक्षारक्षक यांनी आता अनु. जातीचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर केल्यामुळे सेवा जेष्ठतेनुसार ते वरिष्ठ सुरक्षारक्षक या पदाच्या पदोन्तीसाठी पात्र आहेत. त्याुळे श्री. राजन खरात यांच्याऐवजी श्री. रमेश रणदिवे यांना वरिष्ठ सुरक्षारक्षक या अनु. जातीच्या आरक्षित असलेल्या पदावर पदोन्ती देणेसाठी निवड समिती शिफारस केली आहे.
**विजतंत्री** :– निवड समिती पुढे सादर केलेल्या पदोन्नतीचे प्रस्तावातील एकूण ४ कर्मचारी हे खुला प्रवर्गातील आसून विजतंत्री या संवर्गातील खुला प्रवर्गाचे सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या १ पदावर श्री. एम.आर.शेख , तारतंत्री हे सेवाजेष्ठतेनुसार पात्र असून विजतंत्री या पदाची अर्हता धारण करीत असल्याने सदर खुला प्रवर्गाचे १ पदावर श्री. एम. आर. शेख, तारतंत्री यांना विजतंत्री या पदावर पदोन्नती देता येईल.

निवड समितीने १२ वर्षाचा लाभ/पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठी शिफारस केलेल्या उपरोक्त विविध संवर्गातील कर्मचा–यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा / पदोन्नतीचा लाभ मिळणेकामी महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

***महासभा ठराव क . २१***
***दिनांक:-२३/६/२००४.***

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे महापालिकेच्या सेवेत १२ वर्षापर्यंत पदोन्नती न मिळालेल्या वर निर्दिष्ट केलेल्या पात्र कर्मचा–यांना शासकिय धोरणाप्रमाणे वरीष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देणेस मान्यता देत आहे व श्री. रमेश वामन रणदिवे, सुरक्षा रक्षक यांना वरीष्ठ सुरक्षा रक्षक व श्री. एम.आर. शेख, तारतंत्री यांना विजतंत्री या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

*मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.*

*विषय क्र. ५:- तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.*

*मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :- मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, अनु.क्र. ७, ११ व १२ वर प्रभाग क्र. १२ असे लिहिले आहे. तर त्या जागी प्रभाग क्रमांक १३ अशी सुधारणा केली जावी.*

*मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :- मा. महापौर, यामध्ये एक रस्ता राहून गेला आहे. गांधी रोड ते निजधाम आश्रम या रस्त्याला निजधाम मार्ग असे नाव दिले तर बरे होईल. धन्यवाद. या प्रस्तावा सोबत तो देखील प्रस्ताव होता.*

*मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :- मा. महापौर महोदया, अनु.क्र. १ वर सिध्देश्वर उदयान असे दर्शविले आहे, तर त्या ठिकाणाला यापूर्वीच सिध्देश्वर चौक असे नामकरण करण्यात आले आहे. या प्रस्तावासाठी कोणत्त्याही नगरसेवकाने पत्र दिलेले नाही, तर अनु. क्र. १ वरील बाब वगळण्यात यावी. तेथिल चौकाला सिध्देश्वर चौक असे नाव यापूर्वी दिलेले आहे.*

***यावेळी मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.***

*मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :- मा. महापौरजी, मला असे वाटते, विरोधी पक्ष नेत्त्यांनी जो प्रस्ताव केला आहे, तर मी सांगु इच्छितो की, मला याबाबत माहिती आहे. हे खरे आहे की, तेथिल चौकाला यापूर्वी सिध्देश्वर चौक असे नामकरण करण्यात आलेले आहे. कोणा व्यक्तीने मंत्रालयात जावून तेथून आयुक्तांच्या नावे शिफारस पत्र आणले आहे. तर मला असे वाटते की, त्यामुळेच यादीमध्ये या रस्त्याचे नाव आले आहे. यासाठी तेथिल संबंधित नगरसेवक श्री. बोडारे यांनी अदयाप समंती दिलेली नाही. तर मला असे वाटते की, जोपर्यंत ते यासाठी शिफारस करीत नाहीत तोपर्यंत या रस्त्याचे नाव स्थगित ठेवण्यात यावे.*

*मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :- मा. महापौर महोदया, या यादीमध्ये अनु. क्र. १६ वर जो रस्ता दर्शविला आहे, जो स्मशान भूमीपासून कुर्ला कॅम्प येथिल शिवनेरी हॉस्पीटल मार्गाने जातो, तर या रस्त्याला स्वर्गीय महम्मद रफी मार्ग असे दर्शविले आहे. परंतु माझी अशी सूचना आहे, त्या पूर्वी पदमश्री हा शब्द जोडण्यात यावा. ‘‘ पदमश्री स्वर्गीय महम्मद रफी मार्ग’’ अशी सुधारणा त्यामध्ये करण्यात यावी. व दुसरे असे की, या रस्त्याचे नाव मी सुचविले होते. परंतु हा रस्ता*

आमच्या प्रभागातून इतर जवळच्या प्रभाग क्र. १० मध्ये जातो. तर यासाठी प्रभाग क्र. ९ व १० च्या नगरसेवकांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकूर :-</u> रस्त्यांना नावे दिली जात आहेत, तर मी आपणांस एक निवेदन करु इच्छितो की, प्रभात सिनेमा ते शिवमंदिर हा मुख्य रोड आहे, त्या रस्त्यावर मागील सात दिवसात दोन अपघात झालेले आहेत व त्यामध्ये दोघांचा मृत्यू झालेला आहे. त्या रस्त्यावर कुठेही गतीरोधक, झेब्रा क्रॉसिंग नाही. तर कृपया करुन तेथे गतिरोधक बसवावा व त्यावर पट्ट्या मारुन दयाव्यात.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी :-</u> मा. महापौरजी, सभागृहाला माझे निवेदन आहे की, कॅम्प नं. २ येथिल, ओटी सेक्शन मध्ये एक निजधाम आश्रम आहे, एक प्रस्ताव आला आहे की, त्या विभागाला अमरधाम चौक असे नाव दिले जावे. तर मी या सदनाला विनंती करते की, त्याची औपचारीकता पूर्ण झाली आहे. परंतु ते या प्रस्तावात आलेले नाही तर ते देखील पास केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा.महापौरजी, नामकरणाचा प्रस्ताव आला आहे, पहिले २५ नावे आहेत. त्याचबरोबर दुसरे ९ देखील नावे आहेत. ते सर्व पास केले जावे. जसे आमच्या विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले, व आमचे माजी महापौर यांनी सांगितले की, ते नगरसेवक मार्फत यायला हवे. तर अनु. क्र. १ वरील रस्ता वगळून इतर सर्व पास केले जावे. जसे सभापती स्थायी समिती यांनी सांगितले तर तो देखील प्रस्ताव मंजुर केला जावा. तर मी समजतो की, त्याला कुणाची काही हरकत नाही. तर सर्वानुमते एक रस्ता वगळून सदस्यांनी सुचविलेले इतर रस्ते पास केले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :-</u>मा. महापौर, सचिव साहेब, या विषयावर मी बोलू इच्छितो, महापालिकेतर्फे पूर्ण शहरात कुठल्याही चौकास जेव्हा नामकरण करण्यात येते, तर त्यावेळेस त्याठिकाणी त्या रस्त्यावर काही अनाधिकृत फलक काही व्यक्ती लावतात. तर अशावेळी महापालिकेचे कर्तव्य आहे की ते फलक काढुन टाकण्यात यावेत. अन्यथा येथे जे पास होते त्याला काही अर्थ उरणार नाही. असे एक उदाहरण आहे कॅम्प नं. १ येथे एक सिंधी पेपर लिडर प्रकाशित होते. तेथे माता मजनीबाई चौक असे नामकरण करण्यात आले होते तेथेच शेजारी कुणीतरी फलक लावला आहे. त्याबद्दल मी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले देखिल आहे. तो फलक हटविण्यासाठी मी सांगितले आहे. तर मी निवेदन करतो की, तो जो फलक आहे तो तात्काळ हटविण्यात यावा. भविष्यात असे प्रकार घडु नयेत म्हणुन महापालिकेतर्फे पाउले उचलण्यात यावीत.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ५:-</u> तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अ. | रस्त्या/ चौक | प्रस्तावित नांव |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | बॅरेक नं. ५७५ ते बॅरेक नं. ६२५ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-२ | ''स्वामी अमरदास नगर '' |
| २ | उल्हासनगर-१, मधील नगर न्युज प्रेस समोरील उद्यानास | ''इंदिरा गांधी यादगार उद्यान'' |
| ३ | उल्हासनगर-४, मधील प्रभाग कमांक १६, मधील चित्रा पॅलेस ते बॅ.नं.१३९४ ते बॅ.नं. १३९७ पर्यंतच्या मार्गास | ''दासूमल कारारा मार्ग'' |
| ४ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील बॅ.नं. २०८४ ते बॅ.नं. २०८५ पर्यंतच्या रस्त्त्यास | ''मुखी शिणकुमल रामचंदाणी मार्ग'' |
| ५ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील झुलेलाल टॉवर, ओ.टी.सेक्शन येथील चौकास | ''गुरूनानक देव चौक'' |
| ६ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक ११ मधील, बॅ.नं.२०७१ मधील रुम नं.११ ते २० पर्यंतच्या रस्त्त्यास | ''श्री.फतीचंद उध्दवदास चिचडेजा मार्ग'' |
| ७ | उल्हासनगर-५ मधील प्रभाग कमांक १३ मधील, ब्लॉक नंबर ७१४ ते ७४१ पर्यंतच्या वस्तीस | ''सहयाद्री नगर'' |
| ८ | उल्हासनग-५ प्रभाग कमांक १२ मधील बॅ.नं. १७७९ ते दसरा मैदान पर्यतच्या रस्तास | ''स्वामी सर्वानंदजी महाराज मार्ग'' |
| ९ | उल्हासनगर-५ प्रभाग कमांक १२ मधील तिरथ टॉवरपासून प्रभाराम अपार्टमेंटच्या परिसरास | ''भगत नगर'' |
| १० | उल्हासनगनर-५ प्रभाग कमांक १२ मधील जॅकी प्लॉझा हॉटेल पासून ते ब्लॉक सी-४ सी-६ मार्गे, कुलदेवी माता मंदिर ते डॉ. लाला यांच्या घरापासून पॅनारामा अपार्टमेंटच्या परिसरास | ''सुख निधान नगर'' |
| ११ | उल्हासनगर-५, मधील प्रभाग कमांक १३ सरस्वती अपार्टमेंटपासून ते निजधाम अपार्टमेंटच्या रस्त्त्यास | ''स्वामी रामदासजी महाराज मार्ग'' |
| १२ | उल्हासनगर-५, प्रभाग कमांक १३ मधील सुगन पॅलेस ते निजधाम मंदिरापर्यंत (ब्लॉक नं.७७९ ते ब्लॉक नं.७९३) पर्येतच्या मारिषा अपार्टमेंटच्या रस्त्त्यास | ''जय बाबा धाम मार्ग'' |
| १३ | उल्हासनगर-४, मधील प्रभाग कमांक ९, मधील सिध्दार्थ हौ.सो.ब्लॉक नं. ४४६ समोरील कानसईरोड येथील चौकास | ''युवा नेते चंद्रशेखर भालेराव चौक'' |
| १४ | उल्हासनगर-२ मधील अमन टॉकीजजवळील चौकास | ''संत सतरामदास चौक'' |
| १५ | उल्हासनगर-३, प्रभाग कमांक १ मधील माता सप्तश्रृगी चौक ते राणा कंम्पाउंडजवळील महात्त्मा फुले चौक पर्यंतच्या रस्त्त्यास | ''माता रेणूका देवी माहूरगड मार्ग '' |
| १६ | उल्हासनगर-४ ,प्रभाग कमांक १४ मधील व्हिनस लाल चक्की मार्गावरील वखारीपासून, स्मशानभूमी, शिवनेरी हॉस्पीटल, आंबिका बेकरी, बुध्द विहार, | ''पदमश्री स्वर्गीय महम्मद रफी मार्ग'' |

| | | |
|---|---|---|
| | सर्टीफॉईल स्कूल मार्गे, नितनवरे यांचे घरापर्यंतचे रस्त्यास | |
| १७ | उल्हासनगर-४ प्रभाग क्रमांक १४ मधील, विनु अपार्टमेंट पासून भक्ती अपार्टमेंटपर्यंतच्या रस्त्यास | ‘‘स्वातंत्र सैनिक श्री. नारायण बाबुराव शिंदे मार्ग’’ |
| १८ | उल्हासनगर-१ प्रभाग कमांक ४ मधील बेवस चौक ते शिवशक्ती अपार्टमेंट टिळकनगर पर्यतच्या रस्त्यास | ‘‘दादा कन्हैयालाल पारवानी रोड’’ |
| १९ | उल्हासनगर-१ प्रभाग कमांक ४ मधील बॅ.नं. २०९ ते २११ पर्यतच्या रस्त्यास | ‘‘ताराचंद लाहोरी मार्ग’’ |
| २० | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक. ६ मधील,चंद्रशेखर आझाद शाळेसमोरील चौकास | ‘‘श्री चंद्रशेखर आझाद चौक’’ |
| २१ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील,आझाद पॉवर लॉड्रीजवळील चौकास | ‘‘स्व. रामभाऊ म्हाळगी चौक’’ |
| २२ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, कुंज बिहारी तब्बेला शेजारील चौकास | ‘‘राहूल चौक’’ |
| २३ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, वडार कॉलनी चौकास | ‘‘जय संतोषी माता चौक’’ |
| २४ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील,रुहाणी संतसंग ते चंद्रशेखर आझाद शाळेपर्यंतचे रस्त्यास | ‘‘साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे मार्ग’’ |
| २५ | उल्हासनगर-३ प्रभाग कमांक ६ मधील, चंद्रशेखर शाळे पासून आनंद शिंदे यांचे घरापर्यंतचे रस्त्यास | ‘‘शहिद मंगल पांडे मार्ग’’ |
| २६ | उल्हासनगर -३ येथील कल्याण-अंबरनाथ रोडवरील परमानंद ट्रान्सपोर्ट समोरील चौकास, | कै. अण्णासाहेब पांडुरंग पाटिल चौक |
| २७ | उल्हासनगर-१ येथील सतनाम बी. अपार्टमेंट ते गुलशन अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यास. | ''स्वर्गीय होतुसिंग गुणसिंग गुलबान मार्ग'' |
| २८ | उल्हासनगर-२ मधील वाह गुरू चक्की बॅरेक नंबर ७०३ समोर ते रामरात यादव, यांचे घर ते नाल्यापर्यंत या विभागास | ''महा महिंदर नगर'' |
| २९ | उल्हासनगर-१ मधील बॅ. नं. ५७८ अे ते बॅ. नं. ५८८ पर्यंतच्या रस्त्यास | ''स्वर्गीय मोटुमल शर्मा (जाजक)मार्ग'' |
| ३० | उल्हासनगर-४मधील उल्हास रेल्वे स्टेशन समोरील जकात नाका क्रमांक ७ समोरील चौकास | ''कै.प्रतापराव मारूती सावंत चौक'' |
| ३१ | उल्हासनगर-१ प्रभाग क्र. २ मधील, ओ.टी. सेक्शन पोस्ट ऑफिस येथिल चौकास | ‘‘डॉ. हजारीमल चौक’’ |
| ३२ | उल्हासनगर-२ प्रभाग क्रमांक २२ येथे इ. एस. आय. दवाखानाजवळ तसेच सतनाम कॉलनी उल्हासनगर -२ येथे व जपानी बाजार मिलद दुप्पटा कापड दुकान याठिकाणी | ''श्री. नारायणदास एल. रामरख्यानी प्रवेशव्दार'' |
| ३३ | उल्हासनगर-२ प्रभाग क्रमांक २२ सोनार हॉल मातामंदिरजवळ | ''श्री. हरिसिंग मिलापसिंग लबाणा प्रवेशव्दार'' |

| | | |
|---|---|---|
| ३४ | गांधी रोड, तहसिलदार कार्यालय ते निजधाम आश्रम गेट, उल्हासनगर-५ | ''निजधाम आश्रम मार्ग'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही नांवाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव क्रमांक ५, दिनांक ११. २. २००४ अन्वये २५ व ठराव क्रमांक ६, दिनांक ७. ६.२००४ अन्वये ८ असे एकूण ३३ उपरोक्त दर्शविलेले नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर/ अध्यक्ष व इतर चार सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण ३३ नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

सभेतील चर्चेअंती, तदर्थ नामकरण समितीचे दिनांक ११. २. २००४ रोजीचे ठराव क्र. ५, मधील अनुक्रमांक १ वर दर्शविलेले नाव वगळून त्या जागी बॅरेक नं. ५७५ ते बॅरेक नं. ६२५ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर-२ या जागेस स्वामी अमरदास नगर व अनुक्रमांक ३४ वर गांधी रोड, तहसिलदार कार्यालय ते निजधाम आश्रम गेट, उल्हासनगर-५ या रस्त्यास निजधाम आश्रम मार्ग असे नाव देण्याचा प्रस्ताव समाविष्ट करुन एकुण ३४ जागांना नावे देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव महासभेपूढे प्रस्तावित

महासभा ठराव क्र. २२ दिनांकः-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)

अनुमोदकाचे नाव :- श्री. पंजाबी नारायण

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीला अनुसरुन वर नमूद केलेल्या उक्त रस्त्यांचे, सार्वजनिक जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:- श्री उत्तम लोणारे यांची महापालिकेच्या सेवेत उपआयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

काही सदस्य :-पास. पास

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ६:- श्री उत्तम लोणारे यांची महापालिकेच्या सेवेत उपआयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः-

महाराष्ट्र शासन, गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ३१ मे, २००३ च्या आदेशान्वये श्री. उत्तम लोणारे यांची या महापालिकेत उपायुक्त पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली आहे. त्यानुसार श्री. उत्तम लोणारे हे या महापालिकेत दि. २.६.२००३ पासुन कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ नुसार महासभा ठराव क्र. ४९ दिनांक १८.७.२००३ नुसार श्री. उत्तम लोणारे यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीची मुदत दिनांक २.६.२००४ रोजी संपुष्ठात येत आहे.

श्री. उत्तम लोणारे यांच्या प्रतिनियुक्तीच्या वाढीव कालावधीस आणखी दोन वर्षाकरिता मान्यता मिळणेकामी महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. २३ दिनांकः-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री उत्तम लोणारे, उप-आयुक्त यांना महापालिका सेवेत दिनांक २/६/२००३ पासून दोन वर्षाचे कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

सर्वानुमते

महापौर / पीठसीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ७:- सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहुन यु. एन. एफ. पी. ए साहयक

एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रु ८ ,३८ ,३२७/- ची रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करणेस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव आला आहे तर हे पैसे कोणत्त्या वर्षासाठी दयायचे आहेत. यावर्षीसाठी दयायचे आहेत की तीन-चार वर्षा पुर्वीचे दयायचे आहेत हे आमच्या समोर यायला हवे कारण यावर्षी आपल्याला ८ ,३८३२७/-रू. कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाहीत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, आपल्या येथे एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पा अंतर्गत काम चालु आहे त्याच्या कंन्ट्री प्लान क्रमांक ५ मध्ये आपणांस ९० टक्के अनुदान प्राप्त झाले होते व त्यावेळी तत्त्कालिन आयुक्त श्री. शुळ साहेब यांनी राज्यशासनाला अभिवचन दिले होते की, महापालिकेतर्फे १० टक्के रक्कम भरण्यात येईल. ती रक्कम अदयाप दिलेली नाही कारण त्यास महानगरपालिकेची मान्यता नव्हती. १९९६सालची ही गोष्ट आहे. त्यावेळी ही बाब महापालिकेसमोर येवुन रक्कमेचा भरणा करणे योग्य झाले असते कारण त्यावेळी त्यांचे ९० टक्के अनुदान आपणांस प्राप्त झाले होते थोडीफार बाकी आहे. जवळ जवळ रू. ७० लाख अनुदानापोटी आपणांस मिळणार आहे. जर आपण एवढे पैसे भरले तर. त्यावेळी हा प्रस्ताव मंजुर व्हायला हवा होता. त्यावेळी ठेवला नाही म्हणुन आम्ही आता हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मा. महापौर महोदया, यु.एन.एफ.पी.ए. च्या अंतर्गत शहरामध्ये एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पा अंतर्गतचे जे वेगवेगळे कार्यक्रम चालतात त्यामध्ये आरोग्य विषयक व इतर कार्यक्रम असतात. परंतु याची माहिती सदस्यांना कमी असते. या योजने अंतर्गत चांगले कार्यक्रम शहरात चालतात. झोपडपट्टयांमध्ये देखिल या योजने अंतर्गत चांगले काम केले जाते. परंतु सदस्यांना याची माहिती कमी असते त्यामुळे माझी आयुक्तांना विंनती आहे की, येणा-या महासभेत यु.एन.एफ.पी.ए च्या अंतर्गत जी कामे करण्यात आली आहेत. त्याची माहिती आम्हास देण्यात यावी व माझी अशी देखिल विनंती आहे की, या योजने अंतर्गत सदस्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेतल्यास चांगले होईल.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास

<u>मा. महापौर:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ७:-</u> सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहुन यु. एन. एफ. पी. ए साहयक एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रु ८ ,३८ ,३२७/- ची रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:-</u>

यु. एन. एफ. पी. ए. सहाय्यित एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प, उल्हासनगर महानगरपालिकेत सन १९९८ ते २००२ या कालावधीत राबविणेत आला. सदर प्रकल्पांतर्गत झालेल्या एकुण खर्चापैकी १० टक्के रक्कम महानगरपालिकेने खर्च करण्याबाबत आणि प्रकल्प संपुष्ठात आल्यानंतर होणा-या आवर्ती खर्चाचा भार

उचलण्यास तत्कालीन मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सहमती दिलेली होती. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने रू. ८,३८,३२७/- (आठ लाख अडतीस हजार तीनशे सत्ताविस मात्र) इतकी रक्कम राज्य आर. सी. एच. सोसायटीस अदा करावयाची आहे. सदर रक्कम राज्य आर.सी. एच सोसायटीकडे जमा करण्यासाठीचे अ.शा.पत्र क्र. आयपीडी-१००३ /३१०/प्र.क्र.५४/क क्र.१ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ण दि. १३ फेब्रुवारी, २००४ या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

सन २००४-२००५ च्या अंदाजपत्रकात सदरचा खर्च भागविण्यासाठी तरतुद करण्यात आलेली नाही. सदर खर्चासाठीची तरतुद सुधारित अंदाजपत्रकात करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात सदर रक्कम अदा करण्याचा प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

महासभा ठराव क्र. २४ दिनांक:-२३/६/२००४.

सुचकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :- श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अनुदान समायोजनास अधिन राहून यु. एन. एफ. पी. ए. सहाय्यित एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प अंतर्गत रुपये ८,३८,३२७/- ची रक्कम राज्य आर.सी.एच. सोसायटीस अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आयत्त्यावेळचा विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>आयत्त्यावेळचा विषय:-</u>

<u>विषय क्र. ८:-</u> पैसे द्या व वापरा तत्त्वावर शौचालय देखभाल व दुरूस्तीसाठी विविध संस्थाना देणे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा. महापौर महोदया, हा प्रस्ताव आणताना प्रशासनाकडुन काही चुका झालेल्या आहेत त्यामुळे हा विषय नियमित विषय सुचीवर आणण्यात यावा.

*__मा. सदस्य श्री किशोर वनवारी :-__ नियमीत विषय सुचीवर हा विषय आणण्यात यावा.*

*__काही सदस्य :-__ नियमीत विषय सुचीवर हा विषय आणण्यात यावा.*

*__मा. महापौरः-__सदरचा विषय नियमित विषय सुचीवर आणण्यांत यावा.*

*__मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-__ कृपया राष्ट्गिताकडे लक्ष दयावे.*

*जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ७. ३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.*

*(प्रकाश पं. कुकरेजा)*
*महापालिका सचिव*
*उल्हासनगर महानगरपालिका*

## *उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर*

*दिनांकः-१९/७/२००४*

*__उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/७/२००४ रोजीच्या__*
*__सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.__*

*उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.७.२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.*

*__१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.__*
*__२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.__*

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३६. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ३७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ३८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४०. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४१. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४२. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४६. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४७ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. नाना आनंदा पवार | ४८. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५०. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २१. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५१. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २२. | श्री. शांताराम निकम | ५२. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५४. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५५. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६ | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५७. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ५९. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम | ६०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्रीमती. खिलनानी भावना | ६१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६२. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु, २. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, ३. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ४ श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ५. श्रीमती गुप्ता आनिता धर्मेंद, ६. श्रीमती. वनवारी मोना अशोक, ७. श्री. मोहन साधवानी, ८. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी,९ श्री. प्रशांत जाधव, १०. श्रीमती. जयश्री सुर्वे , ११. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १२. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १३. श्री. चौधरी राजेंद शांताराम,१४. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण, १५. श्री. बहरानी मोहन वर्यलदास,१६. श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास, १७श्री. माखिजा हरदास सन्मुखदास,१८. श्री. लालवानी दिलीप जेठानंद हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री.शांताराम निकम:-मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य व मा. आयुक्त ही सभा सुरू होण्यापुर्वी कुंभकोणम या ठिकाणी सरस्वती नर्सरी शाळेमध्ये अचानक आग लागल्याने त्यामध्ये १०० पेक्षा जास्त मुलांचा जळुन मृत्यु झालेला आहे त्यासाठी

या सभेने त्यांना या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी विनंती करतो. त्याच बरोबर महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक श्री. प्रल्हाद शिंदे ज्यांनी १०,००० गाणी गायलेली आहेत. '' उड जायेगा पंछी, रह जायेगा पिंजरा खाली'' या गाण्याने संपुर्ण महाराष्ट्राला वेड लावुन टाकले. असे श्री. प्रल्हाद शिंदे यांचे देखिल निधन झाले आहे. त्यांनाही या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली जावी. त्याच बरोबर कोकण विधान परिषदेचे शिक्षक आमदार मा. श्री. वसंत बापट यांचे सुध्दा निधन झाले आहे. त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पण केली जावी. त्याचबरोबर कमलाकर वैशंपायन विनोदी अभिनेता व नाटककार यांचे सुध्दा निधन झाले आहे आणि सकाळच्या संचालिका डॉ. बानु कोयाजी ज्यांना रेमन मॅगसेसे हा पुरस्कार मिळाला होता आणि त्याचबरोबर त्या स्त्री रोग तज्ञ म्हणुन प्रसिध्द होत्त्या. कुटूंब नियोजनासाठी त्यांनी बरेच कार्य केले आहे यांना सुध्दा या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली जावी. अशी विनंती मी सभागृहाला करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>याच बरोबर आमचे मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांच्या चुलत भावाचे देखिल निधन झाले आहे. त्यांनाही कृपा करून दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजाः-</u>कृपया श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे उभे राहावे.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

## <u>शोक प्रस्ताव</u>

तामिळनाडु राज्यातील कुंभकोणम या ठिकाणी सरस्वती नर्सरी शाळेमध्ये अचानक आग लागल्याने त्यामध्ये १०० पेक्षा जास्त मुलांचा जळुन मृत्त्यु झाला.

तसेच महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक श्री. प्रल्हाद शिंदे, कोकण विधान परिषदेचे शिक्षक आमदार मा. श्री. वसंत बापट, विनोदी अभिनेता व नाटककार श्री. कमलाकर वैशंपायन,दैनिक सकाळच्या संचालिका डॉ.बानु कोयाजी, उल्हासनगर महानगरपालिकेतील भाजपाचे नगरसेवक श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचे चुलत भाऊ श्री. गोकलदास रूपचंदानी यांचे नुकतेच निधन झाले. या सर्वांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> २४ अ <u>दिनांकः-१९.७.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कुंभकोणम येथील सरस्वती नर्सरी शाळेला आग लागुन मृत्त्युमुखी पडलेले १०० पेक्षा अधिक विद्यार्थी, श्री. प्रल्हाद शिंदे, श्री.

वसंत बापट, श्री. कमलाकर वैशंपायन, डॉ. बानु कोयाजी, श्री. गोकलदास रूपचंदानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे. आता ४.४० झाले आहेत.

प्रश्न क्र. २७८ श्री. नाना पवार यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २७८:-</u> उल्हासनगर महानगरपालिका, सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० ,दिनांक २२/१/१९९९ सदरील ठरावाची अंमलबजावणी महापालिका प्रशासनाकडुन झालेली आहे काय?

अ) सदरील ठरावाची अंमलबजावणी झाली नसल्यास त्याचे कारण काय?

वरील प्रश्नांची सविस्तर उत्त्तरे येणा-या महासभेमध्ये मिळण्यास विनंती आहे.

<u>उत्त्तरः-</u>उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३०, दि. २२.१. १९९९ अन्वये माहे जानेवारी, १९९९चे महानगरपालिकेच्या तत्त्कालीन सर्व सदस्याचे मानधन व बैठक भत्त्याची रक्कम दिवंगत मनपा सदस्य यांच्या मुलांचे नावे कायमस्वरूपी ठेवीत ठेवलेले आहे.

दिवंगत सदस्यांवर अवलंबून असणा-या त्यांची पत्नी, भाऊ, मुलगा किंवा मुलगी यापैकी एका व्यक्ती विशेष बाब म्हणुन शासनाच्या मंजुरीने मनपा सेवेत पात्रतेनुसार भरती करणेबाबत शिफारस केली होती सदर बाब प्रलंबित आहे.

शासकीय सेवेत अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देणेबाबत शास निर्णय क्र. अकंपा - १९९९/प्र. क्र. २०/२०००/आठ, दि. २८ मार्च, २००१ अन्वये शासकीय / निमशासकीय कर्मचारी दिवंगत झाल्यास त्याच्या वारसात नोकरीत सामावून घेणे बाबतचे कोणतेही आदेश शासनाने निर्गमीत केलेले नाहीत. यास्तव, त्यांचे वारसास अदयापपर्यंत नाकरीत सामावुन घेतलेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, प्रश्न क्र. २७८ असा होता की उल्हासनगर महानगरपालिका, सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० ,दिनांक २२/१/१९९९ सदरील ठरावाची अंमलबजावणी महापालिका प्रशासनाकडुन झालेली आहे काय?
येथे प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे ते समाधानकारक नसल्याने आता कुणी याचे उत्तर येथे देऊ शकतो का? कारण आम्ही विचारले आहे की या ठरावाची अंमलबजावणी

*महापालिका प्रशासनातर्फे झाली आहे अथवा नाही. झाली नसेल तर त्याचे कारण काय आहे?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):</u>-मा. महापौरजी, या प्रश्नाचे आम्ही जे उत्तर दिले आहे त्याशिवाय त्याचे दुसरे कोणतेही समाधानकारक उत्तर होवूच शकत नाही. कारण की हा प्रश्नच चुकीचा होता. व जो ठराव केला होता तो देखिल कायदयाच्या कक्षेत नव्हता. जो ठराव कायदयाप्रमाणे नसेल त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. महानगरपालिका कर्मचारी मग ते क व ड संवर्गातील असतील तर त्यांच्यासाठी अनुकंपा तत्त्वावर त्यांच्या वारसांना नियुक्ती देण्यात येते. नगरसेवकाच्या वारसाला अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याचा कोणताही कायदा नसल्याने या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. व ही अंमलबजावणी करता येणे शक्यही नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवार:</u>-मा. आयुक्त साहेब, या ठिकाणी अनुकंपा तत्त्वाबाबत आम्ही प्रश्न विचारलेलाच नाही. जो प्रश्न विचारला नाही त्याचे उत्तर या ठिकाणी आपण दिलेले आहे. प्रश्न एकदम साधा आणि सरळ आहे. आणि या ठरावामध्ये तत्कालिन महानगरपालिकेने प्रशासनास फक्त शिफारस केलेली आहे. आणि त्या शिफारशीची अंमलबजावणी आपण म्हणजेच प्रशासनाने केलेली नाही आणि ते या ठिकाणी आपण बोलुन दाखवले आहे की तो ठरावच चुकीचा होता. माझा प्रश्न या ठिकाणी असा आहे की, महानगरपालिका शिफारस करते हा ठराव जर चुकीचा होत असेल तर मग या ठिकाणी अनेक वेळा असे प्रश्न आलेले आहेत की, महासभेने शिफारस करून ते अंमलात सुध्दा आणलेले आहेत. आपण पाहिलेले आहे आणि या सभेत आपण थेट बोललात की, हा ठराव चुकीचा आहे. तर माझे मत असे आहे की, शिफारस करणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महासभेला जर वाटत असेल एखादया विषयावर शिफारस करणे तर ते योग्य आहे आणि योग्य होते म्हणुनच त्यावेळच्या महासभेमध्ये उपस्थित असलेल्या सर्व प्रशासकीय अधिका-यांनी तो ठराव स्विकारला. कायदेशिर नसता तर त्याच वेळेला सांगण्यात आले असते की, हा विषय कायदेशिर नसुन बेकायदेशिर आहे. परंतु महानगरपालिका प्रशासन ठरावाची अंमलबजावणी न झाल्यामुळे ती चुक न स्विकारता महासभेने हा ठराव चुकीचा केला असे उत्तर देते तर हे एकदम दुःखद उत्तर आहे असे मी मानतो. हा एक प्रकारे महासभेचा अपमान करण्यात आलेला आहे असे माझे मत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:</u>-मा. महापौरजी, आता श्री. नाना पवार यांचा जो प्रश्न आहे त्यावर मी चर्चा करू इच्छितो. या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने नेहमी प्रमाणे फसवे असे उत्तर दिले आहे. प्रशासनास सवय आहे की, फसवे आणि थोडक्यात उत्तरे दयायची आणि आपल्यावर आलेले घोंगडे झटकुन टाकायचे. या ठिकाणी त्यांनी म्हंटले आहे की, अनुकंपा तत्त्वावर या ठिकाणी नोक-या देण्यात येतात. हा नियम सगळयांना माहित आहे. शासनाचा जो निर्णय आहे त्या निर्णयाप्रमाणे त्या क्षेत्रामध्ये, कार्यालयात काम करत असणारे जे चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहेत. अशा कर्मचा-यांसाठी अनुकंपा तत्त्व मानले जाते. परंतु या ठिकाणी श्री. बाबुराव बगाडे हे नगरपालिकेचे सदस्य होते. या ठिकाणचे कर्मचारी नव्हते. तरी सुध्दा त्यांच्या भावना लक्षात घेवून, त्यांच्या कुटूंबावर जी परिस्थिती बितलेली आहे. ती परिस्थिती विचारात घेवून या ठिकाणी त्या वेळच्या सभागृहाने,त्या वेळच्या महापालिका सदस्यांनी सभागृहामध्ये ठराव पास करण्यात आला होता की श्री. बाबुराव बगाडे यांची पत्नी अथवा भावास योग्यते नुसार नोकरी जर या ठिकाणी उपलब्ध असेल तर ती देण्यात यावी. परंतु प्रशासनाने या ठिकाणी अनुकंपा तत्त्व हा शब्द टाकुन त्या ठरावालाच बगल दिलेली आहे. त्या ठरावामध्ये अनुकंपा तत्त्वानुसार नोकरी मागितली होती अथवा कसे हे मला माहित नाही. परंतु तसे मागण्या एवढे हे सभागृह दुधखुळे नाही असे मला वाटते. त्यावेळच्या सभासदांपैकी आता उपस्थित असलेल्या सदस्या स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी त्या ठिकाणी प्रस्ताव सादर केला*

होता. मा. ज्येष्ठ नगरसेवक जे एका वेळेस महापौर पदावर होते श्री हरदास माखिजा यांनी सुध्दा त्या ठरावाला अनुमोदन दिले होते, प्रस्ताव सादर केला होता. तर ते चुकीचा प्रस्ताव या ठिकाणी आणु शकत नाही. आयुक्तांचे म्हणणे आहे की तो ठरावच चुकीचा होता म्हणजे या ठिकाणी सभागृहामध्ये ब-याच गोष्टी चुकीच्या चालतात असे आयुक्तांना म्हणायचे असेल असे मला या ठिकाणी वाटते. तर जो ठराव पाच सन्माननिय सदस्यांनी मांडला होता. तर अशा या विद्यमान, तज्ञ सदस्यांना आयुक्त जर चुकीचे म्हणत असतील तर हे काही बरोबर नाही. जर हा ठराव आयुक्तांना मान्य नसेल तर याच्या पुढील कार्यपध्दती काय आहे? ठिक आहे, आयुक्तांनी तो ठराव फेटाळला, १९९९ मध्ये झालेला ठराव जर आयुक्त फेटाळत असतील तो त्यांना मान्य नसेल तर तो ठराव त्यांनी शासनाकडे पाठवायला हवा. तर आयुक्तांनी तो ठराव शासनाकडे पाठविला आहे का? शासनाकडे त्यांनी विचारणा केली आहे का? शासनाकडुन त्यांनी मत मागविले आहे का? या प्रश्नाचे उत्तर या ठिकाणी मिळायला हवे. हा ठराव जर आयुक्तांनी फेटाळला असेल तर आयुक्तांनी शासनाचे मत मागविले आहे का? जर आयुक्तांनी शासनाचे मत मागविले नसेल तर ते का मागविले नाही? येथे केलेला ठराव असाच ठेवता येतो का? जे ठराव अडचणीचे वाटतात त्यावर आयुक्त शासनाचे मत मागवु शकतात. तर त्यांनी ते मत मागविले आहे का? मला या ठिकाणी या प्रश्नाचे उत्तर हवे आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी आधी जे उत्तर दिले होते ते देखिल योग्य होते. या सभागृहाने जो ठराव केला होता तो अनुकंपा तत्त्वावर होता असे ठरावात लिहिले नव्हते. परंतु कोणत्त्याही दिवंगत सदस्याच्या वारसास नोकरी दयायची असेल तर त्या पध्दतीस कायदेशिर भाषेत अनुकंपा तत्त्व असेच म्हंटले जाते. तो ठराव १९९९ मध्ये या सभागृहात पास झाला त्यावेळी तत्त्कालिन आयुक्तांनी त्यांचे काय मत दिले याची माहिती माझ्याकडे नाही परंतु सभागृहात आयुक्तांच्या उपस्थितीत एखादा ठराव पास होत असेल व त्यावर आयुक्त त्यांचे कोणतेही मत देत नसतील याचा अर्थ तो ठराव कायदेशिर ठरतो असे होणार नाही. त्यावेळचे जे आयुक्त होते त्यांनी त्यांचे मत त्वरीत दयायला हवे होते व सभागृहाने त्यांचे मत मागितले असल्यास त्यांनी ते दयायला हवे होते. त्यांनी काय सांगितले हे मला माहित नाही. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की हा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४५१ प्रमाणे हा ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठवायला पाहिजे होता. तेव्हा तो पाठविला नाही. मी आता सभागृहाला सांगु इच्छितो की, हा ठराव विखंडीत करण्यासाठी त्वरीत राज्य शासनाला अथवा नगरविकास विभागाला पाठविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा.महापौर, जो ठराव महानगरपालिकेमध्ये सदस्यांनी पारीत केला असेल तो ठराव किती दिवसांच्या आत शासनाकडे पाठवायला हवा. १९९९ नंतर आज जवळ जवळ पाच वर्ष झाली आहेत आणि आता आयुक्त साहेब सांगत आहेत की, आता आम्ही हा ठराव शासनाला पाठवु तर हे योग्य आहे का? किती दिवसात तो पाठवायला पाहिजे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, कलम ४५१ मध्ये अशी कालमर्यादा निर्धारीत केलेली नाही. जर तो ठराव कायदेशिर होता तर १९९९मध्ये तत्त्कालिन आयुक्तांनी त्याची अंमलबजावणी का केली नाही? हा प्रश्न समोर येतो. जे झाले आहे ते येथेच संपवुन मी सभागृहाला सांगु इच्छितो की हा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या तरतुदीनुसार विखंडित करण्यासाठी लवकरच राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा.महापौरजी, श्री. नाना पवार यांनी जो प्रश्न विचारला आहे. त्याचे आयुक्तांनी त्यांच्या कायदेशिर व प्रशासकीय भाषेत उत्तर दिले आहे.

मुददा असा आहे की संपुर्ण शहराच्या वतीने मा. सदस्य श्री. बाबुराव बगाडे यांच्या पत्नीस किंवा भावास नोकरी मिळण्यासाठी जो ठराव पास केला होता. कदाचित हा ठराव प्रशासनाच्या दृष्टीने बेकायदेशिर असेल परंतु संपुर्ण शहराच्या भावना व सभागृहाच्या भावना विचारात घेवुन आयुक्तांनी विशेष अधिकार वापरून, मा. महापौरांनी तसे आदेश देखिल दयावेत की विशेष अधिकार वापरून श्री. बाबुराव बगाडे यांच्या भावास अथवा पत्नीस नोकरी देण्यात यावी ही माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः</u>-मा. महापौरजी,मी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे मला योग्य उत्तर मिळालेले नाही. आयुक्तांनी जे उत्तर दिले ते देखिल फिरवाफिरवीचे उत्तर आहे असे मला वाटते. त्यांना मी प्रश्न विचारला होता की या ठिकाणी महासभेत एखादा ठराव पारीत करायचा असेल तो आयुक्तांना मान्य नसेल तर तो किती दिवसात. त्यांनी सांगितले की त्याला कालावधी नाही आणि आता आम्ही तो पाठवु. तर हे संयुक्तीक आहे का? पाच वर्षांनी ठराव शासनाकडे पाठवल्यास शासन आपल्या महापालिकेला काय म्हणेल? कशा प्रकारचे कारभार येथे होतात. म्हणजे पाच वर्ष सभागृहाच्या भावना आपण दडपुन ठेवल्या आहेत. कुणाच्या तरी भावना त्यामध्ये गुंतल्या आहेत. त्या भावनांचा या ठिकाणी आपण अनादर करत आहात असे मला या ठिकाणी वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः</u>-मा. महापौरांना विनंती करेन की, आयुक्तांना त्यांनी आदेश दयावेत की आयुक्तांनी त्यांचे विशेष अधिकार वापरून श्री बाबुराव बगाडे यांच्या पत्नीस किंवा भावास नोकरी देण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः</u>-मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब तत्कालिन महानगरपालिकेने शिफारस केलेली आहे हे लक्षात घ्या. आणि स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये, या ठिकाणी दोन अडीच वर्षामध्ये महानगरपालिकेमध्ये अनेक विषय या ठिकाणी उपस्थित झाले. आणि महापालिकेने अनेक विषयामध्ये शिफारस सुध्दा केलेली आहे. त्यातील एक शिफारस माझ्या माहिती प्रमाणे अशी आहे की, या ठिकाणी सहाय्यक आयुक्त म्हणुन सध्या आपण कार्यरत आहात. आपली सुध्दा शिफारस या महासभेने शासनाकडे केलेली होती, अतिरिक्त आयुक्त म्हणुन. तर या ठिकाणी महापालिकेमध्ये अनेक रिक्त जागा आहेत आणि महानगरपालिकेचे आयुक्त त्यांच्या कायदेशिर अधिकारामध्ये त्या परिवारातील एखादया सदस्यास महापालिकेच्या सेवेमध्ये समाविष्ट करून घेत असेल............

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः</u>-सचिव साहेब हे काय चालु आहे?सभा चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः</u>-तर आपण त्या कुटूंबातील योग्यतेनुसार, पात्रतेनुसार आणि महापालिकेच्या शिफारसीनुसार जर का सेवेमध्ये समाविष्ट करून घेतले तर एक चांगले काम महानगरपालिकेच्या तर्फे होईल असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-मा. महापौरजी, आमच्या एका सदस्याच्या घरी कुणाची तरी प्रकृती अत्यवस्थ आहे. यासाठी आम्हाला असे वाटते की चार दिवसांसाठी बैठक स्थगित करण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः</u>-मा. आयुक्त साहेब, महापौर साहेब, कोणत्त्या नगरसेवकाच्या घरी कोण आजारी आहे याची माहिती या ठिकाणी दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-माझ्या आईची तब्येत खराब आहे.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):</u>-कुणाला काही आक्षेप आहे का?

काही सदस्यः-नाही.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-सभा स्थगित करण्यापुर्वी ज्या लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या स्विकारणे अथवा अस्विकृत करणे यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

पहिली लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्री. लाल पंजाबी

अनुमोदक :- श्री. रामदास उमाप

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे सूचक, अनुमोदक आपले लक्ष महापालिका ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ कडे लक्ष वेधतो की, सदरहु ठराव पारीत झाला असून शहरातील लोकांना कर योग्य मुल्यात सूट प्राप्त होत नाही. त्यामुळे लोकांना फारच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या करिता प्रशासनातर्फे सदरहु ठरावाचा लाभ शहरवासीयांना का देण्यात येत नाही.

दुसरी लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्री. प्रमोद टाले

अनुमोदक :- श्री. रमेश चव्हाण

संपुर्ण शहरात सर्व झोपडपट्टी वर्गामध्ये घराची घरपट्टी माफ करण्यासाठी चढाओढ लागली आहे. तहसील कार्यालयात उत्त्पन्नाचे दाखले मिळणेस गर्दी होत आहे. शहरातील संपुर्ण जनता संभ्रमावस्थेत असुन काही समाज विघातक लोक गैरफायदा घेत आहेत. सदर बाब महानगरपालिकेशी संबंधित असुन महानगरपालिकेची घरपट्टी माफ होणेस नेमकी भुमिका काय आहे व महानगरपालिकेच्या कायदेशिर कक्षेमध्ये कुठला वर्ग सक्षम आहे. या विषयावर चर्चा होणेस विनंती आहे.

तिसरी लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्रीमती कोमल बठीजा

अनुमोदक :- श्री. संजय बठीजा

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती मार्फत गरीब, विधवा व गरजु महिलांना त्यांच्या उदर निर्वाहासाठी मोफत शिवणयंत्र वाटप करण्याची ठरवले आहे परंतु अदयापर्यंत या कामाची कुठपर्यंत प्रगती झाली याची काहीच माहिती मिळाली नाही.

तरी आपणांस विनंती की आज दि. १९.७.२००४ रोजी होणा-या महासभेत याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

<u>मा. सचिव :-</u>पहिल्या दोन लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकृत केल्या असुन तिसरी शिलाई मशिन संबंधीची लक्षवेधी सूचना अस्विकृत केली आहे. श्री. ठाकुरदास वेहरानी यांच्यातर्फे अजुन एक सूचना आली आहे की ते या सभेत उपस्थित राहु शकत नाही यासाठी त्यांची रजा मंजुर केली जावी. पंरतु ते आपल्याला नंतर ठरवायचे आहे. आपणांस तिन्ही सूचना दिलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये सहा महिन्याची..............

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ते नंतर बघितले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्नाचे काय होईल?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ते पुढील बैठकीत घेण्यात येतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>सचिव साहेब, कृपा करून हजेरी पट आपल्या ताब्यात घ्यावा. बैठक झाल्यानंतर कोणीही सही करता कामा नये.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. दिवाणे हजेरीपट बंद करून आपल्या ताब्यात घ्यावा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>सचिव साहेब, श्री. नाना पवार यांचा जो प्रश्न आहे तो कधी पुर्ण करणार?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> पुढील बैठकीत घेण्यात येईल.

कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे. मा. महापौरांनी ही सभा सर्वानुमते चार दिवसांसाठी स्थगित केली आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७. ०० वाजता सभेचे कामकाज चार दिवसांसाठी स्थगित केल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:-२६/७/२००४

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२६/७/२००४ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.७.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून ही सभा सोमवार दिनांक २६.७.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौर:- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४३. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्री. साधवानी मनोज |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५४. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६ | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास, |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. शांताराम निकम | ५९. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम | ६८. | श्री. दिलीप लालवानी |
| ३५. | श्रीमती. खिलनानी भावना | | |
| ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु काशीराम, २. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ३.श्री. टाले प्रमोद नामदेवराव,४. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, ५. श्री. रमेश चव्हाण, ६. श्री. प्रशांत जाधव, ७. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,८. श्रीमती. किरण माखिजा,९. श्री. बहरानी मोहन, १०. श्रीमती. मीनु राजकुमार दासानी,११, श्री. बेहरानी ठाकुरदास, १२. श्री. वदरीया राजेश हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.महापौरजी, आजच्या महासभेच्या कार्यसूचीवरील प्रश्नोत्तरे जी अर्धवट मागील महासभेत झाली होती. ते तसेच ठेवून आज थेट विषयास सुरूवात करावी. आज आमचे मा. छत्रपती शाहु महाराज यांची पुण्यतिथी आहे. आम्हाला तिथे जायचे आहे तर कृपा करून सरळ कार्यसूचीवरील विषयास सुरवात करा.

मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांत :-मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. गणपत एडके यांचे बंधु श्री. राम गोविंद एडके यांचे निधन झाले असुन दोन मिनिटे त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजाः-कृपया श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे उभे रहावे.

सुचकाचे नाव :-

अनुमोदकाचे नाव :-

## शोक प्रस्ताव

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी, श्री. धनंजय बोडारे, श्री. रमेश चव्हाण, श्री. दिलीप गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्तरे न घेता लक्षवेधी घेण्याचे मा. महापौरांनी मान्य केले आहे. तरी लक्षवेधी सूचना.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- कधी ठरले?

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):- तुम्ही येण्याआधी बहुमताने मान्य केले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः- कधी?

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-आता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी तशी सूचना मांडली.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-एका मिनिटात झाले पण.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-लक्षवेधी सूचना. सूचक आहेत श्री. लाल पंजाबी अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप .

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-लक्षवेधी सूरू करण्यापुर्वी सभापतींतर्फे जी लक्षवेधी आणली होती ती मा. महापौरांनी स्विकारली होती. ती लक्षवेधी शहराच्या हितासाठी होती. शिलाई यंत्र सर्व नगरसेवकांना पाच-पाच दिले जावे. जी लक्षवेधी आमची

अमान्य केली. मा. महापौरांनी आयुक्तांना आदेश दयावेत की त्यांनी आम्हाला आश्वासन दयावे आचारसंहिता लागु होण्यापुर्वी शिलाई यंत्र सर्वांना देण्यात येईल.

मा. महापौरः-मी आयुक्तांना आदेश देते. शिलाई यंत्राची व्यवस्था करावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मॅडम असे तर एकेका गोष्टीसाठी लक्षवेधी आणावी लागेल. चार वर्ष झाले रेनकोट देणार होते नगरसेवकांना वाटपासाठी शंभर-शंभर. कुठे आहेत ते रेनकोट? चार वर्ष झालेत सडुन गेले की चांगल्यास्थितीत आहेत?

मा. महापौरः-आयुक्तांनी ते पण पहावे तसेच शिलाई यंत्र अदयाप प्रभागात वाटपासाठी दिली नाहीत त्याकडे पण लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-रेनकोटची स्थिती काय आहे? उदरांनी खाल्ले की सडुन गेले.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आता प्रत्येक गोष्टीसाठी लक्षवेधी आणावी लागेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, विषय पत्रिकेवर ना रेनकोटचा विषय आहे ना शिलाई मशिनचा. रेनकोटची स्थिती काय आहे हे मला माहित नाही परंतु जिथपर्यंत माझ्या लक्षात आहे रेनकोटचे वाटप कसे केले जावे. याबाबतीत काही तरी वाद होता. व त्या विवादामुळे रेनकोटचे अजुन वाटप झालेले नाही. ते वाटपासाठी महासभेपुढे सुध्दा एक प्रस्ताव मांडला होता. तुम्ही निर्णय असा घेतला होता. की प्रत्येक नगरसेवकांनी रेनकोट वाटप करायचे आहे. असे होत नाही. योग्य त्या व्यक्तीस ते मिळावे त्यासाठी आधी वर्तमानपत्रात जाहिरात देवून अर्ज मागविणे त्याची छाननी करणे व जे पात्र लाभार्थी आहेत त्यांना देणे. राहिली गोष्ट शिलाई यंत्राची. तुमच्या माहितीसाठी सांगतो की, शिलाई यंत्र खरेदी करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. आधी जी निविदा आली त्यात २,३००/- रू. प्रती शिलाई यंत्र असा दर आला होता त्यासाठी पुर्ननिविदा मागवल्या. त्यानंतर १९००/- रू. प्रति यंत्र असा दर आला आहे. कामाचे आदेश देखिल दिले आहेत. परंतु आजच २५० शिलाई यंत्र आले आहेत. अजुन आमच्या ताब्यात आल्या नाहीत. परंतु आज २५० शिलाई यंत्र भांडार विभागात मिळतील. त्याचे वाटप जे आहे. आम्ही अर्ज मागविले होते. त्या अर्जाची छाननी केल्यानंतर जे पात्र लाभार्थी आहेत. त्यांना दिले जाईल. प्रत्येक नगरसेवकाला ५ असे वितरण तर होवू शकणार नाही. त्यात तुम्ही ज्यांची शिफारस केली व आम्ही जे अर्ज मागविले त्या अर्जाची छाननी केल्यानंतर ते दिले जाईल. ते छाननीचे काम सुरू आहे. आज मशिन आमच्या ताब्यात आल्या आहेत. छाननीजी करायची आहे त्यास कमीत कमी एक आठवडा लागेल. मग वाटप सुरू होईल.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-लक्षवेधी सूचना. सूचक आहेत श्री. लाल पंजाबी अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप. त्यांची सूचना येणेप्रमाणे

लक्षवेधी सूचनाः-

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मागच्या वर्षी करदरात जी वाढ करण्यात आली. फेब्रुवारी महिन्यात आम्ही एक त्यासाठी विशेष सभेची मागणी केली होती. ती पुर्ण झाली नाही. व त्याबाबतीत एप्रिल महिन्याच्या सभेत त्यावरून बराच गोंधळ झाला होता. त्यांनतर ती सभा मे, १९ ला ठेवण्यात आली. व या सभागृहात सर्व संमतीने करवृध्दी रदद करण्याबाबत ठराव पास झाला होता. परंतु दोन महिन्यानंतर प्रशासनाचे धोरण काय होते आणि काय आहे हे माहित नाही. सर्व संमतीने ठराव मंजुर होवून देखिल आतापर्यंत जे रिवाईज बिल आहे. ते जुलै महिन्यापर्यंत दिले गेले नाही आहे. यासाठी आम्ही लक्षवेधी दिली आहे. कारण की जनतेला विश्वास नाही. कारण ठराव पास झाल्यानंतर लोकांकडे बिले जात नाही. रिवाईजड बिल त्यांच्याकडे अजुन पोहचले नाही. आधीचीच बिले पोहचली त्यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे की या ठरावाची अंमलबजावणी होणार की नाही. त्याचबरोबर महापालिकेची कर वसुली त्यामुळे थांबली आहे. त्यासाठी आम्ही ही लक्षवेधी दिली आहे. आमचा आयुक्तांना आग्रह आहे की लवकरात लवकर रिवाइज्ड बिल इश्यु केले जावे. ही आमची मागणी आहे.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,मागच्या वर्षी महापालिकेच्या क्षेत्रामध्ये १ लाख ४० हजार मालमत्ता आहे. त्यापैकी २००० जुनी मालमत्ता आहे. त्यांचे पुर्नमोजमापणी केली होती. व ५००० नवी मालमत्ता ज्यांचे ॲसेसमेंट झाले नव्हते. अशा ५००० मालमत्तांची मोजमापणी केली होती. बाकी १ लाख ३५ हजार ज्या मालमत्ता आहेत त्यांच्या करात कोणतीही वाढ केली गेली नाही. हा एक गैरसमज आहे की सर्व मालमत्तांचे रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले. व त्यामुळे मोठ्या प्रमाणात कर दरात वाढ झाली आहे. फक्त २००० मालमत्तांचे रिवाइज्ड ॲसेसमेंट केले व ५००० मालमत्तांचे नव्याने ॲसेसमेंट केले होते. ते ॲसेसमेंट रदद करण्याचे जे लेटींग रेट (करमुल्य) आहे. ते ठरवायचा अधिकार आयुक्तांचा असतो. त्यानुसार दर निश्चित करून आम्ही रिवाइज्ड ॲसेसमेंट केले होते. राहिले यावर्षाचे ॲसेसमेंटली जे फायनल करायचे असते. ज्याला अथेंटीकेशन करायचे असते. ते अदयाप केले नाही. यावर्षासाठी जे लेटींग रेट निश्चित करायचे आहेत. ते अजुन केले गेले नाहीत. ते मागील वर्षासाठी होते. तुमचा ठराव लक्षात ठेवून योग्य निर्णय घेतला जाईल. परंतु या वर्षासाठी लेटींग रेट ठरविणे व पुन्हा १ लाख ३५ हजार मालमत्ता ज्या जुन्या आहेत त्याबांधकामांमध्ये काही वाढ किंवा बदल, सुधारणा ते पण पहावे लागेल. त्यासाठी सर्व्हे करावा लागेल. प्रत्त्येक मालमत्तेला भेट दयावी लागेल. ती विझीट करणे व ॲसेसमेंट लिस्टचे ॲथंटीकेशन करणे हे सर्व बाकी आहे. ते केल्यांनतर डिमांड ठरेल व नंतर बिल जाईल. जेथपर्यंत आपल्या महापालिकेचा प्रश्न आहे. नेहमी ऑक्टोबर नंतरच बिल पाठवले जातात. २००२च्या नोव्हेंबरमध्ये आम्ही ॲथंटीकेशन बाबत निर्णय घेतला व डिसेंबरमध्ये बिले पाठवली होती. मागच्यावर्षी देखिल आमची बिले ऑक्टोबर मध्ये गेली होती. यावर्षी अजुन बिले दिली नाही. कारण की विझीट देवून रिवाइज्ड ॲसेसमेंट करायची आहे. किंवा जर काही बदल किंवा सुधारणा झाली नसेल तर जुने ॲसेसमेंट कायम करायचे आहे. याबाबत अदयाप निर्णय घेणे बाकी आहे. तो निर्णय पुढील महिन्यात घेतला जाईल व त्यांनतर बिल देण्याबाबत किंवा लेटींग रेट बाबतीत निश्चित केले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आयुक्त साहेब, तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा निघतो की, मागच्यावर्षीची बिले रिवाइज्ड होणार नाही. असे आहे का?*

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया ,मी मागील वर्षाबाबत जी माहिती दिली आहे की, १ लाख ३५ हजार ज्या मालमत्ता आहेत त्यांच्या ॲसेसमेंटमध्ये काही वाढ झाली नाही. ५हजार ज्या नविन मालमत्ता आहेत त्यामध्ये वाढ झाली होती जी नव्हती म्हणजेच वाढीचा प्रश्नच नाही कारण ते नवीन ॲसेसमेंट होते. तर करवाढीचा त्यात प्रश्नच नव्हता. ज्या २००० मालमत्ता आहेत. त्या २००० मालमत्तेच्या वापरात बदल झाला आहे किंवा बांधकाम वाढल्याने रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले होते. यावर्षाच्या ॲसेसमेंट बाबतीत असा कोणताही निर्णय म्हणजेच जी जुनी बिले आहेत. २००० मालमत्तेत वाढ झाली होती. ते रद्द करणे किंवा न करणे असा कोणताही निर्णय अजुन घेतला गेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>आम्ही जो ठराव पास केला होता तो २००३-२००४वर्षासाठी होता. महासभेने जो ठराव पास केला होता त्याचे काय होणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>२००३-२००४ साठी जो तुमचा ठराव होता त्यामध्ये जे रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले आहे त्याबाबतीत होते. जिथे करवाढ व्हायला पाहिजे. परंतु मागच्या वर्षी डिमांड देण्यात आले होते. त्यामुळे त्यामध्ये आम्ही काही बदल करू शकलो नाही. आता यावर्षी मागच्या वर्षीच्या ज्या २००० मालमत्ता आहेत त्यात बदल करणे न करणे, नविन बिल पाठवणे न पाठवणे त्याबाबतीचा जो निर्णय घ्यायचा आहे तो बिल देण्यापुर्वी ॲसेसमेंट लिस्ट ॲथेंटीकेशन करण्यापुर्वी घेतला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>याचा अर्थ आपल्या म्हणण्यानुसार मागच्या वर्षीची बिले रिवाइज्ड होणार नाहीत. मागच्या वर्षी जी बिले पाठवली गेली त्याचे रिवीझन होणार नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>एकदा डिमांड इश्यु केले गेले तर चुकीचे जर ॲसेसमेंट असेल कलम ४८५ जो आहे त्यानुसार...

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>रेट जे विथ ड्रॉ झाले त्यानुसार काय होणार?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मी तुम्हाला तेच सांगत आहे की सेक्शन ४८५ जो आहे. त्यात ॲसेसमेंटमध्ये दुरूस्ती करू शकतो. परंतु ती दुरूस्ती फक्त त्याच वित्तिय वर्षात केले जाते. ज्या वर्षात दुरूस्ती केली जाते त्याच वर्षासाठी ते लागु केले जाते. रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टमुळे दुरूस्तीचा पण काही फायदा होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>म्हणजे त्या लोकांना तिच बिले कायम आहेत. हे पहा तुम्ही असे फिरवून बोलु नका. माझा निश्चित स्वरूपाचा प्रश्न आहे. त्यांना रिवाइज्ड बिल दिली जाणार की नाही. याचा अर्थ तुम्ही महासभेच्या ठरावाला ओलांडुन पुढे जात आहात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>रिवाइज्ड बिल कशाला दयायची हे सांगा. एकदा आम्ही जे व्हा मागणी केली त्यानंतरचा तुमचा ठराव आहे. व लेटींग रेट जे निश्चित केले आहेत ते कायदयाच्या चौकटीतच केले आहेत. तुम्ही स्वतः कायदयाचे जाणकार आहात जे पण झाले तर जर बेकायदेशिर झाले असेल तर ४८५ नुसार प्रश्न उपस्थित झाला असता.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>सर्वांच्या माहितीसाठी सांगतो याचा अर्थ त्या ठरावाची अंमलबजावणी करणार नाही. असेच ना अजुन काय?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्त साहेब, लक्षवेधी देण्यामागचा उददेश एकच होता. मागील वर्षी आपण जे करमुल्य निर्धारीत केलेले वाढविले ते पुर्वीप्रमाणे लागु करण्यासाठी महासभेने ठराव पारीत केला होता. आणि त्या ठरावाची अंमलबजावणी आपण करणार आहात की नाही त्या दृष्टीकोनातुन ही लक्षवेधी दिली आहे. ठराव तसाच झाला होता की जो आपण करमुल्य दर वाढवलेला आहे तो पुर्वीप्रमाण कायम करण्यासाठी ठराव करून महासभेने तुम्हाला निर्देश दिले होते. त्याची अंमलबजावणी केली की नाही केली? करणार किंवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>तुम्ही हा ठराव वाचुन दाखवा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>हा महासभा ठराव क्र. ४ आहे दि. १९ ५.०४ मध्ये. gh महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता सन १९९६-९७ या सरकारी वर्षात लागु असलेल्या करयोग्य मुल्यांकनाची दरसुची लागु करणे मान्य करीत आहे व सन २००३-२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रददबादल करीत आहे. व त्या परिणामात सन २००३-२००४ च्या आकारणी पुस्तकातील नोंदी बाबत संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर घरपटटी रक्कम भरल्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या आत परताव्याची देय रक्कम अदा करणेस प्रशासनास निर्देशित करीत आहे. त्यांचे हेच म्हणणे आहे की,२००३-२००४साठी जे करयोग्य मुल्य वाढवून नोटीस पाठवले आहेत. किंवा बिल पाठवले आहेत ते रदद करून नवीन बिल गेलेले आहेत. म्हणुन ही लक्षवेधी म्हणजेच त्या ठरवाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने तुम्ही काही पावले उचचली आहेत का किंवा नाही आहेत? उचलणार आहात किंवा नाही? मग हा ठराव जो महासभेने पारीत केला त्याविषयी काय करणार आहात.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, २००३-२००४ची डिमांड निश्चित झाली आहेत. बिले पाठवली गेली आहेत. त्यामुळे २००३-२००४च्या डिमांडमध्ये काही बदल होवू शकत नाही. व २००४-२००५साठी जी डिमांड करायची आहे. त्याबाबत अदयाप आम्ही ॲसेसमेंट लिस्टचे ॲथंटीकेशन केलेच नाही. त्याबाबत आम्ही अजुन बिले इश्यु केली नाहीत. कारण की आमची अदयाप ॲसेसमेंटची लिस्टच तयार नाही. ती यादी तयार झाल्यानंतरच त्याबाबत निर्णय घेतला जावू शकेल. व ॲसेसमेंट लिस्ट ॲथंटीकेशन करण्यापुर्वी करमुल्य योग्य दर निश्चित करायचे आहे. लेटींग रेट यावर्षी निश्चित होतील व त्यानंतरच निर्णय होईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>यावर्षाचे नाही. २००३व २००४ साठी आहे. तुम्ही जे पाठविले त्याबाबतीत काय? ते रदद होणार नाही, ते रदद करणार नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>त्याबाबत मी सांगितले आहे की, एकदा डिमांड केली गेली व जे कायदयाच्या चौकटीत आहे. ते रदद व्हायचा प्रश्नच नाही. ४८५नुसार जर दुरूस्ती करायची असेल तर त्याच वर्षात मागील वर्षाच्या बिलात दुरूस्ती करण्याचा आपल्याला काही अधिकार नाही. तुम्ही सेक्शन ४८५ पहा. रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टमुळे तो फायदा दिला जावू शकेल. आणि जे दरवाढीबाबत आपण बोलत आहात. ती फक्त २००० मालमत्तेमध्ये आली आहे. त्यात सुध्दा बांधकामांचे क्षेत्र वाढविले आहे. किंवा रचना किंवा वापरात बदल केलेला आहे. त्यामुळे वाढ केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. आयुक्त साहेब, महासभेने जो ठराव केला आहे तो अमान्य आहे त्यावर अंमलबजावणी होणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-महापालिकेने यावर्षी ठराव पास केला आहे. तर या ठरावाची अंमलबजावणी यावर्षी होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-इथे लिहिले आहे वर्ष २००३-२००४ करिता. आयुक्त साहेब मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की तुम्ही जनतेला स्पष्ट संदेश दया. बिले रिवाइज्ड होणार नाही. नगरसेवकांनी जनतेची दिशाभुल केली आहे. प्रापर्टी टॅक्स जो विथ ड्रॉ केला आहे तो चुकीचा आहे. हे तुम्ही लोकांना सांगा की तुम्ही बिल भरा. किंवा हा ठराव रद्दीच्या टोपलीत गेला असे सांगुन टाका.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-तीच गोष्ट मी स्पष्टपणे सांगितली आहे. मागील वर्षी जे बिल दिले गेले आहे. यावर्षी दुरूस्ती करण्यासाठी कायदयामध्ये काही तरतुद नाही. आता गोष्ट चालु वर्षासाठी. चालु वर्षात काय करायचे आहे हे काही अजुन ठरविले नाही. याबाबत अजुन काही बोलु शकत नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-आयुक्त साहेब जेव्हा हा ठराव पास झाला. त्यानंतर शहरातील जे पण स्थानिक वर्तमानपत्र होती. करवाढीचा प्रस्ताव रदद झाला आहे. लोकांच्या मनात एक शंका आहे की प्रस्ताव रदद झाल्यावर वाढलेला कर भरायचा नाही. तुम्ही म्हणत आहात की, २००३ व २००४चे जे बिल पाठविले आहे ते भरायचे आहे. लोकांना समजत नाही की, सत्ताधारी पक्षाने व विरोधी पक्षाने मिळुन एक ठराव पास केला की करवाढ रदद करण्यात आलेली आहे. त्याला तर काही अर्थच उरला नाही. इथे इतक्या टाळया वाढविल्या गेल्या करवाढ रदद झाली म्हणुन. लोकांना समाचार मध्ये सांगितले करवाढ रदद झाली, रदद झाली. शहरात हाहाकार माजला होता. लोकांनी त्यासाठी फटाके वाजविले त्याचे काय झाले शेवटी? याचा अर्थ तर काहीच नाही झाले त्याबाबतीत जरा खुलासा करावा. लोकांना आम्ही काय सांगायचे? आज लोक बिल भरण्याच्या परिस्थितीत नाही. त्यांना समजत नाही बिल कमी होईल. भरायचे की नाही भरायचे? त्यांनी करायचे काय? किंवा २००४ व २००५ असे मिळुन एकत्र बिल भरावे याबाबतीत कृपया सविस्तर सांगावे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-आयुक्त वारंवार खुलासा देत आहेत ना की होणार नाही. त्यांनी काय लिहुन दयावे काय?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-सत्ताधारी पक्षाने तर बाहेर खुप फटाके वाजविले होते यासाठी. आणि इथे सांगितले की करवाढ रदद झाली. त्याचे काय झाले?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-ते सांगत आहेत ना की होणार नाही. अजुन काय करायचे त्यांनी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मग कसे सर्वजण स्टेटमेंट देतात की करवाढ रदद करण्यात आली आहे. ठराव करण्याला अर्थ काय झाला? जनतेला फक्त खुश केले की, निवडणुका येत आहेत करवाढ रदद झाली आहे. असे करून काही होत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-श्री. जमनु पुरस्वानी यांना माहित नाही की शहरातील जनतेला मागील १६ वर्षापासुन मुर्ख बनविले जात आहे हे काय नवे आहे काय?पहिल्यांदा नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-हे तुम्ही बरोबर बोललात.

मा. सदस्य श्रीह. जमनादास पुरस्वानी:-म्हणजे जनतेची फक्त दिशाभुल करायची आहे आणि सांगायचे आहे की, गरीबांना करवाढ रदद केली आहे. दारीद्य रेषेखालील लोकांना कर भरावा नाही लागणार. २४००० वार्षिक उत्त्पन्न असणा-यांना कर भरावा लागणार नाही. अशाप्रकारे तुम्ही लोकांची दिशाभुल करणार असाल तर असा ठराव करायची काही गरज नाही.

धनंजय बोडारे:-
मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-

राजेंद्र चौधरी:-

मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी:-

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:-१९/७/२००४

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/७/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.७. २००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्मानानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.
२)मा. उपमहापौर:- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३६. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ३७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ३८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४०. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४१. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४२. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४६. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४७ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्री. नाना आनंदा पवार | ४८. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५०. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २१. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५१. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २२. | श्री. शांताराम निकम | ५२. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५४. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५५. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६ | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५७. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ५९. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम | ६०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्रीमती. खिलनानी भावना | ६१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६२. | श्री. बदरीया राजेश नानिकराम |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु, २. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, ३. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ४ श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ५. श्रीमती.गुप्ता आनिता धर्मेंद, ६. श्रीमती. वनवारी मोना अशोक, ७. श्री. मोहन साधवानी, ८. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी,९ श्री. प्रशांत जाधव, १०. श्रीमती. जयश्री सुर्वे , ११. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १२. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १३. श्री. चौधरी राजेंद शांताराम,१४. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण, १५. श्री. बहरानी मोहन वर्यलदास,१६. श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास, १७ श्री. माखिजा हरदास सन्मुखदास,१८. श्री. लालवानी दिलीप जेठानंद हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री.शांताराम निकम:-मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य व मा. आयुक्त ही सभा सुरू होण्यापुर्वी कुंभकोणम या ठिकाणी सरस्वती नर्सरी शाळेमध्ये अचानक आग लागल्याने त्यामध्ये १०० पेक्षा जास्त मुलांचा जळुन मृत्यु झालेला आहे त्यासाठी

या सभेने त्यांना या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी विनंती करतो. त्याच बरोबर महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक श्री. प्रल्हाद शिंदे ज्यांनी १०,००० गाणी गायलेली आहेत. '' उड जायेगा पंछी, रह जायेगा पिंजरा खाली'' या गाण्याने संपुर्ण महाराष्ट्राला वेड लावुन टाकले. असे श्री. प्रल्हाद शिंदे यांचे देखिल निधन झाले आहे. त्यांनाही या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली जावी. त्याच बरोबर कोकण विधान परिषदेचे शिक्षक आमदार मा. श्री. वसंत बापट यांचे सुध्दा निधन झाले आहे. त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पण केली जावी. त्याचबरोबर कमलाकर वैशंपायन विनोदी अभिनेता व नाटककार यांचे सुध्दा निधन झाले आहे आणि सकाळच्या संचालिका डॉ. बानु कोयाजी ज्यांना रेमन मॅगसेसे हा पुरस्कार मिळाला होता आणि त्याचबरोबर त्या स्त्री रोग तज्ञ म्हणुन प्रसिध्द होत्त्या. कुटूंब नियोजनासाठी त्यांनी बरेच कार्य केले आहे यांना सुध्दा या ठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली जावी. अशी विनंती मी सभागृहाला करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>याच बरोबर आमचे मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांच्या चुलत भावाचे देखिल निधन झाले आहे. त्यांनाही कृपा करून दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा:-</u>कृपया श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे उभे राहावे.

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

## <u>शोक प्रस्ताव</u>

तामिळनाडु राज्यातील कुंभकोणम या ठिकाणी सरस्वती नर्सरी शाळेमध्ये अचानक आग लागल्याने त्यामध्ये १०० पेक्षा जास्त मुलांचा जळुन मृत्यु झाला.

तसेच महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक श्री. प्रल्हाद शिंदे, कोकण विधान परिषदेचे शिक्षक आमदार मा. श्री. वसंत बापट, विनोदी अभिनेता व नाटककार श्री. कमलाकर वैशंपायन,दैनिक सकाळच्या संचालिका डॉ.बानु कोयाजी, उल्हासनगर महानगरपालिकेतील भाजपाचे नगरसेवक श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचे चुलत भाऊ श्री. गोकलदास रूपचंदानी यांचे नुकतेच निधन झाले. या सर्वांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> २४ अ <u>दिनांक:-१९.७.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कुंभकोणम येथील सरस्वती नर्सरी शाळेला आग लागुन मृत्युमुखी पडलेले १०० पेक्षा अधिक विद्यार्थी, श्री. प्रल्हाद शिंदे, श्री.

वसंत बापट, श्री. कमलाकर वैशंपायन, डॉ. बानु कोयाजी, श्री. गोकलदास रूपचंदानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्त्तरे. आता ४.४० झाले आहेत.

प्रश्न क्र. २७८ श्री. नाना पवार यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २७८:-</u> उल्हासनगर महानगरपालिका, सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० ,दिनांक २२/१/१९९९ सदरील ठरावाची अंमलबजावणी महापालिका प्रशासनाकडुन झालेली आहे काय?

अ) सदरील ठरावाची अंमलबजावणी झाली नसल्यास त्याचे कारण काय?

वरील प्रश्नांची सविस्तर उत्त्तरे येणा-या महासभेमध्ये मिळण्यास विनंती आहे.

<u>उत्त्तरः-</u>उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३०, दि. २२.१. १९९९ अन्वये माहे जानेवारी, १९९९चे महानगरपालिकेच्या तत्त्कालीन सर्व सदस्याचे मानधन व बैठक भत्त्याची रक्कम दिवंगत मनपा सदस्य यांच्या मुलांचे नावे कायमस्वरूपी ठेवीत ठेवलेले आहे.

दिवंगत सदस्यांवर अवलंबून असणा-या त्यांची पत्नी, भाऊ, मुलगा किंवा मुलगी यापैकी एका व्यक्ती विशेष बाब म्हणुन शासनाच्या मंजुरीने मनपा सेवेत पात्रतेनुसार भरती करणेबाबत शिफारस केली होती सदर बाब प्रलंबित आहे.

शासकीय सेवेत अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देणेबाबत शास निर्णय क्र. अकंपा - <u>१९९९/प्र.</u> क्र. <u>२०/२०००/आठ</u>, दि. २८ मार्च, २००१ अन्वये शासकीय / निमशासकीय कर्मचारी दिवंगत झाल्यास त्याच्या वारसात नोकरीत सामावून घेणे बाबतचे कोणतेही
आदेश शासनाने निर्गमीत केलेले नाहीत. यास्तव, त्यांचे वारसास अदयापपर्यंत नाकरीत सामावुन घेतलेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, प्रश्न क्र. २७८ असा होता की उल्हासनगर महानगरपालिका, सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३० ,दिनांक २२/१/१९९९ सदरील ठरावाची अंमलबजावणी महापालिका प्रशासनाकडुन झालेली आहे काय?
येथे प्रश्नाचे जे उत्त्तर दिले आहे ते समाधानकारक नसल्याने आता कुणी याचे उत्त्तर येथे देऊ शकतो का? कारण आम्ही विचारले आहे की या ठरावाची अंमलबजावणी

*महापालिका प्रशासनातर्फे झाली आहे अथवा नाही. झाली नसेल तर त्याचे कारण काय आहे?*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):</u>-मा. महापौरजी, या प्रश्नाचे आम्ही जे उत्तर दिले आहे त्याशिवाय त्याचे दुसरे कोणतेही समाधानकारक उत्तर होवूच शकत नाही. कारण की हा प्रश्नच चुकीचा होता. व जो ठराव केला होता तो देखिल कायदयाच्या कक्षेत नव्हता. जो ठराव कायदयाप्रमाणे नसेल त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. महानगरपालिका कर्मचारी मग ते क व ड संवर्गातील असतील तर त्यांच्यासाठी अनुकंपा तत्त्वावर त्यांच्या वारसांना नियुक्ती देण्यात येते. नगरसेवकाच्या वारसाला अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याचा कोणताही कायदा नसल्याने या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. व ही अंमलबजावणी करता येणे शक्यही नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवार:</u>-मा. आयुक्त साहेब, या ठिकाणी अनुकंपा तत्त्वाबाबत आम्ही प्रश्न विचारलेलाच नाही. जो प्रश्न विचारला नाही त्याचे उत्तर या ठिकाणी आपण दिलेले आहे. प्रश्न एकदम साधा आणि सरळ आहे. आणि या ठरावामध्ये तत्कालिन महानगरपालिकेने प्रशासनास फक्त शिफारस केलेली आहे. आणि त्या शिफारशीची अंमलबजावणी आपण म्हणजेच प्रशासनाने केलेली नाही आणि ते या ठिकाणी आपण बोलुन दाखवले आहे की तो ठरावच चुकीचा होता. माझा प्रश्न या ठिकाणी असा आहे की, महानगरपालिका शिफारस करते हा ठराव जर चुकीचा होत असेल तर मग या ठिकाणी अनेक वेळा असे प्रश्न आलेले आहेत की, महासभेने शिफारस करून ते अंमलात सुध्दा आणलेले आहेत. आपण पाहिलेले आहे आणि या सभेत आपण थेट बोललात की, हा ठराव चुकीचा आहे. तर माझे मत असे आहे की, शिफारस करणे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महासभेला जर वाटत असेल एखादया विषयावर शिफारस करणे तर ते योग्य आहे आणि योग्य होते म्हणुनच त्यावेळच्या महासभेमध्ये उपस्थित असलेल्या सर्व प्रशासकीय अधिका-यांनी तो ठराव स्विकारला. कायदेशिर नसता तर त्याच वेळेला सांगण्यात आले असते की, हा विषय कायदेशिर नसुन बेकायदेशिर आहे. परंतु महानगरपालिका प्रशासन ठरावाची अंमलबजावणी न झाल्यामुळे ती चुक न स्विकारता महासभेने हा ठराव चुकीचा केला असे उत्तर देते तर हे एकदम दुःखद उत्तर आहे असे मी मानतो. हा एक प्रकारे महासभेचा अपमान करण्यात आलेला आहे असे माझे मत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:</u>-मा. महापौरजी, आता श्री. नाना पवार यांचा जो प्रश्न आहे त्यावर मी चर्चा करू इच्छितो. या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने नेहमी प्रमाणे फसवे असे उत्तर दिले आहे. प्रशासनास सवय आहे की, फसवे आणि थोडक्यात उत्तरे दयायची आणि आपल्यावर आलेले घोंगडे झटकुन टाकायचे. या ठिकाणी त्यांनी म्हंटले आहे की, अनुकंपा तत्त्वावर या ठिकाणी नोक-या देण्यात येतात. हा नियम सगळयांना माहित आहे. शासनाचा जो निर्णय आहे त्या निर्णयाप्रमाणे त्या क्षेत्रामध्ये, कार्यालयात काम करत असणारे जे चतुर्थ श्रेणी कर्मचारी आहेत. अशा कर्मचा-यांसाठी अनुकंपा तत्त्व मानले जाते. परंतु या ठिकाणी श्री. बाबुराव बगाडे हे नगरपालिकेचे सदस्य होते. या ठिकाणचे कर्मचारी नव्हते. तरी सुध्दा त्यांच्या भावना लक्षात घेवून, त्यांच्या कुटूंबावर जी परिस्थिती बितलेली आहे. ती परिस्थिती विचारात घेवून या ठिकाणी त्या वेळच्या सभागृहाने,त्या वेळच्या महापालिका सदस्यांनी सभागृहामध्ये ठराव पास करण्यात आला होता की श्री. बाबुराव बगाडे यांची पत्नी अथवा भावास योग्यते नुसार नोकरी जर या ठिकाणी उपलब्ध असेल तर ती देण्यात यावी. परंतु प्रशासनाने या ठिकाणी अनुकंपा तत्त्व हा शब्द टाकुन त्या ठरावालाच बगल दिलेली आहे. त्या ठरावामध्ये अनुकंपा तत्त्वानुसार नोकरी मागितली होती अथवा कसे हे मला माहित नाही. परंतु तसे मागण्या एवढे हे सभागृह दुधखुळे नाही असे मला वाटते. त्यावेळच्या सभासदांपैकी आता उपस्थित असलेल्या सदस्या स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी त्या ठिकाणी प्रस्ताव सादर केला*

होता. मा. ज्येष्ठ नगरसेवक जे एका वेळेस महापौर पदावर होते श्री हरदास माखिजा यांनी सुध्दा त्या ठरावाला अनुमोदन दिले होते, प्रस्ताव सादर केला होता. तर ते चुकीचा प्रस्ताव या ठिकाणी आणु शकत नाही. आयुक्तांचे म्हणणे आहे की तो ठरावच चुकीचा होता म्हणजे या ठिकाणी सभागृहामध्ये ब-याच गोष्टी चुकीच्या चालतात असे आयुक्तांना म्हणायचे असेल असे मला या ठिकाणी वाटते. तर जो ठराव पाच सन्माननिय सदस्यांनी मांडला होता. तर अशा या विद्यमान, तज्ञ सदस्यांना आयुक्त जर चुकीचे म्हणत असतील तर हे काही बरोबर नाही. जर हा ठराव आयुक्तांना मान्य नसेल तर याच्या पुढील कार्यपध्दती काय आहे? ठिक आहे, आयुक्तांनी तो ठराव फेटाळला, १९९९ मध्ये झालेला ठराव जर आयुक्त फेटाळत असतील तो त्यांना मान्य नसेल तर तो ठराव त्यांनी शासनाकडे पाठवायला हवा. तर आयुक्तांनी तो ठराव शासनाकडे पाठविला आहे का? शासनाकडे त्यांनी विचारणा केली आहे का? शासनाकडुन त्यांनी मत मागविले आहे का? या प्रश्नाचे उत्तर या ठिकाणी मिळायला हवे. हा ठराव जर आयुक्तांनी फेटाळला असेल तर आयुक्तांनी शासनाचे मत मागविले आहे का? जर आयुक्तांनी शासनाचे मत मागविले नसेल तर ते का मागविले नाही? येथे केलेला ठराव असाच ठेवता येतो का? जे ठराव अडचणीचे वाटतात त्यावर आयुक्त शासनाचे मत मागवु शकतात. तर त्यांनी ते मत मागविले आहे का? मला या ठिकाणी या प्रश्नाचे उत्तर हवे आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी आधी जे उत्तर दिले होते ते देखिल योग्य होते. या सभागृहाने जो ठराव केला होता तो अनुकंपा तत्त्वावर होता असे ठरावात लिहिले नव्हते. परंतु कोणत्त्याही दिवंगत सदस्याच्या वारसास नोकरी दयायची असेल तर त्या पध्दतीस कायदेशिर भाषेत अनुकंपा तत्त्व असेच म्हंटले जाते. तो ठराव १९९९ मध्ये या सभागृहात पास झाला त्यावेळी तत्त्कालिन आयुक्तांनी त्यांचे काय मत दिले याची माहिती माझ्याकडे नाही परंतु सभागृहात आयुक्तांच्या उपस्थितीत एखादा ठराव पास होत असेल व त्यावर आयुक्त त्यांचे कोणतेही मत देत नसतील याचा अर्थ तो ठराव कायदेशिर ठरतो असे होणार नाही. त्यावेळचे जे आयुक्त होते त्यांनी त्यांचे मत त्वरीत दयायला हवे होते व सभागृहाने त्यांचे मत मागितले असल्यास त्यांनी ते दयायला हवे होते. त्यांनी काय सांगितले हे मला माहित नाही. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की हा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४५१ प्रमाणे हा ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठवायला पाहिजे होता. तेव्हा तो पाठविला नाही. मी आता सभागृहाला सांगु इच्छितो की, हा ठराव विखंडीत करण्यासाठी त्वरीत राज्य शासनाला अथवा नगरविकास विभागाला पाठविण्यात येईल.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-मा.महापौर, जो ठराव महानगरपालिकेमध्ये सदस्यांनी पारीत केला असेल तो ठराव किती दिवसांच्या आत शासनाकडे पाठवायला हवा. १९९९ नंतर आज जवळ जवळ पाच वर्ष झाली आहेत आणि आता आयुक्त साहेब सांगत आहेत की, आता आम्ही हा ठराव शासनाला पाठवु तर हे योग्य आहे का? किती दिवसात तो पाठवायला पाहिजे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, कलम ४५१ मध्ये अशी कालमर्यादा निर्धारीत केलेली नाही. जर तो ठराव कायदेशिर होता तर १९९९मध्ये तत्त्कालिन आयुक्तांनी त्याची अंमलबजावणी का केली नाही? हा प्रश्न समोर येतो. जे झाले आहे ते येथेच संपवुन मी सभागृहाला सांगु इच्छितो की हा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या तरतुदीनुसार विखंडित करण्यासाठी लवकरच राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-मा.महापौरजी, श्री. नाना पवार यांनी जो प्रश्न विचारला आहे. त्याचे आयुक्तांनी त्यांच्या कायदेशिर व प्रशासकीय भाषेत उत्तर दिले आहे.

मुददा असा आहे की संपुर्ण शहराच्या वतीने मा. सदस्य श्री. बाबुराव बगाडे यांच्या पत्नीस किंवा भावास  नोकरी मिळण्यासाठी जो ठराव पास केला होता. कदाचित हा ठराव प्रशासनाच्या दृष्टीने बेकायदेशिर असेल परंतु संपुर्ण शहराच्या भावना व सभागृहाच्या भावना विचारात घेवुन आयुक्तांनी विशेष अधिकार वापरून, मा. महापौरांनी तसे आदेश देखिल दयावेत की विशेष अधिकार वापरून श्री. बाबुराव बगाडे यांच्या भावास अथवा पत्नीस नोकरी देण्यात यावी ही माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः</u>-मा. महापौरजी,मी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे मला योग्य उत्तर मिळालेले नाही. आयुक्तांनी जे उत्तर दिले ते देखिल फिरवाफिरवीचे उत्तर आहे असे मला वाटते. त्यांना मी प्रश्न विचारला होता की या ठिकाणी महासभेत एखादा ठराव पारीत करायचा असेल तो आयुक्तांना मान्य नसेल तर तो किती दिवसात. त्यांनी सांगितले की त्याला कालावधी नाही आणि आता आम्ही तो पाठवु. तर हे संयुक्तीक आहे का? पाच वर्षांनी ठराव शासनाकडे पाठवल्यास शासन आपल्या महापालिकेला काय म्हणेल? कशा प्रकारचे कारभार येथे होतात. म्हणजे पाच वर्ष सभागृहाच्या भावना आपण दडपुन ठेवल्या आहेत. कुणाच्या तरी भावना त्यामध्ये गुंतल्या आहेत. त्या भावनांचा या ठिकाणी आपण अनादर करत आहात असे मला या ठिकाणी वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः</u>-मा. महापौरांना विनंती करेन की, आयुक्तांना त्यांनी आदेश दयावेत की आयुक्तांनी त्यांचे विशेष अधिकार वापरून श्री बाबुराव बगाडे यांच्या पत्नीस किंवा भावास नोकरी देण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः</u>-मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब तत्कालिन महानगरपालिकेने शिफारस केलेली आहे हे लक्षात घ्या. आणि स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये, या ठिकाणी दोन अडीच वर्षामध्ये महानगरपालिकेमध्ये अनेक विषय या ठिकाणी उपस्थित झाले. आणि महापालिकेने अनेक विषयामध्ये शिफारस सुध्दा केलेली आहे. त्यातील एक शिफारस माझ्या माहिती प्रमाणे अशी आहे की, या ठिकाणी सहाय्यक आयुक्त म्हणुन सध्या आपण कार्यरत आहात. आपली सुध्दा शिफारस या महासभेने शासनाकडे केलेली होती, अतिरिक्त आयुक्त म्हणुन.  तर या ठिकाणी महापालिकेमध्ये अनेक रिक्त जागा आहेत आणि महानगरपालिकेचे आयुक्त त्यांच्या कायदेशिर अधिकारामध्ये त्या परिवारातील एखादया सदस्यास महापालिकेच्या सेवेमध्ये समाविष्ट करून घेत असेल.............

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः</u>-सचिव साहेब हे काय चालु आहे?सभा चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः</u>-तर आपण त्या कुटूंबातील योग्यतेनुसार, पात्रतेनुसार आणि महापालिकेच्या शिफारसीनुसार जर का सेवेमध्ये समाविष्ट करून घेतले तर एक चांगले काम महानगरपालिकेच्या तर्फे होईल असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-मा. महापौरजी, आमच्या एका सदस्याच्या घरी कुणाची तरी प्रकृती अत्यवस्थ आहे. यासाठी आम्हाला असे वाटते की चार दिवसांसाठी बैठक स्थगित करण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः</u>-मा. आयुक्त साहेब, महापौर साहेब, कोणत्त्या नगरसेवकाच्या घरी कोण आजारी आहे याची माहिती या ठिकाणी दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-माझ्या आईची तब्येत खराब आहे.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):</u>-कुणाला काही आक्षेप आहे का?

काही सदस्यः-नाही.

मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-सभा स्थगित करण्यापुर्वी ज्या लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या स्विकारणे अथवा अस्विकृत करणे यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

पहिली लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्री. लाल पंजाबी

अनुमोदक :- श्री. रामदास उमाप

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे सूचक, अनुमोदक आपले लक्ष महापालिका ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ कडे लक्ष वेधतो की, सदरहु ठराव पारीत झाला असून शहरातील लोकांना कर योग्य मुल्यात सूट प्राप्त होत नाही. त्यामुळे लोकांना फारच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या करिता प्रशासनातर्फे सदरहु ठरावाचा लाभ शहरवासीयांना का देण्यात येत नाही.

दुसरी लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्री. प्रमोद टाले

अनुमोदक :- श्री. रमेश चव्हाण

संपुर्ण शहरात सर्व झोपडपट्टी वर्गामध्ये घराची घरपट्टी माफ करण्यासाठी चढाओढ लागली आहे. तहसील कार्यालयात उत्त्पन्नाचे दाखले मिळणेस गर्दी होत आहे. शहरातील संपुर्ण जनता संभ्रमावस्थेत असुन काही समाज विघातक लोक गैरफायदा घेत आहेत. सदर बाब महानगरपालिकेशी संबंधित असुन महानगरपालिकेची घरपट्टी माफ होणेस नेमकी भुमिका काय आहे व महानगरपालिकेच्या कायदेशिर कक्षेमध्ये कुठला वर्ग सक्षम आहे. या विषयावर चर्चा होणेस विनंती आहे.

तिसरी लक्षवेधी सूचनाः-

सुचक :- श्रीमती कोमल बठीजा

अनुमोदक :- श्री. संजय बठीजा

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती मार्फत गरीब, विधवा व गरजु महिलांना त्यांच्या उदर निर्वाहासाठी मोफत शिवणयंत्र वाटप करण्याची ठरवले आहे परंतु अदयापर्यंत या कामाची कुठपर्यंत प्रगती झाली याची काहीच माहिती मिळाली नाही.

तरी आपणांस विनंती की आज दि. १९.७.२००४ रोजी होणा-या महासभेत याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

<u>मा. सचिव :-</u>पहिल्या दोन लक्षवेधी सूचना मा. महापौरांनी स्विकृत केल्या असुन तिसरी शिलाई मशिन संबंधीची लक्षवेधी सूचना अस्विकृत केली आहे. श्री. ठाकुरदास वेहरानी यांच्यातर्फे अजुन एक सूचना आली आहे की ते या सभेत उपस्थित राहु शकत नाही यासाठी त्यांची रजा मंजुर केली जावी. परंतु ते आपल्याला नंतर ठरवायचे आहे. आपणांस तिन्ही सूचना दिलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये सहा महिन्याची..............

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ते नंतर बघितले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>प्रश्नाचे काय होईल?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ते पुढील बैठकीत घेण्यात येतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>सचिव साहेब, कृपा करून हजेरी पट आपल्या ताब्यात घ्यावा. बैठक झाल्यानंतर कोणीही सही करता कामा नये.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. दिवाणे हजेरीपट बंद करून आपल्या ताब्यात घ्यावा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>सचिव साहेब, श्री. नाना पवार यांचा जो प्रश्न आहे तो कधी पुर्ण करणार?

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> पुढील बैठकीत घेण्यात येईल.

कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे. मा. महापौरांनी ही सभा सर्वानुमते चार दिवसांसाठी स्थगित केली आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज चार दिवसांसाठी स्थगित केल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः-२६/७/२००४

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२६/७/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.७.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून ही सभा सोमवार दिनांक २६.७.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.
२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ५. | श्री.सोनवणे नथु काशिराम | ३७. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३८. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ९. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. अंकुश म्हस्के |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४९. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १८. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५१. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २०. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. रामरख्यानी मोहनदास, |
| २१. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्री. शांताराम निकम | ५४. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५५. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५६ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५७. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्री. संजय रामचंद बठीजा |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६०. | श्री. बहरानी मोहन, |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६१. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्रीमती. खिलनानी भावना | ६२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६४. | श्री. दिलीप लालवानी |
| ३३. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ६५. | श्री. वदरीया राजेश |
| ३४. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | | |

तर

मा. सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु बाबु, २ श्रीमती. सीमा चंदाराम मोकल, ३. श्री. उमाप रामदास राघोजी, ४ श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ६. श्री. मोहन साधवानी, ७ श्री. जेसवानी सतराम पुनमदास, ८. श्री. लुंड गोविंदराम, ९. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी, १०. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ११ श्री. जयसिंघानी अनिल १२. श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,१३. श्रीमती. किरण माखिजा,१४. श्री. बेहरानी ठाकुरदास, १५ श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा.महापौरजी, आजच्या महासभेच्या कार्यसूचीवरील प्रश्नोत्तरे जी अर्धवट मागील महासभेत झाली होती. ते तसेच ठेवून आज थेट विषयास सुरूवात करावी. आज आमचे मा. छत्रपती शाहु महाराज यांची पुण्यतिथी आहे. आम्हाला तिथे जायचे आहे तर कृपा करून सरळ कार्यसूचीवरील विषयास सुरवात करा.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा विषय क्र. १ प्रश्नोत्तरे हा सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. लिंगे सुर्यकांत :-</u>मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. गणपत एडके यांचे बंधु श्री. राम गोविंद एडके यांचे निधन झाले असुन दोन मिनिटे त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजाः-</u>कृपया श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे उभे रहावे.

सुचकाचे नाव :- श्री. लिंगे सुर्यकांत

अनुमोदकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

## <u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ५ अ चे नगरसेवक श्री. गणपत गोविंद एडके यांचे बंधु श्री. राम गोविंद एडके यांचे नुकतेच दुःखद निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २४ ब</u> <u>दिनांकः-२६.७.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. राम गोविंद एडके यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठसीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी, श्री. धनंजय बोडारे, श्री. रमेश चव्हाण, श्री. दिलीप गायकवाड, श्री. चिमन रूपानी, श्री. राजेंद्र चौधरी, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. जमनु पुरस्वानी, श्रीमती. सांगिता जावळे, श्रीमती निना नाथानी, श्री. प्रमोद टाले, श्री. शांताराम निकम, श्रीमती. ससाणे लक्ष्मी, श्रीमती सुर्वे जयश्री, श्री. खेमानी दर्शनसिंग, श्री. मुलचंदानी महेंद्र यांनी ४.२५ सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्नोत्त्तरे न घेता लक्षवेधी घेण्याचे मा. महापौरांनी मान्य केले आहे. तरी लक्षवेधी सूचना.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> कधी ठरले?

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u> तुम्ही येण्याआधी सर्वानुमते मान्य केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u> कधी?

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>आता.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मी तशी सूचना मांडली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>एका मिनिटात झाले पण.

मा. सदस्य श्री. गौतम भालेराव यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>लक्षवेधी सूचना. सूचक आहेत श्री. लाल पंजाबी अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप .

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>लक्षवेधी सूरू करण्यापुर्वी सभापतींतर्फे जी लक्षवेधी आणली होती ती मा. महापौरांनी स्विकारली नव्हती. ती लक्षवेधी शहराच्या हितासाठी होती. शिलाई यंत्र सर्व नगरसेवकांना पाच-पाच दिले जावे. जी लक्षवेधी आमची अमान्य केली. मा. महापौरांनी आयुक्तांना आदेश दयावेत की त्यांनी आम्हाला आश्वासन दयावे आचारसांहिता लागु होण्यापुर्वी शिलाई यंत्र सर्वांना देण्यात येईल.

मा. सदस्य श्रीमती भावना खिलनानी व श्रीमती रेखा कारीरा यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. महापौर:-</u>मी आयुक्तांना आदेश देते. शिलाई यंत्राची व्यवस्था करावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भूल्लर:-</u>मॅडम असे तर एकेका गोष्टीसाठी लक्षवेधी आणावी लागेल. चार वर्ष झाले रेनकोट देणार होते नगरसेवकांना वाटपासाठी शंभर-शंभर. कुठे आहेत ते रेनकोट? चार वर्ष झालेत सडुन गेले की चांगल्यास्थितीत आहेत?

<u>मा. महापौरः-</u>आयुक्तांनी ते पण पहावे तसेच शिलाई यंत्र अदयाप प्रभागात वाटपासाठी दिली नाहीत त्याकडे पण लक्ष दयावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>रेनकोटची स्थिती काय आहे? उदरांनी खाल्ले की सडुन गेले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा व श्रीमती भारती छाब्रिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आता प्रत्येक गोष्टीसाठी लक्षवेधी आणावी लागेल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, विषय पत्रिकेवर ना रेनकोटचा विषय आहे ना शिलाई मशिनचा. रेनकोटची स्थिती काय आहे हे मला माहित नाही परंतु जिथपर्यंत माझ्या लक्षात आहे रेनकोटचे वाटप कसे केले जावे. याबाबतीत काही तरी वाद होता. व त्या विवादामुळे रेनकोटचे अजुन वाटप झालेले नाही. ते वाटपासाठी महासभेपुढे सुध्दा एक प्रस्ताव मांडला होता. तुम्ही निर्णय असा घेतला होता. की प्रत्येक नगरसेवकांनी रेनकोट वाटप करायचे आहे. असे होत नाही. योग्य त्या व्यक्तीस ते मिळावे त्यासाठी आधी वर्तमानपत्रात जाहिरात देवून अर्ज मागविणे त्याची छाननी करणे व जे पात्र लाभार्थी आहेत त्यांना देणे. राहिली गोष्ट शिलाई यंत्राची. तुमच्या माहितीसाठी सांगतो की, शिलाई यंत्र खरेदी करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. आधी जी निविदा आली त्यात २,३००/- रू. प्रती शिलाई यंत्र असा दर आला होता त्यासाठी पुर्ननिविदा मागवल्या. त्यानंतर <u>१९००/-</u> रू. प्रति यंत्र असा दर आला आहे. कामाचे आदेश देखिल दिले आहेत. परंतु आजच २५० शिलाई यंत्र आले आहेत. अजुन आमच्या ताब्यात आल्या नाहीत. परंतु आज २५० शिलाई यंत्र भांडार विभागात मिळतील. त्याचे वाटप जे आहे. आम्ही अर्ज मागविले होते. त्या अर्जाची छाननी केल्यानंतर जे पात्र लाभार्थी आहेत. त्यांना दिले जाईल. प्रत्येक नगरसेवकाला ५ असे वितरण तर होवू शकणार नाही. त्यात तुम्ही ज्यांची शिफारस केली व आम्ही जे अर्ज मागविले त्या अर्जाची छाननी केल्यानंतर ते दिले जाईल. ते छाननीचे काम सुरू आहे. आज मशिन आमच्या ताब्यात आल्या आहेत. छाननीजी करायची आहे त्यास कमीत कमी एक आठवडा लागेल. मग वाटप सुरू होईल.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>लक्षवेधी सूचना. सूचक आहेत श्री. लाल पंजाबी अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप. त्यांची सूचना येणेप्रमाणे

<u>लक्षवेधी सूचनाः-</u>

सुचकः- श्री. लाल पंजाबी

अनुमोदक :- श्री. रामदास उमाप

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे सूचक अनुमोदक आपले लक्ष महापालिका ठराव क्र. ४ दि. १९.५.२००४ कडे लक्ष वेधतो की, सदरहु ठराव पारीत झाला असून शहरातील लोकांना करयोग्य मूल्यात सुट प्राप्त होत नाही. त्यामुळे लोकांना फारच

*अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या करिता प्रशासनातर्फे सदरहु ठरावाचा लाभ शहरवासीयांना का देण्यात येत नाही.*

*मा. सदस्या श्रीमती. निता आहुजा यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मागच्या वर्षी करदरात जी वाढ करण्यात आली. फेब्रुवारी महिन्यात आम्ही एक त्यासाठी विशेष सभेची मागणी केली होती. ती पुर्ण झाली नाही. व त्याबाबतीत एप्रिल महिन्याच्या सभेत त्यावरून बराच गोंधळ झाला होता. त्यांनतर ती सभा मे, १९ ला ठेवण्यात आली. व या सभागृहात सर्व संमतीने करवृध्दी रदद करण्याबाबत ठराव पास झाला होता. परंतु दोन महिन्यानंतर प्रशासनाचे धोरण काय होते आणि काय आहे हे माहित नाही. सर्व संमतीने ठराव मंजुर होवून देखिल आतापर्यंत जे रिवाईज बिल आहे. ते जुलै महिन्यापर्यंत दिले गेले नाही आहे. यासाठी आम्ही लक्षवेधी दिली आहे. कारण की जनतेला विश्वास नाही. कारण ठराव पास झाल्यानंतर लोकांकडे बिले जात नाही. रिवाईजड बिल त्यांच्याकडे अजुन पोहचले नाही. आधीचीच बिले पोहचली त्यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे की या ठरावाची अंमलबजावणी होणार की नाही. त्याचबरोबर महापालिकेची कर वसुली त्यामुळे थांबली आहे. त्यासाठी आम्ही ही लक्षवेधी दिली आहे. आमचा आयुक्तांना आग्रह आहे की लवकरात लवकर रिवाइज्ड बिल इश्यु केले जावे. ही आमची मागणी आहे.*

*मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी सभागृहात प्रवेश केला.*

*<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया,मागच्या वर्षीप्रमाणे महापालिकेच्या क्षेत्रामध्ये १ लाख ४० हजार मालमत्ता आहे. त्यापैकी २००० जुनी मालमत्ता आहे. त्यांचे पुर्नमोजमापणी केली होती. व ५००० नवी मालमत्ता ज्यांचे ॲसेसमेंट झाले नव्हते. अशा ५००० मालमत्तांची मोजमापणी केली होती. बाकी १ लाख ३५ हजार ज्या मालमत्ता आहेत त्यांच्या करात कोणतीही वाढ केली गेली नाही. हा एक गैरसमज आहे की सर्व मालमत्तांचे रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले. व त्यामुळे मोठया प्रमाणात कर दरात वाढ झाली आहे. फक्त २००० मालमत्तांचे रिवाइज्ड ॲसेसमेंट केले व ५००० मालमत्तांचे नव्याने ॲसेसमेंट केले होते. ते ॲसेसमेंट रदद करण्याचे जे ॲन्युअल लेटींग रेट (करयोग्य मुल्य) आहे. ते ठरवायचा अधिकार आयुक्तांचा असतो. त्यानुसार दर निश्चित करून आम्ही रिवाइज्ड ॲसेसमेंट केले होते. राहिले यावर्षाचे ॲसेसमेंटली जे फायनल करायचे असते. ज्याला अथेंटीकेशन करायचे असते. ते अदयाप केले नाही. यावर्षासाठी जे लेटींग रेट निश्चित करायचे आहेत. ते अजुन केले गेले नाहीत. ते मागील वर्षासाठी होते. तुमचा ठराव लक्षात ठेवून योग्य निर्णय घेतला जाईल. परंतु या वर्षासाठी ॲन्युअल लेटींग रेट ठरविणे व पुन्हा १ लाख ३५ हजार मालमत्ता ज्या जुन्या आहेत त्याबांधकामांमध्ये काही वाढ किंवा बदल, सुधारणा ते पण पहावे लागेल. त्यासाठी सर्व्हे करावा लागेल. प्रत्येक मालमत्तेला भेट दयावी लागेल. ती विझीट करणे व ॲसेसमेंट लिस्टचे ॲथंटीकेशन करणे हे सर्व बाकी आहे. ते केल्यांनतर डिमांड ठरेल व नंतर बिल जाईल. जेथपर्यंत आपल्या महापालिकेचा प्रश्न आहे. नेहमी ऑक्टोबर नंतरच बिल पाठवले जातात. २००१च्या नोव्हेंबरमध्ये आम्ही ॲथंटीकेशन बाबत निर्णय घेतला व डिसेंबरमध्ये बिले पाठवली होती. मागच्यावर्षी देखिल आमची बिले ऑक्टोबर मध्ये गेली होती. यावर्षी अजुन बिले दिली नाही, कारण की विझीट देवून रिवाइज्ड ॲसेसमेंट करायची आहे. किंवा जर काही बदल किंवा सुधारणा झाली नसेल तर जुने ॲसेसमेंट कायम करायचे आहे. याबाबत अदयाप निर्णय घेणे बाकी आहे. तो निर्णय पुढील महिन्यात घेतला जाईल व त्यांनतर बिल देण्याबाबत किंवा, ॲन्युअल लेटींग रेट बाबतीत निश्चित केले जाईल.*

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आयुक्त साहेब, तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा निघतो की, मागच्यावर्षीची बिले रिवाइज्ड होणार नाही. असे आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया,मी मागील वर्षाबाबत जी माहिती दिली आहे की, १ लाख ३५ हजार ज्या मालमत्ता आहेत त्यांच्या ॲसेसमेंटमध्ये काही वाढ झाली नाही. ५हजार ज्या नविन मालमत्ता आहेत त्यामध्ये वाढ झाली होती जी नव्हती म्हणजेच वाढीचा प्रश्नच नाही कारण ते नवीन ॲसेसमेंट होते. तर करवाढीचा त्यात प्रश्नच नव्हता. ज्या २००० मालमत्ता आहेत. त्या २००० मालमत्तेच्या वापरात बदल झाला आहे किंवा बांधकाम वाढल्याने रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले होते. यावर्षाच्या ॲसेसमेंट बाबतीत असा कोणताही निर्णय म्हणजेच जी जुनी बिले आहेत. २००० मालमत्तेत वाढ झाली होती. ते रद्द करणे किंवा न करणे असा कोणताही निर्णय अजुन घेतला गेला नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-आम्ही जो ठराव पास केला होता तो २००३-२००४वर्षासाठी होता. महासभेने जो ठराव पास केला होता त्याचे काय होणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-२००३-२००४ साठी जो तुमचा ठराव होता त्यामध्ये जे रिवाइज्ड ॲसेसमेंट झाले आहे त्याबाबतीत होते. जिथे करवाढ व्हायला पाहिजे. परंतु मागच्या वर्षी डिमांड देण्यात आले होते. त्यामुळे त्यामध्ये आम्ही काही बदल करू शकलो नाही. आता यावर्षी मागच्या वर्षीच्या ज्या २००० मालमत्ता आहेत त्यात बदल करणे न करणे, नविन बिल पाठवणे न पाठवणे त्याबाबतीचा जो निर्णय घ्यायचा आहे तो बिल देण्यापुर्वी ॲसेसमेंट लिस्ट ॲथेंटीकेशन करण्यापुर्वी घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-याचा अर्थ आपल्या म्हणण्यानुसार मागच्या वर्षीची बिले रिवाइज्ड होणार नाहीत. मागच्या वर्षी जी बिले पाठवली गेली त्याचे रिवीझन होणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-एकदा डिमांड इश्यु केले गेले तर चुकीचे जर ॲसेसमेंट असेल कलम ४८५ जो आहे त्यानुसार...

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-रेट जे विथ ड्रॉ झाले त्यानुसार काय होणार?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मी तुम्हाला तेच सांगत आहे की सेक्शन ४८५ जो आहे. त्यात ॲसेसमेंटमध्ये दुरूस्ती करू शकतो. परंतु ती दुरूस्ती फक्त त्याच वित्तिय वर्षात केले जाते. ज्या वर्षात दुरूस्ती केली जाते त्याच वर्षासाठी ते लागु केले जाते. पूर्वलक्षी प्रभावामुळे दुरूस्तीचा पण काही फायदा होत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-म्हणजे त्या लोकांना तिच बिले कायम आहेत. हे पहा तुम्ही असे फिरवून बोलु नका. माझा निश्चित स्वरूपाचा प्रश्न आहे. त्यांना रिवाइज्ड बिल दिली जाणार की नाही? याचा अर्थ तुम्ही महासभेच्या ठरावाला ओलांडुन पुढे जात आहात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-रिवाइज्ड बिल कशाला दयायची हे सांगा. एकदा आम्ही जेव्हा मागणी केली त्यानंतरचा तुमचा ठराव आहे. व ॲन्युअल लेटींग रेट जे निश्चित केले आहेत ते कायदयाच्या चौकटीतच केले आहेत. तुम्ही

स्वतः कायदयाचे जाणकार आहात जे पण झाले ते जर बेकायदेशिर झाले असेल तर ४८५ नुसार प्रश्न उपस्थित झाला असता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-सर्वांच्या माहितीसाठी सांगतो याचा अर्थ त्या ठरावाची अंमलबजावणी करणार नाही. असेच ना अजुन काय?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-आयुक्त साहेब, लक्षवेधी देण्यामागचा उददेश एकच होता. मागील वर्षी आपण जे करयोग्य मुल्य निर्धारीत केलेले वाढविले ते पुर्वीप्रमाणे लागु करण्यासाठी महासभेने ठराव पारीत केला होता. आणि त्या ठरावाची अंमलबजावणी आपण करणार आहात की नाही त्या दृष्टीकोनातुन ही लक्षवेधी दिली आहे. ठराव तसाच झाला होता की जो आपण करयोग्य मुल्य दर वाढवलेला आहे तो पुर्वीप्रमाण कायम करण्यासाठी ठराव करून महासभेने तुम्हाला निर्देश दिले होते. त्याची अंमलबजावणी केली की नाही केली? करणार किंवा नाही?

मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-तुम्ही हा ठराव वाचुन दाखवा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-हा महासभा ठराव क्र. ४ आहे दि. १९.५.०४ मध्ये ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता सन १९९६-९७ या सरकारी वर्षात लागु असलेल्या करयोग्य मुल्यांकनाची दरसुची लागु करणे मान्य करीत आहे व सन २००३-२००४ या सरकारी वर्षात प्रशासनातर्फे लागु करण्यात आलेल्या नविन करयोग्य मुल्यांकनाची दरसूची रददबादल करीत आहे. व त्या परिणामात सन २००३-२००४ च्या आकारणी पुस्तकातील नोंदी बाबत संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर घरपटटी रक्कम भरल्या दिनांका पासुन सहा महिन्याच्या आत परताव्याची देय रक्कम अदा करणेस प्रशासनास निर्देशित करीत आहे. त्यांचे हेच म्हणणे आहे की,२००३-२००४साठी जे करयोग्य मुल्य वाढवून नोटीस पाठवले आहेत. किंवा बिल पाठवले आहेत ते रदद करून नवीन बिल गेलेले पाहिजे. म्हणुन ही लक्षवेधी म्हणजेच त्या ठरावाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने तुम्ही काही पावले उचचली आहेत का किंवा नाही आहेत? उचलणार आहात किंवा नाही? मग हा ठराव जो महासभेने पारीत केला त्याविषयी काय करणार आहात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-मा. महापौर महोदया, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, २००३-२००४ची डिमांड निश्चित झाली आहेत. बिले पाठवली गेली आहेत. त्यामुळे २००३-२००४च्या डिमांडमध्ये काही बदल होवू शकत नाही. व २००४-२००५साठी जी डिमांड करायची आहे. त्याबाबत अदयाप आम्ही ॲसेसमेंट लिस्टचे ॲथंटीकेशन केलेच नाही. त्याबाबत आम्ही अजुन बिले इश्यु केली नाहीत. कारण की आमची अदयाप ॲसेसमेंटची लिस्टच तयार नाही. ती यादी तयार झाल्यानंतरच त्याबाबत निर्णय घेतला जावू शकेल. व ॲसेसमेंट लिस्ट ॲथंटीकेशन करण्यापुर्वी करयोग्य मुल्य दर निश्चित करायचे आहे. ॲन्युअल लेटींग रेट यावर्षी निश्चित होतील व त्यानंतरच निर्णय होईल.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-यावर्षाचे नाही. २००३व २००४ साठी आहे. तुम्ही जे पाठविले त्याबाबतीत काय? ते रदद होणार नाही, ते रदद करणार नाही.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-त्याबाबत मी सांगितले आहे की, एकदा डिमांड केली गेली व जे कायदयाच्या चौकटीत आहे. ते रदद व्हायचा प्रश्नच नाही. ४८५नुसार जर दुरूस्ती करायची असेल तर त्याच वर्षात मागील वर्षाच्या

बिलात दुरूस्ती करण्याचा आपल्याला काही अधिकार नाही. तुम्ही सेक्शन ४८५ पहा. रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टमुळे तो फायदा दिला जावू शकेल. आणि जे दरवाढीबाबत आपण बोलत आहात. ती फक्त २००० मालमत्तेमध्ये आली आहे. त्यात सुध्दा बांधकामांचे क्षेत्र वाढविले आहे. किंवा रचना किंवा वापरात बदल केलेला आहे. त्यामुळे वाढ केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. आयुक्त साहेब, महासभेने जो ठराव केला आहे तो अमान्य आहे त्यावर अंमलबजावणी होणार नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>महापालिकेने यावर्षी ठराव पास केला आहे. तर या ठरावाची अंमलबजावणी यावर्षी होईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>इथे लिहिले आहे वर्ष २००३-२००४ करिता. आयुक्त साहेब मी तुम्हाला स्पष्टपणे सांगतो की तुम्ही जनतेला स्पष्ट संदेश दया. बिले रिवाइज्ड होणार नाही. नगरसेवकांनी जनतेची दिशाभुल केली आहे. प्रापर्टी टॅक्स जो विथ ड्रॉ केला आहे तो चुकीचा आहे. हे तुम्ही लोकांना सांगा की तुम्ही बिल भरा. किंवा हा ठराव रद्दीच्या टोपलीत गेला असे सांगुन टाका.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>तीच गोष्ट मी स्पष्टपणे सांगितली आहे. मागील वर्षी जे बिल दिले गेले आहे. यावर्षी दुरूस्ती करण्यासाठी कायदयामध्ये काही तरतुद नाही. आता गोष्ट चालु वर्षासाठी. चालु वर्षात काय करायचे आहे हे काही अजुन ठरविले नाही. याबाबत अजुन काही बोलु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आयुक्त साहेब जेव्हा हा ठराव पास झाला. त्यानंतर शहरातील जे पण स्थानिक वर्तमानपत्र होती. करवाढीचा प्रस्ताव रद्द झाला आहे. लोकांच्या मनात एक शंका आहे की प्रस्ताव रद्द झाल्यावर वाढलेला कर भरायचा नाही. तुम्ही म्हणत आहात की, २००३ व २००४चे जे बिल पाठविले आहे ते भरायचे आहे. लोकांना समजत नाही की, सत्ताधारी पक्षाने व विरोधी पक्षाने मिळुन एक ठराव पास केला की करवाढ रद्द करण्यात आलेली आहे. त्याला तर काही अर्थच उरला नाही. इथे इतक्या टाळया वाजविल्या गेल्या करवाढ रद्द झाली म्हणुन. लोकांना समाचार मध्ये सांगितले करवाढ रद्द झाली, रद्द झाली. शहरात हाहाकार माजला होता. लोकांनी त्यासाठी फटाके वाजविले त्याचे काय झाले शेवटी? याचा अर्थ तर काहीच नाही झाले त्याबाबतीत जरा खुलासा करावा. लोकांना आम्ही काय सांगायचे? आज लोक बिल भरण्याच्या परिस्थितीत नाही. त्यांना समजत नाही बिल कमी होईल. भरायचे की नाही भरायचे? त्यांनी करायचे काय? किंवा २००४ व २००५ असे मिळुन एकत्र बिल भरावे याबाबतीत कृपया सविस्तर सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आयुक्त वारंवार खुलासा देत आहेत ना की होणार नाही. त्यांनी काय लिहुन दयावे काय?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>सत्ताधारी पक्षाने तर बाहेर खुप फटाके वाजविले होते यासाठी. आणि इथे सांगितले की करवाढ रद्द झाली. त्याचे काय झाले?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>ते सांगत आहेत ना की होणार नाही. अजुन काय करायचे त्यांनी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मग कसे सर्वजण स्टेटमेंट देतात की करवाढ रद्द करण्यात आली आहे. ठराव करण्याला अर्थ काय झाला? जनतेला फक्त खुश

केले की, निवडणुका येत आहेत करवाढ रदद झाली आहे. असे करून काही होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>श्री. जमनु पुरस्वानी यांना माहित नाही की शहरातील जनतेला मागील १६ वर्षापासुन मुर्ख बनविले जात आहे हे काय नवे आहे काय?पहिल्यांदा नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>हे तुम्ही बरोबर बोललात.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>म्हणजे जनतेची फक्त दिशाभुल करायची आहे आणि सांगायचे आहे की, गरीबांना करवाढ रदद केली आहे. दारीद्रय रेषेखालील लोकांना कर भरावा नाही लागणार. २४००० वार्षिक उत्पन्न असणा-यांना कर भरावा लागणार नाही. अशाप्रकारे तुम्ही लोकांची दिशाभुल करणार असाल तर असा ठराव करायची काही गरज नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>मा. महापौर महोदया, आमच्या विरोधी पक्षांना आम्ही काही चांगले काम करतो तेव्हा त्यांना निवडणुकाच का दिसतात?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>काय चांगले काम केले आहे. कर विथड्रॉ करत नाही हे चांगले काम केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आम्ही जेव्हा पण चांगले काम करतो तुम्हाला निवडणुका दिसतात. तुम्हाला फक्त राजनीती करायची आहे का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>चांगल्या कामाचा काहीतरी रिझल्ट दिसला पाहिजे ना. करवाढ रदद केली वर्तमानपत्रात आले, लोकांच्या घरात हॅंडबिल पोहचले. आणि म्हणता काही झाले नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सिंधीमध्ये एक म्हण आहे.

" कोल्हयाला द्राक्ष आंबटच "

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>हे आधी तुमच्यासाठी लागू होते नंतर दुस-यांवर.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>तुम्ही ज्या चुका केल्या त्या आम्ही निस्तारीत आहोत. जकातीचे तुम्ही खाजगीकरण केले ते पण आम्हीच निस्तारीत आहोत. आचारसंहितेमुळे तुम्ही जे दर कमी नाही केले ते आम्ही करत आहोत. उलट तुम्ही आम्हाला साथ दया ना , त्रास का देता?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>पंजाबीजी, श्री. लाल पंजाबींनी जे सांगितले की, १९. ७.२००४चा जो ठराव आहे. आयुक्त साहेब सांगत आहेत तो रदद होणार नाही त्याचा पुढे विचार करू म्हणजे जो स्पष्ट ठराव होता की प्रशासनाने जे कर योग्य मुल्य वाढविले आहे. तो रददबादल करून जुन्या दराने कर लागु करण्यात यावे. प्रशासनाने ते नामंजुर केले आहे. आयुक्त साहेबांनी आपण सर्वसंमतीने केलेला ठराव अमान्य केला आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>आयुक्त साहेबांनी , जर ठराव अमान्य केला तर मंत्रालयातुन मान्य करून आणु.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>१९.५.२००४ला ठराव झाला. वर्तमान कक्षात बसलेल्या पत्रकारांनी २०.५.२००४ला बातमी छापली की हा प्रस्ताव सर्वसंमतीने पास झाला आहे. करवाढ रद्द करण्यात आली आहे. आणि दोन महिन्यांनी इतिवृत्त कायम झाल्यानंतर आज दोन महिन्यांनी....

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>आधी तुम्ही तुमची भुमिका स्पष्ट करा की, तुम्ही सकारात्मक किंवा नकारात्मक भुमिकेत आहात.

<u>मा. सदस्य श्री.नारायण पंजाबीः-</u>मा. महापौर साहेब, पत्रकार वर्ग काही छापणार त्यासाठी......

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>आम्ही सकारात्मक विचार करतो. तुम्हीच तुमची भुमिका स्पष्ट करा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आमची भुमिका ही आहे की जनतेचा फायदा झाला पाहिजे, जनतेची दिशाभूल नाही झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>तुमचीच भुमिका स्पष्ट नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>पाहिल्या सभेत म्हणता की करवाढ रद्द करण्यात आली . दोन महिन्यात इतिवृत्त कायम झाल्यानंतर म्हणतात की, २००३ व २००४ चे कर जसे आहे तसे भरावे लागतील. ही लोकांची दिशाभुल करणे आहे नाही तर काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आम्ही मंत्रालयात जावुन काम करवुन आणु. इथे जर होत नाही तर तिथे आमचे सरकार आहे. आमचे आमदार साहेब आहेत श्री. पप्पु कालानी तिकडुन आम्ही करून आणु.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी...........

<u>मा. सदस्य श्री.लाल पंजाबीः-</u>काय करून आलात आज पर्यंत? चटई क्षेत्र वाढवुन आलात. आम्ही पाहिले आमदारांनी काय काम केले ते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>हे बघा सरकारी काम आहे हळुहळु सर्व होईल. घाई नका करू जे होईल ते चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, करवृध्दी जी झाली होती. आचारसंहिता लागु झाल्यावर करवाढ करण्यात आली होती. त्यावेळी महासभा करू शकत नव्हतो. आयुक्त साहेबांनी स्वतःच्या अधिकारात करवाढ केली. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार आचारसंहिता पुर्ण झाल्यावर सत्ताधारी व विपक्षांनी मिळुन एक ठराव पास केला. कराचे बिल आहे त्याचा दर जुनाच राहिल. जुन्या दराने बिल निघेल. त्यावेळेस मी महासभेत स्पष्टपणे म्हंटले होते ते इतिवृत्तात देखिल लिहिलेले आहे. जर आयुक्त साहेबांनी हा ठराव रद्द करण्यासाठी पाठविला किंवा त्या ठरावाची अंमलबजावणी केली नाही तरी आम्ही ठराव करतच राहणार. यामध्ये भले सत्ताधारी पक्ष असो वा विपक्ष असो सर्वांची भावना हिच होती की शहरात करवाढ नाही झाली पाहिजे. आज जसे आयुक्तांनी सांगितले की पाच करोड रू. जे वाढवले गेले होते. त्यापैकी साडे तीन करोड रूपये तर लोकांनी भरले पण आहेत. नव्या दराने ३ करोड रू. लोकांनी तर भरले पण आहेत तरी पण आम्ही हा ठराव केला होता की २००४ पासुन जे दर वाढविले आहेत ते रद्द केले जावेत. आयुक्त साहेब जेव्हा यावर्षीचे रिवाइज्ड बजेट घेवून येतील किंवा नवीन अर्थसंकल्प

आणतील. तुम्ही वसुली जरी केली तरी आम्ही त्याचा विरोध करू. महासभेच्या ठरावावर अंमलबजावणी केली पाहिजे. त्यानंतर बीपीएल योजना जी आहे. येणारी लक्षवेधी त्यासाठी आहे. आम्ही ठरावात टाकले आहे की, ज्यांनी टॅक्स भरला आहे त्यांना याचा फायदा होणार नाही. जे दारीद्य रेषेखाली आहेत. त्यांची थकबाकी माफ केली जावी त्यात पण अट टाकली आहे की, ज्यांनी कर भरला आहे त्यांना याचा फायदा होणार नाही. परंतु आयुक्त साहेबांनी सभागृहाची भावना लक्षात घ्यावी ही विनंती आहे. लोकांकडे नवीन नोटीस गेली आहे. ज्यांनी कर भरला नाही. आता आमचे मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी म्हंटले लोक विचार करत आहेत भरायचा कर की नाही भरायचा? महासभेचे जे मत आहे ते लक्षात घेवून आपण जो निर्णय घेतला तर लोकांना फायदा होईल. लोक करवाढ झालेले बिल भरण्यास तयार नाही अशी परिस्थिती आहे. माझी आयुक्तांना विनंती आहे की, कमीत कमी जे अजिबात बिल भरू शकत नाही. जसे बीपीएलवाले आहेत. त्याचत-हेने ज्यांना नव्या दराने बिले दिली गेली आहेत. त्यांनी भरली नाहीत.त्यांची परिस्थितीच नाही बिल भरण्याची. तर मेहरबानी करून त्यांचा समावेश केला तर बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>मा. महापौरजी, या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. आयुक्त साहेबांनी पण आपले म्हणणे सांगितले आहे तर इथे ही चर्चा थांबवावी.

<u>मा. महापौर:-</u>आयुक्त साहेबांना आदेश देते की, करवाढ जी झाली आहे ती रद्द करावी. व नवीन जो टॅक्स लावतील तो लागु झाला पाहिजे. नवीन नाही जुना दराने दिले गेले पाहिजे. व जे दर वाढवले ते माफ केले जावे.

<u>मा. सचिव(श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>दुसरी लक्षवेधी सुचना आहे. त्याचे सूचक आहे श्री. प्रमोद टाले व अनुमोदक आहेत श्री. रमेश चव्हाण त्यांची सूचना येणेप्रमाणे.

## <u>दुसरी लक्षवेधी सूचना:-</u>

सूचक :- श्री. प्रमोद टाले

अनुमोदक :- श्री. रमेश चव्हाण

संपुर्ण शहरात सर्व झोपडपट्टी वर्गामध्ये घराची घरपट्टी माफ करण्यासाठी चढाओढ लागली आहे. तहसील कार्यालयात उत्पन्नाचे दाखले मिळणेस गर्दी होत आहे. शहरातील संपुर्ण जनता संभ्रमावस्थेत असुन काही समाज विघातक लोक गैरफायदा घेत आहेत. सदर बाब महानगरपालिकेशी संबंधित असुन महानगरपालिकेची घरपट्टी माफ होणेस नेमकी भुमिका काय आहे व महानगरपालिकेच्या कायदेशिर कक्षेमध्ये कुठला वर्ग सक्षम आहे. या विषयावर चर्चा होणेस विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौरजी, मा. उपमहापौर, मा. आयुक्त इथे उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य आज संपुर्ण शहरामध्ये सर्व झोपडपट्टी वर्गामध्ये शहरात जेवढया झोपडपट्टया आहेत. जो जो स्लम ऐरीया आहे. या संपुर्ण वर्गामध्ये घरपट्टी माफ करण्यासाठी जी अनाऊन्समेंट झालेली आहे. त्यामुळे संपुर्ण जनता ही आपली घरपट्टी माफ करण्यासाठी त्यांची चढाओढ लागली आहे. तहसिलकार्यालयामध्ये जर गेलात तर त्यासाठी लागणारे ॲफीडेव्हीटसाठी जो दीडशे रू. पर्यंत खर्च आहे. जो माणुस कर्ज काढुनही ॲफीडेव्हीट करत आहे. अशी चढाओढ तिथे लागली आहे. संपुर्ण शहरामध्ये यासर्व वर्गामध्ये एक संभ्रमावस्था

निर्माण झाली आहे की टॅक्स खरोखर माफ होणार आहे की नाही. आम्ही एवढा खर्च करत आहे. गोरगरीब माणुस दोनशे ते तिनशे रू. खर्च करतो. हा जो घरपट्टी माफ करण्याचा जो प्रकार आहे तो महानगरपालिकेच्या अखत्यारीत असल्यामुळे यामध्ये बरेचसे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थायी समितीच्या अध्यक्षांनी जो ठराव पास केला आहे तो ठराव पण वाचला ठरावामध्ये जे जे भारतीय संविधान सांगितले आहे. ७४ वी घटना आहे. आयुक्त महोदय हा जो ठराव झाला आहे. भारतीय संविधानाची ७४वी घटना दुरूस्ती, बीपीएमसी ॲक्ट १५२ कलम आहे त्यामध्ये नेमके काय लिहिले आहे. घटना दुरूस्ती नेमकी काय आहे. ७४व्या घटना दुरूस्ती काय आहे. याचा उहापोह इथे होणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक अधिनियमाचे कलम १५२ मध्ये घरपट्टी माफ करण्याबद्दल नेमके काय निकष लावले आहेत. याचा उल्लेख व्हायला पाहिजे. तिसरे स्थायी समितीने जो ठराव पास केला २४ हजारा पर्यंत उत्पन्न आणि जर ही योजना दारीद्य रेषेखालील किंवा बीपीएल कॅटेगरी खाली असेल, पिवळे रेशन कार्ड जर आवश्यक असेल जर अंत्योदय कार्ड आवश्यक असेल. केशरी कार्ड असणारे ज्यांचे उत्पन्न २४०००/- लिहीले असेल ते पण या कॅटेगरीत कसे लागु होतील याचे उत्तर असले पाहिजे. दुसरे त्याचा जो वार्षिक उत्पन्नाचा दाखला आहे. वार्षिक उत्पन्नाचा दाखला हा काढण्यासाठी तिथे तहसिलदार ऑफीस मध्ये नुसती रांगच्या रांग लागली आहे. तिथे दलालांना एवढे फावलेले आहे की दलाल लोक त्याचा गैरफायदा घेत आहेत. दुसरे आणखी एक आहे मा. आमदार श्री. पप्पु कालानी यांचे जे कार्ड आहे. आज ते कार्ड बाजारात खुल्या भावाने विकले जात आहे. माझ्याकडे पण असे एक कार्ड आलेले आहे. दहा रूपये वीस रूपये देवून ते कार्ड मिळते. जर असे प्रकार जर शहरात होत असतील तर आज पर्यंत आयुक्तांनी त्याबद्दल त्यांची नेमकी भुमिका स्पष्ट केली पाहिजे. एकतर घरपट्टी माफ करण्याबाबत महानगरपालिकेने जो ठराव केला आहे. तो ठराव नेमका कुठल्या निकषाने बसवला आहे. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १५२ चे कलम नेमके काय आहे. घरपट्टी माफ करण्याबद्दल नेमके कोणते निकष लावले आहेत. ७४वी घटना दुरूस्ती नेमकी काय आहे? आणि यामध्ये लोकांची जी संभ्रमावस्था झाली आहे त्यांची घरपट्टी नक्की माफ होणार आहे का? आणि जर होणार असेल तर नेमकी त्याची प्रोसिजर काय आहे. घरपट्टी तसा तुम्ही फॉर्म काढला आहे का? तो फॉम तुम्ही नेमका कुठल्या आधारावर काढला आहे. तो फॉर्म काढताना निकष कोणता लावला आहे. आणि हे सर्व अर्ज तुम्ही नेमके कुठल्या पध्दतीने घरपट्टी माफ करणार आहात. यावर आयुक्तांचे किंवा प्राधिकृत व्यक्तींचे त्यावर भाष्य असले पाहिजे. आणि लोकांमध्ये जी संभ्रमावस्था झाली आहे. विधानसभेचे पडघम वाजायला लागले आहेत. लोकांना असे वाटते की विधानसभेमध्ये उभे राहणा-यांसाठी नवीन योजना असतील किंवा चॉकलेट असतील किंवा अजुन काय असेल. काही लोक तर अशी आहेत की टॅक्स पावती आम्हाला दया आम्ही त्याचे थेट पैसे देतो. असे पण लोक इथे आहेत. तर यासर्व शहरामध्ये जो गोंधळ झालेला आहे. याचे निराकरण करण्यासाठी तुमची नेमकी भुमिका काय याचे इथे उत्तर मिळावे.

मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर, उपमहापौर,आयुक्त व सर्व सदस्य उल्हासनगर शहरामध्ये सर्व झोपडपट्टी वर्गामध्ये आज सगळीकडे दलाल फिरत आहेत. २४०००च्या खाली उत्पन्न ज्याचे असेल. रेशन ऑफीसमध्ये ही अशी लाईन लागली आहे. ज्यांचे उत्पन्न ३६००० होते ते २४ हजार करून आणत आहेत. याआधी तुमच्याशी चर्चा झाली होती. तुम्ही सांगितलेले ज्याच्या घरी टिव्ही आहे, फ्रीज आहे किंवा दुचाकी वाहने आहेत त्यांचे माफ होणार नाही. आणि इथे शहरामध्ये असे दलाल फिरत आहेत की, आमच्याकडे कार्ड दया. २४०००उत्पन्नाची गरज नाही तुम्ही थेट फॉर्म दया. त्याचे नक्की काय नॉर्मस आहेत. त्याचे निकष काय आहेत हे

आम्हाला समजवुन सांगा. जेणेकरून झोपडपटटीधारकांना कोणी फसवणार नाही. स्पष्टपणे तुमचे संदेश जनतेपर्यंत गेले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-प्रथम श्री. लाल पंजाबी यांनी जी लक्षवेधी आणली त्याबददल त्यांचे अभिनंदन करतो. महासभा ठराव केल्यानंतर प्रशासन मानत नाही. हे महासभेच्या आणी प्रशासनाच्या लक्षात आणुन दिले आहे. श्री. प्रमोद टाले व श्री. रमेश चव्हाण यांनी जी लक्षवेधी आणली. शेवटी कायदेशिर की बेकायदेशिर बाब परंतु ज्वलंत समस्या, ज्वलंत विषय महापालिकेत किंवा शहरामध्ये आहे. तो सभागृहाच्या आणि प्रशासनाच्या लक्षात आणुन देणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे ते त्यांनी केले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी काही प्रश्न विचारले आहे. ते अतिशय महत्त्वाचे आहे. मी त्यामध्ये भर टाकतो आहे की आयुक्त साहेब स्थायी समितीचा ठराव झाल्यानंतर दारीद्य रेषेखालील जी कुटूंबे आहेत त्यांना मालमत्ता कर माफ हा एक राजकीय ठराव होता, प्रशासनाकडुन नव्हता असे तुमच्याशी बोलणे झाल्यानंतर लोकप्रतिनिधीनी आणलेला ठराव स्थायी समितीमध्ये तो आणल्यानंतर तुमच्याशी बोलणे झाले तुम्ही म्हणालात की, हा ठराव जनरलमध्ये लागु होत नाही आणि वैयक्तिक प्रकरणांसाठी आयुक्तांचे अधिकार आहेत त्यासाठी ठरवाची आवश्यकता नाही. तिच माहिती आम्हाला याठिकाणी पाहिजे. आणि जे लाभार्थी आहेत. असे दारीद्य रेषेखालील लाभार्थी आपल्या महापालिकेच्या नोंदीनुसार किती आहेत त्यांची संख्या किती? आपल्याकडे निश्चित रेकॉर्ड असेल. दारीद्य रेषेखालील कुटूंबे किती आहेत? आज जसे श्री. प्रमोद टाले व श्री. रमेश चव्हाण यांनी सांगितले की, कुठलीही कार्ड दिली जात आहेत. कोणत्त्याही लोकांना दिली जात आहेत. त्याचे काही निकष नाहीत तर ही जी योजना आहे. किंवा स्थायी समितीच्या ठरावानुसार आपण लगेच नागरीक सुविधा केंद्रातुन फॉर्म वितरीत करण्यास सुरूवात केली तिथे प्रचंड लाईन म्हणजे प्रशासन आणि स्थायी समिती यांच्या संगनमताने हा ठराव झाला. लगेचच या अगोदर अशाप्रकारचा फॉर्म उपलब्ध नव्हता. परंतु तो दारीद्य रेषेखालील लोकांना टॅक्स माफीचा फॉर्म लगेच सी.एफ.सी. मधुन उपलब्ध करून दिला आहे. तर अशा किती लोकांना आपण देवू शकता असे काही निश्चित केले आहे का? अभ्यास केला आहे का? त्यांनतर पिवळे कार्डच पाहिजे त्या व्यतिरिक्त दुसरे काही ॲफीडेव्हीट पाहिजे. त्याआधारे सुध्दा आपण टॅक्स माफ करू शकता का?आणि कर माफ करायचा असेल तर सरसकट होईल का? जर सरसकट होणार असेल तर त्याची प्रक्रिया काय आहे? आणि एखादया क्ष व्यक्तीला जर कर माफ करायचा असेल तर त्याला स्थायी समितीच्या ठरावाचा उपयोग होईल का? त्याची प्रक्रिया काय? आणि तुम्ही किती प्रक्रिया पुर्ण केल्यावर एखादया क्ष व्यक्तीला या ठरावाचा लाभ देता येईल. याची संपुर्ण माहिती याठिकाणी दयावी ही नम्र विनंती. किती प्रक्रिया आहेत त्याच्या? त्याला तुम्ही नोटीस न देता टॅक्स माफ करणार का? का फक्त रेशनिंग कार्ड पाहिले. उत्त्पन्नाचा दाखला पाहिला तर जागच्या जागी टॅक्स माफ करणार का? तुम्ही नोटीस पाठवणार? वॉरंट पाठविणार, जप्ती करणार? का पंचनामा करून नंतर शिफारस करणार याची इत्त्थंभुत माहिती जर इथे प्रशासनाच्या वतीने दिलीत तर बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):</u>-मा. महापौर महोदया, सन्मानानिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी जी लक्षवेधी आणली आहे. माझ्यामते हा लक्षवेधीचा विषय असु शकत नाही. कारण हे की, जर सार्वजनिक हिताचा प्रश्न असेल यात महानगरपालिकेकडुन किंवा महापालिका प्रशासनाकडुन किंवा महापालिकेच्या कोणताही प्राधिका-याकडुन सार्वजनिक हितात जर काही बाधा आली तरच लक्षेवधी सूचना येवू शकते. यात स्थायी समितीचा निर्णय सार्वजनिक हितासाठी घेतला गेला आहे. हि एक गोष्ट. ७४व्या घटनादुरूस्ती विषयी बोलले आहे. हि घटनादुरूस्तीतर ८९ सालानंतर झाली. १९९२मध्ये हि घटनादुरूस्ती झाली परंतु हे जे नियम झाले आहेत ते १९४९साली झाले आहेत. १९४९मध्ये अधिनियम झाले त्यातील १५२ कलमान्वये एक तरतुद आहे की, जर आयुक्तांना वाटले तर कर किंवा कर वसुलीसाठी झालेला

खर्च तो वसुल होण्या योग्य नाही. तर स्थायी समितीची मान्यता घेवुन माफ होवू शकतो. इकडे मार्च महिन्यामध्ये जेव्हा आम्ही वसुलीसाठी सक्तीचे पाऊन उचलणे सुरू केले तेव्हा कित्त्येक निवेदने माझ्याकडे आली होती. ते निवेदन आल्यानंतर खुपसे लोक विनंती करायचे की आमच्याकडे कर भरण्यासाठी पैसे नाही. दहा वर्षाचे देणे बाकी आहे. परंतु आमच्या कडे अन्न खायला सुध्दा पैसे नाही. तर हे पैसे आम्ही कुठून भरणार. तेव्हा त्यावेळी मी काही लोकांना सांगितले होते की, तुमची जर अशी परिस्थिती आहे. महापालिकेचा कर तुम्ही भरू शकत नाही तर तुम्ही आम्हाला एक अर्ज दया. तुम्ही जर दारीदय रेषेखाली येत असाल तर रेशन कार्ड बीपीएलचे आहे किंवा आर्थिकदृष्टया कमकुवत आहे. रेशन कार्ड किंवा उत्तपन्नाचा दाखला ते आम्हाला दया. आम्ही वेरीफाय करू. जर महापालिकेच्या अधिकारीना तुमच्या घरी अशी स्थावर किंवा जंगम मालमत्ता नाही मिळाली जी जप्त करून टॅक्सची वसुली करू शकतो. ते कर आम्ही माफ करू. जितकी पण निवेदने माझ्याकडे आली त्यांना आम्ही सांगितले होते काही नगरसेवक पण आले होते त्यात एक श्री. प्रमोद टाले पण होते. असे माझ्या लक्षात आहे. त्याचवेळी मी त्यांना ही सर्व प्रक्रिया समजावली होती. परंतु त्यानंतर कोणत्त्याही नागरिकाकडुन तसा अर्ज आला नाही पंरतु स्थायी समितीने एक ठराव पास केला. तो ठराव कायदयाने बरोबर असल्याने त्यावर अंमलबजावणी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला त्याकरिता जो पण निर्णय घेतला गेला स्थायी समितीत जर वैयक्तिक अर्ज आला असता तर एप्रिल मे मध्येच असे प्रस्ताव स्थायी समितीमध्ये प्रशासनातर्फे गेले असते व टॅक्स माफ केला असता. आपण कल्याण महापालिकेचे उदाहरण घ्या, दुस-या कोणत्त्याही महापालिकेचे किंवा नगरपालिकेचे उदाहरण घ्या. जिथे दरवर्षी जो कर वसुल केला जावू शकत नाही तो वसुल करण्यासाठी स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवुन कर माफ केला जातो. इकडे लोकांच्या माहितीसाठी स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर आम्ही एक अर्जाचा नमुना तयार केला. कुणी कसाही अर्ज केला आणि जर त्यात खरी माहिती नसेल तर पुढे जावुन अर्जाची छानणी करण्यास प्रशासनास त्रास झाला असता त्याकरिता आम्ही एक अर्जाचा नमुना तयार केला. छाननी फॉर्म तयार केला. आमच्या लोकांना काही निर्देश दिले. व लोकांच्या माहितीसाठी सामान्य जनतेच्या माहितीसाठी एक निवेदन १५ जुलैला वर्तमानपत्रात दिले. यासाठी जे नगरसेवक माझ्याकडे यायचे त्यांना मी पुर्णपणे स्पष्टीकरण दिले आहे. इथे सभागृहात जे स्पष्टीकरण मागत आहेत त्यांना मी माझ्या कार्यालयात स्पष्टीकरण दिले. ते सदनात पुन्हा स्पष्टीकरण मागत आहेत. ज्यांना मी मार्च मध्ये समजावले होते की ही योजना अशी आहे ते पण इथे स्पष्टीकरण मागत आहे. मला वाटते ही जी कायदयात तरतुद आहे. १५१ सेक्शन अंतर्गत ज्यांची कर वसुली होवू शकत नाही. ते फक्त पात्र आहे. त्यात निकष जो असायला पाहिजे होता. नियम असायला पाहिजे होते. नगरपालिकेचे जर तुम्ही उदाहरण घेतले तर वसुल न होण्याजोगा करलिखित नियम १९८३ हे नियम नगरपालिकेत आहेत. नगरपालिकेत कायदयानुसार जे नियम असायला पाहिजे. टॅक्सचे जे रूल आहेत त्यामध्ये ही तरतुद किंवा स्पष्ट असे स्पष्टीकरण नाही. कोणती थकबाकी राईट ऑफ करायची आहे. निर्लेखित करायची आहे. व कोणती थकबाकी निर्लेखित करायची नाही. त्यासाठी नियम नाही बनविले. ते नियम नसल्याने आम्ही एक निवेदन लोकांच्या माहितीसाठी दिले त्यानुसार १००० पेक्षा जास्त अर्ज आले आहेत.ज्यांनी अर्ज केला ते सर्व पात्र आहेत हा अर्थ होवू शकत नाही. किंवा तहसिलदाराकडुन जर कुणी उत्तपन्नाचा दाखला आणला असेल २४०००/- पेक्षा कमी उत्तपन्न असल्याचा त्यांचे माफ होईल असे नाही होवु शकत. मला तर ही माहिती मिळाली आहे की ,ज्यांच्याकडे दोन दोन कार आहेत. चार चाकी वाहने आहेत त्या व्यक्तीने देखिल उत्तपन्नाचा दाखला आणला आहे.त्यांना दाखला आणण्यापासुन कोणी थांबवु शकत नाही. परंतु त्यांचा कर माफ करायचा की नाही तो निर्णय तर प्रशासनाला घ्यायचा आहे तो जर पात्र असेल, त्याकडे जर स्थावर व जंगम मालमत्ता नसेल तर त्याचा टॅक्स माफ करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर मांडला जाईल. प्रत्येक मालमत्तेचा वेगवेगळा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला जाईल. आज आमच्याकडे जे १००० अर्ज आले

आहेत. व इतर येणार आहेत. त्यांची पण योग्य छाननी करून जे पात्र लाभार्थी आहेत त्यांचीच शिफारस केली जाईल व जे नाही आहेत. त्यांचे कम्युनिकेट केले जाईल. इतकेच नाही तर त्यांच्याकडे जी स्थावर व जंगम मालमत्ता असेल ती जप्त करून कर वसुल केला जाईल. आज आमच्याकडे जी माहिती आहे. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजने अनुसार  जवळ जवळ ११००० लोक या शहरात दारीद्य रेषेखाली आहेत. दारीद्य रेषेखाली असणे याचा अर्थच असा आहे की तो व्यक्ती करमाफीसाठी पात्र आहे. कारण की त्याच्याकडे कोणतीच मालमत्ता नाही. त्याचे जे उत्पन्न येते ते फक्त त्याच्या कुटूंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी पुरतो. फक्त उदरनिर्वाहा एवढाच पैसा त्याच्याकडे येतो. त्यापेक्षा जास्त पैसा त्याच्याकडे नाही. काही लोक असे पण आहेत जे दारीद्य रेषेच्या वर असतील पंरतु त्यांचे उत्पन्न आर्थिकदृष्टया कमकुवत असेल त्यांच्याकडे स्थावर मालमत्ता किंवा जंगम मालमत्ता नसेल. काही लोक असे आहेत ज्यांची एकच प्रापर्टी वारंवार ॲसेसमेंट करण्यात आली आहे. १७७६मालमत्ता आहेत. एकाच मालमत्तेवर दोनदा टॅक्स लावला आहे. तो पण कर वसुल होणार नाही कारण की जो कर कायदयान्वये वसुल झाला आहे तो त्याने भरला आहे. आणि जो दुस-यांदा टॅक्स लावला आहे तो पण वसुल होणार नाही. ते पण माफ करण्यासाठी स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवला जाईल. काही मालमत्ता अशा आहेत ज्या रोड वायडिंगमध्ये निष्कासित केले आहेत तरी पण त्यांना कर लागु केला आहे. अशा ६३९ मालमत्ता आहेत ज्या निष्कासित केलेल्या बांधकामावर टॅक्सचे बिल येत आहे ते पण कर माफ केले जाईल. मग ते दारीद्य रेषेखालील असोत वा वर असोत. श्रीमंत असो वा गरीब असो. मालमत्ताच नाही आहे ती मालमत्ता महापालिकेने स्वत: निष्कासित केले आहे. त्यावर कर लावणे चुकीचे होते परंतु कित्येक वर्षापासुन अशी मागणी होत आहे. त्यामुळे आपली मागणी जास्त आहे परंतु त्याच्या तुलनेत वसुली होत नाही. ती कमी दिसते. कित्येक मालमत्ता अशा आहेत ज्या महापालिकेच्या रेकॉर्डमध्ये कागदावर आहेत व अशा एकुण ४७२६ मालमत्ता आहेत. आम्ही पुर्ण सर्व्हे केला आहे. या मालमत्ता महापालिकेच्या रेकॉर्डमध्ये आहेत. मालक कोण आहेत माहित नाही. मालमत्ता कुठे आहे माहित नाही. फक्त मालमत्तेचे बिल जाते. त्यामुळे जवळ जवळ ४ कोटी ८० लाखाची मागणी दिसते वास्तविक तेवढी वसुली होत नाही की ही मालमत्ता कुठे आहे जीची पहिल्यांदा मोजमापणी केली आहे. काहीतर असेल. पहिल्यांदा जेव्हा ॲसेसमेंट झाले तिथे काही तरी असेल म्हणुनच ॲसेसमेंट झाले आहे.  किंवा होवू शकते अनाधिकृत बांधकाम आहे, अनाधिकृत बांधकाम जे होते ते वाढविण्याचा इरादा होता. आधी टॅक्स लावून घेतला नंतर बनविले.  हे उल्हासनगर आहे काहीही होवू शकते. अशा मालमत्ता ४००० पेक्षा जास्त आहेत ज्याची मागणी ४कोटी ८० लाख आहे. जर ती मालमत्ता आज मिळत नाही. आणि पहिल्यांदा जी ॲसेसमेंट झाली आहे. ज्याने ती केली ती प्रॉपर्टी कुठे हे त्याला विचारावे लागेल. जर प्रॉपर्टी मिळत नाही तर तो कर देखिल निर्लेखित करावा लागेल. अशा जवळ जवळ ११हजार दारीद्य रेषेखालील मालमत्ता व ६ ,७ हजार अशा मालमत्ता एकतर निष्कासित केले आहे. किंवा दोनदा ॲसेसमेंट झाले आहे. किंवा मालमत्ता नसताना देखिल ॲसेसमेंट झाले आहे. हे जे सर्व आहे अशा सर्व मालमत्तांचा कर निर्लेखित करावा लागेल. ते सर्व स्थायी समिती समोर वेगवेगळे ज्याला आम्ही पृथक प्रस्ताव किंवा वैयक्तिक प्रस्ताव असे वेगवेगळे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवून करून घेवू. कायदयाच्या नियमाचे पालन करूनच हे होणार. यात काही चुकीचे नाही. आणि लोकांच्या माहितीसाठी जे काही दयायचे होते त्यांना सांगायचे होते ते पण आम्ही निवेदन प्रस्तुत करून सांगितले आहे. मला वाटते सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले व इतर काही सदस्यांनी प्रश्न विचारले होते त्यांचे समाधान झाले असेल.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौर महोदया, आयुक्तांनी आता एक टिका केली की हे उल्हासनगर आहे इथे काहीही होवू शकते. हे बोलणे ठिक नाही. या वाक्यासाठी माझा विरोध आहे. ते शब्द त्यांनी पुन्हा मागे घ्यावे.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेब काय म्हंटले?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>त्यांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे. परंतु त्यांनी....

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेबांनी जी निंदा केली ती बरोबर आहे की चुकीची आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>नाही. नाही........

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>नाही नाही चुकीचे आहे. उल्हासनगरची बदनामी आहे. तुम्ही विचार करा महापौरजी. विचार करा, समजा.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेब ते काही चुकीचे बोलले नाही. हे उल्हासनगर आहे, कोणताही कायदा कधीही बदलु शकतो. त्यात ते काय चुकीचे बोलले.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौरजी....

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौरजी, आपण आयुक्तांशी सहमत आहात का उल्हासनगरमध्ये काहीही होवू शकते?

<u>मा. महापौरः-</u>यात विरोध करण्यासारखे काही नाही. वेळ कधीही बदलु शकते त्यात विरोध करण्यासारखे काहीच नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>विरोध करण्यासारखे काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>कमेंट चुकीची झाली.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>तुम्ही कसे म्हणता उल्हासनगरमध्ये काहीही होवु शकते. ही काय बोलण्याची पध्दत झाली.

<u>मा. महापौरः-</u>त्यांचे बरोबर आहे. माझे म्हणणे आहे ते जर काही बोलले तर ते वाक्य मी कशी थांबवु शकते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>माझे म्हणणे आहे की त्यांनी जे निवेदन दिले ते बरोबर आहे परंतु त्यासोबत त्यांनी जी कमेंट केली ती चुकीची आहे.

<u>मा. महापौरः-</u>आयुक्त साहेब तुम्ही आधी असे का बोललात आता तुम्ही ते वाक्य काढु इच्छिता?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>नाही, नाही उल्हासनगरला काय समजले आहे. उल्हासनगरमध्ये मंत्री महोदय येतात आणि म्हणतात की जिथे दुर्गंधी आली की समजायचे की उल्हासनगर आहे. कोणी काय बोलते, कोणी काय बोलते. काय समजलात उल्हासनगरला.

मा. महापौरः-तुम्ही खाली बसा. आता सभागृहनेता बोलत आहेत ना?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-आता मी बोलत आहे. आधी मला बोलु दया. आपण असे कसे बोलता.

मा. महापौरः-आता सभागृह नेता बोलत आहेत ना, तुम्हाला चर्चा करायची काय गरज आहे. तुम्ही बसा. आता सभागृह नेता बोलत आहेत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मी माझे विचार प्रकट करतो. मेहरबानी करून मा. महापौरजी, मी माझ्या भावना व्यक्त करत आहे. माझी आयुक्तांना विनंती आहे.. .......

मा. महापौर-सभागृह नेता बोलत आहेत ना, तुम्हाला बोलायची गरज नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-ते उल्हासनगर बददल बोलले म्हणुन हे बोलत आहेत.

मा. महापौरः-मी याबाबतीत काहीच बोलणार नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-तुम्ही तर बोलुन चुकलात जे बोलायचे होते की याला काही अर्थ नाही. आता तुम्ही काय बोलणार?

मा. महापौरः-मला याबाबतीत काही बोलायचे नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब आता आपण जे निवेदन दिले त्यात मी थोडी दुरूस्ती करू इच्छितो की आता आपण म्हणालात की उत्पन्नाचा दाखला दिल्यानंतर देखिल आम्ही त्याची पडताळणी करू. जेणेकरून तो व्यक्ती त्या योजनेचा लाभार्थी होवू शकतो की नाही. मी इथे थोडे बोलु इच्छितो उत्पन्न दाखला घेतल्यानंतर जर पडताळणी करणार असाल तर तहसिलदार कार्यालयातुन उत्पन्न दाखला आणण्याच्या मजबुरीला संपवले जावे. श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की तिथे बरेच दलाल आहेत. ५००-६०० रू. ते उत्पन्न दाखल्यासाठी म्हणुन घेतात. उत्पन्न दाखला घेतल्यानंतर देखिल महापालिका पडताळणी करणार आहे. आयुक्त महोदय तुम्ही जसे म्हणाालात की दोन दोन कार असुन देखिल एकजण उत्पन्न दाखला घेवून आला. आयुक्त महोदय मी तुमचे लक्ष याकडे वेधु इच्छितो. उत्पन्न दाखला घेतल्यानंतर देखिल पडताळणी जर करणार आहात तर उत्पन्न दाखला आणण्याच्या मजबुरीला संपवले जावे. कारण की गरीब लोक पाचशे रूपये भरून उत्पन्नाचा दाखला आणत आहेत त्यातुन त्यांची सुटका होईल. तुम्ही नक्कीच त्याची चौकशी करा. जे या योजनेत बसत आहे त्यांचा कर माफ केला जावा. हे उत्पन्न दाखल्याचा जो खर्च होत आहे. तो त्यांनी करू नये त्यापासुन त्यांना वाचवा धन्यवाद.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मी मा. महापौर व आयुक्तांना सांगु इच्छितो की, उत्पन्नाचा दाखला जो आहे ते तहसिलदार कार्यालयातुन न घेवून आमच्याकडुन घ्यावे. एस.ई.ओ. ना अधिकार आहेत उत्पन्नाचा दाखला देण्याचा. मी तहसिलदारांची चर्चा केल्यावर त्यांनी शुध्दीपत्र दाखवले. महाराष्ट्र शासनाचा आदेश आहे. कशाला लोक तहसिलदारमध्ये जातात मी असे जवळ जवळ ५० उत्पन्नाचे दाखले दिलेले आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, बी.पी.एल. योजनेबाबत ही जी चर्चा चालु आहे त्यामध्ये मी आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो की मागील स्थायी समितीत आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते. कुणाकडे जर पिवळे कार्ड असेल, केशरी

कार्ड असेल आणि त्याचे उत्पन्न जर २४०००/- पर्यंत आहे तर त्याला प्रतिज्ञापत्र किंवा उत्पन्नाचा दाखला आणण्याची गरज नाही असे तुम्ही शेवटी म्हणाला होतात. त्यांनी फक्त करपावती, रेशनकार्डची झेरॉक्स व अर्ज दयावा मग त्याची चौकशी केली जाईल. तर मेहरबानी करून याचा खुलासा करावा. ना उत्पन्नाच्या दाखल्याची गरज आहे ना सत्य प्रतिज्ञापत्राची. रेशन कार्डमध्ये जर २४०००/- उत्पन्न असेल त्याची झेरॉक्स व करपावती व नागरीक सुविधा केंद्रात जो अर्ज मिळतो हे तीन कागदपत्रे दयायची आहेत कृपया याचा खुलासा करावा. जो आपण स्थायी समितीमध्ये केला होता. आम्ही स्थायी समिती इतिवृत्तामध्ये या ठरावात एक दुरूस्ती सुचविली होती की जर कुणी उत्पन्नाचा दाखला आणला किंवा सत्य प्रतिज्ञापत्र आणले ही चर्चा जेव्हा चालु होती तेव्हा आयुक्त साहेब म्हणाले की, त्यांनी हे न देता करपावती, रेशनकार्डची झेरॉक्स व अर्ज दिले तरी पडताळणी करून आम्ही त्यांचे कर माफ करू. तर मेहरबानी करून उत्पन्नाचा दाखल्यासाठी ५०० रूपये किंवा सत्य प्रतिज्ञापत्रासाठी २०० रू. त्या खर्चापासुन गरीबांची सुटका होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौरजी, आता थोडया वेळापुर्वी आयुक्त साहेब जे बोलले ही लक्षवेधी होवू शकत नाही. कदाचित आयुक्त साहेबांना हे माहित नसेल की संपुर्ण शहरामध्ये या टॅक्स माफी बददल जो सावळा गोंधळ चालु आहे. हा सावळा गोंधळ जसा वाढला आहे तसा तिथे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न देखिल निर्माण होवू शकतो. आणि त्याचा विषय हा महानगरपालिकेचा कक्षेत असल्यामुळे लक्ष वेधणे फार आवश्यक होते म्हणुन ही आम्ही लक्षवेधी घेतली आहे. दुसरी गोष्ट आयुक्त साहेब जे बोलले की, ११,००० लोक दारीद्रय रेषेखालील आहेत जे लाभधारक आहेत. मला वाटते महानगरपालिकेने जेव्हा सर्व्हे केला होता. जर त्यांनी सर्व्हे केलाच असेल पुर्वी आणि त्यामध्ये जर ते खरेखर दारीद्रय रेषेखाली असतील तर त्यांना या प्रक्रियेची काय आवश्यकता आहे? तुम्ही त्यांना थेट नोटीस देवून किंवा पत्र देवून तुम्ही थेट त्यांचा कर माफ करू शकता त्याच्यासाठी ही प्रोसीजर करण्याची काय आवश्यकता आहे. आणि हा ॲथंटीक रेकॉर्ड दाखवुन जर महानगरपालिकेने सर्व्हे अर्धवट ठेवले असेल तर तो त्यांनी पुर्ण केला पाहिजे. जेणेकरून जे खरोखरच दारीद्रय रेषेखाली आहे त्यांना त्याचा लाभ घेता येईल. दुसरी गोष्ट जे तुम्ही बी.पी.एम.सी ॲक्ट मध्ये सरळ सरळ स्पष्टपणे म्हंटले आहे की, दारीद्रय रेषेखालील व्यक्तींनाच याचा लाभ घेता येईल आणि स्थायी समितीमध्ये ही कॉन्ट्रावर्सी केलेली आहे. २४हजाराच्या खालील उत्पन्न आणि बीपीएल धारक म्हणजे नेमके तुम्ही विकर सेक्शनमधील सर्व लोकांचे करणार आहात का बीपीएल मधील फक्त पिवळे रेशनकार्ड आहे त्यांचेच करणार आहात. हा इथे एक मुददा तयार होतो. जर २४ हजाराच्या आतील उत्पन्न असणा-या लोकांचे जर तुम्ही माफ करणार असाल तर ते बीपीएमसी ॲक्टमध्ये नेमके बसते का? याचा पण तुम्ही उल्लेख करणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>महापौर महोदया, महापालिकेचे सर्व जे सदस्य आहेत ते महापालिकेचे विश्वस्त असतात असे मानले जाते. आणि मग ज्यावेळेला विश्वस्त आपली भुमिका सोडुन वागतात. त्यावेळेला मुख्य जबाबदारी जी येते ती येते प्रशासनाची आणि प्रशासनाचे कार्यकारी प्रमुख आहेत त्यांची. एका बाजुला इथे कॉमेंन्टस् झाली त्यावर ऑबजेक्शन पण झाले की उल्हासनगरमध्ये काहीही होवू शकते. आज गरीब लोकांचा कर माफ झाला आहे. उदया होवू शकते की एखादा अपंग व्यापारी असेल, अनुसूचित जातीचे व्यापारी असतील त्यांचा कर माफीचा प्रस्ताव पण पुढे येवू शकतो किंवा लहान उदयोगधंदयाचे जे व्यापारी आहेत. त्यांना करात सवलत देण्याची मागणी सुध्दा आपण करू शकतो. अजुनही खुप काही अशी कारणे शोधु शकतो कारण निवडणुका तेजगतीने पुढे येत आहेत. आता महापालिकेचे काम करण्या ऐवजी.........

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>प्रत्येक बाबतीत निवडणुका हे चुकीचे आहे.

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापालिकेचे कोणतेही काम करण्याऐवजी आता जनतेला खुश करण्यासाठी नवीन नवीन बहाणे शोधायचे आहे. परंतु एकाबाजुला ज्यावेळेला आयुक्त महोदयांनी अशी कॉमेंन्टस केली की लक्षवेधी सूचना ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातुन मांडली जाते. खरे म्हणजे एकदा सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना सदस्यांनी मांडल्यानंतर आणि महापौरांनी ती स्विकारल्यानंतर त्यावर ही लक्षवेधी सूचना अयोग्य होती किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नव्हती अशी प्रतिक्रीया आयुक्तांनी देणे हे उचित नव्हते परंतु त्यांनी आपले वैयक्तिक मत याठिकाणी व्यक्त केलेले आहे. खरे म्हणजे आम्हाला असे वाटले होते की, हा जो ठराव आहे हा ठराव सुध्दा आयुक्त अत्त्यंत कठोरपणे तो नाकारतील कारण थोडयाच वेळापुर्वी याठिकाणी मालमत्ता कराच्या वाढीसंबंधी चर्चा झाली. त्या वाढी संदर्भात जी चर्चा झाली त्यात आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले की महासभेचा तो जो ठराव आहे तो ठराव काही प्रशासन मान्य करणार नाही म्हणुन. म्हणजे एकाबाजुला आयुक्तांकडे सुध्दा सुस्पष्ट अशी भुमिका नाही की एकाबाजुला करवाढीचा जो प्रस्ताव होता. जो महासभेने एकमताने मान्य केला असा ठराव होता त्यावेळेला तिथे महापालिकेचे आर्थिक इंटरेस्ट हे सर्व येते परंतु ज्यावेळेला जेव्हा असे ठराव असतात की टॅक्स माफीचेच आहेत. आता पुन्हा मोठी यादी सांगितली याठिकाणी खरे म्हणजे आयुक्त महोदयांनी नेमके डबल असलेल्या टॅक्स पावत्त्या नेमक्या किती आहेत. गोरगरीबांची प्रकरणे किती आहेत. याचे आकडे देण्याऐवजी स्पष्ट आणि नेमकी अशी रक्कम किती आहे ती खरे म्हणजे आयुक्तांनी महासभेला सांगितली पाहिजे. की हे सर्व करत असताना आता काही ठिकाणी असे झाले आहे की, काही मालमत्तेचा कर लोकांनी भरलेलाच नाही. आणि तो न भरल्यामुळे ५० हजार, लाख रूपये झाला आणि तो दोन लाख रूपये झाल्यांनतर तो न भरण्याची युक्ती म्हणुन महापालिकेच्याच लोकांना हाताशी धरून पुन्हा त्याचे नवीन ॲसेसमेंट करण्यात आले आणि मग मागची दोन लाखाची थकबाकी असलेली जी मालमत्ता आहे ती हरवली म्हणुन जर आपण त्याचा टॅक्स जर माफ करणार असु याठिकाणी असे प्रकरणे घेवुन तर खरे म्हणजे ही फार मोठी एक प्रशासनाची अशी एक स्वतःची फसवणुक आहे. आणि हे सगळे स्पष्टपणे माहिती आहे की नेमके काय झालेले आहे. ही कमेंन्टस तुमच्या हदयामधुन निघाली ती इथे आवडणार नाही कोणाला. शहरवासियांना आवडणार नाही. सभागृहामधील सदस्यांना आवडणार नाही की उल्हासनगरमध्ये काहीही होवू शकते परंतु जेव्हा तुमच्या हदयामधुन बोलता बोलता ही कमेंन्टस बाहेर येते तेव्हा कुठेतरी त्याच्यामध्ये सत्त्य दडलेले असते. आणि तुम्हाला सुध्दा माहिती आहे की या शहरामध्ये वाटेल ते होवु शकते आणि वाटेल ते होवु शकते असे प्रशासनाच्या प्रमुखाला वाटते. तेव्हा खरे म्हणजे याठिकाणी जागरूक राहुन अत्त्यंत जागरूकपणे भुमिका घेण्याची जी जबाबदारी आहे ती आयुक्तांची येते. परंतु खेदाने म्हणावेसे वाटते की, एकाबाजुला विश्वस्त आपल्या भुमिकेशी प्रतारणा करतात त्यावेळेला आयुक्त सुध्दा कार्यकारी प्रमुखाच्या भुमिकेपासुन दुर का पळतात हे कळायला मार्ग  नाही. याठिकाणी त्यांनी ज्या स्पष्टपणे महत्त्वाचा प्रश्न इथे आम्ही उपस्थित करत आहोत की जर समजा काही प्रकरणे तुमच्याकडे आली आणि ती गोरगरीबांची प्रकरणे आहेत, बीपीएल मधील आहेत, जनरल आहेत  तुमची खात्री पटली की ही व्यक्ती किंवा हे कुटूंब हा टॅक्स भरू शकत नाही तर अशी प्रकरणे जेव्हा तुम्ही निश्चित कराल तेव्हा त्यांची पाणीपटटीची जी थकबाकी आहे ती सुध्दा तुम्ही माफ करणार आहात का? या महत्त्वाच्या प्रश्नावर तुम्ही येथे खुलासा केला पाहिजे. आणि ही आमची मागणी सुध्दा आहे स्पष्टपणे. शिवसेना भाजपाची मागणी आहे की ज्या ज्या प्रकरणामध्ये मालमत्ता कर माफ केला जाईल त्या प्रत्त्येक प्रकरणामध्ये पाणीपटटीची जी थकबाकी आहे. ती सुध्दा माफ केली गेली पाहिजे. कारण त्यावेळेला आपण निकष लावु शकत नाही. ज्या प्रकरणात जे कुटूंब मालमत्ता कर भरू शकत नाही. ते पाणीपटटी मात्र भरू शकतील असे आपण म्हणु शकत नाही. आणि त्याच जेन्युयन केसेसमध्ये आपण हे केले पाहिजे. इथे अनेक शंका कुशंका निर्माण झाल्या त्याच्यामध्ये २४ हजाराचे उत्त्पनन किंवा बीपीएलचे निकष, पिवळे कार्ड तुम्ही एकाबाजुला सांगता की स्थायी समितीचा जो निर्णय आहे,*

तो कायदेशिर चौकटीत घेतलेला निर्णय आहे त्यामुळे त्याची अंमलबजावणी प्रशासन करणार आहे. परंतु दुस-या बाजुला तुम्ही सांगता की प्रत्येक प्रकरणाची तुम्ही चौकशी पण करणार आहात प्रत्येक प्रकरण तपासुन पाहणार आहात. स्थायी समितीने जो ठराव पास केला आहे. त्याच्यामध्ये दोन तीन निकष मला वाटते त्यामध्ये ठेवले आहेत. २४हजारच्या आतमध्ये उत्पन्न असणे, पिवळे कार्ड असणे अशाप्रकारचे निकष जर तिथे ठेवले असतील आणि त्या निकषाचे कागदपत्र जर इथे पुर्णपणे उपलब्ध होत असतील मग प्रशासनास हे करण्यामध्ये अडचण काय? मग पुन्हा चौकशी कसली आली. मगाशी श्री. प्रमोद टाले यांनी एक फार चांगला मुददा उपस्थित केला की दारीद्रय रेषेखाली असणा-या कुटूंबाची यादी जर महापालिकेकडे असेल ती महापालिकेने स्वत: सर्व्हे करून बनवली असेल तर त्या प्रकरणामध्ये पुन्हा चौकशीचा प्रश्न येतो कुठे? चौकशी ही फक्त ज्याठिकाणी खरे म्हणजे केशरी कार्ड असते, ३६हजार, ५० हजारचे उत्पन्न दाखवले आहे. कार्ड वर्षभरापुर्वीचे असेल आणि त्या कुटूंबाने जर तुमच्याकडे मागणी केली आणि आज तेथील परिस्थिती बदलली असेल, कंपनी बंद झाली, कंपनीमधील नोकरी सुटली किंवा इतर अनेक कारणामुळे ही थकबाकी जी आहे कर भरण्याबाबत ती येवु शकते अशा प्रकरणाबाबत आपण समजु शकतो. परंतु महापालिकेची स्वत:चीच यादी किंवा महापालिकेला स्वत:च्या यादीवर विश्वास नसावा हे मात्र मनाला पटत नाही याच्यामधुन जसे आमच्या चव्हाण साहेबांनी सांगितले की दलालांचे पेव तहसिलदार कार्यालयात फुटलेले आहे. जर ही चौकशी पध्दत सुरू झाली. तर दलालांचे इथे पेव फुटेल. त्यावेळेला ही प्रक्रिया सुरू होईल तेव्हा संपुर्ण महापालिका ही दलालांच्या ताब्यात असेल आणि त्यावेळी दलाल सांगतिल त्याचाच टॅक्स फक्त माफ होईल बाकीच्यांचा होणार नाही. अशी अराजक परिस्थिती महापालिकेमध्ये  निर्माण होईल.आणि याठिकाणी फार मोठी यादी सांगितली. खरे म्हणजे अशी सवय प्रशासनाने या महासभेला लावताच कामा नव्हती परंतु तरी सुध्दा हे ठराव कायदेशिर आहेत मान्य करणार आहोत वगैरे वगैरे. खरे म्हणजे महापालिकेची सध्याची आर्थीक स्थिती बघता. प्रशासनाने खरे म्हणजे कठोर भुमिका घ्यायला पाहिजे. माझ्या सारख्या सदस्याचे वैयक्तिक मत आहे की, प्रशासनाने यावर कठोर भुमिका घेणे आवश्यक होते. पंरतु तसे घडलेले नाही. आयुक्त महोदयांना माझी पुन्हा एकदा विनंती आहे की त्यांनी मगाशी केलेला खुलासा आहे तो मोघम आहे असमाधानकारक आहे त्यांनी सुस्पष्ट नेमके कोणाचा टॅक्स माफ होणार आहे. हे अतिसुस्पष्टपणे सांगणे गरजेचे आहे. त्याच्यावर आवश्यक असेल तर तुम्ही केबलवर तसे निवेदन दया. तुमचे स्वत:चे निवेदन हे कुठल्याही राजकीय व्यक्तीपेक्षा जास्त अथेंन्टीक असेल . तुमचे प्रशासनाच्या केबलवरती स्ट्रीप पण दया. आणि आयुक्तांनी दिलेले जे स्टेटमेंट आहे ते केबलवरून व लोकांना वर्तमानपत्रातुन दिले तर जास्त अथेंन्टीक असेल. अशाप्रकारचे सुस्पष्ट भुमिका घेणारे निवेदन आयुक्तांनी या शहरवासियांना करावे आणि याठिकाणी माझी सर्व सभागृहाला विनंती आहे की ज्या पध्दतीने मालमत्ता कर गरीब कुटूंबाचा माफ करणार आहोत त्याच पध्दतीने त्या मालमत्ता करासोबत पाणीपटटीची त्या कुटूंबाची थकबाकी आहे ती सुध्दा माफ झाली पाहिजे असा ठराव या महासभेने संमत करावा अशी मागणी याठिकाणी करत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर बनवारी:-</u>पाणीपटटीचे पण ठरावात टाकले आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महोदया आता जे मध्ये मध्ये प्रश्न उपस्थित झाले आहेत.

<u>मा. महापौर:-</u>प्रमोदजी, साहेब उत्तर देत आहेत ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, लक्षवेधीवर माझे निवेदन झाले होते. मी आता इतकेच निवेदन करू इच्छितो की जे पण मी आधी निवेदन केले त्याचा अर्थ एकच होता की जो ठराव स्थायी समितीने केला आहे. तो

कायदयाच्या चौकटीत असल्याने प्रशासनाने त्यावर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. व दुसरे जेव्हा मी असे म्हणटले की या शहरात काहीही होवु शकते. ते मी याकरिता म्हणटले कारण माझ्याकडे जी मालमत्तेची यादी आहे ती मालमत्ताच नाही तरी त्याचा टॅक्स लावला गेला आहे मी पुराव्यासहित बोलत होतो. बाकी दुसरे कशाबाबतीत किंवा शहरात काही होते त्याविषयी मी काही बोललो नाही. माझ्या हातात जे आकडे होते ते की मालमत्ता नसताना देखिल त्यांना कर लावला आहे. दैनंदिन जे काही या शहरात होते त्याबाबतीत मी काही बोललो नाही.मी फक्त याबाबतीत बोललो. यावर देखिल श्री. दर्शनसिंगनी हरकत घेतली मला वाटते ते योग्य नव्हते. तरी पण मी पुन्हा खुलासा करू इच्छितो की, मालमत्ता नसताना देखिल कर आकारला गेला आहे त्याला मी काहीही समजतो बाकी काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब इथे विचारले गेले आहे की, ज्याचे उत्पन्न २४ हजाराच्या आत आहे त्यांना उत्पन्नाचा दाखला व सत्यप्रतिज्ञा पत्र आणणे जरूरीचे आहे का? याचा खुलासा करा.

मा. सदस्या श्रीमती किरण माने यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. महापौरः-</u>आता उत्तर दिले आहे ना त्यांनी.

<u>मा. सदस्य श्री. अशोर ठाकुरः-</u>ही महत्त्वाची बाब आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी,........

<u>मा. महापौरः-</u>जमनुजी तुम्ही बसा. आता लक्षवेधीवर कोणीही चर्चा करणार नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषयः- मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/०६/२००४ (त्यात दिनांक २३/०६/२००४) चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री.नारायण पंजाबीः-</u>पास करण्यास हरकत नाही. यात एका वाक्याचा समावेश करायचा आहे ज्यावेळी सर्व सदस्य जोरजोरात ओरडत होते. त्यामुळे कोण काय बोलत होते ते कळत नव्हते. त्यावेळी मी असे म्हंटले होते की, बहुतेक माझा आवाज दबला गेला असेल ज्या पत्रकाराविषयी मी बोललो होतो त्याने माझ्या प्रभागात काही काम चालु होते त्याच्या मोबदल्यात दहा हजार रूपयांची मागणी केली होती. ते मी दिले नाही म्हणुन माझ्या नावाने तो ओरडत होता हे त्यात लिहावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>यांचे असे म्हणणे आहे की, मी पत्रकारा विरूध्द दहा हजार मागितल्याचे आरोप केल्याने तो माझ्या नावाने ओरडत होता.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>त्यावेळी खुप गोंधळ असल्याने ते लिहु शकले नाही.

<u>मा. महापौरः-</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांनी आदेश दिले आहेत की वाक्याचा समावेश करावा. दहा हजाराची मागणी केलेले वाक्य जोडुन टाकावे.

<u>मा. महापौरः-</u>सदरचे इतिवृत्त वरील सुधारणेसह सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषयः- मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/०६/२००४ (त्यात दिनांक २३/०६/२००४) चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ३ रिक्त पदांपैकी १ पदाचे कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटरइलेक्ट्रॉनिक्स) असे पदनाम देणेकामी स्थायी समिती ठराव क्र. ६२ , दिनांक ८/७/२००४ कायम करणे.

<u>काही सदस्यः-</u>पास. पास.

<u>मा.महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ३:-</u> उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ३ रिक्त पदांपैकी १ पदाचे कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटरइलेक्ट्रॉनिक्स) असे पदनाम देणेकामी स्थायी समिती ठराव क्र. ६२ , दिनांक ८/७/२००४ कायम करणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये वापरात असलेले संगणक, प्रिंटर्स व इतर साहित्य यांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी एक अनुभवी संगणक अभियंता, In House Hardware Support साठी संपुर्ण वेळ नियुक्ती करण्याबाबत नागरी सुविधा केंद्रातर्फे मागणी करण्यात आलेली आहे.

महापालिकेत सद्या एकूण ४८ संगणक संच व २ सर्व्हर व २४ प्रिन्टर्स कार्यालयीन कामासाठी कार्यरत आहेत. सदर यंत्रणा सुस्थितीत ठेवण्यासाठी त्यांची नियमित देखभाल करणे आवश्यक आहे. सदरची देखभाल उत्त्पादक कंपनीशी वार्षिक सेवा कराराने करता येईल किंवा उत्त्सुक संस्थाकडुन दरपत्रके / निविदा मागवून करता येईल. खाजगीरित्त्या वार्षिक सेवाकरार करावयाचा झाल्यास एकूण यंत्रणेच्या खर्चाच्या १० टक्के इतका खर्च करावा लागेल. सदर खर्च किमान रू. १ . ५० लक्ष पेक्षा अधिक होईल. आणि देखभाल ही सतत सुरू राहणारी बाब आहे. त्यामुळे महापालिकेच्या आस्थापनेवर संगणक अभियंता नेमल्यास अधिक सोयीचे होईल. तसेच सदर सेवा २४ तास आणि कार्यालयातच उपलब्ध होईल. संगणक अभियंता हे पद कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदाशी समकक्ष आहे. त्यामुळे सदर पदाच्या वेतनावर वार्षिक खर्च रू. १ , ०५ ,०००/- इतका होईल. त्यामुळे खाजगीरित्त्या नागरी सुविधा केंद्राची देखभाल करण्याऐवजी स्वतंत्र कनिष्ठ अभियंता (संगणक) नियुक्त करणे फायदेशिर ठरणार आहे. त्यामुळे पुढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१ . विद्युत विभागात कनिष्ठ अभियंता (विद्युत) या श्रेणीतील एकूण ३ रिक्त पदे आहेत.
२ . कनिष्ठ अभियंता (विद्युत) व संगणक अभियंता ही दोन्ही पदे तांत्रिक स्वरूपाची आहेत.

३. कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदासाठी डिप्लोमा / डिग्री (विद्युत) अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेवुन संगणक, प्रिंटर व इतर साहित्य यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी नियुक्ती करण्यात येणारा संगणक अभियंता याचे पदनाम, शैक्षणिक पात्रता व तांत्रिक अर्हता तसेच कनिष्ठ अभियंता (विद्युत) यांचे पदनाम, शैक्षणिक पात्रता व तांत्रिक अर्हता ही खालीलप्रमाणे तुलनात्त्मक होऊ शकेल.

| पदनाम | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | कनिष्ठ अभियंता (कॉम्पुयटर / इलेक्ट्रॉनिक्स) |
|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | डिप्लोमा/ डिग्री (इलेक्ट्रीकल) | डिप्लोमा/ डिग्री (इलेक्ट्रॉनिक्स / संगणक/ तत्सम शाखा / Allied Branch) |
| वेतनश्रेणी | ४५००-१२५-७००० | ४५००-१२५-७००० |

तसेच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स) या पदावर पुर्ण वेळ संगणक अभियंत्याची नियुक्ती केल्यास पालीकेस आर्थिक दृष्टया व कामकाजाच्या दृष्टीने फायदेशिर ठरणार आहे.

विद्युत विभागामध्ये सद्या ३ कनिष्ठ अभियंता (विद्युत) संवर्गात रू. ४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीतील पदे रिक्त आहेत. नागरी सुविधा केंद्र, विद्युत विभागामार्फत कार्यान्वित केले असुन देखभाल सुध्दा त्याच विभागाकडून करण्यात येते. सबब कनिष्ठ अभियंता (विद्युत)या ३ रिक्त पदापैकी एका पदाचे कनिष्ठ अभियंता (कॉम्पुयटर / इलेक्ट्रॉनिक्स) असे पदनाम करण्यासाठी मंजूरीस मा. स्थायी समिती पटावर सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांक:-८.७.२००४

सुचकाचे नाव :-श्रीमती. मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. नंदीनी बामणकर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महासभेच्या मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ३ रिक्त पदांपैकी एका पदाचे कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर / इलेक्ट्रॉनिक्स) असे पदनाम बदलणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महासभा ठरावक्र.२५** **दिनांक:-२६/७/२००४.**

सुचकाचे नाव :- श्रीमती. ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती संगिता जावळे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेच्या विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ३ रिक्त पदापैकी एका पदाचे कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर / इलेक्ट्रॉनिक्स) असे पदनाम बदलणे कामी दि. ८.७.२००४ चा स्थायी समिती ठराव क्र. ६१ कायम करित आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ४:-</u> उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री आर. सी. इदनानी, सहाय्यक अभियंता व श्री बी. एस. पाटील, शाखा अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>या विषयाबाबत मी बोलु इच्छितो, मा. महापौरजी, श्री. आर.सी. इदनानी हे जे आहेत त्यांना उपविभागीय अधिकारी म्हणुन पदोन्नती मिळाली आहे. या प्रस्तावामध्ये त्यांच्या नावासमोर शाखा अभियंता असे लिहिले. त्यांची पदोन्नती होवून एक आठवडा झाला आहे. त्यांना येथे राहायचे आहे किंवा नाही याचा प्रथम खुलासा झाला पाहिजे. हा खुलासा करून नंतरच प्रस्ताव आणला पाहिजे. दोन लोकांचा प्रस्ताव एक श्री. आर.सी. इदनानी व दुसरे श्री. बी.एस. पाटील या दोघांचा प्रस्ताव एकत्रितरित्त्या आणलेला आहे आम्ही प्रत्येक महासभेत अशी मागणी केलेली आहे की, प्रत्येकाचा प्रस्ताव वेगवेगळा आणला जावा. म्हणुन हा प्रस्ताव पुढे ढकलुन पुढील महासभेत आणला जावा.

**मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे सभागृहातुन बाहेर गेले त्यांच्याजागी श्री. उत्तम लोणारे (उपआयुक्त मुख्यालय) हे आसनस्थ झाले.**

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>दोघांचाही प्रस्ताव एकत्रितरित्त्या आणलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>हा जो दोघांचाही प्रस्ताव एकत्रितरित्त्या आणला आहे तो वेगवेगळा करून आणला जावा. एक आठवड्यापुर्वीच श्री. आर. सी. इदनानी यांना उपविभागीय अधिकारी म्हणुन पदोन्नती दिल्याचे पत्र आले आहे. आम्ही असे ऐकले आहे की, ते येथुन जाणार आहेत यासाठी ते जाणार आहेत की नाही याची खात्री करून हा प्रस्ताव पुढील महासभेत पुन्हा आणला जावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>हा विषय पुढे ढकलला जावा?

<u>मा. महापौर:-</u>सदरचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:-</u> उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री आर. सी. इदनानी,

सहाय्यक अभियंता व श्री बी. एस. पाटील, शाखा अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:- ''पैसे द्या व वापरा'' तत्त्वावर शैचालय देखभाल व दुरुस्तीसाठी विविध सेवाभावी संस्थाना देणेसाठी मान्यता देणे.

या विषयाबाबत एक पुरक प्रस्ताव आहे. तो आपणां सर्वांना प्रस्तुत सुध्दा करण्यात आलेला आहे. याबाबत श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी) हे आपणांस अधिक माहिती देतील.

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-''पैसे दया आणि वापरा'' या तत्त्वावर सुलभ शौचालयाच्या पध्दतीनुसार या शहरामध्ये शौचालये बांधण्यात येणार आहेत. यासाठी या विषयाबाबत आम्ही एक पुरवणी पत्रक दिले आहे. पुरवणी पत्र देण्याचे कारण फक्त एवढेच आहे की १४ जागा अशा आहेत की, ज्याबाबत एका संस्थेपेक्षा अधिक संस्थांनी मागणी केली आहे की आम्हाला तिच जागा दिली जावी परंतु त्यासाठी निकष काय असला पाहिजे की ज्या संस्थेने प्रथम मागणी केली आहे त्या संस्थेस दिली पाहिजे की ज्या संस्थेकडे अनुभव आहे तिला दिली पाहिजे. ज्या संस्थेला अनुभव नाही तिला दिली नाही पाहिजे? याबाबत सभागृहाला निर्णय घ्यायचा आहे. यासाठी आम्ही ते पुरवणीपत्र दिले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, मी याबाबत असे सांगु इच्छितो की, ''पैसे दया आणि वापरा'' या तत्त्वावर जागा त्या संस्थेस दिली पाहिजे की ज्या संस्थेला अनुभव आहे. त्याचबरोबर ज्या संस्थेने प्रथम मागणी केली आहे त्या संस्थेला दिली पाहिजे. दुस-या कोणत्त्याही संस्थाना दिली जाऊ नये. तसेच तिसरे असे की, मी तीन जागा लिहुन घेतल्या आहेत त्या मी आपणांस सांगु इच्छितो. या तिन्ही जागा सारख्याच तर नाहीत?

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-पाहुन घेतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-होय, ते मी आपणांस देतो. अनुभव हा असलाच पाहिजे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:-मा.महापौरजी, आयुक्त साहेब व मा. सचिवजी ''पैसे दया व वापरा'' या तत्त्वावर संत चेलाराम मार्केट जवळ एक शौचालय बांधण्यात आले. त्या शौचालयाची ३' x ३०' ची जागा दुस-या दुकानदाराला विकली आहे. शौचालयाचे बांधकाम करताना, स्लॅब टाकताना कॉलम वेगळा टाकावयास पाहिजे होता. दुकानाला लागुन एकसंग स्लॅब टाकला आहे. दुसरे कॉलम दिले नाहीत. आणि त्या संस्थेने पुन्हा अर्ज केला आहे की, ''पैसे घ्या आणि वापरू दया'' या तत्त्वावर वापरण्यास दया तर त्या ठेकेदाराचे नाव काळया यादीमध्ये टाकुन त्याला जेलमध्ये टाकण्याची कृपा करावी. त्या संस्थेचे नाव आहे शांती.......

मा. उपमहापौर :-या जागेची पाहणी केली नव्हती काय? या जागेची पाहणी आपण कधी करणार?

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-याबाबत आमच्या स्वच्छता निरिक्षकांचा अहवाल आहे आणि दुसरे असे की ज्या संस्थेने या जागेची मागणी केली होती...

<u>मा. उपमहापौरः-</u>बरोबर आहे संस्थेने मागणी केली होती, आपण लिहिले आहे प्रभात टॉकीज जवळील जुनी मुतारी व दुस-या ठिकाणी लिहित आहात प्रभात चौक तर यामधील कुठले बरोबर आहे? तर कोणता प्रभात चौक?दोन लोकांनी मागणी केली आहे. प्रभात टॉकीज तर एकच आहे ना? तर मला असे वाटते की यामध्ये संभ्रमता आहे. आपण यामध्ये सुधारणा करू इच्छित असाल तर सुधारणा करा. नाहीतर पुढील महिन्यामध्ये हा प्रस्ताव आणा.

<u>श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>सुधारणा करून आणतो.

<u>मा. उपमहापौरः-</u>दुरूस्त करून आणणार?

<u>श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>होय.

<u>मा. उपमहापौरः-</u>ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौर महोदया, आता सुलभ शौचालयांचा विषय चर्चेस आलेला आहे. त्यानुसार मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, बॅरेक नं. १०६च्या मागे एका सार्वजनिक शौचालयाची मागणी केली होती. आमच्या नगरसेविका श्रीमती. भारती छाब्रिया यांनी आपल्या नगरसेवक निधीतुन दोन लाखाचा निधी याकामी दिला होता. जेणेकरून तेथे लवकरात लवकर सार्वजनिक शौचालय बांधले जावे. लोक खुल्या मैदानात शौचास जात आहेत. या संदर्भात मी आयुक्त महोदयांना मी चार वेळा भेटलो आहे. परंतु त्या जागेची या यादीमध्ये कुठे नोंद आलेली नाही. व या जागेबाबतचा प्रस्ताव सुलभ शौचालयांच्या प्रस्तावामध्ये घेण्यांत यावा अशा प्रकारचा शेरा मारून पाठविण्यात आला होता. या संदर्भात मी आपणांशी चार वेळा भेटलो आहे. एवढेच नाही तर धनुष्यधारी वर्तमानपत्राच्या प्रेस शेजारी जे शौचालय आहे. ते तोडुन तेथे नगरसेवक निधीतुन नविन शौचालय बांधण्याबाबत मी पत्र दिले होते. ते सुध्दा या योजनेत घेतलेले नाही. त्याठिकाणचा सुध्दा या यादीमध्ये समावेश नाही. एवढेच नाही तर प्रभाग क्र. १ मध्ये काही दिवसापुर्वी एक सार्वजनिक शौचालय तुटले ज्यामध्ये एक महिला जखमी झाली , आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांना त्याठिकाणी मी घेवुन गेलो. व त्यांनी सांगितले होते की येथे एक नाही तर दोन शौचालयांची आवश्यकता आहे कारण येथे फार मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. त्या जागेचा सुध्दा यामध्ये काही उल्लेख नाही. तर या तिन्ही ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधण्याचे काम लवकरात लवकर सुरू झाले पाहिजे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. आयुक्त साहेब, याविषय क्र. ७ बाबत पुरवणीपत्रक आलेले आहे. ''पैसे दया आणि वापरा'' सुलभ शौचालय चालविणेकामी… ..

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u> श्री. खरात साहेब, याबाबत आम्हाला आश्वासन दया.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>एक मिनिट माझा मुददा पुर्ण होवू दया. माझा मुददा असा आहे की तुम्ही जेव्हा सेवाभावी संस्थांना ''पैसे दया आणि वापरा'' या तत्त्वावर जर तुम्ही देत असाल तर या सर्व सेवाभावी संस्था जेवढया शहरामधील आहेत त्या सर्व सेवाभावी संस्थाना तुम्ही काम दयायला पाहिजे. कारण ही जी पध्दत तुम्ही वापरली आहे काही संस्थाना सहा-सात काही संस्थाना काहीच नाही अशा पध्दतीने जेव्हा तुम्ही दिले आहे. याचा अर्थ असा आहे की हे फक्त ठेकेदारच आहेत. तुमचा उददेश जो आहे सहकारी संस्थांनी सेवातत्त्वावर ते चालवावे. हा जर मुददा घेतला तर प्रत्येक सेवा संस्थेला तुम्ही ते चालविण्यास दयावयास पाहिजे. आणि हा मुददा

तुम्ही इथे गाळला आहे. याचा अर्थ असा आहे की तुम्ही सेवा संस्थेचा जो निकष आहे, महाराष्ट्र शासनाचा जो निकष आहे त्याच्या विरोधात तुम्ही चालता. माझे म्हणणे स्पष्ट आहे की तुम्ही या उल्हासनगरमधील स्थानिक जेवढया सेवाभावी संस्था आहेत. मला वाटते की, महर्षी वाल्मिक सेवाभावी संस्था आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसेवा फांऊडेशन संस्था आहे अशा जेवढया संस्था आहेत. त्या संस्थांना योग्य वाटप करून त्यांना हे दयावयास पाहिजे अशी माझी मागणी आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, मी जसे म्हंटले की, ज्यांनी प्रथम मागणी केली आहे व ज्यास अनुभव आहे. त्यासच दिले पाहिजे कृपया आपण या बाबीकडे लक्ष दया. व सभागृहाचे मत घ्या.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>नाही, काही संस्थाना दहा-दहा, पंधरा-पंधरा आणि काही संस्थाना काहीच नाही? आणि असे जर तुम्ही करत असाल तर सेवाभावी संस्थाना तुम्ही बोलवावयास नको होत्त्या, तुम्ही सरळ ठेकेदारांना बोलवावयास पाहिजे होते. सेवाभावी संस्थेचा अर्थ काय? आणि सेवाभावी संस्थाना जर तुम्ही बोलवत नसाल तर उल्हासनगर मधील ज्या सेवाभावी संस्था आहेत त्यांचे तुम्ही नुकसान करत आहात.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, सचिव साहेब गटनेते श्री. दिलीप लालवानी यांनी पॅनल क्र. १ येथील शौचालयाबाबत जो मुददा उपस्थित केला शौचालयाची भिंत पडून त्याच्यात एक महिला जखमी झाली. आयुक्त साहेबांनी त्याठिकाणी भेट देवून पाहणी केली. काम चालु करण्याचे त्यांनी तात्त्काळ आश्वासन दिले तर ते काम कधी चालु होईल. मा. खरात साहेब लक्ष देतील का? ते शौचालय अतिशय नादुरूस्त आहे त्याचा कुणी वापर करू शकत नाही. ते पडण्याच्या स्थितीत आहे म्हणुन तुम्ही किती दिवसात काम चालु करणार याचे सभागृहासमोर आश्वासन दिले तर बरे होईल. म्हणजे आम्ही अपेक्षा ठेवू की तुम्ही खरेच काम करू शकता. ही तातडीची बाब आहे. हे जर केले नाही तर पुढील कामे तुम्ही काय करणार?

<u>श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-</u>मा. महापौर महोदया, या शहरातील जेवढी काही शौचालये नादुरूस्त अवस्थेत आहेत. ज्यांची दुरूस्ती करणे जरूरीचे आहे. अशा सर्व शौचालयांची यादी आम्ही तयार केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>शौचालये दुरूस्ती बाबत मी बोलत नाही आहे, डॉ. खरात साहेब, जे शौचालय तुटले ज्यामध्ये महिला जखमी झाली. जे शौचालय पुर्णपणे तुटले तेथे नविन शौचालय बांधणे आवश्यक आहे. आयुक्त साहेब त्याठिकाणी प्रत्त्यक्ष भेट देवुन आले आहेत. आयुक्त साहेबांनी सांगितले की येथे एक नाही तर दोन शौचालयांची आवश्यकता आहे. लवकरच आम्ही काम सुरू करू. तसेच बॅरेक क्र. ९०६च्या मागे सुध्दा सार्वजनिक शौचालय नाही. महिला उघडयावर शौचास जातात. धनुष्यधारी वर्तमानपत्राच्या प्रेस शेजारी जे सार्वजनिक शौचालय आहे ते मिलट्रीच्या काळात बांधलेले आहे. त्याबाबत कित्त्येक वेळा मी बोललो आहे. नगरसेवक निधीतुन या शौचालयाचे बांधकाम करण्यात यावे असे पत्रही दिले आहे. म्हणुन या शौचालयांचा यामध्ये समावेश करण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:-</u>खरात साहेब, बोलण्याचा उददेश हा आहे की, जोपर्यंत एखादी घटना घडत नाही. तो पर्यंत सर्वकाही व्यवस्थित आहे असे गृहीत धरले जाते. पॅनल क्र. १ मधील एका सार्वजनिक शौचालयाची भिंत कोसळली त्यामध्ये एक महिला जखमी झाली आणि त्यानंतर सर्व प्रशासन कामाला लागले. म्हणुन माझे असे म्हणणे आहे की, चुक होण्या अगोदर एखादी अप्रिय घटना घडण्या अगोदर काम झाले तर चांगले असते. दोन चार माणसे मरतील त्यांनतर मग मंत्री

महोदय येतील, भांडणे होतील, हा नाही आला, तो नाही आला असे होण्यापेक्षा माझ्या प्रभागातील काम चांगल्या प्रकारे होईल जर आपण थोडे लक्ष दिले तर.......

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-त्या जागेचा आम्ही या प्रस्तावामध्ये समावेश करू.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-श्री. खरात साहेब, एखादा माणुस शौचालयामध्ये पडला तर लगेच काम चालु होईल का? नाही, काल माझ्या प्रभागामध्ये एका सार्वजनिक शौचालयामध्ये एक माणुस पुर्णपणे टाकीमध्ये गेला. स्लॅब तुटला तर तेथील काम चालु होईल का?

मा. उपमहापौर:-ज्या जागांची दोन दोन वेळा नोंद आली आहे. त्या जागांचे आपण काय करणार आहात?

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-ज्या जागांची दोन दोन वेळा नोंद आलेली आहे त्यातील एक नोंद काढुन टाकु व पुढील महासभेत आणु.

मा. सदस्य श्री.प्रमोद टाले:-नाही, मी जे विचारले की एखादा माणुस शौचालयाच्या टाकीमध्ये पडला तर तेथील शौचालय दुरूस्तीचे काम लगेच चालु होईल का? तसे असेल तर माझ्या प्रभागामध्ये डिफेन्स मध्ये कालच शौचालयामध्ये एक माणुस पडला आहे.

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-मी आता तेच सांगत होतो की जी शौचालये नादुरूस्त आहेत त्यांच्या दुरूस्तीचे काम करण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाकडे गेलेला आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-दुरूस्ती करून सुध्दा जर ते वापरात आणण्याच्या स्थितीत नसेल तर.

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-जर ते शौचालय दुरूस्ती लायक नसेल व "पैसे दया व वापरा" या तत्त्वावर सार्वजनिक शौचालय उपलब्ध करून देण्याबाबत तेथील रहिवाश्यांची मागणी असेल तर तसा प्रस्त्ताव यामध्ये सामील करून घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-तो प्रस्ताव यामध्ये समाविष्ट करून घेतला जाईल?

श्री. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):-होय.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:-साहेब, मग काय म्हणता तुम्ही करणार आहात.? आम्हाला सेवाधारी नको, वेतनधारी पाहिजे. सेवाधारी त्याच्या पध्दतीने सेवा करेल. वेतनधारी पाठवाल तर लवकर होईल. सांगा नाहीतर उदया येथे महापालिकेत लोक डबे घेऊन येतील.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-पास?

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:-काय पास? मी बोललो ते पास झाले का?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-आम्ही सांगितलेल्या जागांचा समावेश केल्यानंतर पास.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आमचे गटनेता श्री. दिलीप लालवानी यांनी ज्या तीन ठिकाणांचा उल्लेख केला त्या तीन ठिकाणांचा समावेश करून तसे आमच्या मा. उपमहापौर यांनी जसे सांगितले की ज्याठिकाणांची दोन-दोन वेळा नोंद आलेली आहे त्यातील एक नोंद रदद करून हा जो प्रस्ताव आपल्या समोर आला आहे याकामी ज्यांना अनुभव आहे व ज्यांनी अगोदर मागणी केली आहे. त्यांना देण्याबाबतचा प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>ज्यांनी प्रथम मागणी केली आहे व ज्यांना कामाचा अनुभव आहे त्यांना दिले जाईल.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे पुन्हा सभागृहात आले व श्री उत्त्तम लोणारे हे आपल्या स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सचिव साहेब, एक मिनिट माझ्या प्रभागात देखिल एक सार्वजनिक शौचालय आहे. विठ्ठलवाडी झोपडपट्टी येथिल त्याचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. देंवदसिंग खेमाणीः-</u>कॅम्प नं. ४ येथिल मुख्य बाजारपेठेतील शौचालयासाठी मी कितीतरी वेळा आवाज उठविला आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. खरात जी यादी तयार करून देतील ती ठरावात जोडली जाईल.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हया सभागृहा बाहेर गेल्या.

<u>मा सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>माझ्या प्रभागात सुध्दा दोन शौचालय आहेत त्यांचा सुध्दा यामध्ये समावेश केला जावा. बॅरेक नं. ६१८ आणि .......

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>प्रस्ताव पारीत करा परंतु त्याबाबत माझी एक सूचना आहे सर्व शहरामध्ये सुलभ शौचालये असली पाहिजेत. माझ्या प्रभागात सुध्दा मी केले आहे. परंतु तिथे सुटया पैशांची व्यवस्था करण्यास सांगा. तेथे सुटया पैशांवरून भांडणे होतात. जी संस्था शौचालये चालविण्यास घेईल ना त्यांना सुटया पैशाची व्यवस्था करण्यास सांगा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मंजुर?

<u>मा. महापौरः-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत सुचविलेल्या सुधारणा करून ठराव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ६:-</u> केंद्र शासनाची राष्ट्रीय युवा योजना २००३ उल्हासनगर शहरात लागु करणे व अतर्भुत खर्चास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, ही योजना अतिशय चांगली आहे. श्री. खरात साहेबांनी लिहिले आहे नगरसेवक निधीतुन हे काम करण्यासाठी परंतु माझे म्हणणे आहे की हे काम महापालिका निधीतुन केले जावे. लोकांना जागृत करण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना तयार केली आहे परंतु श्री. खरात साहेबांनी लिहिले आहे की हे काम नगरसेवक निधीतुन करावे. मला असे वाटते की हे काम आयुक्त साहेबांच्या निधीतुन केले जावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>मंजुर?

<u>मा.महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ६:-</u> केंद्र शासनाची राष्ट्रीय युवा योजना २००३ उल्हासनगर शहरात लागु करणे व अतर्भुत खर्चास मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः-</u>

केंद्रशासनाने "राष्ट्रीय युवा धोरण २००३" जाहिर केलेले असून सदर धोरणाची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे. सदर धोरणाची उददीष्टे पुढील प्रमाणे आहेत.

युवकांमध्ये राष्ट्र भावना, राष्ट्रीय एकात्मिकता, अत्याचार सहन न करणे (दहशतवाद विरोध) याची भावना युवकांच्या मनात जागृत करणे.
उत्तम नागरिक बनण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य गुण निर्माण करणे.
राष्ट्राचा इतिहास, कला, वैभव, संस्कृती यांची युवकांच्या मनात जागृती निर्माण करणे.
"सर्व शिक्षण अभियान" अंतर्गत सर्व युवकांना शिक्षण देणे.
आरोग्य विषयक माहिती देणे.
शांतता आणि सदभावना याबाबत जागृती निर्माण करणे.
राष्ट्रीय संपत्तीचे जतन करणे यासाठी युवकांच्या मनात जागृती निर्माण करणे.

युवकांच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय :-

शिक्षण
प्रशिक्षण आणि उद्योग
आरोग्य आणि कुटूंब कल्याण
अ. सामान्य आरोग्य
ब. वैचारिक आरोग्य
क.आध्यात्मिक आरोग्य
ड.एच.आय.व्ही एडस, प्रजनन संस्थेशी निगडीत आजार लैंगिक आजार

इ. प्रजनन आरोग्य व कुटूंब कल्याण
राष्ट्रीय संपत्तीचे जतन
क्रिडा
कला आणि संस्कृती
विज्ञान
कौशल्य, गुणसंपन्न नागरिक बनणे.

वरील उददीष्टे साध्य करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेत युवक कल्याण, क्रिडा व सांस्कृतिक विभाग निर्माण करणे आवश्यक आहे.

सदर विभागाच्या कामाचे स्वरूप खालील प्रमाणे राहिल.

आरोग्य विषयक माहिती व सल्ला देण्यासाठी विविध शाळा, महाविद्यालयातून कृती गट स्थापन करणे.
प्रत्येक प्रभाग समितीमध्ये युवकांसाठी "युवक केंद्र" स्थापन करणे.
प्रत्येक प्रभागात एक "योगा केंद्र" (Meditation Centre)प्रायोगिक तत्त्वावर स्थापन करणे.
युवकांसाठी क्रिडा संकुल स्थापन करणे.
स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे सुरू करणे.
प्रत्येक कॅम्पमध्ये एक याप्रमाणे एक ०५ व्यसनमुक्ती केंद्र सुरू करणे.

शहराच्या विकासात युवकांचा सहभाग घेण्यासाठी सदर स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे.

लेखा शिर्ष क्र. ब४ (v) Other Social Activities मध्ये रू. १०.०० लाख, E (ix) क्रिडा खर्चासाठी उपलब्ध तरतुद रक्कम रू. ५. ० लाख, व लेखा शिर्ष क्र. ब४ (v) Other Development works out of corporators निदक मधुन सदर राष्ट्रीय युवा धोरण अंमलबजावणीची सुरूवात करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. सन २००४-२००५ या वर्षात सदर कामासाठी रक्कम रू. १० लाख वापरून सदर राष्ट्रीय युवा धोरणाची अंमलबजावणी ची सुरूवात करण्यास्तव मा. महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**महासभा ठराव क्र. २७** **दिनांक:-२६/७/२००४.**

सुचकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

अनुमोदकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार केंद्र शासनाचे (राष्ट्रीय यूवा धोरण २००३)योजनेस उल्हासनगर शहरात लागु करणे कामी नगरसेवक निधी वगळुन महापालिकेच्या इतर निधीतुन रू. १० लाख खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ७:-</u> महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्लॉट क्र. १२९ , चालता नं. ३ , शिट नं १३ , कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>हे जे आरक्षण वगळण्यास सांगितले जात आहे याबाबत सर्व पक्षांच्या गटनेत्त्यांशी चर्चा करून त्यांनतरच प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा.

<u>काही सदस्य :-</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ७:-</u> महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्लॉट क्र. १२९ , चालता नं. ३ , शिट नं १३ , कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. ५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>ासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—१९/८/२००४

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/८/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक १९.८.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३७. | श्री. प्रशांत जाधव |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३८. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ४०. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४१. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४३. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४५. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३१ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४६. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| ४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४७ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ४९. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५२. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५६ | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २४. | श्री. शांताराम निकम | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्री. मोहन साधवानी | ६४. | श्री. हरदास माखिजा |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम | ६६. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | | |

तर

मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी व मा. सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु, २. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ३श्रीमती. मसंद माया घनश्यामदास, ४.श्रीमती. खिलनानी भावना, ५.श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ६.श्री. जाधव सुरेश मधुकर, ७.श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ८.श्रीमती किरण लखी माखिजा, ९. श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर, १०.डॉ. निना प्रकाश नाथानी, ११.श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश, १२. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, १३.श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. प्रभारी आयुक्त हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे हे आयुक्तांचे जागी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

मा. सचिवः—आता ४ . २५ झाले आहेत. प्रश्न क्र. २७९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र.२७९:— टीपीडी /उमपा/९१/९७/९३३ मंजूर आराखडयानुसार श्री. नंद जेठानी नामक विकासधारने सुरु केलेल्या वाणिज्य सकुल इमारतीमध्ये दुकाने खरेदी करण्याबाबत विचारलेल्या खालील प्रश्नांची उत्तरे मिळणेबाबत.

माझ्या प्रभागातील उत्तर भारतीय परिषद संस्थेच्या सदस्यांनी संदर्भ—साप्रवि/उमपा/जा.क्र. ३१२/१२.१२. २००३ नुसार टीपीडी /उमपा/९१/९७/९३३ मंजूर आराखडयानुसार श्री. नंद जेठानी नामक विकासधारने सुरु केलेल्या वाणिज्य सकुल इमारतीमध्ये दुकाने खरेदी करण्याबाबत निवेदन केले आहे. त्यानुसार सदर वाणिज्य संकुल इमारतीबाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य , सुचक व समाधानकारक उत्तरे संबंधितांनी दयावी ही विनंती.

१) अ) टीपीडी /उमपा/९१/९७/९३३ मंजूर आराखडयाच्या वाणिज्य संकुल इमारतीत दुकाने खरेदी करण्यास काही हरकत आहे का? महापालिकेची त्यात दुकाने खरेदी करण्यास ना हरकत आहे का?
ब) उपरोक्त मंजुर आराखडयाच्या इमारतीत असलेले दुकाने अधिकृत म्हणजे महापालिकेच्या अटी व शर्तीच्या नियमानुसार मंजुर आहे का? सदर दुकाने (इमारत) रस्ता
रुंदीकरणात जाणार आहे का? जाणार नसल्यास भविष्यात होणा—या घटनेस महानगरपालिका जबाबदार राहील का?
क) उपरोक्त मंजुर आराखडयाच्या इमारत रस्ता रुंदीकरणात (प्रारुप विकास आराखडयानुसार) आहे की नाही याबाबत अहवाल डीआयएलआर, एमएमआरडी व एसडीओ या कार्यालयातून अहवाल (रिपोर्ट) मागविला होता का?
ड) उपरोक्त मंजुर आराखडया इमारतीचा प्लॉन हा चुकीच्या कागदपत्रकाच्या आधारावर मंजुर झाला आहे का?
म) उपरोक्त मंजुर आराखडया इमारतीचा प्लॉन मंजुर झाला तेव्हा त्या सोसायटीला (समता को. ऑ. हॉ.) सदर इमारतीच्या जागेचा मालकी हक्क मिळाला होता का?

तरी सदर प्रश्नाची योग्य, सुचक , समाधानकारक उत्तरे देण्याची कृपा करावी जेणेकरुन गोरगरीब (दुकाने खरेदी करणारे) नागरीकांचे आयुष्याची कमाई डबघाईत जाणार नाही ते रस्त्यांवर येणार नाहीत याची तमा करावी ही नम्र विनंती.

उत्तरः—बांधकाम परवानगी क्र. ९१/९७ श्री. नंद जेठानी नायक विकासधारकाने सुरू केलेल्या वाणिज्य संकुल इमारतीचे बांधकाम या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/९१/९७ , ९६२ दि. १.१२.२००३ पत्रान्वये बांधकाम थांबविण्यात आले आहे. तद्नंतर सदर बांधकामा विरूध्द उच्च न्यायालयात दावा दाखल केले असल्याने याबाबत अंतिम निर्णय /आदेश कडून आजच्या तारखेस प्राप्त झाले नाही. न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्या नुसार केलेल्या कार्यवाही बाबत महासभेपुढे सादर करणे सोयस्कर होईल.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लरः—सध्या परिस्थिती काय आहे? प्रकरण न्यायालयात आहे का? आपण येथे यावर चर्चा करू शकतो का?

<u>मा. सचिव:—</u>सदर विकासकाने कल्याण येथिल दिवाणी न्यायालयातुन स्थगन आदेश आणला होता. त्यानंतर प्रकरण उच्च न्यायालयात गेले होते. उच्च न्यायालयातुन अदयाप कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. दरम्यानच्या कालावधीत आयुक्तांनी सदर इमारतीचा परवाना रद्द केला आहे. सदर ठिकाणी सध्या काम बंद अवस्थेत आहे.

<u>मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>ठिक आहे.

<u>मा.सचिव:—</u>प्रश्न क्र. २८० हा श्री. विश्वनाथ पाटील यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २८०:—</u> महादेवनगर उल्हासनगर—४ येथिल कल्याण उल्हासनगर हद्दीवरुन गेलेल्या रस्त्यावर, रिमोल्डींग टायर कंपनी शेजारी बांधकाम चालू असून त्यास महानगरपालिकेकडुन परवानगी देण्यात आली आहे का? सद्यस्थितीत सुरु असलेले बांधकाम मंजुर आराखडयानुसार आहे का? नसल्यास वाढीव काम किती? कृपया याची सविस्तर माहिती येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>सदर इमारतीस या कार्यालयाकडुन पत्र क्र. उमपा/नरवि/बाप/१८४/०२/४९८, दिनांक २०/६/२००३ पत्रान्वये परवानगी मंजूरी दिलेली आहे.

विकास कर्ता यांनी सदर इमारतीच्या अंतर्गत फेरफार केलेला असल्याने याबाबत नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. २८१ हा श्री. दिलीप लालवानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २८१:—</u> उल्हासनगर कॅम्प नं. ३ रामायण नगर के सामने स्थित द्वारका धाम कितीने वॉल के भुखंड पर बनी हुई है?

२) उक्त भुखंड पर किसी प्रकार का आरक्षण है क्या?

३) कितनी सनद उक्त भवन निर्माता के पास है?

४) क्या उक्त इमारत का नक्शा उमनपा ने पास किया है? यदि हां तो क्या वो इमारत नक्शे के अनुरुप बनी हुई है? क्या उक्त इमारत के विरुध्द कभी उल्हासनगर में. शिकायतें आई है? यदि हॉ तो कितनी?

५) क्या उक्त इमारत का कोइ न्यायालयीन प्रकरण जारी है या नाही? यदि हैं तो क्या हैं? यदि नहीं तो क्या इस इमारत को उमनपा ने मुळ सहमती देकर अघोषित रुप से वैद्य घोषित कर रखा है?

<u>उत्तर:—</u>४४’ —० x ८०’—०’ स्वेअर.

सदर भुखंडाचा काही भाग रस्त्याने बाधित होत आहे व काही भाग पोस्ट व टेलिग्रामकरीता राखीव आहे. (आरक्षण क्र. १६२)

सदर भुखंडात कोणताही प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला नसल्याने माहिती देणे शक्य नाही.

नाही.

मे. सि. ज. ज्यु.डी. उल्हासनगर यांचे न्यायालयातील रे.सि.नं.२१४/९५ हा दिनांक २०/१/९६ च्या विधी विभागाचे पत्रान्वये सदर दावा मनाई उठविण्यात आली आहे. त्या अन्वये मुख्याधिकारी यांनी दिनांक २०/१/९६ पर्यंत निष्कासन करावे. परंतु अदयाप निष्कासन झालेले नाही. निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संबंधित अधिका—याने व्यासपीठावर यावे. कोळेकर साहेब आधी या प्रश्नाला आपण वाचावे त्यानंतर आपण जे उत्तर दिले आहे ते देखिल वाचावे.

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी व श्री. मनोज साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न आपणांस वाचायचा आहे उत्तर ते देतील.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—आम्ही आपणांस वरील प्रमाणे प्रश्न विचारला आहे. आपण त्याचे उत्तर दिले आहे की,महापालिकेने कोणत्याही प्रकारचा नकाशा मंजुर केलेला नाही. तर सद्यस्थिती काय आहे?

उपायुक्त अ.बा.वि. (श्री. पी.डी. कोळेकर):—मा. महापौर महोदया, सचिव साहेब येथील सर्व रहिवाश्यांना घरे खाली करण्याची नोटीस देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाचा एक आदेश आला आहे. त्यामध्ये सप्टेंबर २००४ पर्यंत निवासी बांधकामे तोडण्यास मनाई केली आहे. सप्टेंबर २००४ नंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—म्हणजे सप्टेंबर २००४ नंतर आपण कारवाई करणार आहात.

उपायुक्त अ.बा.वि. (श्री. पी.डी. कोळेकर):—होय.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—ठिक आहे.

मा. सचिव:— प्रश्न क्र. २८२ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. २८२:—हाऊ मच एक्सपींडीचर वेअर ऑक्युअर्ड ऑन फिलींग ऑफ पेटोलस् इन इअर २००१—२००२, २००३—२००४?
गिव द लोकेशन वेअर द पोटोलस् वेअर फिल्ड?
गिव द नेमस् ऑफ एजन्सी हू केरीड आउट द पोथल्स वर्क?

उत्तर:—१.अे)एक्सपीन्डीचर केरीड इन २००१—२००२ रू. ८३,३४,५८०/—
बी)एक्सपींन्डीचर ऑक्युर्ड इन २००२—२००३ रू. ५७,८३,०८०/—

२. द लिस्ट ऑफ लोकेशन वेअर द पोथर्ल्सस वेअर फीलड इज ऑफ एक्ससीझीव्ह लेन्थ इज अॅव्हीलेबल इन द पी.डब्लु.डी. सेक्शन.
३. द नंबर ऑफ अेजन्सीज इज १४ द लिस्ट बीइंग ऑफ एक्ससीझीव्ह लेन्थ इज अॅव्हीलेबल इन द पी. डब्लु.डी. सेक्शन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—चिजवानी साहेबांना बोलवा.

मा. सचिव:—ते आता कुठे आहेत. उत्तर शहर अभियंता यांनी दिले आहे. त्यापुर्वी मी आपणांस एक जरूरी सूचना देवू इच्छितो. श्री. जाधव यांची आपल्या महापालिकेत प्रतिनियुक्तीने शहर अभियंता या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. व श्री. संजय दुसाने यांची उपायुक्त या पदावर या महापालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी कृपया व्यासपीठावर येवून आपली ओळख करून दयावी.

शहर अभियंता (श्री.एस. व्ही. जाधव):—मा. महापौरजी, मा. महापालिका सचिव, उपस्थित सभागृहातील मान्यवर मी एस.व्ही. जाधव कार्यकारी अभियंता म्हणुन सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग येथुन आलो आहे. याठिकाणी प्रतिनियुक्तीवर शहर अभियंता म्हणुन शासनाने माझी नियुक्ती केली आहे. यापुर्वी मी कल्याण महानगरपालिकेत व ठाणे महापालिकेत काम केले आहे. सर्वसाधारणपणे मला थोडाफार अनुभव आहे. आणि मी आपल्या सर्वांचे सहकार्य इच्छितो. मी देखिल मनापासुन काम करेन याची मी आपणांस ग्वाही देतो.

उपायुक्त (श्री. संजय दुसाने):—मा. महापौर, मा. सचिव, सन्माननिय लोकप्रतिनिधी सदस्य मी संजय ज. दुसाने, मुळचा मी मुख्याधिकारी या राज्य शासनाच्या संवर्गातील असुन दिनांक ३० जुलै पासुन आपल्या महापालिकेत उपायुक्त या पदावर हजर झालो आहे. माझ्याकडे उपायुक्त महसुल हा कार्यभार देण्यात आलेला असुन त्यासबंधिचे कामकाज पहात आहे. माझ्या या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत आपणांकडुन सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा करतो. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—एक मिनिट, आपण यापुर्वी कुठे काम केले आहे, मुख्याधिकारी म्हणुन केले आहे कुठे केले आहे ते सांगावे.

उपायुक्त (श्री. संजय दुसाने):—यापुर्वी मी मुख्याधिकारी म्हणुन भगुर जिल्हा नाशिक, सावदा जिल्हा जळगाव त्याचप्रमाणे नवापुर जिल्हा नंदुरबार येथे मुख्याधिकारी म्हणुन काम केले आहे. त्यानंतरच्या कालावधीत मुख्याधिकारी संवर्गातील एक पद जिल्हा प्रकल्प अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथेही काम केले आहे याशिवाय इतर काही नगरपालिकांचा अतिरिक्त कार्यभार माझ्या सेवेच्या कालावधीत झाला आहे. मी मुख्याधिकारी म्हणुन आतापर्यंत १२ वर्षे सेवा केलेली आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—मा. महापौरजी, याठिकाणी दोन्ही अधिका—यांनी आपला परिचय दिलेला आहे. त्या परिचयामध्ये दोन्ही अधिका—याच्या माध्यमातुन आम्ही ऐकले. मा. महापौरजी, मा. सचिव परंतु आयुक्तांचे नाव घेण्यात आलेले नाही ही पध्दत बरोबर आहे का?

मा. सचिव:—हे नविन अधिकारी आहेत. हळुहळु सर्व शिकतील.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—हे वरीष्ठ अधिकारी आहेत. यापुर्वी यांनी ब—याच ठिकाणी काम केले असेल. त्यांना महापालिकेची पध्दत माहित आहे, नगरपालिकेची पध्दत माहित आहे.

मा. सचिव:—तुम्ही मोठे मन करून त्यांना माफ करावे.

मा. महापौर:—कोणत्याही नविन ठिकाणी आल्यास चांगला माणुस देखिल घाबरून जातो.

मा. सचिव:—तसेच याठिकाणी अजुन एक अधिकारी आले आहेत श्री. सावकारे. ज्यांची या महापालिकेत उप अभियंता या पदावर नियुक्ती झाली होती नंतर त्यांना कार्यकारी अभियंता म्हणुन पदोन्नती मिळाल्यावर पाणी पुरवठा विभागात कार्यकारी अभियंता म्हणुन त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता पा.पु. विभाग (श्री. आर. आर. सावकारे):—मा. महापौर, महापालिका सचिव, मा. आयुक्त मी या महापालिकेत जुन महिन्यामध्ये उप अभियंता या पदावर हजर झालो होतो त्यानंतर माझी पदोन्नती होवून या महापालिकेत माझी कार्यकारी अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. माझी जवळ जवळ २० वर्ष सेवा झालेली आहे. आणि या २० वर्षाच्या कालावधीत मी कल्याण महापालिका, अंबरनाथ नगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण येथे काम केलेले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, आता येथे काही अधिका—यांनी आपला परिचय दिला त्याबद्दल बोलण्यापुर्वी मी सांगु इच्छितो की, महापालिका सभागृहात सचिव साहेबांनी व्यासपीठाच्या मागे महापुरूषांचे जे पुतळे बनविले आहेत, खुप चांगल्या प्रकारे बनविले आहेत. तसेच जय जवान, जय किसान चे जे शिल्प उभारले आहे ते फारच छान दिसत आहे. सर्व प्रथम त्याबद्दल मी सचिव साहेबांचे अभिनंदन करू इच्छितो.

मा. महापौर:—आम्ही देखिल सचिव साहेबांनी जे चांगले काम केले आहे त्याबद्दल सभागृहाच्या वतीने अभिनंदन करते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—यानंतर आमचे जे अधिकारी नियुक्त केले आहेत त्या सर्वांचे अभिनंदन करतो. एका अधिका—याला तर उल्हासनगर फार आवडले. व त्यांना ते शुभ देखिल सिध्द झाले. ते येथे उप अभियंता म्हणुन आले आहेत, आता त्यांना कार्यकारी अभियंता म्हणुन पदोन्नती मिळाली आहे. व आमचे दुसरे उप अभियंता श्री. जवांदे यांना देखिल पदोन्नती मिळाली आहे. त्यांची सार्वजनिक बांधकाम विभागात नियुक्ती केली आहे याबद्दल देखिल आम्ही त्यांना शुभेच्छा देतो. आज महासभेत ज्या अधिका—यांचा विषय आला आहे. आम्ही सर्वांचा विषय

पास करू. परंतु त्यासाठी एकच अपेक्षा ठेवतो की, शहराच्या कामासाठी कोणताही शेरा न मारता शहराचे काम चांगल्याप्रकारे करतील. व जे जनप्रतिनिधी आहेत, उल्हासनगरची जी जनता आहे त्यांना आशिर्वाद देतील. तर त्यांनी चांगल्याप्रकारे काम करावे. या सर्वांना मी सभागृहाच्यावतीने हार्दीक शुभेच्छा देतो.

मा. सचिव:—धन्यवाद. याशिवाय अजुन एक सूचना याठिकाणी आली आहे. याठिकाणी ब—याच सन्माननिय सदस्यांनी महापुरूषांच्या प्रतिमा आणलेल्या आहेत. व त्या येथे लावण्यात आलेल्या आहेत. त्यांनी आणलेल्या महापुरुषांच्या प्रतिमा व पुतळे परत घेवुन जाण्यासाठी कुणाचा काही आक्षेप आहे का?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—आपण मागील बाजुस जी चित्रे लावली आहेत. ती कोणाची आहेत हे समजुन येत नाही. फक्त झेंडा कळुन येतो, बाकी ज्या तसबीरी आहेत त्या कोणाच्या आहेत ते कळुन येत नाही.

मा. सचिव:—वरील बाजुस भगवान बुध्द आहेत त्यांच्या खालील बाजुस डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, या बाजुस महात्मा गांधी आहेत, येथे झुलेलाल आहेत, त्या बाजुस गुरूनानक आहेत. त्या बाजुस हेमु कालानी आहेत व बाजुला छत्रपती शिवाजी महाराज आहेत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—माझे म्हणणे असे आहे की, महापुरूषांचे जे चित्र लावले आहेत. ते चित्र शासकीय नियमाप्रमाणे लावणे आवश्यक असते. त्यामध्ये जर काही बदल झाल्यास तो महापुरूषांचा अपमान होवू शकतो.

मा. सचिव:—बदल काहीही नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—माझ्या नजरेप्रमाणे मला असे वाटते की, बाबासाहेब व गौतम बुध्द हे प्रत्यक्ष जसे आहेत त्याप्रमाणे वाटत नाही. गांधीजी देखिल गांधीजींसारखे दिसत नाहीत. हेमु कालानी देखिल ओळखु येत नाहीत.

मा. सचिव:—आपली काही सूचना असल्यास त्याप्रमाणे दुरूस्ती केली जाईल. शिल्पकार अजुन पण येथे उपलब्ध आहेत. आपली काही सूचना असल्यास त्याप्रमाणे बदल केला जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—माझे म्हणणे एवढेच आहे की, महापुरूषांचा अपमान होणार नाही अशाप्रकारे चित्र लावण्यात यावे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—मा. महापौरजी, या सभागृहाला जेवढे सुशोभित व सुंदर करण्यात आले आहे. त्याबद्दल आम्ही सचिव साहेबांचे आभारी आहोत. तसेच आज दुसरी आनंदाची बातमी म्हणजे आमचे नगरसेवक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचा वाढदिवस असल्याने आम्ही त्यांना देखिल सभागृहातर्फे शुभेच्छा देतो. मा. महापौरजी, आमचे सहयोगी नगरसेवक श्री. अनिल जयसिंघानी यांचा देखिल आज वाढदिवस आहे. त्यांना देखिल आम्ही शुभेच्छा देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—मी विचारलेल्या प्रश्नांला आपण उत्तर दिले आहे की, २००१—२००२ मध्ये रू. ८३ लक्ष एवढा खर्च झाला आहे. याचा अर्थ असा आहे की, रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी या महापालिकेचे जवळपास रू. १ कोटी एवढे खर्च होत आहेत. येथे जे शहर अभियंता बसले आहेत, इतर अभियंता आहेत तर यांना असे वाटत नाही का दरवर्षी एवढे पैसे खर्च करण्यापेक्षा एखादी योजना बनवुन असा खर्च होणार नाही. त्यानंतर पुन्हा दुस—या वर्षी आपण रू. ६० लाख एवढा खर्च केला. दरवर्षी हा जो खर्च होतो, रस्त्यावर जे खड्डे पडतात व जे आपण बुजवतो त्याची गॅरंटी किती असते? याची माहिती कोण घेतो. असे तर होत नाही ना की तेच खड्डे परत परत भरले जात आहेत. दुसरे म्हणजे मी आपल्याकडे जी यादी मागितली आहे त्याला आपण उत्तर देताना सांगितले की यादी मोठी असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागात येवून पहावी. हे उत्तर बरोबर नाही. आमचे मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी देखिल प्रश्न विचारला होता. त्यावेळी सभागृहात ठरले होते की एखादया सदस्याने प्रश्न विचारल्यास त्याची यादी त्याला देण्यात येईल. माझा प्रश्न जानेवारी महिन्यातील आहे. आता ऑगस्ट महिना संपत आला आहे. गेल्या सात—साडेसात महिन्यात सार्वजनिक बांधकाम विभागाला आम्हाला यादी उपलब्ध करून देण्यास वेळ मिळाला नाही. दुसरे मी एजन्सीबद्दल विचारले आहे. आपण वाचा किती एजन्सी दिल्या आहेत.

कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवांदे):—मा. महापौर महोदया, रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी एकुण १४ एजन्सीजला काम देण्यात आले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—याची देखिल यादी आपण देवू शकला नाहीत. १४ जणांची नावे आपणांस जास्त वाटली. मला दु:ख होते की, शहर अभियंता व आयुक्त लिहुन देतात की १४ नावे पण फार जास्त आहेत आपण सा.बा.विभागामध्ये येवून ती नावे पहावीत. आपला कारभार हा असा चालु आहे. १४ नावांची यादी आपण देवु शकत नाही. एका पानावर १४ नावे येतात. आपण एक पान देखिल लिहु शकत नाही. ७ महिन्यात आपण एवढे देखिल करू शकला नाहीत.

कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवांदे):—ही आठ पांनाची माहिती आहे. एका पानावर एवढे आले नसते. यासाठी प्रश्नाचे तसे उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—माझे म्हणणे असे आहे की, १४ एजन्सीजचे नाव दयायला आपल्याला काय त्रास आहे. आपण म्हंटले आहे की सा.बा. विभागात येवून पहावे.

कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवादे):—मा. महापौर महोदया, यामध्ये विचारलेली माहिती फक्त एजन्सीची नसुन खड्डयांची विस्तृत माहिती मागितली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—माझे तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न खर्च किती झाला? दुसरा प्रश्न असा आहे की, कुठे कुठे खड्डे भरले? तिसरा प्रश्न म्हणजे किती एजन्सीने काम केले? आपण एक उत्तर दिले की एवढा खर्च झाला. दुसरे उत्तर दिले की यादी फार मोठी आहे. तिसरे उत्तर दिले आहे की १४ एजन्सीने काम केले आहे. जर आपल्यास १४ जणांची यादी मोठी वाटत असेल तर मग आपण माहिती देणार तरी कधी? १४ नावे देण्यास काय त्रास आहे.

कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवादे):—१४ एजन्सी बरोबरच आपण रस्त्यावर पडलेल्या खड्डयांची यादी देखिल मागितली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:— माझे तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न खर्च किती झाला? दुसरा प्रश्न असा आहे की, कुठे कुठे खड्डे भरले? तिसरा प्रश्न म्हणजे किती एजन्सीने काम केले? आपण एक उत्तर दिले की एवढा खर्च झाला. दुसरे उत्तर दिले की यादी फार मोठी आहे. तिसरे उत्तर दिले आहे की १४ एजन्सीने काम केले आहे. जर आपल्यास १४ जणांची यादी मोठी वाटत असेल तर मग आपण माहिती देणार तरी कधी? १४ नावे देण्यास काय त्रास आहे. यावर शहर अभियंता व आयुक्त यांची देखिल सही आहे. साडे सात महिन्यात महापालिकेला वेळ मिळाला नाही का?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—जवादे साहेब, प्रश्न सरळ आहे. त्याला उत्तर देताना आपण सांगता की, १४ एजन्सीची यादी मोठी आहे. तर एवढे देखिल महापालिकेसाठी मोठे काम आहे का? आपण याचे उत्तर देत नाही. आयुक्त काही न पाहता सही करतात.

कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवादे):—काही न पाहता सही करण्याचा प्रश्न नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मी आपल्याला सांगु इच्छितो की, मागील वेळी देखिल श्री. दिलीप लालवानी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रश्न उपस्थित केला होता. हा जो सा.बा. विभाग आहे हा सर्वात भ्रष्ट विभाग आहे. येथे अभियंते नाहीत तर मिस्टर ४५ टक्के चालतात. याबद्दल उपमहापौर व श्री. लालवानी यांनी माहिती दिली होती. त्यावेळी असे ठरले होते की, सा.बा.वि. बद्दल पुर्ण माहिती देण्यात येईल. तरी देखिल आपण उत्तर देण्याचे टाळत आहात. १४ जणांची यादी आपणांस मोठी वाटते. आपण संपुर्ण सभागृहाची दिशाभुल करून उत्तर देण्याचे टाळत आहात. तीन वेळा आपल्याला प्रश्न विचारला तरी आपण याचे उत्तर देत नाहीत.

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. वि.(श्री. एम. ए. जवादे):—</u>सन्माननिय सदस्यांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न होत नाही. यादी आहे फक्त ती वितरीत केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>यासाठी आपण सभागृहाची माफी मागायला हवी. आपण चुकीचे उत्तर देत आहात. १४ जणांची यादी आपणांस मोठी वाटत आहे. आपण ठेकेदाराला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात. आता तीन वेळा विचारले तरी आपण त्याला उत्तर देत नाही. आयुक्त साहेब हे काय चालु आहे? आपण उठुन उत्तर दयावे. १५ मिनिटांपासुन एक प्रश्न चालु आहे आपण यामध्ये दखल दयायला हवी.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:— </u>मा. महापौर महोदया, जी १४ एजन्सीची यादी आहे ती सन्माननिय सदस्यांना देण्यात येईल व सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री.लाल पंजाबी:—</u>कधी देणार? सहा महिन्यानंतर प्रश्न येतो व उत्तर दिले जाते की आता देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानी:—</u>मला प्रश्न विचारून साडे सात महिने झाले अजुन पर्यंत यादी मिळाली नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>यादी आता दया.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. २८३ श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २८३:—</u> उल्हासनगर महानगरपालिकेने प्लॉट नं. ६१८ /६१९ या जागेवर मुकेश पी. वाधवानी यास नरवि/बाप/क्र.२९९/९९/१२४० दिनाक २९/१/२००१ नुसार नकाशा मंजूर केलेला असून त्याबाबत खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे व माहिती महासभेत दयावी.
अ) सदर जागा ही सद्याच्या विकास आराखडयानुसार कोणत्या प्रयोजनार्थ आहे?
ब) सदर जागा ही येणा—या विकास आराखडयानुसार कोणत्या प्रयोजनार्थ आहे?
क) वरील क्रमांकातील मंजुर नकाशानुसार त्या ठिकाणी गाळे व सदनिका किती चौ. फुट व प्रत्येक मजल्यावर किती याची माहिती दयावी.
ड) पैकी महापालिकेकडे सदर विकासकाने किती चौ. फुट व प्रत्येक मजल्यावर किती याची माहिती दयावी.
इ) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला किती तारखेला देण्यात आला?
ई) सदर नकाशा मंजुर करतांना करण्यात आलेल्या करारानुसार महापालिकेला देय असलेले क्षेत्रफळ ताब्यात घेतले का?

उत्तर:—अ. सदरची जागा हौसींग फॉर डिसहाउस या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेले आहे.
ब. प्रारूप विकास आराखडयामध्ये आ. क्र. ४१, सार्वजनिक सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयी या व आ.क्र. ३९ मनोरंजनासाठी खुली जागा या प्रयोजनार्थ आरक्षित आहे.
क. सदर मुळ नस्ती सहा संचालक नगररचना, ठाणे यांचेकडे दि. २९.११.०३ च्या पत्रान्व्ये पाठविण्यात आलेली असल्याने वरील कार्यालयाकडून सदर नस्ती प्राप्त झाल्यानंतर खुलासा सादर करणे सोयीस्कर होईल.
ड. मंजुर नकाशानुसार १ रूम सदनिका रहिवासी वापरासाठी २८८.८० चौ.मी. क्षेत्रात बनवुन देण्यासाठी करारनामा करण्यात आलेला आहे.
इ. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही.
ई. मंजुर करताना करण्यात आलेल्या करारानुसार महापालिकेला देय असलेले क्षेत्रफळ ताब्यात घेतले नाही. दि. २८. ६.२००२ रोजीच्या पत्रान्वये जागेवर सरू असलेले बांधकाम थांबविण्याबाबत. विकासकर्ता यांना पत्र पाठविण्यात आलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>उत्तर दयायला कोण आहे?

<u>मा. सचिव:—</u>नगररचनाकार आज नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>उपायुक्तांना बोलवा त्यांच्याकडे कार्यभार दिला आहे.

<u>मा. सचिव:—</u>दुसाने साहेब कृपया उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>दुसाने साहेब, १.१.२००४ ला हा वरील प्रमाणे प्रश्न विचारला आहे. त्याला आपण उत्तर दिले आहे की, सदरची जागा हाऊसिंग फॉर डिसहाऊस्ड या प्रयोजनार्थ आरक्षित आहे. उल्हासनगरच्या आरक्षित भुखंडापैकी हा एक भुखंड होता. त्याकाळात येथे ६ प्लॅाटस् विकसित केले गेले. त्यांनतर सध्याच्या विकास आराखडयामध्ये सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयी हा आरक्षण क्रमांक ३९ मनोरंजनासाठी खुली जागा या प्रयोजनार्थ आहे. आता सध्याच्या विकास आराखडयाचा जो हेतु होता.

<u>उपायुक्त (श्री. संजय दुसाने):—</u>प्रारूप विकास आराखडा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>तर आता तिथे काय करणार?तुम्ही परवाना अगोदरच्या आराखडयाप्रमाणे पास केला आहे. तेव्हा दोन्ही नकाशे होते. मंजुर नकाशा सुध्दा होता व प्रारूप नकाशा सुध्दा होता. असे असताना सुध्दा त्याठिकाणी मंजुर नकाशा नुसार हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी तो प्लॅाट असताना बिल्डरला ती जागा दिली. आणि त्यानंतर मी वारंवार हा प्रश्न विचारला आहे की त्या ठिकाणी त्या पध्दतीचे बांधकाम चालु आहे का? तेव्हा पासुन सातत्याने पाठपुरावा केला. त्याकडे तुम्ही दुर्लक्ष केले लक्ष दिले नाही. आता सुध्दा तसेच चालले आहे. त्यानंतर त्यातील जे २५ टक्के बांधकाम घ्यायचे होते. ते घेतले का? जोत्याचा परवाना नाही दिला तरी देखिल त्या ठिकाणी इमारत उभी आहे. आजच्या परिस्थितीत त्या इमारतीची स्थिती काय आहे? तुम्ही २००२साली काम थांबविण्यासाठी पत्र दिले होते. तुम्ही यात म्हंटले आहे की, २८८. ८० चौ. मी. बनवून देण्यासाठी करारनामा करण्यात आला होता. हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी जी जागा आहे ती बांधकाम करताना साधारणत: गरीब लोकांसाठी ज्यांचे पुर्नवसन करायचे त्यांना त्या ठिकाणी सामावुन घेण्यासाठी त्या प्रयोजनार्थ आरक्षित होते. त्यानुसार ३०० चौ.फुटाचे बांधकामाच्या सदनिका, गाळे होणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात त्या ठिकाणी १००० व १२०० चौ.फुटाच्या सदनिका झाल्या आहेत. हे प्रशासनाच्या वारंवार लक्षात आणुन सुध्दा प्रशासनाने त्यावर कुठलीही कार्यवाही केली नाही. आणि पायाचा दाखला घेतला नाही तरी देखिल इमारत पुर्ण झाली आहे. आणि उत्तरात सांगतात की, २००२ साली बांधकाम थांबविण्यासाठी त्यांना पत्र दिले आहे. परंतु बांधकाम थांबलेले आहे का? आजची परिस्थिती काय आहे?

<u>उपायुक्त (श्री. संजय दुसाने):—</u>मा. महापौर महोदया, आपल्या महापालिकेत मागील ब—याच कालावधीपासुन नगररचनाकार हे पद रिक्त असुन त्या पदाचा कार्यभार कल्याण येथील अधिका—यांकडे आहे. आजच्या बैठकीत ते उपस्थित नाहीत. परंतु या प्रश्नाची उपायुक्त म्हणुन जबाबदारी घेवून मी उत्तर देत आहे. याबाबतची जी सद्यस्थितीची माहिती आहे. ती तातडीने घेवून पुढच्या सभेपर्यंत आम्ही सभागृहापुढे पुर्णपणे सादर करू शकु. आपल्याकडे अधिकारी नसल्यामुळे ब—याचशा बाबीत अडचणी निर्माण होत आहेत. यासाठी पाठपुरावा देखिल सुरू आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>ठिक आहे. आयुक्त साहेब अधिकारी बदलत राहतील. नवीन अधिकारी त्याच अभ्यासु वृत्तीने उत्तर देईल असे सांगता येत नाही. परंतु ज्या पध्दतीने लोकप्रतिनीधींनी ठेवलेले प्रश्न आहेत ते आयुक्तांनी दालनात बसुन त्या प्रश्नांवर सखोल चर्चा करून महासभेमध्ये तयारीनिशी यायला हवे. अधिकारी बदलत राहतील याचा अर्थ सदस्यांनी काय वाट बघत राहायचे का? यांना माहित नाही, त्यांना माहित नाही. अधिकारी अनुपस्थितीत आहेत. हा प्रश्न १ जानेवारीला विचारलेला आहे. आणि त्या प्रश्नाचे उत्तर आज सुध्दा समाधानकारक मिळत नाही. यात श्री. दुसाने साहेब यांचा दोष नाही. हा संपुर्ण प्रशासनाचा दोष आहे. जी एक पध्दत आहे. तीच येथे अंगिकारली जात नाही. अधिकारी बदलला म्हणजे उत्तर बदलते असे नाही. आयुक्तांना माहित आहे हा प्रश्न येणार आहे. तेव्हा महासभेमध्ये उत्तर देण्यासाठी तयारी करणे आवश्यक होते की त्या ठिकाणी परिस्थिती काय आहे. मी २८. ६ २००२ला पत्र दिले आहे बांधकाम थांबवावे म्हणुन. परंतु बांधकाम थांबवले आहे का? आणि ते ताब्यामध्ये घेतले आहे का? ते ताब्यामध्ये घेवूच शकत नाही कारण परवान्याप्रमाणे ते बांधकाम झालेले नाही. अशा परिस्थितीमध्ये तुम्ही उपाययोजना काय करणार? का असेच त्या बिल्डरच्या घशात घालणार. या इतर इमारतीमध्ये

सुध्दा जवळ जवळ ७–८ ठिकाणी जे आरक्षित भुखंड होते त्या ठिकाणी त्या बिल्डरच्या ताब्यात दिलेल्या आहेत. तिथेही असेच षडयंत्र करून ते दुस–याच्या ताब्यात देण्यात येईल. ज्या प्रयोजनार्थ ही जागा आहे त्या प्रयोजनार्थ ती वेळीच वापरली गेली पाहिजे. परंतु हे प्रशासनाच्या लापरवाहीने, हलगर्जीपणाने किंवा मुद्दामुन जाणुन बूजुन दुर्लक्ष करत असतील तर ते चुकीचे आहे. कृपया आता माहित नसेल तर पुढील महासभेमध्ये नक्की काय आहे. त्याचे उत्तर दयावे.

<u>उपायुक्त (श्री. संजय दुसाने):–</u>पुढील महासभेमध्ये याबाबतची सविस्तर माहिती देण्यात येईल.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. २८४ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २८४:–</u> १) मे. अॅन्थोनी वेस्ट हॅन्डलींग सेल्स हया कंपनीला घनकचरा वाहतूकीचे कंत्राट दिले आहे. करारामधील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने त्यानुसार काम चालले आहे का?
अ) दिनांक १/१०/२००३ पासून सदर ठेकेदाराचे काम सुरु झाले तेव्हा पासून किती गाडया कॉम्पेक्टर व स्कीपलिडर उल्हासनगर मध्ये आहेत?
ब) नमूद केलेल्या प्रकारातील सर्व कचरा कुंडया त्या त्या ठिकाणी ठेवून कचरा जमा केला जातो का? तसेच निश्चित केलेले कामगार व कामगार संख्या दयावी?
क) तसेच कामगार कायदयाचे पालन केले जाते का? त्यानुसार त्यांना वेतन व इतर सूविधा दिल्या जातात का? कृपया सविस्तर माहिती दयावी.

<u>उत्तर:–</u>होय, तथापि अदयाप सर्व अटींची पुर्तता झालेली नाही.
अ. आतापर्यंत अ. कॉम्पक्टर–७ ब. डंम्पर प्लेसर–२क. डम्पर (टिपर)–२ या व्यतिरिक्त सदर काम सुरू झाल्यावर पहिल्या महिन्यात २० ते ३० टिम्पर (डम्पर) रात्रंदिवस ठेकेदारामार्फत भाडे तत्वावर उपलब्ध बरून लावण्यांत आले आहेत.
ब. होय
कचरा कुडयांची संख्या, हातगाडयांची संख्या व कामगार सख्या सोबतच्या प्रपत्रात नमुद केली आहे.
क. होय
करारनाम्यातील शर्त क्रमांक ९. २ नुसार बील अदा केले आहे.
करारनाम्यातील शर्त क्र. ९.१ दंड आकारण्यात येईल.
यामुळे कोणताही परिणाम झालेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>येथे संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत हे चुकीचे नाही. यानंतर बैठक होईल अथवा होणारही नाही. परंतु संबंधित अधिकारी येथे उपस्थित नाही. एक नाही, दोन नाही, कुणीही नाही. आरोग्य विभागाशी निगडीत हा प्रश्न आहे.

<u>मा. सचिव:–</u>तुम्हाला हवे असेल तर प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>आयुक्त साहेब उत्तर देत नसतील तर प्रलंबित ठेवण्यात यावा.

<u>मा. सचिव:–</u>आयुक्तांच्या जागी जे प्राधिकृत अधिकारी उपस्थित आहेत ते प्रश्न प्रलंबित ठेवण्याविषयी सांगत आहेत.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:–</u>पुढील बैठकीत घेवू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मी काही जास्त विचारणार नाही. तुम्ही उत्तरे दिली आहेत फक्त ही उत्तरे चुकीची आहेत. तुम्ही ती संबंधित अधिका–यांना अथवा आयुक्तांना दाखवा.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:–</u>त्यामध्ये काही चुका असतील तर आम्ही तुम्हाला सविस्तर उत्तर देवू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मागच्या वेळेस हा प्रश्न आला होता तेव्हा श्रीमती जयश्री सुर्वे यांनी हा प्रश्न विचारला होता तेव्हा त्याचे उत्तर दिले होते की, अद्याप ठेकेदार काही अटी पुर्ण करू शकलेला नाही, काही अटी बाकी आहेत. कोणत्या अटी आहेत हे तुम्ही त्यावेळी सांगितले होते. इथेही तसेच नमुद केले आहे.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>जी माहिती अपुर्ण असेल ती आरोग्य विभागाकडुन घेवून मी आपणांस देतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>त्यानंतर या ठिकाणी चुकीची माहिती दिलेली आहे. यामध्ये दिले आहे, संपुर्ण कचरा वाहतुक करारातील अटी व शर्तीप्रमाणे होत आहे. परंतु ही चुकीची माहिती आहे. आपण हा ठेका कच— याची वाहतुक बंद गाडयांमधुन व बंद कुंडयांमधुन करण्यासाठी दिला आहे. लोकांना त्याचा धोका होवू नये म्हणुन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, त्यांनी दिलेल्या सुचनांनुसार हे काम आपण चालु केला आहे. त्यासाठी २.२० कोटी ऐवजी ४.३८ कोटी म्हणजे साधारणत: २.१८ कोटी वर्षाला जास्त देत आहोत. केवळ बंद गाडयांमधुन, बंद कचरा कुंडयांमधुन आणि सुका कचरा, ओला कचरा हा वेगळा व्हावा म्हणुन ठेका दिला आहे. तर या अटी पुर्ण होत नाहीत. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे म्हारळ गांव वाल्यांनी सुका कचरा व ओला कचरा वेगळा होत नाही, त्या व्यतिरिक्त मी बाकीच्या ८—१० अटी सांगितल्या ज्यांची पुर्तता होत नाही. आणि ९ तारखेला म्हारळ गांव वाल्यांनी डंपींग ग्राउंडवर आपल्या गाडया येवू दिल्या नव्हत्या. त्याचे कारण एकच होते की, उघडया गाडयांमधुन कचरा वाहतुक होते, म्हणजे प्रशासन सांगते आम्ही बंद गाडयांमधुन, कॉम्पॅक्टर मधुन कचरा वाहतुक करतो. प्रशासन त्या ठेकेदाराला कश्यासाठी पाठिशी घालत आहे, ते समजुन येत नाही. म्हारळ ग्राम पंचायतीचे एक पत्र आहे, ९ तारखेला त्यांनी ते आयुक्तांना दिले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी ट्रक्सचे नंबर सुध्दा दिले आहे. ट्रक नंबर एम.एच. ०४ बी. व्ही.८०६८ , एम.एच. ०४ बी.जी.७८४५, एम.एच. ०५ पी.५६४७ अशा प्रकारे ८—९ ट्रकची यादी त्यांनी दिली आहे. ज्यामधुन कचरा वाहतुक होत आहे. आणि त्यामुळे त्या म्हारळ ग्राम पंचायतीच्या हद्दीतुन कचरा जात असल्याने, तो रस्त्यावर पडतो आहे. अतिशय घाण आहे, कॅम्प नं. ५ येथिल ती घाण होती. ती घाण तेथे पडल्याने तेथिल लोकांनी आंदोलन केले आहे की, आमच्याकडे कचरा येवू देवू नका. आपण मात्र त्याचे उत्तर दिले आहे की, यापुढे आम्ही अशा प्रकारच्या उघडया गाडयांमधून कचरा वाहतुक करणार नाही. हे पत्र आयुक्तांचे आहे. या पत्रामध्ये आयुक्तांनी ३ अटी दिल्या आहे. एक म्हणजे कच—याची वाहतुक डंपींग ग्राउंड पर्यंत बंद वाहनातुन करण्यात येईल. म्हणजे यापुर्वी होत नव्हती. यापुर्वी सभागृहाला, न्यायालयाला सुध्दा आम्ही सांगितले की, बंद गाडयांमधुन, कॉम्पॅक्टर मधुन कच—याची वाहतुक होत आहे. परंतु येथे प्रशासन उघडे पडले आहे, चुकीची माहिती दयायचा, उद्देश कोणताही असू दया, परंतु ठेकेदाराला पाठीशी घालु नका. त्यामुळे २ दिवस उपायुक्त (मुख्यालय) आम्ही स्वत: त्या ठिकाणी होतो. तेथिल अंदोलनाला आम्ही विनंती केली की, यापुढे असे होणार नाही. तर अशा प्रकारे चुकीची माहिती देणे अजुनही चालू आहे. ठेकेदाराने ब—याचशा अटीचे उल्लंघन केले आहे, तरी देखील त्याच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही. फक्त आम्ही ९(१) नुसार आम्ही दंड आकारणी करणार असे सांगतात. दंड आकारला की नाही, हेही माहिती नाही. आता माहित आहे का? नसेल तर मला पुढच्या सभेत माहिती दया. सचिव साहेब हे होत आहे ते चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी, बोडारे साहेबांचा जो विषय आहे, ठेक्याच्या अटी व शर्ती आम्ही मागील महासभेत देखील विचारल्या होत्या. माहितीच्या अधिकाराप्रमाणे मी एक पत्र देवून देखील विचारले होते. त्याचेही उत्तर मला मिळाले नाही. या ठेकेदाराला प्रशासन पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. निश्चित प्रयत्न करीत आहे. कारण ज्या अटी व शर्ती आपण दिल्या आहेत त्याचे तो निश्चितच उल्लंघन करीत आहे. श्री. बोडारे साहेबांनी एक सुंदर निवेदन केले आहे की, उघडया गाडयांमधुन जी कचरा वाहतुक करतात. त्या सर्व उघडया गाडया माझ्या घरासमोरून जातात. उदयापासुन मी त्यांचे नंबर घेवून पुढच्या महासभेत आपल्याला देईन. म्हणजे या ठेकेदाराला दुप्पट पैसे देवून सुध्दा हा ठेकेदार व्यवस्थित काम करित नाही. याचा ठेका रद्द करण्यासाठी अटी व शर्तीची माहिती आम्हाला होणे आवश्यक आहे. यासाठी आम्हाला तुम्ही ती दयायला हवी परंतु तुम्ही ती दयायला तयार नाहीत. याचा अर्थ असा की, वैद्यकिय आरोग्य अधिकारी असो अथवा आरोग्य विभागाचे अधिकारी असो. आजची महासभा तर अशी दिसत आहे की, येथे एकाही अधिका—याचा ठावठिकाणा नाही. पुढेचे पाठ मागचे सपाट असे येथे दिसत आहे. जुन्या अधिका—यांनी काळपांढर करून ठेवायचे नविन अधिकारी आले म्हणजे त्यांनी म्हणायचे

की आम्हाला माहित नाही. पुर्ण माहित नाही आम्ही नविन आहोत, ही कारणे नेहमीच चालणार आहेत. आज श्री. खरात साहेब हे का आले नाहीत? त्यांचा महत्वाचा प्रश्न येणार आहे हे त्यांना माहिती नव्हते का? श्री. खरात साहेबांना प्रत्येक वेळी प्रश्न विचारला की चुकीची उत्तरे देवून ते दिशाभुल करण्याचा प्रयत्न सतत करीत असतात तर माझा असा आरोप आहे की, तुम्ही या विषयावर तंतोतंत उत्तरे पुढील महासभेपर्यंत दिली नाही तर आम्ही सगळे पुरावे गोळा करू. धन्यवाद.

मा. सचिव :—प्रश्न क्र. २८५ हा श्री. नाना पवार यांचा आहे.

प्रश्न क्र. २८५:— अ) कल्याण—अंबरनाथ रोड, वरील नाका नं. ८ शेजारील ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराचे काम कोणत्या कंपनीला / ठेकेदाराला दिले आहे?

ब) सदरील काम किती महिन्याचे कालावधीमध्ये ठेकेदाराने पूर्ण केले पाहिजे?

क) ठेकेदाराने / कंपनीने निर्धारित कालावधीत काम पूर्ण केले नसल्यास कायदेशीर कारवाई कोणत्या प्रकारे केली जाते?

उत्तर:—अ.मेसर्स डी. एस. कंन्स्ट्रक्शन.
ब. ६ महिने.
क.ठेकेदाराने कंपनीने निर्धारीत कालावधीत काम केले नसल्यास त्यांना नोटीस बजावण्यात येते तरी त्यास नोटीस बजावण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. नाना पवार:—उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :—प्रश्न क्र. २८६ हा मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांचा आहे. ते उपस्थित नसून त्यांच्या प्रश्नोत्तराची कार्यवृत्तांत नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. २८६:—१ कॅम्प नं. १ स्थित बंसी जगनानी मार्ग पर दैनिक उल्हास विकास के दफतर वाला स्ट्रक्चर दों दो बार डेमोलिश्यिन ऑर्डर निकाले जाने के बाद भी क्यों नही तोडा गया है?

२. क्या उक्त स्ट्रक्चर के विरुध्द गत् उल्हासनगर महानगरपालिका बॉडी में तत्कालिन नगरसेवक श्री. बी.बी. मोरे ने प्रश्न उठाया था? लोकायुक्त से भी उक्त स्ट्रक्चर पर कारवाई के निर्देश आये थे या नहीं?

३. उक्त बांधकाम यदि उल्हासनगर महानगरपालिका की नजर में अवैद्य है, तो उस पर अब तक कारवाई क्यों नहीं की जा रही है?

उत्तर:—१. तत्कालीन मुख्याधिकारी यांनी प्रश्नांकित बांधकाम निष्कासीत करण्याबाबत दि. ४.४.९८ रोजी नोटीस दिली होती. अदयाप ते निष्कासित झाले नसलेचे दिसुन येते. त्यासाठी दि.११.४.०१च्या पत्राने कागदपत्र मागणीची नोटीस दिली होती. परंतु पुढे कारवाई झाली नाही असे दिसुन येते.
२. होय श्री. बी.बी. मोरे तत्कालीन सदस्य यांनी महासभेत प्रश्न विचारला होता व त्यास उत्तर दिले होते याकडे लक्ष वेधण्यात येत आहे.
३. न्यायालयीन आदेशानुसार अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कृती आराखडा सुरू केला आहे. त्या अंतर्गत अदयाप संबंधीत बांधकामांविरूध्द कायदयाप्रमाणे निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २८७ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २८७:– उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत शहरात काही मोबाईल कंपनीच्या वतीने टॉवर्स उभारण्यात आले आहेत का?

असल्यास किती?

सदरच्या टॉवर्सच्या विरोधात लेखी तक्रारी आल्या आहेत काय?

असल्यास सदर प्रकरणी काय कायदेशीर कारवाई करण्यात आली?

नसल्यास त्याची कारणे काय?

उत्तर:–उल्हासनगर शहरात बांधकाम पुर्णतेचा दाखला न घेतलेल्या इमारतीवर एअरटेल, बीपीएल एटीएनटी यांचे टॉवर उभारण्यात आलेले आहेत.

त्या उभारण्यासाठी नगररचना विभागामार्फत कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असलेले टॉवर अनाधिकृत इमारतीवर असल्याने अशांना परवानगी नाकरण्यात आली आहे. अनाधिकृत इमारतीवरील टॉवर धोकादायक आहेत किंवा कसे त्याबद्दल शहर अभियंता यांचेकडून तपासणी करून अभिप्राय देण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच अधिकृत व अनाधिकृत इमारतीवर विनापरवाना टॉवर उभारल्याबद्दल संबंधीत कंपन्यांना अनाधिकृत बांधकामांबद्दल उप–आयुक्त (अनाधिकृत बांधकाम)यांनी नोटीस काढण्याचे आदेश आले आहेत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–ठिक आहे.

मा. सचिव:– प्रश्न क्र. २८८ हा श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. २८८:–व्हाईल पासिंग द बजेट वाईड रिझोल्युशन नं. १०१ डेटेड २०.२.२००३, २० रोडस् वेअर ब्राट टू बी डेव्हलपमेंट. इन धिस कनेक्शन प्लीझ रिप्ले.

१. हाऊ मेनी रोडस् हॅव बीन डेव्हलप? (प्लीज स्पेसिफाय रोडस् ॲन्ड वेदर वर्कस आर इन प्रोग्रेस ऑर कंम्पलेटेड)

२.इफ सम रोडस् आर नॉट डेव्हलपड ऑर इवन वर्कस नॉट स्टार्टेड रिझनस् देअरफॉर?

उत्तर:–१. अ. विकसित झालेले रस्ते निरंक
ब. कामे प्रगतीपथावर असलेले रस्ते–३
क.काम पुर्ण झालेले रस्ते–निरंक
२.अ. ज्या रस्त्यांची निविदा प्रक्रिया चालु आहे असे रस्ते–५
ब. ज्या रस्त्यांची प्राकलन प्रक्रिया चालु आहे असे रस्ते –१२

कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):–मा. महापौर महोदया, या प्रश्नामध्ये २० रस्त्यांच्या प्रगतीबाबत विचारणा केली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–आता काय स्थिती आहे?

कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):–मी सन्माननिय सदस्य श्री. रूपचंदानी यांना सांगु इच्छितो की, आजच्या परिस्थितीत नविन चालु झालेले काम आहे.– न्यु इंग्लिश स्कुल ते बॅरेक क्र. ९२६ कुर्ला कॅम्प, उल्हासनगर–४ हे काम चालु झाले आहे. त्यानंतर राधास्वामी सतसंग येथे साकव बनविण्याचे काम प्रगती पथावर आहे. उर्वरित कामे ही यादीत दर्शविल्याप्रमाणेच आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u> मी आपणांस वरील प्रमाणे प्रश्न विचारला होता. त्यास आपण रस्त्यांची नावे व सद्यस्थिती याची यादी दयायला हवी होती परंतु आपण ती दिली नाही. कोणकोणते रस्ते आहेत त्यांची नावे मी विचारली होती परंतु ती आपण दिली नाही. मी इंग्रजीत प्रश्न दिला आहे म्हणुन आपणांस कळले नाही का? जर आपणांस इंग्रजीत काही त्रास असेल तर यापुढे मी मराठीत प्रश्न विचारेन. माझा प्रश्न स्पष्ट आहे त्याला आपण उत्तर काय दिले आहे ते बघा.

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>आपण विचारले आहे की, किती रस्त्यांचा विकास केला आहे? रस्त्यांची नावे दया?व कामे पुर्ण झाली अथवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>याला आपण काय उत्तर दिले आहे?

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>आम्ही उत्तर दिले आहे की, विकसित झालेले रस्ते निरंक आहेत. प्रगतीपथावर कामे असलेले रस्ते तीन.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>तुमच्याकडे त्यांची नावे आहेत का?
<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>नावे माझ्याकडे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>मी आपणांस प्रश्नात विचारले आहे. अद्याप कोणते रस्ते पुर्ण झाले नाहीत? हा माझा प्रश्न होता मला याचे उत्तर दयावे. आपण उत्तर बरोबर दिलेले नाही. याचा अर्थ अभियंत्याला प्रश्न काय आहे ते देखिल कळत नाही. मी विचारले आहे की जे २० रस्ते मंजुर झाले आहेत. त्यातील कोणते रस्ते चालु झाले आहेत हे मी विचारले आहे. आपण मला दिले आहे का? हे काय उत्तर आहे का? आपण अशाप्रकारे सभागृहाचा वेळ वाया घालवत आहात. व आमची दिशाभुल देखिल करीत आहात. मी जेव्हा सरळ प्रश्न विचारत आहे तेव्हा आपण त्याचे उत्तर देखिल देवू शकत नाही. यामध्ये तर काही जास्त माहिती दयायचा प्रश्न नाही. मग उत्तर का देत नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>मा. महापौर महोदया, मी सन्माननिय सदस्यांच्या प्रश्नाचे जे उत्तर देत आहे ते माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>आपण सभागृहाला माहिती का दिली नाही?

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>आपणांस याची सविस्तर माहिती पुढील महासभेत देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>ही हद्द झाली. जानेवारी महिन्यातील प्रश्न आहे, आम्ही आता ऑगस्ट महिन्यात विचारत आहोत. पुढील महासभा नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. तेव्हा आपण उत्तर देणार का? आता दोन महिने सभा होणार नाही. याचा अर्थ अभियंता व उपआयुक्त यांना काही समजत नाही. मी प्रश्न काय विचारला आहे हे देखिल त्यांना कळत नाही. माझा प्रश्न एकदम सरळ आहे. जर अधिकारी हे पण समजत नसतील तर आम्ही काय करणार? प्रत्येक ठिकाणी आपण चुकीची उत्तरे देत आहात. आता दुसरा प्रश्न वाचा, त्याचे उत्तर वाचुन मला सा.बा. विभागावर हसु येत आहे. आयुक्त देखिल काही न पाहता सहि करतात.

<u>मा. सचिव:—</u>आपणांस यादी देण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>ते ठिक आहे परंतु त्यानंतर काय? दुस—या प्रश्नाचे काय उत्तर दिले आहे. तुम्ही उत्तर दिले आहे प्रक्रिया चालु आहे. काय प्रक्रिया चालु आहे? प्राकलन झाले आहे, निविदा झाली आहे अथवा नाही? काहीच नाही.

<u>कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग (श्री. एम.ए. जवादे):—</u>उत्तरात दिले आहे ज्या रस्त्यांची निविदा प्रक्रिया चालु आहे. असे रस्ते पाच आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>काय प्रक्रिया चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>उत्तरावर कोणाची सही आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>श्री. चिजवानी यांची सही आहे. त्यांना बोलवा. श्री. सुखरामानी कोठे आहेत त्यांना बोलवा. आयुक्त साहेब आपण श्री. सुखरामानी यांना बोलवा त्यांची सही आहे. आम्ही पुढच्या वेळेसाठी का थांबावे?

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>मा. महापौर महोदया, आमचे उप अभियंता आता नाहीत. कार्यकारी अभियंता व शहर अभियंता आहेत. सन्माननिय सदस्यांनी विचारलेल्या रस्त्याच्या प्रश्नाबाबतची विस्तृत यादी आम्ही पुढील आठवडयात देवू. आता शहर अभियंता व कार्यकारी अभियंता आहेत परंतु त्यांच्याकडे यादी उपलब्ध नाही ती आपणांस नंतर देण्यात येईल. पुढील आठवडयात मी आपणांस यादी देतो. मी विनंती करतो की पुढील आठवडयात यादी देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आपण श्री. सुखरामानी यांना का वाचवत आहात? त्यांना येथे का बोलवत नाही? जेव्हा त्यांनी सही केली आहे तेव्हा त्यांना का बोलविण्यात येत नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>श्री. सुखरामानी यांना बोलवा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>मिस्टर ४५ परसेंट कुठे गेले? त्यांना बोलवा. तुम्ही त्यांचा बचाव का करीत आहात हे आम्हाला आधी सांगा. ज्यावेळेला ४५ टक्के एवढे कमिशन खातात त्यावेळेला नाही जात. श्री. लोणारे साहेब यावर आपली देखिल स्वाक्षरी आहे. आपण जेव्हा सही करता तेव्हा ती आपली देखिल जबाबदारी ठरते. आम्ही तुम्हाला देखिल प्रश्न विचारू शकतो. अशा भ्रष्ट अधिका—याचा कृपया बचाव करू नका. आपण आयुक्त असुन काय करित आहात. मला आश्चर्य वाटते.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>याठिकाणी शहर अभियंता व कार्यकारी अभियंता उपलब्ध असल्याने उप अभियंता यांना बोलविण्यात आले नव्हते. परंतु आता त्यांना निरोप दिला आहे ते येत आहेत.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—**यावर आपली देखिल स्वाक्षरी आहे. आपणांस कळत नाही का उत्तर कसे दयायचे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**आपण उत्तर दयावे सही आपली आहे.

**आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—**त्यांना बोलवले आहे ते आपणांस माहिती देतील.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**याचा अर्थ आपण काही न पाहता सही करता. हे काय आहे?

**मा. महापौर:—**श्री. सुखरामानी यांना बोलवले आहे ते येत आहेत. महासभा आहे तर त्यांनी यायला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः**—तो पर्यंत पुढील प्रश्न घ्यावा.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः**—प्रश्नोत्तराचा तास अर्ध्या तासानी वाढवला जावा.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः**—आजच्या दिवसासाठी वाढविण्यात यावा.

**मा. सचिवः**—पुढील प्रश्न घ्यायचा का?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः**—पुढील प्रश्न घ्यावा.

**मा. महापौर :**— सचिव साहेब पुढील प्रश्न घ्यावा.

**मा. सचिवः**—प्रश्न क्र. २८९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**प्रश्न क्र. २८९ः**—शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ येथिल श्री. जी. जे. मोटवानी व दौलतराम मोटवानी यांच्या मालकीच्या जागेवरील इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० नुसार सदर इमारती संबंधीत विचारलेल्या खालील प्रश्नाची योग्य सुचक समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याबाबत.

प्र. १) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीस पायाभरणी दाखला घेतला आहे का?

प्र. १ ब) ) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीने बांधकाम पुर्णतेचा दाखला घेतला आहे का?

प्र. १ क) ) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीचे वाढीव बांधकाम आहे का? असल्यास किती? त्यावर आपण कोणत्या प्रकारची कार्यवाही केली याचा खुलासा करावा

उत्तरः—सदर इमारतीस पाया भरणी दाखला दिलेला नाही.

नाही.

होय, १६२. ९५ चौ.मीटर.

वाढीव बांध्कामाबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः**—मा. महापौर व आयुक्त साहेब, सद्यस्थिती काय आहे हे जरा सांगावे. प्रश्न विचारून सात महिने झाले आहेत. आता काय स्थिती आहे?

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब १३.१२.२००२ ला परवानगी दिलेली आहे. व १६२. ९५ चौ.मी. चे जास्त बांधकाम केलेले आहे. त्यांना जागा रिकामी करण्यासाठी नोटीस दिलेली आहे. सध्या त्या ठिकाणी लोकांचे वास्तव्य आहे. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—सात महिने झाले आहे आणि तुम्ही आता ऑक्टोबर महिन्यात कारवाई करणार असे सांगत आहात. सात महिन्यांपासुन काय झोपले होते का? काही सेटींग झाली होती का?सांगा मला, ही तर उघड उघड सेटींगच दिसत आहे. सात महिन्यापासुन कार्यवाही होत नाही व आता महासभेत ऑक्टोबर महिन्याचे आश्वासन देण्यात येत आहे.

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—त्यांना दिलेल्या नोटीसीचा कालावधी तर पुर्ण व्हायला हवा.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—अजुन किती कालावधी हवा? नोटीस किती दिवसांची असते?

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—एक महिन्याची नोटीस असते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—नोटीस कधी दिली होती?

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—नोटीस दिल्यानंतर शासनाकडुन एक परिपत्रक प्राप्त झाले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—हे सप्टेंबर २००४चे परिपत्रक कधी प्राप्त झाले आहे?

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—माझा प्रश्न १ जानेवारी २००४चा आहे. आपण एक महिन्याची नोटीस दिली असेल तर त्याचा कालावधी फेब्रुवारी महिन्यात संपला असेल. परिपत्रक कधी प्राप्त झाले आहे?

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—जुन महिन्यात.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—मग फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे व जुन असे पाच महिने आपण झोपले होते का? आतुन काही सेंटीग झाली होती का? तुम्ही सभागृहाला उत्तर दया. हे असेच चालु राहणार का? त्यानी पायाचा दाखला सुध्दा घेतलेला नाही. तुम्ही काय झोपले होते का? एखादया गरीबाने झोपडे बनविल्यास ते तोडण्यासाठी तुम्ही लगेच तेथे जातात. मग हे एवढे दिसले नाही का? हा प्रश्न प्रलंबित ठेवून कार्यवाही झाल्यावर पुढील महासभेत त्याचे उत्तर दयावे. तोपर्यंत याला प्रलंबित ठेवावा. कार्यवाही व्हायला हवी. यामध्ये सेटींग व्हायला नको. कारवाई होणार की नाही ते आधी महासभेला सांगा.

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—कार्यवाही होईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः**—सचिव साहेब, तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित राहील. दुसरा प्रश्न देखिल असाच आहे. त्याची परिस्थिती काय आहे ते सांगा. यामध्ये देखिल आपलीच स्वाक्षरी आहे. मा. सचिव साहेब यांना प्रश्नाची प्रत दयावी त्यांना प्रत मिळत नाही.

**मा. सचिवः**—प्रश्न क्र. २९० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**प्रश्न क्र. २९०ः**— प्र. क्र. १ मध्ये, १२ ओटी सेक्शन, निलेश अपार्टमेंट मागे, ए—ब्लॉक रोड, बाळकृष्ण नगर, उल्हासनगर—१ येथे डॉ. रवि शंकर श्रीवास्तव नामक व्यक्तीने सदर ठिकाणी लांबी १८ ग ६५ उंची २४ फुट ट्रेगॅटेर (लोड बेरींग) नविन बांधकाम केले आहे. सदर ठिकाणच्या नव्या बांधकामा संबंधीत विचारलेल्या खालील प्रश्नाची योग्य सुचक समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याबाबत.

प्र. १ अ) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव नामक व्यक्तीने निलेश अपार्टमेंट मागे, ए—ब्लॉक रोड, बाळकृष्ण नगर, उल्हासनगर—१ येथे लांबी १८ ग ६५ उंची २४ फुट ट्रेगॅटेर (लोड बेरींग) नविन बांधकाम अधिकृत, कायदेशीर, महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार मंजुर आराखडयानुसार परवानगी आहे का?

प्र. १ ब) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव यांचे सदर ठिकाणच्या बांधकामाच्या जागेवर मालकी आहे का?

प्र. १ क) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव यांचे सदर ठिकाणचे बांधकाम अधिकृत आहे का? नसल्यास आपण कोणत्या प्रकारची सदर बांधकामावर कारवाई केली आहे याबाबत खुलासा करावा.

उत्तरः—परवानगी घेतली नाही.
मालकी हक्काबाबत सदर विकासधारकाकडुन कागदपत्र मागणी केली आहे.
बांधकाम धारकास बांधकामाची कागदपत्र सादर करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः**—लोणारे साहेब, मी आज उघडपणे बोलतो की, अधिकारी आपणांस गांभीर्याने घेत नाही. तुम्ही प्रभारी आयुक्त आहात आपणाकडे हे सर्व दुर्लक्ष करीत आहेत. ज्यावेळी आयुक्त असतात त्यावेळी हे व्यवस्थित उत्तरे देतात. हा आपला अपमान आहे.

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)ः**—डॉ. श्रीवास्तव यांना देखिल जागा खाली करण्याची नोटीस देण्यात आली आहे. एक महिन्यापुर्वी नोटीस दिली आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः**—हे उत्तर जानेवारीमध्ये दिले आहे. त्यामध्ये आपण जानेवारी महिन्यात नोटीस दिल्याचा उल्लेख केला आहे. मग एक महिन्यापुर्वी आपण त्याला नोटीस कशी काय देणार? खोटे बोलुन आपण सभागृहाची दिशाभुल करीत आहात.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल सभागृहातुन बाहेर गेल्या.

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)ः**—ऑक्टोबरमध्ये जागा खाली करून घेण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—हे दोन्ही प्रश्न प्रलंबित ठेवावेत. आपण ऑक्टोबर महिन्यात हे प्रश्न घेवू. आपण कारवाई केल्यांनतर ते प्रश्न इथे घेवू.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी**:—मा. महापौरजी, याच संदर्भात मी बोलु इच्छितो की, काही बांधकामां संदर्भात त्वरीत कारवाई करण्यात येते. माझ्या प्रभागात लक्ष्मणदास चावला नावाचे एक वरिष्ठ नागरिक आहेत. त्यांनी ब—याच कालावधीपुर्वी टिअरगर्डरचे बांधकाम केले आहे. त्यांच्या मागे काही लोक लागले आहेत. त्यांची अवस्था कु□याप्रमाणे केली आहे. त्यांना सारखी सारखी नोटीस, निष्कासन आदेश देण्यात येत आहेत. त्यांनी ब—याच कालावधीपुर्वी स्वत:च्या कुटूंबासाठी टिअरगर्डरचे बांधकाम केले आहे. त्याचा पुरावा दिल्यानंतरही त्यांना वारंवार १५ दिवसाची, १० दिवसाची, ४ दिवसांची नोटीस देण्यात येत आहे. हे चुकीचे आहे. आणि हे एवढे स्पष्ट प्रकरण ज्यामध्ये १६० ते १६५ मीटरचे अनाधिकृत बांधकाम असताना त्यावर कारवाई होत नाही. जे टीअरगर्डरचे बांधकाम आहे त्या लोकांना का सतावले जात आहे. हे चुकीचे आहे. आजही टिअरगर्डरची किती बांधकामे सुरू आहेत. त्यांचकडे दुर्लक्ष करून फक्त लक्ष्मणदास चावला यांना लक्ष का केले जात आहे? त्यामध्ये काय आहे?

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:—ते सेटींग करण्यात यशस्वी झाले नाहीत म्हणुन त्रास दिला जात आहे. यांनी सेटींग केली आहे म्हणुन काही करत नाही.

**श्री. पी.डी. कोळेकर (उपआयुक्त अ.बा. विभाग)**:—मा. महापौर महोदया, यांच्या प्रकरणात श्री. खिलनानी यांनी तक्रार केल्यानंतर मी निर्णय दिला आहे. त्या निर्णयावर यांनी आयुक्तांकडे अपिल केले आहे. त्या अपिलाचा निर्णय अजुन झाला नाही. आम्ही त्यावर काय करणार?

<u>मा.सचिव:—</u>प्रश्न क्र. २९१ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी**:—मी सभेच्या माध्यमातुन आपणांस विनंती करतो की, लक्ष्मणदास चावला यांच्यासारख्या वरीष्ठ नागरिकाला अशाप्रकारे त्रास देण्यात येवू नये. त्यांनी त्यांच्याकडे असलेली सनद व इतर कागदपत्रे देखिल सादर केली आहेत. तर आपणांस निवेदन आहे की, त्यांचे प्रकरण योग्य असल्याने त्यावर विचार करून त्यांना न्याय दयावा. अन्यथा मला आंदोलन करावे लागेल.

<u>पश्न क्र. २९१:—</u> उल्हासनगर शहरातील खालील मोठया व्यक्तीकडुन व महापालिकेच्या कर विभागातील अधिका—याकडुन संगनमताने मागील ब—याच वर्षापासून कमी आकाराची टॅक्स बिले देऊन महापालिकेचे अर्थिक नुकसान करीत आहेत. सदरील व्यक्तीकडुन नियमानुसार टॅक्स वसूल करावा व महसूलात वाढ करावी यासाठी प्रशासनाने काय कारवाई केली?

संबंधितांकडुन तफावतीची रक्कम वसूल केली काय?

दोषी आढळलेल्या व्यक्ती व अधिका—यांवर काय कारवाई केली? या व्यतिरिक्त आणखी अशी प्रकरणे आहेत काय?

कृपया यांची चौकशी होऊन सविस्तर माहिती मिळावी.

१) सम्राट बिस्कीट २) महाराजा हॉल ३) टर्निंग पॉईंट ४) सुंदरदास बजाज ५) माया हॉटेल ६) किशोर केसवानी७) गोल्डन हाऊस

<u>उत्तर</u>:—दप्तरी नोंदणी नुसार नमुद केलेल्या व्यक्तीकडुन त्यांचे मिठकतीचे क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराची वसुली केली जाते.

सदर मालमत्ता धारकांचे मिळकतीचे क्षेत्रफळाची चौकशी करण्यासाठी संबंधीत कर निरिक्षकास आदेश दिलेले आहेत.

मिळकत धारकाचे क्षेत्रफळात तफावत आढळल्यास संबंधीतास नोटीस बजावून रक्कम वसूल केली जाईल.

दोषी आढळलेल्या व्यक्ती व अधिका—यावर कायदेशिर कारवाई करणेत येईल.

अशी प्रकरणे शोधण्यासाठी सर्वेक्षण सूरू आहे.

१. सम्राट बिस्कीट:—यांचे क्षेत्रफळात तफावत आढळलेली आहे. त्यानुसार नोटीस देण्याची कारवाई सुरू आहे.
२. महाराजा हॉल:— यांना क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराचे बिल देण्यात येत आहे.
३. टर्निग पॉइंट:—सर्वेक्षण सन २००३—२००४मध्ये झालेले आहे. त्यानुसार त्यास नोटीस देण्याची कारवाई सुरू आहे.
४. सुंदरदास बजाज:—यांना क्षेत्रफळानुसार तसेच भाडोत्री नोंदणीप्रमाणे मालमत्ता कराचे बिल देण्यात येत आहे.
५. माया हॉटेल:— यांना क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराचे बिल देण्यात येत आहे.
६. गोल्डन हाऊस:—यांना क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराचे बिल देण्यात येत आहे.
७. किशोर केसवानी:—यांना क्षेत्रफळानुसार मालमत्ता कराचे बील देण्यात येत आहे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:**—मा. महापौरजी, एक सेकंद कोळेकर साहेबांनी आता सांगितले की कुणाची तरी तक्रार आहे त्यावेळी माझे लक्ष नव्हते. जर खिलनानी असे त्यांनी सांगितले असेल तर त्याचा अर्थ आमच्या नगरसेविका मा. श्रीमती खिलनानी असा होत नाही. हा कोणीतरी मोहनदास खिलनानी आहे. तुम्ही संभ्रम करण्याचा प्रयत्न करू नका. आमचे श्री. रवि खिलनानी अथवा श्रीमती भावना खिलनानी यांची याबद्दल तक्रार नाही. मोहनदास खिलनानी यांची तक्रार आहे. तो बोगस माणुस आहे. त्याने बोगस तक्रार केली आहे. तरी कृपा करून आपण याच्याकडे लक्ष देवू नये. व वरीष्ठ नागरिकांना त्रास देण्याचा प्रयत्न करू नये.

**मा. सचिव:**—श्री. बच्चाराम रूपचंदानी आपला जो प्रश्न क्र. २८८ होता त्याबद्दल आपणांस काही विचारायचे होते ते आता आपण विचारू शकता.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:**—श्री. सुखरामाणी आपण १०.१.२००४ला माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. इंग्रजीत प्रश्न विचारला असता आपण मराठीत उत्तर दिले आहे. मला असे वाटते की एकतर आपणांस इंग्रजी येत नसेल किंवा आपण उत्तर देवू इच्छित नसाल. मी सरळ विचारले आहे की, अर्थसंकल्पात आपण जे २० रस्ते सादर केले होते. त्यापैकी कोणत्या रस्त्यांचे काम सुरू आहे त्यांची अवस्था काय आहे. आपण याला उत्तर काय दिले आहे ते जरा वाचुन बघा.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप:**—मा. महापौरजी, ही चिजवानी साहेबांप्रमाणे पध्दत झाली. प्रश्नोत्तराचा कालावधी संपविण्याचा आपला विचार आहे का? आपण लवकर उत्तर देवू शकत नाही का? उत्तर दयायला एवढा वेळ लागतो का? ही तर चिजवानीप्रमाणे पध्दत झाली. वेळ काढुन निघुन जायचे.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:**—आपण सभागृहाला काय समजता. सभागृहाचा वेळ कशाला घेता?आधी तुम्ही प्रश्न वाचा काय आहे.

**श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):**—अर्थसंकल्प पारीत करताना ठराव क्र. १०१ दि. २२.२. २००३ अन्वये २०रस्त्यांचा विकास करण्याचे ठरले होते. याबद्दल उत्तर दयावे. किती रस्त्यांचा विकास केला आहे? हा प्रश्न आपण विचारला होता. याचा अर्थ असा आहे की, किती रस्त्यांचा विकास झाला आहे? त्याचे उत्तर दिले आहे निरंक.

**मा.सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानी:**—आपण पुन्हा चुकीचे उत्तर देत आहात.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—तुम्ही विचारले आहे किती रस्त्यांचा विकास केला आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—याचा अर्थ २० रस्त्यांमध्ये आपण किती रस्ते विकसित केले आहेत?

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—विकसितचा अर्थ विकसित झालेले रस्ते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—त्यापुढे लिहिले आहे त्या रस्त्यांची माहिती दयावी.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—त्यानंतर आपण लिहिले आहे कुठली कामे प्रगतीपथावर आहेत? त्याचे आम्ही उत्तर दिले आहे प्रगतीपथावर असलेले रस्ते ३.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—आपण त्यांच्या नावाची यादी देवू शकत नाही का? आपल्याला एवढे देखिल कळत नाही का? आपण स्वत: अभियंता आहात. मी स्पष्ट विचारले आहे की रस्त्यांची नावे दयावीत. तीन रस्ते म्हणजे काय?

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—२० रस्त्यांपैकी पहिला रस्ता आहे सिरू चौक ते बसंत बहार पर्यंत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—आपण ते यामध्ये का लिहुन दिले नाही. साडेसात महिन्यानंतर तुम्ही आता येथे उत्तर देत आहात.आपणांस यामध्ये लिहुन देण्यासाठी काय अडचण होती.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—आम्ही आपणांस माहिती देवू शकतो.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी:—मग का दिले नाही?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—मी आपणांस स्पष्टपणे प्रश्न विचारला असताना आपण उत्तर का दिले नाही?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—त्यावेळचे शहर अभियंता आता येथे नाहीत. ते येथे असते तर त्यांनी उत्तर दिले असते. आम्ही त्यांच्याकडे जी टिप्पणी सादर केली होती. त्यामध्ये आम्ही सविस्तर माहिती दिली होती.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—तुम्ही तुमच्या टिप्पणीत काय लिहीले होते ते आम्हाला कसे कळेल?

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—आम्ही आपणांस आता उत्तर देत आहोत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—आता सांगता म्हणजे काय मेहरबानी करता काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय कृपा करून आपल्या अधिका—यांना निर्देश दयावेत की, महासभेच्या एक दिवस अगोदर जे प्रश्न येणार आहेत त्यांचा अभ्यास करून यावे कारण सहा—सहा महिन्यांनी येथे प्रश्न येतात त्यावर माहिती तर मिळाली पाहिजे सदस्यांना.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—अशा अधिका—यांना हटविण्यासाठी कायदयात काही तरतुद नाही का? काही काम करत नाहीत फक्त कमिशन खाण्याचे काम करतात.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>प्रत्येक बाबतीत सभागृहाची दिशाभुल करतात. पॉट होल्सच्या कामात सुध्दा दिशाभुल करतात. प्रत्येक बाबतीत फक्त दिशाभुलच करायची आहे.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>आता सविस्तर माहिती देत आहेत.

<u>मा. महापौर:—</u>लोणारे साहेब, एकतर हे अधिकारी प्रश्नाचा अभ्यास करीत नाहीत. सदस्य जे प्रश्न विचारतात त्याचे समाधानकारक उत्तर त्यांच्याकडुन मिळत नाही. किती तरी महासभांपासुन आपल्या महापालिकेत नगररचनाकार नाहीत. नगररचनाकार कामावर रूजु होत नाहीत. आता यांच्याकडुन उत्तर मागितले जात आहे तर ते समाधानकारक उत्तर देत नाहीत. आता हे नव्याने आलेले आहेत. हे काय उत्तर देणार? तर काय सदस्य वेडे आहेत का? माईक समोर असे उभे राहण्यास, आपण आयुक्त साहेबांना सांगा की असे अधिकारी येथे नको आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>महापौर महोदया, एक विनंती आहे, संत निरंकारी हॉलच्या बाजुला एका गतीरोधकाची अत्यंत आवश्यकता आहे. तेथे आपघात होत आहेत. म्हणुन महापौर महोदया आपण निर्देश दयावेत की, तेथे त्वरीत गतीरोधक बसविले जावेत.

<u>मा. सदस्य श्री. मनोज साधवानी:—</u>एक नाही, तीन—तीनची आवश्यकता आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>झुलेलाल मंदीरा शेजारी देखिल गतिरोधकाची आवश्यकता आहे. पुढील महासभेपर्यंत तेथे गतिरोधक बसविले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>मा. महापौर महोदया, गुलराज टॉवर शेजारी सुध्दा गतिरोधक बसविले पाहिजेत. तेथे रोज अपघात होतात. तेथे गतिरोधक बसविण्यास प्राधान्य दिले जावे. ही माझी आपणांस विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>कॅम्प नं. २, ओटी सेक्शन येथे सुध्दा गतिरोधकाची आवश्यकता आहे. तसेच झुलेलाल मंदिर व निरंकारी हॉल येथे सुध्दा गतिरोधकाची आवश्यकता आहे. गौशाळा रोड, कॅम्प नं. ५ श्री. किशोर वनवारी यांच्या प्रभागात सुध्दा गतिरोधकाची आवश्यकता आहे. डॉ. डोलवानी यांच्या दवाखान्यासमोर, गांधी रोड येथे तर या गतिरोधकाचे काम करावे तसेच येथे उत्तर देण्यामध्ये जे गतिरोध होत आहे तो दुर करून लवकरात लवकर उत्तर देण्याचा आपला वेग वाढवावा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, येथे काय विचार विमर्श होत आहे? गतिरोधक तयार केले पाहिजेत. कार ब्रेकर नको आहेत. ते यांना सांगा. सार्वजनिक बांधकाम विभागातील लोकांना गतीरोधक तयार करता येत नाहीत ते असे काही गतिरोधक तयार करतात की त्यामुळे मोटार गाडयांचे नुकसान होते.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>महापौर महोदया, आताच सन्माननिय सदस्यांनी जे सांगितले की, गतिरोधकांची आवश्यकता आहे. ती तर आहेच त्याचबरोबर अत्यंत खेदाने असे म्हणावे लागत आहे की, आमचे श्री. सुखरामानी येथे उभे आहेत. कॅम्प नं. ५ येथे चालीया साहेबांचा मेळा चालु आहे. पॉटहोल्सबाबत कार्यादेश झालेले असताना सुध्दा ते काम जर यावेळेस होत नसेल तर त्याचा फायदा काय? त्यांनी लेखी लिहुन दिले असतानाही पॉटहोल्सचे काम होत नाही तर गतिरोधकाचे काम काय होईल?

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—</u>मा. महापौरजी, आमच्या मा. महापौरांनी निर्देश दिल्यानंतर सुध्दा श्री. सुखरामानी साहेबांकडुन यापुर्वी काही काम झाले नाही. व यापुढे सुध्दा काही होणार नाही. मला याची सुध्दा खात्री वाटत नाही की, ते गतिरोधक तयार करून देतील म्हणुन.

<u>मा. महापौर:—</u>आता श्री. जवादे साहेबांनी तेथील कार्यभार स्विकारला आहे ना? श्री. जवादे साहेब गतिरोधकाचे काम पुर्ण करतील. त्यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला आहे.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—आम्ही आपणांस यादी देतो. अर्थसंकल्पात जी तरतुद असेल त्या हिशोबाने होईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—मी प्रश्न काय विचारला आहे. तो आपण वाचुन पहा.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—आपण कारणे विचारली आहेत ती एकेक कारणे आम्ही आपणांस देवू. आपण विचारले आहे की रस्त्याचे काम का चालु झाले नाही? त्याबाबतची उत्तरे आपणांस देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—कामे काही होत नाहीत

मा. सचिव :—प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

***आयत्त्यावेळचे दोन विषय आहेत, पहिला विषय आहे, उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील वालधुनी नाल्यावरील अर्धवट अवस्थेत असलेले काम पुर्ण करणेबाबत व दुसरा विषय आहे उल्हासनगर ३, येथील शांती नगर प्रवेशदवाराच्या बाजूला असलेल्या जागेत सुशोभिकरण करणे व दिवंगत प्राचार्य के. एम. कुंदनानी यांचा पुतळा उभारणे बाबत.***

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—पहिला जो विषय आहे वालधुनी येथील नाल्याचा मला असे म्हणायचे आहे की या कामामध्ये गुरूव्दारा येत आहे. गुरूव्दाराचे निशानसाहाब याबाबत उल्हासनगर येथील पंजाबी धर्माच्या सर्व शीख लोक आहेत त्यांच्या बरोबर बैठक घेवून त्यांनतरच हा विषय महासभेसमोर आणला जावा. तोपर्यंत महासभेत हा विषय ठेवला जावू नये.

मा. सचिव:—निशाण साहाब स्थानांतर करण्यासाठी संमती दिलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—संमती दिली आहे तर संमतीचे पत्र यथे कुठे आहे?

मा. सचिव:—आहे त्यांच्या कडे, लेखी दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—परंतु सर्वांची संमती घेतल्यानंतरच प्रस्ताव आणला जावा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—मा. महापौरजी, काय आहे की, निशाणसाहाब हटविले जाणे हा अतिशय संवेदनशील विषय आहे. व यासाठी तेथील जे स्थानिक कमिटीचे लोक आहेत. त्यांच्याशी विचार विमर्श न करता शहरातील जे शीख समाजाचे नेते मंडळी आहेत. त्यांच्याशी सल्लामसलत करूनच त्यास हात लावला तर योग्य होईल. अतिशय संवेदनाशिल मुद्दा आहे असे मला वाटते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—व निशाणसाहाब बाबत जी परवानगी घेतली आहे असे आपण म्हणता ती येथील स्थानिक पातळीवरची चालणार नाही. आकालतख्तची परवानगी आवश्यक आहे. अमृतसर येथील आकालतख्तची परवानगी आवश्यक आहे. हा विषय आणुन शहरात दंगल माजवायची आहे का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—असे विषय येथे आणले नाही पाहिजेत. अशा विषयांमुळे शहरांमध्ये दंगली माजतील. मा. महापौरांना माझे निवेदन आहे असे विषय येथे आणले नाही पाहिजेत.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—गुरूव्दाराचे जे ग्यानीजी आहेत त्यांनी आकालतख्तकडुन लेखी परवानगी आणलेली आहे. कोणत्या पध्दतीने करायचे आहे. ते तेथुन त्यांनी पुर्णपणे लिहुन आणले आहे. त्या रितीनुसारच केले जाईल.

मा. सदस्य / सदस्या श्री. अशोक ठाकुर, श्रीमती. वसीटा बेबी हे / हया सभागृहातुन बाहेर गेले / गेल्या.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आकालतख्तचे जे परिपत्रक आहे ते प्रथम येथे दया.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—आकालतख्तचेच आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—कुठे आहे ते दया इथे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः—श्री. सुखरामाणी साहेब आपणांस माहित आहे का आकालतख्त कोठे आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आकालतख्त कुठे आहे?

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—अमृतसर येथे ग्यानीजी स्वतः गेले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—त्यांनी त्यांच्याकडुन लेखी आणले आहे काय? त्याची प्रत आम्हाला दया.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—त्यांनी लेखी आणले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—दया त्याची प्रत दया.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—ती प्रत ग्यानीजींकडुन आणावी लागेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—तो पर्यंत हा विषय पुढे ढकला.

श्री. एस.बी. सुखरामानी (उप अभियंता सा.बा. विभाग):—त्यांच्याकडुन लेखी पत्र आणतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—प्रत आणा व हा विषय नियमित सभा सूचनेवर येवू दया. आयत्यावेळीचा विषय नाही , आपण दंगली माजवाल ......

मा. सदस्य श्री. संजय बठिजा सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, हा जो विषय आहे. आमचे विरोधी पक्षनेता श्री. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज म्हणत आहेत ते ही बरोबर आहे श्री. दर्शनसिंग खेमाणी बोलत आहेत ते ही बरोबर आहे. तसेच श्री. सुखरामाणी साहेब जे बोलत आहेत ते ही बरोबर आहे. परंतु आम्ही हा विषय पारीत केल्यानंतर जे राष्ट्रीय स्तरावरचे शीख समाजातील उल्हासनगरचे जे लोक आहेत. जसे की, भुल्लर महाराजजी , श्री. देवेंद्रसिंगजी यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतरच तो लागु केला जावा. येथे आज ते सांगत आहेत की त्यांनी अमृतसर येथुन परवानगी आणलेली आहे. ती यांच्यासमोर ठेवल्या नंतरच हा प्रस्ताव लागु केला जावा. अशा स्वरूपाचा ठराव पारीत करून या लोकांशी सल्लामसलत करून, कोणतेही वादग्रस्त मुद्दा उपस्थित व्हावा असे आम्हालाही वाटत नाही. तर हा जो विषय आलेला आहे.........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—नंतर नाही चालणार का? हा प्रस्ताव नियमित सभा सूचनेवर आणला जावा आणि त्यानंतर तो पारीत केला जावा. एवढी काय तातडीची बाब आहे. एवढे काय संकट आहे की आजच हा प्रस्ताव पारीत केला पाहिजे. असे काय संकट आहे जरा सांगा तर.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आमच्याकडुन हा प्रस्ताव आलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>तर राहु दया ना. आणखी काय? नियमित सभा सूचनेवर हा प्रस्ताव येवू दया. १५—२० वर्षापासुन जे काम चालु आहे त्याबाबत आजच्या सभा सूचनेवर हा विषय आणण्याची काय आवश्यकता आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>श्री. किशोर वनवारी म्हणत आहेत आमच्याकडुन हा प्रस्ताव आलेला नाही तो आयुक्तांकडुन आलेला आहे. आयुक्त तर त्यांनीच आणलेले आहेत ना? आज ते आपण जसे सांगाल तसे करतात. ते आपल्या मर्जीप्रमाणे करतात का?मनमानी करतात का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>ब—याचशा गुरूव्दारातील लोक आमच्याकडे येवून गेले त्यांनी याबाबत आमच्याकडे लेखी अर्ज केले ओहत.  हा विषय आपण नियमित सभा सूचनेवर आणलात तर त्या हरकतींच्या प्रती मी आपणांस त्यावेळी देईन.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>आपण जसे म्हणत आहात त्यास आमची काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>तर हा प्रस्ताव नियमित सभा सूचनेवर आणावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>दुसरा एक विषय आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात समितीची एक बैठक होते त्यांनतरच रस्ता, चौक यांच्या नामकरणाचा प्रस्ताव महासभेत आणला जातो. परंतु आता २३ तारखेपासुन आचारसंहिता लागणार आहे. व ही शेवटची सभा आहे तर मी एक लेखी पत्र मा. आयुक्त व श्री. सुखरामानी यांना तसेच आमचे जे नविन कार्यकारी अभियंता आहेत श्री. जवादे यांना दिले आहेत. ज्या ज्या सदस्यांचे रस्ते, चौक यांच्या नामकरणाचे प्रस्ताव राहिले आहेत. ते सर्व प्रस्ताव आजच्या या सभेपुढे आणले जावेत. परंतु यांनतर सभा होणार नाही तर याचे काय झाले त्याचा प्रथम खुलासा केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>सन्माननिय महापौर व आयुक्त साहेब एवढी काही घाई नाही. पाच वर्षापासुन आम्ही ज्या रस्ते व चौकांच्या नामकरणाचे प्रस्ताव पारीत केले आहेत आजपर्यंत त्यांनाच फलक लागले नाहीत. तर हा विषय आयत्यावेळचा विषय म्हणुन आणण्याची काय घाई आहे? हा विषय नियमित सभा सूचनेवर आणला जावा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आयत्यावेळेचा विषय म्हणुन आलाच नाही.  प्रश्नच उपस्थित होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>मी आपणांस विचारू इच्छितो की, आज नामकरण तदर्थ समितीची जी समितीची बैठक होवू शकली नाही त्याबाबतचा खुलासा आपण कराल का? याचा खुलासा श्री. सुखरामानी करतील ना? सभा का घेतली नाही हे आम्हाला विचारू तर दया. आपण जेव्हा विचारता तेव्हा आम्हाला बोलु देता का?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>मी हे बोलु दिले नाही. आपण समजला नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>या महिन्यामध्ये नामकरण तदर्थ समितीची बैठक का झाली नाही. याचा खुलासा श्री. सुखरामानी व आयुक्त साहेब करतील. श्री. सुखरामानी यांना ही बैठक आयोजित करायची होती त्यांनी ती का आयोजित केली नाही. याबाबत खुलासा आपण नाही तर ते लोक करतील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>असे विचारण्याची आपणांस पहिल्यांदाच हिंम्मत झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>नामकरणाचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत ते वाचुन दाखविले जावेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आम्ही तर हेच म्हणत आहोत की, श्री. सुखरामानी यांना विचारण्याची आपणांस पहिल्यांदाच हिंम्मत झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>आपण सुध्दा.........

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>माहित आहे त्यावेळेस काय करत होतात. शहराचे मायबाप आपणच आहात?

<u>मा. महापौर:—</u>रस्ते व चौकांना नावे देण्यासाठी नामकरण तदर्थ समितीची जी बैठक बोलावली जाते त्यावेळस मी येथे नव्हते. काही कामानिमित्त बोहर गेले होते. त्यामुळे महिनाभरात मिटिंग घेतली नाही. यामध्ये श्री. सुखरामाणी यांची काही चुक नाही. याबाबत नंतर विचार करू.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>सचिव साहेब, माझा एक हरकतीचा मुद्दा आहे. मा. महापौरांशी विचार विनिमय केल्याशिवाय एखादा विषय महासभेत चर्चेस येवु शकतो काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मी याबाबत खुलासा करू इच्छितो की, हा विषय आयत्यावेळचा म्हणुन घ्या असे मी म्हंटले नाही. जे जे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते वाचुन दाखविले जावेत. सभागृहाचे मत असेल तर ते सभेच्या कामकाजात सामावुन घेवून पारीत करावेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>सभागृहाला असे काही अधिकार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>पहिले प्रलंबित प्रस्ताव वाचु तर दया.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>मा. महापौरजी, महासभेची ही सभा चालु आहे. सभा सूचनेवर जे काही विषय असतील त्यावरच सदस्य बोलु शकतात. विषयांच्या बाहेर जावुन कोणी बोलु शकत नाही. व कुणाही अधिका—यास असे बाध्य केले जावू शकत नाही की तुम्ही याचे उत्तर दया, त्याचे उत्तर दया. अधिका—याकडुन जे उत्तर दयायचे आहे त्याबाबत आयुक्त साहेब किंवा आपणच निर्देश देवू शकता दुसरा कोणी असे सांगु शकणार नाही. प्रस्ताव वाचुन दाखवायचा किंवा नाही हे अधिकार आपले आहेत. दुसरा कुणी व्यक्ती असे सांगु शकत नाही की हे वाचुन दाखवा. व महासभेच्या सभा सूचनेवर नसलेल्या कोणत्याही विषयावर महासभेत चर्चा होऊ शकत नाही. आयुक्त साहेब या सभेचे अध्यक्ष नाहीत. सभेच्या अध्यक्षा आमच्या मा. महापौर आहेत. त्या ज्याला सांगतिल तेच बोलतील. आयुक्त साहेबांच्या निर्देशावरून कोणी बोलणार नाही. महापौर महोदया आपण सांगा की हा विषय सभेच्या कामकाजावर नाही त्यामुळे त्यावर कुणास बोलता येणार नाही.

<u>मा. महापौर:—</u>नामकरण तदर्थ समितीची बैठक बोलावली नव्हती. मी शहराबाहेर गेले होते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>सभा सूचनेवर विषय नाही, विषय नसताना कुणी का बोलावे.

<u>मा. महापौर:—</u>बोलु शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>होय, बोलु शकत नाही. मुद्दा समाप्त होतो.  आपण बसुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>श्री. सुखरामानी साहेबांनी आम्हाला सांगावे कोणता कोणता प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याबाबत सभागृह निर्णय घेईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>महापौरांनी निर्णय दिल्यानंतर कुणी बोलु शकत नाही. महापौरांनी सांगितले की सभासूचनेवर तो विषय नाही तर हा मुद्दा तेथे समाप्त होतो.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>मागील महासभेत सुध्दा महापौरांनी असेच सांगितले होते की, सभेचे कामकाज स्थगित करण्यात येत आहे. परंतु त्यानंतर सुध्दा सभेचे कामकाज चालु होते. सभागृहाचे मत घेतले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मागच्या महासभेत महापौरांनी सभेचे कामकाज तहकुब करत असल्याचा निर्णय दिल्यानंतरही सभेचे कामकाज चालविण्या बाबत सभागृहाने निर्णय घेतला होता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>मा. सचिवजी, कायदयानुसार हा प्रस्ताव घेतला जावू शकतो का? हे आपण सांगा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>ती गोष्ट वेगळी होती ही गोष्ट वेगळी आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>सभा सूचनेवरील विषयांपलिकडे जावुन चर्चा करू शकतो का?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>या प्रस्तावावर चर्चा होवूच शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>ही शेवटची महासभा आहे. यानंतर आचारसंहिता लागु होईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>आचारसंहितेची गोष्ट आज नाही. २४ तारखेनंतर लागु होईल. जो विषय सभा सूचनेवर नाही त्यावर चर्चा होवू शकत नाही. महापौरांनी सांगितले चर्चा होवू शकत नाही. तेथेच मुद्दा समाप्त होतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>श्री. सुखरामानी सांगा नामकरणाचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>सचिव साहेब कायदा काय बोलतो ते सांगा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—</u>सचिव साहेब कायदा काय बोलतो ते सांगा.

<u>मा. सचिवः—</u>मा. महापौरांच्या नियंत्रणाखाली या सभेचे कामकाज चालते. त्यांनी ठरवायचे आहे कोण बोलेल , कोण बोलणार नाही. आणि जे अधिकारी वर्ग आहेत त्यांनी सुध्दा मा. महापौरांकडुन परवानगी घेवून नंतर बोलायचे आहे. तर मा. महापौरांनी सध्या निर्देश दिले आहेत की, या विषयावर चर्चा होणार नाही.

*आयत्यावेळीचे दोन विषय होते, कृपया लक्ष दया त्यामध्ये उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील पुलाचे जे काम आहे तो विषय सर्वसंमतीने सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जाणार नाही असे सर्वांचे मत आहे. आपण सर्वजण याबाबत एकमत आहात ना? तो प्रस्ताव वगळला जात आहे. व दुसरा विषय जो आहे उल्हासनगर ३ , येथील शांती नगर प्रवेशदवाराच्या बाजूला असलेल्या जागेत सुशोभिकरण करणे व दिवंगत प्राचार्य के. एम. कुंदनानी यांचा पुतळा उभारणे बाबत हा विषय सर्वानुमते सभेच्या कामकाजात सामावुन घ्यायचा आहे.*

*<u>मा. महापौरः-</u>सर्वानुमते आयत्यावेळचा १ला विषय वगळण्यांत येत आहे व जो आयत्यावेळचा दुसरा विषय आहे त्याचा सभेच्या कामकाजात समावेश करण्यात येत आहे.*

<u>मा. सचिवः—</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

*<u>विषय क्र.२:-</u>मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०७/२००४ (त्यात दिनांक २६/०७/२००४) व दिनांक ७.८.२००४ चे इतिवृत्त कायम करणे.*

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः—</u>मा. महापौरजी, १९.७.२००४ला जी महासभा झाली होती त्यामध्ये मा. सदस्य श्री. नाना पवार यांचा २७८ व्या क्रमांकाचा जो प्रश्न होता. हा २७८ वा प्रश्न त्यावेळेस सभा स्थगित झाल्यामुळे थांबविला होता त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की या प्रश्नावर पुढच्या वेळेस चर्चा करू. आणि आज या प्रश्नावर चर्चा झालेली नाही. मी महापौरांना विनंती करेन की, पुढच्या महासभेत हा प्रश्न चर्चेस घेतला जावा.

<u>मा. सचिव:—</u>पुढील महासभेत मा. आयुक्तांच्या उपस्थितीत याबाबत निर्णय घेतला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>मागच्या वेळी जी सभा झाली त्या सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर २६ तारखेला सभा झाली.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. २७८ बाबत मा. महापौरांनी निर्देश दयायचे होते त्याबाबत आपण म्हणत आहात ना?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>होय. तो पुढील महासभेत घेतला जावा.

<u>मा. सचिव:—</u>इतिवृत्त कायम?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मागील महासभेत आयुक्त साहेबांनी सांगितले होते, आम्ही सांगितले होते की, घरपट्टीचे जे दर महासभेने रद्द केले आहे ते रद्दच राहतील. जुन्या दराने मिळकत कराची देयके जातील मी अशाप्रकारची हरकत घेतली होती. मी असे म्हंटले होते की, ज्या लोकांना नविन दराने मिळकत कराची देयके पाठविली आहेत. त्यांना आता जुन्या दरानेच मिळकत कराची देयके जातील. याबाबत आयुक्तांनी जर कार्यवाही केली नाही आणि याविरूध्द जर त्यांनी शासनाकडे पत्रव्यवहार केला तर आम्ही महासभेत याबाबत ठराव करत राहु असे मी म्हंटले होते.

<u>मा. सचिव:—</u>ते वाक्य जोडायचे आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>होय. वाक्य जोडायचे आहे.

<u>मा. सचिव:—</u>कुणाची काही हरकत नाही ना? ठिक आहे?

***<u>मा. महापौरः-</u> मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेले वाक्य नसेल तर सुधारणा करून सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०७/२००४ (त्यात दिनांक २६/०७/२००४) व दिनांक ७८.२००४ चे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यात येत आहे.***

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ३:—</u> महापालिका कर्मचा—यांना महागाई भत्यातील मुळवेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मुळवेतनामध्ये विलीन करण्याकामी मंजुरी देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>हा विषय पारीत केला जावा.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. ३:—</u> महापालिका कर्मचा—यांना महागाई भत्यातील मुळवेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मुळवेतनामध्ये विलीन करण्याकामी मंजुरी देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका कर्मचा–यांना राज्य शासकीय कर्मचा–यांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात येतात. त्यानुषंगाने सध्या कार्यरत कर्मचा–यांना मूळ वेतनावर ६१ टक्के महागाई भत्ता मिळत आहे. आता राज्य शासनाने उपरोक्त शासन निर्णय क्रमांक १ नुसार दिनांक १.८.२००४ पासून पात्र कर्मचा–यांना त्यांच्या मुळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता त्यांच्या मूळ वेतनामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे तसेच कर्मचा–यांना अनुज्ञेय असलेल्या इतर भत्यांची परिगणना मुळ वेतन व त्यात समाविष्ट करण्यात आलेल्या महागाई भत्ता या दोन्हींवर करावयाची आहे.

२)शासन निर्णय क्रमांक २ नुसार सेवा निवृत्ती धारकांना सुध्दा १ ऑगस्ट, २००४ पासून विदयमान निवृत्ती वेतनाच्या ५० टक्के एवढया महागाई भत्याचे विलिनीकरण निवृत्तीवेतनात करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

वरील बाबी लक्षात घेता, सदरचे शासन निर्णय महापालिका कर्मचा–यांना व सेवा निवृत्ती वेतन धारकांना १ ऑगस्ट २००४ पासून लागु केल्याने महापालिकेवर अंदाजे २० ते २५ लाख एवढा अतिरिक्त आर्थिक बोजा पडण्याची शक्यता असून त्यासाठी सुधारित अंदाजपत्रकात तशी तरतुद करावी लागणार आहे.

वरील शासकीय धोरणानुसार महागाई भत्यांतील मूळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. महासभेची मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव कृ. २९ दिनांकः–१९/८/२००४.

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेतील पात्र कर्मचा–यांना दि. १.८.२००४ पासुन महागाई भत्यातील मुळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मुळ वेतनामध्ये विलीन करण्यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ४:—** श्री. आर. सी. इदनानी, सहाय्यक अभियंता यांच्या दि. २८.६.२००४ ते १९.७.२००४ या कालावधीतील महापालिका सेवेत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे

श्री. आर. सी. इदनानी हे सध्या येथे कार्यरत नाहीत. काही कालावधीसाठी ते येथे कार्यरत होते. ते या महापालिकेत जेवढया कालावधीसाठी होते तेवढया कालावधीसाठीची मंजुरी दयायची आहे.

**काही सदस्य :—**पास. पास.

**मा. महापौर:—**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**विषय क्र. ४:—** श्री. आर. सी. इदनानी, सहाय्यक अभियंता यांच्या दि. २८.६.२००४ ते १९.७.२००४ या कालावधीतील महापालिका सेवेत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे

**प्रस्तावना:—**

मुख्य अभियंता,(को.वि.),मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/प्र.क्र.३७६/आस्था/२ १७६५,दि.१४.०६.०४ अन्वये श्री.आर.सी.इदनानी, यांची सहाय्यक अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री.आर.सी.इदनानी, हे या महानगरपालिकेत सहाय्यक अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.२८.०६.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत . परंतू श्री.आर.सी.इदनानी, सहाय्यक अभियंता यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत उप अभियंता या पदावर बढती मिळाल्याने त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून दिनांक १९.७.०४ मध्यान्होत्तर त्यांचे मूळ विभागात (महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात ) हजर होण्यासाठी कार्यमुक्त केले आहे.

तरी श्री. आर.सी.इदनानी, सहाय्यक अभियंता यांच्या दि.२८.६.०४ ते १९.७.०४ या कालावधीतील महापालिकेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या नेमणुकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र :— ३० दिनांक:—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. आर. सी. इदनानी सहाय्यक अभियंता यांच्या दि. २८.६.०४ ते दि. १९.७.०४ या कालावधीतील महापालिका सेवेत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र.५:—</u> श्री. संजय युवराज पवार, यांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर त्याचे पुढील ६ महिन्या करिता नेमणुकीचे नविनीकरणास मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र. 5:-</u>** श्री. संजय युवराज पवार, यांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर त्याचे पुढील ६ महिन्या करिता नेमणुकीचे नविनीकरणास मान्यता देणे.

**<u>प्रस्तावनाः-</u>**

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची एकुण २६ पदे मंजुर आहेत. सेवाभरती नियमाप्रमाणे सरळसेवेने १९ पदे व पदोन्नतीने ७ पदे भरावयाची आहेत. सरळसेवेने भरावयाच्या १९ पदांपैकी १० पदे आरक्षणाची व ९ पदे खुल्या प्रवर्गासाठी आहेत. सध्या महापालिकेतील एकुण मंजुर २६ पदांपैकी १४ पदे कार्यरत आहेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासनाच्या विविध नागरी सुविधा विषयक योजना राबविल्या जातात त्यासाठी उपलब्ध कर्मचारी वर्ग अपुरा पडत असून त्याचा परिणाम सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाजावर होत आहे. ही बाब विचारात घेऊन श्री.संजय युवराज पवार, प्रकल्पग्रस्त उमेदवार हे कनिष्ठ अभियंता या पदाची सेवा भरती नियमावलीतील अर्हता धारण करत असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/४७० दि. २७/२/२००४ अन्वये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर ६ महिन्यांच्या कालावधीसाठी रु ४५००—१२५—७००० या वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात आली होती. शासनाचे दि ३ जानेवारी १९९७ च्या परिपत्रकामध्ये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना वर्ग क व ड सवंर्गात परस्पर नियुक्ती देताना एकुण संवर्गबळाच्या ५ % इतकी पदे भरता येतील असे निर्देश दिलेले आहेत.

सदर शासन परिपत्रकातील तरतुदींच्या अनुषंगाने श्री. संजय युवराज पवार यांच्या सेवेचा ६ महिन्याचा कालावधी दि २६/८/२००४ राजी संपुष्टात येत असल्याने व त्यांनी ६ महिन्याच्या कालावधीमध्ये समाधानकारक काम केले असल्याने कामाची निकड हा निकष लक्षात घेऊन, त्यांना रु ४५००—१२५—७००० या वेतनश्रेणीत मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती करण्याकरीता मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>महासभा ठराव क्र.</u>** 31 **<u>दिनांकः-19/8/2004.</u>**

सुचकाचे नाव :— श्रीमती कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. संजय युवराज पवार यांना महापालिका सेवेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर त्याचे पुढील ६ महिन्याकरिता नेमणुकीचे नविनीकरणास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ६:—** जिल्हा परिषद ठाणे येथील श्रीमती लता बी. पाटील व इतर ४ प्राथमिक शिक्षकांची उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात एकतर्फी बदली कामी शिक्षण मंडळाचे ठराव कायम करणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**विषय क्र. ६:—** जिल्हा परिषद ठाणे येथील श्रीमती लता बी. पाटील व इतर ४ प्राथमिक शिक्षकांची उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात एकतर्फी बदली कामी शिक्षण मंडळाचे ठराव कायम करणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रात एकूण २८ प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी ९ मराठी माध्यमाच्या शाळा आहेत सदर शाळामधील वाढती पटसंख्या पहाता मराठी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांची कमतरता लक्षात घेता शिक्षण मंडळाने जिल्हा परिषद ठाणे येथील एकूण ५ प्राथमिक शिक्षकांची एकतर्फी बदलीस खालील नमुद केलेले ठराव पारित केलेले आहेत.

| अ.क्र. | ठराव क्र. | दिनांक | एकतर्फी बदली झालेल्या शिक्षकांची नावे |
|---|---|---|---|
| १. | ४४ | १५/७/०३ | श्रीम. लता बी. पाटील |
| २. | ४५ | १५/७/०३ | श्रीम. वनिता एस. सोनावणे |
| ३. | ६० | २१/१०/०३ | श्रीम. जयश्री जयवंत दवणे |
| ४. | ६० | २१/१०/०३ | श्रीम. सुमित्रा बळराम जाधव |
| ५. | ६० | २१/१०/०३ | श्रीम. सविता राजाराम घरत |

वरिल ठरावानुसार पंचायत समिती , अंबरनाथने सदर प्राथमिक शिक्षकांना दि. १/७/२००४ रोजी कार्यमुक्त केलेले आहे. त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेत दि. १/७/२००४ रोजी शिक्षण मंडळात महापालिकेच्या मान्यतेस अधिन राहुन रूजू करून घेतले आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधिल नियम ४० अन्वये शिक्षण मंडळाने पारित केलेल्या ठरावास महासभेच्या मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र :— ३२** **दिनांक:—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :– श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती लता बी. पाटील व इतर ४ प्राथमिक शिक्षकांची उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात एकतर्फी बदली कामी शिक्षण मंडळाचा ठराव कायम करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :–विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ७:– महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्लॉट क्र १२९, चालता नं ३, शिट नं १३, कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः– मा. महापौर महोदया, हा प्रस्ताव आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत यावा. असे किती तरी प्रकरणे आहेत. ज्या ज्या कुणाचे आहेत त्या सर्वांना विचारून ती सर्व प्रकरणे एकत्रितरित्या आणली जावीत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः–हा एकच प्रस्ताव खास करून कसा आला?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः– हा एकच प्रस्ताव खास करून कसा आला? हा प्रस्ताव वगळण्यांत यावा.

मा. सचिव :–प्रस्ताव वगळण्यांत यावा? सर्वसंमतीने?

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. मनोज साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. महापौरः–सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

विषय क्र. ७:– महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्लॉट क्र १२९, चालता नं ३, शिट नं १३, कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे

मा. सचिव :–विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ८:– कैवल्यधाम लोणावळा या संस्थेच्या योगविद्या प्रशिक्षणास महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना भाग घेण्याची सवलत शासन निर्णया प्रमाणे लागु करणेस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

**मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे व श्री. वाघे शामु सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. ८:—</u> कैवल्यधाम लोणावळा या संस्थेच्या योगविद्या प्रशिक्षणास महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना भाग घेण्याची सवलत शासन निर्णया प्रमाणे लागु करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा २४०४/२/सेवा—८ मंत्रालय, मुंबई—३२, दि. ०३ फेब्रुवारी, २००४ चे पत्र सोबत जोडले आहे.

उक्त शासन निर्णयान्वये राज्य शासनाने कैवल्यधाम, लोणावळा या संस्थेतर्फे घेण्यात येणा—या योग विद्या प्रशिक्षण शिबिरात भाग घेणा—या राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पुढीलप्रमाणे सवलती लागु केल्या आहेत.

अ) कैवल्यधाम, लोणावळा या संस्थेतर्फे घेण्यात येणारे योगविद्या प्रशिक्षणाच्या दहा दिवसांच्या शिबिरात प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळविला आहे. अशा राज्य शासकीय अधिकारी / कर्मचा—याने मागणी केल्यास त्यास, वैद्यकिय प्रमाणपत्र सादर न करता एकावेळी कमाल १४ दिवस इतकी परिवर्तीत रजा मंजुर करता येईल.

ब) वरील प्रयोजनासाठी परिवर्तीत रजा आवश्यकतेनुसार तीन वर्षातुन एकदा व संपुर्ण सेवा कालावधीमध्ये कमाल सहा वेळा याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

क) संबंधित कर्मचा—याने रजेचे आवेदनपत्र प्रशिक्षणाच्या प्रवेशपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह सादर करणे तसेच रजेवरून परत आल्यानंतर प्रशिक्षण पुर्ण केल्याचे संबंधित प्रशिक्षण केंद्राचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ड) या प्रशिक्षणासाठीचा अपेक्षित खर्च संबंधित कर्मचा—याने स्वतः सोसावयाचा आहे.

इ) सदर सवलत हक्क म्हणुन मागता येणार नाही.

सदर शासन निर्णयाप्रमाणे कैवल्यधाम, लोणावळा या संस्थेच्या योग विद्या प्रशिक्षणात महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांना भाग घेण्याची सवलत लागु करण्यात यावी. सदर प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव कृ. ३३ दिनांकः—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासन निर्णयाअन्वये कैवल्यधाम लोणावळा या संस्थेतर्फे घेण्यात येणा—या योग विद्या प्रशिक्षण शिबिरात भाग घेणा—या महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी उक्त सवलती लागू करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ९:— विशेष महसूल समितीची रचना करणे.

या समितीसाठी ९ सन्माननिय सदस्यांची नावे प्रस्तावित करण्यात आली आहेत. सन्माननिय सदस्यांची नावे या क्रमाने आहेत,

१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२. श्री. जाधव प्रशांत
३. श्री. बठीजा संजय
४. श्री. रामरख्यानी मोहनदास
५. श्री. जेसवानी सतरामदास
६. श्री. पंजाबी नारायण
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
९. श्री. लालवानी दिलीप

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब हा प्रस्ताव प्रशासनाने आणला आहे. सचिव साहेब प्रशासनाचा प्रस्ताव आहे. प्रशासनाला काय आवश्यकता भासली की अशाप्रकारची महसुल समिती स्थापन करावी. प्रशासन सक्षम नाही का? हा महापालिका सचिवांनी आणलेला प्रस्ताव आहे.

मा. सचिव:—हा प्रशासनाचा प्रस्ताव नाही हा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे कलम ३० नुसार मागील वेळेस विशेष महसुल समितीची जी रचना केली होती तीचा कार्यकाल समाप्त होत आहे. व जसेही तिचा कार्यकाल आज समाप्त होत आहे त्यामुळे मा. महापौरांच्या वतीने विषय आणला जातो व मा. महापौरांकडुन जेव्हा विषय आणला जातो तेव्हा तो सचिव कार्यालयाकडुन येतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—परंतु विषय क्र. १३ चा जो विषय आहे त्याबाबत शासनाने जो स्थगिती आदेश पाठविला आहे तो बरोबर आहे असे प्रशासनाचे मत आहे. जो ठराव विखंडीत केला आहे तो बरोबर आहे. एकाबाजुला ज्या समित्या गठीत केल्या आहेत त्या बरोबर आहेत. त्यावर शासनाने स्थगिती आदेश दिला आहे. तो स्थगिती आदेश बरोबर आहे असे प्रशासनाचे किंवा आयुक्तांचे मत आहे. आणि दुस—या बाजुला आपण एक अतिरिक्त समिती गठीत करण्याचा प्रस्ताव आणता. हे कुठपर्यंत योग्य आहे?

मा. सचिव:—शासनाकडुन कुठलाही स्थगिती आदेश नाही. त्यांच्याकडे एक प्रस्ताव पाठविला होता की, ज्या ज्या समित्या आहेत त्यांच्याकडे काही कामकाज नाही. म्हणुन त्या समित्या ठेवणे उचित नाही. म्हणुन त्या समित्यांच्या सभापतींना जो वाहनभत्ता उपलब्ध करून दिला जातो. तो रद्द केला जावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—या समितीच्या सभापतींना वाहन भत्ता दिला जात नाही का?

मा. सचिव:—दिला जातो ना?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>प्रशासनाने हा प्रस्ताव आणताना मागच्या वर्षी ही जी समिती होती त्या समितीने केलेल्या कामाचा काही आढावा दिला आहे का, परिणाम काय झाला? समिती स्थापन केल्यानंतर उल्हासनगर महानगरपालिकेला फायदा काय झाला? व त्यामुळे महापालिका प्रशासनाने आजच्या सभा सूचनेवर हा प्रस्ताव आणला. जकातीचे उत्पन्न वाढले? समितीच्या किती बैठका झाल्या त्याचे जरा विवरण दया. या संपुर्ण वर्षामध्ये या समितीच्या एवढया एवढया बैठका झाल्या आहेत व त्यामुळे जकातीच्या उत्पन्नात वाढ झाली. शहराच्या उत्पन्नात वाढ झाली. कोणकोणत्या गोष्टीत वाढ झाली ते जरा सांगा म्हणजे आम्ही त्यावर विचार करू. सचिव साहेब किती बैठका झाल्या? त्यामध्ये काय निर्णय झाले? कुठली पध्दती अवलंबिली? कोणते धोरणात्मक निर्णय घेतले? ज्यामुळे प्रशासनाला या समितीची निकड लागली. आजच समितीची मुदत संपल्यानंतर लगेच ती स्थापन झाली पाहिजे. मागच्या वर्षी शिक्षण समितीची मुदत संपल्यानंतर त्या समितीची स्थापना लगेच झाली नाही.

<u>मा. सचिव:—</u>झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>आता झाली? मध्ये वेळ होता की नाही?ब—याच समित्या तीन—चार महिन्यांनंतर आपण स्थापन केल्या या समितीस लगेच पुर्नजिवीत करण्याची प्रशासनाला गरज का भासली? आता पर्यंत बैठका किती झाल्या, त्यामध्ये कुठले ठराव पारीत झाले, किती झाले त्याची विस्तृत माहिती दिली असती की यामुळे आम्हाला प्रशासनाला हा अडथळा पडतो की, याच्यामुळे अडचण होते आहे. आणि त्यामुळे या समितीची आवश्यकता आहे.

<u>मा. सचिव:—</u>या समितीची एक सुध्दा बैठक घेतली नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u> तरीही लेखी प्रस्ताव आला आहे.

<u>मा. सचिव:—</u>त्याची काही कारणेही आहेत. कारण की आमची जी नियमावली आहे. त्यामध्ये आठ समित्यांची तरतुद आहे. व ही नवी समिती गठीत केली होती. व ती पहिल्यांदाच गठीत केली होती. व जेव्हा ती गठीत केली होती त्यावेळेस या ठरावामध्ये हे सुध्दा स्पष्ट केले होते की या समितीचे कामकाज काय असेल व अधिकार काय असतील ते मा. आयुक्त साहेब निर्धारीत करतील. माझ्या मते या समितीचे कामकाज व अधिकार अद्याप निर्धारीत झालेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>या समितीचे कामकाज निर्धारित केलेले नाही. आता सुध्दा निर्धारित केलेले नाही. एक वर्षापासुन निर्धारीत केलेले नाही. आणि आज सभेमध्ये प्रस्ताव आणण्याचे कारण काय होते?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>वर्षभर या समितीवर किती खर्च झाला?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>पहिले कामकाज काही झाले नाही परंतु खर्च किती झाला?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>या समितीवर एकुण किती खर्च झाला? एकही ठराव पारीत झाला नाही. या समितीची नियमावली सुध्दा अदयाप तयार झाली नाही. परंतु या समितीवर खर्च किती झाला ते जरा सांगा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सचिव:—</u>खर्चाचे विवरण माझ्याकडे नाही. याबाबतीत लेखा विभागाचे अधिकारी आपणांस सांगु शकतील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>या ज्या विशेष समित्या गठीत केल्या जातात. आठ अधिक एक नऊ, मी यापुर्वी सुध्दा म्हंटले आहे व सरकारकडे लेखी निवेदन केले आहे याबाबत हरकती घेतलेल्या आहेत या समित्यांच्या सभापतींना वाहन भत्याची रक्कम अदा करू नये. आमचा असा उघड आरोप आहे की कोणतीही समिती काहीही काम करत नाही. सचिव साहेबांनी सांगितले की विशेष महसुल समितीची वर्षभरात एक सुध्दा बैठक झाली नाही. त्यानंतरही प्रशासनाकडुन या समितीचे गठन करण्यासाठी प्रस्ताव येतो. म्हणुन आमचा हा स्पष्ट आरोप आहे की,

प्रशासन व सत्ताधारी पक्ष यांच्या मध्ये मिलीभगत आहे. व हे जे प्रस्ताव येतात ते समित्यांना खुश करण्यासाठी, पैसा देण्यासाठी, **त्यांच्या घरचा खर्च चालविण्यासाठी** महापालिकेचा पैसा व्यर्थ घालविला जातो. यासर्व समित्या व सभापती शहरावर व महापालिकेवर ओझे आहेत यासाठी आम्ही या प्रस्तावाचा उघडपणे विरोध करत आहोत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा.महापौरजी, सर्व प्रथम मी हा खुलासा करू इच्छितो की, नवी मुंबई येथील जे अधिकारी आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी आले होते त्यांनी आम्हास असे उघड सांगितले होते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशी स्पष्टपणे तरतुद आहे. आपण कितीही समित्या स्थापन करू शकता. कदाचित त्यावेळेस आमचे काही सदस्य उपस्थित नव्हते. राहीला प्रश्न दुसरा आम्ही सभापतींना कुणालाही वाहनभत्ता देतो तो त्यांना खुश करण्यासाठी **त्यांचे घर चालविण्यासाठी** ही पध्दती १९९७ पासुन शिवसेना भाजपाच्या कार्यकालावधीपासुन सुरू झाली ती आता चालत आली आहे. तिसरे असे की, आज जो वाहनभत्ता मिळतो त्याबाबत खरे तर मी बोलावयास नको होते परंतु मला बोलण्यास मजबुर केले जात आहे. विरोधी पक्षनेता सुध्दा प्रत्येक महिन्यास वाहनभत्ता घेत आले आहेत. जे मागच्या वर्षी विरोधी पक्षनेता होते, आजही जे आहेत वया अगोदर सुध्दा जे होते. **ते लोक सुध्दा घर चालविण्यासाठी** खुश होण्यासाठी वाहनभत्ता घेत आहेत. तर सभागृहात असे आरोप लावण्या अगोदर आपण विचार केला पाहिजे की १९९७ मध्ये शिवसेना—भाजपाच्या कालावधीत ही पध्दत चालु केली. आता तर महाराष्ट्र  शासनाने सुध्दा अधिका—यांना वाहनभत्ता देण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या सभा सूचनेवर हा विषय आहे. आज जर महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता यांनी वाहनभत्या ऐवजी गाडीची मागणी केली तर १५ हजारा ऐवजी ६० हजार रूपये खर्च येईल. ड्रायव्हरचा खर्च, पेट्रोलचा खर्च, गाडीचा देखभाल व दुरूस्तीचा खर्च विचारात घेतला तर मोठया प्रमाणावर खर्च होतो म्हणुन आज शासनाला सुध्दा असे वाटते की, खाजगी व्यक्तीने स्वत: गाडी खरेदी करावी. सर्व कामांचे खाजगीकरण केले जात आहे. तर १९९७—९८मध्ये शिवसेना भाजपाने ही जी वाहनभत्याची पध्दत चालु केली होती. त्यावेळेस श्री. लाल पंजाबी सदस्य होते किंवा नाही हे मला आठवत नाही. विशेष महसुल समितीची जी सभा आहे. तीचे कार्यक्षेत्र निश्चित न झाल्यामुळे आजपर्यंत झाली नाही. जकात वसुलीचे खाजगीकरण झाल्यामुळे आमचे त्यावर नियंत्रण नव्हते. आज जेव्हापासुन जकात वसुलीचे काम महापालिका चालवत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने असा निर्णय घेतला की यावर्षी व्यापा—यांना सवलतीचे व्हावे. जकात वसुलीचे खाजगीकरण बंद करून महानगरपालिकेने स्वत: जकात वसुलीचे काम करावे व महसुल समिती केवळ जकातीसाठी नाही टॅक्ससाठी सुध्दा आहे. व उत्पन्नाचे जेवढे काही मार्ग आहेत. त्याच्याशी संबंधित आहे. तर मेहरबानी करून जसे या समितीबाबत तरतुद आहे. ते लक्षात घेता हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करू. तसेच मुख्य लेखा परिक्षकांचा वाहनभत्याबाबतचा अहवाल आला आहे. व त्यामध्ये असे लिहिले आहे की, याबाबतचा महासभेत ठराव पारीत करून पाठवा. कारण की १९९७—९८मध्ये याबाबत जो ठराव झाला होता तो स्थायी समितीमध्ये झाला होता. हा ठराव महासभेत पारीत झाल्यानंतर महापौर , उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, व सर्व सभापतींना वाहनभत्ता मिळणे सुरू होईल तर मेहरबानी करून हा जो विषय आहे त्यावर पक्षीय राजकारण बाजुला सारून आपण पहिल्यापासुन ठरावाची जी अंमलबजावणी करत आलो आहोत. काही दिवसापुर्वी आपण सत्तेमध्ये होतात. आज आम्ही सत्तेत आहोत. तर मेहरबानी करून हा मुद्दा जास्त न वाढविता सर्व संमतीने पारीत केला जावा. आरोप प्रत्यारोप, उत्तरावर उत्तर न करता सर्वसंमतीने प्रस्ताव पारीत केला जावा. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे**:—आमची भुमिका श्री. लाल पंजाबी यांनी मांडली आहे. श्री. वनवारी साहेब सांगितले की, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती, यांच्यासाठी याअगोदर कधी विरोध केला नाही. परंतु यास विरोध यासाठी आहे की, पहिले आठ समित्या होत्या. त्यानंतर चार प्रभाग समित्या होत्या. ८ अधिक ४ बारा व एक महसुल समिती एकुण १३ समित्या आहेत. प्रशासन सुध्दा म्हणते श्री. पोखरकर साहेबांनी जो अहवाल पाठविला होता. त्यामध्ये त्यांनी पुर्ण विवरण दिले होते. श्री. लाल पंजाबी साहेबांकडे सुध्दा सर्व समित्यांच्या सभांचे विवरण आहे. एक या दोन समिती व्यतिरिक्त दुसरे काही कामकाज नाही. आमचे आयुक्त साहेबांनी महासभेत म्हंटले की उल्हासनगरमध्ये काहीही होवू शकते. मागच्यावेळेस आपणांस हे चुकीचे वाटले होते परंतु आयुक्तांच्या दृष्टीकोनातुन जर असे असेल तर त्यास जबाबदार आयुक्तच आहेत. शासन व प्रशासन जर सकारात्मकदृष्टीकोन ठेवत असतील तर येथील लोकांना सुध्दा ती सवय लागते. जिथे कायदयाचा अभाव आहे. तर प्रशासन लोकांकडुन कूठल्या अपेक्षा करणार आहेत? कायदा बनविणारे, बनविल्यानंतर तो सक्षमपणे वापरणारे अधिकारी, प्रशासन याठिकाणी असले पाहिजे. परंतु या ठिकाणी कायदयाचा अभावच आहे तो प्रशासन व शासनकर्ते यांच्यामध्ये चाललेला आहे. लोकांच्या पैशाची उधळपट्टी झाली नाही पाहिजे. ज्या समितीची वर्षभरात एकही बैठक झाली नाही.त्याच्यातुन कुठलेही उत्पन्न

झाले नाही. जी मागच्यावर्षी परिस्थिती होती तीच यावर्षी आता असताना महसुल समिती स्थापन करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव आणला आहे. हा चुकीचा आहे. अगोदरच्या समित्यांचे जे कामकाज चालु आहे. जसे परवा महिला बालविकास समितीने शिलाई मशिनचे वाटप केले आहे. त्यांच्या माध्यमातुन काम चालु आहे. पाणी पुरवठा, आरोग्य समितीचे सभापती काम करत आहेत. अशा समित्यांना आमचा विरोध नाही व नव्हता. ते काम करत असतील तर परंतु काम करत नसताना श्री. लाल पंजाबी यांचे जे म्हणणे होते की, फक्त वाहनभत्ता देण्यासाठी जी समिती स्थापन केली जाते त्या समितीच्या स्थापनेचा उद्‌देश हाच आहे. मागच्या वर्षी या समितीचा जो उद्‌देश होता तो सफल करू शकला नाहीत. त्या समितीचे कुठलेच कामकाज झालेले नाही. अजुन त्याचे नियम बनविले नाहीत असे सचिव साहेबांनी सांगितले तरी पण तुम्ही ही समिती स्थापन करण्यासाठी प्रस्ताव दिलात त्यामागे एकच उद्‌देश आहे की कोणत्या तरी नगरसेवकाला त्याठिकाणी सभापती म्हणुन बसवावे. हा जो शासनकर्ते आणि प्रशासनकर्ते यांचा जो डाव आहे. यासाठी आमचा विरोध आहे.

**<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—</u>**मा. महापौरजी, मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, आपल्या कार्यकालावधीत कुमारी साहेबांकडे हजारो लोक महसुल समितीशी संबंधित आपल्या समस्या घेवून येत असत. कुमारी साहेबांकडे आपल्या कार्यालयात बसुन त्यांची सोडवणुक केली आहे. भलेही बैठक औपचारीकपणे घेतली गेली आहे किंवा नाही. परंतु त्यांनी लोकांच्या समस्यांचे निराकरण जरूर केले आहे. असे मी सांगु इच्छितो, धन्यवाद.

**<u>मा. सचिव:—</u>**सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी म्हंटले की, या समितीसाठी नियमावली तयार केली नाही. मी असे म्हंटले की, समितीचे जे कामकाज काय असेल व अधिकार काय असतील यासंबंधी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९चे कलम ३० अन्वये महासभा ते ठरवुन ठराव करते. मागच्या वेळेस काय झाले होते, आम्ही ठराव तर केला होता परंतु कामकाज व अधिकार निश्चित करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांना प्राधिकृत केले होते. नियमावली नाही. हे म्हणणे चुकीचे आहे.

**<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—</u>**मा. महापौरजी व सभागृहात उपस्थित असलेले सर्व माझे सहयोगी आज या
✂ प्रस्तावाबाबत सभागृहात जी चर्चा चालु आहे. महसुल समितीची जी रचना होत आहे. त्याबाबत माझे बंधु सभागृहाचे वरीष्ठ नगरसेवक श्री. लाल पंजाबी साहेब यांच्याकडे आम्ही आदराने पाहतो. या सभागृहात ते जे चर्चा करतात ती चर्चा मी लक्षपुर्वक ऐकतो. व त्यातुन काही शिकण्याचा प्रयत्नही करतो. श्री.बोडारे साहेब असोत किंवा श्री.पंजाबी साहेब असोत. जे काही विरोधी पक्षातील वरीष्ठ नेते मंडळी आहेत. परंतु आज सभागृहामध्ये पंजाबी साहेबांनी जे वक्तव्य केले आहे. त्याने मला अतिशय दु:ख झाले आहे. एकीकडे पाहीले तर त्यांनी आपल्या वक्तव्याने त्यांनी जे मत व्यक्त केले आहे की, महसुल समितीची जी रचना केली जाते. ती सदस्यांना खुश करण्यासाठी व **त्यांच्या घरचा खर्च चालविण्या<u>साठी या समितीची रचना केली</u>** जात आहे. मला असे वाटते की, सदस्यांच्या **घरचा खर्च**
✂ **<u>चालविण्यासाठी समितीची रचना केली</u>** जात आहे हे वक्तव्य सभागृहातील सदस्यांची अवमानता आहे. व पंजाबी साहेबांसारखे नेत्याच्या तोंडुन अशा प्रकारचे वक्तव्य येणे हे वादग्रस्त आहे. मला असे वाटते की, सत्ताधारी पक्षातील जेवढे काही सदस्य या समितीमध्ये आहेत. त्यांनी हा प्रस्ताव तोपर्यंत पारीत होवू देवू नये. जोपर्यंत श्री. लाल पंजाबी साहेब आपले हे शब्द मागे घेत नाहीत.

**<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>**नका पारित करू. नका पारित करू. चांगली गोष्ट आहे.

**<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—</u>**आपल्या वक्तव्याने पुर्ण सभागृहाची अवमानता झाली आहे. सर्व सदस्यांना आपण अपमानीत केले आहे. आज जर सत्ताधारी पक्ष याबाजुला आहे. उदया आपण त्याबाजुला म्हणजे सत्ताधारी पक्षात बसु शकता. आपण आम्हाला ही संधी देत आहात उदया आम्ही असेच वक्तव्य आपल्याबाबत करू शकतो. व आपल्या सारख्या वरीष्ठ नगरसेवकांकडुन वक्तव्य येईल याचा मी कधी विचारच करू शकत नव्हतो. म्हणुन माझी आपणांस विनंती आहे की आपण आपले शब्द मागे घ्यावेत.

**<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>**माझ्या बोलण्याचा उद्‌देश हा होता की ही समिती स्थापन करण्याचा उद्‌देश हाच आहे की, एखादया सदस्याचे पुर्नवसन करायचे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—कुमारी साहेब ही काय व्यक्ती एवढया खालच्या स्तरावरची आहे? की त्यांना आपला घर खर्च चालविण्यासाठी या समितीचे सभापती पद घ्यावे लागेल?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:—महापौरजी, येथे एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की, श्री. लाल पंजाबी साहेबांना सभापती पद मिळाले नाही. म्हणुन ते दुस—यांसाठी असे बोलत आहेत. त्यांनी असे बोलता कामा नये. एक वरिष्ठ नगरसेवक असे म्हणतो ही दु:खाची गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—मला असे वाटते की, हिंदी ऐवजी, इंग्रजीतुन बोलले तर शब्दाचा काही अर्थ बदलत नाही. आपण म्हणता की काही सदस्यांचे पुर्नवसन करण्यासाठी या समितीची स्थापना केली जाते. व त्यांना काही ठराविक रक्कम दिली जाते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, या समितीचा अर्थ काय आहे. त्याचे सुध्दा आपण उत्तर दया.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—त्यांनी आपले शब्द तर मागे घ्यावेत ना?

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—चर्चेवरून असे दिसते की, ही जी समिती गठीत झाली आहे ती कायदयानुसार झाली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—नाही आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:—हे पहा इंग्रजीत बोलु नका.

XXX मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—काय ही समिती कायदयानुसार गठीत झालेली आहे किंवा नाही. कुणी असे म्हणु शकणार नाही की ती बेकायदेशिररित्या गठीत झाली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मी आपणांशी वादविवाद करण्यास तयार आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—काय आपण सांगु शकाल की ही समिती बेकायदेशिर आहे?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—माखिजा साहेब मी आपणांस सांगतो,

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:—बोडारे साहेब आपण नेहमी सत्य ते बोलता. सत्यता काय आहे ते आपण सांगा.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—अशाप्रकारचे वक्तव्य ऐकल्यावर व अशा समितीवर आमचे राहणे मला वाटते औचित्याचे नाही.

मा. सचिव:—अशा प्रकारचा प्रश्न जेव्हा पहिल्यांदाच ही समिती गठीत केली होती. त्यावेळी मा. आयुक्त साहेबांना विचारला होता. त्यांनी आपले उत्तर दिले होते. त्याबाबत आता जर मी काही त्याबाबत बोललो तर लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखे होईल. मी त्याबाबत बोलणे ठिक नाही.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—मला असे वाटते की, महापालिका सचिव उत्तर देण्यास टाळत आहेत. याची काही कारणे असतील हे मी समजु शकतो. परंतु या अगोदर या समितीचे गठन करण्यात आले होते व सभागृहाने त्यास आजपर्यंत सभागृहाने स्विकृती दिली होती. याचा अर्थ ती बेकायदेशिर नाही. जेव्हा मागच्या वेळेस आयुक्त साहेब येथे उपस्थित होते तेव्हा त्यांनी तिला स्विकृती दिली होती. ते विधीशाखेचे पदवीधर आहेत. आणि त्यांनी सर्व बाजुंचा विचार करूनच या समितीला स्विकृती दिली होती. म्हणुन मी असे म्हणु शकत नाही की बेकायदेशिर आहे म्हणुन. ही समिती कायदेशिर आहे. याबाबत सन्माननिय सदस्यांनी जे वक्तव्य केले ते चुकीचे आहे. अशा प्रकारचे ते वक्तव्य

करतील असे मला कधीही वाटले नव्हते. मी आपणांस विनंती करतो की सभागृहाचा मान राखुन आपण आपले शब्द मागे घ्यावेत. उदया कदाचित आपण सत्ताधारी पक्षाच्या बाजुला असाल व आम्ही आपल्या बाजुकडे असू.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आपली मनोकामना पुर्ण होवो.

✂ मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:— घर खर्च घेणे या लोकांनी सुरू केले आहे ना? घर खर्च घेण्याची सुरूवात या लोकांनीच केली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—यांची जी भुमिका आहे. त्यानुसार ते याबाजुला म्हणजे सत्ताधारी बाजुला कधीही येवू शकणार नाहीत.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—या देशामध्ये लोकशाही आहे. सरकार कधी सेना भाजपाचे किंवा कॉग्रेस व राष्ट्रवादीचे सरकार येवू शकते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—हे होवू शकते. कदाचित असे होवू शकते की हे आमच्या पक्षात येवू शकतात.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—आपणांस असा आनंद झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—पंजाबी साहेब, लोकशाहीचा आदर राखुन आपण आपले शब्द मागे घेतले पाहिजेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मी माझ्या शब्दाचा पुर्नविचार करतो ही जी समिती गठीत केली जाते ती केवळ काही लोकांचे पुर्नवसन करण्यासाठी या वाक्यावर मी ठाम आहे.

✂ मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—आपण जे म्हणालात की घरचा खर्च चालविण्यासाठी हे शब्द आपण मागे घ्यावेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—पुर्नवसन करण्यासाठी गठीत केली जाते.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—हे बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—श्री. लाल पंजाबी साहेब आपण आमचे आहात. आम्ही आपणांस मत दिले आहे. आमचा काही तरी विचार करा.

✂ मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—सचिव साहेब, आपणांस विनंती आहे की, घरचा खर्च चालविण्यासाठी हे जे वाक्य आहे ते इतिवृत्तांतातून वगळले जावे. सन्माननिय सदस्यांने त्यास स्विकृती दिली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—महसुल समितीची रचना काही सदस्यांच्या पुर्नवसनासाठी केली जाते असे माझे म्हणणे आहे.

✂ मा. महापौर:—घरचा खर्च चालविण्यासाठी महसुल समितीची रचना केली जाते. हे शब्द इतिवृत्तांतातून वगळले जावेत.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—धन्यवाद, पंजाबी साहेबांना पुन्हा एकदा आम्ही स्विकृत सदस्य म्हणुन निवडून देवू.

मा. सचिव:—प्रस्ताव पारीत ?सर्वसंमतीने?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आमचा विरोध आहे. भाजपा—शिवसेनेचा विरोध आहे या समितीच्या गठनासाठी.

मा. महापौर:—सचिव साहेब, या प्रस्तावावर मतदान घ्या.

मा. सचिव:—जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत. श्रीमती कोमल बठीजाजी आपण कोणत्या बाजुने आहात? या प्रस्तावाबाबत कॉंग्रेसची काय भुमिका आहे?

मा. महापौरांचे मत प्रस्तावाच्या बाजुने असल्याने प्रस्तावाच्या बाजुने आता ३१ मते होतील.

## प्रस्तावाच्या बाजुने :—३१ मते

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. मुलचंदानी महेंद्र
३. श्रीमती कालानी ज्योती
४. श्री. रामरख्यानी मोहनदास
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०.श्री. नाना पवार
११.श्रीमती आहुजा निता
१२.श्री. रुपानी चिमन
१३.श्री निकम शांताराम
१४.श्री. ठाकूर विनोद
१५.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१६.श्री. गायकवाड सुरेश
१७.श्रीमती वनवारी मोना
१८.श्री. वनवारी किशोर
१९.श्री. लुंड गोविंदराम
२०.श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१.श्री. पमनानी ईश्वर
२२.श्री. पंजाबी नारायण
२३. श्रीमती पंजाबी दिपा
२४.श्री. लबाना होशियारसिंग
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती भारती छाब्रिया
२७.श्री. सतरामदास जेसवानी
२८. श्री. जाधव प्रशांत
२९.श्रीमती करोतिया मालती
३०.श्रीमती रेखा कारीरा
३१. श्रीमती कोमल बठीजा

मा. सचिव:—जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

## प्रस्तावाच्या विरोधात :—१७ मते

१. श्रीमती जावळे संगिता

२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. जमनादास पुरस्वानी
५. श्रीमती कृष्णानी रेखा
६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
७. श्रीमती बामणकर नंदिनी
८. श्रीमती खांडेकर प्रेमा
९. श्री. गायकवाड दिलीप
१०.श्रीमती माने किरण
११.श्री. चव्हाण रमेश
१२.श्री. बोडारे धनंजय
१३.श्री. पाटिल विश्वनाथ
१४.श्रीमती ससाणे लक्ष्मी
१५.श्री. चौधरी राजेंद्र
१६.श्रीमती सुर्वे जयश्री
१७. श्री. नथु सोनवणे

मा. सचिवः—कॉग्रेस पक्षाची काय भुमिका आहे? तटस्थ?

## तटस्थ मते ३.

१. श्री. भालेराव गौतम
२. श्री. प्रमोद टाले
३. श्री.साधवानी मोहन

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—सचिव साहेब, प्रस्तावाच्या विरोधात १८ मते आहेत ना? आपण १७ चीच मोजणी केलीत?

मा. सचिवः—एक स्विकृत सदस्य आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—पंजाबी साहेब मत देवू शकत नाहीत.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ९:— विशेष महसूल समितीची रचना करणे.

प्रस्तावनाः—

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील तरतुदीनुसार महापालिकेस आपल्या विशेष ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी विशेष समितीची रचना करता येते.

उल्हासनगर शहरामधील जकात व मालमत्ता कर वसुली विरूध्द अनेक तक्रारी येत होत्या. महापालिका उपभोक्त्यांच्या तक्रारींची दखल घेत नाही अशी शहरातील लोकांची धारणा झाली होती म्हणुन शहरातील लोकांच्या अडचणी विचारात घेता प्रशासन व जनप्रतिनिधी यांच्या कामाला गती देण्यासाठी दि. २०.८.२००३ रोजीचे महासभा ठराव क्र. ६६ अन्वये ९ सदस्यीय विशेष महसुल समितीची रचना करण्यांत आलेली आहे. सदर

समितीचा एक वर्षाचा कालावधी दि. १९.८.२००४ रोजी संपुष्ठात येत असल्याने नविन वर्षासाठी विशेष महसुल समितीची रचना करणे आवश्यक असुन सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित.

**महासभा ठराव कृ. ३४** **दिनांकः—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या ९ सदस्यीय विशेष महसुल समितीची रचना करित आहे.

१. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
२. श्री. जाधव प्रशांत
३. श्री. बठीजा संजय
४. श्री. रामरख्यानी मोहनदास
५. श्री. जेसवानी सतरामदास
६. श्री. पंजाबी नारायण
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
९. श्री. लालवानी दिलीप

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

**fo"k; Ø- 10%&** Jh- Bkdqjnkl csgjkuh ;k lnL;kps vugZrslacaf/kP;k iz'ukpk

fu.kZ; ek- U;k;kf/k'kkdMs ikBfo.ks-

याबाबत मी आपणांस सूचना देवू इच्छितो आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी दिवाणी न्यायालयात या प्रश्नाचा निर्णय घेण्यासाठी न्यायाधिशासमोर संदर्भ अर्ज क्रमांक २५ सादर केला आहे. त्यांना श्री. ठाकुरदास बेहरानी यांच्या अनर्हतेबाबत हरकत आहे. त्यांनी बोर्डसमोर प्रासेडिंग सादर केले आहे. त्यानंतर आपणांस काय निर्णय घ्यायचा आहे ते जरा सांगा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>मला असे वाटते एखादया नगरसेवकाने जर हरकत घेतली असेल तर हे प्रकरण वगळले पाहिजे. हा जो मुद्दा न्यायालयात गेला आहे. म्हणुन मला असे वाटते की याबाबत कोणताही ठराव पारीत करण्याची गरज नाही. यासाठी हा प्रस्ताव वगळला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. वाघे शामु यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव:—</u>प्रस्ताव वगळला जावा?

<u>मा. सदस्य श्री. किशारे वनवारी:—</u>आमच्याकडे कोणत्या निर्णयासाठी हा प्रस्ताव आला आहे. कृपया सचिव साहेबांनी सांगावे.

<u>मा. सचिव:—</u>त्यांना मा. आयुक्तांनी एक सूचना दिली होती की आपण सहा महिन्यापर्यंत महापालिकेच्या सभेत उपस्थित राहिला नाहीत म्हणुन कायदयानुसार आपण अनर्हतेस पात्र आहात. तर कायदा असा आहे की, जर कोणताही सन्माननिय सदस्य अपात्र घोषित केला पाहिजे. तर त्याबाबतचा निर्णय मा. न्यायाधिशानी घेतला पाहिजे. त्यासाठी तीन उपाय आहेत. एक तर ही आहे जे सन्माननिय सदस्य अपात्र होणार आहे. त्यांनी स्वत: न्यायालयात गेले पाहिजे. किंवा अन्य कुणी सन्माननिय सदस्य याबाबत न्यायालयात जावू शकतात. तिसरे मा. आयुक्त साहेबांना ही महासभा विनंती करून असे ठरवून देत असेल की, न्यायालयात यांचे प्रकरण पाठवा तर महासभेच्या वतीने ते न्यायालयात जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>म्हणजे आम्ही यावर निर्णय घेवू शकतो?

<u>मा. सचिव:—</u>आपणांस मा. आयुक्तांना विनंती करावी लागेल की आपण हे प्रकरण न्यायालयात पाठवा. व प्रश्न असा आहे की, श्री. मोहन बेहरानी यांनी स्वत:हुन न्यायालयात दावा दाखल केला आहे. आपला अर्ज दाखल केला आहे. तर त्याबाबतचा निर्णय न्यायालय घेणारच आहे. जर आपणांस आपल्या वतीने प्रकरण न्यायालयात पाठवायचे असेल तर दोन—दोन अर्ज होतील. म्हणुन मला असे वाटते की एकच अर्ज पुरेसा आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:—</u>मला असे वाटते की, सभे—समोर ज्यांचे प्रकरण आहे. त्यांचा भाऊ जर न्यायालयात गेला आहे.व आज महासभा जो निर्णय घेणार आहे की, आयुक्तांना या बाबत विनंती केली जावी की हे प्रकरण न्यायाधाशांकडे पाठविले जावे. या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. सभागृहाकडुन हा प्रस्ताव न्यायालयापुढे जाणार नसल्याने  हा प्रस्ताव वगळला जावा. महापौरजी, सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्यांना माझी ही विनंती आहे की, जेव्हा प्रस्ताव न्यायालयापुढे सादर झालेला असताना या सभागृहाने याबाबत काही निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. म्हणुन हा प्रस्ताव वगळला पाहिजे जसे श्री. लाल पंजाबी यांनी सूचना केली आहे. त्याप्रमाणे...

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव महासभेपुढे आला आहे. एक तर सदस्याने स्वत: न्यायालयात जावे. दुसरे असे की, जसे आपण म्हंटले की, दुस—या कुणी न्यायालयात जावे. तिसरे आयुक्त साहेबांनी महासभेस विनंती केली होती ना? की आपण निर्णय घ्या. तर हे जे न्यायालयात गेले आहेत. त्याबाबत आयुक्त साहेबांनी आपली बाजु मांडली आहे.

<u>मा. सचिव:—</u>मा. आयुक्त साहेबांनी हा प्रस्ताव आपल्याकडे यासाठी पाठविला होता की पाठविण्या अगोदर त्यांना त्याची माहिती नव्हती की, श्री. मोहन बेहरानी यांनी न्यायालयात काही प्रकरण दाखल केले आहे. त्यांनी एक दोन दिवसापुर्वीच अर्ज दाखल केला आहे. त्याची सूचना वकिलामार्फत कालच प्राप्त झाली आहे. व माझ्यामते दोन दोन अर्ज करून काही फायदा होणार नाही. आपण आता जरी निर्णय घेतला तरी याबाबतचे जे उत्तर आहे ते आयुक्त साहेब दाखल करतील. व त्यांनी जो अर्ज दाखल केला आहे त्याचे उत्तर ही आयुक्त साहेब देतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आमच्या समोर ज्या कारणासाठी प्रस्ताव आला आहे. तो पारीत केला जावा. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशी तरतुद आहे की, जर एखादा सदस्य सलगपणे सहा महिन्यापेक्षा अधिक काळ सभांना गैरहजर राहिला तर त्याचे सदस्यत्व संपुष्ठात येते. आयुक्त साहेबांनी त्यास नोटीस सुध्दा दिली आहे.

आमच्या समोर प्रस्ताव यासाठी आणला की एकतर त्याने स्वतः न्यायालयात जावे. किंवा दुसरे कुणी जावे, किंवा महासभेने निर्णय घ्यावा.

<u>मा. सचिवः—</u>मी आपणांस सांगितले की, मा. आयुक्त साहेबांना माहिती नव्हती की, ते न्यायालयात जाणार आहेत. जर ते जात नसतील व जर या महासभेचे असे मत असेल की त्यांना जे अनर्ह केले आहे त्यामध्ये काही वाद आहे तेव्हा आपणांस न्यायालयात जावे लागेल. वाद नसेल तर जायचे नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>आता हे सांगा की, आपल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार सहा महिने व एक दिवस होवून गेल्यानंतर त्यांची सदस्यता तर वाचत नाही ना?

<u>मा. सचिवः—</u>त्यांचे सदस्यत्व बंद होण्याबाबत किंवा ते अपात्र होण्याबाबत आपणांस काही शंका आहे का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>बिल्कुल नाही.

<u>मा. सचिवः—</u>शंका नाही तर आपण काय ठरविणार?त्यांनी जो अर्ज दाखल केला आहे त्याच्या उत्तरादाखल आयुक्त साहेब आपले म्हणणे मांडतील, उत्तर दाखल करतील म्हणजे आपणांस म्हणायचे आहे. ते सर्व त्यामध्ये येईल.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः—</u>सभागृहाचा हा सर्व संमतीने निर्णय आहे की हा प्रस्ताव वगळला जावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>हा प्रस्ताव वगळला जावा.

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

## <u>**fo"k; Ø- 10%&**</u> Jh- Bkdqjnkl csgjkuh ;k lnL;kps vugZrslacaf/kP;k iz'ukpk fu.kZ; ek- U;k;kf/k'kkdMs ikBfo.ks-

<u>मा. सचिवः—</u>विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ११ः—</u> दि. २३.१.२००१ ते २२.१२.२००१ या कालावधीचा श्री. बनवारीलाल ढेणवाल तत्कालीन सभापती, आरोग्य समिती यांना विशेष बाब म्हणुन वाहनभत्ता अदा करणे बाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१ दि. १९.७.२००४ कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>पास. पास.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>भाजपा— शिवसेनेचा विरोध आहे. कोणत्याही सभापतींच्या वाहनभत्याच्या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

<u>मा. महापौरः—</u>सचिव साहेब या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.

<u>मा. सचिवः—</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मतेः—३५ मते</u>

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. मुलचंदानी महेंद्र
३. श्रीमती कालानी ज्योती
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०.श्री. नाना पवार
११.श्रीमती आहुजा निता
१२.श्री. रुपानी चिमन
१३.श्री निकम शांताराम
१४.श्री. ठाकूर विनोद
१५.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१६.श्री. गायकवाड सुरेश
१७.श्रीमती वनवारी मोना
१८.श्री. वनवारी किशोर
१९.श्री. लुंड गोविंदराम
२०.श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१.श्री. पमनानी ईश्वर
२२.श्री. पंजाबी नारायण
२३. श्रीमती पंजाबी दिपा
२४.श्री. लबाना होशियारसिंग
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती भारती छाब्रिया
२७.श्री. सतरामदास जेसवानी
२८. श्री. जाधव प्रशांत
२९ श्री. भालेराव गौतम
३०..श्रीमती करोतिया मालती
३१. श्री. रामरख्यानी मोहनदास
३२. श्री. प्रमोद टाले
३३. श्री. साधवानी मोहन
३४. श्रीमती रेखा कारीरा
३५.श्रीमती कोमल बठीजा

मा. सचिव:—जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## प्रस्तावाच्या विरोधात :—१७ मते

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. जमनादास पुरस्वानी
६. श्रीमती कृष्णानी रेखा
६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग

७. श्रीमती बामणकर नंदिनी
८. श्रीमती खांडेकर प्रेमा
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती माने किरण
११. श्री. चव्हाण रमेश
१२. श्री. बोडारे धनंजय
१३. श्री. पाटिल विश्वनाथ
१४. श्रीमती ससाणे लक्ष्मी
१५. श्री. चौधरी राजेंद्र
१६. श्रीमती सुर्वे जयश्री
१७. श्री. नथु सोनवणे

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ११:— दि. २३.१.२००१ ते २२.१२.२००१ या कालावधीचा श्री. बनवारीलाल ढेणवाल तत्कालीन सभापती, आरोग्य समिती यांना विशेष बाब म्हणुन वाहनभत्ता अदा करणे बाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१ दि. १९.७.२००४ कायम करणे.

प्रस्तावना:—

महानगरपालिकेच्या सन १९९७ ते २००३ या कालावधीत दिनांक २३.१.२००१ ते २८.२.२००२ या कालावधीत श्री. ढेणवाल बनवारी हे आरोग्य समितीच्या सभापती पदी कार्यरत होते.

उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०/४/१९९७ अन्वये विशेष समिती सभापती यांना त्यांचे कार्यकालावधी चार चाकी वाहन ऐवजी प्रति माह रू. १५०००/— वाहन भत्ता देणे बाबत मान्यता दिलेली आहे. सदर ठरावातील अटी नियमानुसार त्यांना ज्यादिवशी वाहन खरेदी करतात त्या दिवसापासुन वाहन भत्ता मिळण्यास संबंधित पात्र राहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. ढेणवाल बनवारी यांचे नावावर सदरचे वाहन झालेनंतर २३/१२/२००१ ते २२/२/२००२ पर्यंत वाहन भत्ता अदा करण्यात आला आहे.

श्री ढेणवाल बनवारी यांनी दिनांक २३/१/२००१ ते २२/२/२००२ या संपुर्ण कालावधीचा वाहन भत्ता देण्यात यावा असा दिनांक २८/४/२००३ रोजी अर्ज दिलेला होता सदर बाबीस स्थायी समिती सभा दिनांक ९/७/२००३ ठराव क्र. ३७ अन्वये मान्यता मिळालेली नाही.

आता श्री. ढेणवाल बनवारी यांनी परत या बाबीसाठी दिनांक १५/१०/२००३ रोजी अर्ज केलेला असून प्रस्ताव पुन्हा स्थायी समिती सभेपुढे ठेवीत आहोत.

स्थायी समिती ठराव क्रमांक १२९ दिनांक ३१/३/२००३ अन्वये प्रभाग समिती सभापती श्री. प्रमोद टाले यांची याच स्थितीमधील मागणी विशेष बाब म्हणुन संपुर्ण कालावधीचा वाहन भत्ता देणेस मान्यता दिलेली असुन महासभा ठराव क्र. ८, दिनांक २५/४/२००२ अन्वये हा निर्णय कायम करण्यात आलेला आहे.

श्री. प्रमोद टाले यांचे धर्तीवर आपली मागणी मान्य करण्याची विनंती श्री. ढेणवाल बनवारी यांनी केलेली आहे.

श्री. ढेणवाल बनवारी यांना विषयातील कालावधीसाठी पुढील प्रमाणे वाहन भत्ता देय असेल.

दिनांक २३/१/२००१ ते ३१/१/२००१ .......९ दिवस..... रूपये ४,३५५. ००
दिनांक १/२/२००१ ते ३०/११/२००१ .......१० महिने ..... रूपये १५०,०००. ००
दिनांक १/१२/२००१ ते २२/१२/२००१ .......२२दिवस..... रूपये १०,६४५. ००

श्री. ढेणवाल बनवारी, आरोग्य समिती सभापती यांना दिनांक २३/१/२००१ ते २२/१२/२००१ पर्यंत एकूण वाहन भत्ता रूपये १,६५,०००/— प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी स्थायी समिती सभेपुढे सादर करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७१ दिनांकः— १९. ७. २००४

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :—श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव स्थायी समिती ठराव क्र. ६ दिनांक ३०.४. १९९७ च्या धर्तीवर अटी व शर्ती मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी श्री. बनवारी ढेणवाल, तत्कालीन सभापती, सार्वजनिक आरोग्य समिती यांना विशेष बाब म्हणुन दि २३/१/२००१ ते २२/१२/२००१ या कालावधीचा वाहन भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>
सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महासभा ठराव कृ. ३५** **दिनांकः—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन रामरख्यानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. बनवारी ढेणवाल तत्कालीन सभापती, आरोग्य समिती यांना दि २३/१/२००१ ते २२/१२/२००१ या कालावधीचा विशेष बाब म्हणुन वाहन भत्ता अदा करणे कामी स्थायी समिती ठराव क्र.७१ दि. १९.७.२००४ कायम करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>
महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**मा. सचिव:—**विषय क्र. १२ वाचून दाखवितात.

**विषय क्र. १२:—** उल्हासनगर शहरातील पर्यावरणाच्या स्थितीबाबतचा अहवाल विचारात घेणे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**आताच आम्हाला अहवालाची प्रत मिळाली आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**हा अहवाल इंग्रजीमध्ये आहे मराठीत पण असला पाहिजे. इंग्रजीसाठी आम्हाला मग शिकवणी लावावी लागेल. ज्या सदस्यांना इंग्रजी समजत नाही त्यांना.नाहीतर शिकवणीची व्यवस्था करा सर्वांसाठी इंग्रजी वाचुन त्यांनी समजावले पाहिजे. कोणता विषय काय आहे. मग ज्या दिवशी चर्चेला यायचे असेल त्यादिवशी शिकवणीच्या टिचरला सोबत घेवून येवू.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**पास.

**मा. सचिव:—**काय पास?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा. महापौर हा विषय ३१ जुलै पर्यंत यायला पाहिजे होता.....

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**आम्हाला मराठीत प्रत मिळाली पाहिजे. नंतर पुढच्या महासभेत आणा.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**मा. सभागृह नेता जे बोलत आहेत. ३१ जुलै पर्यंत अहवाल आणायचा आहे. अहवाल आणणे आणि पास करणे वेगळे. आता आम्हाला जो हा अहवाल मिळाला आहे. आम्ही महासभेत आल्यावर, बसल्यावर आम्हाला हा अहवाल दिला गेला. इतका मोठा अहवाल आहे. उघडुन पाहण्याएवढा सुध्दा वेळ नाही मिळाला. पास आपण नंतर करू शकतो. फक्त ३१ जुलै पर्यंत आणण्याचा मुद्दा होता. नंतर आपण यावर चर्चा करू शकतो.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**आमचा विरोध आहे, वाचले नाही, काही नाही असेच पास करायचे काय?

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**जे लोक लोकशाहीचे उदाहरण देतात, लोकशाही विषयी बढाया मारतात त्यांना माझी विंनती आहे ते असे कसे पास करू शकतात , त्यांनी या विषयी बोलले पाहिजे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सचिवजी, सभेचे कामकाज कोणत्या भाषेतुन चालले पाहिजे?

**मा. सचिव:—**तुम्हाला काय शंका आहे ते सांगा?

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**हा जो अहवाल आपण दिला आहे तो इंग्रजीत आहे. हा मराठीत असला पाहिजे. विषय पटलावर विषय मराठीत आहे. त्याचे भाषांतर देखिल करून दिले नाही. आम्ही काय समजायचे.

**मा. सचिव:—**त्यांनी इंग्रजीत का तयार केले हे उत्तर ते देवू शकतील.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**तुमच्या माध्यमातुन हा विषय इथे ठेवला गेला आहे.

<u>मा. सचिव:–</u>हो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>त्यांना बोलवा. विषय ठेवताना मराठीमध्ये भाषांतर करून देणे जरूरी होते.

<u>मा. सचिव:–</u>त्याचे कारण असेल ते कारण संबंधित जबाबदार व्यक्ती येवून सांगेल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>कोण आहेत जबाबदार?

<u>मा. सचिव:–</u>इथे ते उपस्थित नाही आहेत. श्री. भदाणे तुम्हाला सांगतील.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–</u>मा. महापौरजी, मला असे म्हणायचे आहे की, डॉ. खरात यांना हे माहित नव्हते का की सभेचे कामकाज मराठीत चालते आणि कोणतीही कागदपत्रे मराठीत सादर केली जातात. त्यांनी त्यावेळेसच हे पाहायला पाहिजे होते की हे इंग्रजीत आहे ते मराठीत यायला पाहिजे. ब–याचशा लोकप्रतिनिधींना इंग्रजी कमी समजते. ते स्वत: देखील उपस्थित नाहीत. प्रत्येक विषयाच्या वेळी ते उपस्थित नव्हते.

<u>श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):–</u>या अहवालात ९० टक्के शब्द वैज्ञानिक स्वरूपाचे आहेत. म्हणुन ते मराठीत नाही बनवु शकत म्हणुन इंग्रजीत अहवाल तयार केला गेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–</u>सर्व शब्दांचे भाषांतर मराठीत होते आम्हाला माहित आहे. भदाणे साहेब असे बोलु नका. प्रत्येक शब्दाचे भाषांतर मराठीत होवु शकते.

<u>श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):–</u>बहुतांश शब्द वैज्ञानिक स्वरूपाचे आहेत. म्हणुन मराठीत देखिल त्याचा उच्चार जसाच्या तसा करायला लागतो म्हणुन आम्ही हा अहवाल इंग्रजीत बनवला आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी:–</u>आभारी आहोत. हा अहवाल इंग्रजीत तयार केला आहे. आम्ही आधी देखिल आपणांस विनंती केली आहे की, सदनाची जी काही कार्यवाही आहे ती मराठीत चालु दयावी परंतु त्याचे भाषांतर देखिल करावे. आम्हाला जास्त मराठी समजत नाही आम्ही गप्प बसतो. माझी एक विनंती आहे की याचे भाषांतर मराठीत करून दयावे. आणि यापुढे जे पण तुम्ही अेजेंडा किंवा विषय देता त्याचे इंग्रजीत भाषांतर करून दयावेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मिस्टर जनसंपर्क अधिकारी तुम्ही जनसंपर्क अधिकारी आहात. लोकांशी तुमचा जास्त संपर्क येणार आहे. तोंडाला येईल ते उत्तर दिले म्हणजे संपले असे नाही. यात असे शब्द आहेत का की मराठीत त्याचा अर्थ लागत नाही.

<u>श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):–</u>हो मराठीत अर्थ आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मग तुम्ही उत्तर काय दिले?

<u>श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):–</u>कधी कधी असे शब्द असतात की, पुर्णत: तो जसाच्या तसाच इंग्रजीचा मराठीत लिहावा लागतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मग शोधा शब्दकोषात तुम्ही कशासाठी आहात?

<u>श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):–</u>तुमचे म्हणणे बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>वैज्ञानिक शब्द आहेत त्यांचे मराठीत भाषांतर करता येत नाही हे काय उत्तर झाले.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—वैज्ञानिक शब्द आहे त्याचा मी तुम्हाला मराठीत अर्थ सांगतो. एअर म्हणजे हवा. वॉटर म्हणजे पाणी नाही समजत कसे काय तुमचे वैज्ञानिक आहे काय समजत नाही.

श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):—उदा. सिओडी, बीओडी यामध्ये एअर मॉनेटरींगचा जो एक पार्ट आहे त्याचे ॲनालिसीस केला जातो. शब्दश: मराठीमध्ये त्याचा परिपुर्ण अर्थ लागत नाही म्हणुन आम्ही त्याला इंग्रजीमध्ये बनविले आहे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—जेवढे काही मराठीत करता येईल तेवढे तरी करा ना? तेवढी तरी मेहरबानी करा आमच्यावर नाही जास्त करू शकला तर?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, आपल्या बायलॉजमध्ये आहेत. शासन निर्णय उल्हासनगर महानगरपालिकेने शासकीय ठराव क्र. १ दि. २२ ऑक्टोबर, १९९६ पासुन मराठी भाषेत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आहे याच्यामध्ये कुठे मराठी भाषा? तरी तुम्ही घेता चुकीचे सांगु शकत नाही. सभागृहामध्ये सदस्यांनी फक्त हात वर करायचे, पास पास म्हणुन काय आहे त्यामध्ये आम्हाला कळत नाही. ठराव तुम्ही केला. बायलॉज तुमचे आहे. इथे स्पष्टपणे लिहिले आहे मराठीत घेतले पाहिजे तुम्ही इंग्रजीत दिले तरी पास?आताच सांगितले इथे कायदयाचा अभाव तोच कायदा बनतोय.

श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):—ठिक आहे. याचे मराठीमध्ये होवू शकते. परंतु ३१ जुलै पर्यंत अहवाल सादर करायचा होता , वेळ कमी होता म्हणुन दिले. वेळ असता तर जरूर आम्ही मराठी आवृत्ती दिली असती.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—तुमची समस्या दुस—यांच्या माथी कशाला मारता. तुम्ही नाही करू शकत तर कुणाच्या माथ्यावर हे मारता?

श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):—यानंतर जो पण अहवाल तयार करू तो मराठीमध्ये देण्याचा पुर्ण प्रयत्न करू.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—प्रयत्न नाही, मराठीतच तुम्हाला करावा लागेल.

श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):—करू करू मराठीत देवू.

मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—फक्त मराठीतच नाही तर इंग्रजीमध्ये पण दयावे लागेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—इंग्रजीत पण देतील.

श्री. युवराज भदाणे (जनसंपर्क अधिकारी.):—दोन्ही भाषेत देवू.

महापौर:—यापुढे सदनात कोणतेही कामकाज इंग्रजीत येणार नाही मराठीत येईल.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—मा. स्थायी समिती सभापतींनी जो मुद्दा उपस्थित केला की इंग्रजीत नसले पाहिजे, मराठीत असले पाहिजे हे त्यांचे म्हणणे एकदम योग्य आहे. तर हे इंग्रजीत नको हा विषय आम्हाला समजलाच नाही. इंग्रजीत नाही आले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—दोन्ही भाषेत असले पाहिजे.

मा. महापौर:—ठिक आहे यापुढे मराठीतच सर्व मिळेल.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर:—याची प्रत देखिल मराठीत दिली पाहिजे.

मा. महापौरः—हे मराठीत देतील.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—निर्णय काय आहे? ठराव होत आहे की नाही?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—मराठी आणि इंग्रजीत दोन्ही दिली पाहिजे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—पास करण्यास हरकत नाही परंतु जर कायदयात बसत असेल तर ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौर, आता जे आमच्या जनसंपर्क अधिका—यांनी सांगितले की हा अहवाल फक्त पाठवायचा आहे. ॲक्शन प्लान वगैरे सर्व नंतर येईल म्हणुन ते म्हंटले की, जो ॲक्शन प्लान येईल तो मराठीत येईल. हा पर्यावरणाचा अहवाल पुण्याला पाठवायचा आहे. तर मेहरबानी करून माझी सदस्यांना विनंती आहे की हा अहवाल ३१ जुलै पर्यंत जायला पाहिजे होतो कारण ही शेवटची महासभा आहे. आज फक्त अहवाल पास करू ॲक्शन प्लान मराठीत येईल. तुम्ही विचारा पाहिजे तर त्यांना. फक्त अहवाल पाठवायचा आहे. ३१ जुलै पर्यंत तुम्ही जरा खुलासा करा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—मा. सचिवजी, मा. सभागृह नेता जे बोलत आहेत ३१ जुलै पर्यंत. आज १९ ऑगस्ट आहे म्हणजे अहवाल आधीच उशिरा आला आहे. परंतु हे शहराच्या हितासाठी आहे सर्वांना माहित पडले पाहिजे म्हणुन आम्ही तांत्रिक मुद्दा घेतच नाही आहोत की तुम्ही ३१ जुलै पर्यंत अहवाल का नाही ठेवला आम्ही जाणुन बुजून हा मुद्दा उपस्थित नाही केला परंतु समितीचा जो अहवाल आहे. सभागृहात तो आला पाहिजे. पारीत झाला पाहिजे असे नाही. ३१ जुलै पर्यंत महासभेसमोर ठेवला पाहिजे. ते आम्ही मान्य करतो. परंतु आम्हाला असे म्हणायचे आहे की आताच हातात अहवाल मिळाला आहे. कमीत कमी लोकशाहीच्या आधारानुसार चर्चा तर झाली पाहिजे. अहवाल आता मिळाला आम्ही कधी वाचणार? आज १९ ऑगस्ट आहे आम्ही हे विचारलेच नाही की ३१ जुलै पर्यंत का नाही दिले? उशिर होतो. हा पर्यावरण अहवाल आहे आमची इच्छा आहे आम्ही तो वाचावा त्यावर चर्चा व्हावी. शहरातील पर्यावरणाविषयी आहे. तुम्ही चर्चेपासुन वंचित का ठेवू इच्छिता? आपण भले दोन महिन्याने पास केले तर काय फरक पडतो? काय बिघडणार आहे? आम्हाला वाचु तर दया आताच आम्ही सभागृहात शिरलो आणि प्रत हातात दिली. सभागृहात शिरल्यावर प्रत हातात देतात. सचिवजी तुम्ही सांगा यात कायदा काय आहे? ३१ जुलै पर्यंत महासभेसमोर ठेवला पाहिजे. पास झालेच पाहिजे असे काही नाही. सात दिवसाची वेळ का आहे की सर्व सदस्यांनी वाचुन यावे. सात दिवसाचे तर सोडा तुम्ही काहीच वेळ देत नाही तर कसे वाचणार आम्ही हा तर तुम्ही विचार केला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी , श्री. मोहन साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.**

आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः—मा. महापौर महोदया, आज जो सदनासमोर अहवाल ठेवला आहे. यावर चर्चा झाली पाहिजे. सन्माननिय सदस्य सांगतिल त्यावेळी चर्चा झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—पास करा पास.

मा. सचिवः—काय पास करायचे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—हा जो अहवाल आमच्या समोर आणला आहे तो ॲक्शन प्लान तर नंतर येणार आहे ना?

मा. सचिवः—नियमात असे आहे. शहरातील पर्यावरण अहवाल महासभेसमोर ठेवला पाहिजे. त्यावर विचार केला पाहिजे त्यानंतर ॲक्शन प्लान बनविला जातो. तुम्हाला आता काय करायचे ते सांगा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—विचार करायचा आहे ना? ॲक्शन प्लान नंतर येणार ना?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>वाचु तर दया.

<u>मा. सचिवः—</u>ॲक्शन प्लान आल्यावर तुम्ही चर्चा करू शकता.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>ॲक्शन प्लान आल्यावर तुम्ही चर्चा करू शकता ना?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>तुम्हाला जर सर्व गोष्टी बहुमताने करायच्या असतील तर करा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>वाचले नाही त्यावर निर्णय कसा घ्यायचा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः—</u>आयुक्त साहेब स्वतः म्हणतात की नंतर पास करू शकतात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>तुम्हाला इतकी घाई का आहे आयुक्त साहेब म्हणता नंतर पास करू शकता.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>तुम्हाला जर सर्व गोष्टी बहुमताने करायच्या असतील तर करा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>महापौर महोदया, सभागृहात आल्यावर जो आम्हाला अहवाल दिल्यावर आम्ही तो वाचला नाही. जे वाचले नाही त्यावर आम्ही निर्णय घेवू शकत नाही म्हणुन तुम्ही आदेश दया सदरचा विषय वगळण्यांत यावा. तुमच्या संमतीने इथे विषय आणला आहे.

<u>मा.सचिवः—</u>नाहीतर असे करायचे का की आता नुसता पर्यावरणस्थिती दर्शक अहवाल विचारात घ्यायचे व प्रति आराखडा पुढच्या सभेत घेता येईल असे मान्य आहे का?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>असे नाही करू  शकत. आम्ही विचार काय चर्चा करू शकत नाही.

<u>मा. सचिवः—</u>त्याने काय फरक पडतो?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>सचिवजी सात दिवसाची नोटीस का दिली जाते.सात दिवस आधी आम्हाला माहिती दिली पाहिजे ना? आयुक्त साहेब सात दिवसाची नोटीस का असते? कारण की सर्वांना अभ्यास करता येईल.  तुम्ही त्या नियमाचे पालन करू शकत नाही.

<u>मा. सचिवः—</u>मतदान घ्यायचे का?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आमचा विरोध आहे.  न वाचता आम्ही काही करणार नाही. हा चांगला मुद्दा आहे शहरासाठी आम्ही यावर चर्चा करणार. आणि असा पर्यावरणाचा मुद्दा या महासभेत त्यावर चर्चा न होते हा तर लोकशाहीचा अपमान आहे. श्री. हरदास माखिजा काही तरी यापुर्वी चांगले लोकशाहीबददल बोलत होते. आता त्यांना लोकशाहीचा अपमान वाटत नाही. आता काही उठुन बोलतच नाही.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः—</u>मा. महापौर महोदया, हा जो अहवाल ठेवला आहे त्यावर चर्चा करण्यासाठी पुढील महासभेत ठेवला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आम्ही तेच म्हणतो पास करण्यास हरकत नाही परंतु आम्हाला वाचुन येवू दे, चर्चा करू दे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>नोव्हेंबर पर्यंत पुढील सभा होणार नाही. तुम्ही लक्षात घ्या. ही शेवटची सभा आहे. २३ तारखेपासुन आचारसंहिता लागु होणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>तुम्ही सांगा एवढी काय घाई आहे की आजच पास झाले पाहीजे. आयुक्त साहेब म्हणतात नंतर पास केले तर चालेल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>तुम्हाला ज्या ज्या विषयावर घाई नसते ते घेत नाही ना?गुरूव्दाराचे नका घेवू हे नका घेवू. आता काय.......

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>हे वाचुन तर आले पाहिजे ना, समजतच नाही काय आहे काय नाही?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>३१ जुलैला अहवाल यायला पाहिजे होता आज १९ ऑगस्ट आहे. अहवाल शासनाकडे गेला पाहिजे. ॲक्शन प्लानच्या वेळी सर्वजण चर्चा करू शकतात असे आयुक्त साहेब देखिल म्हणाले.

<u>मा. सचिव:—</u>तुम्हाला अहवाल मान्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>हो, आम्हाला अहवाल मान्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मी जी शंका उपस्थित केली त्याचे आपण उत्तर दिले नाही.

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सचिव:—</u>कॉंग्रेस व आर.पी.आय चे मत काय?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>आर.पी.आय.च्या मते पर्यावरणाचा विषय हा महत्वाचा आहे. व त्यावर चर्चा झाली पाहिजे. चर्चा जर होत नसेल तर पास करणे ठिक नाही.

<u>मा. सचिव:—</u>तुमचे मत तटस्थ आहे.

<u>मा. सचिव:—</u>ठिक आहे. जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

## <u>प्रस्तावाच्या बाजुने :—३१ मते</u>

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. मुलचंदानी महेंद्र
३. श्रीमती कालानी ज्योती
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०.श्री. नाना पवार
११.श्रीमती आहुजा निता
१२.श्री. रुपानी चिमन
१३.श्री निकम शांताराम
१४.श्री. ठाकूर विनोद
१५.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१६.श्री. गायकवाड सुरेश
१७.श्रीमती वनवारी मोना

१८.श्री. वनवारी किशोर
१९.श्री. लुंड गोविंदराम
२०.श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१.श्री. पमनानी ईश्वर
२२.श्री. पंजाबी नारायण
२३. श्रीमती पंजाबी दिपा
२४.श्री. लबाना होशियारसिंग
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती भारती छाब्रिया
२७.श्रीमती कारीरा रेखा
२८. श्री. जाधव प्रशांत
२९ श्रीमती कोमल बठिजा
३०..श्रीमती करोतिया मालती
३१. श्री. रामरख्यानी मोहनदास

मा. सचिव:— जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

## प्रस्तावाच्या विरोधात :—१७ मते

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. जमनादास पुरस्वानी
५. श्रीमती कृष्णानी रेखा
६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
७. श्रीमती बामणकर नंदिनी
८. श्रीमती खांडेकर प्रेमा
९. श्री. गायकवाड दिलीप
१०.श्रीमती माने किरण
११.श्री. चव्हाण रमेश
१२.श्री. बोडारे धनंजय
१३.श्री. पाटिल विश्वनाथ
१४.श्रीमती ससाणे लक्ष्मी
१५.श्री. चौधरी राजेंद्र
१६.श्रीमती सुर्वे जयश्री
१७. श्री. नथु सोनवणे

## तटस्थ:—२ मते

१. श्री. भालेराव गौतम
२. श्री. प्रमोद टाले.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १२:— उल्हासनगर शहरातील पर्यावरणाच्या स्थितीबाबतचा
अहवाल विचारात घेणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ६७ — अ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (२००३—२००४)तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**महासभा ठराव कृ. ३६** **दिनांक:—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

ही महासभा आयुक्तांतर्फे प्रत्येक पालिका सदस्यास प्रस्तुत केलेला सन २००३—२००४ चा उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**</u>सचिव साहेब मी प्रश्न विचारला होता आपण सचिव आहात. सभेचे कामकाज आपण चालवता. ठराव मराठीत आला पाहिजे. जर मराठीत येत नसेल तर कायदयात बसतो का? दोन ओळीचा ठराव नाही. पर्यावरण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल म्हणजे हा ठराव होत नाही.

<u>मा. सचिव:—</u>तो विषय आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मराठीत नाही म्हणुन ठराव पुर्ण होतो का?

<u>मा. सचिव:—</u>ठराव तर मराठीत येतो ना तुमच्याकडे कधी पण. हा ठराव नाही, हा अहवाल आहे. तुम्हाला पर्यावरणाचा अहवाल दिला गेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>म्हणजे अहवाल मराठीत देणे जरूरी नाही.

<u>मा. सचिव:—</u>कायदयाने जरूरी आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**</u>कायदयाने जरूरी आहे ते झाले नाही म्हणजे कायदा तोडला गेला. आणि कायदा तोडला गेला म्हणजे ते बेकायदेशिर आहे.

<u>**मा. सचिव:—**</u>तुम्ही जर भाषेची नियमावली वाचली असेल तर त्यात त्यांनी एक सुट दिली आहे. जर एखादा कायदेशिर मजकुर असेल त्याचे जर भाषांतर शक्य नसेल तर ते इंग्रजीत करू शकतात. नियमावलीत तसे आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**</u>म्हणजे आपण मान्य केले की याचे भाषांतर करू शकत नाही. आपल्याकडे इतके हुशार लोक नाहीत की इंग्रजीचे भाषांतर मराठीत करू शकतील.

<u>**मा. सचिव:—**</u>मी तुम्हाला कायदयाची स्थिती सांगितली. श्री. भदाणे साहेबांचे म्हणणे आहे की तेथे वैज्ञानिक शब्द आहेत. मराठीत घेतले तर त्या शब्दाचा अर्थ दुसरा निघतो. म्हणुन इंग्रजीत केले आहे.

विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

<u>**विषय क्र. १३:—**</u> महापलिका पदाधिका—यांना वाहनभत्ता देणे कामी
स्थायी समिती ठराव क्र. ६ दि. ३०.४.९७ विचारात
घेवून पुर्ननिर्णय घेणे.

<u>**मा. सदस्य श्री. किशारे वनवारी:—**</u>पास. पास.

<u>**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—**</u>मा. महापौर महोदया आमचे आयुक्त साहेब खुप चांगले काम करत आहेत. मला जी माहिती मिळाली आहे. आयुक्त साहेबांच्या गाडीची ए. सी. पण काम करत नाही. व कित्येक वेळा गाडी रस्त्यात देखिल धोका देते. आयुक्त साहेबांना एक नविन गाडी घेण्याची परवानगी दिली पाहिजे. भले त्या गाडीची किंमत २० लाख रूपये असु दे. दिवसरात्र ते इतके चांगले काम करत आहेत. त्यांना कुठे उशिर झाला व त्यामुळे शहरात अडचण निर्माण झाली. ते उल्हासनगर शहराचे आयुक्त आहेत. म्हणुन कमीत कमी २० लाखाची गाडी जरी घेवू इच्छित असतील तर त्यांनी घ्यावी. नवी गाडी घ्यावी तसे सभागृहात सर्वानुमते मान्य झाले पाहिजे.

<u>**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**</u>हा जो १३ नंबरचा विषय आहे. याबाबतीत आम्ही आधीच महसुल समितीचा विषय होता तेव्हा बोललो आहोत. आमची एक स्पष्टपणे भुमिका आहे. भाजपा व शिवसेनेची की ज्यापण वैधानिक समित्या आहेत. पदाधिकारी आहेत. त्यात महापौर ,उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, प्रभाग समितीचे जे सभापती आहेत त्यांनाच फक्त वाहनभत्ता मिळाला पाहिजे. हे आमची स्पष्टपणे भुमिका आहे. तुम्ही जर त्यात बदल करून याच व्यक्तींना देवू इच्छित असाल तर आम्ही तुमच्याशी सहमत आहोत. आमची ही भुमिका पुर्वीपासुनच आहे की विषय समित्यांचे सभापती सोडुन जे प्रभाग समितीचे सभापती आहेत. महापौर, उपमहापौर जे वैधानिक पदाधिकारी आहेत. आम्ही त्यांचा आदर करतो फक्त त्यांनाच वाहनभत्ता दिला जावा. तर आम्ही त्यांच्याशी सहमत आहोत. तो ठराव सर्वसंमतीने पास करू.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**</u>आयुक्त साहेब, पुन्हा प्रशासनाची भुमिका येथे संशयास्पद आहे. ठराव तात्पुरता विखंडीत करण्यात येतो. असे शासनाचे पत्र आणि पुन्हा महासभेपुढे ठेवुन पुर्नविचार करण्यासाठी २.५.२००२ला येते. आणि तुम्ही २००२ म्हणजे जवळपास दोन वर्ष तीन महिन्यानंतर महासभेसमोर येते. विलंब होण्याची कारणे काय?दि. २.५.२००२ साली आले. तेव्हा अभिप्राय घ्यायची गरज वाटली नाही का? सभेपुढे न ठेवण्याची कारणे काय होती? दुसरे इथे पुर्नविचार करायचा म्हणजे नक्की कोणता. प्रशासनाने जी भुमिका मांडलेली आहे इथे शेवटच्या ओळीत स्पष्टपणे म्हंटले आहे. स्थायी समिती ठराव क्र. ६, दि. ३०.६.१९९७ अंशत: विखंडीत करण्याच्या प्रशासनाच्या भुमिकेचा व महापालिकेचे क्षेत्र व कामकाज या बाबी विचारात घेता. महापालिकेचे क्षेत्र म्हणजे १३ चौ. कि.मी. क्षेत्रात एवढया समित्या असणे गरजेचे नाही, आवश्यक नाही म्हणजे अनावश्यक आहे असे आयुक्तांचे म्हणणे आहे. व ते महापालिकेचे क्षेत्र व कामकाज बाबी विचारात घेता शासनाकडे दि.१८.२.२००२ रोजी पाठविलेला स्थायी समितीचा

ठराव अंशत: विखंडीत करण्याचा प्रस्ताव योग्य आहे. हे आयुक्तांचे म्हणणे आहे आणि मग तरी प्रस्तावाची वस्तुस्थिती व प्रस्तावावरील शासनाचे अभिप्राय विचारात घेवुन प्रस्ताव महासभेपुढे पुर्नविचारणेसाठी सादर करण्यात येत आहे. आमच्या श्री. किशारे वनवारी काय किंवा बरेचसे सदस्य म्हणाले पास, पास. तर नक्की पास काय?विखंडीत करण्यात येत असलेला प्रस्ताव योग्य आहे हा पास की नक्की काय? शेवटच्या ओळीतुन काहीच निष्पन्न होत नाही. सचिव साहेब जो प्रस्ताव ठेवला आहे तोच चुकीचा आहे. एकतर ठेवला उशिरा आणि ठेवण्याची पध्दत देखील चुकीची आहे. तुम्हाला सांगायचे काय? काय अपेक्षा आहे महासभेकडुन? चुकून आमचे सदस्य महासभेत पास, पास बोलायचे. यांना बोलायचे असेल भत्ता चालु करा. आणि आयुक्तांची भावना आहे. शासनाने विखंडीत केलेला ठराव आहे तो योग्य आहे.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>शासनाने अजुन तो विखंडीत नाही केला.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>इथे काय म्हंटले आहे.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>मा. महापौर महोदया, हा जो ठराव आहे. ठराव क्र. ६, १९९७ नुसार सगळया पदाधिका—यांना वाहनभत्ता मंजुर केला होता. १९९७मध्ये जेव्हा ठराव पास केला होता. स्थायी समितीत तेव्हा जे पदाधिकारी होते त्यांना वाहनभत्ता देत होते. त्यानुसार त्यावेळचे आयुक्त यांनी हा ठराव शासनाकडे पाठविला होता की, महापालिकेचे क्षेत्रफळ पाहता इतक्या समित्यांची आवश्यकता नाही. म्हणुन शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविला होता. तर शासनाने तो अदयाप पर्यंत विखंडीत केला नाही. पुर्नविचारासाठी महासभेपुढे ठेवला आहे की इतक्या समित्यांची आपणांस आवश्यकता आहे की नाही? जेव्हा आयुक्त साहेबांनी १८ फेब्रुवारी २००२ ला सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तो पण मी यासोबत दिला आहे. तर इतक्या समित्या ठेवायच्या की नाही ठेवायच्या हे आता महासभेला ठरवायचे आहे. महासभेचा निर्णय झाल्यावर आम्ही शासनाकडे तसा ठराव पाठवू.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आयुक्त साहेब, शासनाकडुन जे पत्र आले आहे. २.५.२००२ तुम्ही अडीच वर्षानंतर आज ठेवत आहात. आयुक्त म्हणुन तुम्हाला कधी आता तुम्ही आयुक्तांच्या जागी बसला आहात म्हणुन विचारतो की हा प्रस्ताव त्यावेळी महासभेसमोर ठेवला पाहिजे. कामकाज नियमावलीमध्ये असे आहे. सेक्शन २ नुसार बिझनेस ऑफ ऑर्डर कसे असतात. प्रत्येक महासभेत जे पण महत्वाचे पत्र शासनाकडुन येते. जसे हे पत्र आहे. तुम्हाला कधीच वाटले नाही की हे पत्र सभागृहासमोर ठेवले पाहिजे. अडीच वर्षानंतर तुम्ही सांगत आहात महासभेला.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>मा. महापौर महोदया, हा जो ठराव पास झाला ९७ साली.....

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>नाही. नाही. मी काय विचारत आहे. २.५.२००२ला जेव्हा पत्र येते.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>मी तेच तुम्हाला सांगत आहे. १९९७साली ठराव पास झाला की मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाचे कलम १९ अन्वये शासनाचे आदेश आहेत की वाहनभत्ता नाही दयायला पाहिजे होता तरी पण इथे देत गेले. ही आर्थीक अनियमितता आहे म्हणुन शासनाकडुन मंजुर होवून येईस्तोपर्यंत हे थांबवले आहे. म्हणजे त्यास स्थगिती दिली आहे. हे पत्र आमच्याकडे आले. ऑडीटमध्ये ऑबजेक्शन आले. आमच्या समोर आले आम्ही त्वरीत महासभेसमोर ठेवले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>मी काय विचारतो, त्याचे तुम्ही उत्तर देत नाही आहात. २ मे, २००२ ला जेव्हा पत्र आले होते की, आपण सदर ठरावाचा पुर्नविचार करण्यासाठी महासभेपूढे सूचित करण्यात यावे. तुम्ही या अडीच वर्षात ठेवले का महासभेपूढे........

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>नाही ठेवले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> का नाही ठेवले?

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—</u>आता समोर आले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> समोर तर अडीच वर्षापूर्वी आले ना? २००२ ला आले आहे, तुमच्या समोर कधी आले?

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः–</u>आता ऑडीट ऑब्जेक्शन झाल्यावर माझ्यासमोर आले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आता आले? तुमची सही आहे तेथे तुम्ही जरा उघडून वाचा.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः–</u>२००२ साली मी नव्हतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>जे कोणी आयुक्त होते, आयुक्त ते आयुक्त मग ते कोणीही असो. भले मग तो सोनवणे असो.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः–</u>हे मी मानतो की, ते प्रशासनासमोर आले होते, प्रशासनाच्या लक्षात राहायला पाहिजे होते. माझ्या समोर नव्हते आले. वाहन विभागाकडून जेव्हा आले, तेव्हा मी तुमच्यासमोर ठेवले आहे.

**मा.सदस्या श्रीमती कोमल बठिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः–</u>तुम्ही हे मान्य केले पाहिजे की, आयुक्तांनी हे पत्र सभागृहासमोर ठेवायला पाहिजे होते.

<u>आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारीः–</u>मी तर ते सांगु शकत नाही. परंतु जेव्हा माझ्या समोर आले तेव्हा मी ठेवले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>माझी विनंती आहे की, या सर्वांबरोबर गटनेत्यांना देखिल वाहनभत्ता देण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः–</u>गटनेत्यांची जी वैधानिक स्थिती जी आहे ती फक्त विरोधी पक्षनेता व सभागृहनेता यांना आहे त्यामुळे प्रश्नच उद्‌भवत नाही. मला जरी तुम्ही दिले तरी मी विरोध करीन.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>गटनेता इतके कष्ट करतात, महापालिकेच्या समस्या इथे मांडतात. माझी विंनती आहे की, ठरावात बदल करून गटनेत्यांना १५ हजार दिले जावे असे जोडावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः–</u>आमचे श्री. दिलीप लालवानी व श्री. दिलीप गायकवाड हे गटनेता आहेत. त्यांना पण भत्ता दिला जावा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–</u>सन्माननिय महापौरजी, हा उल्हासनगर महापालिकेचा पैसा आहे. उल्हासनगर मधील जनतेचा पैसा इथे जमा होतो. हा काही एखादया व्यापा–याचा, सेठचा माल नाही की घेतला आणि दान करत सुटले. आमचे मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी म्हंटले की आयुक्तांना २० लाखाची गाडी दया. मी त्यांचे लक्ष वेधु इच्छितो की या उल्हासनगरमधील प्रत्येक प्रभागात जावुन बघा. जे काम आमचे मंजुर झाले आहे. मग तो महापालिका निधी असो वा नगरसेवक निधी असो. काणीही ठेकेदार वर्क ऑर्डर घ्यायला तयार नाही कारण की त्या ठेकेदारांना वेळेवर कामाचे पैसे दिले जात नाही. ज्या महापालिकेत ठेकेदारांना पैसे मिळत नाही. ते ठेकेदार बाहेर जावुन सांगतात ही उल्हासनगर महापालिका नाही राहीली, धर्मशाळा झाली आहे. हिचे दिवाळे वाजले आहे. इथे पैसेच नाही तर काय काम करायचे व अशा परिस्थितीत सत्ताधारी पक्षाचे गटनेता म्हणतात की, २० लाखांची गाडी आयुक्तांना दया. मी तर म्हणेन की ४० लाखाची गाडी दया. स्वतःच्या पैशाने दया म्हणजे माहित पडेल. जनतेच्या पैशाने देण्याचा प्रयत्न करू नये. दुसरे असे की, ठेकेदारांना बिल न दिल्यामुळे आमच्या प्रभागात जो कचरा पसरला आहे. नाल्याचे काम २५० सी. सी. बांधकाम सर्व थांबले आहे आजच्या तारखेत ते काम होत नाही आहे. आधी ठेकेदारांना बिलाचे पैसे दया. काम चालु करून घ्या व आम्हा गटनेत्यांना कुणाला एका रूपयाचा कोणताही निधी जो

दिला गेला आहे. आता सभागृह नेता म्हणाले की गटनेत्यांना वाहनभत्ता दिला पाहिजे. आम्हाला त्याची गरज नाही. तुम्हाला अजुन पाहिजे असेल तर अजुन विषय समित्यांची रचना बनवा व आपल्या कोणत्या सदस्याला १५००० रू. चालु करून घ्या. आम्हाला त्याची गरज नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदया, उल्हासनगर शहरात आयुक्तांनी खुप पैसा वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्रालयात देखिल ते ये—जा करत असतात. डयुटी पेक्षा जास्त ते काम करतात परंतु कुठेही ये—जा करताना कारची अे.सी नादुरूस्त होणे, कार नादुरूस्त होणे. त्यांना नविन गाडी असलीच पाहिजे कारण की वाटले पाहिजे की ते महापालिकेचे आयुक्त आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे आम्ही निवेदन करतो की आयुक्तांना नविन गाडी घ्यायचे निर्देश दयावेत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:—महापौरजी, मी विसरून जाईन आमच्या श्री. दिलीप गायकवाड यांनी महापालिकेची आर्थिक स्थिती सांगुन दु:ख व्यक्त केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन व्यक्त करतो. यापुढे पण त्यांनी याकडे लक्ष दयावे. धन्यवाद.

मा.सचिव:—काय करायचे?

मा. सदस्य श्री. संजय बठीजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—सर्वांना वाहनभत्ता दिला जावा. सन्माननिय सदस्य श्री. पंजाबी सहमत असतील तर गटनेत्यांना देखिल दिला जावा.

मा. सचिव:—गटनेत्यांचा जो प्रश्न आहे. मागील वेळी त्यांच्यासाठी पण मंजुर केले असता शासनाने तो ठराव विखंडीत केला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—ते आयुक्तांनी मंजुर केले होते. कुणी विखंडीत करवला होता हे तुम्हाला माहित आहे.

मा. सदस्या श्रीमती रेखा कारीरा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सचिव:—एकदा शासनाने निर्णय घेतल्यावर त्याचा यात कुठून समावेश होणार?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—ज्याप्रमाणे पंजाबी साहेब म्हणाले त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. श्री. किशोरजी यांचे बंद झाले नाही पाहिजे बाकी सर्वांचे बंद झाले तरी चालेल.

आयुक्तांच्या जागी उपस्थित प्राधिकृत अधिकारी:—मा. महापौर महोदया, हा जो वाहनभत्याचा प्रस्ताव जो आम्ही आणला आहे. तो यासाठी विखंडीत करण्यासाठी पाठविला होता. इथल्या ज्या विषय समित्या आहेत त्यांची इथे एवढी गरज नाही. हे पुर्नविचारासाठी सभागृहासमोर आणले आहे. हे जरूरी आहे की नाही हे तुम्ही ठरवायचे नंतर आम्ही शासनाकडे पाठवु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—पास. पास.

मा. महापौर:—सचिवजी सदरचा प्रस्ताव मतदानास टाकावा.

मा. सचिव:—जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने :—३१ मते</u>

१. श्रीमती रामचंदानी भावना
२. श्री. मुलचंदानी महेंद्र
३. श्रीमती कालानी ज्योती
४. श्री. वाघे शामु
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०.श्री. नाना पवार
११.श्रीमती आहुजा निता
१२.श्री. रुपानी चिमन
१३.श्री निकम शांताराम
१४.श्री. ठाकूर विनोद
१५.श्रीमती सोनेजी मीना (सोंडे)
१६.श्री. गायकवाड सुरेश
१७.श्रीमती वनवारी मोना
१८.श्री. वनवारी किशोर
१९.श्री. लुंड गोविंदराम
२०.श्री. खेमाणी देवेंद्रसिंह
२१.श्री. पमनानी ईश्वर
२२.श्री. पंजाबी नारायण
२३. श्रीमती पंजाबी दिपा
२४.श्री. लबाना होशियारसिंग
२५. श्री. तलरेजा विनोद
२६. श्रीमती भारती छाब्रिया
२७.श्री. संजय बठिजा
२८. श्री. जाधव प्रशांत
२९ श्री. भालेराव गौतम
३०..श्रीमती करोतिया मालती
३१. श्री. रामरख्यानी मोहनदास

<u>मा. सचिव:—</u>जे या प्रस्तावाच्या विरोधाात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात :—१७ मते</u>

१. श्रीमती जावळे संगिता
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. जमनादास पुरस्वानी
५. श्रीमती कृष्णानी रेखा
६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
७. श्रीमती बामणकर नंदिनी
८. श्रीमती खांडेकर प्रेमा
९. श्री. गायकवाड दिलीप

१०. श्रीमती माने किरण
११. श्री. चव्हाण रमेश
१२. श्री. बोडारे धनंजय
१३. श्री. पाटिल विश्वनाथ
१४. श्रीमती ससाणे लक्ष्मी
१५. श्री. चौधरी राजेंद्र
१६. श्रीमती सुर्वे जयश्री
१७. श्री. नथु सोनवणे

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—सचिव साहेब आता दोन ठराव होणार का? जिथ पर्यंत त्यांची सहमती आहे तिथपर्यंत आणि नंतर वेगळा. ठराव दोन तर होणार नाही ना? पुर्णपणे विरोधात आहे का?

मा. सचिव:—त्यांचा विरोध आहे.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १३:— महापलिका पदाधिका—यांना वाहनभत्ता देणे कामी स्थायी समिती ठराव क्र. ६ दि. ३०.४.९७ विचारात घेवून पुर्ननिर्णय घेणे.

प्रस्तावना:—

सन १९९६ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पहिली सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर महापालिकेच्या मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व वैधानिक समित्यांचे सभापती इत्यादी पदाधिकाऱ्यांना, राज्यातील इतर महापालिकेत ज्याप्रमाणे वाहने पुरविण्यात येतात त्याप्रमाणे वाहने पुरविण्यात यावीत. महापालिकेकडे वाहने नसल्याने नवीन वाहने खरेदी करावी लागतील व त्यांच्या देखभालीसाठीसुध्दा खर्च करावा लागेल. ही बाब विचारात घेऊन महानगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांना स्थायी समिती ठराव क्र. ०६, दि. ३०/४/१९९७ अन्वये वाहनाऐवजी पुढीलप्रमाणे वाहनभत्ता मंजुर करण्यात आला आहे.

१) मा. महापौर रु. २१०००/— दरमहा.
२) मा. उपमहापौर रु. २००००/— दरमहा.
३) मा. सभापती स्थायी समिती रु. २००००/— दरमहा.
४) मा. सभागृह नेता रु. १५०००/— दरमहा.
५) मा. विरोधीपक्ष नेता रु. १५०००/— दरमहा.
६) मा. सभापती विषय समिती रु. १५०००/— दरमहा.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १९ (अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेने नियमाद्वारे सदस्यांना शासनाच्या पूर्व मंजुरीने मानधन, फी किंवा भत्ते अनुज्ञेय आहेत. महापालिकेने अद्यापपर्यंत पदाधिकाऱ्यांना दयावयाचे मानधन फी किंवा भत्ते याबाबत नियम केलेले नाहीत.

महापालिकेने तसे नियम केले नसले तरी सदर स्थायी समिती ठराव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविणे आवश्यक होते. परंतु सदर ठराव शासनाकडे न पाठविता पदाधिकाऱ्यांना शासनाच्या मंजूरीशिवाय वाहनभत्ता अदा करण्यात येत होता. त्यानंतर सदर प्रस्ताव दि. १८/२/२००२ च्या पत्रान्वये तत्कालीन आयुक्तांनी सदर ठराव अंशत: विखंडीत करण्यासाठी शासनाकडे पाठविला. सदर प्रस्तावात त्यांनी असे नमुद केले की, महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादी विषयी कामकाजाचे नियम व मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३० अन्वये ठराव करून एक किंवा अधिक विशेष विषय समित्या नियुक्त करता येतील. कल्याण—डोंबिवली, ठाणे व इतर आजूबाजूच्या परिसरातील महानगरपालिकेत त्यांच्या विशेष विषय समित्यांची संख्या पाचपेक्षा अधिक नाही.

महापालिकेत प्रभाग समित्यांची रचना वैधानिक असून विशेष विषय समित्यांची रचना ऐच्छिक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ १३ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचे आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे कामकाज ०४ प्रभाग समित्या व ०८ विशेष समित्या यांच्याकडे सोपविले जाते. सदर विशेष समित्यांकडे कामकाज नसल्याने सन १९९७ ते २००२ या कालावधीमध्ये एका सरकारी वर्षात दोन किंवा तीनपेक्षा अधिक सभा झाल्या नाहीत. परंतु सभापतींना दरमहा १५,०००/— रूपये इतका वाहनभत्ता देय असतो.

माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती यांची रचना करणे अयोग्य आहे कारण महापालिकेकडे माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी काहीही सोय व व्यवस्था उपलब्ध नाही आणि सन १९९७ ते २००२ पर्यंत संबंधित समितीच्या रचनेनंतर त्याविषयी काही उपलब्धी आलेली नाही. म्हणून या विशेष विषय समितीची रचना करता कामा नये. तसेच क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतीक कार्यक्रम समिती यांच्या प्रयोजनासाठी महापालिकेकडे काहीही उपक्रम वा उपाययोजना नाहीत म्हणून या विशेष विषय समितीची रचना करता कामा नये. चार प्रभाग समित्यांच्या रचना संविधानिक/वैधानिक असुन प्रभाग समितीची कामे पाणी पुरवठा, जल नि:सारण स्वच्छता आणि पावसाळयात तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट यासारख्या स्थानिक व अत्यावश्यक सेवा पालिका प्रशासनाने त्वरित दूर करणे आवश्यक आहे. म्हणून पाणी पुरवठा व जल नि:सारण समिती आणि आरोग्य व वैयक्तिक सहाय्य समिती यांचे कामकाज व प्रभाग समितीचे कामकाज समसमान असल्याने भांडणे निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या दोन्ही समितीची रचना अयोग्य ठरेल.

१) उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असून रु. १३७.०० कोटी इतके दायित्व आहे.

२) रु. ९० कोटी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला पाणी बिलापोटी देणे थकबाकी आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे २० कोटी रूपये अंडर ग्राउंड ड्रेनेज स्कीमसाठी देणे बाकी आहे.

३) उल्हासनगर महानगरपालिका हे फक्त १३ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचे शहर आहे. त्यामध्ये ०४ प्रभाग समित्या व ०८ विशेष समित्या इतक्या प्राधिकरणाकडे महापालिकेचे कामकाज सोपविणे अयोग्य आहे.
४) प्रभाग समित्यांची रचना वैधानिक आहे व विशेष समित्यांची संख्या ऐछिक आहे.
५) महापालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने प्रभाग समित्या किंवा विशेष समित्यांना कामकाज उपलब्ध होत नाही.
६) सन १९९७ ते २००२ या कालावधीत कुठल्याही विशेष विषय समितीकडे कामकाज नसल्याने कुठल्याही एका सरकारी वर्षात दोनपेक्षा जास्त सभा झाल्या नाहीत. परंतु प्रत्येक विशेष विषय समितीच्या सभापतींना प्रतिमाह रु. १५,०००/— वाहनभत्ता देय असतो. कामकाज नसतांना रु. १५,०००/— प्रतिमाह ०८ सभापतींना वाहनभत्ता देय असतो आणि प्रतिमाह १,२०,०००/— खर्चाचे ओझे महापालिकेस सहन करावे लागते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८ प्रमाणे एवढया मोठया परिवहन उपक्रम/सेवेकरीता परिवहन समितीचे सभापतींना समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी वाहन खर्च अनुज्ञेय आहे. विशेष विषय समितीच्या सभापतींना केवळ प्रत्येक महिन्याच्या एका सभेस उपस्थित रहायचे आणि

त्यांच्या विषय सुचीतील कामकाजाचे निर्णय घ्यायचे असतात. त्या व्यतिरिक्त अन्य काही कामकाज नसते म्हणून महापालिकेच्या निधीचा दूरुपयोग, गैरवापर किंवा अपव्यय होवू नये, त्याअर्थी स्थायी समिती ठराव क्र. ०६, दि. ३०/४/१९९७ विशेष विषय समिती सभापतींना वाहनभत्ता देणे संबंधीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५१ च्या तरतुदीद्वारे उपरोक्त ठराव अंशत: विखंडीत करण्यात यावा. सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेण्यापुर्वी दि. २/५/२००२ च्या पत्रान्वये 'सदर ठरावाचा पुन्हा विचार करण्याबाबत महासभेस सुचित करण्यात यावे' असे कळविले आहे.

दरम्यान महालेखापाल, मुंबई यांनी लेखा परिक्षणात सन १९९७ –९८ ते सन २००१–२००२ या कालावधीमध्ये महापालिकेचे पदाधिकारी व ०८ विषय समित्यांचे सभापती यांना शासनाच्या पुर्वमंजुरीशिवाय रु. ६३.९१ लक्ष इतका वाहनभत्ता अदा केला असल्याने ही वित्तीय अनियमितता असल्याचा आक्षेप घेतला आहे. सदर वित्तीय अनियमितता टाळण्यासाठी पदाधिकाऱ्यांना देण्यात येत असलेला वाहनभत्ता शासनाची मान्यता मिळेपर्यंत दि. २२/७/२००४ च्या आदेशान्वये अदा करण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे.

*स्थायी समिती ठराव क्र.०६, दि. ३०/६/१९९७ अंशत: विखंडीत करण्याच्या प्रशासनाच्या भुमिकेचा व महापालिकेचे क्षेत्र व कामकाज ह्या बाबी विचारात घेता शासनाकडे दि. १८/२/२००२ रोजी पाठविलेला स्थायी समितीचा ठराव अंशत: विखंडीत करण्यासाठीचा प्रस्ताव योग्य आहे. तरी प्रस्तावाची वस्तुस्थिती व या प्रस्तावावरील शासनाचे अभिप्राय विचारात घेऊन प्रस्ताव महासभेपुढे पुर्नविचारासाठी सादर करण्यात येत आहे.*

<u>महासभा ठराव क्र :–</u> ३७ <u>दिनांक:–१९/८/२००४.</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गौतम भालेराव

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दि. ३०.६.९७ चा स्थायी समिती ठराव क्र. ६ त्यात झालेल्या सुधारणांसह जसा आहे तसा कायम करित आहे व शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन सदरहु ठरावान्वये महानगरपालिकेतील पात्र पदाधिका–यांना स्वत:चे वाहन वापर खर्चापोटी विर्निदिष्ट केलेल्या प्रतीपुर्तीची ठराविक रक्कम अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १४:— उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. आर. आर. सावकारे यांना उप अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

यांना एका वर्षाची मुदत देण्याची आवश्यकता भासणार नाही. कारण की आधी त्यांना उप अभियंता म्हणुन आणले गेले होते. परंतु आता त्यांना कार्यकारी अभियंता पदावर बढती मिळाली आहे. हा जो प्रस्ताव आहे तो जितक्या कालावधीसाठी ते उप अभियंता म्हणुन होते. तेवढयाच कालावधीची आम्हाला मान्यता घ्यायची आहे.

काही सदस्यः—पास. पास.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १४:— उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. आर. आर. सावकारे यांना उप अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः—

मुख्य अभियंता, (कोकण विभाग) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र मजीप्रा / मु. अ. (को. वि) / प्र. क्र. ३७३ (३)/ आस्था/२/१७४७ दि.१०.०६.०४ अन्वये श्री आर. आर. सावकारे, यांची उप अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री आर. आर. सावकारे, हे या महानगरपालिकेत उप अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.१८.०६.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या उप अभियंता, उत्तर क्षेत्र, उल्हासनगर—३, या विभागाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. तरी त्यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्रः— ३८ दिनांकः—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. आर. आर. सावकारे, उप अभियंता, (पाणी पुरवठा विभाग) यांना महानगरपालिका सेवेत दि. १८.६.०४ ते दि. १५.८.०४ या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १५ः—उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस. बी. पाटील यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—एक वर्षासाठी पास.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १५ः—उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस. बी. पाटील यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः—

मुख्य अभियंता, (कोकण विभाग), मजीप्रा / मु. अ. (को. वि) / प्र. क्र. ३७३ / आस्था/१७६५ दि.१४.०६.०४ अन्वये श्री बी. एस. पाटील, यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री बी. एस. पाटील, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.१७.०६.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत. तरी श्री बी. एस. पाटील, शाखा

अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

**महासभा ठराव क्रः– ३९** **दिनांकः–१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :– श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती संगिता जावळे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. एस. बी.पाटील यांना शाखा अभियंता, (पाणी पुरवठा विभाग) यांना महानगरपालिका सेवेत दि. १७.६.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः–विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १६ः– उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस. एन. जाधव, यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

काही सदस्य :–पास. पास.

मा. महापौरः–सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १६ः– उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस. एन. जाधव, यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः–

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र ३१२ दि. १८.०६.०४ अन्वये श्री एस. एन. जाधव, यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर

महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री एस. एन. जाधव, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.२९.०६.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री एस. एन. जाधव,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी त्यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र:— ४० दिनांक:—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती निता आहुजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. नाना पवार

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री एस. एन. जाधव शाखा अभियंता, (पाणी पुरवठा विभाग) यांना महानगरपालिका सेवेत दि. २९.६.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १७:—</u> उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. व्ही. एम. विसपुते यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १७:—</u> उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. व्ही. एम. विसपुते यांना शाखा अभियंता (पाणी पुरवठा विभाग) या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र ३४३ दि. २९.०६.०४ अन्वये श्री व्ही.एम.विसपुते, यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एका वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे.

श्री व्ही.एम.विसपुते, हे या महानगरपालिकेत शाखा अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.०७.०७.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत व सध्या शाखा अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्री व्ही.एम.विसपुते,यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा आहे .तरी त्यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर सादर केला आहे.

**महासभा ठराव क्र:— ४१** **दिनांक:—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री व्ही.एम.विसपुते शाखा अभियंता,(पाणी पुरवठा विभाग) यांना महानगरपालिका सेवेत दि. ७.७.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १८ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १८:—</u> महापालिकेतील पात्र अधिका—यांना स्वत:चे वाहन वापर प्रतीपुर्तीची ठराविक रक्कम सवलत लागु करणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १८:— महापालिकेतील पात्र अधिका—यांना स्वत:चे वाहन वापर प्रतीपुर्तीची ठराविक रक्कम सवलत लागु करणे.

प्रस्तावना:—

शासनाच्या वित्त विभागाकडील दि. १० सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णया द्वारे शासकिय व इतर कार्यालयातील अधिका—यांना शासकिय कामासाठी स्वत:चे वाहन वापरण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरीता वाहन धोरण विहीत करण्यात आले होते. त्यामध्ये वाहन वापराच्या खर्चाची प्रतिपुर्ती ठरविण्यासाठी व प्रति कि. मि. दरा संबंधी निर्देशांक सुत्र विहीत करण्यात आले होते. त्यानुसार महासभा ठराव क्र. ९० दि. २८/१/२००३ अन्वये महापालिकेतील अधिका—यांना कार्यालयीन कामासाठी स्वत:चे चार चाकी वहान खरेदी करण्याची व वाहन वापर खर्चाच्या प्रतिपुर्तीचे दिलेल्या मंजूरी प्रमाणे वाहन खर्च प्रतिपुर्ती देय होती.

शासनाने त्यांचेकडील दि. १३ मार्च २००३ च्या शासन निर्णयाद्वारे निर्देशांक सुत्रामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. :— १

| सुत्र | | | उदाहरण, | |
|---|---|---|---|---|
| १ | वाहनाची किंमत | क्ष | मारूती व्हॅन | २,४५,२८२/— |
| २ | कर्ज (वाहनाच्या किंमतीच्या ८५ टक्के) | य | कर्ज | २,०८,४८९ |
| ३ | व्याज (१२ टक्के ) वार्षिक | र | व्याज | २९,४३३ |
| ४ | घसारा (१० टक्के) वार्षिक | ल | घसारा | २५,०१८ |
| ५ | वाहन चालकाचा पगार (रू. ३५०० स्थिर) दरमहा | व | वाहन चालकाचा पगार | ४२,००० |
| ६ | देखभाल दुरूस्ती वार्षिक(२ टक्के) | ष | देखभाल दुरूस्ती | ४,९०६ |
| ७ | एक वेळचा कर (भागीले १०) | स | एक वेळचा कर (अंदाजे) | १,००० |
| ८ | विमा | ह | विमा (अंदाजे) | ३०० |
| | | | एकूण | १,०२,६५७ |
| | | | मासिक | ८,५५५ |
| सूत्र त्र (र+ल+व+ष+स+ह) भागीले १२ | | | | |

प्रति किलो मिटर. दरा संबंधी निर्देशांक सुत्र

तक्ता क्र. २

| | | |
|---|---|---|
| १ | एकूण मि.मी. ''अ'' | १३५० कि.मी. (महापालिकेचे क्षेत्रानुसार) |
| २ | कि. मी. प्रति लिटर ''ब'' | १२ कि.मी (सरासरी) |
| ३ | खर्च प्रति लिटर — ''क'' | रू. ३१ (पेट्रोल)<br>रू. २० (डिझेल) |
| सुत्र ''अ'' भागिले ''ब'' गुणीले ''क'' | | रू. ३,४८७ (पेट्रोल)<br>रू. २,२५० (डिझेल) |

तक्ता क्र. १+२= अनुज्ञेय प्रतिपूर्ती

महापालिकेतील अधिका—यांना वाहन प्रतिपुर्तीचे खर्चाची रक्कम देणेत येते अशा अधिका—यांना या पुढे शासनाचे सुधारीत निर्णयानुसार वरिल निर्देशांक सुत्राप्रमाणे पेट्रोल व डिझेल वाहनासाठी दरमहा अनुक्रमे रू. १२,०००/— व रू. १०,५००/— एवढी रक्कम देय होईल. याप्रमाणे वाहन खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम

महापालिकेतील अधिका—यांना/वाहन धारकांना अदा करण्यासाठी महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ४२ दिनांक:—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासनाच्या धोरणानुसार महापालिकेतील पात्र अधिका—यांना स्वत:चे पेट्रोल / डिझेल वाहन वापर खर्चापोटी दरमहा अनुक्रमे रूपये १२,०००/— व रूपये १०,५००/— एवढी प्रतिपुर्तीची ठराविक रक्कम सवलत लागु करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. १९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १९:— उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री.संजय अ. दुसाने यांना उप आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—एका वर्षासाठी.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १९:— उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री.संजय अ. दुसाने यांना उप आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि. २७ जुलै, २००४ च्या आदेशान्वये श्री. संजय ज. दुसाने, मुख्याधिकारी यांची या महापालिकेत उप आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. संजय ज. दुसाने हे या महापालिकेत उप आयुक्त या पदावर दि. ३०.७.२००४ पासून कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार श्री. संजय ज. दुसाने, उप आयुक्त यांच्या प्रतिनियुक्तीच्या ३ वर्षाच्या कालावधीच्या नियुक्तीस महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव कृ. ४३ दिनांकः—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री संजय ज. दुसाने, मुख्याधिकारी यांना महानगरपालिका सेवेत उपायुक्त या पदावर दि. ३०.७.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः—</u>विषय क्र. २० वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २०:-</u> महापालिका शिक्षण मंडळातील सदस्यांना मानधन व बैठक भत्ता अदा करणे कामी शिक्षण मंडळाचा ठराव क्र. ४७ दि. ७.८.२००३ कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>आमच्या शिक्षण मंडळाचे सदस्य आहेत त्यांना जेव्हा पासुन मंडळ बनले आहे तेव्हा पासुन देण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u>नाही. नाही. आता ठराव आला आतापासुन देण्यात यावे.

<u>मा. सचिवः—</u>पुर्वलक्षी प्रभावाने नाही.

<u>मा. सदस्य श्री. प्रशांत जाधवः—</u>जेव्हा पासुन मंडळ अस्तित्वात आले तेव्हापासुन दया.

<u>मा. सचिवः—</u>जेव्हा पासुन शासनाने मंजुर केले तेव्हापासुन.

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. २०:—</u> महापालिका शिक्षण मंडळातील सदस्यांना मानधन व बैठक भत्ता अदा करणे कामी शिक्षण मंडळाचा ठराव क्र. ४७ दि. ७.८.२००३ कायम करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि. १६ ऑगस्ट, २००१ च्या शासन निर्णयाव्दारे शासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम , १९४९ चे कलम १९ (अ)(१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महापालिका सदस्यांना मानधन रू. ३, ०००/— दरमहा व सभेप्रित्यर्थ भत्ता रू. १००/— अदा करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महापालिका सदस्यांना मानधन व बैठकभत्ता देण्यात येतो.

त्याचधर्तीवर महानगरपालिका शिक्षण मंडळाने ठराव क्र. ४७ दि. ७.८.२००३ अन्वये महापालिका शिक्षण मंडळातील सदस्यांना मानधन व बैठक भत्ता देण्याचा प्रस्ताव पारित करून महापालिकेकडे पाठविला आहे.

शिक्षण उप संचालक, मुंबई यांनी दि. १२.७.२००४ च्या पत्रान्वये शिक्षण मंडळातील सदस्यांना महानगरपालिका सदस्यांना देण्यात येणारे मानधन व बैठक भत्ता इतकेच देण्यात यावे व त्यापेक्षा जास्त असु नये, त्यासाठी महापालिकेच्या निधीतून खर्च करावा असे नमुद केले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार शिक्षण मंडळातील सदस्यांना महापालिका सदस्यांना मानधन रू. ३, ०००/— दरमहा व बैठक भत्ता रू. १००/— बाबत निर्णय होण्यासाठी महासभेच्या पटलावर ठेवण्यात येत आहे. तथापि, शिक्षण मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्य झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, ही बाब महासभेच्या निर्दशनास आणण्यात येत आहे.

सदर प्रस्तावास शासनाची पुर्व मंजुरी घ्यावी लागेल. तोपर्यंत शिक्षण मंडळातील सदस्यांना मानधन व बैठकभत्ता अदा करता येणार नाही. अन्यथा सदरची बाब ही वित्तिय अनियमितता होवून लेखा परिक्षणात आक्षेप उपस्थित होवू शकतात.

सदर प्रस्ताव मान्य झाल्यास सुमारे रू. ४. ५० लक्ष इतका अतिरिक्त वार्षिक खर्च महापालिकेला करावा लागेल. त्यासाठी शिक्षण मंडळाच्या व महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतुद करावी लागेल.

शिक्षण मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर मानधन व बैठक भत्ते पुर्वलक्षी प्रभावाने देण्यात येवू नयेत असे स्पष्ट मत आहे.

महासभा ठराव कृ. ४४ दिनांक:—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातील सदस्यांना वर उल्लेख केलेला मानधन व बैठक भत्ता अदा करणे कामी शिक्षण मंडळाचा ठराव क्र. ४७, दि. ७.८.२००३ कायम करित आहे.

## परंतु ———

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातील सदस्यांना दिनांक १२/७/२००४ पासून सदरहू मानधन व बैठक भत्ता अदा करता येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव:—**विषय क्र. २१ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २१ :—** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस.व्ही. जाधव यांना शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—**आधी काम पहा मग एक वर्षासाठी करा. सहा महिने ठिक आहे.

**मा. महापौर:—**कोणीही अधिकारी सहा महिन्यासाठी येतो का? एक वर्षासाठी तर केले जाते ना.

**काही सदस्य :—**पास. पास.

**मा. महापौर:—**सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. २१ :—** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत श्री. एस.व्ही. जाधव यांना शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि. ३० जुलै, २००४ च्या आदेशान्वये श्री. एस. व्ही. जाधव यांची या महापालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. एस. व्ही. जाधव हे या महापालिकेत शहर अभियंता या पदावर दि. ३०.७.२००४ पासून कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार श्री. एस. व्ही. जाधव, शहर अभियंता यांच्या प्रतिनियुक्तीच्या ३ वर्षाच्या कालावधीच्या नियुक्तीस महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव कृ.** ४५ **दिनांक:—**१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. एस. व्ही. जाधव, शहर अभियंता यांना दि. ३०.७.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः—</u>विषय क्र. २२ वाचुन दाखवितात.

**<u>fo"k; Ø- 22%&</u>** mYgkluxj 'kgjkr 'kqJq"kkx`g uksan.kh dkeh izLrkfor
mifo/khps elqnk ekU; dj.ks-

<u>मा. सचिवः—</u>शहरात जितके पण नर्सिग होम आहेत. त्यांच्यासाठी उपविधी तयार करत आहोत. त्याआधारावर प्रत्येक नर्सिग होमला महापालिकेमध्ये नोंदणी करावी लागेल. त्यांनतर त्याचा फायदा काय होईल. त्यांच्याकडे कुणाचाही जन्म व मृत्यु झाल्यास कशात—हेने त्यांनी उपचार केले होते ती सर्व माहिती महापालिकेला उपलब्ध होईल. कुठे कॉलरा झाला किंवा काय झाले? त्याची माहिती इकडे उपलब्ध होईल. यामुळे महापालिकेचे त्यांच्यावर नियंत्रण असेल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>परवानगी घ्यायला त्रास तर होणार ना?

<u>मा. सचिवः—</u>रजिस्ट्रेशन करायचे आहे फक्त. पास?

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. २२ः—</u> उल्हासनगर शहरात शुश्रुषागृह नोंदणी कामी प्रस्तावित उपविधीचे मसुदा मान्य करणे.

<u>प्रस्तावनाः—</u>

मुंबई शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम १९५० चे कलम १ चे पोटकलम २ व ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने दिनांक १०/०६/२००३ च्या शासकीय राजपत्रात अधिसूचनेद्वारे सदर कायदा उल्हासनगर शहरासाठी लागु करण्याचे निर्देश दिलेले आहेत. उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत येणा—या क्षेत्रांना उक्त अधिनियमाचे कलम २ ते १८ च्या तरतुदी दिनांक १५/६/२००३ पासुन लागु करण्यात आलेल्या आहेत.

सदरचा कायदा अंमलात आणण्यापूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेने ''मुंबई शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम १९५० च्या कलम १७'' शी विसंगत नसेल अशी उपविधी तयार करणे आवश्यक आहे. शुश्रुषालयावर नियंत्रण ठेवण्याकरिता सदर उपविधीची आवश्यकता असते. सदर उपविधी शासनातर्फे कायम झाल्यावर शुश्रुषालयांवर नियंत्रण ठेवण्याची पध्द्त निश्चित होईल व त्यामुळे पुढीलप्रमाणे महापालिकेला माहिती मिळु शकेल.

अ) शहरातील प्रत्येक शुश्रुषालयाची योग्य प्रकारे नोंदणी केली जाईल.
ब) शहरातील प्रत्येक शुश्रुषालयात दाखल होणारा रुग्ण किंवा जन्मलेले बालक यांचा अभिलेख महापालिकेला उपलब्ध होवु शकेल.
क) शुश्रुषालयात दाखल होणा—या रुग्णांची वर्णक्रमे निर्देश सुची महापालिकेला केव्हाही प्राप्त होवु शकेल.
ड) तीव्र आजाराने ग्रस्त असलेल्या प्रत्येक रुग्णाच्या प्रकृतीतील चढउताराचा दैनंदिन अभिलेख महापालिकेला उपलब्ध होवु शकेल.
इ) शुश्रुषालयात बाळंतपणाकरिता दाखल झालेल्या आणि अशा प्रत्येक स्त्रीला शुश्रुषालयात झालेल्या बालकांच्या प्रकृतीतील चढउताराचा अभिलेख महापालिकेला उपलब्ध होवु शकेल.

उपरोक्त माहिती व्यतिरिक्त अतिरिक्त माहिती महापालिकेला शहरातील सर्व शुश्रुषालयांची नोंदणी झाल्यानंतर उपलब्ध होवु शकेल.

जर उपविधीचा मसुदा महापालिकेतर्फे विचाराअंती मान्य करण्यात आला तर सदर सदारचा मसुदा महापालिकेतर्फे शहरातील नागरिकांचे आक्षेप दाखल करण्यासाठी प्रसिध्द् करण्यात येईल, त्यानंतर नागरिकांचे आक्षेप ऐकणे व असे सर्व आक्षेप व सूचना महापालिकेपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. त्यानंतर महापालिकेच्या अंतिम मान्यतेने प्रस्तावित उपविधीचा मसुदा शासनाकडे कायम करण्यासाठी पाठविण्यात येईल. शासन सदर उपविधीमध्ये फेरबदल अथवा निरसीत करु शकेल.

त्याअर्थी महापालिकेने उपविधीचा मसुदा तयार केला असुन सोबत जोडला आहे. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्रः— ४६**
**दिनांकः—१९/८/२००४.**

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरात शुश्रुषागृह नोंदणी व त्या अनुषंगानेच्या प्रयोजनाकामी प्रस्तावित उपविधींचा मसुदा मान्य करित आहे व प्रशासनास पुढील निर्देश देत आहे.

१. प्रस्तावित उपविधीबाबत ज्या तारखेस महापालिका अंतिमरित्या निर्णय घेणार असेल त्या तारखेच्या निदान सहा आठवडे आधी शासकीय राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रामध्ये नोटीस देणे.
२. अशा उपविधीची एक मुद्रित प्रत महापालिकेच्या मुख्य कार्यालयात ठेवणे.
३. नोटीसीच्या तारखेपासुन निदान एक महिन्यापर्यंत तिचे अवलोकन करू इच्छिणा—या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वाजवी वेळी ती पाहण्यासाठी विनामुल्य उपलग्ध करून देणे.
४. सदरहु उपविधीच्या मुद्रित प्रती ज्या व्यक्तीस आवश्यक असतील अशा कोणत्याही व्यक्तीस आयुक्त प्रत्येक प्रतीसाठी ठरवतील अशी फी देण्यात आल्यावर त्या देणे.
५. सदरहु नोटीसीच्या तारखेपासुन निदान एक महिन्याच्या आत, त्या संबंधी कोणत्याही व्यक्तीकडुन जे लेखी आक्षेप घेण्यात येतील आणि ज्या लेखी सूचना करण्यात येतील ते सर्व आक्षेप आणि सूचना आयुक्तांच्या अभिप्रायासह महासभेपुढे ठेवणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः—</u>आयत्यावेळचा विषय आहेत. विषय क्र. २३ सर्वानुमते वगळण्यांत आला आहे.

<u>विषय क्र. २३ः—</u> उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील वालधुनी नाल्यावरील अर्धवट अवस्थेत असलेले काम पुर्ण करणेबाबत.

आयत्यावेळचा विषय क्र. २४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २४ः—</u> उल्हासनगर ३, येथील शांती नगर प्रवेशद्वाराच्या बाजूला असलेल्या जागेत सुशोभिकरण करणे व दिवंगत प्राचार्य

के. एम. कुंदनानी यांचा पुतळा उभारणे बाबत.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्यावेळचा विषय:—

विषय क्र. २४:— उल्हासनगर ३, येथील शांती नगर प्रवेशद्वाराच्या बाजूला असलेल्या जागेत सुशोभिकरण करणे व दिवंगत प्राचार्य के. एम. कुंदनानी यांचा पुतळा उभारणे बाबत.

प्रस्तावना:—

उपरोक्त विषयाबाबतचे पत्र श्री. दिनेश पंजवानी, प्राचार्य सी.एच.एम. कॉलेज यांचेकडून शांती नगर येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारा जवळ असलेल्या जागेमध्ये उद्यान विकसीत करणे व उद्यानाची देखभाल महाविद्यालयाच्या खर्चाने करणे व प्रवेशद्वाराच्या मध्यभागी कै. के.एम. कुंदनानी यांचा अर्धअकृती पूतळा बसविणे असा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावास अनुसरून प्रशासनाने सुशोभिकरणाचा आराखडा मागविला आहे. सदर प्रस्तावाप्रमाणे सुशोभिकरण केल्यास शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. सबब या प्रस्तावा बाबत सकारात्मक विचार होणे आवश्यक आहे.

कै. के. एम. कुंदनानी यांची जन्मशताब्दी दि. २४ ऑगस्ट रोजी असून सदर दिवशी प्रस्तावित कामाचा आरंभ करण्याच्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा मानस आहे. सदर बाब लक्षात घेऊन दि.१९.८.२००४ च्या महासभेत सदर प्रस्ताव आयत्या वेळचा विषय म्हणुन सूचीत समाविष्ठ करण्यात यावा.

महासभा ठराव कृ. ४७ दिनांक:—१९/८/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंह खेमानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर—३ येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज प्रवेश व्दाराच्या बाजुला असलेल्या जागेमध्ये श्रीमती चांदीबाई हिंम्मतमल मन्सुखानी महाविद्यालयाच्या स्वखर्चाने उद्यान विकसित करणे व प्रवेशव्दाराच्या मध्यभागी कै. के. एम. कुंदनानी यांचा अर्धकृती पुतळा बसविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

*जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर मालती करोतिया यांनी जाहिर केले.*

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२०/१०/२००४

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१०/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.१०.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. उप—महापौर, श्रीमती जया साधवानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | २९. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ३. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३०. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. वाघे शामु बाबु | ३१. | श्री. सुरेश जाधव |
| ५. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ३२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ६. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ३३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ८. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३५. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ९. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ३६. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १०. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ११. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १२. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ३९. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १३ | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १५. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४२. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १६. | श्री. नाना आनंदा पवार | ४३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १७. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| १८. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ४५. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| १९. | श्री. शांताराम निकम | ४६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २०. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४७ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २१. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४८. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २२. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४९. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५१. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी, |
| २५. | श्री. लुंड गोविंदराम | ५२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २६. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ५३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २८. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ५५. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर

१. मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया तसेच मा. सदस्य / सदस्या २. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, ३.श्री. सोनवणे नथु काशिराम,४.श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर, ५.श्री. टेकचंदानी राजु, ६. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ७. श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र, ८. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ९. श्री. सुरेश नामदेव गायकवाड, १०. श्रीमती. वनवारी मोना अशोक, ११.श्री. मोहन साधवानी, १२.श्री. जेसवानी सतराम पुनमदास, १३. श्रीमती. जयश्री

सुर्वे, १४. श्री. दर्शनसिंह खेमाणी, १५. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, १६. श्री.भालेराव गौतम यशवंत, १७. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १८. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, १९. श्रीमती किरण माखिजा, २०.श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना, २१.श्री. विनोद चंदीराम तलरेजा, २२.श्री. बहरानी मोहन वर्यलदास, २३. श्री. हरदास माखिजा, २४. श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास , २५. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ हे सभेस अनुपस्थित होते.

मा. महापौरांच्या अनुपस्थितीत मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी हया पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ .२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. नारायण पंजाबी हे सोडुन उपस्थित सर्व सत्ताधारी पक्षाचे सदस्य सभागृहाबाहेर गेले.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**गणपूर्ती अभावी आजची सभा रद्द केली जावी.

**मा. सचिव:—**सभा रद्द करता येणार नाही. सभेचे कामकाज स्थगित करावे लागेल.

**मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—**आजची सभा गणपुर्ती अभावी पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

या घोषणेनंतर शिवसेना—भाजपाच्या सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४ ३० वाजता सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करत असल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२९/१०/२००४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२९/१०/२००४ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.१०.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करून पुढे ढकलण्यांत आल्याने सदरची सभा शुक्रवार दि. २९.१०.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | २८. | श्री. जाधव प्रशांत |
| ३. | .श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | २९. | श्री. सुरेश जाधव |
| ४. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३०. | श्री. दर्शनसिंह खेमाणी, |
| ५. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ६. | श्री. वाघे शामु बाबु | ३२. | श्री.भालेराव गौतम यशवंत, |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, |
| ८. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ३४. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ३७. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ३८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १३ | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३९. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १४. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १५. | श्री. नाना आनंदा पवार | ४१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १६. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४२. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १७. | श्री. शांताराम निकम | ४३. | श्रीमती किरण माखिजा, |
| १८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ४६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ४७ | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २२. | श्री. मोहन साधवानी | ४८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ४९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्री. लुंड गोविंदराम | ५०. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| २५. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २६. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ५२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २७. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ५३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर

१. मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया. तसेच मा. सदस्य / सदस्या २.श्री. सोनवणे नथु काशिराम,३.श्री. टेकचंदानी राजु, ४.श्रीमती. सीमा चंदाराम मोकल, ५.श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ६. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ७. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ८. श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र, ९.श्री. रूपानी चिमन

अमरूमल, १०. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ११. श्री. टाले प्रमोद नामदेवराव, १२. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) , १३.श्रीमती. वनवारी मोना अशोक, १४. श्री. रमेश चव्हाण, १५.श्रीमती भावना रवी खिलनानी , १६. श्रीमती. जयश्री सुर्वे, १७.श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १८. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, २०. श्रीमती. भटीजा कोमल अमृत, २१. श्री. जयसिंघानी अनिल, २२. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण, २३.श्री. विनोद चंदीराम तलरेजा, २४. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, २५. श्री. हरदास माखिजा, २६.श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास , २७. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सचिव साहेब मा. महापौर व उप—महापौर अनुपस्थित असल्याने व गणपुर्ती असल्याने सभेचे कामकाज चालविण्यासाठी उपस्थित सदस्यांमधून एकाची पीठासीन अधिकारी म्हणून निवड करण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>सचिव साहेब, आजच्या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून आम्ही श्री. किशोर वनवारी यांचे नाव सुचवित आहोत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकूर :—</u> आम्ही त्यांचे नावाला अनूमोदन देत आहोत.

<u>मा. सचिव :—</u> कोणाला काही हरकत आहे काय?

<u>काही सदस्य :—</u> नाही—नाही.

यावेळी श्री. किशोर वनवारी हे सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणून आसनस्थ झाले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u>मा. महापौरजी, आमच्या शहराचे आमदार श्री. पप्पु कालानी हे पुन्हा विधानसभेवर निवडुन आल्याबद्दल पुर्ण सभागृहाच्या वतीने व पूर्ण शहराचे वतीने आम्ही त्यांना शुभेच्छा देतो.

मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला. आणि त्या पीठासीन अधिका—यांच्या स्थानी आसनस्थ झाल्या. व श्री. किशोर वनवारी हे आपल्या स्थानावर आसनस्थ झाले.

यावेळी श्री. किशोर वनवारी व श्री. मनोज साधवानी वगळता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य सभागृहातुन बाहेर गेले. व त्याव्यतिरिक्त शिवसेना भाजपाचे खालील सदस्य सभागृहात उपस्थित होते.

***मा. श्रीमती. संगिता जावळे, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर,श्री. दिलीप गायकवाड,श्री. उमाप रामदास, श्री. बच्चाराम रूपचंदानी,श्री. राज असरोंडकर,श्रीमती माने किरण,श्री. पाटील विश्वनाथ,श्रीमती कृष्णानी रेखा, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे, श्री. पुरस्वानी जमनादास.***

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी):—</u>.गणपुर्ती अभावी सभा स्थगित केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>या स्थगित सभेसाठी गणपुर्तीची आवश्यकता नाही ना?

<u>मा. सचिव:—</u>नियम असा आहे की, दोन सभांमध्ये गणपुर्ती नसेल तर तिस—या सभेस गणपुर्तीची आवश्यकता नाही. गणपुर्ती अभावी..........

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>हे तर चुकीचे आहे. सत्ताधारी पक्ष सभा बोलावतो परंतु सभा सूचनेवरील विषयांवर चर्चा करत नाहीत. मला असे वाटते की हे असे पहिल्यांदाच होत आहे की सभा बोलवायची परंतु सभा सूचनेवरील

विषयांवर चर्चा करायची नाही. ही चुकीची प्रथा आहे व मला असे वाटते की, सत्ताधारी पक्षाचे हे बेजबाबदार पणाचे काम आहे. आम्ही त्यांचा निषेध करतो.

पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—गणपुर्ती अभावी सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत पुढे ढकलत आहे.

मा. सचिव :— . मा. पीठासीन अधिकारी यांनी ही सभा पूढील सूचना देईपर्यंत स्थगित केली आहे. कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४. ३५ वाजता सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत स्थगित केल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—४/११/२००४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.४/११/२००४ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.१०.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करून दि. २९.११.०४ रोजी आयोजित करण्यांत आली होती. ही सभा पुन्हा स्थगित करून गुरूवार दिनांक ४.११.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :— श्रीमती मालती करोतीया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३१. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३२. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३३. | श्री. प्रशांत सुरेश जाधव |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३४. | श्री. सुरेश जाधव |
| ६. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ३५. | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३६. | श्री. दर्शनसिंग खेमाणी |
| ८. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ३७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३९. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४०. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४१. | श्री. भालेराव गौतम |
| १३ | श्रीमती बामणकर नंदिनी | ४२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४३. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४४. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १६. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ४५. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १७. | श्री. नाना आनंदा पवार | ४६. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १८. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ४७ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४८. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २०. | हिश्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५०. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५१. | श्री. होशियारसिंग लबाना |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २४. | श्रीमती वनवारी मोना | ५३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २६. | श्री. जेसवानी सतरामदास | ५५. | श्री. बेहरानी मोहन |
| २७. | श्री. लुंड गोविंदराम | ५६. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी, |
| २८. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ५९. | श्री. लालवाीन दिलीप |

तर

**<u>१. मा.उप महापौर :— श्रीमती. जया साधवानी</u>** तसेच मा. सदस्य / सदस्या २.श्री. टेकचंदानी राजु, ३. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ४.श्री. वाघे शामु बाबु, ५. श्री. दिलीप गायकवाड, ६.. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ७. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ८. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ९. श्री. शांताराम निकम , १०. श्री. मोहन साधवानी, ११. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १२. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास , १३.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १४. श्री. जयसिंघानी अनिल, १५.श्रीमती किरण लखी, १६. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, १७. डॉ. निना नाथानी, १८. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १९. श्री. हरदास माखिजा, २०. श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास , २१. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

**<u>मा. सचिव:—</u>**विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>**मा. महापौरजी, सर्वात आधी मी विनंती करतो की, आमचे नगरसेवक श्री.सुरेश गायकवाड यांच्या बंधुचे परवा निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. तसेच फॉलवरलाईन कॅम्प नं. ३ येथील डॉ. अनंत मोकल यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नाना पवार

**<u>शोक प्रस्ताव :—</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ११ (अ) चे नगरसेवक श्री. सुरेश गायकवाड यांचे बंधु श्री. अभिमन्यु नामदेव गायकवाड यांचे दि. २.११.०४ रोजी दु:खद निधन झाले .

तसेच फॉलवर लाईन, कॅम्प नं. ३ येथील डॉ. अनंत मोकल यांच्या मातोश्री श्रीमती कौशल्या अर्जुन मोकल यांचे दिनांक २७.१०.२००४ रोजी निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४७ अ** **दिनांक:—४.११.२००४.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. अभिमन्यु नामदेव गायकवाड व श्रीमती कौशल्या अर्जुन मोकल यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:</u>—मा. महापौर,आमची एक विनंती आहे. आज जी महासभा आहे. त्यातील प्रश्नोत्तरे घेण्यात येवू नये. सरळ विषयाला सुरूवात करण्यात यावी. तसेच त्याबरोबर महाराष्ट्रात कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.पी.आय यांची जी सत्ता आली आहे. तसेच आमचे आमदार श्री. पप्पु कालानी पुन्हा आमदार म्हणुन निवडुन आले म्हणुन मी सदनामध्ये सर्वांचे तोंड गोड करू इच्छितो व अभिनंदन प्रस्ताव मांडु इच्छितो म्हणुन मला मिठाई वाटण्याची अनुमती दिली जावी. धन्यवाद.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

<u>अभिनंदन प्रस्ताव :—</u>

उल्हासनगर शहराचे लोकप्रिय आमदार श्री. सुरेश (पप्पु) कालानी हे सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल संपुर्ण सभागृहाच्या व शहराच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र. ४७ ब** **दिनांक:—४.११.२००४.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. सुरेश (पप्पु) कालानी हे विधानसभेवर निवडून आल्याबद्दल हार्दिक अभिनंदन करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):</u>—मा. महापौरांनी अनुमती दिली आहे. विषयाला सुरूवात करू या?

<u>मा. महापौर:</u>—आपल्या सर्वानुमते प्रश्नोत्तराचा कालावधी तहकुब करीत आहे. सचिव साहेब, पुढील विषय घेणेसाठी मी सचिव साहेबांना निर्देश देत आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २:—</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक <u>१९/०८/२००४</u> चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:</u>—सचिव साहेब व सभेचे सर्व सदस्य, सर्वात आधी इतिवृत्ताबद्दल बोलु इच्छितो. आम्ही जे महासभेत बोलतो. अधिकारी त्याची किती पुर्तता करतात. आम्ही इतिवृत्त जे पास करणार आहोत ते याचे प्रमाण आहे. पान नं. ५ जर आपण पाहिले तर. आम्ही प्रश्न विचारला होता की, पॉटहोलची यादी किती ठेकेदारांनी केली आहे. फक्त १४ नावे होती. ते १४ नाव देण्यात अडीच महिने लागले. या अगोदरही मी आपणांस विचारले होते की कुठे केठे पार्टहोलस्चे काम झाले आहे. त्यावेळी म्हंटले होते खुप लांबलचक यादी आहे देवू शकत नाही. आता अचानक हातात एक यादी आली आहे. जर अधिका—यास वाटत असेल तर यादी देतील. नाही वाटले तर सांगतील खुप मोठी यादी आहे तुम्ही येवून सार्वजनिक बांधकाम विभागात बघा. मला या गोष्टीचे दु:ख आहे. प्रशासन जितके कडक असले पाहिजे तितके नाही. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की डिसेंबर महिन्यात मी

उद्यानाविषयी प्रश्न विचारला होता. आयुक्त साहेबांनी त्यात आश्वासन दिले होते दोन महिन्यात त्याची पुर्तता करेन परंतु ११ महिने झाले तरी त्याची पुर्तता झाली. उद्यानाचा प्रश्न अर्धवट राहिला आहे. आम्ही महासभेत बोलतो. असे वाटते की हे फक्त ऐकतात आणि निघुन जातात त्याच्यावर पुर्तता करत नाहीत. माझी आयुक्तांना पुन्हा एकदा विनंती आहे. जो पण सदस्य प्रश्न विचारतो त्याकडे कमीत कमी लक्ष तरी दिले जावे. जसे तुम्ही म्हणता एका आठवडयात यादी देवू परंतु अडीच महिने झाले तरी दिली नाही. तिस—यांदा सभा झाली तेव्हा तुम्ही दिली आहे. जेव्हा प्रश्न येतो तेव्हा तुम्ही यादी देत नाहीत. आम्ही जे इतिवृत्तात बोलतो ते बोलु नये असे वाटते. अधिकारी आमच्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत. या आठवडयात मला अजुन एक गोष्ट लक्षात आली आहे. जेव्हा आम्ही एखादया अधिकारींना फोन करतो त्यांना भेटायला जातो. तेव्हा ते सांगतात आम्ही खुप व्यस्त आहोत. संत गाडगेबाबा महाराज अभियानात आम्ही व्यस्त आहोत. काही पण काम सांगा असेच म्हणतात. गाडगेबाबा सफाई अभियान असे तर नाही म्हणत सर्व शहर बाहेरून साफ करा. आतुन तसेच असू दे. आमचे काहीच काम होत नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे. जर असे काही काम आले तर अधिकारींना सांगा ज्या लोकांच्या तक्रारी आहे त्याच्यावर लक्ष दयावे. सर्व बहाने करतात. आम्ही व्यस्त आहोत आम्ही नाही करू शकत असे सांगतात. हेच मी म्हणु इच्छितो. या इतिवृत्तात खुप काही सांगायचे होते पण मी सर्वसाधारण असे सांगितले आहे. यानंतर जे पण सदस्य बोलतील त्यांच्या बोलण्यावर लक्ष दिले जावे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:—इतिवृत्त कायम? ठिक आहे.

<u>मा.महापौर:—</u>सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. २:—</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०८/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:— दोन अधिकारी नवीन आले आहेत विषय सुरू करण्यापुर्वी त्यांची ओळख करून देतो. एक आहेत श्री. बनसोडे साहेब ज्यांना मुख्य लेखा परीक्षक पद दिले गेले आहे. आणि श्री. पवार शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी कृपया त्यांनी मंचावर यावे. व आपली ओळख करून दयावी.

<u>श्री. सुरेश बनसोडे (मुख्य लेखा परीक्षक):—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब,महापालिका सचिव व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य आणि सभागृह यांना माझे अभिवादन. माझे नाव सुरेश बनसोडे मी महाराष्ट्र वित्त लेखा सेवेचा वर्ग १ चा अधिकारी आहे. माझी शैक्षणिक पात्रता बी.ई.सिव्हील असुन मी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयामध्ये साधारणत: आठ वर्ष नोकरी केलेली आहे. मी ग्रामविकास सुत्रसंचालन विभाग तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग याठिकाणचे माझे काम झालेले आहे. माझ्या अनुभवाचा तसेच ज्ञानाचा फायदा आणि माझे काम मनापासुन करण्याच्या वृत्तीचा फायदा या महापालिकेला होईल. यासाठी मी प्रयत्न करेन तसेच यासाठी मला आपले सहकार्य अपेक्षित आहे धन्यवाद.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:—श्री. पवार यावेळी इथे उपस्थित नसुन ते नंतर येतील तेव्हा त्यांची ओळख करून देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>ते कोण आहेत? शिक्षण मंडळाचे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:—विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ३:—</u>श्री. बी. एस. पवार यांच्या प्रतिनियुक्तीवरील महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. ते. उपस्थित नाहीत, कोण आहेत ते माहित तर पडले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही त्यांचा चेहरा देखिल पाहिला नाही.

काही सदस्य :—डिफर करा. डिफर.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—हा प्रस्ताव पुढे ढकलायचा? सर्वसंमतीने?

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, काही कारणास्तव ते अधिकारी आज सभागृहात उपस्थित नाहीत. सकाळी ते उपस्थित होते. दिवसभर ते माझ्या सोबतच होते. ते नाही आहेत म्हणुन त्यांचा विषय वगळणे ठिक नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—मा. महापौर महोदया, आम्ही त्यांचा प्रस्ताव नाकारत थोडा आहोत? पुढे ढकलत आहोत. सध्या ते सभागृहात उपस्थित नाहीत, सभागृहाचा मान सुध्दा राखला पाहिजे.

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—कदाचित त्यांना आजच्या सभेची माहिती नसेल कारण की ही तहकुब सभा आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी':—ज्या अधिका—याचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यांत आला आहे त्यांना सभा केव्हा आहे ती माहित नाही. असे ते कोणते अधिकारी आहेत? ते तर बेजबाबदार अधिकारी झाले ना?

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—पुढील महासभेत येवून त स्वतः माहिती देवू शकतील परंतु आजच्या सभेत ते उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या विषयीचा विषय पुढे ढकलणे हा काही चांगला संकेत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—त्यांना येथे येवून किती कालावधी झाला?ते महासभेत येत नाहीत हा काही चांगला संकेत नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—आयुक्त साहेब, महासभेचे कामकाज संपेपर्यंत जर त्यांना बोलावुन घेता आले तर बोलावुन घ्या ना. मा. महापौरजी, एक सूचना अशी होती की गेल्या चार—पाच महासभांमध्ये मी एक बघतो आहे. संपुर्ण महासभा चालु असताना तळमजल्यावर पोलिसांचा ताफाच्या ताफा असतो. आणि वरती प्रेक्षक गॅलरीमध्ये कुठल्याही प्रेक्षकाला बसण्यास परवानगी दिली जात नाही. हा खरे तर तसे पाहिले तर लोकशाहीचा अपमान आहे. आणि प्रेक्षक गॅलरीमध्ये का येवू देत नाहीत याचे पण आयुक्तांकडुन उत्तर मिळाले तर बरे होईल.

मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, मागील काही महासभांमध्ये या सभागृहात व सभागृहाच्या बाहेर सुध्दा अशी काही परिस्थिती निर्माण झाली होती. ज्यामुळे महापालिका कार्यालय व त्याच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण होवू शकत होती. महापालिका सभागृहाच्या बाबतीत किंवा महापालिकेच्या बाबतीत अशी काही जर स्थिती निर्माण होत असेल तर प्रेक्षक गॅलरीमध्ये प्रवेश देणे आम्हास उचित वाटले नाही. कारण की काही दिवसापुर्वी काही असामाजिक तत्वाचे लोक प्रेक्षक गॅलरीमध्ये येवून बसले होते. व तेथे जे भांडण झाले त्याचे रूपांतर या सभागृहाबाहेर काही अव्यवस्था किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. तसा एक गोपनिय अहवाल पोलिस विभागाकडुन महापालिका प्रशासनास प्राप्त झाला होता त्यामुळे आम्ही पोलिस विभागास विनंती केली होती की जेव्हा जेव्हा आमची महासभा असेल या शहरामध्ये अव्यवस्थेची स्थिती निर्माण होवू नये म्हणुन पोलिस बंदोबस्त दिला जावा. जर या सभागृहास विश्वास असेल, कारण की ही सर्व आपली व आमची जबाबदारी आहे. या सभागृहाचे पावित्र राखणे, सभागृहाबाहेर सुध्दा, आमचे सर्व सन्माननिय सदस्य व त्यांचे सर्व जे काही अनुयायी आहेत त्यांचे वर्तन चांगले राहो ही आपली व आमची जबाबदारी आहे. जर आपण ही जबाबदारी घेत असाल तर या नंतर येणा—या महासभेत प्रेक्षक गॅलरीमध्ये नागरिकांना प्रवेश करण्याची आम्ही

परवानगी देवू शकतो. परंतु कुठलाही अनुचित प्रकार होता कामा नये. याबाबत सभागृहाच्या वतीने प्रशासनास अवगत केले पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब माझे असे म्हणणे आहे की, कमीत कमी ज्या नगरसेविका आहेत, त्यांचे जे पती आहेत ते बाहेर येवुन थांबतात. कमीत कमी त्यांना तरी प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जावा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—श्री. लाल पंजाबी साहेब, साहेबांनी जे सांगितले आहे, याचा अर्थ असा आहे की, या महानगरपालिकेवर असामाजिक तत्वांचा पगडा बसला आहे. असे यांचे म्हणणे आहे. असे जर असेल आणि प्रेक्षकांना जर .......

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—श्री. टालेजी,जर आपणांस स्वत:ला असामाजिक तत्व समजत असतील तर आम्ही त्यांच्या मताशी सहमत आहोत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'—शहरातील जनतेला जर प्रेक्षक गॅलरीमध्ये जर प्रवेश देत नसाल तर हा लोकशाहीचा साारासार अपमान होत आहे. म्हणुन माझी ही विनंती आहे की, प्रेक्षक गॅलरी जनतेसाठी खुली केली जावी.

मा. महापौर:—नाही. श्री. प्रमोद टालेजी, प्रेक्षक गॅलरीबाबत आपण जे म्हणत आहात ना, नगरसेविकांचे पती प्रेक्षक गॅलरीत बसु शकतात. व तसेच प्रेक्षक गॅलरीत प्रवेश देण्यासाठी नगरसेवकांच्या स्वाक्षरीने जसे फॉर्म भरून दिले जात होते ती पध्दत यापुढेही चालु राहील.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—याबाबतच्या कायदयानुसार जे नियम आहेत ते नियम आहेत ते लागु केले जावेत ना?

मा. महापौर:—प्रेक्षक गॅलरीमध्ये जो काही गोंधळ होतो तो नियंत्रणात आणण्यासाठी असामाजिक तत्वाच्या लोकांना प्रवेश दिला जावु नये.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—परंतु प्रेक्षकांना किंवा नागरिकांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जात नाही हा त्यांचा अपमान आहे. ज्या नागरिकांना प्रेक्षक गॅलरीत यायचे आहे त्यांना येवू दिले जावे. त्यांना येवू देण्यास काय हरकत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—प्रशासनाधिकारी श्रीयुत पवार साहेब, आपण व्यासपीठावर यावे.

मा. महापौरांचे म्हणणे आहे की, आपण निर्णय घ्यावा प्रेक्षक गॅलरीमध्ये कुणाला प्रवेश दयायचा, कुणाला प्रवेश दयायचा नाही. त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:— नियम काय म्हणतात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, जेथ पर्यंत प्रेक्षक गृहात प्रवेशाचा प्रश्न आहे. याबाबत सभागृहानेच नियमावली तयार केली आहे. त्या हिशोबाने प्रेक्षक गॅलरीत प्रवेशासाठी नगरसेवक ज्याकुणाच्या अर्जावर सही करतात त्यानुसारच त्यांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जातो. आपण ज्यांच्या अर्जावर सहया करता त्यांना प्रवेश दिला जातो. परंतु कुणीही असामाजिक तत्वाची व्यक्ती प्रेक्षक गॅलरीत जावू नये यासाठी जर काळजी घेतली जात असेल तर ती अतिशय चांगली गोष्ट आहे. सभागृहाच्या सुरक्षिततेची गोष्ट आहे म्हणुन प्रेक्षक गॅलरीत प्रवेश मिळविण्यासाठी जे लोक उत्सुक आहेत त्यांनी नगरसेवकांच्या स्वाक्ष—या घेतल्या पाहिजेत. प्रेक्षक गॅलरीत जे काही नागरिक येतात ते कोणत्या कोणत्या नगरसेवकाशी संबंधित असतात. नियमावलीच्या हिशोबाने बरोबर आहे.

मा. महापौर:—नियमावलीची कार्यवाही करू शकता.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>नियमानुसार तर प्रेक्षक गॅलरीत नागरिकांना प्रवेश दयायचा आहे. त्या व्यतिरिक्त मा. महापौरांनी विनियम तयार केले आहेत. त्याचा मुळ आधार असा आहे की, कुणीही प्रेक्षक जेव्हा प्रेक्षक गॅलरीत येतो तर त्यास कुण्या ना कुण्या नगरसेवकाने मी यास ओळखतो असे प्रमाणित करायचे आहे. परंतु हे करताना ही जबाबदारी घेतली पाहिजे की, प्रेक्षक गॅलरीत जी व्यक्ती प्रवेश करत आहे ती असामाजिक तत्वाची नाही. अशा व्यक्तीला प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दयायचा ही नाही. जर या आधारावर आपण ओळख पटवत असाल तर कुणालाही आपण मनाई करू शकत नाहीत. ठिक आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>त्या नियमावलीमध्ये आमचे एक वाक्य समाविष्ट केले जावे. जेथे नगरसेवक स्वाक्षरी करतात ना त्याच्या बाजुला असे लिहिले जावे की, ही व्यक्ती गुन्हेगार नाही याचे मी खात्री देत आहे. या व्यक्तीवर काही गुन्हे नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>आपणांस जर वाटत असेल की, ही व्यक्ती गुन्हेगार आहे तर तिची शिफारस करावयास नको.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>करावयास पाहिजे किंवा नाही. हे वेगळे आहे परंतु तेथे जर मी वर सांगितलेले एक वाक्य समाविष्ट केले तर विचार करून नंतरच स्वाक्षरी करतील.

<u>श्री. पवार (प्रशासन अधिकारी):—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय, मा. सचिव, सन्माननिय सदस्य त्याचप्रमाणे येथील सर्व उपायुक्त, माझे सहकारी माझे नाव बी.एस. पवार मी शिक्षण मंडळामध्ये १ सप्टेंबर ,२००४ पासुन प्रशासन अधिकारी म्हणुन हजर झालेलो आहे. या अगोदर माझी २७ वर्षे सेवा झालेली आहे. पुर्वी उल्हासनगर येथे मी ९२—९३ या एक वर्षामध्ये प्रशासन अधिकारी म्हणुन काम केलेले आहे. त्यानंतर मला येथुन पदोन्नती मिळाली. येथे येण्यापुर्वी कल्याण—डोंबिवली महानगरपालिकेचे शिक्षण मंडळात अडीच वर्षे प्रशासन अधिकारी म्हणुन काम पाहिले आहे. सप्टेंबर पासुन याठिकाणी मी हजर झालेलो आहे. मी आपणांला ओळख करून देतो. व आपल्या सर्वांकडुन मला सहकार्य मिळेल. अशी मी आपणांला विनंती करतो धन्यवाद.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>विषय क्र. ३ पास? एक वर्षासाठी? पास? विषय पास?

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ३:—</u> श्री. बी. एस. पवार यांच्या प्रतिनियुक्तीवरील
महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी
म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः—</u>

शासनाने शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसएटी—३३०४ / ()४१२/०४प्रशा—२, दि. २४/८/२००४ च्या आदेशान्वये श्री. बी. एस. पवार, मुख्याध्यापक, बी. जे. हायस्कुल, ठाणे यांची प्रशासन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, शिक्षण मंडळ या पदी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा) नियम, इत्यादी १९८१ मधील नियम ४० मधील अटी व शर्तीनुसार २ वर्षासाठी नियुक्ती केली आहे. श्री. पवार, सदर पदावर दि. १/९/२००४ पासून रूजू झाले आहेत.

श्री. पवार यांच्या प्रतिनियुक्तीस व अटी व शर्तीस मंजूरी देण्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र ४८ दिनांकः—०४/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. बी. एस. पवार यांची दिनांक १/९/२००४ पासुन महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी म्हणुन एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ४:—</u> डॉ. के. आर. खरात यांच्या प्रतिनियुक्तीवरील उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

एक वर्ष पुर्ण झाले आहे. दुसरे वर्ष सुरू आहे. या दुस—या वर्षासाठी मंजुरी दयायची आहे. या दोन वर्षासाठी एकत्रितरित्या मंजुरी दयायची आहे. एक वर्ष पुर्ण झालेले आहे. आणखी एक वर्ष, पास?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, एका गोष्टीचा खुलासा मागु इच्छितो, या विषयाबाबत शासनाकडुन काही आदेश पत्र आले आहे का? त्यांच्या पदोन्नतीबाबत शासनाकडुन काही पत्र आले आहे का? याचा कृपया खुलासा केला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, डॉ. खरात यांची पहिली नियुक्ती जी आहे ती वैद्यकीय अधिकारी म्हणुन येथे पहिली नियुक्ती झालेली आहे. आम्ही राज्य शासनाला वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे जे रिक्त पद आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ नुसार जे पद आहे. या पदावर नियुक्ती करण्यासाठी विनंती केली होती. परंतु शासनाने फक्त वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती केली होती. आम्ही सरकारला पुन्हा विनंती केली, यांची पदोन्नती झाली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे जे आमच्याकडील रिक्त पद आहे त्याच पदावर त्यांची नियुक्ती केली आहे. यामुळेच हा प्रस्ताव थोडया उशिराने आपल्या समोर आलेला आहे. ज्या पदावर त्यांची नियुक्ती करण्यांत आली आहे त्या पदावरील नियुक्तीबाबतचे राज्य शासनाचे आदेश होते. यामुळे थोडया उशिराने आपल्या समोर हा प्रस्ताव ठेवला आहे. तसेही ते वैद्यकीय आरोग्य अधिकारी आहेत. आमच्याकडे उपायुक्त कमी असल्यामुळे उपायुक्त आरोग्य या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, आपणांस ज्यांना पहायचे असेल तर आपल्या माहितीसाठी मी आपणांस सांगु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानी:—</u>वैद्यकीय आरोग्य अधिका—यांचे काम काय आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>वैद्यकीय आरोग्य अधिका—याचे काम काय आहे ते आपणांस महित आहेच. उपायुक्त आरोग्य यांचे काम काय आहे ते ही आपणांस माहित आहेच. ते ही आपण प्रश्नांच्या माध्यमातुन विचारू शकता त्या प्रश्नाचे उत्तर देईल. आता प्रस्ताव जो आपल्या समोर आहे. तो त्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा आहे. व माझी सभागृहास विनंती आहे की, यांच्या नियुक्तीस मान्यता दिली पाहिजे. ते एक कार्यक्षम अधिकारी आहेत. याबाबत माझ्या मनात कुठलीच शंका नाही. व आपणांस माहिती देताना मला अतिशय आनंद होत आहे की हे जे डॉ. खरात आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे कामकाज चालत आहे. मागील तीन—चार वर्षापासुन महाराष्ट्र सरकारने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरू केले आहे. याअगोदर महानगरपालिकेस कोणतेही पारीतोषिक मिळाले नव्हते. यावर्षी आम्हास तिस—या फेरीत चांगल्या प्रशासनिक बाबीबाबत तिस—या क्रमांकाचे पाच लाख रूपयाचे पारीतोषिक मिळाले. व आज चौथ्या फेरीसाठी सुध्दा आमची निवड झाली. आज राज्यशासनाकडुन एक टिम आमच्या प्रधान सचिव पाणी पुरवठा व आरोग्य विभागाचे प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ उल्हासनगरमध्ये आले होते त्यांनी संपुर्ण शहराचा दौरा केला. सर्व अधिका—यांकडुन माहिती घेतली. आम्ही चौथ्या फेरीसाठी सुध्दा पात्र ठरलो आहोत. यामध्ये डॉ. खरात यांचे फार मोठे योगदान आहे. हे येथे सांगताना मला अतिशय आनंद होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, खरात साहेबांचा हा जो विषय आहे. त्यांना जुन महिन्यामध्ये एक वर्ष पुर्ण झाले आहे. त्यानंतर सहा महिने अधिक झाले आहेत. आता एक वर्षाचा कालावधी वाढविला जात आहे तो जुन महिन्यापासुन मोजला जाईल. सहा महिने त्यांना झाले आहेत आणखी सहा महिन्याच्या कालावधीसाठी मंजुरी दयायची आहे. हा जो सहा महिन्याचा वाढीव कालावधी आहे यासाठी महासभेची परवानगी घेतली नाही त्याचे कारण काय आहे. जुन महिन्यामध्ये त्यांना एक वर्ष पुर्ण झाले त्यांनतर सहा महिने अधिक झाले आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, मी आपणांस अगोदरच कारण सांगितलेले आहे. त्यांची जी प्रथम नियुक्ती झाली होती ती वैद्यकीय अधिकारी म्हणुन झाली होती. परंतु आमच्याकडे जे रिक्त पद होते. ते वैद्यकीय आरोग्य अधिका—याचे होते. व याबाबत जोपर्यंत दुरूस्ती येत नव्हती तोपर्यंत मी आपल्यासमोर प्रस्ताव ठेवु शकत नव्हतो. दुरूस्ती आल्यानंतरच प्रस्ताव ठेवला आहे. होवु शकते त्यामध्ये काही दिरंगाई झाली असेल जर दिरंगाई झाली असेल तर त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु यामागे दुसरे कोणतेही कारण नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—</u>मा. महापौरजी, त्यांना जे सलग सेवेत घ्यायचे आहे त्याबाबत मला काही एक म्हणायचे नाही. परंतु विषय हा आहे की, खरात साहेबांनी आरोग्य विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर माझी त्यांना एक विनंती आहे की कित्येक असे काही गलिच्छ वस्त्यांमधील प्रभाग आहेत की ज्यामध्ये सफाई कामगारांची नियुक्ती ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे. जेवढी व्हावयास पाहिजे. ती आजच्या तारखेला कित्येक प्रभागामध्ये म्हणजेच सफाई कामगारांच्या समस्या हा विषय त्यांनी लक्षात घेवून त्याची पुर्तता केली पाहिजे. दुसरी गोष्ट ही आहे की, शहरामध्ये रस्त्यांची सफाई तर अतिशय सुंदर वाटत आहे. आम्ही सुध्दा रस्त्यावरून फिरतो. तर इतके सुंदर दिसत आहे की, खरोखरच हे शहर अतिशय सुंदर व स्वच्छ वाटत आहे. परंतु गलिच्छ वस्त्यांमध्ये जावुन जर पाहिले तर ॲथोनी नावाच्या ठेकेदाराचे जे काम आहे ते अतिशय निकृष्ठदर्जाचे आहे. कारण की, गल्यांमध्ये जो कचरा जमा होतो तो उचलला जात नाही. तो डंम्पीग ग्राऊंडवर पाठविला जात नाही. तो उचलला जात नाही. तर मेहरबानी करून याविषयाकडे त्यांनी लक्ष दयावे. त्यांच्या पदोन्नतीस आमची काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब डॉ. खरात यांना एक वर्ष मुदत वाढ देण्याकरिता जो प्रस्ताव ठेवला आहे त्यास आमची काही हरकत नाही. परंतु हाथ जोडुन एक गोष्ट मी सांगु इच्छितो की कमीत कमी चार महिन्यापासुन उपायुक्त श्री. लोणारे व डॉ. खरात माझ्या प्रभागातील एक महिला कर्मचारी जिच्या जागेवर तिच्या मुलास कामावर घेतले आहे. तर त्यास माझ्या प्रभागातुन काढुन दुस—या प्रभागात पाठविले आहे. परंतु चार महिन्याचा आत मी जवळ जवळ पन्नास वेळा उपायुक्त व डॉ. खरात यांना देखिल सांगितले आहे. त्यांना सांगुन देखिल त्यांनी आजपर्यंत त्याला माझ्या प्रभागात पाठविले नाही. एक तर आधीच माझ्या प्रभागात कर्मचारी कमी आहेत. जर माझ्या प्रभागातील कुणी कर्मचारी सेवा निवृत्त होत असेल तर त्या जागेवर त्यांचा मुलगा जर कामावर रूजु होत असेल तर तो माझ्या प्रभागात आला पाहिजे की दुस—या प्रभागात परंतु दहा वेळा आश्वासन देवून सुध्दा उपायुक्त लाणारे यांनी त्यास माझ्या प्रभागात पाठविले नाही. अशाप्रकारे जर काम चालले तर

एकीकडे आम्ही त्यांची प्रशंसा करतो की त्यांचे काम चांगले आहे व दुसरीकडे एका कामासाठी पन्नास वेळा आम्हाला त्यांना सांगावे लागत आहे. ही गोष्ट बरोबर नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—महापौर महोदया, या बरोबर मी आपणांस हे ही सांगु इच्छितो की, डुकरे पकडण्यासाठी आमच्या प्रभागातुन जे सफाई कामगार घेतले होते. आजपर्यंत ते कामगार आमच्या प्रभागात परत पाठविले नाहीत. त्याबाबत सुध्दा खरात साहेबांना खुलासा करण्यास सांगा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—पास?

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:— डॉ. के. आर. खरात यांच्या प्रतिनियुक्तीवरील उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. उमपा/२२९८/२०३०/ प्र. क्र. २५९/९८/नवि—२३ दिनांक १३ जून २००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदनामाचे एक पद मंजुर आहे.

सदर पदावर सक्षम अधिका—याची प्रतिनियुक्तीवर नेमणुक करणेबाबत, शासनाकडे विनंती केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. प्रतिनि १००२/२१५८/प्र. क्र. ४३४/सेवा—२ दिनांक १९ मे. २००३ अन्वये डॉ. के. आर. खरात यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर प्रथमत: एका वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर नेमणुक केली आहे.

डॉ. के. आर. खरात यांना सद्यस्थितीत देय असलेली शासन मान्य वेतनश्रेणी ही उल्हासनगर महानगरपालिकेत आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा उच्चतम अशी असल्याने कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टै—२/६५ दि. २५ जून २००३ अन्वये डॉ. के. आर. खरात यांचेकडे वैद्यकीय आरोग्य अधिकीर या पदाचा पूर्णवेळ कार्यभार सोपविला आहे. त्यानुसार डॉ. खरात हे वरील पदावर दि. २३.६.२००३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

दरम्यानच्या काळात डॉ. खरात, वैद्यकीय अधिकारी यांच्या पदनामात '' वैद्यकीय अधिकारी यांच्या पदनामात ''वैद्यकीय आरोग्य अधिकारी'' असा बदल करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र. पी. आर. ओ—१००३/प्र. क्र. ३४५/सेवा २ दिनांक २६ मे. २००४ अन्वये मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार डॉ. के. आर. खरात यांच्या, प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मंजुरी मिळणेबाबत महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव कृ. ४९ दिनांक:—०४/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. के. आर. खरात यांची दिनांक २३/६/२००३ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:— उल्हासनगर शहरातील पर्यावरण अहवालाआधारे तयार केलेल्या कृती आराखडयास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब, खास करून आपणांस मी विचारू इच्छितो हा जो कृती आराखडा तयार केला जातो, मागील वर्षी सुध्दा तयार केला होता. परंतु त्यावर जेव्हा कार्यवाही करण्याची वेळ येते तेव्हा मला असे वाटेत की, त्यामध्ये आपण खुपच मागे राहतो किंवा लक्ष देत नाही. जेथपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न आहे. मी एक छोटासा विषय उपस्थित करतो. मागील वर्षी आपण कृती आराखडा तयार केला होता. उल्हासनगरमध्ये हवेचे प्रदुषण एवढे आहे की, चोवीस तासा पैकी सकाळी एक तास जर आपण झोपलेो सकाळी सहा ते सात वाजेपर्यंत ........... उल्हासनगरमध्ये हवेचे प्रदुषण मोठया प्रमाणावर आहे. व या महापालिकेच्या महासभेत आम्ही चौदा मॉनिटरी युनिट खरेदी करण्यासाठी आम्ही मंजुरी दिली होती त्यासाठी आम्ही १८ लाख रूपये मंजुर सुध्दा केले होते. त्याची सद्यस्थिती काय आहे व मॉनीटरी युनिटसची स्थिती काय आह हे जर आयुक्त साहेबांनी सांगितले तर एक पाऊल आम्हाला पुढे सरकता येईल. नाहीतर हा प्रस्ताव पारीत करणे ही केवळ एक औपचारीकता राहील. त्यापेक्षा अधिक काही नसेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, जर आपणांस आठवत असेल तर मागील वर्षी जो पर्यावरणाचा अहवाल सभागृहासमोर ठेवला होता. त्याचबरोबर एक दहा बाबींचा एक कृती आराखडा आपल्या समोर ठेवला होता. त्या दहा मधील जवळ जवळ चार ज्या बाबी आहेत त्या अंशत: आम्ही पुर्ण केल्या आहेत. जसे की, ई—गर्व्हनर्सचा एक मुद्दा होता. घनकचरा व्यवस्थापनाचा एक मुद्दा होता. पाणी पुरवठा योजनेबाबतचा होता. त्यामध्ये एक तर आम्ही काही पुर्ण केले आहे किंवा काही प्रकल्पाबाबत आम्ही नियोजन केले आहे. व अंमलबजावणी सुरू होणार आहे. आपण ज्या बाबत बोलत आहात हे यंत्र आहे. हवा नियंत्रणाबाबतचे यंत्र आहे. यंत्रणा लावण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ती जी कंपनी आहे त्या कंपनीशी विचार विनिमय सुरू आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ७५ टक्के अनुदान देणार आहे. त्यांच्याकडे सुध्दा प्रस्ताव पाठविला जात आहे. यावर्षाच्या शेवटपर्यंत म्हणजे हे जे वित्तिय वर्ष आहे. या वर्षातच हवा नियंत्रण यंत्र बसविले जाईल.

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील**:—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हा जो पर्यावरणाचा अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये पर्यावरणासंबंधीत बहुतेक गोष्टींच्या बाबींचा विचार करण्यात आलेला आहे. परंतु माझ्या म्हणण्याप्रमाणे पर्यावरणावर होणा—या परिणामाबाबतच्या एका विषयाचा विचार केलेला नाही. असे मला वाटते. मागील काही महिन्यापुर्वी महासभेमध्ये तबेल्यांविषयी एक प्रश्न उपस्थित झाला होता तबेल्यांविषयी. तबेल्यांमुळे पर्यावरणांवर परिणाम होतो. असा माझा विचार आहे. त्या महासभेत उत्तर देतांना असे सांगण्यात आले होते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये जवळ—जवळ २०० च्या आसपास तबेले हे विना परवाना चालत आहेत. असे उत्तर मिळाले होते. तबेल्यांमधील जनावरांच्या घाणीमुळे पर्यावरणावर काय परिणाम होतो याविषयी अहवालात काही विचार केलेला नाही. तरी माझे म्हणणे असे आहे की, त्याच्यावर पण विचार व्हावा. आणि त्या जनावरांपासून मिळणा—या दुधाचाही लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होतो, याचाही विचार व्हावा. आणि ते महासभेपुढे सादर करण्यात यावे. त्या अहवालावर परत विचार करून अहवाल सादर करण्यात यावा असे माझे म्हणणे आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब उल्हासनगर कॅम्प —५ येथे आशिया खंडातील सर्वात मोठा जिन्स पॅन्टी तयार करण्याचा कारखाना चालु आहे. आणि बरेचसे कारखाने तेथे उघडत आहेत. त्यामुळे उल्हासनगर शहराचे नाव पुर्ण आशिया खंडामध्ये प्रसिध्द झाले असेल हजारापेक्षा अधिक कारखाने तेथे आहेत परंतु त्याचबरोबर एक समस्या यामुळे उभी ठाकली आहे. जिन्सचा कपडा धुलाईसाठी जे केमिकल वापरले जाते. त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. त्याबाबत महानगरपालिका काय विचार करत आहे. याचा कृपया खुलासा केला जावा.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर**:—महापौर महोदया, अशा प्रकारचे कुठलेही पर्यावरण विषय आहेत ते आल्यानंतर त्याच्या पाठोपाठ कृती आराखडयाची सुध्दा चर्चा होते परंतु आताच आमचे सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, प्रत्यक्षामध्ये काम करताना मात्र किंवा नगरसेवकांनी एखादी सूचना केली. किंवा एखादे पत्र दिले तर त्याच्यावर कुठल्या प्रकारची कार्यवाही होते किंवा प्रतिसाद मिळतो. अशाप्रकारचे चित्र मात्र महापालिकेत दिसत नाही. माझ्याकडे दोन उदाहरणे आहेत. माझ्या प्रभागात निवासी विभागामध्ये एक तबेला आहे. आणि त्या तबेल्यातील संपुर्ण शेण त्या नाल्यामध्ये असते जर तीन चार दिवसाला दोन दिवसाला तो नाला चोकअप होतो त्याच्याबाबत आतापर्यंत माझी तीन चार पत्र झाली कारवाई करण्यासाठी पंरतु त्याच्यावर प्रशासनाकडुन मात्र कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. दुसरे एक चांगले ठळक उदाहरण आहे ते स्वामी शांतीप्रकाश जो पुतळा आहे भाटीया चौकामध्ये तेथुन ते नेताजी चौकापर्यंत जो रस्ता जातो त्या रस्त्यामध्ये जी झाडे आहेत त्या झाडांना ठोकरून स्कुटरचे , मोटर सायकलचे अपघात झालेले आहेत. शांतीप्रकाशच्या पुतळयापासुन चौकापर्यंत रस्ता दुभाजक असावा. अशी मागणी वारंवार होत होती. जेणे करून अपघात टळतील आणि झाडे पण वाचतील. परंतु महापालिकेचे धोरण असे आहे की, प्रत्येक अपघातानंतर एक झाड तोडायचे त्याठिकाणी आतापर्यंत सात ते आठ अपघात झाले. एक मयत झाले परंतु गेल्या दोन वर्षात वारंवार पत्रव्यव्हार करून सुध्दा त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे काम किंवा उपाययोजना महापालिका करत नाहीत. एक कशाचे ध्योतक समजायचे? मी आयुक्तांना याबाबत एक पत्र दिले होते ते त्यांना चांगले आठवत असेल की पाच जुन या पर्यावरणाच्या दिवशीच महापालिकेने एक झाड तोडले होते. अपघात झाल्यानंतर तर अशाप्रकारच्या उपाययोजना होणार असतील तर आपल्या पर्यावरण विषयाच्या बाकीच्या ज्या कल्पना आहेत त्या ढोबळ ठरतील. आणि महापालिकेचे किंवा आयुक्तांचे शहर पातळीवर जे काही प्रामाणिक प्रयत्न सुरू असतील तर त्या प्रयत्नांना कनिष्ठ स्तरावरील जो अधिकारी वर्ग आहे तो निरर्थक ठरवेल. तर यापध्दतीने सुध्दा एक तर प्रशासनाकडुन उपाययोजना व्हायलाच पाहिजे परंतु त्याचबरोबर सन्माननिय सदस्यांकडुन स्थानिक पातळीवर ज्या सूचना येतात. तर त्यावर अग्रक्रमाने तातडीच्या स्वरूपात कार्यवाही झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. आणि आयुक्तांना विनंती आहे.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी**:—मा. महापौरजी, उल्हासनगर शहरामध्ये अनेक राज्यांतुन खराब केमिकल आणुन सोडले जाते. तर या अहवालामध्ये त्याचाही उल्लेख असला पाहिजे. त्यावरही उपाययोजना महापालिकेतर्फे केल्या गेल्या पाहिजेत. अशी मागणी मी इथे करत आहे.

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे**:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पर्यावरणाच्या विषयी आपण सादर केलेल्या अहवालामध्ये एक त्रुटी आहे. शहरामधील गॅरेज रिक्षा, स्कुटर यांची मोठमोठी गॅरेज आहेत. यामध्ये वाहनांची दुरूस्ती

होत असताना वाहने रेस केल्याने प्रचंड प्रमाणावर धुर बाहेर फेकला जातो. त्यामुळे हवेचे प्रदुषण तर होतेच होते. प्रत्येक व्यक्ती दुपारच्या वेळेला विश्रांती घेत असते. काही ठिकाणी शाळा आहेत तिथेही या प्रदुषणाचा विपरीत परीणाम होतो. तर ही गोष्ट लक्षात घेवून आपण याबाबतीत उपाययोजना करावी अशी विंनती करतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया,सन्माननिय सदस्य श्री. विश्वनाथ पाटील यांनी अतिशय महत्वपुर्ण मुद्दा येथे उपस्थित केला आहे. जेवढे काही तबेले आहेत त्यांचा येथील पर्यावरणावर काय परिणाम होत आहे. याचा उल्लेख या अहवालात केलेला नाही. त्यांच्या या मताशी मी सहमत आहे. आमच्या महापालिकेच्या वतीने मागील वर्षी जो सर्व्हे केला होता. त्यानुसार या शहरामध्ये २१९ तबेले आहेत. त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होतो याचाही उल्लेख या अहवालात पुढल्या वेळेस केला जाईल. परंतु यासाठी सर्व्हे करून तबेल्यांचा पर्यावरणावर काय परिणाम होतो हे पाहिले जाईल. दुसरे येथे असे सांगितले गेले की, येथे जे जिन्सचे कारखाने आहेत. किंवा कापड उद्योग आहे. यामुळे प्रदुषण होते त्या प्रदुषणाबाबत काहीही उल्लेख नाही. याबाबत या अहवालात उल्लेख केलेला आहे. आमचा जो विकास आराखडा तयार केला गेला त्यामध्ये जे औदयोगिक क्षेत्र आहे. त्या क्षेत्रातील बरेचसे कारखाने आता बंद पडत आहेत. व जेथे औदयोगिक क्षेत्रे नाही. जसे की उल्हासनगर—५ येथे औदयोगिक क्षेत्र नाही परंतु तेथे उद्योगधंदे येत आहेत. व अधिकतर कापड उद्योग आहेत त्यामुळे फार मोठया प्रमाणावर प्रदुषण होते. तर आता जो नवीन विकास आराखडा तयार होईल. त्यामध्ये औदयोगिक क्षेत्र व रहिवासी क्षेत्र त्यांच्यामध्ये योग्य त्या प्रमाणात आराखडा तयार केला जाईल. विकास आराखडा तयार करताना याबाबीकडे लक्ष दिले जाईल. येथे रस्ता दुभाजकाबाबत जे सांगितले गेले. दुभाजकाबाबतीत काही नॉमर्स आहेत. रस्त्याची रूंदी किती फुटाची असली पाहिजे. की ज्यामुळे रस्ता दुभाजक लावला जावु शकेल. ८० फुटापेक्षा जर रस्त्याची जास्त रूंदी असेल तर रस्ता दुभाजक लावला जावु शकतो. नाहीतर दुभाजक लावला जावू शकत नाही. याशिवाय आपण जे रस्ते सांगितले आहेत. ते रस्ते जर ८० फुटापेक्षा अधिक रूंदीचे असतील तर खात्रीशिररित्या मी असे सांगु शकणार नाही. परंतु ते रस्ते जर ८० फुटापेक्षा रूंद असतील तेथे दुभाजक टाकले जातील.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयाव्दारे मी बोलु इच्छितो. आयुक्त साहेब सांगत आहेत की, ८० फुट किंवा त्यापेक्षा जास्त रूंदीचे जे रस्ते आहेत. त्याठिकाणी दुभाजक लावले जातात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, या शहरामध्ये काय झालेले आहे. याचा मी उल्लेख केलेला नव्हता.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—आम्ही या शहराचे नागरिक आहोत. या शहराचे नगरसेवक आहोत. या शहरातील नगरसेवकांनी महासभेत आपणाकडे मागणी केली आहे. बाहेरच्या नगरसेवकाने, बाहेरच्या कुठल्या शहरासाठी मागणी केलेली नाही. आम्ही या शहराचे नगरसेवक असुन या शहरासाठी मागणी केलेली आहे. आपण या शहरासाठी खुलासा करा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—महापौर महोदया, आयुक्त महोदय ही गोष्ट खरी आहे की जेथे ८० फुट रूंदीचा रस्ता आहे तेथे रस्ता दुभाजक असला पाहिजे. परंतु काही काही रस्ते असे आहेत की काही जागा अशा आहेत की तेथे अपघात होतात त्याठिकाणांबाबत नागरिक प्रशासनाकडे अशी मागणी करतात की तेथे स्पीड ब्रेकर असावा. व आम्ही लोक मागणी करतो स्पीड ब्रेकरची कार ब्रेंकरची नाही किंवा व्हेईकल ब्रेकरची नाही. होते असे की, स्पीड ब्रेकर एकच लहानसा असला पाहिजे किंवा तीन चार लहान लहान स्पीड ब्रेकर असले पाहिजेत. जेणेकरून वाहनाच्या वेग मर्यादिवर नियंत्रण येईल. परंतु तसे न करता स्पीड ब्रेकर एवढे मोठे तयार केले जातात की, त्यावरून वाहने उडतात. म्हणुन स्पीड ब्रेकर हा स्पीड ब्रेकर सारखाच तयार केला पाहिजे व जेथे जेथे अपघात होतात तेथे मानवतावादी दृष्टीकोनातुन स्पीड ब्रेकर तयार केले पाहिजे. व दुसरे गोष्ट अशी की येथे सांगितले गेले की ''प्रदूषण'' येथे वायु प्रदुषण, जल प्रदुषण व ध्वनी प्रदुषण सुध्दा या शहरात आहे. कित्येक असे कारखाने आहेत ज्यांना महापालिकेचा ना हरकत दाखला नाही. दिवसरात्र तीन तीन पाळयांमध्ये ते लोक कारखाने चालवतात. शेजारच्या लोकांची झोपमोड होते. जसे की आता आमच्या श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगितले की, वेगवेगळया राज्यांमधुन केमिकल्स आणुन शांतीनगर येथे विसर्जित केले जाते. तर ही मागणी सभागृहात आम्ही चार वेळा केली आहे. तर यावर प्रशासनाने सक्तीने काही कारवाई केली पाहिजे. जेणेकरून तेथील लोकांचे आरोग्यावर काही विपरीत परीणाम होणार नाही. व यासर्व गोष्टींकडे

अधिकाधिक लक्ष दिले जावे. व जे लोक याकामांसाठी जबाबदार आहेत. त्यांना काही ना काही शिक्षा झाली पाहिजे. काही दंड झाला पाहिजे. याकडे प्रशासनाने लक्ष दिले तर फार चांगले होईल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय आयुक्त साहेबांनी येथे सांगितले की, ८० फुट किंवा त्यापेक्षा अधिक रूंदीचा जर रस्ता असेल तरच रस्ता दुभाजक लावता येईल. परंतु ज्या ठिकाणांचा मी स्पष्टपणे उल्लेख केला तर त्या एकाच ठिकाणी जवळ जवळ सात ते आठ अपघात झालेले आहेत. या सात आठ अपघांतांमध्ये एका अपघातामध्ये तर एकाचा मृत्युही झालेला आहे. आपले जवांदे साहेब हे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता होते तेव्हा त्यांच्या गाडीचाही तेथे अपघात झाला होता. त्यांचा वाहनचालक सुध्दा गंभीर स्वरूपी जखमी होता. तर प्रत्येक अपघातानंतर आपण जर एकेक झाड तोडणार असु, जर दुभाजक लावता येत नसतील तर प्रशासनाने पर्यायी काही तरी व्यवस्था करावी. आपण स्वामी शांतीप्रकाश यांचा भाटीया चौकामध्ये पुतळा बसविला त्या पुतळयाची तेथे सजावट आणि सोदर्यीकरण केले आहे व त्यांच्या समोर आपण ड्रम ठेवलेले आहे. ड्रम ठेवण्याचा जो भाग आहे तो काही सौदर्यीकरणामध्ये येत नाही. म्हणुन नॉर्मस प्रमाणे जर दुभाजक लावता येत नसतील तर किमान पर्यायी काहीतरी उपाययोजना आपण केली पाहिजे. तातडीने केली पाहिजे अशी माझी आयुक्तांना विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री.  चिमण रूपाणी:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आता ही जी पर्यावरण अहवालावर चर्चा चालु आहे. त्याव्यतिरिक्त आणखी काही मुद्दे त्यामध्ये आले पाहिजेत. जसे की आमचे नगरसेवक श्री. सोनावणे साहेबांनी म्हटले की, शहरामध्ये जितके काही पेट्रोल पंप आहेत तेथे जे भेसळयुक्त पेट्रोल मिळते. त्याच्या वापराने मोठया प्रमाणावर धुर बाहेर पडतो. ज्यामुळे शहराचे पर्यावरण दुषित होते. धुरामुळे जनतेच्या आरोग्यावर दुष्परीणाम होतो. म्हणुन महानगरपालिका क्षेत्रात जेवढे काही पेट्रोल पंप आहे त्यावर लक्ष केंद्रीत केले जावे. जेणेकरून ते लोक भेसळयुक्त पेट्रोल किंवा डिझेलची विक्रि करू शकणार नाहीत. दुसरे असे की शहरामध्ये प्रदुषण थांबविण्यासाठी हीरवळ असणे अतिशय आवश्यक आहे. मी आधी सुध्दा महासभेत याबाबत बरेचवेळा बोललो आहे. जे मोठे रस्ते आहेत त्यांच्या दोन्ही बाजुस झाडे लावली जावीत. जेथे दोन दोन रस्ता दुभाजक आहेत तेथे एक रस्ता दुभाजक ठेवुन रस्त्याचे रूंदीकरण करून रस्त्याच्या कडेला झाडे लावली जावीत. आपण कल्याण महानगरपालिकेत उपायुक्त होतात. तेथे आपण जे काम केले तिथे ज्याप्रकारे बदल घडवून आणला आहे. त्याचप्रमाणे उल्हासनगरमध्ये हिरवळ व सौदर्यीकरणावर लक्ष केंद्रीत केले जावे ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.

<u>मा. महापौर:—</u>मी रूपाणी साहेबांच्या हे लक्षात आणुन देवू इच्छिते की, जेथे आपण राहता व मी राहते. व आपले सचिव साहेब सुध्दा राहतात. तेथे श्री. दुरू खत्री यांचा किती मोठा कारखाना आहे. दिवसरात्र तेथुन किती मोठया प्रमाणावर धुर बाहेर पडतो. त्याबाबत आपण का नाही बोलत?

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>मी आता तेच बोलणार होतो की, शहरामध्ये रहिवासी क्षेत्रामध्ये जे कारखाने आहेत.

<u>मा. महापौर:—</u>नाही. पेट्रोल पंप तर लांब आहे. आपल्या विभागामध्ये जे कारखाने चालु आहेत. लोकांना दम्याचे आजार होत आहेत. मी बोलणे बरोबर वाटत नाही परंतु आपण तर त्या विभागाचे सदस्य आहात आपण तर बोलले पाहिजे ना?

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>महोदया, माझे बोलणे पुर्ण झालेले नाही.

<u>मा. महापौर:—</u>किती कारखाने आहेत? किती धुर बाहेर सोडतात याबाबत आपण चर्चा केली पाहिजे. मी त्याबाबत बोलणे बरे वाटत नाही.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>शहरामध्ये रहिवासी क्षेत्रात असे जेवढे काही कारखाने आहेत ज्यांचे धुरांडे बाहेर काढलेले आहे. आता दुरू खत्री यांच्या कारखान्याबाबत महापौर महोदयांनी स्वत: म्हंटले श्री. दुरू खत्री यांच्या कारखान्यातुन एवढा काही धुर बाहेर पडतो की ज्याबाबत आम्ही तक्रार सुध्दा केलेली आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळापर्यंत आम्ही तक्रारी केलेल्या आहेत परंत अदयाप पर्यंत काहीही कारवाई झालेली नाही.

<u>मा. महापौर:—</u>आपणांस माहित असेल किंवा नाही या कारखान्यातुन सकाळ संध्याकाळ फार मोठया प्रमाणावर धुर बाहेर फेकला जातो. तेथे बसणे सुध्दा मुश्किलीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>त्याकडे सुध्दा लक्ष दिले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौर महोदया, आता पर्यावरणाविषयी जी काही चर्चा चालु आहे जेथपर्यंत मी समजतो की, पहिले आम्हाला कायदा असा सांगितला गेला होता की, ४० फुट रूंदीचा जो कोणताही रोड असले तर तेथे दुभाजक लावले जात नाही. जर ४० फुट रूंदी पेक्षा जास्त रूंदीचे रोड असतील जसे की ६०, ८०,१०० फुट रूंदीचे तर तेथे दुभाजक लावले जातील. आयुक्त साहेब आपण जर याचा खुलासा केलात तर बरे होईल. ३३ रस्ते तसेच पाच नंबरचा एक रोड घेतला होता. त्याबाबतीत आजपर्यंत असे सांगण्यात आले होते की, ४० फुट रूंदीचे रस्त आहे त्यामध्ये दुभाजक बसविता येणार नाहीत. ६० आहेत, ८० आहेत , १०० फुट रूंदीचे रस्ते असतील तर दुभाजक बसविता येतील हे झाले पहिले. दुसरे असे की, आज जे आमचे सदस्य स्पीड ब्रेकर साठी ओरड करतात. स्पीड ब्रेकर ताबडतोब लागले पाहिजेत. व जेवढया काही नगरसेवकांची तक्रार आहे ती ही आहे की, आधी जे स्पीड ब्रेकर लावले होते ते गायब झाले आहेत. त्यांची तर दुरूस्ती करू शकतात. अशा स्पीड ब्रेकर वर लक्ष दिले जावे. दुसरे जे दुभाजक लावले आहेत. त्यांना व स्पीड ब्रेकर वर कमीत कमी रंग मारला जावा. मध्यंतरी आपण आल्यानंतर हे काम चालु झाले होते. परंतु ते अर्ध्यावरच बंद झाले आहे. स्पीड ब्रेकरवर जो झेब्रा कलर मारला जातो. त्याचबरोबर पर्यावरणाबाबत हा जो अहवाल आमच्या समोर ठेवला आहे. यावर अंमलबजावणी कधी पर्यंत होणार. आता येथे बसल्या बसल्या मी ब—याचशा बाबी वाचल्या आहेत. अनाधिकृत नळजोडण्या आहेत,नाल्यांमध्ये नळजोडण्या आहेत. असा प्रत्येक विषयाबाबत माहिती दिली आहे. परंतु यावर अंमलबजावणी केव्हा होईल.जरा त्याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. गल्यांमध्ये ज्या ज्या नळजोडण्या घेतल्या जातात त्यासाठी मोठमोठया जलवाहीन्या टाकण्यासाठी आमदार पप्पु कालानी साहेबांनी दोन करोड रू. चा निधी उपलब्ध करून दिला होता. बाकीच्या ज्या नळजोडण्या आहेत. त्यांच्यासाठी मोठमोठया जलवाहिन्या टाकुन त्यावरून कनेक्शन शिफ्ट करून घेतल्या पाहिजेत. रोगराई फैलावण्याची जी शक्यता आहे. त्याबाबत कार्यवाही कधी होणार? हा जो अहवाल आहे त्यास मंजुरी दिल्यानंतर तो केवळ दप्तरी दाखल होता कामा नये. तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. ती कार्यवाही कधी होणार? याबाबतही जरा माहिती दिली तर बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, खराब केमिकल्स टॅकरव्दारे आणुन या शहरात सोडले जात आहेत. त्याबद्दल पर्यावरण अहवालात काहीतरी खुलासा व्हावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, माझ्या निवेदनात मी तोच खुलासा करत होतो की, एक हरकतीचा मुद्दा आला त्यामुळे माझे निवेदन अर्धवट राहीले. शांतीनगर येथील नाल्यात जे केमिकल सोडले जाते. ते टॅकर दोन वेळा पकडुन आम्ही त्यांच्यावर पोलिस केस सुध्दा केली आहे. त्याचा एफआयआर नंबर मी आमच्या वैद्यकीय अधिका—यांकडे मागत होतो. सध्या तो माझ्याकडे नाही परंतु अशा टॅकरवाल्यांवर आम्ही पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. व त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये माझी काही बातमी आली होती.त्या बातमीचा खुलासा त्या कंपनीकडुन करण्यात आला होता की ती कंपनी पुण्याहुन इकडे केमिकल्स पाठवत नाही. दोन वेळा आम्हाला माहिती मिळाली दोन्ही वेळा आम्ही त्यांना रंगेहाथ पकडुन पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. दुसरी एक गोष्ट आमचे नगरसेवक श्री. सोनवणे यांनी सांगितले रस्त्यावर जी गॅरेजेस चालु आहेत त्यांच्यामुळे जे प्रदुषण होत आहे त्याचा उल्लेख या अहवालात नाही. याबाबतीत सुध्दा लक्ष दिले जाईल. व आताच आपण जसे म्हंटले की, याची अंमलबजावणी कधी होईल. हे जे १७ मुद्दे आहेत. त्या सर्वांची जर पुर्तता करायची असेल तर कित्येक कोटी रूपये लागतील.आमची आर्थीक स्थिती जी आहे ती पाहुनच आम्हाला अंमलबजावणी करावी लागेल. हा काही एक वर्षाचा कार्यक्रम नाही. प्रत्येक वर्षी पर्यावरण अहवाल तयार होईल. कृती आराखडा तयार करू व त्यामधुन जे तात्काळ करण्यासारखे आहे ज्यास पैशाची आवश्यकता नाही ते ताबडतोब केले जाईल परंतु ज्याकामी पैसा लागतो किंवा काही कायदेशिर अडचण आहे. त्यासाठी थोडा कालावधी लागेल. आमच्याकडे जो निधी उपलब्ध आहे तो लक्षात घेवून या अहवालाची अंमलबजावणी केली जाईल. व रस्त्यांच्या बाबतीत, जी इंडियन रोड कॉग्रेस आहेत त्यांनी जो निकष ठरवून दिला आहे ते लक्षात घेतले जातील. मी शहर अभियंत्यांना आदेश देईन की त्यांनी आय.आर.सी. च्या स्टॅण्डर्ड प्रमाणे रस्त्यावरील दुभाजक व गतीरोधक यांच्याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. आय.आर.सी.स्टॅण्डर्ड नुसार दुभाजक फक्त ८० फुट पेक्षा अधिक रूंदीच्या रस्त्यांवर बसविता येतात. व जे गतिरोधक आम्हाला शहरातील

रस्त्यांवर बसवायचे असतात. त्यांचे सुध्दा नॉर्मस आहेत. त्यांची उंची किती असली पाहिजे. रूंदी किती असली पाहिजे. याबाबत सुध्दा काही नॉमर्स आहेत. या शहरामध्ये नॉमर्सला बाजुला करून बरेचसे गतिरोधक तयार केले आहेत. काही लोकांनी अनाधिकृत नळ जोडण्या घेतल्या आहेत. त्यामुळेच काही स्पीड ब्रेकर तयार झाले आहेत. याशिवाय आम्ही सर्व ठिकाणी सर्व्हे करून जेथे आवश्यकता आहे तेथे स्पीड ब्रेकर तयार केले आहेत. व जेथे आवश्यकता नाही तेथील स्पीड ब्रेकर काढुन टाकण्याबाबत एक प्राकलन यार केले आहेत. त्याचा खर्च सुध्दा काही लाखामध्ये आहे. बरीचशी कामे सुरू करणे किंवा करणे या शहरास नितांत गरजेचे आहे. परंतु निधीच्या अभावी ती कामे सुरू करू शकलो नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>आता स्पीड ब्रेकर बिना नॉर्मस नुसार तयार केले जात आहेत. तीन नंबर मध्ये महाराजा हॉल आहे. जुने जे स्पीड ब्रेकर तयार केले आहेत ते नॉर्मस नुसार नाहीत परंतु आता जे तयार करणार आहात ते तरी नॉर्मस नुसार तयार करा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>आता जे स्पीड ब्रेकर तयार होत आहेत ते नॉमर्सच्या हिशोबानेच तयार झाले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>नाही होत,मी सांगतो आपणांस महाराजा हॉल समोर आता स्पीड ब्रेकर बसविले आहेत ते बिना नॉर्मस नुसार आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>आम्ही त्यांची चौकशी करू व ज्या अभियंत्यांनी नॉर्मसचे उल्लंघन करून स्पीड ब्रेकर तयार केले असतील त्याच्यावर कारवाई करू.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–</u>स्पीड ब्रेकर बाबतीत मला एक सूचना करायची आहे. मुख्य रस्त्याला जे जोड रस्ते तयार करण्यांत आलेले आहेत जे सिमेंट कॉक्रिटचे किंवा डांबरी रस्ते आहेत. झोपडपट्टयांमधुन जे रस्ते निघतात त्या रस्त्यांची स्थिती अशी आहे की, झोपडपट्टयांमध्ये लहान लहान मुले रस्त्यांवर धावत येतात. व खेळतात. स्पीड ब्रेकर बाबतीत कित्येक पत्रे दिली आहेत. परंतु तरीही संवेदनशिल अशाठिकाणी स्पीड ब्रेकर बसविले नाहीत. तेथे सुध्दा प्रत्येक मुलांना अपघात झाला आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:–</u>मा. महापौर महोदया, या पर्यावरण अहवालामध्ये महत्वाचा जो भाग आहे तो महापालिका शाळांच्या संदर्भातील आहे. आणि त्या अहवालामध्ये स्पष्टपणे हे लिहीले आहे की, महापालिका शाळांची अवस्था ही वाईट आहे. आणि त्यामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी आजही त्यांना शाळांमध्ये ज्या प्राथमिक सुविधा मिळाल्या पाहिजेत त्यापासुन ते वंचित आहेत. त्यांनी दुसरा उल्लेख हा केला आहे की, महापलिकेस या शाळांची सुधारणा करताना आर्थीक परिस्थितीचे कारण सांगता येणार नाहीत. कारण त्या मुलांचे शैक्षणिक भवितव्य आहे. ते जर वाया घालवायचे नसेल तर आर्थीक परिस्थितीचे कारण न सांगता महापालिकेला उपाय योजना करायच्या आहेत. कृपया आयुक्त महोदयांकडुन त्याबाबतही खुलासा अपेक्षित आहे. महापालिका शाळांना विकसित करण्याबाबतीत काय धोरण आपल्याकडे आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये २८ प्राथमिक शाळा आहेत. मराठी, हिंदी व सिंधी माध्यमाच्या शाळा चालविल्या जातात. त्यामधील २५ इमारती या महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. व तीन इमारती आम्ही भाडयाने घेतल्या आहेत. ज्या २५ इमारती आहेत. त्या आम्हाला जिल्हा परिषदेकडुन हस्तांतरीत झालेल्या आहेत. जेव्हा आम्ही प्राथमिक शाळा आमच्याकडे हस्तांतरीत करून घेतल्या. त्यांची अवस्था बहुतांश खराब आहे. मागील वर्षी आम्ही त्यांच्या दुरूस्तीवर ४० लाख रूपये खर्च केले. परंतु काही इमारती अशा आहेत त्याची दुरूस्ती करूनही काही फायदयाचे नाही. तेथे नवीन इमारत बांधावी लागेल. आम्ही जेव्हा या बाबतची जेव्हा सर्व्हेक्षण केले तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, आमच्या जेवढया काही शाळा आहेत. त्यांचे २५० वर्गांची आम्हाला आवश्यकता आहे. व त्यांच्या बांधकामासाठी आजच्या डी.एस.आर नुसार जवळ जवळ ४ कोटी रूपयांची आवश्यकता आहे. त्यासाठी सुध्दा मी शहर अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे त्यात शहर अभियंता, महापालिका मुख्य लेखा परीक्षक, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व कार्यकारी अभियंता स्थापत्य अशा चार लोकांची समिती स्थापन केली आहे. हे लोक महापालिकेच्या सर्व शाळांच्या

सद्यस्थितीबाबत एक अहवाल देतील. त्यानंतर त्यांच्या पुर्नबांधणीसाठी किती खर्च येईल. याचा अंदाज देतील आता तर प्रार्थमिक अंदाज असा आहे की जवळ जवळ ४ कोटी रूपये खर्च येईल. परंतु प्रत्यक्षात किती खर्च येईल याबाबतीत ही समिती मला एक महिन्याच्या आत अहवाल देणार आहेत. त्यानंतर महात्मा फुले शिक्षण योजना जी आहे तिच्या माध्यमातुन ४० लाख रू. अनुदान मिळेल. व बाकी महानगरपालिकेच्या निधीतुन येणा–या दोन तीन वर्षामध्ये खर्च महानगरपालिकेस आपल्या बजेटमधुन करण्याबद्दल तरतुद करावी लागेल. व शाळांची पुर्नबांधणी करावी लागेल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):–</u>पास?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–</u>महापौर महोदया, जसे आमच्या आयुक्त साहेबांनी सांगितले की अशी अशी आम्ही तरतुद करू. दोन वर्षामध्ये पुर्ण होईल, त्यांनी याकामी ४ लोकांची समिती सुध्दा स्थापन केली आहे. ते ऐकुन मला थोडा आनंद व दु:ख सुध्दा झाले. दु:ख याबाबतीत झाले की, आजपासुन जवळ जवळ दिड वर्ष अगोदर मी अग्निशमन इमारतीबाबत प्रश्न विचारला होता. त्याबाबतीत आयुक्त साहेबांनी सांगितले होते की आम्ही श्री. बुलचंद सोनेसर यांना याकामी नेमले आहे. व अग्निशमन दलाची ती इमारत खाली करून घेतली आहे. व व्हीटीसी ग्राऊंड येथे त्यांचे कार्यालय स्थापन केले होते. व असे सांगितले होते की, तीन चार महिन्यामध्ये इमारतीचे काम पुर्ण होईल. परंतु मला अत्यंत दु:खाने म्हणावे लागत आहे की, अदयाप पर्यंत ज्यांच्या अहवालाची आम्हाला माहिती नाही. सोनेसर यांनी काय केले आहे. इमारत तयार होईल किंवा नाही. आता शाळांबाबत जे आयुक्तांनी म्हंटले असे तर होणार नाही चार जणांची ही जी समिती आहे ती समितीच राहील. व यांनी जी अंमलबजावणी करायची ती होणार नाही. तर याबाबतीत मला कधी कधी शंका येते. दुसरे असे की साहेबांनी आताच सांगितले की ८० फुटापेक्षा जास्त रूंदीच्या रस्त्यावर दुभाजक लावले जातात. आमचे जे शहर अभियंता आहेत त्यांना हे माहित आहे का? आपण जे म्हंटलात की, अभियंत्यांना विचारले जाईल. त्यांनी जर नॉर्मसचे उल्लंघन करून स्पीड ब्रेकर तयार केले असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. मला असे वाटते की,आता जे शहर अभियंता म्हणुन आले आहेत ते अलिबाग येथुन आले आहेत. दुस–या कुठल्यातरी कार्यालयातुन आले आहेत त्यांनी महापालिकेमध्ये काम केलेले नाही. तर त्यांना याबाबतीत माहिती आहे का? की दुभाजक कोणत्या नॉर्मस नुसार रस्त्यावर लावले पाहिजेत. आता तर त्यांनी सांगितले तर मला असे वाटते की, त्यांना काही माहिती असेल. कारण की, अधिका–यांनी दयावयाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपण स्वत: देता. परंतु शहर अभियंत्यांना याबाबतीत काय माहिती आहे. ती तर आम्हाला पाहिजे ना? जर त्यांनाच माहिती नसेल तर उप अभियंता काय करणार? कनिष्ठ अभियंता काय करणार?जर त्यांना माहिती असेल तर त्यांनी आम्हास सांगितले तर फार बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, सभागृह हे जे आहे ते कुण्या अधिका–याच्या ज्ञानाची परीक्षा घेण्यासाठी नाही. व हे सुध्दा मानणे चुकीचे आहे की, जे अधिक्षक अभियंता कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांना इंडियन रोड कॉग्रेसचे निकष माहित नाहीत. आपल्या या वक्तव्यावर माझी हरकत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–</u>आपण स्वत: म्हणालात की, आभियंत्यांकडुन काही चुक झाली असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>आपल्या सारख्या एवढया अनुभवी सदस्याने वरीष्ठ अधिका–यांच्या ज्ञानाविषयी शंका घेणे योग्य नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–</u>शंका कुणी घेतली? आमचे सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितलेल्या मुद्दयावर आपण म्हणालात की, एखादया अभियंत्याने नॉर्मसचे उल्लंघन करून जर स्पीड ब्रेकर बसविले असतील तर त्यांच्यावर कारवाई करू. चुक झाली असेल तर एक तर शहर अभियंता साईड वर जात नसेल. प्रत्येक गोष्टीबाबत आपण सभागृहात सांगतात की याबाबतीत आम्ही कारवाई करू. यासाठीच मी विचारू इच्छितो की, त्यांना माहिती असेल तर ठिक आहे. ही शंकेची गोष्ट नाही. आम्ही आपणांस विचारू इच्छितो की हया चुका पुन्हा पुन्हा का होतात. कारण की आम्हाला सुध्दा माहिती पाहिजे आम्ही सुध्दा विचार करू.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>याबाबतीत मी खात्रीनिशी असे सांगु इच्छितो की, येथे जे शहर अभियंता म्हणुन आलेले आहेत. त्यांच्याकडे अनुभव आहेत. जवळ जवळ मागिल दहा वर्षापासुन ते कार्यकारी अभियंता म्हणुन काम करत आहेत. त्याअगोदर दहा बारा वर्ष ते उपअभियंता म्हणुन काम करत होते. त्यांनी ठाणे महानगरपालिका , कल्याण डोंबिवली महानगरपालिकांमध्ये काम केले आहे. अहमदनगर जिल्हा परीषद सारख्या जिल्हा परीषदेमध्ये काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात रायगड जिल्हा परीषदेसारख्या जिल्हा परीषदेत काम केले आहे. आपण जे म्हणता की त्यांना या गोष्टीचे ज्ञान नाही. आपल्या या वाक्यास माझी हरकत आहे. त्यांना जर ज्ञान नसते तर एम.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण होवून ते इथे आले नसते. मला वाटते की या विषयावर सभागृहात जास्त चर्चा होता कामा नये. काही तक्रार असेल तर माझ्याकडे येवून ती आपण नोंदवू शकता. त्यावर मी जरूर योग्य ती कार्यवाही करेन.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)</u>:—पास?

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ५:—</u> उल्हासनगर शहरातील पर्यावरण अहवालाआधारे तयार केलेल्या कृती आराखडयास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर महानगरपालिका पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ सादर केला आहे. संपूर्ण शहरातील पर्यावरणाचे व्यवस्थेसाठी करावयाच्या सर्व कृतींचा यामध्ये समावेश आहे. या अहवालामध्ये वर्ष २००३—२००४ चा पर्यावरण विषयक अहवाल व वर्ष २००४—२००५ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यवाही करावयाच्या महत्वाच्या १७ मुद्दयांवरील कृती आराखडा याचा समावेश आहे. कृती आराखडयामध्ये दर्शविलेल्या विषयांबरोबरच आणखी महत्वाचे मुद्दे विचारात घेणे, त्याबाबत करावयाची कृती ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या ठिकाणी सर्वसामान्य, अतिशय महत्वाचे व दुर्लक्षित न करण्यासारखे तसेच तातडीने कार्यवाही करावयाच्या विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. नमूद केलेल्या महत्वाच्या १७ विषयां व्यतिरिक्त कमी प्राधान्यक्रम असलेले व तातडीने उपाययोजना करावयाचे महत्वाचे विषय असू शकतात. परंतु सर्व प्रथम सुरुवात करणे गरजेचे आहे. एकदा सुरुवात केल्यानंतर इतर महत्वाच्या विषयासंबंधी उल्हासनगर महापालिका पुढाकार घेवुन कृती करु शकते.

१. पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण
२. प्रकल्प व्यवस्थापन गट
३. ई गर्व्हनन्स आणि ई नियोजन गट
४. पर्यावरण व आरोग्य विषयक धोरणांची कार्यक्षमता वाढविणे.
५. आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा.
६. परिसरातील हवा गुणवत्ता व्यवस्थापन.
७. औद्योगिकरण झालेल्या भागांचे रेखांकन.
८. मल नि:सारण व सांडपाणी प्रक्रिया केंद्र व्यवस्थापन.
९. पाणी पुरवठा व्यवस्थापन.
१०. महापालिका शाळांचे व्यवस्थापन.
११.स्वयंरोजगार.
१२.भुयारी गटारे — नाला व्यवस्थापन भाग १
१३.भुयारी गटारे — नाला व्यवस्थापन भाग २
१४.लोकसंख्या व गृहनिर्माण व्यवस्थापन.
१५.सामाजिक सहभाग व व्यवसाय उद्योग.
१६.UMC-KDMC-AMC यांची एकमेकांशी सांगड
१७.झोपडपट्टी सुधार कार्यक्रम

वरील सर्व बाबी उल्हासनगर महापालिका प्रशासनातर्फे पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ पुस्तिका स्वरुपात सादर केले असुन ते महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ५० **दिनांकः—०४/११/२००४.**

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका प्रशासनातर्फे प्रस्तावित करण्यात आलेल्या पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—सर्व शहरवासियांना, सर्व नगरसेवकांना , सर्व अधिका—यांना व सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. २५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—४/११/२००४

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.४/११/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक ४.११.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :— श्रीमती मालती करोतीया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३१. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३२. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३३. | श्री. प्रशांत सुरेश जाधव |
| ५. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ३४. | श्री. सुरेश जाधव |
| ६. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ३५. | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३६. | श्री. दर्शनसिंग खेमाणी |
| ८. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ३७. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३९. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४०. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४१. | श्री. भालेराव गौतम |
| १३ | श्रीमती बामणकर नंदिनी | ४२. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४३. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४४. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १६. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ४५. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १७. | श्री. नाना आनंदा पवार | ४६. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १८. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ४७ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४८. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २०. | हिश्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५०. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५१. | श्री. होशियारसिंग लबाना |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २४. | श्रीमती वनवारी मोना | ५३. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २६. | श्री. जेसवानी सतरामदास | ५५. | श्री. बेहरानी मोहन |
| २७. | श्री. लुंड गोविंदराम | ५६. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी, |
| २८. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ५८. | श्री. लालवीन दिलीप |
| ३०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | | |

तर

<u>मा.उप महापौर :— श्रीमती. जया साधवानी</u> तसेच मा. सदस्य / सदस्या १.श्री. टेकचंदानी राजु, २. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ३.श्री. वाघे शामु बाबु, ४. श्री. दिलीप गायकवाड, ५.. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ६. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ७. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ८. श्री. शांताराम निकम , ९. श्री. मोहन साधवानी, १०. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, ११. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास , १२.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १३. श्री. जयसिंघानी अनिल, १४.श्रीमती किरण लखी, १५. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, १६. डॉ. निना नाथानी, १७. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १८. श्री. हरदास माखिजा, १९. श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास , २०. श्री. पंजाबी लाल देवनदास, २१. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, सर्वात आधी मी विनंती करतो की, आमचे नगरसेवक श्री.सुरेश गायकवाड यांच्या बंधुचे परवा निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. तसेच आमच्या सदस्या श्रीमती मोकल यांच्या सास—यांचे निधन झाले आहे. डॉ. मोकल यांना सुध्दा श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

<u>शोक प्रस्ताव:—</u>

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौर,आमची एक विनंती आहे. आज जी महासभा आहे. त्यातील प्रश्नोत्तरे घेण्यात येवू नये. सरळ विषयाला सुरूवात करण्यात यावी. तसेच त्याबरोबर महाराष्ट्रात कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आर.पी.आय यांची जी सत्ता आली आहे. तसेच आमचे आमदार श्री. पप्पु कालानी पुन्हा आमदार म्हणुन निवडुन आले म्हणुन मी सदनामध्ये सर्वांचे तोंड गोड करू इच्छितो. म्हणुन मला मिठाई वाटण्याची अनुमती दिली जावी. धन्यवाद.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>मा. महापौरांनी अनुमती दिली आहे. विषयाला सुरूवात करू या?

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २:—</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०८/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>सचिव, आमचे सभेचे सदस्य सर्वात आधी इतिवृत्ताबदद्ल बोलु इच्छितो. आम्ही जे महासभेत बोलतो. अधिकारी त्याची किती पुर्तता करतात. आम्ही इतिवृत्त जे पास करणार आहोत ते याचे प्रमाण आहे. पान नं. ५ जर आपण पाहिले तर. आम्ही प्रश्न विचारला होता की, पार्टहोलची यादी किती ठेकेदारांनी केली आहे. फक्त १४ नावे होती. ते १४ नाव देण्यात अडीच महिने लागले. या अगोदरही मी आपणांस विचारले होते की कुठे केठे पार्टहोलस्चे काम झाले आहे. त्यावेळी म्हंटले होते खुप लांबलचक यादी आहे देवू शकत नाही. आता अचानक हातात एक यादी आली आहे. जर अधिका—यास वाटत असेल तर यादी देतील. नाही वाटले तर सांगतील खुप मोठी यादी आहे तुम्ही येवून सार्वजनिक बांधकाम विभागात बघा. मला या गोष्टीचे दु:ख आहे. प्रशासन जितके कडक असले पाहिजे तितके नाही. मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो की डिसेंबर महिन्यात मी उद्यानाविषयी प्रश्न विचारला होता. आयुक्त साहेबांनी त्यात आश्वासन दिले होते दोन महिन्यात त्याची पुर्तता करेन परंतु ११ महिने झाले तरी त्याची पुर्तता झाली. उद्यानाचा प्रश्न अर्धवट राहिला आहे. आम्ही महासभेत बोलतो. असे वाटते की हे फक्त ऐकतात आणि निघुन जातात त्याच्यावर पुर्तता करत नाहीत. माझी आयुक्तांना पुन्हा एकदा विनंती आहे. जो पण सदस्य प्रश्न विचारतो त्याकडे कमीत कमी लक्ष तरी दिले जावे. जसे तुम्ही म्हणता एका आठवडयात यादी देवू परंतु अडीच महिने झाले तरी दिली नाही. तिस—यांदा सभा झाली तेव्हा तुम्ही दिली आहे. जेव्हा प्रश्न येतो तेव्हा तुम्ही यादी देत नाहीत. आम्ही जे इतिवृत्तात बोलतो ते बोलु नये असे वाटते. अधिकारी आमच्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत. या आठवडयात मला अजुन एक गोष्ट लक्षात आली आहे. जेव्हा आम्ही एखादया अधिकारींना फोन करतो त्यांना भेटायला जातो. तेव्हा ते सांगतात आम्ही खुप व्यस्त आहोत. संत गाडगेबाबा महाराज अभियानात आम्ही व्यस्त आहोत. काही पण काम सांगा असेच म्हणतात. गाडगेबाबा सफाई अभियान असे तर नाही म्हणत सर्व शहर

बाहेरून साफ करा. आतुन तसेच असू दे. आमचे काहीच काम होत नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे. जर असे काही काम आले तर अधिकारींना सांगा ज्या लोकांच्या तक्रारी आहे त्याच्यावर लक्ष दयावे. सर्व बहाने करतात. आम्ही व्यस्त आहोत आम्ही नाही करू शकत असे सांगतात. हेच मी म्हणु इच्छितो. या इतिवृत्तात खुप काही सांगायचे होते पण मी सर्वसाधारण असे सांगितले आहे. यानंतर जे पण सदस्य बोलतील त्यांच्या बोलण्यावर लक्ष दिले जावे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—इतिवृत्त कायम? ठिक आहे.

मा.महापौर:—सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानंमते समंत करण्यात येत आहे.

विषय क्र. २:— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १९/०८/२००४ चे इतिवृत्त कायम करणे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय सुरू करण्यापुर्वी दोन अधिकारी नवीन आले आहेत त्यांची ओळख करून देतो. एक आहेत श्री. बनसोडे साहेब ज्यांना मुख्य लेखा परीक्षक पद दिले गेले आहे. आणि श्री. पवार शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी कृपया त्यांनी मंचावर यावे. व आपली ओळख करून दयावी.

श्री. सुरेश बनसोडे (मुख्य लेखा परीक्षक):—मा. महापौर, आयुक्त साहेब,महापालिका सचिव व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य आणि सभागृह यांना माझे अभिवादन. माझे नाव सुरेश बनसोडे मी महाराष्ट्र वित्त लेखा सेवेचा वर्ग १ चा अधिकारी आहे. माझी शैक्षणिक पात्रता बी.ई.सिव्हील असुन मी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयामध्ये साधारणत: आठ वर्ष नोकरी केलेली आहे. मी ग्रामविकास सुत्रसंचालन विभाग तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग याठिकाणचे माझे काम झालेले आहे. माझ्या अनुभवाचा तसेच ज्ञानाचा फायदा आणि माझे काम मनापासुन करण्याच्या वृत्तीचा फायदा या महापालिकेला होईल. यासाठी मी प्रयत्न करेन तसेच यासाठी मला आपले सहकार्य अपेक्षित आहे धन्यवाद.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—श्री. पवार यावेळी इथे उपस्थित नसुन ते नंतर येतील तेव्हा त्यांची ओळख करून देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—ते कोण आहेत? शिक्षण मंडळाचे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय क्र. ३:—श्री. बी. एस. पवार यांच्या प्रतिनियुक्तीवरील महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. ते. उपस्थित नाहीत, कोण आहेत ते माहित तर पडले पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्ही त्यांचा चेहरा देखिल पाहिला नाही.

काही सदस्य :—डिफर करा. डिफर.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—हा प्रस्ताव पुढे ढकलायचा? सर्वसंमतीने?

<u>मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, काही कारणास्तव ते अधिकारी आज सभागृहात उपस्थित नाहीत. सकाळी ते उपस्थित होते. दिवसभर ते माझ्या सोबतच होते. ते नाही आहेत म्हणुन त्यांचा विषय वगळणे ठिक नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>मा. महापौर महोदया, आम्ही त्यांचा प्रस्ताव नाकारत थोडा आहोत? पुढे ढकलत आहोत. सध्या ते सभागृहात उपस्थित नाहीत, सभागृहाचा मान सुध्दा राखला पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>कदाचित त्यांना आजच्या सभेची माहिती नसेल कारण की ही तहकुब सभा आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी':—</u>ज्या अधिका—याचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यांत आला आहे त्यांना सभा केव्हा आहे ती माहित नाही. असे ते कोणते अधिकारी आहेत? ते तर बेजबाबदार अधिकारी झाले ना?

<u>मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>पुढील महासभेत येवून त स्वत: माहिती देवू शकतील परंतु आजच्या सभेत ते उपस्थित नाहीत म्हणुन त्यांच्या विषयीचा विषय पुढे ढकलणे हा काही चांगला संकेत नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>त्यांना येथे येवून किती कालावधी झाला?ते महासभेत येत नाहीत हा काही चांगला संकेत नाही.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>आयुक्त साहेब, महासभेचे कामकाज संपेपर्यंत जर त्यांना बोलावुन घेता आले तर बोलावुन घ्या ना. मा. महापौरजी, एक सूचना अशी होती की गेल्या चार—पाच महासभांमध्ये मी एक बघतो आहे. संपुर्ण महासभा चालु असताना तळमजल्यावर पोलिसांचा ताफाच्या ताफा असतो. आणि वरती प्रेक्षक गॅलरीमध्ये कुठल्याही प्रेक्षकाला बसण्यास परवानगी दिली जात नाही. हा खरे तर तसे पाहिले तर लोकशाहीचा अपमान आहे. आणि प्रेक्षक गॅलरीमध्ये का येवू देत नाहीत याचे पण आयुक्तांकडुन उत्तर मिळाले तर बरे होईल.

<u>मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, मागील काही महासभांमध्ये या सभागृहात व सभागृहाच्या बाहेर सुध्दा अशी काही परिस्थिती निर्माण झाली होती. ज्यामुळे महापालिका कार्यालय व त्याच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण होवू शकत होती. महापालिका सभागृहाच्या बाबतीत किंवा महापालिकेच्या बाबतीत अशी काही जर स्थिती निर्माण होत असेल तर प्रेक्षक गॅलरीमध्ये प्रवेश देणे आम्हास उचित वाटले नाही. कारण की काही दिवसापुर्वी काही असामाजिक तत्वाचे लोक प्रेक्षक गॅलरीमध्ये येवून बसले होते. व तेथे जे भांडण झाले त्याचे रूपांतर या सभागृहाबाहेर काही अव्यवस्था किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. तसा एक गोपनिय अहवाल पोलिस विभागाकडुन महापालिका प्रशासनास प्राप्त झाला होता त्यामुळे आम्ही पोलिस विभागास विनंती केली होती की जेव्हा जेव्हा आमची महासभा असेल या शहरामध्ये अव्यवस्थेची स्थिती निर्माण होवू नये म्हणुन पोलिस बंदोबस्त दिला जावा. जर या सभागृहास विश्वास असेल, कारण की ही सर्व आपली व आमची जबाबदारी आहे. या सभागृहाचे पावित्र राखणे, सभागृहाबाहेर सुध्दा, आमचे सर्व सन्माननिय सदस्य व त्यांचे सर्व जे काही अनुयायी आहेत त्यांचे वर्तन चांगले राहो ही आपली व आमची जबाबदारी आहे. जर आपण ही जबाबदारी घेत असाल तर या नंतर येणा—या महासभेत प्रेक्षक गॅलरीमध्ये नागरिकांना प्रवेश करण्याची आम्ही परवानगी देवू शकतो. परंतु कुठलाही अनुचित प्रकार होता कामा नये. याबाबत सभागृहाच्या वतीने प्रशासनास अवगत केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आयुक्त साहेब माझे असे म्हणणे आहे की, कमीत कमी ज्या नगरसेविका आहेत, त्यांचे जे पती आहेत ते बाहेर येवुन थांबतात. कमीत कमी त्यांना तरी प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जावा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>श्री. लाल पंजाबी साहेब, साहेबांनी जे सांगितले आहे, याचा अर्थ असा आहे की, या महानगरपालिकेवर असामाजिक तत्वांचा पगडा बसला आहे. असे यांचे म्हणणे आहे. असे जर असेल आणि प्रेक्षकांना जर .......

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—</u>श्री. टालेजी,जर आपणांस स्वत:ला असामाजिक तत्व समजत असतील तर आम्ही त्यांच्या मताशी सहमत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:'—</u>शहरातील जनतेला जर प्रेक्षक गॅलरीमध्ये जर प्रवेश देत नसाल तर हा लोकशाहीचा साारासार अपमान होत आहे. म्हणुन माझी ही विनंती आहे की, प्रेक्षक गॅलरी जनतेसाठी खुली केली जावी.

<u>मा. महापौर:—</u>नाही. श्री. प्रमोद टालेजी, प्रेक्षक गॅलरीबाबत आपण जे म्हणत आहात ना, नगरसेविकांचे पती प्रेक्षक गॅलरीत बसु शकतात. व तसेच प्रेक्षक गॅलरीत प्रवेश देण्यासाठी नगरसेवकांच्या स्वाक्षरीने जसे फॉर्म भरून दिले जात होते ती पध्दत यापुढेही चालु राहील.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>याबाबतच्या कायदयानुसार जे नियम आहेत ते नियम आहेत ते लागु केले जावेत ना?

<u>मा. महापौर:—</u>प्रेक्षक गॅलरीमध्ये जो काही गोंधळ होतो तो नियंत्रणात आणण्यासाठी असामाजिक तत्वाच्या लोकांना प्रवेश दिला जावु नये.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>परंतु प्रेक्षकांना किंवा नागरिकांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जात नाही हा त्यांचा अपमान आहे. ज्या नागरिकांना प्रेक्षक गॅलरीत यायचे आहे त्यांना येवू दिले जावे. त्यांना येवू देण्यास काय हरकत आहे.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>प्रशासनाधिकारी श्रीयुत पवार साहेब, आपण व्यासपीठावर यावे.

मा. महापौरांचे म्हणणे आहे की, आपण निर्णय घ्यावा प्रेक्षक गॅलरीमध्ये कुणाला प्रवेश दयायचा, कुणाला प्रवेश दयायचा नाही. त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:— </u>नियम काय म्हणतात?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, जेथ पर्यंत प्रेक्षक गृहात प्रवेशाचा प्रश्न आहे. याबाबत सभागृहानेच नियमावली तयार केली आहे. त्या हिशोबाने प्रेक्षक गॅलरीत प्रवेशासाठी नगरसेवक ज्याकुणाच्या अर्जावर सही करतात त्यानुसारच त्यांना प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दिला जातो. आपण ज्यांच्या अर्जावर सहया करता त्यांना प्रवेश दिला जातो. परंतु कुणीही असामाजिक तत्वाची व्यक्ती प्रेक्षक गॅलरीत जावू नये यासाठी जर काळजी घेतली जात असेल तर ती अतिशय चांगली गोष्ट आहे. सभागृहाच्या सुरक्षिततेची गोष्ट आहे म्हणुन प्रेक्षक गॅलरीत प्रवेश मिळविण्यासाठी जे लोक उत्सुक आहेत त्यांनी नगरसेवकांच्या स्वाक्ष—या घेतल्या पाहिजेत. प्रेक्षक गॅलरीत जे काही नागरिक येतात ते कोणत्या कोणत्या नगरसेवकाशी संबंधित असतात. नियमावलीच्या हिशोबाने बरोबर आहे.

<u>मा. महापौर:—</u>नियमावलीची कार्यवाही करू शकता.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>नियमानुसार तर प्रेक्षक गॅलरीत नागरिकांना प्रवेश दयायचा आहे. त्या व्यतिरिक्त मा. महापौरांनी विनियम तयार केले आहेत. त्याचा मुळ आधार असा आहे की, कुणीही प्रेक्षक जेव्हा प्रेक्षक गॅलरीत येतो तर त्यास कुण्या ना कुण्या नगरसेवकाने मी यास ओळखतो असे प्रमाणित करायचे आहे. परंतु हे करताना ही जबाबदारी घेतली पाहिजे की, प्रेक्षक गॅलरीत जी व्यक्ती प्रवेश करत आहे ती असामाजिक तत्वाची नाही. अशा व्यक्तीला प्रेक्षक गॅलरीत प्रवेश दयायचा ही नाही. जर या आधारावर आपण ओळख पटवत असाल तर कुणालाही आपण मनाई करू शकत नाहीत. ठिक आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>त्या नियमावलीमध्ये आमचे एक वाक्य समाविष्ट केले जावे. जेथे नगरसेवक स्वाक्षरी करतात ना त्याच्या बाजुला असे लिहिले जावे की, ही व्यक्ती गुन्हेगार नाही याचे मी खात्री देत आहे. या व्यक्तीवर काही गुन्हे नाही.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>आपणांस जर वाटत असेल की, ही व्यक्ती गुन्हेगार आहे तर तिची शिफारस करावयास नको.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>करावयास पाहिजे किंवा नाही. हे वेगळे आहे परंतु तेथे जर मी वर सांगितलेले एक वाक्य समाविष्ट केले तर विचार करून नंतरच स्वाक्षरी करतील.

<u>श्री. पवार (प्रशासन अधिकारी):—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय, मा. सचिव, सन्माननिय सदस्य त्याचप्रमाणे येथील सर्व उपायुक्त, माझे सहकारी माझे नाव बी.एस. पवार मी शिक्षण मंडळामध्ये १ सप्टेंबर ,२००४ पासुन प्रशासन अधिकारी म्हणुन हजर झालेलो आहे. या अगोदर माझी २७ वर्षे सेवा झालेली आहे. पुर्वी उल्हासनगर येथे मी ९२—९३ या एक वर्षामध्ये प्रशासन अधिकारी म्हणुन काम केलेले आहे. त्यानंतर मला येथुन पदोन्नती मिळाली. येथे येण्यापुर्वी कल्याण—डोंबिवली महानगरपालिकेचे शिक्षण मंडळात अडीच वर्षे प्रशासन अधिकारी म्हणुन काम पाहिले आहे. सप्टेंबर पासुन याठिकाणी मी हजर झालेलो आहे. मी आपणांला ओळख करून देतो. व आपल्या सर्वांकडुन मला सहकार्य मिळेल. अशी मी आपणांला विनंती करतो धन्यवाद.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>विषय क्र. ३ पास? एक वर्षासाठी? पास? विषय पास?

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ३:—</u> श्री. बी. एस. पवार यांच्या प्रतिनियुक्तीवरील
महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी
म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

शासनाने शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एसएटी—३३०४ / ()४१२/०४प्रशा—२, दि. २४/८/२००४ च्या आदेशान्वये श्री. बी. एस. पवार, मुख्याध्यापक, बी. जे. हायस्कुल, ठाणे यांची प्रशासन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, शिक्षण मंडळ या पदी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा) नियम, इत्यादी १९८१ मधील नियम ४० मधील अटी व शर्तीनुसार २ वर्षासाठी नियुक्ती केली आहे. श्री. पवार, सदर पदावर दि. १/९/२००४ पासून रूजू झाले आहेत.

श्री. पवार यांच्या प्रतिनियुक्तीस व अटी व शर्तीस मंजूरी देण्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी महासभेपुढे ठेवण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र ४८** दिनांक:—०४/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. बी. एस. पवार यांची दिनांक १/९/२००४ पासुन महानगरपालिका शिक्षण मंडळात प्रशासन अधिकारी म्हणुन एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय क्र. ४:— डॉ. के. आर. खरात यांच्या प्रतिनियुक्तीवरील उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

एक वर्ष पुर्ण झाले आहे. दुसरे वर्ष सुरू आहे. या दुस—या वर्षासाठी मंजुरी दयायची आहे. या दोन वर्षासाठी एकत्रितरित्या मंजुरी दयायची आहे. एक वर्ष पुर्ण झालेले आहे. आणखी एक वर्ष, पास?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, एका गोष्टीचा खुलासा मागु इच्छितो, या विषयाबाबत शासनाकडुन काही आदेश पत्र आले आहे का? त्यांच्या पदोन्नतीबाबत शासनाकडुन काही पत्र आले आहे का? याचा कृपया खुलासा केला जावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, डॉ. खरात यांची पहिली नियुक्ती जी आहे ती वैद्यकीय अधिकारी म्हणुन येथे पहिली नियुक्ती झालेली आहे. आम्ही राज्य शासनाला वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे जे रिक्त पद आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ नुसार जे पद आहे. या पदावर नियुक्ती करण्यासाठी विनंती केली होती. परंतु शासनाने फक्त वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती केली होती. आम्ही सरकारला पुन्हा विनंती केली, यांची पदोन्नती झाली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी हे जे आमच्याकडील रिक्त पद आहे त्याच पदावर त्यांची नियुक्ती केली आहे. यामुळेच हा प्रस्ताव थोडया उशिराने आपल्या समोर आलेला आहे. ज्या पदावर त्यांची नियुक्ती करण्यांत आली आहे त्या पदावरील नियुक्तीबाबतचे राज्य शासनाचे आदेश होते. यामुळे थोडया उशिराने आपल्या समोर हा प्रस्ताव ठेवला आहे. तसेही ते वैद्यकीय आरोग्य अधिकारी आहेत. आमच्याकडे उपायुक्त कमी असल्यामुळे उपायुक्त आरोग्य या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, आपणांस ज्यांना पहायचे असेल तर आपल्या माहितीसाठी मी आपणांस सांगु इच्छितो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानी:—वैद्यकीय आरोग्य अधिका—यांचे काम काय आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—वैद्यकीय आरोग्य अधिका—याचे काम काय आहे ते आपणांस महित आहेच. उपायुक्त आरोग्य यांचे काम काय आहे ते ही आपणांस माहित आहेच. ते ही आपण प्रश्नांच्या माध्यमातुन विचारू शकता त्या प्रश्नाचे उत्तर देईल. आता प्रस्ताव जो आपल्या समोर आहे. तो त्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचा आहे. व माझी सभागृहास विनंती आहे की, यांच्या नियुक्तीस मान्यता दिली पाहिजे. ते एक कार्यक्षम अधिकारी आहेत. याबाबत माझ्या मनात कुठलीच शंका नाही. व आपणांस माहिती देताना मला अतिशय आनंद होत आहे की हे जे डॉ. खरात आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाचे कामकाज चालत आहे. मागील तीन—चार वर्षापासुन महाराष्ट्र सरकारने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरू केले आहे. याअगोदर महानगरपालिकेस कोणतेही

पारीतोषिक मिळाले नव्हते. यावर्षी आम्हास तिस–या फेरीत चांगल्या प्रशासनिक बाबीबाबत तिस–या क्रमांकाचे पाच लाख रूपयाचे पारीतोषिक मिळाले. व आज चौथ्या फेरीसाठी सुध्दा आमची निवड झाली. आज राज्यशासनाकडुन एक टिम आमच्या प्रधान सचिव पाणी पुरवठा व आरोग्य विभागाचे प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ उल्हासनगरमध्ये आले होते त्यांनी संपुर्ण शहराचा दौरा केला. सर्व अधिका–यांकडुन माहिती घेतली. आम्ही चौथ्या फेरीसाठी सुध्दा पात्र ठरलो आहोत. यामध्ये डॉ. खरात यांचे फार मोठे योगदान आहे. हे येथे सांगताना मला अतिशय आनंद होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u>मा. महापौरजी, खरात साहेबांचा हा जो विषय आहे. त्यांना जुन महिन्यामध्ये एक वर्ष पुर्ण झाले आहे. त्यानंतर सहा महिने अधिक झाले आहेत. आता एक वर्षाचा कालावधी वाढविला जात आहे तो जुन महिन्यापासुन मोजला जाईल. सहा महिने त्यांना झाले आहेत आणखी सहा महिन्याच्या कालावधीसाठी मंजुरी दयायची आहे. हा जो सहा महिन्याचा वाढीव कालावधी आहे यासाठी महासभेची परवानगी घेतली नाही त्याचे कारण काय आहे. जुन महिन्यामध्ये त्यांना एक वर्ष पुर्ण झाले त्यांनतर सहा महिने अधिक झाले आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, मी आपणांस अगोदरच कारण सांगितलेले आहे. त्यांची जी प्रथम नियुक्ती झाली होती ती वैद्यकीय अधिकारी म्हणुन झाली होती. परंतु आमच्याकडे जे रिक्त पद होते. ते वैद्यकीय आरोग्य अधिका–याचे होते. व याबाबत जोपर्यंत दुरूस्ती येत नव्हती तोपर्यंत मी आपल्यासमोर प्रस्ताव ठेवु शकत नव्हतो. दुरूस्ती आल्यानंतरच प्रस्ताव ठेवला आहे. होवु शकते त्यामध्ये काही दिरंगाई झाली असेल जर दिरंगाई झाली असेल तर त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु यामागे दुसरे कोणतेही कारण नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–</u>मा. महापौरजी, त्यांना जे सलग सेवेत घ्यायचे आहे त्याबाबत मला काही एक म्हणायचे नाही. परंतु विषय हा आहे की, खरात साहेबांनी आरोग्य विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर माझी त्यांना एक विनंती आहे की कित्येक असे काही गलिच्छ वस्त्यांमधील प्रभाग आहेत की ज्यामध्ये सफाई कामगारांची नियुक्ती ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे. जेवढी व्हावयास पाहिजे. ती आजच्या तारखेला कित्येक प्रभागामध्ये म्हणजेच सफाई कामगारांच्या समस्या हा विषय त्यांनी लक्षात घेवून त्याची पुर्तता केली पाहिजे. दुसरी गोष्ट ही आहे की, शहरामध्ये रस्त्यांची सफाई तर अतिशय सुंदर वाटत आहे. आम्ही सुध्दा रस्त्यावरून फिरतो. तर इतके सुंदर दिसत आहे की, खरोखरच हे शहर अतिशय सुंदर व स्वच्छ वाटत आहे. परंतु गलिच्छ वस्त्यांमध्ये जावुन जर पाहिले तर ॲथोनी नावाच्या ठेकेदाराचे जे काम आहे ते अतिशय निकृष्ठदर्जाचे आहे. कारण की, गल्यांमध्ये जो कचरा जमा होतो तो उचलला जात नाही. तो डंम्पीग ग्राऊंडवर पाठविला जात नाही. तो उचलला जात नाही. तर मेहरबानी करून याविषयाकडे त्यांनी लक्ष दयावे. त्यांच्या पदोन्नतीस आमची काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब डॉ. खरात यांना एक वर्ष मुदत वाढ देण्याकरिता जो प्रस्ताव ठेवला आहे त्यास आमची काही हरकत नाही. परंतु हाथ जोडुन एक गोष्ट मी सांगु इच्छितो की कमीत कमी चार महिन्यापासुन उपायुक्त श्री. लोणारे व डॉ. खरात माझ्या प्रभागातील एक महिला कर्मचारी जिच्या जागेवर तिच्या मुलास कामावर घेतले आहे. तर त्यास माझ्या प्रभागातुन काढुन दुस–या प्रभागात पाठविले आहे. परंतु चार महिन्याचा आत मी जवळ जवळ पन्नास वेळा उपायुक्त व डॉ. खरात यांना देखिल सांगितले आहे. त्यांना सांगुन देखिल त्यांनी आजपर्यंत त्याला माझ्या प्रभागात पाठविले नाही. एक तर आधीच माझ्या प्रभागात कर्मचारी कमी आहेत. जर माझ्या प्रभागातील कुणी कर्मचारी सेवा निवृत्त होत असेल तर त्या जागेवर त्यांचा मुलगा जर कामावर रूजु होत असेल तर तो माझ्या प्रभागात आला पाहिजे की दुस–या प्रभागात परंतु दहा वेळा आश्वासन देवून सुध्दा उपायुक्त लाणारे यांनी त्यास माझ्या प्रभागात पाठविले नाही. अशाप्रकारे जर काम चालले तर एकीकडे आम्ही त्यांची प्रशंसा करतो की त्यांचे काम चांगले आहे व दुसरीकडे एका कामासाठी पन्नास वेळा आम्हाला त्यांना सांगावे लागत आहे. ही गोष्ट बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:–</u>महापौर महोदया, या बरोबर मी आपणांस हे ही सांगु इच्छितो की, डुकरे पकडण्यासाठी आमच्या प्रभागातुन जे सफाई कामगार घेतले होते. आजपर्यंत ते कामगार आमच्या प्रभागात परत पाठविले नाहीत. त्याबाबत सुध्दा खरात साहेबांना खुलासा करण्यास सांगा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):–</u>पास?

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**<u>विषय क्र. ४ः—</u>** डॉ. के. आर. खरात यांच्या प्रतिनियुक्तीवरील उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावनाः—</u>

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. उमपा/२२९८/२०३०/ प्र. क्र. २५९/९८/नवि—२३ दिनांक १३ जून २००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय आरोग्य अधिकारी पदनामाचे एक पद मंजुर आहे.

सदर पदावर सक्षम अधिका—याची प्रतिनियुक्तीवर नेमणुक करणेबाबत, शासनाकडे विनंती केली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. प्रतिनि १००२/२१५८/प्र. क्र. ४३४/सेवा—२ दिनांक १९ मे. २००३ अन्वये डॉ. के. आर. खरात यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर प्रथमतः एका वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर नेमणुक केली आहे.

डॉ. के. आर. खरात यांना सद्यस्थितीत देय असलेली शासन मान्य वेतनश्रेणी ही उल्हासनगर महानगरपालिकेत आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा उच्चतम अशी असल्याने कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टै—२/६५ दि. २५ जून २००३ अन्वये डॉ. के. आर. खरात यांचेकडे वैद्यकीय आरोग्य अधिकाीर या पदाचा पूर्णवेळ कार्यभार सोपविला आहे. त्यानुसार डॉ. खरात हे वरील पदावर दि. २३.६.२००३ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

दरम्यानच्या काळात डॉ. खरात, वैद्यकीय अधिकारी यांच्या पदनामात '' वैद्यकीय अधिकारी यांच्या पदनामात ''वैद्यकीय आरोग्य अधिकारी'' असा बदल करणेस मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई शासन निर्णय क्र. पी. आर. ओ—१००३/प्र. क्र. ३४५/सेवा २ दिनांक २६ मे. २००४ अन्वये मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ नुसार डॉ. के. आर. खरात यांच्या, प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मंजुरी मिळणेबाबत महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव कृ.** ४९ दिनांकः—०४/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. के. आर. खरात यांची दिनांक २३/६/२००३ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:— उल्हासनगर शहरातील पर्यावरण अहवालाआधारे तयार केलेल्या कृती आराखडयास मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब, खास करून आपणांस मी विचारू इच्छितो हा जो कृती आराखडा तयार केला जातो, मागील वर्षी सुध्दा तयार केला होता. परंतु त्यावर जेव्हा कार्यवाही करण्याची वेळ येते तेव्हा मला असे वाटेत की, त्यामध्ये आपण खुपच मागे राहतो किंवा लक्ष देत नाही. जेथपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न आहे. मी एक छोटासा विषय उपस्थित करतो. मागील वर्षी आपण कृती आराखडा तयार केला होता. उल्हासनगरमध्ये हवेचे प्रदुषण एवढे आहे की, चोवीस तासा पैकी सकाळी एक तास जर आपण झोपलो सकाळी सहा ते सात वाजेपर्यंत .......... उल्हासनगरमध्ये हवेचे प्रदुषण मोठया प्रमाणावर आहे. व या महापालिकेच्या महासभेत आम्ही चौदा मॉनिटरी युनिट खरेदी करण्यासाठी आम्ही मंजुरी दिली होती त्यासाठी आम्ही १८ लाख रूपये मंजुर सुध्दा केले होते. त्याची सद्यस्थिती काय आहे व मॉनीटरी युनिटसची स्थिती काय आह हे जर आयुक्त साहेबांनी सांगितले तर एक पाऊल आम्हाला पुढे सरकता येईल. नाहीतर हा प्रस्ताव पारीत करणे ही केवळ एक औपचारीकता राहील. त्यापेक्षा अधिक काही नसेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, जर आपणांस आठवत असेल तर मागील वर्षी जो पर्यावरणाचा अहवाल सभागृहासमोर ठेवला होता. त्याचबरोबर एक दहा बाबींचा एक कृती आराखडा आपल्या समोर ठेवला होता. त्या दहा मधील जवळ जवळ चार ज्या बाबी आहेत त्या अंशत: आम्ही पुर्ण केल्या आहेत. जसे की, ई—गर्व्हनर्सचा एक मुद्दा होता. घनकचरा व्यवस्थापनाचा एक मुद्दा होता. पाणी पुरवठा योजनेबाबतचा होता. त्यामध्ये एक तर आम्ही काही पुर्ण केले आहे किंवा काही प्रकल्पाबाबत आम्ही नियोजन केले आहे. व अंमलबजावणी सुरू होणार आहे. आपण ज्या बाबत बोलत आहात हे यंत्र आहे. हवा नियंत्रणाबाबतचे यंत्र आहे. यंत्रणा लावण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ती जी कंपनी आहे त्या कंपनीशी विचार विनिमय सुरू आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ७५ टक्के अनुदान देणार आहे. त्यांच्याकडे सुध्दा प्रस्ताव पाठविला जात आहे. यावर्षाच्या शेवटपर्यंत म्हणजे हे जे वित्तिय वर्ष आहे. या वर्षातच हवा नियंत्रण यंत्र बसविले जाईल.

**<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील</u>:—**मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हा जो पर्यावरणाचा अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये पर्यावरणासंबंधीत बहुतेक गोष्टींच्या बाबींचा विचार करण्यात आलेला आहे. परंतु माझ्या म्हणण्याप्रमाणे पर्यावरणावर होणा—या परिणामाबाबतच्या एका विषयाचा विचार केलेला नाही. असे मला वाटते. मागील काही महिन्यापुर्वी महासभेमध्ये तबेल्यांविषयी एक प्रश्न उपस्थित झाला होता तबेल्यांविषयी. तबेल्यांमुळे पर्यावरणांवर परिणाम होतो. असा माझा विचार आहे. त्या महासभेत उत्तर देतांना असे सांगण्यात आले होते की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये जवळ—जवळ २०० च्या आसपास तबेले हे विना परवाना चालत आहेत. असे उत्तर मिळाले होते. तबेल्यांमधील जनावरांच्या घाणीमुळे पर्यावरणावर काय परिणाम होतो याविषयी अहवालात काही विचार केलेला नाही. तरी माझे म्हणणे असे आहे की, त्याच्यावर पण विचार व्हावा. आणि त्या जनावरांपासून मिळणा—या दुधाचाही लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होतो, याचाही विचार व्हावा. आणि ते महासभेपुढे सादर करण्यात यावे. त्या अहवालावर परत विचार करून अहवाल सादर करण्यात यावा असे माझे म्हणणे आहे.

**<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:—**मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब उल्हासनगर कॅम्प —५ येथे आशिया खंडातील सर्वात मोठा जिन्स पॅन्टी तयार करण्याचा कारखाना चालु आहे. आणि बरेचसे कारखाने तेथे उघडत आहेत. त्यामुळे उल्हासनगर शहराचे नाव पुर्ण आशिया खंडामध्ये प्रसिध्द झाले असेल हजारापेक्षा अधिक कारखाने तेथे आहेत परंतु त्याचबरोबर एक समस्या यामुळे उभी ठाकली आहे. जिन्सचा कपडा धुलाईसाठी जे केमिकल वापरले जाते. त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. त्याबाबत महानगरपालिका काय विचार करत आहे. याचा कृपया खुलासा केला जावा.

**<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर</u>:—**महापौर महोदया, अशा प्रकारचे कुठलेही पर्यावरण विषय आहेत ते आल्यानंतर त्याच्या पाठोपाठ कृती आराखडयाची सुध्दा चर्चा होते परंतु आताच आमचे सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, प्रत्यक्षामध्ये काम करताना मात्र किंवा नगरसेवकांनी एखादी सूचना केली. किंवा एखादे पत्र दिले तर त्याच्यावर कुठल्या प्रकारची कार्यवाही होते किंवा प्रतिसाद मिळतो. अशाप्रकारचे चित्र मात्र महापालिकेत दिसत नाही. माझ्याकडे दोन उदाहरणे आहेत. माझ्या प्रभागात निवासी विभागामध्ये एक तबेला आहे. आणि त्या तबेल्यातील संपुर्ण शेण त्या नाल्यामध्ये असते जर तीन चार दिवसाला दोन दिवसाला तो नाला चोकअप होतो त्याच्याबाबत आतापर्यंत माझी तीन चार पत्र झाली कारवाई करण्यासाठी परंतु त्याच्यावर प्रशासनाकडुन मात्र कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. दुसरे एक चांगले ठळक उदाहरण आहे ते स्वामी शांतीप्रकाश जो पुतळा आहे भाटीया चौकामध्ये तेथुन ते नेताजी चौकापर्यंत जो रस्ता जातो त्या रस्त्यामध्ये जी झाडे आहेत त्या झाडांना ठोकरून स्कुटरचे , मोटर सायकलचे अपघात झालेले आहेत. शांतीप्रकाशच्या पुतळयापासुन चौकापर्यंत रस्ता दुभाजक असावा. अशी मागणी वारंवार होत होती. जेणे करून अपघात टळतील आणि झाडे पण वाचतील. परंतु महापालिकेचे धोरण असे आहे की, प्रत्येक अपघातानंतर एक झाड तोडायचे त्याठिकाणी आतापर्यंत सात ते आठ अपघात झाले. एक मयत झाले परंतु गेल्या दोन वर्षात वारंवार पत्रव्यवहार करून सुध्दा त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचे काम किंवा उपाययोजना महापालिका करत नाहीत. एक कशाचे ध्योतक समजायचे? मी आयुक्तांना याबाबत एक पत्र दिले होते ते त्यांना चांगले आठवत असेल की पाच जुन या पर्यावरणाच्या दिवशीच महापालिकेने एक झाड तोडले होते. अपघात झाल्यानंतर तर अशाप्रकारच्या उपाययोजना होणार असतील तर आपल्या पर्यावरण विषयाच्या बाकीच्या ज्या कल्पना आहेत त्या ढोबळ ठरतील. आणि महापालिकेचे किंवा आयुक्तांचे शहर पातळीवर जे काही प्रामाणिक प्रयत्न सुरू असतील तर त्या प्रयत्नांना कनिष्ठ स्तरावरील जो अधिकारी वर्ग आहे तो निरर्थक ठरवेल. तर यापध्दतीने सुध्दा एक तर प्रशासनाकडुन उपाययोजना व्हायलाच पाहिजे परंतु त्याचबरोबर सन्माननिय सदस्यांकडुन स्थानिक पातळीवर ज्या सूचना येतात. तर त्यावर अग्रक्रमाने तातडीच्या स्वरूपात कार्यवाही झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. आणि आयुक्तांना विनंती आहे.

**<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u>:—**मा. महापौरजी, उल्हासनगर शहरामध्ये अनेक राज्यांतुन खराब केमिकल आणुन सोडले जाते. तर या अहवालामध्ये त्याचाही उल्लेख असला पाहिजे. त्यावरही उपाययोजना महापालिकेतर्फे केल्या गेल्या पाहिजेत. अशी मागणी मी इथे करत आहे.

**<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे</u>:—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, पर्यावरणाच्या विषयी आपण सादर केलेल्या अहवालामध्ये एक त्रुटी आहे. शहरामधील गॅरेज रिक्षा, स्कुटर यांची मोठमोठी गॅरेज आहेत. यामध्ये वाहनांची दुरूस्ती

होत असताना वाहने रेस केल्याने प्रचंड प्रमाणावर धुर बाहेर फेकला जातो. त्यामुळे हवेचे प्रदुषण तर होतेच होते. प्रत्येक व्यक्ती दुपारच्या वेळेला विश्रांती घेत असते. काही ठिकाणी शाळा आहेत तिथेही या प्रदुषणाचा विपरीत परीणाम होतो. तर ही गोष्ट लक्षात घेवून आपण याबाबतीत उपाययोजना करावी अशी विंनती करतो.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–मा. महापौर महोदया,सन्माननिय सदस्य श्री. विश्वनाथ पाटील यांनी अतिशय महत्वपुर्ण मुद्दा येथे उपस्थित केला आहे. जेवढे काही तबेले आहेत त्यांचा येथील पर्यावरणावर काय परिणाम होत आहे. याचा उल्लेख या अहवालात केलेला नाही. त्यांच्या या मताशी मी सहमत आहे. आमच्या महापालिकेच्या वतीने मागील वर्षी जो सर्व्हे केला होता. त्यानुसार या शहरामध्ये २१९ तबेले आहेत. त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होतो याचाही उल्लेख या अहवालात पुढल्या वेळेस केला जाईल. परंतु यासाठी सर्व्हे करून तबेल्यांचा पर्यावरणावर काय परिणाम होतो हे पाहिले जाईल. दुसरे येथे असे सांगितले गेले की, येथे जे जिन्सचे कारखाने आहेत. किंवा कापड उद्योग आहे. यामुळे प्रदुषण होते त्या प्रदुषणाबाबत काहीही उल्लेख नाही. याबाबत या अहवालात उल्लेख केलेला आहे. आमचा जो विकास आराखडा तयार केला गेला त्यामध्ये जे औदयोगिक क्षेत्र आहे. त्या क्षेत्रातील बरेचसे कारखाने आता बंद पडत आहेत. व जेथे औदयोगिक क्षेत्रे नाही. जसे की उल्हासनगर–५ येथे औदयोगिक क्षेत्र नाही परंतु तेथे उद्योगधंदे येत आहेत. व अधिकतर कापड उद्योग आहेत त्यामुळे फार मोठया प्रमाणावर प्रदुषण होते. तर आता जो नवीन विकास आराखडा तयार होईल. त्यामध्ये औदयोगिक क्षेत्र व रहिवासी क्षेत्र त्यांच्यामध्ये योग्य त्या प्रमाणात आराखडा तयार केला जाईल. विकास आराखडा तयार करताना याबाबीकडे लक्ष दिले जाईल. येथे रस्ता दुभाजकाबाबत जे सांगितले गेले. दुभाजकाबाबतीत काही नॉमर्स आहेत. रस्त्याची रूंदी किती फुटाची असली पाहिजे. की ज्यामुळे रस्ता दुभाजक लावला जावु शकेल. ८० फुटापेक्षा जर रस्त्याची जास्त रूंदी असेल तर रस्ता दुभाजक लावला जावु शकतो. नाहीतर दुभाजक लावला जावू शकत नाही. याशिवाय आपण जे रस्ते सांगितले आहेत. ते रस्ते जर ८० फुटापेक्षा अधिक रूंदीचे असतील तर खात्रीशिररित्या मी असे सांगु शकणार नाही. परंतु ते रस्ते जर ८० फुटापेक्षा रूंद असतील तेथे दुभाजक टाकले जातील.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–महापौर महोदया, हरकतीच्या मुद्दयाव्दारे मी बोलु इच्छितो. आयुक्त साहेब सांगत आहेत की, ८० फुट किंवा त्यापेक्षा जास्त रूंदीचे जे रस्ते आहेत. त्याठिकाणी दुभाजक लावले जातात.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, या शहरामध्ये काय झालेले आहे. याचा मी उल्लेख केलेला नव्हता.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–आम्ही या शहराचे नागरिक आहोत. या शहराचे नगरसेवक आहोत. या शहरातील नगरसेवकांनी महासभेत आपणाकडे मागणी केली आहे. बाहेरच्या नगरसेवकाने, बाहेरच्या कुठल्या शहरासाठी मागणी केलेली नाही. आम्ही या शहराचे नगरसेवक असुन या शहरासाठी मागणी केलेली आहे. आपण या शहरासाठी खुलासा करा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–महापौर महोदया, आयुक्त महोदय ही गोष्ट खरी आहे की जेथे ८० फुट रूंदीचा रस्ता आहे तेथे रस्ता दुभाजक असला पाहिजे. परंतु काही काही रस्ते असे आहेत की काही जागा अशा आहेत की तेथे अपघात होतात त्याठिकाणांबाबत नागरिक प्रशासनाकडे अशी मागणी करतात की तेथे स्पीड ब्रेकर असावा. व आम्ही लोक मागणी करतो स्पीड ब्रेकरची कार ब्रेंकरची नाही किंवा व्हेईकल ब्रेकरची नाही. होते असे की, स्पीड ब्रेकर एकच लहानसा असला पाहिजे किंवा तीन चार लहान लहान स्पीड ब्रेकर असले पाहिजेत. जेणेकरून वाहनाच्या वेग मर्यादिवर नियंत्रण येईल. परंतु तसे न करता स्पीड ब्रेकर एवढे मोठे तयार केले जातात की, त्यावरून वाहने उडतात. म्हणुन स्पीड ब्रेकर हा स्पीड ब्रेकर सारखाच तयार केला पाहिजे व जेथे जेथे अपघात होतात तेथे मानवतावादी दृष्टीकोनातुन स्पीड ब्रेकर तयार केले पाहिजे. व दुसरे गोष्ट अशी की येथे सांगितले गेले की ''प्रदूषण'' येथे वायु प्रदुषण, जल प्रदुषण व ध्वनी प्रदुषण सुध्दा या शहरात आहे. कित्येक असे कारखाने आहेत ज्यांना महापालिकेचा ना हरकत दाखला नाही. दिवसरात्र तीन तीन पाळयांमध्ये ते लोक कारखाने चालवतात. शेजारच्या लोकांची झोपमोड होते. जसे की आता आमच्या श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगितले की, वेगवेगळया राज्यांमधुन केमिकल्स आणुन शांतीनगर येथे विसर्जित केले जाते. तर ही मागणी सभागृहात आम्ही चार वेळा केली आहे. तर यावर प्रशासनाने सक्तीने काही कारवाई केली पाहिजे. जेणेकरून तेथील लोकांचे आरोग्यावर काही विपरीत परीणाम होणार नाही. व यासर्व गोष्टींकडे

अधिकाधिक लक्ष दिले जावे. व जे लोक याकामांसाठी जबाबदार आहेत. त्यांना काही ना काही शिक्षा झाली पाहिजे. काही दंड झाला पाहिजे. याकडे प्रशासनाने लक्ष दिले तर फार चांगले होईल धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः—मा. महापौर महोदया, सन्माननिय आयुक्त साहेबांनी येथे सांगितले की, ८० फुट किंवा त्यापेक्षा अधिक रूंदीचा जर रस्ता असेल तरच रस्ता दुभाजक लावता येईल. परंतु ज्या ठिकाणांचा मी स्पष्टपणे उल्लेख केला तर त्या एकाच ठिकाणी जवळ जवळ सात ते आठ अपघात झालेले आहेत. या सात आठ अपघांतामध्ये एका अपघातामध्ये तर एकाचा मृत्युही झालेला आहे. आपले जवांदे साहेब हे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता होते तेव्हा त्यांच्या गाडीचाही तेथे अपघात झाला होता. त्यांचा वाहनचालक सुध्दा गंभीर स्वरूपी जखमी होता. तर प्रत्येक अपघातानंतर आपण जर एकेक झाड तोडणार असु, जर दुभाजक लावता येत नसतील तर प्रशासनाने पर्यायी काही तरी व्यवस्था करावी. आपण स्वामी शांतीप्रकाश यांचा भाटीया चौकामध्ये पुतळा बसविला त्या पुतळयाची तेथे सजावट आणि सोदर्यीकरण केले आहे व त्यांच्या समोर आपण ड्रम ठेवलेले आहे. ड्रम ठेवण्याचा जो भाग आहे तो काही सौदर्यीकरणामध्ये येत नाही. म्हणुन नॉर्मस प्रमाणे जर दुभाजक लावता येत नसतील तर किमान पर्यायी काहीतरी उपाययोजना आपण केली पाहिजे. तातडीने केली पाहिजे अशी माझी आयुक्तांना विनंती आहे.

मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आता ही जी पर्यावरण अहवालावर चर्चा चालु आहे. त्याव्यतिरिक्त आणखी काही मुद्दे त्यामध्ये आले पाहिजेत. जसे की आमचे नगरसेवक श्री. सोनावणे साहेबांनी म्हटले की, शहरामध्ये जितके काही पेट्रोल पंप आहेत तेथे जे भेसळयुक्त पेट्रोल मिळते. त्याच्या वापराने मोठया प्रमाणावर धुर बाहेर पडतो. ज्यामुळे शहराचे पर्यावरण दुषित होते. धुरामुळे जनतेच्या आरोग्यावर दुष्परीणाम होतो. म्हणुन महानगरपालिका क्षेत्रात जेवढे काही पेट्रोल पंप आहे त्यावर लक्ष केंद्रीत केले जावे. जेणेकरून ते लोक भेसळयुक्त पेट्रोल किंवा डिझेलची विक्रि करू शकणार नाहीत. दुसरे असे की शहरामध्ये प्रदुषण थांबविण्यासाठी हीरवळ असणे अतिशय आवश्यक आहे. मी आधी सुध्दा महासभेत याबाबत बरेचवेळा बोललो आहे. जे मोठे रस्ते आहेत त्यांच्या दोन्ही बाजुस झाडे लावली जावीत. जेथे दोन दोन रस्ता दुभाजक आहेत तेथे एक रस्ता दुभाजक ठेवुन रस्त्याचे रूंदीकरण करून रस्त्याच्या कडेला झाडे लावली जावीत. आपण कल्याण महानगरपालिकेत उपायुक्त होतात. तेथे आपण जे काम केले तिथे ज्याप्रकारे बदल घडवून आणला आहे. त्याचप्रमाणे उल्हासनगरमध्ये हिरवळ व सौदर्यीकरणावर लक्ष केंद्रीत केले जावे ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.

मा. महापौरः—मी रूपाणी साहेबांच्या हे लक्षात आणुन देवू इच्छिते की, जेथे आपण राहता व मी राहते. व आपले सचिव साहेब सुध्दा राहतात. तेथे श्री. दुरू खत्री यांचा किती मोठा कारखाना आहे. दिवसरात्र तेथुन किती मोठया प्रमाणावर धुर बाहेर पडतो. त्याबाबत आपण का नाही बोलत?

मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः—मी आता तेच बोलणार होतो की, शहरामध्ये रहिवासी क्षेत्रामध्ये जे कारखाने आहेत.

मा. महापौरः—नाही. पेट्रोल पंप तर लांब आहे. आपल्या विभागामध्ये जे कारखाने चालु आहेत. लोकांना दम्याचे आजार होत आहेत. मी बोलणे बरोबर वाटत नाही परंतु आपण तर त्या विभागाचे सदस्य आहात आपण तर बोलले पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः—महोदया, माझे बोलणे पुर्ण झालेले नाही.

मा. महापौरः—किती कारखाने आहेत? किती धुर बाहेर सोडतात याबाबत आपण चर्चा केली पाहिजे. मी त्याबाबत बोलणे बरे वाटत नाही.

मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः—शहरामध्ये रहिवासी क्षेत्रात असे जेवढे काही कारखाने आहेत ज्यांचे धुरांडे बाहेर काढलेले आहे. आता दुरू खत्री यांच्या कारखान्याबाबत महापौर महोदयांनी स्वतः म्हंटले श्री. दुरू खत्री यांच्या कारखान्यातुन एवढा काही धुर बाहेर पडतो की ज्याबाबत आम्ही तक्रार सुध्दा केलेली आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळापर्यंत आम्ही तक्रारी केलेल्या आहेत परंत अदयाप पर्यंत काहीही कारवाई झालेली नाही.

<u>मा. महापौर:—</u>आपणांस माहित असेल किंवा नाही या कारखान्यातुन सकाळ संध्याकाळ फार मोठया प्रमाणावर धुर बाहेर फेकला जातो. तेथे बसणे सुध्दा मुश्किलीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणी:—</u>त्याकडे सुध्दा लक्ष दिले जावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौर महोदया, आता पर्यावरणाविषयी जी काही चर्चा चालु आहे जेथपर्यंत मी समजतो की, पहिले आम्हाला कायदा असा सांगितला गेला होता की, ४० फुट रूंदीचा जो कोणताही रोड असले तर तेथे दुभाजक लावले जात नाही. जर ४० फुट रूंदी पेक्षा जास्त रूंदीचे रोड असतील जसे की ६०, ८०,१०० फुट रूंदीचे तर तेथे दुभाजक लावले जातील. आयुक्त साहेब आपण जर याचा खुलासा केलात तर बरे होईल. ३३ रस्ते तसेच पाच नंबरचा एक रोड घेतला होता. त्याबाबतीत आजपर्यंत असे सांगण्यात आले होते की, ४० फुट रूंदीचे रस्त आहे त्यामध्ये दुभाजक बसविता येणार नाहीत. ६० आहेत, ८० आहेत , १०० फुट रूंदीचे रस्ते असतील तर दुभाजक बसविता येतील हे झाले पहिले. दुसरे असे की, आज जे आमचे सदस्य स्पीड ब्रेकर साठी ओरड करतात. स्पीड ब्रेकर ताबडतोब लागले पाहिजेत. व जेवढया काही नगरसेवकांची तक्रार आहे ती ही आहे की, आधी जे स्पीड ब्रेकर लावले होते ते गायब झाले आहेत. त्यांची तर दुरूस्ती करू शकतात. अशा स्पीड ब्रेकर वर लक्ष दिले जावे. दुसरे जे दुभाजक लावले आहेत. त्यांना व स्पीड ब्रेकर वर कमीत कमी रंग मारला जावा. मध्यंतरी आपण आल्यानंतर हे काम चालु झाले होते. परंतु ते अर्ध्यावरच बंद झाले आहे. स्पीड ब्रेकरवर जो झेब्रा कलर मारला जातो. त्याचबरोबर पर्यावरणाबाबत हा जो अहवाल आमच्या समोर ठेवला आहे. यावर अंमलबजावणी कधी पर्यंत होणार. आता येथे बसल्या बसल्या मी ब—याचशा बाबी वाचल्या आहेत. अनाधिकृत नळजोडण्या आहेत,नाल्यांमध्ये नळजोडण्या आहेत. असा प्रत्येक विषयाबाबत माहिती दिली आहे. परंतु यावर अंमलबजावणी केव्हा होईल.जरा त्याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. गल्यांमध्ये ज्या ज्या नळजोडण्या घेतल्या जातात त्यासाठी मोठमोठया जलवाहीन्या टाकण्यासाठी आमदार पप्पु कालानी साहेबांनी दोन करोड रू. चा निधी उपलब्ध करून दिला होता. बाकीच्या ज्या नळजोडण्या आहेत. त्यांच्यासाठी मोठमोठया जलवाहिन्या टाकुन त्यावरून कनेक्शन शिफ्ट करून घेतल्या पाहिजेत. रोगराई फैलावण्याची जी शक्यता आहे. त्याबाबत कार्यवाही कधी होणार? हा जो अहवाल आहे त्यास मंजुरी दिल्यानंतर तो केवळ दप्तरी दाखल होता कामा नये. तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. ती कार्यवाही कधी होणार? याबाबतही जरा माहिती दिली तर बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, खराब केमिकल्स टॅकरव्दारे आणुन या शहरात सोडले जात आहेत. त्याबद्दल पर्यावरण अहवालात काहीतरी खुलासा व्हावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, माझ्या निवेदनात मी तोच खुलासा करत होतो की, एक हरकतीचा मुद्दा आला त्यामुळे माझे निवेदन अर्धवट राहीले. शांतीनगर येथील नाल्यात जे केमिकल सोडले जाते. ते टॅकर दोन वेळा पकडुन आम्ही त्यांच्यावर पोलिस केस सुध्दा केली आहे. त्याचा एफआयआर नंबर मी आमच्या वैद्यकीय अधिका—यांकडे मागत होतो. सध्या तो माझ्याकडे नाही परंतु अशा टॅकरवाल्यांवर आम्ही पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. व त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये माझी काही बातमी आली होती.त्या बातमीचा खुलासा त्या कंपनीकडुन करण्यात आला होता की ती कंपनी पुण्याहुन इकडे केमिकल्स पाठवत नाही. दोन वेळा आम्हाला माहिती मिळाली दोन्ही वेळा आम्ही त्यांना रंगेहाथ पकडुन पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. दुसरी एक गोष्ट आमचे नगरसेवक श्री. सोनवणे यांनी सांगितले रस्त्यावर जी गॅरेजेस चालु आहेत त्यांच्यामुळे जे प्रदुषण होत आहे त्याचा उल्लेख या अहवालात नाही. याबाबतीत सुध्दा लक्ष दिले जाईल. व आताच आपण जसे म्हंटले की, याची अंमलबजावणी कधी होईल. हे जे १७ मुद्दे आहेत. त्या सर्वांची जर पुर्तता करायची असेल तर कित्येक कोटी रूपये लागतील.आमची आर्थीक स्थिती जी आहे ती पाहुनच आम्हाला अंमलबजावणी करावी लागेल. हा काही एक वर्षाचा कार्यक्रम नाही. प्रत्येक वर्षी पर्यावरण अहवाल तयार होईल. कृती आराखडा तयार करू व त्यामधुन जे तात्काळ करण्यासारखे आहे ज्यास पैशाची आवश्यकता नाही ते ताबडतोब केले जाईल परंतु ज्याकामी पैसा लागतो किंवा काही कायदेशिर अडचण आहे. त्यासाठी थोडा कालावधी लागेल. आमच्याकडे जो निधी उपलब्ध आहे तो लक्षात घेवून या अहवालाची अंमलबजावणी केली जाईल. व रस्त्यांच्या बाबतीत, जी इंडियन रोड कॉग्रेंस आहेत त्यांनी जो निकष ठरवून दिला आहे ते लक्षात घेतले जातील. मी शहर अभियंत्यांना आदेश देईन की त्यांनी आय.आर.सी. च्या स्टॅण्डर्ड प्रमाणे रस्त्यावरील दुभाजक व गतीरोधक यांच्याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. आय.आर.सी.स्टॅण्डर्ड नुसार दुभाजक फक्त ८० फुट पेक्षा अधिक रूंदीच्या रस्त्यांवर बसविता येतात. व जे गतिरोधक आम्हाला शहरातील

रस्त्यांवर बसवायचे असतात. त्यांचे सुध्दा नॉर्मस आहेत. त्यांची उंची किती असली पाहिजे. रूंदी किती असली पाहिजे. याबाबत सुध्दा काही नॉमर्स आहेत. या शहरामध्ये नॉमर्सला बाजुला करून बरेचसे गतिरोधक तयार केले आहेत. काही लोकांनी अनाधिकृत नळ जोडण्या घेतल्या आहेत. त्यामुळेच काही स्पीड ब्रेकर तयार झाले आहेत. याशिवाय आम्ही सर्व ठिकाणी सर्व्हे करून जेथे आवश्यकता आहे तेथे स्पीड ब्रेकर तयार केले आहेत. व जेथे आवश्यकता नाही तेथील स्पीड ब्रेकर काढुन टाकण्याबाबत एक प्राकलन यार केले आहेत. त्याचा खर्च सुध्दा काही लाखामध्ये आहे. बरीचशी कामे सुरू करणे किंवा करणे या शहरास नितांत गरजेचे आहे. परंतु निधीच्या अभावी ती कामे सुरू करू शकलो नाहीत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आता स्पीड ब्रेकर बिना नॉर्मस नुसार तयार केले जात आहेत. तीन नंबर मध्ये महाराजा हॉल आहे. जुने जे स्पीड ब्रेकर तयार केले आहेत ते नॉर्मस नुसार नाहीत परंतु आता जे तयार करणार आहात ते तरी नॉर्मस नुसार तयार करा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आता जे स्पीड ब्रेकर तयार होत आहेत ते नॉमर्सच्या हिशोबानेच तयार झाले पाहिजेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—नाही होत,मी सांगतो आपणांस महाराजा हॉल समोर आता स्पीड ब्रेकर बसविले आहेत ते बिना नॉर्मस नुसार आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आम्ही त्यांची चौकशी करू व ज्या अभियंत्यांनी नॉर्मसचे उल्लंघन करून स्पीड ब्रेकर तयार केले असतील त्याच्यावर कारवाई करू.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—स्पीड ब्रेकर बाबतीत मला एक सूचना करायची आहे. मुख्य रस्त्याला जे जोड रस्ते तयार करण्यांत आलेले आहेत जे सिमेंट कॉक्रिटचे किंवा डांबरी रस्ते आहेत. झोपडपट्टयांमधुन जे रस्ते निघतात त्या रस्त्यांची स्थिती अशी आहे की, झोपडपट्टयांमध्ये लहान लहान मुले रस्त्यांवर धावत येतात. व खेळतात. स्पीड ब्रेकर बाबतीत कित्येक पत्रे दिली आहेत. परंतु तरीही संवेदनशिल अशाठिकाणी स्पीड ब्रेकर बसविले नाहीत. तेथे सुध्दा प्रत्येक मुलांना अपघात झाला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—मा. महापौर महोदया, या पर्यावरण अहवालामध्ये महत्वाचा जो भाग आहे तो महापालिका शाळांच्या संदर्भातील आहे. आणि त्या अहवालामध्ये स्पष्टपणे हे लिहीले आहे की, महापालिका शाळांची अवस्था ही वाईट आहे. आणि त्यामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी आजही त्यांना शाळांमध्ये ज्या प्राथमिक सुविधा मिळाल्या पाहिजेत त्यापासुन ते वंचित आहेत. त्यांनी दुसरा उल्लेख हा केला आहे की, महापलिकेस या शाळांची सुधारणा करताना आर्थीक परिस्थितीचे कारण सांगता येणार नाहीत. कारण त्या मुलांचे शैक्षणिक भवितव्य आहे. ते जर वाया घालवायचे नसेल तर आर्थीक परिस्थितीचे कारण न सांगता महापालिकेला उपाय योजना करायच्या आहेत. कृपया आयुक्त महोदयांकडुन त्याबाबतही खुलासा अपेक्षित आहे. महापालिका शाळांना विकसित करण्याबाबतीत काय धोरण आपल्याकडे आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये २८ प्राथमिक शाळा आहेत. मराठी, हिंदी व सिंधी माध्यमाच्या शाळा चालविल्या जातात. त्यामधील २५ इमारती या महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. व तीन इमारती आम्ही भाडयाने घेतल्या आहेत. ज्या २५ इमारती आहेत. त्या आम्हाला जिल्हा परिषदेकडुन हस्तांतरीत झालेल्या आहेत. जेव्हा आम्ही प्राथमिक शाळा आमच्याकडे हस्तांतरीत करून घेतल्या. त्यांची अवस्था बहुतांश खराब आहे. मागील वर्षी आम्ही त्यांच्या दुरूस्तीवर ४० लाख रूपये खर्च केले. परंतु काही इमारती अशा आहेत त्याची दुरूस्ती करूनही काही फायदयाचे नाही. तेथे नवीन इमारत बांधावी लागेल. आम्ही जेव्हा या बाबतची जेव्हा सर्व्हेक्षण केले तेव्हा आमच्या असे लक्षात आले की, आमच्या जेवढया काही शाळा आहेत. त्यांचे २५० वर्गांची आम्हाला आवश्यकता आहे. व त्यांच्या बांधकामासाठी आजच्या डी.एस.आर नुसार जवळ जवळ ४ कोटी रूपयांची आवश्यकता आहे. त्यासाठी सुध्दा मी शहर अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे त्यात शहर अभियंता, महापालिका मुख्य लेखा परीक्षक, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व कार्यकारी अभियंता स्थापत्य अशा चार लोकांची समिती स्थापन केली आहे. हे लोक महापालिकेच्या सर्व शाळांच्या

सद्यस्थितीबाबत एक अहवाल देतील. त्यानंतर त्यांच्या पुर्नबांधणीसाठी किती खर्च येईल. याचा अंदाज देतील आता तर प्रार्थमिक अंदाज असा आहे की जवळ जवळ ४ कोटी रूपये खर्च येईल. परंतु प्रत्यक्षात किती खर्च येईल याबाबतीत ही समिति मला एक महिन्याच्या आत अहवाल देणार आहेत. त्यानंतर महात्मा फुले शिक्षण योजना जी आहे तिच्या माध्यमातुन ४० लाख रू. अनुदान मिळेल. व बाकी महानगरपालिकेच्या निधीतुन येणा–या दोन तीन वर्षामध्ये खर्च महानगरपलिकेस आपल्या बजेटमधुन करण्याबद्दल तरतुद करावी लागेल. व शाळांची पुर्नबांधणी करावी लागेल.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>पास?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>महापौर महोदया, जसे आमच्या आयुक्त साहेबांनी सांगितले की अशी अशी आम्ही तरतुद करू. दोन वर्षामध्ये पुर्ण होईल, त्यांनी याकामी ४ लोकांची समिती सुध्दा स्थापन केली आहे. ते ऐकुन मला थोडा आनंद व दुःख सुध्दा झाले. दुःख याबाबतीत झाले की, आजपासुन जवळ जवळ दिड वर्ष अगोदर मी अग्निशमन इमारतीबाबत प्रश्न विचारला होता. त्याबाबतीत आयुक्त साहेबांनी सांगितले होते की आम्ही श्री. बुलचंद सोनेसर यांना याकामी नेमले आहे. व अग्निशमन दलाची ती इमारत खाली करून घेतली आहे. व व्हीटीसी ग्राऊंड येथे त्यांचे कार्यालय स्थापन केले होते. व असे सांगितले होते की, तीन चार महिन्यामध्ये इमारतीचे काम पुर्ण होईल. परंतु मला अत्यंत दुःखाने म्हणावे लागत आहे की, अदयाप पर्यंत ज्यांच्या अहवालाची आम्हाला माहिती नाही. सोनेसर यांनी काय केले आहे. इमारत तयार होईल किंवा नाही. आता शाळांबाबत जे आयुक्तांनी म्हंटले असे तर होणार नाही चार जणांची ही जी समिति आहे ती समितीच राहील. व यांनी जी अंमलबजावणी करायची ती होणार नाही. तर याबाबतीत मला कधी कधी शंका येते. दुसरे असे की साहेबांनी आताच सांगितले की ८० फुटापेक्षा जास्त रूंदीच्या रस्त्यावर दुभाजक लावले जातात. आमचे जे शहर अभियंता आहेत त्यांना हे माहित आहे का? आपण जे म्हंटलात की, अभियंत्यांना विचारले जाईल. त्यांनी जर नॉर्मसचे उल्लंघन करून स्पीड ब्रेकर तयार केले असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. मला असे वाटते की,आता जे शहर अभियंता म्हणुन आले आहेत ते अलिबाग येथुन आले आहेत. दुस–या कुठल्यातरी कार्यालयातुन आले आहेत त्यांनी महापालिकेमध्ये काम केलेले नाही. तर त्यांना याबाबतीत माहिती आहे का? की दुभाजक कोणत्या नॉर्मस नुसार रस्त्यावर लावले पाहिजेत. आता तर त्यांनी सांगितले तर मला असे वाटते की, त्यांना काही माहिती असेल. कारण की, अधिका–यांनी दयावयाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपण स्वतः देता. परंतु शहर अभियंत्यांना याबाबतीत काय माहिती आहे. ती तर आम्हाला पाहिजे ना? जर त्यांनाच माहिती नसेल तर उप अभियंता काय करणार? कनिष्ठ अभियंता काय करणार?जर त्यांना माहिती असेल तर त्यांनी आम्हास सांगितले तर फार बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, सभागृह हे जे आहे ते कुण्या अधिका–याच्या ज्ञानाची परीक्षा घेण्यासाठी नाही. व हे सुध्दा मानणे चुकीचे आहे की, जे अधिक्षक अभियंता कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांना इंडियन रोड कॉंग्रेसचे निकष माहित नाहीत. आपल्या या वक्तव्यावर माझी हरकत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचंदानी:—</u>आपण स्वतः म्हणालात की, आभियंत्यांकडुन काही चुक झाली असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>आपल्या सारख्या एवढया अनुभवी सदस्याने वरीष्ठ अधिका–यांच्या ज्ञानाविषयी शंका घेणे योग्य नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>शंका कुणी घेतली? आमचे सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सांगितलेल्या मुद्दयावर आपण म्हणालात की, एखादया अभियंत्याने नॉर्मसचे उल्लंघन करून जर स्पीड ब्रेकर बसविले असतील तर त्यांच्यावर कारवाई करू. चुक झाली असेल तर एक तर शहर अभियंता साईड वर जात नसेल. प्रत्येक गोष्टीबाबत आपण सभागृहात सांगतात की याबाबतीत आम्ही कारवाई करू. यासाठीच मी विचारू इच्छितो की, त्यांना माहिती असेल तर ठिक आहे. ही शंकेची गोष्ट नाही. आम्ही आपणांस विचारू इच्छितो की हया चुका पुन्हा पुन्हा का होतात. कारण की आम्हाला सुध्दा माहिती पाहिजे आम्ही सुध्दा विचार करू.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—याबाबतीत मी खात्रीनिशी असे सांगु इच्छितो की, येथे जे शहर अभियंता म्हणुन आलेले आहेत. त्यांच्याकडे अनुभव आहेत. जवळ जवळ मागिल दहा वर्षापासुन ते कार्यकारी अभियंता म्हणुन काम करत आहेत. त्याअगोदर दहा बारा वर्ष ते उपअभियंता म्हणुन काम करत होते. त्यांनी ठाणे महानगरपालिका , कल्याण डोंबिवली महानगरपालिकांमध्ये काम केले आहे. अहमदनगर जिल्हा परीषद सारख्या जिल्हा परीषदेमध्ये काम केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात रायगड जिल्हा परीषदेसारख्या जिल्हा परीषदेत काम केले आहे. आपण जे म्हणता की त्यांना या गोष्टीचे ज्ञान नाही. आपल्या या वाक्यास माझी हरकत आहे. त्यांना जर ज्ञान नसते तर एम.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण होवून ते इथे आले नसते. मला वाटते की या विषयावर सभागृहात जास्त चर्चा होता कामा नये. काही तक्रार असेल तर माझ्याकडे येवून ती आपण नोंदवू शकता. त्यावर मी जरूर योग्य ती कार्यवाही करेन.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—पास?

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५:— उल्हासनगर शहरातील पर्यावरण अहवालाआधारे तयार केलेल्या कृती आराखडयास मान्यता देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ सादर केला आहे. संपूर्ण शहरातील पर्यावरणाचे व्यवस्थेसाठी करावयाच्या सर्व कृतींचा यामध्ये समावेश आहे. या अहवालामध्ये वर्ष २००३—२००४ चा पर्यावरण विषयक अहवाल व वर्ष २००४—२००५ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यवाही करावयाच्या महत्वाच्या १७ मुद्दयांवरील कृती आराखडा याचा समावेश आहे. कृती आराखडयामध्ये दर्शविलेल्या विषयांबरोबरच आणखी महत्वाचे मुद्दे विचारात घेणे, त्याबाबत करावयाची कृती ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या ठिकाणी सर्वसामान्य, अतिशय महत्वाचे व दुर्लक्षित न करण्यासारखे तसेच तातडीने कार्यवाही करावयाच्या विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. नमूद केलेल्या महत्वाच्या १७ विषयां व्यतिरिक्त कमी प्राधान्यक्रम असलेले व तातडीने उपाययोजना करावयाचे महत्वाचे विषय असू शकतात. परंतु सर्व प्रथम सुरुवात करणे गरजेचे आहे. एकदा सुरुवात केल्यानंतर इतर महत्वाच्या विषयासंबंधी उल्हासनगर महापालिका पुढाकार घेवुन कृती करु शकते.

२. पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण
२. प्रकल्प व्यवस्थापन गट
३. ई गर्व्हनन्स आणि ई नियोजन गट
४. पर्यावरण व आरोग्य विषयक धोरणांची कार्यक्षमता वाढविणे.
५. आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा.
६. परिसरातील हवा गुणवत्ता व्यवस्थापन.
७. औद्योगिकरण झालेल्या भागांचे रेखांकन.
८. मल नि:सारण व सांडपाणी प्रक्रिया केंद्र व्यवस्थापन.
९. पाणी पुरवठा व्यवस्थापन.
१०. महापालिका शाळांचे व्यवस्थापन.
११.स्वयंरोजगार.
१२.भुयारी गटारे — नाला व्यवस्थापन भाग १
१३.भुयारी गटारे — नाला व्यवस्थापन भाग २
१४.लोकसंख्या व गृहनिर्माण व्यवस्थापन.
१५.सामाजिक सहभाग व व्यवसाय उद्योग.
१६.UMC-KDMC-AMC यांची एकमेकांशी सांगड
१७.झोपडपट्टी सुधार कार्यक्रम

वरील सर्व बाबी उल्हासनगर महापालिका प्रशासनातर्फे पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ पुस्तिका स्वरुपात सादर केले असुन ते महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव कृ. ५०** **दिनांक:—०४/११/२००४.**

सुचकाचे नाव :—श्री. होशियारसिंग लबाना

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिका प्रशासनातर्फे प्रस्तावित करण्यात आलेल्या पर्यावरणीय कृती आराखडा वर्ष २००४—०५ यास मान्यता देत आहे.
तसेच पुढील महासभेत इतिवृत्त कायम होण्याचा वाट न पाहता सदर ठरावाची थेट अंमलबजावणी करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**सर्व शहरवासियांना, सर्व नगरसेवकांना , सर्व अधिका—यांना व सर्वांना सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

**मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा)**:—कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. २५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१९/११/२००४

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/११/२००४ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९.११.२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :– श्रीमती. मालती करोतिया

२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३६. | श्री. रमेश चव्हाण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३७. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३८. | श्री. सुरेश जाधव |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३९. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४०. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४१. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४३. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४६. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४९. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५१. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. शांताराम निकम | ५५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्री. विनोद तलरेजा |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५८. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ६०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६१ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६२ | श्री. बेहरानी मोहन |
| ३०. | श्री. मोहन साधवानी | ६३ | श्रीमती मीनु राजकुमार दासानी, |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम | ६५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६६. | श्री. हरदास माखिजा |
| ३४. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६७. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद<br>श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर

तसेच मा. सदस्य / सदस्या १. श्री. यादव लालबिहारी बुझारत, २.श्री. टेकचंदानी राजु, ३. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ४. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ५.श्रीमती भावना रवी खिलनानी, ६.श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ७.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ८.श्री. जयसिंघानी अनिल,९.श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण , १०. श्रीमती किरण माखिजा,११ श्री. बेहरानी ठाकूरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ३ .३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौरः—सर्वप्रथम आपले सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांच्या पुतणीचे निधन झाल्याने त्याप्रित्यर्थ सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळावे अशी विनंती करते.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

शोक प्रस्ताव :—

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २३ (अ) चे नगरसेवक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांची पुतणी कु. विनु. एन. ठाकुर हीचे दि. ७.११.०४ रोजी दु:खद निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५० अ दिनांकः—१९.११.२००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कु. विनु एन. ठाकुर हीच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर सर्व सन्माननिय सदस्य महारा ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख यांनी परवा जो निर्णय घोि ात केला महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी आणि आज आमच्या मा. मालतीताई करोतिया आणि श्रीमती जया साधवानी या आमच्या रिपब्लीकन पक्षाच्या ख—या महापौर म्हणुन काम करीत आहेत. त्यांना जी मुदतवाढ मिळाली आहे त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

**मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सचिव:—वि ाय क्र. १ प्रश्नोत्तरे. प्रलंबित प्रश्न क्र. २८३ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २८३:— उल्हासनगर महानगरपालिकेने प्लॉट नं. ६१८ /६१९ या जागेवर मुकेश पी. वाधवानी यास नरवि/बाप/क्र.२९९/९९/१२४० दिनाक २९/१/२००१ नुसार नकाशा मंजूर केलेला असून त्याबाबत खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे व माहिती महासभेत दयावी.

अ) सदर जागा ही सद्याच्या विकास आराखडयानुसार कोणत्या प्रयोजनार्थ आहे?

ब) सदर जागा ही येणा—या विकास आराखडयानुसार कोणत्या प्रयोजनार्थ आहे?

क) वरील क्रमांकातील मंजुर नकाशानुसार त्या ठिकाणी गाळे व सदनिका किती चौ. फुट व प्रत्येक मजल्यावर किती याची माहिती दयावी.

ड) पैकी महापालिकेकडे सदर विकासकाने किती चौ. फुट व प्रत्येक मजल्यावर किती याची माहिती दयावी.

इ) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला किती तारखेला देण्यात आला?

ई) सदर नकाशा मंजुर करतांना करण्यात आलेल्या करारानुसार महापालिकेला देय असलेले क्षेत्रफळ ताब्यात घेतले का?

उत्तर:—अ. सदरची जागा हौसींग फॉर डिसहाउस या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेले आहे.

ब. प्रारूप विकास आराखडयामध्ये आ. क्र. ४१, सार्वजनिक सांस्कृतिक व कल्याणकारी सुखसोयी या व आ.क्र. ३९ मनोरंजनासाठी खुली जागा या प्रयोजनार्थ आरक्षित आहे.

क. सदर मुळ नस्ती सहा संचालक नगररचना, ठाणे यांचेकडे दि. २९.११.०३ च्या पत्रान्व्ये पाठविण्यात आलेली असल्याने वरील कार्यालयाकडून सदर नस्ती प्राप्त झाल्यानंतर खुलासा सादर करणे सोयीस्कर होईल.

ड. मंजुर नकाशानुसार १ रूम सदनिका रहिवासी वापरासाठी २८८.८० चौ.मी. क्षेत्रात बनवुन देण्यासाठी करारनामा करण्यात आलेला आहे.

इ. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही.

ई. मंजुर करताना करण्यात आलेल्या करारानुसार महापालिकेला देय असलेले क्षेत्रफळ ताब्यात घेतले नाही. दि. २८.६.२००२ रोजीच्या पत्रान्वये जागेवर सरू असलेले बांधकाम थांबविण्याबाबत. विकासकर्ता यांना पत्र पाठविण्यात आलेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—माझे प्रश्न क्र. २८९ व २९० हे प्रलंबित होते त्यांचे काय झाले? त्यापुर्वी देखिल प्रश्न क्र. २७९ होता. मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, त्यावेळी आपण सांगितले होते की हे प्रकरण न्याय प्रवि ट असल्याने त्यावर येथे चर्चा करता येणार नाही. त्यावेळी उत्तर दिले होते की, न्यायालयाचा निर्णय झाल्यावर आपणांस अवगत करण्यात येईल. आता त्या ठिकाणी काम चालु आहे. महासभेच्या समोर काही सादर नाही केले. आम्ही त्यावेळी एम.एम. आर.डी. अे. चे एक पत्र

दाखवले होते. त्यावेळी आयुक्तांनी सांगितले होते की, ते पत्र खोटे आहे. तर आम्ही त्यावेळी खरे पत्र दाखवण्यास सांगितले होते. तर खरे खोटे काय आहे ते महासभेसमोर ठेवायला हवे. आम्ही एम.एम. आर.डी.ए. चे २ डिसेंबरचे पत्र त्यावेळी दाखवले होते. त्यामध्ये सांगण्यांत आले होते की, जो परवाना मंजुर केला आहे तो रस्त्याने बाधीत होत आहे. जी इमारत तयार होत होती ती दहा फुट रस्त्यामध्ये येत होती. आयुक्तांनी सांगितले होते हे पत्र खोटे आहे. त्यावेळी आम्ही सांगितले की, दुसरे पत्र आणुन तुम्ही सभेसमोर ठेवा. एम.एम.आर.डी.ए. खोटे बोलत आहे की महापालिका खोटे बोलत आहे हे समोर येवू दया.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>आता तो प्रश्न यावेळी माझ्या हातात नाही. परंतु या प्रकरणाबद्दल मी आपणांस पुर्ण माहिती देवू  ाकतो. याबाबत तक्रार आली होती. एम.एम. आर.डी. ए. कडुन आम्ही जे स्प  टीकरण मागितले होते ते वेगळे आहे व तक्रारदाराने जे उत्तर दिले ते वेगळे आहे. तर आमच्याकडे जे उत्तर आले होते त्याप्रमाणे सदरचे बांधकाम नविन विकास आराखडयाप्रमाणे १०० फुट रस्त्यात बाधीत होत होते. सदरचे उत्तर तक्रारदाराला दिले होते. या प्रकरणाबद्दल मी पुर्ण सुनावणी घेतली आहे. आता मी विस्तृतपणे त्याची माहिती देवू  ाकत नाही. परंतु एक पुर्ण सुनावणी दिली आहे. आणि सुनावणी दिल्यानंतर त्या बांधकाम परवनागीमध्ये ज्या त्रुटी होत्या त्या त्रुटी दुरूस्त करण्याचे निर्देश विकासकाला दिले होते. मध्यंतरी उच्च न्यायालयात यासंबंधात एक याचिका देखिल दाखल केली होती. त्या याचिकेचा निर्णय यावेळी माझ्या हातात नाही. परंतु निर्णय असा झाला आहे की, श्री. प्रकाश याबद्दल काय निर्णय झाला आहे? याचिका मागे घेतली आहे.

<u>मा. सचिवः—</u>याचिकाकर्त्याने त्याची याचिका मागे घेतली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>याचिका न्यायालयात प्रलंबित असल्याने आम्ही सदर प्रकरणात परवानगी देवू  ाकत नव्हतो परंतु सदरची याचिका आता मागे घेण्यात आली आहे. मी सुनावणी घेते वेळी बांधकाम परवानगीतील त्रुटी दुर करण्यासाठी जे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याने सदर ठिकाणच्या इमारतीला मी सुधारित परवानगी दिली आहे. कनि  ठ न्यायालयातुन जे स्थगन आदेश होते ते देखिल आता नाही आहेत. कोणत्याच न्यायालयाचे स्थगन आदेश नसल्याने , सुनावणीनंतर जे निर्देश दिले होते त्यांची पुर्तता झाल्याने त्या परवानगीला मी सुधारित परवानगी दिलेली आहे व सुधारित परवानगी देताना मागील आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात सदरच्या बांधकामाला ज्या सवलती दिल्या होत्या त्या सवलती कायम ठेवल्या आहेत. मी जी सुनावणी घेतली आहे त्याची प्रत मी सभागृहासमोर ठेवण्यास तयार आहे. उच्च न्यायालयातुन याचिका मागे घेण्याचा जो निर्णय झाला आहे तो देखिल आपल्यासमोर ठेवण्यास तयार आहे. व आपणांस जर असे वाटत असेल की, त्यामध्ये काही चुकीचे झाले आहे तर आपणांस व इतर कुणासही त्या निर्णया विरूध्द, माझ्या निर्णयाविरूध्द राज्य  ाासनाकडे अथवा न्यायालयात जाण्याचा हक्क आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>हे बांधकाम १०० फुट रूंद रस्त्याने बाधीत होत आहे. असे असताना नविन परवानगी देताना आपण नविन विकास आराखडा लक्षात घेतला नाही का? जुना व नविन विकास आराखडा बघितला नाही का? आज रोजीस नकाशे मंजुर करताना फक्त जुना आराखडा लक्षात घेतला जातो का?

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>विकास आराखडयाप्रमाणे परवानगी देताना मंजुर विकास आराखडा व सुधारित विकास आराखडा दोन्ही बघणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणेच केले जाते. या प्रकरणांत देखिल दोन्ही आराखडे बघुन परवानगी दिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>नविन विकास आराखडयात सदरचे बांधकाम १०० फुट रस्त्याने बाधीत होत असल्याचे एम.एम.आर.डी.ए. ने दाखविले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>एम.एम.आर.डी.ए. प्रमाणे आपण बघितल्यास दिसुन येईल की, सदरचे बांधकाम १०० फुट रस्त्याने बाधीत होत नसुन सदरच्या बांधकामाचे सामासिक अंतर रस्त्यामध्ये येत आहे. या बांधकामाचा मुळ नकाशा मंजुर करताना तत्कालिन आयुक्तांनी त्यांचे अधिकार वापरून सामासिक अंतरामध्ये त्यांना सवलत दिली होती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>याचा अर्थ त्यांना बाजुने जागा सोडण्याची आवश्यकता नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>आवश्यकता होती परंतु तत्कालिन आयुक्तांनी त्यांना परवानगी देताना सामासिक अंतरांची सुट दिलेली आहे. मी ते बदलु  ाकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>तत्कालिन आयुक्तांनी चुकीची परवानगी दिली आहे असा याचा अर्थ होतो. आम्ही याच्या विरूध्द उच्च न्यायालयात जायला हवे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>आपणांस, प्रत्येकाला तसा हक्क आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>आयुक्तांनी रस्त्यावर बांधकाम परवानगी दिली आहे याचा अर्थ यामध्ये काहीतरी सेटीग झाली आहे. या विरूध्द आम्हाला न्यायालयात जायलाच हवे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>आपण आधी पुर्ण चौकशी करा नंतर आपणांस जर असे वाटत असेल की काही चुकीचे झाले आहे तर आपण न्यायालयात जावु  ाकता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u> ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, चार–पाच महिन्यापुर्वीच्या महासभेमध्ये मी एक प्रश्न विचारला होता. तो प्रश्न व्हीटीसी ग्राऊंड ते मानेरा जंक्शन या रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत होते आणि आहे. तो ठेकेदाराकडुन कधी पुर्ण करून घेणार असे विचारले होते. त्याचे उत्तर दिले होते की, दोन महिन्याच्या आत काम पुर्ण करण्यात येईल किंवा सुरू करण्यात येईल. आज पण त्या रस्त्याची परिस्थिती जशी चार–पाच महिन्यांपुर्वी होती, जेव्हा प्रश्न विचारला होता तशीच आज पण आहे. तर त्यावि  ायी काय कारवाई झाली किंवा ठेकेदाराला काय सांगण्यात आले किंवा काम चालु करण्यासाठी काय कारवाई करण्यात आली. याची माहिती दिली तर बरे होईल.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>मा. महापौर महोदया, हे काम सुरू करण्याचे आश्वासन मी सभागृहात दिले होते त्याप्रमाणे आम्ही ठेकेदारा समवेत दोन वेळा चर्चा केली. ठेकेदाराला कराराच्या कलम १७ प्रमाणे नोटीस देखिल दिली आहे. नोटीस दिल्यानंतर ठेकेदाराने काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते परंतु अदयाप पर्यंत ठेकेदाराने कामास सुरूवात केली नाही. त्या ठेकेदारा विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

<u>मा. सचिवः– </u> प्रश्न क्र. २८३ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>प्रश्न क्र. २८९ कधी घेणार?

मा. सचिव:—याच्यानंतर येणार.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—प्रश्न क्र. २८३ जो वरील प्रमाणे आहे. श्री. महाराज भुल्लर यांनी जो प्रश्न विचारला तोच मी पुनश्च विचारत आहे. कोणताही नकाशा मंजुर करताना चालु विकास आराखडा आणि प्रारूप विकास आराखडा याची सांगड घालुनच, जर दोन्ही विकास आराखडयामध्ये बांधकाम बाधीत नसेल तर आपण परवानगी देतो. या ठिकाणी प्रारूप विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. ४१ ही सार्वजनिक सांस्कृतिक प्रयोजनासाठी जागा असताना आणि कल्याणकारी सुखसोयींसाठी स्प टपणे मोकळी जागा असताना देखिल त्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेली आहे. प्रथम म्हणजे हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी जे आरक्षण मंजुर होते त्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिली आहे आणि पुढची मजेशिर गो ट म्हणजे एक तर पहिला प्रश्न हा की प्रारूप विकास आराखडयाची दखल घेतली नाही अथवा विचारात घेतला नाही का? ती जागा इमारत पाडुन नंतर मोकळी करणार काय? पुढचा प्रश्न देखिल मजेशिर आहे की वरील क्रमांकातील मंजुर नकाशावर त्या ठिकाणी गाळे व सदनिका किती चौरस फुट व प्रत्येक मजल्यावर किती याची माहिती दयावी. याची माहिती अदयाप पर्यंत म्हणजे २००१ साली जो मंजुर नकाशा आहे. त्याचे उत्तर १ जानेवारी, २००४ ला विचारले आहे. तर तेव्हा सुध्दा त्याचे उत्तर दिले आहे की, प्रकरणाची मुळ नस्ती सहाय्यक संचालक, नगररचना ठाणे यांच्याकडे दिनांक २९.११.२००३च्या पत्रान्वये पाठविण्यात आली असल्याने वरील कार्यालयाकडुन सदर नस्ती प्राप्त झाल्यानंतर खुलासा करण्यात येईल. सदर नस्ती आलेली आहे का? तुम्ही जे सांगितले त्यावर आम्ही विश्वास ठेवतो की, तुमच्या कार्यालयाकडे अजिबात माहिती नाही. महापालिकेचा प्लॉट एका बिल्डरला दिला, प्रारूप विकास आराखडा बाधित होत असतानाही तुम्हाला काही माहित नाही. परंतु १ जानेवारी पासुन हा प्रश्न प्रलंबित आहे. आता तरी तुमच्याकडे माहिती आहे का? तर माहिती दयावी. त्याच्यानंतर पुढचा त्यापैकी किती चौ. फुट जागा विकासकाकडुन आपल्याला घ्यायची आहे. त्याचे उत्तर आहे २८८. कशी? आणि सध्या त्या इमारतीला बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिला आहे का? इथे उत्तर दिलेले आहे नाही. आणि बांधकाम थांबविण्यासाठी पत्र दिले आहे तर ते बांधकाम थांबले आहे का? सध्याची परिस्थिती काय आहे याची जरा माहिती दया.

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, ही जी मंजुरी दिली आहे याची संचिका नगररचना संचालक यांच्याकडे पाठविल्याने त्याबाबत माहिती आता देवू ाकत नाही. याप्रश्नाचे जे उत्तर दिले आहे की, सदर बांधकामाला अदयाप पुर्णत्वाचा दाखला दिलेला नाही हे उत्तर बरोबर आहे. आज जागेवर काय परिस्थिती आहे, बांधकाम चालु आहे अथवा थांबलेले आहे. याची माहिती जागेवर जावुन पाहणी केल्यावर देता येईल. आता यावेळी सदरची माहिती मी देवू ाकत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—आयुक्त साहेब, हा प्रश्न मागील महासभेमध्ये होता, आणि हा प्रलंबित प्रश्न आहे. मागील महासभेत हा प्रश्न आला होता. आणि मागच्या महासभेमध्ये याचे उत्तर दिले गेले नाही कारण त्यावेळी संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते. आणि आता तरी तुम्ही याचे उत्तर दयायला हवे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी व श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. प्रभारी आयुक्त:—मागील महासभेत मी स्वत: उपस्थित नव्हतो त्यामुळे उत्तर दिले नव्हते. आज ते दयायला हवे होते. मला माहित आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—मागील महासभा म्हणजे आचारसंहितेच्या आधीची महासभा.

मा. प्रभारी आयुक्त:—हो. विधानसभा निवडणुकीच्या आधी होती. परंतु आज आपण जो उपप्रश्न उपस्थित केला आहे की, सदर ठिकाणी सद्यस्थिती काय आहे? याची जी माहिती आहे जी लेखी स्वरूपात दिली आहे ती आता माझ्याकडे आहे. परंतु आज जागेवर काय परिस्थिती आहे. ते जागेवर गेल्यावरच कळु ाकेल. एखादया वेळेस आमच्या अधिका—यांना याची माहिती असु ाकेल. ते जागेवर गेले असतील तर. जर माहिती असेल तर ते देतील. जर माहिती नसेल तर पुढील महासभेत आपणांस लेखी स्वरूपात माहिती देण्यात येईल. आता आपण येथे जे उपप्रश्न उपस्थित केले आहेत त्याची माहिती लेखी स्वरूपात आपणांस पुढील महासभेत देण्यात येईल.

श्री. संजय दुसाने (उप आयुक्त ाहर):—मा. महापौर महोदया, मागील महिन्यामध्ये कनि ठ अभियंत्यांनी प्रत्यक्ष जागेवर पहाणी केली असता मंजुर नकाशा पैकी 'अ' विंगचे काम पुर्ण झाले असुन 'ब' विंगचे तळमजल्यानंतर काम बंद असल्याचे दिसुन आले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—'अ' विंगची तुम्ही जी पहाणी केली तर सदर ठिकाणी वापर सुरू झाला आहे काय?

श्री. संजय दुसाने (उप आयुक्त ाहर):—कनि ठ अभियंत्यांनी जी पाहणी केली आहे त्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झालेले आहे. वापर सुरू झाला अथवा नाही याची पुर्ण माहिती आता यावेळी माझ्याकडे नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—हाऊसिंग फॉर डिसहाऊससाठी आरक्षित असलेली जागा एखादया विकासकाला दिल्यानंतर, आम्हाला नगरसेवकांना सुध्दा माहिती आहे की ३०० चौ. फुटाच्या वर कोणतीही सदनिका बांधण्यांत येवू नये. हे कायदयाच्या तरतुदीमध्ये, एम.आर.टी.पी ॲक्टमध्ये आहे. आणि येथे तुमच्या प्रशासनाने उत्तर दिले आहे की, मुळ संचिका उपलब्ध नसल्याने आम्ही उत्तर देवू ाकत नाही. ही लपवालपवी आहे. आम्हाला सुध्दा माहिती आहे की, तेथे जास्तीत जास्त जे गाळे आहेत त्याचे प्रयोजन आहे............ही चर्चा मागेही झाली आहे. चार व ापुर्वी जेव्हा तेथे काम चालु होते, प्रशासनाला माहिती आहे. दि. २९.११.२००३ला मुळ संचिका पाठवलेली आहे, आता आपल्याकडे कागदपत्र उपलब्ध नाहीत. आपल्याकडे ठेवायला हवे होते. महासभेमध्ये वारंवार हा प्रश्न उपस्थित होत आहे. तरीं देखिल तुम्ही ते ठेवलेले नाही. हे बरोबर आहे का आयुक्त साहेब? याचे फक्त उत्तर दया की आपले प्रशासन किती कार्यक्षम आहे. तुम्ही सांगत असाल परंतु ते दिसले पाहिजे. तीन महिन्यांपासुन प्रश्न प्रलंबित आहे परंतु तुम्ही अदयाप उत्तर देवू ाकले नाहीत. आपल्याकडे नगररचना विभाग आहे, मालमत्ता विभाग आहे. मालमत्ता विभागासाठी स्वतंत्र उपायुक्त आहेत.

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, हे खरे आहे की या प्रश्नासाठी प्रशासनाला मागील दोन महिने उपलब्ध होते. दोन महिन्यात माहिती दयायला हवी होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—दोन महिने नाही प्रश्न जानेवारी महिन्यात विचारला आहे. १ जानेवारी, २००४ ला.

मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी व श्रीमती रेखा कृ णानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>प्रश्नाचे उत्तर महासभेच्या पटलावर ठेवल्यानंतर आपण येथे जे उपप्रश्न विचारलेत त्याबाबत माहिती प्राप्त करून घेण्यासाठी आम्हाला दोन महिने मिळाले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>उपप्रश्न त्याचवेळेस सुरवातीला विचारले आहेत. १.१.२००४ला प्रश्न आणि उपप्रश्न विचारले आहे. यामध्ये नविन काहीच नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>प्रशासनाला जवळ जवळ दहा महिने होते तरी देखिल उत्तर देवू  ाकलो नाही. यासाठी मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु आपणांस हे देखिल आश्वासन देईन की, पुढील महासभेत, आमच्या उपायुक्तांना पुण्याला पाठवून ती संचिका व तिची छायांकित प्रत आणली जाईल. तसेच प्रत्यक्ष जागेवर देखिल उपायुक्त पहाणी करतील. त्यानंतर पुढील महासभेत एक विस्तृत उत्तर आपणांस देण्यात येईल. विस्तृत उत्तर सर्व संबंधित कागदपत्रा समवेत देण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आम्ही आधी बघितले होते की, आपण एक चांगली प्रथा पाडली होती. ज्यादिवशी महासभा असायची त्यादिवशी आपण सर्व अधिका—यांना आपल्या दालनात बोलवुन प्रश्नांवि  ायी चर्चा करायचे. मला वाटते आता आपण असे करणे सोडुन दिले आहे. दुस—यांची परिस्थिती पाहुन. याचा अर्थ आता आपण देखिल दुस—यांप्रमाणे वागायला सुरूवात केली आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>असे नाही. आज २९२ पासुन पुढील प्रश्न घेण्यात येणार आहेत. याची माहिती माझ्याकडे आहे. मी माझ्या अधिका—यांसमवेत चर्चा देखिल केली आहे. आता येथे असे होत आहे की, जसे श्री. विश्वनाथ पाटील हे उभे राहीले आणि मागील प्रश्नावि  ायी माहिती मागितली.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आयुक्त साहेब, यामध्ये स्प  टपणे लिहिले आहे की, मागील बैठकीत प्रलंबित असलेले प्रश्न क्र. २८३, २८४, २८९ हे प्रथम घेण्यात येतील.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>माझ्याकडे आजच्या बैठकीची जी सभा सूचना आहे त्यामध्ये स्प  टपणे लिहिले आहे की, २९२ पासुन पुढील प्रश्न घेण्यात येतील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>आपण दुस—या पानावर पहावे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>ते नजरचुकीने राहुन गेले. आम्ही तळटिप पाहिली नाही. कधी कधी असे होते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब जेव्हा कल्याण येथुन उल्हासनगर येथे आले होते त्यावेळी ते अत्यंत कार्यक्षम होते. त्यांनी तेथे बरीच चांगली कामे केली होती. आज उल्हासनगर येथे राहिल्यानंतर त्यांना असे वाटत आहे की, उल्हासनगर असेच चालते तर आपण देखिल असेच चालायला हवे. त्यामुळे ते थोडे सुस्त झाले असावेत. त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल आम्हाला काही  ांका नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>आपल्या काही काही वाईट सवई आम्हाला देखिल घ्याव्या लागतील.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—</u>आम्हाला देण्याची आवश्यकता नाही. आपण तर आधीपासुनच कार्यक्षम आहात. परंतु उल्हासनगर  ाहरात राहुन आपल्या देखिल अंगवळणी तेच पडले आहे. आधी तर आपण

असे नव्हतात, आधी आपण प्रत्येक गो  टीवर लक्ष ठेवून यायचे. आम्ही आपणांस विनंती करू आपण आधिप्रमाणेच तयारी करून यावे. ज्यामुळे जसे आम्ही आनंदी होतो तोच आनंद कायम राहिल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—मी माझे मित्र श्री. मोहन बेहरानी यांना सांगु इच्छितो की याच आयुक्तांनी आता पर्यंत जेवढी आरक्षित भुखंडावर बांधकामे झाली आहेत. यासर्व ठिकाणी महापालिकेला जे २५ टक्के, १० टक्के मिळायला हवे होते. ते मिळाले आहे. फक्त हीच एक इमारत आहे, ही इमारत २००० साली जेव्हा मी सभापती होतो त्यावेळी तयार झाली होती. या इमारतीमध्ये आता आपले जे नगररचनाकार श्री. मिलिंद सोनावणे आहेत यांनी बराच मोठा भ्र  टाचार केला आहे. मी त्यांना दहा वेळा सांगितले की संबंधित विकासकाकडुन दहा टक्के जागा महापालिकेला घ्यावी. त्यावर ते सांगतात की ज्यावेळी 'बी' विंगचे काम पुर्ण होईल तेव्हा जागा घेण्यात येईल. 'बी' विंगचे बांधकाम करण्याचा त्याचा मनोदय दिसुन येत नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे की ज्याप्रकारे ते उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यानुसार या ठिकाणी आपण जर जागेचा ताबा घेतला तर आपल्या महापालिकेचे उत्पन्न वाढुन आपण जे चांगले काम केले आहे ते पुढे देखिल चालु राहिल.  दुसरे म्हणजे या विकासकाने संपुर्ण इमारत विकलेली आहे.  व महापालिकेला दाखवित आहे की, पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही. त्याने इमारतीखाली २५ दुकाने जास्तीची बनविलेली आहे.  त्याचे नाव अनिल होतचंदानी असून तो मुकेश वाधवानीच्या नावाने इमारती बनवित असतो.  याची संपुर्ण संचिका काढल्यास आपणांस त्यामध्ये त्रुटी आढळून येतील.  व यासाठी श्री. मिलिंद सोनवणे हे जबाबदार आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आयुक्त साहेब, यामध्ये उपप्रश्न असा आहे की,  आपण मंजुर केल्याप्रमाणे ३०० चौ.फुटाच्याच सदनिका त्यामध्ये आहेत का?  माझ्या माहिती प्रमाणे तेथे ६०० , ६५०, ७०० ते १००० चौ. फुटाच्या सदनिका आहेत.  आपण आतापर्यंत त्यांच्याकडुन २५ टक्के बांधकाम हस्तांतरीत करुन घेतले नाहीत त्याचे कारण श्री. नारायण पंजाबी यांनी आता सांगितले आहेच. म्हणजे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला यासाठी दिला नाही की, महापालिकेला जे २५ टक्के किंवा ३० टक्के बांधकाम हस्तांतरीत करायचे आहे, ते होवू नये याच उद्देशाने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला नाही.  अशा प्रकारचे भाड्यंत्र चालु असतांना प्रशासन त्यांना पाठीशी घालत आहे.  यावरुन दिसून येते की, २००१ साली जो नकाशा पास केला, तो २००४ सालापर्यंत आपल्याकडे नाही आहे.  पुढच्या महासभेत याची सविस्तर माहिती दयावी.  मिळेल ना?  नसेल तर आम्हांला सांगा की आमच्याकडे माहिती नाही.  आम्ही अपेक्षा ठेवतो.

मा. सचिव :— प्रलंबित प्रश्न क्र. २८४ श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

प्रश्न क्र. २८४:— १) मे. अॅन्थोनी वेस्ट हॅन्डलींग सेल्स हया कंपनीला घनकचरा वाहतूकीचे कंत्राट दिले आहे.  करारामधील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने त्यानुसार काम चालले आहे का?
अ) दिनांक १/१०/२००३ पासून सदर ठेकेदाराचे काम सुरु झाले तेव्हा पासून किती गाडया कॉम्पेक्टर व स्कीपलिडर उल्हासनगर मध्ये आहेत?
ब) नमूद केलेल्या प्रकारातील सर्व कचरा कुंडया त्या त्या ठिकाणी ठेवून कचरा जमा केला जातो का? तसेच निश्चित केलेले कामगार व कामगार संख्या दयावी?
क) तसेच कामगार कायदयाचे पालन केले जाते का?  त्यानुसार त्यांना वेतन व इतर सूविधा दिल्या जातात का? कृपया सविस्तर माहिती दयावी.

उत्तर:—होय, तथापि अदयाप सर्व अटींची पुर्तता झालेली नाही.

अ. आतापर्यंत अ. कॉम्पक्टर–७ ब. डंम्पर प्लेसर–२क. डम्पर (टिपर)–२ या व्यतिरिक्त सदर काम सुरू झाल्यावर पहिल्या महिन्यात २० ते ३० टिम्पर (डम्पर) रात्रंदिवस ठेकेदारामार्फत भाडे तत्वावर उपलब्ध बरून लावण्यांत आले आहेत.

ब. होय

कचरा कुडयांची संख्या, हातगाडयांची संख्या व कामगार सख्या सोबतच्या प्रपत्रात नमुद केली आहे.

क. होय

करारनाम्यातील ार्त क्रमांक ९. २ नुसार बील अदा केले आहे.

करारनाम्यातील ार्त क्र. ९.१ दंड आकारण्यात येईल.

यामुळे कोणताही परिणाम झालेला नाही.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम व श्री. सुर्यकांत लिंगे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** मा. आयुक्त साहेब, मला वाटते मागच्या वेळेस याचे उत्तर दिले नव्हते. हाच प्रश्न श्रीमती जयश्री सुर्वे यांनी ६–७ महिन्यापूर्वी विचारलेले होता. ॲन्थनी वेस्ट ॲण्ड हॅन्डलींग सेल या कंपनीला घनकचरा वाहतूकीचे काम दिले आहे. सदरचे काम करारातील अटीं प्रमाणे चालु आहे का? तेव्हा सुध्दा ''होय'' असे उत्तर दिले होते, आणि पुढे दिले होते, काही अटींचे पालन केले जात नाही. कोणत्या अटींचे पालन केले जात नाही आणि कोणत्या अटींचे पालन केले जात आहे? त्यावेळी ठेकेदार या विशि ट अटींचे उल्लंघन करीत आहे व त्याप्रमाणे काम करीत नाही म्हणुन आम्ही त्यांच्यावर कारवाई केली आहे असे कोणतेही सविस्तर उत्तर दिले नव्हते. तेव्हा ही टाळाटाळीचे उत्तर दिले होते. मागच्या महासभेमध्ये आचारसंहिता, निवडणुकीच्यापुर्वी तेव्हाही काहीच उत्तर देता आले नाही. त्यानंतर माझा एक साधा आणि सरळ प्रश्न होता की त्यातील कोणत्या कोणत्या अटी बाकी आहेत? तेव्हा त्याचे उत्तर दिले होते की कृपया त्यातल्या किती अटींचे पालन होत आहे व किती अटींची पुर्तता झालेली नाही. आणि त्या अटींची पुर्तता झाली नाही म्हणुन आपण त्यावर काय कारवाई केली आहे त्याची जरा माहिती दया. त्यातल्या ठराविक अटी तुमच्या माहितीसाठी सांगतो ज्यावर मागील महासभेमध्ये चर्चा झाली होती, तुम्ही असताना. करारनाम्यामध्ये कचराकुंडया विशि ट आकाराच्या ठराविक ठिकाणी ठेवणे, त्या तशा ठेवल्या गेल्या नाहीत. त्यांनतर ओटे बांधायचे, कुठेही ओटे दिसत नाहीत. कचरा वाहतुकीसाठी गाडया, त्या कुणी मोजल्या नाही पण तुम्ही सांगितले त्यावर आम्हाला ांभर टक्के विश्वास , खात्री आहे की त्या असणार. तुमचे पर्यवेक्षण चांगले आहे परंतु ज्या उद्देशाने आम्ही हे कचरा वाहतुकीचे कंत्राट, जे पुर्वी अडीच कोटीचे होते ते पाच कोटीला दिले होते. २. ३३ कोटीचे ४. ३८ कोटीला दिले होते जे पुढे जावुन भवि यात सरासरी ५ कोटीचे होणार आहे. जो मुख्य उद्देश होता तो म्हणजे कचरा वेगळा करणे, ओला कचरा, सुका कचरा तो अजुनही होत नाही. हे त्यावेळेस देखिल सांगितले होते. पाच महिन्यानंतरही त्यामध्ये काहीच फरक नाही. त्यानंतर बंद गाडयांमधून कचरा वाहतुक केली जाते. परंतु तुम्हाला एक आठवण करून देतो की, मागच्या वेळेस म्हारळ ग्रामपंचायतवाल्यांनी आंदोलन केले होते की आमच्या राणा ट्रेडिंग येथे कचरा जाताना तो मोकळया गाडयांमधुन जातो. आणि तो रस्त्यावर पडत आहे. आणि तुमचा कचरा जरी आमच्या येथे येत असला तरी तो आमच्या हद्दीतुन जाताना मोकळया गाडयांतुन, रिकाम्या गाडयांतुन, उघडया गाडया असल्याने त्याचा त्रास आम्हाला आहे. त्या गाडयांचे क्रमांकही त्या लोकांनी तुम्हाला दिले होते. जवळ जवळ सात ते आठ गाडया होत्या. श्री. उमाप साहेब सुध्दा बोलले होते की, माझ्या घरासमोरून उघडया गाडया जात आहेत. उघडया गाडया जातात आणि आम्हाला चुकीची माहिती दिली जाते. आणि ज्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कचरा वाहतुकीचा ठेका दिला गेला होता तो परिपुर्ण होत नाही. कृपया ते पुर्ण झाले आहे का याची माहिती दयावी. त्यातील कोणत्या अटी अजुन बाकी आहेत ज्या पुर्ण झाल्या नाहीत. ांभर टक्के पुर्ण झाल्या तर आमचे काही म्हणणे नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी व श्री. हरदास माखिजा हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, याच वि  यावर महासभेत दोन तीन प्रश्न आहेत असे मला वाटते. श्रीमती सुर्वे यांचाही प्रश्न आहे. श्री.महाराज यांचा देखिल आहे. जसे उच्च व सर्वोच्च न्यायालयात एकाच वि  यावरील ब—याच याचिका एकत्र सुनावणीसाठी घेतल्या जातात. अशाच प्रकारे हे सर्व प्रश्न एकाचवेळी सुनावणीसाठी घेतल्यास मला उत्तर देणे सोपे होईल अन्यथा वारंवार त्याच प्रश्नावर तेच उत्तर दयावे लागेल. दोन तीन प्रश्न आहेत असे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—श्रीमती सुर्वे यांचा प्रश्न सहा महिन्यापुर्वी होता. त्याचे उत्तर हेच होते की काही अटी बाकी आहेत.

मा. प्रभारी आयुक्तः—प्रत्येक दोन महिन्यानंतर यावर प्रश्न येत आहे. यासाठी मी आता जेवढे प्रश्न आले आहेत तेवढया प्रश्नाचे उत्तर एकाच वेळी देवू इच्छितो. जेणे करून एकदा उत्तर दिल्यावर वारंवार उत्तर देण्याची आवश्यकता भासणार नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—मा. आयुक्त साहेब, तुमच्या या टिप्पणीवर माझा आक्षेप आहे. नगरसेवक हे समस्या आहेत म्हणुन प्रश्न विचारतात. समस्या सुटली तर प्रश्न विचारायची कुणाला हौस नाही. ज्या पध्दतीने तुम्ही बोललात की दर दोन महिन्यानंतर प्रश्न येतो, उच्च व सर्वोच्च न्यायालय. तर तुमची ती पध्दत चुकीची आहे.

मा. प्रभारी आयुक्तः—एकाच वेळी दोन प्रश्न आले आहेत म्हणुन मी असे बोललो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—याचे कारण त्यावेळी जो प्रश्न विचारला तो अजुन तसाच प्रलंबित आहे. म्हणुन पुन्हा प्रश्न विचारला आहे.

मा. प्रभारी आयुक्तः—जर आपणांस याचे उत्तर स्वतंत्र हवे असेल तर मी स्वतंत्ररित्या उत्तर देईन.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—तो प्रश्न नाही समस्या सुटायला पाहिजेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. प्रभारी आयुक्तः—त्याबाबतीत मी उत्तर देतो. याबद्दल एक सविस्तर टिप्पणी आपणांस देण्यात आली होती. जी मुख्य अट होती ती म्हणजे वाहने पुरविण्याची ती पुर्ण झाली आहे. मायक्रोलेवल प्लान्ट तयार करण्याची अट देखिल पुर्ण झाली आहे. कचरा पेटया पुरविण्याची जी अट होती तर त्याने करारातील अटी पेक्षा जास्त कचरा पेटया पुरविलेल्या आहेत. कराराप्रमाणे कर्मचा—यांचा जो प्रश्न आहे तर त्याने कर्मचारी देखिल जास्तीचे लावलेले आहेत. डंम्पींग ग्राउंड व्यवस्थापनाची जबाबदारी कराराप्रमाणे त्याच्याकडे नसताना देखिल त्याने तेथे एक वाहन बुलडोझर जास्तीचा दिला आहे. अशाप्रकारे डंम्पींग ग्राउंडच्या व्यवस्थापनाची जबाबदारी त्याने घेतली आहे. ज्या दोन बाबी अदयाप पुर्ण झाल्या नाहीत त्याबद्दल मागील महासभेत देखिल मी बोललो होतो. त्यापैकी एक होती ती म्हणजे कचरा वर्गीकरणाची. प्रत्येक घरात ओला व सुका कचरा दोन वेगवेगळया कचरा कुंडयात ठेवण्याची अट अजुन पुर्ण झालेली नाही. व दुसरे म्हणजे जे १५० ओटे बनवायचे आहेत ते अजुन तयार झालेले नाहीत. या

दोन अटी अदयाप पुर्ण न होण्याचे कारण एक म्हणजे डंम्पींग ग्राऊंड अजुन मिळालेले नाही व कच–यावर जी प्रक्रिया सुरू करायची होती ती अजुन सुरू झालेली नाही. घराघरात कचरा वेगळा केल्यानंतर तो एकाच गाडीत जमा करण्यात येईल व डंम्पींग ग्राउंड वर एकाचठिकाणी टाकण्यात येईल. तर त्याला काही अर्थ राहणार नाही. यामुळे कच–यावर प्रक्रिया व तो वेगळा करणे हे एकाचवेळी सुरू करण्यात येईल. आम्हाला आता जे एक व र्ा मिळाले आहे त्यामध्ये कचरा वेगळा करण्यासाठी लोकांमध्ये जागृती करायला हवी यासाठी कॅम्प सुरू केले आहेत. यासाठी ठेकेदाराने एक अधिकारी नेमला होता त्याने प्रत्येक सोसायटीत जावुन तेथील लोकांसमवेत बैठक घेतली व त्याने कचरा वेगळा करण्याबाबत लोकांना माहिती दिली. कचरा वेगळा करण्याची जबाबदारी नागरिकांची आहे. आपल्या नागरिकांची आहे जेथे कचरा निर्माण होतो. त्यांची जबाबदारी आहे दोन वेगवेगळा कचराकुंडया ठेवणे. या महासभेने तसा ठराव देखिल केला आहे. वेगवेगळया कचराकुंडयामध्ये लोकांनी कचरा जमा करायला हवा. जोपर्यंत लोक वेगवेगळया कुंडयामध्ये कचरा जमा करणार नाहीत तोपर्यंत आम्हाला यामध्ये यश मिळणार नाही. आज पुर्ण महारा ट्रातील परिस्थिती पाहिल्यास दिसुन येईल की कुठेही कचरा ंभर टक्के वेगळा होत नाही. काही ठिकाणी सुरूवात झाली आहे. व ज्या महापालिकांनी याची सुरूवात केली आहे त्यांना २५ ते ३० टक्के पर्यंत यश प्राप्त झाले आहे. कचरा वर्गीकरणासाठी जी पहिली पायरी आहे ती म्हणजे लोकांमध्ये जागृती निर्माण करणे याला आम्ही सुरूवात केली आहे. यासाठी एक जाहिरात तयार केली आहे. ती केबलवर दाखवली जाते. याशिवाय लोकांच्या घरात जावुन बैठका देखिल घेतल्या आहेत. दुसरे म्हणजे हे वर्गीकरण कधी चालु होईल. यासाठी आम्हाला डंम्पींग ग्राऊंडवर २५ हेक्टर जागा मिळाली आहे. तेथे आमचे प्रक्रिया केंद्र लवकरच सुरू होणार आहे. हे सुरू होताच वर्गीकरण देखिल १०० टक्के होईल. दुसरे म्हणजे ओटे बनविण्याचे काम, या कामास त्याने सुरूवात केली आहे. एक नमुना ओटा तयार करून त्यांनी आम्हाला दाखवला आहे. व तो मी व स्वत: ाहर अभियंता यांनी जावुन पाहिले आहे. चोपडा कोर्टाच्या बाहेरच त्याने तो ओटा बनविला आहे. त्यामध्ये आम्ही त्यांना काही सुधारणा सुचविल्या आहेत. जसे की ओटा रस्त्याच्या कोणत्या बाजुस हवा. कचरा उचलण्यासाठी काय सुविधा हवी. ते आम्ही आता त्यांना सांगितले आहे. फक्त आमच्यातर्फे थोडे काम बाकी आहे. १५० जागा कारण की ज्या ३६६ कचराकुंडया आहेत त्या आपल्या ाहरात विविध ठिकाणी ठेवलेल्या आहेत. आणि हे जे १३ चौ. की.मी. क्षेत्र आहे. त्यामध्ये फक्त १५० ठिकाणी दोन कुंडया एकत्र ठेवायच्या आहेत. सुक्या कच–यासाठी एक कचराकुंडी व ओल्या कच–यासाठी एक कचराकुंडी अशाप्रकारे त्या ठेवायच्या आहेत. दोन्ही कुंडया एकाच ओटयावर ठेवायच्या आहेत. असे १६६ ओटे बनवायचे आहेत. आतापर्यंत आम्ही अशा १५० किंवा १६६ जागा अदयाप त्यांना निश्चित करून दिलेल्या नाहीत. आम्ही उपायुक्त आरोग्य यांना अशा जागा लवकरात लवकर निश्चित करून देण्यासाठी आदेशित केले आहे. जेणे करून १५० ओटे तयार करता येवू ाकतील. ते काम देखिल लवकरच सुरू होईल. त्यांनी एक नमुना ओटा तयार करून दाखवला आहे. निविदेतील इतर ार्ती त्याने पुर्ण केल्या आहेत. दोन कामे फक्त शिल्लक आहेत. निविदेतील जवळ जवळ ९० टक्के अटींची पुर्तता त्यांनी केली आहे. जे काम त्याचे नव्हते ते देखिल करण्यास तो आम्हाला सहाय्य करीत आहे. मी त्याचे उदाहरण देखिल आपणांस दिले आहे. डंम्पींग ग्राऊंडचे व्यवस्थापन यासाठी एक बुलडोझर, मनु य ाक्ती व इंधन हे सर्व त्याच्यातर्फे करण्यात येत आहे.

मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:–</u>मा. महापौर महोदया, कचरा उचलण्याचा जो ठेका ाहरामध्ये सुरू आहे त्याबद्दल ज्या तांत्रिक बाबी आहेत जर आपण त्यावेळच्या करारातील आवश्यक असलेल्या बाबी व पुर्तता केलेल्या बाबी याचे जर रकाने बनवून आपण विचार केला की कुठल्या बाबींची पुर्तता झाली व कुठल्या बाबींची पुर्तता झालेली नाही? तर कदाचित ती पुर्तता ७५, ८०, ८५ टक्के आढळुन येईल.

आणि हे आपल्याला टक्केवारीने सांगता येईल की, एवढे एवढे टक्के बाकी आहेत. परंतु प्रत्यक्षामध्ये हे ओटे बनविणे व इतर ज्या तांत्रिक बाबी आहेत हा नंतरचा भाग आहे. परंतु प्रत्यक्षात ज्या मुलभुत गो टींसाठी या हरामध्ये 'शुन्य कचरा' करण्यासाठी आपण हे जे ४ कोटींचे कंत्राट दिले आहे. त्यामध्ये आपण यशस्वी झालो आहे का? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. तांत्रिक बाबी तर फार नंतरच्या गो टी आहेत. आमचे एखादे नगरसेवक जसे श्री. धनंजय बोडारे तिकडच्या बाकावर बसलेले आहेत. मी इकडच्या बाकावर बसलेलो आहे. हे आम्ही समजु कतो परंतु आमच्या प्रभाग समिती ४ मध्ये दोन तीन महिन्यापुर्वी एकमताने एक ठराव संमत झाला होता की, या ॲन्थनी कंपनीचे काम समाधानकारक नसल्याने त्याचे देयक अदा करण्यात येवू नये. तेथे एकुण १८ नगरसेवक वेगवेगळया पक्षाचे आहेत. आणि कुठल्याही पक्षाचा नगरसेवक असला तरी प्रत्येकाचे मत असे होते की ॲन्थोनी याचे जे काम आहे ते असमाधानकारक काम आहे. आज सकाळची अगदी ताजी गो ट सांगतो आमच्या भागातील जे स्वच्छता निरिक्षक आहेत त्यांना मी एका ठिकाणच्या कच—याची तक्रार केली. त्याठिकाणी जवळ जवळ ४ ते ५ दिवसांपासुन कचरा पडलेला होता. म्हणजे आज एका खाजगी कंपनीला एवढया मोठया ४ कोटीचे कंत्राट दिले त्यानंतर सुध्दा एखादया ठिकाणी ४ ते ५ दिवसापर्यंत कचरा पडलेला असू कतो ही गो ट येथे सांगितली तर पचनी पडणार नाही. परंतु प्रत्यक्षात ती स्थिती आहे. आज सकाळीच मी त्याबद्दल तक्रार केली आहे. दुसरी गो ट अशी की, आम्ही नेहमी एक तक्रार त्या भागातील स्वच्छता निरिक्षक, अधिकारी व त्या ठेकेदाराचे पर्यवेक्षक यांना सांगत असतो की या हरातील जे ढिगारे आहेत वेगवेगळया ठिकाणचे ते अजिबात नियमितपणे उचलले जात नाहीत. सध्याची परिस्थिती काय आहे ते आता मला महित नाही. परंतु अगदी काल परवा पर्यंत प्रभाग क्षेत्र क्र. ४ मध्ये संपुर्ण प्रभाग क्षेत्रात जेथे सहा प्रभाग आहेत. त्याला फक्त एक डंम्पर आहे. तो आम्हाला अडचणी सांगतो की, माझ्याकडे एकच डंम्पर आहे त्यामुळे कुठे उचलायचे, कुठे उचलायचे नाही. त्यांनतर आम्ही फक्त खत्यावरचाच कचरा उचलणार. अमुक एका ठिकाणी असलेलाच कचरा उचलणार. जर कचरा असा असेल तर त्यासाठी अमुक ही गाडी, अमुक गाडी आमच्याकडे उपलब्ध नाही. हे सर्व ऐकण्यासाठी आपण त्याला ठेका दिलेला नाही. आपण असा विश्वास ठेवायला हवा की, आपला जो आग्रह आहे तो काम पुर्ण होण्यासाठी आहे. येथे स्प टपणे सांगावेसे वाटते की, आपल्याला ॲन्थोनी कंपनी कडुन जो प्रतिसाद अपेक्षित होता तो प्रतिसाद ती कंपनी देवू कली नाही. बाकी ''नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न'' आणि ''ना कर्त्याचा वार निवार'' ठेकेदाराकडे बरीच कारणे आहेत. परंतु ठेकेदार हा कारणे सांगण्यासाठी नाही आहे. कंत्राटदार हा पुर्तता करण्यासाठी आहे. त्याने प्रत्येक गो टीची मग त्याठिकाणी लोकप्रतिनिधी असतील , अधिकारी असतील त्यांनी सांगितलेल्या कामांची पुर्तता केली पाहिजे. परंतु आम्ही बघतो की, कंत्राटदार सुध्दा अडचणी सांगतो. तर त्या पध्दतीने ज्या आपल्या तांत्रिक बाबी आहेत त्याही महत्वाच्या आहेत. परंतु माझे येथे असे म्हणणे आहे की, कचरा उचलण्याचे जे मुख्य काम आहे ते देखिल असमाधानकारक आहे. ढिगारे जे आहेत ते आजही व्यवस्थित उचलले जात नाहीत. आजही आपण हरामध्ये जर फेरफटका मारला तर अनेक ठिकाणी आपणांस छोटया मोठया प्रमाणात ढिगारे दिसुन येतील. जर खत्यावरचाच ढिगारा कंत्राटदार उचलणार असेल तर हे जागोजागी पडलेले ढिगारे कोणी उचलायचे याचा सुध्दा आपण काहीतरी निर्णय केला पाहिजे. कारण आपले मुकादम हात वर करतात, आपले स्वच्छता निरिक्षक हात वर करतात, जर कंत्राटदार सुध्दा हात वर करणार असेल तर हे जे छोटया मोठया ठिकाणी पडलेले ढिगारे आहेत व इतर ठिकाणी पडलेला जो कचरा आहे तो कोणी उचलायचा? याबाबत आपण याठिकाणी खुलासा केला पाहिजे. आणि १०० टक्के ज्याला आपण ''शुन्य कचरा'' म्हणत होतो तर त्यापध्दतीचे साध्य आपण केले आहे का? याची खात्री आपण याठिकाणी सभागृहाला दिली पाहिजे अशी आपल्याला विनंती आहे.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमापः</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब ॲन्थोनीच्या वि ायामध्ये जी आता चर्चा झाली तर मी येथे सांगु इच्छितो की काही महिन्यापुर्वीच्या महासभेत हा वि ाय आला असता मी ठेकेदार व महापालिका यामध्ये जो करार झाला आहे याची प्रत सदस्यांना महासभेत देण्यावि ायी सांगितले होते परंतु अदयाप आम्हाला ती कराराची प्रत देण्यात आली नाही.कुठल्या अटी व ार्ती त्याने पुर्ण न केल्यास त्याचा ठेका रद्द करता येईल याबाबत मी सभागृहाला दोन वेळा विचारणा केली होती. प्रत्यक्षात स्थिती अशी आहे की आमचे सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी त्यांच्या प्रभाग समितीतील एक मुद्दयाचा खुलासा याठिकाणी केला. प्रभाग समिती क्रमांक २ मध्ये नुकतीच आमची सभा झाली. त्या सभेमध्ये उपस्थित सर्व सदस्य, सत्तापक्षाचे व विरोधी पक्षाचा मी एकटाच होतो. सगळयांनी ही गो ट मान्य केली की रस्त्यावर उचलण्यासारखा असलेला जो कचरा आहे. डंम्पीग करण्यासाठी त्यांची गाडी जावु ाकेल किंवा जी सोपी डंम्पींग आहे अशा ठिकाणीच कचरा उचलला जातो. परंतु झोपडपट्टयांमध्ये एवढी घाणेरडी अवस्था निर्माण झाली आहे की, त्या ठिकाणी कचरा उचललाही जात नाही व कचरा गोळाही केला जात नाही. त्या ठिकाणी गाडया जाण्याची किंवा डबे घेवुन जाण्याची व्यवस्था अडचणीची असल्यामुळे याचे लोक त्या ठिकाणी कामेही करत नाहीत. दुसरी गो ट अशी आहे की जो कर्मचारी वर्ग यांनी आपल्या ाहरासाठी सुरवातीला दिला होता त्यामध्ये सुध्दा कपात झाली आहे. कारण त्यांनी सुरवातीला जी नक्कल करून दाखवली ती परिपुर्ण नसुन ोवट पर्यंत टिकलेली नाही म्हणुन महासभेमध्ये या वि ायावर वेळोवेळी मग ती प्रभाग समितीची बैठक असो, महासभा असो ॲन्थोनीच्या बाबतीतील तक्रारी सर्व ठिकाणाहुन येत आहेत. ाहराच्या मुख्य रस्त्यांवर पाहिले तर सफाई खरोखरच चांगली आहे असे आम्हाला म्हणावे लागेल. परंतु ज्या ठिकाणी गाडी जाण्याची व्यवस्था नाही, कचरा उचलण्याची व्यवस्था नाही, साफसफाईची व्यवस्था नाही. ाक्यतो झोपडपट्टयांमध्ये एवढी मोठी अडचण निर्माण झाली आहे की, साफ सफाईच्या बाबतीत हे काम ॲन्थोनीचे माणसे करतील, ते लोक म्हणतात महापालिकेचे लोक करतील, महापालिकेचे लोक म्हणतात ॲन्थोनीचे लोक करतील अशी ढकलाढकल चालुन या ाहरामध्ये रोगराई जन्माला घालण्याची परिस्थिती चालु आहे असे मला म्हणावे लागेल. माझी विंनती आहे की ॲन्थोनीच्या बाबतीत आम्ही ६० हजाराचे दिवसाला १. २० लाख खर्च करीत आहोत त्या पध्दतीने त्याचे काम या ाहरामध्ये समाधानकारक नाही असे मला म्हणायचे आहे.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>—यामध्ये एक महत्वाचा प्रश्न आहे की जादा पेमेंट दिल्यामुळे महापालिकेच्या इतर विकास कामांवर त्याचा परिणाम झालेला आहे का? हे महत्वाचे आहे. तर याबाबतीत तुम्ही उत्तर दिले आहे की, याबाबत कुठलाही परिणाम झालेला नाही., परिणाम झालेला नाही चांगली गो ट आहे. परंतु बहुसंख्य नगरसेवक, आमच्या प्रभागात काम होत नाही अशी ओरड करत असतात. त्याचे कारण म्हणजे ठेकेदाराला पेमेंट मिळत नाही. अगदी नगरसेवक निधीतील, प्रभाग समिती निधीतील देखिल कामे होत नाहीत. पाणी पुरवठा विभागाची कामे सुध्दा बंद आहेत कारण की, ठेकेदाराला पेमेंट मिळत नाही असे म्हंटले जात आहे आणि इकडे तुम्ही बोलता की विकास कामावर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. पाण्याचे, एम.आय.डी.सी चे अदयाप पर्यंत कधीही बिल बाकी नव्हते एवढे बिल, एम.आय.डी.सी. ची १४ कोटीची थकबाकी आहे. आबादी आबाद असेल आनंदी—आनंद असेल तर आमचे काहीही म्हणणे नाही परंतु इथे उत्तर तरी तसे देवू नये की सगळे काही व्यवस्थित चालले आहे. इकडे वस्तूस्थिती वेगळी आहे व उत्तर वेगळे आहे. आयुक्त साहेब, सर्व जर व्यवस्थित असेल, सुव्यवस्थित असेल तर नगरसेवक निधीतील प्रभाग समिती निधीतील ठेकेदारांच्या कामाचे पैसे बाकी आहेत ते अदा करणेकामी त्यांना मदत करा. कामे लवकर चालु होतील. बहुसंख्य नगरसेवक, आमचे श्री. दिलीप गायकवाड साहेब, श्री. भुल्लर साहेब हे सगळे, विरोधी पक्षाच्या

बाकावरील सर्व सदस्य याबाबतीत रडतात. त्यांच्या प्रभागातील कामे होत नाहीत. म्हणजे ठेकेदारांना पेमेंट दिले जात नाही.

मा. सदस्य श्री. वाघे ाामु हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:—मा.आयुक्त साहेब, सफाईच्या बाबतीत बोलायचे झाले तर ''चहा पेक्षा किटली गरम'' प्रभागामध्ये नगरसेवकाचे कोणीच ऐकत नाही, मुकादम ऐकत नाही. आताही आपण माझ्या बरोबर येवून पाहु ाकता की रस्त्यावरून पाणी वाहत आहे. ८० फुट रूंद रस्त्याच्या दोन्ही बाजुने ४ फुट खोल नाला तयार झाला आहे. तो पुर्ण भरला आहे, आठ दिवसापासुन. मन्नु या मुकादमास सांगुन कंटाळलो. श्री. खरात साहेबांनाही तोंडी विचारणा केली. करतो म्हणुन सांगितले परंतु आजपर्यंत त्यांनी ते काम केले नाही. २२ तारखेपर्यंत मी पाठपुरावा करूनही काम केले नाही. तर माझे असे म्हणणे आहे जर ॲन्थोनीला दर दिवशी एक लाख वीस हजार रूपये देता तर त्याचे महिन्याचे ३६ लाख रूपये होतात. तर आम्ही ८० नगरसेवक आहोत. प्रत्येक नगरसेवकाला नगरपालिकेने ४०६ किंवा ८०९ ही चार चाकी वाहने पुरवावीत. आणि तीन कामगार दयावेत. नगरसेवकाच्या घराजवळ ती गाडी उभी असावी. आमच्या जवळ कोणी तक्रार घेवून आले तर आम्ही त्याला लगेच सांगु की बाबा गाडी चालु कर तेथे जो कच—याचा ढिग पडला आहे तो उचल. म्हणजे ते तरी आमच्या अधिपत्याखाली राहतील आणि वागतील म्हणजे ऐकतील. व्यवस्थीत राहतील, लोकांचेही प्रश्न सुटतील. आम्ही तिकडुन येथे चार ठिकाणी फोन करावा. येथे विस्तारीत फोन आहेत, विस्तारीत फोनवर संपर्क साधताना मोबाईल फोनचे १७५ रू. चे कार्ड कधी संपते माहित सुध्दा पडत नाही. फोन केला तर स्वच्छता निरीक्षक जागेवर नसतात, नगरपालिकेस फोनचे बिल भरपुर येत असेल. तर एखादया तरी नगरसेवकाने सांगावे की अग्निशमन विभागाच्या कर्मचा—यांशी दुरध्वनीवरून माझा संपर्क झाला किंवा सफाई विभागाच्या कर्मचा—याशी संपर्क झाला? कुणीही फोन वर भेटत नाही. त्यामुळे इतर ठिकाणी जसे नाशिकला प्रत्येक नगरसेवकास ४ चाकी वाहन पुरविले आहे. याकामी त्यांना कर्ज काढुन दिले आहे. याकामी प्रत्येक नगरसेवकाला २० हजार रूपये जरी खर्चास दिले तरी १ लाख ६० हजार रूपये होतील. हे जाणारे ३६ लाख कुठे? आणि ते एक लाख ६० हजार कुठे? तर आपण या गो टीवर विचार करून आयुक्त साहेबांनी योग्य तो निर्णय घ्यावा. नाहीतर कठोर निर्देश दयावेत. एक दोन कर्मचा—यांना बरोबर घेवून आपण कामाची पाहणी करावी. व तात्काळ निर्णय घ्यावा की, तुम्ही दिवसभरात जे काम केले आहे ते मला दाखवा. २० माणसे कागदावर आहेत. मुकादमाला केव्हाही विचारले तर तो म्हणतो की एकही कामगार काम ऐकत नाही. सफाईच्या बाबतीत एवढा भुर्दंड भरून बाकी इतर सुविधांवर पाणी फेरून, आमच्या कार्यकालावधीस तीन व र्ा पुर्ण होत आले आहेत. तर बारा लाखाचे काम होण्याऐवजी फक्त सहा सहा लाखाचीच कामे मंजुर झाली आहेत. ती सुध्दा होत नाहीत. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे. म्हणुन आम्ही पाठपुरावाही करत नाहीत. परंतु सफाईची अत्यावश्यक गरज आहे. सफाईवर जोर दिला तर बरे होईल. लोकांना सफाई पाहिजे, पाणी पाहिजे. बाकीचे विचारतही नाहीत ते , चालायला रस्ते आहेत—— नाही आहेत तरी, आपण पुर्नविचार करून ॲन्थोनीचा ठेका रद्द करावा. प्रत्येक नगरसेवकाचे प्रत्यक्ष मत कागदावर लिहुन घ्या. कोण काय म्हणतो त्याप्रमाणे, आपण सदर आरोग्य विभागास सूचना दयाव्यात व आम्हाला लोकांच्या शिव्या—शापांपासुन वाचवावे. ही आपणांस विनंती करतो.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—मा. आयुक्त साहेब, ॲन्थोनी यांनी जेव्हा पासुन ठेका घेतला तेव्हापासुन आजपर्यंत प्रत्येक महिन्याचा तर तुम्ही सर्व्हे केलाच असणार आणि त्या सर्व्हेमध्ये टक्केवारीनुसार त्याच्या कामाची प्रगती तुम्हाला दिसली असणार. सुरवातीला दहा टक्के असेल नंतर २० टक्के असेल, ३० टक्के असेल आता ९० टक्के असेल कदाचित ९५ टक्के असेल. हे करत असताना त्यांना रितसर पेमेंट

सुध्दा गेलेले आहे. परंतु सुरवातीपासुन आतापर्यंतचे पेमेंट माझ्या माहितीप्रमाणे १०० टक्के दिलेले आहे. माझी विंनती अशी आहे की, त्यांनी ज्या टक्केवारीने काम केले. दहा टक्के काम केले असेल तर १० टक्के पेमेंट, ९० टक्के काम झाले असेल तर ९० टक्के पेमेंट म्हणजे आपण प्रत्यक्षात ज्या सेवा विकत घेतो. त्या सेवेचा योग्य मोबदला त्याला मिळाला पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती नीना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, सर्वात प्रथम मी आमच्या सचिव व आयुक्त साहेबांना धन्यवाद देवू इच्छितो कारण की, महासभेचे आमचे हे जे सभागृह आहे ते अतिशय चांगल्या रितीने त्यांनी सजविले आहे. खुर्च्यांची कव्हर्स बदली केली आहेत. व नविन कारपेट लावले आहे. मला असे वाटते की, ही दिवाळीची भेट आहे. दुसरे असे की, आज येथे अ‍ॅन्थोनीचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. त्यांचा जो ठेका आहे. तो रद्द केला जावा. आम्ही त्यांच्या या मताशी बिल्कुल सहमत नाही. मला असे वाटते की,मी १९८६ पासुन सलग नगरसेवक आहे. त्यावेळेस आमच्यावर ७५ टक्के तणाव कचरा उचलण्याबाबतचा होता. आता कुणी नगरसेवक भले काही बोलो. आमच्या प्रभागामध्ये कचरा उचलणारी गाडी आली नाही. अमुक एका ठिकाणी दहा ट्रक कचरा गोळा झाला आहे, २० ट्रक कचरा गोळा झाला आहे. पहिले आमच्या मनावर ७५ टक्के तणाव कचरा उचलण्याबाबतचा होता. तो आता कमी होवून ५ टक्के झाला आहे. दसुरे असे की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत कधीही असे झाले नव्हते, गल्ली गल्लीमध्ये कामगार कचरा गोळा करण्यासाठी येत नव्हते, अ‍ॅन्थोनीचे कामगार आता येतात. त्यामध्ये सुध्दा आता आयुक्त साहेबांनी हे जे काम केले आहे. त्यामध्ये नगरसेवकांची प्रति  ठा वाढली आहे. लोक म्हणतात की तेथील चांगला नगरसेवक निवडून आला आहे. माझ्याकडे ओटी सेक्शनचा विभाग येत नाही. परंतु तेथील लोक म्हणतात की, श्री. किशोर वनवारी निवडून आल्यापासून कामगार गल्ली बोळांमध्ये कचरा गोळा करण्यासाठी येत आहेत. आजपर्यंत असे कधी झालेले नाही. आयुक्त साहेबांनी अ‍ॅन्थोनी यांना कचरा उचलण्याचा ठेका दिला आहे. त्यामुळे नगरसेवकांचा मान वाढला आहे. प्रति  ठा वाढलेली आहे. तिसरे मी हे मान्य करतो की, दिवाळीमुळे किंवा अन्य दुस—या कारणामुळे जर कुठे कचरा गोळा झाला असेल तेथे गाडया लावुन जेसीबी मशिन लावुन  जसे श्री. पनवेलकरांच्या बाबतीत कधी—कधी ओरड  होत असे. त्यावेळेस वाहनांची संख्या वाढवुन ती समस्या सोडवली जात होती. तर जेवढया काही नगरसेवकांच्या प्रभागात दिवाळीमुळे कचरा साठला असेल तेथे अधिकाधिक गाडया लावून कचरा उचलला जावा. आमचे नगरसेवक श्री. दिलीप गायकवाड हे जे बोलत आहेत त्याकडेही मी येत आहे. साहेब आमच्या कॅम्प ५ मध्ये जेव्हाही प्रभाग समितीची सभा होते तेव्हा प्रभाग अधिकारी श्री. रामसिंघानी हे कधीच आमचे ऐकत नव्हते. आमचे हे ऐकत नाहीत , ते ऐकत नाहीत आम्ही दोन—तीन वेळा सभा स्थगित केली. प्रभाग समितीची जी  ेवटची सभा झाली. दिवाळीमुळे प्रभागामध्ये सर्वत्र कचरा गोळा झाला होता आम्ही प्रभाग अधिका—यां बाबतीत आयुक्तांना सांगत होतो तर ते ऐकत नव्हते. परंतु तरीही आम्ही आयुक्तांना धन्यवाद देतो. त्यांनी ती तक्रार न ऐकता प्रभाग अधिका—याचीच बदली केली. जो प्रभाग अधिकारी तेथे लक्ष देत नव्हता. तक्रारी ऐकुन घेत नव्हता. जी काही ओरड होत होती. त्याबाबत ते सांगायचे,  आमचे हे ऐकुन घेत नाहीत. मी स्वत: अ‍ॅन्थोनींना बोलविले होते ते आले नाहीत. आता अ‍ॅन्थोनी स्वत: थोडे येथे येवू  ाकतील? त्यांनी सुपरवायझर ठेवले आहेत, मुकादम ठेवले आहेत. तर त्यांना बोलावुन घेणे प्रभाग अधिका—याचे काम आहे त्यांच्याकडुन काम करून घेणे. हे नगरसेवकाचे काम नाही की त्यांनी रोज कच—याबाबत तक्रारी कराव्यात, हे काम स्वच्छता निरीक्षक , मुकादम व प्रभाग अधिकारी व आरोग्य विभागाचे उपायुक्त श्री. खरात साहेब जे आहेत त्यांचे आहे. त्यांनी प्रभागामध्ये पहाणी केली पाहिजे. जे जे नगरसेवक तक्रारी करतात त्यांच्या तक्रारीचे निवारण झाले पाहिजे. तर मला अत्यंत दु:ख होते की, काही दिवसापुर्वी कॅम्प नं. ५ येथे जी अडचण निर्माण झाली होती त्याबद्दल मी सभा स्थगित केली होती. व त्वरीत ठेकेदारास

सांगितले की, काही गाडया मागवून जेथे जेथे कच—याचे ढिग साठले आहेत. तेथील कचरा उचलला जावा. कचरा उचलण्याचे हे जे काम दोन व ार्पासुन चालु आहे या कामाबाबत आम्ही खुपच समाधानी आहोत. ाासकीय सुट्टीच्या दिवशी ाहरातील कचरा कधीच उचलला जात नव्हता. आता ाासकीय सुट्टीच्या दिवशी सुध्दा कचरा उचलला जात आहे. महापालिकेचे सेवेतील कायम कामगार कामावर येत नाहीत. परंतु अॅन्थोनी या ठेकेदाराचे कामगार कामावर येतात गल्लीगल्लीमधील कचरा एकेका कडुन गोळा करतात. ही अतिशय चांगली सवलत आहे. म्हणुन आवेशात येवून आम्ही याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही पाहिजे. जेणेकरून ठेका रद्द केला जाईल. आज आम्ही कचरा उचलण्याचा जो ठेका दिला आहे त्यांच्या कामामध्ये ज्याकाही कमतरता आहेत त्यांची पूर्तता करून घेतली पाहिजे. जसे जनतेच्या व ाहराच्या हिताचे आहे आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांनी घो ाणा दिली होती की, ''स्वच्छ उल्हास, हरीत उल्हास'' उल्हासनगर स्वच्छ झाले पाहिजे. याचबरोबर धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः—</u>मा. महापौरजी, मी सभागृहाला हे सांगु इच्छितो की, ाहरातील कचरा उचलला जात नाही म्हणुन मी उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली होती. ाहराच्या हितासाठी, यावेळी ाहरातील बरेचशी प्रति ठीत मंडळी माझ्याबरोबर होती, श्री. प्रल्हाद आडवाणी , रोटरीयन व ाहरातील अन्य काही प्रति ठीत व्यक्ती त्यावेळी माझ्याबरोबर होत्या. जनहित याचिकेत मा. उच्च न्यायालयाने कच—यावि ायी आमच्या ाहराबाबत अत्यंत वाईट असे ताशेरे ओढले होते. माझ्या प्रभागात दोन अशी ठिकाणे आहेत. झुलेलाल ााळा आहे या ााळेतील सुमारे पाच हजार विद्यार्थी येथुन जा—ये करतात. माझ्या प्रभागातील याठिकाणचा कचरा उचलला जात नव्हता. व एक सखी पॅलेस हा विभाग आहे तेथील सुध्दा कचरा उचलला जात नव्हता. त्यामुळे मी ाहरातील प्रति ठीत व्यक्तींना समवेत घेवून उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्या याचिकेत उच्चतम न्यायालयाने आमच्या ाहराबाबत अतिशय वाईट असे ताशेरे ओढले होते. आमच्या विभागातील कचरा उचलला जात नाही. याबाबत नेहमी आम्हाला फोन करावे लागत होते. आमच्या प्रभागामध्ये दुर्गंधी पसरली आहे. या विभागातुन लहान लहान मुले ये—जा करतात. अॅटोरिक्षा पलटी होण्याचा संभव असतो. परंतु जेव्हा पासुन आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे की, सुका कचरा व ओला कचरा वेगवेगळा करून उचलण्याचे काम ठेकेदाराला दिले आहे. त्यामुळे माझ्या प्रभागात त्याठिकाणी आता कचरा दिसुन सुध्दा येत नाही. येवढी स्वच्छता असते की कचरा उचलल्यानंतर ते लोक तेथे जंतुनाशकाची फवारणी सुध्दा करतात. कारण की त्यांना मी सुध्दा सांगितले आहे व नेहमी आमच्या हे निर्दशनास सुध्दा आले आहे , ते लोक जेथुन कचरा उचलतात तेथे जंतुनाशके फवारणी करतात. ही अतिशय आनंदाची गो ट आहे. दुसरी गो ट अशी की रात्रीचे वेळी सुध्दा दोन दोन, तीन तीन वेळा माझ्या प्रभागातील कचरा उचलतात. आधी कचरा उचलणा—या गाडया मोठ—मोठया होत्या परंतु आता या ठेकेदाराने छोटया गाडया ठेवल्या आहेत. कारण की आमचे काही रस्ते लहान आहेत. गल्ली बोळ आहेत तेथे सुध्दा या लहान लहान गाडया जातात. व कामगार बरोबर वेळेवर येतो झाडु मारून कचरा गोळा करतो. त्यानंतर जंतुनाशकांची फवारणी करतो व कच—याची गाडी येते व कचरा उचलुन घेवून जाते. तर कचरा उचलण्याबाबत ाहरामध्ये चांगले परिणाम आहेत. त्यासाठी आयुक्तांना मी धन्यवाद देतो. व आम्ही लोक याबाबतीत खुपच खुश आहोत. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मा. आयुक्त साहेब, आता श्री. किशोर वनवारी साहेबांनी जे ाब्द उच्चारले की, पहिले नगरसेवक लोकांना ७० टक्के आपले लक्ष कचरा उचलण्याच्या कामावर केंद्रीत करावे लागत होते. हे जे त्यांचे वाक्य आहे ते स्वयंस्प ट सत्य आहे परंतु श्री. किशोर वनवारी यांचे लक्ष मी याकडे सुध्दा वेधु इच्छितो की, आजपासुन तीन व ार्पुर्वी जेव्हा कच—याच्या वि ायी, व जेव्हा तेथील कचरा उचलण्याचा ठेका श्री. पनवेलकर यांच्याकडे होता. त्यावि ायी विरोधी पक्षाच्या वतीने येथे एक सभा बोलविण्यात आली होती. त्यावेळी सुध्दा श्री. किशोर वनवारी यांनी असे ाब्द

उच्चारले होते की, पनवेलकर आल्यानंतर जे नगरसेवक कचरा उचलण्याच्या कामावर ७० टक्के लक्ष केंद्रीत करत होते. ते काम आता संपले आहे. पनवेलकर चांगल्याप्रकारे कचरा उचलत आहेत. श्री. किशोर वनवारींचे वाक्य आजसुध्दा इतिवृत्तांतात आपण पाहु   ाकता. जर नसेल तर मी आणुन ते दाखवु   ाकतो. व जेव्हा पनवेलकर पुर्णपणे कचरा उचलत होते व १९९७ मध्ये याकामी आमच्या नगरसेवकांची ७० टक्के   ाक्ती जी खर्च होत होती. ती पनवेलकर आल्यानंतर संपली होती. व   ाहरातील कचरा पुर्णपणे उचलला जात होता. कुठल्याही नगरसेवकास डंम्पीग ग्राऊंड पर्यंत जावे लागत नव्हते. काही त्रुटी त्यांच्या कामामध्ये होत्या. परंतु तरीही एवढी मोठी रक्कम, पनवेलकरांना जी रक्कम दिली जात होती त्याच्या दुप्पट रक्कम ॲन्थोनी यांना दिली जात असताना फक्त घरोघरी जावुन ते लोक कचरा गोळा करतात. मला असे वाटते की, २० टक्के लोकांकडे सुध्दा हे लोक जात नसतील. इमारती सोडुन बॅरेक मध्ये सुध्दा हे लोक जात नाहीत. जेथे ५० बॅरेक असतील तेथील १० बॅरेक्स मध्ये सुध्दा हे लोक कचरा गोळा करण्यासाठी जात नाहीत. याप्रकारे फक्त १००—१५० लोकांचे काम वाढल्यानंतर पनवेलकरांपेक्षा डब्बल पेमेंट देणे योग्य नाही. उल्हासनगर महानगरपालिकेचा खर्च व्यर्थ जात आहे. कराराच्या अटी   ार्तीमध्ये ज्या बाबी नमुद केल्या आहेत. निविदा भरताना ठेकेदार ॲन्थोनी यांनी काय काय करायचे आहे त्यातील ५० टक्के बाबींची सुध्दा आजपर्यंत पुर्तता झालेली नाही. यासर्व गो  टीं लक्षात घेता. जसे आमच्या श्री.उमाप साहेबांनी सांगितले की, असे कारण सांगा की ज्या गो  टीची पुर्तता केली नाही तर आम्ही त्याचा ठेका रद्द करू   ाकतो. तर याबाबत आजपर्यंत प्रशासन लेखी देवु   ाकले नाही की ॲन्थोनीची कोणती चुक झाल्यानंतर आम्ही त्यांचा ठेका रद्द करू   ाकतो. परंतु मला असे वाटते की, त्यांच्या ब—याचशा चुका आहेत. जे नियम आहेत त्यांची पुर्तता केलेली नाही. त्यांचा ठेका रद्द करून पाच कॅम्पामध्ये वेगवेगळया प्रकारचे पाच ठेकेदार नेमुन त्यांच्याकडुन योग्य त्याप्रकारे या   ाहरातील कचरा उचलला जावा. या पाच ठेकेदारांमधील जो ठेकेदार आपल्या कॅम्पातील काम अधिक चांगल्या प्रकारे करेल त्यालाच पुढील व   र्ी ठेका दिला जाईल. अशाप्रकारे १० व   ाचा ठेका देवून व कोणत्याही बाबीतीत त्याला सुट न देता प्रत्येक बाबींची त्याच्याकडुन पुर्तता करून घ्यावी अन्यथा   ाहरासाठी हे हानीकारक आहे व   ाहराच्या पैशाचा अपव्यय आहे. धन्यवाद. जयहिंद.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>महापौर महोदया, माझी एक विनंती आहे आमच्या आयुक्त साहेबांनी या ठेकेदारास जो ठेका दिला आहे तो ठेकेदार काम  बरोबर  करत आहे. ठेकेदार कोण आहे त्यास आम्ही ओळखत नाही. त्याच्याकडे नविन गाडया आहेत. याअगोदर जे काही ठेकेदार असायचे त्यांच्या गाडयांची स्थिती इतकी खराब असायची की कचरा डंम्पीग ग्राऊंडवर पोहचविण्या अगोदरच रस्त्यातच अर्धी गाडी कचरा पडून जायचा. गाडीतुन पडलेला कचरा उचलण्यासाठी सफाई कामगारांना मेहनत करावी लागत होती. कृपा करून, आज जे काम होत आहे ते चांगले काम होत आहे. ते चांगले काम होत आहे. त्यास चांगलेच म्हंटले पाहिजे. जे वाईट काम आहे त्याबाबत आम्ही नेहमीच वाईट म्हणत आलो आहोत. यावेळी दिपावलीच्या वेळेस आपण पाहिले असेल , विद्युत विभागाने चांगल्या प्रकारे काम केले. रात्रंदिवस मेहनत केली. पाणी विभागाचे अधिकारी सुट्टी असूनसुध्दा कार्यालयात उपस्थित होते. जेथे जेथे पाण्याची कमतरता होती तेथे पाणी पुरवठा करत होते. सफाई विभाग बंद असताना सुध्दा अर्धा दिवस ते दररोज कामावर येत होते. त्यासाठी आम्ही आयुक्तांना धन्यवाद देतो. व सत्ताधारी पक्षाला धन्यवाद देतो. यांच्या जागृततेमुळे , आयुक्तांच्या जागृततेमुळे आमची दिपावली चांगली गेली. बाकी जे थोडेफार काम राहिले आहे. ठेकेदाराकडुन  ते काम करून घेणे जरूरीचे आहे. आमची आयुक्त साहेबांना ही विंनती असेल की, नाल्यांमधुन जो कचरा निघतो तो उचलण्यासाठी , कचरा कुंडीपर्यंत पोहचविण्यासाठी जी गाडयांची कमतरता आहे ती पुर्ण केली जावी. जेणेकरून योग्य त्याप्रकारे काम व्हावे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>आमच्या सत्ताधारी पक्षाच्या सभागृह नेत्यांनी जे म्हंटले त्यांना मी सांगु इच्छितो की, त्यांच्या एका सहकारी पत्रकाराने लिहिले आहे की, दैनिक धनु यधारीमध्ये अशाप्रकारचे वृत्त आहे. ाहरामध्ये काही ठिकाणी दुर्गंधीचे डोंगर सहजरित्या दिसु ाकतात.

मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>मा. महापौरजी, या सभेमध्ये वर्तमानपत्र वाचनु दाखविण्याची काही आवश्यकता नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>वर्तमानपत्रातल्या बातमीचा उल्लेख सभागृहात केला जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानी:—</u>हे जे वृत्त प्रसिध्द केले आहे ते दैनिक धनु यधारीचे पत्रकार आपल्या पक्षाचे नगरसेवक आहेत. एकीकडे ते ठेकेदाराची प्रशंसा करतात दुसरीकडे त्यांना वाचवु इच्छितात तर यामधील सत्यता काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>बच्चारामजी आपण आधी ती बातमी वाचा व नंतर मी त्याबाबतीत उत्तर देतो. आधी वाचा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—</u>सभागृह नेता ठेकेदारांची प्रशंसा करतात व त्यांच्या बाजुला जे नगरसेवक बसतात ते लिहितात की, ाहरामध्ये किती कच—याचे ढिग साचले आहेत. सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. प्रशासनाला वारंवार सांगुन सुध्दा कच—याची ही दुर्गंधी हटविली जात नाही. तर वस्तुस्थिती काय आहे? कारण की आमच्या प्रभागामध्ये तर दुर्गंधीच आहे. याबाबत मी एका वर्तमानपत्रामध्ये बातमी दिली होती. कचरा उचलणारा ठेकेदार आमच्या प्रभागांकडे लक्ष देत नाही. मला असे वाटते की तो सत्ताधारी पक्षाचा नगरसेवकांच्या प्रभागातच जास्त लक्ष देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब या आचारसंहितेपुर्वी म्हणजे एक आठवडयापुर्वी आमच्या प्रभाग समितीमध्ये सभा झाली होती. प्रभाग समितीच्या सभेमध्ये आम्ही सर्व संमतीने, त्या सभेमध्ये श्री. किशोर वनवारी,श्री. सतरामदास जेसवानी होते. सर्व नगरसेवक होते. त्या सर्वांनी मिळुन ठरविले होते. त्या सभेचे आमच्याकडे इतिवृत्त आहे ते आपण वाचुन पाहु ाकता. त्यांनी त्या इतिवृत्तांत म्हंटले आहे की, ाहरात सफाई होत नाही. त्याची इतिवृत्तांतात नोंद आलेली आहे. ाहरात बिल्कुल साफ—सफाई होत नाही. ठेकेदाराला पैसे दिले जावु नये. असा ठराव पारीत केलेला आहे. अशाप्रकारचे निवेदन दोन महिन्यापुर्वी त्यांचे होते आणि आज ते म्हणत आहेत की आम्ही ठेकेदाराच्या कामाबाबत समाधानी आहोत. आयुक्त साहेब प्रभाग समितीमध्ये जो ठराव पारीत होतो. प्रभाग समितीला स्थायी समितीचे अधिकार आहेत की नाहीत? त्यानंतर ठराव पारीत केल्यानंतर तुम्ही पेमेंट देणार की नाही? प्रभाग समितीला काय अधिकार आहेत ते कृपया सांगा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>मा. महापौरजी, जेव्हा कुठेही ाहरामध्ये एखादा ठराव पारीत केला जनतेने किंवा जनप्रतिनिधींनी. तो अंमलात आणावा किंवा नाही आणावा. याबद्दल तुमचे मत आवश्यक आहे. दुसरे असे की चार प्रभाग समित्यांमध्ये बहुमताने जेव्हा एखादा ठराव पारीत होतो. जास्तीत जास्त जनप्रतिनधी जेव्हा मोठया आवाजात ओरडुन सांगतात की ॲन्थोनीचा ठेका रद्द झाला पाहिजे कारण की त्यांचे काम असमाधानकारक आहे. एवढे सर्व ाहरातील जनता सांगत असताना फक्त प्रशासनाच ठरविणार आहे का की तो ठेका रद्द करावा किंवा नाही करावा. म्हणजे प्रशासनच हे ठरविणार आहे

आणि जनप्रतिनिधींची जी भावना आहे ती तुम्ही विचारात घेणार नाही का? प्रभाग समिती ४ मध्ये सुध्दा हा ठराव झालेला आहे. प्रभाग समिती ४ चे सभापती यांनाही तुम्ही विचारू ाकता ते तुम्हाला सांगु ाकतील की सत्ताधारी पक्षाचे सभापतीच्या वेळी जो ठराव पारीत झालेला आहे. इतरही प्रभाग समित्यांमध्ये हा ठराव पारीत झालेला आहे. असे असतानाही प्रशासन या जनप्रतिनिधींच्या भावनांची कदर न करता जनतेच्या विरोधात काम करत आहेत असे म्हणावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u>मा. महापौर महोदया, उत्तर घ्यायचे आहे............सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष..................

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय इतका वेळ चर्चा चालु आहे. आम्ही लोक गप्प बसलो आहोत. व आम्ही गप्प बसण्याचे कारण हे नव्हते की विरोधी पक्षानी जो आवाज उठविला त्यासाठी आमच्याकडे काही उत्तर नव्हते. आम्ही गप्प यासाठी बसलो की, विरोधी पक्ष जो आवाज उठवत आहे. त्यामध्ये काही तरी सत्यता जरूर आहे. जेव्हा ही काही काही सत्यता असते व जेव्हा प्रशासनासमोर अशाप्रकारचा आवाज उठविला जातो. तर होवू ाकते की जेथे कुठेही आम्ही कमी पडत असू त्या व्यवस्थेमध्ये आम्हाला आणखी थोडी सुधारणा पाहावयास जरूर मिळेल. आता आमचे मित्र मा. बच्चाराम रूपचंदानी जे आमचे वरी ठ नगरसेवक आहेत त्यांनी आवाज उठविला की, धनु यधारीमध्ये असे लिहिले आहे. व संपादकांचा हवाला दिला तर मी माझ्या मित्राला सांगु इच्छितो की, जेथेपर्यंत संपादकीय वृत्ताचा प्रश्न उपस्थित होतो त्यास संपादक बांधील असतो. कारण की, संपादक आपले मत संपादकीय मध्ये लिहितो. व संपुर्ण वर्तमानपत्रामध्ये इतर ज्या बातम्या असतात त्या लोकांमध्ये जागृती पसरविण्यासाठी स्थानिक पातळीवरच्या बातम्या असतात. व लोकांच्या भावना ाासन व प्रशासनापर्यंत पोहचविणे हे उल्हास विशे ा चे छोटे छोटे हे मुद्दे आहेत. त्याचे माध्यम आहे. सर्वसामान्य जनतेमधुन जे काही लोक आमच्याकडे वृत्त पाठवितात. ाहरामध्ये अमुक याठिकाणी कच—याचे ढिग दुर्गंधी आहे. त्यावर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. मी धन्यवाद देतो श्री. बच्चाराम रूपचंदानी यांना ज्यांनी धनु यधारीचा या महासभेत उल्लेख केला. प्रशासनाने धनु यधारीकडे आणखी चांगल्या दृ टीने पाहावे. व ही जी ठेक्याची गो ट येथे चालु आहे. तर मी एवढे बोलु इच्छितो की, जेव्हा पासुन ॲन्थोनीला ठेका दिला आहे. तेव्हापासुन सफाईच्या कामात सुधारणा आहे. व आज आमच्या महानगरपालिकेचे नाव बाहेरच्या ठिकाणी अभिमानाने घेतले जाते. कारण की महापालिका क्षेत्रात साफसफाई उत्तम प्रकारची आहे. परंतु आम्ही त्यांच्या या कामाला आतापर्यंत जे गुण देत आहोत. जे ९० टक्के. ९० टक्के मार्कस देत असताना ते फस्ट क्लासमध्ये पास आहेत. परंतु आम्ही त्यांना १०० टक्केच्या हिशोबाने पेमेंट अदा करतो. यासाठी कच—याची ांभर टक्के सफाई करून घेणे हे आमचे कर्तव्य आहे. व असे करत असताना ाहराच्या हिताच्या दृ टीकोनातुन जर विरोधी पक्ष आवाज उठवित असतील किंवा सत्ताधारी पक्ष आवाज उठवत असतील तर हे आमच्या सर्वांचे कर्तव्य ठरते की आम्ही सर्वजण कुठे कुठे कमी पडत आहोत. आम्ही सर्व जण एकत्र होवून १०० टक्के काम कसे करून घेवू ाकु. ही आमची जबाबदारी ठरते. यासाठी मा. आयुक्त महोदयास माझे निवेदन आहे की, रा ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने, ही गो ट सत्य आहे की पुर्वी पेक्षा ाहर अधिक स्वच्छ दिसत आहे. परंतु आम्हाला आता अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. व प्रामाणिकपणे ते कुणाला कमी लेखण्यासाठी नाही. हे काम आम्ही सर्वांनी एकत्र मिळुन करण्याची आवश्यकता आहे. व त्यासाठी ठेका रद्द करण्याची आवश्यकता नाही. कारण की आज आम्ही ९० टक्के यशस्वी झालो आहोत. याच ठेकेदाराला पुढे मुदतवाढ देवून आम्ही १०० टक्के यशस्वी होवू असे आम्हाला सर्व मिळुन प्रयत्न केले पाहिजे जयहिंद.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आताच कच—याच्या ठेकेदाराविषयी बहुतेक चर्चा झाली परंतु आज मला असा अनुभव आला त्यावरून एक नविन समस्या निर्माण होईल असे मला वाटते. आज सकाळी अकरा—साडे अकराच्या सुमारास ठेकेदाराची जी माणसे कचरा गोळा करण्यासाठी घरोघरी कच—याची गाडी घेवून फिरतात. त्यातील एक व्यक्ती माझ्याकडे आला. आणि मला त्यांनी सांगितले की, एक नंबर आणि दोन नंबर वरून कचरा गोळा करणारी काही ठेकेदाराची माणसे माझ्याकडे आली आणि त्यांनी काम बंद करायला सांगितले. तर मला त्यांनी विचारले की तुमच्या प्रभागामध्ये मी कचरा उचलतो ते काम बंद करायचे आहे का? मी म्हंटले कशासाठी बंद करणार? तुम्हाला ठेका दिला आहे, ठेकेदाराचा तु माणुस आहेस आमच्या महानगरपालिकेच्या माणसाशी संबंध काय तुमचा? तुम्ही ठेकेदाराची माणसे आहात तुम्हाला जे काम दिले आहे ते तुम्हाला करावेच लागेल. परंतु ते मला कचरा उचलु देत नाहीत त्याला काय करणार. ठेकेदाराच्या माणसांचे म्हणणे होते तर मी म्हणलो का उचलु देत नाही ती माणसे तुला कचरा. तर ते म्हणे आम्हाला दिवाळीचा बोनस ठेकेदाराने दिला नाही. पैशाबाबत त्यांची काही अडचण झाली आहे. तर त्याच्या साठी ते मला सांगतात की तु या प्रभागामध्ये कचरा उचलायचा नाही आम्ही सर्वांनी कचरा उचलायचे बंद केले आहे. असे जर झाले असेल तर त्या ठेकेदाराने त्यांना पेमेंट केले नसेल किंवा बोनसचे पैसे वगैरे त्यांचे काही पेमेंट वगैरे ते जर दिले नसतील तर उदया उल्हासनगरमध्ये सगळीकडे अशी समस्या निर्माण होईल. आता ज्या लोकांनी कचरा जमा करण्याचे बंद केले असेल किंवा नसेल याची मला कल्पना नाही परंतु माझ्याकडे त्या माणसाची तक्रार आली. माझ्या विभागात कचरा उचलणा—यांची तक्रार आली. त्यावरून पुढे जी समस्या निर्माण होणार असेल तर त्याकडे लक्ष देवून ठेकेदार त्यांना वेळेवर पेमेंट देतो की नाही. कचरा उचलणा—यांच्या समस्या जर सोडविल्या नाही तर ही समस्या पुढे निर्माण होवू   ाकते. घरोघरी जावुन कचरा उचलणारी जी माणसे आहेत. त्यांनी काम बंद केल्यानंतर कच—याचे ढिग साचु   ाकतात. तर त्याबाबतीत आयुक्तांनी त्यांच्याशी बोलुन..................

मा. प्रभारी आयुक्त:—त्याबाबत आम्हाला माहिती दिली पाहिजे. दोन महिन्यापुर्वी एक तुलनात्मक तक्ता या सभागृहात देण्यात आला होता. त्याबाबतीत श्री. उमाप यांचे मी लक्ष वेधु इच्छितो. त्यांचे म्हणणे आहे की, माझ्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. ठेका रदद करण्याबाबतच्या काय अटी,   ार्ती आहेत. त्याबाबत माहिती दयायची आहे ती सुध्दा दिली जाईल. ती सर्वांना प्रस्तुत केली जाईल. ही जी सविस्तर चर्चा झाली यावरून असे दिसुन येते की काही लोक संतु  ठ आहेत कारण की ठेकेदाराचे काम योग्य प्रकारे होत नाही. असे काहींना वाटते. कचरा उचलण्याचे जे वेळापत्रक आहे त्यानुसार कचरा उचलला जात आहे. परंतु जेथे कचरा कुंडया आहेत तेथुनच कचरा उचलण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. कित्येक लोकांनी कित्येक नाल्यांचा उल्लेख केला किंवा लोक इकडे तिकडे जो कचरा फेकतात किंवा ज्या अनाधिकृत कचरा कुंडया आता निर्माण झाल्या आहेत. त्याबाबतीत जबाबदारी ठेकेदाराची नाही. ती आमची जबाबदारी आहे परंतु आम्ही हे सुध्दा पाहु की तेथे कचरा कुंडी ठेवु किंवा तेथील कचरा योग्य प्रकारे कचरा कुंडीवर आणुन तो उचलला जावा. जे काम आम्ही करत आहोत. ते काम आणखी चांगल्या पध्दतीने केले जावे. तेथे सांगण्यात आले की, 'शुन्य कच—याची स्थिती साध्य झाली किंवा नाही. ''शुन्य कच—याची स्थिती एका व  ामिध्ये तर होणार नाही यासाठी निरंतर प्रयत्न करावे लागतील. यासाठी येथील जनतेही सहकार्य करावे लागेल. परत   ुन्य कच—याची स्थिती   ाहरात येवू   ाकेल. परंतु आपल्या सर्वांच्या माहितीसाठी मी एक गो  ट सांगु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेत मागील व  ीं राज्य सरकारच्या वतीने संत गाडगेबाबा महाराज अभियान आयोजित केले होते. उल्हासनगर महानगरपालिकेने त्यामध्ये ४ थ्या फेरीमध्ये प्रवेश केला आहे. आज पर्यंत उल्हासनगर महानगरपालिका कधीही राज्य स्तरावरील कोणत्याही स्पर्धेमध्ये पहिल्या फेरीपर्यंत  पोहोचली

नाही याव र्षी आमच्या एका प्रभागाला चांगल्या प्रशासकीय कामाबाबतचे पाच लाख रूपयाचे पारीतोि ाक मिळाले. व चौथ्या फेरीमध्ये बावीस महानगरपालिकांमधील ज्या आठ महानगरपालिकांची निवड झाली आहे. त्या आठ महानगरपालिकांमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे नाव आहे. हे आपणांस सांगताना आम्हाला गर्व होत आहे की त्या कमिटीमध्ये जे सदस्य म्हणुन आले होते. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, त्यांचे उप सचिव व कित्येक अधिकारी तेथे आले होते. त्यासर्वांना त्यांचे कुटूंबिय किंवा त्यांच्या माहितीचे लोक विचारत होते की, आज उल्हासनगरमध्ये कशासाठी आपण जात आहात? व यावर समितीचे सदस्य त्यांना उत्तर देत होते की, एक स्वच्छता अभियान झाले. या स्वच्छता अभियानामध्ये उल्हासनगरचे नाव आहे. व पुढच्या फेरीमध्ये जे पारीतोि ाक दयायचे आहे. पहिला व दुसरा क्रमांक निश्चित करायचा आहे. त्यासाठी आम्हाला तेथे जावुन तपासणी करायची आहे. आम्हाला तेथे जावुन चौकशी करायची आहे व हे ऐकुन की उल्हासनगरचे नाव पारीतोि ाक मिळविणा–या महानगरपालिकांच्या यादीमध्ये आहे. हे ऐकुन त्यांचे कुटूंबिय व त्यांचे मित्र सुध्दा हैराण होवून जात होते. मला वाटते ही प्रगती प्रशासनाची आहे. ही प्रगती महानगरपालिकेचे स्वच्छता विभागात जे कामगार काम करत आहेत त्यांची व महानगरपालिकेने हा जो ठेका ॲन्थोनी यांना दिला आहे ते जे काम करत आहेत या दोघांचा एक चांगला मिलाप झाल्याची ही फळनि पत्ती आहे. आपण व आम्ही कुणावरही टिका करणे हे स्वाभाविकच आहे. आपणांस ज्या पध्दतीने काम अपेक्षीत आहे, आपणांस ज्या प्रकारचे काम अपेक्षित आहे व १०० टक्केची गॅरेंटी आम्ही नाही देवू ाकलो. हे आम्हांला माहित आहे, ठेकेदाराला माहित आहे, सर्वांना माहित आहे. कारण की, आपल्या अपेक्षा मोठया आहेत. पहिले आपणांस सर्वत्र कचरा दिसून येत होता. तो आता दिसत नाही. मोजक्याच ठिकाणी कचरा दिसून येतो. यासाठी आपणांस वाटते की, याकामी तो एकटा ठेकेदारच जबाबदार आहे. येथ पर्यंत की, नाली मध्ये जो कचरा दिसून येतो, त्यासही ठेकेदार जबाबदार आहे, असे आपणांस वाटते. हे जे आहे ती आपली चुकीची भावना आहे. ती मी दूर करु इच्छितो व पुन्हा आपणांस अस्वस्थ करु इच्छितो. त्या ठेकेदाराच्या २ अटी, ार्तींची पुर्तता झालेली नाही. त्यांची पुर्तता करुन घेवून लवकरच त्यांची पुर्तता होईल, या व्यतिरिक्त सुध्दा सभागृहाला असे वाटत असेल, ठेका रद्द केला पाहिजे. तर ठेका रद्द करण्यासाठी सुध्दा प्रशासन तयार आहे. आपणांस हे ठरवायचे आहे. ठेका चालु ठेवायचा आहे की बंद ठेवायचा आहे? व पुन्हा आपली जुनी जी पध्दत होती, त्या पध्दतीनेच जायचे आहे. आपणांस पुर्वीची पध्दत चांगली वाटत असेल जुनी पध्दत अवलंबिण्यास प्रशासनास काहीही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आयुक्त साहेब, एक गो ट मी सांगु इच्छितो, इन्स्पेक्टर येतात तर साफसफाई होते, दुस–या दिवशी पुन्हा तीच स्थिती एक–दोन दिवस साफ सफाई झाली. तशी नेहमीच झाली पाहिजे. एक दिवसासाठी नाही, नियमित साफ–सफाई झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> आयुक्त साहेब, हा प्रश्न होता परंतु जशी प्रस्ताव व ठरावावर जशी चर्चा होते तशी झाली आहे. तुम्ही उत्तर दिले पण टिका करणे हा उद्देश नव्हता तुम्ही तो ाब्द वापरला म्हणून म्हटले.

<u>मा. प्रभारी आयुक्त :–</u> मी तुमच्या प्रश्नावर टिका टिप्पणी केली नाही. जितकी पण चर्चा झाली टिकाटिप्पणी नेहमी नकारात्मक नसते. जी पण चर्चा होते, जी पण टिका होते तिला टिकाच म्हणतात. टिका नेहमी नकारात्मक नसते. ती सकारात्मक पण असते.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर दयायचे होते, जर आर्थिक दृ परिणाम महापालिकेवर झाला आहे काय? आणि झालेला जर नसेल तर ठेकेदाराला पेमेंट मिळेल का? याठिकाणी तुम्ही किंवा ठेकेदाराने केलेल्या कामाची स्तृती करणे हे स्वाभाविक कर्तव्य

आहे. तुम्ही काम केल्याचे समर्थन तुम्ही केलेच पाहिजे. त्याला सत्ताधारींनी पाठिंबा दिला आहे. किंवा पुढाकार घेतला आहे. समर्थन केले आहे म्हणुन ते इथे चुकीचे बोलुच ाकत नाही म्हणजे झाले प्रभाग समिती क्र. ४ त्या प्रभाग समिती क्र. ४ मध्ये उद्‌बोधक आहे की यामागे, सर्व लोकांसमोर आम्ही समर्थन करतो असे दाखवले तरी जे तिथे झाले ते पहा. सर्व नगरसेवक त्या ठेकेदाराच्या विरोधात आहेत. तो काम व्यवस्थित करत नाही. त्याठिकाणी निर्णय झालेला आहे की सदरचा ठराव रद्द करा. किंवा त्याचे पेमेंट तरी रोका हे सर्व पाच नंबरच्या विभागातील किंवा प्रभाग क्र. ४ चे नगरसेवक बोलतात म्हणजे काही तरी त्यामागे कारणे आहेत. याठिकाणी श्री. वनवारीजी किंवा श्री. तलरेजाजी समर्थन करतील त्यात त्यांचे काही वावगे नाही. तुम्ही सर्व बरोबर आहात. प्रशासनाने सुध्दा त्यांची वाहवा केली ते ही बरोबर आहे. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की दामदुप्पटीने जो ठेका दिला आहे. तो चुकीचा आहे जे आता पर्यंत आम्ही सांगत आलेलो आहे की हेच काम श्री. जमनु पुरस्वानी म्हंटले होते त्यानुसार अगोदर हे श्री. पनवेलकरांना काम दिले होते, असे आमचे लोकप्रतिनिधी सुध्दा बोलत होते. आणि तुम्ही तर आम्हाला प्रमाणपत्र दिले आहे की, पनवेलकरांचे काम १०० टक्के व्यवस्थित होते. हे तुम्ही लिखित दिलेले आहे. याचा अर्थ तो ठेकेदार सुध्दा १०० टक्के काम चांगले करत होता आणि हा ठेकेदार सुध्दा चांगले काम करतो. मग पाच कोटी देण्याचा अर्थ काय होता? हा आमचा मुख्य मुळ मुद्दा होता. त्याचे अजुनही उत्तर मिळाले नाही. ते तसेच राहीले तरी चालेल यावर भरपुर चर्चा झाली आहे. मी असमाधानी असुन समाधानी आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः</u>—मा. महापौरजी, मी यांना उत्तर देतो की, या ठेक्यामुळे महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर विपरित परिणाम झाला आहे का? असे काहीही झाले नाही. बरोबर काम करतील , चांगल्या प्रतीचे काम करतील नंतर पेमेंट मिळेल. दुसरे जसे श्री. पनवेलकरांवि ायी बोललात. आम्ही कधीही असे म्हंटले नाही की त्यांचे काम बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>—माझ्याकडे लिखित आहे. त्याच्या विरोधात कसलीही तक्रार नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्तः</u>—तेच मी म्हणतो त्यांचे काम बरोबर नाही असे आम्ही कधी नाही म्हंटले. परंतु घन कचरा व्यवस्थापनाचे नियम २००० आले आहेत त्यात स्टोअरेजचे ट्रान्सस्पोटेशनचे नॉर्मस आहेत त्यानुसार नव्हते. त्यामुळे हे नविन दयावे लागले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>—मा. महापौरजी, कच—याबाबत चर्चा चालु असताना दोन चार गो टी माझ्याबाबत बोलल्या गेल्या त्या दोन चार गो टींचा मी खुलासा करू इच्छितो. प्रभाग समितीचा ठराव पहा त्यात हे कुठेच ठरले नाही की, ठेका रद्द करायचा. प्रभाग समिती ४ मध्ये जे होते त्यातील काही लोकांना माहित आहे, काही लोकांना माहित नाही. तुम्ही ठराव पहा. त्यांचे काम कचरा वाढला आहे. या महिन्यात जर त्याने काम नाही केले तर त्याचे पेमेंट रद्द केले जावे. असे आहे जरा लक्ष देवून ठराव बघा. तुम्ही बहुतेक वाचले नाहीत. दुसरे श्री. जमनु पुरस्वानी जे म्हणाले बरोबर आहे. तीन व ापुर्वी पनवेलकरांचे काम चांगले होते त्यांनी निविदा भरली पण तो निविदेच्या अटी, ार्तीत बसत नव्हता कायदयाने त्यांना ठेका नाही मिळाला हा मला खुलासा करायचा आहे. श्री. जमनुजी म्हणतात दरव ाी ठेकेदार बदलला पाहिजे त्यांच्या भावना मी समजतो. दरव ाी ठेका दिला पाहिजे. बरोबर आहे पण स्थायी समितीत जे पास झाले त्यांनी जे सांगितले दरव ाी यायला पाहिजे कशासाठी?

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>ही तर आमची भावना आहे स्थायी समितीच्या सभापतींची भावना असली पाहिजे. कारण की दरव र्ी ठेका त्यांच्याकडे येणार. आम्ही तर यासाठी म्हणणाार दरव र्ी आले पाहिजे जर कोणी काम ठिक नाही केले तर बदल करता येईल. ही तर स्थायी समिती सभापतींची भावना असली पाहिजे दरव र्ी ठेका आणण्याची.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आज महासभेत पहिल्यांदा नाही. पनवेलकर साहेबांचा मुद्दा आला आहे हे पन्नासदा झाले आहे. दिड व ार्पासुन चालतच आले आहे अॅन्थोनीचा मुद्दा. प्रश्न असा झाला आहे की कार्यसूचीवरचा वि ाय चालु आहे. तर मेहरबानी करून जो चांगला आहे त्याला चांगलेच बोलणार व ज्या लोकांचे काम होत नाही तिकडे लक्ष दयावे. किंवा तिथले नगरसेवक जसे श्री. जमनुभाई पुर्ण दिवस हिंदु हॉटेलमध्ये फिरत असतात. माझा त्यांना सल्ला आहे की त्यांनी प्रभागाकडे जरा लक्ष दयावे आमच्या सारखे. तुमचे पण काम होईल.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. एक लक्षवेधी सूचना प्राप्त झाली आहे ज्याचे सूचक आहेत श्री. राज असरोंडकर व अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप ही लक्षवेधी सूचना वेळेवर न मिळाल्याने मा. महापौरांनी अमान्य केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>वि ाय सांगा.

<u>मा. सचिव:—</u>वि ाय असा आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाचे ठेकेदार जे आहेत त्यांना कार्यादेश मिळून देखिल वेळेवर काम सुरू करत नाहीत. जर सुरू जरी केले तरी अर्ध्यातच सोडतात. व बिलाची अपेक्षा करतात. व बिल मिळाल्यानंतर अर्धे राहिलेले काम सोडुन दुसरे काम सुरू करतात.

वि ाय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>वि ाय क्र. २:—</u> मागील सभेचे दि. २०.१०.२००४ (त्यात दिनांक २९.१०.२००४ व दिनांक ४.११.२००४) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

यामध्ये पान क्र. ७ व ५० वर जी प्रिंटींग मिस्टेक झाली आहे ते पान तुम्हाला बदलुन दिले आहे. दोन्ही पाने आपणांस बदलुन दिली आहेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>४ नोव्हेंबरचे जे इतिवृत्त आहे त्यामध्ये मला अनुपस्थित दाखवले आहे. माझे ५ व ६ पानांवर वेगवेगळया वि ायावर माझ्या नावाचे चर्चा आली आहे. माझे त्यात नाव आहे आणि मला अनुपस्थितीत दाखवले आहे. मला त्यात उपस्थित दाखवले जावे.

<u>मा. सचिव:—</u>तुम्ही बहुतेक सही नसेल केली म्हणुन तुमची अनुपस्थिती दाखवली आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>त्यात दुरूस्ती केली जावी.

<u>मा. सचिव:—</u>ठिक आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—मा. महापौर, आयुक्त साहेब मागच्या महासभेचे पण इतिवृत्त पास करणार का?

मा.सचिवः—होय.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—मी पर्यावरणावर चर्चा करताना गॅरेजचे ध्वनी प्रदु  ाण होते. असे त्यात समावि  ट करावे म्हणुन मागणी केली होती. त्यात आयुक्त साहेबांनी उल्लेख केला की, श्री. नगरसेवक सोनवणे यांनी मागणी केली ती आम्ही पर्यावरण अहवालात समावि  ट करू असे त्यांचे वक्तव्य असल्यावर सुध्दा या इतिवृत्तात ते आले नाही. याचा अर्थ इतिवृत्त इथे बसुन लिहितात की नुसते टेपवर रेकॉर्ड केले जाते.  काही वाक्ये येतात काही वाक्ये येत नाहीत. त्यामुळे आपण योग्य ते बघुन इतिवृत्त पास करावे.

मा. सचिवः—आपणांस काय पाहिजे आहे? इतिवृत्तात आले नाही की आता त्यात घालायचे आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :—इतिवृत्तात आले नाही म्हणजे पर्यावरण अहवालात आले नाही. आयुक्त साहेबांचे बोलणेच इतिवृत्तात आले नाही.

मा. सचिवः—प्रदु  णाच्या वि  यावर चर्चा करताना सन्माननिय सदस्य श्री. नथु सोनावणे यांनी निर्दशनास आणून दिलेल्या  गॅरेजच्या प्रदु  णा बाबत मा. आयुक्तांनी दिलेल्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद आलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी आहे की याबाबतच्या आयुक्तांच्या उत्तराची इतिवृत्तांताच्या पृ  ठ क्र. २० वर सविस्तरपणे नोंद आलेली आहे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौरः—सदरचे इतिवृत्त वरील सुधारणे सह सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

वि  ाय क्र. २:— मागील सभेचे दि. २०.१०.२००४ (त्यात दिनांक २९.१०.२००४ व दिनांक ४.११.२००४) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सचिवः— वि  ाय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३:—महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना प्रत्येकी रु ४,०००/— प्रमाणे दिपावली भेट देण्यास मान्यता देणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ३:—महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना प्रत्येकी रु ४,०००/— प्रमाणे दिपावली भेट देण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना:—

वित्तिय वर्ष २००३—२००४ साठी सर्व महापालिका कर्मचा—यांना खालील अटी व शर्तीस अधिन राहून दिपावली भेट खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. सदरची दिपावली भेट गट ''अ'' ''ब'' ''क'' व ''ड'' मधील सर्व महापालिका अधिकारी /कर्मचारी तसेच शिक्षण मंडळातील अधिकारी कर्मचा—यांना व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी /कर्मचारी यांना अनुज्ञेय राहील.

२. जे कर्मचारी ३१ मार्च २००४ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २००३—२००४ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असे कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास पात्र राहतील.

३. दिनांक १/४/२००३ ते ३१/३/२००४या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी दिपावली भेट मिळण्यास अपात्र असतील.

४. सदर भेट ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खलील सूत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

अनुज्ञेय वित्तलब्धी रूपये
———————————————————— ग हजर दिवस
३६६ दिवस

५. कर्मचा—यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजुर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६. दिपावली भेट दिपावलीपूर्वी एक रक्कमी अदा करण्यात यावी.

७. दिपावली भेट संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुली करण्यात येईल.

सदर खर्चाची तरतुद वित्तिय वर्ष २००४—२००५ च्या सुधारित अर्थ संकल्पात करण्यात येईल.

उपरोक्त सर्व बाबींच्या अधिन राहून महापालिकेच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा—यांना वर्ष २००३—२००४ साठी दिपावली भेट म्हणुन रूपये. ४०००/— प्रति कर्मचारी देण्याचे प्रस्तावास मा. महासभेची मान्यता मिळणेसाठी सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र ५१** दिनांक:—१९/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या, शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवरील व प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी / कर्मचा—यांना सन २००३—२००४साठी दिवाळी निमित्त रू. ४०००/— प्रति याप्रमाणे देण्यास कार्योत्तर मंजुरी देत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः— वि  ाय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:— श्री.सु.के.बनसोडे यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

काही विपक्ष सदस्य :—पास. पास.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—डिफर करा.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः—मा. महापौरजी ही जी नेमणुक आहे ती किती कालावधी करिता आहे. जरा सांगा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः—डिफर कशाला वि  ाय? पास पास?

मा. सदस्य श्री. रामदास उमापः—वि  ाय डिफर नाही झाला पाहिजे पाहिजे तर वोटींग करा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—डिफर करायला काही तरी कारण सांगा एकतर नेमणुकीचा कालावधी आहे. मतदान घ्या वाटल्यास.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः—श्री. बनसोडे हे मागासवर्गीय असुन तुम्ही वि  ाय डिफर करता. मागासवर्गीय कुठला अधिकारी आला असेल आणि जाणुन बुजुन जर तुम्ही डिफर करत असाल तर हा मागासवर्गीयांवर जाणुन बुजून अन्याय करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—पास. पास.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—पास. नाहीतर वोटींग घ्या.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—पास करा.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>मा. महापौर महोदया, या महापालिकेत जवळ जवळ दोन व  र्ा मुख्य लेखा परीक्षकाचे पद रिक्त होते. महापालिकेला जर स्वतःचे लेखा परिक्षक नियुक्त करायचे होते. सेक्शन ४५ नुसार अधिकार महापालिकेला आहेत. त्यानंतर जर राज्य   ाासनाने प्रशासनाच्या विनंती वरून जर कुणाला इथे प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे. तर त्याच्या नियुक्तीला मान्यता घेण्याची देखिल गरज नसते. आम्ही विचार केला की, सेक्शन ४५ चे अधिकारी आहेत.   ाासनाचे आदेश असुन देखिल संकेत आहे की त्यांना महापालिकेची मान्यता घ्यायची आहे. व यामुळे मान्यतेसाठी म्हणुन प्रस्ताव तुमच्या समोर मांडला आहे. जर या प्रस्तावाबाबत आपणांस काही हरकत असेल तर हा प्रस्ताव इथे मंजुर होत नाही. तर तो प्रस्ताव मी पुन्हा परत घेईन. परत याकरिता घेतो कारण की, महासभेच्या मान्यतेची गरजच नाही. राज्य   ाासनाने त्यांना पाठवले आहे.

**मा. सदस्या श्रीमती सीमा मोकल हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u>तुम्ही प्रस्ताव आणला का?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—</u>तुम्ही इथे प्रस्ताव आणलात कशाला?आमची मत आहेत ना काही?

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>मी प्रस्ताव मागे जरी घेतला तरी मी त्यांना पुन्हा परत पाठवणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>वोटींग करा प्रस्ताव आणलात तरी कशाला?

<u>मा. महापौरः—</u>जर विरोधी पक्ष नेता व सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे पास करा तर पास करायला काय हरकत आहे? सदनाचे म्हणणे आहे पास करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी आता कायदा सांगितला. त्याबाबतीत मी इथे काही गो  टी मांडु इच्छितो. बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये ही तरतुद आहे की कोणत्याही विशे  ा कार्यकारी अधिकारीला जर ठेवायचे असेल, किंवा कोणताही अधिकारी प्रतिनियुक्तीवर येतो. आयुक्तांनी सहा महिन्याच्या आत त्याच्या नियुक्ती वि  ायी स्थायी समितीची मान्यता घ्यायची आहे एका व  ार्साठी. दोन व  ार्साठी महासभेची मान्यता घ्यायची आहे. आज श्री. एस. के. सेठ यांना इथे येवून दिड व  र्ा झाले. तुम्ही कायदा सांगता.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>हरकतीचा मुद्दा आहे. मा. महापौर महोदया, या वि  ायी जर काही माहिती हवी असेल तर प्रश्न विचारा लिखित स्वरूपात तुम्हाला याची माहिती मिळेल. आता सभागृहासमोर जो प्रस्ताव प्रशासनातर्फे आला आहे व ज्यामध्ये मान्यता देणे ही औपचारीकता आहे. त्याला डिफर करणे किंवा नामंजुर करणे हे येतच नाही. आपणांस मी उच्च न्यायालयाची एक जजमेंट देईन ज्यामध्ये स्प  टपणे लिहिले आहे की, बडोदा महानगरपालिके बाबतीत आहे की ॲपरूव्हल ऑफ दी म्युनिसिपल कार्पोरेशन इज निअरली अ फॉरमेलीटी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>नाही साहेब ते वेगळे आहे मी तो कायदा तुम्हाला सांगतो. महासभा डिफर करू   ाकते.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>आता तुमच्या पुढे जो वि  ाय आहे त्यासाठी तीन उपाय आहेत. एक तर तुम्ही मंजुर करा, किंवा नामंजुर करा. त्या व्यतिरिक्त प्रशासनाकडे एक उपाय आहे प्रस्ताव माघारी घेणे. मी हा प्रस्ताव मागे घेवू इच्छितो.

<u>मा. महापौरः–</u>कोणी अधिकारी आले तर सदनाची परवानगी घेतात. श्री.एस. के.सेठ यांना दिड व  र्ा झाले............सदनाचे म्हणणे आहे तर श्री. बनसोडे यांचा वि  ाय पास केला जावा. पास करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>आयुक्त साहेबांनी जो कायदा सांगितला तो कायदा मी तुम्हाला सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः–</u>वोटींग करा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः–</u>वोटींग करा.

<u>मा. सदस्य श्री.राजेद्रसिंह भुल्लरः–</u>महापौरांनी सांगितले पास तर वि  ाय संपला.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>असे होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः–</u>हा महापौरांचा अपमान आहे.

<u>मा. महापौरः–</u>जर सर्वांचे मत आहे पास करा तर पास कले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>असे नसते. पाच–सहा जण उठुन उभे आहेत मी सांगतो. आयुक्तांनी जे तीन कायदे सांगितले. एक तर............

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'–</u>मा. महापौरजी, तुम्ही एकदा निर्णय दिल्यावर त्यावर चर्चा कशाला?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः–</u>आम्हाला तुमचे म्हणणे ऐकायचे नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'–</u>वोटींग घ्या. सचिव साहेब कायदा सांगा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः–</u>ऐका आता कायदा.

<u>मा.सचिवः–</u>मा. आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे मला प्रस्ताव मागे घेण्याची परवानगी दया मी प्रस्ताव मागे घेतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः–</u>महासभा आयुक्तांचे आदेशान्वये चालते का?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः–</u>पीठासीन अधिकारी सांगतील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः–</u>पीठासीन अधिकारींनी निर्णय दिल्यावर आयुक्त साहेबांचे आदेश चालतील का?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—महापौर निर्णय घेतील आयुक्त नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—सचिव साहेब पॉलीसी नका करू.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर / मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—वोटींग घ्या, वोटींग.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—यापुढे एक पण प्रस्ताव आला नाही पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—वोटींग घ्या.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—सत्ताधारी म्हणतात वोटींग घ्या, वोटींग घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—कायदा सांगा कायदा.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—वनवारी साहेब विरोध करतात कारण काय?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—आयुक्त साहेब पीठासीन अधिकारींनी सांगितले नाही कुणाच्या हाताखाली

सभा चालवितात.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—महापौर मॅडम, इथे जे अधिकारी येतात त्यांचा चेहरा, भा ा बघुन जर नियुक्ती करत असतील तर ते चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—याच्यापुढे एकाही अधिका—याचा प्रस्ताव येवू दयायचा नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—ही चुकीची पध्दत आहे आम्ही याचा विरोध करतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—चुकीची प्रथा आहे, एखादे पद रिझर्व्ह ठेवण्यासाठी दुस—या अधिका—यावर अन्याय करायचा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—महापौर महोदया, सचिवजी....

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—सचिवजी, महापौरांनी निर्णय दिल्यावर आयुक्त मागे घेवू ाकतात का? आधी हे सांगा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः—वोटींग घ्या, वेटींग.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—महापौरांनी निर्णय दिल्यावर त्यावर फक्त वोटींग होवू ाकते. त्यांनी पास म्हंटल्यावर काय झाले पाहिजे ते सांगा.

मा. महापौरः—श्री. बनसोडे यांनी असा काय गुन्हा केला तुम्ही पास करत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—वोटींग करा.

मा. महापौरः—ते मागासवर्गीय आहेत म्हणुन का इतर कोणत्या कारणामुळे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—राजनीती करू नका कायदा विचारा.

मा. महापौरः—कायदयाच्या बाहेर नाही. कायदयानुसार ते आले आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—महापौरजी, मी सांगतो कायदा तुम्हाला. आयुक्त साहेब........

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—सचिव साहेब........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—तुमचा कायदा कोणाकडे जावून वाचायची आम्हाला गरज नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—महापौरजी, सचिवजी, आयुक्त साहेब यात दोन तीन गो टी आहेत. एक तर आयुक्त साहेबांनी जे सांगितले ते एकदा का वि ाय सदनाच्या पटलावर आला. आयुक्त साहेब तुम्ही ऐका. जेव्हा वि ाय कार्यसूचीवर येतो तेव्हा ती सदनाची संपत्ती असते. ही आता तुमची संपत्ती नाही. मंजुर नामंजुर करण्याचा अधिकार सभागृहाचा आहे. आणि त्याशिवाय दुसरी गो ट महत्वाची महापौर महोदयांनी हे सांगितले की हे मंजुर करा. तर मंजुर करा नाहीतर वोटींग घ्या.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः—पीठासीन अधिकारी यांनी सांगितले ना तो अंतिम निर्णय.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—सभागृहाचे मत आहे वोटींग करा. मग तुम्ही मतदान का घेत नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—महापौर महोदया, आजपर्यंत एकाही अधिका—याच्या बाबतीत असे घडले नाही. वि ाय डिफर कसा करतात हे समजत नाही. त्याला बेस काय? कारण काय?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर / मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—कारण सांगा कारण.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—यातुन काहीतरी वेगळाच तर्क निघतो असे आम्हाला वाटते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—सचिव साहेब मला असे वाटते की, श्री. बनसोडे साहेब हे सत्ताधारी पक्षांना भेटून नाही आले.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः'—अधिकारी मागासवर्गीय आहे म्हणुन विरोध करता का?

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः—मागासवर्गीयांचे तुम्ही प्रतिनिधीत्व करत असाल...

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>बहुतेक श्री. किशोर वनवारी यांना हे भेटुन नाही आले. अधिकारींनी विचार केला पाहिजे.श्री. किशारे वनवारींना तर कमीत कमी भेटुन यायला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>हा मागासवर्गीयांवर होणारा अन्याय आहे. डिफर जर करत असाल तर हा सत्ताधारी पक्षाचा अन्याय आहे. तसे होत असेल तर तुम्हाला इथे राहायचा हक्क नाही.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:—</u>किशोर वनवारीजी तुम्ही विरोध का करता याचे कारण सांगा.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>महापौर महोदया,.....

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:'—</u>महापौरजी, तुम्ही वोटींग घ्या.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>महापौर महोदया, सभागृहात जर चार सदस्य एखादया वि  ायावर मतदानाची मागणी करतात तर नियमानुसार वोटींग घेतली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>हे एकदम चुकीचे आहे. असे नसते.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>वोटींग घ्यायची हा नियमच आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>ते म्हणतात डिफर करा, आम्ही म्हणतो मंजुर करा. महापौर मॅडम तुम्ही वोटींग करा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>हा वि  ाय डिफर करण्याचा सत्ताधारी पक्षाने जो निर्णय घेतला तो पुर्णपणे चुकीचा आहे. मागासवर्गीयांवर अन्याय करणारा हा निर्णय आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, महापौरांनी याठिकाणी सांगितले की, श्री. बनसोडे साहेब हे कुठले गुन्हेगार नाहीत. एवढे सांगितल्यानंतरही सत्ताधारी पक्ष ऐकत नाही. पण अनिल खतुरानी सारखा गुन्हेगार ज्याच्यावर काही केसेस होत्या त्याला सुध्दा सत्ताधारी पक्षाने सोडण्यास सांगितले आहे ही फार दु:खाची बाब आहे. याठिकाणी आमच्या भारतीय जनता पार्टी व शिवसेने तर्फे एकमताने मतदान तरी घ्या किंवा पास करा.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:—</u>पीठासीन अधिकारींचा निर्णय ऐका.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>मा. महापौरजी, यांचे म्हणणे आहे डिफर करा, आमचे म्हणणे आहे पास करा. तुम्ही वोटींग घ्या.

<u>मा. सचिव:—</u>मा. महापौरांच्या आदेशान्वये मी सूचित करतो की, जेव्हा एखादा वि  ाय महासभेपुढे आला की तो महासभेची संपत्ती होते. परंतु त्याचा निकाल करण्यासाठी तीन उपाय असतात. एक तर आपण मंजुर करा, दुसरे नामंजुर करा. तिसरे डिफर किंवा वगळा. यावेळी मा. आयुक्तांनी आपल्या समोर मांडले आहे की हा प्रस्ताव ते माघारी घेवू इच्छितात त्यासाठी तुमची परवानगी हवी. निर्णय कसा घ्यायचा आहे

तुम्हाला ठरवायचा आहे. मंजुर करायचे, नामंजुर करायचे का वगळायचे. मा. महापौरांना जो निर्णय घ्यायचा असतो तो बहुमताच्या आधारावर घ्यायचा असतो. जर आपणांस वाटत असेल तर मतदान घेतले जाईल.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आमचे म्हणणे आहे डिफर करा. तुम्ही वोटींग घ्या.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव मतदानासाठी टाकत आहे.

मा. सचिवः—जे सदस्य हा प्रस्ताव डिफर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत. ३२ मते

१ श्रीमती. रामचंदानी भावना
२ श्री. लिंगे सुर्यकांत
३ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४ श्री. ऐडके गणपत
५ श्रीमती. शर्मा कमला
६ श्री. वलेचा पृथ्वी
७ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
८ श्री. गुप्ता प्रभुनाथ
९ श्री. पवार नाना
१० श्रीमती आहुजा निता
११ श्री. निकम शांताराम
१२ श्री. ठाकुर विनोद
१३ श्रीमती. सोनेजी मीना
१४ श्रीमती मंसद माया
१५ श्रीमती. वनवारी मोना
१६श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्रीमती रेखा कारीरा
२० श्री. पमनानी ईश्वर
२१श्री. पंजाबी नारायण
२२ श्रीमती पंजाबी दिपा
२३ श्री. साधवानी मनोज
२४ श्रीमती भठिजा कोमल
२५ श्री. लबाना होशियारसिंग
२६ श्री. तलरेजा विनोद
२७ श्रीमती. रिझवानी सुजाता
२८ श्रीमती. छाब्रिया भारती
२९ श्री. संजय बठिजा
३० श्रीमती. दासानी मिनु
३१श्री. जाधव प्रशांत
३२श्रीमती करोतिया मालती

मा. सचिवः—जे सदस्य हा प्रस्ताव डिफर करण्याच्या विरूध्द आहेत व हा प्रस्ताव मंजुर करू इच्छितात त्यांनी हात वर करावेत. १८ मते.

६ श्री. भालेराव गौतम
७ श्री. टाले प्रमोद
८ श्रीमती. जावळे संगिता
९ श्री. उमाप रामदास
१० श्री. पुरस्वानी जमनादास
११ श्री. रूपचंदानी बच्चाराम
१२ श्री.राज असरोंडकर
१३ श्रीमती. कृष्णानी रेखा
१४ श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
१५ श्री. सोनावणे नथु
१६ श्री. गायकवाड दिलीप
१७ श्रीमती माने किरण
१८ श्री. चव्हाण रमेश
१९ श्री. धनंजय बोडारे
१५ श्री. पाटील विश्वनाथ
१६ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१७ श्री. चौधरी राजेंद्र
१८ श्रीमती. सुर्वे जयश्री

काही विपक्ष सदस्यः—महापौरांचे मत?

मा. सचिवः—त्यांनी सत्ताधारी पक्षाच्या बाजुने केले आहे.

मा.महापौरः—सदरचा प्रस्ताव बहुमताने वगळण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:— श्री.सु.के.बनसोडे यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

प्रस्तावनाः—

उपरोक्त लिखित विषयासंबंधी सदनातील उपस्थित सत्ताधारी सदस्यांची अशी सूचना आहे की, सदरचा विषय कार्यसूचीवरून वगळण्यांत यावा तर विरोधी पक्षातील सदस्यांची सदरचा विषय मंजुर करण्यात यावा वगळण्यात येवू नये अशी भुमिका आहे. त्यामुळे दोन्ही पक्षाच्या परस्पर विरोधी भुमिकेमुळे सदर विषय वगळावा किंवा कसे याबाबत मतदान घेणे आवश्यक आहे. त्याअर्थी मतदानासाठी व योग्य निर्णयासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव कृ. ५१ (अ) दिनांकः—१९/११/२००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मतदानाच्या निकालाप्रमाणे आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून विषय क्र. ४ वगळण्यास संमती देत आहे.

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:— वि  ाय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५:— महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्लॉट क्र १२९, चालता नं ३, शिट नं १३, कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे

काही सत्ताधारी सदस्य :—पास. पास.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—नाही. नाही. असे कसे पास? काही बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—पुर्ण  ाहराचे करा एकाचे का आणले आहे? अशी काय खास गो  ट आहे. पास काय म्हणता, टेबलाखालुन माल मिळाला आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—पास.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सेटींग झाली आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—हे धंदे आम्ही नाही करत सेटींगचे . कोण करते हे सर्वांना माहित आहे. प्रत्येक भुखंडाचे तंटे कोण आणते. पुर्ण उल्हासनगरला माहित आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—सभागृह नेताजी सभेचा मान ठेवा.

मा. सचिव:—जे प्रस्ताव मंजुर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत. ३५ मते.

१ श्रीमती. रामचंदानी भावना
२ श्री. लिंगे सुर्यकांत
३ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४ श्री. ऐडके गणपत
५ श्रीमती. शर्मा कमला
६ श्री. वलेचा पृथ्वी

७ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
८ श्री. गुप्ता प्रभुनाथ
९ श्री. पवार नाना
१६ श्रीमती आहुजा निता
१७ श्री. निकम शांताराम
१८ श्री. ठाकुर विनोद
१९ श्रीमती. सोनेजी मीना
२० श्रीमती मंसद माया
२१ श्रीमती. वनवारी मोना
१६श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्रीमती रेखा कारीरा
२० श्री. पमनानी ईश्वर
२१श्री. पंजाबी नारायण
२५ श्रीमती पंजाबी दिपा
२६ श्री. साधवानी मनोज
२७ श्रीमती भठिजा कोमल
२५ श्री. लबाना होशियारसिंग
२६ श्री. तलरेजा विनोद
२७ श्रीमती. रिझवानी सुजाता
३० श्रीमती. छाब्रिया भारती
३१ श्री. संजय बठिजा
३० श्रीमती. दासानी मिनु
३१श्री. जाधव प्रशांत
३२श्रीमती करोतिया मालती
३३श्री. टाले प्रमोद
३४श्री. भालेराव गौतम
३५श्रीमती अनिता गुप्ता

मा. सचिवः—जे प्रस्ताव मंजुर करण्याच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. १६ मते.

१ श्रीमती. जावळे संगिता
२ श्री. उमाप रामदास
३ श्री. पुरस्वानी जमनादास
४ श्री. रूपचंदानी बच्चाराम
५ श्री.राज असरोंडकर
६ श्रीमती. कृष्णानी रेखा
७ श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८ श्री. सोनावणे नथु
९ श्री. गायकवाड दिलीप
१० श्रीमती माने किरण
११ श्री. चव्हाण रमेश
१२ श्री. धनंजय बोडारे
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद्र
१६ श्रीमती. सुर्वे जयश्री

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढील प्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५ः— महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे

कलम ३७ अन्वये प्लॉट क्र १२९, चालता नं ३, शिट नं १३, कॅम्प नं ४ या जागेवरील (ट्रेंचिंग ग्राऊंड) मंजुर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारुप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देणे

प्रस्तावना:—

प्लॉट नं. १२९, चालता नं. ३, शिट नं. १३, कॅम्प नं.४ या जागेवरील (सार्वजनिक उपयोगासाठीचे) मंजूर विकास योजनेतील आरक्षण वगळुन प्रारूप विकास योजनेमधील रहिवास विभागात वर्ग करणेबाबत एम.आर.टी.पी. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव या कार्यालयाकडुन शासनास ६० दिवसांच्या आत सादर करणेबाबत शासनाकडील दि. ८.३.२००४ च्या पत्रान्वये आदेश पारीत केले आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

अर्जदार श्री. भिमा बाबु कडु यांनी प्लॉट नं. ३, शिट नं. १३, उल्हासनगर—४ या जागेमध्ये बांधकाम करण्यासाठी अर्ज या कार्यालयास दि. २१.१.२००२ रोजी सादर केला होता. अर्जदाराने सादर केलेल्या प्रकरणामधील सर्व कागदपत्रांची पूर्तता करून व पडताळणी करताना उल्हासनगर शहराच्या मंजूर विकास योजनेत सदर जागा आ. क्र. १८० ट्रेचिंग ग्राऊंडसाठी आरक्षित या क्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याने सदर बांधकाम परवानगी अर्ज या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/सामान्य /१५९/०१ दि. २२.१.२००२ च्या पत्रान्वये विकास परवानगी नाकारण्यात आली. त्याविरूध्द अर्जदाराने मा. उच्च न्यायालय याचिका क्र. ९३९/२००३ दाखल केली होती. सदर याचिकेवर दि. ३.६.२००३ रोजी निर्णय देण्यामध्ये अर्जदारास एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ४७ अन्वये अपील दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले होते. अर्जदाराने एम.आर.टीचपी. ॲक्ट १९६६ चे कलम ४७ अन्वये शासनास दि. १.७.२००३ रोजी अपील दाखल केल्यानंतर सदरहु अपीलाची सुनावणी मा. राज्यमंत्री यांचे दालनात दि. २९.१.२००४ रोजी झाली. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

अर्जदाराची जागा मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षणामध्ये असली तरी सुधारीत विकास योजनेमध्ये रहिवास विभागात समाविष्ट आहे. सद्यस्थितीत सुधारीत विकास योजना मंजुर होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे व तो मंजुर होईपर्यंत अर्जदारास त्याठिकाणी विकास करता येणार नाही. ही बाब अर्जदारावर अन्यायकारक आहे. त्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही करून फेरबदल प्रस्ताव शासनास पुढील कार्यवाहीसाठी ६० दिवसांच्या आत सादर करण्यात यावा.

दरम्यानच्या कालावधीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उल्हासनगर शहराची प्रारूप विकास योजना दि. २०.२.२००४ रोजी शासनाच्या राजपत्रात एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ च्या कलम २८ (४) अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर नकाशा जनतेच्या माहितीसाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे मुख्य कार्यालयात प्रसिध्द करण्यात आला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन शासनाचे आदेशानुसार एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण बदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावे किंवा कसे याबाबत विचार विनिमय होणेसाठी, महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेबाबत सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र. ५२ दिनांक:—१९/११/२००४.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज साधवानी

ही महसभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कायदयाच्या पूर्ततेच्या अधीन राहुन उल्हासनगर ४ येथील प्लॉट क्र. १२९, चालता क्र. ३, शिट क्र. १३, साईट क्र. १८० या जागेवरील मंजुर विकास योजनेतील ट्रेचिंग ग्राऊंड हे आरक्षण वगळुन सुधारित प्रारूप विकास योजने मधील रहिवास विभागात वर्ग करण्यास मान्यता देत आहे.

सुचकांची सही/—

अनुमोदकांची सही/—

बहूमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः— वि  ाय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:— अंध, अस्थीव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा—या महापालिका कर्मचा—यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे वाहन भत्ता देणे मान्य करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मला माहित पडले आहे अजुन एक जी.आर. आला आहे त्यात यांना अजुन लाभ मिळणार आहेत. त्याचा त्यांना दुप्पट फायदा होईल मग हे आता कशाला पास करायचे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—शासन निर्णय कुठे आहे? दाखवा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—आता हे पास करा. नंतर पुन्हा ते आणा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—दुस—या जी. आर.नुसार त्यांना दिड पट फायदा होईल.

श्री. लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—मा. महापौर महोदया, सदनासमोर जो प्रस्ताव आला आहे. पेमेंट मध्ये जे बेनिफीट दयायचे आहे. तो वेतनाचाच एक भाग आहे. महापालिका अे ग्रेडमध्ये येते त्यांच्या बेसिक नुसार म्हणजे ६,५००—१०,५०० या बेसिकच्या खाली वेतन घेणारे कर्मचारी त्यांना ५००/— रू. स्केलमध्ये दयायचे आहे. सभागृह नेता म्हणतात त्याप्रमाणे नविन जर आदेश आले असतील ते अदयाप

आमच्याकडे आले नाहीत. जे आदेश आम्हाला ाासनाकडुन मिळाले ते आम्ही सदनासमोर ठेवले आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—नविन आदेश आले आहेत.

श्री. लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—आमच्या हातात अजुन आले नाहीत. जे सदनासमोर ठेवले आहे तेच आहे. नविन ाासनाचे आदेश आले की ते पण सदनासमोर ठेवले जातील.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—आम्हाला माहित पडले आहे की, नव्या ाासन निर्णयानुसार त्यांना साडे आठ हजार रूपये मिळणार आहेत. माझी सदनाला विनंती आहे की, पुढच्या महिन्यात जो जी. आर मिळेल. त्यामध्ये त्यांना साडे सहा हजारा ऐवजी साडे आठ हजार रूपये मिळणार आहेत. साडे आठ हजार रूपये पास करणे योग्य आहे. आमचे असे मत आहे. सदनाने ठरवावे.

श्री. लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—वाहनभत्ता आहे हजारात नाही ५००, ८०० रूपये असे होवू ाकतो. आठ हजार, सहा हजार नसतील. वाहनभत्ता एवढा नसतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—उदया मी मंत्रालयात जाणार आहे. मी तो ाासन निर्णय घेवून येईन.

श्री. लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—ठिक आहे आम्ही सदनासमोर हे मांडले आहे नविन आल्यावर तो पण घेवू.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—सचिव साहेब, एक चूक झाली आहे. डिफर करण्यासाठी किती मतदानाची आवश्यकता आहे उपस्थित सदस्यांपैकी? इकडे १८ आहेत तुम्ही १६ मोजले आहेत. इथे आधी जो वि ाय होवून गेला डिफर करण्यावि ायी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—श्री. बनसोडे साहेबांचा वि ाय होता.तिथे १६ नाही १८ आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—वि ाय डिफर करण्यासाठी किती गणपुर्तीची आवश्यकता आहे?

मा. सचिव:—१६ आपले आणि श्री. प्रमोद टाले व श्री.गौतम भालेराव हे दोन मिळुन १८ होतात बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—तिथे ३२ इथे १८.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—डिफर होण्यासाठी किती गणपुर्तीची आवश्यकता आहे?

मा. सचिव:—साधारण बहुमत पाहिजे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—२/३ गणसंख्या पाहिजे.

<u>मा. सचिव:—</u>नाही. नाही, साधारण बहुमत पाहिजे.

<u>**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**</u>पास. पास.

<u>**मा. सचिव:—**</u>जास्त जर लाभ मिळत असेल तर ठिक आहे ना?

<u>**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—**</u>ते नंतर आणा ना.

<u>**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**</u>ते नंतर आणा ना प्रशासनाला माहित नाही कधी येणार हे म्हणतात येणार आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**</u>सचिव साहेब, आता ठराव पास झाल्यावर त्यांना जर अजुन फायदा मिळत असेल तर ठराव आणता येणार नाही का?

<u>**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:—**</u>आता जे मिळते ते मंजुर करा. नंतर आल्यावर पुन्हा आणा.

<u>**मा. सचिव :—**</u> जे हा प्रस्ताव डिफर करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत. ३५ मते..........

१. श्रीमती. रामचंदानी भावना
२. श्री. लिंगे सुर्यकांत
३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४ श्री. ऐडके गणपत
५ श्रीमती. शर्मा कमला
६ श्री. वलेचा पृथ्वी
७ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
८ श्री. गुप्ता प्रभुनाथ
९ श्री. पवार नाना
१०श्रीमती आहुजा निता
११श्री. निकम शांताराम
१२श्री. ठाकुर विनोद
१३श्रीमती. सोनेजी मीना
१४श्रीमती मंसद माया
१५श्रीमती. वनवारी मोना
१६श्री. वनवारी किशोर नारायणदास
१७ श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१८ श्री. लुंड गोविंदराम
१९ श्रीमती रेखा कारीरा
२० श्री. पमनानी ईश्वर
२१श्री. पंजाबी नारायण
२८ श्रीमती पंजाबी दिपा
२९ श्री. साधवानी मनोज
३० श्रीमती भठिजा कोमल
२५ श्री. लबाना होशियारसिंग
२६ श्री. तलरेजा विनोद
२७ श्रीमती. रिझवानी सुजाता
३२ श्रीमती. छाब्रिया भारती
३३ श्री. संजय बठिजा
३० श्रीमती. दासानी मिनु
३१श्री. जाधव प्रशांत
३२श्रीमती करोतिया मालती

३३श्री. टाले प्रमोद
३४श्री. भालेराव गौतम
३५श्रीमती अनिता गुप्ता

<u>मा. सचिव :—</u> जे हा प्रस्ताव डिफर करण्याच्या विरोधात आहे व मंजूर करण्याच्या बाजूने आहे त्यांनी आपले हात वर करावेत. १६ मते...........

१.श्रीमती. जावळे संगिता
२.श्री. उमाप रामदास
३.श्री. पुरस्वानी जमनादास
४.श्री. रूपचंदानी बच्चाराम
५. श्री.राज असरोंडकर
६. श्रीमती. कृष्णानी रेखा
७. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
८. श्री. सोनावणे नथु
९. श्री. गायकवाड दिलीप
१०.श्रीमती माने किरण
११.श्री. चव्हाण रमेश
१२.श्री. धनंजय बोडारे
१३ श्री. पाटील विश्वनाथ
१४ श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१५ श्री. चौधरी राजेंद्र
१६श्रीमती. सुर्वे जयश्री

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने वगळण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ६:—</u> अंध, अस्थीव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा—या महापालिका कर्मचा—यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे वाहन भत्ता देणे मान्य करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उपरोक्त लिखित विषयासंबंधी सदनातील उपस्थित सत्ताधारी सदस्यांची अशी सूचना आहे की, सदरचा विषय कार्यसूचीवरून वगळण्यांत यावा तर विरोधी पक्षातील सदस्यांची सदरचा विषय मंजुर करण्यात यावा वगळण्यात येवू नये अशी भुमिका आहे. त्यामुळे दोन्ही पक्षाच्या परस्पर विरोधी भुमिकेमुळे सदर विषय वगळावा किंवा कसे याबाबत मतदान घेणे आवश्यक आहे. त्याअर्थी मतदानासाठी व योग्य निर्णयासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५२ (अ)** **दिनांक:—१९/११/२००४.**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मतदानाच्या निकालाप्रमाणे आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून विषय क्र. ६ वगळण्यास संमती देत आहे.

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>कृपया रा ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४. ४५ वाजता सभेचे कामकाज दि. ३०.१२.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत स्थगित केल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–१८/१२/२००४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/१२/२००४ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १८.१२.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :– श्रीमती. मालती करोतिया
२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३४. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३५. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३६. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३८ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४१ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्री. विनोद तलरेजा |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५७. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. मोहन साधवानी | ६०. | श्री. बेहरानी मोहन |
| ३०. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६१ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम | ६२ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ६३ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६४. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु बाबु, २. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ३. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ४. श्री. नाना आनंदा पवार, ५. श्री. शांताराम निकम, ६. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ७. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ८. श्री. सुरेश जाधव, ९. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, १०. श्री. रामरख्यानी मोहनदास ११. श्रीमती किरण लखी माखिजा, १२. श्री. साधवानी मनोज लालचंद, १३. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, १४. श्री. बेहरानी ठाकुरदास , १५. श्री. हरदास माखिजा, १६. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश, हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ .३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—मा.महापौरजी, सभा सुरू होण्यापुर्वी माझी आपणांस एक विनंती आहे की, मराठी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार, महान कलाकार श्री. लक्ष्मीकांत बेर्डे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. हिंदी चित्रपटात सुध्दा त्यांनी अत्यंत चांगली भुमिका वठवली असे महान कलाकार यांना श्रध्दांजली अर्पित करावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मी पण हेच म्हणु इच्छितो की आमचे उप लेखापाल श्री. ईश्वर रामचंदानी यांचे देखिल निधन झाले असुन त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—या श्रध्दांजली सोबत एक विनंती करतो की, त्यांच्या मुलाला इथे कामावर ठेवले तर हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

शोक प्रस्ताव

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना एकदा एक पत्र दिले होते की,...

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—सभागृह नेताजी एक मिनिट.मी तुम्हाला विनंती करतो तुमचा विषय दुसरा आहे. अभिनंदनासाठी उल्हासनगरचे एक रहिवासी श्री. रामनाथ दादा मोते, ५६ वर्षात पहिल्यांदा असे झाले आहे की, उल्हासनगरचा रहिवासी शिक्षक मतदार संघ कोकण विभागातुन विधान परिषदेसाठी सदस्य म्हणुन निवडुन आले आहेत. आपण त्याचे अभिनंदन करू. तरी अभिनंदन ठराव करण्याचे सुचित करतो.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—त्याच बरोबर आमचे श्री. मोकल साहेब हे राष्ट्रवादी पक्षातर्फे निवडुन आले आहेत. त्यांच्यासाठी देखिल अभिनंदन प्रस्ताव पास करण्यात यावा व सर्वांचे तोंड गोड करण्यात यावे. आता जो मी विषय घेत आहे. आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो की, यावर्षी जी घरपावती आहे. महासभेत सर्व पक्षांतर्फे सर्व संमतीने ठराव पास करण्यात आला होता की, घरपावतीचे जे दर आहेत. जे जुने आहेत तेच लागु होतील. परंतु यावेळी दर वाढवुन जी बिले पाठवुन गेली आहेत. जर ते वृध्दीदराने लावले गेले असतील तर येणा—या महासभेत मी व आमचे जितके नगरसेवक आहेत ते सर्व जमिनीवर बसतिल व तोपर्यंत जमिनीवरून नाही उठणार जोपर्यंत जुन्या दराने कर पावती पाठवत नाहीत. करात जी दरवाढ करण्यात आली आहे ती रद्द करण्यात यावी नाहीतर तोपर्यंत आम्ही जमिनीवर बसु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—यापुर्वी देखिल आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी जर तुम्ही आम्हाला सहकार्य दिले असते तर बरे झाले असते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौरजी आताच लोकसभेमध्ये एक प्रस्ताव पास करून एफ—आय चॅनेल चालु गेले. लोकसभेचे थेट प्रक्षेपण पुर्ण देशात

सुरू आहे. तसेच मी आपणांस निवेदन करतो की या महासभेचे थेट प्रक्षेपण सुरू करण्यात यावे. जेणेकरून या शहरातील सत्ताधारी व विपक्ष पक्ष कशात—हेने काम करत आहे हे शहराची जनता पाहु शकेल. मी आपणांस निवेदन करतो की, लोकसभेचे थेट प्रक्षेपण जसे सुरू करण्यात आले आहे. कमीत कमी इथे टीव्ही चॅनेल व्दारा थेट प्रक्षेपण करून या शहरात काय काय घटना होतात हे पाहु शकतील. असे मी आपणांस निवेदन करतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—रद्द करा रद्द करा, करवृध्दी रद्द करा. लोकांवर अन्याय चालणार नाही, चालणार नाही.

इकडे सत्ताधारी पक्षातील सदस्य अशा घोषणा देत खाली जमिनीवर धरणे धरून बसले.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब मी तुमच्या हे लक्षात आणुन देवू इच्छितो की, सत्ताधारी पक्षातील लोक आमच्या समोर खाली जमिनीवर बसले आहेत हे योग्य वाटत नाही. तुम्ही सत्ता चालवत आहात. तुमचा जो अनुभव आहे आणि हे जे अभियान चालु आहे. त्यानुसार सत्ता चालविण्याचा अनुभव आम्हाला चुकीचा वाटतो. करवाढ नाही झाली पाहिजे असा विरोध विरोधी पक्षाने केला होता. आमचेच अनुकरण करून यांनी असे जमिनीवर बसणे, असे प्रदर्शन करणे योग्य नाही. सत्ता चालविण्याचा योग्यतेचा हा विषय नाही.

मा. महापौर:—मी आयुक्त साहेबांना आदेश देते की त्यांनी उत्तर दयावे.

काही सत्ताधारी सदस्य:—आम्ही केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—मा. महापौरजी, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब हा विषय आम्ही उपस्थित केला होता. चार महिने अगोदर देखिल जेव्हा आयुक्तांनी उत्तर दिले होते मी अमान्य करेल त्यावेळी देखिल आम्ही हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता की हे जे काम होत आहे ते चुकीचे आहे. आम्ही भले यांच्या आंदोलनाशी सहमत नाही. परंतु हा आमचाच मुद्दा होता. त्यावेळी तुम्ही आम्हाला पाठिंबा नव्हता दिला. तरी पण आम्ही या विषयाला संपुर्णपणे पाठींबा देत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—सहकार्य दया, सहकार्य दया. सत्ताधारी पक्षांना साथ दया. हा शहराच्या हिताचा प्रश्न आहे. खुर्ची सोडुन खाली बसा.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—तुम्ही साथ मागितली नव्हती, आम्हाला कुणाला विश्वासात घेतले नव्हते. तुम्ही आधीच आम्हाला विश्वासात घ्यायला पाहिजे होते. आम्ही तुमच्या सोबत राहिलो असतो. मी आतापण तुमच्या सोबत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौरजी, हा प्रस्ताव सर्वसंमतीने इथे पास झाला होता. तरी पण जर प्रस्ताव पास होत नाही तर हा महासभेचा अपमान आहे. जोपर्यंत ही करवाढ संपत नाही. तोपर्यंत शिवसेना व भाजपा पक्ष सभात्याग करतील.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—आम्ही सुध्दा सभात्याग करतो.

इथे भाजपा शिवसेनेचे व कॉंग्रेसचे उपस्थित सर्व सदस्य सभागृहा बाहेर गेले.

इकडे सत्ताधारी सदस्य टॅक्स वृध्दा रद्द करा, रद्द करा अशा घोषणा देत होते.

मा. महापौरः—मी अर्ध्या तासासाठी ही सभा स्थगित करत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—अर्ध्या तासासाठी सभा स्थगित करण्यांत येत आहे.

इकडे मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.

मा. उपमहापौरः— मी सभागृहातील सदस्यांची भावना लक्षात घेवून सर्व पक्षीय गटनेत्यांची २८ तारखेला महापौरांच्या दालनात या विषयावर चर्चेला बसु. मी सर्व गटनेत्यांना निवेदन करते त्यांनी तिकडे त्यादिवशी उपस्थित राहवे व ही सभा दि. ३०.१२.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत स्थगित करत आहे व श्री. कुमारी यांचे अभिनंदन करते ते महसुल समितीचे सभापती झाले आहेत व ते एन.सी. पी. चे ग्रुप लिडर आहेत त्याबद्दल. पुन्हा एकदा सांगते २८ तारखेला सर्व गटनेत्यांनी महापौरांच्या दालनात चर्चेसाठी उपस्थित रहावे. सूचना पत्र पाठविण्यात येणार नाही. ४ वाजता उपस्थित रहावे. लक्षवेधी व आयत्यावेळच्या विषय दाखल करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयत्यावेळचा विषय नियमित कार्यसूचीवर आणावा.

मा. उपमहापौरः—ठिक आहे. तो नियमित कार्य सूचिवर आणावा. लक्षवेधी स्विकारत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आयत्यावेळचे विषय का नाही?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयत्यावेळचे विषय नियमित कार्यसूचीवर येवू दया. घाई काय आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—फक्त लक्षवेधी स्विकारण्यात येत आहे. आयत्यावेळचे विषय नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

*जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५ .१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.*

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

शोक प्रस्ताव :—

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. २३ (अ) चे नगरसेवक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांची पुतणी कु. विनु. एन. ठाकुर हीचे दि. ७.११.०४ रोजी दु:खद निधन झाले आहे.

त्यांचे कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५० अ दिनांकः—१९.११.२००४.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार कु. विनु एन. ठाकुर हीच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका